# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—२०/१/२००९

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २०/१/२००९ रोजीच्या
सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

१२

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा मंगळवार दिनांक २०/१/२००९ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती निर्मले विद्या विजय हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते/होत्या.

१. महापौर—— श्रीमती निर्मले विद्या विजय

| | | | |
|---|---|---|---|
| २ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | ३३ | श्री. लालबिहारी बुझारत यादव |
| ३ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | ३४ | श्रीमती पंचशिला नाना पवार |
| ४ | श्री. गायकवाड दिलीप | ३५ | श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी |
| ५ | श्री. रविंद्र दशरथ बागूल | ३६ | श्रीमती करोतीया मालती राधाचरण |
| ६ | श्री. रामसागर जनार्दन यादव | ३७ | श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण |
| ७ | श्रीमती निलम प्रेमसिंग रावत | ३८ | श्रीमती बोडारे वसुधा धनंजय |
| ८ | श्री. मोरे भानजी भिकारी | ३९ | कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल |
| ९ | श्री. दत्तात्रय नारायण पवार | ४० | श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे |
| १० | श्रीमती चौधरी राजश्री राजेंद्र | ४१ | श्री. शेखर केशव यादव |
| ११ | श्री. विजय खंडु सुपाळे | ४२ | श्रीमती सुमन गजानन शेळके |
| १२ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ४३ | श्री. प्रशांत किसनराव धांडे |
| १३ | श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान | ४४ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १४ | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी | ४५ | श्री. किशोर जग्यासी |
| १५ | श्रीमती सुजाता रमेश रिझवानी | ४६ | श्रीमती चेनानी ज्योती रमेश |
| १६ | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद | ४७ | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड |
| १७ | श्री. राजू जग्यासी | ४८ | श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी |
| १८ | श्री. राम (चार्ली) पारवानी | ४९ | श्रीमती ज्योती शाम माने |
| १९ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ५० | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २० | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार (कुमारी)केवलराम | ५१ | श्री. ठाकूर विनोद लालसिंग |
| २१ | श्री. भठीजा (बब्बु) संजय | ५२ | श्री. मोहन साधवाणी |
| २२ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे | ५३ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| २३ | श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा | ५४ | श्री. बच्चाराम रूपचंदानी |
| २४ | श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास | ५५ | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| २५ | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती | ५६ | श्रीमती मीना सोनेजी (सोंडे) |
| २६ | श्रीमती शकुंतला पाटील | ५७ | श्रीमती वनवारी मोना अशोक |
| २७ | श्री. मोहन (गारो) रामरख्यानी | ५८ | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी |
| २८ | ॲड. श्री. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी | ५९ | श्री. मुकेश सोहन तेजी |
| २९ | श्री. ढोके जनार्दन किसनराव | ६० | श्री. पाटील प्रधान धर्मा |
| ३० | श्री.एडके गणपत गोविंद | ६१ | श्री. सुनिल साहेबराव गंगवानी |
| ३१ | श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा | ६२ | श्री. राजेश नानीकराम वधारीया |
| ३२ | श्रीमती वेलकर सुरेखा राजन | | |

तर,

१. उप—महापौर—— श्री. आयलानी कुमार उत्तमचंद

तसेच खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

२. श्रीमती संगीता राजेश कंडारे, ३. श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज), ४. श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी, ५. श्रीमती जया प्रकाश माखीजा, ६. श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी, ७. डॉ. (श्रीमती) निना प्रकाश नाथानी, ८. श्री. लाल पंजाबी, ९. श्रीमती महाडीक रजनी मोहन, १०, श्री. महेश सुखरामानी, ११. श्री. सुंदर मंगतानी, १२. श्री. सुरेश मधुकर जाधव, १३. श्री. बोडारे धनंजय बाबूराव, १४. श्रीमती मनसुलकर शिला सुभाष, १५. श्रीमती लता शांताराम निकम, १६. श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई), १७ श्री. प्रकाश गणपत सावंत, १८ श्री. नरेंद्र रामचंद्र राजानी, १९. श्री. गोदुमल नारायणदास क्रिष्णानी

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. अशोक रणखांब, अतिरिक्त आयुक्त
२. श्री. मिलींद सावंत, उप–आयुक्त
३. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
४. श्री. दिपक सावंत, उप–आयुक्त
५. श्री. जिंदे, वैदयकीय आरोग्य अधिकारी
६. श्री. अनुदिप दिघे, मुख्य लेखा अधिकारी
७. श्री. अनंत कांबळे, प्र. मुख्य लेखा परिक्षक
८. श्री. एस.जी. खडताळे, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
९. श्री. रमेश काजळे, प्र. प्रभाग अधिकारी
१०. .श्री. व्ही.आर.गर्जे, प्र. सहा. आयुक्त
११. श्री. रमेश काजळे, प्र. सहा. आयुक्त
१२. श्री. के.जे. पारेख, उप अभियंता, सा.बां.वि.
१३. श्री. गंगारामानी, उप अभियंता, विदयुत
१४. श्री. लिमये, मुख्य लिपिक

श्री. अशोककुमार रणखांब, अतिरिक्त आयुक्त हे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्री. श्याम शिवनानी
२. श्री. तानाजी पतंगराव
३. श्रीमती नर्गिस खान

सांयकाळी ४.३० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>मा. महापौरजी, आमचे सहकारी नगरसेवक श्री. राजेश वधारिया यांच्या आजी श्रीमती गणेशीबाई रतनलाल बसंतानी यांचे दिनांक १६/१/२००९ रोजी निधन झाले. मी सभागृहास विनंती करतो की, शोक प्रस्तावान्वये त्यांना श्रध्दांजली दिली जावी.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>मा. महापौरजी, आमचे सन्माननिय सदस्य श्री. प्रधान पाटील यांच्या आईचेही नुकतेच काही दिवसापुर्वी निधन झाले आहे. त्यांना सुध्दा श्रध्दांजली दिली पाहिजे.

<u>महापालिका सचिव:–</u>कृपया मौन धारण करावे.

---

सुचकाचे नाव :– श्री. राजु जग्यासी
अनुमोदकाचे नाव :– श्री. प्रशांत धांडे

<u>शोक प्रस्ताव</u>

उल्हासनगर महानगरपालिकेचे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नामनिर्देशित सदस्य श्री. राजेश वधारिया यांची आजी श्रीमती गणेशीबाई रतनलाल बसंतानी यांचे दिनांक १६/१/२००९ निधन झाले

श्रीमती गणेशीबाई रतनलाल बसंतानी यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

महासभा ठराव क्र. ४७ अ — दिनांक:—२०/१/२००९

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्रीमती गणेशीबाई रतनलाल बसंतानी यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

प्रश्नोत्तरे.........

. व्यासपीठामागे असलेल्या घडयाळामध्ये यावेळी सायंकाळचे ४.३० वाजले आहे. प्रश्न क्र. १४५ हा श्री. बच्चाराम रुपचंदानी यांचा आहे

?

प्रश्न क्र. १४५ :—आय सिक अंसर फोर द फोलोविंग क्युशन इन द फोर्थकमिंग जनरल बॉडी मिटींग.

१) प्रोविजन ऑफ बजेट फोर फिलींग पोटहोल्स इन द टाउनशिप फोर द इअर२००७—२००८

२) गिव द नेम ऑफ एजन्सी विथ द टेंडर अमाउंट

३) गिव द लोकेशन वेअर द वर्क हॅस बिन अंडरटेकन

४) डेट ऑफ कमेन्स ॲण्ड कंम्पलीशन ऑफ वर्क

५) ॲक्च्युअल अमाउंट स्पेन्ट.

उत्तर :— रेस १,००,००,०००/—

अ) शैलेस कन्स्ट्रक्शन रेस. १४,००,०००/—.
ब) जयभारत कन्स्ट्रक्शन रेस. २५,००,०००/—.
क) कोनार्क इन्फ्रास्ट्रक्चर रेस. ४०,००,०००/—
ड) जयभारत कन्स्ट्रक्शन रेस. २४,००,०००/—
३) लिस्ट इन्क्लोजड्

४) डब्ल्यु.ओ. डीटी डॉटॅ

| | | |
|---|---|---|
| अ) | २०.९.०७ | ४.१.०८ |
| ब) | २०.९.०७ | ३०.१२.०७ |
| क) | ११.९.०७ | ८.११.०७ |
| ड) | २०.९.०७ | ३०.१२.०७ |

५) रेस. १,२०,९७,०१४/—.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी:–</u>या प्रश्नाचे उत्तर कोण देणार?

<u>महापालिका सचिव :–</u>शहर अभियंता उत्तर देतील.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–</u>ते सभेत उपस्थित कोठे आहेत? हा प्रश्न पुढील महासभेत घेतला जावा. शहर अभियंता नसतील तर या प्रश्नाचे उत्तर आयुक्त साहेब देतील काय? मा. आयुक्त साहेब, आज महासभा आहे असे शहर अभियंतांना माहित असेल ना? आज महासभा असल्याचे आपण शहर अभियंत्यांना सांगितले असेल ना

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर :–</u> ते उप अभियंता आहेत, कार्यकारी अभियंता आहेत, शहर अभियंताही तेच आहेत. सर्व काही तेच आहेत.

<u>श्री. अशोककुमार रणखांब (अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–</u> आज आपला जो प्रकल्प दिल्ली येथील कार्यालयात सादर करण्यात आलेला आहे आणि त्याबाबतीत ज्या काही त्रुटी निदर्शनास आणुन देण्यात आलेल्या आहेत त्यांची पुर्तता करण्यासाठी हुडकोच्या ऑफिसमध्ये आयुक्त साहेबांनी, श्री. शिर्के यांना पाठविले आहे.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–</u>त्यांच्याऐवजी आपण उत्तर देणार की, दुसरे कोणी उत्तर देईल.

<u>श्री. मिलिंद सावंत (उप आयुक्त मुख्यालय):–</u>सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप अभियंता आहेत.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–</u>ते उत्तर देतील काय? विचारा त्यांना? उप अभियंता शहर अभियंत्यांशी प्रश्नाचे उत्तर देवु शकतात काय? विचारात त्यांना? माझी काही हरकत नाही. बोलवा त्यांना. ते उत्तर देवु शकतात काय?

<u>श्री. मिलिंद सावंत (उप आयुक्त मुख्यालय):–</u>होय, देवु शकतात, देवु शकतात.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी:–</u>बोलवा त्यांना.

<u>महापालिका सचिव :–</u>लेखी उत्तर तर आपणांस दिलेले आहे.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–</u>त्याबाबतीतच मला त्यांना विचारायचे आहे. २० लाख रुपये जास्त खर्च केला आहे. त्याबाबतीत त्यांनी मंजुरी घेतली आहे काय? या २० लाखास आपणांस कोणी मंजुरी दिली? अर्थसंकल्पात १ कोटी रक्कमेची तरतुद असतांना १ कोटी २० लाख रुपये आपण खर्च कसे केले? या २० लाख खर्चास आपण कुणाची परवानगी घेतली? ती घेतली आहे काय? आयुक्तांकडुन आपण मान्यता घेतली आहे काय? अर्थसंकल्पीय तरतुदीपेक्षा २० लाख रुपये जास्त आपण कसे खर्च केले.

<u>श्री. पारीख (उप अभियंता, सा.बां.वि.):–</u>प्राकलनीय रक्कमेच्या १० टक्क्याची वाढ होवु शकते.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी:–</u>मी आपणांस काय सांगतो, अर्थसंकल्पात १ कोटी रुपयांची तरतुद होती. आपण या प्रश्नाच्या उत्तरात लिहिले आहे की, १ कोटी २० लाख रुपये खर्च झाला आहे. या वाढीव २० लाख रुपये खर्चास आपणांस मान्यता मिळाली आहे काय? बोला वेळ काढुपणा करु नका. नाहीतर हा प्रश्न मी पुढील महासभेत पुन्हा विचारेल. या प्रश्नाबाबत आपणांस काही माहिती आहे काय? नसेल तर मग उत्तर देण्यासाठी आपण व्यासपीठावर का आलात? हे तर उत्तर देवु शकत नाहीत, आपण म्हणाला होतात की हे उत्तर देतील म्हणुन? शहर अभियंता यांच्याशी संबंधीत प्रश्नाचे उत्तर उप अभियंता कसा देईल? नाहीतर मुख्य लेखा अधिका–यास बोलावुन त्यांना विचारा. ते सांगु शकतील, वाढीव २० लाख रुपये खर्चास परवानगी मिळाली आहे किंवा नाही ते?

<u>महापालिका सचिव :–</u>कार्यकारी अभियंता आल्यानंतर हा प्रश्न विचारला तर अधिक चांगले होईल.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी:—मी तर तेच म्हटले होते परंतु आयुक्त साहेबांनी सांगितले की, हे उत्तर देवु शकतील. ते उत्तर देवु शकत नसतील तर आयुक्त साहेब तुम्ही सांगा तुम्ही उत्तर दया. शहर अभियंता यांच्याशी संबंधीत प्रश्नाचे उत्तर देण्याची उप अभियंत्यांमध्ये क्षमता आहे काय? शहर अभियंताच उत्तर देवु शकत नाही तर हे काय उत्तर देवु शकतील?

श्री. अशोककुमार रणखांब (अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—मला वाटले की, हा व्यक्ती इतका अकार्यक्षम नसेल. म्हणुन मी सांगितले.

महापालिका सचिव :— प्रश्न क्र. १४६ हा श्री. प्रभुनाथ गुप्ता यांचा आहे.

**?** प्रश्न क्र. १४६ :— प्र. क्र. १) आजतक का महानगरपालिके मे कितना टॅक्स (कर) पावती डबल इंटरी का केस आया है। और मनपा के अधिकारीने उसके उपर कौनसा कारवाई किया है और कितना सही सर्व्हे कर के उस अर्जदारधारको को सही जबाब दिया है?

प्र.क्र. २) अ) मनपा के अधिकारीयोंने कितना डबल इंटरी का केस की समस्या और कौन से साल तक हल किया है। और बची हुई है और अर्जदार की केस कबतक पुरे शहर की टॅक्स की डबल इंटरीकी समस्या हल करेंगे ?

ब) साल २००८—०९ तक न्यु ऐसेसमेंट कितना निकला है । और बाकी कब करेंगे ?

उत्तर :— १) सन २००८—०९ या वर्षामध्ये दुबार नोंद रद्द करणेकामी अंदाजे ६० अर्ज प्राप्त झालेले आहे. सदर प्रकरणी प्रत्यक्ष पाहणी करुन योग्य कार्यवाही लवकरात लवकर करण्यात येईल.

२ अ) वरीलप्रमाणे

ब) सन २००८—०९ मध्ये अंदाजे ३०० मिळकतींचे सर्वेक्षण करण्यात आलेले आहे. तसेच नव्याने अस्तित्वात आलेल्या मिळकतींचे पाहणी करुन सर्वेक्षण करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता :— मा. महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव साहेब, व सभागृहातील सर्व सदस्य, माझे असे ऐकिवात आले आहे की, आपण माझ्यासाठी प्रस्ताव पारीत करणार होतात त्याबद्दल मी आपला अतिशय आभारी आहे. सर्व प्रसंग पाहता मला कसेतरी होत होते परंतु कधी एकदा आपणाशी संकल्प साधतो

महापालिका सचिव :—प्रश्नाचे उत्तर ठिक आहे काय?

सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता :—ठिक आहे.

महापालिका सचिव :— प्रश्न क्र. १४७ हा श्री. भारत राजवानी यांचा आहे. सध्या ते सभागृहात उपस्थित नसल्यामुळे त्यांच्या प्रश्न व उत्तराची इतिवृत्तांतात नोंद घेण्यात येत आहे.

**?** प्रश्न क्र. १४७ :— उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील नागरीकांना भाजीपाला खरेदीची सोय व्हावी यासाठी महापालिका प्रशासनामार्फत शहरात विविध ठिकाणी भाजी मंडई बांधण्यात आल्या आहेत त्या अनुषंगाने खालील प्रश्नावर महासभेत चर्चा होवून सुचक, समाधानकारक, सविस्तर माहिती मिळणेस विनंती आहे.

प्र.क्र. १ अ) उल्हासनगर महानगरपालिका प्रशासनाने महापालिका हद्दीत भाजी मंडई कुठे बांधल्या आहेत? कधी, बांधल्या आहेत? किती ठिकाणी भाजी मंडईचे बांधकाम केले आहे? त्यांचे ठिकाण व पत्ते मिळावेत? प्रत्येक भाजी मंडई बांधणेसाठी किती खर्च करण्यात आला? सदरच्या प्रत्येक भाजी मंडईत किती गाळे बांधण्यात आले आहेत? भाजी मंडईतील गाळे कोणाला वितरीत करण्यात आले आहे? कोणत्या मुख्य अटी व शर्तीचे अधिन राहून वाटप केले आहेत का? त्याबाबत मालकी तत्वावर/भाडेतत्वावर देण्यात आले आहेत का? त्याबाबत करार करण्यात आला आहे का? भाडेतत्वावर देण्यात आले असल्यास प्रत्येक गाळे धारकाकडून किती भाडे आकारणी करण्यात येते? भाडे आकारणी व वसूली कोण करतो? भाजी मंडयातील भाडेतत्वावर दिलेल्या गाळयांचे भाडे वसुली

नियमितपणे करण्यात येते का? भाडे नियमित न भरल्यास दंड विलंब शुल्क आकारणी करण्यात येते का? आतापर्यंत किती भाडे वसूली व दंड, विलंब शुल्क वसुली करण्यात आली आहे? किती भाडे येणे थकबाकी आहे? भाडे थकबाकी असल्यास वसूलीस जबाबदार अधिकारी कोण? सदर अधिका—यावर कामात हलगर्जीपणा बद्दल कारवाई करण्यात आली आहे का? कोणती? उल्हासनगर—४ कृष्ण मंडळ शाळा येथिल भाजी मंडईतील गाळे कधी बांधण्यात आले? किती गाळे बांधण्यात आले? त्यापैकी किती गाळे कोण कोणास वितरीत करण्यात आले? गाळे विपरीत करतांना कोणत्या अटी शर्तीनुसार विपरीत करण्यात आले आहेत? ते नियमानुसार वितरीत करण्यात आले आहेत का? सदरचे गाळे बेकायदेशीररित्या वितरीत करण्यात आले असल्यास जबाबदार अधिकारी कोण? संबंधीत अधिकारी दोषी आढळल्यास महापालिका नियमानुसार त्याचेवर कोणती कारवाई करणार आहे? कृपया प्रत्येक प्रश्नांची सुचक, समाधानकारक, सविस्तर, खुलासेवार माहिती मिळणेस विनंती आहे.

<u>उत्तर :—</u> उल्हासनगर १,२,३,४ व ५ येथे भाजी मंडई बांधलेल्या आहेत. सन १९८७—१९८९ या कालावधीत बांधलेल्या आहेत.

उक्त नमूद केलेल्या ठिकाणी भाजी मंडईचे बांधकाम केलेले आहे.

१. जय भवानी भाजी मार्केट, उल्हासनगर—१
२. जय झुलेलाल भाजी मार्केट, उलहसनगर—२
३. इंदिरागांधी भाजी मार्केट, उल्हासनगर—३
४. क्रिष्ण मंडळ शाळे समोर मार्केट, उल्हासनगर—४
५. छत्रपती शिवाजी भाजी मंडई, उल्हासनगर—५

हा प्रश्न सार्वजनिक बांधकाम विभागाशी संबंधीत आहे. उल्हासनसगर—१ मध्ये ८४, उल्हासनगर—२ मध्ये ३२, उल्हासनगर—३ मध्ये १८३, उल्हासनगर—४ मध्ये ७३, उल्हासनगर—५ मध्ये ६५

भाजी मंडईतील गाळे भाजी विक्रेत्यांना भाडे तत्वावर देण्यात आलेले आहेत.

होय, ताबापत्र देण्यात आलेले आहे.

प्रत्येक गाळे धारकाकडून कमीत कमी रु. ६५/— ते जास्तीत जास्त रु. १८०/— याप्रमाणे भाडे आकारणी करणेत येते. वसुली लिपिक, भाडे आकारणी करतो.

थकबाकी काढणेचे काम सुरु असून सध्यस्थितीत वसुलीचे काम सुरु आहे.

होय

अटी व शर्तीमध्ये नमुद केलेप्रमाणे सुरु असून सदयस्थितीत

सार्वजनिक बांधकाम विभाग

एकूण ७३ गाळे

रस्त्यावर व्यवसाय करणा—या व्यवसायिकांना तात्पुरत्या स्वरुपात गाळयावर बसण्यास परवानगी दिलेली आहे. (न्यायालयाच्या आदेशान्वये)

सदर गाळयांना लिलाव पध्दतीने वितरण करुन गाळे भाडे पट्टयांवर देणेबाबात कार्यवाही सुरु आहे.

**<u>महापालिका सचिव :—</u>** प्रश्न क्र. १४८ हा श्रीमती जयश्री सुर्वे यांचा आहे.

**<u>प्रश्न क्र. १४८ :—</u>** खालील मिळकतधारकांना महापालिका प्रशासनाने बांधकाम परवानगी/सुधारीत बांधकाम परवानगी दिलेली आहे त्या अनुषंगाने खालील प्रश्नावर महासभेत चर्चा होवून सविस्तर माहिती मिळणेस विनंती आहे.

प्र.क्र. १ अ ) नरेश श्रीचंद राघानी बॅरेक १२६६/६, प्लॉट नं. ३९४ चा नं. १४९ जी.बी. शॉप नं. १,२ या ठिकाणी बांधकाम करणेस बांधकाम परवानगी क्र. उमपा/नरवि/बांप/९८/०५/०६ अन्वये मंजुरी देणेत आलेली आहे. सदर ठिकाणी सुधारीत बांधकाम परवानगी देणेत आली आहे का? सुधारीत बांधकाम परवानगी दिली असल्यास कशी दिली? कोणत्या अटी व शर्तीचे अधिन राहून देणेत आलेली आहे?

ब) ज्योती प्रकाश लुल्ला प्लॉट नं. २१ भाग १ व २ चा नं. १५५, इंडस्ट्रीयल एरिया यांना बांधकामास परवानगी क्र. उमपा/नरवि/बांप/७८/०७/१२५ अन्वये बांधकाम परवानगी दिली आहे. सदरचे बांधकाम मंजूर नकाशानुसार करणेत आले आहे का? की, सदर बांधकामात वाढीव अनधिकृत बांधकाम करणेत आले आहे? वाढीव अनधिकृत बांधकाम करणेत आले आहे? वाढीव अनधिकृत बांधकाम केले असल्यास किती करण्यात आले आहे? प्रशासनाने सदरचे बांधकामास नोटिस बजावून कारवाई केली आहे का?

क) उल्हासनगर महानगरपालिकेत नगररचनाकार हे पद कधी पासून रिक्त आहे? सदरचे पद भरण्यात आले आहे का? नगररचनाकार हे पद रिक्त असल्यास वरील बांधकामास परवानगी कशी, कधी व कोणी दिली?

<u>उत्तर :—</u> अ) होय

सदर ठिकाणचे वाढीव क्षेत्राचा सुधारीत प्रस्ताव सादर केल्यामुळे सुधारीत बांधकाम नकाशा मंजुर करण्यात आलेला आहे.

ब) १) होय

२) नाही

३) नाही

४) नाही

५) सदर बांधकामात अनधिकृत बांधकाम नसल्यामुळे नोटिस देवून कारवाई करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

क) सध्या नगररचनाकार, नगररचना विभागात कार्यरत आहे. तसेच वरील दोन्ही बाधंकाम परवानगीला इमारत बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे.

<u>सदस्य श्रीमती जयश्री सुर्वे:—</u> ठिक आहे.

<u>महापालिका सचिव :—</u> प्रश्न क्र. १४९ हा श्रीमती जयश्री सुर्वे यांचा आहे..

**<u>प्रश्न क्र. १४९ :—</u>** उल्हासनगर शहर स्वच्छ व सुदर रहावे, नागरीकांचे आरोग्य अबाधीत रहावे यासाठी प्रशासनामार्फत शहरातील कचरा उचलणेचा ठेका मे. ॲन्थोनी वेस्ट हॅण्डलींग कंपनीला दिला आहे त्या अनुषंगाने खालील प्रश्नांवर महासभेत चर्चा होवून सविस्तर माहिती मिळणेस विनंती आहे.

प्र.क्र. १ अ) शहरातील कचरा उचलणेचा ठेका मे. ॲन्थोनी वेस्ट हॅण्डलींग कंपनीला केव्हा पासून देणेत आला आहे? ठेक्याचे करारातील अटी व शर्तीनुसार सदर ठेकेदार काम पाहत आहे का? नसल्यास कोणकोणत्या अटी व शर्तीचे उल्लंघन केले आहे? प्रशासनाने त्याबद्दल ठेकेदारास दंड आकारणी केली आहे का? किती व कोणत्या कारणासाठी? कामाचे सुरुवातीस ठेकेदार किती खत्त्यावरील कचरा गोळा करीत होता? त्यानुसार किती पैसे अदा करण्यात येत होते? सद्यस्थितीत किती खत्त्यावरील कचरा गोळा करत आहे? सदरचे खत्ते पुर्वी प्रमाणेच आहेत का? कमी झाले आहेत? कमी झाले असल्यास कोणााचे लेखी व तोंडी आदेशानुसार कमी करणेत आले आहेत? खत्ता कमी करणेची कारणे कोणती? खत्ते कमी झाले असल्यास ठेकेदारास अदा करण्यात येत असलेले पैसे कमी करण्यात आले आहेत का? पुर्वी प्रमाणेच अदा करण्यात येत आहेत?

<u>उत्तर :—</u> १ अ) ऑक्टोंबर, २००३ पासून मे. ॲन्थोनी वेस्ट हॅण स्ेल प्रा.ली. कंपनीला कचरा वाहतूकीचा ठेका देण्यात आलेला आहे.

ठेक्याचा अटी व शर्तीनुसार ठेकेदार काम पाहत आहे.

अटी व शर्तीचे उल्लंघन केल्यास मुल्यांकन अहवालाद्वारे देयकातून रक्कम कपात करण्यात येते.

सन २००५ पासून अंदाजीत रु. २९,३४,३४७/— आजपर्यंत मुल्यांकन अहवालानुसार रक्कम कपात करण्यात आलेली आहे.

विविध कारणे असून उदा. घंटा गाडी न पुरविणे, काही खत्ते न उचलणे, कामगारांना संरक्षणात्मक साहित्य व गणवेश न पुरविणे, कचरा कुंडीजवळ जंतुनाशकांची फवारणी न करणे इत्यादी. सुरुवातीस जवळ जवळ ३८४ खत्ते उचलत असे, सुरुवातीस प्रतिदिन रु. १,१९,२८५/— एकूण पुरवित असलेल्या सेवेसाठी रक्कम अदा करण्यात येत होती. मुल्यांकन अहवालानुसार सध्यस्थितीत ३४४ खत्त्यांवरील कचरा गोळा करीत आहे.

सन २००७—०८ रोजी निवडणुका झाल्यानंतर बदल झालेल्या प्रशासकिय वार्डाच्या आराखडयानुसार एकूण ४ झोन मध्ये १७ रुट बनविण्यात आले असून सदरचे खत्त्यांची आवश्यकतेनुसार ठिकाणे बदलण्यात आलेली आहेत. घनकचरा व्यवस्थापन नियम २००० च्या तरतूदीनुसार कचराकुंडया कमी करण्यात येत आहेत.
नागरीकांच्या सोयीनुसार व घनकचरा व्यवस्थापन नियम २००० च्या तरतूदीनुसार कचराकुंडया कमी करण्यात येत आहेत.

नागरीकांच्या सोयीनुसार व घनकचरा व्यवस्थापन नियम २००० च्या तरतूदींनुसार खत्ते कमी करण्यात आले आहेत.

ठेकेदाराचे देयक विविध निकषांवर आधारीत असून सहा. आयुक्त व सर्व स्वच्छता निरिक्षक यांनी मुल्यांकन अहवाला नमूद केल्यानुसार त्याचे देयकातून कपात करण्यात येते.

सदस्य श्रीमती जयश्री सुर्वे:— ठिक आहे.

महापालिका सचिव :— प्रश्न क्र. १५० हा श्री. राजु जग्यासी यांचा आहे.

? प्रश्न क्र. १५० :— डिटेल्स ऑफ पॉटहोल्स वर्कस् केरीड ऑल ओव्हर उल्हासनगर म्युनिसिपल कॉर्पोरेशन एरिया.

विथ टु अबोव सबजेट मेटर इट इज हिअरबाय रिक्वेस्ट टु टेक द फोलोविंग क्युशन द इन द फोर्थकमींग जनरल बॉडी मिटींग अब्ड प्रोव्हाईड ऑल डिटेल्स इन द मेटर.

पोटहॉल्स वर्कस सेक्शनेड बाय द स्टॅंडिंग कमिटी उल्हासनगर म्युनिसिपल कॉर्पोरेश अमाउंटींग टु रेस ४०/— लॅक्स् अंडर बीपीएमसी अॅक्ट १९४९ क्लॉज ५ (२) ऑन डेटेड ०१ सप्टेंबर २००८

द टर्मस् अॅण्ड कंडिशन ऑद वर्कस, लोकेशन/पॉईंट ऑफ द वर्कस् अॅण्ड इटस् मेझरमेंट अॅण्ड साईज अॅण्ड थिकनेस. बी.एम. ऑर ए.सी. वर्कस, एजेन्सी डिटेल्स, सुपरविजन अॅण्ड मेझरमेंट टेकन बाय हुम अॅण्ड ऑल ऑदर रिलेटेड डिटेलस्.

व्हॉट वेअर द रिझन/कंडिशन टु सेक्शन द सेड वर्क अंडर क्लॉज५ (२) २ ऑफ बीपीएमसी अॅक्ट १९४९.

उत्तर :—लिस्ट ऑफ पॉटहॉल्स वर्क एक्झीक्युटेड अलॉगविथ लोकेशन मेझरमेंट, एरिया इज इन्कोजड् हिअरविथ.

१) एजन्सी नेम : फोर फिलिंग पॉटहॉल्स इज झोनवाईज.

१. झोंन नं. १: मे. आर.के. चंदनानी

२. झोन नं. २ : मे. के. हरेश अॅण्ड असोसिएट

३. झोन नं. ३ : मे. जय भारत कन्स्ट्रक्शन

४. झोन नं. ४ : मे. जय भारत कंन्स्ट्रक्शन

डयु टु लोकसभा बाय इलेक्शन (आय इ बिफोर मान्सुन) वर्क ऑफ फिलिंग पॉटहोल्स डयुरींग मान्सुन वाज नॉट सेक्शनड्. अॅज सच पॉटहॉल्स क्रिअटेड डयुरींग मान्सुन वेअर नेसेसरी टु फिल बिफोर गणेश फेसटीव्हल. देअर वाज कोर्ट ऑर्डर टु फिल पॉटहॉल्स अर सर्टन प्लेस अल्सो. द एजन्सी अपॉईंटेड फोर द सेम वर्क रिफ्युज टु केरी आउट वर्क. अॅस सच लुकींग टु द अर्जन्सी ऑफ प्रपोज टु टेक अप हॅण्ड, अकॉर्डींग प्रपोजल ऑफ सेम वाज पुट इन स्टेंडिग कमिटी अंडर ५/२/२. सुपरविजन वाज डन बाय मिस्त्री, ज्यु. इंजिनिअर, डप्युटी. इंजिनिअर ऑफ कंर्नर्ड झोन ऑफ पिडब्ल्युडी.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:—</u> ठिक आहे.

<u>महापालिका सचिव :—</u> प्रश्न क्र. १५१ हा श्री. राजु जग्यासी यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. १५१ :—</u> डिटेल ऑफ टेंडर/रिकॉलड् टेंडर ॲण्ड कोटेशन वर्क्स डन बाय स्टोर डिपार्टमेंट ऑफ कॉर्पोरेशनण

विथ रिकार्ड टू अबोव सब्जेक्ट मेटर इट इज इअरबाय रिक्येस्ट टू टेक द फोलोविंग क्युशन द इन द फोर्थकमिंग जनरल बॉडी मिटींग अेबड प्रोवाईड ऑल डिटेल्स इन द मेटर.

ॲकोर्डीगली ऑल डिटेल्स लाईक एजन्सी नेमड ॲण्ड ॲडरेसए रिक्वाअर्ड डाक्यूमेंट डिटेल्स, वर्कस अमाउंट कोटेड ॲण्ड सेक्शनड् अमाउंट विथ इस्टीमेट अमाउंट, ॲथोराईजेशन ऑफ द वर्क डिटेल्स लाईक रिझोल्युशन नं. डेट वर्क/ॲक्शपेन्टशन ऑर्डर टाईम लिमिट ऑफ द वर्क, वर्क कम्पलेटेड विथीन टाईम लिमिट ऑर नॉट, आक्ट्राय पेड रिसिप्ट डिटेल्स इफ ॲप्लीकेबल, वायोलेशन ऑफ टर्म ॲण्ड कंडिशन इफ अेनी ॲक्शन प्रपोज्ड ऑर टेकन, टेंडर कॉलड्, सबमिशन ओपनिंग, ॲपरुव्हल, निगीओटेशन डेट इटीसी ॲण्ड ऑल द सेम इफ ॲप्लीकेबल फोर क्वोटेशन वर्कस्.

फोर द पिरिअड ऑफ एप्रिल २००७ टु मार्च २००८ ॲण्ड एप्रिल २००८ टु टिल डेट.

१. प्रोवाईड ऑल डिटेल्स फोर द टेंडर वर्क्स डन फोर व्हेरिअस मटेरियल्स फर्निचर स्टेशनरी इटीसी.

२. हाउ मेनी सेड टेंडर वेअर रिकॉल्ड् ॲण्ड वॉट वेअर द रिजन/कंडिशन फोर रिकॉलींग.

३. रिकॉल्ड टेंडर वेअर अलोटेड टु हुम ॲण्ड हेस दे सबमिटेड देअर टेंडर बिफोर रिकॉलेड ॲण्ड वॉट वाज द डिफरन्स इन द अमाउंट कोटेड (हायअर ऑर लोअर) फोर द सेम टेंडर वर्कस्.

४. इन टेंडर वर्क्स इन हाउ मेनी इन्टन्स निगीओटेशन वॉज केरीड आउट बाय हुम विथ हुम ॲण्ड वॉट वाज द कोटेशन आउटकम रिझल्ट.

५. गिव ऑट डिटेल्स ऑफ कोटेशन वर्कस डन फोर र्पचेसींग ऑफ व्हेरीअस मटेरीअल्स, फुड ॲण्ड गुडस् इटीसी.

६. हॅस द अरर्स्टवाइल ॲण्ड प्रेझेंट कमिशनर हॅस इश्युड अेनी रायटींग इन्स्ट्रक्शन देट नो कोटेशन वर्कस् शॉल बी केरीड आउट बाय ऐनी डिपार्टमेंट ऑफ कार्पोरेशन.

<u>उत्तर :—</u> यादी सोबत जोडत आहे. खालील बाबतीत ३ फेरनिविदा मागविण्यात आलेल्या आहे.

अ) श्री. गणेश दर्शन प्रतियोगीता २००७ साठी कोणत्याही पुरवठादाराने विहित मुदतीत निविदा सादर न केल्यामुळे

ब) फर्निचर साहित्याकरीता निविदेत सादर केलेले दर जास्त असल्यामुळे

क) महिला व बालकल्याण विभागाकरीता इनर्व्हटर संच खरेदीसाठी एकच निविदा प्राप्त झाल्यामुळे

अ) श्री. गणेश दर्शन प्रतियोगिता २००७ साठी खालीलप्रमाणे ५ फेरनिविदा प्राप्त झाल्या.

१. महेश एंटरप्रायझेस
२. अमरज्योत एंटरप्रायझेस
३. माउंटमेरी एंटरप्रायझेस
४. मोहित एंटरप्रायझेस
५. मोहिनी एंटरप्रायझेस

वाटाघाटीअंती न्युनत्तम दरानुसार संबंधीत निविदाकारास कार्यादेश देण्यात आले होते.

ब) फर्निचर साहित्याकरीता खरेदीसाठी खालीलप्रमाणे ५ फेरनिविदा प्राप्त झाल्या.

१. महेश एंटरप्रायझेस
२. अमरज्योत एंटरप्रायझेस
३. माउंटमेरी एंटरप्रायझेस
४. मोहित एंटरप्रायझेस
५. मोहिनी एंटरप्रायझेस

वाटाघाटी अंती न्युनत्तम दर सादर केलेल्या संबंधित निविदाकारास कार्यादेश देण्यात आले होते.

क) महिला व बालकल्याण विभागाकरीता इनर्व्हटर संच खरेदीसाठी मे. मोहिनी एंटरप्रायझेस यांना पुरवठा आदेश देण्यात आला. यापुर्वी एकच निविदा प्राप्त झाल्याने ती उघडण्यात आलेली नाही.

प्राप्त निविदे सदंर्भात वाटाघाटी करणेकामी निविदाधारकांसोबत बैठक घेवुन वाटाघाटी अंती न्युनत्तम दर सादर केलेल्या संबंधित निविदाकारास कार्यादेश देण्यात आले होते. सदर प्रकरणाच्या मुळ संचिका लेखा विभागास सादर करण्यात आलेल्या असल्यामुळे दरपत्रकाबाबतची माहिती तात्काळ उपलब्ध करुन देणे शक्य नाही. अशाप्रकारचे आदेश दिसून येत नाहीत.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:—</u> ठिक आहे.

<u>महापालिका सचिव :—</u> प्रश्न क्र. १५२ हा श्री. रविंद्र बागुल यांचा आहे. सध्या ते सभागृहात उपस्थित नाहीत. त्यामुळे त्यांच्या प्रश्न व उत्तराची नोंद घेण्यात येत आहे.

<u>प्रश्न क्र. १५२ :—</u> टिलसन मार्केट, उल्हासनगर—३ या बांधकामाबाबत खालील प्रश्नावर महासभेत चर्चा होवून सविस्तर माहिती मिळणेस विनंती आहे.

प्र.क्र. १ अ) सदर बांधकामास महापालिकेने परवानगी दिली होती का? कधी दिली होती? परवानगी दिली असल्यास परवानगी आदेशाची सत्यप्रत मिळावी? सदरची परवानगी महापालिका प्रश्नासनाने रद्द केली आहे का? कश्याचे आधारे परवानगी रद्द केली आहे? परवानगी रद्द केली असल्यास परवानगी रद्द करणेची कारणे कोणती? सदरची परवानगी केव्हा रद्द करण्यात आली? परवानगी रद्द केली असल्यास संबंधीत ठिकाणी दुरुस्ती बांधकाम कसे सुरु आहे? सदर कामास कोर्टाचा स्टे आहे का? जय शंकर बारचे मागे तळमाळा अधिक दोन माळयाचे इमारतीचे दुरुस्तीचे बांधकामाजवळ जवळ पुर्णत्वास असून सदरचे बांधकाम टिलसन मार्केट या इमारतीमध्ये समाविष्ट आहे का? सदर बांधकामावर कोर्टाचा स्टे असेल तर सद्यस्थितीत सुरु असलेले बांधकाम कोणाचे परवानगीने सुरु आहे?

<u>उत्तर :—</u> होय. प्लॉट नं. ८४ (भा.), सेक्शन—१७, टिल्सन शॉपिंग सेंटर हया इमारतीतील बांधकामास दिनांक २५/६/२००८ रोजी दुरुस्ती परवानगी देण्यात आली होती. त्याची प्रत सोबत जोडली आहे.

होय. दुरुस्ती परवानगीतील अट क्र. ३ चा भंग केलेला असल्यामुळे सदरची दुरुस्ती परवानगी रद्द करण्यात आलेली आहे.

हाये. दुरुस्ती परवानगीतील अट क्र. ३ नुसार म्हणजे मालकी हक्कामध्ये कोणताही वाद उद्भवल्यास तसेच बाजूच्या रहिवाशांनी तक्रार दाखल केल्यामुळे दुरुस्ती परवानगी रद्द करण्यात आली आहे.

होय. दिनांक ४/७/२००८ रोजी रद्द करण्यात आली.

सदर प्रकरणी मा. न्यायालयाचे स्थगिती असल्याने महापालिकेतर्फे पुढील कारणी करार आली नाही.

होय.

होय.

सदर बांधकाम महापालिकेच्या परवानगीनुसार सुरु नाही. परवानगी रद्द केली आहे. विकासक स्वत: करीत आहेत.

**महापालिका सचिव :—** प्रश्न क्र. १५३ हा श्री. भारत राजवानी यांचा आहे. सध्या ते सभागृहात उपस्थित नाहीत. त्यामुळे त्यांच्या प्रश्न व उत्तराची नोंद घेण्यात येत आहे.

**प्रश्न क्र. १५३ :—** उल्हासनगर शहरातील नागरीकांचे आरोग्य अबाधित राखणे हे महापालिकेचे आदय कर्तव्य असूमन शहर स्वच्छ रहावे व सुंदर दिसावे यासाठी महापालिकेच्या आरोग्य विभागामार्फतविविध प्रकारचे साहित्य व जंतुनाशकांची तसेच औषधांची फवारणी करणेत येते त्या अनुषंगाने खालील प्रश्नावर महासभेतचर्चा होवून सूचक व समाधानकारक सविस्तर माहिती मिळणेस विनंती आहे.

१. १) सोलफॅक २) शाईथिऑन ३) कॉरबॉलीक पावडर ४) काळे फिनाईल ५) निमरेक्स ६) रॅट पॉईझिन ७) मलेरिया ऑईल ८) ब्लिचींग पावडर ९) ॲसिड बॉटल १०) जर्मिक्लीन ११) हायजिन १२) हबौसोल १३) फ्रेशऑल गोल्ड १४) डेफनिका १५) सायट्रस क्लिन १६) डेल्टामेथ्रीन पावडर १७) फाईट आऊट १८) सेप्टीलटॅक किजींग पावडर १९) पाथरेथ्रम २ टक्के २०) फेनिथिऑन २१) प्युरीक्लोअर २२) बायोलाव्हो—२५ २३) विनाश ५०—५० २४) सोलफॅक ५० ईएन २५) सफाया मोना क्लोरो पावडर २६) प्लायटेक्स २७) लिडेन पावडर २८) काबोनिन डेस्ट पावडर २९) फिनोलेन सुपरफोट ३०) डायक्लेव्हास ३१) टेमिफॉस ३२) हायटेक या प्रत्येक जंतुनाशकांचा उपयोग कश्यासाठी होतो?

सदरची जंतुनाशके सन २००७—०८ २००८—०९ मध्ये कधी, किती खरेदी करण्यात आली? संबंधीत ठेकेदार व एजन्सीचे नाव व पत्ता मिळावा? प्रत्येक जंतुनाशकांची प्रती नग किंमत किती आहे? प्रत्येक जंतुनाशक व साहित्यासाठी एकुण किती रक्कम अदा करण्यात आली? सदरच्या साहित्य, जंतुनाशकांचा वापर कधी, कुठे व कसा करण्यात आला? सदरची ज्रंतुनाशके कोणत्या कारणासाठी वापरणेत आली? सदरच्या साहित्य व जंतुनाशके वार्डातून वापरल्याबाबत संबंधीत नगरसेवक वा नागरीकांच्या स्वाक्ष—या घेणेत आल्या आहेत का? आल्या असलयास स्वाक्ष—याची पोच मिळावी? खरेदी करण्यात आलेले साहित्य महापालिका मुख्य स्वच्छता निरिक्षक कार्यालयात नोंद केली आहे का? नोंद केलेली असल्यास नोंदीचे रजिस्टरच्या पानाच्या सत्यप्रती मिळाव्यात? सदरचे साहित्य जंतुनाशके स्वच्छता निरिक्षक कार्यालयास वाटप केलेले असल्यास प्रत्येक स्वच्छता निरिक्षक कार्यालयाचे सामान घेतलेल्या व त्याचा वापर केलेल्या रजिस्टरच्या पानांच्या सत्यप्रती मिळाव्यात? सदरची जंतुनाशके व साहित्य खरेदीच्या बिलांच्या पावत्यांची सत्यप्रत मिळावी.

**उत्तर :—** सन २००८—०९ वर्षासाठीची जंतुनाशक खरेदीची प्रक्रिया सुरु आहे.

सन २००७—०८ साली औषध खरेदी कधी, किती व केलेल्या औषधांचा उपयोग कशासाठी होतो व इतर माहितीचा तपशिल सोबत जोडला आहे. (एकुण तीन पाने)

महापालिका सचिव :— प्रश्न क्र. १५४ हा श्री. अनिल विदयार्थी यांचा आहे.

? प्रश्न क्र. १५४ :— उल्हासनगर ५ में वार्ड ६८ नेताजी स्कुल के पास श्रीमती भगवंती रुपचंदानी चौक के पास जय बाबा धाम के सामने वाला रोड जो बिल्कुल अच्छे हालात में था उसको खोदकर नया रोड ३५० बनाया जा रहा है? या ब्लॉक लगाए जा रहे है? वो रोड और चौक कॅम्प नं. ५ को जोडनेवाला मेन रोड है तो इस क्वालीटीके ब्लॉक हेवी ट्राफिक को झेल पाएंगे?

अ) यह काम कौनसे फंड से ओर कितनी लागत से हो रहा है?

ब) इस काम का प्रस्ताव कौनसे नगरसेवकने दिया था? या तो पीडब्ल्युडी विभाग ने अपनी तरफसे किंया है? उसका खुलासेवार उत्तर दिया जाए?

क) यह काम कौनसे ठेकेदार को दिया गया है? और कितने दिनों तक मेन रोडके ट्राफिक को डीस्टर्ब करके इस रोड का काम पूरा किया जाएगा?

उत्तर :— या ठिकाणी चौकामध्ये स्थानिक नगरसेवकाने त्यांच्या नगरसेवक निधीतून केलेल्या मागणीनुसार पेव्हर ब्लॉक बसविण्याचे काम सुरु आहे सदर पेव्हर ब्लॉकवर हेवी ट्राफिक चालू शकते.

हे काम नगरसेवक निधितून करण्यात येत आहे व या कामाची प्राकलनीय किंमत रु. ५.०० लाख एवढी आहे.

हे काम करण्यासाठी श्री. बच्चाराम रुपचंदानी यांनी त्यांच्या नगरसेवक निधीमधुन प्रस्तावित केल्याप्रमाणे करण्यात येत आहे.

हे काम विलास मजूर कामगार सहकारी संस्था मर्या. ता. अंबनाथ जिल्हा ठाणे यांना दिलेले आहे. सदर काम करण्याची मुदत चार महिने असली तरी हे काम २० दिवसात पुर्ण होणार आहे.

सदस्य श्री. अनिल विदयार्थी:— सन्माननिय आयुक्त साहेब, हे जे लेखी उत्तर देण्यात आलेले आहे त्या उत्तराशी मी संतृष्ट नाही, या प्रश्नासंदर्भात आपण खुलासा कराल काय?

श्री. अशोककुमार रणखांब (अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—आपल्या प्रश्नाचे लेखी उत्तर दिलेले आहे, आपणांस सुध्दा त्याची प्रत मिळाली आहे.

सदस्य श्री. अनिल विदयार्थी :—त्या उत्तराने मी संतृष्ट नाही.

श्री. अशोककुमार रणखांब (अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—कोणत्या उत्तराने आपण संतृष्ट नाहीत? हे पहा, यामध्ये असे लिहिले आहे की, स्थानिक नगरसेवकाने त्याच्या नगरसेवक निधीतुन केलेल्या मागणीनुसार त्याठिकाणी चौकामध्ये पेवर ब्लॉक बसविण्याचे काम सुरु आहे. पेवर ब्लॉकवर जड वाहनांची वाहतुक होवू शकते.

सदस्य श्री. अनिल विदयार्थी :—दुसरा जो प्रश्न आहे त्या संदर्भात व प्रश्नाचा ब भाग जो आहे त्याबाबतीत?

श्री. अशोककुमार रणखांब (अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—या प्रश्नाचे उत्तर दिलेले आहे. तेथुन जड वाहतुक चालु शकते.

महापालिका सचिव :— प्रश्न क्र. १५५ हा श्री. बी.बी. मोरे यांचा आहे.

? प्रश्न क्र. १५५ :— उल्हासनगर शहरात ७६ प्रभागापैकी बहुतांशी प्रभागात कच—याचे साम्राज्य वाढले आहे. कचरा उचलण्यासाठी महापालिकेच्या गाडया उपलब्ध नसल्याने, पालिका सफाई कामगार कचरा गोळा

करतात. परंतु कचरा उचलण्यासाठी महापालिकेच्या साल्ट गाडया उपलब्ध नसल्यामुळे शहरात कच—याचे ढिग वाढत आहेत.

शहरातील एकूण ७६ प्रभागापैकी काही प्रभागात साल्ट सफाई कामगार कार्यरत आहेत तर काही प्रभागात पंधरा, वीस असे कमी—अधिक सफाई कामगार कार्यरत आहेत. अशा प्रकारे प्रभागात सफाई कामगारांबाबत भेदभाव न ठेवता सफाई कामगारांची प्रत्येक प्रभागात नेमणूक करावी.

काही प्रभागात नगरसेवक स्वत: खर्चाने हातगाडया लावून कच—याची विल्हेवाट लावण्याचा त्रोटक प्रयत्न करतात. अशीच स्थिती कायम राहिल्यास एकदिवस शहराची अवस्था ''डंपिंग ग्राउंड'' झाल्या वाचून राहणार नाही? या सर्वच घटकांचा शहरातील तमाम नागरीकांच्या आरोग्याशी संबंधी येत असल्याने नागरीकांना शहरात वास्तव करणे कठिण झाले आहे.

सदर सुचनेचा गांभिर्यपुर्वक विचार करुन पालिका महासभेत चर्चा व्हावी.

त्यांनी याबाबत त्वरीत निर्णय घेवुन संबंधीत विभागांना प्रमुखांना तात्काळ आदेश दयावेत.

<u>उत्तर :—</u> आरोग्य विभागामार्फत लोखंडी हातगाडया उपलब्ध करुन घेण्यासाठी निविदा प्रक्रिया पुर्ण झाली असून मा. स्थायी समिती समोर सदरचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

एप्रिल, २००७ रोजी मा. आयुक्त यांच्या मान्यतेने सर्व स्वच्छता निरिक्षक यांनी प्रभाग निहाय बिट चार्ट बनविले असून त्यानुसार प्रभागात सफाई कामगारांची नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यानुसार प्रत्येक प्रभागात किमान १३ ते कमाल १८ सफाई कामगार कार्यरत आहेत.

**<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे:—</u>** सन्माननिय महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब व सन्माननिय सदस्य, मी असा प्रश्न विचारला आहे की, या शहरामध्ये जे ७६ प्रभाग आहेत, त्यांतील काही प्रभांगामध्ये साफसफाई होत नाही. काही प्रभागात ७ सफाई कामगार, काही प्रभागांमध्ये २० सफाई कामगाार तर काही प्रभागांमध्ये ७ सफाई कामगार अशा पध्दतीने कामगारांची नेमणुक केलेली आहे. आणि दुसरी गोष्ट अशी की, कामगार कमी असूनही दोन, तीन कामगार गैरहजर राहतात, त्यामुळे दोन, तीन कामगारच हजर असतात. त्यांच्याकडुन संपुर्ण प्रभागातील साफ सफाई होत नसल्यामुळे सर्वत्र दुर्गंधी पसरते, कच—याचे ढिग साठले जातात. त्यामुळे कचरा उचलण्यासाठी नगरसेवक आपल्या स्वत:च्या पैश्यातुन हातगाडी विकत आणतात. आणि कच—याचे ढिग हटविण्याचे प्रयत्न करतात. कारण त्या नगरसेवकाला त्याचा प्रभाग स्वच्छ ठेवायचा असतो. दुसरी गोष्ट की, कचरा उचलण्यासाठी गाडया नाहीत. याबाबतीत आमचे सन्माननिय उप—आयुक्त श्री. दिपक सांवत यांना ब—याचवेळा मी सांगितले आहे, ते म्हणतात की, मी निविदा मागविल्या आहेत. परंतु त्यांना अदयाप अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही. परंतु मी येथे सांगु इच्छितो की, उल्हासनगर महापालिकेच्यावतीने ज्या कचरा गाडया मागविल्या जातात त्या अत्यंत निष्कृष्ट प्रतीच्या असतात. त्यांचा पत्रा बरोबर नसतो. जर खरोखरच १८ गेजचा पत्रा वापरला तर कमीत कमी वर्षभरासाठी त्या गाडीचा कचरा उचलण्यासाठी उपयोग होवु शकतो. नगरसेवक जर हजेरीशेडवर गेले तर सफाई कामगार आणि मुकादम त्यांच्या समोर उभे राहतात आणि कचरा गाडी दाखवत सांगतात की, साहेब, ती तुमच्या प्रभागातील गाडी घ्या. या गाडीमध्ये एक किलो सुध्दा कचरा बसणार नाही. त्या गाडीला सर्व बाजुने छिद्रे पडलेली असतात. त्यात कचरा उचलणा—याने व्यवस्थिपणे कचरा न उचलण्यामुळे प्रभागात अतिशय दुर्गंधी होते, यासाठी मी हा प्रश्न विचारलेला आहे, त्याचे आमच्या उप—आयुक्तांनी सविस्तरपणे उत्तर दयावे.

<u>डॉ. दिपक सावंत (उप—आयुक्त, आरोग्य):—</u>सन्माननिय महापौर महोदया, आयुक्त साहेब, सर्व सन्माननिय सदस्य, सन्माननिय सदस्य श्री. मोरे साहेबांनी हातगाडयांबाबत जो प्रश्न विचारला आहे, त्याबाबत कालच्याच स्थायी समिती सभेमध्ये हातगाडयांबाबतचा विषय मंजुरीस ठेवलेला होता. स्थायी समितीने त्यास मंजुरी दिलेली आहे आणि त्यानुसार संबंधीत ठेकेदाराला आम्ही कार्यादेश सुध्दा दिले आहेत. या १० ते १५ दिवसामध्ये प्रत्येक प्रभागास २,२ कचरा गाडया पुरविण्याचे आम्ही योजिले आहे. आणखी दोन, दोन कचरा गाडया दिल्या जाव्यात असे स्थायी समितीच्या काही सन्माननिय सदस्यांनी सुचित केले आहे. त्याबाबतचा प्रस्ताव सुध्दा आम्ही स्थायी समितीपुढे मंजुरीस्तव ठेवणार आहोत. उल्हासनगर महानगरपालिकेत एकुण ७६ प्रभाग आहेत. ७६ प्रभागांमध्ये प्रत्येक प्रभागाचा बिट चार्ट तयार केलेला आहे. त्या प्रभागाची लोकसंख्या, आणि त्या प्रभागातील रस्ते आणि नाले यांचा विचार करुन कमित कमी १३ ते जास्तीत जास्त १८ सफाई कामगार नेमले जातील या दृष्टीकोनातुन एप्रिल, २००७ मध्ये व्यवस्था केली होती. उल्हासनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर सफाई कामगारांची संख्या अतिशय कमी आहे. ३०५ सफाई कामगारांचा वाद न्यायालयात चालु

आहे. आता आस्थापना विभागाशी मी चौकशी केली असता, २ फेब्रुवारीला त्याबाबत निर्णय होईल असे सांगण्यात आले. अगोदरच कामगारांची संख्या कमी असल्यामुळे त्यात काही कामगार अनुपस्थित राहिल्यामुळे अडचणी उद्‌भवतात.

सदस्य श्री.बी. बी. मोरे:—उप—आयुक्त साहेब, मी असे म्हणु इच्छितो की, महापालिकेतर्फे आपण जर लवकरात लवकर याबाबतचा प्रस्ताव सादर केला असता तर मला असे वाटते की, इतर कामांना जरी आपण खोळंबा केला असता तरी चालले असते आमचा विभाग झोपडपट्टीचा विभाग असल्यामुळे आणि कच—याची वाहतुक करण्यासाठी गाडी नसल्यामुळे आम्हांला अक्षरश: भाडयाने हातगाडी घ्यावी लागते. हातगाडीने आम्ही कचरा उचलला आहे. आणि आजही उचलतो आहे. अदयापपर्यंत तुमच्या गाडया व्यवस्थीत नाहीत आणि ज्या गाडया घेतल्या जातात त्यांचा जो पत्रा असतो तो अतिशय लवचिक असतो आणि त्यामुळे ती एक महिनासुध्दा टिकत नाही. चांगला पत्रा वापरला तर ती गाडी कमित कमी सहा महिने वर्षभर चालेल. दुसरी गोष्ट चार, चार महिने सफाई कामगार कामावर येत नाही. सावंत साहेब, तुम्हांला मी दोन वेळा स्मरणपत्र दिलेले आहे. माझ्या प्रभागात कोणकोणते सफाई कामगार काम करतात आणि त्यातील कोणते कामगार चार महिन्यापासुन गैरहजर आहेत, याबाबतचे मी पत्र दिलेले आहे परंतु त्यावर अदयाप कोणतीही कारवाई झालेली नाही, का नाही? सफाई कामगार जर चार महिने गैरहजर राहत असेल तर त्याला आपण नोटिस बजावली पाहिजे. निलंबित केले पाहिजे. जर त्याला पोटापाण्याची भ्रांत नसेल, नोकरीची गरज नसेल तर त्याच्या जागी दुसरा माणुस घेतला पाहिजे. परंतु अशी काही या महापालिकेतर्फे होत नाही. म्हणुन आम्हांला येथे खेदाने सांगावे लागत आहे, आम्ही जेव्हा हजेरी शेडवर जातो तेव्हा सफाई कामगार व मुकादम सांगतात की, तुम्ही महासभेत काही बोलत नाहीत. गैरहजर कर्मचा—यांच्या जागी, दुसरे कर्मचारी घेत नाहीत त्यांमुळे आम्ही काय करायचे? दर दिवशी कमीत कमी तीन ते चार कामगार गैरहजर असतात. जास्तीत जास्त तीन ते चार कामगार कामावर असतात. आणि त्यामुळे प्रभागामध्ये साफसफाई होत नाही. त्यामुळे लोक आम्हांला विचारतात, आम्ही तुम्हांला महापालिकेत निवडून पाठविले आहे. तुम्ही महापालिकेत काय करतात? म्हणुन मी डॉ. सावंत साहेब, तुम्हांला सांगु इच्छितो की, जर प्रभागातील कचरा लवकर उचलला गेला नाही, गैरहजर कामगारांच्या जागी नविन कामगार दिले नाही, तर पुढची महासभा आम्ही चालवु देणार नाही. असे मी आरपीआयच्यावतीने ठामपणे सांगतो. आयुक्त साहेब, याकडे तुम्ही सुध्दा लक्ष दिले पाहिजे. आणि काय कार्यवाही करणार आहात ते तुम्हीही सांगावे. श्रीमती सुमन शेळके या शिक्षण समितीच्या सभापती आहेत, त्यांच्या प्रभागात किती सफाई कामगार आहेत.

सदस्या श्रीमती सुमन शेळके :—मा. महापौर महोदयांना याबाबतीत मी तोंडी सांगितले आहे आणि डॉ. सावंत साहेबांना लेखी आणि तोंडी सांगून सुध्दा डॉ. सावंत सफाई कामगारांच्या बाबतीत लक्ष देत नाहीत. कारण ५४ क्रमांकाचा प्रभाग हा स्टेशन विभागाचा व वडोलगावचा प्रभाग आहे. त्याचबरोबर झोपडपट्टीचा विभाग आहे आणि या प्रभागासाठी फक्त आठच सफाई कामगार दिले आहेत. त्यातील तीनच कामगार हजर असतात. त्या तीन कामगारांमध्ये संपुर्ण प्रभागाची सफाई कशी होणार? कचरा उचलण्यासाठी हातगाडया सुध्दा नाहीत. माझ्या प्रभागात नुकताच एक कार्यक्रम झाला. तेव्हा सफाई करण्यासाठी मी गाडी मागितली तर मुकादमाने सांगितले की, आपल्या प्रभागात हातगाडी नाही. प्रभागामध्ये एखादा कार्यक्रम असतो अशा वेळी साफसफाई करण्यासाठी आणि गोळा झालेला कचरा उचलुन फेकण्यासाठी जर हातगाडया नसतील तर महापालिका काय करते? कारण प्रत्येक प्रभागात हातगाडया नाहीत काय? असा माझाच प्रभाग आहे काय? जेथे सफाई कामगार कमी, हातगाडया नाहीत. असे जर असेल तर यापुढे मी उपोषणास बसणार आहे. या बाबतीत काय कारवाई करणार आहात ते डॉ. सावंत साहेबांनी सांगावे.

डॉ. दिपक सावंत (उप—आयुक्त, आरोग्य):—सन्माननिय सदस्या श्रीमती सुमन शेळके यांनी त्यांच्या प्रभाग क्रमांक ५४ बाबतीत जो प्रश्न विचारला आहे, त्यांच्या प्रभागासाठी १३ कामगारांची नियुक्ती करण्यात आली होती त्यातील दोन कामगार सेवा निवृत्त झाले आहे. दोन कामगार त्या प्रभागालगतचा जो विभाग आहे त्यामध्ये ठेवले होते. तशा संबधीत आरोग्य निरिक्षकास सूचना दिलेल्या आहेत आणि

लेखी आदेश सुध्दा काढायला सांगितला आहे की ते कामगार प्रभाग क्र. ५४ मध्ये पाठवुन दयावे, आजच तुम्हांला उत्तर देतो.

सदस्या श्रीमती सुमन शेळके :—माझ्या प्रभागातील जे दोन कामगार सेवानिवृत्त झाले आहे त्यांच्या जागी दोन कामगार दिले जावे. आता आपण सफाई कामगारांची जी भरती करणार आहात ना त्यातील दोन कामगार या प्रभागासाठी दया.

सदस्य श्री. मोहन साधवानी :—मा. महापौरजी, माझ्या प्रभागातील एक सफाई कामगार जुन महिन्यापासुन कामावर येत नाही. त्याबाबतीत मी डॉ. सावंत साहेबांना सांगितलेले आहे. माझ्या जिवितवास या नगरसेवकाकडुन धोका असल्याचे सांगुन बदली त्याने करुन घेतली आहे. ज्या प्रभागात त्याची बदली केली आहे त्या प्रभागात सुध्दा तो कामावर जात नाही. आज सहा महिने झाले तो कामावर येत नाही. वैदयकीय आणि इतर काही रजा देतो. परंतु त्याच्यावर महापालिकेकडुन कोणतीही कारवाई होत नाही. तो म्हणतो की मला काम करायचे नाही, तो मोटरसायकलवर दिवसभर फिरत असतो. जुन ते जानेवारी असे ७ महिने होतात, ७ महिन्यापासुन तो कामावर येत नाही. त्याने लिहुन दिले आहे की मला टिबी आहे. परंतु तो रोज महापालिकेत येतो. डॉ. सांवत साहेब याबाबतीत उत्तर दया.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—सावंत साहेब, आपण उत्तर दिले की, प्रत्येक प्रभागात १३ ते १८ सफाई कामगार नेमले आहेत. त्याबाबतीत आपण काय निकष लावले आहेत? कारण की माझा प्रभाग हा सर्वात मोठा प्रभाग आहे. मोठा प्रभाग असतांनाही आपण माझ्या प्रभागासाठी केवळ १३ सफाई कामगार दिले आहेत. ते आपण कोणत्या हिशोबानुसार दिले आहेत? आपण माझ्या प्रभागात कधी गेला होतात काय? प्रभागातील काही काही विभाग चांगला आहे, परंतु काही ठिकाणी झोपडपट्टीचा विभाग आहे. तर त्याबाबतीत आपण काय विचार केलात?

डॉ. दिपक सावंत (उप—आयुक्त, आरोग्य):—प्रभागाची जी रचना आहे, .........

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—आपणांस माझा प्रभाग माहित आहे.

डॉ. दिपक सावंत (उप—आयुक्त, आरोग्य):—माहित आहे.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—तर मग सांगा कोठुन कोठपर्यंत आहे? त्यानंतर मग मी सांगु शकेल की आपणांस माहित आहे म्हणुन.

डॉ. दिपक सावंत (उप—आयुक्त, आरोग्य):—मी दाखवु शकतो, आपल्या प्रभागामध्ये पटेल नगर आहे.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—आपणांस माहित नसेल तर सांगा, माझा प्रभाग कोठुन कोठपर्यंत आहे ते मी सांगतो. कोणत्या प्रभागात किती सफाई कामगार दिलेत हे आपण कसे ठरविले?

डॉ. दिपक सावंत (उप—आयुक्त, आरोग्य):—संबंधीत जे आरोग्य निरिक्षक होते, आणि जे मुख्य आरोग्य निरिक्षक होते, त्यांना माहिती गोळा करण्यास सांगण्यात आले होते.

सदस्य श्री. विनोद ठाकुर :—मा. महापौरजी, मी एक मिनिट बोलु इच्छितो, सभागृहात प्रश्न कोणी विचारला आहे? उत्तर कोण देत आहे? एकाच प्रश्नावर जर संपुर्ण सभागृह अशीच चर्चा करत राहिले तर बरोबर होणार नाही यासाठी मी सचिव साहेबांना विचारु इच्छितो की याबाबतीत कायदयात काय तरतुद आहे?

सदस्य श्री.बी.बी. मोरे:—बरोबर, बरोबर ......

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :–</u>सचिव साहेब, माझी एक विनंती आहे, आपण जे उत्तर देत आहात त्याची इतिवृत्तांतात नोंद येईलच, नाहीतर मी म्हणणार होतो की, लिहुन देण्याची काही गरज नाही. त्यासाठी क्षमा करा. परंतु दुसरा कुणी सदस्य त्यावर चर्चा करु शकतो किंवा नाही? मला असे वाटते की, प्रत्येक नगरसेवक प्रत्येक प्रश्नावर चर्चा करु शकतो. तो त्याचा अधिकार आहे.

<u>महापालिका सचिव :–</u>प्रश्नांवर चर्चा होत नाही, येथे चर्चा होत आहे. प्रश्नाबाबतीत सन्माननिय सदस्यांची अपेक्षा असते की, उत्तर मिळाले पाहिजे तेवढेंच.

<u>सदस्या श्रीमती मालती करोतिया :–</u> साहेब, आम्हां सदस्यांना ज्या अडचणी आहेत, त्या कोण दुर करेल? डॉ. सावंत साहेबांशी मी दोन तीन वेळा चर्चा केली, दोन वर्षापासुन माझ्या प्रभागात मुकादम नव्हता, त्यानंतर श्री. हरपाल करोतिया हा मुकादम दिला आणि त्यानंतर श्री. राजु अण्णा यास काढुन टाकले आपणांस माहित नाही का माझा प्रभाग किती मोठा आहे? व माझ्या प्रभागात हातगाडया सुध्दा नाहीत. गेल्या पंधरा वर्षापासुन आम्ही निवडुन येत आहे, महापौर सुध्दा होते तरीही माझ्या प्रभागात हीच स्थिती आहे तर मग काय मी वेडी आहे? आम्ही वारंवार सांगतो तरी आपण काही लक्ष देत नाही, आमचा काही मान ठेवत नाहीत काय? डॉ. सावंत साहेब, जातीवाद करतात काय?

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :–</u>डॉ. सावंत साहेब, त्या कामगारावर आपण कारवाई का करत नाहीत ते सांगा. तो कामगार सहा महिन्यापासुन कामावर येत नाही. त्याच्यावर आपण कारवाई का करत नाही? तो वैदयकीय रजा देत आहे, तो खरोखरच आजारी आहे का? हे तपासुन पाहण्यासाठी पाठविले जावे.

<u>डॉ. दिपक सावंत (उप–आयुक्त, आरोग्य):–</u>त्याची तपासणी करण्यास पाठविले जाईल.

<u>सदस्या श्रीमती मालती करोतिया:–</u>प्रभागामध्ये सफाई होते किंवा नाही याची डॉ. सावंत साहेबांनी पाहणी केली आहे की नाही?

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे:–</u>कामगारांवर कारवाई करण्यासाठी उप–आयुक्त यांच्याकडे वेळ कोठे आहे?

<u>सदस्या श्रीमती मालती करोतिया:–</u>महापौर महोदया, माझ्या प्रभागातील एक सफाई कामगार कमी करण्यात आला आलेला आहे, माझी तक्रार ऐकुन घेण्यास कुणी तयार नाही.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>डॉ. सावंत साहेब, २००७ सालामध्ये उल्हासनगर महानगरपालिकेला १६ लाखाच्या हातगाडया दिल्या होत्या, त्या कोठे आहेत? त्या वापरल्या गेल्या की कोठे खोलित ठेवल्या गेल्या? त्या कोठे गायब झालेल्या आहेत? त्याचे तुम्ही उत्तर दया.

<u>डॉ. दिपक सावंत (उप–आयुक्त, आरोग्य):–</u>तपासुन तुम्हांला लेखी उत्तर देतो.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :–</u>लेखी उत्तर दिल्याने ते मला एकटयालाच माहित पडेल, त्याऐवजी सभागृहातील सर्व सदस्यांना माहिती मिळाली पाहिजे. व्ही.टी.सी. ग्राउंड येथे ज्याप्रमाणे सायकली सडत आहे त्याप्रमाणे या गाडया सडत आहे की काय त्याची माहिती दिली जावी.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :–</u>डॉ. सावंत साहेब, राजेंद्र अडांगळे कामावर का येत नाही त्याचे पुढील महासभेपर्यंत मला उत्तर पाहिजे, तो जर वैदयकीय रजेवर असेल तर त्यास कोणता आजार आहे? त्याची सविस्तर माहिती मला पाहिजे.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>त्या प्रश्नाची सभागृहास माहिती दिली जावी असे मी म्हटले आहे त्याचे काय झाले?

**डॉ. दिपक सावंत (उप–आयुक्त, आरोग्य):–**सभागृहास माहिती दिली जाईल.

**सदस्य श्री.बी.बी. मोरे :–**तर मग आता दया ना? डॉ. सावंत साहेब, उल्हासनगर महानगरपालिकेच्या डोक्यावरुन आता पाणी गेले आहे, यासाठी आपण माझ्या प्रश्नाचे सभागृहात उत्तर दिले पाहिजे.

**डॉ. दिपक सावंत (उप–आयुक्त, आरोग्य):–**२००७ मध्ये ज्या व्हील बॅरोज घेण्यात आलेल्या होत्या, त्याची सविस्तर माहिती असलेली संचिका मागवुन घेतो. आणि महासभेतच उत्तर देतो.

**सदस्य श्री. लालबिहारी यादव :–**मा. महापौरजी, २००७ मध्ये जेव्हा या हातगाडया मागविण्यात आल्या, त्या किती महिन्यात चालल्यात? गाडया देण्याचे हे एक नाटक आहे आणि गाडया खरेदी करण्यामागे फार मोठा घोटाळा आहे. गाडयांचे व्हिल बरोबर नसतो, पत्रा बरोबर नसतो, पत्रा अतिशय पातळ व लवचिक असतो. एक महिना गाडी चालते आणि त्यानंतर तीचे एक चाक निघुन जाते. दुस–या महिन्यामध्ये हॅण्डल तुटतो, त्यानंतर पत्रे निघुन जातात. एक वर्षभर सुध्दा ती गाडी चालत नाही अशी गाडी देण्यामागे काय फायदा आहे? व आता जी गाडी देणार आहात ती किती महिने चालेल? याची सुध्दा माहिती दया. नाहीतर पुढील महासभेचे मी कामकाज चालवु देणार नाही.

**सदस्य श्री.बी.बी. मोरे :–** उप–आयुक्त डॉ. सावंत साहेब, मला वाटते, आचारसंहिता लागेपर्यंत एक महासभा होईल. त्या महासभेमध्ये मला या प्रश्नाचे लेखी उत्तर मिळाले पाहिजे.

**महापालिका सचिव :–** प्रश्न क्र. १५६ हा श्री. बी.बी. मोरे यांचा आहे.

**?** **प्रश्न क्र. १५६ :–** स्थानिक स्वराज्य संस्थेच्यावतीने पालिका पदाधिका–यांच्या विविध ठिकाणच्या प्रशिक्षणार्थी दौ–यामुळे पालिका क्षेत्रातील विविध कराच्या स्वरुपात मिळणा–या कराच्या निधिची उधळपट्टी मोठया प्रमाणात होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

प्रशिक्षणाच्या नावाखाली पदाधिकारी प्रशिक्षण तर दुरच परंतु पालिका क्षेत्रात जमा होणा–या विविध स्वरुपातील कराची उधळपट्टी करुन नागरीकांच्या समस्यांना अग्रक्रमाने घेण्याऐवजी दुय्यम स्थान दिले जाते.

तरी सदर प्रशिक्षणासाठी होणा–या खर्चावर निर्बंध घालावे अशी शिफारस स्वराज्य संस्थेकडे करण्यात यावी तसेच सुचनेचा गांभिर्यपुर्वक विचार करुन पालिका महासभेत चर्चा व्हावी.

**उत्तर :–** पालिका सदस्यांना प्रशिक्षण देण्याकामी धोरणात्मक निर्णय घेंण्यासाठी प्रशासनाने आपली भुमिका स्पष्टपणे महासभेपूढे सादर केली होती व महासभेने दिनांक १/९/२००८ च्या ठराव क्र. २० अन्वये धोरणात्मक निर्णय घेणेसाठी मान्यता दिलेली नाही.

सदरहु ठरावाची प्रत यासोबत जोडण्यांत येत आहे.
प्रशासन महासभेच्या ठरावापूढे जावू शकत नाही. कारण महासभेचा निर्णय अंतिम आहे.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :–</u> मी असा प्रश्न विचारला आहे की, वर्षाच्या काठी नगरसेवक उल्हासनगर शहराबाहेर किंवा राज्याबाहेर प्रशिक्षणास जातात आणि जनतेने कररुपाने भरलेल्या पैसा खर्च करुन येतात. प्रशिक्षणाचा कोणताही हेतु साध्य होत नाही. हे फक्त जावुन येतात, मौजमजा करुन येतात. या प्रश्नाचे उत्तर आजच्या सभेतील आयुक्तांनी दयावे असे मला वाटते.

<u>श्री. अशोककुमार रणखांब(अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी) :–</u>विरोधी पक्ष नेतांनी याठिकाणी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे, त्याचे उत्तर यापुर्वी त्यांना देण्यात आले आहे. प्रत्यक्ष मी उत्तर दयावे अशी त्यांची भुमिका असल्यामुळे त्याचे उत्तर मी याठिकाणी देत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये वेगवेगळया प्रशिक्षणासाठी जेव्हा सन्माननिय सदस्यांना पाठविले जाते त्यावेळी त्यामागची भुमिका अशी असते की, त्याठिकाणी त्या शहरामध्ये कशाप्रकारचे काम चालते त्याची माहिती सदस्यांना मिळावी आणि आता आपल्या प्रश्नातच उत्तर आहे. प्रश्नाचा आपण जो खुलासा केला की त्याठिकाणी आमचे सदस्य जातात, आम्ही कुठलीही माहिती घेतलेली नाही, असे करतात, तसे करतात.... तर त्यांनी काय करावे? ज्याठिकाणी आपण त्यांना माहिती घेण्यासाठी, प्रशिक्षण घेण्यासाठी पाठवितो. त्यामध्ये महानगरपालिकेची भुमिका अशी असते की त्याठिकाणी त्यांनी प्रशिक्षण घ्यावे, माहिती घ्यावी. त्याठिकाणी त्यांनी जर माहिती घेतली नाही किंवा कामकाज केले नाही तर त्याच्याबद्दल नगरपालिकेने/महानगरपालिकेने काय करायचे हा प्रश्न निर्माण होतो. याबाबतीत निर्णय आपल्यालाच घ्यायचा आहे. कारण आपल्या परवानगीनेच आपण त्यांना येथुन पाठवितो. त्यामुळे त्यांना प्रशिक्षणास पाठवायचे कि नाही पाठवायचे हे तुम्ही ठरवायचे आहे.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>मा. आयुक्त साहेब, मी हा प्रश्न यासाठी विचारलेला आहे की, काही सदस्य म्हणतात की, आम्ही वातानुकुलीत गाडीतुन जातो, थर्ड क्लासमध्ये कुणी जात नाही. हा जो अनाठायी खर्च होतो तो बरोबर नाही. म्हणुनच मला सांगायचे आहे की, वर्षाकाठी हा जो खर्च होतो, हा जर कुठल्या चांगल्या कामासाठी वापरला तर फार बरे होईल. उत्पन्नाच्या बाबतीत महापालिकेची स्थिती अतिशय गंभीर स्थितीवर आलेली आहे. आणि म्हणुन सन्माननिय सदस्यांना माझी विनंती आहे की, आपण जेव्हा कोठे प्रशिक्षणास जातात तेव्हा तेथे काय काय होते ते जर येथे बसुन मला सांगितले तर बरे होईल.

<u>श्री. अशोककुमार रणखांब(अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी) :–</u>सदस्यांना प्रशिक्षणास प्रशासन पाठवत नाही. हा निर्णय महासभेने घेतल्यानंतर त्याची कार्यवाही केली जाते. त्यामुळे प्रशिक्षणाची आवश्यकता नसते या मताशी मी सहमत नाही. कारण प्रत्येकाला प्रशिक्षणाची आवश्यकता असते. आपल्या महानगरपालिकेत ज्या पध्दतीने कामकाज चालते ते पाहता इतर महानगरपालिकांमध्ये, इतर राज्यांमध्ये कशाप्रकारचे काम चालते ते पाहण्याची जर सन्माननिय सदस्यांनी इच्छा प्रकट केली तर त्याठिकाणी त्यांना महासभेच्या परवानगीने, महासभेच्या ठरावाने आपण पाहतो. जर महासभेने हा ठराव केला नाही तर आपण त्यांना पाठवणार नाही. त्यामुळे याच्यापुढे आपण सर्वांनी निर्णय घ्या. त्याची अंमलबजावणी आम्ही निश्चितपणे करु.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>आता दिल्ली येथिल प्रशिक्षणाबाबतचे पत्र आले आहे मग त्याठिकाणी प्रशिक्षणास पाठवायचे नाही काय? श्री. मोरे साहेब, प्रशिक्षण हे महत्वाचे आहे.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>श्री. धांडे, मला एक सांगा, तुम्ही बाहेर जावुन प्रशिक्षण घेवुन आलात त्याचे काय परस्वरुप तुम्ही दाखविले आहे?

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>बाकीच्या महानगरपालिकांमध्ये पहा, महापौर विदेश दौरा करुन आलेले आहेत.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>बाकीच्या महानगरपालिकांची आर्थिक परिस्थिती आणि आपल्या महापालिकेतील आर्थिक परिस्थिती यात फरक आहे. आपली महानगरपालिका ड वर्गीय महापालिका आहे.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>ठिक आहे, विदेशात नाही परंतु सिंगापुरला तर आपण आपल्या महापौरांना पाठवु शकतो.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे:–</u>महिन्याला अडीच कोटी कोठुन आणायचे? अशी जर परिस्थिती महापालिकेची असेल,.....

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>सन्माननिय विरोधी पक्ष नेता साहेब, दिल्ली येथिल प्रशिक्षणासाठी आपणही यावे आणि निरिक्षक म्हणुन काम पहावे. आणि खरोखरच त्या प्रशिक्षणाचा फायदा होतो की नाही ते पहावे. खरोखरच आम्ही गेलेलो आहे आणि आम्हांला त्याचा भरपुर लाभ झालेला आहे. म्हणुन म्हणतो एक वेळा आपणही आमच्याबरोबर यावे. आपण वरीष्ठ आहात तुमचे देखिल आमच्यावर निरिक्षण राहिल.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>साहेब, दुसरी गोष्ट अशी की, जेव्हा नगरसेवक प्रशिक्षणास जातात, गट गट तयार करुन प्रशिक्षणास जातात. मग त्यांना मजा मारायला माझ्या सारखा माणुस मिळत नाही. म्हणुन मला सांगायचे आहे, गटागटाने जातात आणि ज्या कुण्या वरिष्ठ नगरसेवकास प्रशिक्षणास जायची इच्छा असेल तर त्यास सांगतात की, आता जागा नाही असा प्रकार होतो.

<u>श्री. अशोककुमार रणखांब (अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी) :—</u>नगरसेवक जर प्रशिक्षणास गेले तर त्यांनी २४ तास काय करावे याबाबत त्यांच्यावर आपले काही नियंत्रण असते. आमची माफक अपेक्षा असते की त्याठिकाणी त्यांनी प्रशिक्षण घ्यावे. उर्वरित वेळेत त्यांनी काय करायचे याबाबतीत त्यांच्यावर कोणाचे बंधन नाही. आणि आता तर मी आपणासर्वांना विनंती करेल की पुढच्या वेळेस प्रशिक्षणास जातांना श्री. मोरे साहेबांसारख्या वरीष्ठ नगरसेवकांना सुध्दा बरोबर घेवुन जा. म्हणजे तुमच्यावर त्यांचे नियंत्रण राहिल.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :—</u>मला असे म्हणायचे आहे की, नगरसेवक वर्षभर प्रभागात काम करतो. नागरीकांचे आणि कामाचे त्याच्यावरील दडपण लक्षात घेता तुम्ही त्यास प्रशिक्षणास पाठवितात. असा त्यातील मतितार्थ आहे?

<u>श्री. अशोककुमार रणखांब(अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी) :—</u>हा जो ठराव केलेला आहे, या ठरावानुसारच सदस्यांना प्रशिक्षणास पाठविण्यात आलेला आहे. त्यामुळे यावर दुसरे काही उत्तर मी देवु शकत नाही.

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर :—</u>मा. आयुक्त साहेब, मा. महापौरांच्या अनुमतीने मी आपणांस एक प्रश्न विचारतो. मागच्या वेळेस चंदीगडला आम्ही लोक प्रशिक्षणास गेलो होतो त्याचे प्रवास, रहिवास व भोजनाचे देयक रक्कम अदयापही मिळाले नाही. लेखा विभागामधुन त्यावर शेरा मारण्यात आलेला आहे की, या कामी अर्थसंकल्पात तरतुद केलेली रक्कम संपलेली आहे. आणि दिल्ली येथे प्रशिक्षण आहे, त्या प्रशिक्षणास जा म्हणुन आज आम्हांला सूचना देण्यात आलेली आहे. अर्थसंकल्पात तरतुद नाही तर मग या प्रशिक्षणास सदस्य जाणार कसे? आणि मागच्या प्रशिक्षणास आम्ही गेलो होतो त्याचे पैसे अदयाप मिळालेले नाही.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>या कामी अर्थसंकल्पात तरतुद किती तरतुद केलेली आहे, त्याची किती रक्कम शिल्लक आहे हे तपासून पाहवयास पाहिजे होते. ते काही नाही आणि दिल्लीला जा, आणखी कोठे कोठे जा असे सांगितले जाते.

<u>महापालिका सचिव :—</u> प्रश्नोत्तराचा कालावधी समाप्त.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>एक मिनिट, एक मिनिट, प्रश्नोत्तराचा कालावधी संपला? साहेब, बाकीचे दोन प्रश्न आहेत ते?

<u>महापालिका सचिव :—</u>प्रश्नोत्तराची वेळ संपली आता ते प्रश्न पुढील महासभेत येतील.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>पुढल्या वेळेस येणार? कारण की यामध्ये महत्वाचा प्रश्न आहे.

<u>महापालिका सचिव:—</u>प्रश्न क्र. १५७ पासून पुढचे प्रश्न पुढील महासभेत येतील. कृपया लक्ष दयावे. लक्षवेधी सुचना जी आहे तीचे सुचक आहेत श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील

विषय :— अधिकाराचा गैरवापर करुन लाखो रुपयांची संपत्ती गोळा करणा—या जनसंपर्क

अधिकारी श्री. युवराज भदाणे यांची सखोल चौकशी होणे बाबत लक्षवेधी.

ही लक्षवेधी मा. महापौरांनी स्विकृत केली नाही. कारण की ती निर्धारीत वेळेनंतर मिळालेली आहे. दुपारी २ वाजुन १५ मिनिटांनी मिळालेली आहे. यासाठी ती स्विकृत करण्यास येत नाही.

विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

<u>विषय क्र. २ :—</u> मागील सर्वसाधारण महासभेचे दिनांक १२/१२/२००८ (त्यात दिनांक ९/१/२००९) रोजीचे व दिनांक ९/१/२००९ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त कायम करणे.

---

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर :—</u> मागील सर्वसाधारण महासभेचे दिनांक १२/१२/२००८ (त्यात दिनांक ९/१/२००९) रोजीचे व दिनांक ९/१/२००९ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

---

**विषय क्र. २ :—** मागील सर्वसाधारण महासभेचे दिनांक १२/१२/२००८ (त्यात दिनांक ९/१/२००९) रोजीचे व दिनांक ९/१/२००९ रोजीच्या विशेष महासभेचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नाव : श्री. रामसागर यादव

अनुमोदकाचे नाव : श्री. बी.बी. मोरे

<u>महासभा ठराव क्र. ४७ ब</u> <u>दिनांक : २०/१/२००९</u>

ही महासभा महापालिका सचिवांनी प्रस्तुत केलेल्या मागील सर्वसाधारण महासभेचे दिनांक १२/१२/२००८ (त्यात दिनांक ९/१/२००९) रोजीचे पृष्ठ क्र. १ ते २९ व दिनांक ९/१/२००९ रोजीच्या विशेष महासभेचे पृष्ठ क्र. १ ते ५ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

<u>एकमताने</u>

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

विषय क्र. ३:— सेवानिवृत्त, दिवंगत सफाई कामगारांचे वारसांस वारसा पध्दतीने नियुक्ती देणे.

---

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ३** :— सेवानिवृत्त, दिवंगत सफाई कामगारांचे वारसांस वारसा पध्दतीने नियुक्ती देणे.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विशयास अनुसरून सादर करण्यात येते की, लाड कमिटीच्या शिफारशी वारसा (वशिला) पध्द्‌तीच्या अंमलबजावणीबाबत नगर विकास विभाग, परिपत्रक क्र. संकीर्ण—२२९२/१९९९/प्र.क्र. १६४/९२/नवि—६, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,दिनांक ३० जुन १९९४ नुसार महानगरपालिकेतील सफाई कामगार/मुकादम यांच्या निवृत्तीनंतर, मृत्युनंतर, स्वेच्छा निवृत्तीनंतर किंवा वैद्यकीयदृष्टया अपात्र ठरविल्यानंतर त्यांचे जागी वारसा हक्काने नियुक्ती करण्यात येते.

उल्हासनगर महानगरपालिकेतील सेवा निवृत्त, दिवंगत, वैद्यकीय सेवानिवृत्त सफाई कामगार यांचे जागी वारसा हक्कांने नियुक्ती मिळणेबाबत खालीलप्रमाणे विनंती अर्ज सादर केलेले आहेत.

| अ.क्र | सफाई कर्मचाऱ्याचे नाव | सेवा निवृत्ती/मृत्यु दिनांक | वारसाचे नाव | कर्मचाऱ्याशी असलेले नातेसंबंध |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. छगन दगडु साठे | स्वेच्छा निवृत्ती, दिनांक ३१/०३/२००८ | श्रीम. मंदा सुनिल साठे | सुन |
| २ | श्री. रामभाऊ षंकर अल्हाट | स्वेच्छा निवृत्ती, दिनांक ३०/०६/२००८ | श्री. अंकुश रामभाऊ अल्हाट | मुलगा |
| ३ | श्रीम. सुरजावती प्रतापसिंग पथारिया | स्वेच्छा निवृत्ती, दिनांक ३१/०८/२००८ | श्री. सुंदर प्रतापसिंग पथारिया | मुलगा |
| ४ | श्रीम. सुशिला भिवा खैरनार | स्वेच्छा निवृत्ती, दिनांक ३१/०८/२००८ | श्री. दगडु भिवा खैरनार | मुलगा |
| ५ | श्रीम. कम्मु कन्नु वाघेला | स्वेच्छा निवृत्ती, दिनांक ३१/०८/२००८ | श्री. धमेंद्र कन्नु वाघेला | मुलगा |
| ६ | श्री. चिमण रामपाल चंडीलिया | स्वेच्छा निवृत्ती, दिनांक ३१/०८/२००८ | श्री. नरेश चिमण चंडीलिया | मुलगा |
| ७ | श्रीम. कमला लक्ष्मण आव्हाड | स्वेच्छा निवृत्ती, दिनांक ३१/०८/२००८ | श्री. अशोक लक्ष्मण आव्हाड | मुलगा |
| ८ | श्री. सिताराम बिहारी देसाई | स्वेच्छा निवृत्ती, दिनांक ३१/०८/२००८ | श्री. महेश सिताराम देसाई | मुलगा |
| ९ | श्रीम. ओखी आत्माराम मकवाना | स्वेच्छा निवृत्ती, दिनांक ३१/०८/२००८ | श्रीम. हेमलता गोविंद मकवाना | सुन |
| १० | श्री. गुरूप्रकाश चिरंजी हडाले | स्वेच्छा निवृत्ती, दिनांक ३१/१०/२००८ | कु. अनिता गुरूप्रकाश हडाले | मुलगी |
| ११ | श्रीम. प्रेमी महावीर भुम्बक | स्वेच्छा निवृत्ती, दिनांक ३०/०९/२००८ | श्री. दिपक महावीर भुम्बक | मुलगा |
| १२ | श्री. पोपट दगडु क्षेत्रे | वैद्यकीय निवृत्ती, दिनांक ३०/०६/२००८ | कु. रेखा पोपट क्षेत्रे | मुलगी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३ | श्री. दादु विट्ठल क्षेत्रे | वैद्यकीय निवृत्ती, दिनांक ३०/०६/२००८ | कु. संतोश दादु क्षेत्रे | मुलगा |
| १४ | श्रीम. इंद्रावती बलबीर चंडालिया | वैद्यकीय निवृत्ती, दिनांक २०/०९/२००८ | कु. संजय बलबीर चंडालिया | मुलगा |
| १५ | श्रीम. ओमबती मन्टुरी भगवाने | वैद्यकीय निवृत्ती, दिनांक २७/०९/२००८ | श्री. अनुपसिंग मन्टुरी भगवाने | मुलगा |
| १६ | कै. फुलाबाई रामभाऊ सोनावणे | मृत्यु दिनांक ०८/०४/२००८ | श्रीम. वैशाली राजु सोनावणे | सुन |
| १७ | कै. महादेव गणपत रोकडे | मृत्यु दिनांक २१/०६/२००२ | श्री. रवि महादेव रोकडे | मुलगा |
| १८ | कै. शकुंतला रावसाहेब पवार | मृत्यु दिनांक ०५/०८/२००६ | श्री. कृष्णा रावसाहेब पवार | मुलगा |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महानगरपालिकेच्या ज्या अधिकाऱ्याचे किमान मासिक वेतन भत्ते वगळुन चारशे रू. किंवा त्याहुन अधिक आहे असे अधिकारी तात्पुरते असो किंवा कायम असो त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकेस निहीत असेल अशी तरतुद आहे. म्हणजेच नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (नि. वे.) नियम १९८२ मधील नियम ६५ व ६६ अन्वये सेवानिवृत्ती प्रकरणी कार्यवाहीस नियुक्ती प्राधिकारी सक्षम आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महापालिका म्हणजेच महासभा ''नियुक्ती प्राधिकारी'' म्हणुन सक्षम आहे.

तरी शासन निर्णयाच्या अधिन राहुन वरील वारसांना उल्हासनगर महानगरपालिकेतील सेवा निवृत्त, दिवंगत, वैद्यकीय सेवानिवृत्त सफाई कामगार यांचे रिक्त जागेवर वारसा हक्कांने नियुक्ती देणेकामी मा. महासभेपुढे मंजुरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ४८ दिनांकः— २०/१/२००९

सुचकाचे नाव :— श्री. रामसागर यादव

अनुमोदकाचे नाव :— श्री. तुलसीदास वसिटा

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे सेवानिवृत्त, दिवंगत वैद्यकीय सेवानिवृत्त सफाई कामगारांचे वारसांस वारसा पघ्दतीने नियुक्ती देण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र.** ४ :— दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत पाणी पुरवठयात सुधारणा करणेकामीचे २७ प्रस्तावित कामांना मंजुरी देणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—नाही, नाही हा विषय पारीत करण्यामध्ये माझी काही हरकत नाही परंतु मी संबंधीत अधिका—यास व्यासपीठावर बोलावू इच्छितो. संबंधीत अधिकारी कोण आहे? श्री. खडताळे साहेब, आपण हे जे २७ प्रस्ताव मंजुरीस आणलेले आहेत, ते आपण आपल्या मर्जीनुसार आणलेले आहेत की नगरसेवकांनी दिले होते?

श्री. एस.जी. खडताळे(कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा):—मा. महापौरजी, उपमहापौरजी, आयुक्त साहेब व सर्व सन्माननिय सदस्यगण, हा जो दलित वस्तीचा प्रसताव आहे, जिल्हाधिकारी कार्यालयाकडील जे परिपत्रक होते त्या अनुषंगाने आम्ही सब डिव्हीजन कार्यालयांकडुन प्रस्ताव मागविले होते. ते प्रस्ताव आल्यानंतर ऑगस्टमध्ये.............

सदस्य श्री.बच्चाराम रुपचंदानी :—मी आपणांस विचारतो, जे २७ प्रस्ताव आपण दिले आहेत, ते नगरसेवकांनी दिल्यानुसारचे आहेत की आपण आपल्या मर्जीनुसार तयार केले आहेत? हे २७ प्रस्ताव कसे आलेत? नगरसेवकांनी दिलेत की आपण सर्व्हे केला आहे त्याचे उत्तर दया त्यानंतर पुढे मी चर्चा करेल.

श्री. एस.जी. खडताळे(कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा):—जिल्हाधिकारी कार्यालयाचे जे परिपत्रक आहे त्या अनुषंगाने.......

सदस्य श्री.बच्चाराम रुपचंदानी :—ते जे परिपत्रक आहे की दलित वस्तीचे जे प्रभाग आहेत, त्यांमध्ये ही कामे करावयाची आहेत. बरोबर आहे? आपण सर्व दलित वस्त्यांचे प्रस्ताव तयार केले आहेत, दलित वस्त्या जेवढया आहेत त्यांची आपणाकडे यादी आहे? आपण वाचुन दाखवा, कोणकोणत्या प्रभागातील प्रस्ताव आपण तयार केला आहे व बाकी प्रभागांमध्ये का केले नाही? जिल्हाधिकारी कार्यालयाचे परिपत्रक आहे ते मला माहित आहे, परंतु मी जो प्रश्न विचारत आहे त्याचे आपण उत्तरच देत नाही. मी आपणांस हे विचारत आहे की, आपण जे २७ प्रस्ताव तयार केले आहे, ते आपण आपल्या मर्जीनुसार केले आहे की, नगरसेवकांनी सांगितले आहे की, आपण या या कामांचे प्रस्ताव तयार करा म्हणुन? ते मी आपणांस विचारु इच्छितो.

श्री. एस.जी. खडताळे(कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा):—दलित वस्तीतील कामांचे प्रस्ताव संबंधीत सब डिव्हीजन ऑफीसमधुन आमच्याकडे आलेले आहेत. ते छाननी होवून आले आहेत.

सदस्य श्री.बच्चाराम रुपचंदानी :—त्यामध्ये विभागाचे नाव लिहून आले आहे काय की हे काम करा म्हणुन? असे काही आले होते काय? हे जे २७ प्रस्ताव आपण तयार केले आहेत, जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन दलित वस्तीतील कामांबाबत मार्गदर्शक सूचना येतात हे मला माहित आहे. परंतु हे जे २७ प्रस्ताव तयार केले आहेत ते आपल्या मर्जीनुसार तयार केले आहेत की नगरसेवकांनी सांगितल्या नुसार तयार केले आहे?

सदस्य श्री. विनोद ठाकुर :—मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, दलित वस्तीतील यांचे काही काम राहिले असेल तर ते या प्रस्तावांमध्ये समाविष्ट करुन घ्या.

सदस्य श्री. बी.बी.मोरे:—सन्माननिय महापौरजी,.....

सदस्य श्री.बच्चाराम रुपचंदानी :—आपण बसून घ्या. मी आयुक्तांना विचारत आहे. हा प्रस्ताव परीत करण्यास माझी काहीही हरकत नाही.

श्री. एस.जी. खडताळे(कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा):—सब डिव्हीजन ऑफिसकडुन हे जे प्रस्ताव आले होते, नागरी दलित वस्त्यांमधील पाणी पुरवठयांमधील जिल्हाधिकारी साहेबांनी एक समिती गठित केली आहे. त्यामध्ये जे सदस्य आहेत ते पाणी पुरवठा समितीचे सभापती आहेत. व सात—आठ सदस्य आहेत. या समितीच्या बैठकीत २४ ऑगस्ट व २५ नोव्हेंबर अशा दोन बैठका झाल्या आहेत. त्या बैठकीतील या यादीस अंतिम स्वरुप देण्यात आले आणि त्यानुसार हा प्रस्ताव आम्ही महासभेस सादर केला आहे.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :—</u>श्री. खडताळे साहेब, मी आपणांस दोन पत्र दिली होती, एक जेट पंपासाठी व एक पाईपलाईनसाठी मी आपणांस सांगितले होते की, हे दोन्ही कामे त्यात समाविष्ट करा. आपण फक्त जेटपंपाचे काम टाकले आणि पाईपलाईनचे काम त्यामध्ये टाकले नाही असे का? मी प्रभागात फिरतो मला माहित आहे की, अमुक याठिकाणी पिण्याच्या पाण्याची समस्या आहे आणि असे असतांना आपण त्या कामाचा प्रसताव या प्रस्तावात का टाकला नाही? मी आपणांस एक पत्र दिले. आयुक्त साहेबांना पत्र दिले. तरी आपण ते काम या प्रस्तावात का टाकले नाही? माझ्या प्रभागामध्ये दलित लोक नाहीत काय?

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>सन्माननिय सदस्यांना मी एक विनंती करतो, ज्या सदस्यांची या प्रस्तावामध्ये कामे आले नसतील त्यांची कामे दुसरी जी आपण यादी तयार करणार आहात त्या यादीत समाविष्ट करावीत.

<u>सदस्य श्री.मोहन साधवानी :—</u>दुस—या यादीत नको, ज्या सदस्यांच्या प्रभागातील कामांची नोंद या यादीमध्ये आलेली नाही त्या सदस्यांची कामे याच यादीत समाविष्ट केली जावीत.

<u>सदस्य श्री.विनोद ठाकुर :—</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, ज्यांच्या प्रभागातील कामे राहीली असतील ती समाविष्ट करुन पाठवा.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :—</u>ज्यांच्या प्रभागातील कामे आली नाहीत, अशी तीन चार कामे यामध्ये समाविष्ट करा.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>....................त्या सभेमध्ये आम्ही ती कामे पास केली. मा. महापौर त्या सभेस उपस्थित होत्या.

<u>श्री. एस.जी. खडताळे(कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा):—</u>सन्माननिय सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी यांच्या प्रभागातील कामाचा एक प्रस्ताव यामध्ये मंजुर झालेला आहे. आपली परवानगी असेल तर आणखी एक प्रस्ताव यामध्ये समाविष्ट करुन घेतो. २७ प्राकलने आम्ही सादर केली आहेत. त्यातील काही घोषित झोपडपट्टीतील .........

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :—</u>श्री. खडताळे साहेब, आपण सर्व नगरसेवकांना विचारणा केली आहे काय?

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :—</u>महापौर महोदया, आमचे जरा ऐकुन घेता का?

<u>श्री. एस.जी. खडताळे(कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा):—</u>दलित वस्तीमधील कामांची अजुनही काही प्राकलने यायची आहे. ती सर्व प्राप्त करुन त्याची छाननी करुन ती जर या निकषांमध्ये बसत असतील तर ती आम्ही सादर करणार आहोत. याशिवाय आम्ही जी काही सादर केलेली यादी आहे,..............

**यावेळी काही सदस्य पास, पास म्हणुन ओरडत होते.**

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :—</u>अहो, आम्हांला तर बोलु दया थोड फार. ही जी २२ कामे आहेत, ती सर्व राखीव प्रभागातील आहेत काय?

<u>सदस्य श्री.विनोद ठाकुर :—</u>मा. महापौरजी, ज्या दलित वस्तीतील कामे राहीली असतील ती समाविष्ट करुन ठराव पारीत केला जावा.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>जे कायदयात बसत असेल तेच करा. दलित वस्तीबाबतचा जो कायदा आहे, ज्या घोषित झोपडपट्टया आहेत त्यामध्येच ही कामे करण्यात यावी.

<u>महापालिका सचिव :—</u>म्हणजेच श्री. खडताळे साहेब, जी यादी देतील तीच लागु करायची ना? श्री. खडताळे साहेबांनी आता निवेदन केले की, जे प्रस्ताव यामध्ये समाविष्ट होवु शकतील, त्यांची यादी तयार करुन देईल. तर ते जी यादी देतील ती यादी ठरावात टाकली जाईल.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया:—</u>ती जी यादी असेल ती एक वेळ सभागृहापुढे आली पाहिजे.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>सन्माननिय सदस्यांना मी एक विनंती करतो, दलित प्रभागाच्या निधीबाबत तुम्ही एवढे भांडता, तुम्ही दलित प्रभागातुन निवडणूकीस उभे राहु शकता?

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>मा. महापौरजी, आपल्या उल्हासनगर महानगरपालिकेत नऊ प्रभाग अनुसूचित जातीसाठी आरक्षित आहेत. आता या प्रस्तावांमध्ये अठरा प्रभागांचा समावेश आहे. त्यानुसार पहिला प्रश्न हा निर्माण होतो की, काय त्या नऊ प्रभागातील कामांचा यामध्ये समावेश आहे. तर त्याचे उत्तर येते, नाही. नऊच्या नऊ प्रभागातील कामे यामध्ये नाहीत. श्री. जे.के. ढोके यांच्या प्रभागातील काम यामध्ये नाही. तर काय त्यांच्या प्रभागामध्ये पाणी पुरवठयाची काही समस्या नाही? त्यांचे एकसुध्दा काम नाही. मग यामध्ये कोणकोणते अनुसूचित जातीचे प्रभाग.......

यावेळी काही सदस्य एकाच वेळी जोरजोरात बोलत होते त्यामुळे कोण नेमके काय बोलत आहेत, हे समजुन येत नव्हते.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u> मला बोलु दया, त्यानंतर आपण बोला. होवु शकते, माझी चुक असेल तर ती आपण सुधारु शकता.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>माझ्या प्रभागातीलही काम घेतलेले नाही. माझ्या प्रभागात पाणी पुरवठयाची स्थिती अतिशय चांगली आहे.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया:—</u>जे प्रभाग अनुसूचीत जातीसाठी राखीव आहेत त्यांना प्रथम यातील निधी वाटप झाला पाहिजे. दुसरे असे की, ज्या वस्तीमध्ये ५० टक्क्यापेक्षा जास्त लोक अनुसूचीत जातीचे राहतात, त्यांच्यासाठी या निधीचा उपयोग झाला पाहिजे. तर येथे जी २७ कामांची यादी दिलेली आहे, काय ते प्रभाग अनुसूचित जातीसाठी राखीव आहेत? किंवा काय तेथे ५० टक्क्यापेक्षा जास्त अनुसूचित जातीचे लोक राहतात? या मुद्दयांचा खुलासा होणे अतिशय जरुरीचे आहे.

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर:—</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, दलित वस्तीच्या नावाने मा. जिल्हाधिकारी साहेबांनी एक समिती नेमली आहे. त्या समितीचे अध्यक्ष संबधीत विभागाचे सभापती असतात, पाणी पुरवठा विभागाचे जे सभापती आहेत ते या समितीचे अध्यक्ष आहेत. मा. महापौरांच्या दालनात या समितीची बैठक झाली होती. त्यामध्ये बीगर सरकारी चार प्रतिनिधी आहेत, दलित वस्तीचे नगरसेवक त्या समितीत आहे. त्यांच्यात झालेल्या बैठकीत या यादीस अंतिम स्वरुप देण्यात आलेले आहे. ज्याठिकाणी ५० टक्क्यापेक्षा जास्त दलित वस्ती आहे, अशा विभागाचीच यांमध्ये कामे आहेत. म्हणुन आता दलित वस्तीच्या या कामांना मंजुरी दिली जावी.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>जग्यासी साहेब, आपण त्या समितीचे सदस्य आहात.

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर :—</u>नाहीतर या प्रस्तावावर मतदान घ्या.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>मा. महापौरजी, जर आपल्या समितीने यादीस अंतिम स्वरुप दिले होते व तीच जर अंतिम असेल तर मग ती महासभेपुढे आणण्याची आपणांस आवश्यकता भासली नसती. महासभेची मंजुरी आवश्यक असल्यानेच विषय महासभेपूढे आला आहे. त्यासाठी महासभेत जे काही प्रश्न विचारले जातील त्याची उत्तरे देणे जरुरीचे आहे.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>सन्माननिय सदस्य साहेब, ही जी दलित वस्तीची पाणी पुरवठया संबंधीची समिती असते, त्या समितीत पहिले निर्णय घेतला जातो आणि त्यानंतर महासभेपुढे प्रस्ताव आणला जातो. महासभेची मंजुरी आवश्यक आहे. आपल्या माहितीसाठी म्हणुन सांगतो ज्याठिकाणी ५० लाखापेक्षा जास्त दलित वस्ती आहे अशा वस्तीतीलच कामे या प्रस्तावान्वये आणलेली आहेत. माझा प्रभाग सुध्दा अनुसूचित जातीसाठी आरक्षित आहे परंतु मी त्याबाबतचा निधी घेतलेला नाही. कारण की माझ्या प्रभागामध्ये पाण्याची समस्या नाही

माझ्या प्रभागात पाणी पुरवठयाची कामे झालेली आहेत. यासाठी ज्या ठिकाणी ५० लाखापेक्षा जास्त दलित वस्ती आहे त्यांच्यासाठी आम्ही निधी दिलेला आहे.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :–</u>जे आरक्षित प्रभाग आहेत, त्यांना वगळुन जर इतर प्रभागांमध्ये या योजनेनुसारचे कामे होत असतील तर तो दलित वस्तीवर अन्याय नाही काय? दलित वस्ती असलेल्या प्रभागांवर अन्याय नाही काय? जिल्हाधिकारी साहेबांनी निर्देश दिल्याप्रमाणेच कामे दलित वस्त्यांमध्ये कामे झाली पाहिजेत.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे सन्माननिय गटनेते साहेब, आपल्या पक्षाच्या सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर यांच्यासमोर या कामाच्या यादीस अंतिम स्वरुप देण्यात आलेले आहे. त्यांना विश्वासात घेवुन बोलावे.

<u>काही सदस्य :–</u>पास, पास......

<u>महापालिका सचिव :–</u>पास? कुणाची काही हरकत? पास? सर्वसंमतीने?

<u>काही सदस्य :–</u>पास,पास.....

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :–</u>बाकी जे अनुसूचित जातीचे प्रभाग आहेत, ते सुध्दा या योजने अंतर्गतच्या कामांमध्ये घेण्यात यावे.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>मा. महापौरजी, दलित वस्त्यांमध्ये ही जी कामे आता होणार आहेत, आम्ही त्यांच्या बाजुने आहोत. आम्ही त्यांच्या विरोधात नाही. माझी ही भुमिका मी प्रथम स्पष्ट करु इच्छितो. परंतु मी काय बोलत आहे, ते कृपया करुन आपण ऐकुन घ्या. आयुक्त साहेब, आपण जरा लक्षपुर्वक ऐकुन घ्या. हा जो निधी आलेला आहे तो दलित वस्तीसाठी आलेला आहे. आमच्या शहरामध्ये जेथे जेथे दलित वस्ती आहे, तेथे या निधितुन कामे केली जावीत असे जिल्हाधिकारी साहेबांचे आदेश आहे. आपण एकुण १८ प्रभागातील कामे हाती घेतली आहेत. काय ते अठराचे अठरा प्रभाग दलित वस्तीसाठी घोषित आहेत काय? याचा कृपया खुलासा करावा.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे:–</u>पास, पास.....

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>श्री. मोरे साहेब, आयुक्त साहेबांना बोलु दया. हा प्रस्ताव पास करुच. मा. आयुक्त साहेब, आपण खुलासा करावा. श्री. खडताळे साहेब, मी माझ्या प्रश्नाचा पुर्नउच्चार करीत आहे. आपण दलित वस्तीचे जी कामे आणली आहेत, गोषवा–यामध्ये नमुद केले आहे की, जिल्हाधिकारी कार्यालयातुन हा निधी आलेला आहे, दलित वस्तीचे जे प्रभाग आहे त्यामध्ये वापर करुन कामे केली जातील. अठराचे अठरा प्रभाग दलित वस्तीसाठी घोषित आहेत, काय आपण हे सभागृहासमोर मान्य करत आहात?

<u>श्री. अशोककुमार रणखांब (अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–</u>श्री. खडताळे, यादीमध्ये आपण जी नावे घेतली आहेत, श्री. जग्यासी यांचा जो प्रश्न आहे याबाबत आपण त्यांना उत्तर दयावे. जी नावे घेतली आहेत ती बरोबर आहे काय एवढेच ते विचारत आहेत त्याबाबत उत्तर दया.

<u>श्री. एस.जी. खडताळे (कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा):–</u>आता आपण जो प्रश्न विचारला आहे, आता जे प्रस्ताव सादर केले आहेत ते दलित वस्तीच्या प्रभागातील आहेत, तसेच घोषित झोपडपट्टीमधील आहेत. सभागृहाचे मत विचारात घेवुन, जे प्रस्ताव आहेत त्याची छाननी करुन ५० टक्क्यापेक्षा जास्त जी दलित वस्ती आहे, असेच प्रस्ताव आम्ही जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करु. अन्यथा ते सादर करणार नाही.

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड:–</u>मा. महापौर, याठिकाणी चुकीचे उत्तर दिले जात आहे. त्याचा अर्थ घोषित झोपडपट्टया किंवा ५० टक्क्याच्यावर तुम्ही सर्व्हे केला नाही. कारण माझा प्रभागातील एक वर्षापासुन १० लाखाचा निधी येवुन पडलेला आहे. त्यांचा अजुन सर्व्हे होत नाही आहे. मी सन्माननिय आयुक्त साहेबांना सांगितले तर ते म्हणतात की, याबाबत लक्षवेधी तुम्ही मांडा. शेवटी माझा निधी घेवुन प्रभागात कामे करावी

लागली. परंतु तुम्ही सर्व्हे केलेला नाही, सर्व्हे न करता तुम्ही अशी कामे आणलीत का या ठिकाणी? हे चुकीचे आहे. तुम्ही आधी व्यवस्थीत सर्व्हे करा. मग कामे आणा.

सदस्य श्री. राजु जग्यासी :—मी श्री. गायकवाड साहेबांच्या मताशी सहमत आहे. दलित वस्तीचा निधी आहे, आमच्या शहरातील कामे झाली पाहिजेत. दलित वस्तीच्या प्रभागात कामे झाली पाहिजेत, त्यास आमचा विरोधी नाही आहे. ज्या प्रभागासाठी हा निधी आला आहे त्याच प्रभागातील कामे झाली पाहिजेत. आपण गोषवारा येण्यापुर्वी ही जबाबदारी घेत आहात काय? आयुक्त साहेब, आपण येथे बसले आहात, हे सर्व प्रभाग दलित वस्ती मध्ये येतात काय? आपण गोषवारा आणतात, आपल्यात आत्मविश्वास आहे काय बोलण्याचा? आपण असा कसा गोषवारा सही करता?

सदस्य श्री. विनोद ठाकुर :—मा. महापौर महोदया, दलित वस्तीचा निधी अदयाप आलेला नाही. कामांची यादी आणि प्राकलने व यादी पाठविली जाईल. व निधी तिकडन मागविण्यात येईल. मागील वेळेस ....

सदस्य श्री. राजु जग्यासी :—श्री. विनोद ठाकुरजी, या कामास आमचा विरोध नाही.

सदस्य श्री. विनोद ठाकुर :—३० ते ३२ लाखाचा निधी मागील वर्षी आला होता. आता आपणाकडुन प्राकलने पाठविल्यानंतर त्यांच्याकडुन किती निधी मंजुर होतो त्यावर अवलंबुन आहे. पुर्ण निधी आलेला नाही.

सदस्य श्री. राजु जग्यासी :—याचाच अर्थ यातील काही कामे रद्द होतील काय?

सदस्य श्री. विनोद ठाकुर :—मागील वर्षी आपण ६५ लाखांच्या कामांचे प्रस्ताव पाठविले होते. मात्र जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन फक्त ३२ लाखाचा निधी मंजुर झाला होता. श्री. खडताळे साहेब, हे बरोबर आहे ना?

सदस्य श्री. राजु जग्यासी :—माझा प्रश्न वेगळा होता.

सदस्य श्री. विनोद ठाकुर :—मला उत्तर देवु दया. सन्माननिय सदस्यांनी काय म्हटले? त्यांनी म्हटले की हा निधी आला आहे. मी त्यांना सांगु इच्छितो की हा निधी अदयाप आलेला नाही. हा निधी मागविला जाईल. परंतु जो त्यांच्याकडुन मंजुर होईल तेवढाच निधी येईल.

सदस्य श्री. राजु जग्यासी :—आयुक्त साहेब, मी जो प्रश्न विचारला आहे त्याचे मला अदयाप उत्तर मिळालेले नाही. काम झाले पाहिजे. आम्ही कामाच्या विरोधात नाही. परंतु गोषवा—या मार्फत आपण सभागृहासमोर जे विषय आणता ते कोठपर्यंत योग्य आहे ते आपण सभागृहात सिध्द करा.

सदस्य श्री. बी.बी. मोरे :—सन्माननिय महापौरजी, आयुक्त साहेब, आता जे सन्माननिय सदस्य तुम्हांला प्रश्न विचारत आहेत, काम होवु दया, पास होवु दया. परंतु काही दलित वस्त्यातील कामे या प्रस्तावात घेण्याचे राहुन गेले आहेत काय? त्याचे तुम्हांला उत्तर देता येत नाही? हा निधी जिल्हाधिका—यांकडुन मागवुन घ्यावा लागतो. तो काही असाच मंजुर होत नाही. मागील वर्षी असे झाले होते की, माझा प्रभाग दलित वस्तीतील असून सुध्दा माझ्या प्रभागातील कामांचा त्यामध्ये प्रस्ताव नव्हता. तुम्ही उत्तर देतांना चुकता.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—श्री. खडताळे साहेब, तुम्ही अभ्यास करुन उत्तर दयावे. तुम्ही एक जबाबदार व्यक्ती आहात.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :—तुम्ही एवढेच उत्तर दिले पाहिजे की, जिल्हाधिकारी साहेबांकडुन निधी मंजुर होवुन येतो, आणि तो मागवुन घ्यावा लागतो.

सदस्य श्री. विनोद ठाकुर :—या प्रस्तावावर मतदान घ्या.

सदस्य श्री. प्रशांत धांडे:– या प्रस्तावावर मतदान घ्या. आम्ही त्या सभेमध्ये या कामांना मंजुरी दिलेली आहे. आणि आम्ही या कामांचा सर्व्हे केलेला आहे. मागील वर्षी मी गलिच्छ वस्ती समितीचा सभापती होतो. कोठे कोठे दलित वस्त्या आहेत त्या आम्हांला तोंडपाठ आहेत.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :–श्री. धांडे, सन्माननिय महापौर महोदयांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली, त्यावेळेस यांचे गटनेते कोठे गेले होते? काय यांचे गटनेते त्याठिकाणी नव्हते?

सदस्य श्री. प्रशांत धांडे :–सन्माननिय मोरे साहेब, त्यांचे सन्माननिय सदस्य बैठकीत उपस्थित होते. त्यांचा एक सदस्य त्या समितीचा सदस्य आहे.

सदस्य श्री. राजु जग्यासी :–मा. महापौरजी, महासभा कशासाठी असते?

सदस्य श्री. विनोद ठाकुर :–सचिव साहेब, मतदान घ्या.

सदस्य श्री. राजु जग्यासी :–आयुक्तांनी माहिती देवु दया ना? आम्हीही हा प्रस्ताव पारीत करु इच्छित आहोतच ना? आम्ही कोठे विरोध करत आहोत? परंतु त्यांना उत्तर तर देवु दया. महासभेत आम्ही कशास बसतो?

सदस्य श्री. प्रशांत धांडे :–हा प्रस्ताव पारीत केला जावा की, मतदान घेतले जावे?

सदस्य श्री. सतिश चहाळ :–आम्ही काही विरोध करीत नाहीत.

सदस्य श्री. राजु जग्यासी :–मतदान कशाबद्दल घेणार? आम्ही तर पास करु इच्छितो ना?

सदस्य श्री. सतिश चहाळ :–मा. महापौरजी, प्रश्न विचारण्याचा आम्हांला अधिकार नाही काय?

सदस्य श्री. प्रशांत धांडे :–मला तर असे वाटते की, तुम्ही संपुर्ण दलित वस्तीच्या विरोधात आहात असे मला वाटते.

महापौर :–उभे असलेल्या सर्व सन्माननिय सदस्यांना माझी विनंती आहे की, त्यांनी आपापल्या आसनावर बसुन घ्यावे. आता या विषयावर मतदान घेतले जाईल.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :–महापौर महोदया, याचा अर्थ ज्याठिकाणी दलित वस्ती आहे त्या ठिकाणच्या कामांचा विरोधी पक्षीयांचा विरोध आहे.

सदस्य श्री. दिलीप गायकवाड :–मा. महापौर महोदया, हा प्रस्ताव तुम्ही पारीत करा. परंतु या प्रस्तावामधील जी कामे आहेत त्यातील एखादेही काम जर दलित वस्तीतील नसेल तर संबंधीतांवर कारवाई झाली पाहिजे. दलित वस्तीतील प्रभाग असेल तर त्यास या योजनेअंतर्गतचा निधी दया. त्यास आमचा काही विरोध नाही. परतु एखादा जरी बिगर दलित वस्तीचा प्रभाग आला असेल तर संबंधीतावर कारवाई होईल.

सदस्य श्री. रविंद्र बागुल :–मा. महापौर महोदया, श्री. दिलीप गायकवाड यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे तो अतिशय बरोबर आहे. ही जी कामे प्रस्तावित केली आहेत त्यातील काही कामे जर दलित वस्तीतील नसतील तर संबंधीतांवर कारवाई झाली पाहिजे.

काही सदस्य :–पास, पास......

सदस्य श्री. राजु जग्यासी :–आम्ही पास तर करतच आहोत ना? आमचा विरोध नाही. परंतु आमच्या प्रश्नाचे आयुक्त साहेबांना उत्तर तर देवु दया.

**श्री. अशोककुमार रणखांब (अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—**सन्माननिय सदस्यांनी जे प्रश्न उपस्थित केले आहेत, त्या प्रश्नामध्ये दोन तीन प्रकारचे कंगोरे स्पष्टपणे दिसुन आले आहेत. पहिली गोष्ट की, हा जो प्रस्ताव आपल्या समोर आलेला आहे त्या प्रस्तावामध्ये दलित वस्ती अंतर्गत जी कामे प्रस्तावित केली आहेत ती वस्ती दलित वस्तीच्या अंतर्गत मोडते काय? काही सन्माननिय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केले की याच्या अंतर्भुत असलेली कामे ही दलित वस्ती अंतर्गत आहेत काय? श्री. खडताळे साहेब तुम्ही संबंधीत विभागाचे कार्यकारी अभियंता म्हणुन काम पाहता, मी तुम्हांला आदेश देतो की, यामध्ये जी कामे अंतर्भुत आहेत त्याची नियमाप्रमाणे पुर्ण खात्री करा. आणि ज्याप्रमाणे असतील आणि जी कामे निकषाची पुर्तता करत असतील तीच कामे तुम्ही सादर करा. अन्यथा दलित वस्तीचा निधी दुसरीकडे वापरला जावु नये.

**काही सदस्य :—**पास,पास........

**महापालिका सचिव :—**एकमताने पास? श्री. खडताळे साहेब जी यादी देतील ती अंतिम राहिल.

**महापौर :—** श्री. खडताळे साहेब, जो दलित वस्तीचा निधी आहे तो दलित वस्तीसाठीच वापरला जावा.

सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र.** ४:— दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत पाणी पुरवठयात सुधारणा करणेकामीचे २३ प्रस्तावित कामांना मंजुरी देणे.

**प्रस्तावना**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचे शासन निर्णय क्र. विवयो १०२०००/१५९२, प्र.क्र. १८९, नवि—४, मंत्रालय, मुंबई दिनांक ५/३/२००२ व नादपी २००४ प्र.क्र. २८, पापु २२ मंत्रालय मुंबई दिनांक २९/८/२००६ अन्वये नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत पाणी पुरवठयात सुधारणा करण्याच्या दृष्टीने प्रस्ताव तयार करुन सादर करण्याचे निर्देश देणेत आलेले आहेत.

उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत दिनांक २५/८/२००७ रोजी शासन निर्णयात दिलेल्या सूचनेप्रमाणे नागरी दलित वस्ती पाणी पुरवठा अंतर्गत घ्यावयाच्या उपाय योजनेसाठी दलित वस्ती पाणी पुरवठा अंतर्गत घ्यावयाच्या उपाय योजनेसाठी दलित वस्ती पाणी पुरवठा अंतर्गत घ्यावयाच्या उपाय योजनेसाठी दलित वस्ती पाणी पुरवठा प्रकल्प अंमलबजावणी समिती स्थापन करण्यात आली व समितीची बैठक दिनांक २६/११/२००८ रोजी मा. अध्यक्ष व सभापती, पाणी पुरवठा विभाग यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. बैठकीत ठरावानुसार दलित वस्ती अंतर्गत १३९.७६ लक्ष रक्कमेचे हाती घेण्याचा २३ कामांना मंजुरी देण्यात आली.

मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांनी दिलेल्या सूचनेनुसार नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत सन २००८—०९ करिता उल्हासनगर शहरातील कॅम्प नं. १ ते ५ मधील अनुसूचित जाती (आरक्षित) प्रभागामध्ये पाणी पुरवठयात सुधारणा करण्याकरीता नविन वितरण वाहिनी टाकणे, विंधन विहिरी खोदून त्यांच्यावर नविन जेट पंप बसविणे इत्यादी कामांचे रु. १३९.७६ लक्ष इतक्या किंमतीचे सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे २३ प्रस्ताव तयार करुन मंजूरीसाठी मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे सादर करावयाचे असल्याने सदर प्रस्तावास मा. महासभेची मंजुरी आवश्यक असल्याने मा. महासभेकडे मंजुरीसाठी सादर.

**महासभा ठराव क्:** ४९ — **दिनांक:—** २०/१/२००९

सुचकाचे नाव :— श्री. रामसागर यादव

अनुमोदकाचे नाव :— श्री.बी.बी.मोरे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत पाणी पुरवठयात सुधारणा करणेकामी सोबत जोडलेल्या यादीतील रु. १,२७,०४,०५९/— खर्चाच्या २३ प्रस्तावित कामांना मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

**नागरि दलित वस्ती पाणी पुरवठा योजने अंतर्गत वर्ष २००८ — ०९ मध्ये करावयाच्या कामाची यादी.**

| अ.क्रं | कामाचे नांव | किंमत | वार्ड क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | उल्हासनगर ३ मधील अबिका दर्शन सोसायटी ते मानसीग गॅरेज पर्यत १०० मी मी व्यासाची जी.आय जलवहिंनी टाकणे. | ५,७४,७००/— | ८ |
| २ | उल्हासनगर ३ मधील मानसीग गॅरेज ते बाबा साहेब आंबेडकर चौक पर्यत १०० मी मी व्यासाची जी.आय जलवहिंनी टाकणे. | ३,६६,२५०/— | ८ |
| ३ | उल्हासनगर ३ मधील स्मशान भुमी ते पवई भागात पर्यत १५० मी मी व्यासाची जी.आय जलवहिंनी टाकणे. | ३१,५९,३००/— | २९ |
| ४ | उल्हासनगर ४ मधील नागसेन नगर साठी ८० मी मी व्यासाची जी. आय जलवहिंनी टाकणे. | २,२२,६००/— | ५५ |
| ५ | उल्हासनगर ५ मधील तानाजीनगर साठी १०० मी मी व्यासाची डी. आय जलवहिंनी टाकणे. | २,५२,६००/— | ७१ |
| ६ | उल्हासनगर ४ मधील रामजी आंबेडकर नगर तक्षशिला नगर व महात्माफुलेनगर येथ विधंन विहीर घेवुन २ एच पी चा जेट पंप बसविणे. | ३,४२,३००/— | ६३ |
| ७ | उल्हासनगर २ मधील बुध्द नगर कृष्ण कॉलनी येथे विधंन विहीर घेवुन २ एच पी चा जेट पंप बसविणे. | १,०२,८५०/— | ४० |
| ८ | उल्हासनगर २ मधील लास्सी बिल्डीग वडार कॉलनी करीता १०० /८० मी मी व्यासाची जी.आय जलवहिंनी टाकणे. | ४,६४,४४०/— | ४० |
| ९ | उल्हासनगर ३ मधील वार्ड क्र. १० विठठलवाडी स्टेशन ते इंदिरा नगर करीता १५० मि. मि. व्यासाची सी. आय जलवाहीनी टाकणे. | ७,६७,३५१/— | १० |
| १० | उल्हासनगर ३ वार्ड क्र. ४३ अशोक सम्राट नगर बॅरेक क्र. ८८१ जवळ, रॉयल टेलर्स जवळ व मोरे घरा पयत १०० मि. मि. व्यासाची जी. आय जलवाहीनी टाकणे. | २,८४,७२५/— | ४३ |
| ११ | उल्हासनगर ३ मधील वार्ड क्र. ४५ आनंदनगर फस्ट गेट ते आनंदनगर व मुरालीधर अपार्टमेन्ट पर्यत १०० मि. मि. व्यासाची जी. आय जलवानिहीनी टाकणे. | ६,४८,८२५/— | ४५ |
| १२ | उल्हासनगर ३ वार्ड क्र.४३ अशोक सम्राटनगर मधील आशीर्वाद सोसायटी बॅ. न. १०८१ व मोतोश्री स्कुल माग १००/८० मि. मि. व्यासाची जी. आयजलवाहीनी ाकणे. | ४,६६,०००/— | ४३ |
| १३ | उल्हासनगर ३ मधील वार्ड क्र. ४५ राधास्वामी संतसंग हॉल ते इमलीपाडा पर्यत १०० मि. मि. व्यासाची जी. आय जलवाहीनी टाकणे. | ७,०४,९०५/— | ४५ |

| | | | |
|---|---|---|---|
| १४ | उल्हासनगर ५मधील वार्ड क्र. ६६ हरीजन पाडयात कर्मचारी निवासस्थान भागात विधंन विहीर घेवुन दोन हॉ. पा. जेटपंप बसविणेबाबत. | १,१५,५००/— | ६६ |
| १५ | उल्हासनगर ४ मधील वार्ड क्र. ६३ नालंदा स्कुल जवळ व अशोक वन येथे विधंन विहीर घेवुन जेटपंप बसविणे बाबत. | २,२६,४००/— | ६३ |
| १६ | उल्हासनगर २ मधील वार्ड क्र. ४० बुध्द विहार ते श्री. भारत मार्बल यांचे घरा पर्यत १०० मि. मि. व्यासाची जी. आय जलवाहीनी टाकणे. | १,३३,४८०/— | ४० |
| १७ | उल्हासनगर ४ मधील वार्ड क्र. ३८ रमाबाई व हनुमान नगर एरीयासाठी १००/८० मि. मि. व्यासाची जी. आय जलवाहीनी टाकणे. | १०,००,३५०/— | ३८ |
| १८ | उल्हासनगर ४ मधील वार्ड क्र. ६३ गुरुनानक चौका पासुन ते भिमशक्ती, नालंदा शाळे पर्यत ८० मि. मि. व्यासाची जी. आय जलवाहीनी टाकणे. | २,१९,५००/— | ६३ |
| १९ | उल्हासनगर ४ मधील तंक्षशिला टाकी शिवसेना कार्यालय व चिकुगल्ली ब्लॉक अेरियासाठी ८०/५० मि. मि. व्यासाची जी. आय जलवाहीनी टाकणे. | ९,८४,८२५/— | ६४ |
| २० | उल्हासनगर ५ मधील समतानगर येथे १५० मि. मि. व्यासाची जी. आय जलवाहीनी टाकणे. | ४,०१,७५०/— | ६५ |
| २१ | उल्हासनगर ४ मधील आंबेडकर पुतळा ते हनुमान मंदीर परिसर १०० मि. मि. व्यासाची जी. आय जलवाहीनी टाकणे. | ४,१८,२००/ | ६४ |
| २२ | उल्हासनगर ४ ओ. टी चौक ते भिमनगर येथे १०० मि. मि. व्यासाची जी. आय जलवाहीनी टाकणे. | १,११,८०८/— | ४७ |
| २३ | उल्हासनगर ५ मधील सहयाद्रीनगर, पटेलनगर व जुने नेहरूनगर येथे ५०/१०० मि. मि. व्यासाची जी. आय जलवाहीनी टाकणे. | ७,३५,४००/— | ६८ |
| | एकुण रक्कम | १,२७,०४,०५९/— | |

---

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर :</u>—मा. महापौरजी, स्थायी समितीचे सभापती श्री. मोहन रामरख्यानी यांचा आज वाढदिवस आहे. त्यांचे अभिनंदन करण्यासाठी तसेच सभागृहात मिठाई वाटप करण्यासाठी परवानगी दिली जावी.

<u>महापालिका सचिव :</u>—मा. महापौरांची अनुमती आहे. श्री. रामरख्यानी यांचे संपुर्ण सभागृहाच्यावतीने हार्दिक अभिनंदन। पुढील कामकाज चालु करायचे?

विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ५ :—** उल्हासनगर शहरासाठी सुधारीत विकास योजनेचे काम खाजगी संस्थाकडुन करुन घेणेस मान्यता देणे.

---

<u>काही सदस्य :</u>—पास—पास......

<u>महापौर :</u>— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ५:—** उल्हासनगर शहरासाठी सुधारीत विकास योजनेचे काम खाजगी संस्थाकडुन करुन घेणेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

१. नगरविकास विभगााकडील अधिसूचना क्र. टीपीएस—१२०१/८०६/सीआर—८६/२००२/युडी—१२, दिनांक २६/१०/२००४ अन्वये शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ मधील तरतुदीनुसार उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्र हे उल्हासनगर, अंबरनाथ, कुळगाव—बदलापूर आणि परिसर अधिसूचित क्षेत्र यातुन वगळल्याने उल्हासनगर महानगरपालिका आपल्या क्षेत्रासाठी स्वतंत्र नियोजन प्राधिकरण आहे.

२. उल्हासनगर शहराची विकास योजना सन १९७४ साली मंजूर झालेली असून त्यास साधारणत: ३३ वर्षे होत आहेत. वस्तुत: महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम मधील तरतुदीनुसार शहराची विकास योजना १० वर्षापर्यंत लागू असते ती नव्याने सुधारीत करणे अपेक्षित होते. त्यानुसार दिनांक ९/४/२००१ रोजी नव्याने सुधारीत विकास योजना करण्यांत आली. तथापि सदर विकास योजना रद्दबादल ठरविल्याने शासनाने दोन्ही विकास योजना म्हणजेच सन १९७४ व २००१ यातील कठोरतम तरतुदीनुसार वापर करण्याबाबत सुचित केले आहे. यामुळे दोन्ही विकास योजनांचा वापर करते वेळेस ब—याच अडचणी निर्माण होत आहेत.

३. यास्तव उल्हासनगर शहरातील सुधारीत विकास योजना तयार करण्यासाठी अधिकारी व कर्मचारी उपलब्ध करुन देणेकामी शासनाला या कार्यालयातर्फे दिनांक १७/७/२००७ व दिनांक ४/८/२००७ रोजीच्या पत्रान्वये विनंती करण्यात आली होती. तथापि, अवर सचिव, नगर विकास विभाग यांनी त्यांचेकडील पत्र क्र. टीपीव्ही—१९०७/८६०/प्र.क्र. १४२/०७/०७/नवि—२७, दिनांक ३/१२/२००७ च्या पत्रान्वये सध्या सांगली मिरज—कुपवाड, कल्याण व धुळे महानगरपालिका यांचे विकास योजनांची कामे प्रगतीपथावर असल्याने विकास योजनेसाठी अधिकारी, कर्मचारी उपलब्ध करुन देणे शक्य नाही, असे कळविले असून उल्हासनगर महानगरपालिकेने सदर काम खाजगी संस्थेकडुन करणेविषयी सुचविले आहे. त्या अनुषंगाने विकास योजनेचे काम खाजगी संस्थांकडुन करुन घेणेबाबत सदरहू बाब मा. सर्वसाधारण सभेसमोर ठेवून कृपया मान्यता घ्यावी.

<u>महासभा ठराव क्र</u>: ५० दिनांक:— २०/१/२००९

सुचकाचे नाव :— श्री. रामसागर यादव

अनुमोदकाचे नाव :— श्री. बी.बी. मोरे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर शहरासाठी सुधारीत विकास योजनेचे काम खाजगी संस्थाकडुन करुन घेणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ६ :—** पालिका सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता यांना तात्पुरत्या आजारास्तव रजा मंजुर करणे.

---

<u>महापालिका सचिव :—</u>जेवढे दिवस ते सभांना आले नव्हते तेवढया दिवसाची रजा मंजुर केली जावु शकते.

<u>सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता :–</u>मला रजा नको आहे.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :–</u>आमचे पहेलवान धडधाकटपणे उभे आहेत.

<u>महापालिका सचिव:–</u>श्री. प्रभुनाथ गुप्ता आपण दोन महिने सभांना उपस्थित नव्हता, त्या कालावधीसाठीची मंजुरी घ्यावी लागेल.

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>महापौर :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ६:–** पालिका सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता यांना तात्पुरत्या आजारास्तव रजा मंजुर करणे.

<u>प्रस्तावना</u>

पालिका सदस्या श्री प्रभुनाथ गुप्ता, यांचे सोबतचे दिनांक ९/१/२००९ रोजीचे पत्र कृपया अवलोकन व्हावे .

उल्हासनगर महानगरपालिकेच्या प्रभाग क्र. ३२ मधून पालिका सदस्य म्हणून निवडून आलेले श्री प्रभुनाथ गुप्ता यांना दिनांक १९/११/२००८ रोजी महापालिका मुख्यालयाच्या प्रवेशद्वारासमोर अपघात होवून त्यांच्या पायाला दुखापत (फॅक्चर) झाल्याने त्यांना कल्याण येथील होली क्रॉस हॉस्पीटलमध्ये भरती करण्यांत आले होते. त्यांच्यावर उपचार करणा–या डॉक्टर मोघे यांनी त्यांना इमारतीचे जिने चढणे –उतरण्यास मनाई केल्याने ते माहे नोव्हेंबर २००८ पासून महापालिकेच्या सभांना अनुपस्थित आहेत.
मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ११(ब) मध्ये तात्पुरता आजार किंवा महानगरपालिकेने मान्य केलेले कोणतेही कारण अशा प्रसंगी लागोपाठ तीन महिन्यांच्या अवधीत महापालिकेच्या सभांना गैरहजर राहता येईल अशी तरतुद आहे.

उपरोक्त तरतुदी नुसार पालिका सदस्य श्री प्रभुनाथ गुप्ता यांच्या अनुपस्थिती बाबत महासभेंची मंजुरी घेणे आवश्यक असल्याने महासभेपुढे प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र:</u> ५१ दिनांक:–२०/१/२००९

सुचकाचे नाव :– श्री. सतीश चहाळ

अनुमोदकाचे नाव :– श्रीमती सुमन शेळके

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे पालिका सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता यांना तात्पुरत्या आजारास्तव दिनांक १९/११/२००८ पासुन ३ महिन्याची किंवा ते सभांना उपस्थित राहण्यास सक्षम होईपर्यंतच्या कालावधीपर्यंत यापैकी जो कालावधी कमीत कमी असेल त्या कालावधीपर्यंतची रजा मंजुर करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ७ :—** जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पूर्ननिर्माण अभियाना अंतर्गत उल्हासनगर पाणी पुरवठा योजना, वितरण व्यवस्थेच्या कामी मुंबई महानगर विकास प्राधिकरणाकडून रु. ६३.८३ कोटी कर्ज उभारण्यास मान्यता देणे.

---

<u>महापालिका सचिव :—</u>दुरुस्ती केली आहे. पास?

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>मा. महापौरजी, मा. सचिवजी,......

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ७:—** जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पूर्ननिर्माण अभियाना अंतर्गत उल्हासनगर पाणी पुरवठा योजना, वितरण व्यवस्थेच्या कामी मुंबई महानगर विकास प्राधिकरणाकडून रु. ६३.८३ कोटी कर्ज उभारण्यास मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर शहरातील अस्तित्वातील वितरण व्यवस्था अतिशय जुनी झालेली असल्यामुळे व त्यामध्ये मोठया प्रमाणात गळत्या असल्यामुळे शहरातील पाणी पुरवठयात सुधारणा करण्यासाठी सन २०४१ ची लोकसंख्या १२००००० लक्षात घेवून व पाण्याची मागणी १९२ द.ल.लि. लक्षात घेवून जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियांना अंतर्गत शहरातील पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेच्या कामाचे रु. १७७.५७ कोटी रक्कमेचे सविस्तर अंदाजपत्रके व आराखडे, तांत्रिक सल्लागारामार्फत तयार करुन केंद्र शासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्यात आले होते.

सदर केंद्र शासनामार्फत उल्हासनगर पाणी पुरवठा योजना वितरण व्यवस्थेच्या कामाच्या रु. १२७.६५ कोटी रक्कमेच्या प्रस्तावास दिनांक १९/१२/२००८ रोजी झालेल्या केंद्रस्तरीय बैठकीत प्रशासकिय मंजुरी देण्यात आली आहे. तसेच राज्य शासनाच्या, दिनांक २७/१२/२००८ रोजी राज्यस्तरीय सुकाणु समितीच्या बैठकीत या योजनेस मंजुरी प्राप्त झालेली आहे. मंजुर योजनेनुसार या कामासाठी केंद्र शासनाकडुन ३५ टक्के महाराष्ट्र शासनाकडुन १५ टक्के, असा एकुण ५० टक्के निधी उपलब्ध होणार आहे. व उर्वरीत ५० टक्के निधी महानगरपालिकेमार्फत उभारावयाचा आहे. मंजुर योजनेनुसार योजनेचा आकृती बंध खालील प्रमाणे

| | |
|---|---|
| १) केंद्र शासनाचे अनुदान— ३५ टक्के | रु. ४४.६८ कोटी |
| २) राज्य शासनाचे अनुदान—१५ टक्के | रु. १९.१४ कोटी |
| ३) महानगरपालिका भाग— ५० टक्के | रु. ६३.८३ कोटी |
| एकुण— | रु. १२७.६५ कोटी |

वर नमुद केल्याप्रमाणे, केंद्र व राज्य शासनाच्या अनुदाना व्यतिरिक्त ५० टक्के रक्कम म्हणजेच रु. ६३.८३ कोटी रक्कम, महानगरपालिके मार्फत उभारावयाची आहे. महानगरपालिकेची सध्याची आर्थिक परिस्थिती बघता महानगरपालिकेस स्वत:च्या उत्पन्नामधुन एवढा निधी उभारणे शक्य नसल्यामुळे या कामाकरीता कर्ज स्वरुपात निधी उभारणे आवश्यक आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेचे क्षेत्र, मुंबई महानगर विकास प्राधिकरणाच्या क्षेत्रात असल्यामुळे मुंबई महानगर विकास प्राधिकरण ही जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्नर्निर्माण अभियानाची, राज्यस्तरीय नोडल संस्था असल्यामुळे मुंबई महानगर विकास प्राधिकरणामुळे कर्जाची उभारणी करावी लागणार आहे.

सदर पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेच्या कामाकरीता मुंबई महानगर विकास प्राधिकरणाकडुन रु. ६३.८३ कोटी रक्कमेची उभारणी केल्यास महानगरपालिकेस व्याजापोटी मुळ मुद्दल परत फेडीपोटी असे एकुण सरासरी रु. ७.५० कोटी प्रति वर्षी रक्कमेचा हप्ता दयावा लागणार आहे. सदर पाणी पुरवठा योनजेची स्वंयपुर्ण होण्याकरीता महानगरपालिकेस पाण्याच्या दरात टप्पा टप्याने वाढ करावी लागणार आहे.

सदर पाणी पुरवठा योजनेस केंद्र शासनाचे व राज्य शासनाचे अनुदान प्राप्त होणार असल्यामुळे सदरची योजना मंजुर आकृती बंधानुसार राबविणेकरीता महानगरपालिकेस मुंबई महानगर विकास प्राधिकरणाकडुन रु. ६३.८३ कोटी रक्कम मुंबई महानगर विकास प्राधिकरणाकडुन कर्ज स्वरुपात निधी उभारण्याच्या सदर प्रस्तावास मा. महासभेची मंजुर घेणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने सदर प्रस्ताव मा. महासभेच्या पटलावर मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: ५२ दिनांकः— २०/१/२००९

सुचकाचे नाव :— श्री. रामसागर यादव

अनुमोदकाचे नाव :— श्री. बी.बी. मोरे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पूनर्निर्माण अभियाना अंतर्गत उल्हासनगर पाणी पुरवठा योजना, वितरण व्यवस्थेच्या कामी मुंबई महानगर विकास प्राधिकरणाकडून रु. ६३.८३ कोटी कर्ज उभारण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. ८ :— महापालिकेच्या पात्र कर्मचा-यांची पदोन्नती मान्य करणे.

---

सदस्य श्री. राजेश वदारिया:—मा. महापौरजी, सचिव साहेब, ....

सदस्य श्री. विनोद ठाकुर :—मा. महापौरजी, मा. सचिवजी, पदोन्नतीचा हा प्रस्ताव पुढे ढकलला जावा. या प्रस्तावामध्ये फक्त संवर्ग ४ च्या कर्मचा—यांना पदोन्नती देण्याचे प्रस्तावित केले आहे. लिपिक संवर्गातील पात्र कर्मचा—यांचा सुध्दा पदोन्न्ती देण्याचा प्रस्ताव आणला जावा.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—कोणता विषय पुढे ढकलत आहात?

काही सदस्य :—विषय क्र. ८

सदस्य श्री. राजेश वदारिया :—विषय क्र. ८ कुठे आहेत?

सदस्य श्री.बी.बी. मोरे :—मा. महापौरजी, आयुक्त साहेब, ८ व्या क्रमांकाचा जो विषय आलेला आहे, तो सर्वसंमतीने पुढे ढकलण्यात यावा.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, मला ७ व्या क्रमांकाच्या विषयावर बोलायचे आहे. बोलु कोठे दिले जात आहे? पास, पास म्हणत आहेत.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :–</u>७ व्या क्रमांकाचा विषय पारीत झाला आहे.

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुरः–</u>पदोन्नती संदर्भात सर्वांचा एकत्रितपणे विषय महासभेपुढे आणला जावा. लिपिकांनाही जी पदोन्नती दयायची आहे, आचारसंहिता लागण्यापुर्वी फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या आठवडयात हा प्रस्ताव आणला जावा.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :–</u>३९ सफाई कामगारांना पदोन्नती देण्याबाबतची ही जी यादी तयार करण्यात आली आहे त्या यादीत सुध्दा फार मोठा घोटाळा आहे. त्याची व्यवस्थित छाननी करुन प्रस्ताव आणला जावा. १९८७ च्या कर्मचा–यास पदोन्नती न देता १९९२ च्या कर्मचा–यास पदोन्नती देण्याबाबत शिफारस करण्यात आलेली आहे.

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड :–</u>मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, पदोन्नतीचा जो विषय आहे, त्या प्रस्तावात ज्या कर्मचा–यांची नावे सेवाजेष्ठते नुसार येण्याची राहुन गेली असतील त्यांची नावे समाविष्ट करुन पुढच्या सभेत प्रस्ताव आणला जावा. व त्यांना न्याय दिला जावा.

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर :–</u>मा. महापौरजी, ही जी समिती आहे ती रद्द करुन नविन समिती स्थापन केली जावी. कारण की या समितीच्यावतीने जे प्रस्ताव येतात, त्यांच्यात वारंवार काही ना काही घोळ असतो. दर वेळी नवनविन यादी आणली जाते. पदोन्नतीचे काम अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेकडे देण्यात यावे.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :–</u>काही मुकादमांची भरती केलेली आहे, या यादीमध्ये काही गडबड वाटते, यासाठी हा विषय पुढें ढकलला जावा. व यामध्ये काही सुधारणा करुन जे काही पात्र कर्मचारी राहिले असतील त्यांना न्याय देण्यासाठी त्यांचाही प्रस्ताव पुढील महासभेपुढे आणला जावा.

<u>श्री. अशोककुमार रणखांब (अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी)ः–</u>यामध्ये मी खुलासा करतो. या समितीने जो प्रस्ताव दिला होता तो पुर्ण तपासणी करुन दिलेला आहे. तथापी आपणामधील काही सदस्यांची मागणी आहे. ती अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेसारख्या एखादया संस्थेकडे पदोन्नतीचे काम देण्यात यावे. आणि याबाबत जर आपण निर्देश दिला तर निश्चितपणे तशी कार्यवाही केली जाईल. आणि प्रशासन त्याची दखल घेईल आणि आपण दिलेल्या निर्देशाप्रमाणे हे काम दुस–या संस्थेस देण्याबाबतची कार्यवाही केली जाईल.

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर :–</u>धन्यवाद साहेब।

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड :–</u>पुढील सभा आचारसंहिता लागु होण्याअगोदर फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या आठवडयात घ्या. आणि हा विषय निर्णयीत काढा.

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर :–</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, हरकतीच्या मुद्दयांन्वये एका विषयाकडे आपले लक्ष वेधु इच्छितो. मिरा–भाईंदर महानगरपालिकेतील सदस्यांचे मानधनात वाढ करण्याचा प्रस्ताव त्या महापालिकेच्या महासभेत आलेला आहे. त्याप्रमाणे आम्ही सांगु इच्छितो की, आमचेही मानधन दरमहा दहा हजार रुपये एवढे करावे.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>सन्माननिय महापौरजी, आयुक्त साहेब, आणि सचिव साहेब, इकडे जरा लक्ष दया. या महापालिकेतील कर्मचा–यांचा पगार जास्त आहे. परंतु सन्माननिय सदस्यांना मात्र ४००० रुपये मानधन आहे. ते सांगायला सुध्दा आम्हांला कमीपणाचे वाटते. आणि म्हणुन मुंबई, नवि मुंबई महानगरपालिकेमध्ये सदस्यांच्या मानधनामध्ये वाढ झाली आहे आणि आता मिरा–भाईंदर महानगरपालिकेत सदस्यांच्या मानधनात वाढ झाली आहे. त्यानुसार उल्हासनगर महानगरपालिकेतील सदस्यानां दरमहा दहा हजार रुपये मानधन मिळाले पाहिजे असे मी याठिकाणी सांगु इच्छितो.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळः–</u>महापौर महोदया, मिरा–भाईंदर सारखी नव्याने स्थापन झालेली महापालिका आपल्या सदस्यांच्या मानधनात वाढ करुन ते दहा हजार रुपयांपर्यंत करु शकते. आपली महानगरपालिका तर

त्यांच्या अगोदरची महानगरपालिका आहे म्हणजे उल्हासनगर महानगरपालिकेतील सदस्यांचे मानधन दहा हजार रुपये प्रतीमहा असे करण्यात यावे.

**सदस्य श्री.बी.बी. मोरे :—**ठिक आहे स्वागत आहे, राष्ट्रवादी कॉंग्रसचे सुध्दा स्वागत आहे. पास, पास झाले आता.

**महापालिका सचिव :—**थेट ठराव कसा पारीत करणार?

**सदस्य श्री. विनोद ठाकुर :—**नाही याबाबत पुढील महासभेत प्रस्ताव आणला जाईल.

**महापालिका सचिव :—**यांचे म्हणणे आहे की, आताच ठराव पारीत केला जावा.

**सदस्य श्री. सतिश चहाळ :—**महापौरांच्या अनुमतीने पुढील महासभेत प्रस्ताव आणुन या महापौरांच्या कालावधीतच तो पारीत केला जावा.

**सदस्य श्री. मोहन साधवानी :—**पुढील महासभेत याबाबतचा प्रस्ताव आणला जावा.

**महापालिका सचिव :—**याबाबत दोन पर्याय आहे, एकतर अशासकिय प्रस्ताव आणा. किंवा प्रशासनाच्यावतीने प्रस्ताव आणला जावा.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**मा. महापौरजी, विषय क्र. ७ वर मी बोलु इच्छित होतो, परंतु मला असे वाटते की, येथे आपण लोक आमचे म्हणणे ऐकण्यास तयार नाहीत त्यामुळे मी सभात्याग करत आहे.

सांयकाळी ५.३८ वाजता श्री. राजेश वदारिया यांनी सभात्याग केला.

**सदस्य श्री.बी.बी. मोरे :—**आता सभेचे काम संपत आले आहे, केवळ जणगणमन म्हणणे बाकी असतांना हे सभात्याग करत आहेत. सभात्यागच करायचा होता तर तो त्यांनी या अगोदरच करावयास पाहिजे होता.

**सदस्य श्री. विनोद ठाकुर :—**हे राष्ट्रगिताचा अपमान करत आहेत.

**सदस्य श्री. बी.बी. मोरे:—** राष्ट्रवादीवाले सहमत होतात, रागपण व्यक्त करतात, व सभात्याग करत पळुनपण जातात.

**सदस्य श्री. रविंद्र बागुल :—**श्री.बी.बी. मोरे साहेब, आमच्या सदस्यांनी सभात्याग केला आहे.

**महापौर :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ८:—** महापालिकेच्या पात्र कर्मचा-यांची पदोन्नती मान्य करणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवरील विविध संवर्गातील पदावर पदोन्नती देणेकामी मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४ (१) मधील तरतुदीन्वये दिनांक २४ ऑक्टोंबर २००८ रोजीच्या आदेशान्वये खालीलप्रमाणे विभागीय पदोन्नती समिती गठित केलेली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | अतिरिक्त आयुक्त | — | अध्यक्ष |
| २) | उप आयुक्त (मुख्यालय) | — | सदस्य सचिव |
| ३) | उप आयुक्त (कर) | — | सदस्य |
| ४) | उप आयुक्त (आरोग्य) | — | सदस्य |
| ५) | मुख्य लेखा परिक्षक | — | सदस्य |

६) मागासवर्गीय अधिकारी — सदस्य
(अधिक्षक किंवा त्यापेक्षा उच्च पदावरील)

उल्हासनगर महानगरपालिकेतील दिनांक ०१ जानेवारी, २००८ रोजी कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांची संवर्गनिहाय अंतिम सेवा जेष्ठता यादी दिनांक १७/१०/२००८ च्या परिपत्रकानुसार अंतिमतः प्रसिध्द केलेली आहे.

उपरोक्त विभागीय पदोन्नती समितीची बैठक दिनांक १६/०१/२००९ रोजी दुपारी ४.०० वाजता मा. अतिरिक्त आयुक्त तथा अध्यक्ष यांचे दालनात आयोजित करण्यांत आली होती.

सदरहु बैठकीमध्ये प्रशासकिय ठराव क्र. २६, दिनांक १३/१२/१९९६ अन्वये मान्यता दिलेल्या सेवा भरती नियम, आस्थापनेवरील मंजूर पदे, भरतीचे प्रमाण, भरलेली पदे, रिक्त पदे व अनुशेष या बाबत आढावा घेण्यांत आला.

सदर बैठकीमध्ये सदस्य सचिव यांनी ठेवलेल्या प्रस्तावावर पुढीलप्रमाणे संवर्ग पदावर पदोन्नती देणेबाबत विचार विनिमय करण्यात आला.

१) <u>मुकादम आरोग्य (३९ पदे)</u>

**वेतनश्रेणी रू. २६१०—६०—२९१०—६५—३३००—७०—४०००**

आस्थापनेवर मुकादम या पदाची एकूण ७० पदे मंजुर आहेत. पैकी ३१ पदे भरलेली असुन रिक्त ३९ पदे आहेत. सेवा शर्तीनुसार मुकादमाची सर्व पदे पदोन्नतीने भरावयाची आहेत. सदर सेवा शर्ती नियमानुसार मुकादम या पदावर पदोन्नतीनी देण्यासाठी पुढीलप्रमाणे शैक्षणिक अर्हता विहित केलेली आहे.

**''सफाई कामगार म्हणून १० वर्षापेक्षा जास्त सेवा झालेला आणि ४ थी पास असावा''**

सफाई कामगाराची दिनांक ०१ जानेवारी, २००८ ची अंतिम सेवा जेष्ठता यादी दिनांक १७/१०/२००८ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. या सेवा जेष्ठता यादीमधील ४ थी पास सफाई कामगारांची एकूण ४५ इतकी नावे सेवा जेष्ठतेनुसार घेण्यात आलेली आहे. त्यापैकी सेवा जेष्ठता क्र. ९, २२, १७७ स्वेच्छने सेवा निवृत्त झालेले आहेत. सेवा जेष्ठता क्र. ७८, ९४ स्वेच्छ निवृत्तीसाठी अर्ज केला असुन तो विचाराधीन आहे. सेवा जेष्ठता क्र. २८९ निधन.

जेष्ठता यादी अनुक्रमांक १ ते ८, १० ते २१, २३ ते २७, २९ ते ४२, ४४ ते ५४, ५६ ते ७७, ७९, ८१ ते ८६, ८८ ते ९१, ९३, ९५ ते १४८, १५० ते १७६, १७८ ते १९० १९२, १९४ ते २१९, २२१ ते २३२, २३४ ते २३५, २३७ ते २५०, २५२ ते २८१, २८३, २८६ ते २८८, २९० ते २९४, २९६ ते २९८, ३०० ते ३०१, ३०३ ते ३०४, ३०७ ते ३१२, ३१५ ते ३१७, ३१९ ते ३२५, ३२७ ते ३३३, ३३५ ते ३३६, ३३८, ३४०, ३४२ ते ३४५, ३४७ ते ३४८, ३५०, ३५२ ते ३५५, ३५९ ते ३६४, ३६६ ते ३७१, ३७३. हे मुकादमाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत नाहीत. सबब, ते मुकादम पदावर पदोन्नती देण्यासाठी अपात्र आहेत.

अशाप्रकारे सेवा जेष्ठता यादीप्रमाणे उपलब्ध रिक्त पदानुसार सेवा शर्ती नियमावली अर्हता धारण करणारे सेवा जेष्ठता यादी अनुक्रमांक २८, ४३, ५५, ८०, ८७, ९२, १४९, १९१, १९३, २२०, २३३, २३६, २५१, २८२, २८४, २८५, २९५, २९९, ३०२, ३०५, ३०६, ३१३, ३१४, ३१८, ३२६, ३३४, ३३७, ३३९, ३४१, ३४६, ३४९, ३५१, ३५६, ३५७, ३५८, ३६५, ३७२, ३७४, ३७५, असे एकूण ३९ कर्मचारी सफाई मुकादम या पदावर पदोन्नती देण्यासाठी पात्र आहेत.

१) श्री. राजु बाबूलाल

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

२) श्री. बिजयपाल शाम्मु

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

३) श्री. राजु बाबू ननावरे

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

४) श्री. कमलाकर सोनाजी

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

५) श्री. रामसिंग कश्मीरा

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

६) श्री. विजय बत्तन

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

७) श्री. बिष्णु पंजाराम

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

८) श्री. राजपाल बिहारी

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

९) श्री. दशरथ श्रीपाद गाडे

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

१०) श्री. शामु चंदर

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

११) श्री. शिवाजी भिवजी

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

१२) श्री. प्रमोद नामदेव

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

१३) श्री. डेव्हिड चंदर

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

१४) श्री. दादू महादेव

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

१५) श्री. रवि रघुनाथ

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

१६) श्री. धर्मवीर शिवचरण

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

१७) श्री. विजेंद्र काले राठी

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

१८) श्री. दादु लक्ष्मण काळे

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

१९) श्री. अंकुश मारूती कांबळे

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

२०) श्री. राजेंद्र बिहारी

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

२१) श्री. बिजय बसंता चेटोले

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

२२) श्री. विनोद ओमप्रकाश सौदे

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

२३) श्री. भास्कर शिवराम भिसे

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

२४) श्री. दिपक बाबुलाल

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

२५) श्री. राजु झडीया

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

२६) श्री. कैलाश हसाराम

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

२७) श्री. मुन्ना मखनलाल

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

२८) श्री. रावजी नारायण परमार

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

२९) श्री. राजपाल कंची

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

३०) श्री. श्याम सेवकराम

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

३१) श्री. बच्चु हेमराज

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

३२) श्री. केदारनाथ सुरताराम बोथ

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

३३) श्रीम. शारदा रामजी

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

३४) श्रीम. ज्योती बच्चु

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

३५) श्री. रमेशकुमार जगदिश

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

३६) श्री. सुरेश इंदरपाल

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

३७) श्री. महेंद्र रामचंद्र

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

३८) श्री. सतिश डोरीलाल

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

३९) श्री. ओमप्रकाश मामचंद गागट

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

### २) मुकादम बांधकाम (६१ पदे)

**वेतनश्रेणी रू. २६१०–६०–२९१०–६५–३३००–७०–४०००**

आस्थापनेवर मुकादम या पदाची एकूण ६१ पदे मंजुर आहेत. पैकी ५९ पदे भरलेली असुन प्रमाणित बिंदु नामावलीनुसार अनु. जमाती या प्रवर्गाची रिक्त ०२ पदे आहेत. सेवा शर्तीनुसार मुकादमांची सर्व पदे

पदोन्नतीने भरावयाची आहेत. सदर सेवा शर्ती नियमानुसार मुकादम या पदावर पदोन्नती देण्यासाठी पुढीलप्रमाणे शैक्षणिक अर्हता विहित केलेली आहे.

**''मजूर आणि इतर तत्सम प्रवर्गामध्ये अंखडपणे १० वर्षे सेवा आवश्यक''**

मजूर/हेल्पर/वॉलमन/झारीवाला दिनांक ०१ जानेवारी, २००८ ची अंतिम सेवा जेष्ठता यादी दिनांक १७/१०/२००८ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सेवा जेष्ठता यादीप्रमाणे अनु. जमाती या प्रवर्गातील सेवा शर्ती नियमावलीनुसार अर्हता धारण करणारे अनुक्रमांक २३३, २४३, २४८ व २७८ हे उमेदवार उपलब्ध आहेत.

सेवा जेष्ठता क्र. ९, २२, १४९ स्वेच्छने सेवा निवृत्त झालेले आहेत.

सेवा जेष्ठता क्र. ७८, ९४ स्वेच्छ निवृत्तीसाठी अर्ज केला असुन तो विचाराधीन आहे.

सेवा जेष्ठता क्र. २८९ निधन

अनु. जमाती – ०२ पदे

| | |
|---|---|
| १) | *श्री. पी. एम. ढोणे*<br>सदर पदाची विहित केलेली अर्हता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र. |
| २) | *श्री. शाम गोमा शिंद*<br>सदर पदाची विहित केलेली अर्हता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र. |
| ३) | *श्री. एच. एम. वाघचौरे*<br>सदर पदाची विहित केलेली अर्हता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र. |
| ४) | *श्री. बी. एम. वाख*<br>सदर पदाची विहित केलेली अर्हता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र. |

दिनांक १६/०१/२००९ रोजीच्या विभागीय पदोन्नती समिती बैठकीचे इतिवृत्त सोबत जोडत आहे. सदर बैठकीमध्ये विविध पदांवर पदोन्नती देण्यासाठी विभागीय पदोन्नती समितीने एक मताने निवडसुची मंजुर केलेली आहे. ती खालीलप्रमाणे.

न्यायालयीन प्रकरणे, चौकशी व शासन आदेशास अधिन राहुन विभागीय पदोन्नती समितीने खालील निवड सुचीस एकमताने मान्यता दिली.

<u>मुकादम आरोग्य</u>

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नांव | सेवा जेष्ठता क्र. | संवर्ग |
|---|---|---|---|
| १ | श्री. राजु बाबूलाल | २८ | सफाई कामगार |
| २ | श्री. बिजयपाल शाम्मु | ४३ | सफाई कामगार |
| ३ | श्री. राजु बाबू ननावरे | ५५ | सफाई कामगार |
| ४ | श्री. कमलाकर सोनाजी | ८० | सफाई कामगार |
| ५ | श्री. रामसिंग कश्मीरा | ८७ | सफाई कामगार |
| ६ | श्री. विजय बत्तन | ९२ | सफाई कामगार |
| ७ | श्री. बिष्णु पंजाराम | १४९ | सफाई कामगार |
| ८ | श्री. राजपाल बिहारी | १९१ | सफाई कामगार |
| ९ | श्री. दशरथ श्रीपाद गाडे | १९३ | सफाई कामगार |
| १० | श्री. शामु चंदर | २२० | सफाई कामगार |

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | श्री. शिवाजी भिवजी | २३३ | सफाई कामगार |
| १२ | श्री. प्रमोद नामदेव | २३६ | सफाई कामगार |
| १३ | श्री. डेब्हिड चंदर | २५१ | सफाई कामगार |
| १४ | श्री. दादू महादेव | २८२ | सफाई कामगार |
| १५ | श्री. रवि रघुनाथ | २८४ | सफाई कामगार |
| १६ | श्री. धर्मवीर शिवचरण | २८५ | सफाई कामगार |
| १७ | श्री. विजेंद्र काले राठी | २९५ | सफाई कामगार |
| १८ | श्री. दादु लक्ष्मण काळे | २९९ | सफाई कामगार |
| १९ | श्री. अंकुश मारूती कांबळे | ३०२ | सफाई कामगार |
| २० | श्री. राजेंद्र बिहारी | ३०५ | सफाई कामगार |
| २१ | श्री. बिजय बसंता चेटोले | ३०६ | सफाई कामगार |
| २२ | श्री. विनोद ओमप्रकाश सौदे | ३१३ | सफाई कामगार |
| २३ | श्री. भास्कर शिवराम भिसे | ३१४ | सफाई कामगार |
| २४ | श्री. दिपक बाबुलाल | ३१८ | सफाई कामगार |
| २५ | श्री. राजु झडीया | ३२६ | सफाई कामगार |
| २६ | श्री. कैलाश हसाराम | ३३४ | सफाई कामगार |
| २७ | श्री. मुन्ना मखनलाल | ३३७ | सफाई कामगार |
| २८ | श्री. रावजी नारायण परमार | ३३९ | सफाई कामगार |
| २९ | श्री. राजपाल कंची | ३४१ | सफाई कामगार |
| ३० | श्री. श्याम सेवकराम | ३४६ | सफाई कामगार |
| ३१ | श्री. बच्चु हेमराज | ३४९ | सफाई कामगार |
| ३२ | श्री. केदारनाथ सुरताराम बोथ | ३५१ | सफाई कामगार |
| ३३ | श्रीम. शारदा रामजी | ३५६ | सफाई कामगार |
| ३४ | श्रीम. ज्योती बच्चु | ३५७ | सफाई कामगार |
| ३५ | श्री. रमेशकुमार जगदिश | ३५८ | सफाई कामगार |
| ३६ | श्री. सुरेश इंदरपाल | ३६५ | सफाई कामगार |
| ३७ | श्री. महेंद्र रामचंद्र | ३७२ | सफाई कामगार |
| ३८ | श्री. सतिश डोरीलाल | ३७४ | सफाई कामगार |
| ३९ | श्री. ओमप्रकाश मामचंद गागट | ३७५ | सफाई कामगार |

<u>मुकादम बांधकाम</u>

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नांव | सेवा जेष्ठता क्र. | संवर्ग |
|---|---|---|---|
| १ | श्री. पी. एम. ढोणे | २३३ (अनु.जमाती) | मजूर |
| २ | श्री. शाम गोमा शिद | २४३ (अनु.जमाती) | मजूर |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ५३ (१) अन्वये नियुक्ती प्राधिकरण मा. महासभा आहे.

तरी न्यायालयीन प्रकरणे, चौकशी व शासन आदेशास अधिन राहुन विभागीय पदोन्नती समितीचा प्रस्ताव मंजुरीकरीता मा. महासभा पटलावर प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: ५२ अ दिनांक:— २०/१/२००९

सुचकाचे नाव :— श्री. विनोद ठाकुर

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही महासभा महापालिकेच्या पात्र कर्मचा—यांची पदोन्नती मान्य करणे बाबतचा प्रस्ताव सविस्तर माहिती अभावी आजच्या सभेच्या कामकाजातून वगळण्यास मान्यता देत आहे..

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :—कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ५.४० वाजता महापौर श्रीमती निर्मले विद्या विजय यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—१६/२/२००९

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १६/२/२००९ रोजीच्या

सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

१३

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा सोमवार दिनांक १६/२/२००९ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती निर्मले विद्या विजय हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

२. महापौर—— श्रीमती निर्मले विद्या विजय

३. उप—महापौर—— श्री. आयलानी कुमार उत्तमचंद

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | ३७ | श्रीमती महाडीक रजनी मोहन |
| ४ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | ३८ | श्री. लालबिहारी बुझारत यादव |
| ५ | श्री. गायकवाड दिलीप | ३९ | श्रीमती पंचशिला नाना पवार |
| ६ | श्रीमती संगीता राजेश कंडारे | ४० | श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी |
| ७ | श्री. रविंद्र दशरथ बागूल | ४१ | श्री. मंगतानी सुंदर आसनदास |
| ८ | श्री. रामसागर जनार्दन यादव | ४२ | श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण |
| ९ | श्रीमती निलम प्रेमसिंग रावत | ४३ | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| १० | श्री. मोरे भानजी भिकारी | ४४ | श्रीमती बोडारे वसुधा धनंजय |
| ११ | श्री. दत्तात्रय नारायण पवार | ४५ | श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे |
| १२ | श्रीमती चौधरी राजश्री राजेंद्र | ४६ | श्री. शेखर केशव यादव |
| १३ | श्री. विजय खंडु सुपाळे | ४७ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १४ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ४८ | श्रीमती सुमन गजानन शेळके |
| १५ | श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान | ४९ | श्री. प्रशांत किसनराव धांडे |
| १६ | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी | ५० | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १७ | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज) | ५१ | श्रीमती मनसुलकर शिला सुभाष |
| १८ | श्रीमती सुजाता रमेश रिझवानी | ५२ | श्री. किशोर जग्यासी |
| १९ | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद | ५३ | श्रीमती चेनानी ज्योती रमेश |
| २० | श्री. राजू जग्यासी | ५४ | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड |
| २१ | श्री. राम (चार्ली) पारवानी | ५५ | श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी |
| २२ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ५६ | श्रीमती ज्योती शाम माने |
| २३ | श्रीमती जया प्रकाश माखीजा | ५७ | श्रीमती लता शांताराम निकम |
| २४ | डॉ. (श्रीमती) निना प्रकाश नाथानी | ५८ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २५ | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार (कुमारी)केवलराम | ५९ | श्री. ठाकूर विनोद लालसिंग |
| २६ | श्री. भठीजा (बब्बु) संजय | ६० | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री), |
| २७ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे | ६१ | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| २८ | श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा | ६२ | श्रीमती वनवारी मोना अशोक |
| २९ | श्री. लाल पंजाबी | ६३ | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी |
| ३० | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती | ६४ | श्री. मुकेश सोहन तेजी |
| ३१ | श्री. मोहन (गारो) रामरख्यानी | ६५ | श्री. पाटील प्रधान धर्मा |
| ३२ | ॲड. श्री. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी | ६६ | श्री. सुनिल साहेबराव गंगवानी |
| ३३ | श्री. ढोके जनार्दन किसनराव | ६७ | श्री. प्रकाश गणपत सावंत |
| ३४ | श्री.एडके गणपत गोविंद | ६८ | श्री. नरेंद्र रामचंद्र राजानी |
| ३५ | श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा | ६९ | श्री. गोदुमल नारायणदास क्रिष्णानी |
| ३६ | श्रीमती वेलकर सुरेखा राजन | ७० | श्री. राजेश नानीकराम वधारीया |

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
१. श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी, २. श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी , ३. श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास, ४. श्रीमती शकुंतला पाटील, ५. श्री. सुखरामानी महेश पहलाजराय, ६. श्रीमती करोतीया मालती राधाचरण, ७. कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल, ८. श्री. मोहन साधवाणी, ९. श्री. बच्चाराम रूपचंदानी, १०. श्रीमती मीना सोनेजी (सोंडे), ११. श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई)

खालील अधिकारी सभेस हजर होते.
१५. श्री. समीर उन्हाळे, आयुक्त
१६. श्री. अशोक रणखांब, अतिरिक्त आयुक्त
१७. श्री. मिलींद सावंत, उप–आयुक्त
१८. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
१९. श्री. दिपक सावंत, उप–आयुक्त
२०. श्री. अनुदिप दिघे, मुख्य लेखा अधिकारी
२१. श्री. अनंत कांबळे, प्र. मुख्य लेखा परिक्षक
२२. श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विदयुत
२३. श्री. एस.जी. खडताळे, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
२४. श्री. आर.बी.शिर्के, प्र. शहर अभियंता
२५. डॉ. राजा रिझवानी, वैद्यकीय अधिकारी
२६. श्री. रमेश काजळे, प्र. प्रभाग अधिकारी
२७. श्री. चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख
२८. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
२९. श्री. नंदु समतानी, उप कर निर्धारक व संकलकम
३०. श्री. व्ही.आर.गर्जे, प्र. सहा. आयुक्त
३१. श्री. रमेश काजळे, प्र. सहा. आयुक्त

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१. श्री. गणेश शिंपी
२. श्री. श्याम शिवनानी
३. श्री. तानाजी पतंगराव
४. श्रीमती नर्गिस खान

वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>महापालिका सचिव :–</u> सभेचे कामकाज चालु करण्याअगोदर मा. महापौरांच्या वतीने स्थायी समिती सभापती यांना व्यासपिठावर निमंत्रीत केले जात आहे.

<u>महापालिका सचिवः–</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ <u>विषय क्र. १ :–</u> स्थायी समितीचा प्रस्ताव विचारात घेऊन करांचे दर निश्चित करणे व सन २००९–१० चे अर्थसंकल्पीय अंदाज व सन २००८–०९ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजास अंतिम स्विकृती देणे

---

<u>सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u>या सभागृहाचे माजी सदस्य श्री. भगवान सावलानी यांचे नुकतेच काही दिवसांपुर्वी निधन झाले आहे. सर्वांनी दोन मिनिटे उभे राहून त्यांना श्रध्दांजली दयावी अशी विनंती आहे.

<u>महापालिका सचिवः–</u>कृपया मौन धारण करावे.

सुचकाचे नाव :– श्री. लाल पंजाबी

अनुमोदकाचे नाव :–श्री. जमनादास पुरस्वानी

**शोक प्रस्ताव**

उल्हासनगर नगरपालिकेचे माजी सदस्य श्री. भगवान सावलानी यांचे नुकतेच काही दिवसापुर्वी निधन झाले

श्री. भगवान सावलानी यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. ५२ ब** **दिनांक:–१६/२/२००९**

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. भगवान सावलानी यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**सदस्य श्री. दिलीप गायकवाड :–**सचिव साहेब, माझ्या नावाची नेमप्लेट गायब आहे. काय कारण आहे? काही लफडे आहे काय?

**महापालिका सचिव :–**सिलींग दुरुस्तीच्यावेळी सर्व टेबलवरील नेमप्लेट काढण्यात आल्या होत्या. त्यामुळे आपल्या नावाची नेमप्लेट लावणे नजरचुकीने राहून गेली आहे.

**सदस्य श्री. दिलीप गायकवाड :–**जरा काळजीपुर्वक लक्ष दया.

**महापालिका सचिव:–**या लहान सहान गोष्टींकडे जास्त बारकाईने पाहू नये.

मा. स्थायी समिती सभापती मा. महापौरांना सन २००९–२०१० चे अर्थसंकल्पीय अंदाज व सन २००८–२००९ चे सुधारीत अर्थसंकल्पीय अंदाज प्रस्तुत करतील.

**स्थायी समिती सभापती, श्री. मोहनदास रामरख्यानी:–**मा. महापौर, उप–महापौर, मा. आयुक्त, सर्व सदस्य, मी आपणासर्वांचे या अर्थसंकल्पात स्वागत करतो. उल्हासनगर शहर हे सिंध प्रांतातुन आलेल्या शरणार्थींचे शहर आहे, अशी ओळख उल्हासनगर शहराची होती. सिंध प्रांतातुन आलेल्या शरणार्थींजवळ काहीच नव्हते, परंतु त्यांनी आपल्या बुध्दीमत्तेचा वापर करुन प्रत्येक घरांमध्ये एक लहानसा धंदा चालु केला. आज हाच धंदा पुर्ण विश्वात उल्हासनगर शहराची ओळख बनली आहे. ही ओळख आता इतिहास बनली आहे. आज हे शहर व्यापारींचे शहर मानले जाते. आमच्या शहरात बनलेली वस्तु फक्त भारतातच नाही तर परदेशात सुध्दा निर्यात केली जाते.

बजेट नावाची सुरुवात फ्रान्स शब्द “Bougete” ने झाली होती. ज्याचा अर्थ आहे ‘‘बटवा’’ ही एक पुंजी जमा करण्याची योजना आहे आणि त्यास योग्य दिशेमध्ये खर्च केला पाहिजे या बटव्यामध्ये जमा झालेली रक्कम किंवा खर्च करण्याची योजना स्थायी समितीच्या सदस्यांनी बनविली आहे, ती मी आपल्यासमोर मांडत आहे.

वित्तीय वर्ष २००९–१० साठी प्रशासनाद्वारे रुपये ५५२ कोटी उत्पन्न व रुपये ६१६ कोटी खर्चाचा प्रस्ताव बनविला आहे. उत्पन्न व खर्चाच्या दरम्यान असलेली ६४ कोटी रुपयाची तुट भरुन काढण्यासाठी करवृध्दीचे प्रस्ताव प्रस्तृत केलेले आहेत ते याप्रकारे......

१) जकात : ९.७५ कोटी
२) मालमत्ता कर : ३८.०० कोटी
३) पाणीपट्टी : १५.२० कोटी
४) अग्निशमन कर इ. : १.५५ कोटी

आपणा सर्वांना हे माहित आहे की संपुर्ण विश्वात आर्थिक मंदी चालु आहे आणि ती नियंत्रणात ठेवण्यासाठी प्रत्येक स्तरावर आर्थिक नियंत्रणाचे प्रयत्न केंले जात आहेत. आम्ही या प्रयत्नांना लक्षात घेवून प्रशासनाने सुचविलेली सर्व प्रकारची वाढ नामंजुर केली आहे, आणि गरीबांना आसरा मिळावा म्हणुन खालील वस्तुंचे जकात दर कमी केले आहेत.

१) चहा कॉफी : १.५० : ने कमी करुन ०.५ %
२) साखर : १.२५ : ने कमी करुन ०.५ %
३) रॉकेल : २.५ : ने कमी करुन ०.५ %
४) गॅस : ४.०० : ने कमी करुन ०.५ %

याप्रमाणे मालमत्ता कर व पाणी बिलांचे दर वाढविण्याचा उद्‌देश ठेवुन जो अर्थसंकल्प तयार केला आहे तो याप्रकारे.....

| अ.क्र. | Income | रक्कम | Expenditure | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | प्रा . शिल्लक | ६.९७ लाख | पगार व भत्ते | ४७.३९ कोटी |
| २ | जकात | १०२.२८ कोटी | एम.आय.डी. सी. | ३३.४० कोटी |
| ३ | मालमत्ता कर | ६५.११ कोटी | कर्ज परतफेड | ४५.८७ कोटी |
| ४ | पानी वसुली | ५१.०० कोटी | पब्लीक हेल्थ | ८.११ कोटी |
| ५ | अनुदान | ३४.३० कोटी | एज्युकेशन | ७.८७ कोटी |
| ६ | **MRTP** प्रमाणे वसुली | १३.१७ कोटी | शहर रोशनाई | ५.९४ कोटी |
| ७ | इतर | १५.८९ कोटी | बाग बगिचे | २.५९ कोटी |
| ८ | **JNNURM** | ३४३.५६ कोटी | जल व्यवस्था | ५.१३ कोटी |
| | | | भुयारी गटार व्यवस्था | ३.६६ कोटी |
| | | | जल व मल नि:सारण | २६.९५ कोटी |
| | | | बांधकाम व्दारे रस्ते व अन्य सुविधा | ३६.५० कोटी |
| | | | प्रभाग समिती मधीलं विकास कामे | १२.१६ कोटी |
| | | | शासन देणी | १८.८७ कोटी |
| | | | इतर | ९.८० कोटी |
| | | | जे.एन.एन.यु.आर.एम | ३.६८ कोटी |
| | एकूण | ६३२.२८ कोटी | एकूण | ६३२.२४ कोटी |

आपणा सर्वांना हे ऐकुन आनंद होईल की, आमचे आयुक्त श्री. समीर उन्हाळे यांच्या अथक प्रयत्नांनी आमच्या शहरासाठी १२८ कोटी रुपयांची पाणी पुरवठा योजना मंजुर झाली आहे. या योजनेमध्ये नविन पाईप

लाईन व नव्या टाक्या बनविल्या जातील जेणेकरुन आपल्या शहरातील पाणी समस्या सुटु शकेल. घरोघरी मिटर लावले जातील, यामुळे जो जितके पाणी वापरेल त्यास तितकेच पाण्याचे बिल अदा करावे लागेल.

<u>साफसफाई व देखभाल:—</u> शहरास सुंदर बनविण्यासाठी शहरात साफसफाई होणे आवश्यक आहे. या गोष्टी लक्षात ठेवुन शहरातील कचरा उचलण्यासाठी, जंतुनाशक औषधे खरेदी करणे, इतर सामानांची खरेदी तसेच मशिनंद्वारे साफसफाईसाठी वर्ष २००९—२०१० च्या अर्थसंकल्पात ८.११ कोटी रुपयांचे नियोजन केले आहे.

राष्ट्रीय स्तरावर होणारे कार्यक्रम जसे की, कुटुंब कल्याण, कृष्ठरोग निवारण, एडस विषयी माहिती, टी. बी. निवारण, पल्स पोलिओ तथा अपंग व्यक्तींसाठी कल्याणकारी योजना या कार्यक्रमांसाठी १.३६ कोटी रुपये अर्थसंकल्पात ठेवले आहेत.

<u>शहर रोशनाई :—</u>शहरातील रस्त्यांवर लावलेल्या फिटींगस्‌ची देखभाल व दुरुस्तीसाठी किंवा विदयुत बिलांसाठी वसुलीसाठी ४.६९ कोटी रुपये ठेवले आहेत. संपुर्ण राज्यात विजेची कमतरता पाहता शोध व विकास करुन विदयुत उत्पादनासाठी नविन शोध विकसित करण्यासाठी रुपये १.२५ कोटी वेगळे ठेवले आहेत.

<u>रस्ते विकास कार्यक्रम</u> :— आपणा सर्वांना हे माहित आहे की, काही काळापुर्वी १० कोटी रुपयांचे मुख्य पाच रस्त्यांचे काम मंजुर केले आहे.

१) निरंकारी हॉल ते भारत चौक
२) डॉल्फीन क्लब ते शांतीनगर
३) हिराघाट ते मिनिस्टर कॉम्पलेक्स
४) पेट्रोल पंप ते ओ.टी. सेक्शन
५) बॅरेक २०५८ ते टॅान्सफर पॉईट

या सर्वांसाठी निविदा मंजुर केल्या गेल्या आहेत. ही कामे लवकरात लवकर सुरु केली जातील.

मागील वर्षी ५३ नविन रस्ते बनविण्याची योजना बनवली होती. त्यातुन उर्वरीत रस्त्यांचा विकास करण्यासाठी अंदाजपत्रकात ५ कोटी रुपये व पावसाळयापुर्वी रस्ते दुरुस्ती करण्यासाठी ३ कोटी रुपये ठेवले गेले आहेत.

<u>महापौर ,उप महापौर , स्थायी समिती व नगरसेवक निधी</u> : —प्रत्येक वर्षाप्रमाणे यावर्षी देखील अर्थसंकल्पामध्ये महापौर निधी ५० लाख, उप—महापौर निधी २५ लाख व स्थायी समिती निधी २५ लाख ठेवला आहे. प्रत्येक नगरसेवकास ६ लाख रुपये आपल्या प्रभागात इच्छेनुसार कामे करण्यासाठी ठेवले आहे. त्याचप्रमाणे प्रभाग समिती निधीसाठी प्रत्येक नगरसेवकास किंवा स्वतंत्र विकास करण्यासाठी प्रत्येकाच्या हिस्सात १६ लाख रुपये येतील याप्रमाणे तरतुद केलेली आहे.

<u>जे.एन.एनयु.आर.एम.योजना</u> :— उल्हासनगर शहरासाठी पाणी पुरवठा योजने व्यतिरिक्त JNNURM योजनेसाठी २५० कोटी रुपये, भुयारी गटार योजना , ७ कोटी रुपये ई—गव्हनर्स , १५० कोटी रुपये, रस्ते विकास १६५ कोटी रुपये, गलिच्छ वस्तींमध्ये घरे, या सर्व योजना शासनाच्या विचाराधीन आहेत. यापैकी गलिच्छ वस्तींमध्ये घरे , या योजनेच्या पहिल्या टप्प्यासाठी ३५ कोटी, केंद्र शासनाद्वारे मंजुर केले आहे. भुयारी गटार व ई गव्हनर्स या दोन्ही योनजेसाठी राज्य शासनाद्वारे मंजुर करुन केंद्र शासनाकडे पाठविले आहे. या सर्व योजना पुढील वर्षी सुरु केल्या जातील. यासाठी आवश्यक ती तरतुद अर्थसंकल्पात ठेवली आहे.

<u>ई गव्हनर्स</u> :—उल्हासनगर महापालिकेतील कर्मचा—यांना प्रत्येक विषयाबाबतीत प्रशिक्षण देवुन त्यांच्या कामाची क्षमता वाढविण्यासाठी, उल्हासनगर महापालिकेतील जास्तीत जास्त कामे संगणकावर अचुक होण्यासाठी, आमचे आयुक्त प्रयत्नशील आहेत. या सर्व स्वप्नांना साकार करण्यासाठी कॅम्प नं. ४ मधील व्हीटीसी मैदान, प्रभाग समिती कार्यालयामध्ये ही योजना सुरु केलेली आहे. अशा प्रकारे प्रत्येक प्रभाग समितीमध्ये खाजगी संस्थांमार्फत नागरी सुविधा केंद्र सुरु केले जातील. त्यामुळे शहरातील सर्व नागरीकांना महापालिका मुख्यालयात येण्याची आवश्यकता राहणार नाही, प्रभाग समिती कार्यालयातुनच त्यांना सुविधा प्राप्त करुन घेवु शकतात. मालमत्ता कर वसुलीसाठी उल्हास स्टेशनजवळ **KIOSK** मशिन लावले आहे. त्यामुळे जनता मशिनक्षरे

मालमत्ता कर भरत आहेत. या यशस्वी प्रयत्नानंतर शहरातील मुख्य जागेंवर जनतेच्या सुविधेसाठी काही दिवसातच ५ नविन **KIOSK** मशिन लावल्या जातील. महापालिकेतील बांधकाम परवानगीसाठी प्राप्त नकाशांची छाननी संगणकाद्वारे अत्याधुनिक कार्यक्रमांमार्फत करण्यासाठी काही दिवसांपुर्वी त्याचा शुभारंभ केला आहे. कर्मचा–यांचे सेवा अभिलेख, पगार, भत्ते, पेन्शन, हजेरी या सर्व गोष्टींसाठी संगणकाद्वारे विकसित कार्यक्रम लवकरात लवकर सुरु केले जात आहेत.

या सर्व योजनांना प्रतिसाद देण्यासाठी किंवा कायम चालु राहण्यासाठी वर्ष २००९–१० च्या अर्थसंकल्पात १.५६ कोटी रुपये तरतुद ठेवली आहे.

महानगरपालिकेतर्फे अर्थसंकल्पाद्वारे प्रत्येक विभागात अपेक्षित प्रत्येक कार्य व कर्तव्यासाठी आवश्यक पैसे दिले गेले आहेत. यासाठी प्रत्येक पालिका सदस्यास स्थायी समितीने ठराव क्र. ११७ दिनांक १२/२/००९ च्या तरतुदीप्रमाणे तयार केलेल्या अर्थसंकल्पीय अंदाजाची पुस्तिका पुरविण्यात आलेली आहे कृपया ती पहावी.

महानगरपालिकेतील सर्व सदस्य एकमताने या अर्थसंकल्पास मंजुरी देतील, ही विनंती मी आपणा सर्वांना करतो. **जयहिंद** !

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>सन्माननिय महापौरजी, आयुक्त साहेब, व अर्थसंकल्प सादर करणारे आमचे स्थायी समितीचे सभापती, आयुक्त साहेब, संपुर्ण देशभरात जे वेगवेगळे अर्थसंकल्प सादर करण्यात आले आहे त्या सर्वांपेक्षा उल्हासनगर महानगरपालिकेचा हा अर्थसंकल्प अतिशय चांगला आहे. फारच छान आहे. पहिल्यांदाच तीन दिवस अगोदर प्रत्येक सदस्यास अर्थसंकल्पाची प्रत पुरविण्यात आलेली आहे. त्यामुळे सभापतींनी अर्थसंकल्पावरील आपले निवेदन वाचुन दाखविण्याची आता काही आवश्यकता नाही. त्यामुळे माझे असे म्हणणे आहे की, हा अर्थसंकल्प सर्व संमतीने पारीत झाला पाहिजे. दुसरी गोष्ट अशी की, दरवर्षी अर्थसंकल्पात काही ना काही त्रुटी राहत असे. परंतु या वर्षी गोरगरीब लोकांसाठी चहा, साखर, गुळ, रॉकेल इत्यादींवरील जकात करामध्ये कपात केली आहे. त्यामुळे गोरगरीबांसाठी हा अर्थसंकल्प अतिशय चांगला आहे. आणि यासाठी या अर्थसंकल्पाचे आम्ही स्वागत करत आहोत व तो सर्वसंमतीने पारीत झाला पाहिजे. सर्व सदस्यांना माझी विनंती आहे की, या अर्थसंकल्पावर चर्चा न करता तो सर्व संमतीने पारीत केला जावा. माझ्याकडे जेव्हा या अर्थसंकल्पाची प्रत आली ती पाहता मला अतिशय बरे वाटले कारण की, १९९७ मध्ये मी एका समितीचा सभापती होतो, त्यावेळी सुध्दा अशी काही सुविधा केलेली नव्हती. म्हणुन आता मी विरोधी पक्ष नेता असतांनाही या अर्थसंकल्पाचे स्वागत करत आहे.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :–</u>मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, स्थायी समितीचे सभापती, मी आपणांस सांगु इच्छितो की, आता महासभेमध्ये हा जो अर्थसंकल्प सादर करण्यात आलेला आहे त्यामध्ये ब–याचशा त्रुटी आहेत. आपले उत्पन्न किती आहे व आपण खर्च किती करत आहोत. वाढीव खर्चाची तोंडमिळवणी करण्यासाठी आपणांस वाढीव उत्पन्न कोठुन मिळेल. मिळकत कराची अधिकाधिक वसुली कशी केली जाईल? याचे यामध्ये स्पष्टीकरण करण्यात आलेले नाही. चहा पावडर, साखर, गुळ व रॉकेल यांवर जकात दरात आपण कपात केली आहे त्याबद्दल आम्ही आपले खुपच आभारी आहोत. त्याचबरोबर आमची अशी विनंती आहे की, नगरसेवकांचा जो प्रभाग समितीमधील जो निधी आहे, त्यातील पाच पाच लाख रुपये कपात करुन त्या रक्कमेतुन उल्हासनगर शहरात एक सुसज्ज असे रुग्णालय बांधले पाहिजे. आणि ते जर होत असेल तर यावेळेस निवडुन आलेल्या नगरसेवकांसाठी ती एक अभिमानाची गोष्ट ठरेल. त्याचबरोबर औषधांवर जकात कर असता कामा नये. तसेच कपडयावर जकातीचा २ टक्केचा जो दर आहे त्याबाबतीत आमचे असे म्हणणे आहे की, तो २० पैश्यांनी कपात करुन १ रुपया ८० पैसे असा केला जावा. या सर्व सुधारणा केल्या तर अर्थसंकल्पाला एक नविन दिशा मिळेल. व आपल्या उल्हासनगरचे नाव सुवर्ण अक्षरांनी लिहिले जाईल.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :–</u>सन्माननिय महापौर, आयुक्त साहेब, आणि स्थायी समिती सभापती, अर्थसंकल्पाबद्दल तर मी बोलु इच्छित नाही. आयुक्त साहेब, मी तुम्हांला विचारु इच्छितो अर्थसंकल्पाचे हे जे एवढे मोठे पुस्तक तयार करण्यात आलेले आहे हे बरोबर आहे काय? यामध्ये काय चुक आहे? काय चुक आहे ती समजली काय?

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे:–</u>तीन दिवसापुर्वीच आपणांस अर्थसंकल्पाची पुस्तिका सर्वांना देण्यात आलेली आहे. आपण अभ्यास करुन आला आहात की नाहीत?

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल:–</u>मी पुर्ण अभ्यास केलेला आहे.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे:–</u>तरीदेखील आपण त्रूटी विचारत आहात. तुमच्या निदर्शनास काही त्रुटी आल्या असतील तर ते तुम्ही सांगावे. आणि आताच विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले आहे की, हा जो अर्थसंकल्प तयार करण्यात आलेला आहे तो अतिशय उत्तम आहे. असा अर्थसंकल्प कुठेही तयार करण्यात आलेला नाही. त्यामुळे आपण तो एकमताने पारीत करुन घ्या.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल:–</u>मी विरोधी पक्ष नेत्यांचे हार्दिक हार्दिक अभिनंदन करतो. जो अर्थसंकल्प तयार करण्यात आलेला आहे आणि त्यावर विरोधी पक्ष नेत्यांनी जे निवेदन केलेले आहे ते आम्हांला आवडला. यामध्ये फक्त एक अशीच चुक आहे की अर्थसंकल्पाच्या पुस्तकात आपली एक सुध्दा सही नाही. फक्त श्री. समीर उन्हाळे लिहिले आहे परंतु सही नाही.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे:–</u>पास केल्यावर सहया आणतात, साहेब?

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>मा.महापौर, उप–महापौर, आयुक्त साहेब, आता मा. सभापती, स्थायी समिती यांनी जो अर्थसंकल्प आणला आहे, तसेच आमचे वरिष्ठ नेते म्हणजे मला म्हणायचे आहे की, विरोधी पक्ष नेता श्री. बी.बी.मोरे हे विरोधी पक्ष नेता असून सुध्दा कुठल्याच गोष्टीला विरोध केला नाही. आज त्यांनी कुठल्या गोष्टीला विरोध केला? ते आज सर्वसंमतीने बोलले तर सभागृह टाळया वाजवत आहेत. विचार करण्यासारखी गोष्ट आहे. नावाला विरोधी पक्ष नेता आहेत, आमचे वरिष्ठ नेते आहेत आम्ही त्यांना मानतो त्यांचा आदर करतो. परंतु सभागृहात झालेल्या असा कुठलाच मुद्दा नाही की त्यांनी विरोध केला आहे. ठिक आहे, श्री. लाल पंजाबीजी आपण फारच छान म्हटलात. आपला जो व्यवहार चालला आहे तो मी थोडक्यात सांगतो. तर आपणा स्वत:सच वाटेल की, गरजच नाही. मा. महापौरजी, आम्ही उल्हासनगर शहरासाठी अर्थसंकल्प तयार केला आहे, अर्थसंकल्प तयार करते वेळी आम्हांला प्रत्येक गोष्टीचा विचार करावा लागतो. आमचे उत्पन्न किती, खर्च किती आहे, तसेच मागील वर्षाचे आमचे अनुभव कसा होते. या सर्व गोष्टींचा विचार करुनच अर्थसंकल्प तयार केला जातो. आज येथे माझ्यापेक्षा वरिष्ठ नेते येथे बसलेले आहेत. श्री. जमनादास पुरस्वानी आपण सुध्दा बोला. २ वर्ष आपण सत्तेवर बसून २ वेळा अर्थसंकल्प सादर केला. जेथे जेथे आम्हांला योग्य वाटेल तेथे तेथे आम्ही आपणांस समर्थन दिले आहे. भलेही तो अर्थसंकल्पाचा विषय असो, किंवा शहर विकास आराखडयाचा विषय असो आम्ही आपणांस साथ दिली आहे. परंतु मला आठवते की, मागील वर्षी माझे बंधु श्री. जमनादास पुरस्वानी यांनी असे म्हटले की, आम्हांला सहा महिने झाले आहेत, आमच्या हातात काय जादुची छडी नाही आहे, आम्ही बसु व शहराचा विकास होईल? बिल्कुल विचार करण्यासारखी गोष्ट आहे. यात सत्यता सुध्दा आहे की सहा महिन्यात आपण विकास कसा करणार? ही गोष्ट आम्ही सुध्दा मानतो. परंतु आज आपल्या सत्तेस दोन वर्ष पुर्ण झाली आहेत. राजनैतिक दुष्टीने बोलत नाही, हा एक वेगळा विषय आहे. मी असे सांगेल की, येथे सभागृहात जे सदस्य उपस्थिथत आहेत त्यांनी जरा मागील सभेचा अनुभव घ्यावा, मागील सभेत जावुन पहा की ते प्रत्यक्षपणे सभागृहात किती विचलीत असतात? अशी ते स्वत: जाणीव करु शकतात की आम्ही सत्तेवर दोन वर्ष बसून काय केले? मी परत एकदा सांगतो की मी काही राजनैतिक दृष्टीने बोलत नाही. आम्ही स्वत: यावर विचार करणार.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>हा आजचा अर्थसंकल्पाचा विषय आहे, त्यावर तुम्ही बोलु शकतात. तुम्ही जर बोलतच राहिलात तर मी सुध्दा एक तास बोलत राहिल.

<u>उप–महापौर :–</u>श्री. मोरे साहेब थांबा, श्री. राजु जग्यासीजी आपण फक्त अर्थसंकल्पाविषयीच बोला. व एकदाच बोला.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>आपण सिध्द करुन दाखवितात काय मी जे बोलत आहे ते अर्थसंकल्पाविषयी बोलत नाही?

<u>उप–महापौर :–</u> आपण फक्त अर्थसंकल्पाविषयीच बोला.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>हे अर्थसंकल्पाविषयीच बोलत आहे.

<u>उप–महापौर :–</u>ठिक आहे, बोला.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:–</u>मा. महापौरजी, उप–महापौरजी, लोकशाही आहे, सत्यता ऐकण्याची ताकद ठेवा.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे:–</u>२० तारखेला लोकशाही आहे त्यादिवशी किती बोलायचे आहे तेवढे बोला तुम्ही.

<u>उप–महापौर :–</u>श्री. मोरे साहेब , बसून घ्या, श्री. जग्यासी यांना अर्थसंकल्पाविषयी बोलु दया.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>मी जी सत्यता सांगत आहे ती माझ्या समोर असेल परंतु आपणांस ती वाटत नसेल. परंतु माझे विचार तर आपणासमोर मांडु दया? मा. महापौरजी, हे काय आहे?

<u>सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर:–</u>मा. महापौरजी, सदस्यांना बोलु दया. श्री.बी.बी. मोरेजी तुम्ही कशाला मध्येच उठता? तुम्ही महापौर आहेत काय? महापौर बोलतील ना काय बोलायचे आहे ते? तुम्ही कशाला मध्ये बोलता? मध्येच उठुन बोलायची तुम्हांला सवय लागली आहे बोलायची? तुम्हांला भरपुर वेळ दिला जातो ना बोलायला?

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>मा. महापौर, मी आपली परवानगी घेवुन बोलत आहे, मा. स्थायी समिती सभापती, मला बोलु दिले जात नाही. नाहीतर मला सभापती स्थायी समिती यांना बोलावयास उठवावे लागेल आणि त्यांना बोलावयास सांगेन. श्री. मोरे साहेब, आपणांस सुध्दा वेळ मिळेल, आपण वरिष्ठ आहात आपण का असे करता? प्रत्येकास आपले विचार ठेवण्याचा हक्क आहे. आपण सुध्दा बोलु शकता. मा. आयुक्त साहेब, आपण जे उत्पन्न व खर्चाचे अंदाज सादर केले होते त्यामध्ये जवळ जवळ ६४ कोटीची तुट आपण दाखविली होती. मी हे जाणुन घेवु इच्छितो की, कोण–कोणत्या करांमध्ये वाढ करुन ६४ कोटीची तुट भरुन काढण्यात आली आहे?

<u>श्री. हरेश इदनानी (उप मुख्य लेखा अधिकारी):–</u>मा. महापौर महोदया, प्रशासनाच्यावतीने ५५२ कोटी ८ लाख रुपये उत्पन्नाचा अंदाज. ६१६ कोटी खर्चाचा अंदाज सादर करण्यात आलेला होता.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>श्री. इदनानी साहेब, मला एवढेच सांगा की, ६४ कोटीची जी तुट दाखविण्यात आली होती ती कशी भरुन काढण्यात आली आहे? तेवढेच मला सांगा.

<u>उप–महापौर:–</u>सदस्य श्री. राजु जग्यासीजी आपणांस जे काही मुद्दे मांडायचे असतील ते सर्व मुद्दे आपण एक एक करुन मांडा त्यावर खुलासा केला जाईल. आपण प्रश्न विचारत राहिल, उत्तर दिले जाईल, पुन्हा आपण प्रश्न विचारत राहाल उत्तर दिले जाईल असे होता कामा नये. यासाठी अर्थसंकल्पाबाबतीत आपणांस जे काही मुद्दे मांडायचे असतील ते सर्व मुद्दे एकाच वेळेस माडा. त्यावर आपणांस उत्तर दिले जाईल.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>मा. उप–महापौरजी, अर्थसंकल्प असाच असतो. अर्थसंकल्पावर चर्चा होत असते.

<u>उप–महापौर:–</u>मला आपणांस असे सांगायचे आहे की, अर्थसंकल्पाबाबतीत आपणांस जे काही प्रश्न विचारायचे असतील ते विचारा, ते एकदाच विचारा त्या सर्वांचे आपणांस उत्तर दिले जाईल.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>आपण जी करांची ६५ कोटीची वसुली दर्शविली आहे, ती बरोबर असल्याचे आपण खात्रीपुर्वक सांगु शकता काय? तिचे समर्थन करु शकता काय? आयुक्त साहेब, ६५ कोटीची वसुली येईल असे आपणांस वाटते का? किंवा या अगोदर कधी ६५ कोटीची वसुली झालेली आहे काय?

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब,.......

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:–</u>श्री. जमनु पुरस्वानीजी, मी केवळ दोन–तीन प्रश्नच विचारेन, जास्त काही प्रश्न विचारणार नाही. ६५ कोटी वसुली होईल असे आपणांस वाटते काय?

<u>श्री. हरेश इदनानी (उप मुख्य लेखा अधिकारी):–</u>प्रशासनाच्यावतीने पुढील वर्षासाठी ४० कोटी रुपये वसुलीचा अंदाज ठेवण्यात आला होता. परंतु स्थायी समितीने त्यात वाढ करुन तो ६५ कोटीचा केला.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :—</u>याचाच अर्थ प्रशासनास असे वाटते की, आपली करांची वसुली ४० कोटी रुपयांची होईल. परंतु स्थायी समिती सभापतींनी ती वाढवुन ६५ कोटी रुपये दर्शविली आहे. आता मला हे सांगा, करांची वसुली कोण करतो? शासन करतो की, प्रशासन करतो?

<u>श्री. हरेश इदनानी (उप मुख्य लेखा अधिकारी):—</u>प्रशासन करते.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :—</u>जर करांची वसुली प्रशासन करते, तर मग प्रशासनाने दर्शविलेला अंदाज योग्य न मानता स्थायी समिती त्यात वाढ करुन मोठया रक्कमेचे अंदाज दर्शविते. या प्रकारास काय म्हटले जाते?

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>हे पहा, करांची वसुली प्रशासन करते. परंतु करांचे प्रशासनावर शासनाची मजबुत पकड असेल तर दर्शविलेली ही वसुली करणे फार मोठे काम नाही. यासाठी आपण आपले सर्व प्रश्न एकदम विचारा. आपल्या सर्व प्रश्नांची आम्ही उत्तर देवु.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :—</u>आपण आता सांगितले की, शासन मजबुत आहे. मागील वर्षी कर वसुलीचे उदिष्ट आपण किती ठेवले होते? सांगा, त्यावरुन दिसुन येईल, शासन किती मजबुत आहे ते? मागील वर्षी किती रक्कम होती?

<u>श्री. हरेश इदनानी (उप मुख्य लेखा अधिकारी):—</u>५५ कोटी.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :—</u>आता पर्यंत किती झाली?

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>श्री. राजुजी, हरकतीचा मुद्दा, आपण जर प्रशासनाची बाजु घेत असाल तर एकाच बाजुने बोला.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :—</u>असा काही कायदा नाही. मी कुणाचीही बाजु घेईन. मी केवळ सत्यपरिस्थिती सभागृहासमोर ठेवु इच्छितो.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>जर प्रशासनाने सुचविलेला अंदाज जर योग्य वाटत असेल तर त्यांनी दाखविलेल्या उत्पन्नाच्या अंदाजानुसार उत्पन्न आणि खर्चामध्ये जी तुट आहे ती भरुन काढण्यासाठी त्यांनी ज्या काही सूचना केल्या आहेत ते आपणांस मंजुर आहेत काय ते सांगा. जकात, मालमत्ता करांमध्ये वाढ व पाणी पुरवठया करामध्ये वाढ ही आपणांस मान्य आहे काय?

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :—</u>जे वसुली करतात ते म्हणतात की आम्ही ४० कोटीपर्यंत वसुली करु व आपण म्हणता की आम्ही ६५ कोटी करु. व श्री. जमनादास पुरस्वानी म्हणतात की, शासन मजबुत आहे. जर मजबुत आहे तर मागील दोन वर्ष शासन कुठे गेले होते?

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>उत्पन्न व खर्चामधील तुट भरुन करण्यासाठी प्रशासनाने ज्या सूचना केल्या आहेत त्या आपणांस मजुर आहेत काय?

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>मी राजु जग्यासी यांना या अगोदर सुध्दा निवेदन केले आहे की, त्यांनी अगोदर सर्वच सर्व प्रश्न विचारावे. त्यांना त्यांच्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर मिळेल. सभागृहातील सर्व सदस्यांना चर्चा करण्यास वेळ दिला जाईल. यासाठी आपले जे काही प्रश्न असतील ते अगोदर आपण विचारा. २००१ २००२ पासुन जेव्हा मा. सदस्या श्रीमती ज्योती कालानी हया स्थायी समितीच्या सभापती होत्या. त्यांच्या कार्यकाळापासुन आजपर्यंतच्या कालावधीचे विवरण देईल. यासाठी मी आपणांस सांगु इच्छितो की, आपण आपले सर्व प्रश्न विचारा.

<u>सदस्य श्री. नरेंद्र राजानी :—</u>मा. महापौरजी, आमचे मित्र श्री. राजु जग्यासी यांना जो प्रश्न विचारला आहे, खरोखरच तो प्रश्न अतिशय योग्य आहे. मालमत्ता कराच्या वसुली बाबत प्रशासनाने आपला अंदाज दर्शविला आहे, त्यात शासनाने दर्शविले आहे की, आपणांस अमुक एवढी वसुली करावी लागेल. एखादया

शहरासाठी किंवा घरासाठी जेव्हा उत्पन्न व खर्चाचे जेव्हा अंदाज तयार केले जातात. त्यानुसार आता आपणासमोर काही बाबींवर करावयाचे निर्धारीत खर्च आहेत. या खर्चाची पुर्तता करण्यासाठी पैसा कोठुन आणला जाईल? त्यासाठी एकतर करांच्या दरात वाढ करावी लागेल. आयुक्तांनी सूचना केल्या होत्या की, जकातीचे दर वाढवा, पाण्याचे दर वाढवा, मिळकत कराचे दर वाढवा. त्या सूचना जर आपणांस मान्य असतील तर आपण सांगा. आणि त्या सूचना जर मान्य नसतील तर प्रशासनास निर्देश दयावे लागतील की आपण आपल्या वसुलीच्या कामामध्ये सुधारणा आणुंन अधिकाधिक वसुली करा. त्यासाठी त्यांच्यावर दबाव आणावा लागेल.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :—</u>श्री. नरेंद्र राजानीजी, मी आपल्या मताशी पुर्णपणे सहमत आहे. प्रशासनाने वसुली बाबत काय अंदाज दर्शविला होता आणि शासनाने काय अंदाज दर्शविला आहे हा फरक मी आपणांस दाखवु इच्छित होतो. आता मी येतो पाणी पुरवठयाच्या वसुलीकडे, पाणी पुरवठयाची वसुली आपण ५१ कोटी दर्शविली आहे.

<u>श्री. हरेश इदनानी (उप मुख्य लेखा अधिकारी):—</u>होंय.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:—</u>पुन्हा तोच मुद्दा येतो. या अगोदर कधी ५१ कोटी रुपये वसुली झाली आहे काय? प्रशासनाने किती रक्कम प्रस्तावित केली होती?

<u>श्री. हरेश इदनानी (उप मुख्य लेखा अधिकारी):—</u>१४ कोटी.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:—</u>याची सभागृहातील बहुताश सदस्यानां कदाचित माहिती नसेल. १४ कोटी रुपये आम्ही वसुली करुन दाखवु असे आयुक्तांनी प्रस्तावित केले होते. आणि शासनाने ती रक्कम वाढवुन ५१ कोटी रुपये दर्शविली आहे. हा अर्थसंकल्प कशाप्रकारे तयार केलेला आहे ते दाखविण्यासाठी मी सांगत आहे. आमचे गटनेते श्री. सतिश चहाळ यांनी जे सांगितले की, या अर्थसंकल्पात आकडयांची आदलाबदल केलेली असेल. ती मी आपणासमोर स्पष्ट करुन दाखवु इच्छितो. कम्प्युटेड उत्पन्न किती आहे ते तुम्ही सांगु शकाल काय?

<u>श्री. हरेश इदनानी (उप मुख्य लेखा अधिकारी):—</u> पगार, भत्ते व प्रशासकिय खर्च यावर १९ टक्के एमआयडीसीचे बिल देण्यासाठी १४ टक्के, कर्ज परतफेड १९ टक्के, शिक्षण मंडळास अनुदान देण्यासाठी ३ टक्के, शासकिय देणी ६ टक्के. या प्रकारे जवळ जवळ १५ ते ६० टक्के उत्पन्न या खर्चासाठी होतो.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:—</u> मागील वर्ष म्हणजे २००८—०९ या वर्षाचे अर्थसंकल्पातील उत्पन्न पेज क्र. ८ वर दाखविले आहे, ३३८ कोटी रुपये.

<u>श्री. हरेश इदनानी (उप मुख्य लेखा अधिकारी):—</u> ४३७ कोटी.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:—</u> ४३७ कोटी? तर आठ महिन्यामध्ये आपणांस किती उत्पन्न मिळाले आहे?

<u>श्री. हरेश इदनानी (उप मुख्य लेखा अधिकारी):—</u> जेएनएनयुआरएम कडुन काही रक्कम यायची होती. त्याबाबत मागील २ वर्षापासुन आम्ही प्रयत्न करत आहोत. आता नुकतीच त्यातील काही रक्कम मंजुर झालेली आहे. त्यामुळे मागील २ वर्षामध्ये आम्ही जे अंदाज व्यक्त केले होते त्यात जेएनएनयुआरएम कडुन रक्कम उपलब्ध न झाल्यामुळे सुधारीत अर्थसंकल्प २१२ कोटीचा करण्यात आलेला आहे.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:—</u> २००८—०९ साठी आपण प्रत्यक्ष उत्पन्न ८५ कोटी दर्शविले आहेत. पृष्ठ क्र. ८ वर आपण ८४ कोटी जे दर्शविले आहे ते ८ महिन्याचे उत्पन्न आहे.

<u>श्री. हरेश इदनानी (उप मुख्य लेखा अधिकारी):—</u> आपण अ अर्थसंकल्पाबाबत बोलत आहात?

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:—</u> होय, उर्वरीत ६५ कोटी ४ महिन्यामध्ये उत्पन्न मिळेल असे आपण गृहित धरले आहे. त्या ४ महिन्यातील ३ महिने पुर्ण झाले आहेत. तर काय ६५ कोटीच्या हिशोबाने तीन महिन्याचे उत्पन्न प्राप्त झाले आहे काय?

<u>श्री. हरेश इदनानी (उप मुख्य लेखा अधिकारी):—</u> निश्चित असा आकडा आता येथे सांगु शकणार नाही.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:—</u> अंदाजे सांगा. ६५ कोटी रुपये ४ महिन्यात आपणांस उत्पन्न यायला पाहिजे होते.

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर :—</u>मा. महापौरजी, माझी हरकत आहे. ही अर्थसंकल्पावरील सभा आहे. हा काय प्रश्नोत्तराचा कालावधी नाही, प्रत्येक प्रश्नाचे उत्तर मागण्यासाठी? हे श्री. राजु जग्यासी स्वत: दोन वर्ष पाणी पुरवठा विभागाचे सभापती होते. त्यावेळेस पाणी पट्टीच्या वसुलीची स्थिती काय होती? ते त्यांना विचारा.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:—</u> अहो, विनोद ठाकुरजी, तर मग आपण परिवर्तन काय आणले आहे? परिवर्तनाबाबत आपले घोषवाक्य काय होते?

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर:—</u> ५० कोटी रुपये पाणी पुरवठयापोटी वसुल होतील असे आम्ही त्यावेळी दर्शविले होते. मा. ज्योती कालानी त्यावेंळेस स्थायी समितीच्या सभापती होत्या. त्यावेळेस काय झाले? ही अर्थसंकल्पावरील महासभा आहे. प्रश्नोत्तराचा कालावधी नाही. यासाठी अर्थसंकल्पावर आपणांस जे काही बोलायचे असेल ते बोला.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:—</u> श्री.विनोद ठाकुरजी, आपण कोणत्या गोष्टीत परिवर्तन केले आहे? संपुर्ण शहरास मुख बनवत आला आहात काय आपण? तुम्ही म्हटले होते आम्ही परिवर्तन करु. मग कोठे गेले ते परिवर्तन.

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर:—</u>ते शहरातील लोक सांगतील. जे २० वर्षात झाले नाही ते या २ वर्षात झाले आहे.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:—</u> शहरातील लोक पाहत आहेत, ऐकत आहेत व समजुन घेत आहेत. प्रेषागृहाचे पत्रकार कक्षात पत्रकार बंधु बसले आहेत. ते पाहत आहेत आपण कशा प्रकारे आकडयांची आदलाबदल केली आहे.

<u>महापौर:—</u>सन्माननिय सदस्य, तुम्ही बसुन घ्या. तुम्ही विषयावर बोलत नाहीत.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:—</u> विषयावर बोलत नाही तर काय आहे? अर्थसंकल्पावरच बोलत आहे, विषय काय आहे?

<u>महापौर :—</u>अर्धा तास झाला तुम्ही बोलत आहात, दुस—यांनाही बोलण्याची संधी मिळु दया.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:—</u> मा. महापौरजी, मी किती वेळ बोलावे याबाबतीत काही कायदा नाही. मी अर्थसंकल्पावर चर्चा करत आहे.

<u>महापौर:—</u>आपण बसून घ्या.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:—</u> मा. महापौरजी, आपण असे करु शकत नाही. माझी ही चर्चा अर्थसंकल्पावरील आहे. जी सत्यता आहे ती ऐकुन घेण्याची आपण हिंमत ठेवा. आपण हा अर्थसंकल्प बहुमताने पारीत कराल याची मला जाण आहे. आपण कशाप्रकारे अर्थसंकल्प सादर केला आहे त्याबाबतचे सत्य ऐकुन घेण्याची हिम्मत तर ठेवा. आपण कशाप्रकारचा अर्थसंकल्प तयार केला आहात? त्याबाबत आपण का घाबरत आहात?

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर :—</u>मा. महापौरजी, हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननिय सदस्य स्वत: स्थायी समितीचे सदस्य आहेत. त्यांना विचारा स्थायी समितीने अर्थसंकल्पास मंजुरी दिली आहे किंवा नाही.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:—</u> १०० टक्के अतिशय चांगला प्रश्न आपण विचारलात. त्याबद्दल आपण बसुन घ्या. श्री. विनोद ठाकुरजी आपणांस माहित नाही, आम्ही स्थायी समितीमध्ये अर्थसंकल्पामध्ये विरोध केला आहे. अगोदर माहिती दया नंतर बोला. तर मा. महापौरजी आपण शहराच्या प्रथम नागरीक आणि महिला महापौर आहात. आपण सत्य ऐकुन घेण्याची हिम्मत ठेवा. आपण शहराचे नेतृत्व करत आहात.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>श्री. राजु जग्यासीजी आपण आपल्या मर्यादेत रहा. महापौरांना आपण बोलु शकत नाहीत. महापौरांना त्यांच्याबाबतीत आपण माहिती देण्याची काही आवश्यकता नाही. त्यांनी आपण बसुन घेण्याबाबत अधिनिर्णय दिलेला आहे. सत्य ऐकुन घेण्याची हिम्मत नाही, असे जे काही बोलत आहात ते बोलणे बंद करा.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:—</u> असे हे बोट कोणाला दाखवतात?

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>आपणांस दाखवत आहे.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:—</u> असे बोट दाखविणे चालणार नाही.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u> आपणांस बोलायला येते का? समजते का आपणांस?

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:—</u> अर्थसंकल्पावर मला बोलु देणार नाही काय?

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>महापौर महोदयांनी अधिनिर्णय दिला आहे. आपण बसुन घ्या. यांना बसण्यास सांगा.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:—</u> आपण अर्थसंकल्पावर बोलु देणार नाहीत काय?

<u>महापौर :—</u>सन्माननिय सदस्य, आपण बसुन घ्या. मी आपणांस म्हटले होते ना?

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:—</u> मी अर्थसंकल्पाविषयी बोलत आहे, भलेही ते आपण पारीत करा. परंतु आमचे काही प्रश्न आहेत ते मी सभागृहासमोर मांडु इच्छितो.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>महापौरांनी अधिनिर्णय दिला आहे.

<u>उप—महापौर :—</u>सन्माननिय सदस्य, दुस—यांना सुध्दा बोलण्याची संधी दया.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:—</u> दुस—यांना सुध्दा संधी मिळेल असा काही वेळ निर्धारीत केला आहे काय की अर्थसंकल्पावर फक्त १० मिनिटे बोलु शकतात. आम्ही कोठे कुणास रोकले आहे?

<u>सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर :—</u>मा. महापौरजी, सदस्यांना बोलू दया ना? सदस्यांना बोलुच देत नाही कुणी?

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>शहराच्या प्रति प्रेम नाही आहे. क्रिटीसाईज करण्याची फक्त संधी हवी आहे. स्थायी समितीत बोलु शकत नाहीत.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :—</u>बोलण्याची संधीच देत नाहीत? फक्त दोन प्रश्नच विचारले आहेत.

<u>उप—महापौर :—</u>आपण विचाराना, बंधुजी.....

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:—</u> मी कोठे नाही म्हणत आहे? मला बोलु तर दया ना?

<u>सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर :—</u>त्यांना बोलु दया ना? अर्थसंकल्पाविषयी चर्चा आहे, संपुर्ण उल्हासनगर शहराचा तुम्ही अर्थसंकल्प सादर केला? या विषयास तर पुर्ण होवु दया ना? २० वर्षापुर्वी काय झाले आणि १५ वर्षापुर्वी काय झाले हे उगाळत बसायची काय गरज आहे? २० वर्षापुर्वी तुम्हीच होते ना सत्तेमध्ये.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>मा. महापौरजी, एक मिनिट. जर महापौरांनी बसण्यास सांगितले तर सदस्याने बसले पाहिजे ना? आपण कायदा दाखवा, वाचुन दाखवा जरा. महापौरांनी बसण्यास सांगितल्यानंतर सदस्याने बसले पाहिजे की नको?

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:—</u> मा. महापौरजी मी आपली परवानगी घेवुनच बोलत आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—</u> प्रथम कायदा सांगा.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:—</u> मा. महापौरजी मी आपली परवानगी घेवुनच बोलत आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—</u> प्रथम कायदा सांगा.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:—</u> मा. महापौरजी मी आपली परवानगी घेवुनच बोलत आहे. आपण निर्णय विचारपुर्वकच दया. अर्थसंकल्पाच्या विषयी बोलण्याचा प्रत्येकास अधिकारी आहे.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे:—</u> महापौरांनी अधिनिर्णय दिला आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—</u> मा. सचिव साहेब, यांना जरा कायदा काय आहे ते सांगा.

<u>महापौर :—</u>सन्माननिय सदस्य, आज अर्थसंकल्पाविषयीच चर्चा करा.

<u>सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर :—</u>तुम्ही अर्थसंकल्प काय केला आहे ते कळले पाहिजे ना?

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:—</u> मा. महापौरजी ही फार लज्जास्पद गोष्ट आहे की आपण अर्थसंकल्पाविषयी आम्हांस बोलु देत नाहीत. लोकशाही मध्ये आपण विचार मांडु देत नाहीत? हा आमचा प्रस्ताव आहे, आपण जे पाहिजे ते करा.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u> मा. महापौरजी, मा. उप—महापौर, सर्व सन्माननिय सदस्य,.......

<u>उप—महापौर :—</u>श्री. जमनुजी, दोन मिनिट, यांना बोलु दया.

<u>सदस्य श्री. :—</u>महापौर निर्णय देतात, सदस्य त्यास तोडतात ही चांगली गोष्ट नाही.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—</u> महापौरांनी, बोलण्यास अनुमती दिली आहे काय?

<u>सदस्या श्रीमती सुररेखा वेलकर:—</u> ही चांगली गोष्ट नाही आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—</u> महापौरांनी त्यांना बोलण्यास अनुमती दिलेली नाही आहे. त्यांना सांगा कायदा काय आहे तो?

<u>सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर :—</u>२० वर्षापुर्वी तुम्हीच होते ना सत्तवर.

<u>उप—महापौर:—</u>प्रथम त्यांना बोलु दया नंतर आपण बोला.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>मा. महापौरजी, ............

**सदस्य श्री. राजु जग्यासी:–** श्री. जमनादास पुरस्वानी यांच्या नंतर मला बोलण्यास परवानगी देणार? मा. महापौरजी, आपण सत्याला का घाबरत आहात?

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–** मा. महापौरजी, मा. सभापती, स्थायी समिती यांच्या तर्फे ६३२ कोटी उत्पन्न व ६२५ कोटी खर्चाचा जो अर्थसंकल्प प्रस्तुत केला गेला, फारच सुंदर अर्थसंकल्प आहे. पहिल्याच वेळी ही महापालिका झाल्यानंतर किंवा असे सुध्दा म्हणता येईल की, ९७ पासुन जेव्हापासुन मी नगरसेवक झालो आहे अशा प्रकारचा अर्थसंकल्प, ज्या कुठल्याही वस्तुच्या जकातीवर वाढ करण्याची गोष्ट तर दुरच परंतु काही वस्तुंवर तर जकात दर कमी केला आहे. मा. सदस्य श्री. राजु जग्यासी काही गोष्ट सांगत होते ते फारच महत्वाची गोष्ट होती. त्यांच्यासाठी मी काही सांगु इच्छितो, २००१ ते २००२ पासुन या महासभेमध्ये मा. सभापती महोदया, श्रीमती ज्योती कालानी यांनी जो अर्थसंकल्प सादर केला होता, १७३ कोटी रुपयाचा अर्थसंकल्प सादर केला होता. त्यावेळेस माझे सदस्य मित्र श्री. राजु जग्यासी सुध्दा या महासभेत सदस्य होते. व बरेचसे सदस्य होते व मी सुध्दा सदस्य होतो. परंतु त्याचा प्रत्यक्ष अर्थसंकल्प जो झाला तो ८३ कोटीचा झाला. त्यांनी तर १७३ कोटीचा प्रस्ताव सादर केला होता परंतु ८३ कोटी रुपये प्रत्यक्ष अर्थसंकल्प होता. ९० कोटी रुपये नुकसान झाले, त्यांची वसुली ९० कोटी कमी झाली. दुस–यावर्षी सुध्दा मा. ज्योती कालानी यांनी १५८ कोटीचा अर्थसंकल्प या महासभेत प्रस्तृत केला होता. मी श्री. राजु जग्यासी यांना सागु इच्छितो की, २००१, २००२ मध्ये ८३ कोटीची वसुली झाली, तर मा. श्रीमती ज्योती कालानी यांनी ८४, ८५ कोटी किंवा त्यापेक्षा जास्त ९० कोटीचा अर्थसंकल्प त्यांनी सादर करावयास पाहिजे होता. परंतु त्यांनी जो अर्थसंकल्प सादर केला तो १५८ कोटीचा होता. आमच्या मा. श्रीमती ज्योती कालानी यांचे प्रयत्न उंच होते, त्यांना माहिती होते की मी १५८ कोटी रुपये वसुल करेल, परंतु दुर्भाग्याची गोष्ट म्हणजे फक्त १०० कोटी रुपये वसुल झाले व ५८ कोटी नुकसान झाले. मी सभागृहातील सदस्यांना निवेदन करतो की, या आकडयास आपण लिहुन ठेवा. तिस–या वर्षी सुध्दा मा. श्रीमती ज्योती कालानी सभापती होत्या, त्यांनी १६८ कोटीचा अर्थसंकल्प सादर केला होता. परंतु आमचा १०४ कोटी अर्थसंकल्प झाला. त्यात सुध्दा ३८ कोटी रुपये प्रत्यक्ष नुकसान झाले होते. त्यानंतर २००४–०५ मध्ये मा. श्रीमती ज्योती कालानी यांनी अर्थसंकल्प सादर केला, १०४ कोटी वसुली होते आणि त्यांनी अर्थसंकल्प सादर केला १८५ कोटीचा? श्री. राजु जग्यासीजी, १०४ कोटीला पाहुन १८५ कोटी अर्थसंकल्प सादर केला. असे का केले, तर मी सांगु इच्छितो की, श्रीमती ज्योती कालानी यांचे प्रयत्न उंच होते. त्या काही करुन दाखवु इच्छित होत्या परंतु सभागृहातील दुस–या सदस्यांचा त्यांना सहयोग नव्हता. हे राहिले अर्थसंकल्पाविषयी. आता मी सांगतो, मालमत्ता कराबाबत. जसे श्री. राजु जग्यासी यांनी म्हटले की, आपण ६५ कोटी रुपये मालमत्ता कर कसे वसुल करणार? २००२ मध्ये मा. सभापती महोदयांनी २८ कोटी ८० लाख रुपयाचे कर वसुलीचे लक्ष्य ठेवले होते. परंतु वसुली किती झाली, फक्त ११ कोटी, ६२ टक्के कमी. आपण आकडे पाहत जा. त्यांचे जे शासन होते आणि त्यानंतर आमचे जे शासन आले, आम्ही ८० टक्क्यापर्यंत लक्ष गाठले आहे त्याबाबतीत आकडे सुध्दा मी आता आपणांस येथे सांगेन. २००२, २००३ मध्ये त्यांचे लक्ष्य होते ४० कोटीचे. २००१ मध्ये ११ कोटी येतात व दुस–या वर्षी किती आले? ४० कोटी? किती टक्के झाले? ३०० टक्क्याच्याही वर परंतु दुर्भाग्याने १८ कोटी ९६ लाख म्हणजेच ५३ टक्के वसुली कमी आली. त्यानंतर २००३–०४ मध्ये मा. श्रीमती ज्योती कालानी यांनी १८ कोटीची वसुली केल्यानंतर पुढील वर्षी वसुलीचे लक्ष थेट ५० कोटीचे लक्ष ठेवले. व वसुली आली फक्त १९ कोटी. ३० कोटी ९५ लाख रुपये कमी. ६२ टक्के कमी. अशा प्रकारचे आकडे आपण जर वाचुन पाहिलेत तर ना केवळ मिळकत कर, मी आता पाणी पट्टी वसुलीवर येत आहे. मा. स्थायी समिती महोदयांनी, २००१, २००२ मध्ये पाणी पट्टी वसुलीचे ३५ कोटी लक्ष ठेवले होते. परंतु दुर्भाग्याने फक्त १० कोटीची वसुली झाली. जी ७१ टक्के कमी आहे, परंतु त्यांचे मनोबल एवढे मोठे होते की त्यांनी याही परिस्थितीत हार मानली नाही. २००२ २००३ मध्ये त्यांनी पुन्हा ४० कोटीचे लक्ष ठेवले, अशा आमच्या स्थायी समिती सभापती होत्या, १० कोटीची पाणी पट्टी वसुली झाल्यानंतर त्यांनी ४० कोटीचे लक्ष ठेवले. व आज जर आम्ही एवढे लक्ष्य ठेवत असू तर काय आपण एवढी वसुली करु शकु. मी आणखी पुढे सांगतो, आमच्या कार्यकालावधीत, २००८–०९ मध्ये जेव्हा आमचे श्री. रामचंद्र पारवानगी हे स्थायी समितीचे सभापती होते त्यावेळेस त्यांनी लक्ष ठेवले ४३७ कोटीचे, त्यातील १७२ कोटी जेएनएनयुआरएम कडुन येणार होते. बाकी जो २६५ कोटीचा अर्थसंकल्प होता, त्यापैकी २०९ कोटीपर्यंतचे उदिष्ट आम्ही काढले. लक्ष्य गाठण्यामध्ये आम्ही फक्त २० टक्के कमी पडलो. ही झाली मालमत्ता कर व पाणी पट्टीच्या वसुली. जकातीबाबत मी श्री. राजु जग्यासी यांना सांगु इच्छितो, २००२–२००३ मध्ये मा. सभापतींनी या सभागृहामध्ये जेव्हा अर्थसंकल्प सादर केला होता, त्यावेळेस या शहरातील व्यापा–यांची बाहेर गर्दी जमली होती, त्यावेळेस विरोधी पक्षामध्ये मी सुध्दा होतो. व त्यावेळेस आम्ही घोषणा देत होतो. त्यावेळेस ४२ जीवनावश्यक बाबींवर जकात दरामध्ये वाढ करण्यात आली होती. त्याबाबींची यादी सुध्दा मी आपणांस

देईल. व २००५–०६ मध्ये पुन्हा ९ बाबींवरील जकात दरामध्ये वाढ करण्यात आली. तरी सुध्दा आम्ही म्हटले की, आमच्या सभापती महोदयांचे मनोधैर्य उंच आहे. त्याबाबत आम्ही बरेच प्रयत्न केले. पथकरामध्ये तीन ते सहा टक्के, पाणी पुरवठा लाभकरामध्ये एक ते तीन टक्क्यांपर्यंत वाढ केली. तरीसुध्दा हे शहर ऐकतच राहिले. श्री. राजु जग्यासी यांना मी सांगृ इच्छितो, शांत समुद्रामध्ये जो नौका चालवतो, तो कधीही कुशल नावीक बनु शकत नाही. लाटांना घाबरुन नौका पार होवु शकत नाही, हिम्मत करणा–यांची कधी हार होत नाही. जर आपण हिम्मतच करणार नसाल, संघर्ष करणार नसाल, संघर्ष करु देणार नसाल तर आपली नौका कधीही पार होवू शकणार नाही. जी आवश्यक कामे आहेत ती करण्याबाबत अगोदर आपल्या मनाची तयारी केली पाहिजे. त्यानंतर जेवढे काही वसुली येणे शक्य आहे तेवढी वसुली प्रथम करा. त्यानंतर आपणांस असे दिसुन येईल की, जे काम होण्यासारखे नव्हते ते सुध्दा केले जावु शकते. जर आपल्यात हिम्मत असेल तर कठिणातले कठिण कोणतेही काम पुर्ण करण्यापासुन आपणांस कुणीही रोखु शकणार नाही. या सभागृहात मी एक गोष्ट सांगु इच्छितो, एक वेळेस भोतिक शास्त्राची शिक्षीका विदयार्थ्यांना शिकवत होती.

**<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>**मा. महापौरजी, ही अर्थसंकल्पावर चर्चा होत आहे काय?

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>**हे पहा, ही गोष्ट आपणांस सांगणे जरुरीचे आहे. ही अर्थसंकल्पावरीलच चर्चा आहे. महापालिकेत कराच्या रुपाने पैसा कसा येईल आणि तो कसा खर्च केला जाईल याबाबत मी सांगत आहे. मन हारले तर जित होवु शकत नाही.

**<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>**माझी गोष्ट देखील आपणांस ऐकावी लागेल. ऐकुन घ्यावी लागेल.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>**जरुर ऐकु. भोतिक शास्त्राच्या शिक्षीकेने विदयार्थ्यांना सांगितले, केटरपिनर आहे त्याच्यामधुन थोडयावेळाने फुलपाखरु बाहेर निघेल. ...................... धन्यवाद, जयहिंद, जय महाराष्ट्र।

**<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>**मा. महापौर महोदया, केवळ दोन मिनिटाची वेळ घेईल. माझे बंधु श्री. जमनादास पुरस्वानी यांना मी शुभेच्छा देवु इच्छितो त्यांनी सांगितले की, महापालिकेची ही जी पुर्ण सत्ता आहे, ती आमच्या भाभी श्रीमती ज्योती कालानी यांनी आखुन दिलेल्या मार्गानुसार चालु आहे. व त्यांचा आपणांस सदैव आर्शिवाद राहिल. व ज्याप्रकारे त्यांच्यामध्ये हिम्मत होती, मला वाटते त्यांच्यापेक्षा आपणांस अधिक हिम्मत प्राप्त होवो. मा. महापौरजी, मी केवळ दोन तीन मिनिटाची वेळ घेईल. कोणत्याही गोष्टीवर मी विश्वास ठेवत नाही. जी सत्यस्थिती आहे ती मी आपणासमोर ठेवु इच्छितो. दोन वर्षाच्या आपल्या कार्यकालावधीचे कोणत्या बाबींवर आपणांस आपली हिम्मत आणखी वाढवावी लागणार आहे ते काही मुद्दे मी आपणांस सांगु इच्छितो, कोठे कोठे आपल्या चुका होत्या, त्या मी आपणांस सांगु इच्छितो. त्याबद्दल आपली अनुमती मिळावी. पहिल्यावर्षी ज्या महापौर झाल्या त्या माझ्या मातेप्रमाणे आहे, शहरात नळाला पाणी नसल्याने त्या स्वत: मडके घेवुन शहरभर फिरल्या होत्या. आणि तसे असूनही त्यांनी पाणी पट्टीचे दर वाढविले होते. पाणी पट्टीचे दर वाढविणार नाही.असे त्यांच्याच जाहिरनाम्यामध्ये म्हटले होते. दुसरे असे की, टॅंकर घोटाळा...... जो घोटाळा सिध्द झाला आहे, जवळ जवळ ३५ कोटीचा घोटाळा झालेला आहे, महाराष्ट्र शासनाकडून असे आदेश आले आहेत की या घोटाळयामध्ये जो कुणी अधिकारी, पदाधिकारी सामिल आहे, त्याच्याकडुन ही रक्कम वसुल केली जावी. त्याचबरोबर ठेकेदाराचा ठेका रद्द केला जावा. परंतु अतिशय दु:खाने सांगावे लागत आहे की, केवळ नाव बदली करुन पुन्हा त्यालाच टॅंकरचा ठेका देण्यात आला आहे. तिसरे असे की, टॅक्स घोटाळा........ मी धन्यवाद देवु इच्छितो आमच्या आयुक्त साहेबांना, कर विभागातील ४४० अशी प्रकरणे होती ज्यांच्या दरामध्ये बदल करण्यात आला होता. परंतु आयुक्त साहेबांनी त्यास स्थगिती दिली आहे. एवढा मोठा घोटाळा? महोदया, हा आमच्या शहरातील जनतेचा पैसा आहे. याबाबत विचार केला पाहिजे की आमची हिम्मत किती मोठी आहे आणि आम्ही कोणत्या मार्गावरुन चालत आहोत. जर त्या प्रकरणांवर स्थगिती आदेश आहे तर अंदाजपत्रकामध्ये आम्ही मिळकत करांच्या कोणत्या दरांचा विचार करणार आहोत? अगोदरच्या दराचा विचार करणार की आता ज्या दराने आपण कर घेत आहोत त्या? स्थगिती आदेश म्हणजे काही निर्णय नाही. चौथी अतिशय महत्वपुर्ण अशी गोष्ट आहे, बिल्डरांकडुन प्रिमीयम घेतला जाईल, त्याबाबत सभागृहात मोठमोठी भाषणे झाली होती, प्रिमियम येईल आमच्या शहराचा विकास होईल. आम्हांलाही चांगले वाटले आम्ही सुध्दा साथ दिली. काय झाले माहित नाही, पुढील महासभेत पुन्हा त्याबाबतचा मुद्दा आला की, प्रिमियम बंद केला जावा. .... मा. महापौरजी, शहरातील नागरीकांना हे सर्व माहित आहे. जर मांजराने डोळे मिटुन दुध प्यायचे आणि तिला वाटले की, आपणांस कुणी पाहिले नाही. तर असे कधी होत नाही. हे बिल्डर, शहरवाशी सर्वांना माहित आहे की, हे का झाले? मी सांगण्याची आवश्यकता नाही. परंतु आपणांस आठवण

करुन देवु इच्छितो की येथे आपल्या कार्यकाळात काय काय होत आहे? पाचवा मुद्दा असा की, आमच्या महापौरांचा मी मनापासुन आदर करतो, काही दिवसापुर्वी त्यांच्या मनामध्ये एक भावना आली होती की, आमच्या शहरातील रस्ते भरले जात नाही. मी उपोषणास बसले पाहिजे. मा. महापौरजी, मी बरोबर बोलतो की, चुकीचे बोलतो, चुकीचे बोलत असेल तर सांगा. आपण आवाज उठविला होतात. ही अतिशय चांगली गोष्ट आहे, सत्तेत राहुनही जर शहरातील रस्त्यांवरील खड्डे भरले जात नसतील तर आपण उपोषणास बसण्याचा विचार करता. परंतु या नाण्याची दुसरी बाजु काय आहे? सत्ताधारीपक्षामध्ये बसुन सुध्दा आम्ही अयशस्वी आहोत. सार्वजनिक बांधकाम विभागासाठी अर्थसंकल्पात आम्ही ३५,३६ कोटीची तरतुद करतो तरीही रस्त्याचे खड्डे आम्ही भरु शकत नाही ही एक सत्यता आहे. अशी बरीचशी प्रकरणे आहेत, जेएनएनयुआरएमचा जो निधी आपण यामध्ये घेतलेला आहे, त्यासाठी एमएमआरडीएकडुन आपणांस कर्ज घ्यायचे आहे. सर्वसाधारण माणुस जेव्हा आपल्या घराचे अंदाजपत्रक तयार करतो त्यावेळेला तो सुध्दा विचार करतो की, ज्या प्रमाणात माझे उत्पन्न आहे, त्याचप्रमाणात मी खर्च करेल. जेव्हा त्यास वाटते की, पहिल्या पंधरा–वीस दिवसामध्येच माझ्या उत्पन्नातील बरेचसे पैसे खर्च झाले आहेत, त्यावेळेस तो आपले खर्च कमी करतो, तो दुधाचे बिल कमी कसे होईल ते पाहतो, पेट्रोंल कमी भरेल, टेलिफोनचा कमी वापर करेल, अशा प्रकारे सर्व सामान्य माणसाची धारणा असते, येथे या प्रकारचा विचार होतो का? जेव्हा आपण अर्थसंकल्प तयार करतो तेव्हा, उत्पन्नाचा अंदाज तर आपण घेतो, अंतिमतः असे दिसुन येते की, आलेले उत्पन्न खर्चामध्ये कधीच संपुन केले आहे. अशा प्रकारच्या ब–याचशा गोष्टी आहेत, त्याबाबतीत मी निवेदन करेल की, आमच्या गटनेत्यांनी जो प्रस्ताव दिलेला आहे, आपण प्रत्येक नगरसेवकासाठी प्रभाग समितीमध्ये १६ लाख रुपयांच्या कामाची तरतुद ठेवली आहे. त्यातील जर पाच, पाच लाख रुपये काढुन त्या पैश्यातुन या शहरास एक चांगल्याप्रकारचे रुग्णालय उपलब्ध करुन दिले तर ते आपल्यासाठी सुध्दा एक गौरवाचे ठरेल तसेच आपणा सर्व नगरसेवकांना गौरवास्पद ठरेल. कारण की, आजपर्यंतच्या दोन वर्षाच्या कालावधीमध्ये आपण शहरवाशियांना कोणताही असा प्रकल्प देवु शकलेला नाही. भलेही आपण तिनशे कोटीचा , चारशे कोटीचा अर्थसंकल्प तयार करत असू. आज जर आपणांस कुणी विचारले ना की आपण या शहरास कोणता असा प्रकल्प दिला आहे तर त्याबाबतीत सत्ताधारी पक्षाचे किंवा विरोधी पक्षातील कोणताही सदस्य उत्तर देवु शकणार नाही. तर याबाबतीत मी आपणांस विनंती करेल की, आमचा आपणाकडे या प्रकारचा प्रस्ताव आहे. त्याबाबत सर्व सदस्यांची सहमती तयार झाली पाहिजे. प्रत्येकाचे पाच, पाच लाख रुपये कपात करुन जमा होणा–या चार कोटी रुपयाचा आपल्या शहरामध्ये एक चांगले रुग्णालय उभे राहिले पाहिजे. व स्थायी समितीमध्ये जो आम्ही दुसरा प्रस्ताव दिला होता, आमचे शहर हे औदयोगिक व व्यापारी शहर आहे. आमच्या शहराचे अर्थकारण कपडयावर अवलंबुन आहे. मा. स्थायी समिती सभापती महोदय, याबाबतीत मी आपणांस खास करुन निवेदन करेल कारण की आपण सुध्दा व्यापारीवर्गातील आहात. उप–महापौरजी आपण सुध्दा व्यापाराशी संबंधीत आहात. माझी आपणांस विनंती राहील की, कपडयांवरील जकात दरांमध्ये २० पैसे जरी आपण कपात केली तरी, शहरवाशियांना फार मोठी सवलत दिल्यासारखे होईल असे मला असे वाटते. याबाबतीत आपणांस असे वाटेल की, असे केले तर जकात वसुलीमध्ये जी तुट होईल ती कोठुन भरुन काढणार? त्याबद्दल मी आपणांस असे सांगु इच्छितो की, जेथे आपण वसुली ६५ कोटी दर्शविली आहे तेथे आपण ७० कोटी लिहा. तसेही आपली हिम्मत मोठी आहे. याचबरोबर औषधांवरील जकात कर माफ करण्याचा मुद्दा राहिला त्याबाबतीत शासन निर्णय आहे. या अर्थसंकल्पामध्ये फार मोठे बदल आम्ही करु इच्छित नाही. आम्ही आपणांस निवेदन करतो की, आपण आमच्या प्रस्तावास मंजुरी दयाल. नाहीतर आम्ही आपणासमोर जो प्रस्ताव ठेवला आहे त्यावर आपण मतदान घेतले तर आपली मेहरबानी होईल. मा. महापौरजी, आपण मला बोलण्याची संधी दिलीत त्याबद्दल आपले आभार मानतो.

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड :–</u>मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, सन्माननिय सदस्य श्री. राजु जग्यासी यांनी अर्थसंकल्पाबाबतीत चांगल्या प्रकारे चर्चा केली. गेल्या दहा ते पंधरा वर्ष यांची या उल्हासनगर शहरामध्ये सत्ता होती. सातत्याने चार वेळेस निवडुन आलेले यांच्या पक्षाचे आमदार यांना या शहरास चांगले एखादे रुग्णालय उपलब्ध करुन दिले पाहिजे असे कधीच सुचले नाही. आमदार निधी कुठे गेला तेच या शहराला माहित नाही. कागदोपत्री पास केले जाते, परंतु काम होते किंवा नाही हे त्यांच्या पक्षाच्या सदस्यांनाच माहित नाही. कारण त्यांच्या पक्षाचे सदस्य मला विचारतात की, आमदार निधी कोठे वापरला जातो? राष्ट्रवादीमध्ये माझे काही मित्र आहेत. ते विचारतात की आमदार निधी कोठे वापरला जातो. मी सांगितले की, उल्हासनगरच्या पुढे वापरला जात असेल. कारण तेथे सिमा रिसोर्ट आहे. म्हणुन मी त्यांना सांगु इच्छितो की, आपला जो आमदार निधी आहे तो घ्या. त्यानंतर आमचा नगरसेवक निधी, आणि रुग्णालयासाठी जो काही निधी असेल तो घेवुन ..........

**सदस्य श्री. सतिश चहाळ :**—मा. महापौरजी, आयुक्त साहेब............

**सदस्य श्री. दिलीप गायकवाड:**—माझे बोलणे पुर्ण झालयानंतर तुम्ही बोला, मी तुमच्या बोलण्यात कधी व्यत्यय आला आहे काय? या ठिकाणी मी एवढेच सांगेल की, १६ लाख रुपयाचा प्रभाग निधी दिलेला आहे. आणि ६ लाख रुपयाचा नगरसेवक निधी दिलेला आहे, प्रभाग समितीचा १६ लाख रुपयाच्या निधीतील एक लाख रुपयाचा निधी आणि महापालिका सभागृहाचे सुशोभिकरण करण्यासाठी दिलेला आहे. उर्वरित १५ लाखाचा जो निधी राहतो त्याबाबतीत माझी आपणांस एक विनंती आहे की तो पाणी पुरवठा विभागासाठी वेगळा आणि सार्वजनिक बांधकाम विभागासाठी वेगळा अशाप्रकारे निधी दोन टप्प्यामध्ये न देता, त्याबाबतीत मागच्यावेळेस असे आढळुन आले आहे की, पाणी पुरवठा विभागाला वेगळा दोन लाखाचा वेगळा आणि सार्वजनिक बांधकाम विभागाला वेगळा निधी तर तसे न करता, पंधरा लाखाचा निधी सन्माननिय सदस्य त्यांच्या प्रभागातील कोणत्याही कामासाठी वापरतील अशी तरतुद या ठिकाणी करण्यात यावी. धन्यवाद, जयहिंद, जयमहाराष्ट्र।

**सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे:**—मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, स्थायी समिती सभापती, माझ्या प्रभागामध्ये १५ शौचालय आहेत. त्यांची स्थिती अतिशय खराब आहे, त्यामुळे नविन शौचालय बांधण्यासाठी २५ लाख निधी ठेवण्यात यावा ही विनंती.

**सदस्य श्री. राजेश वदारिया:**—मा. महापौरजी, प्रथम तर मी आपणांस धन्यवाद देवु इच्छितो, कारण की, कमित कमी या वेळेस तरी आपण मला बोलण्याची संधी दिली. या अर्थसंकल्पातील आणि या अगोदरच्या अर्थसंकल्पातील जी ठळक वैशिष्टये आहे त्यातील पहिले वैशिष्टये आहे की, जेएनएनयुआरएम योजना आमच्या पहिल्या टर्ममध्ये शहर विकास आराखडा (सीडीपी) तयार करण्यात आला होता, त्यानंतर आपणांस सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करायचा होता. ज्यावर आपण जलवाहिनी टाकण्याचा प्रकल्प तयार करुन १२८ कोटी रुपये मंजुर करुन घेतले आहेत. त्याबाबतीत आयुक्त साहेबांना मी एक विचारु इच्छितो की, जो शहर विकास आराखडा महानगरपालिकेने मंजुर केला आहे, त्यामध्ये प्रथम प्राधान्ये आपल्या स्वत:च्या पाण्याचे स्त्रोतास असले पाहिजे. व दुसरे क्रमांकाचे जे प्राधान्य जलवाहिनी टाकण्याच्या कामास देण्यात आले आहे. तर पहिले डीपीआर वितरण व्यवस्थेसाठी जलवाहिनी टाकण्याकामीचा सविस्तर प्रकल्प अहवाल कसा तयार करण्यात आला व तो कसा सादर करण्यात आला. त्यामागे काय कारण आहे? या संदर्भात ६ डिसेंबर, २००८ रोजी मी आपणांस एक पत्र दिले होते. व मागील अर्थसंकल्पाच्यावेळी सुध्दा ही बाब मी आपल्या निदर्शनास आणुन दिली होती की, जवळ जवळ दोनशे कोटीचे नुकसान पाणी पुरवठयामध्ये आपण गेल्या दहा, बारा वर्षामध्ये केले आहे. आपल्या आकडयानुसारचा या वर्षीचे आपले जे नुकसान आहे ते जवळ जवळ ३० कोटीचे आहे. १ हजार लिटर पाण्यास ७ रुपये या दराने एमआयडीसीकडुन आपण पाणी विकत घेतो. ज्याबाबत आपले आणि आम्हां सर्वांचे म्हणणे आहे की, हे दर खुपच जास्त आहे. येथुन ८० किलोमिटर दुर अंतरावर असलेली मिरा—भाईंदर महानगरपालिका शहाड टेम्स येथुन ४.५० रुपये प्रति एकहजार लिटर या पदाने पाणी विकत घेते. तर आपण आपले स्वत:चे पाणी स्त्रोत तयार करण्यासाठी प्रकल्प का तयार करु शकलो नाही. जेएनएनयुआरएम अंतर्गतची ज्या कामांचे प्रस्ताव गेले आहेत, त्यांची कामे मंजुर झाली आहेत. त्याबद्दल आयुक्तांना मी धन्यवाद देवु इच्छितो. त्याचबरोबर मला एका गोष्टीचा खेद सुध्दा आहे, आमच्या असे ऐकिवात येते की, वेगवेगळया महानगरपालिकांचे महापौर, उप—महापौर, स्थायी समितीचे सभापती जेएनएनयुआरएम योजने अंतर्गतचे वेगवेगळे प्रकल्प मंजुर करुन घेण्यासाठी मुंबई व नवि दिल्ली येथे जातात. आपल्या महानगरपालिकेचे महापौर, उप—महापौर व स्थायी समितीचे सभापती, कुठला एखादा प्रकल्प मंजुर करुन घेण्यासाठी नवि दिल्लीस गेले आहेत असे आमच्या कधी ऐकिवात आले नाही. आणि जर गेले असतील तर मेहरबानी करुन त्याचा खुलासा करावा. जो जेएनएनयुआरएमचा प्रकल्प आहे तो भारत सरकारचा प्रकल्प आहे. त्यातील ५० टक्के रक्कम भारत सरकार देईल. ३५ टक्के रक्कम आपणांस भरायची आहे व १५ टक्के महाराष्ट्र शासन देईल. २००९—२०१० च्या अर्थसंकल्पासाठी आम्ही येथे उपस्थित झालो आहेत, त्याचे हे ६ वे वर्ष आहे. जर यात काहीच होवु शकत नाही तर पुढे होण्याची शक्यता कमी आहे. मागील वेळेस आपण जेएनएनयुआरएम मध्ये २५० कोटीचे लक्ष्य ठेवले होते की आपण एवढे पैसे आणु. तर आतापर्यंत आपल्या महानगरपालिके जवळ जेएनएनयुआरएमतर्फे कोणताच पैसा आलेला नाही. ही काय गुपीत गोष्ट नाही आहे. आजपर्यंत जो मंजुर प्रकल्प आहे पाणीपुरवठयाचा १२८ कोटीचा, अंडरग्राउंड पाणी ड्रेनेजसाठी २५० कोटी व ई गर्व्हनससाठी ७ कोटीचा, हे अनुक्रमे २७, ३६ व ६ महिन्याचे प्रकल्प आहेत. यामध्ये स्वत:चे पाणी पुरवठयाचे स्त्रोत निर्माण करण्याचा प्रकल्प का समाविष्ट करण्यात आला नाही? की आपला हा प्रकल्प मंजुर केल्यानंतर दुसरा कोणताही प्रकल्प आम्ही घेणार नाहीत. अशा तर त्यांच्या काही सूचना नाहीत. दुसरे म्हणजे १९८६ पासुन आम्ही या शहरात असे पाहत आलो आहेत की, सुरुवातीस

शहाबादी लादया लावयाचे काम सुरु झाले. त्या अगोदर शहरातील रस्ते खराब होते, गल्ल्यांमध्ये माती होती, गटारी किंवा नाल्या बांधलेल्या नव्हत्या. १९८६ मध्ये श्री. पप्पु कालानी यांची नगराध्यक्ष म्हणुन निवड झाल्यानंतर ५ कोटीत शहरामध्ये सिमेंट कॉक्रिटचे काही रस्ते तयार करण्यात आले. त्यामुळे शहराचा फार मोठया प्रमाणावर विकास झाला. त्यानंतर काळ आला सीसी पॅसेजचा, त्यानंतर काळ आला २५०, व ३५० चा, आज काळ आला आहे इंटरलॉक ब्लॉकचा. इंटरलॉक ब्लॉक त्याच सीसी पॅसेज, २५०, ३५० रस्त्यांवर बसविले जातात. याबाबतीत मी आयुक्त साहेबांना विचारु इच्छितो की, काय आपण त्या ठिकाणच्या वाहतुकीची घनता विचारात घेतली आहे? त्याठिकाणी कोणत्या प्रकारच्या वाहनांची ये, जा असते, त्या रस्त्यांवरुन मालवाहतुक करणा–या वाहनांची वाहतुक क्षमता किती आहे, आणि अशा वाहनांचे वर्दळीची घनता किती आहे, हे प्राकलन मंजुर करण्यापुर्वी आपण कधी पाहिले आहे. प्रत्येक गल्लीमध्ये २५० आणि ३५० या प्रकारच्या रस्त्यांवर इंटरलॉक ब्लॉक बसविले जात आहे. हा पैश्याचा अपव्यय आहे. हा जनतेचा पैसा आहे. ७४ व्या घटनादुरुस्तीत महानगरपालिकावर ब–याच जबाबदा–या सोपविल्या आहेत. ज्यामध्ये आर्थिक विकास, दारिद्रय निर्मुलन, सामाजिक विकास, झोपडपट्टयांचे स्थलांतर अशाच प्रकारची कित्येक कामे आहेत. त्याबाबतीत या अर्थसंकल्पात काहीही तरतुद नाही. त्याबाबतीत स्थायी समिती सभापतीं जरुर खुलासा देतील अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. धन्यवाद।

<u>स्थायी समिती सभापती, श्री. मोहनादास रामरख्यानी :–</u>याबाबतीत श्री. हरेश इदनानी हे उत्तर देतील.

<u>सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u> .अर्थसंकल्पावरील जी महासभा असते त्या दोन अर्थसंकल्पांच्या महासभांमध्ये मी काही बोललो नाही परंतु आजच्या या महासभेत मी बोलु इच्छितो. अर्थसंकल्पावर बोलणे मी ब–याच दिवसापासुन सोडुन दिले आहे. आता श्री. राजेश वदारिया यांनी गरीबां संदर्भातील योजना या अर्थसंकल्पात नसल्याचे म्हटले, या अर्थसंकल्पाची जी विशेषत: आहे ती सांगणे राहुन गेले आहे म्हणुन मी ती सांगु इच्छितो. एमएमआरडीए ब–याच वर्षापासुन कार्यरत आहे. परंतु आजपर्यंत एमएमआरडीएचा एक रुपया सुध्दा या शहरासाठी कधी आणण्यात आला नाही. ज्या पक्षाचा आमदार आहे, त्याच पक्षातील राज्य सरकारमध्ये सत्ता असतांनाही शहरास एमएमआरडीएकडुन एक नया पैसा सुध्दा मिळाला नव्हता. व पहिल्यांदाच मागील वर्षी ७ फेब्रुवारीला एमएमआरडीएचे आयुक्त श्री. रत्नाकर गायकवाड यांना विशेष निमंत्रण देवुन या शहरात बोलविण्यात आले होते आणि त्यावेळी या शहराची पाहणी करण्यात आली होती. त्यानंतर त्यांना बरेचशे प्रकल्प दाखविण्यात आले. आणि त्यानंतरच या शहरासाठी आकाशमार्गीका (स्कायवाक) मिळण्याचे या शहरास सौभाग्य प्राप्त झाले. उल्हासनगर स्टेशनच्या पुर्व आणि पश्चिमेस हे काम चालु आहे. पहिल्यांदाच एमएमआरडीएच्या माध्यमातुन राज्य सरकारकडुन फार मोठी रक्कम आपणांस प्राप्त झाली आहे. २० कोटी रुपय खर्चाचे शौचालयांच्या कामास मंजुरी प्राप्त होणे ही सुध्दा पहिलीच वेळ आहे. आज ज्या कुण्या नगरसेवकांच्या प्रभागामध्ये सुलभ शौचालयाचे उद्घाटन होते त्यावेळेस विविध वृत्तवाहिन्यांच्या प्रतिनिधींना बोलावून दाखविले जाते की, आमच्या प्रभागामध्ये एमएमआरडीएच्या माध्यमातुन कशाप्रकारे शौचालयाचे काम झाले आहे. ही कामे पहिल्यांदाच झाली आहेत. जेएनएनयुआरएमची जी योजना आहे, ती २००३ पासुन चालु आहे. ती काही नविन योजना नाही. मी राजनितीक भाषण करत नाही, परंतु या योजना या शहरात आणण्यासाठी कुणी पुढाकार घेतलेला नव्हता. आमची येथे सत्ता आल्यानंतर व आयुक्त साहेबांनी पाठपुरावा केल्यानंतर २४ गुणीले ७ म्हणजे आठवडयातील ७ दिवस २४ तास पाणी या धोरणानुसार १२८ कोटीची पाणी पूरवठा योजना केवळ मंजुर झाली नाही तर त्यातील काही रक्कम महापालिकेस प्राप्तही झाली आहे. जी ३ कोटी ९८ लाखाची जी रक्कम आहे, ती सुध्दा महाराष्ट्र शासनाकडे पोहचली आहे. व महापालिकेस आदेश आला आहे की आपण आपले खाते उघडा व त्यात ती रक्कम जमा करणार आहेत. ही योजना प्रत्यक्षात पुढे आली आहे. २५० कोटीची अंडरग्रांउड ड्रेनेजची जी योजना आहे, ती योजना महाराष्ट्र शासनाने पारीत केलेली आहे. तसेच दिल्ली मध्ये जेएनएनयुआरएम जे पारीत होणार आहे, ती सुध्दा योजना पुढे आलेली आहे. सल्लागार नेमण्याची, शहर आराखडा तयार करणे या सर्व गोष्टीस वेळ लागतो. बीएसयुपी ही जी योजना आहे जी जेएनएनयुआरएमच्या अंतर्गत येते त्यामध्ये गरीबांसाठी झोपडी बनविले जातात. त्या योजनेअंतर्गत ३५० कोटी ही रक्कम सुध्दा माझ्या माहितीप्रमाणे पारीत झालेली आहे. त्याशिवाय ई गर्व्हनन्स ही जी योजना आहे जसे आजकल कम्पयुटरवर सर्व गोष्टी होतात जसे आपल्या महापालिकेची नागरी सुविधा केंद्र आहे, या ई गर्व्हनर्ससाठी सुध्दा शासनाने ७ कोटी मंजुर केलेले आहे. नागरीकांना महापालिकेत समस्या घेवुन यावे लागु नये, पैसे भरण्यासाठी यावे लागु नये यासाठी जे दोन मशिनी आहेत ते प्रत्यक्षात सुरु झाल्या आहेत, त्यांचे उद्घाटन झाले आहे. एक मशिन ३ नंबर उल्हास स्टेशन जवळ व एक मशिन व्हीटीसी ग्रांउड येथे जेथे प्रभाग समिती आहे तेथे चालु आहे. हे सर्व आमच्या कामांचे परिणाम आहे. याशिवाय या महापालिकेत ठेकेदारांनी केलेल्या कामांबाबत त्यांचे देयकाची रक्कम वर्षानुवर्षे त्यांना मिळत नव्हती. या

कामामध्ये आम्ही पारदर्शकता आणली आहे. आम्ही आयुक्तांना पुर्णपणे सहकार्य देत आहोत. त्यांच्या कामामध्ये आम्ही कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप करत नाही किंवा दबाव आणत नाहीत. एकंदरित आम्ही आयुक्तांच्या याबाबतच्या भुमिकेचे कौतुक करतो. महापालिकेतील कर्मचा—यांना, अधिका—यांना वर्षानुवर्षे पदोन्नती मिळत नव्हती त्यासाठी ते महापौर, उप—महापौर, आयुक्त, स्थायी समिती सभापती यांना भेटत असत. ही पहिलीच वेळ आहे की, महासभेमध्ये शासन असो प्रशासन असो कर्मचा—यांच्या पदोन्नतीबाबत जो पात्र आहे, कुणावरही अन्याय होवु नये याबाबीकडे सुध्दा आम्ही सर्वजण लक्ष देत आहोत. हेच परिवर्तन आहे, जे आजपर्यंत होवु शकले नाही तेच आज होत आहे. याची सुध्दा नोंद झाली पाहिजे, धन्यवाद।

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :</u>—मा. महापौर महोदया, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, स्थायी समिती सभापतींचे मी अभिनंदन करतो, श्री. लाल पंजाबी यांनी सांगितल्याप्रमाणे एक चांगला अर्थसंकल्प, उत्कृष्ट अर्थसंकल्प, ६३२ कोटीचा अर्थसंकल्प स्थायी समितीने महासभेसमोर आणलेला आहे. त्यामध्ये काही फेरफार करुन आमचे सभागृह नेता श्री. यादव हे सभागृहासमोर प्रस्तृत करतीलच. यापुर्वी काय झाले यापेक्षा यापुढे काय करणार? कुणी मागच्यावर्षापासुन जसे श्री. जमनादास पुरस्वानी यांनी मागील २००१ पासुनचा पाढा घातला. कोळसा कितीही उगळला तरीही तो काळाच निघणार आहे, तो काही सफेद होणार नाही. आणि हे प्रत्येकाला माहित आहे. लोक विसरायचा प्रयत्न करत आहे परंतु विसरायला होत नाही. पुन्हा, पुन्हा, पुन्हा, पुन्हा चित्रपटासारखे दिवस पुढे येत आहेत. आम्ही टाळायचे म्हटलो तरी टाळता येत नाही. आठवण करुन दे म्हणतो तर आठवण करुन देत आहेत. मागच्या वर्षी मालमत्ता कर जवळपास ३४ कोटी वसुल झाला. यापूर्वी कधीही एवढा मालमत्ता कर वसुल झालेला नव्हता. जो मालमत्ता कर ५ वर्षापुर्वी ५—६ कोटी, ५—६ कसेटी होता, तो मागच्यावर्षी ३४ कोटी केला. जकात कर जो मागच्या ७—८ वर्षापुर्वी १५ कोटी, १६ कोटी होता तो आता १०२ कोटी आहे. म्हणजे उपाय आहेत परंतु त्यातुन काढण्याची मानसिकता नव्हती. जाणुनबुजुन लपविले जात होते. जेव्हा आमच्या हातात सत्ता होती त्यावेळी प्रत्येकवेळी ते चित्र बदलत जात होते. मग ते पाणी पुरवठयाविषयी असो, मालमत्ता कराविषयी असो किंवा इतर काही बाबतीत असो. श्री. लाल पंजाबी यांनी सांगितल्याप्रमाणे कमीत कमी भ्रष्टाचार रोखण्यासाठी किंवा होवु नये त्यासाठी काळजी म्हणुन पारदर्शकता आणली पाहिजे. पारदर्शकता असेल तर भ्रष्टाचार होणार नाही. चोरांना संधी मिळाली तर ते चोरी करतील, चोरांना जर संधी मिळालीच नाही तर ते चोरी कशी करणार? तशीच पारदर्शकता आयुक्त साहेबांनी, लेखाविभागाने यापुर्वी कधीच मांडली नव्हती. आता नंबराप्रमाणे बिले येतात व नंबराप्रमाणे ती ठेकेदाराला दिली जातात. एक दिवस तर असा होता की, काही वर्षापुर्वी ठेकेदार महापालिकेच्या सभागृहाबाहेरील व्हरांडयात कपडे काढुन बसले होते. आम्हांला उघडे केले जाते, आमचे हे हाल आहेत, अशाप्रसंगी संकटात सापडलेले तत्कालीन आयुक्त श्री. पोखरकर साहेबांनी महापालिकेचा आर्थिक स्थितीस डबगईस आलेली महापालिका असा उल्लेख केला होता. आज त्या महापालिकेचा उत्पन्न ६३२ कोटीच्याही पुढे जात आहे. त्याचे कारण जेएनएनयुआरएम आणि एमएमआरडीएकडुन येणारा निधी, ती आणण्याची मानसिकता आमची आहे. त्यासाठी पाठपुरावा आहे. एमआयडीसीचे बिल वारंवार दिली जातात त्यामुळे पाणी कपात होत नाही. पुर्वी इतर महापालिकेस पाणी भरपुर असायचे परंतु उल्हासनगर महानगरपालिकेस पाणी नसायचे कारण की एमआयडिसीचे वेळोवेळी बिले दिली जात नव्हती. त्यामुळे कधी २५ टक्के, तर कधी ३५ टक्के पाणी कपात व्हायचे. परंतु गेल्या दोन वर्षात कधीही झालेले नाही कर्मचा—यांना त्यावेळेस इथे बोनस सुध्दा दिला जात नव्हता. पगार सुध्दा वेळेवर दिला जात नव्हता. परंतु आता सर्व व्यवस्थीत चालु आहे. पदोन्नतीचे विषय सुध्दा महासभेसमोर येतात. अशा पध्दतीने सुरळीतपणे काम चाललेले आहे. ३७ कोटीचा स्कायवाक आलेला आहे. २२ कोटीचे एमएमआरडीए अंतर्गत निर्मल अभियाना अंतर्गतची शौचालये आहेत. १२७ कोटीची पाणी पुरवठा योजना जी २००३ साली दिल्लीला जावुन तेथुन मंजुर करुन घेणे जरुरीचे होते. परंतु येथिल शासन आणि प्रशासन त्यावेळी चालुच शकत नव्हते. आणि त्यावेळस जवळ जवळ केंद्राने ५३०० कोटीचा महाराष्ट्राला दिलेला वाटयामधुन आपल्या महापालिकेला काहीही मिळाले नाही कारण त्यावेळेस आपला प्रस्ताव सुध्दा गेलेला नव्हता. परंतु आता गेल्या दोन वर्षापासुन सतत पाठपुरावा करुन पाणी पुरवठया अंतर्गत १२७ कोटी मंजुर झालेले आहेत. २७२ कोटीचा अंडर ग्राउंड डेनेजचा प्रस्ताव तोही मंजुरीच्या वाटेवर आहे. यासर्वांसाठी पाठपुरावा लागतो. २००३ साली आम्ही विरोधात असुन सुध्दा ओरडुन सांगत होतो की, आपला प्रस्ताव लवकर जावु दया. परंतु येथे काय चालले होते, स्थानिक राजकारण कसे करायचे? कसे शिजवायचे? याला फोड, त्याला तोड, याच्यातच आम्ही गुंतलो होतो, त्यामुळे तिथपर्यंत आमचे प्रस्ताव गेलेच नाहीत. ना महाराष्ट्र शासनाकडे ना दिल्लीला, ही प्रक्रिया फार मोठी होती, ती पार पाडतांना वर्ष दिडवर्ष आमचे गेले आणि आता कोठे मंजुरी मिळाली आहे. महापालिकेच्या संगणकीकरणाकरिता ७ कोटी, महापालिकेच्या इमारतीसाठी एमएमआरडीएकडुन १ कोटी मिळाले आहे, आणि जेएनएनयुआरएम चे प्रकल्प ते मंजुर करुन घ्यायचे असतील तर त्या प्रकल्पांमध्ये महानगरपालिकेचा वाटा ५० टक्के आहे. आणि ते दाखविण्यासाठी आम्हांला कर्ज घ्यावे

लागेल. आणि कर्ज घेण्यासाठी महापालिका सक्षम आहे. येथे फक्त उघडे करण्यासाठी, टिका करण्यासाठी नाही. आम्ही काय करु शकतो. जर आम्ही आमचे उत्पन्न वाढविले नाही तर आम्ही कर्ज घेवु शकत नाही. कर्ज घेतले नाही तर जेएनएनयुआरएमचे प्रकल्प येथे होवु शकणार नाही. उल्हासनगरला आम्ही कुठल्या दिशेने नेतो आहे. आणि ते करण्यासाठी आम्ही आमचे मानसिकता दाखविली की, यावर्षी ३४ कोटी आहे मागच्या वर्षी ते १९ कोटी होते. १९ कोटीचे ३४ कोटी कसे झाले? त्यासाठी मेहनत घेतली, परिश्रम घेतले, काहीतरी कल्पना वापरल्या. त्याच कल्पनेच्या आधारे ३४ कोटीचे ६५ कोटी कसे होतील ते करण्याचे प्रयत्न आम्ही करणार आहोत. पाणी पुरवठयाच्या बाबतीत सुध्दा तसेच आहे. दिवसेंदिवस महापालिकेची लोकसंख्या वाढते. मध्यंतरी आयुक्त साहेबांशी आमची चर्चा झाली त्यांनी एक चांगला प्रस्ताव मांडला, त्यासाठी जनरल सर्व्हे , सर्व मिळकतींची ॲसेसमेंट लगेच करा. त्या आधारेही ६५ कोटी वसुली होईल अशी आम्हांला खात्री आहे. आतापर्यंत तुम्ही जे लपवुन ठेवले होते ते आता आम्ही उघड करते आहे. अनुक्रमानुसार बांधकाम नकाशे मंजुर होत आहेत, हा माझा तो परका असे अजिबात चालु नाही. अशाप्रकारचा फंडा यापुर्वी कधीही नव्हता. आम्ही तो आणतो पाडतो. सर्वसामान्य माणुस यामध्ये आम्ही कोणताही फरक केलेला नाही. श्रीमंताला तोच न्याय, गरीबाला तोच न्याय. त्या धर्तीवर महापालिका चालली आहे म्हणुन तुम्हांला अभिनंदन करतो. आणि जर जेएनएनयुआरएम चे प्रकल्प आपणांस मंजुर करुन घ्यायचे नसेल तर तुम्ही सांगा हा अर्थसंकल्प खोटा आहे. जेएनएनयुआरएमचे प्रकल्प राबवण्यिासाठी या महापालिकेचा स्तर उंचावण्यासाठी जे जे आम्हांला करणे गरजेचे आहे ते आम्ही केले. आणि ते करत असतांना सर्वसामान्य जनतेवर कोणतीही करवाढ केलेली नाही. उलट त्यामध्ये कपात केली आहे. जे चोरी करणारे आहेत त्यांची चोरी पकडायची आणि महापालिकेच्या उत्पन्न वाढवायचे हा त्यामगाचा उद्देश व तो पुर्ण केलेला आहे. पुन्हा एकदा स्थायी समितीचे सर्व सदस्य आणि सभापती, आयुक्त साहेब यांना मी धन्यवाद देतो. त्यांनी चांगल्या प्रकारचा अर्थसंकल्प तयार केला आहे. यापुढे उत्तोरोत्तर उत्तोरोत्तर मग तो जेएनएनयुआरएमच्या किंवा एमएमआरडीएच्या माध्यमातुन असो किंवा महाराष्ट्र शासनाचे अनुदान असो, किंवा केंद्र शासनाकडुन येणा—या अनुदानातुन असो ते राबविण्यासाठी जास्तीत जास्त निधी मिळो आणि या महापालिकेचा अर्थसंकल्प अधिकाधिक मोठा कसा होईल तो प्रयन्न करा. याठिकाणी खास नमुद करतो की, पहिल्यांदाच क अर्थसंकल्पामध्ये दारिद्रय निर्मुलनासाठी एक वेगळे अंदाजपत्रक तयार केले आहे, महिला बालकल्याण समितीसाठी १ कोटी ३० लाखाचे अंदाजपत्रक. आतापर्यंत २५ लाखाची तरतुद असायची ती वाढवुन १ कोटी ३० लाखाची तरतुद केली आहे. म्हणजेच महिलांसाठी, गरीबांसाठी आम्ही आमचे उत्तरदायित्व किती पुणै करतो आहे, ते या अर्थसंकल्पात दाखवुन दिले आहे. ते श्री. राजेश वदारिया यांनी पाहिले ते दिसत नाहीत. स्थायी समितीच्या सर्व सदस्यांचे आणि सभापतींचे पुन्हा एकदा अभिनंदन करतो, धन्यवाद, जयहिंद, जयमहाराष्ट्र।

<u>सदस्या श्रीमती सुमन शेळके :</u>—सन्माननिय महापौर, स्थायी समिती सभापती आणि आयुक्त साहेब, मला अर्थसंकल्पाबाबतीत असे म्हणायचे आहे की, पुर्व प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण समिती सभापतींचा जो निधी आहे, ज्याप्रकारे महिला बालकल्याण समितीचा निधी वाढविला तसा पुर्व प्राथमीक व माध्यमिक शिक्षण समितीचा निधी वाढविण्यात यावा. एवढे बोलुन मी माझे दोन शब्द संपविते.

<u>सदस्य श्री. रामसागर यादव :</u>—मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, स्थायी समितीचे सभापती, व सचिव साहेब, स्थायी समितीमध्ये जो अर्थसंकल्प तयार करण्यात आलेला आहे, त्याबाबत महापौरांच्या दालनामध्ये सर्व पक्षांचे गटनेते, मा. महापौरजी, स्थायी समितीचे सभापती, या सर्वांसमोर जो निर्णय घेण्यात आला त्यावेळी अर्थसंकल्पामध्ये काही फेरबदल करण्यात आले. तो अर्थसंकल्प मी आपणांस वाचुन दाखवितो. मी मराठीत वाचुन दाखवितो. काही त्रृटी असतील, त्यांकडे आपण दुर्लक्ष कराल अशी माझी अपेक्षा आहे.

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०० अन्वये आवश्यक असलेल्या गोष्टींच्या अधिन राहून स्थायी समितीने ठराव क्रमांक : ११७ दिनांक १२/२/२००९ अन्वये महानगरपालिकेस सादर केलेल्या सन २००९—२०१० च्या अर्थसंकल्पीय अंदाजास, सन २००८—२००९ च्या सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजास व इतर बाबींकरिता पुढील फेरफारांच्या अधिन राहून अंतिम स्वीकृती देत आहे.

## <u>विविध कर व दरांचा प्रस्ताव :</u>

१. जकात दर : शहरात आयात होणा—या जकात पात्र मालाच्या ४ गटात स्थायी समितीने शिफारस केल्याप्रमाणे दरात घट करण्याचे मंजूर करीत आहे. दिनांक १८ जानेवारी २००९ पासून एक वर्षाच्या

कालावधीसाठी जकात वसुलीकरिता खाजगी अभिकर्त्याची नेमणूक करण्यात आली आहे . फेरबदलामूळे होणारी घट जकात अभिकर्त्याकडून अपेक्षित रक्कमेतून कमी करण्यात यावी .

२. मालमत्ता कर , पाणी पुरवठा , टॅंकर भाडे इत्यादी दरामध्ये वाढ नामंजूर करीत आहे.

३. अग्निशमन सेवा शुल्क : महाराष्ट्र आग प्रतिबंधक जीव संरक्षण उपाययोजना अधिनियम २००६ लागू करण्यास व त्यातील तरतूदीनुसार

शुल्क आकारण्यास मंजुरी देत आहे .

## महानगरपालिकेचे सन २००८—२००९ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाज :

स्थायी समितीच्या शिफारसी प्रमाणे सन २००८—२००९ करिता उत्पन्न रुपये २१२.२९ कोटी व खर्च रुपये २१२.२२ कोटी चा सुधारित अर्थसंकल्पीय अंदाज मंजूर करीत आहे .

## महानगरपालिकेचे सन २००९—२०१० चे मूळ अंदाजपत्रक :

स्थायी समितीने सन २००९—२०१० साठी शिफारस केलेल्या रुपये ६३२.२९ कोटीचे उत्पन्न व रुपये ६३२. २५ कोटी खर्चाच्या अर्थसंकल्पीय अंदाजास पुढील प्रमाणे फेरफारासह अंतिम स्वीकृती देत आहे .

स्थायी समिती सदस्यांना १०—१० लाखाचा अतिरिक्त निधी देण्यात आला होता. महापौरांच्या दालनामध्ये महापौर, उप—महापौर, स्थायी समिती सभापती यांच्या उपस्थितीत असा निर्णय झाला की, स्थायी समिती सदस्यांना हा जों १०, १० लाख रुपये अतिरीक्त निधी दिला जात आहे ते अनुचित आहे. त्यामुळे त्यातुन १ कोटी ७० लाख रुपये कमी करण्यात आले आहे. ६६ लाख रुपये नगरसेवक निधीमध्ये वाढविण्यात आले. नगरसेवक निधी दुर्बल घटकांसाठी ३५ लाख रुपयाची तरतुद वाढविण्यात आली. प्रभाग क्षेत्रातील मुलभुत सुविधांसाठी प्रभाग क्षेत्र १ मधुन ९ लाख रुपये कमी करण्यात आले.

(आकडे हजारात)

| पान क्रमांक | उत्पन्न स्थायी समिती अंदाज | ६३२२८५१ | खर्च | ६३२२४८४ | पान क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| | बांधकाम परवाना व प्रिमीयम इत्यादी फी. | +६२०० | प्रभाग क्रमांक : ६,१३,१७,१९,२१,२६,२७,२८, ३४,३८,४६,५०,५३,६०,६४,६६ व ७६ मध्ये पायाभूत सुविधा | —१७००० | २२ |
| | | | नवीन रस्ते | +१५००० | २२ |
| | | | नगरसेवक निधी | + ६६०० | २३ |
| | | | नगरसेवक निधी (दुर्बल घटक) | + ३५०० | २३ |
| | | | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सुविधा (प्रभाग —१) | —९०० | १७ |
| | | | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सुविधा (प्रभाग —१) (दुर्बल घटक) | —१००० | १७ |
| | | | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सुविधा (प्रभाग —२) | —१००० | १७ |
| | | | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सुविधा (प्रभाग —२) (दुर्बल घटक) | —९०० | १७ |
| | | | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सुविधा (प्रभाग —३) | —१००० | १८ |
| | | | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सुविधा (प्रभाग —३) (दुर्बल घटक) | —९०० | १८ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | (प्रभाग —३) (दुर्बल घटक) | | |
| | | | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सुविधा (प्रभाग —४) | —१२०० | १८ |
| | | | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सुविधा (प्रभाग —४) (दुर्बल घटक) | —७०० | १८ |
| | | | मनपा मुख्य इमारत (सभागृह बांधकाम) | —५०० | २२ |
| | | | दशहरा , गोल मैदान, रोटरी व मनपा उदयान संवर्धन | —२००० | १५ |
| | | | सपना गार्डन संवर्धन | —१५०० | १५ |
| | | | उदयाने दुरुस्ती | + ३५०० | १५ |
| | | | दलित वस्त्यात विकास कामासाठी महापालिका वर्गणी . | +१२०० | २४ |
| | | | सार्वजनिक शौचालय व मुता—या बांधणी | +२५०० | ४० |
| | | | दुर्बल घटक वसाहतीत सार्वजनिक शौचालय,मुता—या, नाले बनविणे इ. खर्च | +२५०० | ४० |
| | **एकूण** | ६३२९०५१ | **एकूण** | ६३२८६८४ | |

अशा प्रकारे स्थायी समितीने तयार केलेला जो अर्थसंकल्प होता तो सर्व पक्षांच्या नेत्यांच्या सहमतीने जो अर्थसंकल्प तयार करण्यात आला होता तो मी वाचुन दाखविला. जयहिंद, जयमहाराष्ट्र ।

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>सन्माननिय महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, अर्थसंकल्पावर बरीच चर्चा झाली. कारण की, अर्थसंकल्पच एवढा चांगला तयार करण्यात आला आहे, त्यामुळे सर्व समाधानकारक आहेत. संपुर्ण सभागृह आनंदी आनंद दिसुन येत आहे. यासाठी शेवटी शेवटी मी असे सांगतो की, हा अर्थसंकल्प सर्वानुमते पारीत केला जावा.

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर :—</u>मतदान घ्या, मतदान.....

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :—</u>मा. महापौरजी, आम्ही जो प्रस्ताव दिलेला आहे, प्रत्येक सदस्याच्या नगरसेवक निधीतुन पाच पाच लाख रुपये कपात करुन घेवुन त्यातुन शहरामध्ये एक चांगले सुसज्ज रुग्णालय तयार केले पाहिजे. तसेच कपडयावरील जकात दरामध्ये २० पैश्यांनी कपात केली पाहिजे. व औषधांवरील जकात कर माफ केला पाहिजे. या प्रस्तावाच्या बाजुने जर आपण असाल तर आम्ही आपणांस समर्थन देण्यास तयार आहोत.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>मा. महापौरजी व आयुक्त साहेब, औषधांवरील जकात कर माफ करण्याबाबतीत यापुर्वी जो ठराव झाला होता त्याचे काय झाले?

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :—</u>पास झाला आहे परंतु लागु झालेला नाही.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>ठराव लागु केला आहे की नाही?

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर :–</u>शासनाच्या विचाराधीन आहे.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ:–</u>मा. महापौरजी, आम्ही आपणांस अतिशय चांगला प्रस्ताव दिलेला आहे. शहरास रुग्णालयाची अतिशय चांगली आवश्यकता आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>सन्माननिय महापौरजी, उप–महापौरजी, शहरामध्ये जे एकमात्र रुग्णालय आहे ना, त्याची स्थिती काय आहे? २० वर्षापासुन आमदार आहेत, त्यांच्या आमदारीचा पैसा कोठे गेला?

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :–</u>आमदार निधीचे म्हणता, खासदार निधी कोठे गेला?

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>महाराष्ट्र शासनाच्या अधिन मध्यवर्ती रुग्णालय आहे. इएसआय हॉस्पीटल आहे.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :–</u>मध्यवर्ती रुग्णालयात गेलेला रुग्ण मरुन जातो.

<u>उप–महापौर:–</u>सचिव साहेब, अर्थसंकल्पाबाबतीत मतदान घ्या.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :–</u>महापालिकेच्यावतीने आम्ही महाविदयालय चालु करु इच्छित आहोत.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>औषधांवरील जकात कर माफ करण्याबाबतीत जो ठराव पारीत केलेला आहे त्याचे काय झाले?

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :–</u>शहरासाठी टाउन हॉल ही एक चांगली इमारत तयार करुन दिली आहे.

<u>महापालिका सचिव :–</u>मा. महापौरांचा आदेश आहे की, अर्थसंकल्पाबाबतीत मतदान घेतले जावे. तर मतदान घेतले जावे काय?

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>आम्ही आता सुध्दा आपणांस समर्थन देण्यास तयार आहोत. शहरासाठी एक चांगले रुग्णालय तयार झाले पाहिजे. त्यासाठी प्रत्येक नगरसेवकास आपल्या निधीतुन केवळ पाच पाच लाखाचा निधी दयायचा आहे फार मोठा काही निधी दयायचा नाही. आपल्या शहरात फार चांगले रुग्णालय तयार होईल त्याबाबतीत आपली काय हरकत आहे. मागील वर्षी आपणांस नगरसेवक निधी १५ लाख होता यावर्षी १५ लाख होतील. परंतु शहरासाठी चांगले रुग्णालय उभे राहिल. चांगले रुग्णालय उभे करण्यास आपली काय हरकत आहे? तसेच कपडयांवरील जकात दरामध्ये २० पैसे कपात करा, आम्ही आताही आपणांस समर्थन देण्यास तयार आहोत.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>२००५–०६ मध्ये कपडयावर आपण २० पैसे जकात वाढविला होता तो आम्ही कमी करु?

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>श्री. जमनुजी, मागील वर्षी आपण किती बाबींवर जकात कर वाढविला होता ते सांगु का?

<u>उप–महापौर:–</u>श्री. जमनुजी आपण बसून घ्या.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>आपण विरोध कोणत्या बाबींवर कराल, रॉकेलवरील जकात दरात कपात केली आहे, काय त्याबाबत विरोध कराल?

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ:–</u>श्री. जमनुजी आपण मोठ मोठे डॉयलॉग, शेरशायरी ऐकविली. याबाबतीत जरा थोडी हिम्मत दाखवा. ही तर शहरासाठी चांगली गोष्ट आहे ना?

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड :–</u>आमदार निधी कोठे गेला, आमदार निधीतुन रुग्णालय तयार होवू शकते ना?

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :–</u>श्री. गायकवाड साहेब, आमदार निधी यानंतरच्या कामासाठी, दरवाजे, खिडकी इतर कामासाठी.

<u>सदस्य श्री. नरेंद्र राजानी :–</u>मा. महापौरजी, रुग्णालयाचा विषय अतिशय संवेदनशिल विषय असतो. त्यावर राजकिय स्वरुपाची चर्चा करणे किंवा टिका टिप्पणी करणे उचित होणार नाही. रुग्णालयाच्या विषयावर गंभीरतेने विचार करायचा असेल तर पुढील महासभेत त्यावर विचार केला जावु शकतो. त्याबाबतीत माझी सूचना अशी आहे की, येथे आमदार निधी, आमदार निधी असा वारंवार विषय निघत होता, मला असे म्हणायचे आहे की, आमचा आमदारांचा दोन ते तीन कोटी निधी आहे. मला वाटते आता पाच कोटी रुपयाचा निधी आहे. तो निधी जर या कामासाठी आपण आरक्षित करु शकत असाल तर बाकी जेवढा काही निधी कमी पडत असेल त्याबाबत महानगरपालिकेच्या वतीने विचार केला जावु शकतो.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :–</u>आता आमदार निधीचे आपण म्हणता परंतु खासदार निधी आहे तो सुध्दा मिळाला पाहिजे ना?

<u>सदस्य श्री. नरेंद्र राजानी :–</u>हे बरोबर आहे. खासदार निधी आम्ही आणु. याशिवाय मी हे सुध्दा सांगत आहे की, आमचे आणखी दोन तीन आमदार आहेत जसे आमचे श्री. रामनाथ दादा मोते आहेत, श्री. संजय केळकर आहेत त्यांच्याकडुन सुध्दा जो काही निधी आणण्याची आवश्यकता पुर्ण करु.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>मा. श्री. नरेंद्र राजानी साहेब, आमचे आपणांस एवढेच निवेदन आहे की, रुग्णालयासाठी ४ कोटीची तरतुद करा व कपडयाच्या जकात दरात २० पैश्यांनी कपात केली जाईल असे सांगा आम्ही आपणांस समर्थन देण्यास तयार आहोत.

<u>सदस्य श्री. नरेंद्र राजानी :–</u>आमदार निधीबाबत आपण काय खात्री देवु शकता ते सांगा.

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर :–</u>तुम्हांला अधिकार आहेत काय? अधिकार नाहीत.

<u>सदस्य श्री. नरेंद्र राजानी :–</u>आम्ही सर्व मिळुन एक नविन उल्हासनगर तयार करु इच्छित आहोत. नविन रुग्णालय तयार करु इच्छितो.

मा. सदस्या श्रीमती निना नाथानी सभागृहातुन बाहेर गेल्या. 

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर :–</u>आमदार निधी ५ कोटी असल्याचे आमच्या एका सदस्याने सांगितले परंतु आपल्या आमदाराने बुध्द विहारासाठी दिलेला पाच लाखाचा निधी परत घेतला. ते आपणांस पाच कोटी कोठुन देणार?

यावेळी काही सदस्य सेम, सेम असा आवाज देत होते.

<u>सदस्य श्री. नरेंद्र राजानी :–</u>आमदार निधीबाबत आपणाकडुन खात्री देण्यात येत असेल तर या प्रस्तावावर आपण चर्चा करु शकतो.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ:–</u>मी आमदार निधी किंवा खासदार निधीबाबत बोलत नाही मी आपणांस एकच विनंती करतो की, आपल्या हातात आपला जो नगरसेवक निधी आहे त्यातुन जर पाच पाच लाख रुपये काढले तर.......

मा. सदस्य श्री. जीवन इदनानी, श्री. हरेश जग्यासी, श्री. किशोर जग्यासी हे सभागृहातुन बाहेर गेले.



<u>सदस्य श्री. नरेंद्र राजानी :–</u>शहरात रुग्णालय झाले पाहिजे याबाबत आपणांस रुची नाही? आपणांस केवळ अर्थसंकल्पास विरोध करण्याबाबत रुची आहे. जेणेकरुन बाहेर आपणांस लोकांना सांगायला होईल.

**<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>**मागील वर्षी आपणांस पंधरा पंधरा लाख रुपयाचा निधी मिळाला होता त्यानुसार यावर्षी जर आपण पंधरा पंधरा लाख रुपये निधी घेतला तर काय हरकत आहे? सीसी पॅसेज आणि नाल्यांमध्येच आपला निधी जातो. मा. महापौरजी, मी आपला आदर राखतो.

**<u>उप–महापौर :–</u>**कृपया सर्वांनी बसुन घ्यावे. आता मतदान घेतले जात आहे.

**<u>महापालिका सचिव :–</u>**सत्ताधारी पक्षाचा जो प्रस्ताव आहे व श्री. राजु जग्यासी यांनी ज्या सूचना दिल्या आहेत त्या वगळता जे सन्माननिय सदस्य प्रस्तावाच्या बाजुने आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

**<u>प्रस्तावाच्या बाजुने ४५ मते</u>**

१. श्रीमती विद्याताई निर्मले
२. श्री. कुमार आयलानी
३. श्री. मोहन रामरख्यानी
४. श्रीमती लिलाबाई आशान
५. श्री. विनोद ठाकुर
६. श्री. गोविंदराम लुंड
७. श्रीमती मोना वनवारी
८. श्रीमती ज्योती चैनानी
९. श्रीमती शिला मनसुलकर
१०. श्रीमती निलम रावत
११. श्री. भजनलाल रामचंदानी
१२. श्री. सुरेश जाधव
१३. श्री. जमनादास पुरस्वानी
१४. श्री. रामचंद्र पारवानी
१५. श्री. लाल पंजाबी
१६. श्रीमती जया माखिजा
१७. श्री. लालबिहारी यादव
१८. श्री. दिलीपकुमार जग्यासी
१९. श्री. राजेश वानखेडे
२०. श्री. प्रशांत धांडे
२१. श्री. दत्तात्रय पवार
२२. श्री. अंकुश म्हस्के
२३. श्री. धनंजय बोडारे
२४. श्री. रामसागर यादव
२५. श्री. दिलीप गायकवाड
२६. श्री. राजेंद्रसिंह भुल्लर
२७. श्री. रमेश चव्हाण
२८. श्रीमती वसुधा बोडारे
२९. श्रीमती राजश्री चौधरी
३०. श्रीमती ज्योती माने
३१. श्रीमती नेहा भोईर
३२. श्री. कैलाश तेजी
३३. श्री. विजय सुपाळे
३४. श्री. प्रधान पाटील
३५. श्री. शेखर यादव
३६. श्रीमती जयश्री सुर्वे
३७. श्री. सुंदर मंगतानी
३८. श्रीमती रजनी महाडिक
३९. श्री. तुलसीदास वसिटा

४०.श्री.बी.बी. मोरे
४१. श्री. जे.के. ढोके
४२.श्रीमती लता निकम
४३.श्रीमती सुमन शेळके
४४.श्रीमती पंचशिला पवार
४५.श्रीमती कविता सिरवानी

महापालिका सचिव :—व श्री. राजु जग्यासी यांनी दिलेल्या प्रस्तावाच्या बाजुने व सत्ताधारी पक्षाच्या प्रस्तावाच्या विरोधात जे सन्माननिय सदस्य आहेत, त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

प्रस्तावाच्या विरोधात १४ मते

१. श्री. राजू जग्यासी
२. श्री. सतिश चहाळ
३. श्री. प्रभुनाथ गुप्ता
४. श्री. नरेंद्रकुमार ठाकुर
५. श्रीमती सुरेखा वेलकर
६. श्रीमती संगिता कंडारे
७. श्रीमती सुजाता रिजवानी
८. श्री. गणपत एडके
९. श्री. अनिल ऐलानी
१०.श्री. रविंद्र बागुल
११.श्रीमती निलु चांदवानी
१२.श्रीमती मंजु पोपटानी
१३.श्री. संजय बठिजा
१४.श्री. भारत राजवानी

महापालिका सचिव:—मनसेच्या सदस्यांची काय भुमिका आहे?

सदस्य श्री. नरेंद्र दवणे :—आम्ही दोन्ही सदस्य तटस्थ आहोत.

तटस्थ २

१. श्रीमती जयश्री पाटील
२. श्री. नरेंद्र दवणे

सदस्या डॉ. निना नाथानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

महापालिका सचिव:— पास? बहुमताने?

सदस्य श्री.जीवन इदनानी व श्री. राजेश वदारिया, श्री. हरेश जग्यासी व श्री. किशोर जग्यासी यांनी सभागृहात प्रवेश केला.

महापौर :— सदरचा विषयाबाबत बहुमताने पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑

विषय :— स्थायी समितीचा प्रस्ताव विचारात घेवून करांचे दर निश्चित करणे व सन २००९—२०१० चे अर्थसंकल्पीय अंदाज व सन २००८—२००९ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजास अंतिम स्वीकृती देणे .

प्रस्तावना :—

सन २००८—२००९ या अर्थसंकल्पीय अंदाजाप्रमाणे उत्पन्न रुपये ४३७.८५ कोटी अपेक्षित होत आणि खर्च रुपये ४३७.७३ कोटी अपेक्षित होता .अर्थसंकल्पीय अंदाजाप्रमाणे उत्पन्न झाले नाही त्यामूळे खर्चात कपात करणे आवश्यक असून सदर वर्षाकरिता आयुक्तांनी अर्थसंकल्पीय अंदाजात येणेप्रमाणे स्थायी समितीसमोर सुधारणा प्रस्तुत केलेली होती.

उत्पन्न : २०८.४१ कोटी
खर्च : २०८.३४ कोटी

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ च्या तरतुदीप्रमाणे आयुक्तांनी सन २००९—२०१० करिता उत्पन्न व खर्चाचे अंदाज तयार केले असून ते स्थायी समितीसमोर खालील प्रमाणे सादर केले होते .

उत्पन्न : ५५२.०९ कोटी
खर्च : ६१६.२६ कोटी

वित्तीय वर्ष २००९—२०१० चे अपेक्षित उत्पन्न व खर्च लक्षात घेता रहाणारी तुट रुपये ६४.१७ कोटी जकात मालमत्ता कर , पाणी पट्टी, टॅंकर भाडे व इतर फी च्या दरामध्ये वाढ करणेचा स्वतंत्र प्रस्ताव आयुक्तांनी पुस्तीकेच्या स्वरुपात स्थायी समितीपुढे सादर केला होता.

शिक्षण मंडळाचे सन २००८ — ०९ चे सुधारित अंदाज

शिक्षण मंडळाचे वर्ष २००८—२००९ चे शिक्षण मंडळाचे खालील प्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते .

| | | |
|---|---|---|
| अंदाजपत्रकीय उत्पन्न रुपये | : | १५,३६,६४,९२६/— |
| अंदाजपत्रकीय खर्च रुपये | : | १३,६५,४९,९२६/— |
| अखेरची शिल्लक रुपये | : | १,७१,१५,०००/— |

उपरोक्त अंदाजापोटी रक्कम रु. ६,७९,७२,७२४/— महापालिका हिस्सा म्हणून अदा करण्याची तरतूद करण्यात आली होती .

शिक्षण मंडळाचे सन २००९ — २०१० चे मूळ अंदाज :

प्राथमिक शिक्षण अधिनियम १९४७ मधील पार पाडावयाची कार्ये व कर्तव्य लक्षात घेता, उल्हासनगर महानगरपालिका शिक्षण मंडळातर्फे शिक्षण मंडळ ठराव क्रमांक : ३५ दिनांक ३०/८/२००८ अन्वये वर्ष २००९—२०१० साठी खालील प्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते.

| | | |
|---|---|---|
| अंदाजपत्रकीय उत्पन्न रुपये | : | १८,७९,७७,०००/— |
| अंदाजपत्रकीय खर्च रुपये | : | १८,७९,७७,०००/— |

उपरोक्त दर्शविलेल्या एकूण अंदाजात रुपये ५,२०,००,०००/— शासकीय अनुदान अपेक्षित असून उर्वरितव रक्कम रु. १२,११,६२,०००/— महापालिकेकडून महापालिका वर्गणी म्हणून तरतूद करण्यात आली होती.

शिक्षण मंडळाचे सन २००८—२००९ चे सुधारित व वर्ष २००९—२०१० चे मूळ अंदाजपत्रक , आयुक्तांचे महानगरपालिकेसाठी सन २००८—२००९ चे सुधारित अंदाजपत्रक व २००९—२०१० चे जमा व खर्चाचे अंदाज , कर व दर वाढीचे प्रस्ताव तसेच प्रशासनाकडून तपशिलवार माहिती घेवून अधिनियमाचे कलम ९६ नुसार स्थायी समितीने पुढील प्रमाणे अर्थसंकल्पीय अंदाज तयार केले आहे .

महानगरपालिकेचे सन २००८—२००९ चे सुधारित अंदाजपत्रक :

(आकडे हजारात)

| पान क्रमांक | उत्पन्न (आयुक्तांचे अंदाज) | २०८४०९३ | खर्च (आयुक्तांचे अंदाज) | २०८३३९६ | पान क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| २ | बांधकाम परवाने ,नकाशे , छाननी व प्रिमीयम | १२५५९ | रोजंदारी / मानधन इ. कर्मचारी खर्च | १११ | १० |
| ६ | नैसर्गिक आपत्ती अनुदान | २६२४२ | अधिका—यांना वाहन भत्ता | १०० | ११ |
| | | | प्रवास , जेवन व इतर भत्ते | १०० | ११ |
| | | | टेलिफोन बीले | १०० | १२ |
| | | | ऑफीस इलेक्ट्रीकल बिले | ३०० | १२ |
| | | | महिला व बाल कल्याण | ५०० | १५ |
| | | | धर्मदायी संस्थाना अनुदान | ६०० | १८ |
| | | | भाडे तत्वावरील वाहनांचा खर्च | १६०० | १९ |
| | | | एम.पी. फंडातून विकास कार्य | १ | २३ |
| | | | म्हाडा फंडातून विकास कार्य | १३०० | २३ |
| | | | दुरध्वनी व वीज जोडणी अनामत रक्कम | ८१ | २५ |
| | | | बुस्टर मशिनरी चालवणे खर्च | १७५० | ३५ |
| | | | ड्रेनेज पंप प्लांट, ड्रेनेज पंप स्टेशन व अन्य मल नि:सारण इमारती विदयूत व टेलिफोन बीले . | १०० | ३५ |
| | | | दुर्बल घटक वसाहतीत शौचालय, मुता—या, नाले , गटार व कल्व्हर्ट इत्यादी खर्च | ५०० | ३६ |
| | | | पाणी पुरवठा इमारती विदयूत व टेलिफोन बीले | ३१०० | ३५ |
| | | | कुत्रयाच्या दंशावर औषधोपचार खर्च | ३०० | १४ |
| | | | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा खर्च (प्र.—१) | १०० | १७ |
| | | | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा खर्च (प्र.—३) | १७०० | १७ |
| | | | भुयारी गटार जोडणी साहित्य खरेदी व बसविणे . | २०० | ३९ |
| | | | एम.एम.आर.डी.ए. कर्ज परतफेड | १ | २४ |
| | | | टेलिफोन व वीज जोडणी अनामत रक्कम | ५ | ४१ |
| | | | सार्वजनिक शौचालय व मुता—या बांधणे | १० | ४० |
| | | | नैसर्गिक आपत्ती अनुदानातून विकास | २६२४२ | २४ |
| | एकूण | २१२२८९४ | एकूण | २१२२१९७ | |
| | | | अखेरची शिल्लक | ६९७ | |

## महानगरपालिकेचे सन २००९—२०१० चे मूळ अंदाजपत्रक :

(आकडे हजारात)

| पान क्रमांक | उत्पन्न (आयुक्तांचे अंदाज) | ५५२०८७३ | खर्च (आयुक्तांचे अंदाज) | ६१६२५५२ | पान क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | सर्व साधारण कर | ११५००० | शिक्षण कर | ३७५०० | २५ |
| ०१ | महापालिका शिक्षण कर | २२५०० | रोजगार हमी कर | ५००० | २५ |
| ०१ | वृक्ष कर | २५०० | महापौर निधी | ५००० | २२ |
| ०१ | पथ कर | २७५०० | उप महापौर निधी | २५०० | २२ |
| ०७ | शिक्षण कर | ३७५०० | स्थायी समिती सभापती निधी | २५०० | २२ |
| ०७ | रोजगार हमी कर | ५००० | विकास अधिभार शुल्कातून विकास कार्य | ७५०० | २३ |
| २९ | पाणी पुरवठा लाभ कर | १२५०० | एम.आय.डी.सी. | —१०००० | ३४ |
| २९ | मलप्रवाह सुविधा लाभ कर | ५००० | पावर पंप व पा.पु. साहित्य खरेदी व बसविणे | —५००० | ३९ |
| २९ | मलप्रवाह कर | २२५०० | पावर पंप व पा.पु. साहित्य खरेदी व बसविणे (दुर्बल घटक) | —२५०० | ३९ |
| | | | नगरसेवक प्रशिक्षण व प्रवास खर्च | १०० | १८ |
| २९ | पाणी पुरवठा वसुली (कर) | १७५००० | बांधकाम साहित्य खरेदी | ३०० | १६ |
| २९ | पाणी पुरवठा वसुली (पा.पु.) | १९५००० | बुस्टर मशिनरी चालविणे खर्च | —२५०० | ३५ |
| ३० | बांधकाम परवाना व प्रिमियम फी | ८५००० | मॅकेनिकल स्वीपिंग | ७५०० | १४ |
| ०५ | महापालिका मालमत्ता विनियोग | ११४००० | नवीन रस्ते | —१५००० | २२ |
| ०१ | जकात वसुली | —१७०२२ | वाहने व यंत्र खरेदी | ७५०० | ३९ |
| | | | नगरसेवकांना मानधन व इतर भत्ते (अ अंदाजपत्रक) | ४३३२ | १९ |
| | | | नगरसेवकांना मानधन व इतर भत्ते (क अंदाजपत्रक) | १५०० | १९ |
| | | | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (प्र.१) | ९००० | १७ |
| | | | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (प्र.१)(दु. घटक) | १०००० | १७ |
| | | | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (प्र.२) | १०००० | १७ |
| | | | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (प्र.२)(दु. घटक) | ९००० | १७ |
| | | | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (प्र.३) | १०००० | १७ |
| | | | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (प्र.३)(दु. घटक) | ९००० | १७ |
| | | | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (प्र.४) | १२००० | १८ |
| | | | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सेवा (प्र.४)(दु. घटक) | ७००० | १८ |
| | | | प्रभाग क्षेत्रात पा.पु.व मलनि:सारण सेवा (प्र. १) | १८०० | ३७ |
| | | | प्रभाग क्षेत्रात पा.पु.व मलनि:सारण सेवा (प्र. १) (दुर्बल घटक) | २००० | ३७ |
| | | | प्रभाग क्षेत्रात पा.पु.व मलनि:सारण सेवा (प्र. २) | १८०० | ३७ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | प्रभाग क्षेत्रात पा.पु.व मलनि:सारण सेवा (प्र. २) (दुर्बल घटक) | २००० | ३७ |
| | | | प्रभाग क्षेत्रात पा.पु.व मलनि:सारण सेवा (प्र. ३) | १८०० | ३७ |
| | | | प्रभाग क्षेत्रात पा.पु.व मलनि:सारण सेवा (प्र. ३) (दुर्बल घटक) | २००० | ३७ |
| | | | प्रभाग क्षेत्रात पा.पु.व मलनि:सारण सेवा (प्र. ४) | २४०० | ३७ |
| | | | प्रभाग क्षेत्रात पा.पु.व मलनि:सारण सेवा (प्र. ४) (दुर्बल घटक) | १४०० | ३७ |
| | | | प्रभाग क्र. ६,१३,१७,१९,२१,२६,२७, २८,३४,३८,४६,५०,५३,६०,६४, ६६ व ७६मध्ये रस्ते व पायाभूत सुविधा | १७००० | २२ |
| | | | प्रभाग क्र ७६ मध्ये रस्ते व पायभूत सुविधा | १५०० | २२ |
| | | | सार्वजनिक नाला व गटार बांधणे | २००० | ४० |
| | | | सपना गार्डन संवर्धन | १५०० | १५ |
| | | | उद्याने दुरूस्ती | —१००० | १५ |
| | | | दशरा, गोलमैदान, रोटरी व मनपा (मु.) उद्याने संवर्धन | ५०० | १५ |
| | | | अग्निशमन साहित्य | १००० | २० |
| | | | सभागृह बांधकाम | ८१०० | २१ |
| | | | नगरसेवक निधी (सामान्य) | —४६०० | २३ |
| | | | नगरसेवक निधी (दु. घटक) | —३५०० | २३ |
| | एकूण | ६३२२८५१ | एकूण | ६३२२४८४ | |
| | | | अखेरची शिल्लक | ३६७ | |

<u>शिक्षण मंडळाचे सन २००९—२०१० चे मूळ अंदाजपत्रक :</u>

अंदाजपत्रकीय उत्पन्न रुपये : १७,४५,१२,००० /—
अंदाजपत्रकीय खर्च रुपये : १४,२५,८२,०००/—
अखेरची शिल्लक रुपये : ३,१९,३०,०००/—

उपरोक्त खर्चापोटी महापालिकेच्या हिस्सा म्हणून रुपये ७,८७,०७,०००/— अनुदान , व शासकिय अनुदान म्हणून रक्कम रु. ६,३८,७५,०००/— मंजूर करण्यास शिफारस करण्यात आली आहे.

<u>शिक्षण मंडळाचे सन २००८ — ०९ चे सुधारित अंदाज</u> :

अंदाजपत्रकीय उत्पन्न रुपये : १५,३६,६४,९२६/—
अंदाजपत्रकीय खर्च रुपये : १३,६५,४९,९२६/—
अखेरची शिल्लक रुपये : १,७१,१५,०००/—

उपरोक्त अंदाजापोटी रक्कम रु. ६,७९,७२,७२४/— महापालिका हिस्सा म्हणून मंजूर करणेस शिफारस केली आहे.

## <u>विविध कर व दराचा प्रस्ताव</u> :

१) जकात दर :—— शहरात आयात होणा—या जकात पात्र मालाच्या खालील गटात फेरफार करण्यास शिफारस करण्यात आली आहे.

| वस्तु गट क्रमांक | वस्तुचे नाव | किमान दर (%) | कमाल दर (%) | प्रचलीत दर (%) | प्रशासनामार्फत प्रस्तावीत दर (%) | मंजूर दर | वार्षिक वसुली | वार्षिक वाढ/घट | अभिकर्त्याच्या कालावधीत वाढ किंवा घट (९/४/०९ ते १८/१/२०१० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ अे | साखर व गुळ इ. | ०.५० | ४.०० | १.२५ | ४.०० | ०.५० | ८३१७२६७ | — ४९९०३६० | — ४००५९६० |
| ३८ सी | गॅस (एलपीजी) | ०.५० | ४.०० | ४.०० | ४.०० | ०.५० | १६४४८३६९ | — १४३९२३२३ | — ११५५३२८९ |
| ३८ डी | रॉकेल | ०.५० | ४.०० | २.५० | २.५० | ०.५० | ६९६७६६ | — ५५७४१३ | — ४४७४५७ |
| ११ | चहा व कॉफी इ. | ०.५० | २.०० | १.५० | १.५० | ०.५० | १८९७२५५ | — १२६४८३७ | — १०१५३३५ |
| एकूण | | | | | | | | | — १७०२२०४१ |

दिनांक १८ जानेवारी २००९ पासून एक वर्षाच्या कालावधीसाठी जकात वसुलीकरिता खाजगी अभिकर्त्याची नेमणूक करण्यात आली आहे .फेरबदलामूळे होणारी घट जकात अभिकर्त्याकडून अपेक्षित रक्कमेतून कमी करण्यात यावी असे प्रस्तावीत करण्यात आले आहे .

२) पाणी टॅंकर भाडे : प्रस्तावीत आकारणी मान्य करण्यास शिफारस करण्यात आली आहे .

३) मालमत्ता कर : प्रस्तावीत कर आकारणी मान्य करण्यास शिफारस करण्यात आली आहे.

४) पाणी पट्टी दर : प्रस्तावीत कर आकारणी मान्य करण्यास शिफारस करण्यात आली आहे.

५) अग्निशमन सेवा शुल्क : महाराष्ट्र आग प्रतिबंधक जीव संरक्षण उपाययोजना अधिनियम २००६ मधील तरतूदीनुसार शुल्क आकारण्यास शिफारस करण्यात आली आहे .

६) वर्ष २००७—२००८ मध्ये अर्थसहाय देवून पुरविण्यात येणा—या सेवाबाबतचा तपशिल विचारात घेवून हे अर्थसहाय महापालिकेच्या इतर उपलब्ध निधीतून कायम ठेवण्यास शिफारस करण्यात आली आहे

७) लेखा विवरण पत्र व कर्जाचा तपशिल इत्यादीची नोंद घेण्यात आली आहे .

महासभा ठराव क्रमांक : ५३ दिनांक १६/२/२००९

सुचकाचे नाव : श्री. रामसागर यादव

अनुमोदकाचे नाव : श्री. बी. बी. मोरे

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०० अन्वये आवश्यक असलेल्या गोष्टींच्या अधिन राहून स्थायी समितीने ठराव क्रमांक : ११७ दिनांक १२/२/२००९ अन्वये महानगरपालिकेस सादर केलेल्या सन २००९—२०१० च्या अर्थसंकल्पीय अंदाजास , सन २००८—२००९ च्या सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजास व इतर बाबींकरिता पुढील फेरफारांच्या अधिन राहून अंतिम स्वीकृती देत आहे.

विविध कर व दरांचा प्रस्ताव :

१. जकात दर : शहरात आयात होणा—या जकात पात्र मालाच्या ४ गटात स्थायी समितीने शिफारस केल्याप्रमाणे दरात घट करण्याचे मंजूर करीत आहे. दिनांक १८ जानेवारी २००९ पासून एक वर्षाच्या कालावधीसाठी जकात वसुलीकरिता खाजगी अभिकर्त्याची नेमणूक करण्यात आली आहे . फेरबदलामूळे होणारी घट जकात अभिकर्त्याकडून अपेक्षित रक्कमेतून कमी करण्यात यावी .

२) मालमत्ता कर , पाणी पुरवठा , टॅंकर भाडे इत्यादी दरामध्ये वाढ नामंजूर करीत आहे.

३) अग्निशमन सेवा शुल्क : महाराष्ट्र आग प्रतिबंधक जीव संरक्षण उपाययोजना अधिनियम २००६ लागू करण्यास व त्यातील तरतूदीनुसार
शुल्क आकारण्यास मंजुरी देत आहे .

**<u>महानगरपालिकेचे सन २००८—२००९ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाज</u> :**
स्थायी समितीच्या शिफारसी प्रमाणे सन २००८—२००९ करिता उत्पन्न रुपये २१२.२९ कोटी व खर्च रुपये २१२.२२ कोटी चा सुधारित अर्थसंकल्पीय अंदाज मंजूर करीत आहे .

## महानगरपालिकेचे सन २००९—२०१० चे मूळ अंदाजपत्रक :

स्थायी समितीने सन २००९—२०१० साठी शिफारस केलेल्या रुपये ६३२.२९ कोटीचे उत्पन्न व रुपये ६३२.२५ कोटी खर्चाच्या अर्थसंकल्पीय अंदाजास पुढील प्रमाणे फेरफारासह अंतिम स्वीकृती देत आहे .

(आकडे हजारात)

| पान क्रमांक | उत्पन्न स्थायी समिती अंदाज | ६३२२८५१ | खर्च | ६३२२४८४ | पान क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| | बांधकाम परवाना व प्रिमीयम इत्यादी फी. | +६२०० | प्रभाग क्रमांक : ६,१३,१७,१९,२१,२६,२७,२८, ३४,३८,४६,५०,५३,६०,६४,६६ व ७६ मध्ये पायाभूत सुविधा | —१७००० | २२ |
| | | | नवीन रस्ते | +१५००० | २२ |
| | | | नगरसेवक निधी | + ६६०० | २३ |
| | | | नगरसेवक निधी (दुर्बल घटक) | + ३५०० | २३ |
| | | | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सुविधा (प्रभाग —१) | —९०० | १७ |
| | | | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सुविधा (प्रभाग —१) (दुर्बल घटक) | —१००० | १७ |
| | | | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सुविधा (प्रभाग —२) | —१००० | १७ |
| | | | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सुविधा (प्रभाग —२) (दुर्बल घटक) | —९०० | १७ |
| | | | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सुविधा (प्रभाग —३) | —१००० | १८ |
| | | | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सुविधा (प्रभाग —३) (दुर्बल घटक) | —९०० | १८ |
| | | | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सुविधा (प्रभाग —४) | —१२०० | १८ |
| | | | प्रभाग क्षेत्रात मुलभूत सुविधा (प्रभाग —४) (दुर्बल घटक) | —७०० | १८ |
| | | | मनपा मुख्य इमारत (सभागृह बांधकाम) | —५०० | २२ |
| | | | दशहरा , गोल मैदान, रोटरी व मनपा उदयान संवर्धन | —२००० | १५ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | सपना गार्डन संवर्धन | —१५०० | १५ |
| | | | उदयाने दुरुस्ती | + ३५०० | १५ |
| | | | दलित वस्त्यात विकास कामासाठी महापालिका वर्गणी . | +१२०० | २४ |
| | | | सार्वजनिक शौचालय व मुता—या बांधणी | +२५०० | ४० |
| | | | दुर्बल घटक वसाहतीत सार्वजनिक शौचालय,मुता—या, नाले बनविणे इ. खर्च | +२५०० | ४० |
| | एकूण | ६३२९०५१ | एकूण | ६३२८६८४ | |

**शिक्षण मंडळाचे सन २००८—२००९ चे सुधारित व २००९—२०१० चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाज :**

महापालिका शिक्षण मंडळाचे सन २००८—२००९ चे सुधारित व २००९—२०१० चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाजास स्थायी समितीच्या शिफारशीप्रमाणे स्वीकृती देत आहे .

वरील सर्व बाबीच्या तरतूदींच्या प्रयोजनासाठी उक्त अंदाजपत्रक छापून प्रत्येक महापालिका सदस्यास त्याची प्रत पाठविण्याची व्यवस्था मुख्य लेखा अधिकारी करतील व छापील अंदाजपत्रक या ठरावाचा भाग मानले जाईल .

सुचकाची सही :

अनुमोदकाची सही :

**बहुमताने**

महापौर / पिठासन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—**कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ५.५५ वाजता महापौर श्रीमती निर्मले विद्या विजय यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— २०/२/००९

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २०/२/२००९ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.**

१४

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक २०/२/२००९ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती निर्मले विद्या विजय हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१ महापौर—— श्रीमती निर्मले विद्या विजय

२ उप—महापौर—— श्री. आयलानी कुमार उत्तमचंद

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | ३४ | श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा |
| ४ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | ३५ | श्रीमती वेलकर सुरेखा राजन |
| ५ | श्री. गायकवाड दिलीप | ३६ | श्री. लालबिहारी बुझारत यादव |
| ६ | श्रीमती संगीता राजेश कंडारे | ३७ | श्रीमती पंचशिला नाना पवार |
| ७ | श्री. रविंद्र दशरथ बागूल | ३८ | श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी |
| ८ | श्री. रामसागर जनार्दन यादव | ३९ | श्री. मंगतानी सुंदर आसनदास |
| ९ | श्रीमती निलम प्रेमसिंग रावत | ४० | श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण |
| १० | श्री. मोरे भानजी भिकारी | ४१ | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| ११ | श्री. दत्तात्रय नारायण पवार | ४२ | श्रीमती बोडारे वसुधा धनंजय |
| १२ | श्रीमती चौधरी राजश्री राजेंद्र | ४३ | कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल |
| १३ | श्री. विजय खंडु सुपाळे | ४४ | श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे |
| १४ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ४५ | श्री. शेखर केशव यादव |
| १५ | श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान | ४६ | श्रीमती सुमन गजानन शेळक |
| १६ | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज) | ४७ | श्री. किशोर जग्यासी |
| १७ | श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी | ४८ | श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी |
| १८ | श्रीमती सुजाता रमेश रिझवानी | ४९ | श्रीमती ज्योती शाम माने |
| १९ | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद | ५० | श्रीमती लता शांताराम निकम |
| २० | श्री. राम (चार्ली) पारवानी | ५१ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २१ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ५२ | श्री. ठाकूर विनोद लालसिंग |
| २२ | श्रीमती जया प्रकाश माखीजा | ५३ | श्री. बच्चाराम रूपचंदानी |
| २३ | डॉ. (श्रीमती) निना प्रकाश नाथानी | ५४ | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| २४ | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार (कुमारी)केवलराम | ५५ | श्रीमती वनवारी मोना अशोक |
| २५ | श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा | ५६ | श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई) |
| २६ | श्री. लाल पंजाबी | ५७ | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी |
| २७ | श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास | ५८ | श्री. मुकेश सोहन तेजी |
| २८ | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती | ५९ | श्री. पाटील प्रधान धर्मा |
| २९ | श्रीमती शकुंतला पाटील | ६० | श्री. सुनिल साहेबराव गंगवानी |
| ३० | श्री. मोहन (गारो) रामरख्यानी | ६१ | श्री. प्रकाश गणपत सावंत |
| ३१ | श्री. सुखरामानी महेश पहलाजराय | ६२ | श्री. नरेंद्र रामचंद्र राजानी |
| ३२ | ॲड. श्री. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी | ६३ | श्री. राजेश वधारिया |
| ३३ | श्री. ढोके जनार्दन किसनराव | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी, २. श्री. राजू जग्यासी, ३. श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी, ४. श्री. भठीजा (बब्बु) संजय, ५. श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे, ६. श्री.एडके गणपत गोविंद, ७. श्रीमती महाडीक रजनी मोहन, ८. श्रीमती करोतीया मालती राधाचरण, ९. श्री. सुरेश मधुकर जाधव, १०. श्री. प्रशांत किसनराव धांडे, ११. श्री. रमेश महादेव चव्हाण, १२. श्रीमती मनसुलकर शिला सुभाष, १३. श्रीमती चेनानी ज्योती रमेश, १४. श्री. गोविंदराम डोलुमल लुंड, १५. श्री. मोहन साधवाणी, १६. श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री), १७. श्रीमती मीना सोनेजी (सोंडे), १८. श्री. गोदुमल नारायणदास क्रिष्णानी

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१ श्री. अशोक रणखांब, अतिरिक्त आयुक्त
२ श्री. मिलींद सावंत, उप—आयुक्त
३ श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
४ श्री. दिपक सावंत, उप—आयुक्त
५ श्री. अनुदिप दिघे, मुख्य लेखा अधिकारी
६ श्री. अनंत कांबळे, प्र. मुख्य लेखा परिक्षक
७ श्री. एस.जी. खडताळे, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
८ श्री.आर.बी. शिर्के, प्र. शहर अभियंता
९ श्री.जी.टी. जिंदे, वैदयकीय आरोग्य अधिकारी
१० श्री. आर.बी.शिर्के, प्र. शहर अभियंता
११ डॉ. राजा रिझवानी, वैद्यकीय अधिकारी
१२ श्री. चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख
१३ श्री. व्ही.आर.गर्जे, प्र. सहा. आयुक्त
१४ श्री. रमेश काजळे, प्र. सहा. आयुक्त
१५ श्री. गंगारामानी, उप अभियंता, विदयुत

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्री. गणेश शिंपी
२. श्री. श्याम शिवनानी
३. श्री. तानाजी पतंगराव
४. श्रीमती नर्गिस खान

श्री. अशोककुमार रणखांब, अतिरिक्त आयुक्त आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.

सांयकाळी ४.३५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

प्रश्नोत्तरे.........

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u> सन्माननिय महापौरजी, सचिव साहेब, मागील वेळेस ९ जानेवारीला जी महासभा झाली होती, त्यावेळी सभेपुढे एक विषय होता तो पुढे ढकलण्यात आला होता व सांगण्यात आले होते की, पुढील २० तारखेच्या महासभेत तो घेण्यात येईल. परंतु आजच्या सभा सूचनेवर तो विषय नाही आहे. गोषवारा आलेला नाही त्यास जबाबदार कोण आहे? कोणाच्या चुकीने तो विषय सभा सूचनेवर आला नाही? विषय पुढील महासभेत आणायचे असे सांगायचे आणि प्रत्यक्षात पुढील महासभेत तो विषय आणायचा नाही हे काय चालले आहे?

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u>आपले माजी नगरसेवक श्री. दयाल शर्मा यांचे नुकतेच काही दिवसांपुर्वी निधन झाले आहे. त्यांना श्रध्दांजली दयायची आहे.

सदस्य श्री. हिरानंद जग्यासी हे सभागृहातुन बाहेर गेले. 

<u>महापालिका सचिव :—</u>कृपया मौन धारण करावे.

सुचकाचे नाव :— श्री. बच्चाराम रुपचंदानी

अनुमोदकाचे नाव :—श्री. जमनादास पुरस्वानी

शोक प्रस्ताव

उल्हासनगर नगरपालिकेचे माजी नगरसेवक श्री. दयाल छतलानी यांचे नुकतेच काही दिवसापुर्वी निधन झाले

श्री. दयाल छतलानी यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

महासभा ठराव क्र. ५३ अ                                        दिनांक:—२०/२/२००९

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्री. दयाल छतलानी यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—सचिव साहेब, तो विषय सभा सूचनेवर आला नाही त्यास जबाबदार कोण आहे?

महापालिका सचिव :—रोटरी क्लबचा विषय म्हणत आहात. रोटरी क्लबच्या विषयाबाबत बोलत आहात ना आपण? तो विषय मी मा. महापौरांच्या समोर ठेवला होता. सभा सूचना काढण्याबाबत जी एक समिती बसते त्या समितीने असा निर्णय घेतला की हा विषय पुढील महासभेत घेवु.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— ९ जानेवारीला सांगण्यात आले होते की, हा विषय २० फेब्रुवारीच्या महासभेत घेतला जाईल तरीही तो विषय या सभेच्या सभा सूचनेवर घेतलेला नाही. महासभेत जो निर्णय होतो त्याला काही महत्व आहे किंवा नाही? येथे सर्वसंमतीने निर्णय झाला की तो विषय २० फेब्रुवारीच्या महासभेत घेतला जाईल. त्यानंतर महापौरांच्या दालनात बसून वेगळा निर्णय घेतला जातो. यासाठी मी आपणांस विचारु इच्छितो की, दालनात घेतलेला निर्णय ग्राहय धरला जातो की, महासभेत घेतलेला निर्णय ग्रहय धरला जातो?

महापालिका सचिव :— आता सांयकाळचे ४ वाजुन ४० मिनिटे झाली आहेत.
प्रश्न क्र. १५७ हा श्री.बी.बी. मोरे यांचा आहे.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— साहेब, माझे मागील काही प्रश्न प्रलंबित आहे त्यांची उत्तरे देण्यासाठी श्री. शिर्के साहेबांना व्यासपीठावर बोलवा. रस्त्याच्या कामाबाबतीत यांनी ९ जानेवारी पासुन आज २० फेब्रुवारीपर्यंतच्या एक—दिड महिन्यामध्ये काय चौकशी केली आहे? ते सांगितले जावे.

श्री. आर.बी. शिर्के(प्र. शहर अभियंता):—सन्माननिय महापौरजी, सन्माननिय उप—महापौरजी, सन्माननिय आयुक्त साहेब व सर्व सदस्यगण, मा. श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचा जो १४० क्रमांकाचा जो प्रश्न आहे, त्याबद्दल मी

चौकशी केली आहे. त्या संदर्भात कार्यालयामध्ये जे दस्तऐवज उपलब्ध झाले आहे, त्यानुसार याबाबतीत जी कार्यवाही केली आहे ती तत्कालीन शहर अभियंता यांनी केली आहे. त्यांनी सन्माननिय सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांना पत्रही लिहिले आहे. व तत्कालीन उप–आयुक्त, मुख्यालय यांनी त्या प्रकरणी, आपला अहवालही दिलेला आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>सन्माननिय महापौरजी, माझा प्रश्न फक्त एवढाच आहे की, ते काम कोणी केले? कुणाच्याही खिश्यामध्ये सहा लाख रुपये असे पडलेले नाहीत की, ते खर्च करुन तो त्याबाबतीत कोणताही दावा न करता निघुन जाईल. यासाठी मला हे सांगितले जावे की हे काम केले कुणी? यांच्या अभियंत्यांचा अहवाल आहे की काम चालू आहे. प्रत्येक तारीखनिहाय त्यांचा अहवाल आहे. हे सर्व अहवाल असतांनाही एक महिनाभर चोरी चालू होती. ती चोरी कोण करत होते हे अदयाप आपणांस माहित नाही काय?

<u>श्री. आर.बी. शिर्के(प्र. शहर अभियंता):–</u>तत्कालीन जे शहर अभियंता व कार्यकारी अभियंता होते त्यांनी अहवाल सादर केला होता. त्या हिशोबाने त्या प्रकरणाची चौकशी झाली होती.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>त्या प्रकरणी तत्कालीन उपायुक्तांनी जी चौकशी केलेली आहे ती आपल्या दालनात बसुन केलेली आहे. श्री. चुन्नीलाल यांचे जबाब नोंदुन घेतले आहेत काय? त्याबाबतीत आपणांस मागील सभेतसुध्दा सांगण्यात आलेले होते. त्यावेळी आपण म्हटले होते की, पुढील महासभेत मी त्यांचा जबाब नोंदवुन घेईल. श्री. शितलानी व श्री. चुन्नी लालवानी यांचे जबाब नोंदुन घेतले आहे काय?

<u>श्री. आर.बी. शिर्के(प्र. शहर अभियंता):–</u>त्यांचे जबाब आहेत. त्यांनी जे अहवाल दिलेले आहेत त्यानुसार तत्कालीन शहर अभियंता यांनी कार्यवाही केलेली आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>काय कारवाई केली? महासभेस हे माहित झाले पाहिजे की विना वर्कऑडरने हे काम कसे चालु केले जाते? ज्या ठेकेदाराचे नाव आहे त्याचे नाव आपण घेत नाहीत कारण आपणांस कमिशन मिळते हे मी खुले बोलत आहे. हा माझा आपणावर आरोप आहे.

<u>श्री. आर.बी. शिर्के(प्र. शहर अभियंता):–</u> जयभारत कन्स्ट्रक्शनचे ते काम होते परंतु त्यांनी स्वत: लिहून दिले आहे की हे काम माझे नाही म्हणुन.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:–</u>त्यांनी लिहून दिले परंतु एक महिना काम चालु होते. मी उप प्रश्न विचारतो, जर एक महिना तेथे काम चालु होते लोकांना हे माहित नव्हते की, कोण काम करत आहे?

<u>श्री. आर.बी. शिर्के(प्र. शहर अभियंता):–</u>कार्यालयीन रेकॉर्डनुसार हे माहित पडत आहे की, ज्यावेळेस अहवाल पाठविला आहे त्यावेळेस हे काम बंद केले आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>काम तर पुर्ण झालेच ना? एक महिन्यात काम पुर्ण केले. एक महिना रोज पत्र पाठविले आहे, रोजचा अहवाल आहे. काम कोणी केले? आपण जयभारतवाल्याला वाचवत आहात काय?

<u>श्री. आर.बी. शिर्के(प्र. शहर अभियंता):–</u>त्यावेळेस शहर अभियंत्याने पत्र सुध्दा पाठविले आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u> त्यावेळेचे नाही मी आताचे बोलत आहे. त्यावेळचा खोटा रिपोर्ट आहे. एका महिन्यात काम तर पुर्ण केले आहे ना?

<u>श्री. आर.बी. शिर्के(प्र. शहर अभियंता):–</u> जे कागदपत्र आहेत, व जे संबंधीत आहेत त्यांच्याशी चौकशी केली तर.......

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u> आपण काय चौकशी केली त्याची प्रत दया. महासभेसमोर ठेवा की आपण काय चौकशी केली आहे ते? सर्व नगरसेवकांना त्याची प्रत दया. सध्या आपण वाचुन दाखवा प्रत नंतर दया.

**श्री. आर.बी. शिर्के(प्र. शहर अभियंता):—** मौखिक चौकशी करण्यात आली होती.

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—** मौखिकपणे कुठलीही चौकशी होत नसते. जी काही चौकशी होते ती लेखी होते. त्यासाठीच आपणांस दोन तीन महिन्याची वेळ देण्यात आली होती. हा काही काळु बाळुचा तमाशा नाही की आम्ही येतो, नाचतो आणि आपण पाहून निघुन जाता.

**श्री. आर.बी. शिर्के(प्र. शहर अभियंता):—** लेखी चौकशी करण्यासाठी मला काही आदेश नव्हते.

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—** चौकशी करुन आपण दोन महिन्यात उत्तर दया. सन्माननिय महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, जरा पहा काय करायचे यांचे? हे काम जयभारतवाल्याने केले आहे. कार्यादेश नसतांनाही काम केले आहे आणि अतिशय निष्कृष्ट प्रतिचे काम केले आहे. अशा ठेकेदारास काळया यादीमध्ये टाकले पाहिजे. त्याने आणखी बरीच काही कामे केलेली आहेत. त्याला वाचविण्यासाठी चौकशी अहवाल यांनी डब्यात टाकला आहे. परंतु समोर जे काही दिसत आहे ते सुध्दा हे झाकण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यास वाचविण्याचा प्रयत्न करत आहेत. त्याचे कारण काय? सन्माननिय महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, तीन मुद्दयांवर मला उत्तर पाहिजे. एकतर हे काम कोणी केले? जे प्राकलन मंजुर झाले होते त्याचे काय झाले? त्याबाबत कार्यादेश निघाला किंवा नाही निघाला?

**श्री. आर.बी. शिर्के(प्र. शहर अभियंता):—** या कामाचे कार्यादेश निघालेले नाही. निविदाच मंजुर झालेली नाही. व ज्यास ही निविदा देण्यात आली होती, ज्याच्या नावाने ही निविदा काढण्यात येणार होती, त्याने लिहून दिले आहे की, मी हे काम केलेले नाही. आणि त्यामुळे त्यास कार्यादेश देण्याचा किंवा देयक अदा करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—** या सर्व कार्यवाही झाल्यानंतर सुध्दा स्थायी समितीमध्ये हे काम मंजुर झाले आहे.

**श्री. आर.बी. शिर्के(प्र. शहर अभियंता):—** मंजुर झालेले नाही.

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—** मंजुर झालेले नाही? हे आपण जबाबदारीने सांगत आहात? मी आपणांस स्थायी समितीचा ठराव आणुन देतो.

**श्री. आर.बी. शिर्के(प्र. शहर अभियंता):—** हे काम मंजुर केलेले नाही. पुढे ढकलण्यात आलेले आहे.

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—** ठिक आहे, काम पुढे ढकलले आहे. जर हे काम जयभारत वाल्याने केलेले नाही तर कुणी केले?

**श्री. आर.बी. शिर्के(प्र. शहर अभियंता):—** कार्यालयीन दस्तऐवजावरील नोंदीनुसार मला माहित नाही. हे काम जुने आहे.

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—** तुम्हांला माहित नाही तर मग कुणाला माहित आहे?

**श्री. आर.बी. शिर्के(प्र. शहर अभियंता):—** त्यावेळेस जे शहर अभियंता व कार्यकारी अभियंता होते ते आता येथे कार्यरत नाहीत. व जी चौकशी केली होती ती तत्कालीन उप—आयुक्त, मुख्यालय यांनी केली होती. त्या चौकशीत त्यांनी काही शिफारसी सुध्दा केल्या होत्या. त्या पाहिजेत तर मी वाचुन दाखवितो.

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—** त्यांनी चौकशी करुन जो अहवाल दिलेला आहे त्यामध्ये शेवटी शेवटी जे लिहिले आहे ते या गैर लोकांना मारण्यासाठी लिहिलेले आहे.

**श्री. आर.बी. शिर्के(प्र. शहर अभियंता):—** सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येणा—या विविध विकास कामांमध्ये वापरण्यात येणा—या बांधकाम साहित्यामध्ये गुणवत्ता तपासण्यासाठी कायम स्वरुपी शास्त्रीय कार्यपध्दती अंमलात आणावी. आम्ही शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभागाची जी लॅब्रोटरी आहे त्यांच्याकडुन अहवाल घेतो. प्रत्येक कामाची देयक रक्कम ही लॅब्रोटरीच्या अहवालानंतरच आम्ही अदा

करतो. व दुसरे असे की, या संबंधीत कर्मचारी, कनिष्ठ अभियंता श्री. महेश सितलानी व रोड मुकादम श्री. चुन्नीलाल लालवानी यांनी हलगर्जीपणा केला असल्याने तसेच सदर बाब गंभीरपणे घेण्याचे दिसुन येत नाही. सबब त्यांना ताकिद देण्यात यावी.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— ताकिद कशाला यांना निलंबित करा. आयुक्त साहेब, माझी अशी मागणी आहे की, श्री. सितलानी आणि चुन्नी लालवानी यांनी जर चुकीचा अहवाल दिला असेल तर त्यांना निलंबित करावे. त्यांना निलंबीत केल्यानंतर सत्यस्थिती काय आहे ती आपोआपच पुढे येईल. यासाठी या दोन्ही कर्मचा—यांना निलंबित केले जावे.

श्री. आर.बी. शिर्के(प्र. शहर अभियंता):— ताकिद देण्याची शिफारस केलेली आहे.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :— जर या लोकांनी हलगर्जीपणा केलेला आहे तर या दोघांना निलंबित केले जावे. त्यांना निलंबित करुन चौकशी केली तर वस्तुस्थिती समोर येईल. आणि काम कोणी केले आहे ते स्पष्ट होईल व ते स्वत: तसे सांगतील, प्रतिज्ञापत्र लिहून देतील की, अमुक या माणसाने काम केले आहे.

श्री. अशोककुमार रणखांब(अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):— श्री. शिर्के, प्रत्येक महासभेत हा प्रश्न उपस्थित होतो आणि त्याबाबतीत तुम्ही काही सविस्तर उत्तर देत नाहीत. आता यापुढे मी तुम्हांला आणखी निर्देश देतो की, जी काही चौकशी करायची ती कागदोपत्री चौकशी करा. परंत एक चौकशीचा अंतिम अहवाल पुढच्या महासभेत दयावा आणि जर दिला नाही तर त्याची जबाबदारी आपणावर राहिल.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—नगररचनाकार नाहीत काय? त्यांच्याशी संबंधीत एक प्रश्न आहे.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी:—माझाही एक प्रश्न क्र १४५ प्रलंबित आहे. त्यामध्ये अर्थसंकल्पीय तरतुद १ कोटी रुपये दर्शविली आहे. खर्च १ कोटी २० लाख झालेला आहे. २० लाख खर्च जादा झालेला आहे.

श्री. आर.बी. शिर्के(प्र. शहर अभियंता):— खर्च १ कोटी २० लाख झालेला आहे, हे बरोबर आहे. परंतु तरतुद जी आहे ती दोन कोटी असले पाहिजे. २ कोटीच्या ठिकाणी चुकीने एक कोटी असे टंकलेखित झाले आहे.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— कुणी टंकलेखित केले? एवढया सदस्यांकडे त्याची प्रत गेली? ते कुणाच्याही निदर्शनास आले नाही. मागील सभेत दोन वेळा याबाबतीत मी विचारणा केली आहे. त्यावेळेस का नाही सांगण्यात आले की, २ कोटी तरतुद आहे म्हणुन? लेखा विभागातील अधिका—यांना याबाबतीत विचारणा केली जावी.

श्री. आर.बी. शिर्के(प्र. शहर अभियंता):— मागील महासभेनंतर मी याबाबतची छाननी केली आहे.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— लेखा विभागाचे अधिकारी येथे बसलेले आहेत, त्यांनी सांगावे अर्थसंकल्पाच्या कोणत्या पुष्ठावर याबाबतची नोंद आलेली आहे.

श्री. आर.बी. शिर्के(प्र. शहर अभियंता):— २००७—०८ मध्ये २ कोटीची तरतुद होती.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— लेखा विभागाच्या अधिका—यांना तसे प्रमाणित करु दया ना? रस्त्यांवरील खड्डे भरण्यासाठी २ कोटीची तरतुद होती की १ कोटीची तरतुद होती? २ कोटीचे १ कोटी कसे लिहिले? एवढी मोठी चुक कशी केली?

महापालिका सचिव:—प्रश्न क्र. १५७ हा श्री.बी.बी. मोरे यांचा आहे.

**?** **प्रश्न क्र. १५७ :—** सध्या पालिका क्षेत्रात भटक्या कुत्र्यांची संख्या दिवसागणित वाढत असून त्याचा त्रास शहर वासियांना होत असल्याच्या अनेक तक्रारी माझ्याकडे दैनंदिनी प्राप्त होण्याच्या घटना वाढत आहेत. शहरातील अबालवृध्द तसेच लहान थोर अशा सर्वत्र थरातील व्यक्तींना या भटक्या कुत्र्यांच्या वावराचा त्रास सहन करावा लागत आहे. ही कृत्री समुहा समुहाने रस्त्यावर तसेच रस्त्यांच्या आजुबाजुला वास्तव करुन राहत असुन रात्री अपरात्री पादचा—यांवर हल्ला करुन आपले भक्ष्य ठरवतात. श्वान दंशावर वेळीच उपचार न केल्याने जीवावर बेतण्याची पाळी नागरीकांवर येत आहे.

सदर सुचनेचा गांभिरपुर्वक विचार करुन पालिका महासभेत चर्चा होवून त्याबाबत त्वरीत निर्णय घेवुन संबंधीत विभाग प्रमुखांना श्वान बंदोबस्ताबाबत तात्काळ आदेश व्हावेत.

**उत्तर :—** आरोग्य विभागाने जानेवारी, २००८ मध्ये श्वान निर्बिजीकरण एकूण ४०० श्वानांच्या शस्त्रक्रिया करण्याची निविदा काढलेली होती. परंतु प्राप्त निविदाकार निविदेतील अटी व शर्ती पूर्ण करत नसल्यामुळे निविदा रद्द करण्यात आली. माहे फेब्रुवारी, २००८ मध्ये पुन्हा नविन श्वान निर्बिजीकरण निविदा काढण्यात आली होती. परंतु विहित मुदतीत एकही निविदा या कार्यालयास प्राप्त झालेली नाही. तद्नंतर माहे मार्च, २००८ मध्ये पुन्हा सदर निविदा मागविण्यात आली परंतु एकाही निविदाकाराने निविदा भरलेली नाही. त्यामुळे सन २००८—०९ करीता अंदाजपत्रक मंजुर झाल्यानंतर पुन्हा माहे जुन, २००८ श्वान निर्बिजीकरण एकूण १६०० श्वानांच्या निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करण्याची निविदा काढण्यात आली होती. सदर निविदा दिनांक १९/९/२००८ ते ६/१०/२००८ रोजी पर्यंत विक्रीस होती. त्याची निविदा सूचना दिनांक १९/९/२००८ रोजी दै. सामना, दै. हमारा महानगर व दै. धनुष्यधारी या वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आलेली होती. कुठल्याही निविदाकाराने निविदा खरेदी केलेली नाही. त्यामुळे पुर्ननिविदा काढण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच २००० व्हॉयल्स रेबीस लस खरेदी करण्याचा मे. मॅकविस फार्मा यांचेशी करारनामा करण्याची प्रक्रिया सुरु आहे. करारनामा झाल्यानंतर त्यानां रेबीस लस पुरविण्याचा कार्यादेश देण्यात येईल.

**सदस्य श्री. बी.बी. मोरे :—** सन्माननिय महापौरजी, आयुक्त साहेब, हा जो प्रश्न विचारलेला आहे, तो उल्हासनगर शहरातील भटक्या कृत्र्यांबाबत आहे. कृत्र्यांची जास्त वाढ झालेली आहे असून समुहाने १०—१०, २०—२० कृत्रे टोळक्याने, त्यामध्ये काही रोगी कुत्रे असतात, ही कुत्रे रस्त्याने जाणा—या येणा—या माणसास किंवा स्त्रीयांवर नकळत हल्ला करतात, चावा घेतात. नंतर आपल्या येथिल जे गर्व्हमेंटचे हॉस्पीटल आहे, मध्यवर्ती रुग्णालय येथे इंजेक्शन उपलब्ध नसल्याने तर त्या माणसाला खाजगी रुग्णालयात उपचार करुन घ्यावे लागतात. तर माझ्या माहितीप्रमाणे त्यास ३००० रुपयाचे इंजेक्शन घेवुन आपल्यावर उपचार करुन घ्यावे लागतात. सर्व सामान्य गरीब माणसाला ३००० पर्यंतचे इंजेक्शन परवडणारे सारखे नाही. आणि महापालिकेतर्फे तशी व्यवस्था करण्यात आलेली नाही. आपल्या महापालिकेतर्फे याबाबत काय व्यवस्था करण्यात आलेली आहे? कारण सदरची व्यवस्था करणे अतिशय महत्वाचे आहे. कारण महापालिकेत याबाबत ब—याचशा तक्रारीं व अर्ज आलेले आहेत की, सदर भटक्या कुत्र्यांचा महापालिकेतर्फे बंदोबस्त करण्यात यावा. आपल्या महापालिकेतर्फे त्वरीत भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यात यावा व योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. असा माझा प्रश्न आहे.

**डॉ.जी.टी.जिंदे (वैदयकीय आरोग्य अधिकारी):—**सन्माननिय महापौर अथवा पिठासीन अधिकारी :— महोदया, सन्माननिय उप—महापौर, सन्माननिय आयुक्त साहेब, सन्माननिय विरोधी पक्ष नेता श्री.बी.बी. मोरे साहेब, या प्रश्नांसंदर्भात मध्यवर्ती रुग्णालयात २००० अॅन्टी रेबीज व्हॅक्सीनची जी मागणी आली होती ती आम्ही त्यांना सुपुर्द केलेली आहे. २००० कुप्याची आम्ही खरेदी केली आहे. त्यापैकी १००० कुप्या मध्यवर्ती रुग्णालयात देण्यात आल्या. ३०० कुप्या या प्रसृती रुग्णालयात देण्यात आल्या. आणि महापालिकेच्या दवाखान्यात व ६ नागरी आरोग्य केंद्रांना प्रत्येकी १०० कुप्या देण्यात आल्या. अशा प्रकारे आम्ही वितरीत केल्या आहेत. आणि याबाबतची माहिती जनसंपर्क कार्यालयास पुरविण्यात आलेली आहे. आताच आपण म्हटले की, मध्यवर्ती रुग्णालयात कुप्या उपलब्ध नसतात त्या अनुषंगाने परवाच मी मध्यवर्ती रुग्णालयातील सिव्हील सर्जनशी चर्चा केली, त्यावेळी त्यांनी असे निदर्शनास आणले की, आपणांस शासनाचा जो पुरवठा आहे तो उल्हासनगरची लोकसंख्या आणि कार्यक्षेत्र नजरेसमोर ठेवून दिला जातो. परंतु श्री. मोरे साहेबांनी सांगितल्याप्रमाणे श्वान दंशावरील डोस खाजगी रुग्णालयांमध्ये खुप महाग दिला जातो. ५ इंजेक्शनचा डोस जवळ जवळ दिड हजार रुपयापर्यंत जातो. उल्हासनगरच्या मध्यवर्ती रुग्णालयामध्ये कसा—यापासुन कर्जतपर्यंतचे आणि कल्याण पासुन मुलुंडपर्यंतचे रुग्ण येतात. आणि रुग्णालयात आलेला रुग्ण हा महापालिका कार्यक्षेत्रातील नाही असे म्हणुन आम्ही नाकारत नाही. म्हणुन आमच्याकडे असलेला साठा फार

लवकर संपतो. त्यांच्या मागणीप्रमाणे आम्ही २००० कुप्याची खरेदी केलेली आहे. त्याना सांगण्यात आलेले आहे की, पुन्हा आपण मागणी केल्यास आमच्या कडील उपलब्ध अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार आम्ही कुप्या पुन्हा खरेदी करु आणि त्यानुसार त्यांची मागणी येत आहे. आणि दुसरी जी बाब आहे जी आहे ती अशी आहे की, कुत्र्यांचे निर्बीजीकरण करणे आवश्यक आहे. याबाबतीत आम्ही जानेवारी २००८ रोजी ४०० श्वानांच्या शस्त्रक्रिया करण्याची निविदा काढलेली होती. परंतु प्राप्त निविदाकारांपैकी कुठल्याही अटी मान्य केल्यानसल्यामुळे ती रद्द करण्यात आली. तद्नंतर आम्ही माहे फेब्रुवारी, २००८ मध्ये आम्ही श्वान निर्बिजीकरणाची निविदा काढली परंतु कुणीही त्यासाठी कोरी निविदा खरेदी केली नाही. तद्नंतर माहे मार्च २००८ मध्ये पुन्हा निविदा काढण्यात आली तेव्हा सुध्दा कोणत्याही निविदाकाराने निविदा भरलेली नाही. त्यानंतर माहे जुन मध्ये आम्ही नविन अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार १६०० श्वानांच्या निर्बिजीकरण शस्त्रक्रियेसाठी पुन्हा निविदा काढली. सदर निविदा १९/९/२००८ ते ६/१०/२००८ विक्रीस ठेवली होती. सदरहु निविदा ही मान्यवर वर्तमानपत्र दैनिक सामना, दैनिक हमारा महानगर, दैनिक धनुष्यधारी यामध्ये आम्ही प्रसिध्द केली. तरी कुठल्याही निविदाकाराने सदरहु निविदा भरली नाही. आम्ही आमच्या विभागतर्फे प्रस्ताव ठेवला होता की, २००५–०६ मध्ये अंबरनाथच्या एका संस्थेन निर्बिजीकरणाची शस्त्रक्रिया केली होती. त्याच दराने, त्याच अटीने आता सुध्दा त्यांची करण्याची तयारी होती तशा प्रकारचे पत्र आम्हांस त्यांच्याकडुन प्राप्त झाले होते. तसा आम्ही प्रस्ताव केला होता त्या प्रस्तावास आम्हांस मान्यता मिळाली नाही. अशा प्रकारची कार्यवाही आम्ही आतापर्यंत केलेली आहे.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>डॉ. साहेब, मला एक म्हणायचे आहे, तुम्ही जेवढे वाचन केले तेवढे सांगितले आम्ही देखिल हे मान्य करतो. तुम्ही एवढे जे वाचन केले आहे त्याप्रमाणे जर केले असते तर भटक्या कुत्र्यांचा नायनाट झाला असता. परंतु त्याप्रमाणे केले नाही. तुम्ही याबाबत मागणी केली त्याप्रमाणे शासनाने त्यास मान्यता दिलेली नाही, हे सर्व कागदोपत्री होत आहे. परंतु प्रत्यक्षात जे प्रतिज्ञा करायची आहे ती प्रतिज्ञा होत नाही आहे, या महापालिकेतर्फे केली जात नाही आहे, आणि त्यामुळे दिवसेंदिवस कुत्र्यांच्या संख्येत वाढ होत चालली आहे. चांगल्या माणसाला उदया शहरात फिरणे जमणार नाही. मुंबई शहरात उंदिर पकडण्यासाठी जसा रोजगार मिळतो तसा या महापालिकेस जर जमत नसेल तर मुंबई शहराप्रमाणे कुत्रे पकडण्यासाठी माणुस नेमावा व तशा पध्दतीप्रमाणे एक माणुस एक कुत्रा पकडण्यासाठी काय रोजगार दयावा ते महापालिकेने ठरवावे. अशा पध्दतीने काम केले तर खरोखरच कुत्र्यांचा खरोखरच नायनाट होवु शकेल. परंतु तुमच्या या कागदोपत्री भाषेने आम्हांस एवढे दयायचे होते ते आम्ही दिले यावर काही एक होणार नाही. म्हणुन मी सभागृहा समोर सांगत आहे, जर मुंबई सारखी योजना जर तुम्ही स्विकारली तर काही तरी होईल, तरच कुत्र्यांचा बंदोबस्त होईल. परंतु जी कावरलेली कुत्री असतात ती जर चावली तर त्या माणसाला ३००० चे इंजेक्शन लवकर मिळत नाही. मग तो मनुष्य नगरसेवकाकडे मदतीसाठी येतो आणि म्हणतो की काय साहेब तुम्ही महानगरपालिकेत आहात, आणि महापालिकेत असतांना तुम्ही ही व्यवस्था करत नाहीत? तर तुम्ही इंजेक्शनसाठी पैसे दया. असा हा प्रकार वाढतच चालला आहे आणि म्हणुन आम्ही सभागृहाला विनंती करतो की, महापालिकेतर्फे याची कडक उपाययोजना झाली पाहिजे. जेणेकरुन त्या कुत्र्याचा नायनाट होवु शकेल.

<u>महापालिका सचिव :–</u> प्रश्न क्र. १५८ हा श्री. हिरानंद जग्यासी यांचा असून ते या सभागृहात उपस्थित नाहीत त्यामुळे फक्त त्यांच्या प्रश्नोत्तराची इतिवृत्तात नोंद घेण्यात येत आहे.

**?** <u>प्रश्न क्र. १५८ :–</u> साई वसणशाह दरबार समोरील बांधकामासंदर्भात रुम नं. १, बॅ.नं. २०७०, उल्हासनगर–५ या जागेवरील दिलेली बांधकाम परवानगी रद्द करणेबाबत या विषया संदर्भात नगरविकास विभागाचे पत्र उल्हासनगर महानगरपालिकेस प्राप्त झालेले आहे काय?

अ) सदर बांधकाम संदर्भातील मा. राज्यमंत्री, नगरविकास यांना तक्रारदाराने लिहिलेल्या पत्राच्या अनुषंगाने महानगरपालिकेचा अहवाल भाग नकाशासह शासनास सादर कण्यास सांगण्यात आले आहे काय?

ब) सदर अहवाल महानगरपालिकेने शासनास सादर केलेला आहे काय?

क) असल्यास कृप्या महासभेसमोर प्रत उपलब्ध करावी.

<u>उत्तर :–</u> होय

होय.

सदरचा अहवाल शासनास पाठविण्यात आलेला आहे.

शासनास पाठविलेली अहवालाची प्रत महासभेसमोर उपलबध करण्यात येईल.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी:—</u> कुकरेजा साहेब, दोन मिनिटं, श्री. इदनानी साहेब आलेत.

<u>श्री. हरेश इदनानी (प्र. मुख्य लेखा अधिकारी):—</u>मा. महापौरजी, रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी वर्ष २००७—०८ साठी २ कोटीची तरतुद आहे.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u>जे प्रश्न दिले जातात त्याबाबत लेखा विभागातुन पडताळणी केली जात नाही काय?

<u>श्री. हरेश इदनानी (प्र. मुख्य लेखा अधिकारी):—</u>नाही, ज्या विभागाशी प्रश्न आहे त्या विभागातुनच उत्तर दिले जाते.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी:—</u>जर २ कोटीची तरतुद आहे तर विभागाकडुन १ कोटीची तरतुद कशी लिहिली गेली? किती मोठी चुक आहे? १ कोटीचे २ कोटी कसे झाले?

<u>श्री. आर.बी.शिर्के (प्र. शहर अभियंता):—</u>जसे की मी सांगितले की, टंकलिखीत दोष आहे.

<u>महापालिका सचिव :—</u> प्रश्न क्र. १५९ हा श्री. अनिल विदयार्थी यांचा आहे.

**?** <u>**प्रश्न क्र. १५९ :—**</u> श्री. श्याम लोकवानी, लिपिक यांना देण्यात आलेल्या प्रभारी प्रभाग अधिकारी पदोन्नती बाबत.

१) उमपा/साप्रवि/आस्था/मुली/६३९/२००८, दिनांक २८/११/२००८ च्या आदेशान्वये प्रभारी प्रभाग अधिकारी म्हणून आदेश दिलेले आहेत. श्री. श्याम खेमचंद लोकवानी, लिपिक हे सदरचे पदासाठी महानगरपालिकेत केवळ तेच पात्र उमेदवार आहेत का?

२) अधिक्षक/चौकशी अधिकारी/खरेदी अधिकारी/भांडार अधिकारी किंवा ७ वर्षाचा कामाचा अनुभव आहे का?

३) मान्यता प्राप्त विदयापिठाची पदवी आहे का?

४) मराठी भाषेचे ज्ञान आहे का?

५) एम.एस.सी.आय.टी. परिक्षा उत्तीर्ण केलेली आहे का?

६) एल.एस.जी.डी./एल.जी.एस. परिक्षा उत्तीर्ण केलेली आहे का?

७) सेवा जेष्ठता यादीमध्ये वरीष्ठ लिपिक २४ आहेत त्यांना पदोन्नती देण्यात आलेली आहे का?

८) लिपिक या संवर्गातील सेवाजेष्ठता यादीत अ.क्र. १५ वा आहे. त्यामध्ये ७ कर्मचारी हे सेवानिवृत्त झालेले आहे. श्री. श्याम लोकवानी यांचा क्र. ८ वा आहे, त्यांचे अगोदर ७ वरीष्ठ कर्मचा—यांना पदोन्नती देण्यात आलेली आहे का?

९) दिनांक २०/११/२००८ चे सर्वसाधारण सभेचे विषय क्र. ९ मध्ये कर्मचा—यांच्या पदोन्नती बाबतचा विषयात श्री. श्याम लोकवानी, लिपिक यांना पदोन्नतीने वरिष्ठ लिपिक देण्यात आलेले आहे. त्या सभेचे इतिवृत्त कायम करण्यात आलेले आहे का?

१०) दिनांक १२/१२/२००८ रोजी दुपारी १२.०० वाजता झालेल्या महासभेत सदरच्या विषयाबाबत लक्षवेधी ठेवण्यात आलेली होती. सदरची लक्षवेधी ही कर्मचारी यांचे हिताबाबतची होती तरी देखील आपण सदरील लक्षवेधी फेटाळलेली आहे. सदरील लक्षवेधी आपण का फेटाळली कोणत्या कलमान्वये?

वरील सर्व मुद्दयांची सविस्तर माहिती दयावी, महासभेमध्ये देण्यात यावी ही विनंती.

<u>उत्तर :—</u> श्री. श्याम खेमचंद लोकवानी लिपिक यांना प्रशासकिय कामकाजाच्या दृष्टीने प्रभारी कार्यभार सोपविण्यात आलेला आहे.

१ नाही

२ नाही

३ उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

४ नाही श्री. श्याम लोकवानी यांचे सेवा पुस्तकात एस.एस.सी. आय.टी. परिक्षा उत्तीर्ण असल्याची नोंद आढळुन येत नाही.

५ नाही

६ सेवा जेष्ठता यादीमध्ये १४ वरीष्ठ लिपिक असून त्यांना पात्रतेनुसार पदोन्नती देण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

७ लिपिक या संवर्गातील सेवा जेष्ठता यादीत त्यांचा अनुक्रमांक ०५ वा असून त्यांचे आधीच्या ०४ लिपिक कर्मचा–यांना पदोन्नती देण्यात आलेली आहे.

८ दिनांक २०/११/२००८ चे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त दिनांक ९/१/२००९ रोजीचे महासभेमध्ये कायम करण्यात आले आहे.

मा. महापौर अथवा पिठासीन अधिकारी :– यांचे अखत्यारीतील बाब आहे.

सदस्य श्री. अनिल विदयार्थी:– सन्माननिय महापौरजी, सन्मानिय उपमहापौरजी, सन्माननिय आयुक्त साहेब, माझा जो प्रश्न आहे श्री. श्याम लोकवानी यांच्या संदर्भात होता, त्याबाबत जरा खुलासा करावा.

श्री. मिलिंद सावंत (उप–आयुक्त, मुख्यालय):–मा. महापौर, मा. उप–महापौर, मा. आयुक्त साहेब, श्री. श्याम लोकवानी यांना अतिरिक्त कार्यभार सोपविला आहे त्याबाबत श्री. अनिल विदयार्थी यांचा प्रश्न आहे.

सदस्य श्री. अनिल विदयार्थी:–साहेब, जरा हिंदीत खुलासा करावा.

श्री. मिलिंद सावंत (उप–आयुक्त, मुख्यालय):–श्री. अनिल विदयार्थी यांचा जो प्रश्न आहे तो श्याम लोकवानी यांना अतिरिक्त जो कार्यभार दिला आहे त्याबाबतचा आहे. त्यांना आम्ही उत्तर दिलेले आहे. आपणांस अधिक काही माहिती हवी असेल तर आपण विचारा.

सदस्य श्री. अनिल विदयार्थी:– श्री. श्याम लोकवानी यांना प्रभारी प्रभाग अधिकारी म्हणुन अतिरिक्त कार्यभार देण्यात आला होता, बरोबर आहे ना?

श्री. मिलिंद सावंत (उप–आयुक्त, मुख्यालय):–होय.

सदस्य श्री. अनिल विदयार्थी :–मागील महासभेत आपण म्हणाला होतात की, प्रभारी प्रभाग अधिकारी म्हणुन कायदेशीर कुठलीच पोस्ट नाही?

श्री. मिलिंद सावंत (उप–आयुक्त, मुख्यालय):–होय.

सदस्य श्री. अनिल विदयार्थी :–जर ते पात्र नाहीत, प्रभारी प्रभाग अधिकारी म्हणुन पदच नाही तर मग आपण त्यांना त्या पदावर का ठेवत आहात?

श्री. मिलिंद सावंत (उप–आयुक्त, मुख्यालय):–प्रभारीचा अर्थ आहे असा आहे की............

सदस्य श्री. अनिल विदयार्थी :– प्रभारीचा अर्थ मला सांगु नका मला माहित आहे. कायदेशीर नाही आहे तर तुम्ही त्याला उदयुत का करतात? यालाच नाही तर दुस–या कुणालाही...

श्री. मिलिंद सावंत (उप–आयुक्त, मुख्यालय):–मी असे म्हणत नाही की, ते कायदेशीर नाही म्हणुन. ज्यावेळेस आम्हांस कर्मचारी कमी पडतात त्यावेळेस अशा प्रकारे प्रभारी कार्यभार सोपविला जातो. अशा प्रकारे कामे करुन त्यास प्रभारी म्हणुन बोलले जाते.

सदस्य श्री. अनिल विदयार्थी :–अशी काही तरतुद आहे काय?

श्री. मिलिंद सावंत (उप–आयुक्त, मुख्यालय):–अतिरिक्त कार्यभार देण्याची कायदयात तरतुद आहे. प्रभारीचा अर्थ तात्पुरता कार्यभार सोपविणे.

सदस्य श्री. अनिल विदयार्थी :—परंतु अशी काही कायदयात तरतुद आहे काय? कायदा आपल्यावर बंधनकारक असतांनाही आपण अशी नेमणुक देवु शकतो काय? अतिरिक्त ठिक आहे, प्रभारी करुन मी विचारत आहे.

श्री. मिलिंद सावंत (उप—आयुक्त, मुख्यालय):—पात्रतेचा निकष तेव्हा विचारात घेतला जाईल जेव्हा त्यास पदोन्नती देण्याचा विचार केला जाईल तेव्हा.

सदस्य श्री. अनिल विदयार्थी :—नियुक्ती करतांना सुध्दा तो पात्र आहे किंवा नाही हे पाहिले पाहिजे.

श्री. मिलिंद सावंत (उप—आयुक्त, मुख्यालय):—हे वरिष्ठ लिपिक या संवर्गात काम करत आहेत. व या अगोदर आम्ही वरिष्ठ लिपिकाकडुन प्रभाग अधिका—याचे काम करुन घेतले आहे हे मी यापुर्वी सुध्दा आपणांस सांगितले आहे.

सदस्य श्री. अनिल विदयार्थी :—साहेब, पात्रता तर पाहिली जाईल की नाही? आपण मला उत्तर दिले आहे त्यामध्ये लिहिले आहे की तो पात्र नाही. त्यानंतर सुध्दा आपण त्यास नियुक्ती दिली आहे, का?

श्री. मिलिंद सावंत (उप—आयुक्त, मुख्यालय):—आम्ही त्यांच्याकडुन तात्पुरत्या स्वरुपात काम करुन घेत आहोत. त्यामध्ये पात्रतेचा जो निकष आहे..............

सदस्य श्री. अनिल विदयार्थी :—दुसरे जे पात्र कर्मचारी आहेत त्यांना आपण तात्पुरत्या स्वरुपी नेमणुक का देत नाहीत? यामध्ये महापालिकेचे काय स्वारस्य आहे?

श्री. मिलिंद सावंत (उप—आयुक्त, मुख्यालय):—हे आयुक्त साहेबांनी मान्य करुन आमच्याकडे पाठविले आहे. चार, पाच जे कर्मचारी असतील त्यातील एकाकडे कार्यभार सोपवायचा आहे. त्याबाबतीत आयुक्त साहेबांचा निर्णय अंतिम असेल, कुणाला कार्यभार दयायचा आहे, कुणाला नाही.

सदस्य श्री. अनिल विदयार्थी :—परंतु प्रस्तावित तर आपणच केले होते. आयुक्त साहेबांशी याबाबतीत माझे बोलणे झाले होते त्यांनी सांगितले की, आपणच प्रस्तावित करुन प्रस्ताव पाठविला होता.

श्री. मिलिंद सावंत (उप—आयुक्त, मुख्यालय):—आम्ही प्रस्तावित केले होते कारण श्री. श्याम लोकवानी यांनी कर विभागात काम केले होते, त्याचबरोबर अनाधिकृत बांधकाम विभागात काम केले आहे, यासाठी त्यांच्या नावाची शिफारस केली आहे.

सदस्य श्री. अनिल विदयार्थी :—पात्रता नसतांनाही आपण त्यास पदोन्नती करण्यासाठी कसे प्रस्तावित करता?

श्री. मिलिंद सावंत (उप—आयुक्त, मुख्यालय):—पात्रता नाही असे म्हणु शकत नाही.

सदस्य श्री. अनिल विदयार्थी :—कर विभागात काम करत होते तेथे त्यांना दंड झालेला आहे. तरीसुध्दा आपण त्यांना पदोन्नत करत आहात?

श्री. मिलिंद सावंत (उप—आयुक्त, मुख्यालय):—नंदलाल समितीमध्ये त्यांचे नाव आहे. नंदलाल समितीने त्यांना शिक्षा सुध्दा प्रस्तावित केलेली आहे. तरीसुध्दा आपण त्यांना पदोन्नत करत आहात. पदोन्नत करण्यात आलेले नाही हे मी या अगोदरसुध्दा सांगितले आहे.

सदस्य श्री. अनिल विदयार्थी :—प्रभारी म्हणुन आपण त्यांना नेमणुक दिली आहे म्हणजे पदोन्नतच केले आहे ना? पात्र नसलेल्या कर्मचा—यास प्रभाग अधिकारी म्हणुन आपण पदोन्नत करुन पाठवत आहात?

श्री. मिलिंद सावंत (उप—आयुक्त, मुख्यालय):—जेव्हा अधिकारी कर्मचारी कमी असतात तेव्हा आम्ही कोणत्याही कर्मचा—यास अतिरिक्त कार्यभार देवुन काम करवुन घेतो. ही तात्पुरती व्यवस्था आहे. नियमित पदोन्नत्या दिल्यानंतर श्री. श्याम लोकवानी यांना पदावन्नत करण्यात येईल.

सदस्य श्री. अनिल विदयार्थी :—साहेब, शेवटचा प्रश्न काय आपण त्यास नियुक्त केले आहे? त्यास प्रभारी प्रभाग अधिकारी म्हणुन नियुक्ती दिली आहे काय ती कायदेशीररित्या बरोबर आहे? मुद्देनिहाय बोला बरोबर आहे किंवा नाही?

श्री. मिलिंद सावंत (उप—आयुक्त, मुख्यालय):—प्रशासकिय कामकाजाच्या सोयीसाठी जो कोणी कर्मचारी त्या निकषामध्ये बसत असेल त्यास आयुक्त प्रभारी कार्यभार सोपवु शकतात.

सदस्य श्री. अनिल विदयार्थी :—पात्र नसला तरीही?

श्री. मिलिंद सावंत (उप—आयुक्त, मुख्यालय):—पात्र नाही असे नाही. ही एक तात्पुरती व्यवस्था आहे. पात्रता नियमित पदोन्नती देण्याच्या वेळेस पाहिली जाईल.

सदस्य श्री. अनिल विदयार्थी :—आपण मोघम उत्तर देत आहात. कायदेशीर दृष्टया त्यास पदोन्नती दिली जावु शकते किंवा नाही एवढेच मला सांगा.

श्री. मिलिंद सावंत (उप—आयुक्त, मुख्यालय):—प्रशासकिय सोयीसुविधा लक्षात घेवुन त्यास पदोन्नती दिली गेली आहे.

सदस्य श्री. अनिल विदयार्थी :—आयुक्त साहेब, मी आपणांस विचारतो, कायदेशीररित्या...............

श्री. अशोककुमार रणखांब (अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—मी आपले प्रश्न लक्षपुर्वक ऐकले आहेत, त्यास कोणतीही पदोन्नती दिली गेली नाही. दुसरे असे की, महापालिकेत लागु असलेला मुंबई प्रांतिक महानगरपालिका जो अधिनियम आहे, त्यानुसार जेव्हा आम्ही काम करत असतो आणि त्यावेळेस काही पदे उपलब्ध होतात त्याठिकाणी सेवा जेष्ठतेनुसार कर्मचारी उपलब्ध होतात त्यास तात्पुरत्या स्वरुपी प्रभारी पदभार देण्यात आला होता त्याठिकाणी त्यापेक्षा दुसरा कुणी सेवाजेष्ठ कर्मचारी असता तर त्यास आम्ही त्या पदाचा कार्यभार सोपविला असता.

सदस्य श्री. अनिल विदयार्थी :—साहेब, आहेत ना, सेवाजेष्ठ कर्मचारी आहेत असे आपण उत्तरामध्येच दिले आहे, १४ कर्मचा—यांना पदोन्नती देणे विचाराधीन आहे असे आपण लिहिले आहे.

श्री. अशोककुमार रणखांब (अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—ते वरिष्ठ लिपिक आहेत आणि वरिष्ठ लिपिकामध्ये ते सेवाजेष्ठ आहेत.

सदस्य श्री. अनिल विदयार्थी :—नाही नाही, वरिष्ठ लिपिकमध्ये सुध्दा त्याच्यापेक्षा काही कर्मचारी सेवाजेष्ठ आहेत.

श्री. अशोककुमार रणखांब (अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—प्रत्येकवेळी आपण असे प्रश्न विचारलेत तर त्यांची मी उत्तरे देवु शकणार नाही.

सदस्य श्री. अनिल विदयार्थी :—नाही, नाही आपण जे उत्तर दिले आहे त्यावरच मी प्रश्न विचारत आहे.

श्री. अशोककुमार रणखांब (अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—जेवढे काही प्रश्न आपण विचारले आहेत त्यांची उत्तरे दिली आहेत. व त्यांना प्रभारी पदभार दिला होता हे सुध्दा सत्य आहे. व त्यांच्याकडील तो पदभार काढुन घेतला आहे हे सुध्दा उप—आयुक्त महोदयांनी आता आपणांस सांगीतले आहे. तर मला वाटते या सर्व उत्तरांनी आपले कदाचित समाधान झाले पाहिजे.

सदस्य श्री. अनिल विदयार्थी :—फक्त श्री. श्याम लोकवानी यांच्या प्रकरणात नाही तर प्रभारी म्हणुन कोणते पदच नाही मग कोणत्याही पदाबाबत आपण प्रभारी नियुक्ती करुच नका ना?

श्री. अशोककुमार रणखांब (अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—आपण श्री. श्याम लोकवानी यांच्याबाबतीत प्रश्न विचारला होतात. म्हणुन उत्तर दिले आहे. पुढे जेव्हा आपण प्रभारी पदांबाबत प्रश्न विचाराल त्यावेळेस अभ्यास करुन उत्तर दिले जाईल.

सदस्य श्री. अनिल विदयार्थी :—मी हेच सांगत आहे की, जेवढी काही पदे आहेत त्या प्रत्येक पदांवर आपण प्रभारी म्हणुन नियुक्ती करत आहात. प्रभारी म्हणुन मुकादमांच्याही आपण नेमणुका केल्या आहेत. तळापासुन वरपर्यंत आपण अशाप्रकारे नेमणुका करत आहात. पदे अस्तित्वात नाहीत म्हणुन आपण अशा नेमणुकाच करु नका ना?

श्री. अशोककुमार रणखांब (अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—प्रभारी असे कोणतेही पद नसते. एखादया कर्मचा—यास अतिरिक्त कार्यभार सोपविला जातो त्यावेळी त्यास प्रभारी असे म्हटले जाते.

सदस्य श्री. अनिल विदयार्थी :—त्यासाठी पात्रता पाहिली जाते ना?

श्री. अशोककुमार रणखांब (अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—पात्रता पाहिली जाते परंतु एवढया मोठया आस्थापनेत जे काही पात्र आहेत, बहुतांश कर्मचारी पात्र नसतात, कामाची आवश्यकता लक्षात घेता त्यांना ती नेमणुक देण्यात आलेली आहे. व त्यांना देण्यात आलेली ती नेमणूक आता काढुन सुध्दा घेण्यात आलेली आहे. या उत्तराने आपले कदाचित समाधान झाले पाहिजे.

सदस्य श्री. अनिल विदयार्थी :—कुणाला काढले आहे?.

श्री. अशोककुमार रणखांब (अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—त्यांच्याकडील प्रभारी कार्यभार काढुन घेण्यात आला आहे.

सदस्य श्री. अनिल विदयार्थी :—कुणाचा? श्री. श्याम लोकवानी यांचा?

श्री. अशोककुमार रणखांब (अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—अशाप्रकारे जर आपण प्रश्न विचारत राहिलात तर मी उत्तर देवु शकणार नाही. मी आपणांस तेच सांगत आहे की त्यांना दिलेला प्रभारी कार्यभार त्यांच्याकडुन काढुन घेण्यात आलेला आहे.

सदस्य श्री. अनिल विदयार्थी :—परंतु साहेब, माझ्याकडे कार्यादेशाची जी प्रत आहे त्यामध्ये लिहिले आहे की, श्री. भदाणे यांच्या जागी तात्पुरती नियुक्ती केली आहे.

श्री. अशोककुमार रणखांब (अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—कोणतीही गोष्ट कायम नसते. हे पदोन्नतीचे प्रकरण आहे, तात्पुरतीच नेमणुक आम्ही देत आहोत. जोपर्यंत त्याबाबतीत अंतिम निर्णय घेत नाही तोपर्यंत.

सदस्य श्री. अनिल विदयार्थी :—साहेब, आपण कार्यादेशामध्ये काय लिहिले आहे? तो अनुपस्थित आहे म्हणुन? श्री. भदाणे यांची तेथे पुर्ननियुक्ती करत आहे. अतिरिक्त काम पाहत आहे. जर तो उदया पुन्हा कामावर आला तर अशावेळी आपण काय करणार?

श्री. अशोककुमार रणखांब (अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—ते परत आले तर त्यावेळेस विचार केला जाईल.

सदस्य श्री. अनिल विदयार्थी :—साहेब, मी आपणांस तेच विचारु इच्छित आहे, आपण त्यास जर प्रभारी प्रभाग अधिकारी म्हणुन नियुक्त केले व त्याचे जे मुळ पद आहे त्यावर यांना नियुक्त कराल?

श्री. अशोककुमार रणखांब (अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—जेव्हा परत येतील तेव्हा कायदयानुसार विचार करु. व जे कायदयाच्या दृष्टिने योग्य राहिल तेच करु.

<u>महापालिका सचिव :—</u> प्रश्न क्र. १६० हा श्री. हिरानंद जग्यासी यांचा असून ते यावेळी सभागृहात उपस्थित नाहीत त्यामुळे त्यांच्या प्रश्न व उत्तराची इतिवृत्तांतात नोंद घेण्यात येत आहे.

<u>प्रश्न क्र. १६० :—</u> साई वसणशाह दरबार के सामने बांधकाम के संदर्भ में

१) उल्हासनगर शहर अनधिकृत बांधकाम रेग्युलायझेशन अधिनियम कलम ४ के तहत रास्ते पर किया गया निर्माण रेग्युलायझेशन नही हो सकता । फिर भी उल्हासनगर कॅम्प नं. ५, शिट नं. ७५ बॅ.नं. २०७०, रुम नं. १ इस जगह पर अनुक्रमांक ८९ दिनांक १३/१२/२००७ अनुसारडी—सर्टिफिकेट रस्ते पॅसेज पर कैसे मंजुर किया गया?

२) डी.पी. प्लान के पॅसेज/ रस्ते पर बीपी ८३/०७/१२१ दिनांक १४/५/२००८ अनुसार इस जगह पर बांधकाम अनुमती क्यों और कैसे दी गयी?

३) इस प्रकरण मे. शासनद्वारा दिनांक १९/१०/२००८ के लेटर के तहत अहवाल मांगने पर भी शासन को अब तक इस प्रकरण में अहवाल क्यों भेजा नहीं जा रहा है?

४) इस प्रकरण में शासन और महापालिका के पास लिखित शिकायते प्राप्त होने पर भी इस बांधकाम को रोकने का प्रयास अभी तक क्यों नहीं हुआ?

५) अध्यादेश कलम ४ के तहत रस्ते के जगह पर रेग्युलायझेशन करना गलत है उसी रस्ते के जगह पर बांधकाम परवाना देना भी कानुन गलत है फिर भी इस बांधकाम विषय में पालिका/मा. आयुक्त की ओर से अब तक कारवाई क्यों नही हुई?

६) पालिका इस प्रकरण में कौनसी कारवाई करने जा रही है? या कौनसी कारवाई अब तक की है उसका स्पष्ट विवरण प्राप्त हो.

<u>उत्तर :—</u> सदरचे प्रकरण हे जिल्हा न्यायालय व उच्चत्तम न्यायालय येथे दावे दाखल असून न्यायप्रविष्ठ आहे. तसेच याबाबतचा शासनास अहवाल सादर करण्यात आलेला आहे. तज्ञ समितीने सदरचा प्रस्ताव नियमाधिन केलेला आहे. तसेच मा. पदनिर्देशित प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी ठाणे यांच्या स्वाक्षरीने 'डी' फॉर्म देण्यात करण्यात आलेले आहे.

मा. पदनिर्देशित प्राधिकारी तथा जिल्हाधिकारी ठाणे यांच्या मान्यतेने 'डी' फॉर्म निर्गमित केल्यानंतर सदरचा प्रस्तावास मंजुरी देण्यात आलेली आहे.

सदरचे प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे. तसेच याबाबतचा शासनास अहवाल सादर करण्यात आलेला आहे.

सदरचे बांधकाम विकास नियंत्रण नियमावलीनुसार चालू असल्याने याबाबत कार्यवाही करणे उचित होणार नाही.

वरीलप्रमाणे

वरीलप्रमाणे

**<u>महापालिका सचिव :—</u>** प्रश्न क्र. १६१ हा श्रीमती जयश्री सुर्वे यांचा आहे.

**?** **<u>प्रश्न क्र. १६१ :—</u>** उल्हासनगर महानगरपालिका हद्दीतील नागरीकांचे मिळकतींची कर आकारणी करणेचे व मिळकतधारकाकडुन कर वसुली करण्याचे काम कर विभागामार्फत करण्यात येत आहे त्या अनुषंगाने खालील प्रश्नावर महासभेत चर्चा होवून सविस्तर माहिती मिळणेस विनंती आहे.

प्र.क्र. १ अ) उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत किती हॉटेल, बार, रेस्टारंट, लॉजिंग बोर्डिंग, कारखाने आहेत? त्यांचे नाव व पत्ते तसेच खाता नंबर, बिल नंबर दयावा? त्यांना किती कर आकारणी करण्यात येते? सदरची कर आकारणी ही सध्य स्थितीत अस्तित्वात असलेल्या मिळकतींचे क्षेत्रफळानुसार देणेत येत आहे का? कर आकारणीही क्षेत्रफळानुसार देणेत येत नसल्यास किती मिळकतींचे कर आकारणीत तफावत आहे? त्यांची कॅम्प नुसार आकडेवारी दयावी? तसेच वरील पैकी किती मिळकती भाडयाने दिलेल्या आहेत? त्यांचेकडुन महापालिका नियमानुसार जादा कर वसूली करण्यात येते का? की काही ठिकाणी भाडोत्री असूनही अतिरिक्त, जादा कर वसूली केली जात नाही? यामुळे महापालिकेचे प्रतिवर्षी किती आर्थिक नुकसान होत आहे? यास जबाबदार लिपिक, करनिरिक्षिक, अथवा उप आयुक्त यापैकी कोण आहे?

ब) तसेच महापालिका हद्दीतील किती मिळकतींची कर आकारणी बांधकामे नविन असून देखिल जून्या दराने कर आकारणी केली आहे? अशी प्रकरणे किती आहेत? सदरची प्रकरणे कोणाचे स्वाक्षरीने मंजूर करण्यात आली? सदर प्रकरणात महापालिकेचे किती आर्थिक नुकसान झाले, सदर प्रकरणात दोषी आढळलेल्या अधिकारी, कर्मचा—यावर कारवाई करण्यात आली आहे का? याबाबत सविस्तर माहिती मिळावी.

उत्तर :— अ) सदर माहिती मोठयाप्रमाणावर असल्याने महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत नमुद सर्व प्रकारच्या कर पात्र मिळकती व करपात्र बाबी उदा. क्षेत्रफळ, बांधकाम स्वरुप, वापर, करयोग्य मुल्य इ. चा तपशिल सोबत देण्यात येणा—या सीडीमध्ये उपलब्ध आहे.

ब) अशा प्रकारच्या प्रकरणांसाठी मा. आयुक्त सो. यांनी जा.क्र. उमपा/आका/४०७/०८, दिनांक २८/१/०८ या आदेशान्वये स्थगिती दिलेली आहे. (प्रत सोबत)

<u>सदस्य श्रीमती जयश्री सुर्वे:—</u> ठिक आहे.

<u>महापालिका सचिव :—</u> प्रश्न क्र. १६२ हा श्रीमती जयश्री सुर्वे यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. १६२ :—</u> उल्हासनगर महानगरपालिकेच्या विविध विभागांचे अधिका—यांसाठी व पदाधिका—यांचे दालनासाठी २० ऑक्टोंबर, १९९६ ते आजतागायत किती वातानूकुलीत यंत्र (एसी) खरेदी करण्यात आले आहेत? ते कोणत्या कंपनीचे होते? त्यांचा गॅरेंटी/ वारंटी कालावधी किती होता? गॅरेंटी/वॉरेंटी कालावधीत वातानुकूलीत यंत्र बिघडल्यास त्यांची निगा व दुरुस्ती कोणी केली? त्यांची प्रत्येक नगाची किंमत किती होती? ते कोणत्या अधिकारी, पदाधिकारी यांचे दालनात बसविण्यात आले? सदरचे नविन वातानुकूलीत यंत्र ज्या दालनात बसविणेत आले त्या दालनात पुर्वी वातानूकुलीत यंत्र बसविण्यात आले होते का? नविन बसविल्यानंतर जुन्या वातानुकुलीत यंत्राचे काय केले? ते अन्य ठिकाणी बसविणेत आले का? कोठे बसविण्यात आले? का विकरण्यात आले आहे? विकण्यात आले असल्यास किती वातानुकुलीत यंत्राची विक्री करण्यात आली? किती किंमतीला सदर यंत्र विकण्यात आली? महापालिकेतील किती नादुरुस्त वातानुकुलीत यंत्राची दुरुस्ती प्रशासनामार्फत करण्यात आली? त्यासाठी कोणकोणते स्पेअर पार्ट खरेदी करण्यात आले? त्यांची नावे, संख्या व प्रत्येक नगाची किंमत किती आहे? याची सविस्तर माहिती मिळावी.

ब) उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दीत महापालिकेच्या विदयुत विभागामार्फत किती विदयुत पोल, मर्क्युरी, सोडीयम, टयुब लाईट लावण्यात आल्या आहेत? त्यापैकी किती सध्यस्थितीत चालू स्थितीत आहेत? किती नादुरुस्त आहेत? सदरचे पोल, मक्युरी, सोडीयम दिवे, टयुब लाईट कोणाच्या शिफारशीनुसार बसविण्यात आले? सदरचे पोल, मक्युरी, सोडीयम दिवे, टयुब लाईट कोणाच्या शिफारशीनुसार बसविण्यात आले? सदरचे काम कोणत्या ठेकेदाराने केले आहे? दिनांक २० ऑक्टोंबर, १९९६ पासून सदरच्या कामासाठी किती खर्च करण्यात आला? किती देयके अदा करण्यात आली? याची सविस्तर माहिती मिळावी.

उत्तर :— १) याबाबतचे अभिलेख विविध विभागात उपलब्ध आहे आणि ते मोठया प्रमाणात असल्याने आपणांस विनंती आहे की, विविध विभागात येवून पाहणी करावी.

२) व्होल्टस व्हिडीयोकॉन, नॅशनल, एलजी या कपंनीचे होते.

३) १ ते ३ वर्षापर्यंत वॉरंटी

४) संबंधीत पुरवठेदारांनी

५) याबाबतचे अभिलेख विभागात उपलब्ध आहे आणि ते मोठया प्रमाणात असल्याने आपणांस विनंती आहे की, विभागात येवुन पहाणी करावी.

६) याबाबतचे अभिलेख विभागात उपलब्ध आहे आणि ते मोठया प्रमाणात असल्याने आपणांस विनंती आहे की विभागात येवुन पहाणी करावी.

७) कोठे होते कोठे नाही.

८) ते स्क्रॅप करण्यात आले/ छोटया दालनात बसविण्यात आले.

९) मागील विक्री २४ नग

१०) मागील विक्री रुपये २९००/— प्रति नग अधिक कर

११) वेळोवेळी ज्या एसीमध्ये खराबी निर्माण होते ते रिपेअर करण्यात येतील.

१२)याबाबतचे अभिलेख विविध विभागात उपलब्ध आहे आणि ते मोठया प्रमाणात असल्याने आपणांस विनंती आहे की विदयुत विभागात येवुन पहाणी करावी.

१३) याबाबतचे अभिलेख विविध विभागात उपलब्ध आहे आणि ते मोठया प्रमाणात असल्याने आपणांस विनंती आहे की, या विभागत येवुन पाहणी करावी.

टिप—— लोकप्रतिनिधी व अधिका—यांच्या दालनात फेरबदल होत राहतात तसेच त्यांच्या संख्येतही फेरबदल होत राहतात.

ब) १)अंदाजित १०,००,०००/—

२ व ३) दिवाबत्ती दररोज काही बंद होतात व ते दुरुस्त करण्यात येतात अंदाजित या काळात ९८ टक्केपर्यंत दिवाबत्ती चालु स्थितीत असणे शक्य आहे.

४) मा. नगरसेवक, संस्थेच्या नागरीकांच्या विनंतीनुसार जागेची पाहणी करुन तसेच कर्मचारी यांच्या मार्फत सुचविलेल्या जागेवर सुसाध्यतेची खात्री करुन दिवाबत्ती बसविण्यात येतात.

५) विविध काळात विविध ठेकेदारांनी विविध काम केले आहे या बाबतचे अभिलेख विविध विभागात उपलब्ध आहे आणि ते मोठया प्रमाणात असल्याने आपणांस विनंती आहे की विभागात येवुन पाहणी करावी.

६) याबाबतचे अभिलेख विविध विभागात उपलब्ध आहे आणि ते मोठया प्रमाणात असल्याने आपणांस विनंती आहे की, विभागात येवुन पाहणी करावी.

७) याबाबतचे अभिलेख विविध विभागात म्हणजे लेखा व अभिलेख कक्ष येथे उपलब्ध आहे आणि ते मोठया प्रमाणात असल्याने आपणांस विनंती आहे की विभागात येवुन पाहणी करावी.

टिप—— गरजेनुसार दिवाबत्ती संख्येत व प्रकारात वेळोवेळी फेरबदल होत असतात.

सदस्य श्रीमती जयश्री सुर्वे :— ठिक आहे.

महापालिका सचिव :— प्रश्नोत्तराचा कालवधी संपला. प्रशासनाकडुन आयत्यावेळचे ३ विषय आलेले आहेत

**विषय क्र. १ :—** १) श्री.अशोक सखाराम वायले २) श्री. ज्ञानेश्वर गणपत वायले ३) श्री. चंद्रकांत गुरूनाथ वायले ४) श्री. राजेश ब्राम्हण तरे यांना महापालिका सेवेत पुढील सहा महिन्यासाठी मुदतवाढ देणे.

हा विषय सभेचा कामकाजात सामावुन घ्यायाचा आहे?

काही सदस्य :—हा विषय सभेच्या कामकाजात सामावुन घेतला जावा.

महापालिका सचिव:—सर्वसंमतीने? आयत्यावेळचा विषय क्र. २....

महापौर अथवा पिठासीन अधिकारी :— सदरहु विषय सर्वसंमतीने कार्यसूचीवर समाविष्ट करण्यात येत आहे.

**विषय क्र. २ :—** दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत वर्ष २००८—०९ करीता तयार केलेल्या प्राकलनास मंजुरी देणे.

हा विषय सभेचा कामकाजात सामावुन घ्यायाचा आहे?

काही सदस्य :—हा विषय सभेच्या कामकाजात सामावुन घेतला जावा.

महापालिका सचिव:—सर्वसंमतीने?

सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता:—साहेब, दलित वस्तीचा सर्व्हे कोण करतो?

महापालिका सचिव :—तो नंतरचा मुद्दा आहे. सध्या हा विषय सभेच्या कामाकाजात सामावुन घ्यायचा किंवा नाही असा मुद्दा आहे. आता हे तिन्ही विषय अनुक्रमांक १३,१४ आणि १५ असे सभेपुढे चर्चेस येतील त्यावेळेस आपण त्यावर चर्चा करा. सध्या हे विषय सभेच्या कामकाजात सामावुन घेतले जावे किंवा नाही यास सभागृहाची अनुमती पाहिजे.

हा विषय सर्वसंमतीने सभेचा कामकाजात सामावुन घ्यायाचा आहे?

काही सदस्य :—हा विषय सभेच्या कामकाजात सामावुन घेतला जावा.

महापालिका सचिव:—सर्वसंमतीने?

महापौर अथवा पिठासीन अधिकारी :— :— सदरहु विषय सर्वसंमतीने कार्यसूचीवर समाविष्ट करण्यात येत आहे. आयत्यावेळचा विषय क्र. ३

**विषय क्र. ३:—** चतुर्थश्रेणी कर्मचा—यांना लिपिक पदावर पदोन्नती देण्या प्रयोजनार्थ पुर्वीचा महासभा ठराव क्र. ४६ दिनांक ९/१/२००९ मध्ये अंशत: बदल करणे.

काही सदस्य :— समावेश करुन घ्या.

<u>महापौर अथवा पिठासीन अधिकारी :– :– </u>सदरहु विषय सर्वसंमतीने कार्यसूचीवर समाविष्ट करण्यात येत आहे.

<u>महापालिका सचिव :– </u>आता हे तिनही विषय सभेच्या कामकाजात सामावुन घेतले आहेत.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>४६ क्रमांकाच्या ठरावाचा जो उल्लेख केलेला आहे तो ठराव यासोबत जोडलेला नाही. ती प्रत मिळाली तरच प्रस्ताव काय आहे ते आम्हांला समजु शकेल.

<u>महापालिका सचिव:–</u>त्याची झेरॉक्स काढुन आपणांस दिली जाईल.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :–</u>सचिव साहेब, १६३ क्रमांकाचा जो प्रश्न आहे तो उच्चारण्याचा आपण विसरुन गेलात काय?

<u>महापालिका सचिव:–</u>प्रश्नोत्तरासाठी अर्ध्या तासाचा कालावधी आहे. अर्ध्या तासाचा कालावधी संपल्यामुळे १६३ क्रमांकाचा प्रश्न पुढील महासभेत घेतला जाईल.

कृपया लक्ष दयावे. मा. महापौरांना ३ लक्षवेधी सुचना प्राप्त झाल्या असून त्या पुढील प्रमाणे आहेत.

लक्षवेधी सुचना क्र. १ जीचे सुचक आहेत श्री.बी.बी. मोरे

**विषय :–** निवडणूक कामासाठी तहसलिदार कल्याण यांच्याकडे सेवावर्ग केलेल्या महापालिका लिपिकांना निवडणूक संपल्यानंतरही कार्यमुक्त न केल्याबाबतची लक्षवेधी सूचना

श्री. बी.बी. मोरे साहेब, आपण आपली ही लक्षवेधी सूचना मागे घेतल आहात ना? त्यानी मा. महापौरांच्या अनुमतीने आपली लक्षवेधी सूचना मागे घेतली आहे.

लक्षवेधी सुचना क्र. २ जीचे सुचक आहेत डॉ. निना नाथानी व अनुमोदक आहेत श्री. जमनादास पुरस्वानी

विषय :– गोल मैदान उल्हासनगर–१ येथिल फुटपाथवर पीसीओ व गटई व्यवसायसाठी टप–या उभारण्यास परवानगी न देण्याबाबत

लक्षवेधी सुचना क्र. ३ जीचे सुचक आहेत श्री. चंद्रशेखर यादव व अनुमोदक आहेत श्रीमती जयश्री सुर्वे

विषय :– उल्हासनगर कॅम्प ३ व ४ ला जोडणा–या आकाश मार्गीकेचे (स्कायवाक) साठी नविन विकास आराखडयानुसार रस्त्यांचे रुंदीकरण करणे तसेच उल्हासनगर रेल्वे स्टेशनजवळ परिवहन सेवेच्या बसेस थांबविण्यासाठी रस्त्याचे रुंदीकरण करणे बाबत.

<u>महापौर अथवा पिठासीन अधिकारी :– :–</u> सदरच्या दोन लक्षवेधी सुचना स्विकृत करण्यात येत आहेत.

<u>महापालिका सचिव:–</u>लक्षवेधी सुचना क्र. १ जीच्या सुचक आहेत डॉ निना नाथानी यांनी आपली लक्षवेधी सूचना मांडावी.

लक्षवेधी सुचना याप्रकारची आहे......................

---

## <u>लक्षवेधी सूचना क्रमांक १</u>

सुचकाचे नाव :– डॉ. निना नाथानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

**विषय :–** गोल मैदान उल्हासनगर–१ येथिल फुटपाथवर पीसीओ व गटई व्यवसायसाठी टप–या उभारण्यास परवानगी न देण्याबाबत

मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर या लक्षवेधी सूचनेद्वारे कळविणेत येते की, उल्हासनगर–१ येथिल गोल मैदान येथिल फुटपाथवर पीसीओ व अपंग व्यक्तीस तसेच गटई (चर्मकार) व्यवसाय करणा–या टप–या उघडयासाठी जागा देण्यात येवू नये. फुटपाथवरील जागा केवळ पादचा–यांकरीता राखीव ठेवण्यात यावी.

कोणत्याही व्यवसाय करणेकरीता त्या प्रभागातील नगरसेवक यांची परवानगी घेणे आवश्यक आहे. परंतु अशा प्रकारची परवानगी घेण्यात येत नाही. सबब स्थानिक नगरसेवक यांची परवानगी पत्र नसलयास कोणत्याही प्रकारची व्यवसाय करणेकरीत टपरी उपलब्ध करुन देवु नये.

सदर लक्षवेधी सुचनेचा गांभिर्यपुर्वक विचार करुन पालिका महासभेत चर्चा व्हावी.

---

<u>सदस्या डॉ. निना नाथानी:–</u>मा. महापौर, उप–महापौर, आयुक्त साहेब व सचिव साहेब, मी ही जी लक्षवेधी सूचना मांडलेली आहे, त्या सूचने अन्वये मला हेच सांगायचे आहे की, आपण एसटीडी, पीसीओ बुथसाठी स्टॉल उघडण्याकामी तसेच गटई कामगारांना आपल्या व्यवसायासाठी स्टॉल उभारण्यासाठी आपण जी काही परवानगी देता त्यासाठी संबंधीत विभागाच्या नगरसेवकाची परवानगी घेणे आवश्यक आहे किंवा नाही? माझ्याकडे अशी परवानगी देण्यासाठी ना कुणी आले होते ना मी अशी परवानगी दिली आहे, तरीसुध्दा माझ्या प्रभागामध्ये एकच नाही तर दोन–दोन स्टॉल उभारण्यात आले आहेत. मी या स्टॉलच्या विरोधात नाही, परंतु परवानगी अतिशय आवश्यक आहे. दुसरे असे की, फुटपाथ जो असतो तो पादचा–यांसाठी असतो, त्यांच्या सुरक्षिततेसाठी असतो, जर आम्ही फुटपाथवर असेच एका मागुन एक स्टॉल उभारत राहीलो तर मग पादचा–यांनी कोठुन चालायचे? स्टॉलधारकांना आपण जी जागा देत आहोत, ती काय फक्त फुटपाथवरच दयायची आहे? किंवा स्टॉल उभारण्यासाठी जागा आपणांस दयावयाची आहे? की ते जे सांगतील तेथे जागा दयायची आहे? प्रत्येक प्रभागात किती स्टॉल उभारण्यास परवानगी दिली जावु शकते? माझ्या माहितीप्रमाणे ६४ स्टॉल्स् फुटपाथवर उभारण्यात आले आहेत. यासाठी माझे असे म्हणणे आहे की, प्रत्येक प्रभागात फुटपाथवर फक्त एकच स्टॉल उभारण्यास परवानगी दिली जावी आणि तीही संबंधीत नगरसेवकाच्या परवानगीनेच. माझ्या विभागात गोल मैदानपासुन प्रभाग समिती कार्यालयापर्यंत फुटपाथवर एक नाही तर दोन दोन स्टॉल्स उभारण्यात आले आहेत. यासाठी आपणांस विनंती आहे की, याबाबत यापुर्वी जो ठराव पारीत झालेला आहे, त्यावर विचार करुन सविस्तर खुलासा केला जावा.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>मा. महापौर अथवा पिठासीन अधिकारी :– महोदया, आज याठिकाणी ही जी लक्षवेधी उपस्थित करण्यात आली आहे, तिचा उद्देश असा दिसुन येत आहे की, गौल मैदान येथिल फुटपाथवर या अगोदर असे कित्येक ठराव पारीत करुन अपंग व्यक्तींना एसटीडी, पीसीओ बुथ उभारण्यास तसेच चर्मकार बंधुना आपला व्यवसायासाठी स्टॉल उभारण्यास परवानगी दिली आहे. यापुर्वीच्या ज्या महापौर अथवा पिठासीन अधिकारी :– होत्या, त्यांच्या कालावधीत चर्मकार बंधुना स्टॉल्स उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था केली होती. मा. सदस्या श्रीमती निना प्रकाश नाथानी यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे हे दर्शविले आहे की, गोल मैदान सारखे जे सुदर गार्डन आहे तेथें या चर्मकारांसाठी जी टपरीची व्यवस्था केली जाते ती केली जावु नये. तसेच तेथे पुर्वीपासुनच दोन–तीन पीसीओ बुथ आहेत तसेच काही लोक येवुन फुटपाथवर तेथे महापालिकेची परवानगी न घेता टप–या लावतात. काही लोक तात्पुरता मंडप टाकुन व्यवसाय करत आहेत. परंतु महापालिका त्याकडे लक्ष देत नाही त्यामुळे गोल मैदानच्या सौंदर्याला बाधा पोहचत आहे. उल्हासनगर शहरामध्ये आमच्या गटई कामगार बंधुना छोटे छोटे स्टॉल्स उभारण्याकामी महानगरपालिकेने जी परवानगी दिलेली आहे ती अतिशय चांगले असे काम आहे. त्यांना उदरनिर्वाह करण्यासाठी आणि काम करण्यासाठी त्यातुन प्रेरणा मिळेल. परंतु या व्यतिरिक्त शहराच्या सौंदर्यास बाधा येणार नाही या बाबीचाही आपणांस जरुर विचार करावा लागेल. गटई कामगारांसाठी ७५ ते ८० स्टॉल देण्यासाठी आपण जो ठराव पारीत केलेला आहे. उल्हासनगरमध्ये ७६ नगरसेवक आहेत, त्या प्रत्येक नगरसेवकाच्या प्रभागात एकच स्टॉल लागला पाहिजे. आणि संबंधीत प्रभागाच्या नगरसेवकाशी त्यास सहमती असली पाहिजे. या आशयाचा यापुर्वी पारीत झालेल्या ठरावाची प्रत आता माझ्याकडे आहे. १२/६/२००८ रोजी तो ठराव पारीत केला होता. त्या स्टॉलधारकांना १० हजार रुपये अनुदान देण्याचे सुध्दा ठरविले होते. तसेच आम्ही त्यात एक टीप्स् सुध्दा लिहिली होती जी मराठीत होती, कोणत्याही प्रभागाच्या क्षेत्रात केबीन पुरविणेपुर्वी विद्यमान पालीका सदस्यांची संमती घेणे आवश्यक राहिल. याचे सुचक आहेत श्री. मोहन साधवानी व अनुमोदक आहेत श्री. दिलीप गायकवाड. हा ठराव झाल्यानंतर सुध्दा त्या ठरावाची मी आपणांस प्रत देतो, भलेही ते चर्मकार असोत किंवा गटई कामगारांसाठी स्टॉल असोत त्यांनी कुठल्याही नगरसेवकांची परवानगी घेतली नाही. भलेही स्टॉल लावु दयात

परंतु नगरसेवकांची संमती घेतली पाहिजे. या शहरातील सौंदर्यास बाधा येता कामा नये याकडे लक्ष दिले पाहिजे, धन्यवाद।. मी आपणांस प्रत देत आहे.

सदस्य श्री. बी.बी. मोरे :—सन्माननिय महापौरजी, आयुक्त साहेब, आजचा जो विषय आहे, डॉ. निना नाथानी यांनी जी लक्षवेधी मांडली आहे, त्याबाबत चर्मकार लोकांसाठी जे काही स्टॉल दिले जातात, याबाबत एक ठराव झाला, कल्याणमध्ये रस्तोरस्ते सगळीकडे असेच स्टॉल आहेत. अशा स्टॉलला परवानगी देण्यात आली आहे. कम्प नं. १ ते ५ मध्ये कुठेही स्टॉल उभारण्यास परवानगी देण्यात यावी. फक्त गोल मैदानच्याच परिसरात स्टॉल उभारण्यास परवानगी देण्यात येवु नये. गोल मैदान हे शहराचे नाक आहे. त्याचे सोंदर्य अबाधित राहिले पाहिजे. हे मी सुध्दा मान्य करतो. परंतु जे लोक शिकलेले नसतात अशा लोकांना रोजगार मिळत नाही. असे लोक जर रस्त्याच्या कडेला स्टॉल लावुन काम करु लागले तर ते आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करु शकतात. याबाबतीत माझे असे म्हणणे आहे की, जो व्यक्ती ज्या विभागास राहतो त्यास त्याच विभागात स्टॉल उभारण्यास परवानगी दिली पाहिजे. जर एखादा व्यक्ती चोपडा कोर्ट आंबेडकर नगर येथे राहत असेल तर त्यास कॅम्प नं. ५ मध्ये जागा दिली तर ते बरोबर होणार नाही. तसेही चर्मकारचा जो व्यवसाय आहे तो कोठेही चालु शकतो. या लोकांना स्टॉल उभारण्यास परवानगी दिली नाही तरीही ते रस्त्याच्या कडेला कोठेही बसुन आपला व्यवसाय करुन दिवसाला १०० दिडशे रुपये कमावु शकतात. एकंदरित श्रीमती निना नाथानी यांनी स्टॉल लावण्याविषयी जो विरोध केला आहे तो योग्य असाच आहे. कारण की जो कोणी उठतो तो गोल मैदान येथेच स्टॉल लावतो. चर्मकार समाजाच्या लोकांना रोजगार मिळाला पाहिजे त्यासाठी स्टॉल उभारण्यास परवानगी देण्याबाबत माझी महापौर अथवा पिठासीन अधिकारी :— श्रीमती लिलाबाई आशान यांनी त्यांच्या कार्यकालावधीत जो ठराव पारीत केला तो अतिशय चांगला आहे. परंतु कॅम्प नं. ४ येथे राहणा—या व्यक्तीस गोल मैदान येथे स्टॉल उभारण्यास परवानगी देता कामा नये. कॅम्प नं. ४ येथे जे भाजी मार्केट आहे तेथे परवानगी दिली पाहिजे. प्रत्येकास असे रस्ते वाटुन दिले पाहिजे. किंवा महापालिकेच्या ज्या काही जागा आहेत त्याठिकाणी यांना बसविले जावे. तसा ठराव केला तर त्यास आम्ही सहमत आहोत. आणि या लोकांना जर स्टॉल उभारण्यास परवानगी दिली नाही तर ते लोक बेरोजगार होतील. व ते म्हणतील की, आम्हांला जी रोजी रोटी मिळत होती ती सुध्दा महापालिकेमुळे बंद झाली. दुसरी गोष्ट अशी की, जसे श्री. जमनादास पुरस्वानी यांनी सांगितले की, गोल मैदान हे आमच्या शहराचे नाक आहे, मी सुध्दा ते मान्य करतो. गोल मैदान हे एक उदयान आहे. त्याची व्यवस्थित देखभाल होत आहे काय? श्री. जमनादास पुरस्वानी यांना मी सांगु इच्छितो की, गोल मैदान येथे भगवंती नावानी नावाचा जो स्टेज तयार केला आहे ना, त्याच्या समोर जी जागा आहे ना, त्या जागेपेक्षा माझ्या गावाकडे जी शेती आहे ना तेथिल जागा अतिशय चांगली आहे. गावाकडे बैलांच्या सहाय्याने शेतीची कामे केली जातात म्हणुन तेथिल जागा खराब होवू शकते. परंतु येथे तर माणसे असुन सुध्दा ती जागा एवढी खराब झाली आहे त्या जागेपेक्षा वाईट अशी परिस्थीती भगवंती नावानी स्टेज समोरील जागेची आहे. गावाकडे मेला वगैरे भरतो त्यामध्ये कोणी रॉळ लावतो, पाळणा लावतो तशा प्रकारे याठिकाणी सुध्दा लावले जाते आणि त्या संपुर्ण जागेची वाट लावली जाते आणि तरीसुध्दा श्री. जमनादास पुरस्वानी म्हणतात की, शहरातील हे खुप चांगले असे उदयान आहे. जागा भाडयाने जरुर दया परंतु ती कशाप्रकारे दयायची? त्याबाबतचा विचार महासभेत झाला पाहिजे. महापालिकेच्या कम्प नं. ४ व ५ मध्ये ब—याचशा जागा आहेत. त्यातील एखादी जागा चर्मकार समाजासाठी दिली पाहिजे. या शहरात भुमाफिया नाला सुध्दा सोडत नाहीत. नाल्यावर सुध्दा इमारत बांधतात. परंतु या गरीब लोकांना कोठे ना कोठे जागा दया. त्यांची रोजी रोटी मिळाली पाहिजे. डॉ. निना नाथानी यांच्या लक्षवेधीस माझा विरोध नाही. गोल मैदान हे संपुर्ण शहराचे एकमेव उदयान आहे. ते व्यवस्थित राहिले पाहिजे. शहरातील जेष्ठ नागरीक आणि सेवानिवृत्त लोक फुटपाथवरुन फिरतात त्यांना चालण्यासाठी पुरेसी जागा मिळाली पाहिजे. लोकांना चालण्यासाठी फुटपाथ पाहिजे परंतु त्यामुळे गरीब लोकांचा रोजगार जावुन ते बेरोजगार होता कामा नयेत. शहरातील जी चांगल्यात चांगली जागा त्या लोकांना दिली पाहिजे. धन्यवाद।

सदस्या डॉ. निना नाथानी :— मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब व सचिव साहेब, आपले सन्माननिय सदस्य श्री.बी.बी. मोरे यांनी माझ्या लक्षवेधीस समर्थन दिले त्याबद्दल त्यांना मी धन्यवाद देते. परंतु त्यांनी असे सांगितले की, आपण आपल्या गरीब लोकांना मदत केली पाहिजे. हे १०० टक्के खरे आहे. सर्वांना जागा मिळाली पाहिजे परंतु ते ती देतांना योग्य अये नियोजन झाले पाहिजे. गरीब लोकांना मदत करणे एवढेच महापालिकेचे कर्तव्य नसुन शहरामध्ये पायाभुत सुविधा उपलब्ध करुन देणे हे सुध्दा महापालिकेचे कर्तव्य आहे. पायाभुत सुविधा उध्दवस्त करुन गरीब लोकांना व्यवसायासाठी जागा उपलब्ध करुन दिल्या जात असतील तर हे मात्र काही बरोबर नाही. या लोकांना व्यवसायासाठी जागा दया परंतु त्याचे योग्य असे नियोजन करुनच दया.

**सदस्य श्री. लाल पंजाबी :—**मा. महापौर, उप–महापौर, अतिरिक्त आयुक्त आणि माझे सहकारी मित्रहो, हा जो विषय चालला आहे त्याबाबत डॉ. निना नाथानी, श्री. जमनादास पुरस्वानी, श्री. बी.बी. मोरे यांनी सांगितले, परंतु याबाबत जेव्हा २००८ मध्ये ठराव पारीत होत होता त्यावेळेस सर्वांची भावना अशी होती की, चर्मकार बंधुना स्टॉल मिळाले पाहिजेत. परंतु ते नगरसेवकांच्या सहमतीने मिळाले पाहिजेत. ते यासाठी की नगरसेवकास माहित पडते की, माझ्या प्रभागात या व्यवसायासाठी योग्य जागा कोणती आहे? डॉ. नाथानी यांच्या प्रभागात दोन स्टॉल लागलेले आहेत. ते लावतांना संबंधीत नगरसेवकास विचारणा सुध्दा करण्यात आलेली नाही. त्यांना विचारले असते तर कदाचित ही वेळ आली नसती. आज या ठिकाणी स्टॉल लागलेले आहेत उदया कदाचित दुस–या प्रभागांमध्ये स्टॉल लागणार आहेत. ज्याप्रकारे ठराव पारीत झाला आहे, त्याप्रमाणे त्याची अंमलबजावणी झाली पाहिजे असे सर्वांचे म्हणणे. आता जे स्टॉल लावण्यात आलेले आहे ते हटवुन संबंधीत नगरसेवकाची सहमती घेवुन लावले पाहिजे अशी माझी अपेक्षा आहे. याबाबत आयुक्त साहेबांनी आपली भुमिका स्पष्ट करावी.

**सदस्य श्री. बी.बी. मोरे:—**श्री. लाल पंजाबी हे आमचे वरिष्ठ नगरसेवक आहेत. त्यांनी सांगितले त्याचबरोबर श्री. जमनादास पुरस्वानी यांनी सुध्दा सांगितले की, संबंधीत प्रभागाच्या नगरसेवकाची संमती घेवुन स्टॉल लावले पाहिजे. सर्वच नगरसेवक नाहीत परंतु काही नगरसेवक असे आहेत, ते आपल्या लोकांना सांगतात की, अमुक या व्यक्तीने आपल्या प्रभागामध्ये जी कॅबिन टाकलेली आहे तेथे जावुन या चपलांना शिलाई करुन आणा. असे केले तर बिचा–या त्या चर्मकाराचा धंदा ठप्प होवून जाईल असे होता कामा नये. नगरसेवकाने एकदा संमती दिल्यानंतर मग तो चर्मकार कोठेही बसु दया, व त्याला त्याचा धंदा व्यापार करु दया. नगरसेवकास विचारले पाहिजे त्याची परवानगी असली पाहिजे असे जर म्हणत गेलो तर उदया सकाळ तो नगरसेवक त्या चर्मकाराच्या व्यवसायामध्ये आपला काही हिस्सा ठेवेल. असे होता कामा नये. याकडे कृपया लक्ष दिले जावे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**आयुक्त साहेब, मी महापौर अथवा पिठासीन अधिकारी :— महोदयांकडे ठराव दिला आहे. त्यामध्ये आणखी एक विषय होता की, चर्मकार लोकांना स्टॉलसाठी १०–१० हजार रुपये अनुदान दयायचे होते त्याचे काय झाले? त्यांना १०–१० हजार रुपये अनुदान देण्यात आले की, त्यांनी स्वत: आपले स्टॉल उभारले आहे. हे लक्ष दिले पाहिजे.

**सदस्य श्री. राजेश वधारिया :—**मा. महापौरजी, डॉ. निना नाथानी यांनी जी लक्षवेधी दिली आहे, त्याबद्दल मी हे सांगु इच्छितो की, कोणत्याही फुटपाथवर किंवा रस्त्याच्या मध्ये नागरीकांना जाण्या येण्यासाठी तसेच वाहतुकीला अडथळा होवू नये म्हणुन जितका रुंदीचा रस्ता तयार करण्यात आलेला आहे किंवा फुटपाथ तयार करण्यात आलेला आहे, त्यामध्ये कोणताही अडथळा आणता कामा नये. ज्यामुळे पादचा–यांना व वाहतुकीला गैरसोयीचे होते. दुंसरे काही सदस्याने म्हटले की, गोल मैदान हे आमच्या शहराचे नाक आहे. नाक खराब होवु नये, हात आणि पाय खराब झाले तर चालतील काय? शरीराचे सर्व अवयव चांगले राहिले पाहिजे. तर जो काही निर्णय होईल तो संपुर्ण शहरात लागु झाला पाहिजे. आता यामध्ये असा एक मुद्दा निघाला की, संबंधीत प्रभागाच्या नगरसेवकाची संमती असली पाहिजे. परंतु कित्येकवेळा असे आहे की, निवडुन आलेल्या नगरसवेकाचे त्या विभागातील नागरीकांशी पटत नाही. किंवा तो नगरसेवक ठराविक लोकांना स्टॉल लावु देत नाही. स्टॉल लावण्यास परवानगी देण्याचा अधिकार आयुक्तांचा आहे तो आयुक्तांकडेच राहिला पाहिजे धन्यवाद।

**सदस्य श्री. सतिश चहाळ :—**महापौर अथवा पिठासीन अधिकारी :— महोदया आणि आयुक्त साहेब, डॉ. निना नाथानी यांनी हा जो मुददा येथे उपस्थित केला आहे, त्यामागे शहर सुधारण्याची त्यांची भावना आहे. तसे आपले विरोधी पक्ष नेता यांनी सांगितले की, गोल मैदान हे आपल्या शहराचे नाक आहे. परंतु प्रत्यक्षात उल्हासनगर शहरामध्ये वर फिरुन पाहिले तर काही ठिकाणी रस्त्याच्या मधोमध टप–या टाकुन लोक व्यवसाय करतात. परंतु महापालिकेच्यावतीने त्यांच्यावर काहीच कार्यवाही होत नाही. आणि काही लोक तर मच्छीसुध्दा रस्त्यामध्ये घेवुन विक्रीस बसतात. काही मटणाची दुकाने आहेत त्यांचे गाळ जरी असले तरी टप–या रस्त्यावर लागतात. त्यामुळे फक्त गोल मैदानचाच विचार न करता संपुर्ण शहरातील स्वच्छतेचा विचार करुन शहर चांगले कसे होईल याकडे लक्ष देवुन तसेच चर्मकारांना टप–यांसाठी ज्या काही जागा दयायच्या आहेत त्या प्रत्येक प्रभागामध्ये एखादी जागा आरक्षित करुन दिल्यास चांगले होईल. आणि शहराचा विचार करुन संपुर्ण शहराचा सर्व्हे करावा ही नम्र विनंती.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :</u>—सन्माननिय महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब आणि सचिव साहेब, डॉ. निना नाथानी यांनी जी लक्षवेधी मांडली आहे, त्यानुसार गोल मैदान संदर्भात सर्व सदस्य जागृत झाले आहेत. मी कित्येकवर्षापासुन बघत आलेलो आहे, गोरगरीबांना असे स्टॉल कधीच देण्यात आलेले नव्हते. आमच्या माजी महापौर अथवा पिठासीन अधिकारी :— श्रीमती लिलाबाई आशान यांनी चर्मकार बंधुना स्टॉल उपलब्ध करुन दिले. त्यामुळे ज्या लोकांना रोजगार नव्हता त्या लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. चर्मकार लोकांची परिस्थिती एवढी नाजुक आहे की ते हातावर कमवतात आणि पानावर खातात. त्यांनी जे स्टॉल बनविले आहेत ते मी पाहिले ते त्यांनी स्वत:च्या पैश्यातुन बनविले आहे आणि अतिशय चांगले बनविले आहेत. पुर्वी ते रस्त्यावर बसायचे रस्ता अडवुन बसायचे. आज त्याठिकाणी स्टॉल उभा राहिला आहे. महानगरपालिकेला दिडशे रुपये महिन्याला भाडेही मिळत आहे. या लोकांना आणखी स्टॉल उभारण्यास परवानगी दया. आणि रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी प्रोत्साहन दया.

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर :</u>—मा. महापौर, आयुक्त साहेब आणि सचिव साहेब, दिनांक १२/६/२००८ रोजी आपण एक ठराव पारीत केला होता. आपल्या माजी महापौर अथवा पिठासीन अधिकारी :— यांनी गटई कामागारांना लायसन्स उपलब्ध करुन देण्याचे खुप चांगले काम केले होते. त्याबद्दल त्यांचे मी अभिनंदन करतो. त्या ठरावामध्ये एकदम स्पष्टपणे लिहिलेले आहे, उल्हासनगर महानगरपालिकेने वेळोवेळी ठरविलेल्या ना परवाना क्षेत्रात नो पार्किंग झोन स्टॉलसाठी परवानगी दिली जाणार नाही. दुसरे असे लिहिले आहे की, स्टॉलसाठी परवानगी देतांना १०० रुपये परवानगी दिली जाईल. नुतनीकरण करण्याकरीता २५ रुपये फी आकारली जाईल. गटई कामगार यापुर्वी आपल्या खांदयावर बॅग घेवुन गल्लोगल्ली फिरत होते. त्यांना व्यवसायासाठी हक्काची जागा नव्हती. लायसन्स नव्हते. आपल्या महासभेने एक ठराव पारीत करुन त्यांना हे सर्व करुन दिले. शहर सुंदर असले पाहिजे आणि त्यासाठी डॉ. निना नाथानी यांनी जी लक्षवेधी मांडली आहे, त्याबाबतीत सांगु इच्छितो की, आपल्या शहरामध्ये जे गटई कामगार गरीब लोक राहतात त्यांचेही पोट भरले पाहिजे. गोल मैदान हे शहराचे नाक आहे असे श्री. मोरे साहेबांनी सांगितले. परंतु त्याबद्दल असे सांगतो की, त्याच गोल मैदानच्या सभोवताली वडापाव, पाणीपुरी यांच्या शेकडो हातगाडया लागतात. त्याचे काय? फक्त गटई कामगारांची अडचण येते असे काही आहे काय? गोल मैदानला लोकांना चालायला रस्ता नाही. तेथे लोक अंगाला धक्के मारुन जातात. तेथे एक पेटीसवाला आहे तो रस्त्यापर्यंत पेटी विकतो. हातगाडीवाल्याने लाखो रुपये कमवायचे आणि गरीब बिचा—या गटई कामगाराने एक रुपया सुध्दा कमवायचे नाही. हे चुकीचे आहे. डॉ. निना नाथानी यांच्या लक्षवेधीचे मी समर्थन करतो. त्यांचे म्हणणे आहे की, गटई कामगारांनी एकाच ठिकाणी ओळीने पाच, पाच, सहा, सहाजणांनी न बसता, जी जागा पार्किंगसाठी असेल रहदारीसाठी असेल, अडथळा आणणारी नसेल अशा ठिकाणी बसावे. ती जागा सोडुन जेथे जागा असेल ती त्यांना देण्यात यावी. अधिका—यांनी त्या जागेचे स्वत: जावुन परिक्षण करावे. परिक्षण करुन संबंधीत नगरसेवकाला विश्वासात घेवुन जागा उपलब्ध करुन दयावी धन्यवाद।

<u>सदस्या डॉ. निना नाथानी :</u>—मा. महापौरजी, मी वारंवार हेच म्हणत आहे जसे आमचे सन्मानिय सदस्य म्हणत आहेत की, गटई कामगार गरीब आहेत, ते रस्त्याच्या कडेला बसुन व्यवसाय करतात व आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवितात. त्यांच्यासाठी माजी महापौर अथवा पिठासीन अधिकारी :— श्रीमती लिलाबाई आशान यांनी जे प्रयत्न केले त्याबद्दल त्यांचे मी मनापासुन अभिनंदन करते. माझे एकच म्हणणे आहे की, जागांचे वाटप करण्याची जी पध्दती आहे ती बरोबर नाही. प्रत्येक प्रभागात जर एकएक स्टॉलसाठी जागा दिली तर ते जास्त सोयीस्कर आणि चांगले होईल. परंतु माझ्या प्रभागात तीन, तीन, चार, चार स्टॉल लावले आहेत. दोन स्टॉलमध्ये अंतर नाही. भगवंती नावानी स्टेजचे जे मुख्य प्रवेशद्वार आहे त्याच्या आजुबाजुलाच दोन स्टॉल आहेत. हे बरोबर आहे कि चुकीचे आहे. स्टॉल उभारण्याच्या विरोधात मी नाही. परंतु त्यासाठी एक कार्यपध्दती ठरवुन दिलेली पाहिजे. असे मला वाटते. धन्यवाद।

<u>सदस्य श्री.नरेंद्र राजानी:</u>—मा. महापौरजी, आपल्या लोकशाही व्यवस्थेमध्ये प्रत्येक विषयास कोणत्या ना कोणत्या सामाजिक दृष्टीकोनातुन पाहिले जाते. हा विषय चर्मकार समाज आणि गोल मैदानची सुंदरता एवढया पुरतीच मर्यादीत नाही, येथे गरीबी आणि सुंदर शहराविषयीचा विषय निर्माण होतो. तर ही गरीबी कुण्या एखादया विशिष्ट समाजाशीच निगडित आहे असे नाही. गरीबांसाठी, अपंगांसाठी महानगरपालिकेने व्यवस्था करायची असते. त्यासाठी नियम आहेत, पर्याय आहेत व त्यांच्यासाठी व्यवस्था केली पाहिजे. परंतु येथे कोणतीही जमिन कुण्या एखादयास देण्याविषयीची मान्यतेचा विषय आहे. त्या मान्यतेनुसार एक, दोन किंवा तीन अशा ज्या काही स्टॉलना आपण परवानगी देणार आहोत, त्यावर भविष्यात असाही विचार होवु शकतो की, जेथे दोन स्टॉलसाठी परवानगी देण्यात आली आहे तेथे तीन स्टॉलसाठी परवानगी दिली जावी. किंवा चार स्टॉलना

परवानगी दिली तर काय फरक पडेल असाही विचार होवु शकतो. असा प्रकारची व्यवस्था या शहरासाठी योग्य होणार नाही. त्यामुळे शहरातील वाहतुकीस, पादचा–यांना जागा उपलब्ध होवु शकणार नाही. शहरामध्ये अव्यवस्था पसरते. पुढील हे सर्व दृष्टीकोन लक्षात घेता आमच्या सदस्या श्रीमती निना नाथानी यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे हा जो विषय येथे मांडलेला आहे तो अतिशय योग्य असा आहे. तरीही गरीबांसाठी, मी सर्वसामान्य गरीबांबाबत बोलत आहे. समाजासाठी बोलत नाही. गरीबांसाठी ब–याचशा व्यवस्था, योजना आहेत. महानगरपालिकेने त्या कार्यान्वीत केल्या पाहिजेत. धन्यवाद।

**श्री. अशोककुमार रणखांब (अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–**मा. महापौर अथवा पिठासीन अधिकारी :– महोदया, मा. सदस्या डॉ. निना नाथानी यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे जो विषय येथे मांडला आहे आणि चर्चेत दोन–तीन वेळा हस्तक्षेप करुन त्यांनी जी भुमिका मांडली आहे ती योग्य अशी आहे. त्यांचे म्हणणे आहे की, स्टॉलसाठी जागा वाटप करण्याचे जे धोरण आहे ते योग्य प्रकारे अंमलात आले पाहिजे. जर एकाच ठिकाणी सर्व स्टॉलधारकांना परवानगी दिली तर वाहतुकीसाठी अडचणीचे होवु शकते, असे त्यांचे म्हणणे आहे. त्यानंतर त्यावर आमचे विरोधी पक्षनेता यांनी सविस्तर चर्चा केली आहे, तसेच इतर सदस्यांनीही सविस्तर चर्चा केली आहे. व त्याबाबत यापुर्वी पारीत झालेला दिनांक १२/६/२००८ रोजीचा ठराव आता आमच्याकडे उपलब्ध आहे. त्या ठरावात पाच अटी अंतर्भुत केलेल्या आहेत. व कोणतीही कॅबीन कोणत्याही ठिकाणी ठेवण्यासाठी संबंधीत प्रभागाच्या नगरसेवकाची संमती आवश्यक आहे. अशी त्या ठरावाच्या शेवटी नोंद आहे आता या विषयावर जी काही चर्चा झाली आहे ती लक्षात घेता, यापुढे कोणताही स्टॉलसाठी परवानगी देण्याबाबतचा प्रस्ताव मालमत्ता विभागाकडुन जेव्हा सादर करण्यात येईल त्यावेळेस त्या विभागांनी या सर्व बाबींची पुर्तता करायची आहे. संबंधीत प्रभागाच्या नगरसेवकांची परवानगी घ्यायची आहे. व त्या जागेसंबंधी चौकशी करतांना ती जागा वाहतुकीस अडथळा करत नाही ना याचा विचार करुनच मालमत्ता विभागाने त्याच्यावर कारवाई करायची आहे.

**सदस्य श्री.बी.बी. मोरे :–**आता आपण म्हटलात की, नगरसेवकाची परवानगी घेतली जावी तर या बाबीस माझा विरोध आहे.

**सदस्य श्री. विनोद ठाकुर :–**परवानगी नाही, संमती आहे.

**सदस्य श्री.बी.बी. मोरे :–**प्रभाग क्र. ८ मध्ये आमचे श्री. पवार आहेत मी असा विचार करेल की, त्यांच्या प्रभागात जर स्टॉल उभारला जात असेल तर मला त्याबद्दल वाईट वाटते नाही, तो स्टॉल दुस–या प्रभागात उभारला पाहिजे. म्हणुन याबाबत नगरसेवकांमध्ये संघर्ष होत असतो. यासाठी हा मुद्दा नगरसेवकांवर न सोडता त्याबाबतीत माझी अशी सूचना आहे की............

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :–**श्री. मोरे साहेब, याबाबत ठराव आहे. ठराव बदली करता येत नाही.

**सदस्य श्री. बी.बी. मोरे :–**ठराव जरी असला तरी त्यामध्ये आपण परिवर्तन करु शकतो.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :–**तसा प्रस्ताव आणावा लागेल. आता विषय नाही आहे तो. आता लक्षवेधी पुरता मर्यादीत आहे. मा. महापौर, उप–महापौर अथवा पिठासीन अधिकारी :– आणि आयुक्त साहेब, डॉ. निना नाथानी यांनी मांडलेली लक्षवेधी सूचना त्यावरील चर्चा, मागे महापौर अथवा पिठासीन अधिकारी :– श्रीमती लिलाबाई आशान यांनी एक प्रस्ताव महासभेसमोर आणला होता. गटई कामगाराविषयी त्यांना असलेली तळमळ सभागृहासमोर ठेवल्यानंतर सभागृहाने तो विषय उचलुन धरला आणि त्यांना १०,००० रुपये अनुदानासह जागा उपलब्ध करुन देण्यासाठी एक ठराव पारीत केला. आणि आता त्या ठरावाची अंमलबजावणी केली. त्याबाबत आयुक्त साहेबांनी स्पष्ट सांगितले की, कोणत्याही प्रभागाच्या क्षेत्रात कॅबीन पुरविण्यापुर्वी विद्यमान पालिका सदस्याची संमती घेणे आवश्यक राहिल. अडचण हिच होते की, महासभा जेव्हा एखादा ठराव संमत करते त्याची अंमलबजावणी करतांना प्रशासन दुर्लक्ष करते त्यामुळे असे हे प्रश्न उद्‌भवतात. सुरुवातीला जर संबंधीत नगरसेवकाची संमती घेतली असती ठराव केलेला आहे परंतु त्याची अंमलबजावणी करतांना तुम्ही कोणतीही काळजी घेत नाही त्यामुळे हा प्रश्ननिर्माण होतो. मला असे वाटत नाही की, यापुर्वी डॉ. निना नाथानी किंवा अन्य कुठल्या नगरसेवकाची परवानगी घेतली आहे काय? संपुर्ण सभागृह सागेल की, कोणत्याही सदस्याची संमती घेतलेली नाही. आणि त्यामुळे ही गडबड होत आहे. असाच प्रकारे पुर्वी अपंग लोकांना बुट पुरविण्याची योजना होती, मला वाटते ती आता बंद पडली आहे.

त्याचे कारण म्हणजे असाच निष्काळजीपणा ज्यांना दिले त्यांचेवर काही पर्यवेक्षण नाही, कोण चालवितो, कोण बघतो, जे अपंग आहेत ते बाजुलाच राहिले, जे अपंग नाहीत, सक्षम आहेत असेच लोक त्याठिकाणी कॅबीन चालवित आहेत. ज्या अपंगांना कॅबीन मंजुर केल्या त्यांचे निधन झाले आहे त्यांचे नावावर दुसरेच लोक कॅबीन चालवित आहेत. आणि आता नविन जे लाभार्थी आहेत त्यांचे काय करणार? त्यासाठी अंमलबजावणी करतांना दक्षता घ्या. नाहीतर त्याचे विपरित परिणाम काय होतील? कोणत्याही ठरावाचे जसे चांगले परिणाम आहेत तसे वाईट परिणाम काय? वाईट परिणाम होवु नयेत आणि असलेली योजना किंवा मंजुर केलेला ठराव हा जास्तीत जास्त चांगल्यापध्दतीने कसा राबविता येईल कशी अंमलबजावणी करता येईल याकडे लक्ष दया. तसे दुर्देवाने होत नाही. यासाठी यापुर्वी ज्या चुका झालेलया आहेत त्या पुन्हा न होवु देता, वाहतुकीला अडथळा येणार नाही याप्रकारची काळजी घेवुन ठरावाची काटेकोरपणे अंमलबजावणी करुन जास्तीत जास्त लोकांना अनुदानासह फायदा मिळावा. अनुदान आम्ही मंजुर केलेले आहे. त्या लोकांच्या उदरनिर्वाहचे साधन महापालिकेने तयार करुन दिलेले आहे. कॅबीन तयार करुन देण्यासाठी १० हजार रुपयाचे अनुदान दिलेले आहे. हे सारे करतांना कोणतेही अडथळे येणार नाहीत याची दखल घ्या.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :–</u>१९९७ मध्ये जेव्हा मी नगरसेवक म्हणुन निवडुन आलो आणि त्यावेळेला श्री. नारायण पंजाबी हे देखिल नगरसेवक म्हणुन निवडुन आले होते, त्यावेळेला आमचा एक कार्यकर्ता ज्याच्या हाताची बोटे तुटली आहेत, अपंग आहे, काम करु शकत नाही. श्री. कांबळे नावाचा तो कार्यकर्ता त्याने एस टी डी बुथसाठी परवानगी मिळणे बाबत येथे तर अर्ज केलेच केले मंत्र्यांपर्यंत अर्ज केले. त्याचबरोबर नगरसेवकाकडे सुध्दा अर्ज केले, नगरसेवकाने आयुक्तांना सांगितले की याला येथे स्टॉल उभारण्यासाठी परवानगी दयायची नाही. त्यानुसार त्यास आजपर्यंत परवानगी मिळालेली नाही. आणि हे तुम्हां सर्व सदस्यांच्या आणि सभागृहाच्या निदर्शनास का आणुन देत आहे की एखादा नगरसेवक दुस–या कुणाचा माणुस असला तर त्याला विरोध करतो. याबाबत यापुर्वी जर ठराव झाला असेल तर ती महापालिकेची चुक आहे. आमच्या आबा साहेबांनी सांगितले की, महापालिका आजपर्यंत जे काही करत आली ती चुकीचे करत आली आहे. आणि सन्माननिय नगरसेवकांची सहमती घेवुन जर काही काम केले असते तर ही अशी परिस्थिती आली नसती. श्री. नारायण पंजाबी यांनी त्या अपंग कार्यकर्त्याला एसटीडी बुथ उभारण्यास परवानगी दिली नाही त्यामुळे तो अपंग कार्यकर्ता आता भिक मागण्याच्या स्थितीत आला आहे. ही सर्व परिस्थिती मी सर्व सन्माननिय सदस्यांच्या आणि सभागृहाच्या निदर्शनास आणुन देत आहे.

<u>सदस्या डॉ. निना नाथानी :–</u>मा. महापौरजी, माझ्या प्रभागामध्ये दोन स्टॉल उभारण्यात आले आहेत असे मी सांगितले परंतु प्रत्यक्षात ३ स्टॉल उभारण्यात आले आहे. तिस–या स्टॉलचे उदया उद्घाटन आहे. जे पत्र कार्यालयात पडले होते ते मी पाहिले. त्याबाबत कुणी परवानगी घेतली नाही. आराधना इमारती समोरचा एसटीडी बुथ हा सुध्दा माझ्याच प्रभागात येतो, त्याच बरोबर भगवंती नावानी स्टेजच्या बाजुला दोन असा प्रकारे तीन स्टॉल माझ्या प्रभागात येतात. एक एक प्रभागात तीन तीन स्टॉल माझ्या प्रभागात येतात. मी गटई कामगारांच्या विरोधात नाही परंतु एका नंतर एक असे करत एकाच प्रभागात तीन तीन स्टॉलला परवानगी देणे हे कुठपर्यंत योग्य आहे? याबाबत प्रशासनाच्यावतीने काहीतरी पध्दत तर असली पाहिजे. धन्यवाद।

<u>श्री. अशोककुमार रणखांब (अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–</u>मालमत्ता विभागाने या लक्षवेधीबाबत नोंद घ्यावीत. व यापुढे कोणत्याही प्रस्तावाची कार्यवाही करतांना याबाबतच्या ठरावाची प्रथम कार्यवाही करावी.

<u>महापालिका सचिव:–</u>लक्षवेधी सुचना क्र. २ जीचे सुचक आहेत श्री. चंद्रशेखर यादव व अनुमोदक आहेत श्रीमती जयश्री सुर्वे

लक्षवेधी सुचना याप्रकारची आहे.....................

---

## <u>लक्षवेधी सूचना क्रमांक २</u>

सुचकाचे नाव :– श्री. चंद्रशेखर यादव
अनुमोदकाचे नाव :– श्रीमती जयश्री सुर्वे

**विषय :—** उल्हासनगर कॅम्प ३ व ४ ला जोडणा—या आकाश मार्गीकेचे (स्कायवाक) साठी नविन विकास आराखडयानुसार रस्त्यांचे रुंदीकरण करणे तसेच उल्हासनगर रेल्वे स्टेशनजवळ परिवहन सेवेच्या बसेस थांबविण्यासाठी रस्त्याचे रुंदीकरण करणे बाबत.

उल्हासनगर महानगरपालिका व मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण यांचे संयुक्त विद्वमाने उल्हासनगर कॅम्प नं. ३ व ४ ला जोडणा—या आगाशमार्गीकेचे (स्कायवाक) उद्घाटन करण्यात आले आहे. परंतु उल्हासनगद (पुर्व) येथिल रेल्वे स्टेशन ते लाल चक्की विर सावरकर मार्ग व रेल्वे स्टेशन ते कोयडे पुतळयापर्यंतचे आकाशमार्गीकेचे कामात काही दुकाने बाधित होत असून सदरची दुकाने निष्कासित केल्याशिवाय नविन डीपीप्रमाणे रस्त्याचे रुंदीकरण केल्याशिवाय आकाशमार्गीकेचे काम सुरु होवू शकणार नाही.

तसेच उल्हासनगर महानगरपालिकेने बी.ओ.टी. तत्वावर परिवहन सेवेचा प्रस्ताव राज्य शासनाकडे सादर केला होता. त्यास मान्यता मिळाली असून परिवहन सेवा सुरु करणेसाठी निविदा मागवून मंजुर करण्यात आली असल्याने नजिकचे काळात बस सेवा सुरु होत असून त्या उलहसनगर रेल्वे स्टेशनजवळ परिवहन सेवेच्या बसेस थांबविण्यासाठी स्टेशन जवळीलरस्ता रुंदीकरण करणे आवश्यक व गरजेचे आहे. यामुळे बससेवा रेल्वे स्टेशनपर्यंत पोहचून मुख्यत्वे करुन महिला व नागरीकांची गैरसोय दुर होणार आहे.

आकाशमार्गीचा तसेच परिवहन सेवेचा प्रश्न हा शहरातील नागरीकांचे जिव्हाळयाचा प्रश्न असल्याने महासभेत सदर लक्षवेधी सूचनेवर चर्चा होवून उल्हासनसगर (पुर्व) येथिल रेल्वे स्टेशन ते लालचक्की, वीर सावरकर मार्ग व रेल्वे स्टेशन ते कोयडे पुतळयापर्यंतचे आकाशमार्गीकेचे कामांत अडथळा ठरणारी बांधकामे निष्कासित करणेची कारवाई प्रशासन केव्हा पुर्ण करणार व आकाश मार्गीकेचे कामास कधी सुरुवात करणार याबाबत खुलासा होण्यास विनंती.

---

<u>सदस्य श्री. चंद्रशेखर यादव :—</u>मा. महापौर अथवा पिठासीन अधिकारी :— महोदया, मा. आयुक्त साहेब, एमएमआरडीएच्या सहयोगाने व महापालिकेच्या प्रयत्नाने उल्हास स्टेशन ते कोएंडे पुतळा व वीर सावरकर चौक ते स्टेशन असा एक स्कायवाक पास झाला आहे त्याचे काम अजुनपर्यंत चालु का नाही केले? याचा प्रशासनाने महासभेसमोर खुलासा करावा ही विनंती.

<u>सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे :—</u>मा.महापौर अथवा पिठासीन अधिकारी :— महोदया, मा. आयुक्त साहेब, ही लक्षवेधी महत्वपुर्ण आहे. रेल्वे स्टेशन समोरील रस्ता रुंदीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे. स्कायवाक झाल्यास महिला व नागरीकांची गैरसोय दुर होणार आहेत. कामात अडथळा निर्माण करणारी बांधकामे निष्कासित करण्याची कारवाई प्रशासन केव्हा पुर्ण करणार आहे? खुलासा व्हावा.

<u>सदस्य श्री. चंद्रशेखर यादव :—</u>मा. महापौर अथवा पिठासीन अधिकारी :— महोदया, मी २ वर्षाच्या कालावधीत पहिल्यांदाच लक्षवेधी सूचना मांडलेली आहे त्याचे उत्तर मिळावे.

<u>श्री. आर.बी. शिर्के (प्र. शहर अभियंता):—</u>सन्माननिय महापौर, उप—महापौरजी, सन्माननिय आयुक्त साहेब, सचिव साहेब आणि सन्माननिय सर्व नगरसेवक उल्हासनगर मध्ये जो स्कायवाक होत आहे तो एमएमआरडीएकडुन बांधला जात आहे. उल्हासनगर महानगरपालिकेने उल्हासनगर स्टेशनच्या पुर्व आणि पश्चिमेला त्यासाठी जी जागा दाखविली, त्यामध्ये पश्चिमेला काही अडचण निर्माण झालेली नाही परंतु पुर्वेकडे कॅम्प नं. ४ च्या स्टेशनच्या बाजुला जी दुकाने आहेत ती या कामामध्ये बाधित होत आहे. यासाठी नगररचना विभागाने मार्किंग दिली होती. हा विषय नगरचना विभागाशी संबंधीत आहे. आज नगररचनाकार उपस्थित नसल्यामुळे मी उत्तर देत आहे. नगररचना विभागाने याकामी मार्किंग दिली होती परंतु तिच्यामध्ये नंतर त्यांना काही चुक आढळुन आली आहे आणि पुन्हा मार्किंग करण्यासाठी काल ते गेले होते. परंतु नगररचनाकार उपस्थित नसल्यामुळे मार्किंग करता आली नाही. नगररचनाकारांच्या उपस्थितीतच त्यांचे अधिनस्थ कर्मचारी त्याठिकाणी मार्किंग देणार आहेत आणि तीही ३० फुट रुंदीप्रमाणे देणार आहेत. त्या मार्किंगप्रमाणे जी दुकाने बाधित होती त्याप्रमाणे रस्त्याचे रुंदीकरण होवून स्कायवाकचे काम चालु होणार आहे.

<u>सदस्य श्री. चंद्रशेखर यादव :—</u> नविन डीपीप्रमाणे ४० फुट रुंदीचा रस्ता आहे तो?

<u>श्री. आर.बी. शिर्के (प्र. शहर अभियंता):—</u>मंजुर विकास आराखडयाप्रमाणेच आपण कार्यवाही करत आहोत.

<u>सदस्य श्री. नरेद्रं राजानी :—</u>विषय असा आहे की  विकास आराखडयाप्रमाणे रस्त्याची रुंदी किती फुटाची असते?

<u>श्री. आर.बी. शिर्के (प्र. शहर अभियंता):—</u>मंजुर विकास आराखडयाप्रमाणे ३० फुट रुंदीचा तो रस्ता आहे.

<u>सदस्य श्री. नरेंद्र राजानी:—</u>मला हे सांगा की, विकास आराखडयातील रस्ता किती फुट रुंदीचा असतो?

<u>श्री. आर.बी. शिर्के (प्र. शहर अभियंता):—</u>वेगवेगळया रुंदीचे रस्ते असतात.

<u>सदस्य श्री. नरेंद्र राजानी :—</u>अंदाजे सांगा.

<u>श्री. आर.बी. शिर्के (प्र. शहर अभियंता):—</u>२५ फुट रुंद ते १०० फुट रुंदीचे रस्ते असतात.

<u>सदस्य श्री. नरेंद्र राजानी :—</u>विकास आराखडयामध्ये कुठेही ४० फुट रुंदीपेक्षा कमी फुट रुंदीचा रस्ता असतो काय?

<u>श्री. आर.बी. शिर्के (प्र. शहर अभियंता):—</u>३० फुट रुंदीचा आहे.

<u>सदस्य श्री. नरेंद्र राजानी :—</u>आहे बाबत मी बोलत नाही.  नविन विकास आराखडयामध्ये ४० फुट रुंदीचा आहे की ३० फुट रुंदीचा आहे?

<u>श्री. आर.बी. शिर्के (प्र. शहर अभियंता):—</u>नविन विकास आराखडयामध्ये तो रस्ता ४० फुट रुंदीचा असल्याचे मला माहित आहे.  परंतु आता येथे नगररचनाकार नाहीत.  नविन विकास आराखडा अदयाप कार्यान्वीत झालेला नाही.  ४० फुंट रुंदीच्या हिशोबाने प्रथम त्यांनी मार्किंग दिली होती परंतु तेथे काही अडचणी निर्माण झाल्यामुळे जो मंजुर विकास आराखडा आहे त्यानुसार आताच ते मार्किंग देणार आहेत.

<u>सदस्य श्री. नरेंद्र राजानी:—</u>कुणाच्या घर दुरुस्तीचा नकाशा मंजुर करता किंवा नविन घर बाधंण्याबाबतचा नकाशा मंजुर करता त्यावेळेस कोणता विकास आराखडा समोर ठेवता, दोन्ही विकास आराखडे समोर ठेवुन ज्यामध्ये महानगरपालिकेचा अधिकाधिक लाभ व्हावा हे गृहित धरले जाते हे बरोबर आहे की चुक आहे?

<u>श्री. आर.बी. शिर्के (प्र. शहर अभियंता):—</u>ते नगररचना विभागाचे काम आहे.

<u>सदस्य श्री. नरेद्रं राजानी :—</u>नाही हे बरोबर आहे की चुक आहे? शहरामध्ये राहणारे सर्वसामान्य नागरीकांना हे माहित आहे की, आपल्या शहरामध्ये दोन विकास आराखडे एकाच वेळेस चालु आहेत.  हा संपुर्ण देशात पहिलाच प्रकार आहे. व तो शेवटचा असला पाहिजे, जेव्हा दोन विकास आराखडे समोर ठेवुन बांधकाम नकाशा मंजुर केला जातो.  ज्यामध्ये महानगरपालिकेस जादा फायदयाचे असेल त्यासच मंजुरी दिली जाते.  तर मग रस्ता तयार करण्यासाठी किंवा स्कायवाक तयार करण्यासाठी कमी रुंदीची दर्शविलेला विकास आराखडा का गृहित धरला जातो?  स्टेशनकडे जो रस्ता जातो तो रस्ता साधारणत: रुंदी असला पाहिजे की, अरुंद असला पाहिजे.  कुठल्याही शहराची सुंदरता त्या शहराच्या स्टेशनमधुन बाहेर निघाल्यानंतर दिसुन येते की हे शहर कसे असेल?  शहरामध्ये जाण्याची आवश्यकता पडत नाही.  येथे कॅम्प नं. ४ च्या बाजुने बाहेर पडल्यानंतर एवढे अरुंद रस्ते आहेत, स्टेशनच्या बाहेरील रस्ता एवढा अरुंद आहे, येथे स्कायवाक तयार करण्याची आपणांस एक संधी मिळाली आहे, ती पाहता ४० फुट रुंदी ऐवजी ३० फुट रुंदीचा रस्ता तयार करण्याचा आपण विचार करत आहोत.  कदाचित दुकानदारांचे नुकसान होईल.  परंतु कोणत्याही शहरास किंवा देशास सुंदर बनविण्यासाठी काही लोकांना नुकसान सहन करावे लागते.  काही ना काही त्याग करावा लागतो.  त्या दहा पंधरा दुकानदारांसाठी शहराच्या सौंदर्याकडे दुर्लक्ष करावे.  या महानगरपालिकेच्या नगररचना विभागात बसलेले कर्मचारी किंवा नगररचनाकाराने अशा प्रकारचे विचार मनात ठेवावे की, हे पंधरा सोळा दुकानदार स्थगिती आदेश घेवुन येतील?  त्याने जर स्थगिती आदेश आणला तर तो उठविण्यासाठी प्रयत्न केले जावु शकतात.  स्थगिती आदेश हटविला जावु शकतो.  कुणीही स्थगिती आदेश आणेल म्हणुन आपण आपल्या शहराच्या सौंदर्याकडे दुर्लक्ष करुन ४० फुट रुंदीचा रस्ता ३० फुट करण्याचा विचार करत असु तर कसे चालेल?  तेथे रिक्षा स्टॅण्ड आहे, लोकांची येण्या जाण्याची वर्दळ आहे.  रस्त्याची रुंदी ३० फुट करण्याचे हे प्रकरण कोठुन आले?  जो

विकास आराखडा १९७२ मध्ये तयार करण्यात आला होता, तो आज आपण समोर ठेवत आहात, जो नविन विकास आराखडा तयार करण्यात आला आहे तो समोर ठेवत नाहीत?

श्री. आर.बी. शिर्के (प्र. शहर अभियंता):—या विषयाबाबतचा सविस्तर खुलासा नगररचनाकारच करु शकतील. ही बाब माझ्या अवाक्याबाहेरची आहे.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :—श्री. शिर्के साहेब, जेव्हा कधी शहराच्या हिताचा प्रश्न महासभेत येतो तेव्हा नगररचनाकार हजर नसतात हे काय आहे? आमचे आयुक्त साहेबांना सारस्य नाही आहे. महासभा अतिरिक्त आयुक्त चालवतील व आम्ही येथे बडबड करत राहु. हे बरोबर नाही. मी पाहिले आहे, कित्येक महासभांना आयुक्त उपस्थित राहत नाहीत, ते उपस्थित का राहत नाहीत? त्याची कारणे काय आहेत? ब—याच दिवसापासुन नगररचनाकार नव्हते. अशावेळी तरी आयुक्तांनी उपस्थित राहिले पाहिजे. साहेब, आपण असा एक परिपत्रक काढा, भलेही अधिकारी महिनाभर रजेवर असोत परंतु त्यांनी प्रत्येक महिन्याच्या २० तारखेच्या महासभेत उपस्थित राहिलेच पाहिजे अशाप्रकारे परिपत्रक काढले पाहिजे. आम्ही लोक आपला धंदा व्यापार सर्व सोडुन महासभेत का येतो? कारण की शहरवाशी आम्हांला निवडुन देतात. आता पहा, स्कायवाक संदर्भात यांनी एवढी चांगली लक्षवेधी मांडली आहे आणि त्या लक्षवेधीवर निवेदन करण्यासाठी आज जर नगररचना उपस्थित असते तर किती चांगले झाले असते. २००० मध्ये जेव्हा रस्त्याची रुंदीकरण करायचे होते सनदची जी घरे होती ती तोडण्यात आलीत. रेल्वेने शहरात येणारा व स्टेशनहुन शहरात जाणारा व्यक्तीस त्यांना चालण्यासाठी रस्ता नसतो. आमच्या माता—भगिनी ओरडत असतात की काय हे शहर आहे की नरकखाई आहे. उल्हासनगर ३ आणि ४ ला जोडणारा स्कायवाकचे काम जर आमच्या कार्यकालावधीत होत असेल तर फारच चांगले होईल. यामध्ये बाधित होणारी जेवढी काही दुकाने असतील त्यांना पर्यायी जागा देवुन स्कायवाकचे काम पुर्ण केले जावे एवढे बोलुन मी माझे दोन शब्द संपवितो. धन्यवाद।

सदस्य श्री. नरेंद्र राजानी :—मा. महापौरजी, मा. उपमहापौरजी, मला एक असे प्रकरण सांगा की जेथे अधिकारी वर्ग किंवा प्रशासन असे सांगते की, रस्ता अरुंद केला पाहिजे व निवडुन दिलेले लोकप्रतिनिधी म्हणतात की रस्ता रुंद केला पाहिजे अशी विपरित परिस्थिती का झाली आहे? लोकांमधुन निवडुन आलेला लोकप्रतिनिधी लोकांचे कमित कमी नुकसान व्हावे अशी सर्वसाधारण भुमिका घेत असतो. परंतु येथे अधिकारी म्हणतात की, ३० फुट रुंदीचा रस्ता तयार केला जावा व निवडुन आलेले लोकप्रतिनिधींना वाटते की तो ४० फुट रुंदीचा करावा. अशी विपरीत परिस्थिती का आली आहे?

श्री. आर.बी. शिर्के (प्र. शहर अभियंता):—३० फुट रुंदीचा रस्ता तयार करण्याचा जो निर्णय आहे तो आयुक्त साहेबांचा आहे. मंजुर विकास आराखडयाप्रमाणे काम व्हावे, त्यावर काही कोटकचे—या होवु नयेत व त्यामुळे स्कायवाकचे काम रखडु नये म्हणुन असा निर्णय घेण्यात आलेला आहे.

सदस्य श्री. नरेंद्र राजानी :— आयुक्तांचा हा अतिशय कमजोर निर्णय आहे. यापेक्षा जास्त कमजोर मानसिकता दुस—या कोणत्या आयुक्तांची असु शकत नाही. कोणी कोर्टात जाईल या भितीने रस्ता रुंद होण्यापासुन वाचवुन संपुर्ण शहरातील लोकांना हे दाखवुन दिले जात आहे की, येथिल आयुक्त इतके कमजोर आहेत की, त्यांना फक्त एवढी भिती दाखवा की आम्ही कोर्टात जावु तर आपले दुकान, घर हे कायदेशीर आहे की बेकायदेशीर आहे ते कोणी बघणार नाही. रस्त्यांचे रुंदीकरण होणार नाही. ते कोणत्या मानसिकतेने या शहराचा कारभार चालवु पाहत आहे. व कोणता विकास आराखडा ते समोर ठेवुन ते काम करत आहेत?व कोणत्या शहराची महानगरपालिका केवळ नगररचनाकार नसल्यामुळे एक एक, दोन दोन महिने पुर्णपणे थंडावली आहे? एकतर नगररचनाकार येथे येत नाहीत. त्यांची नियुक्ती होत नाही. जेव्हा नियुक्ती होते तेव्हा ते कामावर येत नाहीत. प्रत्यक्ष जागेवर जावुन पाहणी करत नाहीत. विकास आराखडा पाहत नाहीत. वातानुकुलीत दालनात बसुन काम करत असेल. महासभेत उत्तर देण्यासाठीसाठी उपस्थित राहत नाहीत. व संपुर्ण शहर त्यांची अनुपस्थितीने त्रस्थ व्हावे? त्यांच्यामुळे जर स्कायवाकचे काम एक महिना थांबत असेल तर हा आपणच आपणांवर लावलेला स्थगिती आदेश नाही काय? त्यांच्यामुळे शहराचे एक महिन्याचे नुकसान झाले नाही काय? या शहरातील लाखो लोकांसाठी स्कायवाकचा जो फायदा होणार आहे तो न झाल्यामुळे त्यांचे देयक कोण देणार? एमएमआरडीए तयार आहे, पैसे आले आहेत, ठेका देण्यात आलेला आहे, मुहुर्त झाला आहे, काम सुरु होत नाही? अशा प्रकारे कोणतीही महासभा प्रशासनातील कोणत्याही अधिका—यास सहकार्य करु शकत नाही. तुम्ही महापालिका प्राधिकरणाला आव्हान देत आहात. आपण प्रभारी म्हणुन येथे

बसला आहात आपण समजत आहात की मी त्यांच्या निर्णयास कसे बदलु? नगररचनाकार नाहीत तर आम्ही काय करणार? अजुन एक महिना थांबणार?

श्री. अशोककुमार रणखांब (अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—मा. महापौर, याठिकाणी सन्माननिय सदस्याने जो प्रश्न उपस्थित केला आहे, विकास आराखडयामध्ये जी तरतुद दिली आहे ती तरतुद तसेच जुन्या व नविन विकास आराखडयामध्ये जी कठोरतम तरतुद असते त्याचा वापर आपण करतो. हे आपणांस सुध्दा माहित आहे. आपणांस जे उत्तर हवे होते ते हेच आहे. ज्यात कठोरतम तरतुद आहे तेच आपण पाहतो परंतु या प्रकरणी आयुक्त साहेबांनी निर्णय घेतलेला आहे व त्याबाबत सूचना नगररचनाकारांना दिली गेली आहे. आपण जी भावना व्यक्ती केली आहे की, रस्ता रुंद झाला पाहिजे, ते आवश्यक आहे. परंतु त्याबाबत जो निर्णय झाला आहे त्याबाबत आम्ही आमचे संबंधीत कार्यकारी अभियंता व नगररचनाकार यांना दिला आहे त्याबाबत आपण संदर्भ घेवुन चर्चा करु, याबाबत त्यांनी अगोदरच निर्णय घेतला आहे. प्रश्नावर उत्तर देत असतांना लगेच महासभेत कुणी निर्णय तर बदलु शकत नाही. परंतु याबाबत आपण ज्या सूचना दिल्या आहेत, त्या मला योग्य वाटत आहेत परंतु घेतलेला निर्णय तर लगेच बदलु शकत नाही. यासाठी याबाबत चर्चा करु. नंतर निर्णय घेवु.

सदस्य श्री. नरेंद्र राजानी :— आपल्या भावना मी समजु शकतो हा एक मुद्दा. दुसरा मुद्दा म्हणजे आपण विविध महापालिकेत काम केले आहे आपणांस हे माहित आहे की, कल्याण शहर असो की ठाणे शहर असो तेथिल स्टेशनच्या बाजुच्या दुकानदारांना हटविले नाही, भलेही त्याना सातबाराचा उतारा असो, सनद असो. येथे असे असेल की नाही याबाबत शंका आहे. परंतु या भावनेचा विचार केला पाहिजे. इतर शहरांना जसे आम्ही सुंदर बनविले आहे, या शहरातील जनता ब—याच वर्षासाठी हे शहर सुंदर होण्यासाठी तडपत आहेत. यासाठी सर्व अधिकारी वर्गांना विनंती आहे की त्यांनी सुध्दा हे शहर सुंदर बनण्यासाठी लक्ष दयावे.

सदस्य श्री. विनोद ठाकुर :—मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, आता आपण म्हणलात की, निर्णय घेतला गेला आहे, ३० फुटाचा रस्ता आयुक्त साहेबांनी याबाबत निर्णय घेतला. तर मी आयुक्त साहेबांना प्रश्न विचारतो की, मी इमारतीचा प्लान टाकला तर मला आपण ३० फुट रस्त्याच्या हिशोबाने प्लान पास करुन दया. आयुक्त साहेब, ३० फुट रुंदीच्या हिशोबाने प्लान पास करुन देणार काय?

श्री. अशोककुमार रणखांब (अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—माझ्याकडे असा प्रस्ताव आला असता तर ४० फुट रुंद रस्त्याप्रमाणे प्लान पास केला असता. कारण की कठोरतम तरतुद मला वापरायची आहे.

सदस्य श्री. विनोद ठाकुर :—हे बरोबर आहे ना? ४० फुट रुंद रस्त्याप्रमाणे आपण इमारत बांधकाम नकाशा मंजुर करा आणि रस्ता मात्र ३० फुट रुंदीचा करणार? हा आपण कुठला न्याय आहे? कुठला कायदा आहे? तसेच आपण आता परिवहन सेवा चालु करण्यास मंजुरी दिली आहे. ३० फुट रुंद रस्त्यामध्ये बस फिरणार कशी? बस फिरुन घ्यायची झाली तर मागे मागे घेवुन किती अंतर मागे मागे घेवुन ती फिरवायची? मा. आयुक्त साहेब, मा. महापौरजी, ३० फुट रुंद रस्त्यामध्ये बस कशी फिरणार? लोक कसे चालणार? आणि स्कायवाक कसा बनणार? श्री. शिर्के साहेब, आपणाकडे उप अभियंता, कार्यकारी अभियंता, शहर अभियंता अशी तीन तीन पदे आहेत. मी आपणांस एकच प्रश्न विचारतो, ३० फुट रुंद रस्त्यामध्ये बस फिरेल काय?

श्री. आर.बी. शिर्के (प्र. शहर अभियंता):—सरळ रस्ता असेल तर बस जावु शकते. थोडेसे वळण असेल तरीही जावु शकते. परंतु जागच्या जागी जर ती फिरवायची असेल तर ती फिरु शकणार नाही.

सदस्य श्री. विनोद ठाकुर :—आजच्या तारखेला रस्त्यावरुन एकाच वेळी दोन रिक्षा समांतरपणे धावु लागल्या तर लोकांना चालण्यासाठी रस्ता राहत नाही. दोन रिक्षांची रुंदी किती होईल? ३—३ फुट पकडली तर ६ फुट, २ रिक्षा समांतर उभ्या राहिल्या तर लोकांना जाण्यायेण्यासाठी रस्ता राहणार नाही असे असतांना आपण ३० फुट रुंदीचा रस्ता कसा प्रस्तावित केला? व आयुक्त साहेबांनी तरी ४० फुट रुंदीचा रस्ता मंजुर करण्याऐवजी ३० फुट रुंदीचा रस्ता कसा मंजुर केला? आम्ही इमारत बांधकाम परवानगीसाठी अर्ज करतो उदया आम्हांला ३० फुट रुंदीप्रमाणे नकाशा मंजुर करु?

<u>श्री. आर.बी. शिर्के (प्र. शहर अभियंता):–</u>३० फुट रुंदीच्या रस्त्यावरुन बस धावु शकते. दोन बसेस एकाच वेळी जावु शकतात.

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर :–</u>एक बस गेली आणि एक बस आली, त्यामध्ये फुटपाथ लोकांचे जाणे येणे यासाठी जागा राहिल काय?

<u>श्री. आर.बी. शिर्के (प्र. शहर अभियंता):–</u>अशा वेळेस रस्त्यावर एक मार्गी वाहतुक सुरु केली जाते.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>हा केवळ बस सेवेशी संबंधीत मुद्दा नाही आहे.

<u>सदस्य श्री. चंद्रशेखर यादव :–</u>३० फुट रुंदीचाच रस्ता करण्यासाठी या लोकांनी पैसे घेतलेले आहेत. श्री. शंकर अहुजा नावाचा माणसाने हे सर्व प्रशासनाशी याबाबतीत अर्थपुर्ण व्यवहार केले आहेत अशी चर्चा माझ्या प्रभागात, श्रीमती सुर्वे यांच्या प्रभागात याबाबतची चर्चा चालु आहे. लाखो लोक सकाळी या स्टेशनवरुन मुंबईला कामाला जातात, संध्याकाळी परत येतात. आणि गर्दीच्या वेळेस चालायला जागा नसल्यामुळे धडपडुन पडतात. त्यांचे सर्व शिव्याशाप आम्हांला ऐकुन घ्यावे लागतात, भोगावे लागते.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>मा. महापौरजी, श्री. चंद्रशेखर यादव यांनी ही जी लक्षवेधी सूचना मांडली आहे त्याबाबत मी बोलु इच्छितो. जसे माझे मित्र श्री. नरेंद्र राजानी यांनी सांगितले की, आज पहिल्यादाच असा एक विषय आलेला आहे की, ज्याबाबत निवडुन आलेले लोकप्रतिनिधी म्हणत आहेत की, रस्त्याची लांबी विकास आराखडयाप्रमाणे ४० फुट असली पाहिजे परंतु प्रशासनाने फक्त ती ३० फुट रुंदीची प्रस्तावित केली आहे. १९९९ मध्ये जेव्हा या शहरामध्ये ३३ रस्त्यांच्या रुंदीकरणाचे काम सुरु झाले त्यावेळी श्री. चंद्रशेखर साहेब हे आयुक्त होते त्यांनी शहाड येथे १००–१००, २००–२०० दुकाने तोडली होती. महाराज भुल्लर त्यावेळी तेथे उपस्थित होते. नेहरु चौकात सुध्दा दुकाने तोडण्यात आली होती. त्यावेळेस नगरसेवक ओरडुन सांगत होते परंतु आयुक्तांनी मानले नाही. त्याचेच आज फळ आपणांस मिळाले आहे. शहरात मोठमोठे रस्ते झाले आहेत. वाहतुकीची जी कोंडी होत होती ती आता सुकली आहे. परंतु आज पहिल्यांदाच महासभेत असे होत आहे की, व आमचे नगरसेवक श्री. चंद्रशेखर साहेब म्हणतात की विकास आराखडयाप्रमाणे शहराचे काम करा व प्रशासन म्हणत आहे की ३० फुट रुंदीच्या रस्त्याप्रमाणे काम केले जाईल. हे जे स्कायवाकचे काम होत आहे, या विकास आराखडयामध्ये रस्त्यांची जी रुंदी दर्शविली जाते ती पुढील दहा, पंधरा, वीस, पंचवीस वर्षानंतर या शहराची अवस्था काय असेल? हे पाहिले जाते. तेथुन बस जाईल किंवा नाही एवढेच पाहिले जात नाही. तेथुन बस वळण घेवु शकेल किंवा नाही? बस तर शहाड येथुन सुध्दा वळण घेवु शकत होती. बस तर नेहरु चौकातुन सुध्दा जात होती. परंतु आम्ही विकास आराखडयाप्रमाणे रस्ते रुंद केले. व येणा–या काही दिवसामध्ये आचारसंहिता लागणार आहे. आजच्या सभेमध्ये आयुक्त साहेब उपस्थित नाहीत. स्कायवाकचे काम थांबवावे लागेल. जर काम करायचे असेल तर योग्य प्रकारे केले पाहिजे व ते विकास आराखडयात दर्शविलेल्या रुंदीप्रमाणेच केले पाहिजे. यासाठी मी निवेदन करतो की याबाबतचा निर्णय आजच्या आज या महासभेत झाला पाहिजे. सभागृहातील सर्व सदस्यांचे हेच मत आहे की रस्त्याचे काम विकास आराखडयात दर्शविलेल्या रुंदीप्रमाणेच झाले पाहिजे.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :–</u>महापौर महोदया, आयुक्त साहेब, उल्हासनगर स्टेशन परिसरात जा ये करतांना नागरीकांना जो काही त्रास होत होता तो स्कायवाक झाल्याने दुर होणार आहे. आणि नागरीकांना ही सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी जर रस्त्याची अडचण येत असेल तर ती सोडविणे हे महापालिकेचे कर्तव्य आहे. रस्त्याचे रुंदीकरण करतांना जर कुणाची दुकाने किंवा घरे त्यात जात असतील तर त्यांना पर्यायी जागा देण्याची व्यवस्था महापालिकेने केली पाहिजे. आता जर स्कायवाकचे काम बंद झाले तर ते प्रदिर्घकाळपर्यंत प्रलंबित राहिल. हे काम रखडु नये अशी आम्ही महापौरांना आणि आयुक्त साहेबांना विनंती करतो.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>आयुक्त साहेब, चर्चा झाली. विषय समजला, श्री. नरेंद्र राजानी यांनी अत्यंत भावुक शब्दामध्ये सांगितले की हा मानसिकतेचा प्रश्न आहे. आणि असा मानसिकतेचे प्रशासन असेल तर शहर चालु शकणार नाही. एवढे सर्व ऐकल्यानंतर तुमचे प्रशासनाचे काय मत झाले आहे? दोन मुद्दे आहेत, एकतर इमारत बांधकाम परवानगी देतांना २०० मिटरचा जरी भुखंड असला तरी तुम्ही विकास आराखडयातील कठोरतम तरतुद गृहित धरता आणि रस्त्याच्या बांधकामासंदर्भात तुम्ही लवचिक भुमिका घेण्याचे कारण काय? स्कायवाक सारखा प्रकल्प या शहरात कधी एकदा चालु होतो यासाठी आम्ही उताविळ आहोत परंतु

प्रशासनाच्या, महापालिकेच्या अनास्थेमुळे प्रशासनाच्या उदासिनतेमुळे तो रखडलेला आहे. आणि हा प्रकल्प जर रखडला तर एमएमआरडीएच्या माध्यमातुन जेएनएनयुआरएमच्या माध्यमातुन कुठलाही निधी उपलब्ध करुन घेण्याच्या लायकीचे आम्ही नाही. कारण की, त्यांनी दिलेल्या निधीचा वापर करण्याची आमच्यामध्ये योग्यता नाही? काय चालले आहे हे? तुम्ही कुणाची बाजु घेत आहात? कशासाठी? ४० फुट रुंदीच्या ऐवजी ३० फुट रुंदीचा रस्ता कशासाठी? त्यासाठी एमएमएआरडीएच्या स्कायवाकचा डिझाईन बदली करायचे? सिंगल कॉलमचे बांधकाम दोन्ही बाजुला घ्यायचे ते केवळ तुमच्यासाठी? कारण आपण तेथिल बांधकाम तोडु शकत नाहीत? तोडु शकत नाही तर आपण शहराचा विकास काय करणार? त्यासाठी जर त्याची कायदेशीर मालमत्ता असेल तर जागा संपादीत करुन घेण्याची कार्यपध्दती आहे. आणि बेकायदेशीर असेल तर त्यासाठी काय करायचे ते यापुर्वी आम्ही केलेले आहे. कल्याण अंबरनाथ रोड किंवा शहाडचा रस्ता तसेच ३३ रस्ते आम्ही विकसित केले आहेत. आणि आता या बाबत प्रशासनाची जर अशाप्रकारची मानसिकता असेल तर जेएनएनयुआरएमच्या माध्यमातुन एमएमआरडीएच्या माध्यमातुन, केंद्र सरकारच्या माध्यमातुन, राज्यसरकारच्या माध्यमातुन आम्ही कितीही निधी आणला तर त्याचा काही उपयोग होणार नाही कारण त्याची तुम्ही अंमलबजावणी करु शकत नाही. ६३२ .९० कोटीचा महापालिकेचा अर्थसंकल्प आहे. एमएमआरडीचा निधी तुम्ही वापरु शकत नाहीत तर अर्थसंकल्पाच्या निधीतुन तुम्ही काय विकास कामे करणार आहात? प्रत्येक ठिकाणी विरोध करण्यासाठी स्वार्थी लोक येणार? त्याठिकाणी जास्तीत जास्त सर्वसामान्य लोकांचा निर्णय घेणे आवश्यक होते. परंतु दुर्देवाने येथे फक्त ठराविक लोकांना घाबरुन कामे केली जात आहेत. आमच्या श्री. चंद्रशेखर यादव यांनी एका इसमाचे नाव घेवुन सांगितले की, त्याने महापालिका प्रशासनाशी अर्थपुर्ण व्यवहार केले आहे. संपुर्ण सभागृहाचे तुम्हांला समर्थन आहे. सभागृह सांगते की, तुम्ही विकास आराखडयाप्रमाणे अंमलबजावणी करा. यापुर्वी उलट होते, काही ठिकाणी अनावश्यक असतांना ६० ६० फुट रुंदीचे रस्ते झाले. तेथे आम्ही सांगत होतो की, रुंदी कमी ठेवा परंतु त्यावेळेस सांगण्यात आले की विकास आराखडयाप्रमाणेच आम्ही रस्त्याची रुंदी ठेवणार. आज येथे आपण आयुक्त म्हणुन बसला आहात. आयुक्तांशी तुम्ही तातडीने संपर्क साधा आणि या रस्त्याच्या रुंदीकरणासंदर्भात तातडीने कार्यवाही झाली पाहिजे. जेणेकरुन आम्ही एमएमआरडीएचा पुर्ण पैसा आम्ही वापरु आणि एमएमआरडीएचे इतर प्रकल्प आणण्यासाठी पाठपुरावा करु शकु. नाहीतर त्याठिकाणी जाण्यास आम्हांला हिम्मत होणार नाही. तोंड सुध्दा दाखवता येणार नाही.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, मा. आयुक्त साहेब, त्यांच्याशी एक करारनामा करण्यात आलेला आहे. त्यांची आपणांस माहिती असेल? त्याबाबतीत कोण माहिती देवु शकेल? मला वाटते आपणा कुणालाही याबाबतची माहिती नाही. नाहीतर ही लक्षवेधी पुढील सभेत सलगपणे चर्चेत ठेवा. पुढच्यावेळेसच याबाबतीत विचारणा करु. आता याबाबतीत आपणास कुणासही काही माहिती नाही असे वाटते, त्यामध्ये काय झालेले आहे, काय नाही?

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>मी महापौरांना विनंती करतो की, ही महानगरपालिका काही चुकीचे प्रस्तावित करु शकत नाही किंवा आम्ही नागरीकांच्या भवितव्याशी खेळु शकत नाही. दिवसेंदिवस दिवसेदिवस लोकसंख्या वाढत आहे असे असतांना रस्त्याची रुंदी वाढणे आवश्यक आहे. कमी करण्याचा प्रश्नच नाही. आपण प्रशासनाला आदेश दया, आाता जी लक्षवेधी सूचना आलेली आहे त्यानुसार संपुर्ण सभागृहाची भावना आहे की, विकास आराखडयातील नोंदीनुसार रस्त्याचे रुंदीकरण झाले पाहिजे. अगदी सत्ताधा—यांपासुन विरोधकांपर्यंत, याबाबतीत विरोधक म्हणताच येणार नाही. सर्वांची भावना लक्षात घेवुन आपण प्रशासनाला आदेश दया की, विकास आराखडयातील नोंदीप्रमाणे रस्त्याचे रुंदीकरण झाले पाहिजे व स्कायवाक एमएमआरडीएच्या डिझाईनप्रमाणेच झाला पाहिजे. त्यासाठी काही निधी लागणार असेल तर तो मंजुर करण्यासाठी आम्ही तयार आहोत. त्यासाठी आपण प्रशासनाला आदेश दयावेत.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :—</u>मा. महापौरजी, माझ्या प्रश्नाचे मला अदयाप उत्तर मिळालेले नाही. मा. आयुक्त साहेब, आपणाकडे या प्रश्नाचे उत्तर आहे किंवा नाही ते सांगितले जावे. नसेल तर मला बसायला बरे. पंधरा मिनिटापासुन मी उभा आहे.

<u>श्री. अशोककुमार रणखांब (अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—</u>आता हा जो विषय चालला होता ना, त्यात आपण काय प्रश्न विचारला तेच मला आठवत नाही.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :—</u>मी आपणांस प्रश्न विचारला होता की, एमएमआरडीए व जेएनएनयुआरएम कडुन आपणांस जो निधी मिळाला त्याबाबत महापालिका आणि त्यांच्यामध्ये जो करार झालेला आहे तो कुणी

वाचुन पाहिला आहे काय? किंवा त्याबाबत कुणाला माहिती आहे काय? त्यावर आयुक्तांची स्वाक्षरी आहे किंवा नाही?

<u>श्री. अशोककुमार रणखांब (अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):–</u>तो मी वाचलेला आहे, त्यावर आयुक्तांची स्वाक्षरी आहे. आता त्याबाबतीत तत्काळ मी माहिती देवु शकत नाही.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :–</u>त्यामध्ये एक मुद्दा असा आहे की, जे काही बांधकाम करायचे आहे ते विकास आराखडयातील रुंदीप्रमाणे करायचे आहे. याची यांना माहिती आहे किंवा नाही हे मी जाणुन घेवु इच्छितो. तो करारनामा कुणी वाचला आहे? ज्याकुणी वाचला असेल त्याच्याशी मी चर्चा करु इच्छितो. त्याबाबत आपणांस माहिती आहे किंवा नाही? विकास आराखडयाप्रमाणे आपणांस काम करायचे आहे आणि तरच आपणांस कर्ज मिळेल. जर त्या करारनाम्यावर आयुक्तांनी सही केली आहे तर रस्त्याची रुंदी ३० फुट कशी केली? विकास आराखडयातील रुदीप्रमाणे रस्त्याचे काम केले जाईल अशा करारनाम्यावर ते स्वाक्षरी करुन येतात आणि येथे त्या विपरित निर्देश देतात असे काही आहे काय?

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर :–</u>विकास आराखडा नेमके कुठला? मंजुर विकास आराखडा आणि सुधारीत विकास आराखडा असे दोन वेगवेगळे आराखडते आहेत. १९७४ चा एक व १९९९ चा दुसरा.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :–</u>मा. श्री. शिर्केजी मी आपणांस विनंती करतो की, आपणांस जर माहित असेल तर सांगा. चुकीचे उत्तर देवु नका. कारण की आपण नगररचनाकार नाहीत. आपण करारनामा वाचला असेल तर सांगा.

<u>महापालिका सचिव :–</u>याबाबतीत मा. महापौर अथवा पिठासीन अधिकारी :– महोदय, आपला निर्णय देत आहेत कृपया लक्ष दया.

<u>महापौर अथवा पिठासीन अधिकारी :– :–</u>मंजुर विकास योजनेनुसार ४० फुट रुंद ठेवुन स्कायवाक तयार करण्याची प्रशासनाने कार्यवाही करावी. महासभेच्या सर्व संमतीनुसार मी आयुक्तांना आदेश देते की, महासभेमध्ये आपण स्वत: व इतर सर्व संबंधीत अधिकारी यांना महासभेत हजर राहुन सदस्यांच्या प्रश्नाचे निराकरण करुन कोणत्याही अधिका–याने गैरहजर राहण्यापुर्वी पुर्व परवानगी घेण्यात यावी.

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र.२ ............

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:–</u>सन्माननिय महापौरजी, उप–महापौरजी, माझ्या प्रश्नाचे अदयाप उत्तर मिळाले नाही. महासभेमध्ये जी चर्चा होते, निर्णय होतो की, पुढील महासभेत हा विषय आणला जाईल. त्याबाबतीत बंद दालनात निर्णय होवु शकतो काय की हा विषय आता घ्यायचा नाही, पुढील महासभेत बघु. असा काही निर्णय बंद दालनामध्ये घेतला जावु शकतो काय? महासभेत महापौरांनी अधिनिर्णय दिला होता की, हा विषय २० फेब्रुवाारीच्या महासभेत येईल तो का आला नाही? त्याबाबतीत बंद दालनामध्ये निर्णय घेतला जावु शकतो काय? याबाबतीत काही कायदयात तरतुद आहे काय? सचिव साहेब, याबाबतीत आपण कायदा तर सांगा ना?

<u>महापालिका सचिव :–</u>दोन्हीही निर्णय मा. महापौरांनी घेतलेले असल्यामुळे त्याबाबतीत त्या स्वत:च आता निर्णय देत आहेत.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>दुसरा निर्णय महापौरांनी घेतलेला नाही. महापौरांनी निर्णय घेतलेला आहे असे आपण म्हणत आहात काय?

<u>महापालिका सचिव :–</u>मी यापुर्वी सुध्दा सांगितले आहे की, सभासूचना काढण्यापुर्वी जी सभा झाली होती त्यावेळी आपला विषय ठेवला होता त्याबाबत सभेत निर्णय घेण्यात आला की, पुढील सभेत हा विषय घेवु.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>सन्माननिय महापौरजी, आपण अधिनिर्णय दया की पुढील जी महासभा होईल त्यावेळी हा विषय सभा सूचनेवर येईल.

**महापौर अथवा पिठासीन अधिकारी :— :—**सन्माननिय सदस्य, याचे उत्तर तुम्हांला पुढील महासभेत नक्कीच मिळेल.

**महापालिका सचिव :—**सन्माननिय महापौर अथवा पिठासीन अधिकारी :— म्हणत आहेत की, आपला विषय पुढील महासभेत आणला जाईल. ठिक आहे.

विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

**विषय क्र. २ :—** मागील सभेचे दिनांक २०/१/२००९ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर अथवा पिठासीन अधिकारी :— :—** मागील सभेचे दिनांक २०/१/२००९ रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

---

**विषय क्र. २ :—** मागील महासभेचे दिनांक २०/१/२००९ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नाव : श्री. रामसागर यादव

अनुमोदकाचे नाव : श्री. बी.बी. मोरे

**महासभा ठराव क्र. ५३ ब** **दिनांक : २०/२/२००९**

ही महासभा महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेल्या दिनांक २०/१/२००९ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे पृष्ठ क्र. १ ते ७३ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

**एकमताने**

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ३:—** दिनांक २४/५/२००२ रोजीचे महासभा ठराव क्र. ८ मधील अटी व शर्ती नुसार महापालिकेचे व्ही.टी.सी.मैदान कार्यक्रमांसाठी भाडयाने देणेस मान्यता देणे.

---

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**पास.... परंतु या विषयाचा गोषवारा कोणी तयार केला आहे? व्हीटी आहे की व्हीटीसी येथे व्हीटी मैदान लिहिले आहे, व्हीटी मैदान कोठे आहे? तीन तीन वेळा व्हीटी मैदान असे लिहिले आहे.

**महापालिका सचिव :—**व्हीटीसी मैदान अशी नोंद पाहिजे.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>होय तशी दुरुस्ती करा.   आणि त्याचे भाडे निश्चित केलेले नाही.

<u>महापालिका सचिव :—</u>पुर्वीच्या महासभा ठरावात निश्चित केलेले भाडे त्यास लागु होणार.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u>मा. महापौर, हा जो व्हीटीशी ग्राउंड बाबतीत विषय आलेला आहे, व्हीटीसी ग्रउंड आपण बांधा वापरा हस्तातरीत करा करु शकतो काय?  भाडयाने कसे देणार कुणाला देणार?

<u>महापालिका सचिव :—</u>जसे गोल मैदान वगैरे देतो त्याप्रमाणे.काही दिवसांसाठी जसे की दोन दिवसांसाठी, चार दिसांसाठी.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u>२००२ च्या त्या ठरावाची प्रत आम्हांस दिली नाही.  आम्हांला कसे माहित पडेल?

<u>श्री. मिलिंद सावंत (उप—आयुक्त, मुख्यालय):—</u>मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, २००२ साली महासभेने जो ठराव केला होता त्यामध्ये एकंदर १६ मैदाने भाडयाने देण्याचे ठरविण्यांत आले होते.  त्या १६ मैदानात व्हीटीसी मैदानाचा उल्लेख नव्हता.  आता परिस्थिती अशी आहे की, त्या १६ मैदानांप्रमाणे व्हीटीसी मैदाने ही वेळोवेळी भाडयाने मागितले जाते. त्यामुळे या १६ मैदानामध्ये व्हीटीसी मैदानाचाही समावेश करुन महासभेची परवानगी घेवुन सार्वजनिक प्रयोजन असेल तर ५०० रुपये भाडे अन्यथा व्यवसायीक वापर असेल तर जे काही भाडे बांधकाम विभाग ठरवेल.

उपरोक्त मैदाने, उदयाने लग्नसमारंभासाठी, व्यापारीकामासाठी देण्याचे झाल्यास पाचपटभाडे आकारावे असे प्रस्तावित आहे.  या मैदानाचे भाडे ठरविले आहे सातहजार पाचशे प्रतिदिन, त्याच्या पाचपट भाडे जर व्यवसायिक वापर असेल तर अन्यथा सार्वजनिक वापरासाठी आपण फक्त पाचशे रुपयेच भाडे आकारणी करतो.

<u>महापालिका सचिव:—</u>पास?

<u>सदस्य श्री. राजेश वधारिया :—</u>मा. महापौर अथवा पिठासीन अधिकारी :— महोदया, २००२ चा हा जो महासभा ठराव आहे त्यामध्ये प्रतिदिनचे भाडे त्यामध्ये बाजुच्या रकानाम्यामध्ये लिहिले आहे की, प्रतिवर्ष १० टक्के भाडेवाढ, प्रस्तावित प्रतिदिन भाडे २४ तासासाठी.   तर याबाबतीत महापालिकेच्यावतीने किंवा प्रशासनाच्यावतीने काय प्रस्ताव आहे?

<u>श्री. मिलिंद सावंत (उप—आयुक्त, मुख्यालय):—</u>मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, हा जेव्हा ठराव झाला होता तेव्हा प्रस्तावनेत १९८७ पासुन २००२ पर्यंत पंधरावर्षासाठी भाडे निश्चिती करण्यात आलेली नव्हती.  यासाठी पंधरा वर्षाचे एकुण १० टक्के भाडे वाढ हा रकाना आला होता.  आता येथे म्हटले की ७४०० रुपये भाडे निश्चित झाले आहे.  ते चालु तारखेपासुन निश्चित झालेले आहे.  पंधरा वर्षासाठी १० टक्के भाडेवाढीचा हाज जो रकाना आहे.  प्रत्यक्षात २००२ रोजीचे भाडे निश्चित करण्यासाठी तो रकाना ठेवण्यात आला होता.  आता मी सांगितल्याप्रमाणे ७४०० प्रतिदिन भाडे निश्चित करण्यात आलेले आहे.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>हे मुळतः भाडे झाले.  व्यवसायिक वापरासाठी किती भाडे असेल?

<u>श्री. मिलिंद सावंत (उप—आयुक्त, मुख्यालय):—</u>त्यांनी अट ठेवली होती लग्नसमारंभ, व्यवसायिक काम इत्यादीसाठी पाचपट भाडे आकारणी करावी.  प्रतिदिवसाचे जे भाडे आहे (२४ तासासाठीचे) जे भाडे आहे त्याच्या पाचपट भाडे आकारावे.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>७४०० च्या पाचपट व मुळ भाडे ७४००?

<u>श्री. मिलिंद सावंत (उप—आयुक्त, मुख्यालय):—</u>बरोबर.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>हा जो तक्ता  आपण दिलेला आहे तो माझ्यामते चुकीचा आहे. आपण येथे लिहिले आहे, प्रतिदिन भाडे १००० रुपये व १० टक्के प्रतिवर्षी वाढ. प्रत्येकवर्षी १० टक्के भाडेवाढ केली तर दुस—यावर्षीचे भाडे ११०० रुपये होते तिस—यावर्षी त्यात अजुन ११० रुपये वाढले पाहिजे. अशा प्रकारे चौथ्या पाचव्या वर्षी १०, १० टक्क्याने वाढ केली पाहिजे. याप्रकारे २५०० ते ३००० पेक्षाही जास्त भाडे होईल. यासाठी बरोबर आकडेमोड करुन हा तक्ता तयार करा. आपण हे स्पष्ट लिहिले आहे की, १० वर्षात १००० वाढ आणि पंधरा वर्षात १५०० रुपये. दुस—या वर्षी ११० रुपये वाढतील त्यानंतर १३० रुपये वाढतील. त्यानंतर चौथ्यावर्षी १४२ रुपये वाढतील. त्यानंतर १५३ रुपये वाढतील. त्यानंतर १७० वाढतील. अशी वाढ होता होता ३००० रुपये होतील. हा ठराव पारीत करतांना हा तक्ता दुरुस्त करुन अशा प्रकारची सुधारणा केली जाईल.

<u>श्री. मिलिंद सावंत (उप—आयुक्त, मुख्यालय):—</u>२००२ चा ठराव आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>प्रत्येक वर्षी १० टक्के वाढ असे आपण लिहिले आहे ना? आता आपण लिहिले आहे २५०० रुपये, तर पंधरा वर्षामध्ये २५०० कसे झाले? प्रत्येक वर्षी १० टक्के वाढ आपण करत जा.

<u>श्री. मिलिंद सावंत (उप—आयुक्त, मुख्यालय):—</u>हे साधुवासवानी उदयानाबाबत आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>कोणत्याही उदयानाबाबत असू दया. आता आपण जे कोणतेही उदयान दयाल त्यास प्रत्येक वर्ष १० टक्के भाडेवाढ याप्रमाणे आपण दयाल ना? तर आपण अंकगणिती पध्दतीने आकडेमोड करा. आपण केलेली आकडेमोड चुकीची आहे.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर अथवा पिठासीन अधिकारी :— :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ३ :—** दिनांक २४/५/२००२ रोजीचे महासभा ठराव क्र. ८ मधील अटी व शर्ती नुसार महापालिकेचे व्ही.टी.सी.मैदान कार्यक्रमांसाठी भाडयाने देणेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिका महासभा ठराव क्र. ८ दिनांक २४/५/२००२ अन्वये उल्हासनगर महानगरपालिका मालकीचे एकुण १६ उदयाने/मैदाने भाडयाने देणेबाबत ठराव पारीत केलेला आहे. सदर ठरावात नमुद केलेली १६ उदयाने/ मैदाने नोंदणीकृत ट्रस्ट व नोंदणीकृत संस्था व इतरांना केवळ सार्वजनिक पुजा अर्चा, सार्वजनिक धर्मदाय प्रयोजनासाठी किंवा राजकिय पक्षांच्या सभेसाठी तसेच खेळाच्या स्पर्धेसाठी किंवा त्यांच्या वापरासाठी फायदा मिळविण्याचा उद्देश नाही अशा कामासाठी ठरावात नमुद केलेल्या परिशिष्टामधील रकाना क्र. ६ प्रमाणे भाडे आकारणी करण्यास मान्यता मिळालेली आहे. तसेच सदरची १६ उदयाने/मैदाने लग्न समारंभ/मुंज/वाढदिवस/व्यापारी कामासाठी/कार्यक्रमांसाठी देण्याचे झाल्यावर ५ पट भाडे आकारणी करणेस मान्यता मिळालेली आहे.

परंतु ——

सदर ठरावात नमुद केलेली १६ उदयाने/ मैदाने नोंदणीकृत ट्रस्ट व नोंदणीकृत संस्था व इतरांना केवळ सार्वजनिक पुजा अर्चा, सार्वजनिक धर्मदाय प्रयोजनासाठी किंवा राजकिय पक्षांच्या सभेसाठी तसेच खेळाच्या स्पर्धेसाठी किंवा त्यांच्या वापरासाठी फायदा मिळविण्याचा उद्देश नाही अशा कामासाठी ठरावात नमुद केलेल्या परिशिष्टामधील रकाना क्र. ६ मध्ये निर्दिष्ट केलेल्या रक्कमेऐवजी केवळ रु. ५००/— भुईभाडे आकारण्यात येईल असे नमुद आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेचे व्हि.टी. मैदान सांस्कृतिक /धार्मिक व व्यावसायिक वापरासाठी वारंवार मागणी होत आहे. व्हि.टी. मैदान उल्हासनगर–४ भाडयाने दिल्यास महानगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्नात वाढ होईल अशी धारणा आहे.
उल्हासनगर महानगरपालिकेचे व्हि.टी. मैदान, उल्हासनगर–४ ची कार्यक्रमासाठीची नेहमीची मागणी विचारात घेता महासभा ठराव क्र. ८, दिनांक २४/५/२००२ रोजीच्या ठरावास अधिन राहून ठरावातील अटी व शर्तीनुसार उल्हासनगर महानगरपालिका मालकीचे व्हि.टी. मैदान उल्हासनगर–४ भाडयाने देणेबाबतचा प्रस्ताव मा. महासभेसमोर प्रस्तावित.

महासभा ठराव क्र: ५४ दिनांक:–२०/२/२००९

सुचकाचे नाव :– श्री. लाल पंजाबी

अनुमोदकाचे नाव :– श्री. जे.के. ढोके

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे दिनांक २४/५/२००२ रोजीचे महासभा ठराव क्र. ८ मधील अटी व शर्ती नुसार महापालिकेचे व्ही.टी.सी.मैदान कार्यक्रमांसाठी भाडयाने देणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ४ :–** सेवानिवृत्त, दिवंगत सफाई कामगारांचे वारसांस वारसा पध्दतीने नियुक्ती देणे.

---

काही सदस्य :–पास–पास......
महापौर अथवा पिठासीन अधिकारी :– :– सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ४:–** सेवानिवृत्त, दिवंगत सफाई कामगारांचे वारसांस वारसा पध्दतीने नियुक्ती देणे.

प्रस्तावना
लाड कमिटीच्या शिफारसी वारसा (वशिला) पध्दतीच्या अंमलबजावणीबाबत नगरविकास विभाग परिपत्रक क्र. संकीर्ण–२२९२/१९९९/प्र.क्र. १६४/९२/नवि–६, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दिनांक ३० जुन १९९४ नुसार महानगरपालिकेतील सफाई कामगार/मुकादम यांच्या निवृत्तीनंतर, मृत्युनंतर, स्वेच्छा निवृत्तीनंतर किंवा वैदयकीय दृष्टया अपात्र ठरविल्यानंतर त्यांचे जागी वारसा हक्काने नियुक्ती करण्यात येते.
उल्हासनगर महानगरपालिकेतील सेवा निवृत्त, दिवंगत, वैदयकीय सेवानिवृत्त सफाई कामगार यांचे जागी वारसा हक्काने नियुक्ती मिळणेबाबत खालीलप्रमाणे विनंती अर्ज सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | सफाई कर्मचा–यांचे नाव | सेवानिवृत्त /मृत्यु दिनांक | वारसाचे नाव | कर्मचा–याशी असलेले नातेसंबंध |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीमती सुनिता ज्ञानेश्वर सौदे | दिवंगत, दिनांक २/७/२००८ | श्री. ईश्वर ज्ञानेश्वर सौदे | मुलगा |
| २ | श्रीमती प्रेमबत्ती रुग्गन पारसे | सेवानिवृत्ती, दिनांक ३०/१०/२००८ | कु. बिमलेष रुग्गन पारसे | मुलगी |
| ३ | श्री. बनारसी गोकल राठी | सेवानिवृत्ती दिनांक २३/७/२००४ | श्रीमती राजश्री नानकचंद हडाले | सुन (नातेवाईक) |
| ४. | श्री. अशोक शहाजी मगरे | सेवानिवृत्ती दिनांक ११/११/२००८ | श्री. निलेश अशोक मगरे | मुलगा |
| ५. | श्रीमती ठकुबाई आत्माराम कांबळे | सेवानिवृत्ती दिनांक ११/११/२००८ | श्री. भिमा आत्माराम कांबळे | मुलगा |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महानगरपालिकेच्या ज्या अधिका—याचे किमान मासिक वेतन भत्ते वगळुन चारशे रु. किंवा त्याहुन अधिक आहे असे अधिकारी तात्पुरते असो किंवा कायम असो त्यांची नेमणुक करण्यचाचा अधिकार महानगरपालिकेस निहित असेल अशी तरतुद आहे. म्हणजेच नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा आहे.
महाराष्ट्र नागरी सेवा (नि.वे.) नियम १९८२ मधील नियम ६५ व ६६ अन्वये सेवानिवृत्ती प्रकरणी कार्यवाहीस नियुक्ती प्राधिकारी सक्षम आहे.
मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महापालिका म्हणजेच महासभा '' नियुक्ती प्राधिकारी'' म्हणुन सक्षम आहे.
तरी शासन निर्णयाच्या अधिन राहुन वरील वारसांना उल्हासनगर महानगरपालिकेतील सेवा निवृत्त, दिवंगत, वैदयकीय सेवानिवृत्त सफाई कामगार यांचे रिक्त जागेवर वारसा हक्काने नियुक्ती देणेकामी मा. महासभेपुढे मंजुरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: ५५ — दिनांक:—२०/२/२००९

सुचकाचे नाव :— श्री. लाल पंजाबी
अनुमोदकाचे नाव :— श्री. तुलसीदास वसिटा

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे सेवानिवृत्त, दिवंगत सफाई कामगारांचे वर उल्लेखलेल्या वारसांस वारसा पध्दतीने नियुक्ती देण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ५ :—**उल्हासनगर महानगरपालिकेतील कर्मचा—यांना सहाव्या केन्द्रीय वेतन आयोगाच्या शिफारशी अनुषंगाने वेतन सुधारणापुर्व रु. १०,०००/— अग्रीम अदा करणेकामी धोरणात्मक निर्णय घेणे.

---

**<u>काही सदस्य :–</u>**इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता सदर ठरावांतर्गतचा निर्णय थेट अंमलात आणण्यात यावा.

**<u>महापौर अथवा पिठासीन अधिकारी :– :–</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ५:–** उल्हासनगर महानगरपालिकेतील कर्मचा–यांना सहाव्या केन्द्रीय वेतन आयोगाच्या शिफारशी अनुषंगाने वेतन सुधारणापुर्व रु. १०,०००/– अग्रीम अदा करणेकामी धोरणात्मक निर्णय घेणे.

<u>प्रस्तावना</u>

सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींच्या अनुषंगाने वेतन सुधारणापुर्व अग्रीम अदा करण्याबाबतचा वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक : वेपुर–१२०८/प्र.क्र. ७२/सेवा–९, मंत्रालय, मुंबई–४०० ०३२, दिनांक ६ ऑक्टोंबर, २००८ रोजी शासन सेवेत कार्यरत आहेत अशा राज्य शासकिय व इतर पात्र कर्मचा–यांना त्यांच्या दिनांक १ ऑक्टोंबर, २००८ रोजी अनुज्ञेय असलेल्या विदयमान वेतनश्रेणीतील मुळ वेतनाच्या दुप्पट रक्कम अथवा रुपये १०,०००/– (रुपये दहा हजार मात्र) यापैकी जी जास्त असेल ती रक्कम अदा करणेबाबत मंजुरी दिलेली आहे.

सदर अग्रीमाची रक्कम नियमित वेतनश्रेणीत वेतन घोणा–या कर्मचा–यांनाच अनुज्ञये राहिल. करार तत्वावर किंवा एकत्रित वेतन घेणा–या कर्मचा–यांना ही रक्कम अनुज्ञेय नाही.

वरील अग्रीमाची रक्कम सहाव्या वेतन सुधारणेनुसार अनुज्ञेय सुधारीत वेतन संरचनेच्या (च्ंल "जतनबजनतम) अनुषंगाने यथास्थिती देय वेतनातुन/थकबाकीतुन वसुल करण्यासंबंधीच्या कार्यपध्दतीबाबत स्वतंत्रपणे आदेश यथावकास निर्गमित करण्यात येतील.

तरी अखिल भारतीय सफाई मजुदर कॉग्रेस, भारतीय कामगार कर्मचारी महासंघ, लेबर फ्रन्ट, या कामगार संघटनांचे मागणीनुसार उल्हासनगर महानगरपालिकेत कार्यरत कर्मचा–यांना सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींच्या अनुषंगाने वेतन सुधारणापुर्व रु. १०,०००/– (रुपये दहा हजार मात्र) अग्रीम अदा करणेकामी अंदाजे रुपये २.५ कोटी इतका खर्च अपेक्षित असून याबाबत महापालिकेच्या सन २००८–०९ च्या सुधारीत अंदाजपत्रकात तरतुद करण्यात आलेली आहे.

तरी उल्हासनगर महानगरपालिकेतील कर्मचा–यांना सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींच्या अनुषंगाने वेतन सुधारणापुर्व रु. १०,०००/– (रुपये दहा हजार मात्र) अग्रीम अदा करणेकामी धोरणात्मक निर्णयार्थ मा. महासभा पटलावर प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ५६ <u>दिनांक:–२०/२/२००९</u>

सुचकाचे नाव :– श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :– श्री. सतिश चहाळ

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेतील कर्मचा–यांना सहाव्या केन्द्रीय वेतन आयोगाच्या शिफारशी अनुषंगाने वेतन सुधारणापुर्व रु. १०,०००/– अग्रीम अदा करणेस मान्यता देत आहे.

इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता या ठरावाद्वारे घेतलेल्या निर्णय अंतिम असून थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ६ :—** उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवील अनुसूचित जाती या प्रवर्गातील रिक्त पदांचा अनुशेष भरण्याकामी कार्यवाही करण्याचे काम अ.भा.स्थानिक स्वराज्य संस्थकडे सोपविण्यास मंजुरी देणे.

---

**<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :—</u>**२००३ मध्ये झालेली मागासवर्गीय भर्ती मध्ये घोटाळा झाल्याचे वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झाले आहे. त्या भर्तीच्या वेळेस कागदपत्रांचे निरिक्षण करण्यासाठी जे काही लोक होते, २९० कर्मचारी त्यावेळेस भर्ती करण्यात आले होते. त्यावेळेस आयुक्त म्हणुन श्री. रामनाथ सोनावणे हे होते त्यांनी सुध्दा त्यावेळेस माफीनामा मागितलेला आहे. त्याचप्रकारे हा मागासवर्गीयांच्या भर्तीचा प्रकार आहे काय? बाहेरील कर्मचारी भर्ती करण्यापेक्षा स्थानिक उल्हासनगरचे कर्मचारी भर्ती करण्यात यावेत. याबाबत विचार व्हावा.

**<u>श्री. मिलिंद सावंत (उप—आयुक्त, मुख्यालय):—</u>**मा. महापौर, उप—महापौर अथवा पिठासीन अधिकारी :— आणि आयुक्त साहेब, मा. आयुक्त साहेबांच्या सूचनेनुसार मी सभागृहाला थोडी माहिती देवु इच्छितो, सदरचा गोषवारा हा अनुसूचित जाती रिक्त पदांचा अनुशेष भरण्यासाठी सादर केला आहे. त्या पदांसाठी जाहिरात मागवुन जे काही अर्ज आले होते त्यांची आता लेखी परिक्षा घ्यायची आहे. लेखी परिक्षा घेण्यासाठी कुठली संस्था नेमावी याकरीता हा गोषवारा सादर केलेला आहे. त्यामध्ये फक्त अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेने अनुकुलता दर्शविली असल्याने त्यांचा गोषवा—यामध्ये उल्लेख केलेला आहे.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**मा. महापौरजी, या गोषवा—यामध्ये ज्या पदांचा उल्लेख करण्यात आलेला आहे, त्यातील एक पद आहे तरण तलाव निर्देशक महापालिकेने तरण तलाव चालविण्यासाठी ठेकेदारास दिलेला आहे. त्यामुळे मला असे वाटते की, महापालिकेला या पदाची काहीही आवश्यकता नाही. त्यामुळे हे पद यातुन वगळले जावे.

**<u>श्री. मिलिंद सावंत (उप—आयुक्त, मुख्यालय):—</u>**मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, तरण तलाव निर्देशक या पदासाठी जाहिरात देवुन अर्ज मागविल्यानंतर असे निदर्शनास आलेले आहे की, त्या पदासाठी एकही अर्ज प्राप्त झालेला नाही. त्यामुळे कुणीही उमेदवार या पदासाठी प्राप्त होणार नाही.

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**या पदावर नेमणुक होणार नाही. परंतु येथे या पदाची नोंद राहिल. पवुढे मागे प्रश्न उपस्थित होईल की हे पद रिक्त आहे. त्यासाठी माझे असे म्हणणे आहे की, हे पद वगळले पाहिजे.

**<u>श्री. मिलिंद सावंत (उप—आयुक्त, मुख्यालय):—</u>**आता आपल्याला अर्जच प्राप्त झालेले नाही त्यामुळे त्याची फेर जाहिरात देवुन अर्ज मागविणे किंवा कसे याचा निर्णय महासभेने घ्यावा.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**मा. महापौर अथवा पिठासीन अधिकारी :— महोदया, उल्हासनगर महानगरपालिका अस्थापनेवरील अनुसुचित जाती या प्रवर्गातील लोकांच्या लेखी परिक्षा घेण्यासाठी अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था यांनी लेखी परिक्षा घ्यावी म्हणुन महासभेसमोर प्रस्तावित केले आहे. पुन्हा एकदा तीच मानसिकता दिसुन येते की, २००३ साली झालेली भरती त्यावरील आरोप, प्रत्यारोप आणि मग चौकशी त्यामुळे हे काम तिस—या समितीला दयायचे, हे बरोबर नाही. आपण प्रामाणिक काम केले आहे याबाबत आपले ठाम मत असले पाहिजे. त्यासाठी पारदर्शकता असली पाहिजे. ती जर असेल जरी कोणी कितीही आरोप केले तर त्याचे समर्थन करण्यासाठी किंवा त्या आरोपाचे खंडन करायला संपुर्ण महासभा आहे. आणि त्यासाठी आमची खात्री पटली पाहिजे की, याठिकाणी अत्यंत पारदर्शकता आहे. कोणती कितीही आरोप केले तरी हरकत नाही. जसे जे पायी चालतात त्यांना लोक म्हणतात की घोडयावर का नाही बसलात? आणि घोडयावर बसले तर पायी का नाही चालत? आणि त्यासाठी लोक काय म्हणतील याला घाबरुन ४० फुटाच्या रस्त्याचे जसे झाले आहे की, उच्च न्यायालय त्यास स्थगिती देईल किंवा मुख्यमंत्री स्थगिती देतील. म्हणुन हे काम करायचे नाही. तशाच प्रकारची भावना याठिकाणी निर्माण झाली आहे. २००३ साली झालेल्या भरतीवर चौकशी लागली आहे तशी चौकशी लागायला नको म्हणुन आपण हे काम करायचेच नाही असे प्रत्येकाला वाटते. गटार साफ केले तरी चौकशी लागेल. रस्ता का बनवायचा तरी चौकशी, रस्ता बनविला तरी चौकशी,

घाबरायचे कशाला? म्हणुन माझी याबाबत सूचना आहे की, अत्यंत कणखर भुमिकेने समर्थपणे प्रशासनाने पारदर्शक कारभार करावा. लोकांना कळु दया की या ठिकाणचे शासन आणि प्रशासन भ्रष्टाचार मुक्त पारदर्शक काम करत आहे. आणि या कामासाठी आम्ही सक्षम आहोत ज्याप्रमाणे मुलाखती घेण्यासाठी निवड समिती आहे, तशीच समिती या महापालिकेच्या अंतर्गत ठेवावी. आम्ही आमचे काम दुस—याला कसे दयायचे? एक बाजु अशी आहे की, आम्ही आमचा विकास आराखडा स्वत: तयार करण्यासाठी एमएमआरडीएला काम देण्याचा प्रस्ताव आम्ही रद्द करतो. कारण आम्ही सक्षम प्राधिकरण आहोत. दुस—या बाजुला आम्ही अनुसूचित जाती आणि जमातीच्या उमदेवारांसाठी परिक्षा सुध्दा घेवु शकत नाही. म्हणजे आम्ही किती सक्षम आहोत. म्हणजे आम्ही आमची दुर्बलता दाखवुन देत आहोत तर असे न करता आम्ही दुर्बल नसुन सबळ आहोत, हे दाखविण्यासाठी, पदोन्नतीच्या मुलाखतीसाठी किंवा यापुर्वी निवड समिती होती किंवा तशीच एक समिती परिक्षा घेण्यासाठी आपण स्थापन करावी आणि त्याची परिक्षा आपणच घ्यावी.

<u>श्री. अशोककुमार रणखांब (अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—</u>मा. महापौर अथवा पिठासीन अधिकारी :— महोदया याबाबतीत आम्ही एक खुलासा करु इच्छितो की, ही जी भरती होणार आहे त्या भरतीसाठी मुलाखती या संबंधीत अधिकारी यांच्या मार्फतच घेतल्या जातील. परंतु परिक्षा जी असते ती अत्यंत तांत्रिक स्वरुपाची असते. त्यांचे पेपर काढणे, वाटप करणे, तपासणे ही तांत्रिक आणि शैक्षणिक अशी प्रक्रिया आहे. ती महाराष्ट्र शासनामध्ये बहुतांश करुन लोकसेवा आयोगाकडुन पास पाडली जाते. वेगवेगळया मंडळाकडुन निवड मंडळाकडुन केली जाते. आपल्याकडे तशी यंत्रणा उपलब्ध नाही. म्हणुन फक्त परिक्षा त्यांच्याकडुन घ्यायची आहे. बाकीच्या मुलाखती वगैरे जी भरतीची प्रक्रिया आहे ती महापालिकेकडुनच होणार आहे. फक्त त्याची परिक्षा जी घ्यायची आहे ती स्थानिक स्वराज्य संस्थेकडुन घेण्यासाठी महासभेची परवानगी मागितली आहे.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>सन्माननिय महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, उल्हासनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर अनुसुचित जातीच्या पदांवरील अनुशेष भरण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेस काम देण्याकामी मंजुरीस हा विषय आपणासमोर आलेला आहे. एका सदस्याने सांगितले की, २००३ साली जी भरती झाली त्याबाबतीत वर्तमानपत्रामध्ये बरेचसे बातम्या छापुन आलेले आहेत त्याबाबतीत मला स्पष्ट म्हणायचे आहे की, विषयांकित कामी संमती न देता आता सन्माननिय आयुक्त साहेबांनी सांगितल्याप्रमाणे सगळया गोष्टी आपल्या महापालिकेमार्फत होतील. परिक्षा घेणे आणि उमेदवारांची निवड करणे हे काम जर स्थानिक स्वराज्य संस्थेकडे असेल तर त्यामध्ये सुध्दा घोळ होवु शकतो. यासाठी उल्हासनगर महापालिकेतर्फे एक समिती नेमण्यात यावी. आणि त्या समितीला सर्व अधिकार दयावेत. अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेला हे काम अजिबात देण्यात येवु नये या मताचा मी आहे.

<u>महापालिका सचिव :—</u>मान्यता देंत नाही? सर्व संमतीने?

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे:—</u>आमच्याकडेपण काही तरी अधिकार राहु दया.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर अथवा पिठासीन अधिकारी :— :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे



---

☑

**विषय क्र. ६:—** उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवील अनुसूचित जाती या प्रवर्गातील रिक्त पदांचा अनुशेष भरण्याकामी कार्यवाही करण्याचे काम अ.भा.स्थानिक स्वराज्य संस्थकडे सोपविण्यास मंजुरी देणे.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयास अनुसरून सादर करण्यात येते की, मा. विधान मंडळ अनुसूचीत कल्याण समिती सचिवालय, मुंबई यांचेसोबत दि. 27/6/2007 रोजी झालेल्या बैठकीमध्ये महानगरपालिका

आस्थापनेवरील 'अनुसूचित जाती' या प्रवर्गातील रिक्त पदे भरणेबाबत सुचित करण्यात आले होते. 'अनुसूचित जाती' या प्रवग्रातील तत्कालिन रिक्त पदांचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| वर्ग | पदनाम | पद संख्या |
|---|---|---|
| अ | उप अभियंता | 01 |
| ब | सहाय्यक आयुक्त | 01 |
| क | उपस्थानक अधिकारी | 01 |
| | लघुलेखक मराठी(निम्नश्रेणी) | 01 |
| | कनिष्ठ अभियंता | 01 |
| | तरण तलाव निर्देशक | 01 |
| | कनिष्ठ लिपीक | 01 |
| ड | फायरमन | 02 |
| | विद्युत मदतनीस | 01 |

02. वरीलप्रमाणे रिक्त पदे भरणेकामी दि. 18/9/2007 रोजीच्या विविध वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करून दिनांक 5/10/2007 पर्यंत उमेदवारांकडून अर्ज मागविण्यांत आले होते. तसेच सहाय्यक संचालक, सेवा योजन कार्यालय, ठाणे, समाज कल्याण अधिकारी, समाज कल्याण कार्यालय, ठाणे यांचेकडून यादी मागविण्यांत आली होती. जाहिरातीस अनुसरून आणि सेवायोजन कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या उमेदवारांची यादी असे मिळून 419 उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले होते.

03. प्राप्त अर्जाची छाननी करण्यासाठी उप आयुक्त (आरोग्य) यांचे अध्यक्षतेखाली का. आ. दिनांक 19/10/2007 अन्वये समिती स्थापन करण्यांत आली. सदरहु समितीने दिनांक 30/4/2008 रोजी पात्र ठरविलेल्या उमेदवारांची यादी आयुक्तांना सादर केली.

04. पात्र उमेदवारांची लेखी परिक्षा घेऊन गुणवत्ता यादी तयार करून मिळणेकामी खालिल संस्थाना विचारणा करण्यांत आली.

1) महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लि. (MKCC)
2) नॅशनल स्कुल ऑफ बॅकींग (NSB)
3) महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, मुंबई
4) यशदा, पुणे
5) आय. आर. डी. सी, पुणे
6) अखिल भारतीय स्वराज्य संस्था, मुंबई

05. वरील संस्थपैंकी केवळ अधिल भारतीय स्वराज्य संस्था, मुंबई यांनी प्रथम 50 उमेदवारांसाठी 30,000/- व उर्वरीत उमेदवारांसाठी प्रत्येकी रूपये 600/- असे शुल्क आकारून त्यांचेकडील दिनांक 13 जुन, 2008 रोजीच्या पत्रान्वये लेखी परिक्षा घेणेकामी संमती दर्शविली आहे.

06. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. प्रनिम-2007/प्र.क्र.46/07/13-अ, दिनांक 19 ऑक्टोंबर, 2007 अन्वये भूतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळाच्या कक्षेतील गट 'क' वर्गीय पदांवरील उमेदवारांची निवड करण्यासाठी जिल्हास्तरीय पदांकरितां जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा निवड समित्या स्थापन केल्या आहेत. परंतु या जिल्हा निवड समितीच्या कार्यकक्षेत महानगरपालिकांच्या आस्थापनेवरील गट 'क' वर्गीय पदांचा समावेश नसल्यामुळे तो

समावेश करावा म्हणून अपर मुख्य सचिव (सेवा) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई तसेच जिल्हाधिकारी, ठाणे यांना दि. 12/9/2008 च्या पत्रान्वये विनंती करण्यांत आली. त्यांना दि. 7/11/2008 व दिनांक 18/12/2008 च्या पात्रान्वये स्मरणपत्र सुध्दा पाठविण्यांत आले. परंतु त्यांच्याकडून कांहीच कळविण्यांत आले नाही.

07. महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील गट - अ व गट - ब वर्गीय पदांवरील उमेदवारांची निवड प्रक्रिया पारपाडुन उमेदवारांची शिफारस करणेबाबत मा. सचिव, महाराष्ट्र राज्य लोक सेवा आयोग, फोर्ट, मुंबई यांना दिनांक 7/11/2008 च्या पत्रान्वये विनंती करण्यांत आली होती. त्यास अनुसरून उप सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांनी त्यांचे दिनांक 3/11/2008 च्या पत्रान्वये असे कळविले आहे की, ''आयोगाची कार्यकक्षा (कामे) भारतीय संविधानाने ठरवून दिली आहेत. तसेच आयोगाकडून पार पाडली जाणारी अतिरिक्त कामे ही संविधानाच्या चौकटीतच मा. राज्यपालांनी आयोगावर सोपविली असल्याने या कामाव्यतिरिक्त आयोगास कोणत्याही प्रकारची कामे पार पाडता येणार नाही''

08. वरील विवेचन विचारात घेता ''अनुसूचित जाती'' या प्रवर्गातील रिक्त पदांचा अनुशेष भरणेकामी पात्र उमेदवारांची लेखी परिक्षा घेऊन गुणवत्ता यादी तयार करून पाठविणेबाबतचे काम स्विकारण्यास अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेने अनुकुलता दर्शविलेली आहे. सबब त्यांचेकडे ही कामगिरी सोपविण्यास मंजुरी मिळणेकामी मा. महासभा पटलावर प्रस्तावित करण्यात येते.

महासभा ठराव क्र: ५७ दिनांकः—२०/२/२००९

सुचकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :— श्री.बी.बी. मोरे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवरील अनुसूचित जाती या प्रवर्गातील रिक्त पदांचा अनुशेष भरण्याकामी कार्यवाही करण्याचे काम अ.भा.स्थानिक स्वराज्य संस्थकडे सोपविण्यास मान्यता देत नाही.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र.** ७ :— श्री नितेश प्रकाश रंगारी, कर निरिक्षक यांचा परिविक्षाधीन कालावधी सपुष्टात आणून पुढील वेतनवाढ नियमित करणेस मान्यता देणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

<u>महापौर अथवा पिठासीन अधिकारी :— :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

**विषय क्र. ७:—** श्री नितेश प्रकाश रंगारी, कर निरिक्षक यांचा परिविक्षाधीन कालावधी सपुष्टात आणून पुढील वेतनवाढ नियमित करणेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

महाराष्ट्र शासनाने परिपत्रक क्र.बी.सी.सी—२००२/१३०६/१६—ब, दिनांक २६ मार्च, २००३ अन्वये सरळसेवा व पदोन्नतीमधील मागासवर्गीयांचा अनुशेष भरून काढणेसंबंधी दिलेल्या आदेशानुसार उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवरील विविध संवर्गातील शिल्लक अनुशेषानुसार जिल्हा सेवायोजन कार्यालय, विविध रोजगार व मार्गदर्शन माहिती व संचालनालय, मुंबई व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, शहापुर या कार्यालयाकडुन रिक्त अनुशेषानुसार मागणी करून प्राप्त झालेल्या उमेदवारांच्या मुलाखती माहे जून २००३ मध्ये घेण्यात आल्या होत्या. सदर मुलाखतीसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४ अन्वये समिती गठीत करण्यात आली होती. त्यामध्ये महापालिकेचे ०४ व शासनाकडील वरील ०३ कार्यालयांचे अधिकारी सदस्य म्हणुन होते. महापालिकेने गठीत केलेल्या समितीमार्फत उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या होत्या. महापालिकेच्या सरळसेवा अनुशेषांतर्गत कर निरीक्षक या संवर्गातील अनु.जाती याप्रवर्गाचे ०१ पद भरावयाचे होते. सदर पदासाठी घेण्यात आलेल्या मुलाखतीमध्ये गुणवत्तेनुसार श्री. नितेश प्रकाश रंगारी यांची निवड करण्यात आली होती. सदर उमेदवारांच्या निवडीस महासभा ठराव क्र. ५९ दिनांक २०/६/२००३ अन्वये मंजुरी देण्यात आली आहे. त्यानुसार श्री. नितेश रंगारी यांना कार्यालयीन क्र. उमपा/साप्रवि/आस्था/मुलि/८१, दिनांक ३० जुलै, २००३ च्या आदेशान्वये कर निरीक्षक या पदावर कार्यालयीन आदेशातील १० अटी व शर्तीच्या अधीन राहुन नियुक्ती देण्यात आली होती.

उल्हासनगर महानगरपालिकेने स्वतंत्र सेवाशर्ती नियमावली तयार केली असुन शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आली आहे. त्यामध्ये कर निरीक्षक या पदासाठी सरळसेवेने भरावयासाठी शैक्षणिक अर्हता पुढीलप्रमाणे दिलेली आहे. — १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी (स्था. स्वराज्य संस्थेची पदविकाधारकास प्राधान्य ) २) स्था. स्वराज्य संस्थेतील कर/जकात विभागातील ३ वर्षाचा अनुभव.

श्री. नितेश रंगारी यांना कर निरीक्षक या पदावर नियुक्ती दिलेल्या दिनांक ३० जुलै, २००३ च्या आदेशातील अट क्र. १ मधील पुर्तता करणेसाठी त्यांची मुळ कागदपत्रे तपासली असता महापालिकेच्या सेवाशर्ती नियमावलीतील कर निरीक्षक संवर्गाचे सरळसेवेने भरावयाच्या पदासाठी दिलेल्या अर्हतेतील अट क्र. २ वरील '' स्था. स्वराज्य संस्थेतील कर/जकात विभागातील ३ वर्षाचा अनुभव '' हि अर्हता श्री. नितेश रंगारी धारण करीत नसल्याने त्यांची नियुक्ती कार्यालयीन क्र. उमपा/साप्रवि/आस्था/मुलि/१२०, दिनांक १८ ऑगस्ट, २००३ च्या आदेशान्वये रदद् करून याबाबत रंगारी यांनी मा. उच्च न्यायालयात क्र. ५८५५/२००३ अन्वये दाखल केलेल्या याचिकेची माहिती देण्याचा प्रस्ताव मा. महासभेपुढे सादर केला असता मा. महासभेने ठराव क्र. ७३ दिनांक १९/९/२००३ अन्वये श्री. रंगारी यांची नियुक्ती रदद् करण्याचा ठराव पारित केलेला आहे.

मा. उच्च न्यायालयाने सदर रिट याचिका क्र. ५८५५/२००३ दिनांक १३/४/२००४ रोजी निकाली काढले असुन त्यामध्ये उल्हासनगर महानगरपालिकेने श्री. निलेश रंगारी यांची नियुक्ती रदद् केल्याची कार्यवाही योग्य असुन त्यामध्ये काही त्रुटी असल्याचे आढळुन येत नाही असा निर्णय दिला आहे. सदर मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाविरूध्द श्री. रंगारी यांनी मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये सीएलपी ( सी ) १८५०१/२००४ अन्वये आव्हान केले होते. मा. सर्वोच्च न्यायालयाने श्री. रंगारी हे मागासवर्गीय उमेदवार असल्याने त्यांच्या नियुक्तीबाबत महापालिकेच्या सेवाशर्ती नियमावलीतील अटी शिथिल करण्याचे अधिकार महापालिकेस असल्याने अट शिथील करणेबाबतच्या निर्णयाची माहिती सहा आठवडयाच्या आत पुरविणेस कळविले आहे.

शासनाचे परिपत्रक क्र. रावसेविभाग क्र. बी.एस.सी. १०५५, दिनांक ५ मार्च १९५५ च्या परिपत्रकामध्ये उमेदवाराची किमान अर्हता शिथील करणेबाबत — उमेदवाराची निवड करतानाच्यासंदर्भात गुणवत्तेच्या सर्वसाधारण दर्जाची काटेकोरपणे अंमलबजावणी केल्यानंतर पुरेशा प्रमाणात मागासवर्गीयातील उमेदवार उपलब्ध होत नाही असे आढळुन आले तर त्या वर्गातील उमेदवारांच्या बाबतीत गुणवत्तेच्यादृष्टीने निवडीचा दर्जा

शिथील करण्यात यावा आणि जे उमेदवार सर्वसाधारणपणे योग्य वाटतील आणि जे नेमणुक करण्याच्यादृष्टीने आवश्यक असलेल्या गुणवत्तेच्या किमान दर्जाचे असतील त्यांची निवड करण्यात यावी असे निर्देश दिले आहेत. सदर शासन परिपत्रक हे उमेदवाराच्या गुणवत्तेबाबत आहे अर्हतेबाबत नाही. प्रस्तुत प्रकरणी श्री. रंगारी हे महापालिकेच्या सेवाशर्ती नियमावलीतील अर्हता अट क्र. २ धारण करीत नसल्याने त्यांची नियुक्ती रदद् करण्यात आली आहे.

सबब, मा. सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचे आदेश रद्द करून (Set aside) उपरोक्त दिनांक ५ मार्च १९५५ च्या परिपत्रकातील तरतुदीनुसार सेवाशर्ती नियमावलीतील अट शिथील करण्याबाबत विचारात यावा असे आदेश दिले आहेत. ही बाब विचारात घेवून या प्रकरणी कर निरिक्षक पदाचे सेवा भरती नियमातील स्थानिक स्वराज्य संस्थेतील ०३ वर्षाच्या अनुभवाची अट शिथिल करण्याचा प्रस्ताव मुं. प्रां. म. अधिनियम १९४९ चे कलम ४५४ अन्वये मा. महासभेपुढे प्रस्तावित करण्यात आले. त्यानुसार महासभा ठराव क्रमांक ९१ दिनांक २०/०३/२००६ अन्वये कर निरीक्षक या पदाचा अनुभवाची अट शिथिल करण्यात आली त्यानुसार जा.क्र/उमपा/आस्था/मुली/ ३७६/०६ दिनांक १०/०५/२००६ च्या आदेशान्वये श्री. नितेश प्रकाश रंगारी यांना कर निरीक्षक पदी पुर्ननियुक्ती आदेश बजाविण्यात आले त्यानुसार ते दिनांक १५/०५/२००६ रोजी सेवेत रूजू झाले.

दिनांक १५/०५/२००६ ते १५/०५/२००८ पर्यत श्री. रंगारी यांनी कोणत्याही प्रकारची रजा उपभोगलेली नाही तरी त्यांच्या परिक्षावधीन संपुष्टात आणून पुढील वेतनवाढी मुक्त करणे क्रमप्राप्त आहे त्यासाठी श्री. नितेश रंगारी कर निरीक्षक यांचे गोपनीय अहवाल पुढीलप्रमाणे.

(१) दिनांक १५/०५/०६ ते ३१/०३/०७ पर्यत चा गोपनीय अहवाल अ उत्कृष्ट शेरा दिलेला आहे.

(२) दिनांक ०१/०४/०७ ते ३१/०३/०८ पर्यतचा गोपनीय अहवाल अ उत्कृष्ट शेरा दिलेला आहे.

माहे जून २००६ ते मार्च २००७ अखेर पर्यत श्री. रंगारी यांची निवडणूक कामाकरिता तहसीलदार कार्यालयामध्ये कार्यरत होते तसेच २००७–०८ मध्ये विक्रमी कर वसुली केल्याबददल त्यांना प्रशासकीय पत्र देण्यात आलेले आहे.

परीक्षावधीन कालावधी समाधानकारक रित्या पूर्ण केल्यामुळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ नियम ५३ तसेच म. ना. से. (वेतन) नियम १९८१ मधील ३९ खालील टि–१ (अ) (दोन) अन्वये नियुक्त प्राधिकारी महासभा सक्षम आहे. त्यामुळे नितेश प्रकाश रंगारी, कर निरीक्षक यांच्या परीक्षावधीन कालावधी सपृष्टांत आणून पुढील वेतनवाढ नियमित करण्यासाठी महासभेच्या मान्यतेसाठी सविनय सादर.

<u>महासभा ठराव क्र:</u> ५८ <u>दिनांक:–२०/२/२००९</u>

सुचकाचे नाव :– श्री.बी.बी. मोरे
अनुमोदकाचे नाव :– श्री. विनोद ठाकुर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री नितेश प्रकाश रंगारी, कर निरिक्षक यांचा परिविक्षाधीन कालावधी सपुष्टात आणून पुढील वेतनवाढ नियमित करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–
अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ८** :– सफाई कामगार पदावर कार्यरत काही कर्मचा–यांना वैदयकिय सेवानिवृत्ती देणे.

---

<u>काही सदस्य :–</u>पास–पास……

<u>महापौर अथवा पिठासीन अधिकारी :– :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ८:–** सफाई कामगार पदावर कार्यरत काही कर्मचा-यांना वैदयकिय सेवानिवृत्ती देणे.

<u>प्रस्तावना</u>

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम ७१ अन्वये रुग्णता निवृत्ती वेतनासाठी वैदयकीय प्रमाणपत्र दाखल केल्यानंतर नियम ८० अन्वये कार्यमुक्तता केली जाते. तसेच नियुक्ती प्राधिकारी वैदयकीय सेवा निवृत्तीस परवानगी देवु शकतो अशी तरतुद आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महानगरपालिकेच्या ज्या अधिका–याचे किमान मासिक वेतन भत्ते वगळुन चारशे रु. किंवा त्याहुन अधिक आहे असे अधिकारी तात्पुरते असो किंवा कायम असो त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकेस निहित असेल अशी तरतुद आहे. म्हणजेच नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (नि.वे.) नियम १९८२ मधील नियम ७१ अन्वये वैदयकीय सेवानिवृत्ती प्रकरणी कार्यवाहीस नियुक्ती प्राधिकारी सक्षम आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महापालिका म्हणजेच महासभा '' नियुक्ती प्राधिकारी'' म्हणुन सक्षम आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेतील पुढील सफाई कामगारांनी त्यांचे वयोमानानुसार तसेच शारीरीक आजारपणामुळे त्यांचेकडुन सफाई काम होत नाही याकारणास्तव त्यांनी वैदयकीय सेवा निवृत्तीसाठी विनंती अर्ज सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | सफाई कर्मचा–यांचे नाव |
|---|---|
| १ | श्रीमती किरण रघुवीर रजोरीया |
| २ | श्रीमती माया स्वराज टाक |
| ३ | श्रीमती असरफी भिका |
| ४ | श्रीमती कमला गोविंद महाले |
| ५ | श्री. सिध्दार्थ किरकुळ साळवे |
| ६ | श्री. स्वरुप मंगा |
| ७ | श्री. राजेंद्र बलबीर बिडलानी |
| ८ | श्रीमती रुक्मिणी जगन |
| ९ | श्रीमती सरोज रमेश भगवाने |
| १० | श्रीमती उर्मिला मख्खन |
| ११ | श्रीमती सेवुबाई लक्ष्मण पंडागळे |
| १२ | श्रीमती रमेश गौतम जाधव |
| १३ | श्रीमती गिता मधु अंबोरे |

तरी वरील सफाई कामगारांना वैदयकीय कारणास्तव 'सेवानिवृत्ती' देणेकामी मा. महासभा पटलावर मंजुरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ५९ <u>दिनांक:–२०/२/२००९</u>

सुचकाचे नाव :– श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :– श्री. लालबिहारी यादव

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे वर उल्लेखलेल्या कार्यरत सफाई कर्मचा-यांना वैदयकिय कारणास्तव सेवानिवृत्ती देण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ९ :—**४ सफाई कर्मचा—यांना स्वेच्छा सेवानिवृत्ती देणे.

---

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......
<u>**महापौर अथवा पिठासीन अधिकारी :— :—**</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ९:—** ४ सफाई कर्मचा-यांना स्वेच्छा सेवानिवृत्ती देणे.

<u>प्रस्तावना</u>

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम ६५ व ६६ अन्वये अनुक्रमे ३० वर्ष व २० वर्ष अर्हतकारी सेवा पुर्ण झाल्यानंतर कर्मचा—यास ३ महिन्यांची नोटिस देवुन स्वेच्छा निवृत्ती घेता येते. तसेच नियम ७१ अन्वये रुग्णता निवृत्ती वेतनासाठी वैदयकीय प्रमाणपत्र दाखल केल्यानंतर नियम ८० अन्वये कार्यमुक्तता केली जाते. नियम ६५ पोट नियम १ अन्वये ३० वर्षाच्या सेवेनंतर व नियम ६६ पोट नियम १ अन्वये २० वर्षाच्या सेवेनंतर नियुक्ती प्राधिकारी स्वेच्छा नियुक्तीस परवानगी देवु शकतो अशी तरतुद आहे.
महाराष्ट्र नागरी सेवा (नि.वे.) नियम १९८२ मधील नियम ६५ व ६६ अन्वये सेवानिवृत्ती प्रकरणी कार्यवाहीस नियुक्ती प्राधिकारी सक्षम आहे.
मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महापालिका म्हणजेच महासभा '' नियुक्ती प्राधिकारी'' म्हणुन सक्षम आहे.
उल्हासनगर महानगरपालिकेतील पुढील सफाई कर्मचा—यांनी स्वेच्छा निवृत्तीसाठी विनंती अर्ज सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | सफाई कर्मचा—यांचे नाव | अर्हतकारी सेवा | नियम |
|---|---|---|---|
| १ | श्री. बाबुलाल नथ्थु निकम | २० वर्षापेक्षा जास्त | ६६ |
| २ | श्री. विनोद हरपाल छजनाले | २० वर्षापेक्षा जास्त | ६६ |
| ३ | श्री. सुभाष मानसिंग | २० वर्षापेक्षा जास्त | ६६ |
| ४ | श्री. रामअवतार सुख्खन | २० वर्षापेक्षा जास्त | ६६ |

तरी वरील सफाई कामगारांना स्वेच्छा सेवा निवृत्ती देणेकामी मा. महासभा पटलावर मंजुरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ६० <u>दिनांक:—२०/२/२००९</u>

सुचकाचे नाव :– श्री. रामसागर यादव

अनुमोदकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे वर उल्लेखलेल्या ४ सफाई कर्मचा-यांना स्वेच्छा सेवानिवृत्ती देण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. १० वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. १० :–** उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय सुरू करणेकामी मान्यता देणे.

---

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>महापौर अथवा पिठासीन अधिकारी :– :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. १०:–** उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय सुरू करणेकामी मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिका कॅम्प क्र. ४ व ५ मध्ये महाविदयालय सदयस्थितीत नाही. त्यामुळे कॅम्प क्र. ४ व ५ मधील विदयार्थ्यांना उच्च शिक्षणाकरीता अडचणी सामोरे जावे लागत आहे. सदयस्थितीत महानगरपालिका क्षेत्रात दोनच महाविदयालय कार्यरत आहेत. महानगरपालिका क्षेत्रातील वाढत्या लोकसंख्येचा विचार करता सदर महाविदयालये अपुरी पडत आहेत. तसेच माजी सभापती माध्यमिक व पुर्व प्राथमिक शिक्षण समिती श्री. दत्तात्रय पवार व सभापती माध्यमिक व पुर्व प्राथमिक शिक्षण मिती श्रीमती सुमन शेळके यांनी देखिल महानगरपालिका क्षेत्रात महाविदयालय सुरु करण्याबाबत पत्र दिले आहे. तरी सदर भागात महाविदयालय (कला, वाणिज्य व विज्ञान) सुरु करण्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव शासनास महानगरपालिकेच्या वतीने सादर करण्यात आलेला आहे.

परंतु सदर महाविदयालय (कला, वाणिज्य व विज्ञान) सुरु करणेकरीता मा. महासभेची मंजुरी आवश्यक आहे. तरी महानगरपालिका क्षेत्रात महाविदयालय (कला, वाणिज्य व विज्ञान) सुरु करणेकरीता मा. महासभेची मंजुरी मिळावी ही नम्र विनंती.

<u>महासभा ठराव क्र: ६१</u> <u>दिनांक:–२०/२/२००९</u>

सुचकाचे नाव :– श्री. दत्तात्रय पवार

अनुमोदकाचे नाव :– श्री. सुमन शेळेके

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय सुरू करणेकामी मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ११ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ११** :— श्री अशोककुमार रणखांब,श्री च.प्र.सिह,व श्री एम.ए.जवादे यांची महापालिका आस्थापनेवरील अनुक्रमे अतिरिक्त आयुक्त,सहा. संचालक नगररचना व शहर अभियंता या पदावरील प्रतिनियुक्तीची माहिती नोंद करणे.

---

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :—</u>यातील श्री. सी.पी. सिंग यांचे एक नाव वगळुन.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>हा विषय आमच्यासमोर मंजुरीस्तव ठेवलेला आहे की माहितीसाठी ठेवलेला आह? प्रथम हे सांगा. सचिव साहेब, हा जो विषय आहे आम्हांस माहिती देण्यासाठी ठेवला आहे की आमच्याकडुन मंजुरीस्तव ठेवला आहे.

<u>महापालिका सचिव :—</u>माहिती देण्यासाठी.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>तर मग ती माहिती आम्हांला मिळावी. हा विषय वगळण्याचा किंवा पुढे ढकलण्याचा आमचा अधिकारात थोडेच आहे? आम्हांला माहिती देण्यासाठी आहे, ती माहिती आम्हांला मिळाली, बस झालं.

<u>सदस्य श्री. राजेश वधारिया :—</u>महाराष्ट्र शासनाचे आदेश आहेत. त्याबाबतीत आम्हांला फक्त माहिती दयायची आहे. हा प्रस्ताव रद्द करण्याचा महासभेला अधिकार नाही.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>आम्हांला माहिती मिळाली पुढील कामकाज चालु ठेवा.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>चला ठिक आहे, ठिक आहे.

<u>महापालिका सचिव:—</u>ठिक आहे?

<u>काही सदस्य :—</u>ठिक आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव साहेब, जर हा विषय माहिती देण्यासाठीच आहे तर आम्हांस माहिती मिळाली आता आपण कशली वाट पाहता? वेळ का फुकट घालवता? एवढया दिवसापासुन सभा सूचना मिळाली आहे काही लोकांनी ती वाचली नाही? दुस—या कोणी माहिती नोंद करुन घेतली किंवा नाही पण मी तर माहिती नोंद करुन घेतली. ज्या कुणा सदस्याला याबाबतीत ठराव तयार करुन आणायचा असेल त्यांनी तो पुढील महासभेत आणावा. सचिव साहेब, आपण आमच्या सदस्यांना या कामी कायदयात काय तरतुद आहे ते सांगा. प्रस्ताव माहितीसाठी महासभेमसोर ठेवण्यात आलेला आहे. इतिवृत्तात याची नोंद झालेली आहे. ते आपण इतिवृत्तातुन काढु शकता काय?

आम्ही सर्वजण ओरडुन ओरडुन सांगत आहोत की, आम्हांला या विषयाची माहिती मिळाली आहे. त्याबाबत आपण असे म्हणु शकता की आमच्या माहितीत हा विषय आलेला नाही. येथे आमचे सर्व सन्माननिय सदस्य बसले आहेत ते सर्व बहिरे आहेत काय?

सदस्य श्री. रविंद्र बागुल :—सचिव साहेब, सभेचे कामकाज लवकर लवकर पुढे सरकवा. कामकाज पुढे चालु दया. सांयकाळचे ७.०० वाजले आहेत.

महापालिका सचिव :—काय करायचे?

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—आपण या विषयाची माहिती देवु इच्छित होते. ती माहिती आम्हांला मिळाली आहे. आपण माहिती देण्यासाठी जो विषय आणला होता तो वगळला जावु शकतो काय? याची आम्हांस माहिती दया. आपण विषय वाचुन दाखविला व आम्ही ओरडुन ओरडुन सांगितले की आम्हांला माहिती मिळाली त्यानंतरही या विषयाची आम्हांला माहिती नाही असे सदस्य कसे म्हणु शकतात? यासाठी आपण कायदा काय आहे ते सांगा?

सदस्य श्री. बी.बी. मोरे :—सन्माननिय महापौरजी, आयुक्त साहेब, सभागृहासमोर हा जो विषय आलेला आहे, या विषयाबाबत आमची काय संमती पाहिजे की त्यावर विचार झाला पाहिजे याबाबतीत चर्चा चालु आहे परंतु माझे असे मत आहे की, मा. आयुक्त हे या महापालिकेत येवुन बरेच दिवस झाले आहेत. त्यांच्या बद्दल माहितीची नोंद करण्यासाठी आज येथे विषय आणलेला आहे. परंतु सहाय्यक नगररचनाकार श्री. सिंग यांच्याबाबतीत येथे जो विषय आलेला आहे. त्या सिंग बद्दल सभागृहाला आणि आम्हां सर्व सदस्यांना काणेतीही माहिती नाही. ते कोठुन आले? कसे आले? किती वर्ष? ठाणे मुंबई कोठे त्यांनी काम केले? आम्हांला त्यांच्याबाबतीत अजुन काहीही माहिती नाही. आणि ती माहिती मिळविणे आवश्यक आहे. श्री. जवादे व श्री. रणखांब यांचा प्रस्ताव पारीत करु शकता.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—हा जो विषय आपण आणला आहे तो माहिती देण्यासाठी आहे की, मंजुरी देण्यासाठी आहे? आपण हा विषय फक्त माहितीसाठी आणलेला आहे, ती अमुक हे अधिकारी आपल्याकडे प्रतिनियुक्तीवर आलेले आहेत.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :—महाराजजी, हे लक्षात घ्या जर महाराष्ट्र शासनाने कोणत्याही अधिका—यास आपणाकडे पाठविले तर त्याच्या बाबतीत थोडीशी तरी चौकशी करा. त्यास आम्ही नाही बोलत नाहीत. तसेच त्याचा प्रस्ताव रद्द करा असेही आम्ही म्हणत नाही. काही कालावधीसाठी विषय पुढे ढकला.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—श्री. मोरे साहेब, त्या अधिका—यांना आपल्या महापालिकेत ठेवायचे किंवा नाही याबाबत ते आपणाकडे मंजुरी मागत नाहीत. ते आपणांस माहिती देत आहे की, आपण या या अधिका—यांना प्रतिनियुक्तीवर ठेवले आहे, एवढेच. आपल्या बोलण्यानुसार त्यांना ठेवु किंवा आपल्या बोलण्यानुसार त्यांना परत पाठवु. अमुक या अधिका—यांना प्रतिनियुक्तीवर ठेवले आहे. याची माहिती देण्यासाठी हा विषय आपणाकडे आणलेला आहे. आम्हांला माहिती मिळाली आहे.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :—परंतु हा जो विषय आहे हा पुढील महासभेत घेतला जावा.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—हा विषय माहितीसाठी आणलेला आहे आम्हांला माहिती मिळाली.

सदस्य श्री.बी.बी. मोरे:— काय माहिती मिळाली?

सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :—अमुक अमुक हे तीन अधिकारी आपल्या महापालिकेत प्रतिनियुक्तीवर आले आहेत. ही माहिती मिळाली.

सदस्य श्री.बी.बी. मोरे:—असे नाही चालणार. श्री. अशोककुमार रणखांब हे अतिरिक्त आयुक्त म्हणुन ब—याच दिवसापासुन आलेले आहेत.

**सदस्य श्री. विनोद ठाकुर :—**मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, ११ नंबरचा हा जो विषय आहे तो मराठीत असा आहे श्री. अशोक रणखांब, श्री. चं. प्र. सिंह व श्री. एम.ए. जवादे यांची महापालिका आस्थापनेवर अनुक्रमे अतिरिक्त आयुक्त, सहा. संचालक, नगररचना, व शहर अभियंता या पदावर प्रतिनियुक्तीची माहिती नोंद करणे. याचा जरा खुलासा करावा.

**सदस्य श्री.बी.बी. मोरे :—**माहिती नोंद करणे असा जर विषय आलेला आहे. तर श्री. जवादे साहेबांची आम्हांला पुर्ण माहिती आहे. श्री. अशोककुमार रणखांब याच्याबाबतीत सुध्दा कित्येक महिन्यापासुन माहिती आहे. परंतु श्री. सिंह बद्दल आम्हांला काहीही माहिती नाही. आणि ती माहिती मिळविण्यासाठी म्हणुन आम्ही बोलत आहोत. हा विषय काही कालावधीसाठी पुढे ढकला असे म्हणत नाही. काही कालावधीसाठी हा विषय प्रलंबित ठेवतो. श्री. रणखांब व श्री. जवादे यांच्याबाबतीत सर्व सदस्यांना चांगली माहिती आहे. श्री. रणखांब व श्री. जवादे यांच्या प्रतिनियुक्तीच्या नेमणुकीची माहिती देण्याबाबतचा जो विषय आणलेला आहे तो बरोबर आहे. परंतु श्री. सिंह बद्दल आम्हांला काही माहिती नाही. तर पुढील काही कालावधीसाठी स्थगित करावा.

**सदस्य श्री. सतिश चहाळ :—**मा. महापौर अथवा पिठासीन अधिकारी :— महोदया, विषयाबाबतीत संपुर्ण सभागृहाला माहिती मिळालेली आहे.

**महापालिका सचिव :—**काय करायचे आहे? निर्णय तर आपणांस घ्यायचा आहे.

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—**सन्माननिय महापौरजी, हा विषय काय आहे तो सर्व सदस्यांना समजावुन सांगण्याबाबत सचिव साहेबांना आपण आदेश दया. हा विषय काय आहे हे आमच्या बहुतांश सदस्यांच्या लक्षात आलेला नाही. तरी तो समजावुन सांगण्यासाठी सचिव साहेबांना आपण आदेश दया.

**सदस्य श्री. सतिश चहाळ :—**माहिती नोंद करणे असा विषय आहे. कोणती माहिती नोंद करत आहात ते तुम्ही सांगायला पाहिजे.

**सदस्य श्री. रामचंद्र पारवानी:—**सन्माननिय महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब व सचिव साहेब, आपण म्हणता की हा विषय केवळ माहिती देण्यासाठी आहे तसे असेल तर आपण आम्हांला केवळ एक पत्र देवुन आम्हांला माहिती देवु शकता. महासभेपुढे विषय आणण्याची काय आवश्यकता आहे?

**सदस्य श्री.बी.बी. मोरे :—**बरोबर, बरोबर.....

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**मा. महापौर अथवा पिठासीन अधिकारी :— महोदया, माझे मित्र श्री. रामचंद्र पारवानी यांनी जो मुद्दा उपस्थित केला की जर हा विषय केवळ माहितीसाठी महासभेपुढे आणलेला आहे तर आमचे श्री. रणखांब साहेब, ३ महिन्यापेक्षा जास्त कालावधीपासुन येथे आलेले आहेत. त्यांच्याबाबतची माहिती यापुर्वी ज्या महासभा झाल्या त्या महासभांमध्ये एका पत्रान्वये श्री. अशोक रणखांब यांची अतिरिक्त आयुक्त म्हणुन या महापालिकेत नेमणुक झाली आहे अशी माहिती दिली जावु शकत होती. परंतु विषय पत्रिकेवर हा विषय आणण्यात आलेला आहे की अमुक अमुक या तीन अधिका—यांची प्रतिनियुक्तीवर नियुक्ती झाली आहे. तर या विषयाबाबत सविस्तरपणे सभागृहाला समजावुन सांगितले जावे. याबाबत जर सभागृहातील कोणत्याही सदस्याला हा विषय वगळण्याचा किंवा पुढे ढकलण्याचा किंवा त्यावर मतदान करण्याचा अधिकार नसेल तर याबाबत एका पत्रान्वये सुध्दा माहिती दिली जावु शकत होती. हा विषय विषयपत्रिकेवर आणण्याचे कारण काय आहे? याबाबत सचिव साहेबांनी समजावुन सांगावे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**सचिव साहेब, हा जो विषय आलेला आहे त्याबाबतीत दोन प्रवाह आहेत. काही सदस्यांनी सांगितले की, या विषयावर फक्त माहिती दयायची होती तर आपण एक पत्र सर्व सदस्यांना देवुन माहिती देवु शकत होतात. माहिती नोंद करणे या व्यतिरिक्त या विषयाबाबत आम्ही काही निर्णय घेवु शकतो काय? जर निर्णय घेवु शकत नसु तर ते ठरावाच्या विरोधात आहे. कारण की आपण तसा प्रस्ताव आणलेला नाही. आपण हा विषय सभा सूचनेवर ठेवला म्हणजे माहिती झाली. जसे श्री. जमनादास पुरस्वानी यांनी सांगितले त्याप्रमाणे आपण याबाबतचे पत्र सर्व सदस्यांना प्रस्तुत करु शकत होता. आम्ही आता यावर काय मत दयायचे? आम्हांला मंजुर नाही? माहित नाही? शासनाने त्यांना येथे प्रतिनियुक्तीवर पाठविले आहे ही

माहिती मिळाल्यानंतर ही सभा सूचना सर्वांना वितरीत  झाली आहे. परंतु याबाबतचा ठराव,.... याबाबत पुढे काही चुक होता कामा नये. म्हणुन चर्चा झाली पाहिजे. आम्हांला माहिती नाही आहे असे म्हणुन आम्ही नाकारु शकतो काय? एकतर होय किंवा नाही. इथे होय पण म्हणु शकत नाही आणि नाही पण म्हणु शकत नाही. जसे पाण्याची मोटर बंद केल्यानंतर आलेले पाणी मागे जाते. तसे होवु शकते काय? याची जरा माहिती दया.

सदस्य श्री. जीवन इदनानी :—मा. महापौर अथवा पिठासीन अधिकारी :— महोदया, मा. आयुक्त साहेब, माहिती नोंद करणे म्हणजे काय? याबाबत एखादे पत्र किंवा परिपत्रक बाहेर लावा, झाली माहिती. महासभा ही नियुक्ती प्राधिकरण आहे. प्रत्येक अधिकारी जो येथे प्रतिनियुक्तीवर येतो किंवा काम करण्यासाठी ज्या कुंणाची नियुक्ती केली जाते, निवड भलेही आपण करता परंतु त्याच्या प्रतिनियुक्तीस अंतिम मंजुरी महासभा देते. माझ्या मते महासभा जी आहे ती नियुक्ती प्राधिकारी आहे. त्यामुळे प्रतिनियुक्तीवर जे अधिकारी आले आहेत त्यांना येथे ठेवायचे की परत पाठवायचे याबाबत महासभेलाच निर्णय घ्यायचा आहे. ते अधिकारी या शहरासाठी लायक आहेत किंवा नाही? शहराच्या कामाचे आहे किंवा नाही? याबाबतचा निर्णय जो आहे तो महासभा घेते. यासाठी यावर सविस्तरपणे चर्चा झाली पाहिजे. जो एक व्यक्ती येथे प्रतिनियुक्तीवर आलेला आहे तो आमच्या शहरासाठी किती फायदयाचा आहे. यावर महासभेने निर्णय घेतला पाहिजे.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—माझ्या मते हा विषय सभेच्या कार्यसूचीवरुन वगळला जावा. कारण की या विषयाबाबत काही माहिती नसल्यामुळे आणखी चर्चा करणे बरोबर होणार नाही.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—सर्व सदस्यांना माहिती आहे. आपणांस माहिती नसेल तर आपण हात वर करा. मी म्हणतो मला माहिती आहे. माझे मत नोंदवा. चार साडेचार वाजता सभेचे कामकाज चालु झालेले आहे. याविषयाबाबत नऊ दिवस अगोदर आपणाकडे सभा सूचना आलेली आहे. त्यावेळेस त्यामध्ये माहिती होती ती मी वाचलेली आहे. आज सुध्दा वाचुन पाहत आहे. माझे हे जे शब्द आहेत त्याची इतिवृत्तात नोंद घेतली जावी. ते वगळले जावु नयेत. याविषयाबाबत मला माहिती मिळालेली आहे. तीन अधिकारी आमच्या महापालिकेत वेगवेगळया पदांवर प्रतिनियुक्तीवर कार्यरत आहेत.

सदस्य श्री. लालबिहारी यादव :—मा. महापौरजी, हा जो विषय सभा सूचनेवर आलेला आहे, विषयात उल्लेख केलेले तीनही अधिकारी आपल्या महापालिकेत प्रतिनियुक्तीवर आलेले आहेत. तर तो विषय समजलाच नाही असे आम्ही कसे म्हणु शकतो? खबरे आजतक या वर्तमानपत्रामध्ये एक बातमी आलेली आहे, त्यामध्ये या तिन्ही अधिका—यांची नावे आलेली आहेत.

सदस्य श्री. राजेश वधारिया:—मा. महापौरजी, ही गोष्ट खरी आहे की, महासभा ही महानगरपालिकेसाठी नियुक्ती प्राधिकारी आहे. परंतु नियुक्ती प्राधिकारी कुणासाठी आहे? जे त्या महापालिकेचे कर्मचारी आहेत. जे राज्य शासनाद्वारे पाठविलेले आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त किंवा दुसरे अधिकारी पाठविले जातात. त्यांच्यासाठी ही महासभा नियुक्ती प्राधिकारी नाही. दुसरी गोष्ट अशी की, आमच्या येथुन नगररचना विभागात ब—याच दिवसापासुन नगररचनाकार हे पद रिक्त होते. नगररचनाकार नव्हते. आता नगररचनाकारांची नियुक्ती झालेली आहे. त्यानंतर सहा. संचालक, नगररचना यांचे पद रिक्त होते. त्यासाठी काही महासभांच्या अगोदर आपण एक गोषवारा आणला होता. आम्ही एक ठराव पारीत केला आहे. विकास आराखडा तयार करण्याचे काम एका खाजगी संस्थेला देण्यासाठी एक प्रस्ताव आणला होता. जर सहा. संचालक शहरात नसतील तर यावेळेस शहरामध्ये जे दोन दोन विकास आराखडे नजरेसमोर ठेवुन काम केले जात आहे ते कोण पाहिल? १९७४ चा विकास आराखडा १० वर्षासाठी होता तो आणखी १० वर्षासाठी पाठविण्यात आला. त्याची कालमर्यादा संपलेली आहे. दुसरा विकास आराखडा २००२ मध्ये एमएमआरडीएने जाहिर केला आहे. आज शहरातील परिस्थिती अशी आहे की, या दोन्ही विकास आराखडयामधील जी कठोरतम तरतुद आहे ती लक्षात घेवुन इमारत बांधकाम नकाशा मंजुर केला जात आहे. जर पहिले कुणाचे घर आरक्षणामध्ये नाही तरी सुध्दा त्याचा इमारत बांधकाम नकाशा मंजुर होत नाही. दोन्ही विकास आराखडयातील कठोरतम तरतुद बघुनच बांधकाम परवानगी मंजुर केली जाते. यासाठी सहा. संचालक, नगररचना यांची आवश्यकता असते आणि म्हणुनच येथे प्रतिनियुक्तीवर आलेल्या सहा. संचालकाच्या प्रस्तावास आपण नाकारु शकत नाही.

सदस्य श्री. जीवन इदनानी :—मा. महापौर, व आयुक्त साहेब, आम्ही सहा. संचालक हे पद नाकारत नाही. जी व्यक्ती विशेष शासनाकडुन पाठविली आहे, त्यास स्विकारायचे की नाही हे मी आधीच स्पष्ट केले आहे. हे

आमच्या शहरासाठी किती हिताचे आहे? याबाबत चर्चा झालीच पाहिजे. त्यांचा मागील रेकॉर्ड काय आहे? त्यांनी कोठे कोठे कामे केली आहेत, त्यांना तेथुन का सोडण्यात आले? मी असे ऐकले आहे की, त्यांची अलिबाग येथे बदली झाली होती त्यांना तेथे स्विकारले नाही, त्यानंतर कल्याणमध्ये सुध्दा त्यांना स्विकारले नाही, तेथुन त्यांना हटविले गेले. याचे काय कारण आहे, याबाबत सविस्तर चर्चा झाली पाहिजे. तसेच मी विधी अधिकारी किंवा सचिव साहेबांना ज्यांना कायदयाविषयीची माहिती आहे त्यांना विचारु इच्छितो की, ठिक आहे महासभा नियुक्ती प्राधिकारी आहे, कर्मचा–यांविषयी आम्ही नियुक्ती करु. परंतु जे प्रतिनयुक्तीवर येतात त्याबाबत आम्ही उत्तरदायी नाही आहोत काय? याबाबत ज्यांना कायदेशीर ज्ञान आहे अशा कुणालाही खुलासा करण्यास आपण सांगा. जे प्रतिनियुक्तीवर येतात त्यांच्याबाबतीत महासभेचा अधिकार आहे किंवा नाही? पहिले याचा खुलासा करा.

<u>सदस्य श्री. अनिल विदयार्थी :–</u>मा. महापौरजी, उल्हासनगर महानगरपालिका ही अर्धशासकिय संस्था आहे, राज्य शासनाचे जे निर्णय आहेत ते अर्धशासकिय संस्थेवर बंधनकारक आहे. एवढी आपणांस माहिती मिळाली यापेक्षा अधिक चर्चा होता कामा नये.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>मा. महापौरजी, या विषयास अलग अलग प्रकारे कलाटणी मिळत आहे. काही सन्माननिय सदस्य वेगळे बोलत आहेत, काही सन्माननिय सदस्य आणखी काही वेगळे बोलत आहेत. याविषयाचा नेमका अर्थ काय हे कोणी सांगत नाहीत. मध्यंतरी ब–याच कालावधीपासुन सहा. संचालक नगररचना हे नव्हते. बांधकाम परवानग्या मंजुर होत नव्हत्या. याबाबत आम्ही काही बोलत नाहीत. श्री. सिंह यांच्याबाबतीत जी काही संमती घेतली जाते ती संमती काही दिवसासाठी प्रलंबित ठेवा. एवढेच आहे दुसरे काय? हा प्रस्ताव नाकारायचा किंवा या अधिका–यांना घ्यायचेच नाही किंवा त्यांना परत पाठवायचे, असे काहीही नाही. हे लोक काही विचार करत नाहीत आणि काय काय उत्तरे देत आहेत.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ:–</u>जोपर्यंत ख–या अधिका–याच्या कामाचा अनुभवच घेतलेला नाही तर तो कसा आहे हे आपणांस कसे माहित पडेल की त्यांचे काम बरोबर नाही म्हणुन? शहराचा फार मोठा विकास रखडलेला होता. तर त्या पदाबाबतीत विचार करावा.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>सन्माननिय सचिव साहेब, साडेसहा वाजल्यापासुन या विषयावर चर्चा चालु आहे. आणि सात केव्हाच वाजुन गेले आहेत. पुढील सभा पुढील सभा असे म्हटले जात आहे. यासाठी आता हा विषय काय आहे तो सन्माननिय सदस्यांना समजावुन सांगा.

<u>सदस्य श्री. तुलसीदास वसिटा :–</u>सन्माननिय सचिव साहेब, आपण आम्हांला हे सांगा की, त्यांच्या प्रस्तावास मान्यता दयायची आहे की, त्यांना प्रतिनियुक्तीवर घेतले आहे याची फक्त आम्हांला माहिती नोंद करायची हे आम्हांला सांगा.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :–</u>काहीही देणे नाही, काही देणे नाही, बसं झाले. मान्यता दयायची वगैरे नाही, फक्त विचारायचे आहे, चौकशी करायची आहे.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :–</u>साहेब आल्याचे तीन महिने होवुन गेले आहेत, सर्वांना माहित आहे.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :–</u>मा. महापौरजी, या एकाच विषयावर बरीच चर्चा झालेली आहे. उशिर झालेला आहे. घ्या एकदाचा निर्णय.

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर :–</u>सचिव साहेब, कायदा काय म्हणतो?

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>या विषयाबाबतीत कुणाला माहिती आहे कुणाला माहिती नाही हे जाणुन घेण्यासाठी मतदान घेतले जावे.

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड :–</u>मा. महापौरजी, उप–महापौरजी, आणि आयुक्त साहेब, याठिकाणी दोन अधिकारी नियुक्त करण्यासाठी आणि त्याच बरोबर तिसरे अधिकारी ज्यांचे नाव श्री. सिहं आहे त्यांचा विषय वगळावा असे काही सदस्यांनी सांगितलेले आहे. त्याबाबतीत मी आपल्या हे निदर्शनास आणुन देवु इच्छितो, जे सिंह नावाचे कुणी अधिकारी येथे येणार आहेत, त्यांनी याठिकाणी पदभार सांभाळलेला नाही, कामाला सुरुवातच केलेली नाही. तर त्यांच्याबद्‌दल तुम्हांला आम्ही काय सांगणार आहोत? ते येथे आल्यानंतर त्यांचे काम समाधानकारक नसेल त्यावेळेस तुम्ही त्यांना विरोध करु शकता. दोन अधिकारी घेतात तिस–याला घेण्यास काही हरकत नाही अशी माझी याठिकाणी सभागृहाला विनंती आहे.

महापालिका सचिव :—काय करायचे?

सदस्य श्री. सतिश चहाळ :—सांभाळुन घ्यायचे त्यांना.

महापौर:—हा विषय माहितीसाठी असून ठराव मान्य करा.

महापालिका सचिव :—सर्व संमतीने ? सर्वांना मान्य? माहितीसाठी हा विषय आहे, ठिक आहे, पास?

काही सदस्य :— पास, पास............

सदस्य श्री. जीवन इदनानी :— मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, व सचिव साहेब, ११ नंबरच्या विषयास महापौर महोदयांनी मान्यता दिली आहे.

महापालिका सचिव :—आपणा सर्वांची अनुमती आहे, कुणीही हरकत घेतलेली नाही.

सदस्य श्री. जीवन इदनानी :—माझा आहे. मा. महापौरांनी अधिनिर्णय दिलेला आहे.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—सन्माननिय महापौरांनी अधिनिर्णय दिल्यानंतर आणि ठराव पारीत झाल्यानंतर कुणी एखादा सदस्य बोलु शकतो काय? याबाबतीत काय तरतुद आहे? पुढील विषय पुकारल्यानंतर मागील विषयावर चर्चा होते काय?

सदस्य श्री. जीवन इदनानी :—मी फक्त नोंद करुन घेवु इच्छितो. मा. महापौरांनी अधिनिर्णय दिलेला आहे. आपण नंतरचा जो शब्द उच्चारत आहात की हा विषय पारीत झाला आहे. त्याबाबतीत मा. महापौरांनी अधिनिर्णय दिला आहे. त्यामुळे तो पारीत झाला असे समजले जावे. बाकी सदस्यांना विचारले नाही.

महापालिका सचिव :—मी मा. महापौरांच्या आदेशानु आपणांस विचारत आहे, आपणांस हरकत आहे काय? मतदान करु इच्छित असाल तर मतदान करुन आपण निर्णय घ्या. आपली काय इच्छा आहे? मतदान करायचे काय?

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—सचिव साहेब, आपण कायदयातील तरतुद सांगा. मा. महापौरांनी अधिनिर्णय दिला आहे. ठराव पारीत झाला त्यानंतर आपण पुढील विषय वाचुन दाखविला त्यानंतर मागील विषयावर चर्चा होते काय? जेव्हा आपण म्हटले, पास? तेव्हा सर्व सदस्य गप्प होते. त्यानंतर आपण पुढील विषय वाचुन दाखविला. त्यावरही काही सदस्य पास, पास म्हणत होते. त्यानंतर मागील विषयावर चर्चा होते काय? याबाबतीत कायदयात काय तरतुद आहे ते सांगा. कोणत्या कायदयानुसार आणि कोणत्या कलमानुसार ते आपण सांगा.

महापालिका सचिव :—सर्व संमतीने पारीत ना?

सदस्य श्री. जीवन इदनानी :—माझ्या हरकतीची नोंद घेतली जावी. मा. महापौरांच्या अधिनिर्णयाने ठराव पारीत झाला आहे.

महापालिका सचिव :—तर कृपया त्याबाबतीत खुलासा घेण्यात यावा, मा. महापौरांनी जे म्हटले आहे.

सदस्य श्री. जीवन इदनानी :—विधी अधिका—यांनी कायदेशीर मत दयावे. मी अगोदरच म्हटले आहे की ही महासभा सक्षम आहे त्याबाबतीत विधी अधिका—यांनी खुलासा केला नाही, एका सदस्याने खुलासा केला. महासभेचे अधिकार काय आहेत? हे मी सदस्यांना विचारलेले नाही. जे व्यासपीठावर बसलेले आहेत त्यांना मी विचारत आहे.

यावेळी सदस्य श्री. जीवन इदनानी, श्री. दत्तात्रय पवार, श्री. अंकुश म्हस्के हे बाहेर गेले.



महापालिका सचिव :—मा. महापौरांच्या परवानगीने मी बोलु इच्छितो, सभागृहामध्ये जो निर्णय घेतला जातो तो बहुमताने घेतला जातो. काही सदस्य सभागृहातुन बाहेर गेले आहेत. जे सदस्य उपस्थित आहेत त्यांना कुणाला याविषयावर मतदान घ्यावे असे वाटते काय?

<u>काही सदस्य :—</u>नाही,नाही... पास,पास.....

मा. सदस्या १) श्रीमती लिलाबाई आशान, २) कु. शकुंतला जग्यासी, ३) डॉ. निना नाथानी, ४) श्रीमती इंदिरा उदासी, ५) श्रीमती जयश्री पाटील, ६) श्रीमती शकुंतला पाटील, ७) श्रीमती कविता सिरवानी, ८) श्रीमती जया माखिजा, ९) श्रीमती निलम रावत, १०) राजश्री चौधरी, ११) श्री. चंद्रा टेकचंदानी, मा. सदस्य १२) श्री. सुंदर मंगतानी, १३) श्री. हरेश जग्यासी, १४) मोहन रामरख्यानी, १५) श्री. महेश सुखरामानी, १६) श्री. बच्चाराम रुपचंदानी, १७) श्री. मुकेश तेजी हे सभागृहातुन बाहेर गेले.

<u>महापौर अथवा पिठासीन अधिकारी :— :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ११ :—** श्री अशोककुमार रणखांब,श्री च.प्र.सिह,व श्री एम.ए.जवादे यांची महापालिका आस्थापनेवरील अनुक्रमे अतिरिक्त आयुक्त,सहा. संचालक नगररचना व शहर अभियंता या पदावरील प्रतिनियुक्तीची माहिती नोंद करणे.

<u>प्रस्तावना</u>

मा. नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन आदेश क्र. एम.सी.ओ.१२०८/२१४/प्र.क्र. ६६/०८/नवि—१४, दिनांक २३ मे, २००८ रोजीच्या शासन निर्णयान्वये श्री. अशोककुमार रणखांब, गट — अ यांची अतिरिक्त आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका या पदावर प्रतिनियुक्तीने बदली करण्यात आली आहे. त्यांनी सदर आदेशाच्या अनुषंगाने दिनांक २८/५/२००८ रोजी उल्हासनगर महापालिकेच्या ''अतिरिक्त आयुक्त'' पदाचा कार्यभार स्विकारला आहे.

मा. संचालक, नगररचना महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील आदेश क्र. आस्थाप/चं.प्र.सि/संसनर/प्र.शा—१/३८७, दिनांक २७/०१/२००९ च्या आदेशान्वये श्री. च.प्र.सिंह यांची उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये ''सहाय्यक संचालक नगररचना'' या पदावर प्रतिनियुक्तीने उल्हासनगर येथे नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यांनी दिनांक ३/२/२००९ च्या अर्जान्वये महापालिकेत रूजू करून घेण्याबाबत विनंती अर्ज सादर केला आहे.

उल्हासनगर शहरात सध्या पाणी टंचाई भासत असुन उपलब्ध पाण्याने समप्रमाणात वितरण व्हावे. यासाठी नियोजन करणे आवश्यक आहे. उल्हासनगर शहरातील वितरण व्यवस्था गुंतागुंतीची असुन सदर कामी महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागात सदर पदावर अनुभवी व उल्हासनगर शहराची माहिती असलेल्या अधिकाऱ्याची नियुक्ती होणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने पाणी पुरवठा विभागाकडील पत्र क्र. १६०२/०८, दिनांक २०/०६/२००८ रोजीच्या पत्रान्वये श्री. माधव जवादे, अधिक्षक अभियंता यांची उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये प्रतिनियुक्तीने नियुक्ती करणेबाबत विनंती अर्ज महाराष्ट्र सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडे करण्यात आली होती. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडील आदेश क्र. अ.अ/प्रतिनि/उमनपा/ईटी—१३/२००८/आ.१, दिनांक २२/१/२००९ च्या आदेशान्वये उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली आहे.

महानगरपालिकेच्या सेवेमध्ये श्री. अशोककुमार रणखांब, अतिरिक्त आयुक्त म्हणून व श्री. च. प्र. सिंह, सहाय्यक संचालक नगररचना तसेच श्री. माधव जवादे, शहर अभियंता रूजू करून घेणेबाबत मा. महासभेच्या माहितीसाठी ठेवणे आवश्यक आहे.

श्री. अशोककुमार रणखांब यांची अतिरिक्त आयुक्त, श्री. च. प्र. सिंह यांची सहाय्यक संचालक नगररचना व श्री. माधव जवादे यांची शहर अभियंता या पदावरील प्रतिनियुक्तीस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील कलम ४५ अन्वये महासभेस अवगत करणे आवश्यक आहे. मा. महासभेच्या माहितीस्तव सादर.

<u>महासभा ठराव क्र:</u> ६२ <u>दिनांक:—२०/२/२००९</u>

सुचकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

अनुमोदकाचे नाव :— श्री. सतिश चहाळ

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री अशोककुमार रणखांब,श्री च.प्र.सिह,व श्री एम.ए. जवादे यांची महापालिका आस्थापनेवरील अनुक्रमे अतिरिक्त आयुक्त,सहा. संचालक नगररचना व शहर अभियंता या पदावरील प्रतिनियुक्तीची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/–
अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. १२ वाचुन दाखवितात

---

विषय क्र. १२ :– महापालिकेच्या पात्र कर्मचा–यांची पदोन्नती मान्य करणे.

---

महापालिका सचिव:– सफाई कामगार आहेत आणि सार्व.बांधकाम विभागाचे ४१ लोक आहेत आपणा सर्वांना गोषवारा देण्यात आलेला आहे तो मान्य आहे काय?

काही सदस्य :–पास–पास......
महापौर अथवा पिठासीन अधिकारी :– :– सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

विषय क्र. १२:– महापालिकेच्या पात्र कर्मचा-यांची पदोन्नती मान्य करणे.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवरील विविध संवर्गातील पदावर पदोन्नती देणेकामी मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४ (१) मधील तरतुदीन्वये दिनांक २४ ऑक्टोंबर २००८ रोजीच्या आदेशान्वये खालीलप्रमाणे विभागीय पदोन्नती समिती गठित केलेली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | अतिरिक्त आयुक्त | – | अध्यक्ष |
| २) | उप आयुक्त (मुख्यालय) | – | सदस्य सचिव |
| ३) | उप आयुक्त (कर) | – | सदस्य |
| ४) | उप आयुक्त (आरोग्य) | – | सदस्य |
| ५) | मुख्य लेखा परिक्षक | – | सदस्य |
| ६) | मागासवर्गीय अधिकारी (अधिक्षक किंवा त्यापेक्षा उच्च पदावरील) | – | सदस्य |

उल्हासनगर महानगरपालिकेतील दिनांक ०१ जानेवारी, २००८ रोजी कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांची संवर्गनिहाय अंतिम सेवा जेष्ठता यादी दिनांक १७/१०/२००८ च्या परिपत्रकानुसार अंतिमत: प्रसिध्द केलेली आहे.

उपरोक्त विभागीय पदोन्नती समितीची बैठक दिनांक १६/०१/२००९ रोजी दुपारी ४.०० वाजता मा. अतिरिक्त आयुक्त तथा अध्यक्ष यांचे दालनात आयोजित करण्यांत आली होती.

सदरहु बैठकीमध्ये प्रशासकिय ठराव क्र. २६, दिनांक १३/१२/१९९६ अन्वये मान्यता दिलेल्या सेवा भरती नियम, आस्थापनेवरील मंजूर पदे, भरतीचे प्रमाण, भरलेली पदे, रिक्त पदे व अनुशेष या बाबत आढावा घेण्यांत आला.

सदर बैठकीमध्ये सदस्य सचिव यांनी ठेवलेल्या प्रस्तावावर पुढीलप्रमाणे संवर्ग पदावर पदोन्नती देणेबाबत विचार विनिमय करण्यात आला.

१) <u>मुकादम आरोग्य (३९ पदे)</u>

**वेतनश्रेणी रू. २६१०—६०—२९१०—६५—३३००—७०—४०००**

आस्थापनेवर मुकादम या पदाची एकूण ७० पदे मंजुर आहेत. पैकी ३१ पदे भरलेली असुन रिक्त ३९ पदे आहेत. सेवा शर्तीनुसार मुकादमाची सर्व पदे पदोन्नतीने भरावयाची आहेत. सदर सेवा शर्ती नियमानुसार मुकादम या पदावर पदोन्नतीनी देण्यासाठी पुढीलप्रमाणे शैक्षणिक अर्हता विहित केलेली आहे.

**''सफाई कामगार म्हणून १० वर्षापेक्षा जास्त सेवा झालेला आणि ४ थी पास असावा''**

सफाई कामगाराची दिनांक ०१ जानेवारी, २००८ ची अंतिम सेवा जेष्ठता यादी दिनांक १७/१०/२००८ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. या सेवा जेष्ठता यादीमधील ४ थी पास सफाई कामगारांची एकूण ४५ इतकी नावे सेवा जेष्ठतेनुसार घेण्यात आलेली आहे. त्यापैकी सेवा जेष्ठता क्र. ९, २२, १७७ स्वेच्छने सेवा निवृत्त झालेले आहेत. सेवा जेष्ठता क्र. ७८, ९४ स्वेच्छ निवृत्तीसाठी अर्ज केला असुन तो विचाराधीन आहे. सेवा जेष्ठता क्र. २८९ निधन.

जेष्ठता यादी अनुक्रमांक १ ते ८, १० ते २१, २३ ते २७, २९ ते ४२, ४४ ते ५४, ५६ ते ७७, ७९, ८१ ते ८६, ८८ ते ९१, ९३, ९५ ते १४८, १५० ते १७६, १७८ ते १९० १९२, १९४ ते २१९, २२१ ते २३२, २३४ ते २३५, २३७ ते २५०, २५२ ते २८१, २८३, २८६ ते २८८, २९० ते २९४, २९६ ते २९८, ३०० ते ३०१, ३०३ ते ३०४, ३०७ ते ३१२, ३१५ ते ३१७, ३१९ ते ३२५, ३२७ ते ३३३, ३३५ ते ३३६, ३३८, ३४०, ३४२ ते ३४५, ३४७ ते ३४८, ३५०, ३५२ ते ३५५, ३५९ ते ३६४, ३६६ ते ३७१, ३७३. हे मुकादमाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत नाहीत. सबब, ते मुकादम पदावर पदोन्नती देण्यासाठी अपात्र आहेत.

अशाप्रकारे सेवा जेष्ठता यादीप्रमाणे उपलब्ध रिक्त पदानुसार सेवा शर्ती नियमावली अर्हता धारण करणारे सेवा जेष्ठता यादी अनुक्रमांक २८, ४३, ५५, ८०, ८७, ९२, १४९, १९१, १९३, २२०, २३३, २३६, २५१, २८२, २८४, २८५, २९५, २९९, ३०२, ३०५, ३०६, ३१३, ३१४, ३१८, ३२६, ३३४, ३३७, ३३९, ३४१, ३४६, ३४९, ३५१, ३५६, ३५७, ३५८, ३६५, ३७२, ३७४, ३७५, असे एकूण ३९ कर्मचारी सफाई मुकादम या पदावर पदोन्नती देण्यासाठी पात्र आहेत.

१) श्री. राजु बाबूलाल

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

२) श्री. बिजयपाल शाम्मु

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

३) श्री. राजु बाबू ननावरे

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

४) श्री. कमलाकर सोनाजी

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

५) श्री. रामसिंग कश्मीरा

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

६) श्री. विजय बत्तन

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

७) श्री. बिष्णु पंजाराम

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

८) श्री. राजपाल बिहारी

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

९) श्री. दशरथ श्रीपाद गाडे

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

१०) श्री. शामु चंदर

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

११) श्री. शिवाजी भिवजी

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

१२) श्री. प्रमोद नामदेव

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

१३) श्री. डेव्हिड चंदर

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

१४) श्री. दादू महादेव

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

१५) श्री. रवि रघुनाथ

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

१६) श्री. धर्मवीर शिवचरण

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

१७) श्री. विजेंद्र काले राठी

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

१८) श्री. दादु लक्ष्मण काळे

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

१९) श्री. अंकुश मारूती कांबळे

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

२०) श्री. राजेंद्र बिहारी

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

२१) श्री. बिजय बसंता चेटोले

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

२२) श्री. विनोद ओमप्रकाश सौदे

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

२३) श्री. भास्कर शिवराम भिसे

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

२४) श्री. दिपक बाबुलाल

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

२५) श्री. राजु झडीया

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

२६) श्री. कैलाश हसाराम

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

२७) श्री. मुन्ना मखनलाल

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

२८) श्री. रावजी नारायण परमार

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

२९) श्री. राजपाल कंची

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

३०) श्री. श्याम सेवकराम

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

३१) श्री. बच्चु हेमराज

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

३२) श्री. केदारनाथ सुरताराम बोथ

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

३३) श्रीम. शारदा रामजी

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

३४) श्रीम. ज्योती बच्चु

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

३५) श्री. रमेशकुमार जगदिश

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

३६) श्री. सुरेश इंदरपाल

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

३७) श्री. महेंद्र रामचंद्र

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

३८) श्री. सतिश डोरीलाल

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

३९) श्री. ओमप्रकाश मामचंद गागट

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

## २) मुकादम बांधकाम (६१ पदे)

**वेतनश्रेणी रू. २६१०—६०—२९१०—६५—३३००—७०—४०००**

आस्थापनेवर मुकादम या पदाची एकूण ६१ पदे मंजुर आहेत. पैकी ५९ पदे भरलेली असुन प्रमाणित बिंदु नामावलीनुसार अनु. जमाती या प्रवर्गाची रिक्त ०२ पदे आहेत. सेवा शर्तीनुसार मुकादमांची सर्व पदे पदोन्नतीने भरावयाची आहेत. सदर सेवा शर्ती नियमानुसार मुकादम या पदावर पदोन्नती देण्यासाठी पुढीलप्रमाणे शैक्षणिक अर्हता विहित केलेली आहे.

**''मजूर आणि इतर तत्सम प्रवर्गामध्ये अंखडपणे १० वर्षे सेवा आवश्यक''**

मजूर/हेल्पर/वॉलमन/झारीवाला दिनांक ०१ जानेवारी, २००८ ची अंतिम सेवा जेष्ठता यादी दिनांक १७/१०/२००८ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सेवा जेष्ठता यादीप्रमाणे अनु. जमाती या प्रवर्गातील सेवा शर्ती नियमावलीनुसार अर्हता धारण करणारे अनुक्रमांक २३३, २४३, २४८ व २७८ हे उमेदवार उपलब्ध आहेत.

सेवा जेष्ठता क्र. ९, २२, १४९ स्वेच्छने सेवा निवृत्त झालेले आहेत.

सेवा जेष्ठता क्र. ७८, ९४ स्वेच्छ निवृत्तीसाठी अर्ज केला असुन तो विचाराधीन आहे.

सेवा जेष्ठता क्र. २८९ निधन

**अनु. जमाती – ०२ पदे**

| | |
|---|---|
| १) | श्री. पी. एम. ढोणे<br>सदर पदाची विहित केलेली अर्हता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र. |
| २) | श्री. शाम गोमा शिद<br>सदर पदाची विहित केलेली अर्हता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र. |
| ३) | श्री. एच. एम. वाघचौरे<br>सदर पदाची विहित केलेली अर्हता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र. |
| ४) | श्री. बी. एम. वाख<br>सदर पदाची विहित केलेली अर्हता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र. |

दिनांक १६/०१/२००९ रोजीच्या विभागीय पदोन्नती समिती बैठकीचे इतिवृत्त सोबत जोडत आहे. सदर बैठकीमध्ये विविध पदांवर पदोन्नती देण्यासाठी विभागीय पदोन्नती समितीने एक मताने निवडसुची मंजुर केलेली आहे. ती खालीलप्रमाणे.

न्यायालयीन प्रकरणे, चौकशी व शासन आदेशास अधिन राहुन विभागीय पदोन्नती समितीने खालील निवड सुचीस एकमताने मान्यता दिली.

**मुकादम आरोग्य**

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नांव | सेवा जेष्ठता क्र. | संवर्ग |
|---|---|---|---|
| १ | श्री. राजु बाबूलाल | २८ | सफाई कामगार |
| २ | श्री. बिजयपाल शाम्मु | ४३ | सफाई कामगार |
| ३ | श्री. राजु बाबू ननावरे | ५५ | सफाई कामगार |
| ४ | श्री. कमलाकर सोनाजी | ८० | सफाई कामगार |
| ५ | श्री. रामसिंग कश्मीरा | ८७ | सफाई कामगार |
| ६ | श्री. विजय बत्तन | ९२ | सफाई कामगार |
| ७ | श्री. बिष्णु पंजाराम | १४९ | सफाई कामगार |
| ८ | श्री. राजपाल बिहारी | १९१ | सफाई कामगार |
| ९ | श्री. दशरथ श्रीपाद गाडे | १९३ | सफाई कामगार |
| १० | श्री. शामु चंदर | २२० | सफाई कामगार |
| ११ | श्री. शिवाजी भिवजी | २३३ | सफाई कामगार |
| १२ | श्री. प्रमोद नामदेव | २३६ | सफाई कामगार |
| १३ | श्री. डेब्हिड चंदर | २५१ | सफाई कामगार |
| १४ | श्री. दादू महादेव | २८२ | सफाई कामगार |
| १५ | श्री. रवि रघुनाथ | २८४ | सफाई कामगार |
| १६ | श्री. धर्मवीर शिवचरण | २८५ | सफाई कामगार |
| १७ | श्री. विजेंद्र काले राठी | २९५ | सफाई कामगार |
| १८ | श्री. दादु लक्ष्मण काळे | २९९ | सफाई कामगार |

| | | | |
|---|---|---|---|
| १९ | श्री. अंकुश मारूती कांबळे | ३०२ | सफाई कामगार |
| २० | श्री. राजेंद्र बिहारी | ३०५ | सफाई कामगार |
| २१ | श्री. बिजय बसंता चेटोले | ३०६ | सफाई कामगार |
| २२ | श्री. विनोद ओमप्रकाश सौदे | ३१३ | सफाई कामगार |
| २३ | श्री. भास्कर शिवराम भिसे | ३१४ | सफाई कामगार |
| २४ | श्री. दिपक बाबुलाल | ३१८ | सफाई कामगार |
| २५ | श्री. राजु झडीया | ३२६ | सफाई कामगार |
| २६ | श्री. कैलाश हसाराम | ३३४ | सफाई कामगार |
| २७ | श्री. मुन्ना मखनलाल | ३३७ | सफाई कामगार |
| २८ | श्री. रावजी नारायण परमार | ३३९ | सफाई कामगार |
| २९ | श्री. राजपाल कंची | ३४१ | सफाई कामगार |
| ३० | श्री. श्याम सेवकराम | ३४६ | सफाई कामगार |
| ३१ | श्री. बच्चु हेमराज | ३४९ | सफाई कामगार |
| ३२ | श्री. केदारनाथ सुरताराम बोथ | ३५१ | सफाई कामगार |
| ३३ | श्रीम. शारदा रामजी | ३५६ | सफाई कामगार |
| ३४ | श्रीम. ज्योती बच्चु | ३५७ | सफाई कामगार |
| ३५ | श्री. रमेशकुमार जगदिश | ३५८ | सफाई कामगार |
| ३६ | श्री. सुरेश इंदरपाल | ३६५ | सफाई कामगार |
| ३७ | श्री. महेंद्र रामचंद्र | ३७२ | सफाई कामगार |
| ३८ | श्री. सतिश डोरीलाल | ३७४ | सफाई कामगार |
| ३९ | श्री. ओमप्रकाश मामचंद गागट | ३७५ | सफाई कामगार |

मुकादम बांधकाम

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नांव | सेवा जेष्ठता क्र. | संवर्ग |
|---|---|---|---|
| १ | श्री. पी. एम. ढोणे | २३३ (अनु.जमाती) | मजूर |
| २ | श्री. शाम गोमा शिद | २४३ (अनु.जमाती) | मजूर |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ५३ (१) अन्वये नियुक्ती प्राधिकरण मा. महासभा आहे.

तरी न्यायालयीन प्रकरणे, चौकशी व शासन आदेशास अधिन राहुन विभागीय पदोन्नती समितीचा प्रस्ताव मंजुरीकरीता मा. महासभा पटलावर प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: ६३ दिनांकः—२०/२/२००९

सुचकाचे नाव :— श्रीमती मोना वनवारी

अनुमोदकाचे नाव :— श्री. प्रभुनाथ गुप्ता

ही महासभा वरील प्रस्तावनेत उल्लेखलेल्या ४१ महापालिकेच्या पात्र कर्मचा-यांची मुकादम पदी पदोन्नती मान्य करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी

सर्वसाधारण महासभा

उल्हासनगर महानगरपालिका

सदस्य श्री. रामचंद्र पारवानी व सदस्या श्रीमती मोना वनवारी हे सभागृहातुन बाहेर गेले.

<u>महापालिका सचिव :—</u> ३ आयत्यावेळचे विषय आहेत त्यातील पहिला विषय आहे.

विषय क्र. १३ वाचुन दाखवितात

---

<u>आयत्यावेळचा विषय</u>

**विषय क्र. १३:—** १) श्री.अशोक सखाराम वायले २) श्री. ज्ञानेश्वर गणपत वायले ३) श्री. चंद्रकांत गुरूनाथ वायले ४) श्री. राजेश ब्राम्हण तरे यांना सहा महिन्यासाठी मुदतवाढ देणे.

---

<u>**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**</u>सचिव साहेब हे जे पाच लोक आहेत ते प्रकल्पग्रस्त आहेत. आणि इतर मागासवर्गातील अनुशेष शिल्लक नसल्यामुळे आणि खुल्या संवर्गातील पदे रिक्त नसल्यामुळे प्रकल्पग्रस्तांतर्गत या लोकांना कामावर घेण्याबाबतीत मागच्याच महासभेत आपली चर्चा झालेली आहे. काही तांत्रिक अडचणी आल्या. प्रकल्पग्रस्तांना दाखला मिळाला नाही. महापालिकेमध्ये काम करत असतांना महापालिकेचे उत्तरदायित्व आहे की, त्यांना प्रकल्पग्रस्ताचा दाखला मिळाला पाहिजे. त्यासाठी तसे प्रयत्न केले पाहिजे. कारण पुर्नवसन अधिकारी व जिल्हाधिकारी कार्यालय हे प्रमाणत्र देणार प्रकल्पग्रस्ताचा दाखला मिळाल्यानंतर त्यास आपण येथे प्रकल्पग्रस्त म्हणुन येथे सामावुन घेणार आहेत. त्यासाठी आपणाकडुन प्रयत्न करणे आवश्यक आहे की, हे आमच्याकडे पाणी पुरवठा योजनेमध्ये प्रकल्पग्रस्त झालेले आहेत. असे महापालिकेने त्यांना पत्र दिले पाहिजे आणि त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालय त्यावर कार्यवाही करेल. मुदतवाढ देण्या दरम्यान पुढील कार्यवाही आपण करावी ही नम्र विनंती.

<u>**काही सदस्य :—**</u>पास—पास......

<u>**महापौर अथवा पिठासीन अधिकारी :— :—**</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

<u>आयत्यावेळचा विषय</u>

**विषय क्र. १३:—** १) श्री.अशोक सखाराम वायले २) श्री. ज्ञानेश्वर गणपत वायले ३) श्री. चंद्रकांत गुरूनाथ वायले ४) श्री. राजेश ब्राम्हण तरे यांना सहा महिन्यासाठी मुदतवाढ देणे.

<u>**प्रस्तावना**</u>

शहराचे दक्षिणेकडील पाणी टंचाई दूर करण्याचे दृष्टीने व पाण्याचा अतिमहत्वाचा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने पाले ते गायकवाडपाडा दरम्यान खाजगी जमिनीतून मृद लोखंडी जलवाहिनीचे काम पूर्ण करण्यासाठी महापालिकेने या योजनेसाठी संपादित केलेल्या जमिनधारकांना त्यांचे मागणीनुसार उल्हासनगर महानगरपालिका सेवेत अस्थायी पदावर वर्ग — ४ चे मजुर वॉलमन या संवर्गामध्ये मा. महासभा ठराव क्र. २५, दिनांक २०/११/२००६ अन्वये सामावुन घेण्यात आले होते. पाले ते गायकवाड पाडा दरम्यान सुधारीत पाणी पुरवठा अंतर्गत जलवाहिनीचे काम पुर्ण करण्याच्या दृष्टीने बाधित होणारे लाभार्थी पुढीलप्रमाणे — (१) श्री. ज्ञानेश्वर गणपत वायले (२) श्री. अशोक सखाराम वायले (३) श्री. चंद्रकांत गुरूनाथ वायले (४) श्री. राजेश ब्राम्हण तरे यांची नियुक्तीस मान्यता देण्यात आली होती.

तद्नंतर सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक १५/०२/२००७ रोजीच्या आदेशान्वये ०६ महिन्यांकरीता वरीलप्रमाणे ४ जणांना मंजुर/वॉलमन या पदावर प्रथम नियुक्ती देण्यात आलेली होती. तदृनंतर दिनांक ०६/०९/२००७ रोजीच्या आणि दिनांक १६/०२/२००८ रोजी सेवेत खंड देवुन पुढील ६ महिन्यांकरीता मुदतवाढ महासभा ठराव क्र. ०३, दिनांक १२/०६/२००८ नुसार देण्यात आलेली आहे. सदरची मुदत दिनांक १६/०८/२००८ रोजी संपुष्टात आलेली आहे. तदृनंतर महासभा ठराव क्र. २८, दिनांक १८/१०/२००८ अन्व्ये त्यांना दिनांक १७ फेब्रुवारी, २००९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

उपरोक्त प्रकरणाबाबत शिवसेना गटनेते मा. श्री. धनंजय बोडारे यांनी दिनांक २१/१/२००९ तसेच कॉंग्रेस (आय) गटनेता मा. श्री. तुलसीदास वासिटा यांनी दिनांक ४/२/२००९ व आरपीआय (गवई) गटनेता मा. श्री. प्रशांत धांडे यांनी दिनांक ५/२/२००९ च्या रोजीच्या पत्रान्वये मा. महासभेत चर्चा केल्याप्रमाणे संबंधीत कर्मचाऱ्यांना प्रकल्पग्रस्त म्हणून महापालिकेत कायम करणेबाबत सुचीत केले आहे. त्यावेळेस मा. आयुक्त यांनी ''प्रकल्पग्रस्तांसाठीचा जो शासन निर्णय आहे त्यांचे पालन करून कार्यवाही करू. असे नमुद केलेले होते.''

मात्र (१) श्री. ज्ञानेश्वर गणपत वायले (२) श्री. अशोक सखाराम वायले (३) श्री. चंद्रकांत गुरूनाथ वायले (४) श्री. राजेश ब्राम्हण तरे यांचेकडे प्रकल्पग्रस्त असणेबाबत कोणत्याही प्रकारची कागदपत्रे नाहीत. परंतू संबंधीत कर्मचारी हे महापालिकेचा पाणी पुरवठाविषयक प्रकल्प राबवित असतांना बाधीत झालेले असल्याने विशेष बाब म्हणून महापालिकेत तात्पुरत्या स्वरूपात समाविष्ठ करणेविषयक मा. महासभा ठराव क्र. २५, दिनांक २०/११/२००६ अन्वये मान्यता दिलेली आहे.

रिक्त पदांचा आढावा घेतला असता इतर मागासवर्ग व खुला या प्रवर्गातील सरळसेवेने भरावयाचा अनुशेष रिक्त नाही. तरी, जागा रिक्त झाल्यास त्यांचा प्रथम प्राधान्याने विचार करणत यईल.

तसेच उपरोक्त नमुद ०४ अर्जदाराना प्रकल्पग्रस्त व्यक्तीला अथवा व्यक्तीच्या कुंटबातील व्यक्तीला नोकरी विषयक सवलतीच्या संदर्भात जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडून दाखला प्राप्त करून घेणेबाबत कळविण्यात येईल.

१) श्री.अशोक सखाराम वायले २) श्री. ज्ञानेश्वर गणपत वायले ३) श्री. चंद्रकांत गुरूनाथ वायले ४) श्री. राजेश ब्राम्हण तरे यांची सेवा दि. १७/२/२००९ रोजी संपुष्टात आल्याने त्यांना दि. १८/०२/२००९ रोजी सेवेत ०१ दिवसांचा खंड देवुन दि. १९/०२/२००९ पासुन पुढील ०६ महिन्यांसाठी मुदतवाढ देणेविषयक प्रस्ताव मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) नुसार नवीकरणासाठी नियुक्ती प्राधिकारी तथा सक्षम प्राधिकारी म्हणुन मा. महासभेपुढे पाठविण्यास मान्यता मिळणेस प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ६४ <u>दिनांक:–२०/२/२००९</u>

सुचकाचे नाव :– श्री. धनंजय बोडारे
अनुमोदकाचे नाव :– श्रीमती जयश्री सुर्वे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे १) श्री.अशोक सखाराम वायले २) श्री. ज्ञानेश्वर गणपत वायले ३) श्री. चंद्रकांत गुरूनाथ वायले ४) श्री. राजेश ब्राम्हण तरे यांना दिनांक १९/२/२००९ पासुन पुढील सहा महिन्यासाठी मुदतवाढ देण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. १४ वाचुन दाखवितात

---

⇨ <u>आयत्यावेळचा विषय</u>

**विषय क्र. १४:–** दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत वर्ष २००८–०९ करीता तयार केलेल्या प्राकलनास मंजुरी देणे.

---

<u>**सदस्य श्री. राजेश वधारिया :–**</u>मा. महापौरजी, हा जो प्रस्ताव आहे तो एका प्रभागातील कामांचा असून जवळ जवळ ५४ लाख ७१ हजार रुपये खर्चाचा प्रस्ताव आहे. बाकीच्या दलित प्रभागातील किंवा वस्तीतील कामे काय पुर्ण झाली आहेत? दुसरे असे की, मा. आयुक्तांनी आपल्या अर्थसंकल्पीय भाषणात म्हटले आहे की,

जेथे इन्टरलॉक ब्लॉक लागता कामा नयेत तेथे सुध्दा ते लावले जात आहेत. प्रस्ताव सुध्दा आपणंच आणत आहात की तेथे इन्टरलॉक ब्लॉक लागले पाहिजेत तर याबाबतीत इन्टरलॉक ब्लॉक प्रस्तावित केले आहे तेथे काय परिस्थिती आहे?

<u>सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता :—</u>मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब व सचिव साहेब व सर्व सन्माननिय सदस्य, माझ्या प्रभागामध्ये गौतमवाडीमध्ये ९९ टक्के दलित वस्ती आहे. या वस्तीचा सर्व्हे करण्यासाठी मी कित्येकवेळा बोललो आहे परंतु अदयापपर्यंत सर्व्हे झालेला नाही. माझ्या प्रभागातील कामे या प्रस्तावात का समाविष्ट केले जात नाही? या प्रस्तावास आमचा विरोध आहे. मिलिंद नगरमध्ये ६० टक्के दलित वस्ती आहे. माझ्या प्रभागातील गौतमवाडी आणि मिलिंद नगरचा प्रस्ताव ठेवला तर याबाबतीत विचार केला जावु शकतो.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>मा. महापौरजी, दलित वस्तीतील ज्यांचे प्रस्ताव येणे बाकी आहे त्यांचे सुध्दा प्रस्ताव आले पाहिजेत. आणि श्री. गुप्ताजी यांच्या प्रभागातील प्रस्ताव तर खास करुन.

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड :—</u>माझ्या प्रभागातील दलित वस्तीचा सर्व्हे करण्याचा राहुन गेला आहे. लवकरात लवकर सर्व्हे करुन माझ्या प्रभागात सुध्दा दलित वस्तीचा निधी देण्यात यावा धन्यवाद।

<u>सदस्य श्री. राजेश वधारिया :—</u>मा. महापौरजी, मी काही प्रश्न विचारले होते त्यांची प्रशासनाकडुन अदयाप उत्तरे मिळाली नाहीत. जेथे आपण इन्टरनल ब्लॉक बसविणार आहात तेथे आता सध्या काय स्थिती आहे. मी आपणांस वाचुन दाखवितो, श्री. भगत यांच्या घरापासुन कैलास पर्वत हॉटेलपर्यंत पुढचा मुद्दा आहे, हजेरी शेडपासुन भगत वकिल यांचे घरापर्यंत ९ लाख ९९ हजार व ९ लाख ८३ हजार अशी ही दोन कामे आहेत. एकाच ठिकाणची दोन प्राकलने आहेत. श्री. भगत यांच्या घराच्या डाव्या बाजुकडील रस्त्याचे कामाचे एक प्राकलन आहे तर श्री. भगत यांच्या घराच्या उजव्या बाजुकडील रस्त्याचे कामाचे एक प्राकलन आहे

<u>श्री. आर.बी. शिर्के (प्र. शहर अभियंता):—</u>अ.क्र. २ व ८ वर दर्शविलेले जे काम आहे त्याबाबत आपण कदाचित बोलत आहात.

<u>सदस्य श्री. राजेश वधारिया :—</u>अ.क्र. १ वर पेव्हर ब्लॉक, २ वर पेव्हर ब्लॉक सर्वठिकाणी पेव्हरब्लॉक आपण तयार करत आहात. परंतु आता तेथिल स्थिती काय आहे? सीमेंट कॉक्रिटीकरण झाले आहे. २५० रस्ता तयार केला आहे की ३५० रस्ता तयार केला आहे? काय स्थिती आहे?

<u>श्री. आर.बी. शिर्के (प्र. शहर अभियंता):—</u> फुटपाथ दुरुस्तीचे काम आहे. हजेरी शेडपासुनचे जे आपण काम सांगत आहात ते नाल्याचे काम आहे.

<u>सदस्य श्री. राजेश वधारिया:—</u>ठिक आहे, जेथे आपण पेव्हर ब्लॉकचे काम प्रस्तावित केले आहे तेथे सध्या काय स्थिती आहे?

<u>श्री. आर.बी. शिर्के (प्र. शहर अभियंता):—</u>तेथे जो पॅसेज आहे तो खराब झालेला असेल म्हणुनच आम्ही पेव्हर ब्लॉक लावत आहोत.

<u>सदस्य श्री. राजेश वधारिया :—</u>खराब झालेला असेल. आता आपण सविस्तर प्राकलन तयार केलेले आहे. सविस्तर प्राकलन तयार करतांना आपणांस मोजमाप घ्यायचे आहे. किती भाग खराब आहे, त्यानुसार दुरुस्तीचा प्रस्ताव आपण का दिला नाही? जर सी.सी. पॅसेज खराब झाला असेल तर तेथे तेवढाच सीसी पॅसेज तयार केला जावु शकतो. तेथे इन्टरनल ब्लॉक बसविण्याची काय गरज आहे? तेथे वाहनांची कोणती वर्दळ आहे? जड वाहनांची वर्दळ किती आहे? या सर्व बाबींचा खुलासा झाला पाहिजे. हा जनतेचा पैसा आहे, भलेही तो जिल्हाधिकारी यांच्याकडुन येवो किंवा कोठुनही येवा.आहे तर जनतेचा पैसा

<u>श्री. आर.बी. शिर्के (प्र. शहर अभियंता):—</u>तेथे जे पेव्हर ब्लॉक लावले जातात ते पदाचा—यांसाठी लावले जातात, ते तेथुन वाहने किंवा इतर काही जाण्यासाठी लावले जात नाही.

<u>सदस्य श्री. राजेश वधारिया :—</u>तेथुन गाडी जावु शकत नाही काय?

<u>श्री. आर.बी. शिर्के (प्र. शहर अभियंता):—</u>जावु शकते.

<u>सदस्य श्री. राजेश वधारिया :—</u>जावु शकते तर मग दुरुस्ती करा. पेव्हर ब्लॉक लावण्याची आवश्यकता काय? आयुक्त साहेबांनी सलग दोन अर्थसंकल्पीय भाषणांमध्ये असे लिहिले आहे की, जेथे पेव्हर ब्लॉक लावण्याची आवश्यकता नाही तेथे ते लावता कामा नयेत. जेथे सिमेंट टिकणार नाहीत, डाबंर टिकाणार नाहीत अशा ठिकाणी लावले जावु शकतात. इन्टरलॉक ब्लॉक लावले जावु शकतात ते प्रिकॉस्ट ब्लॉक आहेत. जेथे कोठे आपण ते बसवाल तेथे ते ताबडतोब बसतील.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>महापौर महोदया, हा विषय घ्यायाचा आहे किंवा नाही, आता त्यावर चर्चा करुन फायदा नाही. पास करण्यामध्ये काही अडचण नाही कारण कीयाबबातचा निधी जिल्हाधिका—यांकडुन येणार आहे, राज्य शासनाकडुन येणार आहे तो आपणांस घ्यायचा आहे किंवा नाही, आता आपणासमोर जो प्रस्ताव आहे तो पास करायचा किंवा नाही करायचा? जेथे चुका झाल्या आहेत तेथे पून्हा चुका होता कामा नये . जो निधी आहे तेथे योग्य प्रकारे उपयोग झाला पाहिजे अशी यांची सूचना आहे. त्यावर अंमलबजावणी केली जावी.

<u>सदस्य श्री. राजेश वधारिया :—</u>जसे की, नाल्याचे काम आहे. बाकी पेव्हर ब्लॉकच्या बाबतीत माझे समर्थन नाही.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>श्री. राजेशजी हा जो प्रस्ताव आम्ही पाठविलेले आहेत त्याचे पर्यवेक्षण जिल्हाधिकारी करतील. त्यांच्याकडुन मंजुरी मिळाल्यानंतरच ती कामे करण्यात येणार आहेत. ती कामे करण्यापुर्वी आपण कशास प्राधान्य देणार आहोत ते निश्चित करा.

<u>सदस्य श्री. राजेश वधारिया :—</u>जिल्हाधिकारी ती कामे पाहतील ते बरोबर आहे, परंतु माझे म्हणणे असे आहे की, ...........

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :—</u>मा. महापौरजी, इतर लोकांच्या प्रभागात सुध्दा दलित वस्ती आहे तेथे सुध्दा दलित वस्ती निधीतुन कामे झाली पाहिजेत. एकाच प्रभागात ५४ ते ५५ लाखाचे काम....... हा प्रस्ताव नाकारला जावा नाहीतर आम्ही सभात्याग करु.

<u>सदस्या श्रीमती सुमन शेळके :—</u>दलित वस्ती योजनेअंतर्गत करावयाची कामे माझ्या प्रभागात करण्यासाठी मी पत्र देवुन सुध्दा काम झालेले नाही. या यादीमध्ये वीर तानाजी नगर ते भवानी चौक मार्गे अशोक सोनावणे यांच्या घरापर्यंत सहा इंचाची नविन जीआय जलवाहिनी टाकण्यात यावी. .

<u>सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे:—</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, माझ्या प्रभागात वाल्मिक नगर ही एक दलित वस्ती आहे, बॅरेक नं. १३१७ ते वाल्मिक नगर पर्यंत ४ इंची जीआय जलवाहिनी टाकणे हे काम यादीत घेतलेले नाही. कृपया ते घेण्यात यावे ही विनंती.

यावेळी सभागृहात उपस्थित असलेले आरपीआयचे सदस्य १. श्री. बी.बी. मोरे, २. श्री. जे.के. ढोके, ३. श्रीमती सुमन शेळके, ४. श्रीमती लता निकम, ५. श्रीमती पंचशिला पवार हे सभागृहातुन बाहेर गेले.



<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, राष्ट्रवादी कॉंग्रेसवाले दलितांचे विरोधक आहेत. दलित वस्तीमध्ये काम होत नाही त्यांना चांगले वाटत नाही म्हणुन ते सभागृहातुन बाहेर जात आहेत. प्रेषकगृहाच्या पत्रकार कक्षामध्ये जे पत्रकार बंधु बसले आहेत त्यांनी आपल्या वर्तमानपात्राच्या माध्यमातुन दलित जनतेस माहिती दिली पाहिजे की, दलित वस्तीचे कामे करण्याच्या विषयावर चर्चा होत असतांना राष्ट्रवादीवाले बाहेर जात आहेत

सदस्य श्री. रविंद्र बागुल :—राष्ट्रवादीवाले दलितांच्या विरुध्द नाहीत. राष्ट्रवादीवाल्यांच्या प्रभागात सुध्दा या दलित वस्ती निधीतुन कामे झाली पाहिजेत.

यावेळी सभागृहात उपस्थित असलेल्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या १. श्री. सतिश चहाळ, २. श्री. प्रभुनाथ गुप्ता, ३. श्री. नरेंद्रकुमार ठाकुर, ४. श्रीमती सुरेखा वेलकर, ५. श्रीमती संगिता कंडारे, ६. श्रीमती सुजाता रिजवानी, ७. श्री. अनिल ऐलानी, ८. . श्री. रविंद्र बागुल, ९. श्रीमती निलु चांदवानी, १०. श्रीमती मंजु पोपटानी, ११. श्री. संजय बठिजा या सदस्यांनी सायंकाळी ७.२७ वाजता सभात्याग केला.

यावेळी सभागृहात खालील सदस्य उपस्थित होते व त्यांची संख्या गणपुर्तीपेक्षा कमी होती.

१. मा. महापौर—— श्रीमती विद्याताई निर्मले
२. मा. उप—महापौर——श्री. कुमार आयलानी
३. श्री. विनोद ठाकुर
४. श्री. भजनलाल रामचंदानी
५. श्री. जमनादास पुरस्वानी
६. श्री. लाल पंजाबी
७. श्री. लालबिहारी यादव
८. श्री. राजेश वानखेडे
९. श्री. विजय सुपाळे
१०.श्री. रामसागर यादव
११.श्री. धनंजय बोडारे
१२.श्री. दिलीप गायकवाड
१३.श्री. राजेंद्रसिंह भुल्लर
१४.श्रीमती वसुधा बोडारे
१५.श्रीमती बेबी भोईर
१६.श्रीमती ज्योती माने
१७.श्रीमती जयश्री सुर्वे
१८.श्री. प्रधान पाटील
१९.श्री. शेखर यादव
२०.श्री. तुलसीदास वसिटा

सदस्य श्री. लाल पंजाबी :—मा. महापौरजी, उप—महापौरजी, विरोधी पक्षातील कोणताही सदस्य सभागृहात उपस्थित नाहीत. त्यांच्या अनुपस्थितीत एखादा ठराव पारीत करावा असे आम्हांला वाटत नाही. आम्ही लोकशाही मांनणारे आहोत, आम्हांला असे वाटते की, आम्ही जेव्हा सभेचे कामकाज चालवु त्यावेळेस विरोधी पक्षाचे लोक सुध्दा सभेत उपस्थित असले पाहिजे. यासाठी आपणांस विनंती आहे की, आजच्या सभेचे काम स्थगित करुन उदया दुपारी ३.०० वाजता ठेवावे. विरोधी पक्षाच्या सदस्यांना आम्ही संधी देवु इच्छितो की, या विषयाचा ठराव पारीत करतांना ते सभागृहात उपस्थित असले पाहिजे. यासाठी माझी आपणांस विनंती आहे की, आजची सभा स्थगित करुन उदया तीन वाजता किंवा चार वाजता ठेवण्यात यावी.

महापौर:—ही सभा गणपुर्ती अभावी उदया शनिवार दिनांक २१/२/२००९ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत स्थगित करण्यांत यावी.

महापालिका सचिव :—सभा स्थगित करायची आहे ना? आपणा सर्वांच्या संमतीने मा. महापौरांनी आदेश दिला आहे की, ही महासभा उदया सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत स्थगित केली जावी.

कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ७.३० वाजता महापौर अथवा पिठासीन अधिकारी :— श्रीमती निर्मले विद्या विजय यांनी सभा स्थगित केल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— २१/२/००९

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २१/२/२००९ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.**

१४—अ

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक २०/२/२००९ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. परंतु सदर सभेतील काही कामकाज स्थगित केल्याने ती सभा शनिवार दिनांक २१/२/२००९ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली. सदर सभेत महापौर, श्रीमती निर्मले विद्या विजय हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. महापौर—— श्रीमती निर्मले विद्या विजय

२. उप—महापौर—— श्री. आयलानी कुमार उत्तमचंद

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | २७ | श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा |
| ४ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | २८ | श्रीमती महाडीक रजनी मोहन |
| ५ | श्री. रविंद्र दशरथ बागूल | २९ | श्री. लालबिहारी बुझारत यादव |
| ६ | श्री. रामसागर जनार्दन यादव | ३० | श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी |
| ७ | श्रीमती निलम प्रेमसिंग रावत | ३१ | श्री. मंगतानी सुंदर आसनदास |
| ८ | श्री. मोरे भानजी भिकारी | ३२ | श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण |
| ९ | श्री. विजय खंडु सुपाळे | ३३ | कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल |
| १० | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज) | ३४ | श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे |
| ११ | श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी | ३५ | श्री. शेखर केशव यादव |
| १२ | श्रीमती सुजाता रमेश रिझवानी | ३६ | श्रीमती सुमन गजानन शेळके |
| १३ | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद | ३७ | श्री. किशोर जग्यासी |
| १४ | श्री. राजू जग्यासी | ३८ | श्रीमती ज्योती शाम माने |
| १५ | श्री. राम (चार्ली) पारवानी | ३९ | श्रीमती लता शांताराम निकम |
| १६ | डॉ. (श्रीमती) निना प्रकाश नाथानी | ४० | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| १७ | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार (कुमारी)केवलराम | ४१ | श्री. मोहन साधवाणी |
| १८ | श्री. लाल पंजाबी | ४२ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| १९ | श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास | ४३ | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| २० | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती | ४४ | श्रीमती मीना सोनेजी (सोंडे) |
| २१ | श्रीमती शकुंतला पाटील | ४५ | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी |
| २२ | श्री. मोहन (गारो) रामरख्यानी | ४६ | श्री. मुकेश सोहन तेजी |
| २३ | श्री. सुखरामानी महेश पहलाजराय | ४७ | श्री. पाटील प्रधान धर्मा |
| २४ | ॲड. श्री. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी | ४८ | श्री. प्रकाश गणपत सावंत |
| २५ | श्री. ढोके जनार्दन किसनराव | ४९ | श्री. नरेंद्र रामचंद्र राजानी |
| २६ | श्री.एडके गणपत गोविंद | ५० | श्री. राजेश नानीकराम वधारीया |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्री. गायकवाड दिलीप, २. श्रीमती संगीता राजेश कंडारे, ३. श्री. दत्तात्रय नारायण पवार, ४. श्रीमती चौधरी राजश्री राजेंद्र, ५. श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के, ६. श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान, ७. श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी, ८. श्री. हरेश परमानंद जग्यासी, ९. श्रीमती जया प्रकाश माखीजा, १०. श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी, ११. श्री. भठीजा (बब्बु) संजय, १२. श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे, १३. श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा, १४. श्रीमती वेलकर सुरेखा राजन, १५. श्रीमती पंचशिला नाना पवार, १६. श्री. बोडारे धनंजय बाबूराव, १७. श्रीमती बोडारे वसुधा धनंजय, १८. श्रीमती करोतीया मालती राधाचरण, १९. श्री. प्रशांत किसनराव धांडे, २० श्री. रमेश महादेव चव्हाण, २१. श्रीमती मनसुलकर शिला सुभाष, २२. श्रीमती चेनानी ज्योती रमेश, २३. श्री. गोविंदराम डोलुमल लुंड, २४. श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी, २५. श्री. ठाकूर विनोद लालसिंग, २६. श्री. बच्चाराम रूपचंदानी, २७. श्रीमती वनवारी मोना अशोक, २८. श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई), २९. श्री. सुनिल साहेबराव गंगवानी, ३०. श्री. गोदुमल नारायणदास क्रिष्णानी, ३१. श्री. सुरेश मधुकर जाधव

खालील अधिकारी सभेस हजर होते.

३२. श्री. अशोक रणखांब, अतिरिक्त आयुक्त
३३. श्री. मिलींद सावंत, उप–आयुक्त
३४. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
३५. श्री. हरेश इदनानी, उप मुख्य लेखा अधिकारी
३६. श्री. एस.जी. खडताळे, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
३७. श्री. आर.बी.शिर्के, प्र. शहर अभियंता
३८. डॉ. जी.टी. जिंदे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी
३९. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्री. श्याम शिवनानी
२. श्री. तानाजी पतंगराव
३. श्रीमती नर्गिस खान

सायंकाळी ४.३५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

Jh- v'kksddqekj j.k[kkac vfrfjDr vk;qDr gs vk;qDrkaP;k LFkkuh izkf/kd`r vf/kdkjh Eg.kqu vkluLFk gksrs-

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. १४ वाचुन दाखवितात

---

⇨ <u>आयत्यावेळचा विषय</u>

**विषय क्र. १४:–** दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत वर्ष २००८–०९ करीता तयार केलेल्या प्राकलनास मंजुरी देणे.

---

<u>महापालिका सचिव:–</u>पास?

<u>सदस्य श्री. राजेश वधारिया :–</u>मतदान घ्या, मतदान.

<u>सदस्या श्रीमती सुरेखा वेलकर :–</u>सचिव साहेब, विषय जरा पुन्हा सांगा.

<u>महापालिका सचिव:–</u> दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत वर्ष २००८–०९ करीता तयार केलेल्या प्राकलनास मंजुरी देणे.

**सदस्य श्री. राजेश वधारिया :**—मा. महापौरजी, काल मी कित्येक प्रश्न उपस्थित केले होते. त्यांचे समाधानकारक उत्तर मिळाले नव्हते म्हणुन काल आम्ही सभात्याग केला होता. आता आमच्या त्या प्रश्नांचे उत्तर देण्यास अधिका—यांना सांगा.

**सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता:**—मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव साहेब, सर्व नगरसेवक बंधु—भगिनी, माझ्या प्रभाग क्र. ३२ मध्ये पाच झोपडपट्टया आहेत. त्यांचे सर्व्हेक्षण करण्यासाठी मी २००७ पुर्वी व त्यानंतरही कित्येकवेळा पत्र दिले आहे परंतु त्याचे आजपर्यंत काहीही उत्तर मिळालेले नाही. श्री. शिर्के साहेबांना सुध्दा सांगितले आहे, त्यांना याबाबतीत चांगली माहिती आहे. गौतमवाडी हा जो एरिया आहे तेथे ९९ टक्के दलित बांधव राहतात, मिलंद नगरमध्ये ६० टक्के दलित बांधव राहतात, भवानी नगरमध्ये ५५ टक्के दलित बांधव राहतात. तरीसुध्दा माझ्या प्रभागातील या वस्त्यांची कामे, दलितवस्ती अंतर्गत करावयाच्या कामांच्या यादीमध्ये समाविष्ट केली जात नाहीत. याबाबत श्री. शिर्के साहेबांनी खुलासा केला तर बरे होईल त्याच बरोबर सर्व्हे कोण करणार हे सांगितले तर बरे होईल.

**श्री. आर.बी. शिर्के (प्र. शहर अभियंता):**—मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, सचिव साहेब व सर्व सन्माननिय सदस्य, दलित वस्ती सुधारणा योजना या योजने अंतर्गतच्या कामांना शासनाकडुन जिल्हाधिका—यांच्या मार्फत आपणांस निधी प्राप्त होतो. या कामांसाठी महानगरपालिकेचे किंवा नगरपालिकेचे अनुसूचित जातीसाठी आरक्षित असलेले जे प्रभाग आहेत, किंवा ज्या वस्तीमध्ये ५० टक्क्यापेक्षा जास्त लोकसंख्येचे दलित लोक राहतात त्या वस्त्यांना ही योजना लागु होते. १९९८ मध्ये तत्कालीन नगररचनाकारांनी जो सर्व्हे केला होता, त्यामध्ये १७ झोपडपट्टया त्यानंतर त्यात आणखी ३ झोपडपट्टया अशा एकुण २० झोपडपट्टया दलित वस्तीतील झोपडपट्टया म्हणुन घोषित करण्यात आल्या. महानगरपालिकेमध्ये अनुसूचीत जातीसाठी जे प्रभाग आरक्षित असायचे त्यामध्ये या योजनेतुन कामे केली जात होती. यावर्षी या २० झोपडपट्टयां व्यतिरिक्त सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत जो सर्व्हे झाला होता, त्यामध्ये ज्या वस्त्यांमध्ये ५० टक्क्यांपेक्षा जास्त संख्येने दलित वस्तीचे लोक राहत असल्याचे आढळुन आले अशा झोपडपट्टयांचा विचार करुन ४१ झोपडपट्टयांमध्ये ही कामे प्रस्तावित केली होती. त्यापैकी १० कोटीची १७ कामे मंजुर झाली होती. आता हा जो ८ क्रमांकाचा प्रभाग आहे हा अनुसूचित जातीसाठी आरक्षित असलेला प्रभाग आहे. संपुर्ण प्रभागासाठी ही योजना लागु आहे. दुसरी गोष्ट अशी की, या व्यतिरिक्त आणखी ज्या काही झोपडपट्टया आहेत, त्याबाबत मा. आयुक्तांच्या आदेशानुसार सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गतच्या महिला कर्मचारी व सार्वजनिक बांधकाम विभागातील कनिष्ठ अभियंता यांच्यावतीने सयुक्तीकपणे सर्व्हेक्षणाचे काम चालु करण्यात आलेले आहे. आपल्या प्रभागात सर्व्हे करणारे लोक येतील. त्यांना विभाग दाखवुन दिल्यानंतर ते घरोघरी जावुन त्यांना देण्यात आलेला जो फॉर्म आहे तो भरुन घेतील. आणि त्या वस्तीमध्ये जर ५० टक्क्यापेक्षा जास्त दलित लोकवस्ती आढळुन आली तर ती वस्तीसुध्दा दलित वस्ती म्हणुन समाविष्ट केली जाईल.

**सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता:**—आपण १९९८ च्या सर्व्हे बाबत बोलत आहात मी १९८५ पासुन चौथ्यांदा निवडुन आलेलो आहे. मला सर्व माहित आहे. माझ्या प्रभागामध्ये सर्व्हे करण्यास न गेलेला माणुस काय वेडाबिडा होता की काय? गौतमवाडीमध्ये ९९ टक्के दलित वस्तीचे लोक राहत असतांना सर्व्हे करणारा त्या विभागात का गेला नाही? आता काय करणार ते सांगा. आता सर्व्हेक्षण चालु आहे.

**श्री. आर.बी. शिर्के (प्र. शहर अभियंता):**—आता सर्व्हेक्षण चालु आहे. त्यामध्ये जर ५० टक्क्यापेक्षा जास्त दलित लोकवस्ती आढळुन आली तर दलित वस्तीमध्ये सामावुन घेतली जाईल.

**सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता :**—सर्व्हेक्षण कोण करणार?

**महापौर अथवा पिठासीन अधिकारी :**—ज्या ज्या झोपडपट्टयांना या योजनेचा लाभ मिळत नाही, त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाचे लोक विभाग दाखवुन देतील, त्याठिकाणी सुवर्ण जयंती रोजगार योजनेमध्ये ज्या महिला कर्मचारी आहेत त्या सर्व्हे करतील त्यांचा जो अहवाल येईल त्यानुसार काम केले जाईल.

**सदस्य श्री. मोहन साधवानी :**—मी अर्ज दिला होता त्यावेळेस यादीमध्ये वाल्मिकी नगरचे दलित वस्तीचे काम आले नाही, कैलास नगरचे आले परंतु ते आले नव्हते आता ते मी भांडुन टाकले. आता या वर्षीसुध्दा

यादीमध्ये वाल्मीकीनगरचे नाव आले नाही. आताच्या  यादीमध्ये जे अडीचकोटी मंजुर झाले आहेत ते सर्व घोषित प्रभाग आहेत की अघोषित आहेत की त्यांचे सुध्दा नाव नाही?

श्री. आर.बी. शिर्के (प्र. शहर अभियंता):—मा. महापौरजी, मागील महासभेच्या वेळी आम्ही जिल्हाधिकारी कार्यालय येथे १० कोटीचे प्रस्ताव पाठविले होते, त्यातुन २ कोटी ४४ लाखाचे प्रस्ताव पारीत होवून आले आहेत.

सदस्य श्री. मोहन साधवानी :—पास होवून आले आहेत परंतु ते यादीमध्ये अघोषित आहेत.

श्री. आर.बी. शिर्के (प्र. शहर अभियंता):—त्यामध्ये काही प्रभाग व काही वस्त्यासुध्दा आहेत.

सदस्य श्री. मोहन साधवानी :—आता जे अडीच कोटी पारीत होवुन आले आहे ते घोषित आहेत काय?

श्री. आर.बी. शिर्के (प्र. शहर अभियंता):—कायदयानुसार आहे, आता आमचा प्रस्ताव कायदयानुसारच गेला होता.  जेथे ५० टक्यापेक्षा जास्त मागासवर्गीय वस्ती आहे तेच प्रस्ताव गेले होते त्यातीलच पारीत होवुन आलेले आहेत.

सदस्य श्री. मोहन साधवानी :—माझ्या प्रभागातील का नाही आले?

श्री. आर.बी. शिर्के (प्र. शहर अभियंता):—ते जिल्हाधिकारी कार्यालयातुन पारीत होवून आले आहे.

सदस्य श्री. मोहन साधवानी :—नाही, ही यादी कोणी बनविली आहे?  जे अडीच कोटी घोषित होवुन आले आहे ती यादी कोणी निवडली आहे?

श्री. आर.बी. शिर्के (प्र. शहर अभियंता):—मा. जिल्हाधिकारी कार्यालयातुन निवड होवुन आली आहे.

सदस्य श्री. मोहन साधवानी :—जी यादी आली आहे ती सर्व घोषित आहे?

श्री. आर.बी. शिर्के (प्र. शहर अभियंता):—होय.

सदस्य श्री. मोहन साधवानी :—मी एक अर्ज दिला आहे, गणेशनगर व कैलाश नगरचा.  मा. महापौरजी आपला सुध्दा प्रभाग आहे,  गणेशनगर व कैलाशनगरमध्ये दलित लोकांची वस्ती आहे. त्यांचे घोषित यादीत नाव का नाही घातले ?

श्री. आर.बी. शिर्के (प्र. शहर अभियंता):— आता जे सर्व्हेक्षण होत आहे त्यात नाव येईल.

सदस्य श्री. मोहन साधवानी :—आता नाव येईल त्याचे?

श्री. आर.बी. शिर्के (प्र. शहर अभियंता):—होय, सर्व्हेक्षणाच्या आधारावर नाव येईल.

सदस्य श्री. मोहन साधवानी :—सर्व्हेक्षणाचा अहवाल कधी येईल? ५ वर्षांनी, ३ वर्षांनी कधी येईल?

श्री. आर.बी. शिर्के (प्र. शहर अभियंता):—सर्व्हेक्षणाचा अहवाल ............

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—श्री. शिर्के साहेब, आपण कोणाकडे पाहत आहात?  आपण उत्तर देत आहात आणि कोणाकडे पाहत आहात? आपणांस काही माहित नसेल तर आपण जा आणि ज्यास याची माहिती आहे त्यास येथे बोलवा ना? तमाशा करण्यासाठी उभे आहात काय येथे?

श्री. आर.बी. शिर्के (प्र. शहर अभियंता):—सुवर्ण जयंती व सार्वजनिक बांधकाम विभागाचे संयुक्तीक काम आहे.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :–</u>आपण नेहमी म्हणत आहात सर्व्हेक्षण चालु आहे, येईल. कधी येईल? केव्हापासुन आम्ही ऐकत आहोत.

<u>श्री. आर.बी. शिर्के (प्र. शहर अभियंता):–</u>एका महिन्यात येईल.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :–</u>पुढील महासभेत ही यादी येईल?

<u>सदस्य श्री. लालबिहारी यादवी :–</u>महापौरजी, आयुक्त साहेब, यांच्याच प्रभागात असे होते बाकीच्या लोकांच्या प्रभागात असे का होत नाही? सर्व प्रभागाची कामे झाली पाहिजेत. आपण अशी कशी ४१ नावांची यादी पाठविलीत?

<u>श्री. आर.बी. शिर्के (प्र. शहर अभियंता):–</u>४१ ज्या झोपडपट्टया आहेत, त्यांना सोडुन आता सर्व्हेक्षण केले जाईल.

<u>सदस्य श्री. लालबिहारी यादव :–</u>आपण तीन महिन्यापुर्वी सुध्दा हेच बोलत होतात, आता सुध्दा हेच बोलत आहेत. याचाच अर्थ असा होतो की, जो येथे बोलतो त्यांच्याच प्रभागाचे आपण सर्व्हे करतात? त्यानंतर बाकीच्यांचे सर्व्हे होतच नाही?

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :–</u>आता ४१ झोपडपट्टयांची जी यादी बनविली आहे, त्यांचे प्राकलन कसे नाही आले? फक्त मोजलेल्याच प्रभागांचे ५५,५५, ६०,६० लाखाचे प्राकलन आलेले आहेत. जरा याकडे लक्ष दयावे.

<u>सदस्या श्रीमती सुमन शेळके:–</u>मा. महापौर, उप–महापौर, आयुक्त साहेब, माझा प्रभाग सुध्दा दलित वस्तीचा आहे. नगरसेवकांनी दलित वस्तीमध्ये कामे केलेली आहेत. त्यावेळेस त्यांना तुम्ही निधी दिला होता. माझा प्रभाग दलितवस्तीचा आहे तर मग माझ्या प्रभागात दलित वस्तीचा निधी का देण्यात येत नाही? या यादीमध्ये जे लोकेशन दिले आहे त्यामध्ये ४३ प्रभागाचा तुम्ही निधी दिलात आणि ५४ क्रमांकाच्या प्रभागामध्ये का निधी दिली जात नाही?

<u>श्री. आर.बी. शिर्के (प्र. शहर अभियंता):–</u>मा. महापौरजी, ५४ क्रमांकाचा प्रभाग हा दलित वस्तीचा नाही आहे. त्यास लागुन जो ४५ क्रमांकाचा प्रभाग आहे तो दलित वस्तीचा प्रभाग आहे, त्या प्रभागापुरताच निधी दिला जातो. राहिली गोष्ट तुमच्या प्रभागाची तर तुमच्या प्रभागात सर्व्हेक्षण करु आणि त्यात जर दलित वस्ती आढळली तर त्याची यादी करु. पुर्वी तुमचा प्रभाग त्या प्रभागात होता म्हणुन त्या प्रभागास लाभ मिळत होता. आता सध्या तुमचा प्रभाग दलित वस्तीचा नाही आहे.

<u>सदस्य श्रीमती सुमन शेळके:–</u>सम्राट अशोक नगर हे त्याच प्रभागात येत आहे.

<u>श्री. आर.बी. शिर्के (प्र. शहर अभियंता):–</u>तो सम्राट अशोक नगरचाच भाग आहे परंतु तो तुमचा प्रभाग दलित वस्तीचा नसल्यामुळे त्याला लाभ मिळत नाही. एक वस्ती म्हणुन पकडुन........

<u>सदस्या श्रीमती सुमन शेळके :–</u>त्या लोकेशन मध्ये दुस–या नगरसेवकास फंड का देण्यात येतो?

<u>श्री. आर.बी. शिर्के (प्र. शहर अभियंता):–</u>दुस–या नगरसेवकास देण्याचा प्रश्नच येत नाही. तुमच्या लोकेशनमध्ये.....

<u>सदस्या श्रीमती सुमन शेळके :–</u>दुस–या नगरसेवकास तुम्ही पाण्याचा सुध्दा फंड दिलेला आहे. व येथे सुध्दा फंड दिलेला आहे.

<u>श्री. आर.बी. शिर्के (प्र. शहर अभियंता):–</u>तो प्रभाग क्र. ४५ पुरताच आहे.

<u>सदस्या श्रीमती सुमन शेळके :—</u>याची विचारपुस करुन तुम्ही आमच्या प्रभागात हा फंड देण्यात यावा.

<u>श्री. आर.बी. शिर्के (प्र. शहर अभियंता):—</u>ठिक आहे.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी प्रभाग क्र. ५ भिमनगर आणि वाल्मीकनगर हा अर्धा दलित वस्तीचा आहे. गेल्यावेळेस वाल्मिकनगरसाठी थोडासा फंड दिलेला त्यावेळी श्री. शिर्के साहेबांनी आम्हांला मदत केली होती. जो ५ लाखाचा फंड देण्यात आला होता तो शौचालय बांधण्यासाठीचा होता.परंतु आम्हांला एमएमआरडीएकडुन शौचालय मिळाले परंतु तरी सुध्दा हयावेळेस आम्हांला जो निधी हवा होता, खास भिमनगरची जी वस्ती आहे त्या लोकांनी मोर्चे आणले, अर्ज दिले, येथिल लोकांनी आश्वासन दिले की, आम्ही तुम्हांला पुढच्या वेळेस निधी देवु आणि भिमनगर येथिल जे लोक आहेत, जे नाले व फुटपाथ आहे त्यांची कामे करु परंतु तरीसुध्दा असे होत नाही. एकाच नावावर ५४ लाखाचा निधी पास होतो ही गंभीर बाब आहे. मा. महापौर महोदयांनी यावर दक्षता घ्यावी. धन्यवाद।

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे:—</u> मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, आजसुध्दा काही प्रभागातील सदस्यांचे दलित वस्तीचे काम होत नाही. दलित वस्तीचा भाग उल्हासनगर शहरामध्ये काही विभागात आहे परंतु तेथे सर्व्हे करुन दिला जात नाही आणि म्हणुन त्यास प्राधान्य मिळत नाही असे काही सदस्यांचे म्हणणे आहे. मी स्पष्ट सांगतो की, शासनाने कित्येकवेळा सांगितले आहे की, ज्या प्रभागात ५० टक्क्याच्यावर जर दलित वस्ती असेल तर त्याठिकाणी ती वस्ती दलित वस्ती म्हणुन घोषित केली जाईल. असे मंजुर केले आहे, त्यासच निधी दिला जातो. परंतु सन्माननिय नगरसेवक श्री. बागुल म्हणत आहेत की, भिमनगर येथिल वस्ती दलित वस्ती आहे परंतु सुवर्ण जयंतीच्या माध्यमातुन ज्यावेळेस सर्व्हे केला होता त्या सर्व्हेच्या आधारे एवढी लोकेलिटी होत नाही. आज जरी श्री. बी.बी. मोरे यांनी म्हटले, आमच्या प्रभागात १०० टक्के दलित वस्ती आहे परंतु ज्यावेळेस सर्व्हे केले जाते, त्यावेळेस ५० टक्क्यांच्या वर दलित वस्ती असली पाहिजे. असा कुठलाही निकष न लावता, जो तो उठतो आणि म्हणतो माझा प्रभाग दलित वस्तीचा आहे, निधी दिला जात नाही. परंतु मी बघतो की, ज्या ज्या वेळेस २००७, २००८ व आज २००९ मध्ये प्रत्येक नगरसेवकास हे सर्व माहित आहे, दलित वस्तीचा प्रभाग हा जर सर्व्हे होवून त्यास शासनाने मंजुरी दिली असेल तरच तो प्रभाग दलित वस्तीचा होतो. परंतु येथे विरोधक म्हणुन बोलत असतील तर ते बरोबर नाही आहे. काही नगरसेवक म्हणतात येथे पेवरब्लॉक का बसविता परंतु पेवरब्लॉक बसवु नये असे काही कायदयात म्हटलेले नाही. मला एक आवर्जुन म्हणायचे आहे की जो ज्या प्रभागाचा नगरसेवक असतो तो तेथिल राजा असतो. आणि त्या प्रभागात झोपडपट्टी असते, रस्ते असतात त्या रस्त्यामधुन जाण्यासाठी सीसी पायवाटा असतात, २५० रस्ता असतो, ३५० रस्ता असतो परंतु लोकेशन पाहुन काम केले जाते. आज जर चांगले काम केले तर ते त्या नगरसेवकाच्या पाठीशी असते. म्हणुन पेवरब्लॉक बसविणे काही वाईट नाही आहे. काही नगरसेवक असे म्हणतात की पेवर ब्लॉक का बसवितात? परंतु ज्या ज्या प्रभागाचा जो नगरसेवक आहे तो त्याच्या प्रभागात काहीही कामे करु शकतो. आम्ही कधी कोणाच्या प्रभागातील कामाबाबत असा काही प्रतिकार करत नाही? काही सदस्य म्हणतात की, सुभाष नगरमध्ये दलित वस्ती आहे, गौतम नगर आहे परंतु मला माहित आहे की या उल्हासनगर शहरामध्ये १९६२ सालापासुन आलेलो आहे, आणि मला माहित आहे की गौतमनगर मध्ये किती दलित वस्ती आहे ती. सभागृहात यायचे आणि विरोध करायचा हे बरोबर नाही म्हणुन सन्माननिय सदस्यांना हे माहित झाले पाहिजे की, २००७—०८ मध्ये याच पध्दतीने कलह झाला होता शेवटी ते प्रकरण मा. जिल्हाधिकारींकडे गेले, त्यांनी सांगितले की ज्या वस्तीमध्ये ५० टक्क्याच्यावर दलित लोक राहतात त्यालाच त्याचा फायदा होईल. अस असतांना आज या विषयावर एवढे क्लेश उडविणे, एवढे बोलणे बरोबर नाही. नगरसेवकांना सर्व माहिती आहे परंतु मुद्दामहुन या सभागुहात काहीतरी बोलायचे, काहीतरी हरकत काढायची की कुणाला काही माहित नाही, अशा पध्दतीने बोलत असतात. ९ क्रमांकाचा प्रभाग हा दलित वस्तीचा आहे परंतु आता श्री. शिर्के साहेबांनी सांगितले की, त्याच्याही व्यतिरिक्ती २० व २१ हा प्रभाग दलित वस्तीमध्ये गणला गेला आहे परंतु आम्ही कधी म्हटले नाही, त्यांना प्राधान्य देवु नका. तुम्ही इतरांना सुध्दा प्राधान्य दया. परंतु दलित वस्ती किती टक्के आहे हे पाहुन तुम्ही त्यांना प्राधान्य दया. म्हणुनच हा विषय बहुमताने पास करावा असे मी आवर्जुन सांगु इच्छितो.

<u>सदस्य श्री. राजेश वधारिया:—</u>मा. महापौरजी, मी आपल्या लक्षात आणुन देतो की, उल्हासनगर शहरात ९ क्रमांकाचा जो प्रभाग आहे तो दलित वस्तीचा प्रभाग आहे. त्याव्यतिरिक्त ३० झोपडपट्टया आहेत तेथे दलित वस्ती ५० टक्के पेक्षा जास्त आहे तर प्रशासनाने हा ९ क्रमांकाचा प्रभागामधुन ८ प्रभाग व २० वस्ती दिसल्या नाहीत काय? काय तेथे काही काम बाकीच नाही? तेथे पाण्याची व्यवस्था चांगली आहे? गटार, रस्ते,

विदयुत व्यवस्था चांगली आहे? याचा खुलासा प्रशासनातर्फे झाला पाहिजे. तसेच मा. आयुक्त साहेबांनी २ अर्थसंकल्पाच्या भाषणाच्या वेळी, काल मला या प्रश्नाचे उत्तर मिळाले नाही ते मी आज पुन्हा विचारतो की, त्यांनी अर्थसंकल्पीय भाषणामध्ये असे म्हटले होते की, इन्टरलॉक ब्लॉक लावले गेले नाही पाहिजेत. त्यावर पैसे खर्च होतो. परंतु येथे अ.क्र. २ वर भगत यांच्या घरापासुन ते कैलासपर्वत येथपर्यंत फुटपाथची दुरुस्ती करणे, तसेच अंबिका दर्शन अपार्टमेंट पासुन ते पेरुमल यांच्या दुकानापर्यंत फुटपाथची दुरुस्ती करणे. सीब्लॉक पासुन महापालिकेतर्फे येणा—या रस्त्याच्या डाव्या व उजव्या बाजुला फुटपाथ, काही वर्षापुर्वी रस्ता बनविला गेला होता त्यावेळेस फुटपाथ बनवला गेला होता व खरोखरच त्याची आवश्यकता आहे काय? या इन्टरलॉक ब्लॉकच्या जागेवर समाज मंदिर किंवा अन्य कोणतेही काम करण्याची आवश्यकता होती, एकीकडे आयुक्त साहेब, दोन दोन अर्थसंकल्पीय भाषेमध्ये म्हणतात की, इन्टरब्लॉक लावण्याची आवश्यकता नाही कारण की यामुळे जनतेचा पैसा व्यर्थ जातो. प्राकलनांवर सही तेच करतात व गोषवा—याच्या रुपाने महासभेपुढे प्रस्तावही तेच पाठवितात. कृपया या गोष्टींचा प्रथम खुलासा करावा.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>श्री. शिर्के साहेब, तुम्ही खुलासा करण्याअगोदर मी बोलतो. महापौरजी, परवानगी देत आहात काय? सन्माननिय महापौरजी, एका नगरसेवकास दुस—या प्रभागात अधिकार नाहीत, दुस—या प्रभागात काणते काम झाले पाहिजे आणि कोणते झाले नाही पाहिजे यास कुठलाही अधिकार नाही. हे निवडुन आलेले नाहीत त्यामुळे त्यांना स्वत:चा वॉर्ड नाही. हे स्विकृत सदस्य आहेत, निवडुन आलेल्या नगरसेवकाच्या प्रभागात हेच काम झाले पाहिजे, ते नाही झाले पाहिजे अशा प्रकारचा यांना कोणताही अधिकार नाही. दुसरी महत्वाची गोष्ट अशी की, ४ थ्या क्रमांकावर २००० सालामध्ये अंबिका दर्शन ते पेरुमलचे दुकान फुटपाथ बनविले होते, ज्यावेळेस शहरामध्ये रस्त्यांचे रुंदीकरण करण्यात आलेले होते. त्यावेळेला फुटपाथ तयार करण्यात आले. तुम्ही निरिक्षण करा. नाहीतर यांनी नामनिर्देशित सदस्य पदाचा राजीनामा दयावा नाहीतर मी देईल. त्यांनी स्वत: तेथे डोळे फाडुन पाहणी करावी. तो झोपडपट्टीचा वॉर्ड आहे. तेथिल फुटपाथ तुटलेले आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजुंनी माझ्या वॉर्डाचा भाग आहे. आणि दोन्ही बाजुला फुटपाथ तयार करण्याचा जो प्रस्ताव मी टाकला असेल तो काही गैर नाही. माझा प्रभाग आहे मला काम करण्याची इच्छा आहे, मी ते काम करेल. दुस—याला सांगण्याची ताकद नाही आहे. तुम्ही स्विकृत सदस्य आहात. तुम्हांला कोणताही वॉर्ड नाही. तुम्ही तुमचे पहावे. दुस—याच्या डोळयामध्ये बोट घालण्याचा अजिबात प्रयत्न करु नका आणि तसा प्रयत्न केलात तर त्याचे परिणाम वाईट होतील. दलित वस्तीबाबत ज्या कुणाला बोलायचे असेल त्याने व्यवस्थित बोलावे. एक दुस—यावर जर शितोंडे उडविले तर श्री.बी.बी. मोरे आहे. येथिल रिपब्लीकन पक्ष कमी पडणार नाही. दुस—याच्या वार्डमध्ये तुम्हांला काय बोलण्याची ताकद आहे. तुम्हांला काय अधिकार आहे? तुम्हांला जेवढे बोलायचे असेल, विरोध करायचा असेल तर तेवढा तुम्ही दलित वस्तीबद्दल विरोध करा. जर तुम्ही नगरसेवकाच्या कामास विरोध केला तर याद राखा. मी ते कधीही सहन करुन घेणार नाही.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :—</u>सन्माननिय महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, आमचे श्री.बी.बी. मोरे ज्यांना मी विरोधी पक्ष नेता म्हणणार नाही. श्री. बी.बी. मोरे साहेब, यांना या शहरातील दलितांचे मोठे नेते असे म्हणेल. व नेत्याचे मन अतिशय मोठे असते. व तसेही ते दलितांचे नेते आहेत. असे असतांना त्यांचे कर्तव्य ठरते की, त्यांनी केवळ आपल्या वार्डाचा विचार न करता, संपुर्ण शहरातील दलितांबाबत त्यांनी विचार केला पाहिजे. ही यांची जबाबदारी आहे, हे शहरातील दलितांचे जेष्ठ नेते आहेत. मी आपणांस आठवण करुन देवु इच्छितो की, दलित वस्तीमध्ये विकासाचे कोणतेही काम होत असेल तर आम्ही त्याचे विरोधात नाही. परंतु येथे महासभेत सभागृहाची जी दिशाभुल केली जाते ती सत्यता आम्ही आपणासमोर ठेवु इच्छितो. याबाबतचे प्रमाण मागील महासभेत आपणांस मिळाले आहेच. पाणी पुरवठयाचे काही निधी होते ज्याबाबत गोषवा—यामध्ये आपण लिहिले होते की हे दलित वस्तीचे निधी आहेत. आम्ही विरोध केल्यानंतर ती यादी बदलण्यात आली. व नंतर दलित वस्ती निधीमध्ये ती यादी आणण्यात आली. आमचे जे म्हणणे आहे त्याबाबत आयुक्त साहेब, मी आपणांस विनंती करेल, केवळ एकाच प्रभागात ६० लाखाचे काम. हे काय आपणांस व येथिल सत्ताधा—यांना झोबंत आहे? मी आपणांस विनंती करेल की, हा प्रस्ताव पुढे ढकलला जावा. माझे बंधु—भगिनी जे बाकी लोक बसलेले आहेत, त्यांच्या वॉर्डात सुध्दा सर्व्हे झाला पाहिजे. व ज्यांच्या ज्यांच्या प्रभागामध्ये दलित वस्ती आहे, त्या सर्व वॉर्डांना समान निधी मिळाला पाहिजे. जर आपण असे करत नसाल आणि या प्रस्तावाच्या बाजुने मतदान घेत असाल तर मी असे म्हणेन की, जे दलित वस्तीचे प्रभाग आहेत तेथिल नगरसेवक आपल्या वॉर्डाविषयी न्याय करत नाहीत. केवळ एका वॉर्डामध्ये ६० लाखाचे काम? काय बाकी पुर्ण शहरामध्ये दलित वस्तीचे काही वॉर्ड नाहीत? व जेव्हा या कामाचे प्राकलने आपणाकडे येतात तेव्हा आपण सहया कश्या करता? काय विचार करता? याबाबत आयुक्त साहेब मीआपणाकडुन जाणुन घेवु इच्छितो. आपण याबाबत जरा बोला.

<u>सदस्य श्री.राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>साहेब, आपण बोलण्याअगोदर मी एक मिनिट बोलु इच्छितो, श्री. शिर्के साहेब, हे सांगा की, दलित वस्तीमध्ये काम करण्यासाठी किती नगरसेवकांची आपणाकडे पत्र आली आहेत. श्री. मोरे साहेबांनी पाठपुरावा जास्त केला त्यामुळे त्यांच्या प्रभागातील काम जास्त आले. दुस–या कुणी नगरसेवकाने पाठपुरावा केला नाही त्यामुळे त्यांचे काम मंजुरीसाठी सभागृहापुढे आले नाही. त्यासाठी त्यांनी ओरडण्याची एवढी आवश्यकता नाही. येथे सभागृहात फक्त ओरडायचे की, आमच्या प्रभागामध्ये काम होत नाही. किती नगरसेवकांनी आपणाकडे पत्र दिली आहेत ते आपण सांगा. किती नगरसेवकांनी आपणाकडे पत्र दिली आहेत की, आमच्या प्रभागामध्ये अमुक ही कामे आहेत, अमुक अमुक या दलित वस्त्या आहेत. त्यांच्यामध्ये दलित वस्तीचे प्रमाण अमुक इतके टक्के आहे. आणि त्यांची या प्रस्तावामध्ये कामे आली नाहीत असे कोण कोणते नगरसेवक आहेत त्यांची जरा नावे सांगा. ते नगरसेवक म्हणतील की मी पत्र दिले आहे तर त्यातील किती पत्र आपणाकडे आली आहेत? आपणाकडे याबाबतची माहिती आहे काय?

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>सन्माननिय सदस्य श्री. भुल्लर महाराज यांच्या मताशी मी पुर्णपणे सहमत आहे, ते जे म्हणत आहेत ते बिल्कुल बरोबर आहे. जर नगरसेवक आपल्या प्रभागामध्ये लक्ष देवु शकत नसतील तर व ज्यांच्या प्रभागामध्ये दलित वस्ती आहे, तेच जर आपणाकडे पाठपुरावा करत नसतील तर हा दोष त्या नगरसेवकांवर जातो. परंतु आयुक्त साहेबांकडुन मी हे जाणुन घेवु इच्छितो की, केवळ एकच वॉर्ड नगरसेवक काम करत असो किंवा नसो.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>त्यांनी पाठ पुरावा जास्त केला त्यांनी वॉर्डामध्ये जास्त लक्ष दिले. त्यामुळे त्यांचे जास्त काम आले.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>महाराजजी, मी आपल्या मताशी सहमत आहे. परंतु आयुक्तांकडुन मी हे जाणुन घेवु इच्छितो. आयुक्त साहेब, ही आपली जबाबदारी ठरते की आपणाकडे जिल्हाधिका–यांकडुन दलित वस्तीसाठी जो काही निधी येतो तो निधी सर्व दलित वस्त्यांसाठी वाटला जावा. ही आपली जबाबदारी ठरतेच त्याचबरोबर आमचे श्री. बी.बी. मोरे जे दलितांचे नेते आहेत, त्यांनी आपले मन मोठे केले पाहिजे. यासाठी मी पुन्हा आपणांस विनंती करतो की, हा विषय पुढे ढकलला जावा व या विषयावर विचार केला जावा. आयुक्त साहेब, जरा याबाबतीत आपण खुलासा करावा.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :–</u>आयुक्त साहेब, मी दोन मिनिटं बोलु इच्छितो, सन्माननिय सदस्य श्री. भुल्लर महाराजजी, दलित वस्तीतील निधीसाठी आम्ही सुध्दा बरीचशी पत्र दिली आहेत.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :–</u>आमच्या ४ नंबर वार्डामध्ये सुध्दा दलित वस्ती आहे. त्यांनी सुध्दा बरीचशी पत्र दिले आहेत.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल:–</u> श्री. भारत गंगोत्रीचा प्रभाग आहे, माझा सुध्दा प्रभाग आहे, काही नगरसेवक आहेत त्यांच्या प्रभागात दलित वस्ती आहे.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>याबाबत प्रथम आयुक्त साहेब उत्तर देतील. तसेच श्री. भुल्लर महाराज यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्याच्याशी मी बिल्कुल सहमत आहे. ज्या ज्या नगरसेवकांनी आपल्या प्रभागातील दलित वस्तीतील कामांसाठी पत्र दिली आहेत, आपण त्यांची नावे वाचुन दाखवा.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>मा. महापौर महोदया, मा. आयुक्त साहेब, आज यासाठी जिल्हाधिकारी यांच्याकडुन निधी येत आहे, त्याबाबत एवढी चर्चा करणे माझ्यामते बरोबर नाही. कारण की मी पाहिले आहे मागील कित्येक वर्षात दलित वस्तीसाठी जिल्हाधिका–यांकडुन जेवढे काही निधी येत होते, असे कितीतरी सभापती होते त्यांनी दलित वस्तीचा निधी कधी मंजुर करुन आणलाच नाही. झिरो किंवा जो काही निधी येत होता तो असाच पडुन राहत होता, वापरलाच जात नव्हता. आज जर एवढा निधी येत आहे, व जसे श्री. राजु जग्यासी यांनी सांगितले की, किती नगरसेवकांची पत्र आली? जर कुण्या नगरसेवकाचे पत्र येत असेल तर सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंते प्राकलन का तयार करणार नाहीत? ते तर प्राकलने जरुर तयार करतील. आणि जरी बनविली नसतील तरीही आता हा जो प्रस्ताव सभेपुढे आलेला आहे तो पारीत केला पाहिजे. व इतर नगरसेवकांच्या प्रभागातील प्राकलने तयार करुन ती दुस–या वर्षासाठी आणली पाहिजेत

कारण की आजची ही सभा शेवटची सभा आहे. या सभेत जर आपण हा प्रस्ताव पारीत केला नाही तर या कामांसाठी बाहेरुन जो निधी येणार आहे तो येणार नाही आणि तो व्यपगत होईल. आपल्या शहरासाठी बाहेरुन दोन चार कोटी रुपयाचे निधी बाहेरुन आणायचे दुरच राहिले येणा—या निधीचा सत्यानाश करुन परत पाठवत आहोत? हा कोणता न्याय आहे. हा प्रस्ताव पारीत झाला पाहिजे. भलेही याबाबत मतदान घ्या. चर्चा बरीच झाली आहे. तसे तर हा ठराव सर्वसंमतीने पारीत झाला पाहिजे आणि तसा होत नसेल तर मतदान घ्या व कुणाचे प्राकलन राहिले असेल तर त्यांनी त्याबाबत पत्र दयावे. एप्रिल महिन्यात आम्ही दुसरा निधी आणु त्यात राहिलेले काम करु. तसेच एकाच विषयावर सारखी चर्चा झाली नाहि पाहिजे.

सदस्य श्री. राजु जग्यासी :—मा. जमनुजी जास्त चर्चेचा प्रश्न नाही आहे. आम्ही आपणांस मागील महासभेच्या वेळी चुकीचे ठरविले आहे. मा. महापौरजी अतिशय महत्वपुर्ण असा मुद्दा आहे. पाहिजे तर आपण दोन दिवसानंतर पुन्हा महासभा ठेवा. परंतु दलित वस्तीचा जो निधी आहे तो सर्व दलित प्रभागांमध्ये गेला पाहिजे.

सदस्य श्री. राजेश वधारिया :—मा. महापौरजी, वरिष्ठ नगरसेवक श्री.बी.बी. मोरे यांनी म्हटले की, स्विकृत नगरसेवकाने दुस—याच्या प्रभागात लक्ष देता कामा नये. मी त्यांना सांगु इच्छितो की, मी या महानगरपालिकेचा ट्रस्टी आहे. ट्रस्टी असल्यामुळे प्रत्येक कामावर आमचे बारीक लक्ष असते. व कोठे जर अनावश्यक खर्च होत असेल तर त्याबाबतीत बोलण्याचा मला पुर्णपणे अधिकार आहे. तसेच त्यांनी जे म्हटले की, याचा परिणाम होईल. मी परिणाम भोगण्यास तयार आहे. व मी त्यांचे आव्हानाचा स्विकार करतो.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—मा. महापौर महोदया, २००६—२००७ मध्ये................

सदस्य श्री. राजु जग्यासी:—मा. आयुक्त साहेब, आपण उत्तर दिले पाहिजे.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—आता हे व्यक्तीशः बोलत आहेत. वैयक्तीक पातळीवर यांनी येता कामा नये. या प्रस्तावावर बरीच चर्चा झाली आहे.

सदस्य श्री. राजेश वधारिया:—जेव्हा ते व्यक्तीशः बोलत होते तेव्हा आपण गप्प का होता? त्यावेळेसच आपण बोलावयास पाहिजे होते, व्यक्तीशः नाव घेवुन बोलु नका.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—मा. महापौर महोदया, २००६—०७ मध्ये निवडणूका लागल्या होत्या त्यामुळे हा निधी व्यपगत झाला होता.

सदस्य श्री. राजेश वधारिया :—त्यांनी म्हटले की, स्विकृत सदस्याने निवडुन आलेल्या सदस्याच्या प्रभागात कोणते काम झाले पाहिजे आणि कोणते काम नाही झाले पाहिजे याबाबत बोलता कामा नये.

उप—महापौर :—या विषयावर चर्चा बरीच झाली आता बसुन घ्या. सचिव साहेब, या विषयावर आता मतदान घ्या.

सदस्य श्री. सतिश चहाळ :—मा. महापौरजी, मी आपणांस विनंती करतो की, दलित वस्तीच्या प्रस्तावावर आपण मतदान घेवु नका. ज्या चुका यांनी या अगोदर केलेल्या आहेत त्या सुधारुन ज्या सदस्यांच्या प्रभागातील कामांचे प्रस्ताव नाहीत. ते पुढील वर्षाच्या निधीसाठी समाविष्ट करण्यात यावे. त्यांच्यावर न्याय करा. आम्ही दलित वस्तीच्या विरोधात नाही.

उप—महापौर :—ठिक आहे, ठिक आहे. पुढील महासभेत त्या सर्व सदस्यांचे प्रस्ताव आणले जातील.

सदस्य श्री. किशोर जग्यासी :—आपण हा जो निर्णय घेतला त्याबद्दल आपले स्वागत करतो. आपण फार चांगले व्यक्ती आहात.

सदस्य श्री. लालबिहारी यादव:—सर्व प्रभागांचा सर्व्हे झाला पाहिजे. हा प्रस्ताव सर्वसंमतीने पास?

महापालिका सचिव:—हा प्रस्ताव सर्वसंमतीने पास?

**सदस्य श्री. राजु जग्यासी :—**आपण उत्तर दयाल तर पुढील महासभेत चर्चा करण्यास आम्हांला मुद्दा मिळेल.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—**आता हा प्रस्ताव सर्वसंमतीने पारीत झाला ना?

**सदस्य श्री. सतिश चहाळ :—**श्री. जमनुजी, आम्ही मतदान म्हटले नाही.

**सदस्य श्री.बी.बी. मोरे :—**दलित वस्तीतील कामास राष्ट्रवादीवाले विरोध करतात.

**सदस्य श्री. राजु जग्यासी:—**आयुक्त साहेबांनी उत्तर दिले पाहिजे.

**सदस्य श्री. सतिश चहाळ :—**मा. महापौरजी, मी म्हटले की, आम्ही दलित वस्तीच्या विरोधात नाही आहे.

**उप—महापौर :—**कृपया बसुन घ्या. आयुक्त साहेब आपणांस उत्तर देत आहेत.

**श्री. अशोककुमार रणखांब (अतिरिक्त आयुक्त तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी):—**मा. महापौर, उप—महापौर, सर्वात प्रथम याबाबत मला हे सांगण्याचे अतिशय आवश्यकता वाटते की, आमचा जो विभाग आहे, त्या विभागाकडे या कामांसाठी कोणत्याही नगरसेवकाने पाठपुरावा करण्याची आवश्यकता नाही. कारण की ती आमची जबाबदारी आहे. मी हे काही राजकिय भाषण देत नाही. तर ती आमची जबाबदारी आहे. ज्या विभागामध्ये दलित वस्तीचे ५० टककेपेक्षा जास्त प्रमाण आहे, त्या विभागात काम करणे जरुरीचे आहे. जे जे प्रस्ताव आले आहेत, त्यांची त्यांनी छाननी केली आहे. आमच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने स्वतःहुन चौकशी करावयास पाहिजे होते. आता ज्या लोकांचे अर्ज मिळाले नाहीत, प्रत्यक्षात तर अर्ज करण्याची जरुरतच नाही. या कामांसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने स्वतः सर्व्हे केला पाहिजे. शासन निर्णय असा असा आहे, त्यानुसार अमुक अमुक ही दलित वस्ती या कामांसाठीचे निकष पुर्ण करत आहे. व आता जो काही सर्व्हे केलेला आहे त्याचा अहवाल पुढील महासभेत आला पाहिजे आणि जे प्रभाग या कामापासुन वंचित आहे त्या सर्वांचा प्रस्ताव आपण आणुन त्या सभेत घ्या. व त्यांना सुध्दा या सुविधा उपलब्ध करुन दया. या निधीचा फायदा त्या प्रभागांना सुध्दा करुन दया. उल्हासनगर शहरामधील कोणतीही दलित वस्ती या कामांपासुन वंचित राहु नये.

**महापालिका सचिव :—**पास? सर्व संमतीने?

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर अथवा पिठासीन अधिकारी :— :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

## आयत्यावेळचा विषय

**विषय क्र. १४:—** दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत वर्ष २००८—०९ करीता तयार केलेल्या प्राकलनास मंजुरी देणे.

**प्रस्तावना**

शासन निर्णय क्र.विधयो—१०२००/१५९२/प्र.क्र.१८९/नवि—४, दि.५/३/२००२ नुसार दलित वस्ती सुधारणा योजना अंतर्गत हाती घ्यावयाची कामे अनुसुचित लोकांची लोकसंख्या ५०% पेक्षा जास्त असलेल्या वस्त्यांमध्ये किंवा महानगरपालिकेच्या अनुसुचित जातीच्या प्रभागामध्येच घेणे आहे. उल्हासनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्र.८,३७,३८,४०,४३,४५,५५,६३,६४ हे ९ प्रभाग अनुसुचित जातीचे राखीव प्रभाग आहेत. तसेच पुढील वस्त्यांमध्ये अनुसुचित जातीची लोकसंख्या ५०% पेक्षा जास्त असल्याचे यापुर्वी तत्कालिन नगररचनाकार/शहर अभियंता व उप आयुक्त शहर यांनी प्रमाणित करुन ठेवलेले आहे. १)क्रांतीनगर, उल्हासनगर—१ २)प्रबुध्द नगर, उल्हासनगर—१ ३)वाल्मिकीनगर,उल्हासनगर—१ ४)दत्तवाडी, उल्हासनगर—१ ५)महाकाली मंदिर, उल्हासनगर—१ ६)

हरिजन वस्ती, उल्हासनगर—१ ७) गौतमबुध्दनगर, उल्हासनगर—३८) गरीब नगर, उल्हासनगर—२ ९)मिलिंदनगर, उल्हासनगर—४ १०)सरस्वतीनगर, उल्हासनगर—३ ११)वाल्मिकीनगर, उल्हासनगर—४१२) हरिजनपाडा, उल्हासनगर—४ १३) नागसेन नगर, उल्हासनगर—४ १४) रामजी आंबेडकर नगर, उल्हासनगर—४ १५) वीर तानाजी नगर, उल्हासनगर—४ १६) श्रीरामनगर, उल्हासनगर—५ १७) हरिजन क्वॉटर्स, उल्हासनगर—५ १८) पटेलनगर,उल्हासनगर—५ १९)महात्मा फुले नगर, उल्हासनगर—५ २०)ज्योतिबा फुले, उल्हासनगर—५

सदरचा प्रभाग क्र.८ हा उल्हासनगर महानगरपालिकेच्या अनुसुचित जातीच्या उमेदवारांकरिता राखीव असलेला प्रभाग आहे. संबंधित नगरसेवक यांनी मागणी केल्यानुसार वर्ष २००८—०९ या आर्थिक वर्षामध्ये सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे रु ५४,७१,९००/— रक्कमेच्या प्रस्तावित केलेल्या ०८ कामांचे नकाशे मा. नगररचनाकार उल्हासनगर महानगरपालिका यांची शिफारस मिळाल्यानंतर निधी उपलब्धतेसाठी व मंजुरीसाठी मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे पाठविणेपुर्वी महासभेची मान्यता आवश्यक असल्याने मा. महासभे पुढे मान्यतेसाठी प्रस्तावित आहे.

**दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत वर्ष २००८—०९ करिता प्रस्तावित कामांची यादी व प्राकलनिय रकमेचा तपशिल**

| अ.क्र | प्रभाग क्र. | दलित वस्तीचे नाव | कामाचे नांव | प्राकलनिय किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | ८ | आंबेडकर नगर | चिंतामण सोनावणे यांच्या घरापासुन आढाव यांचे घर ते गॅरेजपर्यंत सि.सि.पायवाटा व नाली बांधणे आणि सिमेंट पेव्हर ब्लॉक बसविणे. | ४९९९०० |
| २ | ८ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर | भगत यांच्या घ्रापासुल कैलास पर्वत हॉटेल पर्यंतच्या फुटपाथचे दुरुस्ती करणे | ९८६३०० |
| ३ | ८ | आंबेडकर नगर | उल्हासनगर ३ येथील प्रभाग क्र.८ मधील राज बागुल यांच्या घरापासुन पालवे यांच्या घरापर्यंत पायवाटा च नाली बांधणे आणि सिमेंट पेव्हर ब्लॉक बसविणे. | ४९९९०० |
| ४ | ८ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर | अंबिका दर्शन अपार्टमेंट पासून पेहरुमल यांच्या दुकाना पर्यंतच्या फुटपाथचे दुरुस्ती करणे | ९८६३०० |
| ५ | ८ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर | नारायण वाघे यांच्या घरापासुन ससाणेबाई व रामदेव यांच्या घरापर्यंत सि.सि.पायवाटा व नाली बांधणे आणि सिमेंट पेव्हर ब्लॉक बसविणे. | ५००००० |
| ६ | ८ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर | पिंटीग केदार व चिंतामण याच्या घरामार्गे मधु केदार व शिरसाठ यांच्या घरापर्यंत सि.सि. पायवाटा व नाली बांधणे आणि पेव्हर ब्लॉक बसविणे | ५००००० |
| ७ | ८ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर | बाबु खाडे चाळीपासुन अशोक मोरे यांच्या घरापर्यंत सि.सि.पायवाटा व नाली बांधणे आणि पेव्हर ब्लॉक बसविणे | ५००००० |
| ८ | ८ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर | महानगरपालिकेच्या शौचालयाजवळील हजेरी शेड पासुन भगत वकील यांच्या यांच्या घरापर्यंत नाला बांधणे. | ९९९५०० |
| | | | **एकुण** | ५४७१९०० |

<u>महासभा ठराव क्र:</u> ६५ <u>दिनांक:—२१/२/२००९</u>

सुचकाचे नाव :— श्री. रामसागर यादव

अनुमोदकाचे नाव :— श्री.बी.बी. मोरे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत वर्ष २००८—०९ करीता प्रभाग क्रमांक ८ मधील विविध कामांच्या ५४,७१,९००/— खर्चाच्या प्राकलनास मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

महापालिका सचिव :— विषय क्र. १५ वाचुन दाखवितात

---

आयत्यावेळचा विषय

**विषय क्र. १५:—** चतुर्थश्रेणी कर्मचा—यांना लिपिक पदावर पदोन्नती देण्या प्रयोजनार्थ पुर्वीचा महासभा ठराव क्र. ४६ दिनांक ९/१/२००९ मध्ये अंशत: बदल करणे.

---

**सदस्य श्री. राजेश वधारिया :—**यामध्ये आपण काय सुधारणा प्रस्तावित करत आहात ती तर दया.

**सदस्य श्री. लाल पंजाबी :—**याबद्दल मी बोलतो. शासन निर्णयानुसार जेव्हा संवर्ग ४ च्या कर्मचा—यास संवर्ग ३ मध्ये पदोन्नत केले जाते, त्यात काही अटी असतात. त्यातील एक अट अशी होती की, पदोन्नती देतांना त्या कर्मचा—यास टंकलेखन आले पाहिजे. व टंकलेखनाचा वेग इंग्रजीत ४० शब्द व मराठीत ३० शब्द प्रति मिनिट असा असला पाहिजे. गर्व्हमेंट कमर्शीयल सर्टीफिकेट (जीसीसी) प्रमाणपत्र असले पाहिजे. दिनांक ९/१/२००९ च्या महासभेत आपण सर्वांनी ठराव सर्वसंमतीने पारीत केला होता. ठराव केला होता की, शासन निर्णयामध्ये ज्या अटी शर्ती आहेत त्या शिथील केल्या जाव्यात. व इतर कर्मचा—यांनी दिड वर्षाच्या आत टंकलेखन शिकुन प्रमाणपत्र सादर करण्याची त्यांना संधी दिली जावी. आणि या लोकांना सुध्दा पदोन्नती मिळाली पाहिजे. शासन निर्णयानुसार संवर्ग ४ मधील पात्र कर्मचा—यांना प्रथम संवर्ग ३ मध्ये पदोन्नती मिळाली पाहिजे. व बाकी जे कर्मचारी शिल्लक राहतात त्यांना पदोन्नती मिळाली पहिजे. आमचा उद्देश होता की, जास्तीत जास्त लोकांना पदोन्नती मिळाली पाहिजे. या ठरावामुळे प्रशासनाच्या मनामध्ये एक द्विधा स्थिती निर्माण झाली. त्यांना असे वाटले की, आपण शासन निर्णय नजरेआड करुन सर्वांसाठी आपण अटी, शर्तीमध्ये शिथीलता करत आहात. परंतु आमच्या मनामध्ये तसे नव्हते. प्रशासन द्विधा मनस्थितीत होते. प्रशासनाची द्विधा स्थिती दुर करण्यासाठी हा ठराव आणलेला आहे. संवर्ग ४ मधुन संवर्ग ३ मध्ये पहिली जी पदोन्नती दिली जाईल ती शासन निर्णयानुसार दिली जाईल. त्याव्यतिरिक्त जे संवर्ग ४ मधील कर्मचारी शिल्लक राहतात. त्यांच्यासाठी टंकलेखनाची अट शिथिल केली जावी.

**सदस्य श्री. राजेश वधारिया :—**काय आपण जो प्रस्ताव देत आहात तो शासन निर्णयानुसार आहे?

**सदस्य श्री. लाल पंजाबी :—**होय, शासन निर्णयानुसारच आहे. शासनाचा १९९३ चा जो निर्णय आहे त्या अनुसार जे कर्मचारी पात्र आहेत त्यांना प्रथम पदोन्नती देवुन बाकी जे कर्मचारी शिल्लक राहतात त्यांच्यासाठी टंकलेखनासाठी अट शिथील केली जावी.

**सदस्य श्री. राजेश वधारिया :—**अट शिथील करण्याबाबतचा जो प्रस्ताव आहे त्याबाबत प्रशासनाने प्रथम खुलासा करावा. काय हा प्रस्ताव शासन निर्णयाच्या तर विरुध्द तर नाही ना? याची खात्री केली जावी.

श्री. मिलिंद सावंत (उप–आयुक्त, मुख्यालय):–मा. महापौर, उप–महापौर, आणि मा. आयुक्त साहेब, सन्माननिय सदस्य श्री. राजेश वधारिया यांनी आता जो प्रश्न उपस्थित केला. संवर्ग ४ मधुन संवर्ग ३ मध्ये पदोन्नती देतांना टंकलेखन येणे बंधनकारक आहे.

सदस्य श्री. राजेश वधारिया :–साहेब, आपण हिंदी बोललात तर आम्हांला समजेल.

श्री. मिलिंद सावंत (उप–आयुक्त, मुख्यालय):–मा. महापौर, उप–महापौर आणि आयुक्त साहेब, संवर्ग ४ मधुन संवर्ग ३ मध्ये पदोन्नती देतांना टंकलेखन येणे बंधकारक आहे. आणि टंकलेखनाचा वेग इंग्रजी ४० शब्द आणि मराठीत ३० शब्द प्रति मिनिट असला पाहिजे. शासन निर्णयाच्या या तरतुदीनुसार आम्ही पदोन्नती दयावयाच्या कर्मचा–यांची नियुक्ती करणार आहोत. आता आमच्याकडे २५ पदे उपलब्ध आहेत. व या शासन निर्णयानुसार ६ कर्मचारी पदोन्नतीस पात्र ठरतात. बाकीची जी १९ पदे शिल्लक राहतात, त्यांच्यासाठी आता असा प्रस्ताव आहे की, टंकलेखनाची अट शिथील करुन त्यांना पदोन्नत केले जावे. असा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे.

सदस्य श्री. राजेश वधारिया:–अट शिथील करण्याची जी आम्ही मान्यता देत आहोत तर काय ती शासन निर्णयाच्या विरुध्द होणार नाही?

श्री. मिलिंद सावंत (उप–आयुक्त, मुख्यालय):–शासन निर्णयानुसार जेवढे काही उमेदवार उपलब्ध आहेत. आपणाकडे २५ कर्मचारी आहेत. शासन निर्णयाची अंमलबजावणी करायची झाली तर आपणांस फक्त ६ कर्मचारी पदोन्नतीसाठी उपलब्ध होतात. उर्वरीत पदे रिक्त राहतात. या रिक्त पदांवर सेवा जेष्ठतेनुसार जो कोणी कर्मचारी येईल व दिड वर्षाच्या विहित कालावधीमध्ये जो टंकलेखनाची अर्हता पुर्ण करेल तोच त्या पदोन्नतीच्या पदावर राहिल नाहीतर तो पदावनत होईल. माझी आयुक्तांशी माझे जे बोलणे झाले आहे, त्यानुसार महासभा ही नियुक्ती प्राधिकारी असल्यामुळे ती काही अटी, शर्ती शिथील करु शकते. हे अधिकार महासभेला आहेत.

सदस्य श्री. लाल पंजाबी :–मागील वेळेस आपण सर्वांनीमिळुन जो सर्वसंमतीने ठराव पारीत केलेला आहे. परंतु आता मुद्दा येथे अडकला आहे की, प्रशासनाच्या मनामध्ये द्विधा मनस्थिती आहे. शासन निर्णयानुसार जे लोक पात्र ठरतात त्यांचे काय करायचे? त्याबाबतीत आमचे असे म्हणणे आहे की, शासन निर्णयावर अंमलबजावणी करुन बाकीची जी पदे शिल्लक राहतात जसे त्यांनी उदाहरण सांगितले की, आपणाकडे २५ पदे आहेत, ६ कर्मचारी पदोन्नतीस सध्या पात्र आहेत तर बाकी जे १९ पदे आहेत त्यांच्यासाठी अट शिथील करुन दिड वर्षामध्ये जर ते टंकलेखनाची विहित अर्हता पुर्ण करुन आले तर त्यांना पदोन्नती देण्यास मान्यता दिली जाईल.

सदस्य श्री. राजेश वधारिया:–आपल्या ठरावामध्ये दिड वर्षाच्या मुदतीची नोंद आहे. तर काय अशी शिथीलता देण्याबाबत शासन निर्णयामध्ये तरतुद आहे?

श्री. मिलिंद सावंत (उप–आयुक्त, मुख्यालय):– संवर्ग ४ मधुन संवर्ग ३ मध्ये पदोन्नती देण्यासाठी शासन निर्णयानुसार टंकलेखन येणे बंधनकारक आहे.

सदस्य श्री. राजेश वधारिया :–समजा आपण कुणाला पदोन्नती देता व दिड वर्षामध्ये तो जर टंकलेखनाची विहित अर्हता धारण करत नसेल तर काय आपण त्यास पदावनत कराल? तर जो व्यक्ती ६ महिन्यामध्ये टंकलेखनाची विहित अर्हता धारण करत असेल समजा त्यास आपण पदोन्नती देत नसाल परंतु तो सेवाजेष्ठ आहे व पुढे मागे तो ही अर्हता धारण करुन येत असेल तर त्यावेळेस आपण काय करणार? त्यास आपण पदोन्नती देणार नाहीत काय? मला असे म्हणायचे आहे की, अट शिथील करु नका. जो जो व्यक्ती ही अर्हता पुर्ण करेल त्या त्या व्यक्तीस सेवाजेष्ठतेनुसार त्यावेळेस आपण पदोन्नती दया. शासन निर्णयात बाधा आणु नका. प्रथम शासन निर्णयानुसार ज्या ६ कर्मचा–यांना पदोन्नती दयायची आहे ती दया त्यानंतर जो जो व्यक्ती टंकलेखन शिकुन प्रमाणपत्र आपणाकडे सादर करेल त्यांचा नियमानुसार विचार करा.

श्री. मिलिंद सावंत (उप–आयुक्त, मुख्यालय):–याबाबतचा निर्णय महासभेने घ्यायचा आहे.

<u>सदस्य श्री. राजेश वधारिया :–</u>महासभा शासन निर्णयाच्या विरुध्द जावु शकत नाही. आपल्या पत्रामध्ये सुध्दा हीच नोंद आहे की आमचा ठराव शासन निर्णयाच्या विरुध्द जातो. त्यासाठी मी अशी विनंती करतो की, त्या ठरावामध्ये सुधारणा करुन शासन निर्णयातील तरतुदनुसार तयार केला जावा. व जो कुणी व्यक्ती विहित शैक्षणीक अर्हता पुर्ण करुन येईल त्याचाच आपण पदोन्नतीसाठी विचार करावा.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>सन्माननिय महापौरजी, आयुक्त साहेब, आजचा विषय हा पदोन्नतीचा विषय आहे. याबाबत मागील महासभेत सर्वसंमतीने ठराव पारीत झालेला आहे. जे सहा कर्मचारी पदोन्नतीस पात्र आहेत त्यांना पदोन्नती दयायची आणि बाकीचे जे कर्मचारी आहेत, त्यांना टंकलेखन येत नाही अशा कर्मचा–यांना सवलत देवुन दिड वर्षाच्या कालावधीमध्ये जर त्यांनी टंकलेखन शिकुन प्रमाणपत्र सादर केले तर त्यांना पदोन्नती दयावी. अशा पध्दतीने सर्व ठरलेले असतांना मी म्हणतो शासन निर्णय सुध्दा असाच आहे. जर तो टंकलेखनाची परिक्षा उत्तीर्ण झाला असेल तर संवर्ग ४ मधुन संवर्ग ३ मध्ये पदोन्नती देण्यास पात्र आहे. पदोन्नती मिळण्याचा त्यास अधिकार आहे. त्याबद्दल मी असे म्हणतो की या विषयावर जास्त चर्चा न करता जे टंकलेखन उत्तीर्ण झाले आहेत त्यांना तरी आपण पदोन्नती देवु या. ज्यांना टंकलेखन येत नाही अशा कर्मचा–यांना सवलत देवुन दिड वर्षाच्या कालावधीमध्ये जर त्यांनी टंकलेखन शिकुन प्रमाणपत्र सादर केले तर त्यांना पदोन्नती दयावी. मी सांगतो की, उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये १२ वर्षानंतर हा विषय घेत आहोत आणि १२ वर्षानंतर हा विषय घेत असतांना तो अमान्य करणे हे बरोबर नाही. कारण की काही लोक असेच काम करुन सेवानिवृत्त होतील तर त्यास तुम्ही काय करणार? जो टंकलेखनाची परिक्षा उत्तीर्ण झाला आहे त्यास तुम्ही जर पदोन्नती दिली नाही तर तो त्याच पदावर सेवानिवृत्त होईल हे बरोबर नाही. त्यावर अन्याय होईल म्हणुन माझी सभागृहाला विनंती आहे की, हा विषय सर्वसंमतीने पारीत करावा. जयहिंद।

<u>सदस्य श्री. राजेश वधारिया :–</u> मा. महापौरजी, मी आपणाकडुन हे जाणुन घेवु इच्छितो, सभागृहानी मान्य केलेला ठराव महत्वाचा असतो की शासन निर्णय महत्वाचा असतो?

<u>श्री. मिलिंद सावंत (उप–आयुक्त, मुख्यालय):–</u>मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, आपल्याला नेहमी शासन निर्णय महत्वाचा असतो.

<u>सदस्य श्री. राजेश वधारिया :–</u>म्हणजेच आपल्या म्हणण्याचा अर्थ आपणांस शासन निर्णय महत्वाचा असतो. ज्याप्रकारे आपण म्हणालात की आपणांस २५ लोकांची भरती करायची आहे, मी एक उदाहरण देतो, शासन निर्णयानुसार ती राखीव वर्गासाठी भरती आहे आणि आपणाकडे फक्त १० कर्मचारी आहेत. बाकीचे एससी, एसटी असे कर्मचारी आहेत, जर आपणांस १५ लोकांची भरती करायची आहे, आपण प्रस्ताव आणलात की आपणांस सर्वसाधारण लोकांची भरती करायची आहे तर आपण ती करु शकतो काय?

<u>श्री. मिलिंद सावंत (उप–आयुक्त, मुख्यालय):–</u>बिंदु नामावलीमध्ये आपण कुठलाही बदल करु शकत नाही.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>याचाच अर्थ शासन निर्णय सर्वात महत्वाचा आहे. तर माझी आपणांस विनंती असेल की, हा प्रस्ताव शासन निर्णयाच्या विरुध्द जाईल यासाठी यावर पुन्हा एकदा विचार केला जावा. त्यानंतरच यास सभागृहामध्ये आणले जावे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–</u>मा. महापौरजी, आता माझे मित्र श्री. राजु जग्यासी यांनी शासन निर्णयाचा विचार केला, या महासभेचे ठराव महाराष्ट्र शासनाच्या अधिन आहे, शासन निर्णय महत्वपुर्ण आहे. परंतु मी सांगु इच्छितो की, शासन निर्णय जो असतो त्याप्रमाणे आपण कामे करतो काय? जेव्हा १९९६ मध्ये उल्हासनगर नगरपालिकेचे महापालिकेत रुपांतर झाले, त्यावेळेस शासनाचा निर्णय आला होता त्या निर्णयानुसार जेवढे काही उप–आयुक्त या महापालिकेत शासनातर्फे येतील ते सहा महिन्यापर्यंत आपणाकडील अधिका–यांना प्रशिक्षण देतील व त्यानंतर उल्हासनगर महानगरपालिकेतील कार्यरत अधिकारीयांना उप–आयुक्त पदी पदोन्नती दिली जाईल. काय आजपर्यंत ती दिली गेली काय? तो शासन निर्णय कोठे गेला? जर आपण शासन निर्णय विषयी बोलत आहोत तर आपण काय शासन निर्णयाची अंमलबजावणी करतो काय? आज येथे जेवढे काही अधिकारी बसले आहेत ज्यांना पदोन्नती मिळाली पाहिजे परंतु उल्हासनगर महापालिकेतील जवेढे काही अधिकारी आहेत ते या शहराचे रहिवाशी आहेत, शहराच्या हितासाठी विचार करतात. हे शहर सुंदर बनण्यासाठी आपण त्यासाठी कामे करु. परंतु आपण त्यांना पदोन्नती दिली आहे? तर आपण का या शासन निर्णयाचा विचार करते आहोत? जे काम येथे होत आहेत ते काय शासन निर्णयानुसार

चालत आहेत? नाही चालत, तर या विषयाला पारीत करा व मी आपणांस निवेदन करतो की, शासन निर्णयानुसार येथिल अधिका–यांना उप–आयुक्त पदी पदोन्नती देवुन किंवा जे अन्य कुठल्या पदावर बसतात त्यांना पदोन्नती दिली पाहिजे.तो विषय सुध्दा लवकरात लवकर आमच्याच कार्यकालावधीमध्ये आला पाहिजे. जेणे करून लोकांना वाटले पाहिजे की भारतीय जनता पार्टी,शिवसेना व अन्य पक्षांचे सरकारने एवढया वर्षापासून प्रलंबित असलेल्या आमच्या पदोन्नत्या दिल्या तर ख–या, यास्तव मी आपणास निवेदन करेन की, आमचे जे अधिकारी आहेत त्यांना सुध्दा पदोन्नत्या दया,जेणे करून त्यांना आम्ही सांगु शकु की आपणास उप आयुक्त बनविण्यांत आमचे सहकार्य होते.

सदस्य श्री. लाल पंजाबी :–मा.महापौरजी व सहकारी हो, शासन निर्णया विषयी चर्चा चालली आहे त्यानुसार सर्वात प्रथम मी आपणास हे सांगु इच्छित आहे की आम्ही शासन बाजुला सारून निर्णय घेत नाहीत. शासन निर्णया नुंसार जे कर्मचारी पदोन्नतीस पात्र आहेत.त्यांना पदोन्नती देत आहोत.त्याशिवाय जे कर्मचारी शिल्लक राहतात,जे पात्र नाहीत, त्यांच्यासाठी आम्ही अटी शिथील करत आहोत. जेणे करून दिड वर्षामध्ये त्यांना टंकलेखनाचा कोर्स पुर्ण करता यावा व त्यांना सुध्दा पदोन्नती मिळावी एक गोष्ट सांगु इच्छितो की,आम्ही शासन निर्णयाकडे दुर्लक्ष करत नसून त्याचे पालन करत आहोत. पात्र कर्मचा–यांना पदोन्नती दिल्या नंतर जी पदे शिल्लक राहतात त्यावर पदोन्नती देता यावी म्हणून अट शिथील करत आहोत, व अट शिथील करण्याचे महासभेस अधिकार आहेत. त्यांचा आपणस वापर करत आहोत. दुसरे असे की श्री राजु जग्यासी श्री मोरे साहेबांना मन मोठे ठेवण्याचा सल्ला देत होते. त्याबद्दल मी त्यांना सांगृ इच्छितो की, संवर्ग ४ मध्ये आमचे जेवढे काही बंधु भगिनी आहेत, जे आता उच्च शिक्षीत आहेत. त्यांच्यासाठी आपणांस मन मोठे करुन त्यांना पदोन्नती देता यावी म्हणुन अट शिथील करुन पदोन्नती देण्याची संधी दयावी. व त्यांनी अधिकाधिक प्रगती करावी अशी आमची भावना आहे.

सदस्य श्री. राजु जग्यासी :–मा. महापौरजी, मी आपणांस अगोदरच स्पष्टपणे विचारले होते की, आम्ही आपणाकडुन हे जाणुन घेवु इच्छितो की आम्ही शासन निर्णयाच्या विरुध्द जावु इच्छित नाही. मी ही गोष्ट स्पष्टपणे सांगतो. व आपण म्हटले होते की, आम्ही सुरुवातीस ज्या लोकांना पदोन्नती देवु ती शासन निर्णयानुसार देवु. येथपर्यंत आम्ही आपणांशी सहमत आहोत. त्याव्यतिरिक्त आपण जे सांगितले त्यावर आम्ही चर्चा करत आहोत. अट शिथील करुन कर्मचा–यांना पदोन्नती देणे हे शासन निर्णयाच्या विरुध्द होईल काय? आम्ही कम्रचा–यांच्या विरुध्द नाहीत हे स्पष्ट करु इच्छितो. पुढे मागे सभागृहावर हे येवु नये की, आपण शासन निर्णयाच्या विरुध्द जावुन कर्मचा–यांना पदोन्नत्या कश्या दिल्या? ही गोष्ट मी स्पष्ट करु इच्छितो.

सदस्य श्री. राजेश वधारिया:–मा. महापौरजी, मी आयुक्त साहेबांना आणखी एक प्रश्न विचारु इच्छितो, समजा शासन निर्णयानुसार अट शिथील करु शकत नाही जसे की श्री. मिलिंद सावंत यांनी सांगितले. व महासभा ठराव करते की आपण अट शिथील करा. तर ज्या आपण पदोन्नत्या दयाल त्या बेकायदेशीर होणार नाहीत काय?

श्री. मिलिंद सावंत (उप–आयुक्त, मुख्यालय):–मा. सदस्य श्री. राजेश वधारियाजी, एक मुद्दा मी स्पष्ट करु इच्छितो, आम्ही प्रथम पदोन्नती कुणास देत आहोत जे कर्मचारी १० वी पास आहेत, सेवाजेष्ठ आहेत, व ज्यांनी टंकलेखनाची परिक्षा उत्तीर्ण केली आहे. या कर्मचा–यांच्या नंतर आम्ही त्या कर्मचा–यांना पदोन्नती देत आहोत जे कर्मचारी सेवाजेष्ठ आहेत, १० वी पास आहेत. आता फक्त प्रश्न राहतो तो टंकलेखनाचा, टंकलेखन परिक्षा उत्तीर्ण करण्यासाठी आम्ही दिड वर्षाचा कालावधी निश्चित करुन दिला आहे. या कालावधीत जो जर पुर्ण करत नसेल तर आम्ही त्यास पदावनत करु. जर कनिष्ठ कर्मचारी दिड वर्षात टंकलेखन पुर्ण करतो व जेष्ठ कर्मचारी पुर्ण करत नाही तर आपोआपच कनिष्ठ कर्मचारीस सेवाजेष्ठ पद धारण करेल. जर दिड वर्षात टंकलेखन वरिष्ठ कर्मचारी पुर्ण करतो तर सेवाजेष्ठ कर्मचारीच पदोन्नत होईल.

महापालिका सचिव :–पास? सर्वसंमतीने?

सदस्य श्री. सतिश चहाळ :–मतदान घ्या.

महापालिका सचिव :–दिनांक ९/१/२००९ ला आपण ठराव पारीत केला आहे.

<u>सदस्य श्री. राजेश वधारिया :—</u>तर आम्हांस असे  वाटते की त्यामध्ये सुधारणा केली जावी.  ४६ क्रमांकाचा जो ठराव आहे त्यामध्ये आपण सुधारणा करावी.  त्यामध्ये जी शिथीलता आहे ती काढुन टाकण्यात यावी.

<u>महापालिका सचिव :—</u>मुद्दा असा आहे की, या विषयाबाबत आपणांस परिपुर्ण माहिती मिळालेली नाही. मुद्दा असा आहे की, आमचे जे सेवाशर्ती नियम आहेत, त्यामध्ये लिपिकासाठी शैक्षणिक पात्रता १० वी उत्तीर्ण अधिक टंकलेखन परिक्षा उत्तीर्ण असला पाहिजे.  व शासन निर्णय सुध्दा असाच आहे की, जो कर्मचारी टंकलेखन परिक्षा उत्तीर्ण आहे त्यासच पदोन्नती दयायची आहे.  पदोन्नतीसाठी हे लोक जी यादी तयार करत आहेत त्यामधील मोजकेच लोक पदोन्नतीस पात्र आहेत.  मागील वेळेस आपण जो ठराव केला होता त्यानुसार जर सेवाजेष्ठता यादी तयार केली तर जे उच्च शिक्षित कर्मचारी आहेत त्यांचा क्रमांक मागे जातो.  यासाठी आतापर्यंत जे कर्मचारी पदोन्नतीस पात्र आहेत, त्यांना प्राधान्याने पदोन्नती दयायची आहे.  व त्यानंतर ही अट शिथील केल्यामुळे जे पात्रता धारण करतील त्यांना पदोन्नती दिली जाईल.  म्हणजेच शासन निर्णयाच्या समसमान निर्देश होतील.  टंकलेखन परिक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर तो कर्मचारी पदोन्नतीस पात्र आहे.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :—</u> शासन निर्णयाच्या विरोधात आम्ही ठराव पारीत करत नाहीत ना? फक्त एवढेच आपण स्पष्ट करा.

<u>महापालिका सचिवः—</u>शासन निर्णयामध्ये मार्गदर्शक सूचना आहेत की, त्यांच्याकडे टंकलेखन परिक्षा उत्तीर्ण असले पाहिजे.  एक वर्षानंतर तो टंकलेखनाचे प्रमाणपत्र सादर करेल.  ते सादर केल्यानंतर तो पात्रता पुर्ण करेल.  एकुण शासन निर्णय आणि सेवाशर्ती नियम यांचा अर्थ एकच निघतो.

<u>सदस्य श्री. राजेश वधारिया :—</u>आपण शिथीलता कशास देत आहात?  ज्यांच्याकडे टंकलेखनाची अर्हता नाही त्यांच्यासाठी.

<u>महापालिका सचिव :—</u>त्यासाठी दिड वर्षाचा कालावधी दिला जाईल.  या कालावधीत टंकलेखन पुर्ण करुन प्रमाणपत्र सादर करा.  या दिड वर्षाच्या कालावधीत जर ते प्रमाणपत्र सादर करत असतील तर त्यांची पदोन्नती कायम केली जाईल.  आणि प्रमाणपत्र सादर केले नाही तर ते पद रिक्त होईल.  व सेवाजेष्ठतेनुसार जो लायक असेल त्यास ते पद दिले जाईल.

<u>सदस्य श्री. राजशे वधारिया :—</u>तर मग तोपर्यंत पदोन्नती का देत आहात?  त्यांना प्रथम अर्हता धारण करु दया ना?

<u>महापालिका सचिव :—</u>जर पदोन्नती दिली नाही तर काय होईल?  समजा, अ.क्र. २५ वर जो कोणी कर्मचारी असेल तो जर अगोदर प्रमाणपत्र घेवुन येत असेल व अ.क्र. २४ वर जो कोणी कर्मचारी आहे तो टंकलेखनाचे प्रमाणपत्र सादर करत नसेल तर अ.क्र. २५ वरील कर्मचारी पदोन्नतीमुळे सेवाजेष्ठ होईल. हे जे बदल केले आहेत ते आपण सेवाशर्ती नियमात केले आहे.  सेवाशर्ती नियमावलीमध्ये जर आपण बदल करु इच्छित असाल तर करा, करु इच्छित नसाल तर तो आपला निर्णय राहिल.

<u>सदस्य श्री. रामसागर यादव :—</u>मा. महापौरजी आणि आयुक्त साहेब, या विषयावर बरीच चर्चा झाली. कोणताही निर्णय होत नसल्यामुळे यावर आता मतदान घेतले जावे.

<u>महापालिका सचिव :—</u>मतदान घ्यायचे काय?

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :—</u>नाहीतर मतदान घ्या. १२ वर्षानंतर महापालिका पदोन्नती देवु इच्छित आहे.  त्यामध्ये सुध्दा हे लोक असा अडथळा आणतात.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :—</u>हा विषय पुढे ढकलला जावा.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :—</u>नाही, नाही हा विषय पुढे ढकलला जाणार नाही. आचारसंहिता लागणार आहे त्यामुळे हा विषय पुढे ढकलला जाणार नाही. नाही होणार, नाही होणार. १२ वर्षानंतर बिचा—यांना पदोन्नती मिळत आहे.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :—</u>आम्ही शासन निर्णयाच्या विरुध्द जाणार नाही जर विषय पुढे ढकलत असाल तर चांगली गोष्ट आहे. पुढे ढकलत नसाल तर मतदान घ्या.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>हा चहा मतदान घ्या.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :—</u>मा. सचिव साहेब, शासन निर्णयाची प्रत आहे काय? शासन निर्णयामध्ये काय लिहिले आहे ते आम्ही वाचुन पाहु इच्छितो.

सदस्या श्रीमती मंजु पोपटानी व श्रीमती निलम रावत हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

<u>महापालिका सचिव :—</u>आपली संमती असेल तर जो ठराव करण्यांत येणार आहे तो मी वाचुन दाखवितो. ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद शासन निर्णयानुसार विहित पात्रता पुर्ण करीत असलेल्या कर्मचा—यांना प्राधान्याने पदोन्नती देण्यात यावी व तद्नंतर लिपिक संवर्गातील लिपिक पदे शिल्लक राहतील तर महासभा ठराव क्र. ४६, दिनांक ९/१/२००९ नुसार टंकलेखकाची अर्हता पुर्ण करण्यासाठी दिड वर्षाच्या मुदतीच्या अटीवर पदोन्नती देण्यास मान्यता देत आहे.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>सर्वसंमतीने ठराव पारीत करा.

<u>महापौरः—</u>सचिव साहेब, या प्रस्तावावर मतदान घ्या.

<u>महापालिका सचिव :—</u>मा. महापौरांच्या आदेशाने, मी आपणांस सांगु इच्छितो की, जे या प्रस्तावाच्या बाजुने मतदान करु इच्छितात त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

<u>प्रस्तावाच्या बाजुने ३२ मते</u>

१. श्रीमती विद्यताई निर्मले
२. श्री. कुमार आयलानी
३. श्रीमती आशान लिलाबाई
४. श्रीमती चंद्रा टेकचंदानी
५. श्री. भजनलाल रामचंदानी
६. श्रीमती कविता सिरवानी
७. श्री. रामचंद्र पारवानी
८. श्री. जमनादास पुरस्वानी
९. श्री. लाल पंजाबी
१०.श्री. महेश सुखरामानी
११.श्री. किशोर जग्यासी
१२.श्रीमती मिनाताई सोनेजी
१३.श्रीमती शकुंतला पाटील
१४.कु. शकुंतला जग्यासी
१५.डॉ. निना नाथानी
१६.श्री. लालबिहारी यादव
१७.श्री. रामसागर यादव
१८.श्री. राजेश वानखेडे
१९.श्री. राजेंद्रसिंह भुल्लर
२०.श्रीमती बेबी भोईर

२१.श्रीमती ज्योती माने
२२.श्री. जयश्री सुर्वे
२३.श्री. शेखर यादव
२४.श्री. विजय सुपाळे
२५.श्री. मुकेश तेजी
२६.श्री. प्रधान पाटील
२७.श्रीमती इंदिरा उदासी
२८.श्रीमती सुमन शेळके
२९.श्री.बी.बी. मोरे
३०.श्री.जे.के. ढोके
३१.श्रीमती जयश्री पाटील
३२.श्रीमती लता निकम

<u>महापालिका सचिव :—</u> जे या प्रस्तावाच्या विरोधात मतदान करु इच्छितात त्यांनी कृपया आपले हात वर करावेत.

<u>प्रस्तावाच्या विरोधात ९ मते</u>

१. श्री. राजु जग्यायी
२. श्री. सतिश चहाळ
३. श्री. प्रभुनाथ गुप्ता
४. श्रीमती सुंजाता रिजवानी
५. श्री.गणपत एडके
६. श्री. भारत राजवानी
७. श्री. नरेंद्रकुमार ठाकुर
८. श्री. अनिल आयलानी
९. श्री. रविंद्र बागुल

<u>महापालिका सचिव :—</u>कॉंग्रेसचे सदस्य?

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी:—</u>आम्ही तटस्थ आहोत.

<u>तटस्थ</u>

१. श्रीमती रजनी महाडिक
२. श्री. मोहन साधवानी
३. श्री.बाबु मंगतानी

<u>महापालिका सचिव :—</u>पास? बहुमताने?

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर अथवा पिठासीन अधिकारी :— :—</u> सदरचा विषयाबाबत बहुमताने पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

<u>आयत्यावेळचा विषय</u>

**विषय क्र. १५:—** चतुर्थश्रेणी कर्मचा—यांना लिपिक पदावर पदोन्नती देण्या प्रयोजनार्थ पुर्वीचा

महासभा ठराव क्र. ४६ दिनांक ९/१/२००९ मध्ये अंशत: बदल करणे.

प्रस्तावना

चतुर्थश्रेणी कर्मचा–यांच्या पदोन्नतीबाबत सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक आरटीआर–१०८५/८५३/प्र.क्र. ७२–८५/तेरा, दिनांक २९ जुन, १९९३ नुसार ''चतुर्थश्रेणीतील कर्मचा–यांनी टंकलेखनातील आवश्यक गती असल्याचे नियमानुसार विहित प्रमाणपत्र (गर्व्हमेंट कमर्शिअल सर्टीफिकेट) धारण केलेले असेल तरच तृतीय श्रेणीत पदोन्नती देण्यात यावी.

तथापि, उल्हासनगर महानगरपालिका महासभा ठराव क्र. ४६, दिनांक ९/१/२००९ अन्वये लिपिक या पदावर पदोन्नती देवुन दिड वर्षापर्यंत टंकलेखनाची अर्हता पुर्ण करणेबाबतचा प्रस्ताव मंजुर करण्यात आलेला आहे.

मा. महासभा ठराव क्र. ४६ दिनांक ९/१/२००९ हा उक्त शासन निर्णयाच्या विरोधात्मक आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ५३ (१) अन्वये नियुक्ती प्राधिकरण मा. महासभा आहे. तरी उक्त बाबी विचारात घेता मा. महासभा पटलावर निर्णयार्थ प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: ६६ दिनांक:–२१/२/२००९

सुचकाचे नाव :– श्री. लाल पंजाबी

अनुमोदकाचे नाव :– श्री.बी.बी.मोरे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद शासन निर्णयानुसार विहित पात्रता पुर्ण करीत असलेल्या कर्मचा–यांना प्राधान्याने पदोन्नती देण्यात यावी व तद्नंतर लिपिक संवर्गातील लिपिक पदे शिल्लक राहतील तर महासभा ठराव क्र. ४६, दिनांक ९/१/२००९ नुसार टंकलेखकाची अर्हता पुर्ण करण्यासाठी दिड वर्षाच्या मुदतीच्या अटीवर पदोन्नती देण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

बहुमताने

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ५.४० वाजता महापौर श्रीमती निर्मले विद्या विजय यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— २०/३/२००९

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २०/३/२००९ रोजीच्या

सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

१५

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक २०/३/२००९ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती निर्मले विद्या विजय हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते/होत्या.

४. महापौर—— श्रीमती निर्मले विद्या विजय

५. उप—महापौर—— श्री. आयलानी कुमार उत्तमचंद

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | ३५ | श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा |
| ४ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | ३६ | श्रीमती वेलकर सुरेखा राजन |
| ५ | श्री. गायकवाड दिलीप | ३७ | श्री. लालबिहारी बुझारत यादव |
| ६ | श्रीमती संगीता राजेश कंडारे | ३८ | श्रीमती पंचशिला नाना पवार |
| ७ | श्री. रविंद्र दशरथ बागूल | ३९ | श्रीमती करोतीया मालती राधाचरण |
| ८ | श्री. रामसागर जनार्दन यादव | ४० | श्री. मंगतानी सुंदर आसनदास |
| ९ | श्रीमती निलम प्रेमसिंग रावत | ४१ | श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण |
| १० | श्री. दत्तात्रय नारायण पवार | ४२ | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| ११ | श्रीमती चौधरी राजश्री राजेंद्र | ४३ | श्रीमती बोडारे वसुधा धनंजय |
| १२ | श्री. विजय खंडु सुपाळे | ४४ | श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे |
| १३ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ४५ | श्री. शेखर केशव यादव |
| १४ | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी | ४६ | श्रीमती सुमन गजानन शेळके |
| १५ | श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी | ४७ | श्री. प्रशांत किसनराव धांडे |
| १६ | श्रीमती सुजाता रमेश रिझवानी | ४८ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १७ | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद | ४९ | श्री. किशोर जग्यासी |
| १८ | श्री. राजू जग्यासी | ५० | श्रीमती चेनानी ज्योती रमेश |
| १९ | श्री. राम (चार्ली) पारवानी | ५१ | श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी |
| २० | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ५२ | श्रीमती ज्योती शाम माने |
| २१ | श्रीमती जया प्रकाश माखीजा | ५३ | श्रीमती लता शांताराम निकम |
| २२ | श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी | ५४ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २३ | डॉ. (श्रीमती) निना प्रकाश नाथानी | ५५ | श्री. ठाकूर विनोद लालसिंग |
| २४ | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार (कुमारी)केवलराम | ५६ | श्री. मोहन साधवाणी |
| २५ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे | ५७ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| २६ | श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा | ५८ | श्री. बच्चाराम रूपचंदानी |
| २७ | श्री. लाल पंजाबी | ५९ | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| २८ | श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास | ६० | श्रीमती मीना सोनेजी (सोंडे) |
| २९ | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती | ६१ | श्रीमती वनवारी मोना अशोक |
| ३० | श्री. मोहन (गारो) रामरख्यानी | ६२ | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी |
| ३१ | श्री. सुखरामानी महेश पहलाजराय | ६३ | श्री. मुकेश सोहन तेजी |
| ३२ | ॲड. श्री. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी | ६४ | श्री. पाटील प्रधान धर्मा |
| ३३ | श्री. ढोके जनार्दन किसनराव | ६५ | श्री. सुनिल साहेबराव गंगवानी |
| ३४ | श्री.एडके गणपत गोविंद | ६६ | श्री. राजेश नानीकराम वधारीया |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्री. मोरे भानजी भिकारी, २. श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान, ३. श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज), ४. श्री. भठीजा (बब्बु) संजय, ५. श्रीमती शकुंतला पाटील, ६. श्रीमती महाडीक रजनी मोहन, ७. श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी, ८. कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल, ९. श्री. सुरेश मधुकर जाधव, १०. श्रीमती मनसुलकर शिला सुभाष, ११. श्री. गोविंदराम डोलुमल लुंड, १२. श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई), १३. श्री. प्रकाश गणपत सावंत, १४. श्री. नरेंद्र रामचंद्र राजानी, १५. श्री. गोदुमल नारायणदास क्रिष्णानी

खालील अधिकारी सभेस हजर होते.

४०.श्री. समीर उन्हाळे, आयुक्त
४१.श्री. मिलींद सावंत, उप–आयुक्त
४२.श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
४३.श्री. दिपक सावंत, उप–आयुक्त
४४.श्री. अनुदिप दिघे, मुख्य लेखा अधिकारी
४५.श्री. अनंत कांबळे, प्र. मुख्य लेखा परिक्षक
४६.श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विदयुत
४७.श्री. एस.जी. खडताळे, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
४८.श्री. आर.बी.शिर्के, प्र. शहर अभियंता
४९.डॉ. राजा रिझवानी, वैद्यकीय अधिकारी
५०.. श्री. चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख
५१.श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्री. गणेश शिंपी
२. श्री. श्याम शिवनानी
३. श्री. तानाजी पतंगराव
४. श्रीमती नर्गिस खान

सांयकाळी ४.२५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ <u>विषय क्र. १ :–</u> मागील महासभेचे दिनांक १६/२/२००९ व दिनांक २०/२/२००९ (त्यात दिनांक २१/२/२००९) रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>मा. महापौरजी, महापालिकेच्या काही जागा भाडयाने देण्याबाबत मागील महासभेत आपण एक ठराव पारीत केलेला आहे. येणा–या २६ तारखेला चेटीचंद सणानिमित्त पेसुमल यात्री निवास येथे माजी उपमहापौर श्री. विनोद तलरेजा यांनी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. तेंथे असा कोणताही कार्यक्रम आयोजित केला जावु नये याबाबत आपलेच काही नगरसेवक त्याबाबत हरकत घेतात. ते जे हरकत घेतात ती चुकीची आहे. भाजपाचे लोक आणि दुसरे काही लोक नेहमी हिंदुत्वाच्या मुद्दयावर निवडुन आले आहेत. तर सिंधी लोक सुध्दा हिंदु आहेत. त्यांच्या कार्यक्रमासाठी अशा प्रकारची हरकत घेता कामा नये.

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>महापौर :–</u> मागील सभेचे दिनांक १६/२/२००९ व दिनांक २०/२/२००९ (त्यात दिनांक २१/२/२००९) रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

☑

**विषय क्र. २ :—** मागील महासभेचे दिनांक १६/२/२००९ व दिनांक २०/२/२००९ (त्यात २१/२/२००९ ) रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नाव : श्री. रामसागर यादव
अनुमोदकाचे नाव : श्री. जीवन इदनानी

महासभा ठराव क्र. ६६ अ — दिनांक : २०/२/२००९

ही महासभा महापालिका सचिवांनी प्रस्तुत केलेल्या सर्वसाधारण महासभेचे दिनांक १६/२/२००९ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ३३ व दिनांक २०/२/२००९ (त्यात २१/२/२००९ ) रोजीच्या पृष्ठ क्र. १ ते ८८ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

एकमताने

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. २ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. २:—** दिनांक १/४/२००९ पासुन निवृत्त होणा—या आठ स्थायी समिती सदस्यांच्या जागी आठ सदस्यांची नेमणूक करणे.

---

सदस्य श्री. राजु जग्यासी :—मा. महापौरजी, संख्याबळाच्या आधारावर स्थायी समितीमध्ये सदस्यांची नेमणूक केली पाहिजे. याबाबतची माहिती घेण्यासाठी आयुक्त साहेबांनी शासनास पत्र लिहिले होते. त्याबद्दल सभागृहास माहिती दिली तर बरे होईल. आपण ते जे पत्र लिहिले होते ते लिहिण्यासाठी कुण्या राजकिय पक्षाने सांगितले होते की बसल्या बसल्या आपल्या मनामध्ये असा विचार आला की याबाबत आपण शासनाकडुन मार्गदर्शन घेतले पाहिजे. याबाबतीत शासनाकडुन काय उत्तर आले आहे? त्याबद्दल सभागृहास माहिती दयाल तर बरे होईल. आपण ते जे पत्र लिहिले होते ते लिहिण्याचे कारण काय होते ते सभागृहास सांगितले तर बरे होईल.

महापालिका सचिव :—मा. महापौरांच्या आदेशानुसार सांगु इच्छितो की, आपण आता जो प्रश्न विचारला आहात, त्याचे उत्तर गोषवा—यामध्ये स्वंयस्पष्ट आहे. कारण काय आहे वगैरे सर्व गोषवा—यामध्ये लिहिलेले आहे. त्याव्यतिरिक्त या सभागृहास मी माहिती देवु इच्छितो की, २० ऑक्टोंबर रोजी मिरा—भाईंदर महानगरपालिकेस शासनाकडुन याबाबतीत एक मार्गदर्शन पत्र पाठविण्यात आले होते. त्यामध्ये ब—याचशा मुद्दयांचे स्पष्टीकरण करण्यात आले होते. त्यानुसार आपल्या येथे सुध्दा याबाबतीत कायदेशीर अडचण होती. त्याबाबतीत खुलासा घेण्यासाठी शासनास पत्र पाठविण्यांत आले होते जेणेकरुन कुणावरही अन्याय होवू नये यासाठी.

सदस्य श्री. राजु जग्यासी :—मी आपणाकडुन हे जाणुन घेवु इच्छितो की, याबाबत उल्हासनगर महानगरपालिकेच्या आयुक्तांनी शासनास पत्र पाठविले आहे. ते पत्र कुणाच्या माहितीसाठी पाठविण्यात आले आहे? किंवा कुण्या पक्षाने अशी मागणी केली होती? किंवा मिरा—भाईंदर महानगरपालिकेने आपणांस असे

काही पत्र पाठविले होते की, आपण आम्हांस पत्र  पाठवा.  याबाबतीत मी आयुक्त साहेबांकडुन माहिती घेवु इच्छितो की, ते पत्र पाठविण्याची आवश्यकता काय होती?  त्याचा जरा सभागृहासमोर खुलासा केला तर बरे होईल.

<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):–</u>माझ्या मते महत्वपुर्ण विषयांबाबतीत महापालिकेच्या वतीने जो काही पत्र व्यवहार होतो तो आयुक्तांच्या स्वाक्षरीने होतो, दुसरे असे की, महापालिकेच्या एखादया विभागाकडुन जर एखादया विषयावर खुलाश्याची मागणी करण्यात आली असेल तर त्याबाबतीत शासनाकडुन फक्त स्पष्टीकरण मागविण्यात आलेले आहे.  एखादया संचिकेवर जी काही कार्यवाही करायची असते त्यामध्ये काही गुप्त असे काही नसते.  एखादया विषयाबाबतीत टिप्पणी सादर केली जाते आणि त्यानुसार आम्ही पत्र पाठवितो. त्यामध्ये पक्षीय असा काही विषय नाही.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>आयुक्त साहेब, आपण शासनाकडुन खुलासा मागविला आहे त्याबद्दल आम्हांस काही हरकत नाही.  माझा केवळ एवढाच प्रश्न आहे की, आपण तो जो खुलासा मागविला आहे तो मागविण्याची आवश्यकता का पडली?  आपण आयुक्त आहात, शासनाकडे पत्रव्यवहार करु शकतात त्याबाबतीत आमची काही हरकत नाही व शासनाकडुन माहिती घेणे हा आपला अधिकार आहे.  त्याची आवश्यकता का पडली एवढेच मी जाणुन घेवु इच्छितो.

<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):–</u>एखादया विभागाकडुन जेव्हा असा काही प्रस्ताव येतो की, या विषयाबाबत शासनाकडुन माहिती घेतली पाहिजे त्यानुसार ही माहिती घेण्यात आलेली आहे.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:–</u>कुणाकडुन?

<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):–</u>विभागाकडुन जेव्हा असा काही प्रस्ताव येतो की, या विषयाबाबत शासनाकडुन मार्गदर्शन घेतले पाहिजे.  त्यानुसार मार्गदर्शन घेण्यात आलेले आहेत.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:–</u>क्षमा करा, कुणाकडुन?  मार्गदर्शन घेतले पाहिजे असा प्रस्ताव कुणाकडुन आला? ही माहिती घेण्याची आवश्यकता का पडली?

<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):–</u>आवश्यकता काय होती?  हा मुद्दा चर्चेचा होवू शकतो किंवा नाही याबाबत मा. महापौरांनी निर्णय घ्यावा अशी मी त्यांना विनंती करतो.  २० ऑक्टोंबर रोजी शासनाकडुन पत्र आले होते. त्यावर विभागाची अशी धारणा आहे की, यावर शासनाचे मार्गदर्शन घेतले पाहिजे.  विभागाचा प्रस्ताव लक्षात घेता शासनाकडुन मार्गदर्शन मागविण्यात आले आहे.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:–</u>मा. आयुक्त साहेब, आपणांस व मा. महापौरांना सुध्दा अत्यंत आदरपुर्वक सांगु इच्छितो की, दोन तीन वर्षापासुन विरोधी पक्ष नेत्याचा मुद्दा चालु आहे. जे लोक सत्तेत बसले आहेत त्याच लोकांनी विरोधी पक्ष नेत्याचे पद सुध्दा घेतले आहे.  त्याबाबत शासनाकडुन मार्गदर्शन घेण्याची कधी आवश्यकता पडली नाही आणि आता या विषयाबाबत आपण मार्गदर्शन घेत आहात?  ठिक आहे.

<u>महापालिका सचिव :–</u>कृपया सर्व गटनेत्यांनी आपापले प्रस्ताव दयावेत.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>मा. महापौरजी, महासभेपुढे जो गोषवारा पाठविण्यात आलेला आहे, त्यामध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या सदस्यांची संख्या लक्षात न घेता प्रशासनाने आपलेच मत तयार केले आहे.  राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे निवडुन आलेले नगरसेवक १६ आहेत ७६ सदस्यामधून ८ सदस्य निवडायचे असल्याने ७६ भागीले ८ बरोबर ९.५ येतात ही संख्या पुर्णांकात १० होते.आमचे १६ सदस्य असल्याने अपुर्णाकातील संख्या बल विचारात घेतले तर त्यानुसार आमच्या दोन सदस्यांना स्थायी समितीत घेतले पाहिजे. दोन ऐवजी फक्त एकच सदस्य घेतला जाईल असे आपण गोषवा–यामध्ये दर्शविले आहे.

<u>महापालिका सचिव :–</u>ही एकच जी संख्या आहे ती शासनाने दिलेल्या मार्गदर्शनानुसार आहे.  त्यानुसार शासनाने जे मार्गदर्शन दिलेले आहे त्या पत्राची छायांकित प्रत आपणांस दिलेली आहे.  शासनाने मिरा–भाईंदर महानगरपालिकेस लिहिलेल्या पत्राची छायांकित प्रत दिलेली आहे.  शासनाने पुणे महानगरपालिकेस दिलेल्या

स्पष्टीकरणाबाबतची प्रत आपणांस दिलेली आहे. शासनाच्या या खुलाश्यानुसार हा गोषवारा तयार करण्यात आलेला आहे.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>परंतु मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१ अ नुसार जी नैमत्तिक रिक्त पदे भरावयाची असतात, त्याबाबतीत स्पष्टपणे असे लिहिले आहे की, जेवढी पदे रिक्त होतात तेवढी पदे भरण्यासाठी आपणांस निवडणूक घ्यायची आहे. आपणांस नेमणूक करायची आहे. व त्यानुसार राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीची १६ सदस्य संख्या लक्षात घेता स्थायी समितीमध्ये आमचे दोन सदस्य गेले पाहिजेत. १६ चे संख्याबळ लक्षात घ्यायचे आहे असे कलम ३१ अ मध्ये कुठेच लिहिलेले नाही. त्यामध्ये स्पष्टपणे लिहिले आहे की, रिक्त असलेली पदे भरण्याबाबतीत संख्याबळ लक्षात घेतले पाहिजे.

<u>महापालिका सचिव :–</u>हाच मुद्दा होता ज्या बाबतीत शासनाकडुन खुलासा मागविण्यात आला होता. भरावयाच्या आठ सदस्यांच्या जागा लक्षात घेवुन संख्याबळ ठरवायचे आहे. एकुण १६ पदांच्या जागा लक्षात घेवुन संख्याबळ ठरवायचे आहे? व कलम ३१ अ चा पोटकलम ३ मध्ये असे लिहिले आहे की, यामध्ये जर काही अडचण असेल तर महानगरपालिका शासनाकडुन मार्गदर्शन घेवु शकते. व शासनाच्या खुलाश्यानुसारच आम्ही याकामी पुढील कार्यवाही करत आहोत. जर आपणांस शासनाचा खुलासा मान्य नसेल तर आपण म्हणत आहात ते बरोबर आहे. आणि जर शासनाचा खुलासा मान्य असेल तर त्यानुसारच चालावे लागेल.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>आपण, आयुक्त साहेबांनी शासनास जे पत्र लिहिले आहे त्यामध्ये सुध्दा मागील वर्षी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीला दोन जागांचा फायदा झाला आहे असे लिहिले आहे. याचा अर्थ असा आहे की, प्रशासनाने अगोदरच आपले मत तयार करुन ठेवले होते.

<u>महापालिका सचिव :–</u>आम्ही शासनास जे पत्र लिहिले आहे त्यामध्ये सर्व पक्षांची वस्तुस्थिती दर्शविली आहे. कुण्या एका पक्षाची वस्तुस्थिती दर्शविली नाही. सर्व पक्षांची वस्तुस्थिती दर्शविली आहे त्यानुसार कुणाचा फायदा होत आहे, कुणाचे नुकसान होत आहे. काय काय परिणाम होती हे सर्व लिहिले आहे आणि वस्तुस्थिती दर्शविली आहे. आपण जर म्हणत असाल की त्यामध्ये वस्तुस्थिती दर्शविली नाही तर त्याबाबतीत उत्तर देण्यास आम्ही तयार आहेत.

सर्व पक्षांच्यावतीने गटनेत्यांनी पत्र दिलेले आहे.

**आरपीआय पक्षाच्या वतीने** ज्यांचे नाव सूचीत केले आहे

१. श्रीमती पंचशिला नाना पवार

**भाजपा पक्षाच्या वतीने** दोन नावे सूचीत केली आहेत.

१. श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी

२. श्रीमती जया प्रकाश माखिजा

**राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने** ज्यांचे नाव सूचीत केले आहे त्यांचे नाव आहे,

१. श्री. रविंद्र दशरथ बागुल

**लोकभारती पक्षाच्या वतीने** दोन नावे सूचीत केली आहेत.

१. श्री. दत्तात्रय नाना पवार

२. श्री. दिलीपकुमार जग्यासी

ठिक आहे? माफ करा, शिवसेना सदस्यांची नावे पुकारण्याचे राहुन गेले त्याबद्दल क्षमा करा.

**शिवसेनेच्या पक्षाच्या वतीने** दोन नावे सूचीत केली आहेत.

१. श्री. रमेश चव्हाण

२. श्रीमती मिनाताई सोनेजी (सोंडे)

ठिक आहे? पास? सर्व संमतीने?

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>महापौर :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र. २:– दि. १/४/२००९ पासून निवृत्त होणाऱ्या ८ स्थायी समिती सदस्यांच्या <u>जागी ८ सदस्यांची नेमणूक करणे.</u>**

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे ८ सदस्य ०१ एप्रिल, २००९ पासून आळीपाळीने निवृत्त होणार आहेत त्यांची नावे व पक्ष इत्यादीचे विवरण खालीलप्रमाणे.............

| अ.क्र. | नाव | पक्ष | संख्या |
|---|---|---|---|
| १ | श्री. गोविंदराम लुंड | लोकभारती | २ |
| २ | श्री. सुरेश जाधव | लोकभारती | |
| ३ | श्री. राजेश वानखेडे | शिवसेना | १ |
| ४ | श्री. नरेंद्रकुमार ठाकुर | राष्ट्रवादी कॉग्रेस | ३ |
| ५ | श्री. संजय बठिजा | राष्ट्रवादी कॉग्रेस | |
| ६ | श्रीमती सुजाता रिजवानी | राष्ट्रवादी कॉग्रेस | |
| ७ | श्री. किशोर जग्यासी | भारतीय जनता पार्टी | १ |
| ८ | श्री. नरेंद्र दवणे | म.न.से | १ |

स्थायी समितीचे उर्वरित ८ सदस्यांची नावे व त्यांचा पक्ष इत्यादीची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | पक्ष | संख्या |
|---|---|---|---|
| १ | श्री. रामरख्यानी मोहनदास | लोकभारती | २ |
| २ | श्री. जीवन इदनानी | लोकभारती | |
| ३ | श्री. मोहन साधवानी | भारतीय राष्ट्रीय कॉग्रेस | १ |
| ४ | श्री. राजु जग्यासी | राष्ट्रवादी कॉग्रेस | २ |
| ५ | श्री. गणपत एडके | राष्ट्रवादी कॉग्रेस | |
| ६ | श्री. जग्यासी हरेश | भारतीय जनता पार्टी | १ |
| ७ | श्री. पाटील प्रधान | शिवसेना | २ |
| ८ | श्री. यादव रामसागर | शिवसेना | |

माहे मार्च २००९ च्या सभेत निवृत्त होणा—या सदस्यांच्या जागी नविन निवडावयाच्या ८ जागांच्या तुलनेत सदस्यांच्या नियुक्तीचा पक्षनिहाय प्रमाणशिर प्रतिनिधीत्व विवरण तक्ता खालीलप्रमाणे असेल.

| लोकभारती | शिवसेना | राकॉपा | भाजपा |
|---|---|---|---|
| २ | २ | २ | १ |
| **कॉग्रेस** | **आरपीआय** | **मनसे** | **एकुण** |
| १ | ० | ० | ८ |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ३१ (अ) मधील तरतुदी अनुसार माहे मार्च २००९ मध्ये महापालिकेद्वारे स्थायी समितीवर केली जाणारी ८ पालिका सदस्यांची नियुक्ती मान्यता प्राप्त पक्षाचे अथवा नोंदणीकृत पक्षाचे किंवा गटाचे ८ पदासाठीचे तौलनिक संख्याबळ विचारात घेण्यांत येईल. त्यामुळे आर.पी.आय व म.न.से या दोन्ही गटाचे प्रतिनिधींना प्रमाणशीर प्रतिनिधीत्व मिळणार नाही. सार्वत्रिक निवडणूकीनंतर दिनांक ५/४/२००७ रोजी जेव्हा एकूण १६ सदस्यांची स्थायी समितीवर नियुक्ती करण्यांत आली होती. तेव्हा १६ पदांची संख्या लक्षात घेवून तौलनिक संख्याबळानुसार खालीलप्रमाणे पक्षनिहाय रचना करण्यांत आली होती.

| लोकभारती | शिवसेना | राकॉपा | भाजपा |
|---|---|---|---|
| ४ | ४ | ३ | २ |
| **आरपीआय** | **कॉग्रेस** | **मनसे** | **एकुण** |
| १ | १ | १ | १६ |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे कलम २० अनुषंगाने स्थायी समितीवर निवडून आल्या नंतर एक वर्षात पोटकलम ३ अन्वये स्थायी समितीने चिठ्ठी काढुन दिनांक ७/३/२००८ च्या **ठराव क्र. १५७** अन्वये पक्षनिहाय पुढील ८ सदस्यांना निवृत्त घोषित केले.

| अ.क्र. | नाव | पक्ष | संख्या |
|---|---|---|---|
| १ | श्री. सुपाळे विजय | शिवसेना | ३ |
| २ | श्री. दिलीप गायकवाड | शिवसेना | |
| ३ | श्रीमती जयश्री सुर्वे | शिवसेना | |
| ४ | श्रीमती निलम रावत | लोकभारती | २ |
| ५ | श्री. जीवन इदनानी | लोकभारती | |
| ६ | श्रीमती लता निकम | आरपीआय | १ |
| ७ | श्री. रामचंद्र पारवानी | भारतीय जनता पार्टी | १ |
| ८ | श्रीमती इंदिरा उदासी | भारतीय राष्टीय कॉंग्रेस | १ |

वरील आठ रिक्त जागी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ३१ (अ) च्या तरतुदी अनुसार ८ सदस्यांची संख्या लक्षात घेवून दिनांक २६/३/२००८ च्या ठराव क्र. ७२ अन्वये पक्षनिहाय खालील पालिका सदस्यांची नेमणुक करण्यांत आली होती.

| अ.क्र. | नाव | पक्ष | संख्या |
|---|---|---|---|
| १ | श्री. जीवन इदनानी | लोकभारती | २ |
| २ | श्री. मोहन रामरख्यानी | लोकभारती | |
| ३ | श्री. मोहन साधवानी | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | १ |
| ४ | श्री. हरेश जग्यासी | भारतीय जनता पार्टी | १ |
| ५ | श्री. रामसागर यादव | शिवसेना | २ |
| ६ | श्री. प्रधान पाटील | शिवसेना | |
| ७ | श्री. राजु जग्यासी | राष्ट्रवादी कॉंग्रेस | २ |
| ८ | श्री. गणपत एडके | राष्ट्रवादी कॉंग्रेस | |

यामुळे शिवसेनेच्या निवृत्त झालेल्या ३ सदस्यांच्या जागी नव्याने २ सदस्य, लोकभारती पक्षाच्या निवृत्त झालेल्या २ सदस्यांच्या जागी नव्याने २ सदस्य, राष्ट्रवादी कॉंगेस पक्षाच्या निवृत्त नझाल्याने २ सदस्यांच्या जागी नव्याने २ सदस्य, भाजपाच्या निवृत्त झालेल्या १ सदस्याच्या जागी नव्याने १ सदस्य, राष्ट्रीय कॉंग्रेसच्या निवृत्त झालेल्या १ सदस्यांच्या जागी नव्याने १ सदस्य, आरपीआयच्या निवृत्त झालेल्या १ सदस्याच्या जागी कोणताही सदस्य नामनिर्देशित करण्यात आलेला नाही.

| अ.क्र. | पक्ष | निवृत्त झालेल्या सदस्यांची संख्या | नव्याने नियुक्त झालेल्या सदस्यांच्या संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | शिवसेना | ३ | २ | १ जागेचे नुकसान |
| २ | लोकभारती | २ | २ | |
| ३ | आरपीआय | १ | — | १ जागेचे नुकसान |
| ४ | भाजपा | १ | १ | |
| ५ | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | १ | १ | |
| ६ | राष्ट्रवादी कॉंग्रेस | —— | २ | २ जागांचा फायदा |

८ सदस्यांच्या रिक्त जागेवर नियुक्ती करावयाची असल्यास पदाची संख्या लक्षात घेता पक्षनिहाय तौलनिक संख्या बळानुसार आर.पी.आय व म.न.से गटाच्या पालिका सदस्यांस स्थायी समितीमध्ये प्रमाणशिर प्रतिनिधीत्व ''शुन्य'' येते म्हणून माहे मार्च २००८ मध्ये निवृत्त झालेल्या आरपीआय गटाचे स्थायी समिती सदस्यांच्या जागी त्या पक्षाचे सदस्यांचे नामनिर्देशन करण्यात आले नाही. तसेच ८ रिक्त पदाची संख्या लक्षात घेता माहे मार्च २००९ मध्ये निवृत्त होणा—या म.न.से गटाच्या सदस्यांचे सुध्दा प्रमाणशिर प्रतिनिधीत्व शुन्य असेल. यामुळे १ एप्रिल, २००९ पासुन ते ४ एप्रिल २०१२ पर्यंतच्या उर्वरित कालावधीसाठी आर.पी.आय व म.न.से गटाचा एकही पालिका सदस्य नेमता येणार नाही. तसेच माहे मार्च २००९ मध्ये स्थायी समितीवर

केल्या जाणा—या ८ पालिका सदस्यांच्या नियुक्तीमुळे राष्ट्रवादी कॉंग्रेस व भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाला आर.पी.आय व म.न.से.च्या जागी प्रत्येकी एक—एक जागेचा फायदा मिळेल.

नुकतेच शासनाकडुन दिनांक २० ऑक्टोंबर २००८ रोजीच्या पत्राद्वारे असे कळविण्यात आले आहे की, **''कोणत्याही समितीच्या कोणत्याही कारणामुळे रिक्त होणा—या जागांवर निवृत्त झालेला सदस्य ज्या मान्यता प्राप्त पक्षाचा/नोंदणीकृत पक्षाचा, गटाचा, आघाडीचा किंवा फ्रंटचा असेल त्याच मान्यता प्राप्त पक्षाच्या नोंदणीकृत पक्षाच्या, गटाच्या, आघाडीच्या किंवा फ्रन्टच्या सदस्यास नामनिर्देशित करणे अपेक्षित आहे. मात्र अशा वेळेस पुर्वीच्या तुलनेने पक्षाच्या/गटाच्या तौलनिक संख्येत बदल झालेला नसावा.''**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ३१ (अ) च्या तरतुदी अनुसार रिक्त पदाची संख्या लक्षात घेवून तौलनिक संख्याबळानुसार प्रमाणशिर प्रतिनिधीत्व दयायचे आहे. परंतु रिक्त होणा—या जागांवर पुर्वी नियुक्त झालेल्या पक्षाच्या सदस्याची नेमणुक करायची असे स्पष्टपणे दिसुन येत नाही. म्हणुन कायदेशीर अडचण निर्माण झाली होती.

यापूर्वी महापालिकेने ८ रिक्त जागांची संख्या लक्षात घेवुन स्थायी समितीवर केलेल्या नेमणुकीमुळे आर. पी.आय व म.न.से गटाचे नुकसान व भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस व राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा फायदा झाला असून त्यामध्ये फेरफार करणे व आर.पी.आय व म.न.से या पक्षांना स्थायी समितीमध्ये प्रमाणशीर प्रतिनिधीत्व देणे शक्य आहे किंवा कसे ? कारण मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१ (अ) पोटकलम (३) अन्वये स्थायी समितीमध्ये नामनिर्देशित करावयाच्या सदस्यांच्या संख्येच्या बाबतीत कोणताही प्रश्न उद्‌भवल्यास त्याबाबत महानगरपालिकेचा निर्णय अंतिम असेल, अशी तरतुद आहे.

सबब, शासनाने मिरा—भाईदर महानगरपालिकेस दिलेल्या स्पष्टीकरणा अनुसार स्थायी समितीची १६ सदस्यांची संख्या लक्षात घेता पक्षनिहाय प्रमाणशिर प्रतिनिधित्व देण्यासाठी कार्यवाही करणे किंवा निवृत्ती नंतर रिक्त झालेल्या जागांवर ८ सदस्यांची संख्या लक्षात घेवून दिलेले प्रमाणशिर प्रतिनिधित्व अंतिम आहे किंवा कसे? याबाबत आयुक्तांनी शासनास दिनांक २९/१/२००९ रोजी पत्रान्वये मार्गदर्शन मिळण्याकामी विनंती केली होती. शासनाने मिराभाईदर महानगरपालिकेस जे मार्गदर्शन दिले आहे. त्याच धर्तीवरचे मार्गदर्शन आम्हास अपेक्षित आहे. दिनांक ५/४/२००७ रोजी स्थायी समितीच्या १६ सदस्यांची नेमणूक बलाबलानुसार करण्यांत आली होती. सदरहु बलाबल कायम नाही.

कारण मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३१ (अ) अनुसार जेव्हा १६ पदे रिक्त होती. त्यावेळी आर.पी.आय व म.न.से गटाच्या प्रत्येकी १—१ सदस्यास प्रमाणशिर प्रतिनिधीत्व मिळाले होते. दरम्यान लोकभारतीचे समर्थक अपक्ष नगरसेवक श्री. हिरो केवलरामानी यांनी राजीनामा दिल्यानंतर लोकभारती पक्षाचे तौलनिक संख्याबळ १८ वरुन १७ वर आले. पोटनिवडणूकीत श्री. हिरो केवलरामानी यांच्या जागी श्री. हरेश जग्यासी हे भाजपाचे सदस्य निवडून आल्याने भाजपाचे तौलनिक संख्याबळ ११ वरुन १२ झाले. तसेच प्रभाग क्र. ४६ मधुन कॉंग्रेस पक्षाचे श्री. सुंदर मंगतानी हे पोटनिवडणूकीत निवडून आल्याने कॉंग्रेस पक्षाचे तौलनिक संख्याबळ ५ वरुन ६ असे झाले. जेव्हा स्थायी समितीवर १६ सदस्यांची नियुक्ती करण्यात आली होती तेव्हा निवडून आलेल्या पालिका सदस्यांची संख्या ७५ होती व त्याआधारे प्रत्येक पक्षाचे प्रमाणशीर प्रतिनिधीत्व खालीलप्रमाणे होते...

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | लोकभारती | १८ / —— X १६ / ७५ | = ३.८४ = ३१ | (५) | कॉंग्रेस | ५ / —— X १६ / ७५ | = १.०६ . = १. |
| (२) | शिवसेना | १७ / —— X १६ / ७५ | = ३.६३ = ३१ | (६) | आरपीआय | ५ / —— X १६ / ७५ | = १.०६ = १. |
| (३) | रा.का.पा. | १६ / —— X १६ / ७५ | = ३.४१ = ३ | (७) | म.न.से. | २ / —— X १६ / ७५ | = ०.४२ = १. |
| (४) | भाजपा | ११ / —— X १६ / ७५ | = २.३४ = २ | (८) | अपक्ष | १ / —— X १६ / ७५ | = ०.०२ |

..

| लोकभारती | शिवसेना | राष्ट्रवादी कॉंग्रेस | भाजपा | कॉंग्रेस | आरपीआय | मनसे | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ४ | ३ | २ | १ | १ | १ | १६ |

पोटनिवडणूकी नंतर तौलनिक संख्याबळात बदल झाल्याने जर एकुण १६ सदस्यांच्या तुलनेत ठरविल्यास स्थायी समितीवर तौलनिक संख्याबळानुसार पक्षनिहाय प्रमाणशीर प्रतिनिधीत्व खालीलप्रमाणे असेल.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | लेकभारती | १७ ——X १६ ७६ | ३.५७=३१=४ | (५) | कॉंग्रेस | ६ —— X १६ ७६ | १.२६ = १ |
| (२) | शिवसेना | १७ ——X १६ ७६ | ३.५७=३१=४ | (६) | आरपीआय | ५ —— X १६ ७६ | १.०५ = १ |
| (३) | रा.का.पा. | १६ ——X १६ ७६ | ३.३६ = ३ | (७) | म.न.से. | २ —— X१६ ७६ | ०.४२ = ० |
| (४) | भाजपा | १२ ——X १६ ७६ | २.५२ =२१=३ | (८) | अपक्ष | १ —— X१६ ७६ | ०.२१ = ० |

| लोकभारती | शिवसेना | राष्ट्रवादी कॉंग्रेस | भाजपा | कॉंग्रेस | आरपीआय | मनसे | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | ४ | ३ | ३ | १ | १ | ० | १६ |

सबब, शासनाच्या मार्गदर्शनानुसार दिनांक ५/४/२००७ रोजी स्थायी समितीवर नेमलेल्या १६ सदस्यांच्या तुलनेत पक्षाच्या/गटाच्या तौलनिक संख्येत बदल झाला असून पक्षाचे बलाबला अनुसार स्थायी समितीच्या एकूण १६ सदस्यांच्या तुलनेत ठरविण्यास व रिक्त झालेल्या जागांवर खालील पक्षाच्या सदस्यास नामनिर्देशित करणे अपेक्षित आहे. जेणेकरुन बलाबलाअनुसार प्रतिनिधीत्व देण्याबाबतच्या तरततुदीची पूर्तता होवू शकेल.

| लोकभारती | शिवसेना | राष्ट्रवादी कॉंग्रेस | भाजपा | आरपीआय | कॉंग्रेस | मनसे | अपक्ष | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | २ | १ | २ | १ | ० | ० | ० | ८ |

म्हणुन योग्य त्या कायदेशिर निर्णयास्तव महासभेपुढे प्रस्तावित.

.

<u>महासभा ठराव क्र:</u> ६७ <u>दिनांकः—२०/३/२००९</u>

सुचकाचे नाव :— श्री. तुलसीदास वसिटा
अनुमोदकाचे नाव :— श्री. सतिश चहाळ

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार खालील आठ सदस्यांची स्थायी समितीवर नेमणूक करीत आहे.

१. श्री. दत्तात्रय नारायण पवार

२. श्री. दिलीपकुमार जग्यासी

३. श्री. रमेश महादेव चव्हाण

४. श्रीमती मिनाताई सोनेजी (सोंडे)

५. श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी

६. श्रीमती जया प्रकाश माखिजा

७. श्री. रविंद्र दशरथ बागुल

८. श्रीमती पंचशिला नाना पवार

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

सदस्य श्री. राजु जग्यासी :–मा. महापौरजी, विरोधी पक्ष नेत्याबाबत सुध्दा शासनाकडुन काही पत्र आले आहेत. त्याची सभागृहास माहिती दिले तर बरे होईल.

महापालिका सचिव :–त्या पत्राची प्रत सर्व सन्माननिय सदस्यांना आताच्या आता दिली जाईल.

सदस्य श्री. राजु जग्यासी :–मा. महापौरजी, उप–महापौरजी, मी एक विनंती करु इच्छितो की, आमच्या सिंधी समाजाचे एक फार मोठे पर्व येणा–या २८ तारखेला चेटीचंदची महायात्रा संपन्न होणार आहे त्यानिमित्त २७ तारखेला मोठया धुमधडयाक्यात रथ यात्रा काढली जाईल त्याबाबतीत मा. महापौर व उप–महापौरांना विनंती करेल की, आपल्या शहरामध्ये जेवढे काही सिंधी संत, महात्मे आणि इतरही राष्ट्रपुरुषांचे पुतळे आहेत, त्यांची त्या दोन तीन दिवसामध्ये योग्य त्या प्रकारे साफसफाई केली जावी व त्यांना पुष्पहार घालण्यात यावे. जेणेकरुन सणांच्या दिवसांमध्ये चांगले दिसेल. याबाबत मा. महापौर व उप–महापौरांनी अधिनिर्णय दिला तर बरे होईल.

सदस्या श्रीमती जयश्री सुर्वे :–मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, मागील एका महासभेत मी लक्षवेधी सूचना मांडली होती. त्या लक्षवेधी सूचनेचे काय झाले? रस्ता रुंदीकरण करा असे मा. महापौरांचे आदेश होते. याबाबतीत आयुक्तांनी उत्तर दयावे. आयुक्त साहेब, उत्तर दया.

सदस्य श्री. सतिश चहाळ :–स्थायी समितीवर नेमणुक झाल्यावर आमच्या सदस्यांस अतिशय आनंद झाला आहे. पेढे वाटप करुन ते आनंद व्यक्त करु इच्छित आहेत. त्यासाठी सभागृहात पेढे वाटण्याकामी अनुमती दिली जावी.

महापालिका सचिव :–सिमला येथिल प्रशिक्षणासाठी जे सदस्य जावु इच्छित होते त्यांच्याबाबतीत सांगु इच्छितो की, लोकसभा निवडणुकांमुळे प्रशिक्षणाचा हा कार्यक्रम अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थाकडुन रद्द करण्यात येणार आहे.

कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ४.४१ वाजता महापौर श्रीमती निर्मले विद्या विजय यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

''स्थायी समिती सभापती'' पदासाठी वैधरित्या नामनिर्देशन पत्र दाखल केलेल्या उमेदवारांची यादी.

दिनांक:—२४/४/२००९

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | सुचकाचे नाव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|---|
| १. | श्री. रविंद्र दशरथ बागुल | श्री. राजु जग्यासी | श्री. गणपत एडके |
| २. | सौ.जया प्रकाश माखिजा | श्री. इदनानी राजु (जीवन) चंद्रभान | श्री. रामसागर जनार्दन यादव |
| ३. | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | श्री.हरेश परमानंद जग्यासी | श्री. प्रधान धर्मा पाटील |

(सुब्बाराव पाटील)
अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग
तथा
पीठासीन अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

## ''स्थायी समिती सभापती '' पदाची निवडणूक लढविणा—या उमेदवारांची अंतिम यादी.

दिनांक:—२४/४/२००९

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १. | श्री. बागुल रविंद्र दशरथ |
| २. | सौ. मखिजा जया प्रकाश |

(सुब्बाराव पाटील)
अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग
तथा
पीठासीन अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका– विशेष सभा
शुक्रवार दिनांक २४/४/२००९

मी स्थायी समिती सभापती पदाचे उमेदवार **श्री. बागुल रविंद्र दशरथ** यांना मतदान करीत आहे.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | स्वाक्षरी |
|---|---|---|
| १ | श्री. रामरख्यानी मोहनदास | |
| २ | श्री. जीवन इदनानी | |
| ३ | श्री. मोहन साधवानी | |
| ४ | श्री. राजु जग्यासी | |
| ५ | श्री. गणपत एडके | |
| ६ | श्री. जग्यासी हरेश | |
| ७ | श्री. पाटील प्रधान | |
| ८ | श्री. यादव रामसागर | |
| ९ | श्री. दत्तात्रय नारायण पवार | |
| १० | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी | |
| ११ | श्री. रमेश महादेव चव्हाण | |
| १२ | श्रीमती मिनाताई सोनेजी (सोंडे) | |
| १३ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | |
| १४ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | |
| १५ | श्री. रविंद्र दशरथ बागुल | |
| १६ | श्रीमती पंचशिला नाना पवार | |

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

(सुब्बाराव पाटील)
अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग
तथा
पीठासीन अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका— विशेष सभा

शुक्रवार दिनांक २४/४/२००९

मी स्थायी समिती सभापती पदाचे उमेदवार **सौ. माखिजा जया प्रकाश** यांना मतदान करीत आहे.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | स्वाक्षरी |
|---|---|---|
| १ | श्री. रामरख्यानी मोहनदास | |
| २ | श्री. जीवन इदनानी | |
| ३ | श्री. मोहन साधवानी | |
| ४ | श्री. राजु जग्यासी | |
| ५ | श्री. गणपत एडके | |
| ६ | श्री. जग्यासी हरेश | |
| ७ | श्री. पाटील प्रधान | |
| ८ | श्री. यादव रामसागर | |
| ९ | श्री. दत्तात्रय नारायण पवार | |
| १० | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी | |
| ११ | श्री. रमेश महादेव चव्हाण | |
| १२ | श्रीमती मिनाताई सोनेजी (सोंडे) | |
| १३ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | |
| १४ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | |
| १५ | श्री. रविंद्र दशरथ बागुल | |
| १६ | श्रीमती पंचाशिला नाना पवार | |

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

(सुब्बाराव पाटील)
अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग
तथा
पीठासीन अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका— विशेष सभा
शुक्रवार दिनांक २४/४/२००९

मी स्थायी समिती सभापती पदाच्या निवडणूक प्रक्रियेमध्ये मतदान प्रक्रियेत भाग घेत नाही:—

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | पक्षाचे नांव |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

(सुब्बाराव पाटील)
अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग
तथा
पीठासीन अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

# निकाल घोषणा

| अ.क्र. | उमेदवारांचे नाव | मतदानाची संख्या |
|---|---|---|
| १. | श्री. बागुल रविंद्र दशरथ | ४ |
| २. | सौ. माखिजा जया प्रकाश | ११ |
| एकुण मतदान संख्या – | | १५ |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम–२००७ च्या नियम–६ मधील पोटनियम–७ अन्वये पीठासीन अधिकारी म्हणून मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये स्थायी समिती सभापती पदाचे उमदेवार सौ. माखिजा जया प्रकाश यांना एकुण १५ पैकी ११ इतकी म्हणजे सर्वाधीक मते मिळाल्यामुळे त्यांची स्थायी समिती सभापती पदी रितसर निवड झाली आहे. असे मी जाहिर करतो.

दिनांक :–२४/४/२००९

स्थान :– उल्हासनगर महानगरपालिका
सभागृह

(सुब्बाराव पाटील)
अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग
तथा
पीठासीन अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः–२४/४/२००९

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २४/४/२००९ रोजीच्या स्थायी समितीचे इतिवृत्त.

१

उल्हासनगर महानगरपालिकेच्या **स्थायी समितीची** विशेष सभा शुक्रवार दिनांक २४/४/२००९ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत श्री. सुब्बाराव पाटील, अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग हे पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

| अ.क्र. | सदस्यांची नावे |
|---|---|
| १ | श्री. रामरख्यानी मोहनदास |
| २ | श्री. जीवन इदनानी |
| ३ | श्री. मोहन साधवानी |
| ४ | श्री. राजु जग्यासी |
| ५ | श्री. गणपत एडके |
| ६ | श्री. जग्यासी हरेश |
| ७ | श्री. पाटील प्रधान |
| ८ | श्री. यादव रामसागर |
| ९ | श्री. दत्तात्रय नारायण पवार |
| १० | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी |
| ११ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १२ | श्रीमती मिनाताई सोनेजी (सोंडे) |
| १३ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी |
| १४ | श्रीमती जया प्रकाश माखिजा |
| १५ | श्री. रविंद्र दशरथ बागुल |
| १६ | श्रीमती पंचशिला नाना पवार |

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. रमेश भदाणे, सहा. प्रादेशिक संचालक, न.पा.प्र., कोकण विभाग
२. श्री. समिर उन्हाळे, आयुक्त
५२. श्री. अशोककुमार रणखांब, अतिरिक्त आयुक्त
३. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
४. श्री. मिलिंद सावंत, उप–आयुक्त
५. डॉ. दिपक सावंत, उप–आयुक्त
६. श्री. अनंत कांबळे, उप मुख्य लेखा परिक्षक
७. डॉ. जी.टी. जिंदे, वैदयकीय आरोग्य अधिकारी
५३. श्री. एस.जी. खडताळे, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
८. डॉ. राजा रिजवानी, वैदयकीय अधिकारी
९. श्री. बबीश गंगारामानी, उप अभियंता, विदयुत विभाग
१०. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्री. गणेश शिंपी
२. श्रीमती नर्गिस खान

दुपारी १२.४५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>महापालिका सचिव :—</u>मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम—२००७ मधील नियम—४ अन्वये स्थायी समिती सभापती पदाच्या निवडणूकीसाठी बोलविलेल्या आजच्या या विशेष सभेच्या अध्यक्षस्थानी मा. श्री. सुब्बाराव पाटील, अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग हे आहेत.

विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

——————————————————————————————————————————————

**विषय क्र. १ :— स्थायी समिती सदस्यांमधुन एका सदस्याची सभापती पदी निवड करणे.**

<u>श्री. सुब्बाराव पाटील (पीठासीन अधिकारी):—</u>

**स्थायी समिती सभापती** पदासाठी महापालिका सचिव यांचेकडे **दिनांक** २०/४/२००९ रोजी ठरवून दिलेल्या वेळेमध्ये **३** उमेदवारांकडुन ४ नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले असून मराठी वर्णानुक्रमाणे ते पुढीलप्रमाणे आहेत:—

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १. | **श्री. पुरस्वानी जमनादास खुबचंद** |
| २. | **श्री. बागुल रविंद्र दशरथ** |
| ३. | **श्री. बागुल रविंद्र दशरथ** |
| ४. | **सौ. माखिजा जया प्रकाश** |

स्थायी समिती सभापती पदाच्या निवडणूका संबंधातील मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम—२००७ नियम—०५ (२) अन्वये, पीठासीन अधिकारी म्हणुन मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये, मी सर्व नामनिर्देशनाची छाननी केली आहे. छाननीमध्ये वैध ठरलेल्या उमेदवारांची नावे मराठी वर्णानुक्रमाने पुढीलप्रमाणे आहेत:—

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १. | **श्री. पुरस्वानी जमनादास खुबचंद** |
| २. | **श्री. बागुल रविंद्र दशरथ** |
| ३. | **सौ. माखिजा जया प्रकाश** |

वरील ३ उमेदवारांपैकी ज्या उमेदवाराला आपली उमेदवारी मागे घ्यावयाची असेल त्यासाठी १५ मिनिटांची वेळ देण्यात येत आहे. अशा उमेदवारास आपली उमेदवारी मागे घेण्यासंबंधातील विहित नमुन्यामधील अर्ज भरुन देवून आपली उमेदवारी मागे घेता येईल.

यावेळेस दुपारचे १२. वाजुन ४५ मिनिटे झाली आहेत.

आता दुपारचे १.०० वाजले आहेत. उमेदवारी मागे घेण्यासाठी देण्यात आलेली वेळ संपली आहे असे मी जाहिर करतो.

सदस्या श्रीमती पंचशिला नाना पवार हया सभागृहातून बाहेर गेल्या. 

दिलेल्या वेळेमध्ये श्री. पुरस्वानी जमनादास खुबचंद या उमेदवाराने आपली उमेदवारी मागे घेतली.

आता, स्थायी समिती सभापती पदाच्या एका जागेसाठी खालील २ उमेदवार निवडणूक रिंगणात शिल्लक राहिलेले असून त्यांची मराठी वर्णानुक्रमाने नावे पुढील प्रमाणे आहेत :—

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| **१.** | **श्री. बागुल रविंद्र दशरथ** |
| **२.** | **सौ. माखिजा जया प्रकाश** |

स्थायी समिती सभापती पदासाठी मराठी वर्णानुक्रमाने अनु. क्र. १ आणि २ च्या उमेदवारांची नांवे जाहिर करण्यात येतील. प्रत्येक उमेदवाराच्या बाजूने ज्यांना आपले मत द्यावयाचे आहे त्यांनी आपला हात वर करायचा आहे. उमेदवार निहाय तयार केलेल्या यादीमध्ये उमेदवाराला मतदान करणा—या सदस्यांच्या

नावांची नोंद घेण्यात येईल. हात वर केलेल्या प्रत्येक सदस्याच्या नावासमोर ‘‘होय’’ म्हणुन नोंद घेण्यात येईल.

loZizFke LFkk;h lferh lHkkirh inkps vuq- Ø- 1 ps mesnokj Jh- ckxqy jfoanz n'kjFk ;kaps uko iqdkj.;kar ;sr vkgs- Jh- ckxqy jfoanz n'kjFk ;kauk ernku d# bfPN.kk&;k lnL;kauh vkiyk gkr oj djkok%&

मतदान केलेल्या सदस्यांच्या नावांची नोंद पुढीलप्रमाणे जाहिर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पालिका सदस्यांचे संपूर्ण नाव |
|---|---|
| १ | श्री. मोहन साधवानी |
| २ | श्री. राजु जग्यासी |
| ३ | श्री. एडके गणपत |
| ४ | श्री. रविंद्र बागुल |

त्यानंतर स्थायी समिती सभापती पदाचे अनु. क्र. २ चे उमेदवार सौ. माखिजा जया प्रकाश यांचे नाव पुकारण्यांत येत आहे. सौ. माखिजा जया प्रकाश यांना मतदान करु इच्छिणा—या सदस्यांनी आपला हात वर करावा:—

मतदान केलेल्या सदस्यांच्या नावांची नोंद पुढीलप्रमाणे जाहिर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पालिका सदस्यांचे संपूर्ण नाव |
|---|---|
| १ | श्री. रामरख्यानी मोहनदास |
| २ | श्री. जीवन इदनानी |
| ३ | श्री. जग्यासी हरेश |
| ४ | श्री. पाटील प्रधान |
| ५ | श्री. यादव रामसागर |
| ६ | श्री. दत्तात्रय नारायण पवार |
| ७ | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी |
| ८ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| ९ | श्रीमती मिनाताई सोनेजी (सोंडे) |
| १० | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी |
| ११ | श्रीमती जया प्रकाश माखिजा |

LFkk;h lferh lHkkirh inkP;k fuoM.kdhe/;s T;k lnL;kauh ernku dsys ukgh v'kk lnL;kaP;k erkph uksan iq<hyizek.ks vkgs-

‘‘निरंक’’

आता निवडणूक प्रक्रिया संपल्याने निवडणूक लढविलेल्या प्रत्येक उमेदवाराला मतदानाद्वारे मिळालेल्या मतांची संख्या व निकाल घोषणा मी पुढीलप्रमाणे घोषित करीत आहे.

## निकाल घोषणा

| अ.क्र. | उमेदवारांचे नाव | मतदानाची संख्या |
|---|---|---|
| १. | श्री. बागुल रविंद्र दशरथ | ४ |
| २. | सौ. माखिजा जया प्रकाश | ११ |
| एकुण मतदान संख्या — | | १५ |

*मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्त्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम २००७ च्या नियम-६ मधील पोटनियम (७) अन्वये पीठासीन अधिकारी म्हणुन मला प्रदान करण्यांत आलेल्या अधिकारान्वये स्थायी समिती सभापती पदाचे उमदेवार श्रीमती जया प्रकाश माखिजा यांना एकुण १५ मतांपैकी ११ इतकी म्हणजे सर्वाधीक मते मिळाल्यामुळे त्यांची स्थायी समिती सभापती पदी रितसर नेमणूक झाली आहे असे मी जाहिर करतो.*

सही ..
(सुब्बाराव पाटील)
अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग
तथा
पीठासीन अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

दिनांक :—२४/४/२००९

स्थान :— उल्हासनगर महानगरपालिका सभागृह

सत्य प्रत

(प्रकाश पं कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

## ''परिवहन समिती सभापती'' पदासाठी वैधरित्या नामनिर्देशन पत्र दाखल केलेल्या उमेदवारांची यादी.

दिनांकः—२४/४/२००९

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | सुचकाचे नाव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|---|
| १. | श्री. सुनिल साहेबराव गंगवानी | श्री. दिलीप लालवानी | श्री. कृष्णा जी. पुजारी |

(सुब्बाराव पाटील)
अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग
तथा
पीठासीन अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

# निकाल घोषणा

महापालिका सचिवांनी दिनांक ८/४/२००९ रोजी काढलेल्या सूचने अन्वये परिवहन समिती च्या सर्व सदस्यांना परिवहन समिती सभापती पदाचा निवडणूक कार्यक्रम कळविण्यांत आला होता. त्या अनुषंगाने दिनांक २०/४/२००९ रोजी एकमेव उमेदवार श्री. सुनिल साहेबराव गंगवानी यांनी आपले नामनिर्देशनपत्र विहीत कालावधीत दाखल केले होते.

परिवहन समिती सभापती पदासाठी एकमात्र वैध नामनिर्देशन दाखल करण्यात आले असून मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम—२००७ च्या नियम—६ मधील पोटनियम—१ अन्वये पीठासीन अधिकारी म्हणून मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये परिवहन समिती सभापती पदाचे उमदेवार *श्री. सुनिल साहेबराव गंगवानी* हे **बिनविरोध** निवडून आल्याचे जाहिर करतो.

दिनांक :—२४/४/२००९

स्थान :— उल्हासनगर महानगरपालिका सभागृह

(सुब्बाराव पाटील)
अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग
तथा
पीठासीन अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—३०/५/२००९

### उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. ३०/५/२००९ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

२

उल्हासनगर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण महासभेची सभा शनिवार दिनांक ३०/५/२००९ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत श्री. विश्वास पाटील, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर हे पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. व खाली दर्शविलेले सन्मानिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

| १. महापौर—– श्रीमती निर्मले विद्या विजय | | | |
|---|---|---|---|
| २ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | ४२ | श्री. कुमार उत्तमचंद आयलानी |
| ३ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | ४३ | श्री. लालबिहारी बुझारत यादव |
| ४ | श्री. गायकवाड दिलीप | ४४ | श्रीमती पंचशिला नाना पवार |
| ५ | श्रीमती संगीता राजेश कंडारे | ४५ | श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी |
| ६ | श्री. रविंद्र दशरथ बागूल | ४६ | श्रीमती करोतीया मालती राधाचरण |
| ७ | श्री. रामसागर जनार्दन यादव | ४७ | श्री. मंगतानी सुंदर आसनदास |
| ८ | श्रीमती निलम प्रेमसिंग रावत | ४८ | श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण |
| ९ | श्री. मोरे भानजी भिकारी | ४९ | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| १० | श्री. दत्तात्रय नारायण पवार | ५० | श्रीमती बोडारे वसुधा धनंजय |
| ११ | श्रीमती चौधरी राजश्री राजेंद्र | ५१ | कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल |
| १२ | श्री. विजय खंडु सुपाळे | ५२ | श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे |
| १३ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ५३ | श्री. शेखर केशव यादव |
| १४ | श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान | ५४ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १५ | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी | ५५ | श्रीमती सुमन गजानन शेळके |
| १६ | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज) | ५६ | श्री. प्रशांत किसनराव धांडे |
| १७ | श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी | ५७ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १८ | श्रीमती सुजाता रमेश रिझवानी | ५८ | श्रीमती मनसुलकर शिला सुभाष |
| १९ | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद | ५९ | श्री. किशोर जग्यासी |
| २० | श्री. राजू जग्यासी | ६० | श्रीमती चेनानी ज्योती रमेश |
| २१ | श्री. राम (चार्ली) पारवानी | ६१ | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड |
| २२ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ६२ | श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी |
| २३ | श्रीमती जया प्रकाश माखीजा | ६३ | श्रीमती ज्योती शाम माने |
| २४ | श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी | ६४ | श्रीमती लता शांताराम निकम |
| २५ | डॉ. (श्रीमती) निना प्रकाश नाथानी | ६५ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २६ | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार (कुमारी)केवलराम | ६६ | श्री. ठाकूर विनोद लालसिंग |
| २७ | श्री. भठीजा (बब्बु) संजय | ६७ | श्री. मोहन साधवाणी |
| २८ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे | ६८ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| २९ | श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा | ६९ | श्री. बच्चाराम रूपचंदानी |
| ३० | श्री. लाल पंजाबी | ७० | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| ३१ | श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास | ७१ | श्रीमती मीना सोनेजी (सोंडे) |
| ३२ | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती | ७२ | श्रीमती वनवारी मोना अशोक |
| ३३ | श्रीमती शकुंतला पाटील | ७३ | श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई) |
| ३४ | श्री. मोहन (गारो) रामरख्यानी | ७४ | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी |
| ३५ | श्री. सुखरामानी महेश पहलाजराय | ७५ | श्री. मुकेश सोहन तेजी |
| ३६ | ॲड. श्री. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी | ७६ | श्री. पाटील प्रधान धर्मा |

| | | | |
|---|---|---|---|
| ३७ | श्री. ढोके जनार्दन किसनराव | ७७ | श्री. सुनिल साहेबराव गंगवानी |
| ३८ | श्री.एडके गणपत गोविंद | ७८ | श्री. प्रकाश गणपत सावंत |
| ३९ | श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा | ७९ | श्री. नरेंद्र रामचंद्र राजानी |
| ४० | श्रीमती वेलकर सुरेखा राजन | ८० | **श्री. गोदुमल नारायणदास क्रिष्णानी** |
| ४१ | श्रीमती महाडीक रजनी मोहन | ८१ | श्री. राजेश नानीकराम वधारीया |

तर
खालील दर्शविलेले सदस्य अनुपस्थित होते.

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. समीर उन्हाळे, आयुक्त
२. श्री. अशोक रणखांब, अतिरिक्त आयुक्त
५४.श्री. मिलींद सावंत, उप–आयुक्त
५५.श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
५६.श्री. दिपक सावंत, उप–आयुक्त
५७.श्री. अनुदिप दिघे, मुख्य लेखा अधिकारी
५८.श्री. अनंत कांबळे, प्र. मुख्य लेखा परिक्षक
५९.श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विदयुत
६०.श्री. एस.जी. खडताळे, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
६१.श्री. आर.बी.शिर्के, प्र. शहर अभियंता
६२.डॉ. राजा रिझवानी, वैद्यकीय अधिकारी
६३.श्री. रमेश काजळे, प्र. प्रभाग अधिकारी
६४.. श्री. चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख
६५.श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
६६.श्री. नंदु समतानी, उप कर निर्धारक व संकलकम
६७.श्री. व्ही.आर.गर्जे, प्र. सहा. आयुक्त
६८.श्री. रमेश काजळे, प्र. सहा. आयुक्त

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्री. गणेश शिंपी
२. श्री. श्याम शिवनानी
३. श्री. तानाजी पतंगराव
४. श्रीमती नर्गिस खान

वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>महापालिका सचिव :–</u>मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम–२००७ मधील नियम–४ अन्वये परिवहन समिती सभापती पदाच्या निवडणूकीसाठी बोलविलेल्या आजच्या या विशेष सभेच्या अध्यक्षस्थानी मा. श्री. सुब्बाराव पाटील, अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग हे आहेत.

विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

————————————————————————————————————————————

⇨ **विषय क्र. १ :–** परिवहन समिती सदस्यांमधुन एका सदस्याची सभापती पदी निवड करणे.

<u>श्री. सुब्बाराव पाटील (पीठासीन अधिकारी):–</u>

**परिवहन समिती सभापती** पदासाठी महापालिका सचिव यांचेकडे **दिनांक** २०/४/२००९ रोजी ठरवून दिलेल्या वेळेमध्ये **एका** उमेदवाराचे नाममनिर्देशन पत्र प्राप्त झाले असून त्याचे नाव पुढीलप्रमाणे आहे:—

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १. | **श्री. गंगवानी सुनिल साहेबराव** |

परिवहन समिती सभापती पदाच्या निवडणूका संबंधातील मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम—२००७ नियम—०५ (२) अन्वये, पीठासीन अधिकारी म्हणुन मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये, मी नामनिर्देशन पत्राची छाननी केली आहे. छाननीमध्ये नामनिर्देशन पत्र वैध ठरले आहे उमेदवाराचे नाव पुढीलप्रमाणे आहे:—

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १. | **श्री. गंगवानी सुनिल साहेबराव** |

आता, परिवहन समिती सभापती पदाच्या एका जागेसाठी एकच उमेदवार निवडणूक रिंगणात असल्याने मी पुढीलप्रमाणे निकालाची घोषणा करीत आहे :—

## निकाल घोषणा

महापालिका सचिवांनी दिनांक ८/४/२००९ रोजी काढलेल्या सूचने अन्वये परिवहन समिती च्या सर्व सदस्यांना परिवहन समिती सभापती पदाचा निवडणूक कार्यक्रम कळविण्यांत आला होता. त्या अनुषंगाने दिनांक २०/४/२००९ रोजी एकमेव उमेदवार श्री. सुनिल साहेबराव गंगवानी यांनी आपले नामनिर्देशनपत्र विहीत कालावधीत दाखल केले होते.

परिवहन समिती सभापती पदासाठी एकमात्र वैध नामनिर्देशन दाखल करण्यात आले असून मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम—२००७ च्या नियम—६ मधील पोटनियम—१ अन्वये पीठासीन अधिकारी म्हणून मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये परिवहन समिती सभापती पदाचे उमदेवार ***श्री. सुनिल साहेबराव गंगवानी*** हे **बिनविरोध** निवडून आल्याचे जाहिर करतो.

दिनांक :—२४/४/२००९

स्थान :— उल्हासनगर महानगरपालिका सभागृह

(सुब्बाराव पाटील)
अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग
तथा
पीठासीन अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

## ‘‘प्रभाग समिती क्र. १ च्या सभापती ’’ पदासाठी वैधरित्या नामनिर्देशन पत्र दाखल केलेल्या उमेदवारांची यादी.

दिनांकः– २४/४/२००९

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | सुचकाचे नाव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|---|
| १. | श्री. एडके गणपत गोविंद | श्रीमती सुजाता रिजवानी | श्री. रविंद्र बागुल |
| २. | श्रीमती भोईर नेहा नंदू | श्री. दिलीप द. गायकवाड | श्री. रामसागर ज. यादव |

(सुब्बाराव पाटील)
अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग
तथा
पीठासीन अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

## ''प्रभाग समिती क्र. १ च्या सभापती '' पदाची निवडणूक लढविणा—या उमेदवारांची अंतिम यादी.

दिनांकः—२४/४/२००९

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १. | श्री. एडके गणपत गोविंद |
| २. | श्रीमती भोईर नेहा नंदू |

(सुब्बाराव पाटील)
अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग
तथा
पीठासीन अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका— विशेष सभा

शुक्रवार दिनांक २४/४/२००९

मी प्रभाग समिती क्र. १ च्या सभापती पदाचे उमेदवार **श्री. एडके गणपत गोविंद** यांना मतदान करीत आहे.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | स्वाक्षरी |
|---|---|---|
| १ | श्री. दिलीप दशरथ गायकवाड | |
| २ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | |
| ३ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | |
| ४ | श्रीमती संगीता राजेश कंडारे | |
| ५ | श्री. रविंद्र दशरथ बागूल | |
| ६ | श्री. यादव रामसागर जनार्दन | |
| ७ | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी | |
| ८ | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज) | |
| ९ | श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी | |
| १० | श्रीमती सुजाता रमेश रिझवानी | |
| ११ | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद | |
| १२ | श्री. राजू जग्यासी | |
| १३ | श्री. राम (चार्ली) फुंदुमल पारवानी | |
| १४ | श्री. हरेश जग्यासी | |
| १५ | श्रीमती डॉ. निना प्रकाश नाथानी | |
| १६ | श्री. आयलानी कुमार उत्तमचंद | |
| १७ | श्री. ॲड. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी | |
| १८ | श्री. ढोके जनार्दन किसनराव (जे.के.) | |
| १९ | श्री. एडके गणपत गोविंद | |

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

(सुब्बाराव पाटील)
अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग
तथा
पीठासीन अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका— विशेष सभा

शुक्रवार दिनांक २४/४/२००९

मी प्रभाग समिती क्र. १ च्या सभापती पदाचे उमेदवार **श्रीमती भोईर नेहा नंदु** यांना मतदान करीत आहे.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | स्वाक्षरी |
|---|---|---|
| १ | श्री. दिलीप दशरथ गायकवाड | |
| २ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | |
| ३ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | |
| ४ | श्रीमती संगीता राजेश कंडारे | |
| ५ | श्री. रविंद्र दशरथ बागूल | |
| ६ | श्री. यादव रामसागर जनार्दन | |
| ७ | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी | |
| ८ | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज) | |
| ९ | श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी | |
| १० | श्रीमती सुजाता रमेश रिझवानी | |
| ११ | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद | |
| १२ | श्री. राजू जग्यासी | |
| १३ | श्री. राम (चार्ली) फुंदुमल पारवानी | |
| १४ | श्री. हरेश जग्यासी | |
| १५ | श्रीमती डॉ. निना प्रकाश नाथानी | |
| १६ | श्री. आयलानी कुमार उत्तमचंद | |
| १७ | श्री. ॲड. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी | |
| १८ | श्री. ढोके जनार्दन किसनराव (जे.के.) | |
| १९ | श्री. एडके गणपत गोविंद | |

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

(सुब्बाराव पाटील)
अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग
तथा
पीठासीन अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

<u>मी प्रभाग समिती क्र. १ च्या सभापती पदाच्या</u> <u>निवडणूक प्रक्रियेमध्ये मतदान प्रक्रियेत भाग घेत नाही:—</u>

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | पक्षाचे नांव |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

(सुब्बाराव पाटील)
अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग
तथा
पीठासीन अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

# <u>निकाल घोषणा</u>

महापालिका सचिवांनी दिनांक ८/४/२००९ रोजी काढलेल्या सूचने अन्वये प्रभाग समिती क्र. १च्या सर्व सदस्यांना प्रभाग समिती क्र. १ च्या सभापती पदाचा निवडणूक कार्यक्रम कळविण्यांत आला होता. त्या अनुषंगाने दिनांक २०/४/२००९ रोजी श्री. एडके गणपत गोविंद व श्रीमती भोईर नेहा नंदू या २ उमेदवारांनी आपले नामनिर्देशनपत्र विहीत कालावधीत दाखल केले होते. दिनांक २४/४/२००९ रोजी श्री. एडके गणपत गोविंद यांनी आपली उमेदवारी मागे घेतल्याने प्रभाग समिती क्र. १ च्या सभापती पदासाठी एकमात्र उमेदवार निवडणूक रिंगणात असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम–२००७ च्या नियम–६ मधील पोटनियम–१ अन्वये पीठासीन अधिकारी म्हणून मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये प्रभाग समिती क्र. १ च्या सभापती पदाचे उमदेवार ***श्रीमती भोईर नेहा नंदू*** हया **बिनविरोध** निवडून आल्याचे जाहिर करतो.

दिनांक :–२४/४/२००९

स्थान :– उल्हासनगर महानगरपालिका सभागृह

(सुब्बाराव पाटील)
अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग
तथा
पीठासीन अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—२४/४/२००९

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २४/४/२००९ रोजीच्या प्रभाग समिती क्र. १ च्या सभेचे इतिवृत्त.**

१

उल्हासनगर महानगरपालिकेच्या **प्रभाग समिती क्र. १** ची विशेष सभा शुक्रवार दिनांक २४/४/२००९ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत श्री. सुब्बाराव पाटील, अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग हे पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

| अ.क्र. | सदस्यांची नावे |
|---|---|
| १ | श्री. दिलीप दशरथ गायकवाड |
| २ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर |
| ३ | श्रीमती संगीता राजेश कंडारे |
| ४ | श्री. रविंद्र दशरथ बागूल |
| ५ | श्री. यादव रामसागर जनार्दन |
| ६ | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी |
| ७ | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज) |
| ८ | श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी |
| ९ | श्रीमती सुजाता रमेश रिझवानी |
| १० | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद |
| ११ | श्री. राजू जग्यासी |
| १२ | श्री. हरेश जग्यासी |
| १३ | श्रीमती डॉ. निना प्रकाश नाथानी |
| १४ | श्री. आयलानी कुमार उत्तमचंद |
| १५ | श्री. ॲड. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी |
| १६ | श्री. एडके गणपत गोविंद |

तर खालील दर्शविलेले सदस्य/ सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील, २. श्री. राम (चार्ली) फुंदुमल पारवानी, ३. श्री. ढोके जनार्दन किसनराव

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. रमेश भदाणे, सहा. प्रादेशिक संचालक, न.पा.प्र., कोकण विभाग
२. श्री. समिर उन्हाळे, आयुक्त
३. श्री. अशोककुमार रणखांब, अतिरिक्त आयुक्त
४. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
५. श्री. मिलिंद सावंत, उप—आयुक्त
६. डॉ. दिपक सावंत, उप—आयुक्त
७. श्री. अनंत कांबळे, उप मुख्य लेखा परिक्षक
८. डॉ. जी.टी. जिंदे, वैदयकीय आरोग्य अधिकारी
६९. श्री. एस.जी. खडताळे, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
९. डॉ. राजा रिजवानी, वैदयकीय अधिकारी
१०. श्री. बबीश गंगारामानी, उप अभियंता, विदयुत विभाग
११. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्री. गणेश शिंपी
२. श्रीमती नर्गिस खान

दुपारी १२.१० वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

**महापालिका सचिव :—**मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम—२००७ मधील नियम—४ अन्वये प्रभाग समिती क्र. १ च्या

सभापती पदाच्या निवडणूकीसाठी बोलविलेल्या आजच्या या विशेष सभेच्या अध्यक्षस्थानी मा. श्री. सुब्बाराव पाटील, अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग हे आहेत.

विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १ :—** प्रभाग समिती क्र. १ च्या सदस्यांमधुन एका सदस्याची सभापती पदी निवड

करणे.

---

श्री. सुब्बाराव पाटील (पीठासीन अधिकारी):—

**प्रभाग समिती क्र. १ च्या सभापती** पदासाठी महापालिका सचिव यांचेकडे **दिनांक** २०/४/२००९ रोजी ठरवून दिलेल्या वेळेमध्ये २ उमेदवारांचे नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले असून मराठी वर्णानुक्रमाणे ते पुढीलप्रमाणे आहेत:—

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १. | **श्री. गणपत गोविंद एडके** |
| २. | **श्रीमती नेहा नंदू भोईर** |

प्रभाग समिती क्र. १ च्या सभापती पदाच्या निवडणूका संबंधातील मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम—२००७ नियम—०५ (२) अन्वये, पीठासीन अधिकारी म्हणुन मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये, मी सर्व नामनिर्देशनाची छाननी केली आहे. छाननीमध्ये वैध ठरलेल्या उमेदवारांची नावे मराठी वर्णानुक्रमाने पुढीलप्रमाणे आहेत:—

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १. | **श्री. एडके गणपत गोविंद** |
| २. | **श्रीमती भोईर नेहा नंदू** |

वरील २ उमेदवारांपैकी ज्या उमेदवाराला आपली उमेदवारी मागे घ्यावयाची असेल त्यासाठी १५ मिनिटांची वेळ देण्यात येत आहे. अशा उमेदवारास आपली उमेदवारी मागे घेण्यासंबंधातील विहित नमुन्यामधील अर्ज भरुन देवून आपली उमेदवारी मागे घेता येईल.

यावेळेस दुपारचे १२ वाजुन १५ मिनिटे झाली आहेत.

आता दुपारचे १२ वाजुन २५ मिनिटे झाली आहेत. उमेदवारी मागे घेण्यासाठी देण्यात आलेली वेळ संपली आहे असे मी जाहिर करतो.

दिलेल्या वेळेमध्य श्री. एडके गणपत गोविंद या उमेदवाराने आपली उमेदवारी मागे घेतली आहे.

आता, प्रभाग समिती क्र. १ च्या सभापती पदाच्या एका जागेसाठी एकमात्र उमेदवार निवडणूक रिंगणात असल्याने मी पुढीलप्रमाणे निकालाची घोषणा करीत आहे :—

# निकाल घोषणा

महापालिका सचिवांनी दिनांक ८/४/२००९ रोजी काढलेल्या सूचने अन्वये प्रभाग समिती क्र. १च्या सर्व सदस्यांना प्रभाग समिती क्र. १ च्या सभापती पदाचा निवडणूक कार्यक्रम कळविण्यांत आला होता. त्या अनुषंगाने दिनांक २०/४/२००९ रोजी श्री. एडके गणपत गोविंद व श्रीमती भोईर नेहा नंदू या २ उमेदवारांनी आपले नामनिर्देशनपत्र विहीत कालावधीत दाखल केले होते. दिनांक २४/४/२००९ रोजी श्री. एडके गणपत गोविंद यांनी आपली उमेदवारी मागे घेतल्याने प्रभाग समिती क्र. १ च्या सभापती पदासाठी एकमात्र उमेदवार निवडणूक रिंगणात असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम—२००७ च्या

नियम–६ मधील पोटनियम–१ अन्वये पीठासीन अधिकारी म्हणून मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये प्रभाग समिती क्र. १ च्या सभापती पदाचे उमदेवार ***श्रीमती भोईर नेहा नंदू*** हया **बिनविरोध** निवडून आल्याचे जाहिर करतो.

दिनांक :–२४/४/२००९

स्थान :– उल्हासनगर महानगरपालिका
सभागृह

(सुब्बाराव पाटील)
अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग
तथा
पीठासीन अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

## ‘‘प्रभाग समिती क्र. २ च्या सभापती ’’ पदासाठी वैधरित्या नामनिर्देशन पत्र दाखल केलेल्या उमेदवारांची यादी.

दिनांकः– २४/४/२००९

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | सुचकाचे नाव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती रजनी मोहन महाडिक | श्री. सुंदर आसनदास मंगतानी | श्रीमती मालती राधारण करोतिया |
| २. | श्री. प्रभुनाथ दुखंती गुप्ता | श्री. सतिश चहाळ | श्रीमती वेलकर सुरेखा राजन |
| ३ | श्री. प्रभनाथ दुखंती गुप्ता | श्री. सतिश चहाळ | श्रीमती वेलकर सुरेखा राजन |
| ४ | श्रीमती कविता सिरवानी | श्री. अंकुश म्हस्के | श्री. जीवन इदनानी |
| ५ | श्रीमती कविता सिरवानी | श्री. अंकुश म्हस्के | श्री. जीवन इदनानी |

(सुब्बाराव पाटील)
अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग
तथा
पीठासीन अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

## ‘‘प्रभाग समिती क्र. २ च्या सभापती ’’ पदाची निवडणूक लढविणा—या उमेदवारांची अंतिम यादी.

दिनांकः—२४/४/२००९

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १. | श्रीमती महाडिक रजनी मोहन |
| २. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती |

(सुब्बाराव पाटील)
अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग
तथा
पीठासीन अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

## ‘‘प्रभाग समिती क्र. २ च्या सभापती ’’ पदाची निवडणूक लढविणा–या उमेदवारांची अंतिम यादी.

दिनांकः–२४/४/२००९

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
| --- | --- |
| १. | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती |
| २. | श्रीमती सिरवानी कविता |

(सुब्बाराव पाटील)
अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग
तथा
पीठासीन अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

## ''प्रभाग समिति क्र. २ च्या सभापती '' पदाची निवडणूक लढविणा–या उमेदवारांची अंतिम यादी.

दिनांक:–२४/४/२००९

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १. | श्रीमती महाडिक रजनी मोहन |
| २. | श्रीमती सिरवानी कविता |

(सुब्बाराव पाटील)
अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग
तथा
पीठासीन अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका— विशेष सभा

शुक्रवार दिनांक २४/४/२००९

मी प्रभाग समिती क्र. २ च्या सभापती पदाचे उमेदवार **श्रीमती महाडिक रजनी मोहन** यांना मतदान करीत आहे.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | स्वाक्षरी |
|---|---|---|
| १ | श्रीमती महाडीक रजनी मोहन | |
| २ | श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान | |
| ३ | श्रीमती जया प्रकाश माखीजा | |
| ४ | श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी | |
| ५ | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार केवलदास उर्फ (कुमारी) | |
| ६ | श्री. लाल पंजाबी | |
| ७ | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती | |
| ८ | श्रीमती शकुंतला कौतीक पाटील | |
| ९ | श्री. मोहन (गारो) रामरख्यानी | |
| १० | श्री. सुखरामानी महेश पहलाजराय | |
| ११ | श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा | |
| १२ | श्रीमती वेलकर सुरेखा राजन | |
| १३ | श्री. लालबिहारी बुझारत यादव | |
| १४ | श्रीमती करोतीया मालती राधाचरण | |
| १५ | श्रीमती पंचशिला नाना पवार | |
| १६ | श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी | |
| १७ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | |
| १८ | श्री. सुंदर आसनदास मंगतानी, | |
| १९ | श्रीमती सुमन गजानन शेळके | |

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

(सुब्बाराव पाटील)
अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग
तथा
पीठासीन अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका— विशेष सभा

शुक्रवार दिनांक २४/४/२००९

मी प्रभाग समिती क्र. २ च्या सभापती पदाचे उमेदवार **श्रीमती सिरवानी कविता** यांना मतदान करीत आहे

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | स्वाक्षरी |
|---|---|---|
| १ | श्रीमती महाडीक रजनी मोहन | |
| २ | श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान | |
| ३ | श्रीमती जया प्रकाश माखीजा | |
| ४ | श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी | |
| ५ | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार केवलदास उर्फ (कुमारी) | |
| ६ | श्री. लाल पंजाबी | |
| ७ | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती | |
| ८ | श्रीमती शकुंतला कौतीक पाटील | |
| ९ | श्री. मोहन (गारो) रामरख्यानी | |
| १० | श्री. सुखरामानी महेश पहलाजराय | |
| ११ | श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा | |
| १२ | श्रीमती वेलकर सुरेखा राजन | |
| १३ | श्री. लालबिहारी बुझारत यादव | |
| १४ | श्रीमती करोतीया मालती राधाचरण | |
| १५ | श्रीमती पंचशिला नाना पवार | |
| १६ | श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी | |
| १७ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | |
| १८ | श्री. सुंदर आसनदास मंगतानी, | |
| १९ | श्रीमती सुमन गजानन शेळके | |

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

(सुब्बाराव पाटील)
अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग
तथा
पीठासीन अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

**उल्हासनगर महानगरपालिका– विशेष सभा**
**शुक्रवार दिनांक २४/४/२००९**

मी प्रभाग समिती क्र. २ च्या सभापती पदाचे उमेदवार **श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती** यांना मतदान करीत आहे.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | स्वाक्षरी |
|---|---|---|
| १ | श्रीमती महाडीक रजनी मोहन | |
| २ | श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान | |
| ३ | श्रीमती जया प्रकाश माखीजा | |
| ४ | श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी | |
| ५ | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार केवलदास उर्फ (कुमारी) | |
| ६ | श्री. लाल पंजाबी | |
| ७ | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती | |
| ८ | श्रीमती शकुंतला कौतीक पाटील | |
| ९ | श्री. मोहन (गारो) रामरख्यानी | |
| १० | श्री. सुखरामानी महेश पहलाजराय | |
| ११ | श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा | |
| १२ | श्रीमती वेलकर सुरेखा राजन | |
| १३ | श्री. लालबिहारी बुझारत यादव | |
| १४ | श्रीमती करोतीया मालती राधाचरण | |
| १५ | श्रीमती पंचशिला नाना पवार | |
| १६ | श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी | |
| १७ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | |
| १८ | श्री. सुंदर आसनदास मंगतानी, | |
| १९ | श्रीमती सुमन गजानन शेळके | |

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

(सुब्बाराव पाटील)
अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग
तथा
पीठासीन अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका— विशेष सभा

शुक्रवार दिनांक २४/४/२००९

मी प्रभाग समिती क्र. २ च्या सभापती पदाच्या निवडणूक प्रक्रीयेमध्ये मतदान प्रक्रियेत भाग घेत नाही:—

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | पक्षाचे नांव |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

(सुब्बाराव पाटील)
अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग
तथा
पीठासीन अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

# निकाल घोषणा

महापालिका सचिवांनी दिनांक ८/४/२००९ रोजी काढलेल्या सूचने अन्वये प्रभाग समिती क्र. २ च्या सर्व सदस्यांना प्रभाग समिती क्र. २ च्या सभापती पदाचा निवडणूक कार्यक्रम कळविण्यांत आला होता. त्या अनुषंगाने दिनांक २०/४/२००९ रोजी श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती, श्रीमती महाडिक रजनी मोहन व श्रीमती सिरवानी कविता या ३ उमेदवारांनी आपले नामनिर्देशनपत्र विहीत कालावधीत दाखल केले होते. दिनांक २४/४/२००९ रोजी श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती व श्रीमती महाडिक रजनी मोहन यांनी आपली उमेदवारी मागे घेतल्याने प्रभाग समिती क्र. २ च्या सभापती पदासाठी एकमात्र उमेदवार निवडणूक रिंगणात असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम–२००७ च्या नियम–६ मधील पोटनियम–१ अन्वये पीठासीन अधिकारी म्हणून मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये प्रभाग समिती क्र. २ च्या सभापती पदाचे उमदेवार *श्रीमती सिरवानी कविता* हया **बिनविरोध** निवडून आल्याचे जाहिर करतो.

दिनांक :–२४/४/२००९

स्थान :– उल्हासनगर महानगरपालिका सभागृह

(सुब्बाराव पाटील)
अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग
तथा
पीठासीन अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—२४/४/२००९

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २४/४/२००९ रोजीच्या प्रभाग समिती क्र. २ च्या सभेचे इतिवृत्त.

१

उल्हासनगर महानगरपालिकेच्या **प्रभाग समिती क्र. २** ची विशेष सभा शुक्रवार दिनांक २४/४/२००९ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत श्री. सुब्बाराव पाटील, अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग हे पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते/ होत्या.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव |
|---|---|
| १ | श्रीमती महाडीक रजनी मोहन |
| २ | श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान |
| ३ | श्रीमती जया प्रकाश माखीजा |
| ४ | श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी |
| ५ | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार केवलदास उर्फ (कुमारी) |
| ६ | श्री. लाल पंजाबी |
| ७ | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती |
| ८ | श्रीमती शकुंतला कौतीक पाटील |
| ९ | श्री. मोहन (गारो) रामरख्यानी |
| १० | श्री. सुखरामानी महेश पहलाजराय |
| ११ | श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा |
| १२ | श्रीमती वेलकर सुरेखा राजन |
| १३ | श्री. लालबिहारी बुझारत यादव |
| १४ | श्रीमती करोतीया मालती राधाचरण |
| १५ | श्रीमती पंचशिला नाना पवार |
| १६ | श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी |
| १७ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के |
| १८ | श्रीमती सुमन गजानन शेळके |

**तर,**

श्री. सुंदर आसनदास मंगतानी हे सदस्य अनुपस्थित होते.

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. रमेश भदाणे, सहा. प्रादेशिक संचालक, न.पा.प्र., कोकण विभाग
२. श्री. समिर उन्हाळे, आयुक्त
३. श्री. अशोककुमार रणखांब, अतिरिक्त आयुक्त
४. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
५. श्री. मिलिंद सावंत, उप—आयुक्त
६. डॉ. दिपक सावंत, उप—आयुक्त
७. श्री. अनंत कांबळे, उप मुख्य लेखा परिक्षक
८. डॉ. जी.टी. जिंदे, वैदयकीय आरोग्य अधिकारी
७०. श्री. एस.जी. खडताळे, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
९. डॉ. राजा रिजवानी, वैदयकीय अधिकारी
१०. श्री. बबीश गंगारामानी, उप अभियंता, विदयुत विभाग
११. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१. श्री. गणेश शिंपी
२. श्रीमती नर्गिस खान

दुपारी १२.२५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>महापालिका सचिव</u> :—मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम—२००७ मधील नियम—४ अन्वये प्रभाग समिती क्र. २ च्या सभापती पदाच्या निवडणूकीसाठी बोलविलेल्या आजच्या या विशेष सभेच्या अध्यक्षस्थानी मा. श्री. सुब्बाराव पाटील, अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग हे आहेत.

विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

———————————————————————————————————————————
—

⇨ **विषय क्र. १** :— प्रभाग समिती क्र. २ च्या सदस्यांमधुन एका सदस्याची सभापती पदी निवड

करणे.

---

श्री. सुब्बाराव पाटील (पीठासीन अधिकारी):—

**प्रभाग समिती क्र.** २ च्या **सभापती** पदासाठी महापालिका सचिव यांचेकडे **दिनांक** २०/४/२००९ रोजी ठरवून दिलेल्या वेळेमध्ये **३** उमेदवारांकडुन ५ नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले असून मराठी वर्णानुक्रमाणे ते पुढीलप्रमाणे आहेत:—

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १ | श्री. गुप्ता प्रभनाथ दुखंती |
| २ | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती |
| ३ | श्रीमती महाडिक रजनी मोहन |
| ४ | श्रीमती सिरवानी कविता |
| ५ | श्रीमती सिरवानी कविता |

प्रभाग समिती क्र. २ च्या सभापती पदाच्या निवडणूका संबंधातील मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम—२००७ नियम—०५ (२) अन्वये, पीठासीन अधिकारी म्हणुन मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये, मी सर्व नामनिर्देशनाची छानणी केली आहे. छाननीमध्ये वैध ठरलेल्या उमेदवारांची नावे मराठी वर्णानुक्रमाने पुढीलप्रमाणे आहेत:—

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १ | श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती |
| २ | श्रीमती महाडिक रजनी मोहन |
| ३ | श्रीमती सिरवानी कविता |

वरील ३ उमेदवारांपैकी ज्या उमेदवाराला आपली उमेदवारी मागे घ्यावयाची असेल त्यासाठी १५ मिनिटांची वेळ देण्यात येत आहे. अशा उमेदवारास आपली उमेदवारी मागे घेण्यासंबंधातील विहित नमुन्यामधील अर्ज भरुन देवून आपली उमेदवारी मागे घेता येईल.

यावेळेस दुपारचे १२. वाजुन २५ मिनिटे झाली आहेत.

आता दुपारचे १२ वाजुन ३५ मिनिटे झाली आहेत. उमेदवारी मागे घेण्यासाठी देण्यात आलेली वेळ संपली आहे असे मी जाहिर करतो.

दिलेल्या वेळेमध्ये श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती व श्रीमती महाडिक रजनी मोहन या उमेदवारांनी आपली उमेदवारी मागे घेतल्याने आता, प्रभाग समिती क्र. २ च्या सभापती पदाच्या एका जागेसाठी एकमात्र उमेदवार निवडणूक रिंगणात असल्याने मी पुढीलप्रमाणे निकालाची घोषणा करीत आहे :—

## निकाल घोषणा

महापालिका सचिवांनी दिनांक ८/४/२००९ रोजी काढलेल्या सूचने अन्वये प्रभाग समिती क्र. २ च्या सर्व सदस्यांना प्रभाग समिती क्र. २ च्या सभापती पदाचा निवडणूक कार्यक्रम कळविण्यांत आला

होता.  त्या अनुषंगाने दिनांक २०/४/२००९ रोजी श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती, श्रीमती महाडिक रजनी मोहन व श्रीमती सिरवानी कविता या ३ उमेदवारांनी आपले नामनिर्देशनपत्र विहीत कालावधीत दाखल केले होते. दिनांक २४/४/२००९ रोजी श्री. गुप्ता प्रभुनाथ दुखंती व श्रीमती महाडिक रजनी मोहन यांनी आपली उमेदवारी मागे घेतल्याने प्रभाग समिती क्र. २ च्या सभापती पदासाठी एकमात्र उमेदवार निवडणूक रिंगणात असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम–२००७ च्या नियम–६ मधील पोटनियम–१ अन्वये पीठासीन अधिकारी म्हणून मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये प्रभाग समिती क्र. २ च्या सभापती पदाचे उमदेवार *श्रीमती सिरवानी कविता* हया **बिनविरोध** निवडून आल्याचे जाहिर करतो.

दिनांक :–२४/४/२००९

स्थान :– उल्हासनगर महानगरपालिका सभागृह

(सुब्बाराव पाटील)
अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग
तथा
पीठासीन अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

## ''प्रभाग समिती क्र. ३ च्या सभापती '' पदासाठी वैधरित्या नामनिर्देशन पत्र दाखल केलेल्या उमेदवारांची यादी.

दिनांकः– २४/४/२००९

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | सुचकाचे नाव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|---|
| १. | श्री. चंद्रशेखर केशव यादव | श्री. धनंजय बा. बोडारे | श्री. किशोर जग्यासी |

(सुब्बाराव पाटील)
अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग
तथा
पीठासीन अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

# निकाल घोषणा

महापालिका सचिवांनी दिनांक ८/४/२००९ रोजी काढलेल्या सूचने अन्वये प्रभाग समिती क्र. ३ च्या सर्व सदस्यांना प्रभाग समिती क्र. ३ च्या सभापती पदाचा निवडणूक कार्यक्रम कळविण्यांत आला होता. त्या अनुषंगाने दिनांक २०/४/२००९ रोजी एकमेव उमेदवार श्री. चंद्रशेखर केशव यादव यांनी आपले नामनिर्देशनपत्र विहीत कालावधीत दाखल केले होते.

प्रभाग समिती क्र. ३ च्या सभापती पदासाठी एकमात्र वैध नामनिर्देशन दाखल करण्यात आले असून मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम—२००७ च्या नियम—६ मधील पोटनियम—१ अन्वये पीठासीन अधिकारी म्हणून मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये प्रभाग समिती क्र. ३ च्या सभापती पदाचे उमदेवार ***श्री. चंद्रशेखर केशव यादव*** हे **बिनविरोध** निवडून आल्याचे जाहिर करतो.

दिनांक :—२४/४/२००९

स्थान :— उल्हासनगर महानगरपालिका सभागृह

(सुब्बाराव पाटील)
अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग
तथा
पीठासीन अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—२४/४/२००९

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २४/४/२००९ रोजीच्या प्रभाग समिती क्र. ३ च्या सभेचे इतिवृत्त.

१

उल्हासनगर महानगरपालिकेच्या **प्रभाग समिती क्र. ३** ची विशेष सभा शुक्रवार दिनांक २४/४/२००९ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत श्री. सुब्बाराव पाटील, अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग हे पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते/ होत्या.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव |
|---|---|
| १ | कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल |
| २ | श्री. मोरे भानजी भिकारी |
| ३ | श्री. दत्तात्रय नारायण पवार |
| ४ | श्रीमती चौधरी राजश्री राजेंद्र |
| ५ | श्री. विजय खंडु सुपाळे |
| ६ | श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा |
| ७ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे |
| ८ | श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण |
| ९ | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| १० | श्रीमती बोडारे वसुधा धनंजय |
| ११ | श्री. शेखर केशव यादव |
| १२ | श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे |
| १३ | श्रीमती निलम प्रेमसिंग रावत |
| १४ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १५ | श्री. किशोर जग्यासी |
| १६ | श्रीमती चेनानी ज्योती रमेश |

तर खालील दर्शविलेले सदस्य अनुपस्थित होते.

१. श्री. भठीजा (बब्बु) संजय, २. श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास, ३. श्री. चव्हाण रमेश महादेव

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. रमेश भदाणे, सहा. प्रादेशिक संचालक, न.पा.प्र., कोकण विभाग
२. श्री. समिर उन्हाळे, आयुक्त
३. श्री. अशोककुमार रणखांब, अतिरिक्त आयुक्त
४. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
५. श्री. मिलिंद सावंत, उप—आयुक्त
६. डॉ. दिपक सावंत, उप—आयुक्त
७. श्री. अनंत कांबळे, उप मुख्य लेखा परिक्षक
८. डॉ. जी.टी. जिंदे, वैदयकीय आरोग्य अधिकारी
७१. श्री. एस.जी. खडताळे, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
९. डॉ. राजा रिजवानी, वैदयकीय अधिकारी
१०.श्री. बबीश गंगारामानी, उप अभियंता, विदयुत विभाग
११.श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्री. गणेश शिपी
२. श्रीमती नर्गिस खान

दुपारी १२.०८ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>महापालिका सचिव :—</u>मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम—२००७ मधील नियम—४ अन्वये प्रभाग समिती क्र. ३ च्या सभापती पदाच्या निवडणूकीसाठी बोलविलेल्या आजच्या या विशेष सभेच्या अध्यक्षस्थानी मा. श्री. सुब्बाराव पाटील, अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग हे आहेत.

विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

———————————————————————————————————————
—

⇨ **विषय क्र. १** :— प्रभाग समिती क्र. ३ च्या सदस्यांमधुन एका सदस्याची सभापती पदी निवड

करणे.

---

श्री. सुब्बाराव पाटील (पीठासीन अधिकारी):—

**प्रभाग समिती क्र. ३ च्या सभापती** पदासाठी महापालिका सचिव यांचेकडे **दिनांक** २०/४/२००९ रोजी ठरवून दिलेल्या वेळेमध्ये **एका** उमेदवाराचे नाममनिर्देशन पत्र प्राप्त झाले असून त्याचे नाव पुढीलप्रमाणे आहे:—

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १. | **श्री. यादव चंद्रशेखर केशव** |

प्रभाग समिती क्र. ३ च्या सभापती पदाच्या निवडणूका संबंधातील मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम—२००७ नियम—०५ (२) अन्वये, पीठासीन अधिकारी म्हणुन मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये, मी नामनिर्देशन पत्राची छाननी केली आहे. छाननीमध्ये नामनिर्देशन पत्र वैध ठरले आहे उमेदवाराचे नाव पुढीलप्रमाणे आहे:—

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १. | **श्री. यादव चंद्रशेखर केशव** |

आता, प्रभाग समिती क्र. ३ च्या सभापती पदाच्या एका जागेसाठी एकच उमेदवार निवडणूक रिंगणात असल्याने मी पुढीलप्रमाणे निकालाची घोषणा करीत आहे :—

# निकाल घोषणा

महापालिका सचिवांनी दिनांक ८/४/२००९ रोजी काढलेल्या सूचने अन्वये प्रभाग समिती क्र. ३ च्या सर्व सदस्यांना प्रभाग समिती क्र. ३ च्या सभापती पदाचा निवडणूक कार्यक्रम कळविण्यांत आला होता. त्या अनुषंगाने दिनांक २०/४/२००९ रोजी एकमेव उमेदवार श्री. चंद्रशेखर केशव यादव यांनी आपले नामनिर्देशनपत्र विहीत कालावधीत दाखल केले होते.

प्रभाग समिती क्र. ३ च्या सभापती पदासाठी एकमात्र वैध नामनिर्देशन दाखल करण्यात आले असून मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम—२००७ च्या नियम—६ मधील पोटनियम—१ अन्वये पीठासीन अधिकारी म्हणून मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये प्रभाग समिती क्र. ३ च्या सभापती पदाचे उमदेवार ***श्री. चंद्रशेखर केशव यादव*** हे **बिनविरोध** निवडून आल्याचे जाहिर करतो.

दिनांक :—२४/४/२००९

(सुब्बाराव पाटील)
अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग
तथा
पीठासीन अधिकारी

स्थान :— उल्हासनगर महानगरपालिका
सभागृह

# उल्हासनगर महानगरपालिका

## ''प्रभाग समिती क्र. ४ च्या सभापती '' पदासाठी वैधरित्या नामनिर्देशन पत्र दाखल केलेल्या उमेदवारांची यादी.

दिनांकः– २४/४/२००९

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | सुचकाचे नाव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|---|
| १. | श्री. भारत (गंगोत्री) रामचंद्र राजवानी | श्रीमती निलम ठाकुरदास चांदवानी | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| २. | श्रीमती शिला सुभाष मनसुलकर | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड | श्री. बच्चाराम बाशोमल रुपचंदानी |

(सुब्बाराव पाटील)
अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग
तथा
पीठासीन अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

## ‘‘प्रभाग समिती क्र. ४ च्या सभापती ’’ पदाची निवडणूक लढविणा–या उमेदवारांची अंतिम यादी.

दिनांकः–२४/४/२००९

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १. | श्रीमती मनसुलकर शिला सुभाष |
| २. | श्री. राजवानी भारत (गंगोत्री) रामचंद्र |

(सुब्बाराव पाटील)
अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग
तथा
पीठासीन अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका— विशेष सभा

शुक्रवार दिनांक २४/४/२००९

मी प्रभाग समिति क्र. ४ च्या सभापती पदाचे उमेदवार **श्रीमती मनसूलकर शिला सुभाष** यांना मतदान करीत आहे.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | स्वाक्षरी |
|---|---|---|
| १ | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी | |
| २ | श्री. प्रशांत किसनराव धांडे | |
| ३ | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड | |
| ४ | श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी | |
| ५ | श्रीमती ज्योती शाम माने | |
| ६ | श्रीमती लता शांताराम निकम | |
| ७ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे | |
| ८ | श्री. ठाकूर विनोद लालसिंग | |
| ९ | श्री. मोहन साधवाणी | |
| १० | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) | |
| ११ | श्री. बच्चाराम रूपचंदानी | |
| १२ | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी | |
| १३ | श्रीमती विद्या विजय निर्मले | |
| १४ | श्रीमती मीना सोनेजी (सोंडे) | |
| १५ | श्रीमती वनवारी मोना अशोक | |
| १६ | श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई) | |
| १७ | श्रीमती मनसुलकर शिला सुभाष | |
| १८ | श्री. मुकेश सोहन तेजी | |
| १९ | श्री. पाटील प्रधान धर्मा | |

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

(सुब्बाराव पाटील)
अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग
तथा
पीठासीन अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

उल्हासनगर महानगरपालिका— विशेष सभा

शुक्रवार दिनांक २४/४/२००९

मी प्रभाग समिती क्र. ४ च्या सभापती पदाचे उमेदवार **श्री. राजवानी भारत रामचंद्र** यांना मतदान करीत आहे.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | स्वाक्षरी |
|---|---|---|
| १ | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी | |
| २ | श्री. प्रशांत किसनराव धांडे | |
| ३ | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड | |
| ४ | श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी | |
| ५ | श्रीमती ज्योती शाम माने | |
| ६ | श्रीमती लता शांताराम निकम | |
| ७ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे | |
| ८ | श्री. ठाकूर विनोद लालसिंग | |
| ९ | श्री. मोहन साधवाणी | |
| १० | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) | |
| ११ | श्री. बच्चाराम रूपचंदानी | |
| १२ | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी | |
| १३ | श्रीमती विद्या विजय निर्मले | |
| १४ | श्रीमती मीना सोनेजी (सोंडे) | |
| १५ | श्रीमती वनवारी मोना अशोक | |
| १६ | श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई) | |
| १७ | श्रीमती मनसुलकर शिला सुभाष | |
| १८ | श्री. मुकेश सोहन तेजी | |
| १९ | श्री. पाटील प्रधान धर्मा | |

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

(सुब्बाराव पाटील)
अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग
तथा
पीठासीन अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

मी प्रभाग समिती क्र. ४ च्या सभापती पदाच्या  निवडणूक प्रक्रीयेमध्ये मतदान प्रक्रियेत भाग घेत नाही:—

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | पक्षाचे नांव |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

(सुब्बाराव पाटील)
अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग
तथा
पीठासीन अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

# <u>निकाल घोषणा</u>

महापालिका सचिवांनी दिनांक ८/४/२००९ रोजी काढलेल्या सूचने अन्वये प्रभाग समिती क्र. ४ च्या सर्व सदस्यांना प्रभाग समिती क्र. ४ च्या सभापती पदाचा निवडणूक कार्यक्रम कळविण्यांत आला होता. त्या अनुषंगाने दिनांक २०/४/२००९ रोजी श्रीमती मनसुलकर शिला सुभाष व श्री. राजवानी भारत (गंगोत्री) रामचंद्र या २ उमेदवारांनी आपले नामनिर्देशनपत्र विहीत कालावधीत दाखल केले होते. दिनांक २४/४/२००९ रोजी श्री. राजवानी भारत (गंगोत्री) रामचंद्र यांनी आपली उमेदवारी मागे घेतल्याने प्रभाग समिती क्र. ४ च्या सभापती पदासाठी एकमात्र उमेदवार निवडणूक रिंगणात असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम–२००७ च्या नियम–६ मधील पोटनियम–१ अन्वये पीठासीन अधिकारी म्हणून मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये प्रभाग समिती क्र. ४ च्या सभापती पदाचे उमदेवार ***श्रीमती मनसूलकर शिला सुभाष*** हया **बिनविरोध** निवडून आल्याचे जाहिर करतो.

दिनांक :–२४/४/२००९

स्थान :– उल्हासनगर महानगरपालिका सभागृह

(सुब्बाराव पाटील)
अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग
तथा
पीठासीन अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—२४/४/२००९

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २४/४/२००९ रोजीच्या प्रभाग समिती क्र. ४ च्या सभेचे इतिवृत्त.

१

उल्हासनगर महानगरपालिकेच्या **प्रभाग समिती क्र.** ४ ची विशेष सभा शुक्रवार दिनांक २४/४/२००९ रोजी दुपारी १२.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत श्री. सुब्बाराव पाटील, अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग हे पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

| अ.क्र. | सदस्यांची नावे |
|---|---|
| १ | श्री. प्रशांत किसनराव धांडे |
| २ | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड |
| ३ | श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी |
| ४ | श्रीमती ज्योती शाम माने |
| ५ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| ६ | श्री. ठाकूर विनोद लालसिंग |
| ७ | श्री. मोहन साधवाणी |
| ८ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| ९ | श्री. बच्चाराम रूपचंदानी |
| १० | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| ११ | श्रीमती विद्या विजय निर्मले |
| १२ | श्रीमती मीना सोनेजी (सोंडे) |
| १३ | श्रीमती मनसुलकर शिला सुभाष |
| १४ | श्री. मुकेश सोहन तेजी |
| १५ | श्री. पाटील प्रधान धर्मा |

तर

खालील दर्शविलेले सदस्य अनुपस्थित होते.

१. श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी, २. श्रीमती लता शांताराम निकम, ३. श्रीमती वनवारी मोना अशोक, ४. श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई)

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. रमेश भदाणे, सहा. प्रादेशिक संचालक, न.पा.प्र., कोकण विभाग
२. श्री. समिर उन्हाळे, आयुक्त
३. श्री. अशोककुमार रणखांब, अतिरिक्त आयुक्त
४. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
५. श्री. मिलिंद सावंत, उप—आयुक्त
६. डॉ. दिपक सावंत, उप—आयुक्त
७. श्री. अनंत कांबळे, उप मुख्य लेखा परिक्षक
८. डॉ. जी.टी. जिंदे, वैदयकीय आरोग्य अधिकारी
७२. श्री. एस.जी. खडताळे, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
९. डॉ. राजा रिजवानी, वैदयकीय अधिकारी
१०. श्री. बबीश गंगारामानी, उप अभियंता, विदयुत विभाग
११. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्री. गणेश शिंपी
२. श्रीमती नर्गिस खान

दुपारी १२.३५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>महापालिका सचिव :–</u>मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम–२००७ मधील नियम–४ अन्वये प्रभाग समिती क्र. ४ च्या सभापती पदाच्या निवडणूकीसाठी बोलविलेल्या आजच्या या विशेष सभेच्या अध्यक्षस्थानी मा. श्री. सुब्बाराव पाटील, अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग हे आहेत.

विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १ :–** प्रभाग समिती क्र. ४ च्या सदस्यांमधुन एका सदस्याची सभापती पदी निवड

करणे.

---

<u>श्री. सुब्बाराव पाटील (पीठासीन अधिकारी):–</u>

**प्रभाग समिती क्र. ४ च्या सभापती** पदासाठी महापालिका सचिव यांचेकडे **दिनांक** २०/४/२००९ रोजी ठरवून दिलेल्या वेळेमध्ये २ उमेदवारांकडुन २ नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले असून मराठी वर्णानुक्रमाणे ते पुढीलप्रमाणे आहेत:–

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १. | श्रीमती मनसुलकर शिला सुभाष |
| २. | **श्री. राजवानी भारत (गंगोत्री) रामचंद्र** |

प्रभाग समिती क्र. ४ च्या सभापती पदाच्या निवडणूका संबंधातील मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम–२००७ नियम–०५ (२) अन्वये, पीठासीन अधिकारी म्हणुन मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये, मी सर्व नामनिर्देशनाची छानणी केली आहे. छाननीमध्ये वैध ठरलेल्या उमेदवारांची नावे मराठी वर्णानुक्रमाने पुढीलप्रमाणे आहेत:–

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १. | श्रीमती मनसुलकर शिला सुभाष |
| २. | **श्री. राजवानी भारत (गंगोत्री) रामचंद्र** |

वरील ३ उमेदवारांपैकी ज्या उमेदवाराला आपली उमेदवारी मागे घ्यावयाची असेल त्यासाठी १५ मिनिटांची वेळ देण्यात येत आहे. अशा उमेदवारास आपली उमेदवारी मागे घेण्यासंबंधातील विहित नमुन्यामधील अर्ज भरुन देवून आपली उमेदवारी मागे घेता येईल.

यावेळेस दुपारचे १२ वाजुन ३५ मिनिटे झाली आहेत.

आता दुपारचे १२ वाजुन ४५ मिनिटे झाली आहेत. उमेदवारी मागे घेण्यासाठी देण्यात आलेली वेळ संपली आहे असे मी जाहिर करतो.

दिलेल्या वेळेमध्ये श्री. राजवानी भारत (गंगोत्री) रामचंद्र या उमेदवाराने आपली उमेदवारी मागे घेतली आहे.

आता, प्रभाग समिती क्र. ४ च्या सभापती पदाच्या एका जागेसाठी एकमात्र उमेदवार निवडणूक रिंगणात असल्याने मी पुढीलप्रमाणे निकालाची घोषणा करीत आहे :–

# <u>निकाल घोषणा</u>

महापालिका सचिवांनी दिनांक ८/४/२००९ रोजी काढलेल्या सूचने अन्वये प्रभाग समिती क्र. ४ च्या सर्व सदस्यांना प्रभाग समिती क्र. ४ च्या सभापती पदाचा निवडणूक कार्यक्रम कळविण्यांत आला होता. त्या अनुषंगाने दिनांक २०/४/२००९ रोजी श्रीमती मनसुलकर शिला सुभाष व श्री. राजवानी भारत (गंगोत्री) रामचंद्र या २ उमेदवारांनी आपले नामनिर्देशनपत्र विहीत कालावधीत दाखल केले होते. दिनांक २४/४/२००९ रोजी श्री. राजवानी भारत (गंगोत्री) रामचंद्र यांनी आपली उमेदवारी मागे घेतल्याने प्रभाग समिती क्र. ४ च्या सभापती पदासाठी एकमात्र उमेदवार निवडणूक रिंगणात असल्याने मुंबई प्रांतिक

महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती, यांची निवडणूक घेणे) नियम–२००७ च्या नियम–६ मधील पोटनियम–१ अन्वये पीठासीन अधिकारी म्हणून मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये प्रभाग समिती क्र. ४ च्या सभापती पदाचे उमदेवार ***श्रीमती मनसूलकर शिला सुभाष*** हया **बिनविरोध** निवडून आल्याचे जाहिर करतो.

दिनांक :–२४/४/२००९

स्थान :– उल्हासनगर महानगरपालिका
सभागृह

(सुब्बाराव पाटील)
अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग
तथा
पीठासीन अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— २०/५/२००९

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २०/५/२००९ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

(१)

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा बुधवार दिनांक २०/५/२००९ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती निर्मले विद्या विजय हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

६. महापौर—– श्रीमती निर्मले विद्या विजय

| | | | |
|---|---|---|---|
| २ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | ३१ | श्रीमती पंचशिला नाना पवार |
| ३ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | ३२ | श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी |
| ४ | श्री. गायकवाड दिलीप | ३३ | श्रीमती करोतीया मालती राधाचरण |
| ५ | श्री. रविंद्र दशरथ बागूल | ३४ | श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण |
| ६ | श्री. मोरे भानजी भिकारी | ३५ | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| ७ | श्री. दत्तात्रय नारायण पवार | ३६ | श्रीमती बोडारे वसुधा धनंजय |
| ८ | श्रीमती चौधरी राजश्री राजेंद्र | ३७ | कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल |
| ९ | श्री. विजय खंडु सुपाळे | ३८ | श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे |
| १० | श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान | ३९ | श्री. शेखर केशव यादव |
| ११ | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी | ४० | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १२ | श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी | ४१ | श्रीमती सुमन गजानन शेळके |
| १३ | श्रीमती सुजाता रमेश रिझवानी | ४२ | श्री. प्रशांत किसनराव धांडे |
| १४ | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद | ४३ | श्री. किशोर जग्यासी |
| १५ | श्री. राजू जग्यासी | ४४ | श्रीमती चेनानी ज्योती रमेश |
| १६ | श्री. राम (चार्ली) पारवानी | ४५ | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड |
| १७ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ४६ | श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी |
| १८ | श्रीमती जया प्रकाश माखीजा | ४७ | श्रीमती ज्योती शाम माने |
| १९ | डॉ. (श्रीमती) निना प्रकाश नाथानी | ४८ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २० | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार (कुमारी)केवलराम | ४९ | श्री. ठाकूर विनोद लालसिंग |
| २१ | श्री. भठीजा (बब्बु) संजय | ५० | श्री. मोहन साधवाणी |
| २२ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे | ५१ | श्री. बच्चाराम रूपचंदानी |
| २३ | श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा | ५२ | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| २४ | श्री. लाल पंजाबी | ५३ | श्रीमती मीना सोनेजी (सोंडे) |
| २५ | श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास | ५४ | श्रीमती वनवारी मोना अशोक |
| २६ | श्रीमती शकुंतला पाटील | ५५ | श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई) |
| २७ | श्री. सुखरामानी महेश पहलाजराय | ५६ | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी |
| २८ | ॲड. श्री. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी | ५७ | श्री. पाटील प्रधान धर्मा |
| २९ | श्रीमती वेलकर सुरेखा राजन | ५८ | श्री. सुनिल साहेबराव गंगवानी |
| ३० | श्रीमती महाडीक रजनी मोहन | ५९ | श्री. प्रकाश गणपत सावंत |
| | | ६० | श्री. राजेश नानीकराम वधारीया |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीमती संगीता राजेश कंडारे, २. श्री. रामसागर जनार्दन यादव, ३. श्रीमती निलम प्रेमसिंग रावत, ४. श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के, ५. श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज), ६. श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी , ७. श्री. कुमार उत्तमचंद आयलानी, ८. श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती, ९. श्री. मोहन (गारो) रामरख्यानी, १०. श्री. ढोके जनार्दन किसनराव, ११. श्री.एडके गणपत गोविंद, १२. श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा, १३. श्री. लालबिहारी बुझारत यादव, १४. श्री. मंगतानी सुंदर आसनदास, १५. श्री. रमेश महादेव चव्हाण, १६. श्रीमती मनसुलकर शिला सुभाष, १७. श्रीमती लता शांताराम निकम, १८. श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री), १९. श्री. मुकेश सोहन तेजी २०. श्री. नरेंद्र रामचंद्र राजानी, २१.श्री. गोदुमल नारायणदास क्रिष्णानी

खालील अधिकारी सभेस हजर होते.

७३.श्री. समीर उन्हाळे, आयुक्त
७४.श्री. अशोक रणखांब, अतिरिक्त आयुक्त
७५.श्री. मिलींद सावंत, उप–आयुक्त
७६.श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
७७.श्री. अनंत कांबळे, प्र. मुख्य लेखा परिक्षक
७८.श्री. सिंह, सहा. संचालक, नगररचना विभाग
७९.श्री. जी. टी. जिंदे, वैदयकीय आरोग्य अधिकारी
८०.श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विदयुत
८१.श्री. सेलवन, उप अभियंता, पाणी पुरवठा
८२.श्री. आर.बी.शिर्के, प्र. शहर अभियंता
८३.डॉ. राजा रिझवानी, वैद्यकीय अधिकारी
८४.श्री. चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख
८५.श्री. भास्कर मिरपगार, अग्निशमन अधिकारी
८६.श्री. व्ही.आर.गर्जे, प्र. सहा. आयुक्त
८७.श्री. रमेश काजळे, प्र. सहा. आयुक्त
८८.श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
८९.श्री. उदय लिमये, मुख्य लिपिक, साप्रवि

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्री. गणेश शिंपी
२. श्री. श्याम शिवनानी
३. श्री. तानाजी पतंगराव
४. श्रीमती नर्गिस खान

सांयकाळी ४.२९ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

महापालिका सचिव :– विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

प्रश्नोत्तरे.........

यावेळी सांयकाळचे ४ वाजुन २९ मिनिटे झाली आहेत.

महापालिका सचिव :– प्रश्न क्र. १६३ हा श्री. रविंद्र बागुल यांचा आहे.

? **प्रश्न क्र. १६३** :– उल्हासनगर महानगरपालिका मुख्यालयातील कर्मचा–यांना चहापान करता यावे यासाठी महापालिकेने चहाचे कॅटीनला परवानगी दिली आहे त्या अनुषंगाने खालील प्रश्नावर महासभेत चर्चा होवून सुचक, समाधानकारक सविस्तर माहिती मिळणेस विनंती आहे.

प्र.क्र. १ अ) उल्हासनगर महानगरपालिका प्रशासकिय मुख्यालयाचे इमारतीचे आवारामधील १४ चौ.मी. जागा प्रती महा २५० रु. दराने भाडयाने दिली आहे का? सदरची जागा भाडयाने देतांना कोणत्या अटी, शर्ती नियमानुसार देणेत आली आहे? सदरची कॅटीन भाडयाने मिळावी म्हणुन कोणकोणत्या महिला बचत गटांनी अर्ज केलेले आहेत? त्यांचे

अर्जाची सत्यप्रत मिळावी? त्यांचे नाव, पत्ते व त्यांनी देकार दिलेली रक्कम किती आहे? याची माहिती मिळावी. संबंधीत महिला बचत गटांना चहाचे कॅटीन भाडयाने देणेत यावे यासाठी कोणत्या नगरसेवक, आमदार इत्यादी यांनी शिफारस केली आहे. श्री. उपाध्याय यांनी २५० रुपये चौ.मी. प्रमाणे चहाचे कॅटीन चालविणेस दिल्याने व अन्य महिला बचत गट दुप्पट, तिप्पट भाडे देणेस तयार असल्याने महापालिकेचे किती आर्थिक नुकसान झाले आहे? यास जबाबदार कोण आहे?

उत्तर :— होय

उल्हासनगर महानगरपालिका कर्मचारी पतपेढी व श्री. जितेंद्र उपाध्याय यांना यापुर्वी उल्हासनगर महानगरपालिका आवारातील प्रत्येकी १४ चौ.मी. जागा प्रतिमाह भाडे रु. २५०/— आकारणी करुन १२ महिने कालावधी करीता भाडे तत्वावर दिनांक ७/९/२००७ ते ७/९/२००८ कालावधीकरीता देण्यात आली होती व त्याबाबत स्थायी समितीस माहितीस्तव गोषवारा सादर करण्यात आलेला आहे. तद्नंतर श्री. जितेंद्र उपाध्याय यांनी दिनांक १३/८/२००८ च्या अर्जान्वये मुदतवाढ मिळणेबाबत अर्ज सादर केलेला होता. त्या अनुषंगाने मा. स्थायी समितीच्या मान्यतेने ठराव क्र. ६६ दिनांक १६/१०/२००८ नुसार पुढील १२ महिने कालावधीकरीता मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

चहाचे कॅन्टीन भाडयाने देतांनाच्या नियम व अटी शर्तीची प्रत सोबत जोडलेली आहे.

१) श्रमजीवी महिला बचत गट दिनांक ९/५/२००८ २) उत्कर्ष महिला बचत गट दिनांक १८/६/२००८ ३) हरी ओम महिला बचत गट दिनांक १३/८/२००८ ४) जयदिप महिला मंडळ दिनांक २९/८/२००८ ५) जयश्री महिला बचत गट दिनांक १/९/२००८ ६) वृंदा बहुउद्देशीय शिक्षण सामाजिक संस्था दिनांक ५/९/२००८ चे अर्ज.

सदर महिला बचत गट यांचे अर्जाच्या सत्यप्रती सोबत जोडलेल्या आहेत.

अर्जदार यांचे नाव व पत्ते अर्जाच्या सत्यप्रतीमध्ये नमुद आहेत. परंतु देकार रक्कमेबाबत अर्जात काहीही नमुद केलेले नाही. नगरसेवक आमदार यांनी केलेली शिफारास पुढीलप्रमाणे आहे. १) श्रमजिवी महिला बचत गट (नगरसेवक —श्रीमती मिना सोंडे, राजेश ववानखेडे मा. आमदार) २) उत्कर्ष महिला बचत गट (श्रीम. लिलाबाई आशान, महापौर) व नगरसेवक —श्री. रविंद्र बागुल यांचे पत्र (महिला बचत गट यांना चहा कॅन्टीन भाडयाने देणेबाबत

उल्हासनगर महानगरपालिका कर्मचारी पतपेढी व श्री. जितेंद्र उपाध्याय यांना प्रत्येकी रु. २५०/— प्रतिमहा भाडे तत्वावर (एकुण रु. ५००/— प्रति महा) १२ महिने कालावधीकरीता स्थायी समितीच्या मान्यतेने देण्यात आलेली आहे. तसेच अन्य महिला बचत गट यांनी दुप्पट, तिप्पट भाडे देणेस तयार असल्याबाबत अर्जात काहीही नमुद केलेले नाही.

**सदस्य श्री. रविंद्र बागुल :—** सचिव साहेब, कृपया जरा प्रश्न वाचुन दाखवा. तीन महिन्याने प्रश्न चर्चेस येत आहे, त्यामुळे दिलेला प्रश्न विसरुन गेलो आहे.

**महापालिका सचिव :—**तळमजल्यावर चहा कॅटीनसाठी जी जागा भाडयाने दिली आहे त्याबाबतचा आपला प्रश्न आहे.

**सदस्य श्री. रविंद्र बागुल :—**सन्माननिय महापौर महोदया आणि आयुक्त साहेब, आपण चहा कॅटीनसाठी जी जागा भाडयाने दिलेली आहे, तिला दरमहा २५०/— रुपये भाडे आकारण्यात आलेले आहे. चहा कॅटीनसाठी ही जी जागा भाडयाने देण्यात आलेली आहे ती महिला बचत गटांना देण्यात यावी याबाबत मी तसेच मा. आमदार तसेच श्रीमती मिनाताई सोनेजी यांनी सुध्दा पत्र दिलेले आहे. चहा कॅन्टीन जे चालवितात श्री. जितु उपाध्याय ते महानगरपालिकेचे कर्मचारी आहेत की कोण आहेत? याबाबतचे उत्तर देण्यासाठी संबंधीत विभागाचे जे अधिकारी आहेत त्यांना व्यासपीठावर बोलाविले जावे. आणि चहा कॅन्टीनसाठी ही जी जागा भाडयाने दिलेली आहे ती कोणाच्या मंजुरीने दिलेली आहे? किती वर्षाकरीता दिलेली आहे? वर्षाचा कालावधी पुर्ण झालेला आहे किंवा नाही?

**श्री. मिलिंद सावंत(उप—आयुक्त, मुख्यालय):—**सन्माननिय महापौर, आयुक्त साहेब व सचिव साहेब, सन्माननिय सदस्य श्री. रविंद्र बागुल यांनी जो प्रश्न विचारला आहे त्याबाबत स्थायी समितीने दिनांक १६/१०/२००८ रोजी ठराव पारीत करण्यात आलेला आहे. मुदत २१/८/२००८ ला संपुष्टात आली होती. त्यांना पुन्हा १२ महिन्याची मुदतवाढ मिळण्याकरीता या दोघांनी अर्ज केला होता. प्रत्येकी १४ चौरस मिटर अशी जागा रुपये २५०/— प्रतिमहा भाडे यानुसार स्थायी समितीने १२ महिन्याकरीता मुदतवाढ दिलेली आहे. स्थायी समितीच्या ठरावानुसारच त्यांना मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

**सदस्य श्री. रविंद्र बागुल :—**मा. महापौर महोदया, उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये २५०/— रुपये इतके भाडे आहे? आज बाहेर जर कुठेही दुकान घ्यायला गेले तर त्याचे भाडे ३०००/— रुपये प्रमाणे आहे.

बर ठिक आहे ते जावु दया, आपल्याला किती लोकांनी अर्ज दिलेले आहेत? त्यामध्ये कित्येक लोकांनी असे लिहिले आहे की आम्ही तीनपटीने भाडे देणार आहोत काही महिला बचत गटातील महिला आहेत त्यांनी याबाबत पत्र दिलेले आहे. साहेंबांनी सांगावे की किती पत्र आलेली आहेत? किती लोकांनी याबाबत मागणी केलेली आहे?

श्री. मिलिंद सावंत(उप–आयुक्त, मुख्यालय):–श्रमजीवी महिला बचत गट, उत्कर्ष महिला बचत गट, हरीओम महिला बचत गट, जयदिप महिला मंडळ, जयश्री महिला बचत गट, वृंदा बहुउद्देशीय शिक्षण सामाजिक संस्था असे सहा अर्ज आलेले आहेत.

सदस्य श्री. रविंद्र बागुल :–त्यांना का नाही देण्यात आले? महिला मंडळांना प्रथम प्राधान्य का दिले नाही? बचत गट कशासाठी तयार केले आहेत? दुसरा बाहेरचा माणुस येथे येवुन २५०/– रु. प्रतिमहा भाडे देवुन येथे कॅन्टीन चालवितो. मला हे सांगा की, चहा कॅन्टीन चालविण्यासाठी भाडयाने जागा मिळण्याबाबत आठ ते दहा महिला मंडळांनी आपणांस पत्र दिलेले आहे, परत आमदार साहेबांनी शिफारस केलेली आहे. महिला बचत गटांना जागा भाडयाने देण्यासाठी काही नगरसेवकांची पत्रे आहेत. त्यानुसार महिला बचत गटांना कॅटीनसाठी जागा भाडयाने न देता बाहेरच्या व्यक्तीस आपण जागा भाडयाने दिली आहे. त्या व्यक्तीचा महापालिकेशी काहीही संबंध नाही. तो येथे दादागिरीने धंदा करतो. म्हणुन बचत गटांना आपण जागा भाडयाने दया. आयुक्त साहेब, यावर खुलासा करावा.

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):–याबाबतचा निर्णय स्थायी समितीच्या ठरावान्वये झाला असल्याने आपण जे मुद्दे मांडले आहेत ते फेरविचारार्थ स्थायी समितीपुढे ठेवु.

सदस्य श्री. रविंद्र बागुल :–साहेब, स्थायी समितीपुढे ठेवाल हे मान्य आहे. परंतु १२ महिने पुर्ण झाल्यानंतर परत त्यास तुम्ही मान्यता देणार काय?

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):–यापुढे आपण निश्चित दक्षता घेवु. आता आपण जो प्रश्न विचारलात त्यामध्ये जे काही मुद्दे दिले आहेत ते स्थायी समितीच्या विचारार्थ आम्ही आमच्या मार्फत पाठवु.

सदस्य श्री. रविंद्र बागुल :–नाही साहेब हे चुकीचे आहे. पुढील कालावधीसाठी महिला बचत गटांना देण्यात यावे. देणार ना आपण? की या लोकांनाच मुदतवाढ देणार?

आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):–महिला बचत गटांना प्राधान्य देण्याचे जे धोरण शासनाचे आहे त्याचा अवलंब महापालिकेमार्फत निश्चितपणे केला जाईल आणि आपणही स्थायी समितीचे सदस्य आहात. त्यामुळे हा विषय स्थायी समितीपुढे ठेवु.

सदस्य श्री. रविंद्र बागुल :–महिला बचत गटांना देणार असे जे आपण म्हणालात त्याबद्दल मी आपले हार्दिक अभिनंदन करतो. बघु या पुढे काय होते ते?

महापालिका सचिव :– प्रश्न क्र. १६४ हा श्री. विनोद ठाकुर यांचा आहे.

प्रश्न क्र. १६४ :– उल्हासनगर शहरात विविध ठिकाणी होर्डिंग लावल्यामुळे शहर विद्रुपीकरण झाल्याचे दिसून येत आहे. तसेच इतर शहरात होर्डिंगमुळे जातीय दंगल झाली होती. तरी याबाबत खालील विचारलेल्या प्रश्नाची येत्या महासभेमध्ये सविस्तर माहिती मिळणेबाबत.

१) शहरात लावण्यात येणा–या होर्डिंगची परवानगी महानगरपालिकेकडुन घेण्यात येते का?

२) शहरात होर्डिंग परवानगी लावण्याबाबत अटी व शर्ती किंवा मुदत नमुद केली जाते का?

३) शहरातील हायमास्ट लावलेल्या ठिकाणी होर्डिंग लावण्यात आलेल्यांवर कोणती कार्यवाही करण्यात येणार का?

उत्तर :– १) उल्हासनगर महानगरपालिका शहरात होर्डिंग व बॅनर लावण्याची निविदा देण्यात आलेली आहे. कॅम्प नं. १,२,३ लक्ष्मीअॅडव्हाटायझिंग व ४ व ५ किंग अॅडव्हाटायझिंग यांना परवानगी देण्यात आलेली आहे.

२) शहरातील ग्राहक त्यांचा व्यवसाय व इतर बाबींच्या प्रसिध्दीसाठी आवश्यकतेनुसार नियुक्त संस्था/एजन्सी कडुन त्या मुदतीसाठी परवानगी घेतात.

3½ gk;ekLV fdaok b- fBdk.kh vukf/kd`r gksfMZax ykoY;kl egkuxjikfydk iniFk

foHkkxkekQZr dk;Zokgh dj.;kr ;srs-

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुरः– </u>ठिक आहे.

सदस्य श्री दिलीप गायकवाड, श्री. राजेश वानखेडे, श्री. रामचंद्र पारवानी, श्री. हिरानंद जग्यासी, श्री. धनंजय बोडारे व श्री. नरेंद्रकुमार ठाकुर हे सभागृहातून बाहेर गेले

<u>महापालिका सचिव :–</u> प्रश्न क्र. १६५ हा श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांचा आहे. ते यावेळी सभागृहात उपस्थित नाहीत त्यामुळे त्यांच्या प्रश्न आणि उत्तराची इतिवृत्तांतात नोंद घेण्यात येत आहे.

? <u>प्रश्न क्र. १६५ :–</u> येत्या महासभेत दशहरा मैदान, सैकशन नं. २३, उल्हासनगर–३ या भुखंडा संबंधित विचारलेल्या प्रश्नांची योग्य सुचक व समाधानकार उत्तरे मिळावीत तसेच सदर प्रश्नांची योग्य व सविस्तर चर्चा करुन खुलासा करण्यात यावा.

प्र.क्र. १ क) आपल्या संबंधित विभागाच्या दप्तरी दशहरा मैदान, सेक्शन नं. २३, उल्हासनगर–३ हा भुखंड कोणत्या नावे नोंद आहे (मैदान किंवा उदयान)?

ख) सदर मैदानाच्या भुखंडाला पुर्वी किती प्रवेशद्वार होते? सध्या त्या प्रवेशद्वारांची काय स्थिती आहे?

घ) सदर भुखंडाला संरक्षण भिंत बांधली होती का? किती उंचीपर्यंत होती? त्याची उंची दयावी? त्यावेळी सदर भुखंडावरील संरक्षण भिंत बांधण्यास किती खर्च आला होता?

च) सदर भुखंडाच्या संरक्षण भिंतीस प्रवेशद्वार असल्यास बंद केले आहे का? बंद केले असल्यास महापालिकेची परवानगी घेवुन बंद करण्यात आले आहे का?

छ) सध्या त्या मैदानाच्या भुखंडावर बांधकामाचे काम सुरु आहे का? त्यासाठी बांधकाम मंजुरी घेतली आहे का? त्यासाठी महापालिकेची मंजुरी घेणे आवश्यक आहे का? याबाबत सविस्तर माहिती मिळावी तसेच महासभेत याबाबत सविस्तर चर्चा करण्यात यावी.

<u>उत्तर :–</u> हा भुखंड मैदानाकरीता आरक्षित आहे.

सदर उदयानाच्या भुखंडाला दोन प्रवेशद्वार होते, सध्या दोन्ही प्रवेशद्वार चालु आहेत.

होय, त्या भुखंडाला काही भागात ३ फुट ते ४ फुट उंचीची संरक्षण भिंत तत्कालीन नगरपालिकेने बांधली होती. सदर भिंत एका वेळेस बांधलेली नव्हती. निरनिराळया कालावधीमध्ये बाधण्यात आलेली होती. या कामावर अंदाजित रुपये २.०० लक्षपर्यंत खर्च झााला होता.

या भुखंडाच्या एका भागात बगीचा विकसति करण्याकरीता त्या भागाच्या सभोवताली भिंत बांधण्यात आलेली असून त्याप्रमाणे दोन प्रवेशद्वारे आहेत. तथापी उदयानाच्या मागील भागात आता बांधलेल्या कुपनाच्या भिंतीमध्ये छोटे प्रवेशद्वारे ठेवलेले आहे. तसेच उदयानाच्या कामामध्ये लोकांच्या सततच्या वर्दळीमुळे अडथळा येत असल्याने तात्पुरत्या स्वरुपात सदर प्रवेशद्वार बंद केले आहे. तसेच स्थाानिक नगरसेवका श्रीमती इंदिरा उदासी व श्री. गोदुमल क्रिशनानी यांनी सदर प्रवेशद्वारे कायमचे बंद करण्याकरीता पत्राद्वारे मागणी केलेली आहे.

सध्या याठिकाणी उदयान विकसित करण्याचे जसे की, जॉगिंग ट्रॅक, वॉचमन केबीन, बगीच्यांचे कर्बींग व जमिनिचे सपाटीकरण ही कामे सुरु असून त्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ डी अंतर्गत प्रशासकिय व वित्तीय मंजुरी घेतली आहे. सध्या त्या उदयानाचे सुशोभिकरणाचे काम चालु आहे. आणि पंचायत हॉलचे लगत लायब्ररीचे कामास प्रशासकिय व वित्तीय मंजुरी प्राप्त झाली असून कार्यारंभ आदेशही देण्यात आलेले आहेत.

<u>महापालिका सचिव :–</u> प्रश्न क्र. १६६ हा श्री. दिलीप गायकवाड यांचा आहे. ते यावेळी सभागृहात उपस्थित नाहीत त्यामुळे त्यांच्या प्रश्न व उत्तराची इतिवृत्तांतात नोंद घेण्यात येत आहे.

**प्रश्न क्र. १६६ :—** टिलसन मार्केट, उल्हासनगर–३ या बांधकामाबाबत खालील प्रश्नावर महासभेत चर्चा होवून सविस्तर माहिती मिळणेस विनंती आहे.

प्र. क्र. १ अ) सदर बांधकामास महापालिकेने परवानगी दिली होती का? कधी दिली होती? परवानगी दिली असल्यास परवानगी आदेशाची सत्यप्रत मिळावी? सदरची परवानगी महापालिका प्रशासनाने रद्द केली आहे का? कश्याच्या आधारे परवानगी रद्द केली आहे? परवानगी रद्द केली असल्यास परवानगी रद्द करणेची कारणे कोणती? सदरची परवानगी केव्हा रद्द करण्यात आली? परवानगी रद्द केली असल्यास संबंधीत ठिकाणी दुरुस्ती बांधकाम सुरु आहे का? सदर कामास कोर्टाचा स्टे आहे का? जय शंकर बारचे मागे तळमाळा अधिक दोन माळयाचे इमारतीचे दुरुस्तीचे बांधकामाजवळ जवळ पुर्णत्वाास असून सदरचे बांधकाम टिलसन मार्केट या इमारतीमध्ये समाविष्ट आहे का? सदर बांधकामावर कोर्टाचा स्टे असेल तर सदयस्थितीत सुरु असलेले बांधकामा कोणाचे परवानगीने सुरु आहे? सदरचे बांधकाम निष्कासनासाठी गेलेल्या अभियंत्यास मारहाण करण्यात आली होती का? मारहाण प्रकरणी महापालिका प्रशासनाने कोणती कारवाई केली?

**उत्तर :—** सदर बांधकाम दुरुस्ती परवानगीस हया कार्यालयातुन दिनांक २५/६/२००८ रोजी देण्यात आलेली होती व त्याची प्रत सोबत जोडलेली आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधीनियम १९६६चे तरतुदनुसार सदर ठिकाणी वाढीव बांधकाम केल्याचे निदर्शनास आल्याने तसेच दुरुस्ती परवानगीबाबत नगरसेवकांनी तक्रार दिल्याने सदरची दुरुस्ती परवानगी रद्द करण्यात आलेली आहे.

दिनांक ४/७/२००८ रोजी दुरुस्ती परवानगी रद्द करण्यात आली.

तपशिल उपलब्ध नाही.

होय

होय

सदर बाबतीत कोर्टाचा स्टे आहे व विकासक स्वत: काम करीत असल्याने त्यांच्या विरुध्द कोर्ट कॅटेम्प दाखल केले आहे.

हो उर्वरित माहिती सामान्य प्रशासन विभागाशी संबंधीत आहे.

**महापालिका सचिव :—** प्रश्न क्र. १६७ हा श्री.बी.बी. मोरे यांचा आहे.

**प्रश्न क्र. १६७ :—** अ) रॉयल रेसिडेन्सी उल्हासनगर–१ या परिसरात बनलेल्या इमारती या सर्वांना महापालिकेतर्फे परवाना दिला आहे का? व दिला असेल किंवा नाही याचा खुलासा व्हावा तसेच त्याठिकाणी मोठा नाला होता तो नाला देखिल बुजवण्यात आला व मोठ–मोठाल्या टोलेजंग दोन इमारती बनल्या त्या कश्या बनल्या त्या एरियातून अर्धे उल्हासनगरचे सांडपाणी व पावसाचे पाणी नाल्यातुन जाते त्या नाल्यावर ब्रीज कसा बनला? त्याला परवाना महापालिकेने दिला का? रॉयल रेसिडन्सी या ठिकाणी मोठमोठया टोलेजंग इमारती बनल्या त्या इमारतीला महापालिकेचा परवाना आहे का? असल्यास तो कधी व कोणत्या अटीवर देण्यात आला?

ब) मोठया नालावर ब्रीज बनला त्याला परवाना दिला आहे का? व दिला असेल तर महापालिकेच्या कोणत्या नगरसेवकाच्या फंडातून पास करण्यात आला?

d½ ,d bekjr cuyh rsFks nwljk ,d ukyk gksrk rks cqtoqu bekjr cufoyh rh d'kh cuyh o rhyk ijokuk

dlk fnyk ;k loZ xks"Vhapk ;sR;k egklHksr ppkZ gksowu [kqyklk Ogkok-

**उत्तर :—** होय. विकासकाने इमारत बांधकाम परवानगीसाठी सर्व कागदपत्रासह प्रस्ताव सादर केल्याने त्यास इमारत बांधकाम परवानगी देण्यात आली आहे.

नाल्यावर ब्रीज बनविण्यासाठी या विभागाकडुन परवानगी दिली नाही.

या विभागाकडुन परवानगी दिली नाही.

होय. विकासकाने इमारत बांधकाम परवानगीसाठी सर्व कागदपत्रासह प्रस्ताव सादर केल्याने त्यास इमारत बांधकाम परवानगी देण्यात आली आहे.

नाल्यावर ब्रीज बनविण्यासाठी या विभगाकडुन परवानगी दिली नाही.

<u>**सदस्य श्री. बी.बी. मोरे:—**</u> सचिव साहेब, कृपया जरा प्रश्न वाचुन दाखविला जावा.

<u>**महापालिका सचिव :—**</u> आपला प्रश्न रॉयल रेसिडेन्सी उल्हासनगर—१ या परिसरात बनलेल्या इमारती व नाल्या संबंधी आहे.

<u>**सदस्य श्री.बी.बी. मोरे :—**</u>उल्हासनगरमध्ये झोपडी दुरुस्तीसाठी परवानगी मिळत नाही. बिना परवानगी कुणी बांधकाम केले तर ते बांधकाम निष्कासित केले जाते. परंतु येथे मधुबन हॉटेलच्या बाजुला त्याठिकाणी रिजेन्सी क्वाटर बनवुन मोठ, मोठया इमारती तेथे बांधण्यात आलेल्या आहेत आणि आजही इमारती बांधल्या जातात. त्याठिकाणी मोठा नाला होता. तो बुजवुन त्याठिकाणी पुन्हा एक इमारत उभी केली आहे. त्याबाबत मला एवढेच म्हणायचे आहे की उल्हासनगर शहरामध्ये इमारती बांधल्या जातात, परंतु सर्व सामान्य माणासास घराची किरकोळ दुरुस्ती करायची झाली तर ती करता येत नाही हे बरोबर नाही. आणि म्हणुन मी हे सर्व कायदेशीर रित्या दाखविलेले आहे. मी १९६२ पासुन उल्हासनगर शहरामध्ये राहतो. दुस—या लोकांना सनद मिळत नाही, पण यांना सनद मिळते , ती मिळते कशी? आणि टोलेजंग इमारती उभ्या राहतात, कश्या उभ्या राहतात? आणि म्हणुन याठिकाणी माझी अशी हरकत आहे की, या इमारतीचे बांधकाम होत असतांना त्यांना बांधकाम परवानगी दिली कशी? कोणत्या आधारावर परवानगी देण्यात आली? यासाठीच मी असे म्हणतो की, त्यांच्या संबंधीत कागदपत्रांची तपासणी केली जावी. त्याठिकाणी जो नाला होता त्या नाल्यातुन संपुर्ण शहरातील पाण्याचा जो निचरा होत होता, तो नाला बंद झाल्यामुळे अमन सिनेमाच्या परिसरात पाणी साचेल आणि त्या परिसरातील लोक त्रस्त होतील. एवढा मोठा नाला बुजवुन रिजेन्सी वाल्यांनी इमारत उभी केली आहे आणि तेथे एक पुल बाधंण्यात आलेला आहे. तो बांधतांना त्यांनी महानगरपालिकेची परवानगी घेतलेली नाही. आणि अशा प्रकारे जर काही लोक बांधकामे करत असतील तर त्यामुळे शहराला धोका आहे. प्रत्येक वर्षी त्याठिकाणी पाणी साचते. त्यामुळे शेजारील झोपडपट्टी व अमन सिनेमा आणि आजुबाजुच्या सोसायटयांच्या परिसरात पाणीच पाणी असते. आणि असे असतांना महानगरपालिका जर डोळे झाक करत असेल तर ते बरोबर नाही. मी १९९७ मध्य मी नगरसेवक म्हणुन निवडुन आलो होतो. त्यावेळी प्लॉट नं. ६१९ वर गरुडाच्या आकाराचे बाधंकाम करण्यात आले होते ते बाधंकाम पूर्णपणे तोडून ती सुंपर्ण जागा ताब्यात घेण्याची तयारी केली होती मी सांगितले होते की जोपर्यंत तो गरुड काढत नाही तोपर्यंत मी महासभा चालवु देणार नाही. त्याठिकाणचा गरुड काढला आणि ती जागा मोकळी ठेवली होती. आज त्याठिकाणी काही लोकांना पर्यायी जागा म्हणुन महानगरपालिकेने जागा दिलेली आहे. तेथे काही लोक बसलेले आहेत. एवढा मोठा नाला बुजवुन त्याठिकाणी आलीशान आणि टोलेजंग अशी इमारती बांधुन त्याठिकाणी पुल बांधला आहे. तो पुल काढुन टाकण्यात यावा एवढीच माझी हरकत आहे. तो पुल जर या पावसाळयात काढला नाही तर आजुबाजुच्या सर्व झोपडपट्टयांमध्ये आणि सोसायटयांमध्ये पाणीच पाणी होईल आणि काही लोक वाहुन सुध्दा जातील. एवढया मोठया प्रमाणावर तेथे पाणी येते. म्हणुन सर्व सदस्यांना आणि आयुक्तांना माझी वैयक्तीकपणे विनंती आहे की, तुम्ही त्याठिकाणी सर्व्हे करावा व पुल काढुन टाकावा एवढीच माझी विनंती आहे.

<u>**आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—**</u>पुलाच्या संदर्भात सन्माननिय सदस्यांनी आता जी विनंती केली आहे, त्या अनुषंगाने पाहणी करुन सात दिवसाच्या आत अहवाल देण्याबाबतीत शहर अभियंता यांना मी आदेश देतो. आणि त्या अनुषंगाने जी काही कार्यवाही केली असेल त्याची माहिती सभागृहाला आणि आपणांस दयावयास सांगतो.

<u>**महापालिका सचिव :—**</u> प्रश्न क्र. १६८ हा श्रीमती जयश्री सुर्वे यांचा आहे.

**?** <u>**प्रश्न क्र. १६८ :—**</u> उल्हासनगर महानगरपालिकेअतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांना वरीष्ठ लिपीक, कनिष्ठ लेखापरिक्षक, रोखपाल, जकात निरिक्षक, उपलेखापाल, उप लेखापरिक्षक व इतर पदावर पदोन्नती देणेचा प्रस्ताव दिनांक १२/११/२००८ व २६/१२/२००८ च्या महासभेत ठराव क्रमांक. ४० दिनांक २०/११/२००८ अन्वये मान्यता मिळाली असून सबंधीत कर्मचाऱ्यांना दिड महिन्याचा कालावधी सपुष्ठात येवूनही अद्यापपर्यंत पदोन्नतीचे आदेश मिळालेले नाहीत. पदोन्नतीचे आदेशास विलंब होणेची कारणे काय आहेत ? तसेच श्री.श्याम लोकवानी हे सहा. आयुक्त पदासाठी सेवाजेष्ठ नसतांना अपात्र उमेदवार आहेत हे माहित असून देखील त्यांना मात्र सहा.आयुक्त पदी त्वरीत पदोन्नतीचे आदेश देणेत आले ? या मागची कारणे काय आहेत ? किंती रुपयांचा व्यवहार झाला आहे ? हा पदोन्नतीस पात्र इतर संबधीत कर्मचाऱ्यांवर अन्याय नाही का ? याबाबत सविस्तर माहिती मिळणेस विनंती आहे.

<u>उत्तर :–</u> उल्हासनगर महानगरपालिका महासभा ठराव क्र. ४० दिनांक २०/११/२००८ नुसार पात्र कर्मचा–यांना उप स्थानक अधिकारी, लिडिंग फायरमन, रोखपाल, पंपचालक, मिस्त्री, गवंडी या पदावर दिनांक १६/२/२००९ रोजीच्या आदेशान्वये एकुण १६ कर्मचा–यांना पदोन्नती देण्यात आली आहे.

सदर पदोन्नतीबाबत शासनाकडे तक्रार दाखल झाल्याने पदोन्नतीचे आदेश देण्यास विलंब झालेला आहे.

श्री. श्याम खेमचंद लोकवानी यांना सहा. आयुक्त या पदावर पदोन्नती देण्यात आलेली नाही. त्यांना प्रशासकिय कामाकाजच्या दृष्टीने सहा. आयुक्त या पदाचा प्रभारी कार्यभार सोपविण्यात आलेला आहे.

<u>सदस्य श्रीमती जयश्री सुर्वे:–</u> ठिक आहे.

<u>महापालिका सचिव :–</u> प्रश्न क्र. १६९ हा श्रीमती कविता सिरवानी यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. १६९ :–</u> १) उल्हासनगर–३ येथील दसरा मैदानास तदर्थ समितीच्या व महासभेच्या मान्यतेने स्व. मोहनदास बहिरानी, यांचा ठराव पारित करण्यात आला आहे का ?

२) असल्यास त्या ठिकाणी स्व. इंदिरा गांधी नांवाचा नाम फलक लावण्यात आला आहे का

३) असल्यास कोणत्या महासभेमध्ये तो पारित करण्यात आला आहे. त्याचा ठराव क्रमांक व दिनांक मिळावा.

४) तसेच नामफलकाचे उद्घाटन केव्हा व कोणाच्या हस्ते करण्यात आले ?

<u>उत्तर :–</u> होय

होय. स्व. इंदिरा गांधी नावाचा नाम फलक लावण्यात आला आहे.

महासभेने तो ठराव पारीत केलेला नाही. यासाठी स्थानिक नगरसेविका श्रीमती इंदिरा उदासी व नगरसेवक श्री. गोधुमल क्रिशनानी यांनी दिलेला प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात आलेला आहे.

सदर नामफलकाचे उद्घाटन केव्हा झाले हे कोणाला माहित नाही. सदर नामफलकाचे महापालिका प्रशासनातर्फे उद्घाटन झाल्याची कोणतीही माहिती नाही.

<u>सदस्य श्रीमती कविता सिरवानी:–</u> मा. महापौर, मा. आयुक्त आणि महापालिका सचिव साहेब, माझा प्रश्न असा आहे की, दसरा मैदान, उल्हासनगर–३ या उदयानास श्री. मोहन बेहरानी यांचे नाव देण्यास मंजुरी देण्यात आली होती. परंतु त्यास मोहन बेहरानी यांचे नाव न देता इंदिरा गांधी उदयान असे नाव देण्यात आले असे का?

<u>श्री. आर.बी. शिर्के (प्र. शहर अभियंता):–</u>सन्माननिय महापौरजी, मा. आयुक्त साहेब, मा. सचिव साहेब, व सर्व सन्माननिय सदस्य गण, सन्माननिय सदस्या श्रीमती कविता सिरवानी यांनी हा जो प्रश्न विचारला आहे, दसरा मैदान येथिल प्रवेशद्वारावर जो फलक लावण्यात आलेला आहे तो महानगरपालिकेच्यावतीने लावण्यात आलेला नाही.

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर :–</u>मा. महापौरजी आणि मा. आयुक्त साहेब, तो फलक जर महापालिकेच्यावतीने लावण्यात आलेला नसेल तर अशा प्रकारचा फलक कुणीही कोठेही लावु शकतो काय? अशा प्रकारची महानगरपालिकेने परवानगी दिली आहे काय? समजा उदया मी महानगरपालिकेसमोर दुसरा बोर्ड लावला तर आपणांस तो मंजुर असेल काय?

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>मा. महापौर महोदया, श्री. शिर्के साहेबांनी आताच सांगितले की, महानगरपालिकेने तो फलक लावला नाही तो दुस–या कुणी लावलेला आहे. जर महासभेमध्ये त्या ठिकाणच्या नामकरणाचा प्रस्ताव पारीत होतो ते त्यांच्या नजरेसमोर आहे, आणि त्याठिकाणी फलक लावलेला आहे. तर मग तो फलक काढण्याची महापालिकेची जबाबदारी नाही काय?

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर :–</u>दुस–या कुणीतरी फलक लावला असेल तरीही तो काढुन टाकण्याची महानगरपालिकेची जबाबदारी आहे की नाही?

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>उदया सकाळ कुणी कोठेही काहीही फलक लावणार? आणि लावलेला फलक काढणार, हे काय चालले आहे या शहरामध्ये?

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>मा. महापौरजी, एका अधिका–याने उभे राहुन सभागृहात अशा प्रकारचे उत्तर देणे हे योग्य आहे काय? यांचे कर्तव्य काय आहे? यांनी तो फलक काढावयास पाहिजे ना?

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर :–</u>तो अधिकारी कोण आहे? ज्याच्याकडे उप अभियंता, कार्यकारी अभियंता, शहर अभियंता अशा तीन तीन पदांचा कार्यभार आहे असा अधिकारी या प्रकारचे उत्तर देतो.

<u>सदस्य श्री.जीवन इदनानी :–</u>साहेब, महानगरपालिकेच्या बाहेर श्रीमान शिर्के महानगरपालिका असा प्रकारचा फलक लावा. चालेल काय?

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>श्री. शिर्के साहेब, तुम्हांला माहित आहे की, त्याठिकाणी फलक लावलेला आहे तो चुकीचा आहे तो काढण्याची जबाबदारी तूमची नाही काय? त्याबद्दल महासभेत आम्हांला तुम्हांला प्रश्न विचारावा लागतो. आणि आपण याचे सरळ सरळ उत्तर देता की तेथे दुस–याने फलक लावलेला आहे हे काय आहे?

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :–</u>तीन महिन्यापासुन किती तक्रारी आलेल्या आहेत?

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>जर तुम्हांला माहित आहे तेथे चुकीचा फलक लागलेला आहे आणि त्या संबंधीत विभागाचा कार्यभार तुमच्याकडे आहे परंत तुम्ही आम्हांला उत्तर देतात की त्याठिकाणी फलक लावलेला आहे तो आम्ही लावलेला नाही याचा अर्थ काय? आपली जबाबदारी झटकुन टाकायची असे काही आहे काय?

<u>श्री. आर.बी. शिर्के (प्र. शहर अभियंता):–</u>तो जो फलक लावलेला आहे त्याची आपण चौकशी करु.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>चौकशी करायची काही गरज नाही. महासभेत जर ठराव पारीत झालेला आहे तर तेथे लावलेला तो चुकीचा फलक तुम्ही काढु शकतात. तुम्ही आता म्हणता चौकशी करु. तुमची चौकशी होत राहिल त्या अगोदर तुम्ही तेथिल फलक काढुन टाका ती तुमची जबाबदारी आहे. आयुक्त साहेब याबाबतीत आपण उत्तर दयावे.

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर :–</u>तो फलक लावला कधी हे यांना माहित आहे काय? किती महिने झाले फलक लावुन? फलकावरील त्या नावास आमचा विरोध नाही. परंतु ही जी चुकीची प्रथा पडत आहे तिला आमचा विरोधी आहे. हा फलक लावण्यात आलेला आहे २६ जानेवारीला.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :–</u>या गोष्टीस चार पाच महिने झाले आहेत आता या महासभेपुढे प्रश्न आला आहे.

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर :–</u>आता मे महिना चालु आहे. अजुनही तुम्हांला माहित नाही. कोणी कोठेही फलक लावतो. आणि तुम्हांला माहित नसते अधिकारी लोक काय करत आहेत? आयुक्त साहेब, आपण उत्तर दिले तर बरे होईल. हे साहेब उत्तर देतील तर ते सर्व उलटेच उत्तर देतील.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>मा. आयुक्त साहेब, उदया महानगरपालिकेच्या प्रवेशद्वाराशी ‘‘ही खाजगी मालमत्ता आहे’’ असा कुणीही फलक लावेल. ते माहित पडणार नाही. आपण विचार करत बसु हा फलक कुणी लावला आहे?

<u>सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u>श्री. शिर्के, आपण सांगा हा प्रश्न कोणत्या तारखेस विचारलेला आहे? याची फक्त आम्हांस माहिती दया.

<u>श्री. आर.बी. शिर्के (प्र. शहर अभियंता):–</u> तेथे जो फलक लावण्यात आलेला आहे त्याबाबतचा प्रस्ताव आलेला आहे. त्या प्रभागाच्या सन्माननिय नगरसेविका आहेत त्यांनी प्रस्ताव दिलेला आहे.

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर :–</u>या अगोदर तेथे काय नाव दिलेले आहे?

<u>श्री. आर.बी. शिर्के (प्र. शहर अभियंता):–</u>त्याबाबतचा प्रस्ताव आम्ही महासभेपुढे सादर करत आहोत. त्याबाबतचा प्रस्ताव तयार केलेला आहे. जे सन्माननिय सदस्य होते आता दिवंगत आहेत त्या सन्माननिय सदस्याचा नावाचा फलक त्याठिकाणी आत मध्ये लावण्यात आलेला आहे.

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर :–</u>फलक तर बाहेर लावला पाहिजे आत मध्ये कसा लावला? मला असे वाटते की आपण सभागृहाची दिशाभुल करत आहात. आपण उत्तर देण्यास सक्षम नाहीत. आपणांस माहित नाही, त्याठिकाणी २६ जानेवारीला फलक लावण्यात आलेला आहे.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :–</u>फलक आत लावला आहे, बाहेर लावला आहे हे काय आहे?

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :–</u>श्री. जीवनभाई एक मिनिट मी बोलु इच्छितो, श्री. शिर्के साहेब, तुम्ही ज्या दालनात बसता तेथे तुमच्या नावाच्या फलका शेजारी श्री.बी.बी. मोरे यांच्या नावाचा फलक लावला असे हे दोन दोन फलक लावले तर ते चांगले दिसेल काय? उदया या हॉलच्या शेजारी कुणीही फलक लावुन गेले तर ते चांगले दिसेल काय?

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर :–</u>लावा लावा, श्री.बी.बी. मोरे व श्री. आर.बी. शिर्के असे दोन–दोन फलक लावा.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>हे काय चालले आहे? तुम्ही म्हणता आम्ही चौकशी करु. शहानिशा करु. अहो, अनाधिकृत फलक काढुन टाकण्याचे तुम्हांला व महापालिकेला अधिकार आहेत. तेथे एकच फलक ठेवा ना तेथे? असे कसे चालले आहे तेथे?

<u>सदस्य श्री.विनोद ठाकुर :–</u>स्व. इंदिरा गांधीच्या नावाचा फलक आपण कोठेही लावु शकतो. परंतु अगोदर त्याठिकाणी त्या नावास मंजुरी देण्यात आलेली आहे. त्या नावाचा फलक त्याठिकाणी ठेवा. आणि स्व. इंदिरा गांधीच्या नावाचा फलक पाहिजे तर इतर ठिकाणी लावू त्या नावाला आमचा काही विरोध नाही.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u>साहेब, उत्तर दया उत्तर दया. आपण काय चौकशी करणार आहात? त्याचे उत्तर दया. आयुक्त साहेब उत्तर दया.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :–</u>साहेब हा महासभेचा अपमान आहे. आताच फलक काढला पाहिजे, महासभेचा मान ठेवा.

<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):–</u>महानगरपालिकेने ठराव केला आहे. त्यानुसार अंमलबजावणी करावी अशी नगरसेवकांची व प्रशासनाची माफक इच्छा शहर अभियंताकडुन असते.याबाबतीत शहर अभियंता यांनी आपली भुमिका योग्य प्रकारे पार पाडलेली नाही या निष्कषापर्यंत मी ही पोहचलो आहे. या संपुर्ण प्रकाराबाबतीत त्यांना कारणे दाखवा नोटिस देवुन त्यांच्याकडुन खुलासा घेवुन महासभेपुढे मी सादर करेन. आणि जो महासभेने ठराव केलेला आहे त्याची अंमलबजावणी करण्यासाठी मला आता सांगितले की, एक–दोन सदस्यांनी जी पत्रे दिलेली आहेत, त्यांचे बंधु देखील काल मला भेटले तर यामध्ये जो ठराव केलेला आहे त्याची अंमलबजावणी करण्यासाठी जी काही कारवाई आहे, ती विश्वासात घेवुन केली जाईल.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u> मा. आयुक्त साहेब, हे जे महापालिकेचे अधिकारी आहेत त्यांचे कामाची पध्दत काही वेगळीच आहे. मध्यंतरी शहरातील रस्ते, चौकांच्या नामकरणाचा प्रस्ताव आला होता. १ नंबर बसस्टॉप येथे स्वामी दयानंद सरस्वती यांचा पुतळा बसविण्यात आलेला आहे. तेथील चौकाच्या नामकरणाचा एवढा मोठा फलक लावण्यात आलेला आहे. त्यानंतरही यांचा अहवाल येतो की तेथे काहीही नाव दिलेले नाही. व येथे बेकायदेशीर फलक लावण्यात आलेला आहे याबाबत ते म्हणत आहेत की याबाबत माहिती गोळा करुन ते फलक तेथुन हटवु. अशाप्रकारे कामामध्ये त्यांची बेपर्वाई होत आहे. यावर अंकुश लावला

पाहिजे त्याचबरोबर यांच्यावर दंडात्मक कारवाई केली पाहिजे. असे संपुर्ण महापालिकेचे मत आहे आणि तसे केले नाही तर त्याविभागाचे काम योग्य प्रकारे चालणार नाही.

<u>सदस्य श्री. तुलसीदास वसिटा :—</u>त्या प्रभागाच्या संबंधीत नगरसेवकांनी स्व. श्रीमती इंदिरा गांधी प्रवेशद्वार असे नामकरणाबाबतचे पत्रही दिलेले आहे. व श्री. मोहन बेहरानी यांचे नाव आतिल भागात दिलेले आहे. संबंधीत नगरसेवकाची जर हरकत नसेल तर इतरांच्या हरकतीचा काही प्रश्नच उद्‌भवत नाही.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u>आयुक्त साहेब, आपणांस विनंती आहे की, आजच्या तारखेला जे नाव निश्चित करण्यात आलेले आहे त्या नावाचा तेथे फलक लावला पाहिजे. महासभेने सप्टेंबरमध्ये ज्या नावास मंजुरी दिली आहे त्याच नावाचा फलक तेथे लावला पाहिजे. याबाबतचे आश्वासन आज आम्हांस आपणाकडुन पाहिजे.

<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—</u>महासभेचा जो ठराव आहे, त्याची अंमलबजावणी करण्यासाठी जी काही आवश्यक कारवाई आहे ती शहर अभियंताकडुन केली जाईल.

<u>महापालिका सचिव :—</u> प्रश्न क्र. १७० हा श्री. बी.बी. मोरे यांचा आहे.

? **<u>प्रश्न क्र. १७०</u>** :— प्र.क्र. अ) महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार शासकीय अधिका—यांच्या बदल्या तीन वर्षात होतात हे नियमानुसार आहे. परंतु क्लास थ्री आणि क्लास फोर यांच्या बदल्या का होत नाही?

उदा. उल्हासनगर महानगरपालिकेत एका एका कर्मचा—यांला एकाच वार्डात १२ वर्ष झाली आहेत. परंतु त्यांची बदली केली जात नाही याचे कारण काय? जर क्लास थ्री किंवा क्लास फोर कर्मचा—यांची बदली किती वर्षा होते याचा जी आर आहे काय?

जर तसा जी आर नसेल तर त्याची बदली झालीच पाहिजे. जर बदली होत नसेल याला कारणीभूत कोण याचा देखील खुलासा महासभेत व्हावा.

प्र.क्र. ब) सफाई कर्मचा—यांबाबत उपाआयुक्त यांना वेळोवेळी पत्र देवून देखील बदली होत नाही याला कारण काय? हा देखील खुलासा व्हावा की उपायुक्त कोणाच्या दबावाखाली काम करतात?

प्र.क्र. क) उल्हासनगर महापालिकेस काही कर्मचारी क्लास वन असो किंवा क्लास फोर असो त्यांचेकडुन भ्रष्टाचार अथवा कोणतेही ऑफिस विरोधात काम केले गेले तर त्याला निलंबनाची ऑर्डर दिली जाते. परंतु ज्या कर्मचा—यांला निलंबनाची ऑर्डर मिळाल्यावर सहा महिन्याच्या आत त्याची इन्क्वायरी केली जाते. परंतु उल्हासनगर महापालिकेस त्याची साधी इन्क्वायरी होत नाही व त्याला बिना इन्क्वायरीने कामावर घेतले जाते म्हणजे तो कर्मचारी दोषी जरी असेल त्याची इन्क्वारी न झाल्यामुळे त्याला कामावर घेतल्यामुळे तो दोषी आहे किंवा नाही हे समजू शकत नाही व त्याला कामावर घेतले होते हे कुठल्या नियमाने याचा खुलासा महासभेत व्हावा.

<u>उत्तर :—</u> अ) दिनांक १२/५/२००६ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रकरण दोन ३(१) अखिल भारतीय सेवेतील अधिकारी आणि 'अ' 'ब' आणि 'क' गटातील राज्य शासनाचे सर्व सेवक यांच्याकरीता एखादया पदावर असण्याचा सामान्य कालावधी तीन वर्षाचा असेल. तसेच सदर राजपत्रातील प्रकरणे दोन ३(२) गट 'ड' मधील कर्मचा—यांसाठी सामान्यपणे पदावधी निश्चित केलेला नाही. सबब, उपरोक्त नियमांनुसार कर्मचा—यांची आवश्यकतेनुसार प्रशासकिय कारणास्तव बदली करण्यात येते.

ब) आरोग्य विभागामार्फत प्राप्त खुलासा पुढीलप्रमाणे— आरोग्य विभागामार्फत प्रशासकिय सोयीच्या दृष्टीने चतुर्थ श्रेणी मधील कर्मचा—यांच्या बदल्या करण्यात येतात.

क) महानगरपालिकेतील अपचारी कर्मचा—यांची त्यांचेवर ठेवण्यात आलेल्या दोषारोपांच्या स्वरुपाप्रमाणे विभागीय चौकशीच्या अधिन राहून मा. आयुक्तांचे निर्देशानुसार पुढील कार्यवाही करण्यात येते.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५६ (२) (ब) अन्वये अपचारी कर्मचारी यांच्यावर असलेल्या आरोपांची चौकशी होईपर्यंत त्या अधिका—याचे किंवा कर्मचा—यांचे निलंबन शास्ती असल्याचे समजण्यात येत नाही.

सदस्य श्री. दिलीप गायकवाड, श्री. राजेश वानखेडे, श्री. रामचंद्र पारवानी, श्री. नरेंद्रकुमार ठाकुर व श्री. धनंजय बोडारे यांनी सभागृहात पुन्हा प्रवेश केला.

**सदस्य श्री. बी.बी. मोरे:—** मा. महापौरजी, आयुक्त साहेब, मी वरीलप्रमाणे प्रश्न विचारलेला आहे, महाराष्ट्रात व कि संपुर्ण देशभरात शासन नियमानुसार सवंर्ग १ व सवंर्ग २ च्या अधिका—यांच्या दर तीन वर्षांनी बदल्या होत असतात. परंतु सवंर्ग ३ व सवंर्ग ४ मध्ये बहुतांश करुन या महापालिकेत एक—एक कर्मचारी १२—१२ वर्ष एका—एका प्रभागात जर काम करत असतो, त्याची बदली होत नाही त्याला कारण काय? का बदली होत नाही? १२,१२ वर्ष, १०,१० वर्ष ते काम करतात. त्यांची बदली का होत नाही असा मी प्रश्न विचारलेला आहे.

**आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—** या संदर्भात सन्माननिय सदस्यांना मी सांगु इच्छितो की, ज्यांना एकाच ठिकाणी तीन वर्ष झाली आहेत, सामान्यपणे जुन महिन्यामध्ये आपण बदलीची प्रक्रिया करत असतो. ज्यांचे तीन वर्ष झालेले आहेत त्यांची बदलीची प्रक्रिया पुर्ण करु असे मी आपणांस आश्वासन देतो.

**सदस्य श्री.बी.बी. मोरे :—** ठिक आहे. दुसरे असे आहे की त्यामध्ये आज प्रत्येक प्रभागात सफाई कामगार आहेत मी १९९७ मध्ये नगरसेवक होतो, त्यावेळेस जे सफाई कामगार प्रभागात होते तेच आज तेथे आहेत आज त्यांची बदली होत नाही. कारण ते काम बरोबर करत नाहीत, किंवा वेळेवर येत नाहीत किंवा स्वच्छता बरोबर ठेवत नाहीत आम्ही वेळो वेळी उप—आयुक्त, आरोग्य यांना तक्रार केलेली असून देखील त्यांच्या बदल्या करत नाहीत. त्यांना वेळो वेळी विचारले आहे की जर हा कर्मचारी वेळेवर कामावर येत नसेल तर त्याच्यावर काय कारवाई केलेली आहे? श्री. गायकवाड म्हणुन माझ्या प्रभागात एक सफाई कर्मचारी गेल्या सहा महिने गैरहजर आहे, त्याच्यावर काहीही कारवाई केलेली नाही. प्रभागात १४ सफाई कामगार आहेत परंतु त्या १४ कामगारांमधुन फक्त एक किंवा दोनच कामगार हजर असतात. तर तेथिल नगरसेवकाने काय करायचे? मी वेळोवेळी पत्र दिलेले आहे की हे जे कर्मचारी बेजबाबदारपणे वागत असतील, तर त्यांच्याबाबतीत काय केले पाहिजे? म्हणुनच सवंर्ग ४ च्या बाबतीत मी विशेष एक सूचना केलेली आहे. असा जर तो बेजबाबदार वागत असेल तर त्याला ७६ प्रभागामध्ये बदली केली पाहिजे. कारण त्यास समजले पाहिजे की मी कामात काहीतरी कुचराई केली म्हणुन माझी बदली करण्यात आली तो सुधारेल तरी. मला दुसरे काही म्हणायचे नाही. तो कर्मचारी सुधारला पाहिजे. तो पगार घेतो, त्याने वेळेवर कामावर गेले पाहिजे. सात साडेसात वाजेची कामावर येण्याची वेळ आहे ते साडे आठ नऊ वाजता कामावर येतात. कामावर का आले नाही अशी विचारणा केली तर म्हणतात साहेब घरी काम होते. परंतु शनिवार सुट्टी, रविवारी सुट्टी असून सोमवारी कामावर येत नाहीत? तर तो नगरसेवक त्या प्रभागामध्ये काय करणार? लोकांच्या शिव्या खाणार? आज डॉ. सावंत साहेब येथे उपस्थित नाहीत म्हणुन सचिव साहेब उत्तर देत आहेत. डॉ. सावंत साहेबांनी येवुन सांगितले पाहिजे अशी माझी विनंती आहे. काल मी चर्चा देखिल केली होती की साहेब, माझ्या प्रश्नाला तुम्ही उत्तर दिलेच पाहिजे परंतु ते आज आले नाहीत. आम्ही नगरसेवक कितीही कामात असलो तरी महासभेला आम्ही हजर राहतो. पाच वर्षामध्ये मी एकाही महासभेत गैरहजर राहिलो नाही. का तर आम्ही आज्ञा पाळतो, आणि काम करतो. आम्ही किती मानधन घेतो? आम्ही ४०००/— रुपये घेतो. आणि आमचे उप—आयुक्त किती पगार घेतात? ते सांगणे सोडुन दया. ते गलेलठ्ठ पगार घेतात परंतु ते वेळेवर कामावर येत नाहीत. ही एक खेदाची गोष्ट आहे.

मा. सदस्या श्रीमती मिना सोनेजी या सभागृहातुन बाहेर गेल्या.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—** आयुक्त साहेब, या मुद्दयाशीच एक मिळता जुळता प्रश्न आहे, आज नाला सफाईचे काम चालु आहे. प्रत्येक प्रभागात नाला सफाईसाठी १०—१० कर्मचारी आपण दिले आहेत. ही प्रथा १९९७—९८ मध्ये चालु झाली होती. त्यावेळेस प्रत्येक प्रभागामध्ये २०—२०. कामगार दिले होते. त्यावेळी ७५ प्रभाग होते व १७०० लोकांची आवश्यकता असतांना जवळ जवळ ३००० लोक कामासाठी आपणाकडे आले होते. त्यापैकी प्रत्येक प्रभागात २०—२० कामगार नेमुन बाकीच्या लोकांना आपण परत केले होते. परंतु आज परिस्थिती आहे की, १०—१० कामगारांची आवश्यकता असतांना २,३ प्रभाग सोडुन कोणत्याही प्रभागात १० कामगार अदयाप मिळत नाहीत. काही प्रभागांमध्ये ६ तर काही प्रभागांमध्ये ७ असे कामगार आहेत. आमचे जे उप—आयुक्त आहेत, त्यांचे या बाबीकडे काहीही लक्ष नाही. एखादया प्रभागात लोक कमी आलेत, जास्त आले किंवा १० कामगारांची भरती झाली किंवा नाही, प्रभागात सफाई झाली किंवा नाही झाली याकडे ना कोणत्याही स्वच्छता निरिक्षकाचे लक्ष आहे, ना उप—आयुक्तांचे लक्ष आहे. मी असे सांगतो की, ७६ च्या ७६ प्रभांगांपैकी ४० प्रभाग असे नसतील की जेथे १० च्या १० कामगार कामावर आहेत.

कामगारांची तक्रार आहे की आम्ही कामावर यावे तर कोणत्या प्रकारे यावे? आम्हांला वेळेवर पगार मिळत नाही. त्यामुळे काही प्रभागांमध्ये ५,६,७ असे कामगार कामावर आलेले दिसतात. व पावसाळा डोक्यावर येवुन ठेपला आहे. लहान–लहान नाले भरले आहेत. पावसास सुरुवात झाली तर घरामध्ये पाणी शिरेल. यासाठी आपण उप–आयुक्तांना निर्देश दया की, ज्या प्रभागांमध्ये ६–६ कामगार आहेत त्याठिकाणी १० कामगारांची पुर्तता करुन दया. व त्यांनी स्वत: पाहणी करुन १० कामगार कामावर आहेत की नाहीत याची खात्री करुन घ्यावी. अशा प्रकारच्या तक्रारी ब–याच येत आहेत. तर या तक्रारींकडे जरुर लक्ष दया व त्या कामगारांना पगार देण्यास उशिर का होत आहे? व ते कामास का येत नाहीत? याबाबीकडे सुध्दा लक्ष दिले जावे.

मा. सदस्या श्रीमती जया माखिजा व श्रीमती निना नाथानी हया सभागृहातुन बाहेर गेले. 

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :</u>–सन्माननिय सदस्यांनी आता जो मुद्दा उपस्थित केला त्या मुद्दयाबाबतीत मी बोलणारच होतो. महानगरपालिकेचे जे कायम स्वरुपावरील कामगार आहेत त्यांचा पगार नियमित वेळेवर होतो. परंतु हंगामी स्वरुपात जे १०–१० कामगार आपण नाले सफाईसाठी घेतलेले असतात, ते कंबरभर चिखलामध्ये काम करत असतात. व मोठया प्रमाणावर नाल्यांमधुन गाळ काढतात. परंतु त्यांना वेळेवर पगार का होत नाही? त्याबद्दल मी येथे जाहिरपणे सांगतो. आयुक्त साहेब, तुम्ही सूचना दया. तसेच जे स्वच्छता निरिक्षक आहेत, ते हंगामी सफाई कामगारांचे वेळेवर पगार देयक तयार करत नाहीत, त्यामुळे त्यांना वेळेवर पगार मिळत नाही. यामध्ये लेखा विभागाची किंवा लेखा अधिकारी श्री. दिघे साहेबांची काहीही चुक नाही. श्री. दिघे साहेब म्हणतात माझ्याकडे जर पगाराचे देयक आले तर मी ताबडतोब चेक काढेन. चेक काढण्यास सांगेन. व असे श्री. दिघे साहेबांनी हजार वेळेस सांगितले आहे तसे केलेही आहे परंतु स्वच्छता निरिक्षक हे महिनाभर मजा मारत असतात आणि ऐन वेळेस पगार देयक तयार करण्यास घेतात. ते चुकीची पगारदेयके तयार करतात. त्यामुळे ती तीन तीन वेळा परत पाठविली जातात. स्वच्छता निरिक्षकांनी प्रभागातील साफसफाईबाबत पाहणी करायची असते परंतु ते तेही करत नाहीत. आपल्या प्रभागामध्ये किती कामगार कामावर आले आहेत? किती कामगारांनी हजेरी भरली आहे. परंतु ते हे काम करत नाहीत. ते आपल्या मोटरसायकलवर तीन चार प्रभागांमध्ये फे–या मारतात या व्यतिरिक्त ते काहीही करत नाहीत. श्री. जमनादास पुरस्वानी यांनी आता जे सांगितले ते बरोबर आहे. १९९७–९८ मध्ये १०–१० कामगार कामावर येत होते. परंतु आता? मी प्रत्येकाच्या घरोघरी गेलो, व सांगितले की, बाबांनो कामावर या. आता तुम्हांला १४० रुपये पगार आहे, पहिले १०० रुपये पगार होता. ते म्हणतात की आम्हांला वेळेवर पगार मिळत नाही, तुम्ही वेळेवर पगार देणार तर आम्ही कामावर येतो. म्हणजे अशी परिस्थीती स्वच्छता निरिक्षकांमुळे होत आहे. म्हणुन त्यांच्यावर देखील देखरेख ठेवली पाहिजे. एवढीच माझी सूचना आहे.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :</u>–मा. महापौरजी, आता श्री. जमनादास पुरस्वानी जे म्हणाले ते खुपच चांगले म्हणाले सर्वांना भेडसावणारा हा प्रश्न आहे. हे जे कामगार लोक येतात, ते सर्वांच्या प्रभागात सारखे नाहीत. काही प्रभागांमध्ये ४ काही प्रभागात ५ कामगार येतात. माझ्या प्रभागात २० लाखाचे नगरसेवक निधीतुन फुटपाथचे काम चालु आहे. शहाड रेल्वे स्टेशनच्या बाजुला एक कल्व्हर्ट आहे यास खोलण्यासाठी मी वारंवार तक्रार केलेली आहे की, फुटपाथ खोलुन दया व त्यातील कल्व्हर्ट काढुन दया. व्यापारी लोकांच्या घरात, दुकानात पाणी जाते. डॉ. सावंत साहेबांना याबाबतीत मी दोन–तीन वेळा सांगितले, ते नेहमी म्हणतात मी येतो, मी येतो, कुणीही अधिकारी तेथे आला नाही. कुणीही अधिकारी काम करत नाही. सार्वजनिक बांधकाम विभागातील नगरसेवक निधी आहे त्यातुन ते काम चालु आहे. परंतु ते काम अर्धवट राहिले आहे. जोपर्यंत नाल्यातील पाणी पास होत नाही तोपर्यंत तो फुटपाथ बनवुन फायदा काय? आम्ही वारंवार पत्र देतो. ठिक आहे पत्रांवर कार्यवाही होते परंतु त्यापुढची काहीच कार्यवाही होत नाही. कृपया करुन तेवढी कार्यवाही करावी.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :</u>–मा. महापौरजी, हा जो मुद्दा श्री. जमनादास पुरस्वानी यांनी उचलला आहे, तो गंभीर मुद्दा आहे, कारण पावसाळा केव्हाही येवु शकतो तर माझी आपणांस विनंती आहे की, त्यासाठी एक ठराविक एखादया अधिका–याला काम नेमून देण्यांत यावे. प्रत्येक प्रभागात १०–१० कामगार कामावर आहेत, एकुण ७६० कामगार काम करतात. परंतु ते कामावर आहेत की नाही याचे उत्तर कोण देणार? याबाबत आपणांस काही माहिती आहे?

<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):</u>–सर्व सन्माननिय सदस्यांनी जे प्रश्न विचारले आहेत, त्याचे क्रमानुसार उत्तर देण्याचे मी प्रयत्न करतो, सर्वप्रथम जे नाला सफाईचे काम सध्या चालु आहे त्यासाठी ३ मशिन व ७५०

सफाई कामगारांचा सध्या आपण उपयोग करत आहोत. ४१ नाले आपण साफ करत असतो, २२३ कल्व्हर्ट आपण साफ करत असतो. या २२३ पैकी १८० पेक्षा जास्त कल्व्हेट साफ झाले आहेत आणि येत्या दोन दिवसात उरलेले सर्व कल्व्हेट साफ केले जातील. दुसरे असे की, वेळेवर पगार काढण्याबाबतीत श्री. मोरे साहेब व इतर सन्माननिय सदस्यांच्या ज्या सूचना होत्या. त्या अनुषंगाने स्वच्छता निरिक्षकांना व्यक्तीश: जबाबदार धरुन एक महिना झाला की पाच दिवसाच्या आत देयक रक्कम दिली जाईल त्याप्रकारच्या सूचना संबंधीतांना आम्ही दिलेल्या आहेत. तिसरे असे की श्री. रविंद्र बागुल यांनी शहाड येथिल कल्व्हेट बाबत सांगितले आहे ते काम उदयाच्या दिवसात करण्याबाबतीत सूचना संबंधीतांना देत आहे. आणि आपण जे म्हटले होते की अधिकारी व कर्मचारी कामावर येत आहेत काय? यासाठी दैनंदिन अहवाल आयुक्तांच्या कार्यालयात मागविला जातो त्याच्या प्रती सर्व पदाधिका–यांना देण्याबाबतीत मी सूचना देतो. रोज कुठल्या प्रभागामध्ये किती कर्मचारी आलेत त्यांनी कुठले कल्व्हेट साफ केले, कुठले नाले साफ केले याचा दैनंदिन अहवाल हा आपण घेत असतो त्यांच्या प्रती सर्व पदाधिका–यांना देणेबाबतीत मी सूचीत करीत आहे. आणि त्याच बरोबर प्रभाग अधिकारी जे आहेत, सर्व प्रभाग अधिकारी प्रभागातील सर्व नाला सफाई कामांबाबत दैनंदिन आढावा घेणार आहेत. त्याचबरोबर सार्व. बांधकाम विभागाचे जे कनिष्ठ अभियंता व उप अभियंता आहेत ते सुध्दा नाला सफाई कामाचा दैनंदिन आढावा व अहवाल देणार आहेत. त्याच बरोबर मी स्वत: व अतिरिक्त आयुक्त व उप–आयुक्त, मुख्यालय हे सर्वजण आम्ही नाला सफाई कामाचा दैनंदिन आढावा घेणार आहोत. त्या संदर्भात सन्माननिय सदस्यांच्या काही सूचना असतील त्या सूचनांवर त्वरीत कार्यवाही आम्ही करु असे मी आपणाला आश्वासन देतो.

**महापालिका सचिव** :–प्रश्नोत्तराचा कालावधी संपला.

कृपया लक्ष दया. ४ लक्षवेधी सूचना प्राप्त झाल्या असून..................

<u>सदस्या श्रीमती मालती करोतिया :</u>–मा. महापौर, आयुक्त साहेब, व सचिव साहेब, वालधुनी नदीचा जो नाला आहे, ज्यास वालधुनी नदी म्हटले जाते त्यामध्ये किती कचरा आहे? त्याची आपण कधी पाहणी केली आहे?

<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):</u>–आता काम चालु केले आहे. २० टक्के काम पुर्ण केले आहे. पुढच्या १० दिवसात सर्व नाल्यांची सफाई केली जाईल.

<u>सदस्या श्रीमती मालती करोतिया :</u>–साहेब, मी काल पर्वाच तेथुन गेली असता पाहिले की नाल्यामध्ये किती तरी कचरा गोळा झाला आहे. नाला सफाईचे काम होत नाही.

<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):</u>–नाल्या सफाईचे काम जोराने चालु आहे. जेथे जेथे काम कमी झाले असेल त्याठिकाणी कामाचा वेग वाढविण्यात येईल. ३० मे च्या अगोदर सर्व नाल्यांच्या सफाईचे काम पुर्ण केले जावे अशा मी सर्व संबंधीतांना सूचना दिल्या आहेत.

<u>सदस्या श्रीमती मालती करोतिया:</u>–त्या नाल्यामुळे तेथिल झोपडपट्टया दरवर्षी बुडत असतात.

<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):</u>–तो नाला साफ केला जाईल.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :</u>–मा. आयुक्त साहेब, आपण जे नाला सफाईचे काम दिले ते एकाच व्यक्तीस दिले. हे काम जर चार वेगवेगळया ठेकेदारांना दिले तर शहरातील नाला सफाईचे काम चांगल्याप्रकारे होईल. मागील वेळेस काम बरोबर झाले नव्हते ती चुक आपण पुन्हा केली आहे. यामुळे त्रास होणार आहे.

<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):</u>–नाला सफाईचे काम चार वेगवेगळया ठेकेदारांना देण्याबाबत आपण जी सूचना केली आहे तीचा विचार या वेळेस करता आला नाही. आचार संहितेमुळे घाईघाईने आम्हांला निविदेची कार्यवाही करावी लागली. यापुढे प्रत्येक प्रभाग निहाय निविदा काढल्या जातील याची आम्ही दक्षता घेवु.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :</u>–नाला सफाई कामाचे जे व्हिडीओ शुटींग केले होते त्याची सी.डी आम्ही मागीतली होती ती अदयाप मिळाली नाही.

<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):</u>–व्हीडीओ शुटींगची सी.डी उपलब्ध करुन देण्याबाबत आदेश दिला आहे त्याचे काम चालु आहे, जेथे काम कमी केले गेले, कुणी अधिकारी तेथे गेले तर त्यास शिवीगाळ केली होती.

अतिरिक्त आयुक्त तेथे जावुन त्यास समजावुन आले होते. येथे काम करणे जरुरी आहे, जर नियम सोडुन काम केले जावु देणार नाही. आम्ही स्वत: तेथे उपस्थित राहु.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी :—</u>ठिक आहे.

<u>महापालिका सचिव :—</u>मा. महापौरांना ४ लक्षवेधी सुचना प्राप्त झाल्या असून त्या पुढील प्रमाणे आहेत.

लक्षवेधी सूचना क्र. १

सुचकाचे नाव:—श्री. गोविंदराम लुंड
अनुमोदकाचे नाव :—श्री. सुनिल गंगवानी

**विषय :—** दुरुस्ती परवानगी मिळणेबाबतची लक्षवेधी सूचना

लक्षवेधी सूचना क्र. २

सुचकाचे नाव:—श्री. मोहन साधवानी
अनुमोदकाचे नाव :— श्री. दिलीप गायकवाड

**विषय :—** पदोन्नतीच्या आदेशाबाबतची लक्षवेधी सूचना

लक्षवेधी सूचना क्र. ३

सुचकाचे नाव:—श्री. धनंजय बोडारे
अनुमोदकाचे नाव :— श्री. प्रकाश सावंत

**विषय :—** कर्मचा—यांची सेवानिवृत्ती जवळ येवूनही त्यांना पदोन्नती न देण्याबाबत लक्षवेधी

लक्षवेधी सूचना क्र. ४

सुचकाचे नाव:—श्री. धनंजय बोडारे
अनुमोदकाचे नाव :— श्री. प्रकाश सावंत

**विषय :—** मोकळे आरक्षित भुखंड ताब्यात घेण्याबाबत लक्षवेधी

या चार लक्षवेधी सूचनांपैकी मा. महापौरांनी केवळ दोन लक्षवेधी सूचनेस मान्यता दिली आहे. मा. महापौरांचे म्हणणे आहे की, चार लक्षवेधी सूचनेमधील दोन लक्षवेधी सूचना मागे घेण्यांत आल्या आहेत. उरलेल्या दोन लक्षवेधी सूचना स्विकृत करण्याचा त्यांना अधिकार आहे.

<u>सदस्य श्री. राजेश वधारिया :—</u>दोन लक्षतेधी, लक्षवेधींसाठी निर्धारीत केलेल्या वेळेनंतर मिळाल्या आहेत. लक्षवेधी दोन तास अगोदर दिली पाहिजेत. परंतु दोन लक्षवेधी उशिरा मिळाल्या आहेत. त्या आपण कश्या घेवु शकता हे नियमाच्या विरुध्द आहे. महापौरांचा जो काही आदेश असेल तो कायदयानुसार असला पाहिजे. कायदयाबाहेरचा असता कामा नये.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>लक्षवेधी देतांना ज्यावेळी वेळ लिहून दिली जात होती त्यावेळेस श्री. प्रकाश सावंत यांच्या घडाळयामध्ये १ वाजुन ५८ मिनिटे झाली होती. व ही लक्षवेधी स्विकारतांना लक्षवेधीवर जी वेळ लिहिण्यात आलेली आहे ती काय लिहिली आहे?

<u>महापालिका सचिव :—</u>२ वाजुन ५ मिनिटे.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u> सभागृहात जे घडयाळ आहे त्यातील वेळेत व माझ्या हातावरील घडयाळयाच्या वेळेत फरक आहे.

<u>सदस्य श्री. राजेश वधारिया :—</u>परंतु लक्षवेधी सूचना स्विकारतांना श्री. कुकरेजा यांनी किंवा ज्या कुणी लक्षवेधी सूचना स्विकारली असेल त्यांने जी वेळ लिहिली आहे ती २ वाजुन ५ मिनिटे अशी वेळ लिहिलेली आहे.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>श्री. वधारीयाजी मला बोलु दया.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u>व्यासपिठाच्या मागील भिंतीवर असलेल्या घडाळाच्या वेळेत आणि आमच्या घडाळातील वेळेत फरक आहे.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>तेच तर मी सांगत आहे, व्यासपीठामागील भिंतीवर असलेल्या घडयाळात सायंकाळचे ५ वाजुन ९ मिनिटे झालेली आहेत. आपल्या घडयाळयात आता किती वाजले आहेत? ५ वाजुन ९ मिनिटे बरोबर झाली आहेत काय? एक दोन मिनिटाची वेळं मागे पुढे होवु शकते. परंतु येथे जो विषय आहे तो आरक्षित भुखंडांविषयीचा आहे. आम्ही आरक्षित भुखंड वाचवु इच्छितो. आपण ते जर कुणास देवु इच्छित असाल तर दया. माझी काही हरकत नाही. लक्षवेधी सूचना स्विकारली नाही तरी काही नाही. येथे मुद्दा वेळेबाबतचा आहे. लक्षवेधी सूचना देण्याच्यावेळी माझ्या घडयाळात १ वाजुन ५८ मिनिटे झाली होती. त्यामुळे माझ्या हिशोबाने ती लक्षवेधी सूचना स्विकृत झाली पाहिजे. मी जी लक्षवेधी सूचना दिलेली आहे ती १ वाजुन ५८ मिनिटांनी दिलेली आहे.

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर :—</u>सभागृहातील दोन घडयाळांतील वेळेमध्ये फरक आहे. व्यासपीठामागील भिंतीवरील घडयाळयात ५ वाजुन १० मिनिटे झाली आहेत तर सभागृहाच्या प्रवेशद्वारावरील घडयाळयात ५ वाजुन १२ मिनिटे झाली आहेत.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>श्री. राजेश वधारियाजी आता आपल्या घडयाळयात किती वाजले ते सांगा?

<u>सदस्य श्री. राजेश वधारिया :—</u>माझे म्हणणे असे आहे की, जेव्हा आपण एखादया निवडणूकीसाठी नामनिर्देशन पत्र सादर करतो त्यावेळेस कुणाच्या घडयाळयातील वेळ पाहिली जाते? जो अधिकारी अर्ज स्विकारतो त्याच्या घडयाळयात किती वेळ झाली आहे? हे पाहिले जाते. आता लक्षवेधी स्विकृतीची वेळ लिहिली आहे २ वाजुन ५ मिनिटे अशी. तर आता सभागृहातील घडयाळाची वेळ, आपल्या घडयाळाची वेळ आणि माझ्या घडयाळयाची वेळ याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, श्री. राजेश वधारिया यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे, लक्षवेधी स्विकृतीची वेळ २ वाजुन ५ मिनिटे येथे लिहिलेली आहे ती चुकीची आहे. परंतु हा जो विषय आहे तो अतिशय महत्वपुर्ण आहे. जर विरोधी पक्ष एका लक्षवेधीस समर्थन देत असेल तर या लक्षवेधीचा विषय चांगला असल्यामुळे ही लक्षवेधी स्विकृत केली जावी.

<u>सदस्य श्री. धनजय बोडारे :—</u>नाही, आम्ही नैतिकतेने चालणारे आहोत. २ वाजुन ५ मिनिटांनी जर लक्षवेधी सूचना दिलेली असेल तर कायदयानुसार ती स्विकृत केली जावु नये. परंतु लक्षवेधीचा विषय आरक्षित भुखंडाबाबतचा होता. जे लोक महानगरपालिकेचे भुखंड हडप करतात, व वर्षानुवर्षे महानगरपालिकेची ही मिळकत अशीच पडुन आहे, तिला आपण साथ देवु पाहत आहात?

<u>सदस्य श्री. राजेश वधारिया :—</u>आपल्या लक्षवेधीचा विषय अतिशय गंभीर आहे. त्यासाठी मी माझी हरकत मागे घेत आहे. परंतु कायदयाचे नेहमी पालन झाले पाहिजे.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>कायदयाचे उल्लंघन व्हावे असे मी बोलत नाही. परंतु लक्षवेधी सूचना देतांना माझ्या घडाळयामध्ये १ वाजुन ५८ मिनिटे झाली होती. लक्षवेधी स्विकारणा—याने २ वाजुन ५ मिनिटे अशी वेळ लिहिलेली असल्याने लक्षवेधी सूचना स्विकृत केली नाही पाहिजे. बाकीच्या ज्या दोन लक्षवेधी सूचना आहेत त्या घेतल्या जाव्यात.

<u>महापौर:—</u> श्री धनंजय बोडारे यांनी दिलेल्या दोन्ही लक्षवेधी सुचनाना मी स्विकृती दिली असून माझा निर्णय अंतीम आहे. त्यात फेरफाराची काहीही शक्यता नाही.

**महापालिका सचिव :—**श्री. गोविंदरामजी लुंड, पहिली लक्षवेधी सूचना आपली आहे आपण ती सभागृहापुढे मांडावी. दुसरी आरक्षित भुखंडाविषयीची लक्षवेधी सूचना मा. महापौरांकडुन स्विकृत करण्यात आली आहे.

लक्षवेधी सुचना क्र. १ जीचे सुचक आहेत श्री. गोविंदराम लुंड व अनुमोदक आहेत श्री. सुनिल गंगवानी

लक्षवेधी सुचना याप्रकारची आहे.....................

---

## लक्षवेधी सूचना क्रमांक १

सूचकाचे नाव :— श्री. गोविंदराम लुंड

अनुमोदकाचे नाव :— श्री. सुनिल गंगवानी

**विषय :—दुरुस्ती परवानगी बाबत.**

उपरोक्त विषयाबाबत आपणांस कळविण्यांत येते की, नागरीकांना नगररचना विभागाकडुन दुरुस्ती परवानगी दिली जात नाही. आता पावसाळा जवळ येत आहे. नागरीक घराच्या छप्परासाठी, भिंतींसाठी, घराची छत वाढविण्यासाठी किंवा इतर काही किरकोळ दुरुस्तीसाठी अर्ज करतात. परंतु त्यांना दुरुस्ती परवानगी दिली जात नाही. पावसाळा आता तोंडावर आहे, जर लोकांना दुरुस्तीसाठी परवानगी दिली नाही तर लोकांच्या घराचे छप्पर पडण्याची शक्यता आहे, भिंती पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे जिवीत व वित्त हानी होवु शकते.

तसेच काही धोकादायक इमारती आहेत, त्यांना जर दुरुस्ती परवानगी दिली नाही तर पावसाळयात ती कोसळण्याची किंवा स्लॅब कोसळण्याची शक्यता अधिक आहे. लोकांची जिवित व वित्त हानी टाळण्यासाठी त्यांना दुरुस्ती परवानगी देणे आवश्यक आहे. तरी मानवतेच्या दृष्टीकोनातुन सहानुभुतीपुर्वक विचार करुन दुरुस्ती परवानगी देण्याची प्रथा चालु करावी.

---

**सदस्य श्री. गोविंदराम लुंड :—**मा. महापौर महोदया आणि आयुक्त साहेब, मी आपणांस विनंती करतो की, गेल्या ६२ वर्षापासुन बॅरेकच्या ज्या खोल्या आहेत, त्यांतील काही खोल्यांचे पत्रे तुटलेले आहेत. अशा खोल्यांची दुरुस्ती करु दिली जात नाही. त्यांना घर दूरुस्ती परवानगी दिली जात नाही ती का दिली जात नाही. याबाबत खुलासा केला तर फार चांगले होईल. झोपडपट्‌टयांमधील काही घरे आहेत, त्यांना सुध्दा दुरुस्ती परवाना दिली जात नाही. ती का दिली जात नाही? तसेच काही लोकांचे बंगले आहेत, त्यांमध्ये गळती आहे. पावसाळयात पाण्याची गळती होते. त्यावर ते पत्रे लावु इच्छितात परंतु ते सुध्दा त्यांना लावु दिले जात नाहीत असे का? याबाबत जरा खुलासा केला जावा. कुठे अनाधिकृत बांधकाम होत असेल तर ते तोडले जावे किंवा त्यास दंड आकारला जावा. ते आपल्या हातात आहे. परंतु ज्या खोल्यांचे पत्रे तुटलेले आहेत अशा खोल्यांची दुरुस्ती करण्यासाठी परवानगी दिली जावी. कारण बरेचसे प्रभागवासी ही समस्या घेवुन आमच्या घरी येतात त्यांना आम्ही उत्तर देवु शकत नाही. याबाबत सर्व पक्षाचे नेते मंडळी महापौर, उप—महापौर, नगररचनाकार यांची आपण एक बैठक घेवुन याबाबतीत निर्णय घ्यावा व आठ दिवसात मला उत्तर दयावे. जय हिंद, जय महाराष्ट्र ।

सदस्य श्री. संजय बठिजा व श्री. नरेंद्रकुमार ठाकुर हे सभागृहातुन बाहेर गेले.

**सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—**मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त, सचिव आणि सन्माननिय सभागृह श्री. गोविंदराम लुंड यांनी लक्षवेधीद्वारे जी सूचना दिली आहे तीचे मी जोरदार समर्थन करतो. मागील ७—८ महिन्यापुर्वी हा विषय सभागृहापुढे आला होता. महासभेत त्यावर विस्तृत चर्चा झाली होती. आणि घर दुरुस्ती परवानगी दिली पाहिजे असे मत तयार झाले होते. दुरुस्ती परवानगीच्या नावाखाली जर काही अनाधिकृत बांधकामे होत असतील तर त्यांवर आयुक्त साहेबांचा अंकुश राहिला पाहिजे. जे किरकोळ दुरुस्ती करतात ज्यासाठी कायदयानुसार दुरुस्तीची परवानगी आवश्यक नाही, जसे की, प्लास्टर करायचे आहे, टाईल्स बदली करायचे आहे, अशी कामे करणा—या नागरीकांना महापालिका अधिकारी सतावतात. आता पावसाळा डोक्यावर

येवुन ठेपला आहे. ब—याचशा लोकांना आपल्या घरांचे तुटलेले पत्रे बदली करायचे आहेत, ते काम सुध्दा करु दिले जात नाही. तसेच गळत्या इमारतींची जी दुरुस्ती करायची आहे, हा मुद्दा सुध्दा अतिशय क्लिष्ट असा मुद्दा आहे. याबाबतीत मी आयुक्त साहेबांना विचारु इच्छितो व विनंती करतो की, दुरुस्ती परवानगी देण्यामध्ये आपणांस काय अडचणीचे आहे? का देत नाहीत? कारण की लोक आम्हांस सांगातात की, आपली महानगरपालिका ही एक अशी महानगरपालिका आहे की तेथे घर दुरुस्ती परवानगी दिली जात नाही. शेवटी आपणाकडे असा कोणता कायदा आहे? की ज्यानुसार आपण दुरुस्ती परवानगी देवु शकत नाहीत.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :—</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, दादा गोविंदराम लुंड यांनी जी लक्षवेधी सूचना मांडली आहे, तिच्या समर्थनार्थ मी उभा आहे. आतापर्यंत दुरुस्ती परवानगी देण्याचे काम आपल्या महापालिकेत बंद होते. तर काय मी असे गृहित धरुन चालु की आपल्या शहरामध्ये कोणतेही घर दुरुस्तीचे काम चालु नाही? कोणताही जबाबदार अधिकारी येथे असे सांगु शकेल काय की आमच्या शहरामध्ये कुठेही घर दुरुस्तीचे काम चालु नाही? असे तर कुणीही बोलु शकणार नाही. पावसाळा डोक्यावर येवुन ठेपला असल्याने संपुर्ण शहरामध्ये घर दुरुस्तीची कामे चालु आहेत. दुसरी गोष्ट अशी की, घर दुरुस्ती परवानगी घेण्याची आवश्यकता आहे? अशी कायदयात काही तरतुद आहे काय? याचा स्पष्टपणे खुलासा झाला पाहिजे. जर दुरुस्ती परवानगी घ्यायची आवश्यकता असेल तर विशेष करुन कोणत्या बाबींसाठी दुरुस्ती परवानगी घेण्याची आवश्यकता आहे? प्रत्यक्षात असे होते की, जर कुणी आपल्या घरात प्लॉस्टरचे काम चालु केले तर आमचा स्वच्छता निरिक्षक जावुन तेथे उभा ठाकतो. कुणीही अधिकारी जावुन उभा राहतो. व सांगतो की, आपणांस यासाठी परवानगी घ्यायची आहे. तर हा जो प्रश्न आहे हा दुविधा निर्माण करणारा प्रश्न आहे. अधिका—यांना सुध्दा माहिती असली पाहिजे की, प्लास्टर करण्यासाठी परवानगीची आवश्यकता नाही. जर भिंतींची उंची वाढवायची असेल तर त्यासाठी परवानगी घेण्याची आवश्यकता आहे किंवा टाईल्स बसवायच्या असतील तर त्यासाठी परवानगी घ्यायची आहे? घर दुरुस्तीसाठी लोकांना परवानगी दिली जावी परंतु दुरुस्ती परवानगीच्या आड अनाधिकृत बांधकामे होता कामा नयेत याकडे आपण लक्ष दिले पाहिजे. व मी पुन्हा पुन्हा याबाबीचा उल्लेख करतो की, कोणकोणत्या बाबींसाठी परवानगी घ्याची आहे? त्याचा जरा खुलासा केला जावा. जसे मी म्हटले की, प्लॉस्टरसाठी परवानगीची आवश्यकता नाही तर त्यासाठी सुध्दा खुलासा केला जावा की याबाबींसाठी महानगरपालिकेची परवानगी घेण्याची काहीही आवश्यकता आहे किंवा नाही.

<u>सदस्य श्री. लाल पंजाबी :—</u>मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, हा विषय दोन तीन वेळा सभागृहात आलेला आहे. व मला चांगले आठवते, जसे श्री. राजु जग्यासी यांनी म्हटले ज्यावेळेस श्री. आर.के. सोनवणे येथे आयुक्त म्हणुन होते त्यावेळेस या सभागृहात हा विषय निघाला होता. व पाच सहा महिन्या अगोदर सुध्दा हा विषय निघाला होता व त्यावेळी आम्ही सांगितले होते की, एम आर टी पी ॲक्टमध्ये घर दुरुस्ती परवानगीसाठी कोणतीही तरतुद नाही. असेच आमचे नगररचनाकार यांनी सभागृहात दोन तीन वेळा सांगितले होते. याचा अर्थ असा की, प्लॉस्टर करायचे आहे. लादया बसवायच्या आहेत किंवा कौले बदली करायची आहेत, अशी कामे केली जावु शकतात. परंतु त्यावेळी आपण सांगितले होते की, या महानगरपालिकेत दुरुस्ती परवानगी देण्याची एक पध्दत असल्यामुळे आम्ही दुरुस्ती परवानगी देत आहोत. आमचा असा अनुभव आहे की, आपले जे अधिकारी आहेत ते अनाधिकृत बांधकामाकडे डोळेझाक करण्याची किंवा दुर्लक्ष करण्याची हिम्मत ठेवतात. परंतु जर एखादा व्यक्ती आपल्या घराची दुरुस्ती करत असेल तर त्यास जास्तीत जास्त सतावले जाते. त्यासाठी येथे एक सर्व सहमती निर्माण झाली आहे की, एक तर आपण दुरुस्ती परवानगी दया किंवा देण्याचे बंद करा. दुरुस्ती परवानगी दयायची असेल तर त्याबाबतीत श्री. राजु जग्यासी यांनी सांगितल्याप्रमाणे खुलासा झाला पाहिजे व मुकादम पासुन उप—आयुक्त पर्यंतच्या सर्व कर्मचा—यांना / अधिका—यांना स्पष्टपणे सांगितले पाहिजे की, जर कुणी व्यक्ती आपल्या घराची किरकोळ दुरुस्ती करत असेल तर त्यास आपण या बाबींसाठी सतावु नका. मध्यंतरी मला काही कर्मचारी भेटले ते सुध्दा खुप त्रस्त होते. आपणाकडे काही लोकांचे एसएमएस येतात ते आपण संबंधीत कर्मचारी/ अधिका—यांकडे कार्यवाहीसाठी पाठविता. आपल्या या कामाचे आम्ही दाद देतो. आपणाकडे ज्या तक्रारी येतात त्या विशेष करुन जे लोक घराची दुरुस्ती करतात अशा लोकांच्याच असतात. दुरुस्ती परवानगीच्या आड अनाधिकृत बांधकाम व्हावे अशी आमची इच्छा नाही. आम्ही त्याच्या विरोधात आहोत. याबाबतीत प्रशासनाचे नेमके धोरण काय आहे याचा खुलासा झाला पाहिजे. व त्याबाबत सर्व अधिका—यांना स्पष्ट आदेश दिले गेले पाहिजेत. घर दुरुस्ती परवानगीसाठी लोक खुप अडचणीत आहेत. आणि यासाठी मला असे वाटते की, आयुक्त साहेबांनी आपली भुमिका स्पष्ट करावी.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :—</u>मा. महापौर, मा. आयुक्त साहेब, सन्माननिय सदस्य श्री. गोविंदराम लुंड यांनी सद्यस्थितीतील अत्यंत महत्वाचा प्रश्न लक्षवेधीद्वारे सभागृहापुढे उपस्थित केला आहे. झोपडपट्टी विभागामध्ये गरीब

लोकांच्या ज्या झोपडया आहेत त्यांची जर उंची वाढवायची आहे तर त्यासाठी परवानगीची काही गरज आहे असे काही वाटत नाही. जे लोक लोडबेअरींग करुन बेकायदेशीर बांधकाम करतात त्यांच्यासाठी परवानगी घेतली पाहिजे. परंतु झोपडपट्टीमधील गरीब बिचारा माणुस आहे त्याच्याकडे फक्त टॅक्स पावती असते त्या व्यतिरिक्त तो आणखी काय कागदपत्र देणार? या गरीबांना आपण कधी घर दुरुस्ती परवानगी देणार? गरीब बिचारे कधी आपल्या घराची उंची वाढविणार? आज माझ्या प्रभागातील एक गरीब बिचारी बाई जी दुस–यांची भांडी घासते. त्या बाईच्या घराची थोडीसी उंची वाढवायची आहे. त्याठिकाणी प्रभाग अधिकारी येवून गेले. पत्रकार येवुन गेले, सगळे म्हणजे टोटल न्युज पासुन तर पत्रकार येवुन जातात. ती गरीब बिचारी बाई भांडी घासणारी बाई आपले घर बनवेल की अधिका–यांना तोंड देईल? काय आहे तुमच्याकडे कागदपत्र? सनद आहे का? अहो, ती झोपडपट्टीमध्ये राहणारी बाई ती कोठुन बिचारी देणार? म्हणुन मेहरबानी करुन जो झोपडपट्टी विभाग आहे. त्या झोपडपट्टी विभागामध्ये लोकांना, प्लॉस्टर करायचे आहे, पत्रे बदली करायचे आहेत, किंवा अन्य काही जसे की भिंतीची उंची वाढवायची आहे त्यांना आपण कृपया करुन परवानगी दयावी. परवानगी दयावी नाही, परवानगी विचारुपण नका. अशा जुन्या घरांचे तुम्ही अगोदर फोटो काढा. व अर्ज मागवुन घ्या. आणि त्या अर्जानुसार त्यांची घरे पाहुन त्यांना दया. असे नाही की त्याचे टिअरगर्डर, मोठे घर आहे. बंगला आहे,

त्याला वरती, अलिशान राहण्याकरीता झोका लावतो त्याला धोका नका लावुन देवु. त्याला अजुन हवेत राहु दया.

<u>सदस्य श्री. राजेश वधारिया :–</u>मा. महापौरजी, येथे दादा श्री. गोविंदराम लुंड यांनी लक्षवेधी सूचना दिलेली आहे त्या संदर्भात मी आपणांस सांगु इच्छितो की, दुरुस्ती परवानगी न दिल्यामुळे एकतर खालच्या स्तरावरचे जे अधिकारी आहेत ते आपल्या स्तरावर लोकांना सांगतात की आपण बांधकाम करा, परंतु त्या बाबतीत कुणाची तक्रार आल्यानंतर ते बांधकाम तोडले जाते. ज्या कुणाला बांधकाम करायचे असेल ते त्यांच्या मर्जीप्रमाणे चालते कुणाला बांधकाम करु दयायचे, कुणाला बांधकाम करु दयायचे नाही. यासाठी याबाबतीत एकवाक्यता असली पाहिजे. घर दुरुस्ती परवानगी सर्वांना दिली पाहिजे. व त्यामध्ये लिहिलेले पाहिजे की यांना कोणकोणत्या प्रकारचे काम करण्याची मंजुरी आहे. की ज्यामुळे अनाधिकृत बांधकाम होवु नये.

<u>सदस्य श्री. सुरेश जाधव –</u>मा. महापौर, उप–महापौर, आयुक्त साहेब, याठिकाणी जेव्हा मा. आयुक्त श्री. सोनावणे साहेब होते, त्यावेळेस त्यांनी अनाधिकृत बांधकामांना आळा बसण्यासाठी त्यांनी त्यांच्या दृष्टीकोनातुन त्यांनी आपल्या शहरामध्ये एकावर एक निरिक्षण करण्यासाठी काही लोकांना नेमले होते. सार्वजनिक बांधकाम विभाग, आरोग्य विभागवाल्यांना त्यांच्यावर निरिक्षण ठेवण्यासाठी नेमले होते. आपल्या पर्यंत त्या तक्रारी पोहचाव्यात म्हणुन त्यांनी या लोकांना अधिकार दिले होते. परंतु त्या अधिकारांचा या अधिका–यांनी गैरफायदा घेतला आहे. आज आपल्याकडे तक्रारी येत असतील, लोडबेअरींगच्या तक्रारी कमी असतील. एखादया व्यक्तीने आपल्या घराची दोन फुट उंची वाढविली असेल तर लगेच लोक तेथे येतील कारण दोन फुट उंची वाढविणारा त्यास पैसे देत नाही. पैसे न देणा–या व्यक्तीच्या तक्रारी आपणाकडे येतात. आरोग्य विभागाचे व्यक्ती त्यांस छेडत असतात. आयुक्तांना मी भेटणार आहे, मी त्यांना थेट त्याच्याकडे तुमची तक्रार करेन. त्याच्यामध्ये आपले सार्व.बांधकाम विभागाचे अधिकारी असतात, त्यांच्यात त्याचप्रमाणे अनाधिकृत बांधकाम विभगाचे आणि आरोग्य विभागाचे अधिका–यांमध्ये भांडणे होत असतात. तु तक्रार देवु नको आम्हांला तक्रारीस तोंड दयावे लागते. जी मोठी कामे आहेत त्यांची तर आपणाकडे तक्रार येत नसेल. म्हणुन आपणांस विनंती आहे की, अनाधिकृत बांधकाम विभागाचे काम त्यांच्याकडेच देण्यात यावे. आरोग्य विभागाच्या अधिका–यांना आपण जे अधिकार दिले आहेत ते काढुन घ्यावेत यांच्यामुळे आणखी भ्रष्टाचार वाढला आहे. कारण की, एकाला पैसे देण्याऐवजी चार, चार लोकांना पैसे दयावे लागत आहेत. मोठया कामाचे ते पैसे घेतातच, परंतु छोटी मोठी डागडुजी करणारे, घराची दोन तीन फुट उंची वाढविणारे जे लोक असतात त्यांना सुध्दा लोकांना पैसे दयावे लागतात आणि धाक आपला दाखवितात. आयुक्तांकडील सभेमध्ये आम्ही सांगणार असे ते सागंतात म्हणुन मेहरबानी करुन आरोग्य विभागास आपण जे अधिकार दिलेले आहेत ते काढुन घ्यावेत. कारण त्यामुळे आणखी भ्रष्टाचार वाढलेला आहे. धन्यवाद।

<u>सदस्य श्री. विनोद ठाकुर :–</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, महाराष्ट्र सरकारने झोपडपट्टीला १९९५ चे फोटोपास आपणाकडे इश्यु केले आहेत. आणि आता नविन कायदयानुसार २००० पर्यंतच्या झोपडया तोडायच्या नाहीत असा शासनाने आदेश काढला आहे. त्याबाबतचा शासन निर्णय सुध्दा आलेला आहे. त्याच्या अनुषंगाने १४ फुटापर्यंत झोपडपट्टीवाला बांधकाम करुन आपल्या घराची उंची वाढवु शकतो. आणि

आपल्या उल्हासनगर महापालिका क्षेत्रामध्ये ज्या झोपडया आहेत त्या स्वत:च्या मालकीच्या नाहीत तर त्या महानगरपालिकेच्या किंवा शासनाच्या जागेवर असतील. त्यांना कायदयानुसार आपण दुरुस्ती परवानगी देवु शकत नाही. पत्रे बदलायचे असतील किंवा भिंतींची उंची वाढवायची असेल, प्लॅस्टर करायचे असेल तर आपण आपल्या अधिकार क्षेत्राच्या चौकटीत राहुन परवानगी दिली तर खुप चांगले होईल. कारण की आयुक्त साहेबांना सकाळ पासुन संध्याकाळ पर्यंत अमुक याठिकाणी बेकायदेशीर बांधकाम चालु आहे, अनाधिकृत बांधकाम चालु आहे अशा प्रकारचे १०० एसएमएस येत असतील. छुट भयै नेते, ब्लॅकमॅलर लोक, काही न करणारे लोक असतात ते सकाळपासुन संध्याकाळपर्यंत फिरतात. हजार दोन हजार रुपये खिश्यात टाकतात अशा लोकांचे एसएमएस येतात. मेहरबानी करुन त्या एसएमएसवर लक्ष न देता आपल्या अधिका–यांनी जागेवर जावुन शहानिशा करुन त्या गरीब लोकांना झोपडीची दुरुस्ती करु दिली जावी ही नम्र विनंती आहे.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>सन्माननिय महापौरजी, आयुक्त साहेब, दादा श्री. गोविंदराम लुंड यांनी लक्षवेधीद्वारे जो मुद्दा येथे उपस्थित केला आहे, ही लक्षवेधी अतिशय तातडीची आणि कळकळीची असल्याने प्रत्येक नगरसेवकाने यावर चर्चा केलेली आहे. सूचना केल्या आहेत. मला असे म्हणायचे आहे की, याठिकाणी नगररचनाकार श्री. गुरगुळे साहेब आलेले नाहीत. परंतु एडीटीपी श्री. सिंग साहेब आलेले आहेत. कृपया त्यांनी व्यासपीठावर यावे व आमच्या मुद्दयांवर खुलासा करावा. झोपडपट्टयांमध्ये व इमारतींमध्ये घर दुरुस्ती परवानगी देता येते किंवा नाही याचा खुलासा करावा. कारण मागे एकवेळेस अशाच एका सन्माननिय सदस्याने घर दुरुस्ती परवानगी संदर्भात प्रश्न विचारला होता. परंतु आपल्या नगररचनाकार साहेबांनी सांगितले होते की अशी परवानगी देता येत नाही. आणि म्हणुन आम्ही महाराष्ट्र शासनाकडुन कायदयाचे पुस्तक आणलेले आहे. मी झोपडपट्टीचा लोकप्रतिनिधी असल्यामुळे मी झोपडपट्टयांचीच जास्त काळजी घेणार. त्यानंतर इमारतींकडे वळणार. या पुस्तकामध्ये सुध्दा असे स्पष्टपणे म्हटलेले आहे की, त्यांना परवानगी देता येते. आणि त्या कोणकोणत्या महापालिकांच्या क्षेत्रामध्ये देता येते. त्यांची नावे सुध्दा यामध्ये सांगितली आहेत. आणि त्यामध्ये आपल्या उल्हासनगर महानगरपालिकेचे देखील नाव आलेले आहे. आणि याबाबतीत मागील दहा पंधरा दिवसापुर्वी मा. आयुक्त साहेबांशी चर्चा देखील केलेली आहे. तेव्हा मा. आयुक्त साहेब सन्माननिय सदस्यांच्यावतीने मला असे सांगायचे आहे आमचे एडीटीपी श्री. सिंग साहेब आलेले आहेत आणि आचारसंहितेनंतर ही पहिलीच सभा आहे. त्यामुळे कमीत कमी श्री. सिंग साहेबांची सभागृहाला ओळख तरी होईल आणि दुरुस्ती परवानगीबाबत कायदयाच्या दृष्टीकोनातुन ते आम्हांला काय खुलासा करतात याकडे आमचे लक्ष राहिल.. दुरुस्ती परवानगी देता येते किंवा नाही? शासनाचा काय नियम आहे? कश्यासाठी नियम आहे? आणि या उल्हासनगर शहरामध्ये दुरुस्ती परवानगी मिळाली नाही तरी लोक बांधकामे करुन घेतात, परवानगी देत नाही म्हणुन त्याठिकाणी तुमचा मुकादम आणि इन्स्पेक्टर पोहचतो. आणि काय वाटेल ते तेथे होते. ते होवु नये म्हणुन सन्माननिय सदस्य श्री. गोविंदराम लुंड यांनी ही लक्षवेधी पावसाळयापुर्वी उपस्थित केली आहे. या लक्षवेधीला आमच्या सन्माननिय श्री. सिंग साहेबांनी उत्तर दयावे आणि याबाबतीत सन्माननिय महापौर आणि आयुक्त साहेबांना मी सर्वांच्या वतीने विनंती करतो.

<u>श्री. सिंग (सहा. संचालक नगररचना):–</u>मा. महापौर, उप–महापौर, सर्वात प्रथम मी आपला परिचय येथे करुन देतो. सहा. संचालक नगररचना म्हणुन मला एका वर्षाच्या प्रतिनियुक्तीवर शासनाने प्रथमच नियुक्ती दिली आहे. त्यासाठी मी येथे नियुक्त झालेलो आहे. यापुर्वी जिल्हाधिकारी, ठाणे, कल्याण महानगरपालिका येथे मी काम केलेले आहे. दुरुस्ती परवानगी बाबत मा. सदस्यांनी जे प्रश्न उपस्थित केलेले आहेत, प्रत्यक्षात एमआरटीपी ॲक्टमध्ये जी तरतुद असते, त्यामध्ये बांधकाम परवानगी मंजुर केलेल्या इमारतीच्या आत अंतर्गत जे बदल करायचे जसे की, लादी बसविणे, प्लॅस्टरींग करणे त्यासाठी वेगळी परवानगीची आवश्यकता नसते. परंतु एमआरटीपी ॲक्टमध्ये झोपडयांना दुरुस्ती परवानगी देण्याची तरतुद नाही. कारण की त्यामध्ये मालकी हक्काबाबतची मोठी अडचण असते. कुठलीही परवानगी देतांना बांधकाम परवानगी दयायची असेल तर ज्या जागेवर बांधकाम परवारनगी दयायची आहे त्या जागेवर त्यांचा मालकी हक्क असला पाहिजे. म्हणुन एमआरटीपी ॲक्टमध्ये तशी तरतुद जरी नसली तरी बीपीएमसी ॲक्टमध्ये २६४ कलमा अंतर्गत काही तरतुदी येतात. आणि इतर महानगरपालिकांमध्ये जसे की, कल्याण म्हणा किंवा भिंवडी म्हणा किंवा ठाणे म्हणा त्याच्यामध्ये सर्वसाधारण दुरुस्ती परवानग्या ज्या आहेत त्या प्रभाग अधिका–यांकडुन दिल्या जातात. आणि त्याबाबतीत त्यांनी काही निकष ठरविले आहेत. तर आम्ही त्याचा अभ्यास करुन मा. आयुक्त साहेबांच्या मंजुरीने त्यावर चर्चा करुन दुरुस्ती परवानगी आपल्या निकषांमध्ये देता येईल. त्यावर चर्चा करुन आपण निर्णय घेतला तर बरे राहिल.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :—</u>श्री. सिंग साहेब आपण  आता हे जे काही सांगितले की त्याठिकाणी किरकोळ दुरुस्ती जसे की लादी बसविणे, ही कामे करण्यासाठी परवानगीची आवश्यकता नाही परंतु ज्या ठिकाणी घराला तडा गेला असेल आणि या पावसाळयामध्ये ते बांधकाम जर पडणार असेल तर त्याच्यासाठी त्या माणसाने काय करायचे?

<u>श्री. सिंग (सहा. संचालक नगररचना):—</u>तेच सांगतो आहे मी.  बीपीएमसी ॲक्टमध्ये कलम २६४ मध्ये ज्या तरतुदी आहेत त्यानुसार धोकादायक इमारती ज्या असतात, आता आपण म्हणालात की त्यांना तडे वगैरे गेले आहेत.  म्हणजेच ते बांधकाम धोकादायक आहे.  त्यामुळे त्याला दुरुस्ती परवानगीची तरतुद आहे.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>आहे तर मग दुरुस्ती परवानगी का दिली जात नाही?

<u>श्री. सिंग (सहा. संचालक नगररचना):—</u>तेच सांगतो आहे ना?  बाकीची जी तरतुद आहे, फक्त दुरुस्ती परवानगी सोबत मालकी हक्काच्या जागेची कागदपत्र असणे आवश्यक आहे.  जमीनीचे झोनिंग आहे, विकास आराखडयाबाबतचे शेरे घ्यायचे.  हे सगळे बघुन.......

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>साहेब, हे सगळे झाले इमारत दुरुस्ती परवानगीबाबत.  झोपडपट्टींसाठी काय? उल्हासनगरमध्ये कुणाकडेही जमिनीच्या मालकी हक्काची कागदपत्रे नाहीत.  सनद वगैरे काही नाही. त्यांच्यासाठी काय तरतुद आहे?

<u>श्री. सिंग (सहा. संचालक नगररचना):—</u>मी त्याच्याचसाठी सांगतो आहे की, त्याबद्दल ॲक्टमध्ये जरी तरतुद नसली तरी इतर महानगरपालिकांमध्ये जी काही कार्यपध्दती वापरली जाते, त्याची माहिती आम्ही गोळा करु. मा. आयुक्त साहेबांशी चर्चा करु.  त्याच्यावर आपणांस काय तोडगा काढता येईल तो आपण काढु.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>साहेब, लवकरात लवकर तोडगा काढा कारण की पाऊस डोक्यावर येवुन ठेपला आहे.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :—</u>आजपर्यंत कायदयाच्या दृष्टीकोनातुन अशी काही परवानगी दिली आहे काय?  तुम्ही सांगता की आयुक्त साहेबांशी चर्चा करुन निर्णय घेवु.  परंतु झोपडपट्टीमध्ये अशी एक तरी परवानगी दिलेली आहे काय?  अजिबात परवानगी दिलेली नाही असे, आम्ही छातीठोकपणे सांगतो.  का दिल्या नाहीत?  मागे तर महाराष्ट्र शासनाने असे जाहिर केले होते की, १९९५ पुर्वीच्या ज्या झोपडपट्टया असतील त्या नियमित करण्यात आल्या आहेत.  त्यांना परवानगीची आवश्यकता नाही.  आणि ज्या झोपडपट्टया गलिच्छ वस्त्यांमध्ये मोडतात त्यातील झोपडपट्टीधारकास १४ फुट उंचीपर्यंत झोपडीची उंची वाढविण्याची परवानगी आहे.  अशा प्रकारची शासनाची परवानगी असतांना सुध्दा आणि कितीतरी झोपडपट्टया या गलिच्छवस्त्यांमध्ये मोडत असतांना त्यातील किती झोपडपट्टी धारकांना आपण झोपडीची उंची वाढविण्यास परवानगी दिलेली आहे? माझ्या मते तर एकाही झोपडपट्टी धारकास अशा प्रकारची परवानगी दिलेली नाही.  आमच्या श्री. गुरगुळे साहेबांनी सांगितले की, अशा प्रकारची परवानगी देता येत नाही.  अशा प्रकारची प्रकरणे एक एक दोन दोन महिने प्रलंबित राहतात.  आता तर पावसाळा जवळ आला आहे, मग काय करणार?  आणि मग लोक या ना त्या प्रकारे आपले काम करुन घेंतात.  असे न होता कायदेशीर रित्या महानगरपालिकेने परवानगी दिली पाहिजे.

<u>सदस्य श्री. लाल पंजाबी :—</u>श्री. बी.बी. मोरे साहेब, एक मिनिट, आता सहाय्यक संचालकांनी सांगितले की याबाबतीत दोन चार दिवसामध्ये आयुक्त साहेबांशी विचार विनिमय करुन एक धोरण ठरविले जाईल. याबाबतचे धोरण तर पहिल्या पासुनच आहे.  आमचा प्रश्न धोरणा संदर्भातील नाही.  धोरण अगोदरपासुन ठरविले आहे.  दुरुस्ती परवानगी का देत नाहीत?  याबाबतचे आमचे धोरण ठरलेले नाही असे आम्ही म्हणत नाही.  धोरण तर अगोदरच ठरलेले आहे ना?  प्रत्यक्षात परवानगी दयायची आहे..  आम्ही तर म्हणतो परवानगी देण्याची आवश्यकता नाही.  कारण का तर आपण म्हणता की परवानगी देण्याची आमच्याकडे एक प्रथा आहे. त्यानुसार परवानगी दया.  परंतु आपण परवानगी देत नाहीत म्हणुन लक्षवेधीद्वारे हा प्रश्न येथे उपस्थित झाला आहे.  याबाबतचे धोरण अगोदरपासुन आपणाकडे अस्तित्वात आहे.  म्हणुनच तर यापुर्वी ब—याचशा लोकांना परवानग्या मिळाल्या आहेत.  आणि आता परवानगी देणे बंद केले आहे ते का केले आहे? या परवानग्या आता पावसाळा येण्याअगोदर लवकरात लवकर दिल्या जाव्यात अशी आमची मागणी आहे.

<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे)</u>:—दुरुस्ती परवानगी दयावी अशी मागणी सर्व सन्माननिय सदस्यांनी एकमुखाने केली आहे. वर्षभरापुर्वी तत्कालीन शहर अभियंता जे होते त्यांच्या आदेशाखाली काही दुरुस्ती परवानगी देण्यात आलेल्या होत्या. त्यानंतर शहरामध्ये मारहाणी झाल्या, लोकप्रतिनीधींवर गुन्हे दाखल करण्याची वेळ आली? त्यांनतर ही प्रक्रिया थांबविण्यात आली आहे. सर्वप्रथम दुरुस्ती परवानगी दयायची काय? दुरुस्ती कशाला म्हणायचे हा उल्हासनगरमधील बांधकाम व्यवसायातील एक संशोधनाचा विषय आहे. आपण म्हणालात पत्रे बदललेत ते समजु शकतो. परंतु दुरुस्तीच्या नावाखाली जर नविन बांधकाम होत असेल? याबाबतीत मागील काही सभांमध्ये सन्माननिय सदस्यांनी चर्चा केली होती की, दुरुस्तीच्या नावाखाली आठ आठ मजली इमारती उभ्या राहु लागल्या आहेत. अशा बाबतींमध्ये प्रशासनाचा निश्चितच आक्षेप राहणार आहे. जी २००३ सालची १०५ क्रमांकाची जनहित याचिका होती त्याप्रमाणे महापालिकेला प्रत्येक बांधकामाच्या संदर्भातील ज्या काही कारवाई होत्या त्याचा अहवाल हा शासनाला दयावा लागतो. त्याचा मासिक अहवाल महापालिकेमार्फत दिला जातो. या विषयी आपण एकंदरित जी काही चर्चा केली त्यातुन असे वाटते की, कायदयाचा अतिरेक अंमलबजावणीमध्ये होत आहे काय? हे झाले एक. दुसरे अस की, कायदयामधील ज्या प्रचलित तरतुदी आहेत, त्याच्या अनुषंगाने एक कार्यवाही व्हावी अशी अपेक्षा सभागृहाने या लक्षवेधीच्या माध्यमातुन व्यक्त केल्याचे मला जाणवते. दुरुस्ती परवानगी बाबतीत एडीटीपी श्री. सिंग साहेबांनी आता जे सांगितले इतर महापालिकेमध्ये काय कार्यपध्दती अवलंबिली जाते. दुरुस्ती परवानगी देण्याचे बंद केले आहे काय? होय. कारण दुरुस्ती परवानगीच्या नावाखाली खुप अनाधिकृत बांधकामे उभी राहु लागली आणि किंबहुना दुरुस्ती परवानग्या देण्यात येवु नयेत. अशी याच सभागृहात चर्चा झाल्याचे मला आठवते. मात्र सभेची निश्चित तारीख मला आठवत नाही. दुरुस्ती परवानगी देण्याचे बंद करा. असे देखिल चर्चा सभागृहात झाल्याचे आठवते. त्यातुनही पावसाळा येत आहे. म्हणुन दुरुस्ती परवानगीसाठी काहीतरी धोरण असावे. त्यात एका सन्माननिय सदस्याने सांगितले की, धोरणाची काही गरजच नाही. जे काही धोरण आहे त्याची अंमलबजावणी करा अशी मुळात मागणी आहे. उल्हासनगरच्या संदर्भात अनाधिकृत बांधकामविषयी जी एक पुर्वपिठीका आहे, जुना इतिहास आहे तो कळत न कळत तयार झालेला आहे. त्यामुळे तत्कालीन कारणांसाठी दुरुस्ती परवानगी देण्याची पध्दत चालु झाली होती. नगररचनाकारांनी सांगितले की, एमआरटीपी ॲक्टच्या कायदयामध्ये याबाबत तरतुद नाही हे बरोबर आहे. बीपीएमसी कायदयातील कलम २६४ मध्ये धोकादायक इमारतींसाठी तरतुद आहे. परंतु जी बिकर धोकादायक अशी बांधकामे आहेत त्यांच्या दुरुस्तीसाठी नेमके काय धोरण असावे यामध्ये कुठलीही सुसुत्रता नाही. त्यासाठी आपणाकडे दोन पर्याय आहेत त्यातील पहिला पर्याय असा की दुरुस्ती परवानगीच्या नावाखाली आठ आठ मजली इमारती उभ्या राहु नयेत. परवानग्या देण्यासाठी अधिका—यांवर काही दबाव असतात. त्यामुळे चुकीच्या परवानग्या दिल्या जातात त्यामुळे बांधकाम निष्कासनाची कारवाई होते. त्यामुळे शहरातील वातावरण गढुळ होण्याची शक्यता असते. दुरुस्ती परवानगी देतांना बेकायदेशीर बांधकामांना उत्तेजन मिळु नये यासाठी कठोरता असावी म्हणुन आम्ही ही एक प्रथा ठेवली होती. दुसरे म्हणजे झोपडपट्टी कायदयाबाबतीत आता सन्माननिय सदस्य श्री. विनोद ठाकुर आणि श्री.बी.बी. मोरे यांनी सांगितले की, ज्या घोषित झोपडपट्टया आहेत त्यांच्या बाबतीत जर काही तरतुदी कायदयामध्ये असतील तर त्याबाबतीत इतर महानगरपालिकांमध्ये काय केले जाते याचा अभ्यास करुन त्याचे धोरण अवलंबण्याचे काम त्यात काही निकष दिलेले आहेत. कायदयामध्ये निकष आहेत. आता एका सदस्याने म्हटले की, भिंतीला तडा गेला तर त्याबाबतीत दुरुस्ती परवानगीचे काय? तर हे जे निकष आहेत ते इतर महानगरपालिकांनी ठरावांमध्ये तरतुद केलेली आहे किंवा कसे याबाबतीत मागे आपली चर्चा झालेली आहे. जे प्रचलित कायदे आहेत, जे प्रचलित नियम आहेत, आपल्याकडे आता जी जनहित याचिका झाली त्या अनुषंगाने बेकायदेशीर बांधकामांवर जी काही कारवाई करायची आहे. सगळया ठिकाणी कारवाई होतच असेल. काही ठिकाणी आमचे अधिकारी कर्मचारी यांच्या चुका निश्चित होत असतील पण ज्या चुका निदर्शनास आल्या त्या सुधारण्याचा प्रामाणिक प्रयत्न हा प्रशासनाकडुन करण्यात येत आहे त्यात थोडासा अतिरेक असु शकतो. तो मला नाकारता येणार नाही. परंतु तक्रारीच्या अनुषंगाने कारवाई होते, ज्या ज्या ठिकाणची तक्रार आली तिची शहानिशा करण्याचे काम संबंधीत अधिका—यांना आम्ही लेखी आदेशाद्वारे नेहमीच देत आलो आहोत. कारण त्यास आम्ही सर्वात जास्त प्राधान्य दिले आहे. अनाधिकृत बांधकामावर जे काही नियंत्रण असले पाहिजे होते. मधल्या दोन अडीच महिन्यामध्ये त्यामध्ये थोडीसी ढिलाई झाली. काही अधिकारी निवडणुकीच्या कामामध्ये होते. आमच्या काही अधिका—यांनी बदमाश्या केलया असतील. परंतु जेथे कोठे आमचे लक्षात आले तेथे आम्ही निश्चित कारवाई केली आहे. दुरुस्ती परवानग्यांसंदर्भात आठ महिन्यात सभागृहाची जी भुमिका होती त्यास एक सकारात्मक किंवा मानवतावादी दृष्टीकोन घेवुन कदाचित त्यात बदल करावा अशी भुमिका लक्षवेधीच्या माध्यमातुन आलेली आहे. तर त्या अनुषंगाने मी आपणांस सांगु इच्छितो की, आपणाकडे एमआरटीपीचा जो कायदा आहे, सन्माननिय सदस्य श्री. मोरे साहेब व श्री बागुल साहेब यांनी झोपडपट्टी संदर्भात जो उल्लेख

केलेला आहे ते तिन्ही संदर्भ घेवुन इतर महानगरपालिकांमध्ये नेमकी काय उपाययोजना केली जाते आणि दुरुस्ती परवानगीच्या नावाखाली बेकायदेशीर बांधकामांना बुरखा मिळणार नाही याची दक्षता घेण्यासाठी नेमके काय करावे लागेल असा एकत्रित निर्णय घेवुन गरज भासल्यास, मी म्हणतो गरज भासल्यास महासभेचे धोरणात्मक निर्णयासाठी मंजुरी घेवुन आणि शासनाच्या मार्गदर्शनानुसार ही जी दुरुस्ती परवानगीविषयी चिंता सभागृहात उपस्थित केली आहे ती सोडविण्यासाठी आम्ही कायदयाच्या चौकटीत राहुन प्रमाणिकपणे सोडवण्याचा प्रयत्न करु.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरेः—</u>आयुक्त साहेब, मागील सभेत दूरुस्ती परवानगीबाबत प्रश्न विचारला होता की, दुरुस्ती परवानगीच्या नावाखाली आरसीसी बाधंकाम केले जाते त्याचे स्पष्टीकरण तुम्ही आम्हांस दिलेले आहे. मागच्या सभेत त्याबाबत चर्चा झालेली आहे ते बरोबर आहे. आरसीसी इमारतीचे बांधकाम होत असतांना तुमच्या अधिका—यांनी त्या जागेची पाहणी केली पाहिजे आणि ते बांधकाम थांबविले पाहिजे. दृरुस्ती परवानगी कशास म्हणतात की जी किरकोळ दुरुस्ती असते त्यास दृरुस्ती परवानगी म्हणतात. उदया मी दुरुस्ती परवानगी घेईल आणि दोन मजल्याची आरसीसी इमारत बांधेन. याला दुरुस्ती परवानगी म्हणत नाही. आणि याबाबतीतच काही सन्माननिय सदस्यांनी हरकती घेतल्या होत्या. उल्हासनगर शहरामध्ये ब—याचशा अनाधिकृत आरसीसी इमारती बांधण्यात आलेल्या आहेत. आणि त्या थांबविल्या जाव्यात याबाबतीत आम्ही हरकत घेतली होती. त्यावेळी सुध्दा तुम्ही उत्तर दिले होते, स्पष्टीकरण दिले होते. झोपडपट्टीच्या संदर्भात मी आपणांस सांगु इच्छितो की, २००५ मध्ये महापूर आला होता. त्यावेळी सम्राट अशोक नगरपासुन करोयिता नगरपर्यंतच्या नदीकिना—याच्या झोपडपट्टया पाण्याखाली गेल्या होत्या. ब—याचशा झोपडया वाहुन गेल्या होत्या. त्या कुणालाही तुम्ही पर्यायी जागा दिलेली नाही. तत्कालीन आयुक्त श्री. आर.के सोनवणे यांनी सुध्दा दिलेल्या नव्हत्या. आणि तुम्ही तर माणसाला बिल्कुल थारा देत नाहीत. मी मागचे काही बघणार नाही असे म्हणता, मला काही सांगु नका. २००५ च्या महापुरात या शहरातील किती लोक वाहुन गेलेत? याची तिळमात्र माहिती तुमच्याकडे नाही. मी स्पष्टपणे बोलतो आहे. बरेचसे लोक आजही वणवण फिरत आहेत. कुणाच्या भिंती उभ्या राहिलेल्या आहेत. परंतु आजपर्यंत त्यांना दुरुस्ती परवानगी मिळालेली नाही. आजही ते लोक दुरुस्तीच्या नावाखाली ओरडत आहेत आणि म्हणतात की तुमची महापालिका आजही थारा देत नाही. झोपडपट्टीमध्ये दुरुस्ती परवानगी का देत नाही हा आमचा पहिल्या पासुनचा प्रश्न आहे. कारण झोपडपट्टीवाले आरसीसी बांधकाम करु शकत नाहीत एवढा पैसा जर त्यांच्याकडे राहिला असता तर ते झोपडपट्टीत राहिले नसते आणि म्हणून माझे असे मत आहे की आता पावसाळा जवळ आलेला आहे. अशा वेळी तुम्ही दुरुस्ती परवानगी देणे अतिशय महत्वाचे आहे. आणि म्हणुनच या सर्व सन्माननिय सदस्यांच्यावतीने मी तुम्हांला विनंती करत आहे. श्री. सिंग साहेबांनी सांगितलेलेच आहे.की, इतर महानगरपालिकांमध्ये याबाबतीत काय धोरण अवलंबिले आहे त्याची शहानिशा करुन अशा प्रकारच्या परवानग्या देता येतात किंवा नाही याचा त्यांनी उलगडा करावा. असे मी तुम्हांला या सर्व सन्माननिय सदस्यांच्या वतीने सांगतो आहे. कारण प्रत्येक प्रभागातील नागरीक सांगतात की, पावसाळा जवळ आलेला आहे, आमचे झोपडे पडणार आहे. वेगाच्या वा—याने एखादे झोपडे तुटते. आणि अधिकारी म्हणतात तुमच्याकडे काय पुरावा आहे? तर झोपडपट्टी धारकांकडे कागदपत्र तरी काय असतात? तुमच्या नगरपालिकेची टॅक्सपावती असते, लाईटबिल असते. याच्या व्यतिरिक्त सनद वगैरे नसते. आणि आज ज्यांच्याकडे सनद नाही त्यांच्या देखील इमारती उभ्या राहिल्या आहेत. १९६२ पासुन या उल्हासनगर शहरात मी राहत आहे. १९६५ पुर्वीची मालकी हक्काची कागदपत्र ज्यांच्याकडे आहे त्यांनाच आरसीसी बांधकाम परवानगी दिली जाते. आणि तेव्हापासुन या उल्हासनगर शहरात मी आहे परंतु झोपडपट्टीतील कुणालाही बांधकाम परवानगी दिली जात नाही. परंतु माझ्या बाजुला इमारती मात्र उभ्या राहत आहेत. अशी परिस्थिती येत आहे आणि ती मी तुमच्या नजरेस आणून देत आहे. याबाबतीत तुम्ही तुमच्या अधिका—यांना कडक आदेश दयावेत.

<u>सदस्य श्री. गोविंदराम लुंडः—</u>मी आयुक्त साहेबांना विनंती करेल की, त्यांनी हिंदीत बोलले तर बरे होईल. तसेच आता पावसाळा जवळ आलेला आहे. झोपडपट्टयांमधील झोपडयांचे पत्रे उडतात. त्यांना दुरुस्तीसाठी परवानगी दिली पाहिजे याबाबतीत काय करायचे? याबाबतीत दोन—तीन दिवसात निर्णय घेतला जावा. याबाबतीत काय करायचे काय करायचे नाही? पैसे भरायचे किंवा नाही? झोपडपट्टीवाले, बॅरेकवाले, ६०—६२ वर्षापासुन उल्हासनगरमध्ये राहतात. ते थोडीफार दुरुस्ती करतात तर त्यांचे बांधकाम तोडले जाते. त्यांनी करायचे तर काय करायचे? त्यांना राहायचेतर येथेच आहे ना? यासाठी यावर काहीना काही तोडगा काढा. मा. महापौर, मा. उपमहापौर व सर्व राजकिय पक्षाचे नेते मंडळी मिळुन आपणही बसून काहीतरी तोडगा काढा. अशी माझी विनंती आहे. पुढे काय करायचे ते आपण ठरवा.

**आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—**सन्माननिय सदस्य श्री गोविंदराम लुंड यांनी म्हटल्याप्रमाणे मी हिंदीत स्पष्टीकरण करतो. त्यांनी केलेल्या सूचनेबाबतीत कायदयाच्या कक्षेत राहुन व न्यायालयाच्या आदेशाच्या अधिन राहुन याबाबतीत आजुबाजुच्या महानगरपालिकांमध्ये कोणती निती अवलंबिली आहे याचा अभ्यास करुन आपणासमोर प्रस्ताव ठेवु.

**महापालिका सचिव:—**लक्षवेधी सुचना क्र. २ जीचे सुचक आहेत श्री. धनंजय बोडारे व अनुमोदक आहेत श्री. प्रकाश सावंत

लक्षवेधी सुचना याप्रकारची आहे......................

---

## लक्षवेधी सूचना क्रमांक २

सुचकाचे नाव:—श्री. धनंजय बोडारे
अनुमोदकाचे नाव :— श्री. प्रकाश सावंत

**विषय :—** मोकळे आरक्षित भुखंड ताब्यात घेण्याबाबत लक्षवेधी

उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत आरक्षित भुखंड असून सदरचे भुखंड भुमाफिया खोटया सनद मिळवून गिळकृत करीत असल्याने पत्रव्यवहार करुन आरक्षित भुखंड ताब्यात घेणेसाठी तातडीने कारवाई करावी अशी विनंती केली होती. त्या अनुषंगाने सदरचे मोकळे आरक्षित भुखंड ताब्यात घेणेसाठी महापालिकेने आजतागायत कोणती प्रक्रिया/कारवाई केली आहे याबाबत महासभेत चर्चा होवून सविस्तर, समाधानकारक, सुचक माहिति मिळावी ही नम्र विनंती.

---

सदस्या श्रीमती निलु चांदवानी, श्रीमती मंजु पोपटानी, श्रीमती कविता सिरवानी, श्रीमती मोना वनवारी, श्रीमती शकुंतला पाटील, कु. शकुतला जग्यासी, श्रीमती सुरेखा वेलकर, श्रीमती सुजाता रिजवानी, श्रीमती मालती करोतिया हया सभागृहातन बाहेर गेल्या.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, आयुक्तांनी यापुर्वी सांगितले की, अनाधिकृत बांधकामे त्यानंतर मुंबई उच्च न्यायालय आणि मग कारवाई, लोकांचा उद्रेक आणि त्यासाठी शासनाला विशेष अध्यादेश पारीत करावा लागला. एकतर १३ चौरस किलोमिटरचे आपले क्षेत्र, घनदाट वस्ती, जवळ जवळ नऊ ते दहा लाख लोकवस्ती या शहरात आहे. सरकारी आकडयानुसार ती कमी दाखविली आहे. या लोकसंख्येला याबाबत जर सुविधा दयायच्या असतील तर त्यासाठी महापालिकेचे आरक्षित भुखंड हे तसेच राहिले पाहिजेत. १९७४ ला विकास आराखडा तयार करण्यात आला. त्यानंतर १९९९ ला एमएमआरडीएने विकास आराखडा तयार केला परंतु अदयापपर्यंत त्याची अंमलबजावणी झाली नाही. पण १९७४ मध्ये विकास आराखडा मंजुर झाल्यानंतर तत्कालीन नगरपालिकेने अपेक्षित कार्यवाही केली नाही, त्याची अंमलबजावणी झाली नाही. उपविभागीय अधिका—यांनी १५८ भुखंड आपणांस दिले त्यापैकी काहींचा ताबा घेतला. बरेचसे भुखंड रिकामे होते. त्यापैकी काहींवर अतिक्रमणे झाली, काहींवर अंशत: अतिक्रमणे आहेत, १९९९ पासुन मी याबाबत वैयक्तीकपणे पाठपुरावा करत आहे. हे भुखंड ताब्यात घेण्यासाठी महापालिकेने आपल्या अर्थसंकल्पात तरतुद करावी. सनद देण्याचे प्रकार आतापर्यंत चालु होते. सुदैवाने आता सनद देण्याचे बंद आहे. नाहीतर आतापर्यंत जे भुखंड आहेत ते सुध्दा गेले असते, गौल मैदान सुध्दा गेले असते. कैलास कॉलनी सारखे पॅकेज, गायकवाड पाडा याठिकाणचे मोकळे भुखंड ताब्यात घेण्यासाठी महापालिकेने काय कारवाई केली? याची माहिति या सभागृहात दया. प्रत्यक्षात आपली चर्चा झालेली आहे. परंतु झालेली चर्चा त्यावर फलनिश्चिती ही सभागृहाबरोबर शहरातील प्रत्येक नागरीकाला कळावी म्हणुन येथे चर्चा होणे आवश्यक आहे. म्हणुन सभागृहापुढे ही लक्षवेधी सूचना दिली आहे. सध्या आपल्याकडे मोकळे भुखंड किती आहेत? मी मध्यंतरी एक प्रश्न टाकला होता. त्या प्रश्नाचे उत्तर याठिकाणी आलेले नाही. त्याचे कारण दिले गेले की, अभियंते नाहीत. अभिंयते नाहीत म्हणुन आपली महानगरपालिका बंद करता येणार

नाही. प्रश्न दिल्यानंतर प्रश्नाचे उत्तर नेहमीच महापालिकेत असलेच पाहिजे. प्रश्नाचा नंबर कळाला, १७२, त्यामध्ये महापालिकेने महापालिकेच्या आरक्षित भुखंडावर ज्या बांधकामास मंजुरी दिलेली आहेत ती किती? यापुर्वी दिलेली माहिती आहे, त्यावर परत परत प्रश्न येतात परंतु कार्यवाही होत नाही हे दुर्देव आहे. १९९६ पासुन १४ भुखंडावर महापालिकेने बांधकाम परवानगी मंजुर केली आहे. म्हणजे १९८८ पासुन बांधकाम परवानगी देण्यात येते. सदरचा भुखंड विकसित केल्यानंतर त्यातील २५ टक्के जागा महानगरपालिकेने घ्यायची असते. या २५ टक्के जागेमध्ये समजा मंडया, बेघरांना घरे दयायची असेल, ज्याची दुकाने रस्त्यात गेली आहेत त्यांना दुकाने दयायची असतील, तर २५ टक्के जागा मोफत देता येतील. १९९८ पासून आतापर्यंत एकाचा ताबा घेतला आहे. जवळपास त्या मालमत्त्येची किंमत करोडो रुपयांपर्यंत आहे. म्हणजेच महापालिकेचे करोडो रुपये असेच पडून आहेत. श्री. अनिल होटचदांनी ६१९ प्लॉटमध्ये होते, १९९८ साली त्याला बाधंकामासाठी मंजुरी दिली. श्री मरीनाल गोरे यांस १९९८ व २००१ ला २३०० चौ.मी. बाधंकाम परवानगी देण्यात आली. त्यातील २५ टक्के आपणांस घ्यायचे होते परंतु जो बिल्डर आहे त्यानी स्वत:च ती इमारत बांधली ती जागा महापालिकेस दयायची होती. त्यासाठी हे प्रकरण कोर्टात प्रलंबित आहे, म्हणजेच मलिदा त्यांनी खायचा आणि महापालिकेस दयायची वेळ आली तर वाद निर्माण करायचे असेच प्रकार बाकीचे आहेत का? हे शोधून काढण्याचा प्रयत्न केला तर बरेसची प्रकरणे तसीच निघाली. दोन प्रकरणे कोर्टात आहेत आणि तीन बाधंकामे चालूच केलेली नाहीत आणि काही बाधंकामाचा ताबा आता घेतला, ताबा कश्यासाठी उशीरा घेतला? त्याची कारणे काय आहेत महापालिकेच्या अधिका—यांचे लक्षात नव्हते काय की ही मालमत्ता आपली आहे? अतिरिक्त आयुक्त, उप—आयुक्त, मालमत्ता व्यवस्थापक, त्याच्या खालचे अधिकारी, अभियंते करतात काय? तर माझी अशी सुचना आहे की यापुढे आरक्षित भुंखडावर बाधंकासं मजुंरी देता कामा नये. ती खाजगी मालमत्ता असली तरीही तर ती भुमी सपांदन करु. मागील अर्थसंकल्पीय महासभेत भुंखडासाठी विषेश तरतुद करा असे मी म्हटले होते. तुम्ही इतिवृत्त काढा त्यात पहा जर तरतुद केली नसेल तर त्यात तरतुद करा. सुधारीत अर्थसंकल्पात घ्या परंतु एक निश्चित ठरवा की उल्हासनगर महानगरपालिकेतील जे आरक्षित भुंखड आहेत कारण एडीटीपी शी चर्चा करताना ते म्हणाले की आरक्षित भुंखड आता कमी राहिले आहेत. आता आरक्षण टाकायचे कुठे? लोकांना तर सुविधा तर दिल्या पाहिजेत, स्टेडीयम पाहिजे जर सार्वत्रिक विकास करायचा असेल तर त्यासाठी या सुविधा असल्याच पाहिजेत आपण त्या देवु शकत नाहीत. आम्ही चार एफएसआय मागतोय, चार एफएसआय मुळे वाढत्या लोकसंख्येला सुविधा देवु शकतो का? पाण्याच्या टाक्या आम्हाला उद्यानामध्ये बांधाव्या लागतात. ते एमजेपी चे प्लॉट्स आहेत त्याच्यामध्ये आम्ही पाण्याच्या टाक्या बाधंतो पुढे भविष्यामध्ये वाढणा—या (चार) एफएसआय नुसार जर लोकसंख्या वाढली तर त्यांना रस्ते कुठे देणार आहे? रोड .वांइडिंग मध्ये बाधीत होणा—यांना प्लॉट्स कुठले देणार? असलेले प्लॉट आम्ही लोकांना दयायचे त्यातील २५ टक्के घेण्याच्या नावाने बोंबाबोंब करायची. १०—१० वर्ष आम्ही काही कारवाई करत नाही? उदया कदाचित ती जागा त्यांनी विकलीही असेल सांगता येत नाही, माझ्या असे कानावर आले आहे की रिजन्सी पार्क सारख्या दोन तीन जागांवर त्यांनी बेघरांसाठी करार केलेला आहे तुम्ही चौकशी करा. लोक सांगातात की आम्ही बेघर झालेलो आहोत. त्यांनी करार करुन ती जागा इतरांना विकली आहे अशी माहिती मला मिळाली आहे. त्यामुळे मी सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो की ज्या महापालिकेच्या मालमत्ता आहेत त्या लगेच ताब्यात घ्या. आणि त्याची काही तरी विल्हेवाट लावा जेणेकरुन महापालिकेला त्यापासून उत्पन्न मिळेल. मालमत्ता पडुन राहिली तर त्यापासुन काही उत्पन्न मिळणार नाही व त्याची किंमत वर्षानुवर्षे कमी होत जाईल. कारण गेल्या १० वर्षापासुन त्याची काय अवस्था झाली असेल, तेथे खिन्डारे पडलेली असतील त्या जागा ताब्यात घेवुन त्यांची विल्हेवाट लावा, एकतर भाडयाने दया, भाडेही भरपूर आहे. महापालिकेला उत्पन्न पाहिजे आणि जे महापालिकेचे आरक्षित भुंखड आहेत ते हरित पट्टयामध्ये असोत, हरित पट्टयातील बोटक्लब शिल्लक आहे म्हणून उल्हासनगरला चांगले काही देण्याचे स्वप्न बघु शकतो. तिथेही अतिक्रमण झाले असते तर काय झाले असते? तर यासाठी आपण विशेष तरतुद केली आहे का? आपली चर्चा झाल्याप्रमाणे त्या ठिकाणी मालमत्ता ताब्यात घेण्यासाठी एखादया अधिका—याची नेमणूक केली आहे का? बरेसचे खाजगी भुंखड आहेत, कुणीतरी त्याची सनद काढलेली आहे. ती सनद बोगस देखील असु शकते. ती बोगस आहे की खरी आहे त्याची तपासणी करा. खरी असेल तर त्याचे भु संपादन करा. जेणेकरुन आपल्याला स्टॅडीयम बांधता येईल. लोकांना फक्त स्वप्न दाखवुन चालणार नाही. त्यानुसार कारवाई केली पाहिजे. मला असे वाटते की बेघरांची घरे व दुकानांचे प्लॉट हे खाजगी लोकांच्या ताब्यात आहेत. तेही संपादन करण्याची कारवाई लवकर करा. जेणे करुन त्यावर सनद मिळुन असलेल्या सनदेचा वापर करुन बांधकाम परवानगी देता येणार नाही किंवा घेणार नाहीत. आणि यापुढे आपण आपल्या स्तरावर अधिका—यांना एक आदेश दया की यापुढे महापालिकेची मालमत्ता व आरक्षित भुखंड ही महापालिकाच विकसित करेल तेथे कोणत्याही बांधकाम धारकास परवानगी देता कामा नये. काही अडचण असेल तर तसे सांगा. खाजगी मालमत्ता जर ती विकास आराखडयात आरक्षीत असेल तर ती सुध्दा संपादन करु शकतो. खाजगी मालमत्ता

संपादन करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करा, शासकीय भुंखड जे असतील त्याबाबत अर्थसंकल्पात तरतुद करा, शासनाकडून आपल्या ताब्यात घ्या आणि ते विकसित करा लोकांना तेच पाहिजे. आता एडीटीपी आलेले आहेत नाहितर विकास आराखडा तसाच पडून राहिला असता, जमिन आपल्या ताब्यात नाही आणि आरक्षण टाकलेले आहे तरीही त्याचा ताबा आपल्याकडे नाही ते तसेच पडून आहे आणि पुन्हा तीच पध्दत सुरु होईल, ते टाळण्यासाठी जे जे रिकामे भुंखड आहेत ते ताब्यात घेवुन त्यात आरक्षण जसे पाहिजे तसे पुढील विकास आराखडयासाठी टाका ही कळकळीची विनंती आहे, आणि त्याबाबत काय कार्यवाही करणार आहेत यावर लेखी आदेश किंवा सुचना या सभागृहात दया. त्याचबरोबर वर्षानुवर्षे या महापालिकेच्या जागा तश्याच पडून आहे, महापालिकेला त्यापासुन काही उत्पन्न नाही. उल्हासनगरच्या हद्दीमध्ये जे प्लॉट्स आहेत, ज्याची सनद प्रांत अधिका—यांनी दिलेली आहे. त्याचे पेमेन्टं उल्हासनगर महापालिकेस करणे गरजेचे आहे. आता पर्यंत किती सनद काढल्या नंतर पैसे आलेले आहेत तर माहिती असेल तर ठिक आहे नाहीतर पुढच्या महासभेत यादी दयावी. मालमत्ता नुकसान भरपाई त्यामध्ये आपण विकास करु शकतो. असे दोन विषय या ठिकाणी आलेले आहेत. प्रांत विभागाकडून आपल्याला जे येणारे पैसे आहेत ते आपले पैसे आहेत, पण आपले त्या कडे लक्ष नाही तर ते घेण्यासाठी आपण काय कार्यवाही करणार आहेत किंवा केली आहे की नाही अधिका—यांच्या हे लक्षात तरी आहे का? आपले पैसे त्याचे कडे आहेत ते देणे लागतील याबाबत आपण काय निश्चित कार्यवाही केलेली आहे हे सभागृहाला कळवावे.

सदस्य श्री. किशोर जग्यासी, श्री. महेश सुखरामानी, श्री. सुरेश जाधव, श्री. दिलीप जग्यासी हे सभागृहातुन बाहेर गेले. 

<u>आयुक्त (श्री. समिर उन्हाळे)—</u> सन्मानिय महापौर महोदया, सर्व सन्मानिय सदस्य, जेष्ठ नगरसेवक श्री. धनंजय बोडारे यांनी जो प्रश्न विचारलेला आहे तो अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. महानगरपालिकेच्या अर्थिक उत्पन्नाच्या संबधात आपण ज्या ज्या वेळेस जी चर्चा केली आहे त्यावेळेस जर जकात बंद झाली तर काय परिस्थिती होईल अशी दोन तीन महासभेत आपण चर्चा केली होती आणि त्यावेळेस महापालिकेची जी जमिन मालमत्ता आहे ती महानगरपालिकेच्या ताब्यात असणे, दुसरे म्हणजे त्या जमिनीचा विकास करणे, तिसरे असे की त्या जमिनीचे जे मासिक उत्पन्न आहे ते महापालिकेच्या तिजोरीत जमा होणे हया तिनही गोष्टी हया सारख्याच आणि तेवढयाच महत्वाच्या आहेत. दुसरे असे की विकास आराखडयाच्या संबंधाची चर्चा होती, १३ चौ.किमी जो एरिया आहे, साडे सहा, सात, आठ लाखाचे लोकसंख्येचे आपले जे अनुमान आहे ते एवढया कमी जागेमध्ये इतक्या जास्त नागरीकांना राहण्यासाठी आपण जर सुविधा देत नसु तर या शहरासाठी पालकत्व करण्यासाचा आपला जो दावा आहे सगळयाबाबतीत आमच्यासहित आपण कुठेतरी कमी पडू ही वास्तवता आपल्याला नेहमी लक्षात ठेवली पाहिजे. १९७२—७४ साली जो महानगरपालिकचा विकास आराखडा तयार केला त्यामध्ये जे आरक्षण दाखविण्यात आले होते, १९८५—८६ साली तत्कालीन जे प्रांत अधिकारी आणि तत्कालीन नगरपालिकेचे प्रशासक होते त्यांनी त्यावेळचे आरक्षित भुंखड ताब्यात दिले आहते अशी नोंद आपल्या मालमत्ता विभागात उपलब्ध आहे. त्यानंतर १९८६ साली नंतर २००६—२००७ सालामध्ये जी काही त्यावर बाधंकामे झाली ज्या झोपडपट्टया झाल्या ज्या इमारती उभ्या राहिल्या त्याचा विचार करुन जे सहा लाख व आठ लाख लोक येथे राहणार आहेत त्याच्यासाठी जमिनीच्या सुविधा आपण देवु शकलो नाही तर निश्चित पणे या शहरात राहायला या असे नागरिक बोलु शकणार नाहीत हि वास्तवता आहे. हा अतिशय गंभीर प्रश्न असुन हयासाठी दिर्घकालीन उपाययोजना करण्याचा जो मुद्दा आहे दैनदिन बाबी असतील अदांज असतील, नाला असेल, पाणी असेल, त्याबाबत चर्चा होतील पण या प्रश्नाच्या निमित्ताने एका महत्वाच्या विषयाकडे सभागृहाचे लक्ष वेधता आले याबाबतीत मला स्वत:लाही आनंद आहे, निश्चित जी कार्यवाही करायची आहे ती काय करायची आहे याबाबत मागील सभेत जी चर्चा झाली त्या अनुषगांने मालमत्ता विभागाने काहीना—काही हालचाल केली त्यानिमित्ताने चार,पाच जागा आपल्या महापालिकेच्या ताब्यात आल्या तर जे सोळा किंवा अठरा बांधकाम परवानग्या १९९६ सालापासून आपण दिल्याचा अहवाल दाखविण्यात येतो, त्यानुसार ज्या बांधकाम धारकाने २५ टक्के जे बांधकाम दयाचचे आहेत ते हस्तांतरीत केलेले नसेल तर त्याची बाधंकाम परवानगी रद्द करण्याची तरतुद बीपीएमसी कायदया खाली आहे तर ती निश्चित पणे आपण अमंलबजावणी करावी हे मी आपणास प्रथम सांगतो हे झाले एक दुसरे असे की, ज्या जागांवर अर्धवट अतिक्रमणे झालेली आहेत. किंवा ताब्यात गेलेल्या असतील, राहिलेल्या ज्या जमिनी आहेत त्या ताब्यात घेणे त्यांची ओळख पटविणे त्याचे सिमा निश्चित करणे, त्या जागा ताब्यात घेवुन तेथे कंपाऊड वॉल बांधणे. माझ्या मते बराचसा खर्च असणारा हा विषय आहे. त्यासाठी अर्थसंकल्पामध्ये तरतुद करणे आवश्यक असते. सध्या मंजुर झालेला जो अर्थसंकल्प आहे, त्यामध्ये विकास आराखडयानुसारचा जो निधी गोळा होतो तो निधी कोणत्या

कामांवर खर्च केला जावु शकतो. ही जी कारणे दिली आहेत त्यामध्ये आरक्षित जागांचा विकास करणे हे एक महत्वाचे कारण आहे. आणि त्या असतीत्वातील तरतुदीमधुन जर गटारे आणि सीसी पॅसेज तयार करण्याची कामे तुम्ही आणि आम्ही थांबवु शकलो तर हा निधी आरक्षित भुखंड ताब्यात घेण्यासाठी त्याला कंपाऊड वॉल बांधण्यासाठी वापरता येईल. त्यासाठी वेगळी अर्थसंकल्पीय तरतुद करणे आवश्यक राहणार नाही असे माझे मत आहे. जे आरक्षित भुखंड आहेत ते नुसतेच आपण ताब्यात घेतलेले आहेत त्यांच्याबाबतीत आपण काहीही केलेले नाही तर महानगरपालिकेला निश्‍चित असे काही उत्पन्न होणार नाही. आणि आता आपण १२० कोटीची पाणी पुरवठयाची निविदा काढली आहे. ती निविदा ६० टक्के जास्त दराने प्राप्त झाली आहे. १२० कोटीचा प्रकल्प १९३ कोटीपर्यंत पोहोचला आहे. पुन्हा आम्ही निविदा मागविली परंतु एक लक्षात घ्यावे लागेल की, साधारणत: पाचशे ते सहाशे कोटीचा विकास निधी तयार करण्याची जबाबदारी या सभागृहा सहित आपणा सर्वांवर आहे. आणि यासाठी महानगरपालिकेच्या ज्या जमिनि आहेत त्या ताब्यात घेण्याची आपण निश्‍चित कारवाई करु. याबाबतीत ब—याचवेळा आम्ही बोललेलो आहोत परंतु कारवाई झालेली नाही. याबाबतची आपली खंत देखील योग्य आहे. तर महानगरपालिकेच्या जमिनी ताब्यात घेण्यासाठी आम्ही एक विशेष कृतीदल स्थापन करु. त्यामध्ये स्वत: आयुक्त, अतिरिक्त आयुक्त, एडीटीपी, शहर अभियंता, आताच मला माहिती मिळाली आहे की, श्री. जवांदे यांची शहर अभियंता पदावर अतिरिक्त कार्यभार देवुन नियुक्ती केल्याबाबतचा आदेश निघाला आहे. त्याबाबतचा फॅक्स माझ्याकडे आलेला आहे, मा. महापौर महोदयांकडे देखील आलेला आहे. तर याप्रकारे एक विशेष कृती दलाची स्थापना या विषयान्वये मी करत आहे. याबाबतचा आदेश आजच संध्याकाळी कार्यालय सोडण्याअगोदर मी काढेन. या कृती दलामार्फत आरक्षित जमिनी ताब्यात घेवुन त्या विकसित करुन दैनंदिन, मासिक उत्पन्न महानगरपालिकेला मिळण्यासाठी जे काही विहित कार्यपध्दतीतील मार्ग आहेत त्यांचा अवलंब करुन त्या अनुषंगाने एक संकल्प तुम्ही, आम्ही सोडला तर मला खात्री आहे की, या निमित्ताने महानगरपालिकेच्या इतिहासामध्ये एक फार मोठी भुमिका या सभागृहामार्फत आपण पार पाडु शकाल. कृती दलाची आम्ही आता स्थापना करु. आणि आम्ही काय कारवाई केली याचा अहवाल दर महिन्याला सभागृहापुढे सादर करु.

सदस्या श्रीमती ज्योती चैनानी, श्रीमती नेहा भोईर, श्रीमती लिलाबाई आशान हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>**त्याबाबतीत माझ्या काही सूचना आहेत, अपेक्षित आहेत. ज्या जागांवर आपण बांधकाम परवानगीसाठी परवानगी दिलेली आहे, मला वाटते साधारणत: त्या चौदा जागा आहेत, त्यावर दिलेली बांधकाम परवानगी आणि त्यावर २५ टक्क्याप्रमाणे आलेला परतावा तो बरोबर आहे का? हे झाले कायदेशीर बाबींच्या बाबतीत, काही ठिकाणी बेकायदेशीर झाले असेल तर ते पुर्णच्या पुर्ण बांधकाम महापालिकेने ताब्यात घ्यावे. त्या चौदा जागांपैकी काही महापालिकेच्या जागा होत्या. फक्त बांधकाम करण्यापुरती बांधकाम नकाशा त्यास मंजुर करुन दिला आहे. ही माझी सूचना आहे. त्यात काही तांत्रिक अडचण असेल किंवा काही कायदेशीर अडचण असेल तर ती सांगावी परंतु हे बरोबर आहे काय? कारण की या जागा ताब्यात घेण्यासाठी महापालिकेने एवढा वेळ लावलेला आहे. एका विकासकाचे म्हणणे आहे की, ते काम थांबलेले आहे. जेव्हा संचालक सूचना देतील तेव्हा त्यावर कारवाई होईल. म्हणजे विकास आराखडा आमचा, बांधकाम परवानगी आम्ही दिलेली आहे. आणि बांधकाम परवानगी घेतल्यानंतर विकासकाला स्वप्न पडते, त्याला माहिती पडते की तो भुखंड आरक्षित नाही आणि आम्ही मान्य करतो आणि मग संचालकांकडुन काय सूचना येतील तिचे आम्ही वाट बघत राहतो. तर आपणांस आपले माहित असली पाहिजे की आपण कोठे आहोत? ती मालमत्ता आपली आहे का? खात्री असेल तर दुमत असण्याचे कारणच नाही. दोन मते तयार केली जातात. तेथे त्याचा फायदा समोरच्याला होतो फायदा घेणारे भरपुर आहेत. तो फायदा मिळु नये म्हणुन बांधकाम परवानगी ८१६ मिटरची असेल तर त्यानुसार ८१ चौरस मिटर किंवा २५ टक्के जागा किती होते ती, आपल्याला मिळालेली आहे का? ते बरोबर आहे किंवा नाही. त्यासाठी पुर्णपणे तपासणी केली पाहिजे. आता तर एडीटपी आहेत, उच्चस्तरीय अधिकारी असतील ते १४ पैकी ४—५ आरक्षणांच्या जागांची तपासणी केल्यानंतर त्यांनी दिलेली माहिती बरोबर आहे का याची छाननी करा आणि त्या जागा प्रथम ताब्यात घ्या. त्यानंतर शासकिय भुखंड जे आता आहेत ते ताब्यात घेवुन तसेच जे भुखंड आरक्षित आहेत परंतु खाजगी आहेत त्यांना सनद मिळालेली आहे, ते ताब्यात घेण्याची प्रक्रिया लवकरात लवकर सुरु करण्यात यावी. महापालिकेच्या प्रयत्नाने, तुमच्या प्रयत्नाने, लेखा विभागाच्या प्रयत्नाने श्री. दिघे साहेब, श्री. कांबळे साहेब आणि श्री. हरेश इदनानी यांचे मी अभिनंदन करतो त्यांनी चांगल्या सुस्थितीत लेखा विभाग आणुन ठेवलेला आहे. उल्हासनगर महानगरपालिकेच्या इतिहासात जे कधी झाले नव्हते असे त्यांनी केले आहे. ३१ मार्च पर्यंतची

देयक प्रदान झाली आहेत. आतापर्यंत असे कधीच  झाले नव्हते. त्यामुळे उल्हासनगरची आर्थिक स्थिती जी चार वर्षापुर्वी अतिशय कमकुवत होती ती आज चांगल्या स्थितीत आणण्यामध्ये आपण यशस्वी झाला आहात. जे भुखंड आहते ते ताब्यात घेवुन उल्हासनगरची भविष्यातील जी १२ लाखाची जी लोकसंख्या होईल त्या लोकसंख्येच्या पिढीला आपण काहीतरी दिले पाहिजे, नाहीतर ती पिढी आपणांस माफ करणार नाही. अरुंद रस्ते, वालधुनीचा नाला, किवा ४४४ चा नाला तोही साफ करण्याची बोंबाबोंब, भविष्यात असे होईल की साफ करायला जागा नसणार. त्यासाठी आताच पायाभुत सुविधा लोकांना चांगल्या दिल्या पाहिजेत. त्यातल्या त्यात आम्ही त्या सुविधा चांगल्या देवु शकत नाही. कल्याण करु शकत नाही, ठाणे करु शकत नाही, किंवा मुंबईचे सिंगापुर करु शकत नाही. आमचे उल्हासनगर चांगले ठेवण्यासाठी जे रिकामे भुखंड आहेत ते लवकरात लवकर ताब्यात घेण्यासाठी लवकरात लवकर कारवाई करा आणि त्याची माहिती पुढच्या महासभेत दया.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :—</u>मी सुध्दा एक सूचना करु इच्छितो, सन्माननिय सदस्य श्री. धनंजय बोडारे यांनी १५—२० मिनिटे घेतले व उल्हासनगर महापालिकेच्या हद्दीतील व बाहेरील भुखंडाच्या बाबतीत त्यांनी सांगितले. ते भुखंड विकसित कसे करावे, काय करावे त्यांनी हे ही सांगितले. मला तरी असे वाटते की, तुम्ही आल्यापासुन जे भुखंड तुम्ही कंपाउंड मारुन ठेवलेले आहेत, ते भुखंड तुम्ही विकसित करत नाहीत. ते विकसित करण्यासाठी कित्येक वेळा आपली बैठक झालेली आहे. निर्णयही ठरलेला आहे, उदाहरणादाखल अमन सिनेमा समोरील प्लाट नं. ७०५ हा एवढा मोठा प्लाट आहे, तो लोकांना सकाळी प्रातविधी करण्यासाठी ठेवलेला आहे काय? डुक्करे आणि माणसे तेथिल कंपाउंड काढुन टाकतील आणि काही लोक तेथे आपल्या मालकी हक्काचे फलक रोवतील. आणि तेथे पुन्हा बांधकामे होतील. अशी परिस्थिती आपण या महापालिकेची करुन ठेवलेली आहे. कुठल्याही अधिका—यास मग तो उप—आयुक्त असेल किंवा आयुक्त असेल, आयुक्त साहेब, तुम्ही मनाला लावुन घेवु नका. परंतु अधिका—यास असे वाटत असेल की मी येथे तीन वर्ष राहिन आणि निघुन जाईन. जावु दे ते उल्हासनगर काय करायचे आहे आपल्याला. सदस्य बोलतात, तेवढे ऐकुन घ्यायचे आणि सोडुन दयायचे. परंतु आमच्या सन्माननिय सदस्यांनी सांगितले आहे की, भुखंड विकसित झाले पाहिजेत. आम्हांला सिंगापुर नको आहे परंतु कमीत कमी महाराष्ट्रातील लोक या महापालिकेकडे चांगल्या नजरेने पाहतील अशी स्थिती तरी तुम्ही या महापालिकेची ठेवा. आणि तुम्ही मनावर घेतले तर ही स्थिती येवु शकेल. हे उल्हासनगर शहर नंदनवन झाले पाहिजे. आणि म्हणुन ही लक्षवेधी सूचना दिली आहे. कंपाउंड वॉल मारुन ठेवलेले भुखंड तुम्ही विकसित करा आणि ते विकसित कसे कराल याबाबतही चर्चा झालेली आहे. परंतु त्याकडे कुणीही लक्ष देत नाही. इमारत बांधकाम करायचे आहे आणि ते चाललेले आहे. परंतु ज्या भुंखंडामुळे उल्हासनगर महापालिकेला काही उत्पन्न मिळेल याकडे कुणाचे काही लक्ष नाही. आणि म्हणुन आम्ही तुम्हांला सांगतो. तुम्हांला यासाठी सांगतो की तुम्ही आयुक्त आहात. ही सर्व जबाबदारी तुमच्यावर आहे. आम्ही तुम्हांला साथ दयायला तयार आहेत. आणि म्हणुन जे भुखंड आहेत ते विकसित करावे अशी आम्ही एकमुखाने सूचना माडतो.

<u>आयुक्त (श्री. समीर उन्हाळे):—</u>या संदर्भात गटनेत्यांच्या बैठकीत आपली जी चर्चा झाली होती त्या अनुषंगाने सुरुवात आपण बोटक्लबपासुन केली. बोटक्लबच्या आपण दोनदा तिनदा निविदाही काढल्या परंतु सध्याच्या जागतिक मंदीमुळे तसेच मालमत्तांच्या दरामध्ये झालेल्या कपातीमुळे कदाचित त्याला अपेक्षित प्रतिसाद मिळाला नसेल परंतु आपण सुरुवात बोटक्लब पासुन केली होती. पाहिजे तर आम्ही ती प्रक्रिया परत चालु करु. बोटक्लबला मिळणारा जो अनुभव आहे ज्याच्या अनुषगाने बोटक्लब विकसित करण्याची चर्चा झाली होती. त्या अनुषंगाने आम्ही बोटक्लब संदर्भात तिस—यांदा निविदा मागवुन सुध्दा अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. त्यासाठी परत आम्ही निविदा मागवु. आणि आपण सर्वांनी जी भावना व्यक्त केली, जेष्ठ नगरसेवकानी सांगितले आहे की, ही वेळ आहे, महानगरपालिकेचे मासिक उत्पन्न वाढविण्याची, जर चुकुनमाकुन दोन वर्षांनी, पाच वर्षांनी जकात गेली तर महानगरपालिका चालविणे अतिशय अवघड होईल. त्यासाठी जकातीव्यतिरिक्त उत्पन्नाचे मार्ग महापालिकेने शोधले पाहिजेत. त्यासाठी गरज पडली तर पाणी पट्टी, घरपट्टी आणि वास्तववादी दरवाढ किंवा दर कमी जे काही असेल त्याप्रमाणे झाले पाहिजे. जे उपभोगते आहेत त्या उपभोक्यांकडुन शुल्क उभारणे, जेवढा खर्च महापालिकेकडुन होतो त्याप्रमाणात तरी उत्पन्न पर्यायाने मिळाले पाहिजे. ज्याप्रमाणे महिला सदस्य आहे, महापौर ही महिला आहे,एखादी महिला ज्याप्रमाणे घर चालविते त्याप्रमाणे जेवढे उत्पन्न मिळते तेवढे खर्च करण्याची तरतुद घरातील कर्ती महिला करत असते. तर त्या भुमीकेमध्ये तुम्हा—आम्हा सर्वांना मिळुन उतरावे लागेल. हे शहर चांगले विकसित झालेले तुम्हांला दिसुन येईल. यासाठी जे काही शक्य आहे ते आम्ही व आपण सर्वजण मिळुन करु याची मी खात्री देतो.

महापालिका सचिव :— विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

विषय क्र. २ :— मागील सभेचे दिनांक २०/३/२००९ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

महापौर :— मागील सभेचे दिनांक २०/३/२००९ रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

---

**विषय क्र. २** :— मागील महासभेचे दिनांक २०/३/२००९ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नाव : श्री. जीवन इदनानी
अनुमोदकाचे नाव : श्री. बी.बी. मोरे

महासभा ठराव क्र. ०१ दिनांक : २०/५/२००९

ही महासभा महापालिका सचिवांनी प्रस्तुत केलेले दिनांक २०/३/२००९ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे पृष्ठ क्र. १ ते १० पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सर्वानुमते

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ३**:—श्री. नंदलाल शर्मा, सुरक्षा रक्षक यांना महापालिका सेवेतुन दिनांक २५/०३/२००९ पासून स्वेच्छानिवृत्तीस मान्यता देणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

महापौर :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ३** :— श्री. नंदलाल शर्मा, सुरक्षा रक्षक यांना महापालिका सेवेतुन दिनांक २५/०३/२००९ पासून स्वेच्छानिवृत्तीस मान्यता देणे.

प्रस्तावना

श्री. नंदलाल शर्मा, सुरक्षारक्षक, आरोग्य विभाग यांनी स्वेच्छानिवृत्ती मिळणेविषयक दिनांक २६/१२/२००८ रोजी अर्ज दाखल केला आहे.

श्री. नंदलाल शर्मा हे उल्हासनगर महानगरपालिकेत दिनांक २४/८/१९७९ रोजी सुरक्षा रक्षक या पदावर नियुक्त झाले आहेत. त्यांची सेवा २० वर्षापेक्षा अधिक आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (कुटुंब निवृत्ती

वेतन) नियम, १९८२ चे नियम ६६ पोटनियम (१) अन्वये श्री. नंदलाल शर्मा यांना त्यांच्या अर्जानुसार दिनांक २५/३/२००९ रोजी स्वेच्छानिवृत्ती घेता येईल. तसेच त्यांचेविरुध्द विभागीय चौकशी/न्यायालयीन प्रकरण असे एकही प्रकरण प्रलंबीत किंवा प्रस्तावित नाही.

वरील वस्तुस्थिती पाहता श्री. नंदलाल शर्मा सध्या कार्यरत आरोग्य विभाग यांना महाराष्ट्र नागरी सेवा (कुटुंब निवृत्ती वेतन) नियम १९८२ चे नियम ६६ पोटनियम (१) अन्वये दिनांक २५/३/२००९ रोजी स्वेच्छानिवृत्ती घेण्याबाबतचा प्रस्ताव मा. महासभेच्या मंजुरीसाठी प्रस्तावित आहे.

महासभा ठराव क्र: ०२ दिनांक:—२०/५/२००९

सुचकाचे नाव :— श्री. सुरेश जाधव

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती इंदिरा उदासी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. नंदलाल शर्मा, सुरक्षा रक्षक यांना महापालिका सेवेतुन दिनांक २५/०३/२००९ पासून स्वेच्छानिवृत्ती मान्य करित आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

---

विषय क्र. ४ :— उल्हासनगर महानगरपालिकेत कार्यरत कर्मचा—यांना रु. १७००/— प्रवास भत्ता अदा करणेकामी मान्यता देणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

महापौर :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

विषय क्र. ४:— उल्हासनगर महानगरपालिकेत कार्यरत कर्मचा—यांना रु. १७००/— प्रवास भत्ता अदा करणेकामी मान्यता देणे.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिकेत कार्यरत कर्मचा—यांना रु. १६००/— इतका वार्षिक प्रवासभत्ता देण्यात येतो. परंतु उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात कार्यरत कर्मचारी संघटनांनी प्रवास भत्ता रु. १७००/— इतका करण्याबाबत मागणी केली आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेत कार्यरत कर्मचा—यांना प्रवास भत्ता रु. १७००/— इतका वाढीव प्रवासभत्ता दिल्यास वार्षिक रु. २.५०/— लाख एवढा खर्च अपेक्षित आहे.
तरी उल्हासनगर महानगरपालिकेत कार्यरत कर्मचा—यांना प्रवास भत्ता रु. १७००/— करणेकामी धोरणात्मक निर्णयार्थ मा. महासभा पटलावर प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: ०३ दिनांक:— २०/५/२००९

सुचकाचे नाव :— श्रीमती इंदिरा उदासी
अनुमोदकाचे नाव :— श्री. प्रधान पाटील

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेत कार्यरत सर्व पात्र कर्मचा—यांना रु. १७००/— प्रवास भत्ता देणे मान्य करित आहे.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ५** :—श्री. गौतम भालेराव, माजी सभापती, प्रभाग समिती क्र. ३ यांचे सन २००४ ते २००५ या कालावधीचे दुरध्वनी देयक रक्कम रुपये १७४०६/— अदा करणेस मान्यता देणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

सदस्य श्री. धनंजय बोडारे :—आयुक्त साहेब, हा विषय ब—याच दिवसापासुन प्रलंबित आहे. प्रभाग समिती सदस्यांना २००४ मध्ये वाहनभत्ता मिळावयास पाहिजे होता. तो मिळाला नाही. आता हा प्रस्ताव सभागृहापुढे आला असल्याने याबाबतचा जो ठराव पारीत होत आहे त्याबाबतचे इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता त्यांना वाहन भत्ता मिळाला तर बरे होईल.

काही सदस्य :—पास—पास......

महापौर :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ५**:— श्री. गौतम भालेराव, माजी सभापती, प्रभाग समिती क्र. ३ यांचे सन २००४ ते २००५ या कालावधीचे दुरध्वनी देयक रक्कम रुपये १७४०६/— अदा करणेस मान्यता देणे.

प्रस्तावना

श्री. गौतम भालेराव, माजी सभापती, प्रभाग समिती क्र. ३ यांनी दिनांक २/२/२००९ च्या पत्रान्वये सन २००४—२००५ या कालावधीचे दुरध्वनी देयक रक्कम रुपये १७,४०६/— ची मागणी केलेली आहे. यापुर्वी त्यांनी मागणी केलेली नाही व देयक बुकात पाहणी केली असता त्यांना सन २००४—२००५ चे दुरध्वनी देयक रक्कम अदा करण्यात आलेली नाही.

महापालिका स्थायी समिती ठराव क्रमांक ७, दिनांक ३०/४/१९९७ अन्वये इतर सभापती यांना दुरध्वनी देयक भरण्यासाठी दरमहा रु. १५००/— प्रमाणे देण्यास मंजुरी दिलेली आहे.

लेखा परिक्षण विभागाच्या मतानुसार श्री. गौतम भालेराव, माजी सभापती, प्रभाग समिती क्र. ३ यांच्या एप्रिल, २००४ ते २००५ या कालावधीचे दुरध्वनी देयकाचे प्रदानास वित्तीय तरतुदीस महासभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

वरील बाब लक्षात घेवुन महासभेपुढे योग्य निर्णयासाठी सादर.

महासभा ठराव क्र: ०४ दिनांक:—२०/५/२००९

सुचकाचे नाव :— श्री.बी.बी. मोरे
अनुमोदकाचे नाव :— श्री. रविंद्र बागुल

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. गौतम भालेराव, माजी सभापती, प्रभाग समिती क्र. ३ यांचे सन २००४ ते २००५ या कालावधीचे दुरध्वनी देयक रक्कम रुपये १७४०६/— अदा करणे मान्य करित आहे.

सदर ठरवांतर्गतचा निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ६** :— महसूल समिती सदस्या श्रीमती कविता सिरवानी यांचा राजीनामा मंजुर करणें व त्यांच्या जागी नविन सदस्याची नेमणूक करणे.

---

महसूल समिती सदस्य पदासाठी पुन्हा श्रीमती कविता सिरवानी यांचे नाव आले आहे. यापुर्वी त्यांनी राजीनामा दिला होता, आपली पुनर्नियुक्ती व्हावी अशी त्यांची इच्छा आहे. पास?

काही सदस्य :—पास—पास......

महापौर :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

विषय क्र. ६:— महसूल समिती सदस्या श्रीमती कविता सिरवानी यांचा राजीनामा मंजुर करणें व त्यांच्या जागी नविन सदस्याची नेमणूक करणे.

प्रस्तावना

मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ३१ अन्वये तदर्थ समित्यांची नेमणूक करण्याची तरतूद आहे. त्यानुसार उल्हासनगर महानगरपालिकेने महासभा ठराव क्र. १५, दिनांक १/९/२००८ अन्वये महसूल समितीसह ९ विशेष समित्यांची रचना केली आहे.

महसूल समितीने दिनांक दिनांक ९/९/२००८ रोजीच्या आपल्या सभेत ठराव क्र. १ अन्वये श्रीमती कविता सितलदास सिरवानी यांची बिनविरोध निवड केली आहे.

श्रीमती कविता सिरवानी यांनी दिनांक २०/४/२००९ रोजी महसूल समिती सभापती व सदस्य या दोन्ही पदांचा राजीनामा दिला असल्याने तो मंजूर करुन महसूल समिती सदस्य पदाच्या उर्वरीत कालावधीसाठी त्यांच्या जागी दुस—या एका सदस्याची निवड करण्यासाठी महासभेपूढे प्रस्तावित.

महासभा ठराव क्: ०५ दिनांक:— २०/५/२००९

सुचकाचे नाव :— श्रीमती इंदिरा उदासी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वानखेडे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे महसूल समिती सदस्या श्रीमती कविता सिरवानी यांचा राजीनामा मंजुर करून त्यांच्या जागी श्रीमती कविता सिरवानी यांची महसूल समिती सदस्या म्हणून नेमणूक करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—**आता आता सूचना प्राप्त झाली आहे की, मालमत्ता विभागाचे शिपाई श्री. सुरेश होतचंदानी यांना हृदयविकाराचा झटका येवुन आज कामावर असताना त्यांचे निधन झाले आहे. कृपया सर्वांनी उभे राहुन श्रध्दांजली अर्पित करावी.

---

सुचकाचे नाव :— श्री. लाल पंजाबी

अनुमोदकाचे नाव :— श्री. बी.बी. मोरे

**शोक प्रस्ताव**

उल्हासनगर महानगरपालिकेचे मालमत्ता विभागातील शिपाई श्री. सुरेश होतचंदानी हे कामावर असताना व कर्तव्य बजावत असताना आज दिनांक २०/५/२००९ रोजी हृदयविकाराचा झटका येवून निधन पावले आहेत.

श्री. सुरेश होतचंदानी यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. ५ अ** **दिनांक:—२०/५/२००९**

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार सुरेश होतचंदानी यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—**कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ६.१५ वाजता महापौर श्रीमती निर्मले विद्या विजय यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— १९/६/२००९

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १९/६/२००९ रोजीच्यासर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

३

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक १९/६/२००९ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती निर्मले विद्या विजय हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते /होत्या.

७. महापौर—— श्रीमती निर्मले विद्या विजय

८. उप—महापौर—— श्री. ठाकूर विनोद लालसिंग

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | ३७ | श्री. कुमार उत्तमचंद आयलानी |
| ४ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | ३८ | श्री. प्रशांत किसनराव धांडे |
| ५ | श्री. गायकवाड दिलीप | ३९ | श्रीमती पंचशिला नाना पवार |
| ६ | श्री. रविंद्र दशरथ बागूल | ४० | श्रीमती करोतीया मालती राधाचरण |
| ७ | श्री. रामसागर जनार्दन यादव | ४१ | श्री. मंगतानी सुंदर आसनदास |
| ८ | श्रीमती निलम प्रेमसिंग रावत | ४२ | श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण |
| ९ | श्री. मोरे भानजी भिकारी | ४३ | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| १० | श्री. दत्तात्रय नारायण पवार | ४४ | श्रीमती बोडारे वसुधा धनंजय |
| ११ | श्रीमती चौधरी राजश्री राजेंद्र | ४५ | कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल |
| १२ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ४६ | श्री. शेखर केशव यादव |
| १३ | श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान | ४७ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १४ | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी | ४८ | श्रीमती सुमन गजानन शेळके |
| १५ | श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी | ४९ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १६ | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद | ५० | श्री. किशोर जग्यासी |
| १७ | श्री. राजू जग्यासी | ५१ | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड |
| १८ | श्री. राम (चार्ली) पारवानी | ५२ | श्री. बच्चाराम रुपचंदानी |
| १९ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ५३ | श्रीमती ज्योती शाम माने |
| २० | श्रीमती जया प्रकाश माखीजा | ५४ | श्रीमती लता शांताराम निकम |
| २१ | श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी | ५५ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २२ | डॉ. (श्रीमती) निना प्रकाश नाथानी | ५६ | श्री. मोहन साधवाणी |
| २३ | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार (कुमारी)केवलराम | ५७ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| २४ | श्री. भठीजा (बब्बु) संजय | ५८ | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| २५ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे | ५९ | श्रीमती मीना सोनेजी (सोंडे) |
| २६ | श्री. लाल पंजाबी | ६० | श्रीमती वनवारी मोना अशोक |
| २७ | श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास | ६१ | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी |
| २८ | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती | ६२ | श्री. मुकेश सोहन तेजी |
| २९ | श्री. मोहन (गारो) रामरख्यानी | ६३ | श्री. प्रकाश गणपत सावंत |
| ३० | श्री. सुखरामानी महेश पहलाजराय | ६४ | श्री. नरेंद्र रामचंद्र राजानी |
| ३१ | श्री. एडके गणपत गोविंद | ६५ | श्री. गोदुमल नारायणदास क्रिष्णानी |
| ३२ | श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा | ६६ | श्री. राजेश नानीकराम वधारीया |

| | | | |
|---|---|---|---|
| ३३ | श्रीमती वेलकर सुरेखा राजन | ६७ | श्री. ढोके जर्नादन किसनराव |
| ३४ | श्रीमती महाडीक रजनी मोहन | ६८ | श्री. पाटील प्रधान धर्मा |
| ३५ | श्री. विजय खडु सुपाळे | ६९ | श्रीमती संगीता राजेश कडारे |
| ३६ | श्री. हिरांनद आत्माराम जग्यासी (साई) | | |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज), २. श्रीमती सुजाता रमेश रिझवानी, ३. श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा, ४. श्रीमती शकुंतला पाटील, ५. ॲड. श्री. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी, ६. श्री. लालबिहारी बुझारत यादव, ७. श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी, ८. श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे, ९. श्रीमती मनसुलकर शिला सुभाष, १०. श्रीमती चेनानी ज्योती रमेश, ११. श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी, १२. श्री. सुनिल साहेबराव गंगवानी.

खालील अधिकारी सभेस हजर होते.

९०.श्री. समीर उन्हाळे, आयुक्त
९१.श्री. अशोक रणखांब, अतिरिक्त आयुक्त
९२.श्री. मिलींद सावंत, उप–आयुक्त
९३.श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
९४.श्री. दिपक सावंत, उप–आयुक्त
९५.श्री. अनुदिप दिघे, मुख्य लेखा अधिकारी
९६.श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता,विदयुत
९७.श्री. एस.जी. खडताळे, कार्यकारी अभियंता,पाणी पुरवठा
९८.श्री. आर.बी.शिर्के, प्र. शहर अभियंता
९९.डॉ. राजा रिझवानी, वैद्यकीय अधिकारी
१००. श्री. रमेश काजळे, प्र. प्रभाग अधिकारी
१०१. श्री. चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख
१०२. श्री. के. सेलवन, प्र. उप–अभियंता,पाणी पुरवठा
१०३. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
१०४. श्री. व्ही.आर.गर्जे, प्र. सहा. आयुक्त
१०५. श्री. अश्विनी अहुजा, इंजिनियर, मालमत्ता विभाग
१०६. श्री. उदय लिमये, मुख्य लिपिक, सामान्य प्रशासन विभाग

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्री. गणेश शिंपी
२. श्री. श्याम शिवनानी
३. श्री. तानाजी पतंगराव
४. श्रीमती अमिता संखे
५. श्रीमती नर्गिस खान

४.२४ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>महापालिका सचिव :–</u>विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

प्रश्नोत्तरे.........

प्रश्न क्र. १७१ हा श्री.बी.बी. मोरे यांचा आहे.

यावेळी सायंकाळचे ४ वाजून २४ मिनिटे झाली आहेत.

**?**

<u>प्रश्न क्र. १७१ :–</u> प्र.क्र. अ) लोकसभेचे इलेक्शन लागल्यापासून आचारसंहिता २ मार्च २००९ ला लागली असता उल्हासनगर महानगरपालिकेच्या कामकाज चार विभागात चालले असून आचार संहिता लागल्यापासून उल्हासनगर चार प्रभाग समितीमध्ये अनधिकृत बांधकामे किती झालीत व त्याबाबत प्रभाग समितीमध्ये अनधिकृत बांधकामे किती झालीत व त्याबाबत प्रभाग अधिकारी यांनी काय कारवाई केली आहे काय व प्रभाग अधिका–याने कारवाई केली नसेल तर त्या प्रभाग अधिका–याबाबत काय कारवाई करणार?

प्र.क्र. ब) प्रभाग समिती ३ मध्ये सिमरन पॅलेस इमारतीच्या समोर बरीच अनधिकृत बांधकामे झाली व आता पुन्हा चालूच आहे प्रभाग ३ चे प्रभाग अधिकारी श्री. काजळे आहेत यांना अनधिकृत बांधकाम तोडणे बाबत कळविले असता ते दुर्लक्ष करतात याला कारण काय प्रभाग अधिकारी बेजबाबदार वावरत असेल तर त्यावर काय कारवाई करणार महापालिका अनधिकृत बांधकाम तोडणार काय? अनधिकृत बांधकाम तोडणार असतील तर ती कधी तोडणार याचा खुलासा महासभेत व्हावा.

<u>उत्तर :–</u> दिनांक २ मार्च, २००९ पासून लागलेल्या आदर्श आचारसंहिता प्रभाग समिती १ अंतर्गत झालेल्या अनधिकृत बांधकाम हे प्रभागातील अधिकारी व कर्मचारी हे निवडणूक आचारासंहितेच्या कामात व्यस्त असल्यामुळे काही ठिकाणी टिअर्सगर्डर व काही ठिकाणी जुन्या घराची उंची वाढविण्याची काम केलेले आहेत. त्याचे शोध कार्य चालु आहे. प्रभाग सामिती १ अंतर्गत एकुण २४ अन अधिकृत वाढीव बांधकामे व शोध पथक यांचे निदर्शनास आलेली आहेत. त्यापैकी ९ वाढीव बांधकाम निष्कासित करण्यात आलेली आहेत. बाकी बांधकामांची पूर्ण तपासणी करुन त्यांच्या वर कायदेशीर निष्कासनाची कार्यवाही करण्यात येईल.

प्रभाग समिती क्र. २ या क्षेत्रात आचार संहिता कालावधीत एकूण २३ बांधकामे आढळली आहेत. त्यापैकी १२ बांधकामे किरकोळ दुरुस्ती व प्लॉस्टरची आहेत. ६ बांधकामे मंजुर नकाशा आहेत व एकूण बांधकामे अनधिकृत आहेत. २ बांधकामे निष्कासीत करण्यात आली. ३ बांधकामे पोलिस बंदोबस्त मिळाल्यानंतर निष्कासित करण्यात येतील.

अ) लोकसभा निवडणूक कालावधीत प्रभाग समिती क्र. ३ मध्ये एकुण १५ अनधिकृत बांधकामे झालेली आहेत त्यापैकी ८ बांधकामे निष्कासित करण्यात आलेली आहेत. शिल्लक ७ बांधकामे पालिस बंदोबस्त उपलब्ध झाल्यानंतर निष्कासन कार्यवाही करण्याची तजविज ठेवण्यात येत आहे.

ब) सिमरन पॅलेस अपार्टमेंटच्या बाजुला निवडणूक काळात झालेली अनधिकृत बांधकामे आचारसंहिता संपल्यावर पोलिस बंदोबस्त घेवून निष्कासित करण्याची तजविज ठेवण्यात येत आहे.

अ) दिनांक २ मार्च २००९ पासून आचारसंहिता  लागल्यापासून प्रभाग समिती क्र. ४ मध्ये एकूण ४९ अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आलेली आहेत.  उर्वरीत बांधकामे पुरेसा पोलिस बंदोबस्त मिळाल्यावर निष्कासित करण्यात येईल व एक बांधकाम न्यायप्रविष्ट असल्यामुळे ती निष्कासित करण्यात येत आहे.

ब) सदरचा प्रश्न प्रभाग समिती क्र. ३ या कार्यालयाशी संबंधीत आहे.

यावेळी सदस्या श्रीम. जया माखिजा, श्रीम. चंद्रा टेकचंदानी, श्रीम. संगिता खंडारे, श्रीम. ज्योती माने, श्रीम. मंजु पोपटानी, श्रीम. सरोजजी टेकचंदानी, श्रीम. लता निकम. यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे:—</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब आम्ही जो प्रश्न विचारतो त्याला या महासभेमध्ये उत्तर मिळावे, आणि आमचेच नाही तर उल्हासनगर मधील जनतेचे समाधान व्हावे. या बाबतीत अधिकाऱ्यांना कित्येक वेळा सांगितले आहे त्याचबरोबर आयुक्त साहेबाना वारंवार सागितले आहे कि इतर वेळेस अधिकारी आले नाही तरी चालतील परंतु महासभेत उत्तर देण्यासाठी अधिकाऱ्यांनी उपस्थित राहिले पाहिजे. परंतु या उल्हासनगर महानगरपालिकेत तसे चालत नाही त्याच्या उलट होते आणि म्हणुन मला असे वाटते माझ्या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर संबधीत अधिकाऱ्याने दयावे असे मी सभागृहाच्या समोर सागु इच्छितो. मी माझा प्रश्न वाचुन दाखवितो.

<u>महापौर :—</u> आपण जो आता जो प्रश्न वाचला तो . १७० क्रमाकांचा आहे या सभेत १७१पासुनचे प्रश्न चर्चेस घेण्यात आलेले आहेत.  त्यामुळे आपला १७१ क्रमाकांचा जो प्रश्न आहे त्याचा विषय वेगळा आहे.

<u>सदस्य श्री. बी.बी मोरे:—</u> १७१ क्रमांकाचा?

<u>महापालिका सचिव :—</u> होय.

<u>सदस्य श्री. बी.बी मोरे:—</u> नाही नाही, १७० क्रमाकांचा माझा प्रश्न अर्थवट राहिलेला आहे. प्रश्न क्र १७० च्या 'अ' परिच्छेदावर चर्चा झालेली आहे. 'ब' परिच्छेदावर चर्चा झालेली नाही.

<u>महापालिका सचिव :—</u> साहेब, आपण प्रश्न क्रमांक १७१ पहा.

यावेळी सदस्य श्री. नरेंद्र ठाकुर, श्री. रमेश चव्हाण, श्री. सतिश चहाळ, श्री. संजय भठिजा, श्री. महेश सुखरामानी, श्री. रामचंद्र पारवानी, श्री. भारत राजवानी, श्री. नरेंद्र दवणे यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>सदस्य श्री. बी.बी मोरे:—</u> सचिव साहेब मी तुम्हाला सागतो, प्रश्न माझा आहे, त्यावर मागील सभेत मी चर्चा केली आहे १७० अ वर चर्चा झालेली आहे आणि 'ब' वर चर्चा झालेली नाही.

<u>महापालिका सचिव :—</u> मागील वेळेस मा. महापौरांनी त्या प्रश्नावर चर्चा पुर्ण झाली आहे असे घोषित केले होते. म्हणुन कृपया  आता आपण प्रश्न क्र. १७१ पहावा.

<u>सदस्य श्री. बी.बी मोरे:—</u> माझा जो प्रश्न आहे तो १७०,अ, ब, क असा आहे.

<u>महापालिका सचिव :—</u> आता प्रश्न क्र. १७१ पुकारण्यात आला आहे. त्याकडे कृपया आपण लक्ष दयावे.

<u>सदस्य श्री. बी.बी मोरे:—</u> प्रश्न क्र १७० 'ब' वर चर्चा झाली पाहिजे ना?

**सदस्य श्री. रविंद्र बागुलः—** मा. आयुक्त साहेब प्रश्न क्र. १७१ त्यांना वाचून दाखवा ना.

**महापालिका सचिव :—** श्री. मोरे साहेब, प्रश्न क्र १७१ आपणाकडे आहे ना? की आपणांस वाचून दाखवु.

**सदस्य श्री. बी.बी मोरेः—** सचिव साहेब, प्रश्न क्र. ७० 'अ' वर चर्चा झालेली आहे, 'ब' वर चर्चा झालेली नाही.
**महापालिका सचिव :—** परंतु आता प्रश्न क्र. १७१ पुकारण्यात आलेला आहे त्यावर आपण लक्ष केंद्रीत करा.

**सदस्य श्री. बी.बी मोरेः—** प्रश्न देणारा मी असताना असे कसे झाले? नाही नाही हे बिलकुल चुकीचे आहे. प्रश्न क्र १७१ हा संपुर्ण प्रश्न आता मी वाचुन दाखवायचा काय? सर्व सदस्यांकडे या प्रश्नांची प्रत आहे संबधीत अधिकाऱ्याने त्याचे उत्तर दयावे.

श्री. मिलिंद सावंत उप—आयुक्त, (मु):— मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, सचिव साहेब, आचारसहिता लागु झाल्यापासुन ४ प्रभाग समित्यामध्ये अनाधिकृत बाधंकामे किती झाली याबाबतचा प्रश्न मा. सदस्य श्री. बी.बी. मोरे यांनी विचारला आहे. व त्याबाबत प्रभाग अधिकाऱ्यानी काय कार्यवाही केली आणि त्यानी जर कार्यवाही केली नसेल तर त्या प्रभाग अधिकाऱ्यावंर काय कार्यवाही करणार असा प्रश्न विचारला आहे. तर या प्रश्नाबाबत प्रभाग अधिकाऱ्यानी जी माहीती माझ्याकडे सादर केलेली आहे दिनांक ३/२/२००९ ते १२/५/२००९ या कालावधीत एकंदर ३२७ अनाधिकृत बाधंकामाबाबत तक्रारी प्राप्त झाल्या होत्या त्यात रंगरगोटी, किरकोळ दुरुस्ती अशी प्रकरणे ११४ होती. १६ प्रकरणांना या अगोदरच बाधंकाम परवानगी दिलेली होती. ४४ बाधकांमे त्यांना आढळुन आलेली नाहीत. पुन्हा पुन्हा तक्रारी असलेली ७९ बाधंकामे आढळुन आलेली आहेत. आता पर्यंत चारही प्रभाग समित्यामध्ये ५४ बाधंकामे निष्कासित करण्यात आलेली आहेत. आणि चार बाधंकामाबाबतच्या तक्रारी ज्या होत्या ती चार बाधंकामे महापालिका हद्दीबाहेरची होती आणि १६/६/२००९ पर्यंत १६ अनाधिकृत बाधंकामे निष्कासित करण्याचे राहिले होते आज आढावा घेतल्यानंतर असे त्याने सांगितले आहे आज फक्त ५ बाधंकामे निष्कासित करायची राहिले आहेत एकदंरीत ३२७ पैकी ३२२ प्रकरणे निकालात निघाली आहेत ५ प्रकरणे त्याच्याकडे प्रलबिंत आहेत असे त्याचे म्हणणे आहे. या बाबतीत प्रभाग अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की पोलिस बदोबंस्त मिळाल्यावर सात दिवसांत आम्ही ती अनाधिकृत व बाधंकामे निष्कासित करु.

**सदस्य श्री. बी.बी मोरेः—** प्रभाग अधिकाऱ्यावर मला जास्त तुटुन पडता येत नाही? की? या उल्हासनगर महानगर पालिकेत श्री. ढाकरे साहेब हे उप—आयुक्त असताना असे काही प्रकार झालेले आहेत की पोलिस बंदोबस्तविना एखादा अधिकारी, प्रभाग अधिकारी, कर्मचारी एखादया अनाधिकृत बाधकामावर निष्कासनाची कारवाई करण्या साठी गेला तर त्याच्यावर हल्ला होतो याबाबत तुम्हालांही सागितले आहे आणि तुम्ही सुध्दा म्हणाला आहात की पोलिस संरक्षण घेतले पाहिजे आणि त्यावर जो खर्च होईल तो महापालिका करेल, पोलिस संरक्षण घेऊन ती कारवाई करु परंतु आज मिती पर्यंत पोलिस बंदोबस्त न मिळाल्याने या उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये अनाधिकृत बाधंकामे होत आहेत. आम्ही वेळोवेळी तक्रार करतो की त्या वेळी प्रभाग अधिकारी सागतात की पोलिस बंदोबस्त मिळत नाही त्याचेही म्हणणे बरोबर आहे कारण की जर पोलिस संरक्षण मिळाले नाही तर स्वतःचा जीव गमावण्याची वेळ अधिकारी, कर्मचारी यांचेवर आहे आणि ती येवु नये म्हणुन कित्येक वेळेला सांगितले आहे की आपण कुठलीतरी एक ठोस भुमिका घेतली पाहिजे. टिल्सन च्या बाबतीत तसे झालेले आहे शहाड फाटक येथे सुध्दा झालेले आहे उदाहरण दयायचे झाले तर असे हजारो प्रकरणे झालेली आहेत. आणि त्याच्यामुळे कुणी अधिकारी असो किंवा कर्मचारी असो तो घाबरतो, स्वतःचा जीव कोणी धोक्यात घालेल क? यास्तव आयुक्त साहेबांना या महासभेत अशी विंनती करतो की, अनाधिकृत बाधंकामा संदर्भात श्री. डी.आर.पाटील या अधिकाऱ्यावर आपण महिन्याला पंचवीस हजार रुपये खर्च करतो, कर्मचाऱ्यांना आपण पगार वाढवुन देवु शकत नाहीत परंतु श्री डी.आर. पाटील वयस्कर, सेवानिवृत्त व्यक्ती आपण कामावर ठेवला आहे त्यावर महिन्याला पंचवीस ते तीस हजार रुपये खर्च आहे. सहा महिन्यानंतर त्यानां वारंवार मुदत वाढ दिली आहे त्याने आजपर्यत काय काम केले आहे ते मला दाखवा तर जेथे खर्च करायला पाहिजे तेथे आपली महानगरपालिका खर्च करत नाही आणि नको त्या ठिकाणी वाटेल तेवढा खर्च करतो आणि पैसा उधळतोहे मला या ठिकाणी महासभेत सागांयचे आहे. श्री. डी.आर.पाटील यांनी एक तरी प्रकरण तडीस लावले आहे का? दाखवा? एम.आर.टी.पी ॲक्ट नुसार एखादयावर तरी केस केलेली आहे का? आणि केली असेल तर ती यशस्वी झाली आहे का? कोर्टात गेलेली आहे का? एकही नाही अशा प्रकारे जर महापालिकेत

होत असेल तर या बाबतीत आयुक्त साहेबांनी लक्ष घालावे आणि याबाबतीत भरीव आश्वासन दयावे अशी मी आपणांस विनंती करतो.

**श्री. समीर उन्हाळे, आयुक्त:–** मा. महापौर यांच्या परवानगीने सांगु इच्छितो, सभागृहातील जेष्ठ सदस्य श्री. बी.बी.मोरे यांनी अनाधिकृत बांधकामां सदर्भात प्रश्न विचारला आहे त्याबाबतीत प्रभाग अधिकारी आणि उप–आयुक्त महोदयांनी जी माहीती सभागृहापुढे दिलेली आहे, या अडीच महिन्याच्या कालावधीमध्ये ज्याकाही तक्रारी आल्या त्या सर्व तक्रारीची नोंद तसे कार्यादेश, आदेश, तसेच संबधीत अधिकाऱ्याचे पहाणी अहवाल त्यावरती करावयाची कार्यवाही अनाधिकृत बाधंकामाच्या नियंत्रणासाठी हि जी विहित कार्यपध्दती विशद केलेली आहे ही सर्व पार पाडण्याचा प्रयत्न सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांनी केलेला आहे. सगळेच काम झाले असेल असा दावा मीही करणार नाही कुठे लहान सहान चुका नक्की राहिल्या असतील, कुठे हेतुपुरस्कर हि राहिले असेल, कुठे मुद्‌दामहुन राहिले असु शकेल, कुठे एखादी चुक झालेली असु शकेल, कुठे अनाधिकृत बाधंकामांवर नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाने जो २/३/२००९ रोजी जो शासन निर्णय जाहिर केला होता त्यांच्या अनुषगांने कार्यवाही सर्व महानगरपालिका बरोबर उल्हासनगर महानगरपालिकेत चालु करण्यात आली आहे बऱ्याच वेळी अशा तक्रारी केल्या जातात की, हजारो अनाधिकृत बाधंकामे होतात महानगरपालिका आयुक्त किंवा अधिकारी काही काम करत नाहीत तर मी सभागृहात सभागृहाच्यावतीने जनतेला सांगु इच्छितो की जेथे कुठे अनाधिकृत बाधंकाम झाल्याबाबतची तक्रार, मग ती तक्रार एस.एम.एस. व्दारा प्राप्त झालेली असो किंवा कुठल्याही व्यक्तीकडून आलेली असेल तर ती व्यक्ती कोण आहे कशी आहे त्याकडे न पाहता प्रत्येक तक्रारीची व्यक्तीश: नोंद घेवुन त्याच्या पहाणीचा अहवाल सादर करण्याबाबतीत संबधीत अधिकारी कर्मचाऱ्यानां मी आदेश देतो, दर आढवडयाला उप–आयुक्त अनाधिकृत बाधंकाम विभाग हे कामाचा आढावा घेतात, दर आढवडयाला अतिरिक्त आयुक्त कामाचा आढावा घेतात, दर आढवडयाला विभागीय अधिकाऱ्यांनी काय कार्यवाही केली? काय त्रुटी राहिल्या आहेत हयाचा आढावा आयुक्त या नात्याने मी व्यक्तीश: त्याचबरोबर केवळ प्रभाग अधिकाऱ्यांवर अवलंबुन न राहता जे दक्षता पथक आपण तयार केलेले आहे, शहरामध्ये जी काही अनाधिकृम बाधंकामे चाललेली आहेत, त्याबाबत विषेशत: जे आरोग्य निरिक्षक आहेत, त्याच्यामार्फत, सफाई मुकादमांमार्फत, त्याचा वेगळा अहवाल देखील घेतला जातो, आणि अशा प्रकारे अनाधिकृत बाधंकामे नियंत्रित करण्यासाठी विहित कार्यपध्दतीमध्ये सर्व प्रयत्न हे आपल्या सगळयाच्या मार्फत केले जातात आणि ही महापालिका हे असेच चालु ठेवेल. पोलिस बंदोबस्ताबाबतीत सन्मा. सदस्यांनी प्रश्न विचारला त्याबाबत आजच्या सभेमध्ये विषय क्र ९ आम्ही सभागृहापुढे विचारार्थ ठेवलेला आहे तो या संदर्भातलाच आहे, अनाधिकृत बाधंकामासाठी एक वेगळे पोलिस दल हे महानगरपालिकेच्या अखत्यारीमध्ये तयार करायचे आणि त्यांचा तडा लावण्यासाठी एक वेगळे न्यायालय तयार करायचे अशी आपण जी सुचना केली त्याबाबतचा प्रस्ताव आम्ही विषय क्र ९ व्दारे आपल्या विचारार्थ ठेवला आहे जिथे जिथे अनाधिकृत बाधंकामात दिरंगाई होत असेल तर त्या बाबतीत निश्चित शासन, शिक्षा केली जाईल अशी ग्वाही या सभागृहामध्ये या निमित्ताने देतो. याबाबतची जबाबदारी दर वेळेस प्रभाग अधिकारी आणि बिट मुकादम यांचेकडे दयायची हे माझ्यामते थोडेसे अन्याय कारक आहे, शहरातील लोकसंख्या जवळ जवळ सहा लाख आहे जे काही पन्नास शंभर ठेकेदार असतील, जे काही त्यांचे हितचिंतक, लोकप्रतिनिधी असतील मी नगरसेवकांचे नाव घेत नाही परंतु इतर जी काही चर्चा शहरामध्ये असते जी तपासुन पाहता येत नाही, त्याच्याकडुन सुध्दा अनाधिकृत बाधंकामाच्या सदंर्भामध्ये कुठेना कुठेतरी प्रशासकीय कामकाजाला वारंवार अडथळा होत असतो ही बाब आपण, सभागृहाने देखील मान्य केली आहे त्या अनुषगांने कारवाई करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत

जेष्ठ सन्मा. सदस्य बी.बी.मोरे यांनी जो प्रश्न विचारला होता त्याअनुषंगाने अनाधिकृत बाधंकामे, मग त्या ८५५ इमारतीं असतील, किंवा आता वारंवार ज्या तक्रारी येतात त्या अनाधिकृत बाधंकाम धारकांवर गुन्हे दाखल करण्याचे कारवाई करण्याची आदेश संबधित प्रभाग अधिकाऱ्यांना दिले आहेत. जिथे जिथे अनाधिकृत बाधंकामे असतील ती तोडली गेली पाहिजेत, त्याचे देखिल निर्देश दिले गेले आहेत, बऱ्याच वेळेला, कधी प्लॅस्टरींग चालु आहे, काही ठिकाणी पत्रे बदले गेले तरी अनाधिकृत बाधंकाम झाले असे म्हणून प्रशासन त्यावर कार्यवाही करीत नाही याचाही वापर दबाव तंत्र म्हणुन अनेक जण वापर करत असतात मी काही नाव घेवु शकणार नाही, नावे घेणे योग्य होवु शकणार नाही, तरी तसेच दबाव तंत्राचा वापर प्रशासनावर होत असतो. एकदरींत मा. महापौराच्या माध्यमातुन मला सभागृहाला ग्वाही दयायची आहे की अनाधिकृत बाधंकामाच्या संदर्भामध्ये अत्यंत कार्यबंध्द पध्दतीने सर्व कार्यवाही करण्याचे निर्देश या कामाच्या निगडीत असलेल्या सर्व संबधित अधिकाऱ्यांना मग ते अतिरिक्त आयुक्त असतील किंवा उप–आयुक्त असतील, प्रभाग अधिकारी असतील किंवा बिट मुकादम असतील आणि त्याच बरोबर सफाई विभागातील दक्षता पथकाचे जे निरिक्षक असतील त्यांच्याकडून काम करण्याचे निर्देश त्यांच्या कामाचा साप्ताहिक आढावा हा आम्ही घेत असतो आणि जर कुठे त्रुटी राहिली असेल तर ती निश्‍चितपणे दुरुस्ती केली जाईल. सन्मा. सदस्यांनी दुसरा जो प्रश्न विचारला होता तो एफ.आय.आर. दाखल करण्या सदर्भांतील होता गेल्या दिड वर्षामध्ये ४७८ पेक्षा जास्त एफ.आय.आर अनाधिकृत बाधंकामाच्या संदर्भात दाखल केलेले आहेत आणि त्याच बरोबर ३० ते ४० एफ.आय.आर दाखल करण्याचे राहिले आहेत. कार्यालयाची व नियमाची जी काही विहित कार्यपध्दती दिलेली आहे त्याअनुषगांने कायद्याचे पालन करुन सर्व सर्व अधिकारी व कर्मचारी प्रयत्न करतील असे त्यांना निर्देश देतो.

<u>सदस्य श्री. बी.बी मोरेः–</u> मा. महापौरजी आणि आयुक्त साहेब, ज्या सदस्यांना ऐकायचे नसेल त्यांनी कृपया गप्प बसावे नाहीतर बाहेर तरी जावे कारण येथे महासभा महिन्यातुन एक वेळेस होते आणि एक वेळेस होत असताना एक सन्मा. सदस्य शहरासंदर्भात प्रश्न विचारतो, झोपडया कुणी बांधत नाही आणि इतरासांठी बोलतोय आणि ते जर तुम्ही ऐकत नसाल, आपसामध्ये चर्चा करीत असाल तर हे बरोबर नाही. दुसरी महत्वाची गोष्ट माझा प्रश्न क्र १६७ जो होता त्यावेळी तुम्ही सांगितले होते की चौकशी करुन तो पुल हटवेन पण अद्याप त्याची चौकशी झाली किंवा नाही झाली? त्यांना नोटीस दिली किंवा नाही दिली? त्याबाबतीत कुठल्याही सन्मा. सदस्यास कळविण्यात आलेले नाही आणि आज देखील मला महासभेत आज हेच सागांयचे आहे की आता जर त्याच्यावर कारवाई झाली नाही उद्या जर मोठया प्रमाणात पाऊस सुरु झाला आणि आजुबाजुच्या संपुर्ण झोपडपट्‌टीत जर पावसाचे पाणी शिरले तर मी मोर्चा आणल्याशिवाय राहणार नाही. एवढे मी दणादुण या ठिकाणी सांगतो. माझा आवाज उल्हासनगरच्या कानाकोपऱ्यात जातोय. सचिव साहेबानी जे माईक बसविले आहेत ते कधी चालु असतात तर कधी बंद असतात.

श्री.आर.बी शिर्के, कार्यकारी अभियंता, सा.बा.वि.:— **मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, मा. सचिव साहेब व सर्व सन्मा. सदस्य या बाबतची चौकशी दोन दिवसामध्ये करुन आपणांकडे अहवाल देईन.**

सदस्य श्री. बी.बी मोरे:— **आयुक्त साहेब एक महिना वीस दिवस गेले, आमचे अधिकारी चौकशी करु शकले नाहीत, त्या रॉयल रेसीडन्सी पर्यंत पोहोचु शकले नाहीत आणि आता दोन दिवसांत ते चौकशी करणार म्हणजे सभागृहाला काय वाटेल?**

श्री. समीर उन्हाळे, आयुक्त:— **संबधीत अधिकाऱ्यांनी ही जी दिंरगाई केली त्याबद्‌दल त्यांना आता मी याठिकाणी ५०० रूपयांचा दंड ठोठावत आहे. जर दोन दिवसांत चौकशी झाली नाही तर त्यांना निंलबीत करण्यात येईल.**

सदस्य श्री. बी.बी मोरे:— **जर दोन दिवसांमध्ये चौकशी पुर्ण झाली नाही तर पुढील महासभेच्या वेळेस मी व्यासपिठासमोरील मोकळया जागेत जमिनीवर बसेन व उत्तर घेतल्याशिवाय राहणार नाही.**

**महापालिका सचिव :—** प्रश्न क्र १७२ हा श्री. धनजंय बोडारे यांचा आहे.

**?**

**प्रश्न क्र. १७२ :— प्र.क्र.** १ उल्हासनसगर महानगरपालिकेने आरक्षित केलेल्या भुखंडावर सन १९९६ पासून आजपर्यंत किती बांधकामांना परवानगी मंजुर करण्यात आली आहे. त्याची यादी देण्यात यावी.

**प्र.क्र.** २ महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम— १९६६ नुसार आरक्षित भुखंडापैकी महापालिकेस त्या बदल्यात २५ टक्के विकसित केलेली जागा महापालिकेस हस्तांतर करणे क्रमप्राप्त असतांना अशा किती विकासकांनी भुखंड महापालिकेस हस्तांतर केले आहे.

तरी सद्यस्थिती काय आहे? व त्यावर काय उपाययोजना करणार आहात?

वरील प्रश्नांची येत्या महासभेत चर्चा होवून सविस्तर माहिति मिळावी ही विनंती.

उत्तर :— उल्हासनगर महापालिकेने आरक्षित केलेल्या भुखंडावर सन १९९६ पासुन आजपर्यंत एकुण १४ बांधकामांना परवानगी मंजूर करण्यात आलेली आहे. सोबत यादी जोडली आहे.

आरक्षित भुखंडापैकी महापालिकेस त्या बदल्यात २५ टक्के विकसित केलेली जागा महापालिकेस हस्तांतर केलेल्या बाधंकामाची यादी सोबत जोडली आहे.

यावेळी सदस्य श्री. महेश सुखरामानी, श्री. सजंय भठिजा, श्री. नरेंद्रकुमार ठाकुर, हे सभागृहातुन बाहेर गेले.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—** महापौर महोदया, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, याच विषयांवर मागच्या महासभेत लक्षवेधी होती. आरक्षित भुंखड, महापालिकेच्या मालमत्ता हा विषय मागील महासभेमध्ये चर्चीला गेला होता पुढच्या महासभेत या प्रश्नावर व्यवस्थीत उत्तर दिले जाईल किंवा कारवाई केली जाईल तर एक दिड महिन्यापुर्वी विचारलेला प्रश्न आणि मागच्या सभेमध्ये झालेली चर्चा त्यानुसार कारवाई काय काय केली आहे? ठिक आहे प्रश्नाचे उत्तर दिले आहे, मागच्या महिन्यामध्ये आपण आश्वासन दिले आहे त्याची नोंद इतिवृत्तामध्ये सुध्दा आहे. महानगरपालिकेच्या मालमत्ता, आरक्षित भुंखडावर बाधंकाम परवानगी दिल्यानंतर त्यातील २५ टक्के जे बाधकाम घ्यायचे त्यासंदर्भात केलेली कार्यवाही, त्याला झालेली दिरंघाई, ताब्यात घेतले किंवा नाही? घेतले तर किती? प्रत्येक ठिकाणी व्यवस्थीत २५ टक्के घेतले आहेत का? त्यापुढे काय केले? म्हणजे त्याचा लिलाव करणार, विक्रि करणार की भाडेतत्वावर देणार? पुढच्या शेवटच्या प्रश्नाचे उत्तर दिले आहे, ठिक आहे १४ भुंखडांवर बाधंकाम परवानग्या दिल्या त्यामध्ये अनु. क्रं (१) आरक्षण क्रंमाक ६१९, विकास योजनेतील आरक्षणाचा हेतु आहे, हाऊसिंग फॉर डिसहाऊस त्यामध्ये जागेचे क्षेत्र आहे २३७२.४९ चौ. मी. व परवानगी दिली त्याच्या २५ टक्के महापालिकेस हस्तांतरीत करावयाचे बाधंकामाचे जे क्षेत्र आहे ते आपण ताब्यात घेतले, १९९८ पासुन हि परवानगी चालु आहे १९९९ त्यानंतर त्यांनी सुधारीत मंजुरी घेतली, त्यानुसार २००१ पासुन आतापर्यंत ती जागा ताब्यात घेण्यासाठी जवळ जवळ आठ वर्षे लागली. माझा त्यापुढील प्रश्न असा होता की, प्रत्येक मालमत्तेची किंमत काय? आजच्या बाजारभावानुसार मुल्य किती आहे?

म्हणजे गेल्या दहा वर्षापासुन किंवा आठ वर्षापासुन ती मालमत्ता पडुन राहिली आहे त्याची किंमत वाढली किंवा त्याच्यापासुन आम्ही उत्पन्न घेवु शकलो नाही. दुसऱ्या क्रमाकांवर आरक्षण १४८ विकास योजनेत शॉपीग फॉर डिसहाऊस, एकाच वर्गवारीतील भुखंड आहेत जे विकासकाने शोधले आहेत हेच भुखंड विकसित करण्याचा घाट रचलेला आहे त्यामध्ये महापालिका प्रशासन सुध्दा सामील आहे. अनुक्रमांक १ ते १४ हे एकाच प्रयोजनासाठी आरक्षित आहेत, म्हणजे संपुर्ण उल्हासनगरच्या विकासाला भविष्यामध्ये रस्त्याचे रुंदीकरण करण्याचा मुद्दा पुढे आला तर रस्त्याचे रुदींकरण होवु शकणार नाही कारण की आपल्याकडे हाऊसिंग फॉर डिसहाऊस व शॉपीग फॉर डिसहाऊस हे आपणाकडे भुखंड नसणार आहेत, चौदाच्या चौदा भुंखड हे आम्ही खाजगी विकासकाला दिले नाममात्र पचवींस टक्केच्या मोबदल्यात त्या चौदापैकी अनुक्रमांक दोन वर दर्शविलेल्या ठिकाणी बाधंकाम प्रगती पथावर आहे, २००५ साली त्याला बाधंकाम परवानगी दिलेली आहे, १३६ चौ.मी. बाधंकाम त्यांच्याकडुन आपल्याला घ्यायचे आहे ते अद्याप घेतलेले नाही. २००५ पासुन आजपर्यंत म्हणजे २००९ पर्यंत आपण ते ताब्यात घेतलेले नाही. अनुक्रमांक तीन वर दर्शविलेली आहे आरक्षण क्र १९३ वरील जागा विकासयोजनेतील वाहनतळाच्या प्रयोजनार्थ आरक्षित आहे त्याबाबत आमचे सन्मा. नरेंद्र राजानी यांनी चांगला अभ्यास केलेला होता, परंतु गल्ली ते दिल्ली, उल्हासनरच्या गल्लीपासुन, दिल्लीतील लॉबीपर्यंत सर्वत्र तेच तिथे ते यशस्वी झाले परंतु सदर बाधंकाम ताब्यात कधी घेतले यांची माहिती दयावी. १९९९ ला बाधंकाम परवानगी दिली आहे, १९९८ ला? आत्ताच्या वाहनतळाची स्थिती काय आहे? आता तो भुंखड वाहनतळासाठी वापरला जातो का? आणि काय करणार आहात? त्यानंतर अनुक्रमांक ४ वर आरक्षण क्रमांक ८० दर्शविलेले आहे हा भुंखड मार्केट साठी आरक्षित आहे, याबाबत १९९८ साली बाधंकाम परवानगी दिली आहे, सुधारीत मंजुरी त्यास २००० साली दिली आहे परंतु ते बाधंकाम ताब्यात घेण्यास आम्हाला सात वर्ष लागली. एखादया विकासकाने बाधंकाम परवानगी मागितली तर आमचे अधिकारी त्यांच्या सेवेसाठी तत्पर आहोत परंतु जेव्हा त्याच्याकडुन २५ टक्के बाधंकाम घ्यायचे असते तेव्हा आम्ही तेवढे तत्पर नसतो, अजुनही त्या मार्केटमधील ताबा घेतलेला नाही, १९९८ साली बाधंकाम परवागनी दिली, २००० साली सुधारीत परवानगी घेतली, बाधंकाम परवानगी आम्ही दिली, सुधारीत बाधंकाम परवानगी दिली, तरीही अद्याप तेथील जागेचा ताबा घेतलेला नाही त्याचे कारण काय? घेवु शकत नाहीत, आम्ही हतबल आहोत, हताश आहोत की आमची इच्छा शक्ती नाही? १९९८ ते २००९ जवळपास अकरा वर्षाचा कालावधी झालेला आहे, या भुखंडावरील २५७.१४ चौ.मी. जागा आपण घ्यायची आहे, ती कायद्यानुसार घ्यायची आहे , बेकायदेशीर असेल तर त्याबाबतीत मी मागील महासभेत म्हटले होते की पुर्णच्या पुर्ण जागा ताब्यात घ्यायची आहे कारण ती महानगरपालिकेची मालमत्ता होती, त्यानंतर अनुक्रमांक पाच वर आरक्षण क्रमांक १४७ दर्शविलेले आहे यावरील भुखंड होलसेल मार्केटसाठी आरक्षित आहे, याठिकाणी सुध्दा १९९७ ला पहिली परवानगी दिली, त्यानंतर १९९९ ला सुध्दा दोन वेळा सुधारीत परवानग्या दिलेल्या आहेत. पहिली परवानगी दिली होती ४७११. ५४ चौ.मी. ती ५८८३.८७ झाली ती कशी झाली? का झाली? माहित नाही, तेव्हा तर स्टेअरकेस, कॉमन पॅसेज यासबंधी नियम मंजुर केलेले नव्हते, ते आता मंजुर केले आहेत, की त्याच्यामध्ये ते वाढविले आहेत की ते माहित नाही, त्याच्यानुसार आम्ही फक्त ११७७.८८ चौ.मी. जागा ताब्यात घेतलेली आहे. सदर जागा मालमत्ता विभागाने ताब्यात घेतलेली आहे याबाबतीच कार्यवाही मागील पधंरा दिवसात झालेली आहे. ठिक आहे उशीरा का होईना जागा ताब्यात घेतलेली आहे पण ती बरोबर आहे का? ज्यांनी आत्तापर्यंत ती जागा ताब्यात घेण्यासाठी वेळ लावला त्याचा हेतु बरोबर नाही तर ही जी जागा ताब्यात घेतलेली आहे ती बरोबर आहे का? याची फक्त मला माहिती पाहिजे. त्यानंतर अनुक्रमांक सहा वर आरक्षण क्रमांक १४८ दर्शविलेले आहे यामध्ये सुध्दा तसेच आहे १२७०.९० चौ.मी. भुखंड आहे आणि ३१७.७२ चौ.मी. जागा महापालिकेने ताब्यात घेतलेली आहे. अनुक्रमाक सातवर आरक्षण क्रमांक १४८ शॉपीग फॉर डिसहाऊससाठी आरक्षण दर्शविलेले आहे, २००२ मध्ये बाधंकाम परवानगी दिलेली आहे, आजपर्यंत त्या भुंखडावरील जागेचा महापालिकेने ताबा घेतलेला नाही त्याची कारणे काय? अनुक्रमाक आठ वर आरक्षण क्रमांक १४९ शॉपीग फॉर डिसहाऊस आरक्षण त्यामध्ये अजुनही बाधंकाम चालुच केले नाही असे म्हटले आहे आणि जर विहीत मुदतीत बाधंकाम चालु झाले नाही तर ती बाधंकाम परवानगी रद्द करण्यात येते आता आम्ही कशाची वाट बघत आहोत बाधंकाम परवानगी रद्द करण्यासाठी? हे मागच्या महासभेमध्ये सुध्दा मी म्हटले होते, त्यानुसार बाधंकाम परवानगी रद्द करण्याची कार्यवाही सुरु झाली आहे का? अनुक्रमाक नऊ वर आरक्षण क्रमांक ६१९ दर्शविले आहे, हा भुंखड बेघरासाठी घरे या प्रयोजनार्थ आरक्षित आहे, एकुण एक बघितले चौदाच्या चौदा भुखंड २००० साली बाधंकाम परवानगी झालेली आहे आणि त्याला उल्हासनगर प्रसिध्द प्रारुप विकास आराखडयानुसार सदर जागेवर आरक्षणाचा वापर बदल झाल्यामुळे सदरच्या बाधंकामास एम.आर.टी. ॲक्ट १९६६ चे कलम ५१ अन्वये दिनांक २५/१०/२००१ रोजी स्थगिती देण्यात आलेली आहे याचे स्पष्टीकरण व्हावे म्हणजे नक्की काय? बाधंकाम परवानगी देताना तुमच्या समोर काय होते? आणि नंतर कसे लक्षात आले? छाननी जवळपास चार ते पाच ठिकाणी होते असे असतांना सुध्दा बाधंकाम परवानगी दिली कशी आणि

स्थगिती देण्याची वेळ का आली? म्हणजे नक्की चुकी कोणाची आहे? कुठे आहे? की जाणुन बुजुन चुक झाली आहे की चुकुन चुक झाली आहे तसेच अनुक्रमांक १० चे आहे भुखंड क्रमांक ६१९, २००० साली बाधंकाम परवानगी दिलेली आहे, सध्या आम्ही संचालक, नगररचना, पुणे यांचे मत काय? त्याची आम्ही वाट पहात आहोत. या भुखंडावर बाधंकाम नकाशा मंजुर झाला कसा? जर आरक्षित नव्हता तर त्या ठिकाणी करार केला किंवा नाही? केला असणारच , मग करार कसा केला? विकासकाने त्यावेळेस त्याला मंजुरी कशी दिली आणि नंतर हा मुद्दा कसा आला, म्हणजे आठ वर्षानंतर किंवा पाच वर्षापुर्वी बाधंकाम परवानगी मंजुर केली त्यावेळेस विकास आराखडा पाहिलाच असणार? त्या विकासकाने सुध्दा पाहिला असणार? त्यानुसारच बाधंकाम परवानगी मागितली असणार? आणि त्यानुसार आम्ही दिली आणि मग ते नतंर आले कसे काय? त्याचेही उत्तर दयावे. आणि अनुक्रमांक अकरा वर दर्शविलेल्या भुखंडावरील ताबा घेतलेला आहे त्याबद्दल धन्यवाद, ते फक्त बरोबर आहे का? पुन्हा आरक्षण क्रमांक १४८ ला २००५ साली बाधंकाम परवानगी दिली, त्यातील अजुनही काही भागाचा ताबा घ्यायचा राहिला आहे, त्याचे कारण काय ते समजत नाही. १९९९ साली बाधंकाम परवानगी दिलेली, वाणिज्य वापरासाठी, २००७ सुधारीत परवानगी दिली, म्हणजे आठ वर्षाच्या कालखंडानतंर त्यास बाधंकाम परवानगी दिली त्यास कुठल्या आधारावर दिली? का दिली? सुरुवातीला आपण काही अटी शर्ती टाकल्या नाहीत काय? की हे महापालिकेचे भुखंड किती दिवसामध्ये विकसित केले पाहिजे, आणि अजुनही बाधंकाम प्रगती पथावर आहे. पुढील अनुक्रमांक चौदा आरक्षण क्रमांक १४८ यावरील भुखंडावर २००७ साली बाधंकाम परवानगी दिली, अद्याप पर्यंत बाधंकामास सुरुवात झाली नाही, तर यासर्व परिस्थितीमध्ये मी पुढचा प्रश्न केलेला आहे की, आपण कारवाई काय करणार? प्रशासनाने त्याचे उत्तर दयावे, चौदा भुखंडाबाबतील आपण घेतलेला निर्णय, जे बाधंकाम ताब्यात मिळाले नाही, संचालकाकडे आहेत, की आपल्या प्रशासनाकडुनच काही उलट सुलट झाले आहे त्याची माहिती दयावी.

<u>सदस्य श्री. लाल पजांबी:—</u> आयुक्त साहेब, सन्मा. सदस्य श्री. बोडारे साहेबांनी हा जो महत्वपुर्ण प्रश्न विचारलेला आहे, महापालिकेने फक्त चार जागांचा ताबा घेतलेला आहे बाकी जागांवरील आपण ताबा सुध्दा घेतलेला नाही अशी स्थिती का आहे?

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u> मा. आयुक्त साहेब या विषयावर मी सुध्दा बोलु इच्छितो, उल्हासनगर भाजपाचे आमचे अध्यक्ष महोदय श्री. लाल पंजाबी यांनी सागिंतले आहे की चौदा पैकी चार भुखंडाचा ताबा घेतलेला आहे परंतु याचीही माहिती दयावी ताबा घेतलेल्या चार जागाचा काय वापर करत आहोत, त्या जागा अश्याच पडुन आहेत की त्याचा काही वापर होत आहे? किंवा कुणाला दिल्या आहेत? याचा सुध्दा खुलासा झाला पाहिजे. जसे की अनुक्रमांक तीन, अनुक्रमांक पाच, अनुक्रमांक सहा आणि अनुक्रमांक अकरा वरील या चार जागांचा ताबा महानगरपालिकेने घेतलेल्यानंतर या जागांचा काय वापर केला जात आहे? यांची माहिती दयावी.

<u>सदस्य श्री. राजेश वधारीया:—</u> मा. महापौरजी याचंबरोबर मी असे विचारु इच्छितो की, ज्या जागांचा आपण ताबा घेतलेला आहे, ज्याचा आपण ताबा घेणार आहोत, काय त्याचा दुय्यत निबंधकाकडे आपण नोंदणी केली आहे का? काय ही जी मालमत्ता आहे ती शासनाच्या दस्तऐवज्यामध्ये महापालिकेच्या नावे आहे?

<u>श्री. समीर उन्हाळे, आयुक्त:—</u> सन्मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे, श्री. लाल पंजाबी, श्री. जमनादास पुरस्वानी यांनी जे प्रश्न विचारले त्याबाबत मागच्या महासभेमध्ये एक समिती नेमण्याचे ठरले होते की सहा. सचालक, नगररचना यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली, त्यांच्या एक दोन बैठका झाल्या त्या अनुषंगाची कारवाई म्हणून एक जागा ताब्यात घेण्यात आली आहे, मागच्या सभेत मी बोललो होतो की जकात कर राहिल न राहिल हा पुर्णपणे आपल्या नियंत्रणाच्या बाहेरील विषय असल्यामुळे महापालिकेचे करेत्तर उत्पन्न वाढविण्यासाठी महानगरपालिकेची जी मालमत्ता आहे ती ताब्यात घेवुन त्याबाबात विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन त्यातुन जास्तीत जास्त मासीक उत्पन्न कसे मिळेलेल्या त्याअनुषगांने अमलंबजावणी करणे अतिशय गरजेचे आहे त्यासाठी कृती दलाची जी स्थापना आम्ही केली होती, व त्यामध्ये त्यानां एक दीड महिन्याची मुदत दिली होती त्यात जी चर्चा झाली होती ती मी सभागृहापुढे ठेवु इच्छितो, पहिले असे की जी बाधंकाम अद्याप पर्यंत ताब्यात घेतलेली नाहीत त्याबद्दल सागु इच्छिती की, महिन्याला कमीत कमी दोन तरी बाधंकामे ताब्यात घेतलीच पाहिजे, अशा प्रकारच्या सुचना मालमत्ता विभागाला दिलेल्या आहेत. ताब्यात घेणे म्हणजे केवळ कुलुप लावुन ठेवणे नव्हे तर त्यांचे रजिस्टेशन करुन ते बाधंकाम आपल्या ताब्यात घेण्याच्या सुचना मी मालमत्ता विभागाला दिलेल्या आहेत. माझी खात्री आहे की पुढची महासभा होण्यापुर्वा यातल्या ज्या जागा ताब्यात घेतल्या आहेत त्या नावावर करुन घेण्याची प्रक्रिया निश्चितपणे चालू होईल, दुसरे असे की ज्या जागा

ताब्यात घ्यायच्या राहिल्या आहेत त्या जागा ताब्यात घेण्याची कारवाई पुढल्या महिन्याभरात पुर्ण करण्याबाबतचे आदेश मालमत्ता विभागाला देण्यात आले आहेत आणि त्याअनुषंगाने ते पार पाडतील याची दक्षता आपण घेवू, त्याचबरोबर त्या परवानग्या दिलेल्या आहेत परंतु बाधंकामे चालु झालेली नाहीत, जे बाधंकाम पुर्णत:च जर चालु नसेल तर ती बाधंकाम परवानगी व्यपगत होईल याबाबतची वेगळे आदेश देण्याची तरतुद एम.आर.टी.पी. ॲक्ट मध्ये आहे हे सबंधीत विभागातुन तपासुन घेवून तशी जर आवश्यकता नसेल तर तसे त्यांना कळविण्यात येईल की आपण याबाबतीत कुठलेही बाधंकाम केलेले नसल्याने आपली बाधंकाम परवानगी व्यपगत करु याची सुचना माहितीस्तव देण्याची कार्यवाही केली जाईल. ज्या बाधंकाम परवानग्या दिलेल्या आहेत त्यानुसार जी बाधंकामे ताब्यात घेण्याची राहुन गेलेली आहेत आणि ज्या जागा ताब्यात घेतल्या आहेत त्याच्यासाठी मालमत्ताचे चालु वर्षाचे जे काही रेडीरेकनर आहे त्याअनुषंगाने लिज वर देण्याची प्रक्रिया विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन त्याचे जे प्रस्ताव असतील ते येण्याऱ्या महिन्यापासुन ताब्यात घेण्याची कार्यवाही करु एका मालमत्तेची तरी सुरुवात आम्ही करु आणि पुढल्या सहा महिन्यामध्ये ज्या मालमत्ता आपल्या ताब्यात येणार आहेत त्याबाबतीत विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन बाजारभावाच्या मुल्याने महापालिकेला मासिक उत्पन्न मिळविण्याची प्रक्रिया आपण पुर्ण करण्याच्या अनुषंगाने नियोजन करण्याच्या सुचना संबधीत विभागांना देण्यात आलेल्या आहेत. तसा आढावा मी स्वत: दर महिन्यात घेवुन डिसेंबर पर्यंत सर्व मालमत्ता ताब्यात घेणे, व ताब्यात घेतलेल्या मालमत्ता विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन त्यानुसार महापालिकेला मासिक उत्पन्न मिळण्याच्या दृष्टीने कार्यवाही महापालिकेच्यावतीने करण्यात येईल.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—** विषेशत: अनुक्रमांक नऊ वरील आरक्षणांच्या भुखंडाच्या सदर्भांत मी आपणांस विचारु इच्छितो, नगररचना विभागाचा कोणी सबंधीत अधिकारी येथे उपस्थित आहेत का? सचालंक, नगररचना, पुणे यांच्या अभिप्रायानुसार सदरची जागा आरक्षणाने बाधीत होत नाही असे विकासकाचे म्हणणे आहे. आपले काय म्हणणे आहे, आपले ठाम मत आहे का? का आम्ही लिहुन दिले की……. , साहेब नगररचना विभागाचे कोणी अधिकारी येथे उपस्थित आहेत का? सहा. सचालंक आहेत का? नगररचनाकार आहेत का?

**श्री. समीर उन्हाळे, आयुक्त:—** नगररचनाकार पधंरा तारखेपासुन वैद्यकीय रजेवर आहेत.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—** या नगररचनाकारांना तुम्ही इथुन सोडा.

**श्री. समीर उन्हाळे, आयुक्त:—** त्यासाठी आम्ही नवीन नगररचनाकाराची मागणी केली आहे. जे सहा. सचालंक आहेत त्याच्या काही घरगुती अडचणी आहेत त्यासाठी त्यांनी तीन दिवसाची रजा घेतली होती. ते आज आलेले नाहीत, आणि जरी नगररचनाकार नसले तरी नगररचना विभागाची जी कामे आहेत ती सहा. सचालंका मार्फत निकाली काढली जातील, अशा सुचना सहा. सचालंकाना देण्यात आलेल्या आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—** हजर झाल्यापासुन सभागृहात उपस्थित नसतात असे नगररचनाकार असुन उपयोग काय? त्यांना जबाबदारीची जाणीव नाही, हजर झाल्यापासुन ते एकएक महिना रजेवर राहतात, अगोदरचे दहा महिने उल्हासनगरवासियांचे असेच गेले. यांचा काही उपयोग नाही हे बेजबाबदार आहे अहवाल असा तुम्ही त्यांच्या वरिष्ठांकडे पाठवा. इथे असल्यामुळे दुसरे कुणी नगररचनाकार येवु शकत नाहीत. गाळलेलया जागा भरल्या आहेत त्यांचा उपयोग काय?

**श्री. समीर उन्हाळे, आयुक्त:—** याबाबतचा अहवाल यापूर्वीच आपण पाठविला आहे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—** नगररचनाकार नाहीत, सहा. सचालंक नगररचना हे सुध्दा नाहीत, बाधंकाम परवानगी किवा अन्य काही परवानगी घेण्यासाठी कुणी सामान्य नागरिक आला, तर उत्तर देण्यासाठी परवा एक सुध्दा कर्मचारी नव्हता ही परिस्थिती आहे, प्रत्येक विभागात जर असे काम चालणार असेल तर कसे चालेल? त्यासाठी त्याच्यावर कठोर कारवाई करा. सचालंक विभागाचे नेमके काय झाले?

**श्री. समीर उन्हाळे, आयुक्त:—** तपासुन पाहू.

**सदस्य श्री. बी.बी. मोरे:—** सन्मा. सदस्य श्री. धनजंय बोडारे यांनी जो प्रश्न विचारला आहे, तो अतिशय महत्वाचा आहे. या उल्हासनगर महानगरपालिकेत नगररचनाकार, सहा.सचालंक नगररचना व इतर अधिकारी असुनही ते महासभेत उपस्थित राहत नाहीत त्याचे कारण असे, सन्मा. सदस्याची चुक होते, की चुक अशी

आहे की ज्यावेळेला जो कामाचा माणुस नाही मग तो  सहा.सचालंक नगररचना हे असोत किंवा अन्य कोणी असोत, आम्ही सन्मा. सदस्य म्हणतो की यांना घेवु नये, परंतु सन्मा. सदस्यांच्या आर्शिवादाने ते येथे येतात, श्री. बोडारे साहेब हे लक्षात ठेवा, ज्याच्या आर्शिवादाने नगररचनाकार किंवा सहा.सचालंक नगररचना आलेले असतात त्याचे म्हणणे येथे ऐकुन घेतले जाते आणि कायम केले जाते हि दुख:ची गोष्ट आहे. आणि म्हणुनच मागच्या वेळेस आमचे म्हणणे होते की काही लोकांना येथे घेताना ते कुठुन आले कसे आले आणि त्यांनी ठाणे महानगरपालिका, पुणे महानगरपालिका व इतर महापालिकामध्ये  कशा पध्दतीने काम केले आहे? त्यांनी बरोबर काम केलेले नाही असे या सभागृहामध्ये काही सदस्यांनी ओरडुन सांगितले होते, यांना येथे घेवु नका परंतु कुणाला घ्यायचे, कुणाला घ्यायचे नाही, येवढेच काही सन्मा. सदस्य महापालिकेत काम करत असतात. कोण जवळचे आहे, कोण लाबंचे आहे हे एवढेच करत असतात. आणि म्हणुन आता आम्ही रडत बसण्यापैक्षा या महापालिकेत होईल ते आम्ही भोगायला तयार आहोत. कृपया आता तुम्हीच एक काम केले पाहिजे, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. अशोकराव चव्हाण आहेत त्यांच्याकडे एक शिष्टमंडळ जायला पाहिजे आणि त्यांना सागांयला पाहिजे की उल्हासनगर वाचवायचे की नाही? तुम्ही आम्हाला सहा. सचालंक नगररचना तसेच नगररचनाकार दया अशी मागणी करा आणि पुढचे काम आपण करु.

<u>महापालिका सचिव :–</u> लक्षवेधी सुचना, जिचे सुचक आहेत श्री. राजेश वधारिया, हि लक्षवेधी सूचना निर्धारित वेळेनंतर म्हणजेच २ वाजुन ७ मिनिटांनी मिळालेली आहे, परंतु मा. महापौराचे म्हणणे आहे की, जो विषय शहराच्या हिताचा असेल, लोंकाच्या हिताचा असेल त्यासाठी निर्धारीत वेळेची पर्वा न करता त्या लक्षवेधीस मा. महापौरांनी स्विकृती दिलेली आहे.

यावेळी सदस्य श्री. बाबु मगंतानी, श्री. कुमार आयलाना, श्री. दिलीप जग्यासी, हे सभागृहातुन बाहेर गेले.

विषय :– उल्हासनगर महानगरपालिकेचे स्वत:चे पाणी स्त्रोत तयार करण्याकामी प्रगती काय याबाबतची लक्षवेधी सूचना

---

## <u>लक्षवेधी सूचना</u>

<u>सुचकाचे नावः–श्री. राजेश वधारिया</u>

**विषय :–** उल्हासनगर महानगरपालिकेचे स्वत:चे पाणी स्त्रोत तयार करण्याकामी प्रगती काय याबाबतची लक्षवेधी सूचना

आपल्या महानगर पालिकेने आज पासुन दोन ते अडिच वर्षापूर्वी स्व:ताचे पाणी पुरवठा करण्याकामी पाणी स्त्रोत तयार करण्या कामी मंजुरी मिळल्या नंतर प्रतिक्षा इंडिस्टिज या ठेकेदार कंपनीस ठेका देण्यात आला होता परंतु त्या विरूध्द गेमन इंडिया लि. या कंपनीने उच्च न्यायालयात या कामा विरूध्द मनाई हुकूम घेऊन आल्या मुळे त्या कामात कोणत्या प्रकारे प्रगती झालेली नाही.

वरील कामास चालना मिळण्यासाठी महानगरपालिकेने कोणकोणत्या प्रकारे उपाययोजना केल्या तसेच उच्च न्यायालयात महानगर पालिकेची भुमिका बाबत सर्व माहिती दयावी.

जव्हारलाल नेहरु नॅशनल अर्बन रिनिवेशन मिशन व्दारे उल्हासनगर महानगर पालिकेच्या सी.डी.पी. मंजुर झालेली आहे त्याचे कामा मध्ये प्रथम पाणी स्त्रोतास प्राधान्य देण्यात आलेले आहे, या बाबत महानगरपालिकेने कोणकोणत्या प्रकारे पाठपुरावा केला आहे किंवा नाही त्या कामा बाबत महानगर पालिकेची भुमिका बाबत सर्व माहिती दयावी.

तरी वरील लक्षवेधी बाबत आज महासभेत माहिती दयावी.

---

<u>महापौर :–</u> सदरची लक्षवेधी सुचना स्विकृत करण्यात येत आहे. हया लक्षवेधीचा जो विषय आहे तो न्यायप्रविष्ठ आहे यावर जास्त चर्चा केल्यास न्यायालयाच्या अवमानतेचा तो एक मुद्दा होवु शकेल. यासाठी कमीत कमी चर्चा करुन या विषयावर आयुक्त साहेबाचे निवेदन घेवुन हा मुद्दा संपुष्टात आणला तर बरे होईल.

<u>सदस्य श्री. राजेश वधारिया:–</u> माफ करा, आपण काय बोललात ते मी ऐकले नाही.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–</u> सचिव साहेब, एक माहिती घेवु इच्छितो, जेव्हा कोणतीही एखादी लक्षवेधी सुचना प्रस्तुत केली जाते ती कोणताही एक नगरसेवक प्रस्तुत करु शकतो का? की लक्षवेधीवर सुचक व अनुमोदक म्हणुन दोन नगरसेवकाच्या स्वाक्षऱ्या आवश्यक आहेत?

<u>महापालिका सचिव :–</u> कोणतीही लक्षवेधी सुचना, स्थगन प्रस्ताव किंवा अशासकीय प्रस्ताव केवळ एक सदस्य सुध्दा प्रस्तुत करु शकतो.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:–</u> मा. महापौरजी, मा. उप–महापौरजी, मा. आयुक्त साहेब, आज सभागृहाकडुन माहिती घेवु इच्छितो, काल शहरासाठी फार मोठे कार्य झाले आहे, पाच रस्त्याच्या कामाचे उद्घाटन झाले आहे. त्याबद्दल प्रशंसा करतो परंतु त्या कार्यक्रमाचे जे निमत्रंण पत्र छापण्यात आलेले आहे त्याची जबाबदारी कुणाची होती? हे आपण सभागुहापुढे स्पष्ट केले तर त्यातुन काही माहिती मिळविण्याचा आम्ही प्रयत्न करु शकु. मा. महापौरजी एक नगरसेवक या नात्याने मी आपणांस विनंती करतो की, उल्हासनगर महानगरपालिकेच्या वतीने पाच रस्त्यांच्या कामाचे जे उद्घाटन करण्यात आले आणि त्या कार्यक्रमाची जी निमंत्रण पत्रिका छापण्यात आली त्याची जबाबदारी आपण कोणावर सोपविली होती, या बाबतची माहिती आपणाकडुन विनंतीपुर्वक जाणुन घेवु इच्छितो.

<u>उप–महापौर, श्री. विनोद ठाकुर:–</u> मा. महापौरजी, सर्व सन्मा. सदस्य, हा विषय विषय पत्रिकेवर नसल्यामुळे याचा नंतर विचार केला जाईल.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:–</u> मी सुरुवातीस सागिंतले की, विषय वेगळा असल्यामुळे त्याबाबतची माहिती मी विंनतीपुर्वक आपणाकडुन जाणुन घेवु इच्छित आहे. आपण त्याबद्दल सांगु शकता की आम्ही आपणांस माहिती देवु इच्छित नाही म्हणून.......

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे:–</u> हा विषय चर्चेस घेण्यात येवु नये.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:–</u> आपण आम्हा सांगा की, आम्ही आपणांस माहिती देवू इच्छित नाही, मुद्दा संपला.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे:–</u> उप–महापौरांनी सांगितले आहे.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:–</u> सांगा, आपण की आम्ही माहिती देवु इच्छित नाही.

<u>महापौर:–</u> सन्मा. सदस्य हा सभेचा विषय नाही, तुम्ही बसुन घ्या.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:–</u> याचाच अर्थ आपण माहिती देवु इच्छित नाहीत.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे:–</u> कृपया बसुन घ्या.

<u>महापौर :–</u> श्री. राजेश वधारीयाजी, आपण आपली लक्षवेधी सुचना मांडा.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:–</u> मा. महापौरजी आपण अशा एका आसनावर बसला आहात, त्याआसनावरुन आपण सभागृहाचा अपमान करत आहात. एखादया विषयावर एखादा सदस्य आपणाकडुन माहिती घेवु इच्छित असताना .........

<u>महापौर :–</u> श्री. राजेश वधारीयाजी, आपण आपली लक्षवेधी सुचना मांडा.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:–</u> श्री. मोरे साहेब आपण सर्व काही बरोबर करता?

<u>महापौर :–</u>  श्री. राजेश वधारीयाजी, आपण आपली लक्षवेधी सुचना मांडा.

<u>सदस्य श्री. राजेश वधारिया:–</u> मा. महापौरजी, मी निर्धारीत वेळेनतंर लक्षवेधी सूचना दिली होती, तरी सुध्दा ती आपण स्विकारलीत त्याबद्दल आपणांस मी धन्यवाद देतो. कारण की शहर हिताचा विचार करता याच मुद्दयावर मागील वेळेस मी माझी हरकत मागे घेतली होती.

मा. महापौरजी, काही कालावधी पूर्वी महानगरपालिकेने आपल्या पाण्याचा स्त्रोत तयार करण्यासाठी एक प्रकल्प तयार केला होता त्या प्रकल्पासाठी बाधां वापरा आणि हस्तांतरित करा या तत्वानूसार निविदा मागिवण्यात आली होती. में प्रतिभा इंडिस्टिज यांना निविदा देण्याचा निर्णय झाला होता. काही कालावधी नंतर गेमन इंडिया लि. यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई येथे रिट याचिका (क्र ६३५/२००७) दाखल केली होती यामध्ये तीन वेगवेगळे  आदेश झालेले आहेत, दुसरा आदेश १२ जुलै, २००७ मध्ये झाला असुन मा. उच्च न्यायालयाने जे म्हटले आहे, ते मी वाचुन दाखविते.

"I, Heard at length, Learned Conusel Mr. Millind Vasudeo appearing on behalf of the respondent No.4 states that he desires to prove the genuineness of the certificate dated 18 January 2005 which is at Page 185, for that purpose he desires to file affidavit of one Mr. Kukarni who has issued the certificate. He further makes a statement that till then the status quo will be maintained. The statement is accepted S.O. for three weeks."

त्यानंतरचा, अद्याप पर्यंतचा जो आदेश आहे तो शेवटचा आदेश आहे ११/०९/२००७ चा मा. मुंबई उच्च न्यायालयाचा आदेश आहे. तो मी वाचुन दाखविते.

"Heard, Rule, The statement made by the Learned Conusel, for the Respondent No.4, Pratibha Industries Ltd, before the Court on 12.06.2007 that the status Quo will be maintained shall continue till the disposal of writ petition."

यावेळी सदस्या श्रीम. जया माखिजा, श्रीम. सगिंता कंडारे, श्रीम. चद्रा टेकचदांनी, श्रीम. मोना वनवारी, श्रीम. नीना नाथानी या सभागृहातुन बाहेर गेल्या.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी:–</u> मा. सचिव साहेब, ज्या विषयाबाबत उच्च न्यायालयात प्रकरण प्रलंबित आहे, त्यावर आपण सभागृहात चर्चा करु शकतो का? याची आपण माहिती दया नंतर पुढील चर्चा ऐकण्यास मी तयार आहे.

<u>महापालिका सचिव :–</u> यांचे केवळ एकच म्हणणे आहे न्यायालयाने स्थगिती आदेश दिलेला आहे, त्यापुढे सगिन आदेश महानगरपालिकेतर्फे काय कार्यवाही केली? फक्त त्यानां एवढेच जाणुन घ्यायचे आहे, त्याबाबतीत आयुक्त साहेब निवेदन देवु शकतात, या विषयावर अधिक चर्चा होवु शकत नाही.

<u>सदस्य श्री. किशोर जग्यासी:–</u> कोणत्याही निविदेबाबत तो विषय उच्च न्यायालयात प्रलंबित असताना त्यावर कोणताही नगरसेवक करु शकतो का?

<u>महापालिका सचिव :–</u> जलशुध्दीकरण केंन्द्राबाबतचा जो विषय आहे, अद्याप पर्यंत जलशुध्दीकरण केंन्द्र चालु झालेले नाही, त्याकामाचे जसे आहे असे ठेवण्याकामी न्यायालयाचा स्थगिती आदेश प्राप्त झालेला आहे तो उठविण्याकामी आपण काय कार्यवाही केली आहे? यांची माहिती दिल्यानंतर हा मुद्दा संपुष्टात येईल.

<u>सदस्य श्री. राजेश वधारिया:–</u> ११ संप्टेबर २००७ नतंर आजपर्यंत महानगरपालिकेने स्थगिती आदेश उठविण्यासाठी किंवा उच्च न्यायालयात जी याचिका दाखल करण्यात आलेली आहे ती निकाली काढण्यासाठी किंवा प्रकल्प चालु करण्यासाठी काय काय उपाय योजना केली आहे याची कृपया माहिती दयावी.

<u>श्री. समीर उन्हाळे, आयुक्त:–</u>  सदरचा प्रश्न मा. उच्च न्यायालयात प्रलंबित असल्यामुळे विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन, सदरचा प्रश्न न्यायालयाच्या आदेशानुसार लवकरात लवकर सोडविण्याचा प्रयत्न आम्ही करु.

<u>महापालिका सचिव :—</u> ठिक आहे? राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या वतीने एक सुचना आली आहे, त्याची सूचना अशी आहे की, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे गटनेता म्हणुन श्री. भारत रामचंद्र राजवानी यांना नियुक्त केले असुन त्यास मा. महापौरांनी स्विकृती दिली आहे, त्याबद्दल श्री. भारत रामचंद्र राजवानी यांचे अभिनदंन. व त्याची दुसरी सूचना अशी आहे की, श्री प्रभुनाथ गुप्ता यांना विरोधी पक्ष नेता म्हणुन नियुक्त करु इच्छितात, परंतु हा जो विषय अद्याप पर्यंत शासनाच्या विचाराधिन असुन न्यायप्रविष्ठ असल्याने याबाबत मा. महापौरांनी कोणताही निर्णय घेतलेला नाही.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:—</u> मा. महापौरजी, सचिव साहेबांच्या माध्यमातुन आपण जे म्हणालात त्याचा आम्ही आदर करतो, परंतु आपण हे ही सांगितले पाहिजे कालच्या कार्यक्रमाचे जे निमत्रंण पत्र छापले त्यामध्ये श्री. बी. बी. मोरे यांचे नाव विरोधी पक्ष नेता म्हणुन कसे लिहिले?

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे:—</u> महापौरांनी निर्णय घेतलेला आहे, आपले असे हे बोलणे वारंवार चालणार नाही. सन्मा. पिठासिन अधिकाऱ्यांनी निर्णय दिलेला आहे.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:—</u> मा. महापौरांना बोलु दया, आपण बोलणारे कोण होतात, मा. महापौरजी आम्ही आपला आदर करतो, आपण जे शब्द उच्चारलेत त्याला आम्ही मान देतो आत्ता आत्ता सचिव साहेबांनी सांगितले कि, विरोधी पक्ष नेता पदाचा मुद्दा न्यायालयात प्रलंबित आहे, आम्ही आपला आदर करतो तर कार्यक्रमाचे जे निमत्रंण पत्र छापले त्यावर विरोधी पक्ष नेता म्हणुन यांचे नाव कसे लिहिले? आम्ही आपला आदर करतो.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे:—</u> होय होय आदर करता, त्यानंतरही पुन्हा पुन्हा विचारता.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:—</u> होय आम्ही विचारु.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे:—</u> बिल्कुल विचारता कामा नये.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:—</u> बोला, बोला, महापौरजी आपण उत्तर दया.

<u>महापौर:—</u> सचिव साहेब, विषय पत्रिकेवरील पुढील विषय पुकारा.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:—</u> मा. महापौरजी जो निर्णय आपण घेता त्याबाबतीत उत्तर देण्याची आपण हिंमत ठेवा, उप—महापौरजी आपण सुध्दा, नाहितर आपण बोलु तरी नका. महापौरजी सचिव साहेबांना सागतात की, विरोधी पक्ष नेता पदाचा मुद्दा न्यायालयात प्रलबिंत आहे असे असताना आपण निमंत्रण पत्रावर विरोधी पक्ष नेत्याचे नाव कसे लिहितात यांचे उत्तर आपण देवु शकत नाहीत?

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे:—</u> हे निमत्रंण पत्र कोणी छापले?

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:—</u> हे निमत्रंण पत्र कोणी छापले? हेच तर मी विचारत आहे.

<u>सदस्य श्री. रविद्र बागुल:—</u> आयुक्त साहेब, श्री. बी.बी. मोरे स्वत: विचारत आहेत हे निमत्रंण पत्र कोणी छापले? कोनार्क कंपनीचा खर्च आहे का? की ठेकेदाराचा खर्च आहे?

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. २........

<u>सदस्य श्री. रविद्र बागुल:—</u> सचिव साहेब, २ मिनिट या प्रश्नाचे उत्तर होवु दया, महापौर, उप—महापौर काय बोलतात ते.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ:—</u> अडीच वर्ष आमचा हक्क हिरावुन घेतला गेला, आम्ही या पदापासुन अडीच वर्ष वंचित राहिलो, आणि विरोधी पक्ष नेता पदाचा मुद्दा न्यायालयात प्रलंबित असल्याचे बोलल्याबद्दल श्री. बी.बी मोरे यांना त्रास का होतो?

सदस्या श्रीम. वसुधा बोडारे, श्रीम. नेहा भोईर, श्रीम. ज्योती माने, श्रीम. राजश्री चौधरी, या सभागृहातुन बाहेर गेल्या.

**सदस्य श्री. बी.बी. मोरे:—** अहो मीच सांगतो ना जो पर्यंत आम्ही सत्ताधारीपक्षात आहोत तोपर्यंत हे पद तुम्हाला मिळु देणार नाही अशी आमची खात्री झालेली आहे.

**महापालिका सचिव :—** विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. २ :—** मागील सभेचे दिनांक २०/५/२००९ व ३०/५/२००९ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

**सदस्य श्री. गोंविदराम लुंड:—** दिनांक २०/५/२००९ रोजी झालेल्या सभेत दुरुस्ती परवानगी बाबत मी लक्षवेधी सूचना मांडली होती व त्याबाबत जी चर्चा झाली त्याची नोंद इतिवृत्ताच्या पृष्ठ क्रमांक १७ व २३ वर आलेली आहे. परंतु त्या सदर्भात आम्हास अद्याप उत्तर मिळालेले नाही त्याबाबतीत मी आयुक्त साहेबांना विनंती करतो की, त्यांनी खुलासा करावा.

**श्री. समीर उन्हाळे, आयुक्त:—** सन्मा. सदस्यांनी मागील महासभेमध्ये लक्षवेधीच्या माध्यमातुन जो प्रश्न विचारला होता, त्या अनुषगांने मुं.प्रा.म.अधिनियमा मध्ये २६४ क्रमाकांचे जे कलम आहे, कलक २६५,२६६, आणि २६६अ ही जी चार कलमे आहेत या कलमाच्या अनुषगांने जी धोकादायक बाधंकामे आहेत. ज्यांचे वयोमान ३० वर्षे झाल्यानंतर ती बाधंकामे धोकादायक झाल्यानंतर त्यांची दुरुस्ती करण्याकामी जी काही तरतुद आहे त्या मुं.प्रा.म.अधिनियमा मध्ये कलक २६५,२६६, आणि २६६अ अन्वये काम महापालिकेमार्फत यापुर्वी करण्यात येत आहे याच्या पुढेही करण्यात येईल.

**सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी:—** मा. आयुक्त साहेब, आत्ताच आपण मराठीत म्हटले की, जी बाधंकामे ३० वर्षापूर्वीची आहेत त्याना दुरुस्ती परवानगी दिली जाते त्याबद्दल आपणांस असे विचारु इच्छितो की, दुरुस्ती परवानगीसाठी आपणांकडे जे अर्ज येतात त्याची आपण चौकशी करता?

**श्री. समीर उन्हाळे, आयुक्त:—** तेच मी आत्ता सांगत आहे, की मागच्या सभेमध्ये जो प्रश्न विचारला होता त्या अनुषंगाने ठाणे महानगरपालिका, कल्याण महानगरपालिका यांची जी कार्यपध्दती आहे त्या कार्यपध्दतीचा अभ्यास करुन ही जी कलम मुं.प्रा.म.अधिनियमामध्ये दिली आहेत त्यानुसार जी धोकादायक इमारत म्हणून आपण ग्राहय धरतो अशा धोकादायक बाधंकामाच्या दुरुस्तीसाठी मुं.प्रा.म.अधिनियमामध्ये जी तरतुद आहे त्या तरतुदीच्या अनुषंगाने परवानगी देण्याची जी कार्यपध्दती कल्याण महानगरपालिका किंवा इतर महानगरपालिकांची आहे त्याचा अभ्यास करुन ती कार्यपध्दती उल्हासनगर मध्ये राबविण्या सदंर्भातील कार्यवाही नगररचना विभागामार्फत करण्यात येईल. दुसरे असे की, आता आपण जो अहवाल पाहिला होता की आचारसंहितेच्या कालावधीमध्ये अनाधिकृत बाधंकामाच्या संदर्भात ज्या काही तक्रारी प्राप्त झाल्या होत्या त्यातील काही प्लास्टरींगच्या असतील या संदर्भामध्ये परवानगीची मागणी करण्यात आली. त्या संदर्भात अनाधिकृत समजुन निष्कासनाची कार्यवाही करण्यात आली नव्हती. या दोन्ही कार्यपध्दतीचा अवलंब करण्यासदंर्भातील प्रस्ताव नगररचना विभागामार्फत करण्यात आलेलाही आहे. त्यावर आवश्यकतेनुसार शासनाचे मार्गदर्शनही प्रस्ताव पाठवुन घेण्यात आलेला आहे. आणि लवकरात लवकर या संदर्भातील आवश्यक ती कायद्याच्या तरतुदी प्रमाणे कार्यवाही करण्याची तजबीज नगररचना विभागामार्फत करण्यात येईल.

**सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी:—** साहेब उल्हासनगरमध्ये ३० वर्षापूर्वीच्या बॅरेक आहेत, त्यांची दुरुस्ती करायची असेल तर त्याबाबतीत काय तरतुद आहे? आमचे ब्लॉक आहेत ज्यांना ५० वर्ष झाली आहेत, ती बाधंकामे इमारतीसारखी नाहीत, आपण धोकादायक इमारतीचे दुरुस्ती बाबत सागंत आहात परंतु मला जर माझे बॅरेकच्या रुमची दुरुस्ती करायची असेल, तर ......?

श्री. समीर उन्हाळे, आयुक्तः— बॅरेक ही इमारतच आहे ना? मुं.प्रा.म.अधिनियमामध्ये इमारतीची जी संज्ञा आहे ती........

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानीः— दुरुस्ती परवानगी साठी मी आपणांस अर्ज दिला आहे, माझे बाधंकाम धोकादायक आहे किंवा नाही यांची पाहणी करण्यासाठी आपला कुणी अधिकारी जातो का?

श्री. समीर उन्हाळे, आयुक्तः— मुं.प्रा.म.अधिनियमामध्ये असलेल्या तरतुदीनूसार कार्यवाही करण्याची प्रक्रिया चालु होईल, जर ते बाधंकाम धोकादायक असेल तर दुरुस्ती परवानगी देण्याची तरतुद आहे, धोकादायक नसेल तर दुरुस्ती परवानगी देण्याची तरतुद नाही.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानीः— बाधंकाम धोकादायक असल्याचे घोषित कोण करेल? माझे बाधंकाम तीस वर्षापूर्वीचे आहे, दुरुस्ती परवानगीसाठी मी अर्ज दिला आहे.

त्यावेळी सदस्य श्री. नरेंद्र ठाकुर, श्री. संजय भठिजा यांनी सभागृहात पुन्हा प्रवेश केला.

श्री. समीर उन्हाळे, आयुक्तः— मुं.प्रा.म.अधिनियमामध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे, त्यामध्ये कलम २६६अ हे नवीन कलम समाविष्ट केले आहे, तीस वर्षापूर्वीचे जे बाधंकाम आहे त्या बाधंकामांचे परिक्षण (स्टक्चरल ऑडिट) करण्याची तरतुद या अधिनियमात करण्यात आलेली आहे. आपणांस माहित असेलच २००३ पूर्वी तीस वर्षा पूर्वीच्या बाधंकामांचे परिक्षण (स्टक्चरल ऑडिट) करण्यात आले होते, त्यावंर कार्यवाही न झाल्यामुळे तीन महिने कैदेची सजा न्यायालयाकडुन देण्यात आलेली होती, तर दुरुस्तीचा मुद्दा केवळ उल्हासनगर शहरातच आहे असे नाही. दुरुस्ती परवानगीचा मुद्दा असा नाही. राज्यामध्ये २२५ नगरपरिषदा आणि इतर ज्या महापालिका काम करतात, त्या सर्व शहरांमध्ये बाधंकाम दुरुस्ती परवानगीच्या सदंर्भात कायद्यामध्ये जी तरतुद करण्यात आलेली आहे, त्यानुसार कार्यवाही केली जाईल. मागील महिन्यात या सदंर्भात जो प्रश्न उपस्थित करण्यात आला होता त्यानुसार ही प्रक्रिया झालेली आहे त्यानुसार शासनाच्या मंजुरी नंतर पुढील प्रक्रिया पुढील पंधरा दिवसांत चालु होईल.

सदस्य श्री. नरेद्र राजानीः— मा. महापौरजी, मा. आयुक्तजी, मुं.प्रा.म.अधिनियमामध्ये जी तरतुद करण्यात आलेली आहे ती फक्त ज्या धोकादायक इमारती आहेत त्याच्या बाबतीत आहे, परंतू येथे सर्व सामान्य घराचे जे छप्पर आहे ते (एसीसी) पत्राचे आहे तो कौले लावु इच्छितो, टाईल्स लावु इच्छितो, त्याबाबतच्या परवानगी बाबत आपणाकडे काय तरतुद आहे? किंवा कुणास आपल्या घराच्या छप्पराची उंची एक किंवा दोन फुट वाढवायची आहे, त्याला बाधंकामाचे क्षेत्र वाढवायचे नाही, पूर्वीचे त्याचे जे बाधंकाम आहे तेवढयाच बाधंकामात घराच्या छप्पराची उंची वाढवायची आहे तर त्या बाबतीत आपणाकडे काय तरतुद आहे?

सदस्य श्री.जमनादास पुरस्वानीः— मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, उल्हासनगर शहरामध्ये जेव्हा सिंध मधुन विस्थापित होऊन लोक येथे आले, त्यावेळेस मिलिस्ट्रीची जी घरे होती त्यांची छप्परे कौलारु होती, त्यानां साठ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे, त्यामुळे आत्ता जी दुरुस्ती परवानगी मागितली जात आहे ती बॅरेक मधील घरदुरुस्ती साठी परवानगी मागितली जात आहे. जी साठ वर्षापेक्षा जास्त जुनी घर आहे, तर त्याबाबत श्री. नरेद्र राजानी यांनी आत्ता जे सागिंतले त्याबाबतीत आपल्याकडे काय तरतुद आहे?

सदस्य श्री. नरेद्र राजानीः— श्री. जमनुजी, मी नवीन घर बाधंले आहे, मी माझे घराचे छप्पर बदलु इच्छितो, त्याबाबतची तरतुद सांगा.

सदस्य श्री. दत्तात्रेय पवारः— मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, आत्ताच तुम्ही सांगितले की, तीस वर्षापूर्वी जी बाधंकामे झालेली आहेत, जी धोकादायक स्थितीत आहेत अशा बाधंकामांना दुरुस्ती परवानगी देण्याचा विचार करावा. परंतु काही बाधंकामे किंवा घरे सखल भागात आहेत, नदी पात्राच्या जवळपास आहेत, महापूराने बाधित झालेली आहेत, ते आजपर्यंत बाधु शकलेली नाहीत किंवा यापुर्वी कल्याण महानगरपालिकेने जे लोक सखल भागात राहतात त्याना त्याच्या घराची उंची सतरा फुटापर्यंत वाढविण्यास अप्रत्यक्षपणे परवानगी दिली आहे. याबाबत कुठली लेखी परवानगी दिलेली नाही अशा प्रकारचा विचार आपल्या महानगरपालिकेत करता येईल का? किंवा जे आता सखल भागात आहेत किंवा आता ज्या सन्मा. सदस्यांनी आपले विचार

मांडले त्याप्रमाणे जर दुरुस्ती परवानगी घ्यायची असेल तर त्यासाठी कोणती तरतुद आहे, आणि त्याची आपण कशा प्रकारे अमलंबजावणी करणार? याबाबत थोडक्यात माहिती दयावी.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरेः—</u> सन्मा. महापौरजी, आयुक्त साहेब, दुरुस्ती परवानगी संदर्भात बऱ्यासश्या सदस्यांनी विचार व्यक्त केले, मागच्या वेळेस हा विषय चर्चेस आला होता परंतु त्यावर ठोस निर्णय झालेला नाही. प्रत्येक वेळेला सन्मा. सदस्य उभा राहतो आणि दुरुस्ती परवानगी मिळाली पाहिजे याबाबत आपले विचार मांडत असतो. दुरुस्ती परवानगी बाबत तुम्ही कायद्याच्या तरतुदी सांगता आणि कल्याण आणि ठाणे महानगरपालिकेचे उदाहरण देवुन त्यांनी जी काही कार्यवाही अवलंबली असेल त्याप्रमाणे उल्हासनगर महापालिका विचारविनिमय करेल. पावसाळयास दहा पंधरा दिवस उशीर झाला आहे जर खरोखरच पावसाळयास सुरुवात झाली असती तर आता तुम्ही म्हणालात जी धोकादायक बाधंकामे आहेत, त्याना तात्काळ दुरुस्ती परवानगी दिली पाहिजे, त्यापलिकडे मी तर असेही म्हणेन की, ज्या बाधंकामांना तडे गेले आहेत अशा बाधंकामांना जर महानगरपालिका दुरुस्ती परवानगी देणार नसेल तर अशा बाधंकामधारकाकडुन मिळकत कर किंवा पाणीपट्टी घेवु नये असे मी जाहिरपणे सांगु इच्छितो. कारण आपण मालमत्ता कर वसुल करता, पाणीपट्टी वसुल करता आणि त्याला घर दुरुस्ती परवानगी पावसाळा तोडांवर येई पर्यंत तातकळत ठेवाल आणि जर उद्या वादळी वारा आला तर त्याचे घर पडले तर काय होईल? अशाच प्रकारचा एक प्रश्न श्री राजु जग्यासी यांनी मागील काही महिन्यापूर्वीच्या एका महासभेत उपस्थित केला होता, कॅम्प नंबर चार मध्ये कोणाचे तरी घर पडले होते आणि एका माणसाला दुखापत झाली होती आणि त्यानी सभागृहात मांडले होते त्यावर काय कार्यवाही झाली, झाली नाही, अजिबात काही कार्यवाही झाली नाही. २००५ मध्ये महापूर आला होता त्यावेळी गरिब लोकांची घरे बाधीत झाली होती. काही तुटलीही आहेत परंतु त्याना दुरुस्ती परवानगी देत नाहीत त्यांना विचारतात तुमच्याकडे काय पुरावा आहे? तुमच्याकडे सनद आहे का? त्यावेळी ते लोक सबंधीत प्रभागाच्या नगरसेवकाकडे येतात, व सागंतात की बघा महापालिकेकडुन आम्हाला अशी विचारणा केली जाते. म्हणुन, सर्व सन्मा. सदस्याच्या वतीने मी तुम्हाला विचारणा करु इच्छितो की ज्यावेळेस आपल्याला पाणी बील किंवा मालमत्ता कर वसुल करण्याचा अधिकार आहे तर त्याप्रमाणे तुम्हाला घर दुरुस्ती परवानगी देण्याचा अधिकार ही असला पाहिजे, तुम्ही दुरुस्ती परवानगी दिली पाहिजे त्याबाबतचा निर्णय लवकरात लवकर घेतला पाहिजे. नाहीतर म्हणाल आमचे शिर्के साहेब विचारतील व पुढल्या वेळेस सांगतील हे आता अजिबात चालणार नाही. दुरुस्ती परवानगी ही दिली गेलीच पाहिजे. आणि या उल्हासनगर शहरात दुरुस्ती परवानगी देत नाही म्हणुन धनदांडगे दुरुस्ती परवानगीच्या नावाने इमारती उभ्या करतात वेळ आली तर हे आम्ही तुम्हाला दाखवुन देवु. गरिब माणुस दुरुस्ती परवानगी घेण्यासाठी अडुन राहतो त्याला दुरुस्ती परवानगी मिळत नाही. आणि म्हणुन सर्व सन्मा. सदस्यांच्यावतीने मी विनंती करतो की यावर आपण त्वरीत तोडगा काढावा आणि दुरुस्ती परवानगी दयावी.

<u>सदस्य श्री. गोविंदराम लुंडः—</u> आयुक्त साहेबाना मी विनंती करतो की, कल्याण, ठाणे आणि भिंवडी या महापालिकेमध्ये कोणती कार्यपध्दती अवलंबली जाते त्याची चौकशी करुन या ठिकाणी त्याप्रमाणे कार्यवाही करावी. आपल्या शहरामध्ये १९६२ पासुनची बाधंकामे आहेत त्यातील काही घराच्या छप्परांची लाकडे तुटली आहेत, पत्रे तुटले आहेत याबाबतीत मी सहा. सचालंक श्री. सिंग साहेबांना बोललो होतो त्यावर त्यांनी सागिंतले की भिंवडी आणि ठाणे येथे याबाबतीत चौकशी करेन, कल्याण मध्ये अशा प्रकारची परवानगी दिली जाते तर मग आपणाकडे का नाही दिली जात? नागरिक तर आमच्याकडे तक्रार घेऊन येतात ते अर्ज विंनत्या करतात परंतु उत्तर मिळत नाही. या समस्येचे निवारण तर केले पाहिजे याबाबतीत लवकरच निर्णय घेतला जाईल.जे बेकायदेशीर बाधंकाम करत असतील त्याचे बाधंकाम तोडा पाहिजे तर त्यासाठी आम्ही आपल्या बरोबर येवु.

<u>श्री. समीर उन्हाळे, आयुक्तः—</u> दुरुस्ती परवानगी सदर्भात सर्व सन्मा. सदस्यांनी आपापली जी मते मांडली.

<u>सदस्य श्री. गोविंदराम लुंडः—</u> साहेब, हिंदीत बोलले तर बरे होईल.

<u>श्री. समीर उन्हाळे, आयुक्तः—</u> दुरुस्ती परवानगी सदर्भात सर्व सन्मा. सदस्यांनी आपापली जी मते मांडली. त्याअनुषगांने मी सभागृहाला असे सांगु इच्छितो की, कल्याण महानगरपालिकेची व ठाणे महानगरपालिकेची या सबंधीची माहिती मागविण्यात आलेली आहे. जी कार्यपध्दती विषद करायची आहे ती सुध्दा तयार करण्यात आलेली आहे. त्यासदंर्भात शासनाला अवगत करुन तसा ठराव महासभेत लवकरात लवकर आणण्याचा आम्ही प्रयत्न करु.

**सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी(सोंडे):–** साहेब हयाची कार्यवाही केव्हा होईल, पावसाळा येऊन निघुन जाईल असे तर नाही ना?

**श्री. समीर उन्हाळे, आयुक्त:–** धोकादायक बाधंकामाच्या सदंर्भात काही दुमत नाही. कायद्यात तरतुद आहे, कायदयाच्या अनुषंगाने आम्ही कार्यवाही करतच आहोत. जी बाधंकामे धोकादायक नाहीत त्या सदंर्भातील आपली मागणी आहे. याबाबत इतर महानगरपालिकेमध्ये जी कार्यवाही अवलंबिली आहे. त्यानुसार.......

**सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी(सोंडे):–** धोकादायक बाधंकामासदंर्भात सर्व्हे झाला आहे का?

**सदस्य श्री.बी.बी. मोरे:–** तुम्ही दुरुस्ती परवानगी देत नाहीत म्हणूनच पाऊस उशीराने येत आहे.....?

**सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी(सोंडे):–** धोकादायक बाधंकामासदंर्भात सर्व्हे झाला आहे का?

**श्री. समीर उन्हाळे, आयुक्त:–** दरवर्षी या बाबतचा सर्व्हे हा बाधंकाम विभागामार्फत करण्यात आलेला असतो, त्यानां तशा नोटीसा देण्यात आलेल्या असतात.

**सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी(सोंडे):–** धोकादायक इमारतीची यादी महासभेपुढे आली पाहिजे, आम्हास कसे माहित पडेल आमच्या प्रभागात कोणकोणत्या इमारती धोकादायक आहे त्या?

**श्री. समीर उन्हाळे, आयुक्त:–** आम्ही यादी पुरवितो.

**सदस्य श्री. नरेद्र राजानी:–** मा. आयुक्त साहेब, आपण मु.प्रा.म.पा.अधिनियमानुसार कार्यवाही करत असतो, ठाणे व कल्याण महानगरपालिका काय करतात तो वेगळा विषय आहे. आपण आपले एक धोरण तयार करु शकतो, आपण स्थानिक स्वराज्य संस्थेच्या धोरणानुसार कार्यवाही केली पाहिजे, आपले अधिकार आपणांकडे आहेत मु.प्रा.म.पा.अधिनियमामध्ये ज्या सदंर्भात तरतुद नाही त्याबाबतची तरतुद करण्यासाठी आपण सभागृहात नियम करु शकतो तसे धोरण तयार करुन आपण आपला कारभार चालवु शकतो. या शहराची स्थिती होवु शकते, कल्याण व ठाणे महानगरपालिकेपेक्षा वेगळी आहे त्यानुसार येथे निर्णय घेणे अति आवश्यक आहे, कारण की हा अतिशय गंभीर असा विषय आहे, कित्येक लोकांना बऱ्याचशा अडचणी आहेत. कित्येक अडचणीचा दुरुपयोग होत आहे, त्याचा मी उल्लेख करु इच्छित नाही. कल्याण व ठाणे महानगरपालिकेकडुन कधी प्रस्ताव येईल त्याअगोदर पावसाळा सुरु होईल. पावसाळयात लोकांची घरे बुडतील, लोक हैराण होतील. यासाठी आपण आपला निर्णय त्वरीत घेतला पाहिजे, अशी आपणांस विनंती आहे.

**श्री. समीर उन्हाळे, आयुक्त:–** पुढील महासभेपर्यंत याबाबतचा प्रस्ताव पाठवु.

**महापालिका सचिव :–** ठिक आहे, पास?

**काही सदस्य :–**पास–पास......

**महापौर :–** मागील सभेचे दिनांक २०/५/२००९ व ३०/५/२००९ रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

---

☑ **विषय क्र. २ :–** मागील महासभेचे दिनांक २०/५/२००९ व ३०/५/२००९ सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

---

सूचकाचे नाव : श्री. गोंविदराम लुंड

अनुमोदकाचे नाव : श्री. बी. बी. मोरे

<u>महासभा ठराव क्र. ५ब</u> <u>दिनांक : १९/६/२००९</u>

ही महासभा महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेल्या दिनांक २०/५/२००९ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे पृष्ठ क्र. १ ते ३३ पर्यंतचे व ३०/५/२००९ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे पृष्ठ क्र. १ ते ३ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

<u>एकमताने</u>

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ३:—** महापालिका प्रशासकिय केंद्र व पुस्तकालयाकरीता १५ विविध पदनिर्मीतीस मान्यताकामी स्थायी समिती ठराव क्र. २१, दिनांक १/६/२००९ कायम करणे.

---

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र. ३ :—** महापालिका प्रशासकिय केंद्र व पुस्तकालयाकरीता १५ विविध पदनिर्मीतीस मान्यताकामी स्थायी समिती ठराव क्र. २१, दिनांक १/६/२००९ कायम करणे.

**<u>प्रस्तावना</u>**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या अधिकारी/कर्मचारी यांना कार्यालयांतर्गत प्रशिक्षण देण्यासाठी दिनांक ४/९/२००७ पासुन प्रशासकिय प्रशिक्षण व गुणवत्ता केंद्र सुरू करण्यात आले आहे तसेच महापालिकेतील स्थानापन्न पदाधिकारी, नगरसेवक व महापालिका अधिकारी, कर्मचारी यांच्यासाठी अंतर्गत पुस्तकालय/ग्रंथालय सुध्दा सुरू करण्यात आले आहे. या प्रशिक्षणकेंद्रामार्फत यापुढे आणखी काही लोकोपयोगी तसेच कर्मचारी मार्गदर्शक उपक्रमदेखील राबविण्याचा मानस आहे.
प्रशासकिय प्रशिक्षण व गुणवत्ता केंद्र तसेच ग्रंथालय/पुस्तकालयातील कामाची वाढती व्याप्ती यांचा विचार करून तेथील कामकाज सुरळीत व योग्यप्रकारे चालावे यासाठी
१) मार्गदर्शक तत्वे, नियम, उपविधी इत्यादी बनवणे अथवा त्यांत वेळोवेळी बदल करणे.
२) उपलब्ध ज्ञानाचा साठा इतर संस्थाना/व्यक्तींना देणे व त्यांच्याकडुन घेणेकरीता योग्य ती पध्दत ठरविणे.
३) प्रशासकिय प्रशिक्षण केंद्र व पुस्तकालयाचा संपुर्ण खर्च हा महापालिका अंदाजपत्रकातील कर्मचारी प्रशिक्षण खर्च या लेखाशिर्षातील तरतुदीमधुन खर्च करणे.

४) प्रशिक्षण केंद्र व पुस्तकालयाकरीता आवश्यक मनुष्यबळ पुरविणेकरीता पुढीलप्रमाणे तयार केलेल्या पदनिर्मितीचा प्रस्ताव व सेवाप्रवेश नियमावलीस मान्यता मिळणेसाठी मुंबई

प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ५१ अन्वये मा. स्थायी समितीपुढे प्रस्ताव ठेवणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | पदाचे नांव | आवश्यक पदसंख्या | पाचव्या वेतनआयोगानुसार वेतनश्रेणी रू. | कर्तव्ये | सेवाप्रवेशनियम | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | प्रतिनियुक्ती/सरळसेवा | पदोन्नती |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | संचालक | ०१ | ८०००–१३५०० | प्रशिक्षण केंद्रामार्फत होणा–या कामकाजावर नियंत्रण, पर्यवेक्षण, प्रशिक्षण कालदर्शिका तयार करणे, प्रशिक्षण केंद्रामार्फत विविध उपक्रम राबविणे, | प्रतिनियुक्ती... नगरविकास विभागाकडील मुख्याधिकारी संवर्गातील अधिकारी तसेच राज्य शासकिय अथवा उच्च शिक्षण विभागातील समकक्ष अधिकारी अथवा इतर मनपाकडील अधिकारी अथवा वर्ग– १ च्या संवर्गातील समकक्ष पदावरील अधिकारी प्रतिनियुक्तीवर बदलीने नियुक्त करता येतील.<br>सरळसेवा...सदर पदावर सरळसेवेने नियुक्तीसाठी उमेदवारास आवश्यक असलेली अर्हता व पात्रता खालिलप्रमाणे असावी.<br>१) ज्यांचे वय ४० वर्षापेक्षा जास्त नाही<br>२) कोणत्याही शाखेचा पोस्ट ग्रॅज्युएट असावा.<br>३) शासकिय/निमशासकिय सेवेतील वर्ग १ व २ च्या संवर्गातील प्रशासकिय पदावरील कामाचा किमान ५ वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>४) उल्हासनगर महापालिका सेवेत कार्यरत असलेल्या अधिकारी/ कर्मचारी यांचेमधुनदेखील भरतीप्रवेश अर्जाद्वारे नेमणुक करण्यात येईल त्यासाठी वयोमर्यादेची अट नसेल. | सदर पदावर पदोन्नतीने नियुक्तीसाठी उमेदवारास आवश्यक असलेली अर्हता व पात्रता खालिलप्रमाणे असावी.<br>१) कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा.<br>२) सहा. आयुक्त/प्रभागक्षेत्र अधिकारी/वर्ग–२ च्या संवर्गातील समकक्ष पदावरील कामाचा किमान ५ वर्षाचा अनुभव आवश्यक<br>किंवा<br>उपसंचालक, प्रशिक्षण केंद्र या पदावरील कामाचा किमान ०३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक.<br>. |
| २ | उपसंचालक | ०१ | ६५००–१०५०० | प्रशिक्षण केंद्रामार्फत होणा–या कामकाजावर नियंत्रण, पर्यवेक्षण, प्रशिक्षण कालदर्शिका तयार करणे, प्रशिक्षणाचे आयोजन व व्यवस्था पहाणे.,प्रशिक्षण केंद्रामार्फत विविध उपक्रम राबविणे, | प्रतिनियुक्ती... नगरविकास विभागाकडील मुख्याधिकारी संवर्गातील अधिकारी तसेच राज्य शासकिय अथवा उच्च शिक्षण विभागातील समकक्ष अधिकारी अथवा इतर मनपाकडील अधिकारी अथवा वर्ग– २ च्या संवर्गातील समकक्ष पदावरील अधिकारी प्रतिनियुक्तीवर बदलीने नियुक्त करता येतील.<br>सरळसेवा...सदर पदावर सरळसेवेने नियुक्तीसाठी उमेदवारास आवश्यक असलेली अर्हता व पात्रता खालिलप्रमाणे असावी.<br>१) ज्यांचे वय ३५ वर्षापेक्षा जास्त नाही.<br>२) कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा.<br>३) शासकिय/निमशासकिय सेवेतील प्रशासकिय पदावरील कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>४) उल्हासनगर महापालिका सेवेत कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांचेमधुनदेखील भरतीप्रवेश अर्जाद्वारे नेमणुक करण्यात येईल त्यासाठी वयोमर्यादेची अट नसेल. | सदर पदावर पदोन्नतीने नियुक्तीसाठी उमेदवारास आवश्यक असलेली अर्हता व पात्रता खालिलप्रमाणे असावी.<br>१) अधिक्षक व त्यांस समकक्ष असणा–या पदावरील कामाचा किमान २ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक<br>किंवा<br>समन्वयक, प्रशिक्षण केंद्र या पदावरील कामाचा किमान ०२ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक.<br>. |
| ३ | समन्वयक, प्रशिक्षण केंद्र | ०२ | ५५००–९००० | १) विभागांतर्गत प्रशिक्षणाच्या गरजा जाणुन घेणे, त्यानुसार प्रशिक्षण कार्यक्रम आखणे | | सदर पदावर पदोन्नतीने नियुक्तीसाठी उमेदवारास आवश्यक असलेली अर्हता व पात्रता खालिलप्रमाणे |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | २) विभागांतर्गत प्रशिक्षणाच्या गरजांनुसार प्रशिक्षणाचे आयोजन/व्याख्यात्यांचे आयोजन, मानधन व इतर भत्ता व यासंबंधी इतर सर्व कामे. | --- | असावी.<br>१) निरीक्षक व त्यांस समकक्ष असणा–या पदावरील कामाचा किमान ०३ वर्षाचा अनुभव व लायब्ररी सायन्स या विषयाचा सर्टीफिकेट कोर्स उत्तीर्ण असणे आवश्यक<br>किंवा<br>लायब्ररीयन/ग्रंथपाल या पदावरील कामाचा किमान ०१ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक |
| ४ | परिरक्षक, प्रशिक्षण केंद्र | ०१ | ५५००–९००० | १) प्रशिक्षण केंद्रासाठी आवश्यक असलेली उपकरणे व इतर सर्व साहित्य उपलब्ध करणे, त्यांची निगा राखणे व नोंदी ठेवणे तसेच मागणीनुसार उपलब्ध करून देणे.<br>२) प्रशिक्षण केंद्रासाठी आवश्यक असलेली तांत्रिक उपकरणांची नियमित तपासणी करणे, व सदर उपकरणे नेहमी सुस्थितीत राहतील याची काळजी घेणे. | सदर पदावर सरळसेवेने नियुक्तीसाठी उमेदवारास आवश्यक असलेली अर्हता व पात्रता खालिलप्रमाणे असावी.<br>१) ज्यांचे वय ३३ वर्षापेक्षा जास्त नाही.<br>२) विदयुत किंवा संगणक किंवा माहिती तंत्रज्ञान शाखेतील पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण असणे आवश्यक. | |
| ५ | देखभाल व दुरूस्ती अभियंता | ०१ | ५५००–९००० | प्रशिक्षण केंद्राची काळजी घेणे तसेच आवश्यकतेनुसार त्यांची देखभाल व दुरूस्ती करणे. | सदर पदावर सरळसेवेने नियुक्तीसाठी उमेदवारास आवश्यक असलेली अर्हता व पात्रता खालिलप्रमाणे असावी.<br>१) ज्यांचे वय ३३ वर्षापेक्षा जास्त नाही.<br>२) स्थापत्य शाखेतील पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण असणे आवश्यक. | |
| ६ | लायब्ररीयन | ०१ | ४०००–६००० | प्रशिक्षण केंद्राशी संलग्न पुस्तकालयाचे कामकाज पाहणे, मागणी व आवश्यकतेनुसार नविन पुस्तके खरेदी करणे, पुस्तकांची साठा नोंदवही अदयावत ठेवणे, मागणीनुसार पुस्तके उपलब्ध करून देणे व नोंदी ठेवणे. | | सदर पदावर पदोन्नतीने नियुक्तीसाठी उमेदवारास आवश्यक असलेली अर्हता व पात्रता खालिलप्रमाणे असावी.<br>१) कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा व लायब्ररी सायन्स या विषयाचा सर्टीफिकेट कोर्स उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२) लिपीक या पदावरील कामाचा किमान १० वर्षाचा अनुभव असणे आवश्यक. |
| ७ | वरिष्ठ लिपीक (प्रशिक्षणा केंद्र) | ०२ | ४०००–६००० | प्रशिक्षण केंद्राशी संलग्न पुस्तकालयाचे कामकाज पाहणे, मागणी व आवश्यकतेनुसार नविन पुस्तके खरेदी करणे, पुस्तकांची साठा नोंदवही अदयावतठेवणे,मागणीनुसार पुस्तके उपलब्ध करून देणे व नोंदी ठेवणे. | सदर पदावर सरळसेवेने नियुक्तीसाठी उमेदवारास आवश्यक असलेली अर्हता व पात्रता खालिलप्रमाणे असावी.<br>१) कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा.<br>२) ज्यांचे वय ३३ वर्षापेक्षा जास्त नाही.<br>३) शासकिय/निमशासकिय सेवेतील लिपीक या पदावरील कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक. | सदर पदावर पदोन्नतीने नियुक्तीसाठी उमेदवारास आवश्यक असलेली अर्हता व पात्रता खालिलप्रमाणे असावी.<br>१) किमान एस.एस.सी. परिक्षा उत्तीर्ण.<br>२) लिपीक या पदावरील कामाचा किमान ५ वर्षाचा अनुभव आवश्यक. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८ | टेक्निशियन | ०२ | ४०००—६००० | प्रशिक्षण केंद्रामध्ये उपलब्ध असलेल्या विविध तांत्रिक उपकरणांची निगा राखणे व दुरूस्ती करणे, आवश्यकतेनुसार तांत्रिक उपकरणांची प्रशिक्षणाच्या ठिकाणी व्यवस्था करणे. | | महापालिका सेवेतील सलग ५ वर्ष सेवा झालेल्या तारतंत्री संवर्गातील कर्मचा—यांमधुन सदर पदावर पदोन्नतीने नियुक्ती करता येईल. |
| ९ | संगणक चालक | ०१ | ३२००—४९०० | प्रशिक्षण केंद्राशी संबंधित संगणकावरील कामे पहाणे. | सदर पदावर सरळसेवेने नियुक्तीसाठी उमेदवारास आवश्यक असलेली अर्हता व पात्रता खालिलप्रमाणे असावी.<br>१) किमान एच.एस.सी. परिक्षा उत्तीर्ण.<br>२) ज्यांचे वय ३० वर्षापेक्षा जास्त नाही.<br>३) शासन मान्यताप्राप्त संस्थेकडील मराठी टंकलेखन ३० शब्द प्रती मिनीट व इंग्रजी टंकलेखन ४० शब्द प्रती मिनीट कोर्स उत्तीर्ण असणे आवश्यक<br>४) शासनमान्य संगणक परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>५) उल्हासनगर महापालिका सेवेत कार्यरत असलेल्या कर्मचारी यांचेमधुनदेखील भरतीप्रवेश अर्जाद्वारे नेमणुक करण्यात येईल त्यासाठी वयोमर्यादेची अट नसेल. | |
| १० | सुतार | ०१ | ३०५०—४५९० | प्रशिक्षण केंद्राशी संबंधित आवश्यक सर्व सुतार कामे करणे. | सदर पदावर सरळसेवेने नियुक्तीसाठी उमेदवारास आवश्यक असलेली अर्हता व पात्रता खालिलप्रमाणे असावी.<br>१) किमान एस.एस.सी. परिक्षा उत्तीर्ण.<br>२) ज्यांचे वय ३० वर्षापेक्षा जास्त नाही.<br>३) शासन मान्यताप्राप्त संस्थेकडील सुतारकामाशी संबंधित क्षेत्रातील आय.टी.आय. कोर्स उत्तीर्ण असणे आवश्यक | |
| ११ | लिपीक /सहा. लायब्ररियन/ रिसेप्शनिस्ट | ०५ | ३०५०—४५९० | प्रशिक्षण केंद्राशी संबंधित सर्व कामे, पुस्तकालयाशी संबंधित सर्व कामे | सदर पदावर सरळसेवेने नियुक्तीसाठी उमेदवारास आवश्यक असलेली अर्हता व पात्रता खालिलप्रमाणे असावी.<br>१) किमान एच.एस.सी. परिक्षा उत्तीर्ण.<br>२) ज्यांचे वय ३३ वर्षापेक्षा जास्त नाही.<br>३) शासन मान्यताप्राप्त संस्थेकडील मराठी टंकलेखन ३० शब्द प्रती मिनीट व इंग्रजी टंकलेखन ४० शब्द प्रती मिनीट कोर्स उत्तीर्ण असणे आवश्यक<br>४) शासनमान्य संगणक परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>५) लायब्ररी सायन्स या विषयाचा सर्टीफिकेट कोर्स उत्तीर्ण केलेल्या उमेदवारांना प्राधान्य. | सदर पदावर पदोन्नतीने नियुक्तीसाठी उमेदवारास आवश्यक असलेली अर्हता व पात्रता खालिलप्रमाणे असावी.<br>१) किमान एस.एस.सी. परिक्षा उत्तीर्ण.<br>२) शासन मान्यताप्राप्त संस्थेकडील मराठी टंकलेखन ३० शब्द प्रती मिनीट व इंग्रजी टंकलेखन ४० शब्द प्रती मिनीट कोर्स उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>३) शासनमान्य संगणक परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक. |
| १२ | सफाई मुकादम | ०१ | २६१०—४४०० | प्रशिक्षण केंद्र तसेच पुस्तकालयातील साफसफाई व स्वच्छता यावर देखरेख ठेवणे. | ——— | सदर पदावर पदोन्नतीने नियुक्तीसाठी उमेदवारास आवश्यक असलेली अर्हता व पात्रता खालिलप्रमाणे असावी.<br>१) किमान इ. ४ थी उत्तीर्ण.<br>२) महापालिका सेवेतील सफाई कामगार या पदावरील किमान १० वर्ष सलग सेवा झालेली असणे आवश्यक. |
| १३ | शिपाई प्रशिक्षण | ०६ | २५५०—३२०० | प्रशिक्षण कार्यालयाशी व पुस्कालयाशी संबंधित सर्व | सदर पदावर सरळसेवेने नियुक्तीसाठी उमेदवारास आवश्यक असलेली अर्हता व | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | केंद्र | | | कामे | पात्रता खालिलप्रमाणे असावी.<br>१) किमान इ. ४ थी उत्तीर्ण.<br>२) चांगली शरीरयष्टी असावी. | ——— |
| १४ | मदतनीस (विदयुत) प्रशिक्षण केंद्र | ०२ | २५५०—३२०० | प्रशिक्षण कार्यालयाशी व पुस्कालयाशी संबंधित सर्व कामे तसेच तांत्रिक उपकरणांची निगा, दुरूस्तीकरीता सहाय्य करणे. | सदर पदावर सरळसेवेने नियुक्तीसाठी उमेदवारास आवश्यक असलेली अर्हता व पात्रता खालिलप्रमाणे असावी.<br>१) किमान इ. ४ थी उत्तीर्ण.<br>२) चांगली शरीरयष्टी असावी. | ——— |
| १५ | सफाई कामगार | ०४ | २५५०—३२०० | प्रशिक्षण केंद्र तसेच पुस्तकालय येथे नियमित साफसफाई व स्वच्छता ठेवणे. | चांगली शरीरयष्टी असणा—या उमेदवारांमधुन सदर पदावर सरळसेवेने नियुक्ती करता येईल. | ——— |

वरील बाबी लक्षात घेता खालिल प्रस्तावित मुददयांना मंजुरी मिळणे आवश्यक आहे.

१) मार्गदर्शक तत्वे, नियम, उपविधी इत्यादी बनवणे अथवा त्यांत वेळोवेळी बदल करणेसाठी आयुक्त यांना प्राधिकृत करणे.

२) उपलब्ध ज्ञानाचा साठा इतर संस्थाना/व्यक्तींना देणे व त्यांच्याकडुन घेणेकरीता योग्य ती पध्दत ठरविणे व राबविणे यासाठी आयुक्त यांना प्राधिकृत करणे.

३) प्रशासकिय प्रशिक्षण केंद्र व पुस्तकालयाचा संपुर्ण खर्च हा महापालिका अंदाजपत्रकातील कर्मचारी प्रशिक्षण खर्च या लेखाशिर्षातील तरतुदीमधुन खर्च करणेस मंजुरी देणे.

४) प्रशिक्षण केंद्र व पुस्तकालयाकरीता आवश्यक मनुष्यबळ पुरविणेकरीता पुढीलप्रमाणे तयार केलेल्या पदनिर्मितीचा सदर प्रस्ताव व सेवाप्रवेश नियमावलीस मान्यता देणे.

५) नव्याने प्रस्तावित केलेल्या पदांना शासनाकडुन मंजुरी मिळेपर्यत तात्पुरत्या स्वरूपात महापालिकेच्या आस्थापना सुचीवर सद्यस्थितीत मंजुर असलेली पदे खालिलप्रमाणे अदलाबदलीने
भरण्यास मान्यता देणे.

| अ. क्र. | महापालिकेच्या आस्थापनेवर मंजुर असलेल्या पदाचे नांव | वाचनालय तसेच प्रशिक्षण केंद्रासाठी अदलाबदलीने भरावयाचे पद |
|---|---|---|
| १ | उप—आयुक्त/कार्यकारी अभियंता | संचालक, प्रशिक्षण केंद्र |
| २ | सहा.आयुक्त/प्रभागक्षेत्र अधिकारी/उप—अभियंता | उपसंचालक, प्रशिक्षण केंद्र |
| ३ | अधिक्षक/मुख्य लिपीक | समन्वयक, प्रशिक्षण केंद्र |
| ४ | कनिष्ठ अभियंता (विदयुत) | परिरक्षक, प्रशिक्षण केंद्र |
| ५ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | देखभाल व दुरूस्ती अभियंता (प्रशिक्षण केंद्र) |
| ६ | वरिष्ठ लिपीक/लायब्ररीयन कोर्स केलेला लिपीक | लायब्ररीयन |
| ७ | वरिष्ठ लिपीक | वरिष्ठ लिपीक (प्रशिक्षण केंद्र) |
| ८ | टेक्निशियन | विजतंत्री (प्रशिक्षण केंद्र) |
| ९ | संगणकचालक | संगणकचालक (प्रशिक्षण केंद्र) |
| १० | सुतार | सुतार (प्रशिक्षण केंद्र) |
| ११ | लिपीक/सहा. लायब्ररीयन/रिसेप्शनिस्ट | लिपीक |
| १२ | सफाई मुकादम | सफाई मुकादम |
| १३ | शिपाई | शिपाई |
| १४ | मदतनीस | मदतनीस(विदयुत), प्रशिक्षण केंद्र |
| १५ | सफाई कामगार | सफाई कामगार |

तरी उपरोक्त अ.क्र. १ ते ५ वरील बाबींसाठी वरीलप्रमाणेचा प्रस्ताव मंजुरीसाठी मा. स्थायी समितीपुढे ठेवणेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र. २१** दिनांकः— १/६/२००९

सुचकाचे नाव :— श्री. जीवन इदनानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती महासभेच्या मंजुरीस अधिन राहुन वरील प्रस्तावनेनुसार महापालिका प्रशासकिय प्रशिक्षण केंद्र व पुस्तकालया करीता १५ पदनिर्मितीस खालील बाबींसह मान्यता देत आहे.
१) मार्गदर्शक तत्वे, नियम, उपविधी इत्यादी बनवणे अथवा त्यांत वेळोवेळी बदल करणेसाठी आयुक्त यांना प्राधिकृत करणे.

२) उपलब्ध ज्ञानाचा साठा इतर संस्थाना/व्यक्तींना देणे व त्यांच्याकडुन घेणेकरीता योग्य ती पध्दत ठरविणे व राबविणे यासाठी आयुक्त यांना प्राधिकृत करणे.

३) प्रशासकिय प्रशिक्षण केंद्र व पुस्तकालयाचा संपुर्ण खर्च हा महापालिका अंदाजपत्रकातील कर्मचारी प्रशिक्षण खर्च या लेखाशिर्षातील तरतुदीमधुन खर्च करणेस मंजुरी देणे.
४) प्रशिक्षण केंद्र व पुस्तकालयाकरीता आवश्यक मनुष्यबळ पुरविणेकरीता वरीलप्रमाणे तयार केलेल्या पदनिर्मितीचा सदर प्रस्ताव व सेवाप्रवेश नियमावलीस मान्यता देणे.

५) नव्याने प्रस्तावित केलेल्या पदांना शासनाकडुन मंजुरी मिळेपर्यत तात्पुरत्या स्वरूपात महापालिकेच्या आस्थापना सुचीवर सद्यस्थितीत मंजुर असलेली पदे वरीलप्रमाणे अदलाबदलीने भरण्यास मान्यता देणे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महासभा ठराव क्र:</u> ६ दिनांकः— १९/६/२००९

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. जीवन इदनानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे महापालिका प्रशासकिय केंद्र व पुस्तकालयाकरीता १५ विविध पदनिर्मीतीस व त्यासह इतर ५ बाबीस स्थायी समितीने दिनांक १/६/२००९ रोजी पारीत केलेला ठराव क्र. २१, कायम करीत आहे

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ४ :—** उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात बालमित्र शहर प्रकल्प

राबविण्यास मान्यता देणे.

---

**सदस्य श्री. मोहन साधवानीः—** मा. आयुक्त साहेब, मी आपणांस विनंती करतो की याविषयाबाबत जरा थोडक्यात स्पष्टीकरण केले जावे.

**श्री. समीर उन्हाळे, आयुक्तः—** युनीसेफ, जी युनायेटेड नेशनची संस्था आहे, त्याच्या वतीने यशंवतराव चव्हाण ॲकॅडमी फॉर डेव्हलेपमेंन्ट ॲडमिनीस्ट्रेशन ही राज्यशासनाची एक संस्था आहे, महानगरपालिकेचे कामकाज इंजिनियरींग वर्क्स नुसार होते, जसे की रस्ते बांधणे, पुल बाधंणे, गटारे बाधंणे, पाणी पुरवठयाच्या जलवाहिन्या टाकणे. परंतु शहरामध्ये राहणारी आमची जी काही मुले आहेत त्यांच्यासाठी महानगरपालिकेकडुन जेवढी काही कार्यवाही झाली पाहिजे तेवढी होत नाही, ही केवळ उल्हासनगरचीच गोष्ट नाही, देशपातळीवर याची तुलना होऊ शकते. महानगरपालिकांना इजिनियरींग सेवा उपलब्ध करुन देणारी ही संस्था आहे व त्यात वेलफेयर ओरियेनटेशन असेल पाहिजे त्या प्रमाणात ते नाही. ते आणण्यासाठी युनिसेफ व यशदाच्यावतीने पहिले शहर म्हणुन उल्हासनगरची निवड करण्यात आलेली आहे. व या प्रकल्पाचा आम्ही सर्व सदस्यांना जो गोषवारा प्रस्तुत केलेला आहे त्यानुसार पाच, सहा कार्यक्रम करण्याची आमची योजना आहे. बालमित्रत्व शहराची संकल्पना आम्ही शहरात राबवायची किवा नाही, त्याबाबत आपल्या निर्देशनाची आवश्यकता होती, व दुसरे असे की, बालकांना त्याच्या हक्कानुसार सोईसुविधा निर्माण करुन त्याचे जीवनमान उचांवणे आणि बगीच्यासाठी सुदृढ समाज तयार करणे अशी संकल्पना आहे. हे सर्व आम्ही गोषवाऱ्यामध्ये दिलेले आहे, पाहिजे तर गोषवारा वाचुन दाखवू शकतो.

- शहरातील समस्याग्रस्त मुले व मुलींना गरजेनुसार अत्यावश्यक सेवा पुरविणे
- बालकामगारांना त्यांच्या कामाच्या ठिकाणापासून मुक्त करुन नियमित शाळेमध्ये दाखल करणे/विशेष वर्ग सुरु करणे.
- मुलांमध्ये जीवन कौशल्य व व्यावसायिक कौशल्य विकसित करणे.
- शारिरिक व मानसिकदृष्टया विकलांग बालकांना प्राप्त परिस्थितीशी समायोजन करण्यास सक्षम बनविणे.
- मुलांचे हक्क अबाधित राहण्यासाठी जनतेमध्ये जनजागृती करणे.

तर यामध्ये ही उद्दिष्टे ठेवण्यात आलेली आहेत, व विशेष असे जे केंन्द्र असणार आहे

<u>बालसुविधा केंद्र</u>

आपणाकडील पाच कॅम्प आहेत, प्रत्येक कॅम्पामध्ये जी मोठयात मोठी गलिच्छ वस्ती असेल, तेथे जी आमची समाजमंदीरे बाधुन पडलेली आहेत, तेथे आम्ही बालसुविधा केंद्र चालु शकतो, तेथे मुलांसाठी खेळणे ठेवु शकतो, मुलांसाठी संस्कार वर्ग ठेवले जावु शकतात. ' लेक वाचवा' अभियान हा अतिशय गंभीर असा विषय आहे, आपणांस माहित असेलच की, मुंबई महानगर प्राधिकरण विभागामध्ये महिलांची संख्या खुपच कमी आहे, स्त्रीभृण हत्येच्या प्रकारामुळे मुली जिवंतपणे जन्मास येवु शकत नाहीत. त्यामुळे स्त्रीभृण हत्येच्या सदंर्भात याप्रस्तावामध्ये विशेष तरतुद ठेवण्यात आली आहे. मुली वाचवा, लेकी वाचवा, या प्रकारची एक योजना यामध्ये राहिल, मुलांसाठी लायब्ररी ठेवली जाईल, चांगली वाचनीय अशी पुस्तके ठेवली जातील, खेळणी ठेवली जातील. जी मुले शाळेत जात नाहीत त्याच्यासाठी पर्यायी शिक्षण दिले जाईल, सायंकाळी एक तास त्याना शिक्षण दिले जाईल, मुलभुत शिक्षण दिले जाईल, आरोग्य तपासणी १० ते १२ वर्षाची जी मुले मोठया संख्येने बाहेर आहेत, ज्यानां स्वता:चे घर नाही, त्याच्यामध्ये जी व्यसनाधिनता आहे, त्याच्यासाठी समुपदेशन सुरु करु, इंग्रजी संभाषण केंद्र चालु करु, किशोरवयीन मुलीचे किशारीविकास गट वर्ग चालविणे, बालसुविधा केंद्रातुन उपक्रम चालु करणे, वस्तीपातळीवर मुलांची बालपंचायत स्थापन करणे. मुलांचा आवाज प्रत्येक वेळेस महासभेपर्यंत पोहोचतोच असे नाही, आपल्यासाठी ना ते मतदार , ना आमच्यासाठी ते त्रास देणारे नागरिक आहेत, त्यामुळे शासन आणि प्रशासनाचे त्यांच्याकडे लक्ष जात नाही, या मुलाची काय मागणी आहे ते समजत नाही ते जाणुन घेण्यासाठी बालपंचायतची स्थापना आम्ही करु यासाठी सुवर्ण जंयती चा जो महिला बचत गट आहे, असे दोन तीन गट एकत्रित करुन त्याच्यावतीने प्रायोजीत तत्वावर फास्ट फुड प्रकल्प प्रत्येक कॅम्पात आम्ही चालु करु इच्छितो, जीवन प्रशिक्षण कौशल्य ज्यास म्हटले जाते, एखादे पुस्तक वाचणे किंवा आजच्या समाजात आपला निभाव लागु शकणार नाही, त्यासाठी जीवन कौशल्य प्रशिक्षण देण्याची तरतुद यामध्ये ठेवली आहे, बालहक्क जे केंद्र, आमचे जे रिमांडहोम आहेत त्याच्यासाठी महापालिकेच्या वतीने विशेष अनुदान दयायचे आहे, त्याच्यासाठी वैद्यकीय उपचार दयायचे आहेत त्यासाठीची तरतुद या प्रकल्पाच्या माध्यमातुन करु इच्छित आहोत, त्यानंतर जे निराधार केंद्र आहेत, जी अपंग केंद्र आहेत, ज्याना आपण शारिरिक दृष्टया व मानसिक दृष्टया कमकुवत आहे अशा मुलांना सायकल, व्हील चेअर, कर्ण यंत्र, वगैरे आम्ही देतो, परंतु ही जी

अपंग मुले आहेत त्याच्या मातापित्यांना आणि बहिण भावांना समुपदेशन करण्याची आवश्यकता असते, हा बालमित्र प्रकल्प हा माझ्या मते युनिसेफच्या माहितीनुसार भारतातील पाहिले शहर हे उल्हासनगर आहे व या पध्दतीने यशदा बरोबर सामज्यंस करार करुन तीन चार वर्ष चालणारा हा प्रकल्प आहे, पहिल्या वर्षी हि पाच बालसुविधा केंद्र प्रत्येक कॅम्पातील झोपडपट्टीमध्ये चालु करण्याची तरतुद या योजनेमध्ये आम्ही ठेवली आहे,

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी:—</u> या वर्षापासुनच ठेवणार आहेत का? व यासाठी जो वित्तीय खर्च येणार आहे तो महानगरपालिका करेल का युनिसेफ करेल?

<u>श्री. समीर उन्हाळे, आयुक्त:—</u> महापालिका दिडशे कोटी दर वर्षी वेगवेगळया कराच्या रुपाने गोळा करत असताना मुलांसाठी पाच दहा लाख खर्च करणार नाही का?

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ४:— उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात बालमित्र शहर प्रकल्प राबविण्यास मान्यता देणे.**

---

<u>**प्रस्तावना**</u>

यशदा, पुणे यांचेकडून बाल मित्रत्व शहर हा प्रकल्प राबविणेचा प्रस्ताव महानगरपालिकेस प्राप्त झालेला आहे. सदर प्रकल्पाची संकल्पना बालकांना त्यांच्या हक्कानुसार सोयी सुविधा निर्माण करुन त्यांचे जीवनमान उंचावणे आणि भविष्यासाठी सुदृढ समाज तयार करणे अशी आहे. सदर प्रकल्पात खालील बाबींचा समावेश आहे.

*प्रकल्प का राबविणे*

- भारतीय राज्यघटनेनुसार प्रत्येक बालकांच्या सर्वांगिण विकासाची जबाबदारी
- बाल हक्क संहितेची (चाईल्ड राईट कन्वेन्शन) यांची अंमलबजावणी करणे.

*बाल हक्कांपासून बालक वंचित राहिल्यास*

- कुपोषण
- स्त्री – भ्रुण हत्या
- बालकामगार
- शारिरिक, मानसिक व लैंगिक शोषणाचे बळी व यातून विकृती
- व्यसनाधीनतेमध्ये वाढ
- शाळा बाहय बालकांचे वाढते प्रमाण
- बालगुन्हेगारी मध्ये वाढ

*योजनेची ध्येय*

- बालकांच्या हक्कांनुसार वय वर्षे ० ते १८ वयोगटातील सर्व बालकांना त्यांच्या सर्वांगिण उन्नतीसाठी सुरक्षित, पोषक, आनंदपुर्ण वातावरण निर्माण करणे व विकासासाठी समानसंधी उपलब्ध करुन देणे.

*योजनेची उददीष्टे*

- शहरातील समस्याग्रस्त मुले व मुलींना गरजेनुसार अत्यावश्यक सेवा पुरविणे
- बालकामगारांना त्यांच्या कामाच्या ठिकाणापासून मुक्त करुन नियमित शाळेमध्ये दाखल करणे/विशेष वर्ग सुरु करणे.

- मुलांमध्ये जीवन कौशल्य व व्यावसायिक कौशल्य विकसित करणे.
- शारिरिक व मानसिकदृष्टया विकलांग बालकांना प्राप्त परिस्थितीशी समायोजन करण्यास सक्षम बनविणे.
- मुलांचे हक्क अबाधित राहण्यासाठी जनतेमध्ये जनजागृती करणे.

*प्रकल्पांतर्गत प्रस्तावित कृती कार्यक्रम*

A) बाल सुविधा केंद्र

B) वात्सल्य गृह

C) चाईल्ड लाईन (आपत्कालीन दुरध्वनी सेवा)

D) विशेष गरजा असणा—या बालकांसाठी 'निर्धार केंद्र'

E) जीवन कौशल्य वर्ग

**A) बालसुविधा केंद्र**

प्रत्येक वस्ती पातळीवर एक बाल सुविधा केंद्र सुरु करणे. या केंद्रांतर्गत बाल हक्कानुसार खालील उपक्रम राबविणे

*<u>बालसुविधा केंद्राची वैशिष्टे :—</u>*

- सर्वांना लसीकरण व संदर्भ सेवा
- लेक वाचवा अभियान
- ०५ ते ०८ वर्षे वयोगटातील सर्व मुलांना नियमित शाळेमध्ये दाखल करणे.
- अभ्यासिका चालविणे
- शाळा बाहय मुलांसाठी पर्यायी शिक्षण केंद्र सुरु करणे.
- मुलांसाठी समुपदेशन सुरु करणे.
- आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करणे.
- व्यसन मुक्तीसाठी समुपदेशन केंद्र चालविणे.
- पुढील उपचारासाठी सुविधा उपलब्ध करुन देणे.
- ग्रंथालय सुरु करणे.
- इंग्रजी संभाषण वर्ग चालविणे.
- किशोरवयीन मुलींचे किशोरी विकास गट वर्ग चालविणे.
- संगणक वर्ग
- बालसुविधा केंद्राच्या माध्यमातून खेळाचे उपक्रम आयोजित करणे
- सहलींचे आयोजन करणे.
- वस्ती पातळीवर मुलांची 'बालपंचायत' स्थापन करणे.
- प्रकल्पांतर्गत नेमणूक करण्यात आलेल्या प्रकल्प समन्वयेक व स्वयंसेवक व शिक्षकांचे क्षमतावृध्दी, प्रशिक्षकांचे प्रशिक्षण व सचेतना कार्यक्रम/ कार्यशाळा आयोजित करणे
- प्रकल्प नियोजन व अंमलबजावणीसाठी सर्वप्रकारचे तांत्रिक सहाय्य व मार्गदर्शन करणे.
- प्रकल्पाशी संबंधित प्रशिक्षण मॉडयूल्स व इतर साहित्याची निर्मिती करणे.
- प्रकल्प सनियंत्रणासाठी कार्यपध्दती निश्चित करणे.
- प्रकल्पाचे मुल्यमापन करणे.
- प्रकल्पातील विविध कृती कार्यक्रमांचे प्रलेखन करणे.
- लाभार्थी अनुधावन पध्दती विकसित करणे.
- किशोरवयीन मुलींचे 'किशोर विकास गट' वर्ग चालविणे.

- विविध खेळ, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणे.
- १४ ते १८ वर्षे वयोगटातील बालकांना एस.डी.आय. तर्फे व्यावसायिक प्रशिक्षण देणे.

**B)** वात्सल्य गृह

**बाल हक्क: पिळवणूकीपासून संरक्षणाचा हक्क**

अनाथ, रस्त्यावरील बेघर, मुलं, यांच्यासाठी वात्सल्य गृह सुरु करणे.

**वात्सल्य गृहातील अपेक्षित सुविधा –**

- भोजनाची सुविधा
- आंघोळसाठी स्नानगृह
- रहाण्यासाठी / झोपण्यासाठी सुरक्षित निवारा
- व्यक्तीगत साहित्य सुरक्षित ठेवण्यासाठी पेटी / लॉकर इ.

**C)** *चाईल्ड लाईन (दुरध्वनी सेवा)*

बाल हक्क

कोणत्याही बालकाने दुरध्वनी व्दारे संपर्क साधून मदत मागितल्यास सहाय्य करणे.

- संरक्षणाची गरज असलेली मुले, वैफल्यग्रस्त दुर्लक्षित मुले, हरविलेली, पळून गेलेली व आणलेली मुले, बालकामगार इ. सर्व प्रकारच्या मुलांना तात्काळ मदत पुरविणे.
- महानगरपालिकेने जाहिर केलेल्या दुरध्वनी क्रमांकावर मुलांनी संपर्क साधल्यास त्यांना सहाय्यक पुरविणे.

**D)** *जीवन कौशल्य प्रशिक्षण*

*विकासाचा हक्क*

*जीवन कौशल्य वर्गाव्दारे मुलांमध्ये विविध कौशल्ये वृध्दींगत करणे*

नियमित शाळेमध्ये शिकणा–या मुलांकरिता जीवन कौशल्याचे प्रशिक्षण देणे. खालील विषयांचा समावेश करणे.

- स्वत:ची ओळख
- संभाषण कौशल्ये
- नेतृत्व विकास
- निर्णय क्षमता विकसित करणे.
- शिष्टाचार
- समस्या निरसनचे कौशल्य विकसित

**E)** *निर्धार केंद्र*

शारिरिक व मानसिकदृष्टया अपंग मुलांकरिता अपंग एकात्मिक युनिट स्थापन करुन पुढील उपक्रम राबविणे.

- विविध आवश्यक साधने उपलब्ध करुन देणे (उदा. सायकल, व्हील चेअर, कर्ण यंत्र इ.)
- अपंग बालकांना शिक्षणाच्या सोयी व सुविधा प्राप्त करुन देणे.
- पालकांना समुपदेशन (कौउन्सलिंग) सेवा देणे.
- या बालकांच्या पालकांचे सहाय्यता गट (सपोर्ट ग्रुप) सुरु करणे.
- अपंग बालकांचे सांस्कृतिक कार्यक्रम, खेळ स्पर्धा आयोजित करणे.
- अपंग बालकांसाठी आरोग्य सुविधा प्राधान्यक्रमाने पुरविणे.

*बाल मित्रत्व शहर प्रकल्पातून महानगरपालिकेस खालीलप्रमाणे फायदा होईल.*

- महाराष्ट्रामध्ये बालकांच्या हक्कांबाबत जागृत एकमेव महानगरपालिका म्हणून गौरवाने पाहिले जाईल.
- शहरातील बालकांच्या निकोप व सर्वांगिण विकासासाठी महानगरपालिका कटीबध्द आहे हा संदेश सर्वापर्यंत पोहोचेल.

- शहरातील बालकांचे शारिरिक, मानसिक, बौध्दीक आरोग्य सुधारण्यास सहाय्य होईल.
- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सहाय्याने 'बाल मित्रत्व शहर प्रकल्प' राबविणा—या महानगरपालिका म्हणून इतरांसाठी एक आदर्श व मॉडेल ठरणार.

वरील प्राप्त प्रकल्प महानगरपालिका क्षेत्रात राबविल्यास निश्चितच उल्हासनगर 'बाल मित्रत्व शहर' म्हणून ओळखले जाईल. तरी सदर प्रकल्प राबविण्यासाठी व यशदा, पुणे या संस्थेबरोबर महानगरपालिकेस सामज्यंस करार करणे यासाठी मा. आयुक्त यांना प्राधिकृत करणे या करीता मा. महासभेची मंजुरी मिळावी, निर्णयार्थ सादर.

महासभा ठराव क्र: ७ दिनांकः— १९/६/२००९

सुचकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :— श्री. मोहन साधवानी

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात बालमित्र शहर प्रकल्प राबविण्यास मान्यता व यशदा पुणे या संस्थेबरोबर सामजंस्य करार करणेस आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ५ :—** मुंबई महानगर क्षेत्रात कचरा विल्हेवाटीसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे ''सामाईक भरावभुमी'' विकसित करणे कामी उल्हासनगर महानगरपालिकेची सहमती व सहभाग मान्य करणे.

---

सदस्य श्री. धनजंय बोडारेः— यामध्ये दोन पर्याय दिलेले आहेत, प्रशासनाकडुन गोषवारा आला आहे, त्यामध्ये ''सामाईक भरावभुमीवर'' (कॉमन डम्पींग ग्राऊन्डवर) कचऱ्यांवर प्रक्रिया करुन शिल्लक राहिलेला कचरा हा ''सामाईक भरावभुमीवर'' (कॉमन डम्पींग ग्राऊन्डवर) पाठवायचा की संपुर्ण कचराच, प्रक्रिया तिथे करण्यासाठी पाठवायचा या दोन पर्यायापैकी महापालिकेच्या दृष्टीने फायदेशीर कुठला असेल हे स्पष्टपणे सांगावे.

श्री. समिर उन्हाळे, आयुक्तः— प्लॉट आपणाकडुन काढुण घेण्यात आले आणि पर्यायी जागेसाठी मागणी आपण शासनाकडे केलेली आहे, दरम्यान कल्याण आणि उल्हासनगर हा मुंबई महानगर विकास प्राधिकरणाच्या क्षेत्रातील नैऋत्य कडील जो भाग आहे त्यामध्ये प्रत्येक महानगरपालिकेने वेगवेगळया सुविधा निर्माण करण्याचा प्रयत्न केला तर त्यासाठी जागा मिळण्याची अडचण होईल. त्यासाठी मुंबई मेट्रोपॉलिटन रिजन हे प्लॅनिग अॅथॉरिटी या नात्याने या संपुर्ण मुंबई परिसरात दहा ते अकरा जागा त्यांनी निवडलेल्या आहेत आणि त्यातील एक साइट उल्हासनगर व अंबरनाथ जवळची आहे, तर जर एकत्रिक हा प्रकल्प राहु शकला तर महानगरपालिकेला वेगळी संपुर्ण प्रक्रिया आणि ज्याकाही वैधानिक जबाबदाऱ्या आहेत त्यांच्यामधुन ''सामाईक

भरावभुमी'' हा प्रकल्प महापालिकेला कमी खर्चीक पडु शकतो त्यामुळे त्याची शिफारस करण्यास माझ्या मनात काही दुमत नाही की संपुर्ण ''सामाईक भरावभुमी'' मध्ये महापालिकेने सामील झाले तर चांगले आहे, आम्ही मुद्दामहुन महासभेपुढे ठेवले आहे, ''वैयक्तीक भरावभुमी'' पेक्षा ''सामाईक भरावभुमी'' मुळे आर्थिक दृष्टया फायदेशीर आहे, स्थानिक स्तरांवर दैनदिन निर्माण होणाऱ्या संपुर्ण प्रक्रिया तसेच प्रक्रियेनंतरची उर्वरीत कचऱ्यांची संपुर्ण जबाबदारी सामाईक भरावभुमीवर असणार आहे आणि हे आपल्या फायदयाचे ठरु शकते.

**<u>काही सदस्य :—</u>** पर्याय नंबर दोन निवडुन हा प्रस्ताव पारित करावा.

**<u>महापौर :—</u>** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ५:—** मुंबई महानगर क्षेत्रात कचरा विल्हेवाटीसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे ''सामाईक भरावभुमी'' विकसित करणे कामी उल्हासनगर महानगरपालिकेची सहमती व सहभाग मान्य करणे.

<u>प्रस्तावना</u>

शहरात व नागरी भागात निर्माण होणा—या कच—याची विल्हेवाट लावणे ही एक मोठी समस्या आहे व त्यात बहुतांश स्थानिक स्वराज्य संस्थाना स्थानिक व भौगोलिक कारणांमुळे त्यावर उपाय योजना करणे जवळ जवळ अशक्य झालेले आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी प्रकरणे न्यायालयात दाखल झालेली आहेत. तर दुस—या बाजूस केलेल्या कार्यवाहीबाबत नागरीक असंतुष्ट आहेत. हया जटिल प्रश्नावर काहितरी योग्य उपाय योजना आखणे व त्यावर कायमचा तोडगा काढणे हया एकमेव उद्देशाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने लक्ष घालण्यास सुरुवात केली आहे व ठोस पावले देखील उचलली आहेत.

हया विषयावरची पूर्वभूमिका व उदिष्ट ''अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेच्या'' दिनांक ४/४/२००८ च्या कार्यशाळेत विविध दृष्टीने चर्चेस आली होती व असे ठरविण्यात आले होते की ''सामाईक भरावभूमी'' विकसीत करणे हा एकमेव पर्याय आहे. त्या दिशेने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने ठोस कार्यवाही करावी व हया स्तुत्य प्रकल्पाला अग्रक्रम द्यावा.

सदर पत्रानुसार या योजनेला मूर्त स्वरुप देण्याचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणा मार्फत सुरु झाले आहे व त्यासाठी सर्व महानगरपालिका / नगरपारिषदांचा सहभाग व सहमती असणे महत्त्वाचे आहे. जेणे करुन हया योजनाचा काटेकोरपणे विविध अभ्यास करुन उपाययोजना करणे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला शक्य होईल.

सदर प्रकरणी कार्यवाही करण्यापुर्वी खाली मुद्दे विचारात घेणे आवश्यक आहे.

१.''सामाईक भरावभूमी'' ही प्रादेशिक स्तरावर निर्माण करण्यात येणार असल्याने त्याच्या वापरावर सर्व सहभागी होणा—या स्थानिक स्वराज्य संस्थांचा हक्क अबधित राहिल.

२. भरावभूमीची उभारणी, प्रचलन, देखभाल हया सर्वावरील खर्चाची विभागणी सहभागी तत्वावर असेल व कचरा विल्हेवाटीच्या समप्रमाणात सहभागी स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यासाठी आकार ावा लागणार आहे. परंतु त्याबाबतची आकडेवारी निश्चित झाल्यावर त्यावर विचार करण्यात येईल.

३. संबंधीत सहभागी होणा—या स्थानिक स्वराज्य संस्थानी खालील नमुद केलेले पर्याय निवडून त्यापैकी योग्य एका पर्यायावर सहमती देणे आवश्यक आहे. जेणे करुन तयार करणे सोईचे होईल.

पर्याय १:— स्थानिक स्तरावर दैनंदिन कच—यावर प्रक्रीया करण्याची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थाची राहील. कचरा प्रक्रीयेतून उर्वरित निष्क्रीय कचरा सामाईक भरावभूमीत विल्हेवाटीसाठी पाठविला जाईल.

अथवा

पर्याय २:— स्थानिक स्तरावर दैनंदिन निर्माण होणा—या संपूर्ण कच—यावर प्रक्रीया तसेच प्रक्रीयेनंतरची उर्वरीत कच—याची संपूर्ण जबाबदारी ''सामाईक भरावभूमी'' येथेच पार पाडली जाईल.

विस्तारित माहितीच्या आधारावर ''भरावभूमी विकास'' टप्याटप्याने करण्यात येणार आहे व आता स्थानिक स्वराज्य संस्थेकडून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने घेतलेल्या मोहिमेत सहभागी होण्यासाठी वरील पैकी कोणताही एक पर्याय निवडून सहमीत देणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच सदर ठिकाणी कच—यापासून खत/विज निर्मीती प्रकल्प राबविण्याचा मानस आहे.
मुंबई महानगर प्रदेश विकास प्रधिकरण हाती घेतलेल्या योजनेस उल्हासनगर महानगरपालिकेचा सहभाग होण्यासंबधीची सहमती १ महिन्याचे आंत कळविणे आवश्यक आहे.
सदरचा विषय धोरणात्मक स्वरुपाचा असल्याने सदर विषय धोरणात्मक निणर्यासाठी मा. महासभेत सविनय सादर करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ८ दिनांकः— १९/६/२००९

सुचकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजु जग्यासी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे मुंबई महानगर क्षेत्रात कचरा विल्हेवाटीसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे ''सामाईक भरावभुमी'' विकसित करणे कामी उल्हासनगर महानगरपालिकेची सहमती व सहभाग मान्य करीत आहे.

परंतु,

स्थानिक स्तरावर दैनंदिन निर्माण होणा—या संपूर्ण कच—यावर प्रक्रीया तसेच प्रक्रीयेनंतरची उर्वरीत कच—याची संपूर्ण जबाबदारी ''सामाईक भरावभूमी'' येथेच पार पाडली जाईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

त्यावेळी सदस्य श्री. अकुंश म्हस्के, श्री. नरेंद्रकुमार ठाकुर, श्री. संजय भठिजा, हे सभागृहातुन बाहेर गेले.

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ६** :— श्री. पंचम विश्वकर्मा, लिपिक यांच्या विरुध्द दाखल केलेल्या गुन्हयामध्ये न्यायालयाने दोषमुक्त केल्याने त्यांना महापालिका सेवेत पुनर्स्थापित करणे.

---

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑ **विषय क्र. ६:—** श्री. पंचम विश्वकर्मा, लिपिक यांच्या विरुध्द दाखल केलेल्या गुन्हयामध्ये न्यायालयाने दोषमुक्त केल्याने त्यांना महापालिका सेवेत पुनर्स्थापित करणे.

<u>प्रस्तावना</u>

श्री. पंचम विश्वकर्मा यांना वरीष्ठ पोलिस निरिक्षक, मध्यवर्ती पोलिस ठाणे यांनी जा. क्र. १८४१/२००२ दि. ८/४/२००२ पत्रामध्से कळविलेनुसार कार्यालयाकडिल क्र. उमपा/साप्रवि/आस्था /टे. ५/१६/०२ दिनांक १० मे,२००२ च्या आदेशान्वये निलंबित करणेत आले आहे.

मा. विशेष सत्र न्यायालयानें संबंधित प्रकरण क्र. ४६२/०२ विषयक दिंनाक ९ मे. २००२ रोजी श्री. पंचम विश्वकर्मा यांचेविरूध्द दाखल केलेल्या गुन्हयामध्ये ***४६५ए४६८ए४२०ए४७१ॄ*** अन्वये ठेवण्यात आलेल्या दोषारांपातुन दिनांक ९/४/२००९ रोजी दोषमुक्तीचा निर्णय दिला आहे.

श्री. पंचम विश्वकर्मा, यांना सद्यस्थितीत ७५ : निर्वाह भत्ता मिळत आहे. मा. न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार श्री. पंचम विश्वकर्मा, प्रतिवादी क्रमांक २ यांना दोषमुक्त करण्यात आले असल्याने त्यांना सेवेत पुर्नस्थापित करून महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी स्वियेत्तर सेवा, आणि निलंबन, बडतर्फी, सेवेतुन काढुन टाकणे यांच्या काळातील प्रदाणे) नियम १९८१ चे नियम ७१ चें पोटनियम ३ मधील तरतुदीनुसार त्यांचा निलंबन कालावधी हा सेवाकाळ धरून त्यांच्याविरूध्द कारवाई झाली नसती तर जेवढा पगार व भत्ता मिळण्यात ते पात्र राहिले असते तेवढा पगार व भत्ता त्यांना अनुज्ञेय राहील.

सबब. श्री. पंचम विश्वकर्मा, लिपिक (निलंबित) यांना सेवेत पुर्नस्थापित करणेचा प्रस्ताव प्राधिकारी मा. महासभा असल्याने मान्यतेसाठी मा. महासभेपुढे सादर करणेत येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ९ दिनांक:— १९/६/२००९

सुचकाचे नाव :— श्री. गोविंदराम लुंड

अनुमोदकाचे नाव :— श्री. जे.के. ढोके

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. पंचम विश्वकर्मा, लिपिक यांच्या विरुध्द दाखल केलेल्या गुन्हयामधील भारतीय दंडसहितेच्या कलम ***४६५ए४६८ए४२०ए४७१ॄ*** अन्वये ठेवण्यात आलेल्या दोषारोपात विशेष सत्र न्यायालयाने दिंनाक ९/४/२००९ दोषमुक्तीचा निर्णय दिल्याने त्यांना महापालिका सेवेत पुनर्स्थापित करणे व त्यांचा निलंबन कालावधी हा सेवा कालावधी धरुन अनुज्ञेय असलेले वेतन व भत्ते इत्यादी अनुंषगिक लाभ देणे मान्य करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

———————————————————————————————————————

**विषय क्र. ७** :— उल्हासनगर शहरात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाद्वारे जी शौचालय बांधण्यात आली आहेत त्यावर जाहिरात देण्यासाठी जाहिरातीचा हक्क मुंबई महानगर विकास प्राधिकरणास देणेस मान्य करणे.

---

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ७**:— उल्हासनगर शहरात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाद्वारे जी शौचालय बांधण्यात आली आहेत त्यावर जाहिरात देण्यासाठी जाहिरातीचा हक्क मुंबई महानगर विकास प्राधिकरणास देणेस मान्य करणे.

प्रस्तावना

मुबंई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत उल्हासनगर शहरात निर्मल एम.एम.आर.अभियान गलिच्छवस्ती/झोपडपट्टीतील नागरीकांच्या आरोग्याचा स्तर उंचावणारा लोकाभिमुख असा कार्यक्रम फेब्रुवारी २००८ पासून राबविण्यात येत आहे. सदर कार्यक्रमांतर्गत उल्हासनगर कार्यक्षेत्रात बहुतांश स्वच्छतागृहांची बांधकामे पूर्ण झाली असून त्यांचा वापरही सुरु केला आहे. तसेच अंतिम टप्प्यातील बांधकामे सुरु असून ऑक्टोंबर २००९ पर्यंत पूर्ण होणार आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाव्दारे अनेक मोठमोठया प्रकल्पाच्या माध्यमातून नागरीकांसाठी पायाभूत सोईसुविधा उपलब्ध करुन देत असल्याने त्यासाठी खर्चही मोठया प्रमाणात करत असते, असे प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर त्यावर झालेला खर्च वसूल करणेबाबत शासन निर्णय क्र.एमयुआय ३४०३/प्र.क्र. ६५/नवि—१० मंत्रालय, मुंबई दिनांक ०१/११/२००३ च्या आदेशामध्ये नमुद केले आहे.

त्याअनुषंगाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने उल्हासनगर शहरात राबविलेला निर्मल एम.एम. आर.अभियान हा महत्वकांक्षी कार्यक्रमासाठी अनुदान म्हणून जो खर्च होणार त्यामधून काही प्रमाणात तो खर्च शासनाच्या २००३ च्या मार्गदर्शक सुचनांनुसार वसुल झाल्यास अन्य योजनांसाठी तो वापरता येईल. या प्रयोजनार्थ उल्हासनगर शहरात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाव्दारे जी शौचालये बांधण्यात आली आहेत त्यावर जाहिरात देण्यासाठी जाहिरातीचा हक्क मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास देण्याचे मा. महानगर आयुक्त यांनी संदर्भिय पत्रानुसार कळविले असल्याने सदर जाहिरातीचा हक्क मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास देण्याकरीता मा.महासभेची मंजूरी घेणे आवश्यक असल्याने महासभेपुढे ठेवणेस प्रस्तावित.

महासभा ठराव क्र: १० दिनांक:— १९/६/२००९

सुचकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजु जग्यासी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर शहरात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाद्वारे बांधण्यात आलेल्या शौचालयांवर जाहिरात देण्यासाठी जाहिरातीचा हक्क मुंबई महानगर विकास प्राधिकरणास देणे मान्य करित आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी

सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ८ :—** उल्हासनगर शहराची विशेष सुधारीत विकास योजना तयार करणे व याकामी सहा. संचालक नगररचना यांची नगररचना अधिकारी म्हणुन नेमणुक करणे.

---

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ विषय क्र. ८:— उल्हासनगर शहराची विशेष सुधारीत विकास योजना तयार करणे व याकामी सहा. संचालक नगररचना यांची नगररचना अधिकारी म्हणुन नेमणुक करणे.

<u>प्रस्तावना</u>

ाासनाकडील नगर विकास विभागाकडील अधिसुचना क्र.टि पी एस्.१२०२/सी आर—८३/२००२/ओडी—१२, दि. २६ ऑक्टोंबर २००४ नुसार ाासनाने महारा ट्र प्रादेशीक व नगररचना अधिनियम १९६६ चे अधिकारानुसार उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्र 'उल्हासनगर, अंबरनाथ, कुळगांव—बदलापुर आणि परिसर अधिसुचित क्षेत्र' यातुन वगळणेचा निर्णय घेतलेला आहे व परीणामी उल्हासनगर महानगरपालिका आपल्या क्षेत्रासाठी उक्त अधिनियमानुसार 'नियोजन प्राधिकरण' आहे.

सुधारीत विकास योजना तयार करणेसाठी महारा ट्र प्रादेशीक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २३ नुसार विकास योजना तयार करणेसाठी इरादा जाहीर करणारा महासभा ठराव क्र. ७२, दि.७/३/२००५ पारीत करण्यात आला आहे. तसेच कलम २४ नुसार नगर रचना अधिकारीची नियुक्ती करणेसाठी महासभा ठराव क्र.७२, दि.७/३/२००५ अन्वये मंजुरी मिळालेली आहे.

याकामी सुधारीत विकास योजना तयार करणेसाठी जाहीर करण्यात आलेला इरादा ाासनास सादर करणे व राज्य ाासनाच्या नगर रचना व मुल्य निर्धारण विभागाच्या सेवेतील उपसंचालक किंवा सहाय्यक संचालक दर्जाच्या अधिकाऱ्याची उल्हासनगर ाहर सुधारीत विकास योजना तयार करणेसाठी नगररचना अधिकारी म्हणुन नेमणुक करणेसाठी वरील संर्वगातील 'वास्तुतज्ञ व नगररचना' या वि ायातील उच्च पात्रताधारक अधिकाऱ्याची नगररचना अधिकारी म्हणुन नियुक्ती करणेसाठी ाासनास विनंती केलेली होती.

नुकतीच ाासनाने जानेवारी २००९ मध्ये उल्हासनगर महानगरपालिकेला प्रथम एका व ार्च्या प्रतिनियुक्तवर ''सहाय्यक संचालक नगर रचना'' हयांची नव्याने पद निर्माण करून सहाय्यक संचालक नगर रचनाचे पद भरलेले आहे.

सबब उल्हासनगर ाहराची सुधारीत विकास योजना तयार करणेकामी ''नगर रचना अधिकारी'' म्हणुन नव्याने उल्हासनगर महानगरपालिकेला दिलेल्या ''सहाय्यक संचालक नगर रचना'' यांची महारा ट्र प्रादेशीक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २४ अन्वये 'नगर रचना अधिकारी' म्हणुन नेमणुक करण्यासाठी सदरहु बाब मा. सर्वसाधारण सभेपुढे मान्यतेसाठी ठेवण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ११ दिनांक:– १९/६/२००९

सुचकाचे नाव :–श्री. जीवन इदनानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. गोविदंराम लुंड

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर शहराची विशेष सुधारीत विकास योजना तयार करणेस व याकामी सहा. संचालक नगररचना यांची नगररचना अधिकारी म्हणुन नेमणुक करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. ९ :– उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील अनाधिकृत बांधकामे नियंत्रीत करण्यासाठी पोलिस दलासह स्वतंत्र पोलिस स्थानक व विशेष न्यायालय स्थापन करण्यास मान्यता देणे.

---

<u>काही सदस्य :–</u>हा विषय या सभेच्या कामकाजातुन वगळण्यात यावा.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे:–</u> हा विषय या सभेच्या कामकाजातुन वगळण्यात यावा. पुढच्या सभेत बघु.

<u>सदस्य श्री. रविद्रं बागुल:–</u> सचिव साहेब, हा विषय या सभेच्या कामकाजातुन का वगळत आहात? यामध्ये विशेष काय आहे?

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे:–</u> यांच्यासाठी आपल्याला भरपुर काही विचार करायचा आहे? याच्यासाठी येणारा जो खर्च आहे? त्याच्यासाठी वेगळे दालन लागणार आहे, भरपुर खर्च येणार आहे.

<u>सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी(सोंडे):–</u> महिन्याला चार लाखा पेक्षा जास्त खर्च दाखविला आहे,

<u>सदस्य श्री. रविद्रं बागुल:–</u> आता आपणांस खर्च लागत नाही का?

<u>सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी(सोंडे):–</u> नाही.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे:–</u> आता आपल्याला खर्च लागत नाही.

<u>सदस्य श्री. रविद्रं बागुल:–</u> हे सगळे फुकट होते?

**सदस्य श्री. प्रशांत धांडे:—** होय, आपण काही खर्च  देत नाही, कायद्याच्या तरतुदी नुसार कोणताही खर्च देत नाही. आपण स्वतत्र पोलिस दलासह पोलिस स्थानक निर्माण केले तर आपल्यावर फार मोठा आर्थिक बोझा पडणार आहे, म्हणुन तुम्ही हा प्रस्ताव शांतपणे घ्या.

**काही सदस्य :—**हा विषय या सभेच्या कामकाजातुन वगळण्यात यावा.

**महापालिका सचिव:—** हा विषय या सभेच्या कामकाजातुन वगळायचा? सर्व संमतीने?

सदस्या श्रीम. मालती करोतीया, कु. शंकुतला जग्यासी, श्रीम. लिलाबाई आशान हया सभागृहातुन बाहेर गेल्या

**काही सदस्य :—** होय.

**महापौर :—** सदरचा विषय या सभेच्या कामकाजातुन वगळण्याकामी सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ९:—** उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील अनाधिकृत बांधकामे नियंत्रीत करण्यासाठी पोलिस दलासह स्वतंत्र पोलिस स्थानक व विशेष न्यायालय स्थापन करण्यास मान्यता देणे.

प्रस्तावना

नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्ण क्र.कंडोमपा/प्र.क्र.१९२/०६/नवि—२८ दि. २/३/०९ अन्वये महापालिका क्षेत्रात होणारी अतिक्रमणे व अनधिकृत बांधकामे/ अतिक्रमणे नियंत्रण व निर्मुलनासाठी करावयाची जबाबदारी व कार्यपध्दती निश्चित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

उल्हासनगर महानगरपालिकेसाठी स्वतंत्र पोलिस दल व पोलिस स्थानक उभारणेसाठी ठराव करून प्रस्ताव शासनाकडे सादर करणेबाबत शासन निर्णयात नमुद केले आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेकडून सर्वसामान्य जनतेच्या दैनंदिन जीवनांशी निगडीत असलेल्या विविध बाबींसंदर्भात कामकाज शासनाकडून पारित करण्यात आलेले विविध कायदे, शासन निर्णय, आदेश, परिपत्रके यांच्या आधारे करण्यात येते. सदर कामकाज करीत असतांना अनेकदा सामाजिक तत्वांकडून नियमबाहय वर्तणूक करण्यात येऊन कामकाजास अडथळा निर्माण केला जातो. अशा वेळी खाली नमुद केलेल्या विविध कायद्यान्वये पोलिस स्थानकात फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येतो.
(१) महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५३, ५३ अन्वये विना परवानगी बांधकाम करणाऱ्याविरूध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येतो.

(२) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५७(१) अन्वये नियमबाहय बांधकाम करीत असलेल्या व्यक्तिस सदरचे बांधकाम थांबविणेचे आदेश दिले जातात व कलम २५७(२) अन्वये समक्ष अधिकाऱ्यामार्फत सदरचे बांधकाम होणार नाही याबाबत सर्वतोपरी उपाययोजना करणेबाबतचा प्रस्ताव संबंधीत पोलिस अधिकाऱ्यास पाठविण्यात येऊन सदरचे कामकाज होणार नाही याबाबतची कार्यवाही संबंधीत पोलिस स्थानकाच्या मदतीने करणे अभिप्रेत असते. त्याकरीता खालील नमुद कायद्यांतर्गत कारवाई केली जाऊ शकते.

अ) क्रिमीनल प्रोसिजर कोड १९७३ चे कलम १०७, १०९, ११० अन्वये कारवाई प्रस्तावित करणे.

ब) महाराष्ट्र झोपडपटटी दादा, हातभटटीवाले, औषधी द्रव्य विषयी गुन्हेगार व धोकादायक व्यक्ती यांचे विघातक कृत्यांना आळा घालणेबाबत अधिनियम १९८१ अन्वये विना परवाना झोपडया बांधणे, त्या विकणे असे कृत्य करणाऱ्या व्यक्तिंविरूध्द जिल्हाधिकारी / पोलिस आयुक्त यांचेपढे सादर करण्यात येणाऱ्या प्रकरणांबाबत निर्णय

घेतला जातो. याबाबत स्थानिक पोलिस स्थानकात विविध गुन्हयातील प्रस्ताव जिल्हाधिकारी / पोलीस आयुक्त यांचेकडे सादर केल्यानंतर त्यावर योग्य ते निर्णय घेऊन संबंधितांस न्यायालयीन कोठडीत टाकणेचे कारवाई सदर अधिनियमान्वये करण्यात येते.

क) हॅबिच्युअल ऑफेंडर्स ॲक्ट, १९६८.

ड) इंडियन पिनल कोड

इ) बॉम्बे पोलिस ॲक्ट

(३) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३७६(अ) अन्वये एखाद्या जागेचा वापर अथवा कोणतेही कृत्य सार्वजनिक आरोग्यास बाधा उत्पन्न करीत असल्याचे दिसून आल्यास सदर प्रकाराबाबत गुन्हा आरोग्य विभाग, परवाना विभाग इ. विभागाकडून दैनंदिन कामकाज पार पाडीत असतांना दाखल करण्यात येतो.

(४) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३३५ अन्वये विना परवाना शहरात गुरेढोरे यांची आयात करणाऱ्याविरूध्द उल्हासनगर महानगरपालिकेकडून वेळोवेळी फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येतो.

(५) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३९८ अन्वये उल्हासनगर महानगरपालिका हद्दीत आयात करण्यात आलेल्या मालावरील जकात चुकविणाऱ्याविरूध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येतो.

(६) मुंबई प्रांतिक महानगरपालिका (जाहिरात व फलक नियंत्रण) अधिनियम २००३ अन्वये विना परवानगी लावण्यात येणाऱ्या आकाश चिन्हे, जाहिराती व फलक लावणाऱ्यांविरूध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येतो.

(७) महाराष्ट्र प्लास्टीक पिशव्यांचे (कॅरी बॅग्ज) उत्पादन व वापर नियम २००६ अन्वये विहीत घनतेच्या व्यतिरिक्त प्लास्टीक पिशव्यांचा वापर करणाऱ्याविरूध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येतो.

(८) महाराष्ट्र मालमत्ता विरूपणास प्रतिबंध करणेकरीता अधिनियम १९९५ अन्वये मालमत्तेचे विरूपण करणाऱ्या विरूध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येतो.

(९) सार्वजनिक संपत्तीची हानी प्रतिबंध अधिनियम १९८४ अन्वये सार्वजनिक संपत्तीस हानी पोहचविणाऱ्यांविरूध्द संबंधीत पोलिस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात येतो.

उपरोक्त कायद्यान्वये उल्हासनगर महानगरपालिकेविरूध्द सदरच्या कायद्यांचा भंग करणाऱ्याविरूध्द विविध पोलिस स्थानकांमध्ये फौजदारी गुन्ह दाखल केले जातात. तथापि, संबंधीत पोलिस स्थानकांना त्यांचेकडे असलेल्या कार्यबाहुल्यामुळे सदरचे गुन्हे दाखल करून घेतल्यानंतर त्यांचा तपास करून संबंधिताविरूध्द मा. न्यायालयात दोषारोप दाखल करून त्यांचा पाठपुरावा करणे अत्यंत जिकीरीचे होते व न्यायालयीन प्रकरणामध्येही शिक्षचे प्रमाण कमी होत असल्याचे दिसून येते.

उल्हासनगर महानगरपालिकेकडून अनधिकृत बांधकामे होऊ नयेत यासाठी विशेष दक्षता घेण्यात येऊन झालेली अनधिकृत बांधकामे निष्कासित करणेकरिता विशेष मोहिम होती घेण्यात आलेली आहे. सदर मोहिमेअंतर्गत माहे **एप्रिल,०८ ते मार्च,०९** अखेर एकूण ५१७ अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात येऊन २८९ व्यक्तिंविरूध्द महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ अंतर्गत फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर प्रकरणांमध्येही शिक्षेचे प्रमाण अत्यल्प असल्याचे दिसुन येते. तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५७(२) अन्वये सदर अधिकृत बांधकाम सुरू राहणार नाही याबाबत सर्वतोपरी उपाययोजना करणेचे अधिकारी प्रभाग अधिकाऱ्यांस प्रदान करण्यात आलेले आहेत. याचा वापर करून संबंधीत पोलिस स्थानकांकडून अनधिकृत बांधकामे करणाऱ्या व्यक्तिना सदर परिसरात वावरण्यास मनाई करून त्यांच्या विरूध्द इतर कायद्यांद्वारे कारवाई प्रस्तावित करणे. इ. प्रतिबंधात्मक उपाययोजना केली जाऊ शकते. तथापि, पोलिस स्थानकांकडे असलेल्या कार्यबाहुल्यामुळे सदरचे कामकाज त्यांचेकडून करून घेणे महानगरपालिकेस अत्यंत जिकिरीचे होत आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेकडे वर उल्लेख केलेल्या विविध कायद्यान्वये संबंधीतांविरूध्द फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येत असतात. सदर सर्व गुन्हयांचा गुन्हे दाखल करणे, त्यांचा तपास करणे, प्रकरणी न्यायालयात दोषारोप दाखल करणे इत्यादी बाबींकरीता स्वतंत्र पोलिस स्थानक निर्माण केल्यास वर नमुद केलेले

गुन्हे सिध्द करणेस मदत होईल. तसेच भविष्यात अशा प्रकारच्या संभावणाऱ्या गुन्हयांनाही आळा घालणे सोयीचे होईल.

शासन निर्णयानुसार स्वतंत्र पोलिस ठाणे निर्माण करणेसाठी व त्यासाठी येणाऱ्या आवर्ती व अनावर्ती खर्चासाठी मा. महासभेचा ठराव प्राप्त करून घेऊन प्रस्ताव शासनाकडे पाठविणेचा आहे. पोलीस कर्मचारी वर्ग कायमस्वरूपी महापालिकेकडे उपलब्ध करून घेणेबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.

राज्यातील नागरी भागातील अनधिकृत बांधकाम / अतिक्रमण नियंत्रण व निर्मुलनासाठी विविध उपाय योजनांची अंमलबजावणी करण्याबाबत संदर्भाधिन शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आलेले सुचना नागरी पोलीस विशेष पोलीस ठाणे (विवरण अ, ब) मध्ये दर्शविलेल्या संभाव्य आकृतीबंध विचारात घेण्याबाबत या बाबत चा संभाव्य आकृतीबंध (विवरण अ, ब) सोबत जोडण्यात येत आहे.

## नागरी पोलीस यंत्रणा

संदर्भिय शासन निर्णयानुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ अंतर्गत अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणे इत्यादी गुन्हयांसाठी महापालिकेच्या स्तरावर ''नागरी पोलीस यंत्रणा'' उभारण्याकरिता नागरी पोलीसांची आवश्यक पदे महापालिकेच्या आस्थापनेवर निर्माण करुन अशा नागरी पोलीसांचा पूर्ण खर्च स्थायीरित्या उचलण्याची जबाबदारी स्विकारण्यासंबंधी महासभेत ठराव पारीत करुन तेवढे पोलीस कर्मचाऱ्यांची पदे शासनास कळविल्यानंतर शासनाकडील गृह विभागांतर्गत निर्माण करण्यात येतील व त्यावर पोलीसांच्या नियुक्त्या करुन नियीमत पोलीसांना प्रतिनियुक्तीवर ''नागरी पोलीस'' म्हणून नियुक्त करण्यात येईल.

सदर नागरी पोलीसांना मुंबई पोलीस अधिनियम १९५१ मधील कलम २१च्या तरतुदीनुसार सुध्दा प्राधिकृत करण्यात येईल. जेणेकरुन ते महानगरपालिका कायद्याखाली किंवा महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ खालील गुन्हयांची दखल घेऊन त्या संदर्भात कार्यवाही करताना नियमित पोलीसांसारखे कर्तव्यही बजावू शकतील.

परिशिष्ट अ

### अतिक्रमण निर्मुलन व अनधिकृत बांधकाम नियंत्रण इ. साठी महानगरपालिका स्तरावर प्रस्तावित नागरी पोलीस यंत्रणेसाठी आकृतीबंध

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी (असुधारित) | महानगरपालिका ड |
|---|---|---|---|
| १ | सहा.पोलीस आयुक्त/ पोलीस उपअधिक्षक | ८०००–२७५–१३५०० | १ |
| २ | पोलीस निरिक्षक | ७४५०–२२५–११५०० | १ |
| ३ | पोलीस उपनिरिक्षक | ५५००–१७५–९००० | ४ |
| ४ | पोलीस हवालदार | ४०००–१००–६००० | ४ |
| ५ | सशस्त्र पोलीस शिपाई | ३०५०–७५–४५९० | २४ |
| ६ | महिला पोलीस शिपाई | ३०५०–७५–४५९० | १६ |
| ७ | पोलीस नाईक/ वाहन चालक | ४०००–१००–६००० | ३ |
| | एकूण पदे | | ५३ |

### परिशिष्ट ब
### पोलीस स्टेशन – नमुना–२ (ड वर्ग महानगरपालिका क्षेत्रासाठी)

| अ. | पदनाम | वेतनश्रेणी (असुधारित) | महानगरपालिका |
|---|---|---|---|

| क्र. | | | ड |
|---|---|---|---|
| १ | सहाय्यक पोलीस निरिक्षक | ६५००—२००—१०५०० | १ |
| २ | पोलीस उप निरिक्षक | ५५००—१७५—९००० | १ |
| ३ | सहाय्यक पोलीस उपनिरिक्षक | ४५००—१२५—७००० | १ |
| ४ | पोलीस हवालदार (सशस्त्र) | ४०००—१००—६००० | ४ |
| ५ | पोलीस शिपाई (सशस्त्र) | ३०५०—७५—३९५०—८०—४५९० | ८ |
| ६ | कनिष्ठ लिपीक | ३०५०—७५—३९५०—८०—४५९० | १ |
| ७ | वाहन चालक | ४०००—१००—६००० | १ |
| | | एकूण | १७ |

## नागरी गुन्हयांसाठी स्वतंत्र न्याययंत्रणा

नागरी गुन्हयांच्या न्यायप्रविष्ट प्रकरणी न्यायदानाची कार्यवाही त्वरित व्हावी यासाठी महापालिकेच्या क्षेत्रात विशेष न्यायालय स्थापन करण्याविषयी संबधित महानगरपालिका यांचेकडून यासंबंधी पूर्ण खर्च स्थायीरित्या उचलण्याची जबाबदारी स्विकारण्यासंबंधी ठराव प्राप्त झाल्यानंतर विधी व न्याय विभागामार्फत मा. उच्च न्यायालयाच्या मंजूरीने महानगरपालिका कायद्याखालील किंवा महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ खालील गुन्हयांकरिता संबधित महानगरपालिकेच्या क्षेत्रात स्वतंत्र विशेष न्यायालय निर्माण करण्यात येईल. अशा विशेष न्यायालयासाठी येणा—या संपूर्ण आवर्ती/अनावर्ती खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी महानगरपालिकांनी त्यांच्या अर्थसंकल्पात स्वतंत्र लेखा शिर्षाखाली अर्थसंकल्पीय तरतूद करुन शासनाच्या निर्देशानुसार शासकीय तिजोरीत आवश्यक रक्कमेचा भरणा करणे आवश्यक राहील. यासाठी महासभेच्या मान्यतेची आवश्यकता आहे. महापालिकेकडून ठराव प्राप्त झाल्यानंतर नगर विकास विभागामार्फत आवश्यक प्रस्ताव विधी व न्याय विभागाकडे सादर केला जाईल व मा.उच्च न्यायालयाच्या मान्यतेने पुढील कार्यवाही विधी विभागाकडून करण्यात येईल. विषेश न्यायालय स्थापन करण्यासाठी प्रस्ताव करताना विवरण क मध्ये खालील प्रमाणे दर्शविलेल्यानुसार संभाव्य आकृतीबंध विचारात घेवायाचे आहेत.

## परिशिष्ट क

### न्यायालये — नमुना—२ (ड वर्ग महानगरपालिका क्षेत्रासाठी)

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या | वेतनश्रेणी (असुधारित) |
|---|---|---|---|
| १ | सह दिवाणी व फौजदारी न्यायाधीश (व.स्त.) | १ | १२८५०—३००—१३१५०—४००—१७५५० |
| २ | सहाय्यक अधिक्षक | १ | ५०००—१५०—८००० |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | लघुलेखक (नि. श्रे) | १ | ५५००—१७५—९००० |
| ४ | वरिष्ठ लिपीक | १ | ४०००—१००—६००० |
| ५ | कनिष्ठ लिपीक | २ | ३०५०—७५—३९५०—८०—४५९० |
| ६ | बेलिफ | १ | ३०५०—७५—३९५०—८०—४५९० |
| ७ | शिपाई | २ | २५५०—५५—२६६०—६०—३२०० |
| | एकूण | ९ | |

वरीलप्रमाणे विशेष पोलीस स्टेशन, नागरी पोलीस व विशेष न्यायालये अशी सर्व यंत्रणा निर्माण करणेकामी मान्यता मिळणेसाठी महासभा पटलावर प्रस्तावित.

महासभा ठराव क्र: ११ अ दिनांकः— १९/६/२००९

सुचकाचे नाव :— श्री. प्रशांत धांडे

अनुमोदकाचे नाव :— श्रीम. इंदिरा उदासी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील अनाधिकृत बांधकामे नियंत्रण व नागरी गुन्हयांसाठी पोलिस दलासह स्वतंत्र पोलिस स्थानक व स्वतंत्र न्याय यंत्रणा स्थापन करण्याचा प्रस्ताव सविस्तर माहिती अभावी आजच्या सभेच्या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. १० वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १० :—** राष्ट्रीय फेरीवाला धोरणानुसार उल्हासनगर शहरात फेरीवाला व्यवसायाचे प्रारुप विनियमास मान्यता देणे.

---

**सदस्य श्री.राजु जग्यासी:—** मा. महापौरजी या विषयाचे स्पष्टीकरण कोण करेल? या विषयाबाबत माहिती सर्व सदस्य जाणुन घेवुन इच्छितात.

**सदस्य श्री. बी.बी. मोरे:—** आयुक्त साहेबांनी या विषयाचे सविस्तरपणे स्पष्टीकरण करावे.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे:—** मा. महापौर महोदया, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, बऱ्याच दिवसांनतर उल्हासनगरला दिशा देणारा असा विषय महासभेत घेतल्याबद्दल महापौराचे अभिनंदन, उप—महापौरांचे कौतुक, कोणत्याही शहरामध्ये फिरत असताना रस्त्यावर जिकडे तिकडे फेरीवाले दिसतात, आज एक आहे, उद्या दोन, परवा चार होतील, बरेचसे असे रस्ते आहेत की तेथे नुसते फेरिवालेच आहेत. लोंकाना उपजीविकेचे साधन असले पाहिजे, परंतु ते करत असताना एकाला सुविधा आणि दुसऱ्यांला त्रास हे होता कामा नये. त्यासाठी नॅशनल हॉकींग पॉलिसी (राष्ट्रीय फेरीवाला धोरण) बऱ्याच वर्षापासुन या महासभेपुढे असा प्रस्ताव आलेला नव्हता. आणि तो या ठिकाणी आलेला आहे. मागच्या दोन तीन महिन्यापासुन सतत हा विषय येतो. व त्यावर चर्चा होत नव्हती, सोळा व सतरा जुन या दोन दिवसामध्ये या प्रस्तावावर सर्व राजकीय पक्षाचे गटनेते राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टीचे श्री. सतीश चहाळ, त्याचबरोबर आय.पी.आय चे गटनेते, कॉग्रेसचे गटनेते, शिवसेना, गंगाजल, भाजपा या सर्व पक्षाचे गटनेते बसले, त्या प्रस्तावावर विस्तुत चर्चा झाली, रोज कमावयचे आणि रोज खायचे अशा गरिब लोंकाचा हा पहिला विषय आहे. रोज कमविण्याऱ्या लोंकाची उपजिविका कशी चालावी? आणि ते करत असताना कुणाला त्रास होऊ नये यासाठी या विषयावर चर्चा झाली. आणि त्यावर प्रत्येकानी आपापल्या पक्षाच्या नगरसेवकानां सदर विषयाचे गांर्भीय आणि त्याचे महत्व पटवुन सांगावे अशी सुचना करण्यात आली, आणि त्यानुसार सर्वानी सांगितले असावे. या उल्हासनगरमध्ये स्थिर फेरीवाले, फिरते फेरीवाले आहेत. ना—फेरीवाला क्षेत्र घोषित करण्याचा हा विषय आहे, हे करत असताना नियमावली काय असली पाहिजे? एखादे धोरण जर आपण स्विकारले तर त्याची अमंलबजावणी कशी असणार? धोरणच जर असे आहे तर अमंलबजावणी कशी असणार? इतर शहरामध्ये फिरत्या फेरीवाल्यासदंर्भात जे धोरण आहे, त्याबाबतचे जे उपविधी आहेत ते आज आपण मंजुर करत आहोत. त्यामध्ये एकदम बारकाईने विचार केलेला आहे, म्हणुनच आपले कौतुक, फेरीवांल्यासंदर्भात केंद्रशासनाने धोरण जाहिर केले आहे. राज्यशासनाने जाहिर केले आहे आणि स्थानिक शासन म्हणुन आपण जाहिर करत आहोत. आमच्या गटनेत्यांच्या झालेल्या चर्चे नुसार माझी सूचना आहे की ही एक शहर समिती आहे, यामध्ये शहर समिती, प्रभाग समिती, तांत्रिक समिती आणि प्रत्येक क्षेत्रासाठी व्यवस्थापन समिती, व्यवस्थापन समितीने, महानगरपालिकेने ज्या क्षेत्रासाठी ज्या हॉक्र्सला ती जागा दिलेली आहे, मग ते हॉक्र्स फिरते असुदयात किंवा स्थिर असुदयात त्याचे व्यवस्थापन करायचे आहे, तेथे कचरा होवु नये, तेथे काही तंटा होवु नये ही त्यांची संपुर्ण जबाबदारी घ्यायची आहे. स्थिर फेरीवाले, फिरते फेरीवाले, किंवा कुठे नो हॉक्र्स झोन कसे करायचे ते तांत्रिक समितीने प्रभाग समितीला शिफारस करायचे, त्यांनतर प्रभाग समिती शहर समितीला शिफारस करेल आणि शहर समिती महासभेमध्ये आणेल. एवढया बारकाईने यांचा विचार केलेला आहे. शहर समितीमध्ये महापौर अध्यक्षा असतील, सदस्य सचिव म्हणुन उप—आयुक्त मालमत्ता हे असतील. तसेच प्रभाग समितीमध्ये प्रभाग अध्यक्ष किंवा प्रभाग समिती सभापती हे अध्यक्ष असतील आणि त्याठिकाणचा अधिकारी म्हणजे प्रभाग अधिकारी हा सदस्य सचिव असेल, यामध्ये पोलिस उप—आयुक्त, अशी काही नावे दिली आहेत, मला वाटते जवळजवळ चौदा लोंकाची नावे दिलेली आहेत, आणि त्याव्यतिरिक्त बरीशसे लोक आहेत, काही अशासकीय संस्था आहेत, ‘‘शहर समितीमध्ये सर्व पक्षांचे गटनेते आपण घ्यावेत,’’. पान नंबर एकवर उपविधी मध्ये सुधारणा करायची आहे, तर ते सर्व पक्षांचे गटनेते त्यामध्ये घ्यावेत ही माझी सूचना आहे. त्यानंतर अटी आणि शर्ती, मग त्या प्रभाग समितीच्या माध्यमातुन असु दया किंवा शहर समितीच्या माध्यमातुन, स्थिर फेरीवाला असुदया किंवा फिरते फेरीवाल असुदया अटी शर्ती मध्ये तो पंधरा वर्षाचा महाराष्ट्राचा रहिवाशी असला पाहिजे, त्याचप्रमाणे ‘‘तो उल्हासनगरचा रहिवाशी असला पाहिजे’’, हे त्यात नमुद करा, उल्हासनगरचा रहिवाशी, त्यानंतर स्थिर क्षेत्रामध्ये बचत गटाच्या बऱ्याचशा महिला, बचत गटाच्या माध्यमातुन काही निर्मीती करतात, व्यवसाय करतात तर या स्थिर गटामध्ये बचत गटाच्या महिलांना स्थान देता येईल का? ते हयाच्यामध्ये अर्तंभुत करता येईल का? किं बचत गटानांसुध्दा आपण या स्थिर क्षेत्रामध्ये काही चार बाय चार ची जागा दया, जी काही आपली ठरलेली असेल ती, तांत्रिक समिती किंवा प्रभाग समिती जी शिफारस करेल. त्यानुसार बचत गटानांसुध्दा आपण जागा देवु शकाल का? आता बचत गट, बरेसशे उद्योगधंदा व्यवसाय करु इच्छितात, निर्मीती करण्याची क्षमता त्याच्यामध्ये आहे परंतु मार्केट नाही, त्यासाठी पहिल्यापासून आमचा विचार होता की, बचत गटासाठी मार्केटींग भवन निर्माण करायचे, ते मला वाटते गोल मैदानच्या ठिकाणी केले आहे पण ते छोटया प्रमाणात आहे. उल्हासनगर मध्ये बचत गट भरपूर आहेत, गरिबी, दारिद्रता असल्यामुळे बचतगट जास्त आहेत. आणि त्यांना जर त्याचा दर्जा उचांवयाचा असेल, तर त्याना उद्योग व्यवसायामध्ये प्रोत्साहन देण्यासाठी अशा प्रकारचे मार्केट उपलब्ध करुन देणे हे आपले

काम आहे. ते गोल मैदानच्या ठिकाणी आपण करतोय परंतु त्याचबरोबर बचतगटांना या स्थिर क्षेत्रामध्ये सामावुन घेण्यासाठी या उपविधी मध्ये आपण तरतुद करावी अशी माझी विंनती आहे, ही सुधारणा त्यामध्ये करा. त्यानंतर स्थिर क्षेत्रामध्ये जे फुड प्लाझा, किंवा अन्न आणि मासळी विक्री म्हणजे तयार केलेले अन्न पदार्थ हे विक्री करताना फुड लायसन्स आहे का? फुड लायसन्स आपण देतो का? मग ते देण्याची प्रक्रिया सोपी केली पाहिजे. आणि फुड प्लाझा समजा गोल मैदानचा परिसर आहे. हा परिसर फक्त अन्न विक्रीसाठी ठेवला तर त्या ठिकाणच्या फेरीवाल्याना अन्न पदार्थ विक्रीसाठी फुड लायसन्स सोईस्कर रित्या आपण देवु शकु त्याची जबाबदारी आपण घेवुया. जर त्याना लिड बॅकेकडुन कर्ज देण्याची व्यवस्था आपण करतोय, किंवा आपण त्यानां सर्व सुविधा देतोय तर हि सुविधा सुध्दा कशी देता येईल ते पहा. आणि हे धोरण लवकरात लवकर ठरवुन जी शहर समिती आहे , प्रभाग समिती आहे, तात्रिक समिती आहे त्याची रचना लवकरात लवकर करा अशी माझी विनंती आहे, हा चांगला विषय आहे, आपल्या शहराला दिशा देता येईल. लोकांना उपजीवीकेचे साधन देताना इतर पाच लाख लोंकाची गैरसोय होणार नाही. वाहतुकीस अडथळा होणार नाही, अशा दृष्टीकोनातुन आपण सर्वानी उचलेले चांगले पाऊल आहे, आपण सर्वांनी सहकार्य करावे, आणि बिनविरोध हा प्रस्ताव मंजुर करावा अशी माझी विंनती आहे. जय हिंद, जय महाराष्ट्र.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u> मा. आयुक्त साहेब, हा जो विषय आलेला आहे राष्ट्रीय फेरीवाला धोरण या बाबत आम्ही जो ठराव पारीत करत आहोत. त्याबाबतीत श्री. बोडारे साहेबानी काही सूचना केल्या आहेत त्याप्रमाणे मी ही एक सूचना करु इच्छितो, की ज्याप्रकारे दुकानदार, दुकानाच्या बाहेर माल लावतात आणि त्यांनतर फेरीवाले बसतात, त्यामुळे वाहतुकीची कोंडी होते, मी आमचे अतिरिक्त आयुक्त श्री. रणखांब यांचे हार्दिक अभिंनदन करतो, या विषयाबाबत गटनेत्याची जी बैठक होती, त्याबैठकीत या विषयावर चर्चा चालु असताना एक विषय आला होता की, नेहरु चौकापासुन ते शिरु चौकापर्यंत पुर्ण नेहरु चौक परिसर व नेहरु चौक ते गोल मैदानापर्यंत बारा बारा पधंरा पधंरा फुटापर्यंत दुकानदार बाहेर माल लावतात. अतिरिक्त आयुक्त श्री. रणखांब यानी नियंत्रीत आणले. महानगरपालिकेमध्ये असे पहिल्यादांच झाले आहे त्यामुळे वाहतुकीची कोडी सोडविण्यासाठी मदत झाली, त्याबद्‌दल त्यांचे आम्ही अभिंनदन करतो. व त्याचप्रमाणे बोडारे साहेबानी शहर समितीमध्ये गटनेत्याचा समावेश केला पाहिजे, व फेरीवाल्याकडे महाराष्ट्रात पंधरा वर्ष रहिवासाचा दाखल असल्याचा व उल्हासनगरचा पाच वर्षाचा दाखला असला पाहिजे यासर्व बाबीचा समावेश करुन हा विषय पारित केला पाहिजे.

<u>सदस्य श्री. रवि बागुल:—</u> सन्मा. आयुक्त साहेब, फेरीवाल्यासदर्भात आणि ना—हॉकर्स झोन सदंर्भात श्री. जमनादास पुरस्वानी यांनी जो मुद्‌दा माडंला आहे, त्याबद्‌दल साहेबाचे अभिनंदन करतो, नेहरु चौक आणि शिरु चौक येथीलच रस्ते आपणांस दिसतात का? शहाड फाटकचा एवढा मोठा रस्ता आहे, त्याबाबतील कित्येक वेळा तक्रारी केल्या आहेत.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे:—</u> गुलशन नगर सुध्दा आहे.

<u>सदस्य श्री. रवि बागुल:—</u> गुलशन नगर लाबं आहे, गुलशन नगरचा काही सबंध नाही. साहेब, नेहरु चौक आणि शिरु चौकसाठी व्ही.आय.पी टिटमेन्ट देता? श्री जमनु पुरस्वानी यांनी सांगितले, तसेच मी स्वत: पाहिले आहे की नेहरु चौक आणि शिरु चौक याठिकाणी महानगरपालिकेची गाडी उभी राहते, अशी जागा आहे स्टेशनमधुन बाहेर निघाल्यानंतर शहाड फाटक रस्त्यावर महिलांना चालण्यासाठी सुध्दा जागा मिळत नाही. भाजीमार्केट वाल्या लोकांनी एवढी हालत बेकार केली आहे की विचारता सोय नाही. त्यांना व्यवसाय करण्यासाठी जागा निश्‍चित करण्यासाठी रस्त्यावर पट्‌टा मारुन दया. याठिकाणी जो पदपथ तयार करण्यात आलेला आहे त्यासाठी आम्ही दुकानदारांनी तीन तीन फुट रस्ता दिलेला आहे. जेव्हा बघावा तेव्हा नेहरु चौकचा रस्ता क्लियर करा, शिरु चौकचा रस्ता क्लियर केला असे सांगता उल्हासनगरमध्ये तेवढाच विभाग आहे का? आयुक्त साहेब शहाड पॅसेजर असोशिएशनचे दोन तीन वेळेला तुम्हाला पत्र दिले आहे. आपण आपल्या अगांवरचे घोंगडे हे झटकुन पी.डबलु.डी चे काम आहे, असे सांगता श्री बोडारे साहेबांनी हा प्रश्न उपस्थित केला त्यांचे अभिनंदन, उल्हासनगच्या सर्व रस्त्याकडे तुम्ही लक्ष दया.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे:—</u> श्री. बागुल साहेब, आताशी आम्ही सुरुवात केली आहे.

<u>सदस्य श्री. रवि बागुल:—</u> सुरुवात पहिल्यापासून केली आहे पण काही लक्ष देत नाही.

**सदस्य श्री. प्रशांत धांडे:—** नेहरु चौक हा उल्हासनगरचा प्रमुख विभाग आहे, त्याठिकाणी बाजारपेठ आहे.

**सदस्य श्री. रवि बागुल:—** उल्हासनगरमध्ये शहाड फाटक नाही का?

**सदस्य श्री. प्रशांत धांडे:—** शहाड फाटक आहे हे मी मान्य करतो, प्रथम हे रस्ते मोकळे होवु दया, आणि तुम्ही जो सांगता तो विभाग हॉकर्स झोन आहे.

**सदस्य श्री. रवि बागुल:—** नाही नाही.

**सदस्य श्री. प्रशांत धांडे:—** हॉकर्स झोन आहे पाहिजेतर तुम्ही कोणाला विचारुन घ्या.

**सदस्य श्री. रवि बागुल:—** माझा जो प्रश्न आहे तो अधिकाऱ्यांना आहे, साहेब आपण का उत्तर देता?

**सदस्य श्री. राजेश वधारीया:—** आयुक्त साहेब, शेवटी शेवटी आपण उत्तर दया, जे जे मुद्दे आहेत ते आपण ऐकुन घ्या. मा. महापौरजी सभागृहापुढे जो विषय आणलेला आहे तो संपुर्ण शहराच्या हिताचा किंवा अहिताचा विषय होवु शकतो. नॅशनल पॉलिसी फॉर अर्बन दी स्ट्रिट वेन्डर या धोरणानुसार हा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे, त्याबद्दल कृपया मला हि माहिती दया, वार्ड कमिटी, टेक्नीकल कमिटी, मेन्टेनस कमिटी, याचा नॅशनल पॉलिसी फॉर अर्बन दी स्ट्रिट वेन्डर यामध्ये कुठे उल्लेख आहे? नॅशनल पॉलिसी फॉर अर्बन दी स्ट्रिट वेन्डर हे धोरण जर आपण वाचले असेल तर हयामध्ये असे म्हटले आहे की, लहान आकारांची जी शहरे आहेत तेथे शहर पातळीवर व जी मोठी शहरे आहेत, जसे की उल्हासनगर आहे अशा ठिकाणी प्रभाग स्तरांवर समिती तयार केली जाईल. जी समिती हे सर्व काम पाहिल तसेच मेन्टेनस कमिटी चा उल्लेख आहे तो मला सांगा. आपण ही जी तरतुद येथे दर्शविली आहे ती कुठुन आणली आहे? प्रथमतः त्याचा खुलासा करा.

**श्री. समीर उन्हाळे, आयुक्त:—** प्रस्ताव पारित झाल्यानंतर ही तरतुद सभागृहच करणार आहे ना. हे जे आपण म्हटले की तरतुद कुठन आली? हे आदर्श उपविधी जे शासनाने सर्व स्थानिक स्वराज्य संस्थाना पाठविले आहेत त्याच्या आधारावर हा प्रस्ताव तयार करुन प्रशासनाने आपल्या समोर ठेवला आहे. त्यावर आपण विचारविनिमय करावा या साठी हा प्रस्ताव आपल्यासमोर ठेवला आहे. दुसरे असे की, आपण जे म्हणत आहात की, नॅशनल पॉलिसी फॉर अर्बन दी स्ट्रिट वेन्डर या पॉलिसी मध्ये हे कुठे आहे? तर यावर बरीच चर्चा झालेली आहे. बरीचशी वर्कशॉप झाली आहेत. शासनस्तरांवर उप—आयुक्त व मी तीन चार वेळा या चर्चेमध्ये सहभागी झालो आहे. आपण स्वतःस स्थानिक शासन आहेत हा प्रत्येक वेळी महानगरपालिकेने काम करणे असा प्रकार न ठेवता आपण स्वतः आपले व्यवहार, आपल्या अडचणी, आपल्या चुका, यांच्यातुन मार्ग काढण्यासाठी आदर्श उपविधींवर आधारीत उपविधी तयार करुन आपल्यासमोर ठेवले आहेत. सभागृह यावर जो काही निर्णय घेईल त्यांची आम्ही अमंलबजावणी करु.

**सदस्य श्री. लाल पंजाबी:—** श्री. राजेश वधारीया याचे असे म्हणणे आहे की, ही तात्रिंक समिती आपण आणली कुठुन? आपण आदर्श उपविधीची प्रत प्रस्तुत केली आहे.

**सदस्य श्री. राजेश वधारीया:—** _साहेब माझ्या हातामध्ये नॅशनल पॉलिसी फॉर अर्बन दी स्ट्रिट वेन्डर ची प्रत आहे त्यामध्ये कुठेही स्पष्ट उल्लेख नाही पाहिजेतर त्याची एक प्रत मी आपणांस देतो, ती वाचुन याबाबतची तरतुद वाचुन दाखवावी. नॅशनल पॉलिसी मध्ये यांचा कुठेच उल्लेख नाही आपण हे कोठुन आणता?

**सदस्य श्री.बी.बी. मोरे:—** उल्हासनगर मधुन आणतो.

**सदस्य श्री. लाल पंजाबी:—** महाराष्ट्र शासनाने दिलेले जे आदर्श उपविधी आहेत त्यामध्ये असे लिहिले आहे की, ........

**सदस्य श्री. राजेश वधारीया:—** हा शासन निर्णय नाही, हा प्रारुप मसुदा आहे. त्यावर माझे म्हणणे असे आहे की, आपण एवढी मोठी समिती स्थापन कराल, शहर स्तरावंर, प्रभाग स्तरांवर, टेक्नीकल कमिटी, मेंन्टेनस

कमिटी, जी वार्ड कमिटी आहे जीची यामध्ये तरतुद आहे, ती वार्ड कमिटी पहा त्यामध्ये प्रथम महापालिका प्राधिकारी, वाहतुक पोलिस आणि स्थानिक पोलिस, जमीनीचे मालक हे आपण घेतले आहेत, परंतु प्रभाग स्तरांवर त्यास अंतिम रुप दिले पाहिजे. प्रभाग स्तरांवरची समिती शहर स्तरावरील समिती कडे प्रस्ताव देईल आणि शहर स्तरावरील समिती महासभेत प्रस्ताव देईल परंतु या धोरणामध्ये प्रभाग स्तरावर जी समिती असेल ती अंतिम असेल. या धोरणामध्ये प्रभाग समिती स्तरावरची समिती ही अंतिम असेल.

सदस्य श्री. लाल पंजाबी:– आपणाकडे जी प्रभाग समिती आहे तीचा उल्लेख येथे वार्ड कमिटी म्हणून आला आहे,

सदस्य श्री. राजेश वधारीया:– आपणासर्वांसाठी एक परिच्छेद वाचुन दाखवतो.

Designation of vendors markets/no-vending zones should not be left to the sole discretion of any civic or police authority but must be accomplished by a participatory process by a **Town Vending Committee** (which for large towns/cities may be constituted on the basis of wards) whose membership may be as follows :

- ❖ Municipal Authority
- ❖ Traffic and Local Police
- ❖ Public Land Owning Authority
- ❖ Associations (Market, Traders, Resident Welfare, Slum & Chawl etc.)
- ❖ Representative from association of Street vendors (static & mobile)
- ❖ Representative from lead Nationalized Bank/Commercial Bank

The howker's representative should preferably constitute atleast 25% to 40% of the total of members of the Committee. Atleast 1/3rd of street vendors should be women. Process for selection of street vendor's representatives should be based on the following criteria:

- ❖ Membership based orgainsations
- ❖ Financial Accountability

तर या धोरणामध्ये व आपल्या प्रारुप नियमामध्ये खुप भिन्नता आहे.

सदस्य श्री. धनंजय बोडारे:– श्री. राजेश वधारीयाजी, केंन्द्रसरकार, राज्यसरकार, आणि स्थानिक सरकार, राष्ट्रीय फेरीवाला धोरण काय आहे? ते लक्षात घेवुन त्यामध्ये काही सुधारणा करुन यानी महाराष्ट्र शासनाने धोरण तयार केले, व महाराष्ट्र शासनाने सर्व स्थानिक स्वराज्य संस्थाना / महानगरपालिकांना ते स्विकृत करण्यासाठी किंवा त्यामध्ये फेरफार करण्यासाठी पाठविले. त्यामध्ये फेरफार करण्याचा आपणांस अधिकार आहे. तर हया ज्या समित्या आहेत तांत्रिक समिती, व्यवस्थापन समिती, प्रभाग समिती, व शहर समिती त्या आपणांस मंजुर आहेत किंवा नाहीत? आम्हास वाटते की हा प्रस्ताव अतिशय चांगला आहे. कारण की धारेणात एकाठिकाणी चुक होत असेल तर ती सुधारण्यासाठी दुसरे ठिकाण आहे व दुसऱ्या ठिकाणी चुक होत असेल तर तिसरी संधी आहे. परंतु संपुर्ण शहरासाठी एक धोरण होईल आणि त्यामुळे शहरामध्ये चांगली सुधारणा होईल. राष्ट्रीय धोरण काय आहे? होवु शकते त्यांनी प्रभागाचा उल्लेख केला तो दिल्ली महानगर प्रदेशाच्या हिशोबाने केला असेल, तेथील एक एक वार्ड कमिटी आपल्या दोन दोन शहरांएवढया आहेत, समजा मुंबईत चार वार्ड कमिटया आहेत, तर मुंबईची वार्ड कमिटी व उल्हासनगरची वार्ड कमिटी सारखीच आहे का? त्यासाठी असे होवु शकते की, महानगरे लक्षात घेवुन त्यांनी वार्ड कमिटयांना अधिकार दिले असतील तांत्रिक समिति शिफारस करेल, प्रभाग समितीला कारण की प्रत्येकास तांत्रिक ज्ञान नसते, तांत्रिक ज्ञान असलेले लोक तांत्रिक ज्ञान देवु शकतील म्हणुन त्या हिशोबाने प्रथमत: तक्ता तयार करुन कोणता विभाग स्थिर फेरीवाल्यासाठी कोणता विभाग फिरत्या फेरीवाल्यासाठी हे ठरविण्याची शिफारस प्रभाग समिती करते. व शहर समितिला सपुर्ण उल्हासनगर फिरण्याची गरज नाही येथे बसल्या बसल्या रॅन्डअमली जर आम्ही तपासुन पाहिले की, जी प्रभाग समितीने शिफारस केली ती बरोबर आहे की नाही? नाहीतर पोलिस उपआयुक्त, व महापालिका आयुक्त प्रत्येक गल्लीत जातील? तेथील प्रभाग अधिकारी, प्रभाग अध्यक्ष यांनी आपल्या प्रभागामध्ये काय झाले पाहिजे, काय होता कामा नये याचा अहवाल देतील आणि त्या आधारावर शहर समिती कार्यवाही करील. तर हे उपविधी आपणांस स्विकृत करायचे किंवा नाही एवढाच मुद्दा आहे.

सदस्य श्री. राजु जग्यासी:– मा. महापौरजी आम्ही या प्रस्तावाचे समर्थन करतो, मात्र काही माहिती आम्ही जाणुन घेवु इच्छितो याअगोदर महानगरपालिकेच्या वतीने नॉन हॉकींग झोन जाहिर करण्यात आले होते काय ते तसेच राहतील? का त्यामध्ये आम्ही काही बदल करु शकतो? दुसरे असे की नेहरु चौकापासुन शिरु चौकापर्यंतच्या रस्त्यासाठी अतिरिक्त आयुक्तांनी खुप चांगले काम केले ही अतिशय चांगली गोष्ट आहे. एका गोष्टीकडे मी आपले विशेष लक्ष वेधु इच्छितो, आपल्या शहरामध्ये नाना नानी पार्क आहे तो अतिशय दाटीचा विभाग आहे. तेथे आमच्या नगरसेविका श्री. चंद्रा टेकचंदानी यांचे सुपुत्र श्री. राजेश टेकचंदानी हे प्रत्येक वेळेस तेथील प्रश्नांसदंर्भात व्यापारांना घेवुन महानगरपालिकेत येतात, कारण तेथे हॉक्स उभे राहतात त्यामुळे तेथून

लोकांना जा ये करणे संभव नसते. व या मुद्दयाबाबत ते दोन वेळा न्यायालयात गेले होते, व जिंकुन सुध्दा आलेले आहेत परंतु अतिशय दुखा:ने सांगावे लागते की तेथील हॉकर्सना हटविण्यात आलेले नाही. यासाठी या मुद्दयाला प्राधान्य दिले जावे. तिसरे असे की हॉकर्सना जसे आपण लायसन्स देणार आहोत त्यामध्ये आपण अशी अट टाकु की हे फेरीवाले हे उल्हासनगर मध्ये राहणारे असावेत. त्यानांच लायसन्स दिले जाईल असे श्री. धनंजय बोडारे यांनी सांगितले. त्याचबरोबर आपल्या शहरात असे कित्येक मार्केट आहेत जी महानगरपालिकेच्या खर्चाने बाधंण्यात आलेली आहेत. उदाहरणादाखल इंदिरा गांधी भाजी मार्केट बद्दल सांगु शकतो आजच्या तारखेला त्या मार्केटचे महिन्याचे दोन ते अडिच लाख रूपये लाईट बील महानगरपालिका देत आहे परंतु त्या मार्केटचा फायदा महापालिका घेत नाही, तेथील सर्वच्या सर्व गाळे खाली आहेत, व जो कोणी त्या गाळयामध्ये व्यवसाय करतो, त्याकडुन स्थानिक लोक दहा वीस रूपये वसुली करतात. त्या मार्केटची सफाई करण्यासाठी काही सफाईकामगार ठेवले आहे. मार्केटमधील लाईट बील महापालिका भरते परंतु मार्केटमधील गाळयांचा फायदा घेत नाही याबाबीकडे लक्ष दिले जावे. तसेच आपण जे फेरीवाल्याना लायसन्स देणार आहोत त्याचे प्रमाण काय असेल? उदाहरणादाखल आपल्या उल्हासनगरची एकुण लोकसंख्या आहे तिच्या आधारावर ठरविले जाईल की, जे नॉन हॉकर्स झोन आहेत ते सोडुन विचार केला जाईल. या बाबींचा खुलासा करावा. एकंदरीत आम्ही या प्रस्तावाच्या बाजुने आहोत, हा अतिशय चांगला प्रस्ताव आहे, तो पारित झालाच पाहिजे. फक्त दोन तीन बाबींचा खुलासा केला तर आपली मेहरबानी होईल.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे:—</u> सन्मा. महापौरजी, आयुक्त साहेब, सभागृहापुढे हा जो प्रस्ताव आलेला आहे तो अतिशय चांगला आहे, या ज्या समित्या आहेत त्या चांगल्या आहेत, त्या व्यवस्थितपणे काम करतात किंवा नाही त्याच्यावर लक्ष ठेवण्यासाठी सन्मा. सदस्य सभासद म्हणुन राहतील, ते देखरेख करतील आणि बाहेरचा जर फेरीवाला आला , समजा श्री. राजेश वधारीया यांच्या दुकानासमोर तो बसला तर तो त्याला तेथुन हाकलुन देतो, म्हणजेच तेथे भांडण होते, श्री. राजु जग्यासी ही तसेच करेल, तर सांगायचा मुद्दा असा आहे की, जो मागील पधंरा वर्षापासुन उल्हासनगर मध्ये राहतो तोच येथे व्यवसाय करु शकेल. बाहेरचा एखादा फेरीवाला आला आणि उल्हासनगर मध्ये धंदाव्यापार करुन गेला असे अजिबात चालणार नाही. आणि म्हणुन त्यावर या ज्या समित्या आहेत त्या नियंत्रण ठेवतील आणि नियंत्रण ठेवल्यावर आपल्या शहराला एक वळण लागेल. उल्हासनगर एक सुदंर आणि नदनंवन होईल. व्यापाऱ्याच्या दृष्टीकोनातुन अतिशय चांगले आहे. अशा प्रकारे जनतेमध्ये त्याचा लौकिक वाढेल, सध्या कुठलाही फेरीवाला येतो हॉकर्स झोन, नॉन हॉकर्स झोन अशा कुठल्याही ठिकाणी धंदाव्यापार करुन निघुन जातो असे यापुढे होणार नाही म्हणुन यासाठी या समित्या आहेत आणि या समित्यामध्ये सन्मा. नगरसेवक हे सदस्य राहतील. त्यांना अधिकार राहिल फेरीवाल्यांना लायसन्स दिले जाईल, लायसन्स ची फी किती घेतली जाईल इत्यादी बाबत उपविधी तयार केले जातील. म्हणुन श्री. राजेश वधारीया व श्री. राजु जग्यासी यानी चांगले ऐकुन घ्यावे आणि लवकरात लवकर या प्रस्तावाला समर्थन दयावे अशी मी त्यांना विनंती करतो.

<u>सदस्य श्री. राजेश वधारीया:—</u> मा. महापौरजी, श्री. राजु जग्यासी यांनी नाना नानी पार्कचा जो मुद्दा उपस्थित केला होता त्यावर आयुक्त साहेबांनी जरा खुलासा करावा.

<u>**श्री. अशोक रणखांब, अतिरिक्त आयुक्त :—**</u> मा. महापौर, मा. आयुक्त या ठिकाणी फेरीवाल्यांच्या विषयावर आपण जी चर्चा करत आहोत, राष्ट्रीय फेरीवाला धोरण याबाबत बऱ्यासश्या सदस्यांनी काही मुद्दे उपस्थित केले, सध्याच्या परिस्थितीमध्ये आपल्या समोर राज्यशासनाने फेरीवाल्यांच्या सदर्भात जे आदर्श उपविधी दिले आहेत त्याला मंजुरी देण्यासाठी जो प्रस्ताव आपणासमोर ठेवण्यात आलेला आहे, आता हे जे उपविधी दिले आहेत, ते तयार करतान यापुर्वी श्री. धनंजय बोडारे साहेबानी बहुतांश गोष्टीचा उल्लेख याठिकाणी केलेला आहे, उपविधी तयार करताना शहराचा संपुर्ण विचार आणि त्या शहरामध्ये फेरीवाल्यासाठी महानगरपालिकेकडुन काय केले जाईल, या बाबत इतभुंत तरतुद केलेली आहे. या उपविधींवर जर आपणांस विचार करावयाचा असेल तर उपविधी म्हणजे काय? हे नियम दिले आहेत फेरीवाल्यांचे, महाराष्ट्रातील कुठल्याही शहरामध्ये फेरीवाल्यांवर निश्चितपणे कुठलेही नियंत्रण नाही परंतु हे जे उपविधी तयार केले आहेत ते सर्व गोष्टीचा सखोल विचार करुन तयार केले आहेत. या उपविधींचा तीन भागामध्ये आपण विचार करु, पाहिल्या भागामध्ये तीन समित्या सुचविल्या आहेत आपण बाकीच्या गोष्टीचा विचार करायला नको, महानगरपालिकेच्या संदर्भात शहर समिती, प्रभाग समिती, तांत्रिक समिती काही लोकांनी हा मुद्दा उपस्थित केला आहे की, या समित्या नक्की काय काम करणार? शहर समिती ही या शहरामधील फेरीवाल्यांचे धोरण ठरविण्याची समिती आहे तीला मुख्य समिती असे म्हणू. शहरामध्ये कुठले कुठले झोन कुठे ठेवायचे, फेरीवाला झोन कुठे ठेवायचा कुठे ठेवायचा नाही याचा विचार प्रामुख्याने शहर समिती करणार आहे. दुसरी जी समिती आहे प्रभाग समिती या प्रभाग

समिती अंतर्गत त्या प्रभागाचा जो अध्यक्ष असेल तो  त्या प्रभाग समितीचा प्रमुख असेल, आणि बाकीचे अधिकारी त्या समितीमध्ये असणार आहेत आणि तिसरी समिती ही तांत्रिक समिती आहे, त्यामध्ये नगररचनाकारा सारखे तांत्रिक अधिकारी त्या समितीमध्ये असतात त्यामुळे कुठेकुठे हे आरक्षण ठेवायचे आहे, कुठे फेरीवाला झोन ठेवायचा आहे कुठे ठेवायचा नाही, कुठे आपणांस जागा दयायची आहे. या गोष्टींचा विचार करण्यात आलेला आहे. या प्रारुप उपविधीमध्ये दुसरा महत्वाचा जो भाग आहे तो फेरीवाल्याची जी निवड करायची आहे त्याबाबत सुध्दा शासनाने आपणांस नियम तयार करुन दिलेले आहेत, त्यातील ३० टक्के जागा महिलांसाठी राखीव ठेवल्या आहेत, २० टक्के जागा मागासवर्गीयासाठी व ३ टक्के जागा अपंगासाठी राखीव ठेवल्या आहेत त्याचबरोबर दारिद्रेषेखालील लोकांना १० टक्के जागा राखीव ठेवल्या आहेत, हा निकष ठरविल्यानंतर दुसरा असा भाग आहे की हया जागा वाटप कशा करायच्या? त्या त्या वेळी या समित्यांचा उपयोग करायचा आहे, तुम्हाला खोटे वाटेल की, हे उपविधी तयार करताना एवढया सखोलतेने विचार केलेला आहे, महानगरपालिकेला आपल्या ठिकाणी फेरीवाल्याचे जे समायोजन करायचे आहे, त्यांनी अट टाकली आहे की, महाराष्ट्राचा पधंरा वर्षाचा रहिवाशी असला पाहिजे या उपविधीनां मंजुरी देताना तो आपल्या शहराचां पधंरा वर्षाचा रहिवाशी असला पाहिजे, अशा प्रकारच्या काही अटी आपणांस टाकायच्या असतील हा जो मुद्दा गटनेत्याच्या बैठकीत आपण उपस्थित केला होता अशा प्रकारचे जे काही अन्य मुद्दे असतील तर ते सर्व मुद्दे समाविष्ट करुन हे उपविधी तयार करण्याची आपण जी शिफारस केली होती त्यानुसार या अटींबाबत आता येथे विचार होणे आवश्यक आहे. या उपविधी नुसार आपण ज्या फेरीवाल्याची निवड करणार त्यामध्ये फेरीवाल्याचे दोन प्रकार आहेत एक स्थिर फेरीवाला आणि दुसरा फिरता फेरीवाला, फिरत्या फेरीवाल्यांने कशा प्रकारे काम करायचे, स्थिर फेरीवाल्यांनी कशा प्रकारे काम करायचे? त्याला आपण जागा दिल्यानंतर त्याची गाडी कशी असणार आहे? त्यानी कुठल्या ठिकाणी काम करायचे? यांचा संपुर्ण विचार या नियमामध्ये केला आहे आणि आणखी पुढे जावुन शहराचा अतिशय चांगल्याप्रकारे विचार केलेला आहे, हे फेरीवाले आपण निवडले, स्थिर फेरीवाले, फिरते फेरीवाले असे आपण वेगवेगळे केले, त्याना अर्थसहाय्य देखील देण्यासाठी आपणांस कार्य करावे लागणार आहे? आपल्या शहरामध्ये खरोखरच दारिद्र निमुर्लनासारखी जी गोष्ट आहे, त्यांच्यासाठी या फेरीवाल्याच्या माध्यमातुन अतिशय चांगल्या प्रकारे तरतुद या उपविधी मध्ये आहे, त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी आपण वेगवेगळया योजना राबवितो, त्या योजनांमधुन त्यांना प्रशिक्षण देवुन त्यांना जर चांगल्या पध्दतीने फेरीवाल्यांचे काम करता आले, ते चांगल्या पध्दतीने करतील त्यातुन शहराला काहीतरी शिस्त लागेल. त्याचप्रमाणे त्या लोकांचा विमा उतरविण्याची तरतुद देखील या उपविधीमध्ये उपस्थित केली आहे. ही रक्कम किती घ्यायची? शहर समितीने कार्यवाही काय करायची? उद्या एखादया फेरीवाल्याचे काही बरे वाईट झाले तर त्यांच्या कुटुबिंयाना विम्याची रक्कम देखील मिळाली पाहिजे, वेळोवेळी त्या फेरीवाल्याची आरोग्य तपासणी करण्याची तरतुद देखील या उपविधीमध्ये केलेली आहे.  अशा प्रकारचा परिपुर्ण प्रस्ताव तयार केलेला आहे. गटनेत्याच्या बैठकीत चर्चा केली तेव्हा फेरीवाल्यांच्या संदर्भातील कुठलेही अंग त्यामध्ये सोडलेले नाही. महाराष्ट्र शासनाने अत्यंत चांगल्या पध्दतीने आणि जो राष्ट्रीय फेरीवाला धोरण आपण सागंत होता त्या सर्वाचा एक परिपाक म्हणुन हे अत्यंत चांगले धोरण ठरविले आहे. आणि जर आपण त्याला मंजुरी दिली तर ते महाराष्ट्र शासनाकडे आपण पाठविणार आहेत, मंजुरी मिळाल्यानंतर आपल्याला एक चांगल्या पध्दतीने, या शहरासाठी काम करता येईल आज आम्ही फेरीवाल्याना काही ठिकाणी उठवितो, शहाड फाटक गुलशन नगरच्या नगरसेवकानी देखील हा मुद्दा उपस्थित केला की आमचे विभागात तुम्ही काम करीत नाहीत म्हणून तर त्या ठिकाणचा रस्ता साफ करण्यास पाच मिनिट सुध्दा लागणार नाही, दोन मिनिटांत आम्ही साफ करु. या ठिकाणी गटनेत्यानी मागणी केली होती आज आपणाकडे कुठलेही धोरणात्मक नियोजन नाही धोरणात्मक नियोजन यामधुन होईल, कारण फेरीवाला ही समाजाची गरज आहे, आज तुम्हाला भाजी घेवुन घरी जायचे असेल परंतु स्टेशनमधुन बाहेर पडल्यानंतर फेरीवाला जर समोर नसेल तर तुमच्यासाठी प्रचंड प्रमाणात अडचण निर्माण होवु शकते. परंतु फेरीवाल्याच्या धोरणाला जर नियमामध्ये बसविले तर लोंकाची सोय होईल, व वाहतुक कोंडी या सगळया गोष्टीचा सुटकारा केला आणि याना जर रोजगार उपलब्ध करुन दिला तर ते निश्चित महानगरपालिकेचे आभार मानतील, आम्ही काम करत असताना एखादया रस्त्यावरील फेरीवाल्यांना उठवितो परंतु आमच्याकडे कुठल्याही प्रकारचे नियोजन नाही. फेरीवाल्याला उठविल्यानंतर, त्याच्या व्यवसायावर ज्यांचे पोट भरले जाते त्यांनी दुसऱ्या दिवशी काय करायचे हा देखील फार मोठा प्रश्न आहे, आम्ही महानगरपालिकेच्या माध्यमातुन काम करतो, परंतु फेरीवाल्याचे दिवसाचे दोनशे तिनशे रुपयाचे नुकसान होते आणि त्याच्याकडुन अडीशे, तिनशे, पाचशे रुपयांची पावती आम्ही फाडतो, ज्या माणसाला पोटाची गरज आहे म्हणुन तो रस्त्यावर बसुन फेरीवाला म्हणून विक्री करतो, त्याला जर कुठल्याही प्रकारची गरज नसेल तर रस्त्यावर वस्तु विकत बसला नसता, म्हणुन त्याच्यादेखील संसाराचा विचार करण्याची गरज आहे आज ही आपल्या महानगरपालिकेची आहे. आणि या सगळया लोकांचा जर आपण विचार केला तर निश्चित पणे आपल्या शहराला चांगली शिस्त

लागेल. आणि या सगळया गोष्टीचा परिपाक या प्रारुप नियमांमध्ये आहे, जर आपल्याला विनंती आहे की आपण या प्रस्तावाला मान्यता दयावी, आणि मान्यता प्राप्त उपविधी आपण शासनाकडे पाठवु.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी:–</u> श्री. रणखांब साहेब, फक्त एका मुद्दयाची माहिती पाहिजे या अगोदर जे नॉन हॉकर्स झोन जाहिर केले आहेत ते तसेच राहतील की......

श्री. अशोक रणखांब, अतिरिक्त आयुक्त :– होय, त्याबद्दल मी सांगतो, या धोरणाच्या अंतर्गत जी शहर समिती स्थापन करण्यात येईल त्या समितीत मा. महापौरजी अध्यक्षा असतील, ही समिती संपुर्ण शहराचा अभ्यास करुन काही ठिकाणी बदल करुन संपुर्ण शहरासाठी फेरावाल्यांची निवड करुन नवीन कामे करतील. आवश्यक त्या काही ठिकाणी हॉकर्स झोन आहेत ते जर त्यांना योग्य वाटत नसतील तर त्या बाबतीत आवश्यक ते बदल करुन प्रस्ताव तयार करतील हा पुर्णपणे त्यांचा अधिकार असेल.

<u>सदस्य श्री. राजेश वधारीया:–</u> सध्या जे नॉन हॉकर झोन आहेत त्याच्याबाबतील आपण कार्यवाही कराल की ते बाजुला साराल.

<u>श्री. अशोक रणखांब, अतिरिक्त आयुक्त (मु):–</u> हा पुर्णपणे समितीचा अधिकार आहे, त्यावर मी काही बोलु शकत नाही.

<u>सदस्य श्री. राजेश वधारीया:–</u> सध्या ज्या ठरावांची अमंलबजावणी होत आहे, जे नॉन हॉकर्स झोन आहेत आता हे प्रारुप उपविधी आल्यानंतर ते हॉकर्स झोन तर होत नाहीत ना?

<u>श्री. अशोक रणखांब, अतिरिक्त आयुक्त :–</u> पुन्हा एकदा सांगतो, जी शहर समिती आहे ती हे उपविधी मंजुर झाल्यानंतर व आपल्या महानगरपालिकेस लागू झाल्यानंतर संपूर्ण शहराबाबत पुर्नविचार करेल हे पहा दिवसेंदिवस आपली लोकसंख्या वाढत आहे झोन घोषित करताना त्यांमध्ये बदल सुध्दा करावे लागतील, परंतु ते निर्णय फक्त शहर समिती घेईल.

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड:–</u> मा. महापौर, मा. आयुक्त साहेब आता या ठिकाणी फेरीवाल्यासंदर्भात मा. अतिरिक्त आयुक्त श्री रणखांब साहेब यांनी हातगाडीच्या बाबतीत जे वक्तव्य केले ते खर तर नगरसेवकांनी केले पाहिजे होते, दोन मिनिटासाठी मला असे वाटले की तुम्ही नगरसेवक आहात आणि आम्ही अधिकारी आहोत की काय? पण खरोखरच चांगले वक्तव्य केले जर त्या फेरीवाल्याना तेथुन काढले तर ते बेरोजगार होतील, दुसऱ्या दिवशी त्यानी काय केले पाहिजे? एकतर चोऱ्या कराव्या लागतील व डाके टाकावे लागतील, पण त्याच्यासाठी पर्याय म्हणुन महापालिकेने आणि सन्मा. महापौर यांच्या निर्देशनाने व तुमच्या आमच्या प्रयत्नाने व गटनेत्यांच्या बैठकीत जे काही ठरलेले आहे त्याप्रमाणे नियमांच्या चौकटीत राहुन या उल्हासनगरमध्ये फेरीवाल्यांना आपण जे लायसन्स देणार आहोत त्याबद्दल आपणासं एक विंनती व सूचना असेल, की तो फेरीवाला उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामधील रहिवाशी असला पाहिजे, ही अट तर तुम्ही ठेवली आहेच परंतु त्याचबरोबर त्याचे स्वत: रेशन कार्ड असला पाहिजे.....

<u>श्री. अशोक रणखांब, अतिरिक्त आयुक्त :–</u> पंधरा वर्षाचे वास्तव्य हे आपण ठरविणार आहोत.

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड:–</u> होय ते तर झालेच, त्याच्याकडे रेशन कार्ड असले पाहिजे आणि त्याचबरोबर हाऊस टॅक्स पावती असली पाहिजे म्हणजे तो शहरात राहणारा नागरिक असला पाहिजे, नाहितर दुसऱ्या जिल्हयातुन येवुन दुसऱ्या शहरातुन येवुन या ठिकाणी धंदे करतील आणि या शहरातील लोकांना रोजगार मिळणार नाही, असा पक्षपात होता कामा नये, याची या ठिकाणी आपण नोद घ्यावी.

<u>श्री. अशोक रणखांब, अतिरिक्त आयुक्त:–</u> _यांच्यामध्ये कुठल्याही फेरीवाल्याची निवड करताना त्याला लायसन्स देताना दोन तिन समितीच्या छाननीतुन जावे लागणार आहे, आपली जेव्हा या सदंर्भातील पहिली बैठक झाली त्यावेळेस सांगण्यात आले की, फेरीवाल्याची निवड करताना त्याचा त्या भागातील वास्तव्याचा दाखला, तहसिलदारांचे प्रमाणपत्र, आणि संबधित जी समिती आहे त्या समितीमध्ये मा. महापौर अध्यक्षा व असतील, आणि त्याचबरोबर इतर वेगवेगळया ठिकाणचे सदस्य त्याच्यामध्ये असणार आहे, महानगरपालिकेचे

आयुक्त, तसेच त्यांनी ठरविलेले इतर अधिकारी त्यामध्ये असणार आहेत, त्यामुळे याची पुर्णपणे छाननी झाल्याशिवाय त्याला कुठल्याही प्रकारचे लायसन्स मिळणार नाही. आणि जरी असे लायसन्स मिळाले आणि कुणी त्यावर जर हरकत घेतली तर ती हरकत सुध्दा तपासली जाणार आहे, त्यामुळे हे धोरण जेव्हा आपण सुरु करणार, ज्या वेळेस लायसन्य देणार त्यावेळेस आपण सर्वांनी योग्य माणसालाच लायसन्य दिले जाते कि नाही, हे देखील ठरविण्याचा अधिकार सभागृहाला आहे.

सदस्य श्री. राजु जग्यासी:— श्री. रणखांब साहेब, काही वेळेपुर्वी विचारले होते की, जो नाना नानी पार्क आहे तो विभाग नॉन हॉकर्स झोन आहे व न्यायालयाचा देखील आदेश आला आहे की, तेथुन फेरीवाले हटविले पाहिजेत, याबाबत आपण वैयक्तीक पणे लक्ष घालावे.

श्री. अशोक रणखांब, अतिरिक्त आयुक्त:— याबाबतीत माझ्याकडे सध्या काही माहिती नाही.

सदस्य श्री. राजु जग्यासी:— या बाबत आपण जरा अभ्यास करावा. व त्यानंतर फेरीवाल्यांना हटवायचे आहे, कारण की लोकांना खुप त्रास होत आहे.

श्री. अशोक रणखांब, अतिरिक्त आयुक्त :— आता हा विषय तर माझ्या पुढे नाही आहे.

सदस्य श्री. राजु जग्यासी:— आपण पहाणी कराल ना? की नाही करणार?

श्री. अशोक रणखांब, अतिरिक्त आयुक्त :— पहाणी तर दहा वेळा करु.

सदस्य श्री. रविद्रं बागुल:— अशीच वेळ आली तर श्री. रणखाबं साहेब आपण दहा मिनिटांसाठी शहाड फाटकला सुध्दा भेट दया.

सदस्य श्री. प्रशांत धांडे:— पुर्ण शहराला भेट देतील.

सदस्य श्री. रविद्रं बागुल:— देवु दया, अधिकार आहे, तुम्ही असे कसे म्हणतात, ते शहराला भेट नाही देणार तर मग कोणाला देणार? असे कसे बोलता साहेब. अधिकारी आहेत, त्यानी शहराला भेट नाही दिली तर, मग ते काही त्याच्या घरात लपुन बसणार आहेत का?

सदस्य श्री. प्रशांत धांडे:— अहो जेव्हा तेव्हा गुलशन नगर ,गुलशन नगर म्हणता....

सदस्य श्री. रविद्रं बागुल:— गुलशन नगर बद्दल नाही मी बोलत, गुलशन नगरचा शब्द नाही येथे, गुलशन नगरचा प्रश्न नाही, गुलशन नगर बद्दल काही बोलु नका, आम्हाला आयुक्त साहेबांनी गुलशन नगर बद्दल आर्शिवाद दिलेला आहे.

सदस्य श्री. प्रशांत धांडे:— अहो, फुल खिले है गुलशन गुलशन......

सदस्य श्री. बी.बी. मोरे:— या प्रस्तावरची चर्चा आता पुरे झाली पुढचा विषय घ्या.

सदस्य श्री. धनंजय बोडारे:— आम्ही आणि आपले अधिकारी हे करु शकतो, हे आता तुमच्या लक्षात आले आहे, त्यामुळे सुरुवात केलेली आहे, जसा एक रस्ता झाला तसेच बाकीचे रस्ते होतील, आतापर्यंत तुमचा तुमच्यावर विश्वास होता आमच्यावर विश्वास आहे ना? आम्ही नक्की करु.

सदस्य श्री. रविद्रं बागुल:—अभिनंदन आहे, अभिनंदन आहे सर्वाचे....

सदस्य श्री. लाल पंजाबी:— सर्व दलीय बैठकीमध्ये आणखी दोन मुद्दयावर चर्चा झाली होती त्याचा उल्लेख अद्याप पर्यंत आलेला नाही. भाग क्रंमाक तीन मध्ये एक अट होती फेरीवाल्याच्या नोंदणीचा कालावधी कमाल पाच वर्षाचा राहील, व त्यानंतर नोंदणीचे नुतनीकरण आवश्यक राहील. त्याबाबत सर्व दलीय बैठकीमध्ये असे ठरले होते की ''नोंदणीचा कालावधी दोन वर्षाचा असला पाहिजे'', आणि भाग क्रमांक पाच मध्ये तो पंधरा

वर्षापासुन उल्हासनगरचा रहिवाशी असला पाहिजे त्याच्या पुराव्यासाठी रेशन कार्ड व टॅक्स पावतीची झेरॉक्स घेतली पाहिजे यांची सुध्दा विशेष करुन तरतुद केली पाहिजे. आणि जर त्याच्याकडे टॅक्स पावती नसेल तर मतदार यादीमध्ये त्याचे नाव असले पाहिजे, या दोन सुधारणा यामध्ये केल्या पाहिजेत, भाग तीन मध्ये जो पाचव्या क्रमांकाचा मुद्दा आहे त्यानुसार नोंदणीचा कालावधी व भाग क्रमांक पाच मध्ये वरील प्रमाणे सुधारणा केली पाहिजे.

**महापालिका सचिवः—** या ज्या सुधारणा आपण सुचविल्या आहेत त्याच्यासह हा प्रस्ताव पारित झाल्याचे समजायचे?

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १०:— राष्ट्रीय फेरीवाला धोरणानुसार उल्हासनगर शहरात फेरीवाला व्यवसायाचे प्रारुप विनियमास मान्यता देणे.**

**प्रस्तावना**

नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र. राफेधो—०३०९/प्र.क्र.२०/नवि—३४, दिनांक ०२ मार्च, २००९ अन्वये राज्याच्या नागरी भागातील फेरीवाल्यांच्या संदर्भात राष्ट्रीय फेरीवाला धोरण लागू करण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना करणेबाबत फेरीवाला (व्यवसायाचे विनियमन) उपविधी लागु करण्यासंबंधी सुचित करण्यात आले आहे.

उल्हासनगर शहरात राष्ट्रीय फेरीवाला धोरण लागु करण्याच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना करणेकामी फेरीवाला (व्यवसायाचे विनियमन) उपविधीचा प्रारुप मसुदा (सोबत प्रत जोडत आहे.) मा. महासभा पटलावर मंजुरीकरीता प्रस्तावित.

**महासभा ठराव क्रः** १२ **दिनांकः— १९/६/२००९**

सुचकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :—श्री. लाल पजांबी

ही महासभा राष्ट्रीय फेरीवाला धोरणानुसार महाराष्ट्र शासन, महानगरपालिका/नगरपालिका फेरीवाला व्यवसायांचे (विनियमन) संदर्भात आर्दश उपविधी २००९ च्या आधारे उल्हासनगर महापालिका फेरीवाला व्यवसायांचे (विनियमन) उपविधीचा सोबत जोडलेले पृष्ठ क्रमांक १ ते १४ च्या मसुदयास मान्यता देत आहे.
परंतु

१. शहर समितीध्ये सदस्य म्हणून सर्व पक्षांच्या गटनेत्यांचा समावेश करण्यात यावा.
२. स्थिर फेरीवाला म्हणून नोंदणी करण्याकरीता अर्जदार महाराष्ट्र राज्यात पधंरा वर्षे व उल्हासनगरमध्ये पाच वर्षे वास्तव करीत असल्याबाबत अधिवास प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य राहील. त्याच्या पुराव्यासाठी शिधावाटप पत्रिकेची, मिळकत कराच्या पावतीची छायांकित प्रत सोबत जोडली पाहिज, तसेच उल्हासनगर शहराच्या मतदार यादीत मतदार म्हणून त्याचे नावाची नोंद असली पाहिजे.

३. स्थिर फेरीवाल्याच्या गटामध्ये महिला बचतगटानां अग्रस्थान देण्यात यावे.
४. फेरीवाल्यांचा नोंदणीचा कालावधी दोन वर्षाचा राहिल व त्यानंतर नोंदणीचे नुतनीकरण करणे आवश्यक राहिल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. राफेधो–०३०९/प्र.क्र. २०/नवि–३४, द. ०२ मार्च २००९ अन्वये

# उल्हासनगर महानगरपालिका फेरीवाला व्यवसायाचे (विनियमन) आदर्श उपविधी

## भाग—१

### १.१ संक्षिप्त नामाभिधान—

(अ) हे उपविधी ''उल्हासनगर महानगरपालिका फेरीवाला व्यवसायाचे (विनियमन) आदर्श उपविधी २००९'' या नावाने संबोधण्यात येतील.

(ब) हे उपविधी उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात लागू राहील.

(क) हे उपविधी राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

### १.२ व्याख्या—

(अ) विषयात किंवा संदर्भात काहीही प्रतिकूल नसल्यास या नियमात—

(१) **''फेरीवाला''** म्हणजे आपला माल कोणत्याही पक्क्या संसाधनाशिवाय परंतू सार्वजनिक / खाजगी जमिनीवर एखाद्या तात्पुरत्या स्थिर संरचनेच्या आधारे किंवा फिरत्या गाडीच्या आधारे किंवा डोक्यावर भार वाहून फेरीने लोकांना वस्तुची विक्री करणारी किंवा सेवा देणारी व्यक्ती.
**(टिप—** फेरीवाल्यांच्या व्याख्येमध्ये उल्हासनगर महानगरपालिका यांनी यापूर्वी दिलले अपंगाकरिता च्छ बुथ, चर्मउद्योग, आरे—सरिता दूध केंद्र तसेच इतर पक्के स्टॉल यांचा समावेश नाही.)

(२) **''स्थिर फेरीवाला''** म्हणजे एकतर नेमून दिलेल्या सार्वजनिक / खाजगी क्षेत्रातील एका जागेवर बसून मालाची विक्री करणारी किंवा सेवा देणारी व्यक्ती.

(३) **''फिरता फेरीवाला''** म्हणजे ढकल गाडीवरून किंवा हातगाडीवर किंवा सायकलवरून किंवा वाहनातून किंवा आपल्या डोक्यावरील टोपलीतून मालाची विक्री करत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणारी व्यक्ती.

(४) **''व्यक्ती''** म्हणजे वय वर्ष १८ पुर्ण झालेली व्यक्ती.

(५) **''कुटुंब''** म्हणजे पती—पत्नी व त्यांची १८ वर्षापेक्षा कमी वय असलेली मुले.

(६) **''फेरीवाला क्षेत्र—ए''** म्हणजे महानगरपालिकेकडून फिरता फेरीवाला व स्थिर फेरीवाला यांना व्यवसायासाठी दिर्घकाळासाठी किंवा तात्पुरते अनुज्ञेय म्हणून घोषित करण्यात आलेले क्षेत्र.

(७) **''फेरीवाला क्षेत्र—एए''** म्हणजे महानगरपालिकेने घोषित केलेले असे क्षेत्र की, ज्या क्षेत्रामध्ये फक्त फिरता फेरीवाला व्यवसाय करू शकतील. या क्षेत्रामध्ये ना—फेरीवाला क्षेत्र व फेरीवाला क्षेत्र—ए व्यतिरिक्त क्षेत्राचा समावेश असेल.

(८) **''ना—फेरीवाला क्षेत्र''** म्हणजे महानगरपालिकेने त्यांच्या हद्दीत फेरीवाला व्यवसाय करण्याकरिता प्रतिबंधीत म्हणून जाहीर केलेले क्षेत्र

(९) **'' अधिकृत फेरीवाला''** म्हणजे महानगरपालिकेकडे फेरीवाला म्हणून नोंदणी केली आहे आणि महानगपालिकेच्या हद्दीत घोषित फेरीवाला क्षेत्रात किंवा खाजगी ठिकाणी संबंधीत मालमत्ताधारकाच्या मान्यतेने स्वत: व्यवसाय करीत आहे, अशी व्यक्ती.

(१०) **''अनाधिकृत फेरीवाला'' म्हणजे** अधिकृत फेरीवाला व्यतिरिक्त इतर फेरीवाले.

(११) **''किऑस्क''** म्हणजे असा सुशाोभित केलेला खोका की ज्यामध्ये मध्यभागी बसून व्यवसाय करता येतो.

(१२) **''निराधार महिला''** म्हणजे जिला उपजिविकेसाठी कोणतेही साधन उपलब्ध नाही आणि जिच्या कुटुंबात कमवती व्यक्ती नाही अशी स्त्री.

(१३) **''मागासवर्गीय''** म्हणजे ज्या व्यक्तीला अनुसुचित जाती / अनुसुचित जमाती/ इतर मागासवर्ग / भटक्या जाती /विमुक्त भटक्या जमाती / विशेष मागास वर्ग यांचे शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्याने जातीचे वैध प्रमाणपत्र दिले आहे अशी व्यक्ती.

(१४) **''अपंग''** म्हणजे ज्या व्यक्तीकडे ४० टक्क्याहून अधिक अपंगत्व असल्याबाबत जिल्हा शल्य चिकित्सक किंवा सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र आहे अशी व्यक्ती.

(१५) **''प्रकल्पग्रस्त''** म्हणजे ज्या व्यक्तीला शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्यानं प्रकल्पग्रस्त असल्याबाबत प्रमाणपत्र दिले आहे अशी व्यक्ती.

(ब) या नियमात वापरण्यात आलेल्या ज्या शब्दांचा किंवा वाक्यसमुहांच्या स्वतंत्र व्याख्या देण्यात आलेल्या नाहीत, ते उल्हसनगर महानगरपालिका अधिनियमात ज्या अर्थाने वापरण्यात आले असतील तोच त्यांचा अर्थ गृहीत धरण्यात येईल.

## भाग—२

## फेरीवाल्यांच्या व्यवसायाचे विनियमनासाठी संस्थात्मक रचना

### २. उल्हासनगर महानगरपालिका शहर फेरीवाला समिती

### २.१ उल्हासनगर महानगरपालिका शहर फेरीवाला समिती स्थापन करणे—

उल्हासनगर महानगरपालिका खालीलप्रमाणे शहर फेरीवाला समिती स्थापन करीतः—

| | | |
|---|---|---|
| १. अध्यक्ष | : | महापौर |
| २. सदस्य | : | उपमहापौर |
| ३. सदस्य | : | स्थायी समिती सभापती |
| ४. सदस्य | : | सभागृह नेता |
| ५. सदस्य | : | विरोधी पक्ष नेता |
| ६. सदस्य | : | आयुक्त |
| ७. सदस्य | : | पोलीस उप आयुक्त(वाहतूक) |
| ८. सदस्य | : | आयुक्त यांनी नामनिर्देशित केलेला अधिकारी |
| ९. सदस्य | : | सार्वजनिक जमीनीची मालकी असणारे प्राधिकरणाचे प्रतिनिधी |
| १०.सदस्य | : | संघटना(बाजार, व्यापारी, रहिवासी कल्याण, इ.) चे ३ प्रतिनिधी (पैंकी १ महिला) |
| ११. सदस्य | : | ४ फेरीवाला संघटनेचे प्रतिनिधी(पैंकी किमान २ महिला) |
| १२. सदस्य | : | लीड बँकेचे व्यवस्थापक |
| १३. सदस्य | : | कमाल ४ सार्वजनिक संस्थेचे प्रतिनिधी(पैंकी २ महिला) |
| १४. सदस्य सचिव | : | उप आयुक्त(फेरीवाला/अतिक्रमण) |

शहर फेरीवाला समितीच्या एकूण सदस्य संख्यपैंकी किमान २० टक्के एवढे फेरीवाल्यांचे प्रतिनिधी व १० टक्के सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी असतील व सदर प्रतिनिधींचे नामनिर्देशन आयुक्त करतील. तसेच समितीच्या एकूण सदस्यांपैकी एक तृतींश महिला प्रतिनिधी शक्यतो असाव्यात. समितीच्या सभेसाठी एकूण सदस्यांपैंकी किमान एक तृतींश सभासदांच्या उपस्थिती आवश्यक राहील. समितीची बैठक तीन महिन्यातून किमान एकदा घेण्यात यावी. परंतु, आवश्यकतेनुसार तातडीची बैठक अध्यक्षांना बोलविता येईल.

### २.२ उल्हासनगर महानगरपालिका शहर फेरीवाला समितीची कर्तव्ये व जबाबदाऱ्या—

उल्हासनगर महानगरपालिका शहर फेरीवाला समितीच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्यांमध्ये खालील बाबींचा समावेश असेलः—

१) फेरीवाल्यांकरिता शहरात जागांचे नियोजन करणे तसेच स्थिर फेरीवाल्यांकरिता फेरीवाला निहाय

वाटप करावयाच्या जागेचे क्षेत्रफळ व स्वरूप ठरविणे.

२) स्थिर व फिरता फेरीवाल्यांच्या नोंदणी संख्येची शिफारस महानगरपालिकेला करणे.

३) महानगरपालिकेच्या मान्यतेने फेरीवाल्यांकरिता नोंदणी शुल्क व इतर शुल्क निश्चित करणे.

४) कमाल ५ वर्षे या मर्यादेच्या अधीन राहून फरीवाल्यांकरिता नोंदणीचा कालावधी ठरविणे.

५) फिरता फेरीवाले व स्थिर फेरीवाले यांनी विक्री करावयाच्या मालाचा प्रकार ठरविणे.

६) फेरीवाला क्षेत्र ए, फेरीवाला क्षेत्र बी, व ना फेरीवाला क्षेत्राची शिफारस महानगरपालिकेला करणे.

७) फिरता फेरीवाल्यांकरिता माल वाहतूकीच्या वाहनाचा आकार, प्रकार, रचना ठरविणे.

८) फेरीवाला क्षेत्रामध्ये पुरविण्यात येणाऱ्या सोयी/सोविधांबाबत धोरण ठरविणे.

९) फेरीवाल्याकरिता सामाजिक सुरक्षिततेबाबत व कल्याणकारी धोरण ठरविणे.

१०) आठवडी बाजाराबाबत धोरण ठरविणे.

११) अटी व शर्तीचे भंग करणाऱ्या फेरीवाल्यांकडून आकारण्यात येणाऱ्या दंडाचे धोरण ठरविणे.

१२) फेरीवाल्यांचे विनियमन करणाऱ्या इतर मुद्यांबाबत धोरण ठरविणे.

## २.३ उल्हासनगर महानगरपालिका प्रभाग फेरीवाला समिती

**उल्हासनगर महानगरपालिका प्रभाग फेरीवाला समितीची स्थापना करणे:—**

उल्हासनगर महानगरपालिका खालील प्रमाणे प्रत्येक प्रशासकीय प्रभागासाठी प्रभाग फेरीवाला समिती स्थापन करील:—

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अध्यक्ष | : | प्रभाग समिती अध्यक्ष |
| २. | सदस्य | : | त्या प्रभागातील सर्व नगरसेवक |
| ३. | सदस्य | : | वरिष्ठ पोलीस निरिक्षक |
| ४. | सदस्य | : | पोलीस निरिक्षक(वाहतुक) |
| ५. | सदस्य | : | वैद्यकिय अधिकारी |
| ६. | सदस्य | : | अतिक्रमण अधिकारी |
| ७. | सदस्य | : | उप अभियंता (स्थापत्य) |
| ८. | सदस्य | : | नगररचना अधिकारी |
| ९. | सदस्य | : | स्थानिक पातळीवरील फेरीवाला संघटनेचे ४ प्रतीनिधी (पैंकी २ महिला) |
| १०. | सदस्य सचिव | : | विभाग अधिकारी / क्षेत्रीय अधिकारी |

प्रभाग फेरीवाला समितीच्या एकूण सदस्य संख्येपैकी किमान १० टक्के एवढे फेरीवाल्यांचे प्रतिनिधीत्व असेल. सदर प्रतिनिधींचे नामनिर्देशन आयुक्त करतील. समितीच्या एकूण सदस्यांपैकी एक तृतींश महिला प्रतिनिधी शक्यतो असाव्यात. समितीच्या सभेसाठी एकूण सदस्यापैकी किमान एक तृतीश सभासदांच्या उपस्थिती आवश्यक राहील. समितीची बैठक तीन महिन्यातून किमान एकदा घेण्यात यावी. परंतु, आवश्यकतेनुसार तातडीची बैठक अध्यक्षांना बोलविता येईल.

## २.४ उल्हासनगर महानगरपालिका प्रभाग फेरीवाला समितीची कर्तव्ये व जबाबदाऱ्या—

महानगरपालिका प्रभाग फेरीवाला समितीच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्यांमध्ये खालीलबाबींचा समावेश असले:—

१) प्रभाग फेरीवाला तांत्रिक समितीने शिफारस केल्याप्रमाणे फेरीवाला क्षेत्र—ए, फेरीवाला क्षेत्र—बी, व ना—फेरीवाला क्षेत्र घोषित करण्याकरिता शहर फेरीवाला समितीकडे शिफारस करणे.

२) प्रभाग फेरीवाला तांत्रिक समितीने शिफारस केल्याप्रमाणे फेरीवाला क्षेत्राकरिता क्षेत्रनिहाय नकाशे व पीच (बैठक) ची संख्या निश्चित करणे.

३) प्रभाग फेरीवाला तांत्रिक समितीने शिफारस केल्याप्रमाणे फेरीवाला क्षेत्रामध्ये क्षेत्रनिहाय विक्री करावयाच्या मालाचे प्रकार निश्चित करणे.

४) प्रभाग फेरीवाला तांत्रिक समितीने शिफारस केल्याप्रमाणे आठवडी बाजाराची जागा, दिवस व वेळ निश्चित करणे.

५) फेरीवाला क्षेत्र तसेच ना—फेरीवाला क्षेत्रामध्ये नियंत्रण ठेवणे.

६) स्थिर फेरीवाल्यांकरिता जागेचे सोडत पध्दतीने वाटप करतांना सोबत करावयाची आवश्यकता असल्यास किमान ३ व्यक्तींचे पंच मंडळ घोषित करणे. या पंच मंडळाचा अध्यक्ष प्रभाग अधिकारी/ क्षेत्रीय अधिकारी असेल.

७) नागरीकांकडून फेरीवाल्यांच्या विरूध्द प्राप्त झालेल्या तक्रारींवर शहानिशा करून उचित कार्यवाही करणे. (दंड, नोंदणी रद्द करणे, नोंदणी निलंबित करणे इ.)

८) प्रत्येक फेरीवाला क्षेत्राकरिता फेरीवाला क्षेत्र व्यवस्थापन समिती स्थापन करणे.

## २.५ उल्हासनगर महानगरपालिका प्रभाग फेरीवाला तांत्रिक समिती

महानगरपालिका प्रभाग फेरीवाला तांत्रिक समितीची स्थापना करणे—

महानगरपालिका खालीलप्रमाणे प्रत्येक प्रशासकीय प्रभागासाठी प्रभाग फेरीवाला तांत्रिक समिती स्थापन करील.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अध्यक्ष | : | सहाय्यक आयुक्त / प्रभाग अधिकारी / क्षेत्रिय अधिकारी |
| २. | सदस्य | : | उप अभियंता (स्थापत्य) |
| ३. | सदस्य | : | पोलीस निरिक्षक (वाहतुक) |
| ४. | सदस्य | : | वरिष्ठ पोलीस निरिक्षक |
| ५. | सदस्य | : | नगर रचना अधिकारी |
| ६. | सदस्य | : | अतिक्रमण निष्कासन अधिकारी |

## २.६ उल्हासनगर महानगरपालिका प्रभाग फेरीवाला तांत्रिक समितीची कर्तव्ये व जबाबदाऱ्या

महानगरपालिका प्रभाग फेरीवाला तांत्रिक समितीच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्यांमध्ये खालील बाबींचा समावेश असेल:—

१) प्रभागातील फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करणे तसेच सर्वेक्षण करतांना सर्वेक्षण नमुन्यामध्ये फेरीवाल्यांच्या मालाचा प्रकार, तो किती वर्षापासून व्यवसाय करतो, व्यवसायाचे ठिकाण इत्यादीबाबतची माहिती भरून घेणे, व त्याबाबतचे तत्सम पुरावे घेणे.

२) फेरीवाल्यांसाठी प्रभागात जागांचा शोध घेणे. फेरीवाला क्षेत्र व ना—फेरीवाला क्षेत्र घोषित करण्याकरिता प्रभाग फेरीवाला समितीकडे शिफारस करणे. तसेच सक्षम प्राधिकाऱ्याने मंजुर केलेल्या फेरीवाला क्षेत्रांना क्रमांक देणे.

३) फेरीवाला क्षेत्रांकरिता क्षेत्रनिहाय नकाशे व पीच (बैठक) ची संख्या निश्चित करून प्रभाग फेरीवाला समितीकडे शिफारस करणे.

४) फेरीवाला क्षेत्रामध्ये क्षेत्रनिहाय विक्री करावयाच्या मालाचे प्रकार निश्चित करण्याकामी शिफारस करणे.

५) आठवडी बाजाराची जागा, दिवस व वेळ निश्चित करण्याबाबत प्रभाग फेरीवाला समितीकडे शिफारस करणे.

# भाग—३
# फेरीवाल्यांची नोंदणी

## ३.१ फिरत्या फेरीवाल्यांकरिता नोंदणीची कार्यपध्दती व सर्वसाधारण अटी व शर्ती

फिरत्या फेरीवाल्यांची फेरीवाला नोंदणी खालील कार्यपध्दतीनुसार करण्यात येईल.

१) उल्हासनगर महानगरपालिका फेरीवाला नोंदणीसाठी आव्हान करण्याकरिता वृत्तपत्रात जाहीर सुचना प्रसिध्द करेल.

२) फेरीवाल्यांच्या नोंदणीकरिता महानगरपालिका क्षेत्रात अर्जदार विहीत नमुन्यात प्रभाग फेरीवाला समितीकडे तसेच महानगरपालिका क्षेत्रात शहर फेरीवाला समितीकडे अर्ज करेल.

३) फेरीवाला नोंदणी करण्याकरिता अर्जदाराने अर्जासोबत रहिवासाचा दाखला जोडणे आवश्यक राहील.

४) महानगरपालिकेने ठरविलेले नोंदणी शुल्क अर्जदार नोंदणीच्या वेळेस भरेल. दारिद्रय रेषेखालील यादीत नाव असलेल्या कुटुंबातील अर्जदार व्यक्तीने नोंदणी शुल्क भरणे आवश्यक राहणार नाही.

५) फरीवाल्यांचा नोंदणीचा कालावधी कमाल ५ वर्षाचा राहील व त्यानंतर नोंदणीचे नुतणीकरण करणे आवश्यक राहील.

६) नोंदणीकृत फेरीवाल्याने महानगरपालिका छायाचित्र असलेले ओळखपत्र देईल.

### फिरत्या फेरीवाल्यांच्या नोंदणीच्या सर्वसाधारण अटी व शर्ती–

१) प्रत्येक नोंदणीकृत फिरत्या फरीवाल्याने ओळखपत्र सहज दिसेल अशा पध्दतीने अंगावर लावणे बंधनकारक राहील.

२) फिरत्या फेरीवाल्यांना ना फेरीवाला क्षेत्र वगळून इतर क्षेत्रात सतत फिरून व्यवसाय करणे बंधनकारक राहील.

३) फिरता फेरीवाल्यांना त्यांचा व्यवसाय महानगरपालिका विहित करेल त्या वेळेतच करता येईल.

४) नेंदणीकृत फिरता फेरीवाल्याला कोणत्याही अन्नपदार्थ शिजवता वा तयार करता येणार नाही. फिरत्या फेरीवाल्याला नोंदणी पत्रात नमुद केलेल्या वस्तुंचीच विक्री करता येईल.

५) नोंदणीकृत फेरीवाल्याला डोक्यावर टोपली/पाटी ठेवून किंवा सायकलने किंवा महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या आकाराच्या व रचनेच्या हातगाडीतून किंवा अन्य वाहन इत्यादीमधून व्यवसाय करता येईल. मात्र त्या वाहनांवर फेरीवाला नोंदणी क्रमांक लिहीणे बंधनकारक राहील.

६) फिरता फेरीवाला कचरा रस्त्यामध्ये कोठेही न टाकता तो महानगरपालिकेच्या कचरा कुंडीत टाकेल.

७) नोंदणीकृत फिरता फेरीवाला ना–फेरीवाला क्षेत्रात व्यवसाय करतांना आढळल्यास त्याची नोंदणी रद्द करण्यात येईल व तो या उपविधीच्या तरतुदीप्रमाणे व संबंधीत महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीप्रमाणे शिक्षेस पात्र ठरेल.

### ३.२ स्थिर फेरीवाल्यांकरिता नोंदणीची कार्यपध्दती व सर्वसाधारण अटी व शर्ती–

१) उल्हासनगर महानगरपलिका स्थिर फेरीवाला नोंदणीसाठी आव्हान करण्याकरिता वृत्तपत्रात जाहीर सुचना प्रसिध्द करेल.

२) महानगपालिकेत स्थिर फेरिवाल्यांच्या नोंदणीकरिता अर्जदार विहित नमुन्यात प्रभाग फेरीवाला समितीकडे अर्ज करेल. महानगरपालिकेत स्थिर फेरीवाल्यांकरिता नोंदणीकरिता अर्जदार विहित नमुन्यात शहर फेरीवाला समितीकडे अर्ज करेल.

३) स्थिर फेरीवाला नोंदणी करण्याकरिता अर्जदाराने अर्जासोबत महाराष्ट्र राज्यात १५ वर्षे वास्तव्य करित असल्याबाबत अधिवास प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य राहील.

४) महानगरपालिकेने ठरविलेले नोंदणी शुल्क अर्जदार नोंदणीच्यावेळेस भरेल. दारिद्रय रेषेखालील यादीत नाव असलेल्या कुटुंबातील अर्जदार व्यक्तीस नोंदणी शुल्क भरणे आवश्यक नाही. तथापि, इतर शुल्क भरावे लागेल.

५) स्थिर व्यवसाय करणाऱ्या नोंदणीकृत फेरीवाल्यांना महानगरपालिका छायाचित्र असलेले ओळखपत्र देईल.

### स्थिर फेरीवाल्यांच्या नोंदणीच्या सर्वसाधारण अटी व शर्ती–

१) नोंदणीकृत स्थिर फेरीवाल्याने ओळखपत्र सहज दिसेल अशा पध्दतीने अंगावर लावणे बंधनकारक राहील.

२) नोंदणीकृत स्थिर फेरीवाला व्यवसायाच्या जागी हजर नसतांना व्यवसाय सांभाळण्यासाठी तो त्याचे कुटुंबातील आणखी एका व्यक्तीचे नाव अर्जात नमुद करू शकेल. त्या व्यक्तीने नोंदणीच्या कोणत्याही अटींचा केलेला भंग हा नोंदणीकृत फेरीवाल्यानेच केला आहे, असे समजण्यात येवून नोंदणीकृत फेरीवाला त्यासाठी कारवाईस पात्र राहील.

३) स्थिर फेरीवाल्यास देण्यात आलेली बैठकीची जागा (पीच) ही महानगरपालिकेच्या मालकीची राहील. त्या जागेबाबत नोंदणीधारकाला कोणताही अधिकार प्राप्त होणार नाही. ही जागा कोणत्याही प्रकारे हस्तांतरीत करण्याचा नोंदणीधारकाला अधिकार असणार नाही.

४) स्थिर फेरीवाला फेरीवाला क्षेत्रात महानगरपालिकेने नेमून दिलेल्या जागेवरच विक्रीचा माल ठेवून पूर्णपणे तात्पुरत्या स्वरूपात ठराविक वेळेसाठी दैनिक भाडेतत्वावर व्यवसाय करेल.

५) महानगरपालिकेने पदपथावर घोषित केलेले तात्पुरता फेरीवाला क्षेत्र यामध्ये महापालिकेने ठरवून दिलेल्या संरचनेच्या किऑस्क मध्ये विक्रीचा माल ठेवून स्थिर फेरीवाल्यास व्यवसाय करता येईल किंवा महापालिका जमिनीवर आखुन दिलेल्या पीच वर घडीच्या टेबल वर विक्रीचा माल ठेवून व्यवसाय करता येईल. मात्र, विक्रीची वेळ संपल्यानंतर घडीचा टेबल व माल परत घेवून जाणे बंधनकारक राहील.

६) विशेष सुरक्षा कारणासाठी २४ तासांची नोटीस देवून पीचच्या जागेचा वापर थांबविण्याचा संबंधीत आयुक्त यांना अधिकार असेल.

७) स्थिर फेरीवाल्यांना त्यांचा व्यवसाय महानगरपालिकेने विहित केलेल्या वेळेतच करता येईल. तसेच गिऱ्हाइकांशी सभ्य भाषेत व्यवहार करणे व चांगली वर्तणूक ठेवणे स्थिर फेरीवाल्यास बंधनकारक राहील.

८) स्थिर फेरीवाल्यास गिऱ्हाईकांचे लक्ष वेधण्यासाठी मोठयाने ओरडण्याचा, गिऱ्हाइकाच्या अंगाला स्पर्श करण्याचा, ध्वनीवर्धकाचा, उघडझाप करणाऱ्या व तीव्र उजेडाच्या दिव्यांचा वापर करण्याचा अधिकार असणार नाही.

९) स्थिर फेरीवाल्यास केवळ नोंदणीपत्रात नमुद केलेल्या वस्तुच विक्रीसाठी ठेवता येतील.

१०) ज्या अटींवर नोंदणी देण्यात आलेली आहे. त्यापैकी कोणत्याही अटींचा भंग झाल्यास नोंदणी रद्द केली जाईल. मात्र नोंदणी रद्द करण्यापुर्वी नोटीस देवून नोंदणीधारकाला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिली जाईल. ज्या नोंदणीधारकाची नोंदणी रद्द झालेली आहे त्याची पुन्हा नोंदणी करण्यात येणार नाही.

११) स्थिर फेरीवाला मयत / विकलांग झाल्यास त्याची स्थिर फेरीवाला नोंदणीची विक्री करता येणार नाही परंतु नोंदणी त्यांच्या वारसाकडे हस्तांतरीत करता येईल.

## भाग—४

## फेरीवाला व्यवसाय क्षेत्राचे नियोजन

### ४.१ फेरीवाला व ना—फेरीवाला क्षेत्र जाहीर करणे.

### ४.११ फेरीवाला क्षेत्र जाहीर करणे—

### ४.१११ निकर्ष—

फेरीवाला क्षेत्र जाहीर करण्याकरिता खालील निकष वापरावेत.

१) फेरीवाला क्षेत्र—I

पद्ध सर्वसाधारणपणे परिच्छेद —४.२ मध्ये नमुद केल्यानुसार स्थिर फेरीवाला व्यवसायासाठी विशिष्ट पध्दतीने निर्माण करण्यात आलेल्या जागा फेरीवाला क्षेत्र—I म्हणून घोषित करण्यात येतील.

पपद्ध रहदारीस अडथळा निर्माण होणार नाही तसेच वाहतुकीची कोंडी होणार नाही अशा परिच्छेद ४.१२ मध्ये समाविष्ट होणार नाहीत असे पदपथावर ही तात्पुरते फेरीवाला क्षेत्र—ट घोषित करता येईल. मा.त्र, जसे—जसे परिच्छेद—४.२ नुसार स्थिर फेरीवाल्यांच्या व्यवसायासाठी जागा निर्माण होतील तसेतसे तात्पुरता फेरीवाला क्षेत्र—I टप्प्याने आणण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील.

२) फेरीवाला क्षेत्र—II

रहदारीस अडथळानिर्माण होणार नाही तसेच वाहतुकीची कोंडी होणार नाही व ना—फेरीवाला क्षेत्रा व्यतिरिक्त रस्त्यांवर फेरीवाला क्षेत्र—II जाहीर करता येईल. या रस्त्यांवर फिरता फेरिवाल्यांनी फिरून व्यवसाय करण्यास मुभा राहील व कोणत्याही परिस्थित त्यांना स्थिर स्वरूपात व्यवसाय करण्यास मज्जाव राहील.

### ४.११२ कार्यपध्दती

### अ) महानगरपालिका क्षेत्रातील फेरीवाला क्षेत्र जाहीर करण्याची कार्यपध्दती—

महानगरपालिका क्षेत्रात ''फेरीवाला क्षेत्र'' जाहीर करण्याकरिता खालीलप्रमाणे कार्यपध्दती असेल:

१) प्रथम प्रभाग फेरीवाला तांत्रिक समितीमार्फत फेरीवाल्यांचे सर्वेक्षण करण्यात येईल.

२) प्रभाग फेरीवाला तांत्रिक समितीमार्फत स्थिर व फिरता फेरीवाल्यांकरिता जागांचेही सर्वेक्षण करण्यात येईल.

३) सर्वेक्षणानुसार स्थिर व फिरता फेरीवाल्यांकरिता सुचविण्यात आलेल्या ठिकाणांबाबत प्रभाग फेरीवाला तांत्रिक समिती सहाय्यक संचालक, नगररचना यांचे ना—हरकत प्रमाणपत्र घेण्याकरिता प्रस्ताव पाठवेल.

४) सहाय्यक संचालक, नगररचना यांचे ना—हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर प्रभाग फेरीवाला तांत्रिक समिती प्रस्ताव प्रभाग फेरीवाला समितीकडे सादर करेल. प्रभाग फेरीवाला समिती फेरीवाला क्षेत्राची शिफारस करण्यापुर्वी दोन स्थानिक वृत्तपत्रात नोटीस देईल व ३० दिवसांत नागरीकांत हरकती व सुचना मागवेल.

५) नागरीकांच्या हरकती व सुचनांवर प्रभाग फेरीवाला समिती सुनावणी घेईल व प्रस्ताव शहर फेरीवालासमितीकडे शिफारशीसह पाठवेल.

शिफारसीसह पाठवेल.

६) शहर फेरीवाला समितीकडून स्थिर व फिरता फेरीवाल्यांकरिता सुचविण्यात आलेल्या ठिकाणांचा प्रस्ताव ''अ''/''ब''/''क'' —वर्ग महानगरपालिका ठराव करून अंतिम मंजुरीकरिता शासनाकडे पाठवेल. आणि ''ड'' वर्ग महानगरपालिका अंतिम मंजुरीकरिता संचालक, नगरपालिका प्रशासन यांचेकडे पाठवेल.

७) अंतिम मंजुरी मिळाल्यानंतर आयुक्त स्थिर व फिरता फेरीवाल्यांची ठिकाणे दोन स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देवून प्रसिध्दी करेल.

८) प्रत्येक घोषित केलेल्या फेरीवाला क्षेत्रात त्याच्या तपशिलासह ''फेरीवाला क्षेत्र'' असे नामफलक लावण्यात येईल.

ब) **महानगरपालिका क्षेत्रात स्थिर व फिरता फेरीवाल्यांच्या नोंदणीची संख्या निश्चित करण्याची कार्यपध्दती:—**

१) शासनाच्या मान्यतेने फेरीवाला क्षेत्र म्हणून निश्चित करण्यात आलेली ठिकाणे व परिच्छेद क्र. ४.२ नुसार स्थिर फेरीवाला व्यवसायासाठी विशेष पध्दतीने निर्माण करण्यात आलेल्या किंवा निर्माण होवू शकणाऱ्या जागा यांच्या आधारे प्रभाग फेरीवाला तांत्रिक समिती प्रभागासाठी स्थिर व फिरता फेरीवाल्यांची नोंदणीची कमाल संख्या प्रभाग फेरीवाला समितीमार्फत शहर फेरीवाला समितीला सुचविल.

२) शहर फेरीवाला समितीकडून स्थिर व फिरता फेरीवाल्यांची नोंदणी करण्याकामी सुचविण्यात आलेली नोंदणीची कमाल संख्या ''अ''/''ब''/''क'' वर्ग महानगरपालिका ठराव करून अंतिम मंजुरीकरिता शासनाकडे पाठवेल आणि ''ड'' वर्ग महानगरपालिका ठराव करून अंतिम मंजूरीकरिता संचालक, नगरपालिका प्रशासन यांचेकडे पाठवेल.

## ४.१२ ना—फेरीवाला क्षेत्र जाहीर करणे—

### ४.१२१ ना—फेरीवाला क्षेत्रसाठी निकष—

ना—फेरीवाला क्षेत्र जाहीर करण्याकरिता खालील निकष वापरण्यात येती:—

१) २ मीटर पेक्षा कमी रूंदीचे पदपथ.

२) गर्दीच्या ठिकाणी, वाहतुकीची कोंडी होत असलेली ठिकाणे

३) कोणताही वाहन वाहतुकीचा पूल.

४) गोपनीयता व सुरक्षितता या कारणासाठी निश्चित केलेले क्षेत्र.

५) छुकानाच्या समोरील पदपथ.

६) महानगरपालिकेच्या बाजारापासून १०० मीटर अंतरापर्यंतचे क्षेत्र.

७) धार्मिक स्थळे, रूग्णालये, शैक्षणिक संस्था, रेल्वे स्टानके यांचे हद्दीपासून सर्व बाजूने १०० मीटर अंतरापर्यत रस्ते व पदपथ , परंतु धार्मिक स्थळाच्या शेजारी खालील व्यवसाय करणाऱ्या स्थिर फेरीवाल्यांकरिता जागा आरक्षित करता येईल.
   १) हार — तुरे
   २) नारळ, अगरबत्ती, मेनबत्ती विक्री
   ३) पुजा साहित्य

### ४.१२२ ना—फेरीवाला क्षेत्र घोषित करण्याचे प्राधान्यक्रम—

ना—फेरीवाला क्षेत्र जाहीर करतांना खालील प्राधान्यक्रम पाठण्यात येईल.
१) गोपनियता व सुरक्षितता या कारणासाठी निश्चित केलेली ठिकाणे
२) संवेदनशील ठिकाणे.उदा. धार्मिक स्थळे, रूग्णालये, शैक्षणिक संस्था,रेल्वे स्थानके इत्यादी.
३) गर्दीच्या ठिकाणी, वाहतुकीची कोंडी होत असलेली ठिकाणे.
४) दुकानासमोरील पदपथ.

### ४.१२३ कार्यपध्दती—

**अ) महानगरपालिका क्षेत्रात ना—फेरीवाला क्षेत्र जाहिर करण्याची कार्यध्दत—**

परिच्छेद ४.१२३ च्या प्राधान्यक्रमानुसार ना—फेरीवाला क्षेत्र घोषित करण्याकरिता खालील कार्यपध्दती अंवलंबविण्यात येईल:—

१) प्रभाग फेरीवाला तांत्रिक समिती परिच्छेद ४.१२३ च्या निकषानुसार त्यांच्या कार्य क्षेत्रात ना—फेरीवाला क्षेत्र म्हणून घोषित करावयाच्या क्षेत्राविषयी सविस्तर अहवाल प्रभाग फेरीवाला समितीस सादर करेल. प्रभाग फेरीवाला

घोषित करावयाच्या क्षेत्राविषयी सविस्तर अहवाल प्रभाग फेरीवाला समितीस सादर करेल. प्रभाग फेरीवाला समिती आपल्या शिफारसीसह महानगरपालिका शहर फेरीवाला समितीकडे प्रस्ताव सादर करेल.

२) प्रभाग फेरीवाला समिती ना–फेरीवाला क्षेत्राची शिफारस करण्यापुर्वी दोन स्थानिक वृत्तपत्रात नोटीस देईल व ३० दिवसांत नागरीकांच्या हरकती व सुचना मागवेल.

३) नागरीकांच्या हरकती व सुचनांवर प्रभाग फेरीवाला समिती सुनावणी घेईल व प्रस्ताव शहर फेरीवाला समितीकडे संमतीसाठी पाठवेल.

४) शहर फेरीवाला समिती महानगरपालिकेच्या मंजुरीने ना–फेरीवाला क्षेत्र जाहीर करेल.

५) महानगरपालिकेच्या मंजुरीनंतर आयुक्त दोन स्थानिक वृत्तपत्रात जाहीरात देवून मंजुर ना–फेरीवाला क्षेत्राची यादी प्रसिध्द करेल.

६) प्रत्येक घोषित केलेल्या ना–फेरीवाला क्षेत्रात त्याच्या तपशिलासह ''ना–फेरीवाला क्षेत्र'' असे नामफलक लावणे बंधनकारक राहील.

### ४.१२४ टप्प्या–टप्प्याने ना–फेरीवाला क्षेत्राची अंमलबजावणी –

**महानगरपालिकेने वरील कार्यपध्दतीनुसार ना–फेरीवाला क्षेत्र घोषित करतांना खालील प्रमाणे टप्प्या–टप्प्याने कार्यवाही करावयाची आहे:–**

अ) प्रथम परिच्छेद ४.१२१ च्या निकषानुसार जे रस्ते ना–फेरीवाला क्षेत्र म्हणून घोषित करावे लागतील त्यांची यादी तयार करण्यात येईल व परिच्छेद ४.१२२ प्रमाणे अशा रस्त्यांचे प्राथम्यक्रम ठरविण्यात येईल.

ब) सदर रस्त्यांवर व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांची यादी तयार करण्यात येईल व या फेरीवाल्यांच्या यादीमधून स्थिर फेरीवाल्यांकरिता परिच्छेद ५.१ नुसार पात्र असणाऱ्या स्थिर फेरीवाल्यांची यादी वेगळी करण्यात येईल.

क) या स्थिर फेरीवाल्यांच्या यादीतील पात्र स्थिर फेरीवाल्यांना परिच्छेद ४.२ नुसार उपलब्ध होणाऱ्या जागांमध्ये तसेच ज्या पदपथांना परिच्छेद ४.१२१ च्या निकषांची बाधा येत नाही अशा पदपथांवर ''तात्पुरता फेरीवाला क्षेत्र–८'' घोषित करून परिच्छेद ५.१ मध्ये विहीत प्राधान्यक्रमानुसार स्थलांतरीत करण्यात येईल.

वरीलप्रमाणे उपलब्ध जागा परिच्छेद ४.१२४(ब) प्रमाणे पात्र असणाऱ्या स्थिर फेरीवाल्यांच्या संख्येच्या तुलनेत अपुऱ्या असल्यास परिच्छेद ४.१२२ मध्ये कमी प्राधान्यक्रमाचे जे ना–फेरीवाला क्षेत्र आहेत अशा क्षेत्रांना निव्वळ तात्पुरत्या स्वरूपामध्ये ''तात्पुरता फेरीवाला क्षेत्र ८'' असे घोषित करता येऊ शकेल.

ड) जे फेरीवाले परिच्छेद ५.१ मधील फेरिवाल्यांच्या प्राधान्यक्रमात बसत नाहीत अशा फेरीवाल्यांची फिरता फेरीवाला म्हणून नोंदणी करता येईल व असे केल्यानंतर सदरचा रस्ता ना– फेरीवाला क्षेत्र म्हणून घोषित करण्यात येईल.

इ) जे रस्ते परिच्छेद ४.१२२ मधील प्राधान्यक्रमानुसार अग्रक्रमाने ना–फेरीवाला क्षेत्र म्हणून घोषित करावयाचे आहेत ते वरील प्रक्रियेंत प्रथम ''ना–फेरीवाला क्षेत्र'' म्हणून घोषित करण्यात येतील. व त्या ठिकाणी व्यवसाय करणाऱ्या परिच्छेद ५.१ प्रमाणे पात्र स्थिर फेरीवाल्यांचा परिच्छेद ४.२ प्रमाणे उपलब्ध होणाऱ्या जागा देण्यासाठी प्रथम विचार करण्यात येईल. त्यानंतर टप्प्या–टप्प्याने परिच्छेद ४.२ प्रमाणे जागा उपलब्ध झाल्यावर उत्तोत्तर ना–फेरीवाला क्षेत्र घोषित केले जाईल.

ई) परिच्छेद ४.२ नुसार स्थिर फेरीवाल्यासाठी टप्प्या–टप्प्याने अधिक जागा उपलब्ध होताच पदपथांवर तात्पुरता फेरीवाला क्षेत्रात बसविलेल्या स्थिर फेरीवाल्यांना स्थलांतरीत करण्यात येईल.

फ) उपरोक्त प्रक्रियेची अंमलबजावणी करून परिच्छेद ४.१२१ च्या निकषात येणारे रस्ते ना–फेरीवाला क्षेत्र म्हणून घोषित करण्यात येईल.

### (फेरीवाल्यांचे विनियमनाकरिता कृती आराखडा)

### ४.१३ टप्प्या–टप्प्याने ना–फेरीवाला क्षेत्राची अंमलबजावणी –

उल्हानगरपालिकेकडून फेरीवाल्यांच्या व्यवसायाचे विनियम खालील प्रमाणे करण्यात येईल:–

१) सर्वेक्षणाच्या माध्यमातून फेरीवाल्यांची गणना करण्यात येईल.

२) गणना केलेल्या फेरीवाल्यांची व्यवसाय निहाय परिच्छेद ४.२१ मधील क्र. ३ प्रमाणे वर्गवारी केली जाईल.

३) प्रथम प्राधान्याने घोषित करण्यात येणारे ना–फेरीवाला क्षेत्रात व्यवसाय करणाऱ्या नोंदणीकृत स्थिर फेरीवाल्यांना त्वरीत परिच्छेद क्र. ४.२ नुसार उपलब्ध नागरी जागांमध्ये परिच्छेद ५.१ मधील प्राधान्यक्रमानुसार स्थलांतरीत करण्यात येईल. यानंतर शिल्लक राहीलेल्या नोंदणीकृत स्थिर फेरीवाल्यांना परिच्छेद क्र. ५.१ मधील प्राधान्यक्रमानुसार तुर्तास घोषित केलेल्या ''तात्पुरता फेरीवाला क्षेत्र–८'' मध्ये स्थलांतरीत करण्यात येईल.

४) स्थिर फेरीवाल्यांकरिता अधिकअधिक जागा परिच्छेद ४.२ प्रमाणे तयार करण्यासाठी महानगरपालिका प्रयत्न करतील. टप्प्या–टप्प्याने उपलब्ध होणाऱ्या अशा नागरी जागांमध्ये तात्पुरता फेरीवाला क्षेत्रात व्यवसाय करणाऱ्या

नोंदणीकृत स्थिर फेरीवाल्यांना टप्प्या–टप्प्याने परिच्छेद ५.१ मधील प्राधान्यक्रमानुसार स्थलांतरीत करण्यात येईल. रस्ते व पदपथ फेरीवाले मुक्त राहण्याच्या उद्देशाने टप्प्या–टप्प्याने सर्व घोषित केलेले तात्पुरता फेरीवाला क्षेत्र–८, यांचा बदल ना–फेरीवाला क्षेत्रात करण्याच्या दृष्टीने सुक्ष्म नियोजन करून त्यानुसार अंमलबजावणी करण्यात येईल.

## ४.२ फेरीवाल्यांच्या व्यवसायाकरिता नवीन जागा निर्माण करणे.

### ४.२१ स्थिर फेरीवाल्यांकरिता जागेचे नियोजन–

१) सर्वसाधारण महानगरपालिकेच्या क्षेत्रात, तात्पुरता फेरीवाला क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आलेले क्षेत्र वगळता, रस्ता व पदपथावर स्थिर फेरीवाल्यांना व्यवसाय करणे अनुज्ञेय असणार नाही.

२) नवीन विकास आराखडा तयार करतेवेळेस तसेच शहराच्या नवीन भागाच्या विकासाच्या वेळेस नियोजनामध्ये फेरीवाल्यांच्या जागेचे नियोजन करण्यात येईल.

३) स्थिर फेरीवाल्यांकरिता जागेचे नियोजन करते वेळेस शक्यतो फेरीवाल्यांचे तीन प्रकारची वर्गवारी करण्यात येईल. अ) तयार खादयपदार्थ किंवा खादयपदार्थ त्याच ठिकाणी तयार करून विक्री करणारे फेरीवाल्याकरिता जागेचे नियोजन. ब) भाजीपाला, फळे, दुध, अंडी इ. विक्री करणारे फेरीवाले क) इतर फेरीवाले (उदा. रेडीमेड गारमेंट, कटलरी इ.)

१) फुडप्लाझा तयार करणे अ) महत्वाच्या ठिकाणी उदा. रेल्वे स्टेशन, बस स्थानके, शाळा, महाविद्यालये, सिनेमागृह इत्यादी जवळ ''फुड प्लाझा'' तयार करण्यात येतील. जे प्राधिकरणे किंवा खाजगी मालक याकरिता जागा उपलब्ध करून देतील अशांना त्यांनी उपलब्ध करून दिलेल्या जागेबद्दल हस्तांतरणीय विकास हक्क ;ज्क्त्ष्द्ध किंवा प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्र निर्देशांक देता येईल.

ब) खाद्यापदार्थ त्याच ठिकाणी तयार करून विक्री करणारे फेरीवाल्यांची जागा ही तयार खाद्य पदार्थ विक्री करणाऱ्या फेरीवाल्यांच्या जागेपेक्षा जास्त राहील.

क) फूड प्लाझा मध्ये सामायिक सोयी सुविधा करण्यात येतील. उदा. खाण्यासाठीची जागा, हात धुण्याची व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, कचरा कुंडी इत्यादी.

टिप:– याकरिता महानगरपालिकेने विकास नियमावलीमध्ये आवश्यक ते बदल करून घ्यावेत.)

२) **''रात्रीकालीन फूड कोर्ट''–**

ज्या रस्त्यांवर संध्याकाळ नंतर रहदारीचे प्रमाण नाही अशा रस्त्यांची रात्रीकालीन फूड कोर्टसाठी निवड करण्यात येईल. या रस्त्यांवर रात्री ८.०० नंतर महानगरपालिका मान्यता दिलेल्या आकार/प्रकारच्या वाहनांमार्फत नोंदणीकृत फिरत्या फेरीवाल्यांना खाद्यपदार्थ विक्री करता येईल.

३) **''सप्ताहांत फूट कोर्ट'–**

सार्वजनिक सुटटीच्या दिवशी तसेच सप्ताहाच्या अखेरचे दोन दिवसांकरिता (शनिवार, रविवार) शहरातील काही भागांतील रस्ते व पदपथ सप्ताहांत फूड कोर्ट करिता राखीव ठेवता येतील. या रस्त्यांवर रात्री ८.०० नंतर महानगरपालिकेने मान्यता दिलेल्या आकार/प्रकारच्या वाहनांमार्फत नोंदणीकृत फिरत्या फेरीवाल्यांना खाद्यपदार्थ विक्री करता येईल.

### ब) भाजीपाला, फळे, दूध, अंडी इत्यादी विक्री करणारे फेरीवाल्यांकरिता जागेच नियोजन–

१) महानगरपालिका क्षेत्रात नविन पालिका बाजार बांधतांना किंवा जुन्या बाजारांचा पुनर्विकास करतेवेळेस नोंदणीकृत स्थिर फेरीवाल्यांकरिता जागेचे नियोजन करण्यात येईल. याकरीता वाढीव एफ.एस.आय. उपलब्ध करून एकूण चटई क्षेत्राच्या ५० टक्के जागेमध्ये फेरीवाल्यांचे नियोजन करण्यात येईल.

या नियोजनामध्ये इमारतीच्या सर्वात वरचा मजला फूड कोर्टकरिता राखीव ठेवण्यात येईल. इतर मजल्यांमध्ये ५० टक्के जागा ही दैनंदिन गरजेच्या वस्तु विक्री करणाऱ्या नोंदणीकृत स्थित फेरीवाल्यांकरिता राखीव ठेवून उर्वरित जागा इतर व्यवसायीकांना / दुकानदारांना देण्यात येईल, जेणेकरून नागरिक तेथे आकर्षित होतील.

(टिप:– याकरिता महानगरपालिकेने विकास नियमावलीमध्ये आवश्यक ते बदल करून घ्यावेत.)

२) महानगरपालिका यांच्या क्षेत्रातील जुन्या इमारतींचे पुनर्विकास, झोपडपटटी पुनर्विकास आणि नागरी नुतणीकरण योजना ;न्तइंद त्मदमूंस ैबीमउमद्ध इत्यादी योजनामध्ये नागरीकांच्या सोयीच्या दृष्टीने इमारतींमध्ये खालीत दैनंदिन गरजेच्या वस्तुंच्या विक्रीकरिता राखीव गाळे बांधणे अनुज्ञेय असेल.

१) भाजीपाला व फळे

२) दूध, ब्रेड व अंडी

३) किरणा माल

४) इस्त्रीवाला किंवा औषधे

सदर गाळे नोंदणीकृत स्थिर फेरीवाल्यांसाठी उपलब्ध करण्याची लेखी हमी दिल्यास या गाळयांकरीता आवश्यक असणारे बांधकाम क्षेत्र चटईक्षेत्र मुक्त अनुज्ञेय राहील. (टीप :— याकरिता महानगरपालिकेने विकास नियमानलीमध्ये आवश्यक ते बदल करून घ्यावेत.)

३) खाजगी इमारतींना बांधकाम परवानगी देते वेळेस त्यातील रहिवाशांना सोयीच्या दृष्टीने खालील दैनंदिन गरजेच्या वस्तुंच्या विक्रीकरिता गाळे बांधणे अनुज्ञेय असेल. सदरचे गाळे खालील वस्तुंच्या विक्रीकरिता राखीव राहतील.

१) भाजीपाला व फळे

२) दूध, ब्रेड व अंडी

३) किरणा माल

४) इस्त्रीवाला किंवा औषधे

सदर गाळे नोंदणीकृत स्थिर फेरीवाल्यांसाठी उपलब्ध करण्याची लेखी हमी दिल्यास या गाळयांकरिता आवश्यक असणारे बांधकाम क्षेत्र चटईक्षेत्र मुक्त अनुज्ञेय राहील.

(टिप:— याकरिता महानगरपालिकेने विकास नियमावलीमध्ये आवश्यक ते बदल करून घ्यावेत.)

४) महानगरपालिका क्षेत्रातील मोठया क्षेत्राच्या अभिन्यासामध्ये सोडावयाच्या सुविधा क्षेत्रावर बांधकाम करतांना अनुज्ञेय चटई क्षेत्राच्या २० टक्के बांधकाम क्षेत्र दैनंदिन गरजेच्या वस्तु विक्री केंद्रासाठी अनुज्ञेय असेल व त्याच्या ५०टक्के क्षेत्र हे दैनंदिन गरजेच्या वस्तु विक्री करणाऱ्या नोंदणीकृत स्थिर फेरीवाल्यांकरिता राखीव ठेवण्यात येईल.

(टिप:— याकरिता महानगरपालिकेने विकास नियमावलीमध्ये आवश्यक ते बदल करून घ्यावेत.)

५) महानगरपालिका क्षेत्रात अस्तित्वात असणाऱ्या गृहनिर्माण संस्थांच्या मोकळया जागेत नोंदणीकृत फेरीवाल्यांकरिता काही वेळ व्यवसाय करण्यासाठी गुहनिर्माण संस्थांच्या परवानगीने मुभा देता येईल.

**क) इतर फेरीवाले (उदा. रेडीमेड गारमेंट, कटलरी इ.) करिता जागेचे नियोजन करणे—**

१) महानगरपालिका क्षेत्रात अस्तित्वात असणाऱ्या गृहनिर्माण संस्थांच्या मोकळया जागेत नोंदणीकृत फेरीवाल्यांकरिता काही वेळ व्यवसाय करण्यासाठी गुहनिर्माण संस्थांच्या परवानगीने मुभा देता येईल.

२) महानगरपालिकेच्या क्षेत्रात भुयारी वाहनतळाचे बांधकाम करतांना वाणिज्यीक वापरासाठी अनुज्ञेय असणाऱ्या क्षेत्राच्या ५ टक्के इतकी जागा फेरीवाल्यांकरिता राखीव ठेवण्यात येईल. मात्र, अशा ठिकाणी प्रकाश, खेळती व शुध्द हवा मिळेल अशी रचना वाहनतळाची करणे क्रमप्राप्त राहील.

(टिप:— याकरिता महानगरपालिकेने विकास नियमावलीमध्ये आवश्यक ते बदल करून घ्यावेत.)

## ४.३ फेरीवाला क्षेत्रात पुरविण्यात येणाऱ्या सोयी सुविधा—

फेरीवाला क्षेत्र—I मध्ये फेरीवाला भूखंडात संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्थेकडून खालील सोयी सुविधा पुरविण्यात येतील.

१) घनकचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी तरतुदी करणे.

२) स्वच्छता राखण्यासाठी सार्वजनिक स्वच्छतागृहे बांधणे.

३) विज पुरविणे.

४) पिण्याच्या पाण्याची तरतुद करणे.

५) ऊन, पाऊस, धूळ व वारा इत्यांदीपासून संरक्षण होण्यासाठी सार्वजनिक आच्छदनाची व्यवस्था करणे.

महानगरपालिकेला उपरोक्त सोयी सुविधा पुरविण्याकरिता आलेला खर्च महानगरपालिकेला संबंधीत फेरीवाल्यांकडून वसुल करता येईल.

## भाग–५

## स्थिर फेरीवाल्यांच्या व्यवसायाकरिता जागा वाटप करणे.

**५.१ स्थिर फेरीवाल्यांना स्थलांतरीत करण्याकरिता प्राधान्यक्रम–**

१) प्रथम घोषित करण्यात येणारे ना फेरीवाला क्षेत्रात व्यवसाय करणारे फेरीवाले.

२) महानगरपालिकेच्या विकास योजनेअंतर्गत ताब्यात घेतलेल्या किंवा घ्यावयाच्या जागांवर व्यवसाय करणारे पात्र स्थिर फेरीवाले.

३) तात्पुरता स्वरूपात फेरीवाला क्षेत्र–**I** म्हणून घोषित केलेल्या क्षेत्रामध्ये व्यवसाय करणारे स्थिर फेरीवाले.

उपरोक्त प्रमाणे प्रत्येक स्थलांतरणाच्या प्रसंगी स्थिर फेरीवाल्यांना स्थलांतरीत करण्याकरिता खालीलप्रमाणे क्रमवारी ठेवण्यात येईल:–

ट) प्रथम महाराष्ट्र राज्यात १५ वर्षाच्या वास्तव्याचा पुरावा असलेल्या पुर्वीपासूनच्या परवानाधारक फेरीवाल्यांचा त्यांच्या परवानाच्या दिनांकापासून प्राधान्यक्रम ठरविण्यात येईल. यांनतर जागा शिल्लक असल्यास,

ब) महाराष्ट्र राज्यात १५ वर्षाचे वास्तव्य असलेले इतर फेरीवाले यांचा विचार करण्यात येईल.

**५.२ जागा वाटपासाठी समांतर आरक्षण–**

उपरोक्त प्राधान्यक्रमानुसार स्थिर फेरीवाल्यांना जागा वाटप करतेवेळी यांचा विचार करण्यात येईल.

अ) अंपग व्यक्ती ३:
ब) मागासर्गीय – २०:
क) दारिद्र्य रेषेखालील व्यक्ती– १०:

या प्रत्येक प्रवर्गामध्ये ३०: महिला आरक्षण ठेवण्यात येईल व त्यात निराधार विधवा महीलांना प्राधान्य देण्यात येईल.

**५.३ परवानाधारक स्थिर फेरीवाल्यांना स्थलांतरीत करण्याची कार्यपध्दती–**

१) महाराष्ट्र राज्यात १५ वर्षाचे वास्तव्य असलेल्या परवनाधारक स्थिर फेरीवाल्यांची त्यांच्या परवानाच्या दिनांकाच्या आधारे जेष्ठता सुची तयार करण्यात येईल व ज्येष्ठतेनुसार जागा वाटपाकरिता त्यांचा विचार करण्यात येईल.

| | |
|---|---|
| २) | शहर फेरीवाला समिती यांनी सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने फरीवाला क्षेत्र व ना–फेरीवाला क्षेत्र घोषित केल्यानंतर फेरीवाला क्षेत्रामध्ये व्यवसाय करणाऱ्या पुर्वीपासूनच्या परवानाधारक फेरीवाल्यांना जागांचे वाटप करतांना शक्यतो त्याच ठिकाणी किंवा त्याच प्रभागात जागा देण्यात येईल. |
| ३) | जे ना–फेरीवाला क्षेत्रात परवानाधारक फेरीवाले व्यवसाय करित आहेत त्यांचे स्थलांतर शक्यतो त्याच प्रभागातील फेरीवाला क्षेत्रामध्ये करण्यात येईल. फेरीवाल्यांची संख्या जागेच्या संख्यपेक्षा जास्त असल्यास जागेचे वाटप सोडत पध्दतीने करण्यात येईल. |

**५.४ सोडत पध्दीतीने जागा वाटप करणे.**

| | |
|---|---|
| १) | ज्या फेरीवाला क्षेत्रामध्ये जागेच्या संख्येपेक्षा अर्जांची संख्या जास्त आसल्यास सोडत पध्दतीने अर्जदाराची नावे निश्चित करण्यात येतील. |
| २) | एखाद्या अर्जदारास मिळालेली जागा नको असल्यास पुन्हा नव्याने सोडत काढण्याची वेळ येवू नये यासाठी जागेच्या संख्यपेक्षा ५टक्के जास्त अधिक अर्जदारांची नावे सोडतीत निश्चित करून ती नावे प्रतिज्ञा यादीवर ठेवली जातील. |
| ३) | सदरची सोडत पंचमंडळामार्फत करण्यात येईल. |
| ४) | प्रत्यक्ष सोडत सुरू करण्यापुर्वी उपस्थितांसमोर व पंचमंडळामार्फत सोडतीचे प्रात्यक्षिक दाखविले जाईल. |
| ५) | सोडतीचा निकाल, फलकावर तात्काळ प्रदर्शित केला जाईल. प्रतिक्षा यादीचा निकालही प्रदर्शित केला जाईल. |
| ६) | पंचमंडळ प्रात्यक्षिकापासून ते निकाल प्रदर्शित करण्यापर्यंतच्या सर्व बाबींची तपशिलवार नोंद करून त्या अभिलेखावर सहया करतील. |
| ७) | पंचमंडळाने अंतिम केलेला निकाल प्रभाग/विभाग कार्यालयाच्या सुचनाफलकावर प्रसिध्द केला जाईल. |
| ८) | पंचमंडळाचा अध्यक्ष याबाबतची माहिती लेखी स्वरूपात प्रभा फेरीवाला समितीस कळवेल. |

## भाग—६

१४. सामाजिक सुरक्षितता

ट) भागभांडवलाकरिता मदत.

फेरीवाला क्षेत्र व्यवस्थापन समिती त्यांच्या सभासदांची वर्गणी एकत्र करून बँकेत जमा करील व त्यातुन विविध नागरी सोयींच्या देयकांची रक्कम संबंधित प्राधिकरणाकडे जमा करील. फेरीवाल्यांच्या गरजेनुसार फेरीवाल्यांना भागभांडवालावरील जिल्हयाच्या लीड बँकेच्या सहाय्याने कर्ज उपलब्ध करून देण्यास महानगरपालिका मदत करतील.

ब) विमा संरक्षण.

१) फेरीवाल्यांकरिता अपघाती विमाचे संरक्षण असावे.
२) फेरीवाल्यांकरिता आरोग्य विमाचे संरक्षण असावे.
३) फरीवाल्यांकरिता मालाचे व विक्री वाहन संरक्षणार्थ विमा असावा.

वरीलप्रमाणे विमा संरक्षणाकरिता फेरीवाल्याची नोंदणी करतांना नोंदणी शुल्कामध्येच महानगरपालिका यांचेकडून विमाची रक्कम भरणा करून घेण्यात येईल किंवा फेरीवाला क्षेत्र व्यवस्थापन समितीमार्फत स्वतंत्रपणे विमाची रक्कम जमा करून घेवून सर्व फेरीवाल्यांचे एकत्रित विमा काढण्यात येईल.

क) आरोग्य तपासणी.

महानगरपालिकेच्या नागरी आरोग्य केंद्रामार्फत त्यांच्या कार्यक्षत्रातील फेरीवाल्यांची वैद्यकिय तपासणी किमान वर्षातून एकदा करण्यात येईल, शहर फेरीवाला समितीला आवश्यतेनुसार फेरीवाल्यांची वैद्यकिय तपासणीचा कालावधी कमी करता येईल.

ड) प्रशिक्षण व कौशल्यात वाढ—

फेरीवाले हे अतिशय लहान उद्योजक असल्याने त्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी त्याचप्रमाणे उत्पन्नाचे पर्यायी मार्ग शोधण्यासाठी त्यांचे तांत्रिक व व्यवसायीक कौशल्य वाढविण्याच्या दृष्टीने त्यांना प्रशिक्षण देण्याची व्यवस्था महानगरपालिका यांच्या मार्फत करण्यात येईल.

१५. महसुल गोळा करणे.

१) प्रभाग फेरीवाले समिती खालीलप्रमाणे शुल्क आकारेल:—
अ) नोंदणी शुल्क (फी)
ब) मासिक परिरक्षण आकार: हे व्यवसायाचे स्थान/प्रकार यानुसार वेगवेगळे असतील.
क) दंड

२) सदर गोळा केलेला महसुल हा महानगरपालिका निधीत जमा होईल. या निधीचा वेगळा लेखा ठेवण्यात येईल. या निधिच्या अनुषंगाने फेरीवाला समित्यांच्या कामकाजाचे अर्थसंकल्प तयार करण्यात येईल.

## भाग—७

१६. संनियंत्रण—

१) सदर उपविधीची अंमलबजावणी यशस्वीरित्या होण्याकरिता महानगरपालिका शहरातील ना फेरीवाला क्षेत्रातील रस्त्यांची विभागणी बीट निहाय करेल.
२) प्रत्येक बीटवर पर्यवेक्षण ठेवण्यासाठी महानगरपालिका पर्यवेक्षक कर्मचाऱ्यांची नेमणूक करेल.
३) नोंदणी न करणाऱ्या फेरीवाल्यांविरूध्द संबंधीत महानगरपालिकेच्या अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे दखलपात्र गुन्हा नोंदविण्यात येईल.
४) न—फेरीवाला क्षेत्रात व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांविरूध्द संबंधित महानगरपालिकेच्या अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे दखलपात्र गुन्हा नोंदविण्यात येईल.
५) न—फेरीवाला क्षेत्रातून महानगरपालिकेने जप्त केलेले सामान परत मिळणार नाही व अशा सामानाचा लिलाव महानगरपालिकेकडून करण्यात येईल.

**१७. शास्ती—**

या उपविधीच्या भंग करण्याबद्दल अपराध्यास—

अ) नोंदणी न करता व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यास, अपराध सिध्दीनंतर, सहा महिने पर्यंत साध्या कैदेची आणि रूपये पाच हजार पर्यंत इतक्या दंडाची शिक्षा होईल.

क) ना—फेरीवाला क्षेत्रात व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यास, अपराध सिध्दीनंतर , सहा महिने पर्यंत साध्या कैदेची आणि रूपये पाच हजर पर्यंत इतक्या दंडाची शिक्षा होईल.

क) वरील (अ) व (ब) व्यतिरिक्त या उपविधीतील अन्य तरतुदींचा कोणत्याही प्रकारे भंग करण्याबद्दल अपराध्यास पाचशे रूपयापर्यंत असू शकेल अश दंडाची शिक्षा होईल, आणि भंग करणे चालु राहिल्यास बाबतील, पहिल्यांदा भंग केल्याबद्दल दंड झाल्यानंतर ज्या दिवशी भंग करणे चालु रहील अशा प्रत्येक दिवसासाठी वीस रूपयांपर्यंत असु शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल. वरीलप्रमाणे दंड करण्यापुर्वी महानगरपालिकेच्या आयुक्तांकडून किंवा त्याबाबत रीतसर प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याकडून संबंधीत फेरीवाल्यास लेखी नोटीस देण्यात येईल व त्यांचे म्हणणे नोटीसीत विहित करण्यात आलेल्या कालावधीत प्राप्त झाल्यास त्याचा विचार करून दंडाविषयी योग्य तो निर्णय घेण्यात येईल. असा दंड करण्याशिवाय आणखी, आपल्या अधिकाराच्या कक्षेत असेल तेथवर, अपकृती सुधारण्यास दोषी फेरीवाल्यास भाग पाडता येईल.

**१८. निर्वाचनाच्या शक्ती —**

या उपविधीच्या कोणत्याही तरतुदींचा अर्थ लावण्यासंबंधी विवाद उत्पन्न झाल्यास अशा ठिकाणी महानगरपालिका आयुक्तयांचा निण्रय अंतिम राहील.

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ११ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ११ :—** रोटरी क्लब, उल्हासनगर मिड टाउन यांना दिलेला साधुवासवानी उदयान, गोल मैदान येथिल महापालिकेची जागा वापर परवाना करार रद्द करणे.

---

<u>काही सदस्य :—</u> हा प्रस्ताव या सभेच्या कामकाजातुन वगळण्यात यावा.

<u>महापालिका सचिव :—</u> सर्व संमतीने?

<u>महापौर :—</u> सदरचा विषय या सभेच्या कामकाजातून वगळण्याकामी सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ११:—** रोटरी क्लब, उल्हासनगर मिड टाउन यांना दिलेला साधुवासवानी उदयान, गोल मैदान येथिल महापालिकेची जागा वापर परवाना करार रद्द करणे.

<u>प्रस्तावना</u>

महापालिका मालकीचे गोल मैदान येथिल साधु वासवानी उदयानातील जागेपैकी ५३०० चौ.मी. जागा रोटरी क्लब ऑफ उल्हासनगर मिडटाऊन यांना १० वर्ष कालावधीकरीता उदयानाचा विकास करणे, उदयानाचे जागाचे सौंदर्यीकरण करणे व देखभालीसाठी महासभा ठराव क्र. ६३, दिनांक २०/८/२००३ अन्वये मंजुरी देण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने अटी व शर्तीच्या अधिन राहून संस्थेबाबत करारनामा करण्यात आलेला आहे.

करारातील अट क्र. २ मध्ये संस्थेस सदर जागेचा हक्क किंवा जागेचे हस्तांतरण इतर कोणत्याही संस्थेस किंवा व्यक्तीस करता येणार नाही किंवा अन्य कोणत्याही मार्गाने अन्य पक्षाचे हितसंबंध निर्माण करता येणार नाही असे नमुद केलेले आहे.

परंतु दिनांक ६/१०/२००८ रोजी साधु वासवानी उदयानातील जागा रोटरी क्लब ऑफ उल्हासनगर मिडटाउन यांनी मे. गोल्डन ॲम्युजमेंट यांना दिनांक २०/२/२००७ रोजी करारनामा करुन भाडयाने दिलेबाबत तक्रार प्राप्त झालेले असल्याने सदर बाबींचा खुलासा करणेबाबत रोटरी क्लब ऑफ उल्हासनगर मिडटाउन यांना दिनांक १७/१०/२००८ रोजी आदेशित करण्यात आले होते.

रोटरी क्लब ऑफ उल्हासनगर मिडटाउन यांनी वरील बाबींचा खुलासा सादर न केल्याने त्यांना दिनांक ७/११/२००८ रोजीच्यापत्रान्वये २ दिवसाचे आत खुलासा सादर करणेबाबत आदेशित करण्यात आले होते.

त्या अनुषंगाने रोटरी क्लब ऑफ उल्हासनगर मिडटाउन यांनी ८/११/२००८ रोजी सादर केलेला खुलासा मालमत्ता विभागास दिनांक ११/११/२००८ रोजी प्राप्त झालेला असून त्यामध्ये संस्थेने रोटरी क्लब ऑफ उल्हासनगर मिडटाउन साधु वासवानी उदयानातील जागा इतर कोणासही भाडयाने वापरण्यास दिलेली नसुन ॲम्युजमेंटचे हक्क रोटरी क्लब ऑफ उल्हासनगर मिडटाउन यांचेकडेच आहेत. तसेच कार्यरत कर्मचारी सुध्दा संस्थेचेच आहेत. तसेच उदयानास त्यांनी स्वत:चे कुलूप लावलेले असून संपुर्ण जागा त्यांच्या ताब्यात आहे.

रोटरी क्लब ऑफ उल्हासनगर मिडटाउन यांनी मे. गोल्डन ॲम्युजमेंट किंवा इतर अन्य कोणाबरोबरही करारनामा केलेला नाही. त्यांचे माजी अध्यक्ष श्री. जेटो पुरस्वानी यांनी मे. गोल्डन ॲम्युजमेंट यांचे बरोबर दिनांक २०/२/००७ रोजी केलेला करारनामा दिनांक २१/२/२००७ रोजी तात्काळ रद्द केलेला आहे. तसेच अशा प्रकारची भविष्यात चुक होणार नाही असे नमुद केले आहे. यावरुन संस्थेने करारातील अट क्र. २ चा भंग केल्याचे लेखी पत्राद्वारे मान्य केल्याचे दिसून येत आहे.

तरी उक्त बाबी विचारात घेता साधु वासवानी उदयान, गोल मैदान येथिल जागेबाबत रोटरी क्लब ऑफ उल्हासनगर मिडटाउन यांचे सोबत केलेल्या करारनाम्याबाबत मा. महासभा पटलावर निर्णयार्थ प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> १२अ दिनांक:— १९/६/२००९

सुचकाचे नाव :— श्री. रामसागर यादव

अनुमोदकाचे नाव :— श्री. राम पारवानी

ही महासभा रोटरी क्लब, उल्हासनगर मिड टाउन यांना दिलेला साधुवासवानी उदयान, गोल मैदान येथिल महापालिकेची जागा वापर परवाना करार रद्द करणे बाबतचा प्रस्ताव सविस्तर माहिती अभावी आजच्या सभेच्या कामकाजातुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. १२ वाचुन दाखवितात

---

➪ **विषय क्र. १२ :– वर्ग ४ च्या विविध संवर्गातील ८ कर्मचा-यांना लिपिक पदी पदोन्नती देणे.**

---

<u>काही सदस्य :–</u>पास–पास........, सर्व संमतीने पास.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे:–</u> भरपुर दिवसापासून हा विषय रेंगाळला होता आजच्या सभेपुढे तो आलेला आहे, तो सर्व संमतीने पारित करा. आठ लोंकाना पदोन्नती देण्याचा हा जो प्रस्ताव आहे हा पास करावा, बाकीचे जे अपात्र आहेत त्यांच्या बाबतचा प्रस्ताव नंतरच्या सभेत आणावा. आता याला कोणी विरोध करु नये.

<u>सदस्य श्री. राजेश वधारीया:–</u> मा. महापौरजी या विषयावर बोलण्यास मला संधी दिली जावी. मा. महापौरजी पदोन्नतीचा हा जो प्रस्ताव सभागृहापुढे आणलेला आहे, या अगोदर महासभेमध्ये जो प्रस्ताव पास केला होता, त्यानुसारच हा प्रस्ताव आहे की शासन निर्णयानुसार आहे, कृपया करुन याचा खुलासा करावा.

<u>श्री. मिलिंद सावंत, उप–आयुक्त, (मु):–</u> मा. महापौर, उप–महापौर, आयुक्त साहेब व सचिव साहेब, आता श्री. राजेश वधारीया यांनी जो प्रश्न विचारला त्याचे उत्तरादाखल मी सांगु इच्छितो की, आठ कर्मचाऱ्यांना पदोन्ती देण्याचा जो प्रस्ताव आहे तो शासन निर्णयानुसारच आहे.

<u>सदस्य श्री. राजेश वधारीया:–</u> तर या अगोदरचा जो ठराव आहे त्यामध्ये आपण सुधारणा केली आहे का?

<u>श्री. मिलिंद सावंत, उप–आयुक्त, (मु):–</u> हे जे आठ कर्मचारी निवडलेले आहेत ते शासन निर्णया मध्ये ज्या अटी आहेत त्या सर्व अटींची हे कर्मचारी पुर्तता करत आहेत त्यानूसारच त्याना आम्ही निवडले आहेत.

<u>सदस्य श्री. राजेश वधारीया:–</u> हेच मी मागील महासभेत त्यावेळेस बोलत होतो की, शासन निर्णया नूसार आपला ठराव चुकीचा आहे तर त्यावेळेस माझे म्हणणे ऐकुन घेतले नव्हते, त्या प्रस्तावाबाबतीत मी नकारात्मक मतदान केले होते त्यावेळेस आपण माझे म्हणणे ऐकुन घेतले नाही. आज आपण म्हणत आहात की, शासननिर्णयातील तरतुदीनुसार पदोन्नतीचा हा प्रस्ताव आणलेला आहे, तर आपला ठराव चुकीचा आहे, म्हणुन आपण प्रथम त्या ठरावामध्ये सुधारणा करा.

<u>श्री. मिलिंद सावंत, उप–आयुक्त, (मु):–</u> ठराव असा होता की, पात्र कर्मचाऱ्यांना प्रथम पदोन्नती दिली जाईल, व जे अपात्र कर्मचारी आहेत त्याच्यासाठी थोडीसी सवलत दिली जावी. जे पात्र कर्मचारी आहेत त्यांचाच सध्या प्रस्ताव सभागृहापुढे आणला आहे, अपात्र कर्मचाऱ्यांचा प्रस्ताव सभागृहापुढे आणलेला नाही.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी:–</u> मा. महापौरजी, मी आयुक्त साहेंबाना असे विचारु की इच्छितो, कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्याबाबतचा आम्ही महासभेमध्ये प्रस्ताव पारित करतो, परंतु दुखा:ने सांगावे लागते की नऊ नऊ महिने, एक एक वर्ष उलटला नंतरही आजपर्यंत त्याची अमंलबजावणी केली जात नाही. आता दोन महिन्यापुर्वी मला एक महिला कर्मचारी भेटली होती तिने सांगितले की, मला पदोन्नती देण्याचा प्रस्ताव तुम्ही पारित केला परंतु मला ती पदोन्नती मिळाली नाही मी ज्या पदावर होती त्याच पदावर निवृत्त झाली. महासभेने ठराव पारित केल्यानंतरही त्याची अमंलबजावणी का केली जात नाही? आता हा ठराव पारित करत आहोत, त्याबाबत माझी आपणांस विनंती आहे की, या ठरावाची अंमलबजावणी केली जावी, दुसरे असे की, ३९ सफाईकामगारांना सफाई मुकादमाची पदोन्नती दिली ते चांगले झाले, परंतु त्या ज्या ३९ बीट आहेत त्या खाली पडल्या आहेत, त्या बीट भरण्यासाठी आपणांस ज्या सफाई कामगाराची भरती करायची आहे त्याबाबतही विचार केला जावा.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे:–</u> मा. महापौर महोदया, व आयुक्त साहेब ज्या आठ कर्मचाऱ्यांना आपण पदोन्नती देत आहोत त्यांना या सभेचे इतिवृत्त कायम होण्यापर्यंत थांबवु नका, आठ दिवसांच्या आत त्यांना पदोन्नतीचे आदेश दया.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे:–</u> सन्मा. महापौरजी, आज हा जो विषय सभागृहापुढे आणलेला आहे, तो अतिशय चांगला आहे. गेल्या बारा चौदा वर्षापासुन ......

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे:–</u> या प्रस्तावाबाबत जो ठराव करण्यात येईल त्यात इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता या ठरावांअतर्गतचा निर्णय थेट अमंलात आणता येईल अशी नोंद घेण्यात यावी.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे:–</u> अहो श्री. धांडे मला जरा बोलु दया.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे:–</u> तुम्हीच बोलणार का? दुसऱ्यांना बोलण्याचा अधिकार नाही का? मी बोलत असताना तुम्ही मध्येच कशाला बोलता. थाबा जरा.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे:–</u> मी महत्वाचे बोलतो आहे.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे:–</u> मी पण महत्वाचे बोलतो आहे, तुम्ही थांबा जरा, तुम्ही कशाला सगळयांना थाबां थाबां म्हणता, मी पण महत्वाचे बोलतोय.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल:–</u> श्री. बी.बी. मोरे वरिष्ठ आहेत त्यांना बोलु दया.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे:–</u> पुढील सभेत इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता लवकरात लवकर पदोन्नतीचे आदेश देण्यात यावेत. अशी आपणांस महासभेपुढे विनंती आहे.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे:–</u> सन्मा. महापौरजी, आयुक्त साहेब, आज सभागृहापुढे संवर्ग चार च्या कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्याचा हा जो विषय आलेला आहे. गेल्या कित्येक वर्ष पदोन्नतीचा विषय या महापालिकेमध्ये हाताळला नाही. यावेळेला पदोन्नती देण्याची ही जी बुध्दी सुचली, गेल्या कित्येक वर्षापासुन जे कर्मचारी पदोन्नतीसाठी ताटकळत होते त्यांच्याबाबतचा हा प्रस्ताव या सभागृहापुढे आलेला आहे तो आपण करावा. कारण की ते गेल्या कित्येक वर्षापासुन ते पदोन्नतीसाठी पात्र आहेत तेव्हा या आठ कर्मचाऱ्यांचा विषय पारित करावा. बाकीच्या कर्मचाऱ्यांसाठी आपण टप्याटप्याने कार्यवाही करावी परंतु हा विषय सर्व सन्मा. सदस्यांनी बहुमताने पारित करावा. अशी मी सर्व सन्मा. सदस्यांना विंनती करतो.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल:–</u> _सन्मा. आयुक्त साहेब, या कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती बाबत यांनी जे विचार मांडले त्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिंनदन करतो, परंतु आपणांकडे जे सफाई कामगार आहेत त्यांना महापालिकेतुन गणवेश पुरविला जात नाही कित्येक कर्मचांऱ्याना रेनकोट व गमबुट पावसाळयानंतर पुरविले जातात, महानगरपालिका एवढा पैसा खर्च करते? पाच रस्त्यावर करोडो रूपये खर्च करता? मुख्यालयाच्या इमारतीवर एक माळा चढविता, त्या गरीब बिचाऱ्यां कर्मचाऱ्यांना रेनकोट दया, गमबुट दया, किती दिवसापासुन तुमच्या कडे गणवेशाचा कपडा येवुन पडला आहे. गणवेश नसल्यामुळे महानगरपालिकेचा कर्मचारी आहे हे कसे ओळखायच? हा सफाई कामगार महानगरपालिकेचा आहे किंवा नाही? तुम्ही गणवेश देत नसल्याबद्दल मला लाज वाटते. आज एका विभागात मी बसलो होतो तेथे मला सांगण्यात आले की, ज्यावेळी श्री. सोनावणे साहेब आयुक्त होते त्यावेळेस त्यांनी काही सफाई कामगार रेनकोट विना पावसात काम करत असल्याचे पाहुन त्यांनी त्याच दिवशी त्यांना रेनकोट व गमबुट दिले. यासाठी आयुक्त साहेब, या कर्मचाऱ्यांना पावसाळयापूर्वी रेनकोट, गमबुट व गणवेश दिला पाहिजे.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे:–</u> गणवेशाच्या बाबतीत हा जो मुद्दा उपस्थित केला तो अतिशय चांगला आहे, सर्व सन्मा. सदस्याच्या वतीने विनंती करतो की, काही कर्मचारी गणवेशात नसल्याबद्दल त्यांना सचिव साहेबांनी कारणे दाखवा नोटीसा बजावल्या आहेत त्या त्वरीत मागे घेण्यात याव्यात. पहिली गोष्ट तर आपली महानगरपालिका गणवेश देत नाही.

<u>महापालिका सचिव:–</u> कारणे दाखवा नोटीस दप्तरी दाखल केली आहे.

<u>सदस्य श्री. लाल पंजाबी:–</u> सचिव साहेब, हा जो विषय आला आहे यामध्ये संवर्ग ४ च्या कर्मचाऱ्यांना संवर्ग ३ मध्ये पदोन्नती देण्यासाठी २५ जागा आहेत परंतु हा जो प्रस्ताव आलेला आहे तो फक्त आठ जागांचा आहे,

सतरा जागा अजुनही बाकी आहेत, याबाबतीत या सभागृहात फेब्रुवारी महिन्यात आम्ही एक ठराव पारित केला होता की, जेवढे पात्र कर्मचारी आहेत. जेवढया काही जागा रिक्त आहेत पदोन्नती साठी उपलब्ध होण्याऱ्या पंचवीसच्या पंचवीस जागा भरल्या पाहिजेत. व संवर्ग चार च्या कर्मचाऱ्यांस पदोन्नती मिळत असेल तर ती मिळालीच पाहिजे, पंचवीस मधील फक्त आठ पदे भरली आहेत, ही जी आठ पदे भरली आहेत त्याबद्दल आमची काही हरकत नाही. परंतु उरर्वरीत सतरा पदे का भरली जात नाहीत? फेब्रुवारी महिन्यामध्ये आम्ही ठराव पारित केला आहे की, शासन निर्णया मधील अटी नूसार जे पात्र कर्मचारी आहेत, त्यांच्या व्यतिरिक्त जे कर्मचारी राहतात त्यांच्यासाठी आम्ही नियमात शिथीलता दिली होती, व सर्वांना पदोन्नती मिळाली पाहिजे असा ठराव केला होता. त्यानूसार पदोन्नतीसाठी सर्वांची नावे का आली नाहीत? आम्हाला असे वाटते की सर्वांची नावे आली पाहिजेत.

<u>**सदस्य श्री. बी.बी. मोरेः–**</u> श्री. लाल पजांबीजी, पुढील वेळेस ती नावे सुध्दा घेवु ना?

<u>**सदस्य श्री. लाल पंजाबीः–**</u> ती नावे का आली नाहीत? ती नावे आली पाहिजेत.

<u>**सदस्य श्री. प्रशांत धांडेः–**</u> श्री. लाल पजांबीजी, आम्ही सुध्दा सांगतो की ती सतरा नावे नंतर आणा, आता सभागृहापुढे जो प्रस्ताव आला आहे तो पारित करा.

<u>**सदस्य श्री. दिलीप गायकवाडः–**</u> मा. महापौरजी, आता जो प्रस्ताव आला आहे तो पारित करा. जी नावे राहिली आहेत ती पुढच्या सभेत आणा. चर्चा पुरी झाली प्रस्ताव पारित करा, आणि इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता अशी नोंद घेवुन ठराव पारित करा.

<u>**सदस्य श्री. धनंजय बोडारेः–**</u> सर्व सभागृहाची भावना आहे की, आठ कर्मचाऱ्यांना प्रमोशन दिले जावे, फक्त आठच नाही याअगोदर ज्या कर्मचाऱ्यांना प्रमोशन दिले आहे परंतु ते फक्त कागदोपत्री आहे, त्याबाबतीत कुठे तुम्ही २००३ च्या भरतीवरील चौकशीचा सदंर्भ दिला आहे. आता श्री. धांडे साहेबांनी सांगितले त्याप्रमाणे, पुढच्या महासभेमध्ये पदोन्नती दिल्याबाबतचे पत्र, देवु शकतो का आपण? उप–आयुक्त शहर या पदावर कोण आहेत? त्यांचा असा शेरा आहे की, प्रारुप नियमावली मंजुर झाली नसल्यामुळे त्यांना पदोन्नती देण्यात येत नाही. कोण आहेत? श्री. हरेश इदनानी? निवड समितीमध्ये ते आहेत, त्यांनी लिहिले आहे की, प्रारुप नियमावली मंजुर नसल्यामुळे यांना पदोन्नती देता येत नाही देण्यात येवु शकत नाही, हि पदोन्नती देण्याचा प्रस्ताव मला वाटते मागच्या दोन महिन्यापूर्वी महासभेपुढे आणला होता. आणि मागील संपुर्ण एक वर्ष महासभा पदोन्नतीचा प्रस्ताव आणा आणा म्हणुन सांगत होती., तुमची बिंदु नामावली तयार नव्हती किंवा ज्या काही तांत्रिक अडचणी होत्या परंतु प्रारुप नियमावली ही तर आत्ता आली, प्रारुप नियमावली मंजुर झाली नाही म्हणुन पदोन्नती देण्यात येत नाही असे कसे शक्य आहे? पुढल्या महासभेमध्ये हया आठ कर्मचाऱ्याना पदोन्नती दिली म्हणुन जाहिर करु शकता का? म्हणजे आमची नगरसेवकांची किंवा सभागृहाची फसवणुक नकोय. ठिक आहे आठ पात्र कर्मचारी तुम्ही घेतले पण पुढे काय म्हटले आहे सेवाशर्ती नियमावली मंजुर होईल तेव्हा, जर ही नियमावली दोन महिन्यापूर्वी आणि पदोन्नतीचा विषय चार महिन्यापूर्वी आला असता तुम्ही तर? ती नियमावली आत्ता आणली आहे, त्यापूर्वी जर प्रस्ताव आला असता तर यांच्या अधिन राहुन कसे बोलु शकला असता? पूर्वीच्या सेवाशर्तीची नियमावली आपली आहेच. आत्ताची सेवाभरती नियमावली मंजुर झाल्यानंतर त्याना पदोन्नती देणार आहेत? त्यामुळे महासभेने ठराव जरी केला तरी तुम्ही पुढच्या महासभेत काय तर पुढचे सहा महिने सुध्दा तुम्ही पदोन्नती देवु शकणार नाहीत. कारण शासनाच्या मंजुरीस अधिन राहुन असे तुम्ही सागतांय. शासनाने एक वर्ष मंजुरी दिली नाही तर एक वर्ष या लोंकाचे काय? आम्ही श्री. प्रशांत धांडे काय, श्री. बी.बी. मोरेजी काय, श्री. राजु जग्यासीजी काय, किंवा श्री. लाल पंजाबीजी काय सर्वाची एकच भावना आहे की, पात्र कर्मचाऱ्यांना पदोन्नती मिळाली पाहिजे, अपात्र जे आहेत त्यांना अट शिथिल केल्याचा फायदा पुढील महासभेत मिळाला पाहिजे पण आपण तर शासनाच्या मंजुरीस अधिन राहुन म्हटले आहे , कारण काय तर नियमावली मंजुर झालेली नाही. ही नियमावली जर तुम्ही दोन महिन्यापूर्वी आणली नसतील तर आधीची नियमावली होती की नाही? त्याच्या अधिन राहुन तुम्ही मंजुर करा ना? तीच जर अडचण असेल तर? की दुसरी काही अडचण आहे?

<u>**श्री. समिर उन्हाळे, आयुक्तः–**</u> १९९२ सालानतंर कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्याबाबतचा प्रस्ताव माझ्यामते आयुक्त या नात्याने मी हाती घेतला होता. त्यावेळेला ज्या काही तात्रिक अडचणी होत्या त्यातुन मार्ग काढुन आज आपण इथपर्यंत पोहोचलो आहोत, माझ्या मते दिडशे पेक्षा जास्त कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्याचा प्रस्ताव

गेल्या सतरा अठरा वर्षानंतर पाहिल्यांदा येथे येतोय. आस्थापना सदर्भात मी बोलणे प्रस्तुत आहे किंवा नाही हे काही मला माहित नाही. जेवढे वाद कर्मचाऱ्यामध्ये होतात आणि जेवढयाकाही तक्रारी होतात किंवा जेवढया चौकश्या या पदोन्नती समितीच्या सदस्यांच्या लागतात, त्यामुळे कुठेतरी समितीच्या सदस्यांना वाटते की आपण बचावात्मक पवित्रा ठेवुन शासनाच्या काही मान्यता घेण्याची तरतुद ठेवली तर त्यात काही चुकीचे आहे असे मला वाटत नाही. कारण आस्थापनाच्या संदर्भात जी काही कार्यवाही आपण करतो त्या कार्यवाहीचा परिणाम त्या महासभेला किंवा महानगरपालिकेला पुढच्या पंधरा वीस वर्षामध्ये भोगावा लागतो आणि जेव्हा जेव्हा दबावाखाली म्हणा किंवा प्रेमाखातर म्हणा आणि माणुसकीच्या दृष्टीकोनातुन अशा प्रकारचे उपक्रम केले गेलेले आहेत. त्यावेळेला, त्या त्या मग त्या पदोन्नती समिती असू दया, किंवा निवड समिती असू दया त्याच्या विभागीय चौकश्या लागलेल्या आहेत त्यांच्यावर भष्टाचाराचे आरोप झालेले आहेत, त्यामुळे आस्थापना सदर्भामध्ये जी काही कार्यवाही करायची आहे ती विहित कार्यपध्दती अंवलबुन नक्की केली जाईल, कर्मचाऱ्यांच्या सदर्भामध्ये जी काही आपली भुमिका आहे त्यापेक्षा वेगळी भुमिका प्रशासनाची किंवा उप–आयुक्त, आयुक्तांची नाही, यामध्ये दोंघाची भुमिका एकच आहे की जे पात्र कर्मचारी आहेत त्यांना लवकरात लवकर पदोन्नती मिळाली पाहिजे, पण हे करत असताना गिसाडघाई करुन एखादा चुकीचा निर्णय घेतला गेला तर एखादा वीस वर्ष प्रमोशन घेवून बसतो आणि पदोन्नती समितीचे लोक चौकशांना सामोरे जावुन उत्तरे देत बसलतात, तर अशा प्रकारचे गिसाडघाईचे निर्णय प्रशासन घेणार नाही. प्रशासनाची भुमिका आहे, की जेवढे पात्र कर्मचारी आहेत त्यांना लवकरात लवकर पदोन्नती मिळालीच पाहिजे, आणि म्हणुनच सतरा वर्ष न झालेले कार्य गेल्या पाच सहा महिन्यात होत आहे, हे करत असताना पाच सहा महिनेदेखील थाबंण्याचा धीर अधिकारी कर्मचाऱ्यांना नसेल तर बरोबर नाही तेवढी सोशीकता या अधिकारी कर्मचाऱ्यांना आणावी लागेल.

**यावेळी श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता विद्युत हे सभागृहातून बाहेर गेले.**

**काही सदस्यः–** पास पास.....

**सदस्य श्री. प्रशांत धांडेः–** सर्व संमतीने पास.

**महापालिका सचिवः–** पास? सर्व संमतीने? इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता?

**महापौर :–** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. १२:–** वर्ग ४ च्या विविध संवर्गातील ८ कर्मचा–यांना लिपिक पदी पदोन्नती देणे.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवरील विविध संवर्गा पदावर पदोन्नती देण्यासाठी मा. आयुक्त यांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५४ (१) मधील तरतुदीन्वये दिनांक २४ ऑक्टोंबर २००८ रोजीच्या आदेशाये खालिलप्रमाणे विभागीय पदोन्नती समिती गठित केलेली आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | अतिरिक्त आयुक्त | — | अध्यक्ष |
| २) | उप आयुक्त (मुख्यालय) | — | सदस्य सचिव |
| ३) | उप आयुक्त (शहर) | — | सदस्य |
| ४) | उप आयुक्त (आरोग्य) | — | सदस्य |
| ५) | मुख्य लेखा परिक्षक | — | सदस्य |
| ६) | मागासवर्गीय अधिकारी<br>(अधिक्षक किंवा त्यापेक्षा उच्च पदावरील) | — | सदस्य |

उपरोक्त समितीची बैठक मा. अतिरिक्त आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १०/०६/२००९ तसेच दिनांक ११/०६/२००९ रोजी स्थायी समिती सभागृह येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | अतिरिक्त आयुक्त | — | अध्यक्ष |
| २) | उप आयुक्त (मुख्यालय) | — | सदस्य सचिव |
| ३) | उप आयुक्त (शहर) | — | सदस्य |

४) उप आयुक्त (आरोग्य) — सदस्य
५) मुख्य लेखा परिक्षक — सदस्य
६) मागासवर्गीय अधिकारी — सदस्य
(अधिक्षक किंवा त्यापेक्षा उच्च पदावरील)

सदस्य सचिव तथा उप आयुक्त (मुख्यालय) यांनी सामान्य प्रशासन विभागाने तयार केलेल्या वर्ग—ड मधुन वर्ग—क लिपीक या संवर्ग पदावर पदोन्नती देणेबाबत प्रस्ताव समिती समोर विचार विनिमयासाठी ठेवला.

दिनांक १०/०६/२००९ रोजीच्या बैठकीमध्ये खालीलप्रमाणे सदस्यांनी मुद्दे उपस्थित केले.

१) उप आयुक्त (आरोग्य):—सफाई कामगार व सफाई मुकादम यांचे शैक्षणिक पात्रते विषयक नोंदी तपासणी करणेकामी दस्तऐवज उपलब्ध करावे. लिपीक या संवर्गातील पदोन्नतीसाठीचे प्रमाण किती आहे?

उप आयुक्त (आरोग्य) यांनी सफाई कामगार व सफाई मुकादम यांचे शैक्षणिक पात्रते विषयक नोंदी तपासणी करणेकामी दस्तऐवज तसेच लिपीक या संवर्गातील पदोन्नतीसाठीचे प्रमाण तपासले असुन याबाबत त्यांनी दिलेले शिफारसपत्र सोबत जोडत आहे.

२) मुख्य लेखा परिक्षक :— उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवरील पदांसाठी तयार करण्यात आलेली बिंदु नामावली तपासणीसाठी उपलब्ध करावी.

मुख्य लेखा परिक्षक यांनी उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवरील पदांसाठी तयार करण्यात आलेली बिंदु नामावली तपासली असुन याबाबत त्यांनी दिलेले शिफारसपत्र सोबत जोडत आहे.

३) मागासवर्गीय अधिकारी (कार्यकारी अभियंता, सां.बा.वि) :— उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवरील पदांसाठी तयार करण्यात आलेली बिंदु नामावली तपासणीसाठी उपलब्ध करावी.

मागासवर्गीय अधिकारी (कार्यकारी अभियंता, सां.बा.वि) यांनी उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवरील पदांसाठी तयार करण्यात आलेली बिंदु नामावली तपासली असुन याबाबत त्यांनी दिलेले शिफारसपत्र सोबत जोडत आहे.

४) उप आयुक्त (शहर):— महानगरपालिका सेवाशर्तीस मंजुरी मिळाली आहे का? त्यामुळे पदोन्नतीचा प्रस्ताव मांडणे योग्य आहे का?

उल्हासनगर महानगरपालिका प्रारूप सेवाशर्ती नियमावली मा. महासभेपुढे मंजुरीकरीता सादर करण्यात आली असुन त्यास अद्याप मंजुरी मिळालेली नाही. तरी सदर बाब मा. आयुक्त सो. यांचेकडे सादर करण्यात येत आहे.

लिपीक ०८ पदे
वेतनश्रेणी रू. ३०५०—४५९०

आस्थापनेवर लिपीक —२४६, टंकलेखक — ०९, व मिटर वाचक — ३० अशी मिळून २८५ पदे मंजूर आहेत. त्यापैकी २२७ पदे भरलेली आहेत. व रिक्त पदे ५८ आहेत. सेवा शर्ती नियमानुसार उपलब्ध रिक्त पदांच्या २५ टक्के पदे पदोन्नतीने भरावयाची आहेत. रिक्त पदे ५८ आहेत. तथापि, सरळसेवेने जास्त उमेदवार सामावून घेतल्यामुळे प्रत्यक्षात २५ पदे रिक्त आहेत. मागासवर्ग कक्षाने लिपीक पदाची एकूण ७१ पदोन्नतीच्या पदांची बिंदू नामावली ठेवलेली आहे. त्यानुसार अनुशेष खालिलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| अनु. जाती | — ०२ |
| अनु. जमाती | — ०५ |
| वि.जा (अ) | — ०३ |
| भ. ज. (ब) | — ०२ |
| भ. ज. (क) | — ०२ |
| भ. ज. (ड) | — ०१ |
| विमाप्र | — ०१ |
| खुला | — ०९ |
| एकूण — | २५ |

उपरोक्त अनुशेष हा प्रमाणित १०० बिंदू नामावलीनुसार आहे. सेवा शर्ती नियमानुसार लिपीक पदावर पदोन्नती देण्यासाठी खालिलप्रमाणे शैक्षणिक पात्रता विहित केलेली आहे.

''एस. एस. सी.
मराठी टंकलेखन प्र. मि. ३० शब्द व इंग्रजी टंकलेखन प्र. मि. ४० शब्द''

सदर पदावर पदोन्नती देण्यासाठी वर्ग — ४ च्या निरनिराळया प्रशासकीय संवर्गामध्ये उपरोक्त शैक्षणिक पात्रता धारण करणाऱ्या कर्मचाऱ्यांची सामाईक सेवा जेष्ठता यादी तयार करून सोबत जोडली आहे. (पृ. क्र. )

सेवा जेष्ठता यादी मधील अनु. क्र. ४, ५, ८, १० व १२ या अनुक्रमांका वरील उमेदवार इंग्रजी टंकलेखन ४० प्र. शं. मि. ही विहीत अर्हता धारण करीत नाही.

उपरोक्त यादीत अनु.जातीचे ०२, भ.जा. (क)—०१ उमेदवार असे ०३ उमेदवार उपलब्ध आहेत. इतर पात्र ७ उमेदवाराना खुला प्रवर्गामध्ये सामावुन घेता येईल.

वरील उमेदवारांचे विचारक्षेत्र घेण्यांत यावे. सदरहु सर्व कर्मचारी हे वर्ग — ४ चे असल्यामुळे त्यांचे विभागीय पदोन्नती समितीने सेवा जेष्ठतेप्रमाणे उमेदवारांची पदाची विहित केलेली शैक्षणीक पात्रता विचारात घेवुन पुढीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

## वर्ग — ४ च्या विविध संवर्गातील कर्मचारी

## रू. २५५०—३२००

### अनु. जाती — ०२

१) श्री. मनोज विष्णू जाधव (सेवा जेष्ठता यादी क्र. ४)

इंग्रजी टंकलेखन ४० श. प्र. मि. ही अर्हता धारण करीत नाही.

२) श्री. राजेश अे. घनघाव (सेवा जेष्ठता यादी क्र. ६)

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

३) श्री. गणेश आत्माराम शिंदे (सेवा जेष्ठता यादी क्र. ७)

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

भ. ज. (क) — ०१

१) श्री. राजेंद्र मोतीलाल हरणे, मुकादम (सेवा जेष्ठता यादी क्र. १)

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

### खुला — ०५

१) श्री. एस. आर. म्हस्कर, मजूर (सेवा जेष्ठता यादी क्र. २)

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

२) श्री. अच्युत बुधाजी सासे, मजूर (सेवा जेष्ठता यादी क्र. ३)

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

३) श्री. बाबुराव र. पाचपिंडे, मुकादम (सेवा जेष्ठता यादी क्र. ५)

इंग्रजी टंकलेखन ४० श. प्र. मि. ही अर्हता धारण करीत नाही.

४) श्रीम. नर्गिस एम. खान, शिपाई (सेवा जेष्ठता यादी क्र. ८)

इंग्रजी टंकलेखन ४० श. प्र. मि. ही अर्हता धारण करीत नाही.

५) श्री. रमेश दगडू अवाड, सफाई कामगार (सेवा जेष्ठता यादी क्र. ९)

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

६) श्री. महेश पपनलाल, सफाई कामगार (सेवा जेष्ठता यादी क्र. १०)

इंग्रजी टंकलेखन ४० श. प्र. मि. ही अर्हता धारण करीत नाही.

७) श्रीम. दिप्ती लादे, माळी (सेवा जेष्ठता यादी क्र. ११)

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

८) श्री. रेश्मा हरेश नागपुरे, शिपाई (सेवा जेष्ठता यादी क्र. १२)

इंग्रजी टंकलेखन ४० श. प्र. मि. ही अर्हता धारण करीत नाही.

९) जगदिश परमार, सफाई कामगार (सेवा जेष्ठता यादी क्र. १३)

पदाची विहित केलेली शैक्षणिक पात्रता धारण करीत असल्यामुळे पदोन्नतीसाठी पात्र.

पदोन्नतीच्या प्रस्तावातील विचारक्षेत्रातील अधिकारी/कर्मचारी यांचे परिविक्षाधीन कालावधी, निलंबन, चौकशी व मागासवर्गीय आरक्षण याबाबचे कागदपत्र तपासुन खातर जमा केलेली आहे.

शासन आदेश, न्यायालयीन प्रकरणे, चौकशी, प्रारूप सेवा शर्ती नियमावलीच्या मंजुरीस अधिन राहुन विभागीय पदोन्नती समितीने खालील निवड सुची प्रस्तावित केली आहे. तथापि मा. महासभेसमोरील सेवाशर्ती नियमास प्रथम मान्यता मिळाल्यानंतर पुढील कार्यवाही करणे योग्य होईल.

# निवड सुची
## लिपीक

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नांव | सेवा जेष्ठता क्र. | संवर्ग |
|---|---|---|---|
| 1 | श्री. राजेंद्र मोतीलाल हरणे | १ (भ. ज. (क) | मुकादम (बांधकाम) |
| 2 | श्री. एस. आर. म्हस्कर | 02 | मजूर |
| 3 | श्री. अच्युत बुधाजी सासे | 03 | मजूर |
| 4 | श्री. राजेश अे. घनघाव | ०६ (अनु. जाती) | मजूर |
| 5 | श्री. गणेश आत्माराम शिंदे | ०७ (अनु. जाती) | मजूर |
| 6 | श्री. रमेश दगडु आव्हाड | 09 | सफाई कामगार |
| 7 | श्रीम. दिप्ती लादे | 11 | माळी |
| 8 | श्री. जगदिश परमार | 13 | सफाई कामगार |

सेवाशर्ती नियमास अद्याप मंजुरी प्राप्त झाली नसल्याची बाब निवड समितीने निदर्शनास आणुन दिलेली आहे. तथापि, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ५३ (१) अन्वये नियुक्ती प्राधिकरण मा. महासभा आहे. तरी शासन आदेश, न्यायालयीन प्रकरणे, चौकशी, प्रारूप सेवा शर्ती नियमावलीच्या मंजुरीस अधिन मा. महासभा पटलावर आदेशास्तव सविनय सादर

महासभा ठराव क्र: १३ दिनांक:– १९/६/२००९

सुचकाचे नाव :– श्री. प्रशांत धांडे

अनुमोदकाचे नाव :– श्री. रमेश चव्हाण

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे वर्ग ४ च्या विविध संवर्गातील ८ कर्मचा–यांना लिपिक पदी पदोन्नती देणे मान्य करीत आहे.

या ठरावाव्दारे घेतलेला निर्णय अंतिम असुन  तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अमंलात आणता येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १३ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १३ :—** वारसा पध्दतीने काही सेवा निवृत्त/दिवंगत सफाई कामगारांचे वारसांना नेमणूक देणे.

---

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>सदस्य श्री. राजेश वधारीया:—</u> मा. महापौरजी, यामध्ये काही लोक असे आहेत की ते दिवंगत सफाई कामगाराच्या कुटुबातील नाहीत, कुणी नातु आहे, तर कुणी जावई आहे, आणि याना कोणत्या नियमानुसार या प्रस्तावात बसविले आहे?

यावेळी सदस्य श्री. मोहनदास रामरख्यानी, श्री. सुरेश जाधव, श्री. चंद्रशेखर यादव, श्री. विजय सुपाळे, श्री. किशोर जग्यासी, श्री. दत्तात्रेय पवार, श्री. प्रधान पाटील हे सभागृहातुन बाहेर गेले.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे:—</u> सन्मा. महापौरजी, आयुक्त साहेब, सफाई कामगारांच्या बाबतीत, वारसाहक्काने आपण त्याना नोकरी देतो, तर त्याबाबतीत सन्मा. सदस्य श्री राजेश वधारीयांनी म्हटले की, कोणी जावई आहे तर कोणी नातु आहे, एकंदरीत ते त्याच्या कुटुबांतील नाहीत, जो सफाई कर्मचारी सेवानिवृत्त होतो, त्याचा तो कोणी नातेवाईक नाही तरी तुम्ही कामावर घेत आहात असा त्यानी प्रश्न उपस्थित केला आहे. जावई म्हणजे तर तो तर जवळचा आलाच, काही लोकांनी दत्तक म्हणून वारस म्हणून कागदोपत्र तयार केलेले असतात, आणि त्याला शासनाची देखील मान्यता आहे आणि तशा प्रकारे आपल्या उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये केलेले आहे अशी शेकडो उदाहरणे दाखवून देईन, कुणी नातेवाईक नसला तरी दत्तक घेतले तरी, करार करुन घेतला असला तरी, त्याला कामात घेता येते अशा प्रकारे रुढी चालु आहे व अशा प्रकारे कामावर घेतात.

<u>श्री. मिलिंद सावंत, उप—आयुक्त, (मु):—</u> मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब आणि सचिव साहेब, लाड समितीचा, १९९४ चा महाराष्ट्र शासनाच्या  नगर विकास विभागाचा शासन निर्णय आहे, त्यानुसार वारसास पात्र होणाऱ्या व्यक्तीमध्ये पती पत्नी, मुलगा, सुन, अविवाहित मुलगी, विधवा किंवा घटस्पोटित मुलगी, विधवा किंवा घटस्पोटित बहिण, वरील कोणतेही वारस उपलब्ध नसल्यास साभांळ करण्याऱ्या व लेखी हमी घेणारा जवळचा नातेवाईक किंवा नामनिर्देशक व्यक्ती अशा प्रकारे सहा पैकी एखादयास त्याचा वारस म्हणुन नेमू शकतो.

काही सदस्य:— पास पास.......

महापौर :— सदरच्या विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ विषय क्र. १३ :— वारसा पध्दतीने काही सेवा निवृत्त/दिवंगत सफाई कामगारांचे वारसांना नेमणूक देणे.

प्रस्तावना

लाड कमिटीच्या शिफारशी वारसा (वशिला) पध्दतीच्या अंमलबजावणीबाबत नगर विकास विभाग, परिपत्रक क्र. संकीर्ण-२२९२/१९९९/प्र. क्र. १६४/९२/नवि-६, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,दिनांक ३० जुन १९९४ नुसार महानगरपालिकेतील सफाई कामगार/मुकादम यांच्या निवृत्तीनंतर, मृत्युनंतर, स्वेच्छा निवृत्तीनंतर किंवा वैद्यकीयदृष्टया अपात्र ठरविल्यानंतर त्यांचे जागी वारसा हक्काने नियुक्ती करण्यात येते.

उल्हासनगर महानगरपालिकेतील सेवा निवृत्त, दिवंगत, वैद्यकीय सेवानिवृत्त सफाई कामगार यांचे जागी वारसा हक्कांने नियुक्ती मिळणेबाबत खालीलप्रमाणे विनंती अर्ज सादर केलेले आहेत.

| अ.क्र | सफाई कर्मचाऱ्याचे नाव | सेवा निवृत्ती/मृत्यु दिनांक | वारसाचे नाव | कर्मचाऱ्याशी असलेले नातेसंबंध |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. राजेंद्र बलबीर बिडलान | वै. सेवा निवृत्ती, दिनांक २/१२/२००८ | श्री. संदिप राजेंद्र बिडलान | मुलगा |
| २ | श्रीम. निशारकली कालीचरण | स्वेच्छा निवृत्ती, दिनांक ३१/०१/२००९ | श्री. जॅकी कन्हैया रौंधिया | नातू (मुलीचा मुलगा) |
| ३ | श्री. रंगनाथ गंगाराम राऊत | सेवा निवृत्ती, दिनांक २८/०२/२००९ | श्री. ज्ञानेश्वर रंगनाथ राऊत | मुलगा |
| ४ | श्रीम. असरफी भिका | वै. सेवा निवृत्ती, दिनांक २९/९/२००८ | श्री. रामभरोसे भिका | मुलगा |
| ५ | श्रीम. कृष्णाबाई मानसिंग | मृत्यू दिनांक ४/०६/१९९९ | श्रीम. उर्मिला मुकेश कांगडा | सून |
| ६ | श्रीम. सखूबाई सहादू पवार | वै. सेवा निवृत्ती, दिनांक १७/०३/२००८ | श्री. अजय मोहन शिंदे | नातू (मुलीचा मुलगा) |
| ७ | श्रीम. मिना टेकचंद | स्वेच्छा निवृत्ती, दिनांक ३०/०९/२००८ | श्रीम. मंजिल सुरज भेंगारीया | सून |
| ८ | श्रीम. शकुंतला किशोरी | स्वेच्छा निवृत्ती, दिनांक ३१/०९/२००९ | श्रीम. लता किशोरी खैरालिया | मुलगी |
| ९ | श्रीम. किरण रघुवीर राजोरिया | वैद्यकीय सेवा निवृत्ती, दिनांक १२/०८/२००८ | श्री. राकेश रघुवीलर राजोरिया | मुलगा |
| १० | श्रीम. अनोखी मनवीर | स्वेच्छा निवृत्ती, दिनांक ३१/०१/२००९ | श्री. दिपक मनवीर बालगुहेर | मुलगा |
| ११ | श्रीम. रूक्मिणी जगन गायकवाड | वैद्यकीय सेवा निवृत्ती, दिनांक ०२/१२/२००८ | श्री. शरद जगन गायकवाड | मुलगा |
| १२ | श्रीम. शिला आत्माराम देवकर | स्वेच्छा निवृत्ती, दिनांक ३१/०९/२००९ | श्री. भाऊसाहेब विश्वनाथ निकाळजे | जावई |
| १३ | श्रीम. दुलारी जगलाल | स्वेच्छा निवृत्ती, दिनांक ३१/०९/२००९ | श्री. सदिप जगपाल सियोते | मुलगा |
| १४ | श्रीम. ऊमिला मख्खन लाहोरी | वैद्यकीय निवृत्ती, दिनांक ०७/१२/२००८ | श्री. विजय मख्खन लाहोरी | मुलगा |
| १५ | श्री. भानुदास महादेव देवकर | स्वेच्छा निवृत्ती, दिनांक ३१/०९/२००९ | Jh- jkgqy Hkkuqnkl nsodj | मुलगा |
| १६ | श्री. अशोक श्यामलाल चौटोले | स्वेच्छा निवृत्ती, दिनांक | श्री. संदिप अशोक चौटोले | मुलगा |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | ३१/०९/२००९ | | |
| १७ | श्रीम. माया स्वराज टाक | वैद्यकीय निवृत्ती, दिनांक २५/०९/२००८ | श्री. किशन स्वराज टाक | मुलगा |
| १८ | श्री. विनोद हरपाल छजनाले | वैद्यकीय निवृत्ती, दिनांक २८/०२/२००९ | श्री. राजा विनोद छजनाले | मुलगा |
| १९ | कै. अशोक वामन राजगुरू | मृत्यु दिनांक १२/०६/२००८ | श्री. सिध्दार्थ अशोक राजगुरू | मुलगा |
| २० | श्री. बाबुलाल नथ्थु निकम | स्वेच्छा निवृत्ती, दिनांक २८/०२/२००९ | श्री. विजय बाबुलाल निकम | मुलगा |
| २१ | श्रीम. गिता मधु अंबोरे | वैद्यकीय निवृत्ती, दिनांक ०१/०१/२००९ | श्री. वाल्मिक महादु अंबोरे | मुलगा |
| २२ | कै. पांडुरंग रामदास निकम | मृत्यु दिनांक १३/११/२००८ | श्री. परेश पांडुरंग निकम | मुलगा |
| २३ | श्रीम. फुलवती भगवानदास | स्वेच्छा निवृत्ती, दिनांक ३१/०१/२००९ | श्री. दिनेश भगवानदास राजोरिया | मुलगा |
| २४ | श्रीम. सरोज रमेश भगवाने | वैद्यकीय निवृत्ती, दिनांक ०७/१२/२००८ | श्री. मुकेश रमेश भगवाने | मुलगा |
| २५ | श्री. संभा पुंजा | स्वेच्छा निवृत्ती, दिनांक ३१/०१/२००९ | श्री. पप्पी नवनाथ खंडागळे | नातु (मुलीचा मुलगा) |
| २६ | श्री. सिध्दार्थ किरकुळ साळवे | वैद्यकीय निवृत्ती, दिनांक २०/११/२००८ | श्री. रविंद्र समाधान सावळे | पुतण्या |
| २७ | श्री. बाबुराव प्रल्हाद पवार | स्वेच्छा निवृत्ती, दिनांक ०१/१०/२००८ | श्री. भुपेश बाबुराव पवार | मुलगा |
| २८ | श्रीम. कमला गोविंद महाले | वैद्यकीय निवृत्ती, दिनांक ३१/१०/२००८ | श्री. अविनाश विजय महाले | नातु (मुलाचा मुलगा) |
| २९ | श्री. विक्रम बनारसी राठी | मृत्यु दिनांक ०७/०६/२००८ | श्री. अनिल सोमबिर राठी | पुतण्या |
| ३० | श्री. रवि बाबू साळवे | स्वेच्छा निवृत्ती, दिनांक ३१/०१/२००९ | श्री. संतोष रवि साळवे | मुलगा |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महानगरपालिकेच्या ज्या अधिकाऱ्याचे किमान मासिक वेतन भत्ते वगळुन चारशे रू. किंवा त्याहुन अधिक आहे असे अधिकारी तात्पुरते असो किंवा कायम असो त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकेस निहीत असेल अशी तरतुद आहे. म्हणजेच नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (नि. वे.) नियम १९८२ मधील नियम ६५ व ६६ अन्वये सेवानिवृत्ती प्रकरणी कार्यवाहीस नियुक्ती प्राधिकारी सक्षम आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महापालिका म्हणजेच महासभा ''नियुक्ती प्राधिकारी'' म्हणुन सक्षम आहे.

तरी शासन निर्णयाच्या अधिन राहुन वरील वारसांना उल्हासनगर महानगरपालिकेतील सेवा निवृत्त, दिवंगत, वैद्यकीय सेवानिवृत्त सफाई कामगार यांचे रिक्त जागेवर वारसा हक्कांने नियुक्ती देणेकामी मा. महासभेपुढे मंजुरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: १४ दिनांकः— १९/६/२००९

सुचकाचे नाव :— श्री. बी.बी. मोरे

अनुमोदकाचे नाव :— श्री. सतीश चहाळ

ही महासभा वरील प्रस्तावनेत उल्लेख केलेल्या उल्हासनगर महानगरपालिकेतील सेवानिवृत्त, दिवंगत, वैद्यकीय सेवानिवृत्त ३० सफाई कामगारांचे रिक्त जागावर त्यांचे वारसांना वारसा पध्दतीने नियुक्ती देण्याचे मान्य करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. १४ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. १४ :— काही सफाई कामगारांना स्वेच्छा सेवानिवृत्ती देणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

महापौर :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ विषय क्र. १४:— काही सफाई कामगारांना स्वेच्छा सेवानिवृत्ती देणे.

प्रस्तावना

महाराष्ट नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम ६५ व ६६ अन्वये अनुक्रमे ३० वर्ष व २० वर्ष अर्हतकारी सेवा पुर्ण झाल्यानंतर कर्मचाऱ्यास ३ महिन्यांची नोटीस देवुन स्वेच्छा निवृत्ती घेता येते. तसेच नियम ७१ अन्वये रूग्णता निवृत्ती वेतनासाठी वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल केल्यानंतर नियम ८० अन्वये कार्यमुक्तता केली जाते. नियम ६५ पोट नियम १ अन्वये ३० वर्षांच्या सेवेनंतर, व नियम ६६ पोट नियम १ अन्वये २० वर्षांच्या सेवेनंतर नियुक्ती प्राधिकारी स्वेच्छा निवृत्तीस परवानगी देवु शकतो अशी तरतुद आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (नि. वे.) नियम १९८२ मधील नियम ६५ व ६६ अन्वये सेवानिवृत्ती प्रकरणी कार्यवाहीस नियुक्ती प्राधिकारी सक्षम आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महापालिका म्हणजेच महासभा ''नियुक्ती प्राधिकारी'' म्हणुन सक्षम आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेतील पुढीलप्रमाणे सफाई कर्मचाऱ्यांनी स्वेच्छा निवृत्तीसाठी विनंती अर्ज सादर केलेले आहेत.

| अ. क्र | सफाई कर्मचाऱ्याचे नाव | अर्हतकारी सेवा | नियम | स्वेच्छा निवृत्तीचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीम. बबी मधुकर गुडेकर | २० वर्षापेक्षा जास्त | ६६ | ३१/०७/२००९ |
| २ | श्रीम. केशरबाई जियाजी सौदागर | २० वर्षापेक्षा जास्त | ६६ | ३१/०७/२००९ |

तरी वरीलप्रमाणे सफाई कामगार/मुकादम यांना स्वेच्छा सेवा निवृत्ती देणेकामी मा. महासभा पटलावर मंजुरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: १५ दिनांक:— १९/६/२००९

सुचकाचे नाव :— श्रीम. सुमन शेळके

अनुमोदकाचे नाव :— श्रीम. सुरेखा वेलकर

ही महासभा वरील प्रस्तावनेत उल्लेख केलेल्या २ सफाई कामगारांना दिनांक ३१/७/२००९ पासून स्वेच्छा सेवा निवृत्ती देणे मान्य करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १५ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १५ :—** काही सफाई कामगारांना वैदयकीय सेवा निवृत्ती देणे.

---

**<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड:—</u>** मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, सफाई कामगाराचा विषय आलेला आहे, पावसाळयामध्ये दरवर्षी आपण हंगामी सफाई कामगार म्हणुन १० सफाई कामगारांची नेमणुक करतो, तो कार्यकाळ पुर्ण झालेला आहे. प्रभागातील नालेसफाई झालेली नाही त्यासाठी आता किती कामगार देणार आहात.? त्याचा हया ठिकाणी खुलासा झाला तर बरे होईल. व त्याचबरोबर सन्मा. सदस्या मिनाताई सोंडे यांनी मागच्या वर्षी खाडाबदली सफाईकामगारांच्या बाबतीत एक लक्षवेधी दिली होती त्याबद्दल आजपर्यंत उत्तर मिळाले नाही , महापालिकेचे जे कायम स्वरुपातील सफाई कामगार आहेत ते तीन तीन महिने गैरहजर असतात आजारांमुळे दोन दोन महिने गैरहजर असतात त्यामुळे प्रभागांमध्ये सफाईची समस्या निर्माण होते ती सोडविण्यासाठी खाडाबदलीच्या बाबतीत आपण काय निर्णय देणार आहात? ते या ठिकाणी जाहिर करावे अशी माझी विनंती आहे.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>** तो विषय नंतर घेवु. आता श्री दिलीप गायकवाड यांनी जो मुद्दा येथे उपस्थित केला आहे प्रथम त्यावर चर्चा केली पाहिजे. मा. महापौर महोदया, मा. आयुक्त साहेब नालासफाई साठी दहा दहा सफाई कामगार काही दिवसासाठी घेतो त्याबाबतीत या वर्षी अशी दशा झाली आहे की कोणत्याही प्रभागामध्ये दहा सफाईकामगार मिळाले नाहीत काही ठिकाणी पाच,सहा, तर काही ठिकाणी आठ असे सफाई कामगार मिळाले आहेत व नालेसफाईचे जे काम आहे ते अद्याप पर्यंत पुर्ण झालेले नाही, तर मी असे म्हणतो की ज्याप्रकारे दहा सफाई कामगार दिड महिन्यासाठी दोन महिन्यासाठी घेतो यावर्षी आपणांस पाच पाच सहा सहा सफाई कामगार मिळाले आहेत यासाठी या कामगारांची मुदत वाढविली जावी. व दुसरे असे की दिवाळीच्या एक महिना अगोदर दहा दहा सफाई कामगार कामावर घेतो तर त्या बाबतीत असे निवेदन करतो की, दिवाळीस आता तीन महिने बाकी आहेत, आणि दिवाळीच्या एक महिन्या अगोदर दहा सफाई कामगार कामावर घेत असतो तर हे जे पाच पाच सहा सहा सफाई कामगार ज्यांच्या—ज्यांच्या प्रभागामध्ये कामावर लागले आहेत त्यांना सलग दिवाळी पर्यंत कामावर ठेवले जावेत. कारण की आम्हाला जेवढे कमी कामगार मिळाले आहेत त्याची पुर्तता होवु शकेल पुन्हा दिड दोन महिन्या नंतर भरती करावी लागेल व त्यांनतर कामगार मिळत नाहीत त्यामुळे हेच कामगार सलग पणे कामावर घेतले जावेत अशी माझी मागणी आहे.

**<u>सदस्य श्री. मोहन साधवानी:—</u>** मा. आयुक्त साहेब, जेथ पर्यंत मला आठवण आहे स्थायी समितीमध्ये आम्ही ठराव पारित केला होता की पाच पाच कर्मचारी दोन महिन्यासाठी घ्यायचे बाकी एक महिना दिवाळीच्या वेळेस घ्यायचे. तर आत दहा दहा कामगार कसे झाल? आम्ही तर पाच पाच कामगार दोन महिन्यासाठी घेण्याचे मंजुर केले होते.

**<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल:—</u>** आयुक्त साहेब, दोन मिनिट, आपण ज्या जेसीबी आणि प्रोक्लेन मशीन लावलेल्या होत्य, संपुर्ण उल्हासनगर मधील मोठ मोठे नाले साफ करायचे होते तर प्रोक्लेन मशीनने सर्व नाले साफ केले

आहेत का? आपण सर्व्हे केला आहे का? कुणी सर्व्हे केला? कोण अधिकारी आहे त्याने उत्तर देण्यासाठी व्यासपीठावर यावे, किती मोठे नाले साफ झाले, कुठले कुठले नाले साफ केले आहे?

<u>सदस्या श्रीमती. मिनाताई सोनेजी (सोंडे):–</u> मा. आयुक्त साहेब माझ्या प्रभागात चागंल्याप्रकारे नालेसफाईचे काम झालेले आहे त्याबद्दल मी पत्रही दिलेले आहे, आणि उन्हाळयामध्ये आम्हाल पिण्याच्या पाण्याचाही काही त्रास जाणवला नाही त्याबद्दलही मी पत्र दिले आहे आपले हार्दिक अभिनंदन, ध्यन्यवाद.

<u>डॉ. दिपक सावंत, उप–आयुक्त,आरोग्य:–</u> मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, आणि सर्व सन्मा. सदस्य, उल्हासनगर मध्ये जे ४१ मोठे नाले आहेत त्या सर्व नाल्याची सफाई झालेली आहे. गुलशन नगरचा जो नाला आहे त्याबाबतीत स्वच्छता निरिक्षकांनी आपल्याबरोबर चर्चा केलेली आहे. उद्या त्या नाल्याची सफाई करण्याचा कार्यक्रम ठेवला आहे.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल:–</u> उप–आयुक्त साहेब मी तुम्हाला विचारतो की एवढे दिवस तो नाला साफ करायचा का राहिला? उद्याच का तो ठेवलेला आहे, मी काय अधिकारी आहे का? मी नगरसेवक आहे आणि मी आपल्याला पत्र दिलेले आहे आणि हर्मन मोहता साईडचा जो नाला आहे तो ही अद्याप साफ झालेला नाही, राजीव गांधी तयार मध्ये मोठा नाला आहे तो ही तसाच्या तसा भरलेला आहे हया पावसाळयामध्ये एवढे पाणी भरणार आहे की संपूर्ण गुलशन नगर आणि राजीव गांधी नगर बुडून जाईल पुर्वीसारखीच स्थिती होईल.

<u>उप–महापौर, श्री. विनोद ठाकुर:–</u> सन्मा. सदस्य श्री. रवि बागुल साहेब आपण बसुन घ्या हा सभासुचनेवरील विषय नाही या विषयावंर आपण नतंर बोलु.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल:–</u> साहेब, श्री. जमनु पुरस्वानी आत्ताच या विषयावंर बोलले

<u>उप–महापौर, श्री. विनोद ठाकुर:–</u> हा सभासुचनेवरील विषय नाही तुम्ही बसुन घ्या.

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>महापौर :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ विषय क्र. १५:– काही सफाई कामगारांना वैदयकीय सेवा निवृत्ती देणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेतील खालील सफाई कामगारांनी वयोमानानुसार तसेच शारीरिक आजारपणामुळे त्यांचेकडुन सफाई काम होत नसल्यामुळे ''वैद्यकीय सेवा निवृत्ती'' मिळणेबाबत विनंती अर्ज सादर केले आहेत.

| अ. क्र | सफाई कर्मचाऱ्याचे नाव | वैद्यकीय सेवा निवृत्तीचा दिनांक |
|---|---|---|
| १ | श्री. धोंडीराम पुंजाराम | ०१/०१/२००९ |
| २ | श्रीम. कविता संतुमल | १२/०३/२००६ |
| ३ | श्रीम. शकुंतला बाळु जाधव | १८/०२/२००६ |
| ४ | श्रीम. सुशिला सुखदेव गायकवाड | ०५/०४/२००६ |
| ५ | श्री. मधु गंगाराम देवकर | १४/६/२००६ |
| ६ | श्री. गोपी लालजी चव्हाण | ३१/५/२००६ |
| ७ | श्रीम. जनाबाई सखाराम मगरे | १४/६/२००६ |

त्याअनुषंगाने संबंधित कर्मचारी शारिरीक दृष्टया सेवा करणेस पात्र आहेत किंवा नाहीत याबद्दलचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणेबाबाबते मा. जिल्हा शल्यचिकित्सक, ठाणे तसेच संबंधित कर्मचारी यांना कळविण्यात आले होते.

संबंधित कर्मचाऱ्यांनी मा. जिल्हा शल्यचिकित्सक, ठाणे यांचेकडील प्रमाणपत्र सादर केले आहेत. त्यानुसार त्यांना नावासमोर दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका सेवेतुन वैद्यकीय सेवानिवृत्ती देणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम ७१ अन्वये रूग्णता निवृत्ती वेतनासाठी वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल केल्यानंतर नियम ८० अन्वये कार्यमुक्तता केली जाते. तसेच नियुक्ती प्राधिकारी वैद्यकीय सेवा निवृत्तीस परवानगी देवु शकतो अशी तरतुद आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महानगरपालिकेच्या ज्या अधिकाऱ्याचे किमान मासिक वेतन भत्ते वगळुन चारशे रू. किंवा त्याहुन अधिक आहे असे अधिकारी तात्पुरते असो किंवा कायम असो त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकेस निहीत असेल अशी तरतुद आहे. म्हणजेच नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (नि. वे.) नियम १९८२ मधील नियम ७१ अन्वये वैद्यकीय सेवा निवृत्ती प्रकरणी कार्यवाहीस नियुक्ती प्राधिकारी सक्षम आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महापालिका म्हणजेच महासभा ''नियुक्ती प्राधिकारी'' म्हणुन सक्षम आहे.

तरी वरील सफाई कामगारांना वैद्यकीय कारणास्तव ''सेवानिवृत्ती'' देणेकामी मा. महासभा पटलावर मंजुरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: १६ दिनांक:— १९/६/२००९

सुचकाचे नाव :— श्री. जे.के ढोके

अनुमोदकाचे नाव :— श्रीम. निलम रावत

ही महासभा वरील प्रस्तावनेत उल्लेख केलेल्या ७ सफाई कामगारांना वैदयकीय सेवा निवृत्ती देणे मान्य करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. १६ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १६ :—** उल्हासनगर महानगरपालिका अधिकारी / कर्मचा-या संबंधी प्रारुप सेवा भरती नियम मान्य करणे.

---

सदस्य श्री. राजेश वधारीया:— विषय काय आहे ते पुन्हा एकदा वाचुन दाखवला जावा.

महापालिका सचिव :— विषय क्र. १६:— उल्हासनगर महानगरपालिका अधिकारी / कर्मचा—या संबंधी प्रारुप सेवा भरती नियम मान्य करणे.

सदस्य श्री. राजेश वधारीया:— मा. महापौरजी विषय क्रमांक १६ बाबत आपण काय निर्णय घेतला?

काही सदस्य :—हा विषय या सभेच्या कामकाजातुन वगळण्यात यावा.

महापालिका सचिव :— तो विषय या सभेच्या कामकाजातुन वगळण्यात येत आहे.

<u>महापौर :—</u> सदरचा विषया या सभेच्या कामकाजातुन वगळण्याकामी सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १६:—** उल्हासनगर महानगरपालिका अधिकारी / कर्मचा—या संबंधी प्रारुप सेवा भरती नियम मान्य करणे.

<u>प्रस्तावना</u>

महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ नगरविकास विभाग शासन परिपत्रक क्र. ठामपा २००२/८२१/प्र.क्र. ८६/नवि—२३, २००८ अन्वये महानगरपालिकेतील कर्मचारी/अधिकारी मॉडेल सेवा प्रवेश नियम शासनाने तयार केले असून त्याआधारे उल्हासनगर महानगरपालिका कर्मचारी/अधिकरी यांचे सेवा प्रवेश नियम तयार करण्यात आले असुन त्यास मा. महासभेची मान्यता घेवुन हरकती/सुचना मागविण्यासाठी राजपत्रात प्रसिदृध करावयाचे आहेत.

उक्त शासन निर्णयाप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिका कर्मचारी/अधिकारी सेवा प्रवेश नियम (प्रारुप) तयार करुन यापुर्वी मा. महासभा पटलावर सादर करण्यात आले होते.

मा.महासभा ठराव क्र.४६, दिनांक ०९/०१/२००९ अन्वये शासनाचे महानगरपालिका (सेवाभरती व सेवांचे वर्गीकरण) प्रारुप नियम—२००८ च्या आधारे महापालिका अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी नव्याने तयार करण्यात आलेले प्रारुप सेवा भरती नियम पुढच्या स्वतंत्र प्रस्ताव म्हणुन आणण्यास प्रशासनास निर्देश दिलेले आहेत.

सबब, उल्हासनगर महानगरपालिका कर्मचारी/अधिकारी सेवा प्रवेश नियम (प्रारुप) मंजुरीकरीता मा. महासभा पटलावर प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र</u>: १६अ दिनांकः— १९/६/२००९

सुचकाचे नाव :— श्री. जीवन इदनानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. लाल पंजाबी

ही महासभा उल्हासनगर महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांचे सेवा प्रवेशासंबधी सद्या अस्तित्वात असलेल्या नियमांचे अधिक्रमण करून शासनाने तयार केलेल्या महानगरपालिका (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) मॉडेल नियम २००८ च्या आधारे उल्हासनगर महानगरपालिका अधिकारी/कर्मचा—यांसाठी नव्याने तयार करण्यात आलेल्या पृष्ठ क्रमांक १ ते ३३ च्या सेवा भरती नियम मसुदयास सविस्तर माहिती अभावी या सभेच्या कामकाजातुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** एक सूचना आहे, उद्या सहयाद्री गेस्ट हाऊसवर म्युनिसिपल एनर्जी कन्झरवेशन च्या विषयी एका सेमिनारचे आयोजन करण्यात आलेले आहे. तेथे मुंबई महानगर प्रदेशाचे सर्व आयुक्त टेक्नीकल ऑफिसर हे उपस्थित राहणार आहे उल्हासनगर महानगरपालिकेच्या वतीन मा. आयुक्त यांचे मार्गदर्शनाखाली श्री. मुकेश आयलानी हे उपस्थित राहणार आहे. ते अभिनंदनास पात्र आहेत.

**काही सदस्य:–** श्री मुकेश आयलानी याना व्यासपीठावर बोलवा, आम्ही त्यांचे अभिनंदन करु इच्छितो.

**महापालिका सचिव :–** ते सद्या सभागृहातुन बाहेर गेले आहेत.

कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दया.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ६.५२ वाजता महापौर श्रीमती निर्मले विद्या विजय यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः– २०/७/२००९

**उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. २०/७/२००९ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.**

(४)

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा सोमवार दिनांक २०/७/२००९ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती निर्मले विद्या विजय हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

९. महापौर–– श्रीमती निर्मले विद्या विजय

१०.उप–महापौर –– श्री. ठाकुर विनोद लालसिंग

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | ३८ | श्री. कुमार उत्तमचंद आयलानी |
| ४ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | ३९ | श्री. लालबिहारी बुझारत यादव |
| ५ | श्री. गायकवाड दिलीप | ४० | श्रीमती पंचशिला नाना पवार |
| ६ | श्रीमती संगीता राजेश कंडारे | ४१ | श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी |
| ७ | श्री. रविंद्र दशरथ बागूल | ४२ | श्रीमती करोतीया मालती राधाचरण |
| ८ | श्री. रामसागर जनार्दन यादव | ४३ | श्री. मंगतानी सुंदर आसनदास |
| ९ | श्री. मोरे भानजी भिकारी | ४४ | श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण |
| १० | श्री. दत्तात्रय नारायण पवार | ४५ | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | श्रीमती चौधरी राजश्री राजेंद्र | ४६ | श्रीमती बोडारे वसुधा धनंजय |
| १२ | श्री. विजय खंडु सुपाळे | ४७ | कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल |
| १३ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ४८ | श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे |
| १४ | श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान | ४९ | श्री. शेखर केशव यादव |
| १५ | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी | ५० | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १६ | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज) | ५१ | श्रीमती सुमन गजानन शेळके |
| १७ | श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी | ५२ | श्री. प्रशांत किसनराव धांडे |
| १८ | श्रीमती सुजाता रमेश रिझवानी | ५३ | श्रीमती मनसुलकर शिला सुभाष |
| १९ | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद | ५४ | श्री. किशोर जग्यासी |
| २० | श्री. राजू जग्यासी | ५५ | श्रीमती चेनानी ज्योती रमेश |
| २१ | श्री. राम (चार्ली) पारवानी | ५६ | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड |
| २२ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ५७ | श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी |
| २३ | श्रीमती जया प्रकाश माखीजा | ५८ | श्रीमती ज्योती शाम माने |
| २४ | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार (कुमारी)केवलराम | ५९ | श्रीमती लता शांताराम निकम |
| २५ | श्री. भठीजा (बब्बु) संजय | ६० | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २६ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे | ६१ | श्री. मोहन साधवाणी |
| २७ | श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा | ६२ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| २८ | श्री. लाल पंजाबी | ६३ | श्री. बच्चाराम रूपचंदानी |
| २९ | श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास | ६४ | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| ३० | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती | ६५ | श्रीमती मीना सोनेजी (सोंडे) |
| ३१ | श्रीमती शकुंतला पाटील | ६६ | श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई) |
| ३२ | श्री. सुखरामानी महेश पहलाजराय | ६७ | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी |
| ३३ | ॲड. श्री. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी | ६८ | श्री. मुकेश सोहन तेजी |
| ३४ | श्री. ढोके जनार्दन किसनराव | ६९ | श्री. पाटील प्रधान धर्मा |
| ३५ | श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा | ७० | श्री. सुनिल साहेबराव गंगवानी |
| ३६ | श्रीमती वेलकर सुरेखा राजन | ७१ | श्री. प्रकाश गणपत सावंत |
| ३७ | श्रीमती महाडीक रजनी मोहन | ७२ | श्री. नरेंद्र रामचंद्र राजानी |
| | | ७३ | श्री. राजेश नानीकराम वधारीया |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीमती निलम प्रेमसिंग रावत, २. श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी, ३. डॉ. (श्रीमती) निना प्रकाश नाथानी, ४. श्री. मोहन (गारो) रामरख्यानी, ५. श्री.एडके गणपत गोविंद, ६. श्री. रमेश महादेव चव्हाण, ७. श्रीमती वनवारी मोना अशोक, ८. श्री. गोदुमल नारायणदास क्रिष्णानी

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१०७. श्री. अशोक बागेश्वर, आयुक्त
१०८. श्री. अशोक रणखांब, अतिरिक्त आयुक्त
१०९. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
११०. श्री. दिपक सावंत, उप—आयुक्त
१११. श्री. सी.पी. सिंग, सहा. संचालक नगररचनाकार
११२. श्री. ध.म. गरड, मुख्य लेखा अधिकारी
११३. श्री. अनुदिप दिघे, मुख्य लेखा परिक्षक
११४. श्री. अनंत कांबळे, सहा. लेखा परिक्षक
११५. श्री. हरेश इदनानी, उप मुख्य लेखा अधिकारी
११६. श्री.जी.टी. जिंदे, वैदयकीय आरोग्य अधिकारी
११७. श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विदयुत
११८. श्री. एस.जी. खडताळे, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा

११९. श्री. आर.बी.शिर्के, कार्यकारी अभियंता
१२०. श्री. चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख
१२१. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
१२२. श्री. नंदु समतानी, उप कर निर्धारक व संकलक
१२३. श्री. व्ही.आर.गर्जे, प्र. सहा. आयुक्त
१२४. श्री. अश्विनी अहुजा, कनिष्ठ अभियंता, मालमत्ता
१२५. श्री. उदय लिमये, मुख्य लिपिक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्री. श्याम शिवनानी
२. श्री. तानाजी पतंगराव
३. श्रीमती नर्गिस खान

सांयकाळी ४.२५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

सदस्य श्री. मोहन साधवानी :—मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, सभेचे कामकाज सुरु होण्याअगोदर मी एक शोक प्रस्ताव मांडु इच्छितो, आपल्या शहरातील उदयोगपती श्री. रमेश अहुजा यांच्या मातोश्रीं श्रीमती तुलसीबाई अहूजा यांचे नुकतेच काही दिवसांपुर्वी निधन झाले. त्यांना श्रध्दांजली देण्याचा मी प्रस्ताव मांडत आहे.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—भारतीय जनता पार्टीचे जेष्ठ नेते आणि या सभागृहाचे एकेकाळी सदस्य असलेले डॉ. इसर पारवानी यांचेही नुकतेच काही दिवसांपुर्वी निधन झाले आहे त्यांनाही श्रध्दांजली वाहीली जावी. अशी मी विनंती करतो.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :—श्री. संतोष खंडारे नावाचा एक कर्मचारी होता. काल महापालिकेचे काम चालु असतांना त्याचें अपघाती निधन झाले आहे. महानगरपालिकेचे काम करत असतांना खाजगी ठेकेदाराकडील तो कामगार अपघातात मृत्यु पावला आहे.. त्याला सुध्दा श्रध्दांजली वाहिली जावी.

<u>शोक प्रस्ताव</u>

सुचकाचे नाव :— श्री. मोहन साधवानी
श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :—श्री. जमनादास पुरस्वानी
श्री. लाल पंजाबी

उल्हासनगर शहरातील उदयोगपती श्री. रमेश अहुजा यांच्या मातोश्रीं श्रीमती तुलसीबाई अहूजा यांचे नुकतेच काही दिवसांपुर्वी निधन झाले.

भारतीय जनता पार्टीचे जेष्ठ नेते आणि उल्हासनगर पालिका सभागृहाचे एकेकाळी सदस्य असलेले डॉ. इसर पारवानी यांचेही नुकतेच काही दिवसांपुर्वी निधन झाले आहे

तसेच महानगरपालिकेचे काम करत असतांना खाजगी ठेकेदाराकडील एक कामगार श्री. संतोष खंडारे यांचे अपघाती निधन झाले आहे.

श्रीमती तुलसीबाई अहूजा, डॉ. इसर पारवानी, श्री. संतोष खंडारे यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र. १६ ब</u> <u>दिनांक:—२०/७/२००९</u>

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्रीमती तुलसीबाई अहूजा, डॉ. इसर पारवानी, श्री. संतोष खंडारे यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.
प्रश्नोत्तरे.........
यावेळी सायंकाळचे ४ वाजुन २७ मिनिटे झाली आहेत.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>प्रश्नोत्तर चालु होण्याअगोदर आपले लक्ष वेधु इच्छितो की, मागील दोन महिन्यापुर्वीचा रस्त्याच्या कामाचे अहवाला संदर्भातील माझा प्रश्न आहे. आता आयुक्त सुध्दा तेच आहेत. ज्यांनी हा अहवाल तयार केला आहे ते, त्याबाबत त्यांनी काय अभ्यास केला आहे, त्याबाबत श्री. शिर्के साहेबांनी सविस्तर उत्तर दयावे.

<u>श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):—</u>आदरणीय महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, सचिव साहेब, सर्व सन्माननिय सदस्यगण, सन्माननिय सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर यांनी १४० क्रमांकाचा जो प्रश्न उपस्थित केला होता त्याबाबत मागील दोन महासभांपुर्वी या सभागृहात चर्चा झाली होती. हे जे काम आहे ते २००८ मध्ये झालेले आहे. त्याबाबत यापुर्वी सुध्दा काही चौकशी झाली होती. त्यानंतर पुन्हा एकदा चौकशी करण्यास मला सांगितले होते.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>काही—काही काम झाले होते असे न म्हणता प्रत्यक्षात काय काम झाले होते ते सांगा.

<u>श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):–</u>हे काम झाले होते असे मी म्हटले आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u> हे म्हणता आहेत की, काही काम. तर मी असे म्हणतो की, जर सभेच्या कामकाजाचे जर रेकॉर्डींग होत असेल तर टेपरेकॉर्डर रिवाईंड करा. यांनी काय म्हटले आहे ते संपुर्ण सभागृहाला ऐकु येईल.

<u>श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):–</u> या कामाबाबतीत या अगोदर चौकशी झालेली आहे. परंतु पुन्हा चौकशी करण्यास मला सांगण्यात आले होते. त्यानुसार मी चौकशी केली आहे. हे काम ज्या वेळेस झाले होते त्यावेळचा संबंधीत कनिष्ठ अभियंत्याचा अहवाल आहे. त्यानंतर तत्कालीन जे शहर अभियंता होते, त्यांनी एक पत्र दिले होते की, या कामाचे आम्ही देयक अदा करणार नाहीत.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>हे काम काय सांगता? कोणते काम केले ते सभागृहापुढे सांगा. कोणते काम आहे, कसे केले, कुणी केले? आणि त्याबाबत आपण काय चौकशी केली ते सांगा. आपण चौकशी केली, काम कुणी केले आहे? कोणत्या ठेकेदाराने काम केले आहे? कुणाकडे सात लाख रुपये असे पडले नाहीत की तो रस्त्यावर फेकुन जाईल.

<u>श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):–</u>पिंकु प्लाझा पासुन डॉल्फिन क्लब पर्यंतच्या कामाबाबत चर्चा झाली होती.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>काय, काय काम होते डॉल्फिनचे?

<u>श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):–</u>पिंकु प्लाझा पासुन डॉल्फिन क्लबपर्यंत सिमेंट कॉक्रिट रस्त्याचे काम होते. रस्त्याचे त्याठिकाणी काही काम झाले होते. त्याबाबत आपण प्रश्न उपस्थित केला होता की, हे काम कुणी केले आहे? तेथे काम झालेले आहे हे बरोबर आहे परंतु ते महापालिकेच्यावतीने झालेले नाही. असे तत्कालीन कार्यकारी अभियंता व शहर अभियंता यांनी लेखी दिले आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>हे पहा श्री. चुन्नी लालवानी आणि दुसरे कोण होते ते? काय नावे होती त्या दोघांची? आपण त्यांना सभागृहात बोलवाल? त्यांनी आपणांस असे लिहून दिले आहे की, कोण काम करत आहे ते आम्हांला माहित नाही असे त्यांच्या स्वाक्षरीचे पत्र मला दाखवाल? आपण सांगाल काय? पत्र असेल तर त्याची प्रत सभागृहात देण्यात यावी. कोण काम करत आहे ते माहित नाही असा जर बिट मुकादमांचा अहवाल असेल तर तो सभागृहात देण्यात यावा व त्या दोघांना निलंबित करण्यात यावे. त्या रस्त्याचे कोण काम करत आहे हे जर त्या कर्मचा–यांना माहित नसेल तर त्यांना निलंबित केले जावे.

<u>श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):–</u>त्यांचा जो अहवाल आहे त्यामध्ये स्पष्टपणे लिहिले आहे की, आम्ही त्याठिकाणी प्रत्यक्ष जावुन तेथे जे कामगार काम करत होते त्यांच्याकडे चौकशी केली असता हे काम कोण करत आहे त्याचे नाव सांगितले नाही. त्यांनी स्वाक्षरी करुन दिलेला तो कागद आता माझ्याकडे आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u> त्यांनी सही करुन दिलेल्या त्या कागदाची झेरॉक्स करुन दया. माझ्याकडे सुध्दा अहवाल आहे. तुमच्याकडे जो कागद आहे त्यावर त्यांनी लिहिले आहे का की कोण काम करत आहे ते माहित नाही म्हणुन?

<u>श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):–</u>होय. कोण काम करत आहे हे माहित नाही असे लिहून दिले आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u> आयुक्त साहेब, कोणता ठेकेदार कार्यादेश नसतांनाही काम करत आहे. हे जर त्यांना माहित नसेल तर त्या दोघांना आता निलंबित केले जावे. व पुढील आपला काय अहवाल आहे तो सांगितला जावा. सन्माननिय महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, आम्ही तेथे जावुन काम बंद करुन आलो आहोत असे त्यांनी स्पष्टपणे लिहिले आहे. जेव्हा एखादा माणुस एखादे काम जर बंद करुन येत

असेल तर तो तेथिल लोकांना सांगुन येत असतो, तेथे एवढया मोठया मशिनरी लागलेल्या आहेत. मग कोण काम करत आहे हे कसे माहित पडत नाही? हे सभागृहाची दिशाभुल करत आहेत काय? आपण या महापालिकेस सोने की चिडीया समजत आहात काय? कोणीही यावे आणि लुटुन जावे.

<u>श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):–</u>या कामाबाबतीत मी चौकशी केली आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u> दुस–यांदा आपण जी चौकशी केली त्याचा अहवाल काय आहे तो सांगा. पहिल्या चौकशी बाबत काही सांगु नका. व श्री. चुन्नी लालवानी व इतर ज्या कुण्या अधिका–यांनी सहया केल्या असतील त्यांच्या सहीच्या कागदपत्रांची मला झेरॉक्स पाहिजे. त्यांचे आपण जे जबाब घेतले आहे ते आपण नोंदुन घेतले असतील ना? जबाब घेतल्यानंतर त्यांच्या आपण ज्या स्वाक्ष–या घेतल्या आहेत त्या प्रत्येक कागदाची मला झेरॉक्स दिली जावी. व संपुर्ण सभागृहात त्याची प्रत वितरीत केली जावी. दया, मागवा. तोपर्यंत दुसरी चर्चा होवू दया. तोपर्यंत कागदपत्र मागवुन घ्या.

<u>महापालिका सचिव :–</u>प्रश्न क्र. १७३ हा श्री. धनंजय बोडारे यांचा आहे.

**?**

<u>प्रश्न क्र. १७३ :–</u> प्र.क्र. १ (अ) जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निमाण अभियान योजने अंतर्गत पाणी पुरवठा वितरणकरिता मंजूरी मिळाल्यानंतर महापालिकेने याकरिता केलेली सद्याची स्थिती काय आहे?

ब) प्रशासनाकडुन निविदा प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे का? आली असल्यास किती निविदाकारांनी निविदा भरल्या आहेत?

क) निविदाचा कालावधी व काम कोणत्या तारखेस पूर्ण होईल?

ड) निविदिकारास प्रशासनाकडून कोणत्या अटी व शर्ती घालून दिल्या आहेत?

इ) कोण कोणत्या निविदाकाराकडुन किती देकार आल्या आहेत? सद्यस्थिती काय आहे?

वरील प्रश्नांची येत्या महासभेत चर्चा होवून सविस्तर माहिती मिळावी ही विनंती.

<u>उत्तर :–</u> अ)जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुननिर्माण अभियान योजनेअंतर्गत पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेच्या योजनेस दिनांक १९/१२/२००८ रोजी केंद्र शासनाकडुन मंजुरी प्राप्त झाली असून स्थायी समितीचा ठराव क्र. ११९, दिनांक १३/२/२००९ नुसार निविदा मागविण्यास परवानगी प्राप्त झाल्यानंतर दिनांक २/३/२००९ रोजी निविदा मागविण्यात आल्या असून एकुण ६ निविदाकारांनी पुर्व अर्हतेसाठी परिपुर्ण अर्ज सादर केले होते व ४ निविदाकारांनी फक्त पत्र दिलेले होते. त्यामुळे पुर्व अर्हतेसाठी ६ निविदाकारांपैकी ५ निविदाकारांनी पुर्व अर्हतेसाठी निविदेच्या अटी व शर्ती पुर्ण केलेल्या नसल्याने त्यांना पात्र करण्यात आले आहे. १ निविदेकाराने निविदेच्या अटी व शर्ती पुर्ण करीत नसल्याने पुर्व अर्हतेसाठी पात्र ठरले नाही. पुर्व अर्हता प्राप्त झालेल्या ५ ठेकेदारांनी निविदा विकत घेतल्या आहेत. दिनांक १/४/२००९ रोजी निविदा सादर करण्याचा शेवटच्या दिवशी फक्त ३ निविदा प्राप्त झाल्यात. दिनांक ४/४/२००९ रोजी निविदेच्या अटी व शर्ती पुर्ण करणा–या दोन निविदाधारकांच्या निविदा उघडण्यात आल्या. न्युनत्तम देकार असलेल्या ठेकेदारास वाटाघाटी बोलाविले असून, पुढील कार्यवाही चालु आहे.

ब) होय

क) मंजुर योजनेप्रमाणे सदर योजना एकुण २६ महिनेच्या कालावधीत राबविणे आवश्यक आहे. त्यामुळे योजना राबविण्यास एकुण २४ महिन्याचा कालावधी अपेक्षित आहे. (कार्यदेश दिल्यानंतर)

ड)निवदेच्या अटी व शर्ती सोबत जोडलेल्या आहेत.

इ)दिनांक ४/४/२००९ रोजी निविदा उघडण्यात आल्या असून

१) एस.पी.एम.एल. बंगलोर–५९.७० टक्के जादा दराने व

२) एम.एम.एस. पर्यावरण, दिल्ली– ६६ टक्के जादा दराने देकार प्राप्त झालेले आहेत. न्युनत्तम दराच्या निविदाकारास एस.पी.एम.एल. बंगलोर यांना वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असून पुढील कार्यवाही चालु आहे.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u> मा. महापौरजी, आयुक्त साहेब, प्रश्न क्र. १७३ नुसार जेएनएनयुआरएम अंतर्गत पाणी पुरवठयाची योजना चालु आहे. मी हा प्रश्न दोन महिन्यापुर्वी विचारला होता. तो आज महासभेमध्ये आलेला आहे. त्याची माहिती त्यावेळेस झालेल्या निविदेसंदर्भात देण्यात आलेली आहे. त्याबाबतीत मी विचारले आहे की, सद्यस्थिती काय? ज्यावेळेस महासभेमध्ये ही चर्चा होईल, त्यावेळेस निविदेची किंवा संपुर्ण

प्रकरणाची स्थिती काय आहे हे संबंधीत अधिकारी सांगु शकेल काय? पाणी पुरवठयाची जी १२१ कोटीची योजना आहे तिची आजची स्थिती काय आहे? त्याचे तुम्ही उत्तर दिलेले नाही. ठिक आहे, त्यावेळेस ६६ टक्के, ५६ टक्के जास्त दराच्या निविदा आल्या, त्या परवडण्यासारख्या नव्हत्या त्यानंतर आपण फेरनिविदा मागविली त्यावेळेस कितीची निविदा आली आणि आजची स्थिती काय आहे?

<u>श्री. एस.जी. खडताळे (कार्यकारी अभियंता, पापुवि) :—</u>सन्माननिय महापौर महोदया, आयुक्त साहेब, आणि सन्माननिय सर्व सदस्यगण, सन्माननिय सदस्य श्री. धनंजय बोडारे साहेबांनी जवाहरलाल नेहरु नागरी पाणी पुरवठा योजनेअंतर्गत मंजुर झालेल्या योजनेबाबतच्या सद्यस्थितीची विचारणा केली होती. ज्यावेळेस प्रश्न विचारला गेला त्यावेळची स्थिती अशी होती, तेव्हा दोन निविदा प्राप्त झाल्या होत्या. त्यातील पहिली निविदा ५९.७० टक्के जास्त एसपीएनएल बंगलौर या कंपनीने भरली होती . त्यातील दुसरी निविदा एसएमएस पर्यावरण दिल्ली यांनी ६६ टक्के जास्त दराची दराने भरली होती, ज्यावेळेस प्रश्न विचारला होता त्यावेळेस निविदा उघडण्यात आल्या होत्या. व पुढील कार्यवाही चालु होती. पहिली जी निविदा होती ती ५९.७० टक्के जास्त दराची होती. त्यावेळेस आपण संबंधीत ठेकेदाराला वाटाघाटीस बोलाविले होते. तथापी पुढील काहीही कार्यवाही झाली नाही. त्यांनी ५९.७० टक्के हाच दर अंतिम ठेवला होता. म्हणुन आपण पुन्हा १७ मे, २००९ रोजी दुस—यांदा निविदा सूचना प्रसिध्द करुन निविदा मागविल्या होत्या. त्यावेळेस आपणाला एकुण १८ अर्ज प्राप्त झाले होते. त्यातील ११अर्ज आपल्या अटी शर्तीनुसार अपात्र ठरले होते. ७ ठेकेदारांचे अर्ज पात्र ठरले होते त्यापैकी ६ ठेकेदारांनी निविदा घेतल्या होत्या. त्यातील २ निविदा आपणांस प्राप्त झाल्या आहेत. त्यामध्ये मेसर्स प्रतिभा इंडस्ट्रीज यांनी ४८.३६ टक्के जास्त दराची निविदा भरली होती. दुसरे मेसर्स एस.एन.सिंग यांनी ५९.५६ टक्के जास्त दराची निविदा भरली होती. त्यानंतर प्रतिभा इंडस्ट्रीज लिमिटेड यांना वाटाघाटीस बोलाविले होते. त्यात त्यांनी ४८.५६ जादा दरावरुन ३७ टक्के जादा दराने काम करण्यास तयारी दर्शविली होती. परंतु हा दर आपल्या चालु दरसूचीनुसार अवाजवी असल्याने आपल्याला फेरनिविदा मागविणे आवश्यक असल्याने हा प्रस्ताव रद्द करुन तिस—यांदा फेरनिविदा मागविण्यासाठी परवानगी मागीतली आहे.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :— </u>आयुक्त साहेब, एवढया मोठया फरकाने, जादा दराने आलेल्या निविदा आपण पुन्हा मागविल्या त्याबद्दल तुमचे धन्यवाद, तुमचे अभिनंदन. कारण तुम्ही उल्हासनगरचा होणारा तोटा वाचविला आहे. त्या प्रतिभा इंडस्ट्रीज लिमिटेड वाल्याचे काय असेल ते माहित नाही. परंतु मागच्यावर्षी स्वत:चे पाण्याचे स्त्रोत निर्माण करण्यासाठी १०२ कोटीची योजना होती. ती अजुनही उच्च न्यायालयात तशीच पडुन आहे. आम्ही उल्हासनगर वाशियांना स्वप्न दाखविले होते की, उल्हासनगर पाण्याचे स्वत:चे स्त्रोत निर्माण करत आहे. केवळ प्रतिभा इंडस्ट्रीज लिमिटेड सारख्या ठेकेदारामुळे ती लटकत राहिली. त्यांनी त्याचा पाठपुरावा केला नाही. फक्त निविदा घ्यायच्या आणि काहीतरी गोंडबंगाल करायचे अशा प्रकारचा त्यांचा कारभार दिसतो. ते तुम्ही नाकारले. कल्याणला स्थायी समितीपुढे ठराव आणलेला आहे. कल्याणला प्राकलनीय दरापेक्षा ४ ते १० टक्के कमी दराने निविदा जाते. आणि उल्हासनगरमध्ये एवढे महाग का? त्याची कारणे काय ती शोधा आणि असा प्रकार होणार नाही. याची दखल घ्या. सक्षम अशी स्पर्धा झाली पाहिजे. आणि त्याच बरोबर योजना लवकरात लवकर राबविली पाहिजे. हेही लक्षात ठेवा. नुसती बचत करणे हा हेतु नको आहे. बचत तर झालीच पाहिजे, कारण की उल्हासनगरच्या प्रत्येक नागरीकाचा कष्टाचा पैसा आहे. त्यासाठी लवकरात लवकर निविदा मागवुन ती प्रक्रिया लवकरात लवकर पुर्ण करा. आणि ही योजना चालु करा अशी माझी विनंती आहे. उल्हासनगर महानगरपालिकेचे होणारे नुकसान टाळले त्याबद्दल धन्यवाद अभिनंदन.

<u>महापालिका सचिव :—</u> प्रश्न क्र. १७४, १७५, १७६ हे श्री. हिरानंद जग्यासी यांचे असून ते नाकारण्यांत आले आहेत. त्यामुळे त्यांची इतिवृत्तांतात नोंद घेण्यात येत नाही.

प्रश्न क्र. १७७ हा श्री. प्रधान धर्माजी पाटील यांचा आहे.

**?**

<u>प्रश्न क्र . १७७ :—</u> उल्हासनगर महानगरपालिका प्रभाग क्र. ७६ मधील रस्त्याचे दुरावस्थेबाबत खालील प्रश्नावर महासभेत चर्चा होवून सूचक समाधानकारक, सविस्तर माहिती मिळणेस विनंती आहे.

प्र.क्र. १ अ) गायकवाड पाडा हा परिसर महापालिकेत कधी समाविष्ट करण्यात आला? गायकवाड पाडा, सेक्शन ३६, शिवसेना शाखा परिसर, ११ नं नाका, लालचंद कंम्पाउंड, उल्हासनगर—५ येथे रस्ते कधी बनविण्यात आले? रस्त्याचे काम कोणत्या ठेकेदारास देणेत आले? रस्त्याची कामांची किंमत किती होती?

ब) त्यानंतर सदरच्या रस्त्यांची निगा व दुरुस्ती कधी करण्यात आली? वेळोवेळी करण्यात आलेल्या निगा व दुरुस्तीसाठी किती खर्च करण्यात आला? सद्यस्थितीत सदरच्या रस्त्याची अवस्था काय आह? रस्त्यास मोठमोठे खड्डे पडलेत हे खरे आहे का? रस्त्यावरील खड्डयामुळे अपघात होण्याची शक्यता आहे का? सदरच्या रस्त्यांचे दुरावस्थेस कोण जबाबदार आहे? सदर ठिकाणचे रस्त्यांची कामे न करण्यामागे प्रशासनाचा हेतू काय आहे? संबंधीत विभाग नक्की उल्हासनगर महानगरपालिकेत समाविष्ट आहे ना?

<u>उत्तर :–</u> महानगरपालिकेच्या वर्ष २००७ च्या सर्वसाधारण निवडणूकांचे वेळी हा भाग उल्हासनगर महानगरपालिकेत येत असल्याचे शासनाने निदर्शनास आणून दिले होते. गायकवाड पाडा, सेक्शन–३६, शिवसेना शाखा परिसर, नाका क्र ११, लालचंद कंपाउंड हा रस्ता पूर्वीचा जुना आहे. या रस्त्याची दुरूस्ती अद्याप पर्यंत महानगरपालिकेने केलेली नाही. त्यामुळे ठेकेदाराचे नाव व खर्च निरंक समजण्यात यावा.

सदरच्या रस्त्यांची निगा व दुरूस्ती अद्याप पर्यांत करण्यात आलेली नाही. त्यामुळे खर्च निरंक आहे. सद्यस्थितीत रस्ता खराब अवस्थेत आहे. रस्त्यांमध्ये खड्डे आहे. त्यामुळे वाहतूकीस अत्यंत अडचण होत आहे. खड्डयांमुळे वाहतूक वेगात चालत नाही. सदर रस्ता जूना असल्याने व महानगर पालिकेने मागील वर्षी या प्रभागासाठी स्वतंत्र निधी ठेवूनही पाणी पुरवठा विभागाच्या तातडीच्या कामांना महापालिके कडून प्रधान्य दिलेले असल्याने काम होवु शकले नाही. चालू आर्थिक वर्षात या प्रभागासाठी पुन्हा स्वतंत्र निधी ठेवला असून सदर रस्त्यांचे काम करण्यात येईल. सदर विभाग महानगरपालिकेत समाविष्ट आहे. सदर रस्ता जुना असल्याने व देखभाल झालेली नसल्यामुळे त्यांचे नव्याने बांधकाम होणे आवश्यक आहे. या प्रभागासाठी अशा कामांसाठी वेगळा अर्थसंकल्प वेगळी तरतूद ठेवली आहे

**<u>सदस्य श्री. प्रधान धर्माजी पाटील:–</u>** ठिक आहे.

**<u>महापालिका सचिव :–</u>** प्रश्न क्र. १७८ हा श्री राजु जग्यासी यांचा आहे.

**<u>प्रश्न क्र. १७८ :–</u>** रिगारडींग पब्लीक वर्क्स डिपांटमेन्ट ''टेंन्डर वर्क्स टु बी अन्डर टेकन फॉर द प्रीव्हेन्टेशन ऑफ थ्रोरफ फल्ड/नॅचरल कलॅमिटीज'' फॉर द थ्री वर्क्स टु बी ओपन ऑन ११/०५/२००९ ऑर देअरआफटर फॉर द कन्स्ट्रशन, ऑफ रिटेनिग वॉल्स अॅण्ड वाइड ब्रीज.

अ) दि सेड थ्री टेन्डर वर्क्स शाल बी कॅरीड आऊट अन्डर हुज सुपरव्हीजन ऑफीस अॅण्ड अॅथॉरिटी / ओव्हरऑल कंन्ट्रोलिंग अॅथॉरिटी अॅण्ड इट्स ऑफीस डिटेल.

ब) फॉर दी सेड टेन्डर वर्क्स ऑल डिटेल ऑफ इट लाइक प्रीपरेशन ऑफ टेंन्डर नोटीस/टर्म्स अॅण्ड कंन्डीशन / टेन्डर मॅनुअल अॅण्ड परफॉरमा लेड देअरइन ऑर एेनी अदर रिलेटेड डिटेल आर प्रीपेअर बाय फायनालाइज बाय हुम अॅपुव्हुड अॅण्ड अॅथॉराइज बाय हुम, अॅण्ड व्हेन अॅन्ड बाय वीच अॅथॉरिटी.

अ) अॅज पर दी चेकलिस्ट फॉर डॉकुमेंन्ट्स टु अॅकोपनी वीत दी टेन्डर डॉक्युमेंन्ट (फॉर दी पॉइंट नं. ७) रेज रिगारंडीग सरर्टीफीकेट ऑफ इक्सक्युशन ऑफ बिल्डीग वर्क्स मस्ट बी अकॉपनी.

१. काइंडली गीव्ह डिटेल्स पॉलीसी अडॉपटेड, अॅडमिनिस्ट्रेटिव्ह अॅण्ड ज्युडीक्वसीयल रिजनस् ऑर दी डिसीजन टेकन फॉर दी अबाऊ स्टेटेड पॉइट.

२. हु हॅज प्रपोज् ऑर अॅपरुड ऑर अॅथॉराइज् दीज् सरटिफिकेट फॉर अबाऊ स्टेटेड पॉइट.

३. वॉज दी सेड सरटिफिकेट नेसेसरी (अॅक्सक्युशन ऑफ बिल्डीग वर्क्स) व्हेन दी सेड टेन्डर वर्क्स व्हेअर फॉर दी वाइड ब्रीज अॅण्ड रिटेनिंग व्हॉल् कनस्ट्रशन.

४. व्हॉज दी सेड सरटिफिकेट नेसेसरी (अॅक्सक्युशन ऑफ बिल्डीग वर्क्स) व्हेन दी? टेन्डर ऑर दी अेजन्सी कॉल अपॉन अॅण्ड कंन्डीशन लेड बाय उल्हासनगर म्युनिसिपल कारपोरेशन व्हेअर रजिस्टर कन्ट्रोलर वीत देअर क्लास वीत गव्हरमेंन्ट अॅण्ड पी.डबलु.डी. डिपार्टमेन्ट.

ड) अॅज डिसक्राइब इन दी सेड टेन्डर, इ.एम.डी. अमाऊंट पेयेबल वाइड डिमांड ड्राफ्ट शाल बी ड्रान इन

नेम ऑफ सिटी इजिनियर पी.डबलु.डी. डिपार्टमेन्ट.

अॅज दी उल्हासनगर म्युनिसिपल कारपोरेशन ऑर दी सेड वर्क्स कन्ट्रोलिंग अथॉरीटी कन्ट्रोलर ऑफीस हॅज ओपन अॅण्ड बॅक अकाऊंट इन दी नेम ऑफ सिटी इनजिनियर पी.डबलु.डी. डिपार्टमेन्ट टु इनकेस दिस डीडी.

ऑल डिटेल्स अॅन्सर रिपलाय मे बी प्रोव्हाइड अॅट अरलिअेस्ट ऑफ फसकिनेट मी इन दी जनरल बॉडी मिंटीग.

<u>उत्तर :–</u> अ) दिस वर्क विल बी अंडरटेकन बाय पब्लीक वर्कस डिपार्टमेंट ऑफ युएमसी अंडर कंट्रोल ऑफ सिटी इंजिनिअर अॅण्ड एक्झीक्युटीव इंजिनिअर अॅण्ड अंडर सुपरविझन ऑफ कंन्सर्ड डेप्यु. इंजिनिअर अॅण्ड ज्युनिअर इंजिनिअर.

बी) द टेंडर पेपर वेअर प्रिपेअर्ड बाय कन्सर्ड ज्यु. इंजिनिअर ॲण्ड सिटी इंजिनिअर, बिफोर कॉलिंग द टेंडर ॲथोरीटी इज सिटी इंजिनिअर.

सी) एक्सप्रीरीअन्स इज एक्सपेक्टेड इज आरसीसी बिल्डींग ऑर सिमिलर वर्क टेंडर

१) द कंडिशन ऑफ एक्सपिरीअन्स पुट इन द टेंडर इज दॅट टेंडरर शॉल हॅव एक्सपिरीअन्स इन बिल्डींग ऑर सिमिलर टाईप ऑफ वर्क टेंडर. दिस पॉलिसी ॲडोपटेड बिकॉज ऑफ वर्क इज ऑफ आरसीसी टाईप.

२) द कन्सर्ड डेप्यु. इंजिनिअर ॲण्ड ज्यु. इंजिनिअर ॲण्ड सिटी इंजिनिअर एप्रुव्ड फोर दिस कंडिशन.

३) एकोर्डींग टु नेचरल वर्क सर्टीफिकेट ऑफ एक्सपिरीअन्स ऑफ वर्क डन ऑफ सिमिलर टाईप ऑफ वर्क (ब्रिज वर्क) इज पुट इन द टेंडर फोर द एक्सपिरीअन्स मिन्ट दॅट द टेंडरर शॉल हेव एक्सपिरीअन्स इन ब्रिज ऑर बिल्डींग वर्क.

४)लुकींग टु द नेचर ऑफ वर्क एक्सपिरीअन्स ऑफ कान्ट्रक्ट इन एक्झीक्युशन ऑफ सिमीलर टाईप ऑफ वर्क इज इसेंटीअल. द कंडीशन पुट इन द टेंडर फोर द एक्सपीरीअन्स मिंट दॅट द टेंडरर शॉल हेव एक्सपीरीअंन्स इन ब्रिज ओर बिल्डींग वर्क.

डी) इट ववाज प्रिंटेड बाय द मिस्टेक, इट वॉज क्लेरिफाईड वाईल एक्सेपिंग द इएमडी ॲण्ड अर्कोर्डींगल इएमडी एक्सेपटेड इन फेवर ऑफ उल्हासनगर म्युनिसिपल कॉर्पोरेशन.

नो.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u> उत्तर देणारा अधिकारी कोण आहे? मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, हा जो प्रश्न मी महासभेत विचारला आहे, त्याबद्दल श्री. शिर्के यांनी खुलासा करावा असे मला वाटते. हा जो शासनाकडुन निधी आला होता त्यानुसारच आपण निविदा मागविल्या होत्या. तर या निविदा कधी निघाल्या होत्या? त्यांच्या तारखांबाबत आपण माहिती दयाल?

<u>श्री. आर.बी. शिर्के(कार्यकारी अभियंता, साबांवि):–</u>आदरणीय महापौर, उप–महापौर, आयुक्त साहेब, पुर परिस्थिती नियंत्रणासाठी करावयाच्या कामांच्या संदर्भात उल्हासनगर महापालिकेस तीन कामांसाठी मंजुरी मिळाली होती व त्याबाबतचा निधी मिळाला होता. त्यामध्ये चांदीबाई कॉलेजपासुन आरओबी रिटेनिंग व्हॉल, वालधुनी रिव्हर समर्शियल ब्रिज त्याची पुर्नबांधणी करण्यास तसेच शांतीनगर येथे रिटेनिंग व्हॉलचे बांधकाम त्याच्या निविदेची तारीख होती २१/४/२००९.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>२१/४/२००९ ? २१/४/२००९ रोजी आपण निविदा काढली होती. त्याबद्दल काय मी हे जाणुन घेवु शकतो की, या निविदांना अंतिम स्वरुप देण्यात आले आहे काय? कामांना सुरुवात झाली आहे काय?

<u>श्री. आर.बी. शिर्के(कार्यकारी अभियंता, साबांवि):–</u>निविदेतील दर जास्त असल्यामुळे निविदाकारांशी आम्ही वाटाघाटी केल्या आहेत. आणि त्यानंतरचे जे दर आहेत त्याबाबत आम्ही सल्लागारांकडुन व संबंधीत ठेकेदाराकडुन जस्टीफिकेशन घेतले आहे. व ते आता आम्ही स्थायी समितीपुढे ठेवत आहोत.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>श्री. शिर्के साहेब, शासनाकडुन हा जो निधी आलेला आहे, तो पुर परिस्थिती नियंत्रणासाठी करावयाच्या कामांच्या संदर्भात आलेला निधी आहे. व माझी अशी माहिती आहे की, हा निधी पावसाळा अगोदर वापरला जातो. २१/४/२००९ रोजी आपण निविदा मागविल्या आणि आजपर्यंत आपण त्यांच्याशी वाटाघाटी करु शकला नाहीत? त्याचे कारण काय? कारण असेल तर सांगा.

<u>श्री. आर.बी. शिर्के(कार्यकारी अभियंता, साबांवि):–</u>फेरनिविदा प्रक्रियेमध्ये संपुर्ण वर्ष वाया जावु नये अशी आमची धारणा होती. परतु वाटाघाटी करण्यामध्ये बराचसा वेळ गेला हे मी मान्य करतो. व हे काम लवकरात लवकर मार्गी लावले जाईल असे मी आपणांस वचन देतो.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>दुसरे असे की आपण निविदा काढतांना ईएमडीची रक्कम भरण्यासाठी बॅकेमध्ये जे खाते उघडतो ते शहर अभियंता यांच्या पदनामाने उघडतो असे आपण लिहिले आहे.

श्री. आर.बी. शिर्के(कार्यकारी अभियंता, साबांवि):—ते चुकीचे होते. त्याबाबतीत आम्ही स्पष्टीकरण केले होते. जेव्हा निविदा आल्या होत्या तेव्हा त्यांच्याकडुन आम्ही ईएमडीची रक्कम आयुक्तांच्या नावाने घेतली होती.

सदस्य श्री. राजु जग्यासी :—म्हणजेच निविदा काढतांना आपणाकडुन चुक झाली होती?

श्री. आर.बी. शिर्के(कार्यकारी अभियंता, साबांवि):—तो मुद्रणदोष होता. तो सुधारुन घेतला आहे.

सदस्य श्री. राजु जग्यासी :—श्री. शिर्केजी, आपणाकडुन चुक झाली होती हे आपण मान्य करता ना? शहर अभियंत्यांच्या पदनामाने बॅकेमध्ये महापालिकेच्यावतीने कोणतेही खाते उघडले जात नाही.

श्री. आर.बी. शिर्के(कार्यकारी अभियंता, साबांवि):—नाही.

सदस्य श्री. राजु जग्यासी :—निविदेमध्ये ज्या अटी, शर्ती निश्चित केल्या जातात त्याचे अधिकार कुणाकडे असतात?

श्री. आर.बी. शिर्के(कार्यकारी अभियंता, साबांवि):—शहर अभियंत्यांच्या स्तरावर ही कार्यवाही होते. परंतु हे सर्व टिमवर्क आहे. यामध्ये सर्वजण सहभागी असतात.

सदस्य श्री. राजु जग्यासी :—श्री. शिर्केजी, शहर अभियंता यांच्या स्तरावर निविदेची कार्यवाही होते. आणि हे सर्व टिमवर्क आहे. हे ठिक आहे. परंतु निविदेतील अटी, शर्ती मध्ये जर एखादी चुक आढळुन आली तर त्याची जबाबदारी कुणाची?

श्री. आर.बी. शिर्के(कार्यकारी अभियंता, साबांवि):—सर्व संबंधीत अधिकारी, कर्मचारी जबाबदार राहतील.

सदस्य श्री. राजु जग्यासी :—याचाच अर्थ सर्व टिम जबाबदार राहिल? अंतिम स्वाक्षरी करणारा जो अधिकारी आहे तो?

श्री. आर.बी. शिर्के(कार्यकारी अभियंता, साबांवि):—शहर अभियंता सुध्दा जबाबदार असतात.

सदस्य श्री. राजु जग्यासी :—निविदेमध्ये आपण असा उल्लेख केला आहे की, या कामासाठी आरसीसी बांधकामाचा अनुभव पाहिजे.

श्री. आर.बी. शिर्के(कार्यकारी अभियंता, साबांवि):—इमारत/अशा प्रकारच्या कामाचा अनुभव.

सदस्य श्री. राजु जग्यासी :— त्याचा आपण मागील पृष्ठावर उल्लेख केला आहे. आणि तेही जेव्हा आम्ही आपल्या हे निदर्शनास आणुन दिले होते तेव्हा येथे हा प्रश्न टाकण्याचा माझा उद्देश एवढाच आहे की, यापुढे निविदा काढतांना अशा प्रकारच्या चुका आपणाकडुन होवु नये.

श्री. आर.बी. शिर्के(कार्यकारी अभियंता, साबांवि):—हे बरोबर आहे. इमारतीचे आरसीसी बांधकाम असते. अशा प्रकारचे काम, ते पुलाचे काम असल्यामुळे या दोघांपैकी एका कामाचा त्यांना अनुभव असला पाहिजे.

सदस्य श्री. राजु जग्यासी :— दोन्हीपैकी कोणत्याही एका कामाचा अनुभव असे आपण लिहिलेले नाही. आपणांस जेव्हा याबाबतीत सांगण्यात आले त्यानंतर आपण त्यामध्ये दुरुस्ती केली आहे.

श्री. आर.बी. शिर्के(कार्यकारी अभियंता, साबांवि):—नाही ते अगोदरच केले होते. आपल्याकडे जे कागदपत्र होते ते चुकीचे होते. आमच्या दस्तऐवजामध्ये जे काही कागदपत्र आहेत त्यांमध्ये इमारत/ अशा प्रकारच्या कामाचा अनुभव असाच उल्लेख आहे.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u> तर आता हे निश्चित  झाले की, लवकरात लवकर याबाबत वाटाघाटी करुन निविदेस अंतिम स्वरुप दयाल? व यापुढे निविदेमध्ये अशा प्रकारची कोणतीही चुक होणार नाही याकडे आपण लक्ष दयाल?

<u>श्री. आर.बी. शिर्के(कार्यकारी अभियंता, साबांवि):–</u>होय.

<u>महापालिका सचिव :–</u> प्रश्न क्र. १७९ हा श्री. बच्चाराम रुपचंदानी यांचा आहे.

मा. सदस्या श्रीमती जया माखिजा सभागृहातुन बाहेर गेल्या. 

?

<u>प्रश्न क्र. १७९ :–</u> आय सिक ॲनसर फॉर दी फॉलॉविग क्वेशन इन दी फोर्थ कमींग जनरल बॉडी मिंटीग.

१. प्रीव्हाजन ऑफ बजेट फॉर फींलीग पोथोलस इन दी टाऊनशिप फॉर दी इयर २००८–०९.

२. गिव दी नेम ऑफ दी अेजन्सी वीत दी टेन्डर अमाऊंट.

३. गिव दी लोकेशन व्हेअर दी वर्क हॅज बीन अन्डरटेकन.

४. डेट ऑफ कॉमर्स ॲण्ड कम्पंलीशन ऑफ वर्क

५. ॲकच्युअल अमांऊट स्पेन्ट.

<u>उत्तर :–</u> १) रेस १.०० करोर (फोर मेंटेनन्स रोडस)

२) १) मेसर्स आर.के. चंदनानी पीएस.१, डब्ल्यु ओ डेट. १/९/०८ ईस्टीमेट कॉस्ट १००००००/–

२) मेसर्स के. हरेश ॲण्ड एसोसिएट्स पीएस.२, डब्ल्यु ओ डेट. १/९/०८ ईस्टीमेट कॉस्ट १००००००/–

३) मेसर्स जय भारत कन्स्ट्रक्शन पीएस.३, डब्ल्यु ओ डेट. १/९/०८ ईस्टीमेट कॉस्ट १००००००/–

४) मेसर्स जय भारत कन्स्ट्रक्शन पीएस.४, डब्ल्यु ओ डेट. १/९/०८ ईस्टीमेट कॉस्ट १००००००/–

५) मेसर्स महादेव कन्स्ट्रक्शन १ टु ५, डब्ल्यु ओ डेट. २८/२/०८ ईस्टीमेट कॉस्ट ३८२११००/–

३) लिस्ट ॲटेचड.

१. मेसर्स आर.के. चंदनानी पीएस.१, कमेन्समेंट डेट. २/९/०८ डेट कॉम्प. १९/९/०८

२. मेसर्स के. हरेश ॲण्ड एसोसिएट्स पीएस.२, कमेन्समेंट डेट. २/९/०८ डेट कॉम्प. १७/९/०८

३. मेसर्स जय भारत कन्स्ट्रक्शन पीएस.३, कमेन्समेंट डेट. २/९/०८ डेट कॉम्प. १५/९/०८

४. मेसर्स जय भारत कन्स्ट्रक्शन पीएस.४, कमेन्समेंट डेट. २/९/०८ डेट कॉम्प. २२/९/०८

५. मेसर्स महादेव कन्स्ट्रक्शन १ टु ५, कमेन्समेंट डेट. २/९/०८ डेट ऑफ.

<u>श्री. आर.बी. शिर्के(कार्यकारी अभियंता, साबांवि):–</u>प्रश्न क्र. १७९ हा सन्माननिय सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी यांचा आहे. त्या अन्वये रस्त्यावरील खड्डे भरण्याच्या कामाबाबत माहितीची विचारणा केली आहे.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–</u> मी असे विचारले आहे की यावर्षी रस्त्यावरील खड्डे भरणेबाबत अर्थसंकल्पात किती रक्कमेची तरतुद होती?

<u>श्री. आर.बी. शिर्के(कार्यकारी अभियंता, साबांवि):–</u> आपला प्रश्न जो आहे तो सन २००८–०९ या वर्षाकरीताचा आहे.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–</u> मी तेच विचारत आहे.

श्री. आर.बी. शिर्के(कार्यकारी अभियंता, साबांवि):— त्या बद्दल उत्तरात एक कोटी असे लिहिले आहे.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— तरतुद किती आहे? कारण की मागील वेळेस आपण फार मोठी चुक केली होती.

श्री. आर.बी. शिर्के(कार्यकारी अभियंता, साबांवि):— तरतुद एक कोटीचीच आहे ना?

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— आपण निविदा किती रक्कमेची मागविली आहे? एक कोटीच्या तरतुदीमधुन आपण किती रक्कमेची निविदा मागविली आहे?

श्री. आर.बी. शिर्के(कार्यकारी अभियंता, साबांवि):— तेच तर मी सांगत आहे. पहिल्या टप्प्यामध्ये....

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— पहिला टप्पा काय असतो ते अगोदर सांगा. पहिला टप्पा, दुसरा टप्पा, तिसरा टप्पा हे टप्पे काय असतात? रस्त्यावरील खड्डे एकाच वेळी भरले जातात की टप्प्या टप्प्याने भरले जातात? रस्त्यांवरील खड्डे कधी भरले जातात?

श्री. आर.बी. शिर्के(कार्यकारी अभियंता, साबांवि):— ५० टक्के......

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— रस्त्यावरील ५० टक्के खड्डे नंतर भरणार. पावसाळयापुर्वी ५० टक्के खड्डे आपण भरले?

मा. सदस्य श्री. महेश सुखरामानी सभागृहातुन बाहेर गेले. 

श्री. आर.बी. शिर्के(कार्यकारी अभियंता, साबांवि):— ५० लाखाचे प्राकलन तयार केले होते. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे प्रकरण ५ (२) (२) अंतर्गत त्याबाबतीत आदेशही झाले होते.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— ५० लाखाचे आपण जे काम केले ते पावसाळयापुर्वीचे होते की, पावसाळया नंतरचे होते?

श्री. आर.बी. शिर्के(कार्यकारी अभियंता, साबांवि):— पावसाळयामधील होते.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— पावसाळयापुर्वीचे काम आपण कधी चालु केले होते?

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):— पावसाळा चालु असतांना ते काम केले होते.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— पावसाळा चालु असतांना रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काम केले जावु शकते काय?

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):— आवश्यकतेनुसार केले जाते.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— आवश्यकतेनुसार कसे होते? त्यासाठी वेगळयाप्रकारचे मटेरीयल येते ते आपण वापरता काय? कारण की, पाणी आणि डांबर हे एक दुस—याचे शत्रु आहेत. असे असतांना आपण भर पावसाळयात रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काम कसे केले? हे तर असे झाले आमचे ५० लाख रुपये आपण असेच पाण्यात घातले?

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):— सर्वसाधारणपणे प्रत्येक वर्षी गणपतीच्या सणाअगोदर शहरातील रस्त्यांवरील खड्डे बुजविले जातात.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— हे काम पावसाळया अगोदर का केले जात नाही? त्यात काय अडचण आहे? मी आपणांस काय सांगतो, एक कोटीची जी तरतुद करण्यात आलेली आहे ती तरतुद केव्हापासुन लागु

होते? १ एप्रिलपासुन. तर मग १५ मे पर्यंत आपण रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काम का करत नाहीत? यामागे काय कारण आहे? व आता भर पावसामध्ये रस्त्यावरील खड्डे भरण्याचे हे जे काम आपण केले ते बरोबर असल्याचे प्रमाणपत्र आपणांस कुणी दिले? आपण त्यांची तपासणी केली?

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):— होय, तपासणी केली आहे.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— सांगा मला, कोठुन आपण तपासणी केली?

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):— ठाणे येथिल सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन तपासणीचे काम केले आहे.

मा. सदस्य श्री. कुमार आयलानी, श्री. जमनादास पुरस्वानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— त्यांनी त्यात तसे लिहिले आहे का की, पावसाळयामध्ये डांबराचे हे काम चालु शकेल म्हणुन?

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):— जी,जी दुरुस्ती करण्यात आली....

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— असे तर प्रत्येक वर्षी होत असते. आपली यादी जर बघितली तर असे दिसुन येईल की, प्रत्येक वर्षी तोच तोच खड्डा आपण भरत असतो. श्री. शिर्के यांच्या घरासमोर, पुन्हा श्री. शिर्के यांच्या घरासमोर दरवर्षी तेच तेच ठिकाण दर्शविले जाते. आणखी दुसरे काही ठिकाण नसते.

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):— डांबराने रस्त्यावरील खड्डे भरण्यामध्ये तीच एक अडचण आहे की...........

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— मला हे सांगा की, १५ मे पर्यंत रस्त्यावरील खड्डे का भरले जात नाहीत? त्याचे कारण काय? महापालिकेचा पैसा फुकट जावो असे आपणांस वाटते काय? आपण पीडब्ल्युडी मॅन्युअल वाचता, आपणांस माहित आहे की, १५ मे पर्यंत रस्त्यावरील खड्डे बुजविले पाहिजेत आणि १५ मे नंतर डांबराने रस्त्यावरील खड्डे भरण्याचे कोणतेही काम करता येणार नाही. असे असतांनाही आपण पावसाळयात हे काम का करता? आणि जर करायचे असेल तर स्पेशल कोट वापरला पाहिजे. जो पावसाळयात वापरला जातो तो आपण वापरता काय?

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):— सर्व महापालिकांमध्ये पावसाळयात रस्त्यांवरील खड्डे भरले जातात.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— ते काही मला माहित नाही. ते खड्डयात गेले तर मग आपण खड्डयात जायचे काय? इतर महानगरपालिकेचे मला सांगु नका. मी आपणांस हे विचारु इच्छितो की, १५ मे पर्यंत रस्त्यावरील खड्डे भरण्यास आपणांस काय अडचण आहे?

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):— पावसाळयाअगोदर खड्डे भरले तरीही पावसाळयामध्ये रस्त्यांवर खड्डे पडतात.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— पावसाळयाअगोदर जे खड्डे भरले ते टिकले काय? आपण जे खड्डं भरले ते टिकले काय? ते कुणी प्रमाणित केले. चार महिन्यापर्यंत आपण ठेकेदाराचे बिल थांबवुन ठेवता काय? पावसाळयानंतर आपण त्यांच्याकडुन रस्त्यांची दुरुस्ती करुन घेतली आहे का? असेल तर सांगा. समजा पावसाळयात केले ठिक आहे. एक काम केल्यानंतर त्याची हमी किती वर्षाची असते?

<u>श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):—</u> मागील वर्षी पावसाळयामध्ये जे काम केले होते ते पावसाळयानंतर रेक्टीफाय केले होते.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u> बिल्कुल काही केले नव्हते. जेथे आपण डांबराने रस्त्यावरील खड्डे भरले होते तेथे आपण पृष्टांकनाचे (एसी) काम केले नाही अशी लोकांची तक्रार होती. वर्तमानपत्रांमध्ये याबाबतच्या बातम्या आल्या होत्या. आणि त्यानंतर मी पत्रही दिले होते. आता आपण मला सांगा किती ठिकाणी रेक्टीफाय केले? कोठे कोठे केले?

<u>श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):—</u> मागील वर्षी शहरातील जवळ जवळ सर्वच्या सर्व खड्डे डांबराने आम्ही भरले होते. जेणेकरुन लोकांना सोयीचे व्हावे.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u> याचा अर्थ आपण शहरात फिरत नाहीत.

<u>श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):—</u> आमच्याकडे निधी उपलब्ध ..........

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u> श्री. शिर्के साहेब, मी तुम्हांला सांगु इच्छितो की, व्हीटीसी ग्राउंड पासुन जयबाबा धाम पर्यंतचा जो रस्ता आहे तो मागील वर्षी सुध्दा खड्डयांमध्येच होता. आज तर त्यावर सगळयात जास्त खड्डे आहेत. जयबाबा धाम पासुन निजधाम पर्यंत मारिश अपार्टमेंटसमोर मागीलवर्षी सगळयात जास्त खड्डे होते. आजसुध्दा आहेत. त्या मुख्य रस्त्यावरील खड्डे आपण भरलेले नाहीत. रेशनिंग ऑफिसपर्यंत तीच स्थिती आहे. व बहुतेक रस्त्यांची दुरुस्ती केल्याचे आपण जे म्हणत आहात ते चुकीचे म्हणत आहात.

<u>श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):—</u> दरवर्षी अर्थसंकल्पामध्ये जी तरतुद केलेली असते त्या तरतुदीनुसार काम करावे लागते.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u> जर एक कोटी रुपयांची तरतुद आहे तर ज्या रस्त्यांवर जास्त खड्डे पडलेले आहेत त्या मुख्य रस्त्यांवर खड्डे भरण्याचे काम केले पाहिजे. गल्लीबोळामध्ये नव्हे.

<u>श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):—</u> मुख्य रस्त्यांवरीलच आम्ही खड्डे भरत असतो. जेथुन रिक्षांची जा—ये असते, जेथे मोठया प्रमाणावर वाहतुकीची वर्दळ असते......

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u> मला तुम्ही हे सांगा, मानेरा गावापासुन व्हिटीसीपर्यंत येणारा जो नविन रस्ता आहे तेथुन वाहनांची ये—जा नाही? जयबाबा धाम पर्यंत तो जो रस्ता जातो तेथुन वाहनांची ये—जा नाही?

<u>श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):—</u> वाहनांची ये—जा आहे.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u> तर मग त्या रस्त्यावरील खड्डे भरण्याबाबत आपण काय केले ते सांगा? नेताजीपासुन निजधाम पर्यंत १०० फुट रुंदीचा रस्ता आहे. तेथे वाहनाची वर्दळ नाही काय? तेथिल खड्डे भरण्याबाबत आपण काय केले ते सांगा. नेताजीपासुन तहसीलदार ऑफिसपर्यंतच्या रस्त्यावर कोठे खड्डे भरले ते दाखवा? काय केले आपण सांगा? नेताजीपासुन २५ सेक्शनपर्यंतच्या रस्त्यावर तर माणुस चालुच शकत नाही. आपण काय केले?

<u>श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):—</u> त्या रस्त्यावरील सुध्दा खड्डे भरले होते.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u> पुन्हा आपण चुकीचे बोलत आहात. आपण जर खड्डें भरले असतील तर एक तर आपण राजीनामा दया किंवा मी तरी राजीनामा देतो.

<u>श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):—</u> नेताजी चौक येथे आम्ही रस्त्यांवरील खड्डे भरले होंते.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u> मी आपणांस सांगतो की, नेताजी चौकापासुन २५ सेक्शनपर्यंतच्या रस्त्यावरील खड्डे आपण भरले नव्हते.

<u>**सदस्य श्री. गोविंदराम लुंड :–**</u>याबाबतीत बोलुन बोलुन आम्ही थकलो. आपण येवुन प्रत्यक्ष बघा त्या रस्त्याची स्थिती काय आहे? माणुस रस्त्याने चालुच शकत नाही.

<u>**सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–**</u> आयुक्त साहेब, माझी आपणांस विनंती आहे, मागील वर्षी रस्त्यांवरील खड्डे भरण्याचे हे जे काम झाले आहे त्याची चौकशी झाली पाहिजे. कारण की ही जी यादी दिली आहे ती बोगस आहे. एक एक रस्त्याबाबतीत बोलायचे असेल तर एकएक रस्त्याबाबत मी बोलण्यास तयार आहे.

<u>**सदस्य श्री. राजु जग्यासी :–**</u>मा. महापौरजी, श्री. बच्चाराम रुपचंदानी यांना समर्थन देवु इच्छितो. त्यांचे म्हणणे आहे की, रस्त्यावरील खड्डे भरण्याचे जे काही काम झाले आहे त्याची चौकशी झाली पाहिजे. त्यांच्या या मागणीस आम्ही समर्थन देतो.

मा. सदस्य श्री. हिरानंद जग्यासी हे सभागृहातुन बाहेर गेले.

<u>**सदस्य श्री. तुलसीदास वसिटा :–**</u>रस्त्यावरील खड्डे भरण्याचे जे काही काम आहे त्याची चौकशी झाली पाहिजे.

<u>**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–**</u>चौकशी अहवालाचे काय करणार? मागील तीन चार वर्षापुर्वीचा चौकशी अहवाल तसाच सडत पडला आहे. आता अर्धा तास झाला त्या कागदपत्रांची ते अदयाप झेरॉक्स करुन देत नाहीत. असे असतांना हे लोक काय करणार आहेत? फक्त पैसा खाण्यास बसले आहेत दुसरे काही नाही.

<u>**सदस्य श्री. राजु जग्यासी :–**</u>कमीत कमी या महासभेत असा निर्णय घेण्यात यावा की, ज्यांनी या अगोदर रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काम केले आहे त्यांचे देयक तयार केले जावु नये. व देयक रक्कम अदा करण्याचे थांबविले जावे व या कामाची चौकशी झाली पाहिजे. नाहीतर ठेकेदार बिलाची रक्कम घेवुन घरी जावुन बसेल. असे होता कामा नये

<u>**सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–**</u>साहेब याबाबतीत आपण खुलासा करावा.

<u>**आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):–**</u>सन्माननिय महापौर महोदया, सन्माननिय सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी यांनी रस्त्यावरील खड्डे भरण्याच्या कामासंदर्भातील जो प्रश्न उपस्थित केला आहे, त्याबाबतीत शहर अभियंता यांचे नेतुत्वाखाली चौकशी केली जाईल. व तोपर्यंत त्या कामाचे देयक अदा केले जाणार नाही.

<u>**सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–**</u>आभारी आहे.

<u>**महापालिका सचिव :–**</u> प्रश्न क्र. १८० हा श्री. बी.बी. मोरे यांचा आहे.

**?**

<u>**प्रश्न क्र. १८० :–**</u> सन २००९–१० साठी महाराष्ट्र शासनाने उल्हासनगर शहरासाठी महापालिकेला रोडसाठी किती करोड रुपये दिलेले आहेत, तो खुलासा व्हावा व हे करोडो रुपये उल्हासनगर शहराच्या विकासासाठी (रोडसाठी) आले आहेत, तर महत्वाचे रोड घ्यावेत. रोडचा निधी रोडसाठी वापरला का? दुसरीकडे वापरला असल्यास याचा खुलासा महासभेत व्हावा.

<u>**उत्तर :–**</u> सन २००९–१० साठी सार्वजनिक बांधकाम खात्याकडे अदयापपर्यंत रस्ते अनुदान प्राप्त झालेले नाही. असे अनुदान सार्वजनिक बांधकाम खात्याकडे प्राप्त झाल्यानंतर रस्त्यांच्या कामांवर खर्च करण्याकरीता प्रस्तावित करण्यात येईल.

<u>**सदस्य श्री. बी.बी. मोरे :–**</u> उत्तर देण्यासाठी कोण आहे? त्यांना व्यासपीठावर बोलवा. चला श्री. शिर्के साहेब चला आज उत्तरासाठी तुमच्याच प्रश्नाची लाईन लागली आहे. सन्माननिय महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब आणि सभागृहातील सर्व सन्माननिय सदस्य, मी एवढाच प्रश्न विचारला आहे की, महाराष्ट्र शासनाकडुन

आपल्या उल्हासनगर महानगरपालिकेसाठी काही अनुदान आले आहे का? आणि जर आलेले असेल तर त्याचा ऊहापोह करावा. दुसरी गोष्ट अशी की, ते जे अनुदान आले असेल मग ते रस्त्यांसाठी आले असेल तर त्याचा वापर रस्त्यांसाठीच झाला पाहिजे. ते अन्य कोणत्याही कामासाठी वापरण्यात येवु नये. उत्तरात असे लिहिले आहे की, महाराष्ट्र शासनाने अदयाप काही मदत दिलेली नाही. त्यावर श्री. शिर्के साहेब तुमचे काय म्हणणे आहे ते सांगा.

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):—आदरणीय महापौर, उप—महापौर व आयुक्त साहेब, १८० क्रमांकाचा सन्मा. सदस्य श्री. बी.बी. मोरे यांचा असा प्रश्न आहे की, सन २००९—१० साठी महाराष्ट्र शासनाने उल्हासनगर शहरासाठी महापालिकेला रोडसाठी किती करोड रुपये दिलेले आहेत?
महापालिकेकडे रस्त्यांसाठी जे काही अनुदान येते, २००९—१० चे अनुदान अदयाप आलेले नाही.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :—श्री. शिर्के साहेब, थोडक्यात मोजकेच सांगा. होय किंवा नाही अशा एका शब्दात सांगा. रस्त्यांसाठी अनुदान आले आहे किंवा नाही?

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):—नाही.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :— आणि जर आले असेल तर, आपल्याच महानगरपालिकेतील एका अधिका—याने सांगितले की, सव्वाकोटीचे अनुदान आलेले आहे.

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):— सन २००९—१० चे रस्ते अनुदान अदयाप आलेले नाही.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :— ९० लाखाची कुणी मागणी केली आहे, कुणी १५ लाखाची मागणी केली आहे. सर्व सन्माननिय सदस्यांच्यावतीने माझी तुम्हांला या सभागृहामध्ये विनंती आहे की, जर अनुदान आलेले असेल आणि त्याचा जर गैरवापर होत असेल तर ते आम्ही कदापीही सहन करणार नाहीत. आणि जर आले नसेल तर फारच चांगले आहे. आणि जर ते अनुदान आले असेल आणि तुम्ही सभागृहाची दिशाभुल करत असाल तर तुमचा विचार करण्यात येईल.

महापालिका सचिव :—प्रश्नोत्तराचा कालावधी संपला.?

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—एक मिनिट साहेब, आता यांनी जो मला कागद दिला आहे तो मला आधी सुध्दा मिळाला आहे. २४/८/२००८ चा कागद आहे. यांनी मागील महासभेच्यावेळी काय चौकशी केली? ते त्या ठिकाणी गेले आहेत काय? ते तेथे गेलेत आणि काही घेतले आहे काय? आता सभागृहात भगिनी बसल्या आहेत, नाहीतर असा काही एखादा शब्द बोललो असतो. आपण हे पहा, यामध्ये काय लिहिले आहे, एक ब्लॉक भरला आहे ४६ मिटर ३०.५ X ५ असा एक ब्लॉक भरला आहे. प्रत्यक्षात तेथे ५ X ५ चे दोन ब्लॉक भरले आहेत. एक ब्लॉक भरल्यानंतर जेव्हा दुसरा ब्लॉक भरला त्याबाबतीत तीन चार लोकांचे अहवाल आहेत. आपण दहा वेळ जात होतात तेव्हा आपण काय कारवाई केली? त्यांच्याबाबतीत कधी तक्रार केली काय? कार्यादेश नसतांना तो ठेकेदार रस्त्याचे काम करत होता त्याबाबतीत आपण काय कारवाई केली? आपला काय अहवाल आहे आपण काय चौकशी केली ते मला सांगा.या दोन तीन महिन्यामध्ये आपण काय काय चौकशी केली ते सांगा. पाहिजे तर आणखी एक महिन्याची वेळ देतो. पुढल्या महासभेत आणा. परंतु अहवाल बरोबर आणा. या कागदाबाबतीत काय बोलायचे ते मी बंद दालनात आपणांस सांगेन.

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):—हे जे काम आहे ते २००७ मध्ये झाले होते.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:—२००७ चे नाही. आता दोन महिन्यामध्ये आपण काय चौकशी केली आहे? नविन काही लोकांच्या सहया घेतल्या आहेत काय? नव्यानें चौकशी करण्याबाबत आयुक्तांनी आपणांस आदेश दिले होते आपण नव्याने काय चौकशी केली आहे ते सांगा.

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):—याबाबतीत मी जागेवर जावुन पाहणी करुन आलो आहे. याबाबतीत संबंधीत कनिष्ठ अभियंता आणि उप अभियंता यांच्याकडे मी चौकशी केली आहे. त्यानंतर कार्यालयामध्ये जे अभिलेख आहेत, त्यांची पडताळणी केली. त्यानंतर चौकशीचा आम्ही पुर्णपणे अहवाल

तयार केला आहे. तो आता सुध्दा माझ्याकडे आहे. संबंधीत जे कनिष्ठ अभियंता व उपअभियंता व मेस्त्री आहेत त्यांचे आता सुध्दा असे म्हणणे आहे की, हे काम कुणी केले? त्याचे नाव आले नाही.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:— असे कसे आले नाही? एक ब्लॉक एक दिवसामध्ये तर भरला जावू शकत नाही. दिड महिना हे काम चालु होते. दिड महिन्यामध्ये आपण काय केले?

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):— २००७ चें मी सांगत आहे.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:— श्री. महेश सितलानी व श्री. चुन्नीलाल लालवानी यांचे आपण जबाब घेतले आहेत का?

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):— जबाब तर घेतले आहेत .....

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:— हे २००७ चे आहे. तेथे जावुन आम्ही काम थांबवुन आलो एवढेच त्यात लिहिले आहे. त्याव्यतिरिक्त काही लिहिले नाही. एक ब्लॉक भरला आहे. प्रत्यक्षात तेथे मोठ मोठे दोन ब्लॉक भरले आहेत. दुस—या ब्लॉकचा अहवाल कोठे आहे?

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):— यामध्ये लांबी दिलेली आहे.

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—मा. महापौरजी, सन्माननिय सदस्य श्री. भुल्लर महाराजजी, या प्रकरणाबाबत मी माझ्या दालनात बैठक घेतो त्या बैठकीत मी आपणांसही बोलवितो आणि त्यामध्ये जो निर्णय होईल त्याप्रमाणे कार्यवाही करु.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर:— आपल्या दालनात जर निर्णय झाला नाहीतर याबाबत पुंढील महासभेत चर्चा होईल.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :—मा. महापौरजी, आयुक्त साहेब, रॉयल रेसीडेन्सी शेजारील नाल्यावर पुल बांधण्यात आलेला आहे. तो अनधिकृत आहे. तो पुढील महासभेपर्यंत हटविण्यात येईल असे मागील महासभेत सन्माननिय श्री. उन्हाळे साहेबांनी आश्वासन दिले होते. आज श्री. उन्हाळे साहेब नाहीत त्यांच्या जागी दुसरे साहेब आले आहेत. ते काय करु शकतात. उन्हाळे गेले आणि पावसाळे आले असे म्हणायला काही हरकत नाही. ते काय कारवाई करतील ते त्यांनी सांगावे. २० जुनच्या महासभेत तत्कालीन आयुक्त श्री. उन्हाळे साहेबांनी आश्वासन दिले होते आणि त्याबाबतीत श्री. शिर्के साहेबांना सुध्दा आदेश दिले होते की आठ दिवसात याबाबतची पाहणी करुन आम्हांला अहवाल सादर करा.

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि.):—आदरणीय महापौरजी, तत्कालीन आयुक्त साहेबांनी रॉयल रेसीडेन्सी या रहिवास संकुलाशेजारील नाल्याच्या वर बांधलेल्या पुला संदर्भात चौकशी करण्याबाबत मला निर्देश दिले होते. त्यानुसार मी त्या जागेची पाहणी करुन तेथे जी सदयस्थिती आहे त्याचा अहवाल दिला होता. त्याठिकाणी जे संकुल आहे ते नाल्याच्या दोन्ही बाजुला आहे. आणि त्या नाल्यावर पूल टाकलेला आहे. तो पूल नाल्याच्या प्रवाहाच्या १० फुट वर आहे. अतिवृष्टीच्या वेळेला जर जास्त पाणी आले तर पाणी तुंबण्याची शक्यता नाकारता येत नाही. असे मी माझे मत त्यात दिलेले आहे.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :—त्यावर पुढील कार्यवाही काय?

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि.):—त्यापुढील कार्यवाही नगररचना विभाग आणि अतिक्रमण व अनाधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाकडुन होणे अपेक्षित आहे.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :—आपण आपला अहवाल आयुक्तांकडे दिला की, अनाधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाकडे दिला?

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—</u>सन्माननिय महापौर महोदया, जो अहवाल आलेला आहे त्यानुसार कार्यवाही करण्याचे आदेश नगररचना विभाग व अनाधिकृत बांधकाम नियंत्रण विभागास देण्यात येत आहेत.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :—</u>आयुक्त साहेब, दोन महासभा झाल्या. श्री. उन्हाळे साहेब हेच आश्वासन देत आले. तर पुढील महासभे अगोदर त्या पूलाचे निष्कासन झाले पाहिजे अशी मी तुम्हांला विनंती करतो.

<u>महापौर :—</u> प्रशासनाकडुन आयत्यावेळचे विषय म्हणुन पुढील ३ प्रस्ताव प्राप्त झाले आहेत आपली मान्यता असल्यास ते आजच्या सभेच्या कामकाजात समाविष्ट करुन घेता येतील.

मा. सदस्य श्री. रामसागर यादव, श्री. धनंजय बोडारे हे सभागृहातून बाहेर गेले. 

आयत्यावेळीचा विषय क्र.(१)

**विषय क्र. १३:—**उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवरील बिल सर्व्हेअर या पदाची रू. २६००—४००० सुधारीत वेतनश्रेणी लागू करणे.

आयत्यावेळीचा विषय क्र.(२)

**विषय क्र. १४:—**उल्हासनगर महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांना सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार वेतनश्रेणी निश्चित करणेबाबत.

आयत्यावेळीचा विषय क्र.(३)

**विषय क्र. १५:—**उल्हासनगर शहराचा सुधारीत विकास आराखडा तयार करणेकामी २ सहा. नगररचनाकार, २ आरेखक, २ अनुरेखक यांची नियुक्ती करणेबाबत.

हे जे तीन विषय आलेले आहेत ते या सभेच्या कार्यसुचीवर घ्यायचे किंवा नाही त्याबाबत आपण निर्णय घ्या. तीन्ही विषय सभेच्या कामकाजात सामावुन घ्यायचे? कुणाला काही हरकत? ठिक आहे? सर्व संमतीने?

<u>काही सदस्य :—</u>हे तिन्ही विषय सभेच्या कामकाजातून समाविष्ट करुन घ्या.

<u>महापौर :—</u> याबाबत सर्वानुमते पूढीलप्रमाणे ठराव संमत करण्यांत येत आहे. 

---

**विषय** :— आयत्यावेळचे विषय सभेच्या कामकाजात सामावुन घेणे बाबत

सूचकाचे नांव :— श्री. गोविंदराम लुंड
अनुमोदकाचे नांव :—श्री. बी.बी. मोरे

<u>महासभा ठराव क्र. :— १६ क</u> <u>दिनांक : २०/०७/२००९</u>

ही महासभा प्रशासनाच्यावतीने प्राप्त झालेल्या आयत्यावेळच्या खालील तीन विषयास या सभेच्या कामकाजात सामावुन घेण्यास मान्यता देत आहे.

**विषय क्र. १:—**उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवरील बिल सर्व्हेअर या पदाची रू. २६००—४००० सुधारीत वेतनश्रेणी लागू करणे.

**विषय क्र. २:—**उल्हासनगर महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांना सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार वेतनश्रेणी निश्चित करणेबाबत.

**विषय क्र. ३:—**उल्हासनगर शहराचा सुधारीत विकास आराखडा तयार करणेकामी २ सहा. नगररचनाकार, २ आरेखक, २ अनुरेखक यांची नियुक्ती करणेबाबत.

सुचकाची सही /—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर/ पीठासीन अधिकारी

सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापौर :–** कृपया लक्ष दया. ४ लक्षवेधी सुचना प्राप्त झाल्या असून त्या पुढील प्रमाणे आहेत.
लक्षवेधी सुचना क्र. १ जीचे सुचक आहेत श्री. गोविंदराम लुंड

**विषय :–** १) महापालिकेच्या मालकीचे उद्यानाची सुरक्षितता व कर्मचारी वर्ग नसल्याने उद्यानावर केलेला खर्च वाया जात असल्याने यावर महासभेत चर्चा होवून निर्णय होणेबाबत

लक्षवेधी सुचना क्र. २ जीचे सुचक आहेत श्री. किशोर जग्यासी

**विषय:–** २) महसभा ठराव क्र.३१ दिं.२९/६/२००७ मध्ये अंशता बदल करण्याचा प्रस्तावावर चर्चा करुन निर्णय घेण्याबाबत.

लक्षवेधी सुचना क्र. ३ जीचे सुचक आहेत श्रीमती मिनाताई सोनेजी

**विषय :–** ३) महसभा ठराव क्र.३१ दिं.२९/६/२००७ मध्ये अंशता बदल करण्याचा प्रस्तावावर चर्चा करुन निर्णय घेण्याबाबत.

लक्षवेधी सुचना क्र. ४ जीच्या सुचक आहेत श्रीमती जयश्री पाटील

**विषय :–** ४) महसभा ठराव क्र. ३१ दिं.२९/६/२००७ मध्ये अंशता बदल करण्याचा प्रस्तावावर चर्चा करुन निर्णय घेण्याबाबत.

लक्षवेधी सुचना क्र. १ जीचे सुचक आहेत श्री. गोविंदराम लुंड यांच्या लक्षवेधी सूचनेस मा. महापौरांनी स्विकृती दिलेली आहे. उर्वरीत ज्या ३ लक्षवेधी सूचना आहेत त्या रद्द करण्यात आल्या आहेत. कारण लक्षवेधी सूचना हा ठरावात बदल करण्याचा माध्यम नाही.

**सदस्य श्री. किशोर जग्यासी :–**दोन लक्षवेधी सूचना स्विकृत केल्या जावु शकतात ना?

**महापालिका सचिव :–**एकाच विषयाच्या ३ लक्षवेधी सूचना आहेत.

**सदस्य श्री. किशोर जग्यासी :–**दोन लक्षवेधी सूचना स्विकृत केल्या जावु शकतात ना? त्यापैकी श्री. गोविंदराम लुंड यांची एकच लक्षवेधी सूचना स्विकृत केली आहात ना?

**महापालिका सचिव :–**आपण लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातुन ठरावात बदल करु इच्छित आहात.

**सदस्य श्री. किशोर जग्यासी :–**ठरावात बदल करु इच्छित नाहीत. मागील वेळेस २९/६/२००७ रोजी जो ठराव झाला होता.

**महापालिका सचिव :–**जो काही ठराव झाला होता, आपले मत तर असेच आहे की, त्या ठरावात बदल झाला पाहिजे?

**सदस्य श्री. किशोर जग्यासी :–**आम्ही आमचे मत सांगितले कोठे आहे? आपण कसे समजता?

**महापालिका सचिव :–**लक्षवेधीचा उद्देश काय असतो शहरामध्ये जनहिताची काही सुविधा दयायची आहे, अशा गोष्टींसाठी आपण लक्षवेधी सूचना मांडु शकता.

**सदस्य श्री. किशोर जग्यासी :—**मागील वेळेस जो ठराव पारीत झाला आहे त्यावर सुचक म्हणुन श्री. बच्चाराम रुपचंदानी व अनुमोदक म्हणुन श्री. जीवन इदनानी यांच्या स्वाक्ष—या आहेत. हा ठराव महासभेत पारीत झाला आहे.

**महापालिका सचिव :—**ठरावाबाबतीत विचारणा करणे हे लक्षवेधीचे माध्यम नाही.

**सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी :—**ठिक आहे, तर हा मुद्दा पुढील महासभेत आणला जावा.

**महापालिका सचिव :—**व्यवस्थितपणे सभा सूचनेवर मुद्दा आणा.

**सदस्या श्रीमती मिनाताई सोनेजी :—**पुढील सभेच्या सभा सूचनेवर हा मूद्दा आणा.

**सदस्य श्री. किशोर जग्यासी :—**महासभेत जो ठराव पारीत होतो त्याबाबतीत महासभेत विचारणा केली जावु शकत नाही काय?

**महापालिका सचिव:—**त्याचे माध्यम वेगळे आहे, लक्षवेधी हे माध्यम नाही.

**सदस्य श्री. किशोर जग्यासी :—**ठिक आहे.

**महापालिका सचिव :—** लक्षवेधी सूचना क्र. १ जिचे सुचक आहेत श्री. गोविंदराम लुंड, आपण आपली लक्षवेधी सूचना मांडा.

---

## लक्षवेधी सूचना

सुचकाचे नाव :— श्री. गोविंदराम लुंड
अनुमोदकाचे नाव :— श्री. जीवन इदनानी

**विषय:—** महापालिकेच्या मालकीचे उद्यानाची सुरक्षितता व कर्मचारी वर्ग नसल्याने उद्यानावर केलेला खर्च वाया जात असल्याने यावर महासभेत चर्चा होवून निर्णय होणेबाबत.

उल्हासनगर शहरातील महापालिका मालकीचे उदयाने असून काही उदयानांची अवस्था एकदम दयनिय असून व काही ठिकाणी महापालिकेच्या व इतर निधीतून उदयाने अदयावत विकसित केले आहे. परंतु त्या ठिकाणी उदयान अधिक्षक, सुरक्षा रक्षक व कर्मचारी नसल्याने त्या ठिकाणी चोरी व गैरप्रकार होत असतात.

तरी अशा विकसित केलेल्या उदयानाची सुरक्षितता किंवा देखभाल होणे आवश्यक असून सदर पदे भरावे अन्यथा त्या ठिकाणी खाजगी सुरक्षा रक्षक नेमल्यास त्या ठिकाणी चो—या किंवा गैरप्रकारास आळा बसेल व उदयान सुस्थितीत राहिल.

तरी कृपया शहरातील उदयानाची सुरक्षितता व देखभालबाबत महासभेत चर्चा होवून सविस्तर माहिती मिळणेस विनंती आहे.

---

**सदस्य श्री. गोविंदराम लुंड :—**मा. महापौरजी, उप—महापौरजी आणि आयुक्त साहेब, उदयानांमध्ये वॉचमनची नियुक्ती करण्याबाबतीत दोन वर्षापासुन बोलुन बोलुन मी थकलो आहे. त्यानंतर मी चौकशी केली तर असे आढळुन आले की, जो उदयान अधिक्षक होता तो सेवा निवृत्त होवुन बारा वर्ष झाली ते पद अदयाप भरले नाही. ते पद का भरले नाही? उदयानांवर महापालिका करोडो रुपये खर्च करते ते फुकट जातात. प्रभात गार्डन जर आपण बघितले तर त्याची स्थिती अतिशय दयनीय आहे. त्याच्या भिंती पडल्याचे टिव्हीवर दाखविले जाते. जी काही उदयाने आहेत त्यांमध्ये वॉचमन आहे किंवा नाही? याची पाहणी केली जावी. वॉचमन नसल्यामुळे महापालिकेची करोडो रुपयाची संपत्ती नष्ट होते. यासाठी या लक्षवेधीच्या माध्यमातुन मला

उत्तर दिले जावे. आयुक्तांना याबाबतीत बोलुन बोलुन मी थकलो. आता श्री. बागेश्वर साहेब आले आहेत त्यांना मी विनंती करतो की, उदयानांमध्ये वॉचमनची आपण कधी नियुक्ती कराल? उल्हासनगरमध्ये फक्त सपना गार्डन हे एकच उदयान चांगल्या स्थितीत आहे. दुस–या कोणत्याही उदयानामध्ये फिरण्याचे मन होत नाही. म्हणुन या लक्षवेधीवर चर्चा करुन उत्तर दिले जावे.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी:–मा. महापौरजी, उप–महापौर, आयुक्त साहेब, सभागृहातील सर्व सन्माननिय सदस्य, दादा श्री. गोविंदराम यांनी जी लक्षवेधी सूचना मांडली आहे त्यास मी समर्थन करुन सार्वजनिक बांधकाम विभागास विचारु इच्छितो की, उल्हासनगरमध्ये किती उदयाने आहेत? आणि किती वॉचमन आहेत? जर ते आम्हांला सांगतील तर त्यावर आम्ही पुढील चर्चा करु? साहेब, यावर उत्तर आहे का की पुढे जावु?

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):–आदरणीय महापौरजी, उल्हासनगरमध्ये ६० जागा आहेत ज्या उदयानासाठी विकसित केल्या आहेत. परंतु त्यातील ३० जागेवर उदयान विकसित झाले आहे. आपल्याकडे जे उपलब्ध कर्मचारी आहेत, मजुर आहेत, माळी आहेत, पहारेकरी आहेत, त्यांच्या माध्यमातुन जास्तीत जास्त उदयाने आम्ही सुस्थितीत ठेवली आहेत. वॉचमनची कमतरता आहे हे बरोबर आहे.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–श्री. शिर्के साहेब, मी आपणांस असा प्रश्न विचारला की, उल्हासनगरमध्ये किती उदयाने आहेत?

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):–उल्हासनगरमध्ये ६० उदयाने आहेत हे मी यापुर्वीच सांगितले आहे.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :– ती सर्व चांगल्या स्थितीत आहेत का? की अशीच पडुन आहेत?

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):– ६० च्या ६० उदयाने विकसीत करण्यात आलेली नाहीत. त्यातील ३० उदयाने विकसीत करण्यात आलेली आहेत.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :– ३० उदयानांसाठी किती वॉचमन ठेवले आहेत? ३० आहेत? १० आहेत? ५ आहेत? ६० आहेत? १०० आहेत? किती आहेत? ते तर सांगा. येथे वॉचमन बाबतीत विचारणा केली आहे. मजुरांच्या बाबतीत नाही.

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):– ३० वॉचमन आहेत.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :– ३० वॉचमन आहेत तर ते ३० ही उदयानांमध्ये एक–एक याप्रमाणे ठेवता की काही उदयानांमध्ये ३–३ वॉचमन ठेवुन काही उदयानांमध्ये एक सुध्दा ठेवत नाहीत असे काही आहे काय? मला जेवढी माहिती आहे त्यानुसार असे समजते की, काही उदयानांमध्ये आपण २४ तास वॉचमन ठेवता. त्यानुसार त्याठिकाणी आपणांस तीन वॉचमन ठेवावे लागत असतील. आपणाकडे ३०. उदयाने आहेत व ३० वॉचमन आहेत. काही उदयानांमध्ये आपण दोन जरी वॉचमन ठेवले तरी सद्यस्थिती कशी आहे? त्या ३० उदयानांमधील कोण कोणत्या उदयानांमध्ये सध्या वॉचमन नाही? त्याची आपणाकडे यादी आहे का?

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):– मी अगोदरच सांगितले की, आपणाकडे वॉचमनची कमतरता आहे.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :– वॉचमनची कमतरता आहे तर त्यांच्या जागी कोण काम करेल? नगरसेवकांनी वॉचमनगिरी करायची काय? मी आपणांस विचारत आहे आपण उत्तर दया ना? महासभेपुढे आपण सांगत आहात. वॉचमनची जी कमतरता आहे त्याबाबतीत आपण आयुक्त साहेबांना कधी लेखी कळविले आहे काय? किती वॉचमनची पदे खाली आहेत?

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):– प्रायव्हेट सिक्युरीटी वॉचमन नेमण्याबाबतचा प्रस्ताव आम्ही पाठविला होता. सामान्य प्रशासन विभागाने याबाबतचा प्रस्ताव तयार करुन त्याबाबतीत लेखा विभागाकडुन ते मान्यता घेत आहेत. परंतु अर्थसंकल्पात तरतुद नसल्यामुळे तो प्रस्ताव प्रलंबित आहे.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— श्री. शिर्के साहेब, मला हे सांगा की, आपण जे ३० वॉचमन ठेवले आहेत, ते किती उदयाने सांभाळत आहेत? ३० च्या ३० सांभाळत आहेत की १० सांभाळत आहेत की ५ सांभाळतात?

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):— ते ३० उदयाने सांभाळतात.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— सपना गार्डनमध्ये २४ तास आपला वॉचमन असतो. तो कोठुन येतो? काय तेथे खाजगी वॉचमन ठेवला आहे? की त्याला डब्बल डयुटी दिली जाते?

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):— सपना गार्डनमध्ये सुध्दा वॉचमनची कमतरता आहे.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— तेथे आपण किती वॉचमन दिले आहेत? किती दिले? ४ दिले, ६ दिले, २ दिले? किती दिले आहेत?

मा. सदस्य श्री. धनंजय बोडारे यांनी सभागृहात पुनः प्रवेश केला.

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):— सपना गार्डनसाठी २ वॉचमन दिले आहेत.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— चला, दोन झाले. स्वामी शांतीप्रकाश गार्डनमध्ये किती वॉचमन आहेत?

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):— ५ आहे.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— ५ अधिक २, सात झाले. उरले २३. बाकी उदयाने राहिली २८. इंदिरा गांधी उदयानासाठी किती वॉचमन दिले आहेत?

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):— याबाबतचा अहवाल सध्या माझ्याकडे नाही.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— शोभराज उदयानात किती वॉचमन आहेत?

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):— शोभराज उदयानामध्ये एक वॉचमन आहे.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— लाललोई उदयानात किती वॉचमन आहेत? आमच्या उप—महापौरांच्या प्रभागातील उदयानात किती वॉचमन आहेत?

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):— माझ्याकडे जी माहिती आहे त्यानुसार लाललोई गार्डनमध्ये वॉचमन नाही.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— ५० लाख रुपये खर्च करुन एवढे मोठे गार्डन तयार केले आहे.

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):— तेथे सध्या बांधकाम चालु आहे.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— तेथे एवढे मोठे उदयान आहे तेथे आपण एक सुध्दा वॉचमन दिलेला नाही. तर मग आपण कसे म्हणता की, ३० च्या ३० उदयानांमध्ये वॉचमन आहेत असे आपण कसे म्हणता? आपणाकडे ३० वॉचमन आहेत त्यातील दोन वॉचमन सपना गार्डनसाठी दिले. याचाच अर्थ बाकी उदयानांमध्ये आपण वॉचमन दिले नसतील?

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):— मी या अगोदरच सांगितले आहे की, वॉचमनची कमतरता आहे.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— त्यास कोण जबाबदार आहे? भिंत पडते. बेंच तुटतात, झाडे पडतात, आणखी काही घटना घडतात, ते कसे माहित पडेल?

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):— उल्हासनगर महानगरपालिकेची जेवढी काही उदयाने आहेत, ती महापालिकेच्या मिळकती आहेत त्याठिकाणी खाजगी सुरक्षा रक्षक तैनात केले जावेत जेणेकरुन परिणामकारक रखवाली होवु शकेल यासाठी आम्ही एक प्रस्ताव तयार करुन आपल्या मुख्य सुरक्षा रक्षाकांकडे पाठविला होता. त्यांनी तो प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागामार्फत पुढे पाठविला आहे. व अदयाप त्यास अंतिम मंजुरी मिळालेली नाही.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— त्या संचिकेस किती महिने झाले?

श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):—सात आठ महिने झाले.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— कुठे आहे ती संचिका, लेखा विभागात आहे का? त्यांना विचारतो ना? अर्थसंकल्पात तरतुद करु ना. अर्थसंकल्पात तरतुद नाही म्हणजे काय? तातडीच्या प्रसंगी जर आम्ही काही करु शकत नसू तर त्या अर्थसंकल्पाचा उपयोग काय? लेखा विभागाच्या अधिका—यांनी स्पष्टीकरण करावे.

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):— सन्माननिय महापौर महोदया, सन्माननिय सदस्य श्री. गोविंदराम लुंड यांनी सुरक्षा रक्षकांविषयी लक्षवेधीद्वारे जो प्रश्न येथे उपस्थित केला आहे,..........

मा. सदस्य श्री. रामसागर यादव यांनी सभागृहात पुनः प्रवेश केला.

सदस्य श्री. गोविंदराम लुंड :—सहा महिन्यापासुन मी याबाबतीत वारंवार बोलत आहे. चार कर्मचा—यांविषयी अर्थसंकल्पीय तरतुद आहे. आता जर अर्थसंकल्पीय तरतुद नसेल तर ऑक्टोंबरमध्ये जेव्हा सुधारीत अर्थसंकल्प तयार केला जाईल त्यावेळेस तरतुद केली जावी. आता जे काही नुकसान होत आहे, चो—या वगैरे होतात उदयानांना कुणी मालक नाही, प्रत्येक गार्डनमध्ये तीन वॉचमन पाहिजेतच. मी पिंपरी येथे गेलो होतो तेथे काय गार्डन तयार केली आहेत? काय घरे बनविली आहेत. उल्हासनगरमध्ये तसे एकही गार्डन नाही. आमची जी मुले आहेत त्यांना आम्ही काय दिले आहे? काही नाही.

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—सुरक्षा रक्षक नेमणेबाबतची संचिका माझ्याकडे आली होती. अर्थसंकल्पीय तरतुद दर्शवुन फेर सादर करण्यास सांगितले आहे. आठ दिवसात त्यावर मी निर्णय घेईन. अर्थसंकल्पीय तरतुदी विषयीची त्यांची अडचण होती. त्यांनी असा प्रस्ताव दिला होता की, काही लोक तीन महिन्यासाठी ठेवु. अर्थसंकल्पीय तरतुद लक्षात घेता सहा महिन्यासाठी किंवा ३१ मार्चपर्यंत ती सुरक्षा व्यवस्था कशी पुरविता येईल याबाबत आठ दिवसामध्ये निर्णय देतो.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—आता मला हे सांगा की आपणाकडे जो प्रस्ताव आलेला आहे तो किती उदयानांसाठीचा आहे? असे नाही की, ३० उदयानांनंतर आपण म्हणाल की, आमच्याकडे माणसे नाहीत, मग आपला हा जो प्रस्ताव आहे तो कसा आहे? किती उदयानांसाठीचा आहे? असे नाही की, चार आठ तासानंतर तेथिल वॉचमन निघुन जाईल?

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—जेव्हापासुन उल्हासनगर महानगरपालिका स्थापन झाली आहे तेव्हापासुन उदयान अधिक्षक आपणाकडे नाही. ते पद किती तरी वर्षापासुन रिक्त आहे? किंवा आजच्या तारखेला उदयान अधिक्षकाचे पद कुणाकडे आहे? आज संपुर्ण देशात पर्यावरणाविषयी जनजागृती केली जात आहे, असे असतांना उल्हासनगर महानगरपालिकेत उदयान अधिक्षकाची नियुक्ती केली नाही? याबाबतीत माहिती दिली जावी. उदयान अधिक्षक का नाही? एवढी उदयाने आहेत, सपना गार्डन, गोल मैदान तसेच इतर काही उदयाने विकसीत केली जात आहेत. लाखो रुपयाचा निधी आपण त्यासाठी ठेवत आहोत. असे असतांना उदयान

अधिक्षक नाही. उदयानांमध्ये वॉचमन नाहीत. असे असतांना उदयानांच्या विकास कामांसाठी लाखो रुपये खर्च करण्यामध्ये फायदा काय? उदयान अधिक्षक का नाही ठेवला?

सदस्य श्री. गोविंदराम लुंड :—१२ वर्षापासुन उदयान अधिक्षक नाही. त्याबाबतीत मी सभागृहास विनंती करतो की, उदयान अधिक्षकाची नियुक्ती केली जावी.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—तो जो प्रस्ताव दिला आहे तो किती उदयानांसाठीचा आहे?

श्री. अशोककुमार रणखांब (अतिरिक्त आयुक्त):—आदरणीय महापौर महोदया, उदयान अधिक्षकांबाबतीत आता जो प्रस्ताव सुचित केला आहे त्याबाबतीत संपुर्ण माहिती घेवुन हे पद का भरले नाही? याची माहिती घेतो. मुख्यालयाचे उप—आयुक्त आज नाहीत. त्यांच्याकडुन याबाबतची माहिती घेवुन पुढील महासभेत देतो.

सदस्य श्री.बच्चाराम रुपचंदानी :—हा वेगळाच विषय झाला. पहिला विषय वेगळा होता. मी असे विचारले आहे की, आता आपण जे खाजगी सुरक्षा रक्षक मागविणार आहेत ते किती मागविणार आहात? किती उदयानांसाठी मागविणार आहात?

श्री. आर.बी.शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):—उल्हासनगर महानगरपालिकेची जेवढी काही गार्डन आहेत तेथे सुरक्षा रक्षक नेमणे बाबत आम्ही प्रस्ताव दिला होता. ती संचिका सध्या माझ्याकडे येथे उपलब्ध नसल्यामुळे सुरक्षा रक्षकांची संख्या किती दर्शविली आहे ते मी सांगु शकत नाही. परंतु सर्व उदयानांसाठी सुरक्षा रक्षकांची नेमणुक करण्यासाठी आम्ही प्रस्ताव दिला आहे.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—आपले हे उत्तर मोघम आहे. आपण हे जे खाजगी सुरक्षा रक्षक नेमणार आहात ते चार तासासाठी, आठ तासासाठी की २४ तासासाठी नेमणार आहात?

श्री. आर.बी.शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):—कमीत कमी दोन शिफ्टसाठी प्रस्ताव दिला आहे. तीन शिफ्टसाठी जर सुरक्षा रक्षक मिळत असतील तर चांगलेच आहे.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी:—आपण किती सुरक्षा रक्षक मागविले आहेत ते सांगा. दोन लिहिले आहेत, तीन लिहिले आहेत, किती लिहिले आहेत?

श्री. आर.बी.शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):—आम्ही दोन शिफ्टसाठी प्रस्ताव तयार केला होता. तसेच प्रत्येक उदयानामध्ये त्यास रिलीव्हर सुध्दा पाहिजे. ज्या उदयानामध्ये तीन वॉचमन लागतात तेथे तीन शिफ्टसाठी तीन वॉचमन लागतील. त्यांना रिलीव्हर सुध्दा असले पाहिजेत. याबाबत सविस्तर प्रस्ताव तयार करुन पाठविला आहे. त्यामध्ये सर्व उदयानांचा समावेश केला आहे. त्याच बरोबर महापालिकेचे काही कार्यालये आहेत त्यांचाही आम्ही समावेश केला आहे. परंतु ती संख्या नेमकी किती आहे ते आता मला आठवत नाही. सात आठ महिन्यापुर्वीची ती संचिका असून सध्या ती आता माझ्याकडे नाही. त्यामुळे एकुण किती उदयाने आहेत आणि किती महापालिका कार्यालये आहेत हे मला आठवत नाही.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—सन्माननिय महापौरजी, उप—महापौरजी आयुक्त साहेब, हे जे अभियंते आहेत, कोणते पद आहे आता त्यांच्याकडे? १६ तारखेला ही लक्षवेधी सूचना दिलेली आहे. १६ ते २० , ५ दिवस झालेत. यांना ६ महिन्यापुर्वीची संचिका सापडत नाही. यांना यासंबंधीच्या प्रश्नांचे महासभेत उत्तर दयावे लागेल. उल्हासनगरमध्ये किती उदयाने आहेत? जेथे वॉचमन नेमण्यात आलेला नाही?

श्री. आर.बी.शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):—३० उदयाने असल्याचे यापुर्वीच मी सांगितले आहे.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—३० उदयानांमध्ये वॉचमनच्या बैठकीची सोय आहे? उदयानामध्ये वॉचमनला बसण्याची व्यवस्था नाही तो कुठेही जाईल त्यावेळेस आपण काय कराल? आपण जो प्रस्ताव तयार केला आहे तो काय तयार केला आहे?

**श्री. आर.बी.शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):—**जेवढी काही उदयाने आहेत तेथे कॅबीन्स किंवा रुमस् .........

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—**जेवढी काही म्हणजे नेमकी किती? आपण अभ्यास न करताच महासभेत येता काय? ५ दिवसापुर्वी लक्षवेधी आली आहे, त्याबाबतीत काय उत्तर दयायचे याचा अभ्यास करुन आला नाहीत काय?

**श्री. अशोककुमार रणखांब (अतिरिक्त आयुक्त):—**आदरणीय महापौर महोदया, उदयानांमध्ये वॉचमन नेमण्याविषयी आता सभागृहात चर्चा चालु आहे. त्याबाबतीत मी थोडासा खुलासा करु इच्छितो. उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रामध्ये जी ३० उदयाने आहेत त्याबाबत आता यांनी जो मुद्दा उपस्थित केला होता, त्याबाबतचा जो प्रस्ताव या अगोदर मी पाहिला आहे त्यामध्ये या सर्व उदयानांसाठीचा ३ शिफ्टसाठीचा प्रस्ताव प्रस्तावित केलेला नाही. आता या बाबत कार्यकारी अभियंता यांना बरोबर घेवुन आम्ही फेरप्रस्ताव तयार करु. त्यामध्ये ३ शिफ्टमध्ये वॉचमनची व्यवस्था, वॉचमनला बसण्यासाठी जागा, वॉचमनला कोणत्या दिवशी सुट्टी मिळेल. त्यादिवशी कोणता वॉचमन कामावर येईल. अशा प्रकारे तीन शिफ्टमध्ये तीन वॉचमन याप्रमाणे एकुण किती वॉचमनची आवश्यकता पडेल हा सर्व प्रस्ताव पुढील महासभेत सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन येईल. त्यावर आस्थापनेचा किती खर्च होईल, व हे सुरक्षा रक्षक कॉन्ट्रक्ट बेसीसवर आपणांस घ्यावे लागतील. महाराष्ट्रातील इतर महानगरपालिकेतील वुक्षप्राधिकरणा अंतर्गत उदयानांची जी निगा राखली जाते, ती निगा राखण्यासाठी सर्वात प्रथम उदयानांच्या सुरक्षितेची व्यवस्था केली पाहिजे. त्याबाबतीत आमचे भुतपुर्व सभागृह नेता यांनी सुध्दा बराच पाठपुरावा केला आहे. त्याबाबतचा प्रस्ताव सुध्दा आपणाकडे आहे. पुढील महासभेत सर्व तरतुदीसहचा प्रस्ताव येईल त्यामध्ये किती वॉचमन लागतील, त्यांची काय जबाबदारी असेल, सुट्टी कधी मिळेल, व त्यांच्या बरोबर कोण कोण काम करेल याबाबतचा सविस्तर प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत येईल.

**सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—**आयुक्त साहेब, पुढील महासभेअगोदर आपण आपल्या अधिका—यांचा शिकवणी वर्ग घ्या. जी लक्षवेधी आली त्यावर तुम्ही काय काय अभ्यास केला आहे? प्रश्न कुणाशी संबंधीत आहे आणि त्याचे उत्तर कुणाला दयावे लागत आहे? जर उत्तर देता येत नाही तर राजीनामा देवुन निघुन जा ना? काय उल्हासनगर महानगरपालिकेस लुटण्यासाठी आले आहात?

**सदस्य श्री. गोविंदराम लुंड:—**साहेब, एक महिन्यामध्ये कार्यवाही झाली पाहिजे. नाहीतर जे काम २००५ मध्ये झाले नाही, ते २००६ मध्ये झाले नाही, २००७ मध्येही झाले नाही असे होता कामा नये.

**श्री. अशोककुमार रणखांब (अतिरिक्त आयुक्त):—**नाही, मी पुन्हा एकदा सांगतो. एक महिन्यामध्ये त्यांच्याकडुन प्रस्ताव पाठविण्याची पुर्ण व्यवस्था मी करेल. आणि ते निश्चितपणे होईल.

**सदस्य श्री. गोविंदराम लुंड :—**११९ कर्मचारी मंजुर आहेत. बाकीच्यांसाठी अर्थसंकल्पात तरतुद नाही. म्हणुन प्रस्ताव परत गेला आहे.

**आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—**सन्माननिय महापौर महोदया, सन्माननिय सदस्यजी, याबाबतीत एक आठवडयाच्या आत निर्णय होईल. जी अर्थसंकल्पीय तरतुद आहे ती पाहुन अर्थसंकल्पीय तरतुदी नुसार त्या संचिकेवर आठ दिवसात निर्णय घेतला जाईल.

**महापालिका सचिव :—** विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. २ :—** मागील सभेचे दिनांक १९/६/२००९ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

**सदस्य श्री. मोहन साधवानी :—**मा. महापौरजी, मी आयुक्त साहेबांना एक प्रश्न विचारु इच्छितो की, मागील महासभेत सुध्दा पदोन्नतीचा एक विषय होता. आणि त्याअगोदर आम्ही ज्या पदोन्नत्या दिल्या आहेत त्यांना ना वार्षिक वेतनवाढ मिळत आहे तसेच किती लोकांना अदयाप पदोन्नतीचे आदेश मिळाले नाहीत, वार्षिक वेतनवाढ मिळाली नाही? महासभेने ठराव पारीत केल्यानंतरही किती लोकांच्या पदोन्नतीचे प्रस्ताव प्रलंबित

आहेत? प्रत्येक सभेत सांगितले जाते की, पुढील महिन्यात त्यांना पदोन्नतीचे आदेश दिले जातील? त्यांना वार्षिक वेतनवाढ देवु? तर आता असे किती कर्मचारी आहेत की ज्यांना पदोन्नतीचे आदेश मिळाले नाहीत व वार्षिक वेतनवाढ मिळाली नाही?

<u>श्री. अशोककुमार रणखांब (अतिरिक्त आयुक्त):—</u>मा. महापौर महोदया, ज्या पदोन्नतीच्या प्रस्तावास महासभेने मंजुरी दिली होती, त्याबाबतीत सांगु इच्छितो की, २००३ च्या भरती संदर्भात काही तक्रारी झाल्या होत्या. त्या अनुषंगाने एक प्रस्ताव नगरविकास विभागाकडे पाठविण्यात आलेला आहे. त्यास मान्यता मिळाल्यानंतर पदोन्नतीचे आदेश दिले जातील. त्या तक्रारीं संदर्भात चौकशी नगरविकास विभागाने केलेली आहे. त्या तक्रारीमध्ये उल्लेख असलेले जे जे कर्मचारी आहेत, त्यांच्यावर पदोन्नतीच्या आदेशाने परिणाम होणार असल्याने याबाबतीत काय करावे याबाबतचा अभिप्राय नगरविकास विभागाकडुन मागविण्यात आलेला आहे. त्यानंतर त्यांना एक स्मरणपत्रही पाठविले आहे. त्याचे उत्तर आल्यानंतर ताबडतोब कार्यवाही करु.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :—</u>कोणत्या संवर्गातील कर्मचा—यांबाबतीत तक्रारी आहेत? समजा खुला संवर्ग आहे त्यातील कर्मचा—यांबाबतीत कुणाची काही हरकत नसेल तर त्यांना आपण पदोन्नतीचे आदेश देवु शकता ना?

<u>श्री. अशोककुमार रणखांब (अतिरिक्त आयुक्त):—</u>ज्याबाबतीत तक्रार झालेली आहे ती तक्रार नियुक्ती दिल्यानंतर पुढे व मागे त्याचे परिणाम होणार आहेत. त्याबाबतीत चर्चा झाली होती की, ज्या व्यक्तीची नियुक्ती पदोन्नती नंतर होईल त्याबाबतीत जर शासनाने काही निर्णय घेतला तर त्याचा परिणाम मागे, पुढे होवु शकतो. यासाठी शासनाकडुन अभिप्राय मागविला आहे.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :—</u>आता तर आपण २००३ चे बोलत आहात. त्याअगोदर सुध्दा ब—याचशा पदोन्नत्या दिल्या आहेत. विदयुत विभागाचे कर्मचारी आहेत............

<u>श्री. अशोककुमार रणखांब (अतिरिक्त आयुक्त):—</u>तक्रारीमध्ये उल्लेख केलेले जे कर्मचारी आहेत, त्यांच्याबाबतीत मी म्हणत आहे. बाकीच्या कर्मचा—यांना तर आम्ही दिले आहेत. व याची सविस्तर माहिती पुढील महासभेत आपणांस देईन.

<u>महापालिका सचिव :—</u>पास? सर्वसंमतीने?

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर :—</u> मागील सभेचे दिनांक १९/६/२००९ रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

---

☑

**विषय क्र. २ :—** मागील महासभेचे दिनांक १६/६/२००९ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नाव : श्री. गोविंदराम लुंड
अनुमोदकाचे नाव : श्री.बी.बी. मोरे

<u>महासभा ठराव क्र. १६ ड</u> <u>दिनांक : २०/०७/२००९</u>

ही महासभा महापालिका सचिवांनी प्रस्तुत केलेल्या दिनांक १९/६/२००९ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे पृष्ठ क्र. १ ते ८२ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

<u>एकमताने</u>

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ३:—** दिनांक १/८/२००९ पासून निवृत्त होणाऱ्या ६ परिवहन समिती सदस्यांच्या जागी नविन सदस्यांची नेमणूक करणे.

---

निवृत्त होणा—या ६ सदस्यांच्या जागी नविन सहा सदस्यांची नेमणुक करण्यासाठी सहा नावांचा प्रस्ताव आलेला आहे. त्यांची नावे अशी आहेत.

१. आरपीआयच्यावतीने श्री. जे.के. ढोके
२. लोकभारतीच्यावतीने श्री. आदिनाथ यादवराव जाधव
३. श्री. संजय आयोध्याप्रसाद सिंग
४. कॉंग्रेसपक्षाच्यावतीने श्री. आनंद शांताराम शिंदे
५. शिवसेनापक्षाच्यावतीने श्री. विलास ढांगे
६. श्री. नामदेव मरसाळे

ठिक आहे? पास?

**काही सदस्य :—**पास—पास......

मा. सदस्य श्री. राजु जग्यासी, श्री. लाल पंजाबी हे सभागृहातुन बाहेर गेले.

**महापौर :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ३ :—** दिनांक १/८/२००९ पासून निवृत्त होणाऱ्या ६ परिवहन समिती सदस्यांच्या जागी नविन सदस्यांची नेमणूक करणे.

**प्रस्तावना**

दिनांक ०९/०७/२००९ रोजीच्या परिवहन समिती सभेमध्ये विषय २ अनुषंगाने चिठ्ठया काढून खालील सहा परिवहन सदस्य ठराव क्रमांक ७ व्दारे ०१/०८/२००९ पासून निवृत्त होतील असे ठरविण्यांत आले.

| अनु.क्र. | सदस्याचे नाव | राजकिय सबंधित पक्षाचे नाव |
|---|---|---|
| १) | श्री. डॉ विजय पाटील | शिवसेना |
| २) | श्री. राणा सगु | शिवसेना |
| ३) | श्री. जे. के. ढोके | आर.पी.आय. |
| ४) | श्री. दिलीप लालवानी | लोकभारती |
| ५) | श्री. सच्चानंद गोपलानी | लोकभारती |
| ६) | श्री. आशेराम टाक | कॉंग्रेस |

दिंनाक २३/०८/२००७ च्या महासभा ठराव क्रमांक ४० अन्वये १२ परिवहन समिती सदस्यांची नेमणूक करण्यांत आली होती. प्रत्येक गटाचे परिवहन समितीवर प्रमाणशिर प्रतिनिधी व खालील प्रमाणे होते.

| लोकभारती | शिवसेना | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी | भाजपा | कॉंग्रेस | आरपीआय | मनसे | अपक्ष | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ३ | २ | २ | १ | १ | ० | ० | १२ |

मुंबई प्रतिक महानगरपालिका अधिनियम २५ (५) (६) (७) अन्वये रिकाम्या झालेल्या जागांवर नविन ६ सदस्यांची नेमणूक करणे आवश्यक आहे. पूर्वीच्या तुलनेने भाजपा पक्षाचे सख्यांबळात एका सदस्याचे पोट

निवडणूकीत वाढ झाल्याने त्या पक्षाची सदस्य संख्या  ११ वरुन १२ झाली व महापालिका सदस्यांची ७५ वरुन ७६ झाली.

दिनांक २३/०६/२००७ च्या ठराव क्र. ४० अन्वये परिवहन समितीस नेमलेल्या १२ सदस्यांच्या तुलनेने पक्षाचा/गटाच्या तौलनिक संख्येत बदल झाला असून पक्षाचे बलाबलानुसार परिवहन समितीच्या एकूण १२ सदस्यांच्या तुलनेत ठरविल्यास त्या आधारे प्रत्येक पक्षाचे प्रमाणशीर प्रतिनिधित्व खालील प्रमाणे आहे.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | लोकभारती | १८<br>—— X १२<br>७६ | = २.६८<br>= ३ | (५) | कॉंग्रेस | ५<br>—— X १२<br>७६ | = ०.९४<br>= १. |
| (२) | शिवसेना | १७<br>—— X १२<br>७६ | = २.६८<br>= ३ | (६) | आरपीआय | ५<br>—— X १२<br>७६ | = ०.७८<br>= १. |
| (३) | रा.का.पा. | १६<br>—— X १२<br>७६ | = २.५२<br>= २ | (७) | म.न.से. | २<br>—— X १२<br>७६ | = ०.३१<br>= ० |
| (४) | भाजपा | ११<br>—— X १२<br>७६ | = १.८९<br>= २ | (८) | अपक्ष | १<br>—— X १२<br>७६ | = ०.१<br>= ० |

पुर्वीच्या तुलनेत पक्षाच्या/गटाच्या तौलनिक संख्येत एका सदस्याचा संख्येत बदल झाला असलातरी त्यामुळे, परिवहन समितीवर तौलनिक संख्याबळा अनुसार पक्षनिहाय प्रमाणशिर प्रतिनीधीत्वामध्ये बदल झालेला नाही.

सबब रिक्त होणाऱ्या जागांवर निवृत्त झालेला सदस्य ज्या मान्यताप्राप्त पक्षाचा/नोंदणीकृत पक्षाचा, गटाचा, आघाडीचा किंवा फ्रन्टंचा असेल त्याच मान्यता प्राप्त पक्षाच्या, नोंदणीकृत, पक्षाच्या, गटाच्या, आघाडीच्या किंवा फ्रन्टंच्या सदस्यांस नामनिर्देशित करणे आवश्यक आहे. त्यामुळे खालील राजकिय पक्षाचे विनिर्दिष्ट केलेल्या संख्येप्रमाणे परिवहन सदस्य पदाच्या ६ रिक्त जागांवर नविन ६ सदस्य नेमणे प्रस्तावित.

| लोकभारती | शिवसेना | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी | भाजपा | कॉंग्रेस | आरपीआय | मनसे | अपक्ष | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | २ | ० | ० | १ | १ | ० | ० | ६ |

**महासभा ठराव क्र: १७**  **दिनांक:–२०/७/२००९**

सुचकाचे नाव :– श्री. जीवन इदनानी
अनुमोदकाचे नाव :– श्री.बी.बी. मोरे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे दिनांक १/८/२००९ पासून निवृत्त होणाऱ्या ६ परिवहन समिती सदस्यांच्या जागी खालील नविन सदस्यांची नेमणूक करीत आहेत.

१. श्री. अदिनाथ यादवराव जाधव
२. श्री. संजय अयोध्याप्रसाद सिंग
३. श्री. जनार्दन किसन ढोके
४. श्री. विलास ढांगे
५. श्री. नामदेव मरसाळे
६. श्री. आनंद शांताराम शिंदे

सुचकाची सही/–
अनुमोदकाची सही/–

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी

**महापालिका सचिव :–** विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ४ :–** विद्युत विभागाचे निरुपयोगी सामानाची विल्हेवाट लावणेस मान्यता देणे.

---

**काही सदस्य :–**पास–पास......

मा. सदस्य श्री. लाल पंजाबी यांनी पुनः सभागृहात प्रवेश केला.

**महापौर :–** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ४:–** विद्युत विभागाचे निरुपयोगी सामानाची विल्हेवाट लावणेस मान्यता देणे.

**प्रस्तावना**

विद्युत विभागामार्फत निरुपयोगी सामानाची विल्हेवाट लावण्यासाठी जनसंपर्क कार्यालयामार्फत ३ वर्तमानपत्र म्हणजे दै. धनुष्यधारी, दै. फ्रि प्रेस जरनल व दै. आपलं महानगर यात निविदा सुचना देवुन सिलबंद निविदा मागविण्यात आल्या होत्या.

त्यांच्या प्रतिसादात श्री फिरोज कासामल, श्री. इरसाद अहमद अन्सारी, श्री. रफी उल्लाखांन, मे. युरो कॉर्पोरेशन, मे. बाबा ट्रेडिंग कंपनी, मे. जनता कंटेनर्स, मे. रिंदानी इंटरप्रायजेस, में. दिपक ट्रेडर्स, मे. अनिल पांडेय, मे. नसीबदार मुसेब कं., मे. तवाब हुसेन स्क्रॅप ट्रेडर्स, मे. महमद वजीर, मे. शकिल अहमद, मे. रोझ इंटरप्रायजेस, मे. ठाकूर इंटेरीअर, मे. समिर कन्स्ट्रक्शन यांनी कोरे निविदा चे कोरे प्रपत्र खरेदी केले

सदर निविदा इसारा रक्कमेसह सादर करण्याची मुदत २२/०६/०९ रोजी सायकाळी ५.०० वाजे पर्यंत

| Sr. No. | Descr. of Un-serviceable Articles | Unit | Appx Qty. | Expected cost Per Unit in Rs. | M/s. Baba Trading Co. | M/s. Thakur Enterior Per Unit in Rs. | M/s. Janata Containers. Per Unit in Rs | M/s. Anil Pandey Per Unit in Rs | M/s. Rindani Enterprises Per Unit in Rs | M/s. Tawab Hussain Scrap Traders Per Unit in Rs | M/s. Euro Corporation Per Unit in Rs. | Amount of Highest Rate x Qty. in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | All Type OF Chokes | Kg. | २००० | १४ण०० | 20.00 | 17.00 | 30.00 ,Cu 15.00 Al, | 28.50 | 22.00 | 38.87 | <u>58.65</u> | 117300/- |
| 2 | All Type OF Accessories such as Tube starter / Holder | Kg. | ८० | ९ण०० | 11.00 | -- | 2.00 | 5.00 | 10.00 | 13.13 | <u>26.15</u> | 2092/- |
| 3 | Allum Metallic Materials | Kg. | ७० | ६०ण०० | 62.00 | 45.00 | 62.00 | 68.00 | 61.50 | 65.67 | <u>80.30</u> | 5621/- |
| 4 | All Type of A.C Units | Per Ton | १ण५ | १८१५ण०० | --- | -- | 1815.00 | 1500.00 | <u>2200.00</u> | 2687.00 प्रति नग | 2177.00 | 3300.00 |
| 5 | PVC arm/unarm. Cable & wire (Allum.) | Kg. | ६० | ७ण०० | 20.50 | 10.00 | 15.00 | 35.00 | 12.00 | 26.87 | <u>41.99</u> | 2519.40 |
| 6 | G.S./MS./ G.I. Metallic Materials | Kg. | १०० | १८ण२५ | 13.00 | 12.00 | 13.00 | 16.00 | 18.50 | 13.87 | <u>22.99</u> | 2299/- |
| 7 | All Type of Ceiling Fans ( 36" to 56" ) | Each | १४ | १२१ण०० | 125.00 | 125.00 | 125.00 | 175.00 | 130.00 | 187.00 | <u>237.00</u> | 3318./- |

होती, त्याच्या प्रतिसादात मे. बाबा ट्रेडींग कंपनी, ठाकुर इंटेरीअर, जनता कंटेनर्स, अनिल पांडेय, रिंदानी इंटरप्रायजेस, तवाब हुसेन स्क्रॅप ट्रेडर्स, व युरो कॉर्पोरेशन अशा ७ निविदाधारकांनी इसारा रक्कमेसह सिलबंद निविदा वेळेवर सादर केल्या. तसेच मे. दिपक ट्रेडर्स यांच्या सिलबंद निविदा उशीराने म्हणजे वेळेवर न मिळाल्यामुळे सदर निविदा उघडण्यात आली नाही. तसेच वेळेवर मिळालेल्या सातही निविदा दिनांक २५/०६/०९ रोजी दुपारी ३.०० वाजता उघडण्यात आल्या.

त्यांच्या तुलनात्मक तक्ता पुढील प्रमाणे आहे. **COMPERATIVE STATEMENT**

सदर दराचा तुलनात्मक तक्ता नुसार मे. युरो कॉर्पोरेशन अॅटम १, २, ३ व ५,६,७ मध्ये सर्वात जास्त व अपेक्षीत दरापेक्षा ही सर्वात जास्त आहे, आयटम क्र. ४ मध्ये मे. तवाब हुसेन स्क्रॅप ट्रेडर्स यांनी दिलेला दर प्रती नग असा दिल्याने त्यांचा दर मे. रिदानी इंटरप्रायजेस यांनी दिलेल्या प्रति टनानुसार दरापेक्षा कमी आहे. त्यामुळे अॅटम क्रमांक ४ मध्ये मे. रिदानी इंटरप्रायजेस यांनी दिलेला दर सर्वात जास्त व अपेक्षीत दरापेक्षा ही जास्त आहे

वरील बाबी लक्षात घेता ( १ ) ज्या अॅटम मध्ये ज्याचे दर जास्त आहे ते अॅटम त्यांना उपलब्ध परिमाण व ऑक्टोंबर २००९ अखेर पर्यंत जमा होणा—या परिमाण विल्हेवाट करणेस मान्यता मिळावी. ( २ ) जर सर्वाधिक दराच्या निविदाधारकांनी साहित्यें घेण्यास नकार दिला तर त्याची म्डण्क फोरफिट करून दुस—या कुठल्याही एजन्सीला अपेक्षित दरानुसार साहित्याची विल्हेवाट करण्यासाठी आयुक्ताना प्राधिकृत करणे. ( ३ ) मे. दिपक ट्रेडर्स यांची निविदा उशीरा मिळाल्यामुळे उघडता न आलेली सिलबंद निविदा उघडुन त्यांना अनामत रक्कमेचा डी. डी परत करणेस मान्यता मिळावी.

वरील प्रस्ताव मा. महासभेपुढे मंजुरीकरीता ठेवणेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> १८ <u>दिनांकः—२०/०७/२००९</u>

सुचकाचे नाव :— श्री. जीवन इदनानी
अनुमोदकाचे नाव :— श्री. जे.के. ढोके

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार विद्युत विभागाचे निरुपयोगी सामानाची विल्हेवाट लावणेकामी बाब क्रमांक १,२,३,५,६ व ७ करिता मे. युरो कॉपोरेशन व बाब क्रमांक ४ करीता मं. रिदांनी इंटरप्रायजेस या अधिकतम दराच्या निविदाकारांशी संविदेस व खालील बाबीस मान्यता देत आहेत.

( १ ) ज्या अॅटम मध्ये ज्याचे दर जास्त आहे ते अॅटम त्यांना उपलब्ध परिमाण व ऑक्टोंबर २००९ अखेर पर्यंत जमा होणा—या परिमाण विल्हेवाट करणे.

( २ ) जर सर्वाधिक दराच्या निविदाधारकांनी साहित्यें घेण्यास नकार दिला तर त्याची म्डण्क फोरफिट करून दुस—या कुठल्याही एजन्सीला अपेक्षित दरानुसार साहित्याची विल्हेवाट करण्यासाठी आयुक्ताना प्राधिकृत करणे

( ३ ) मे. दिपक ट्रेडर्स यांची निविदा उशीरा मिळाल्यामुळे उघडता न आलेली सिलबंद निविदा उघडुन त्यांना अनामत रक्कमेचा डी. डी परत करणे.

सुचकाची <u>सही/—</u>

अनुमोदकाची <u>सही/—</u>

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

मा. सदस्य श्री. राजु जग्यासी यांनी सभागृहात पुनः प्रवेश केला.

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

➪ **विषय क्र. ५** :—परिवहन सभापती व सदस्यांना महापालिका सदस्यांच्या धर्तीवर पुर्वलक्षी प्रभावाने
शासनाच्या पुर्व मंजुरीने मानधन व बैठक भत्ता मान्य करणे.

---

काही सदस्य :—पास—पास......

महापौर :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ५**:— परिवहन सभापती व सदस्यांना महापालिका सदस्यांच्या धर्तीवर पुर्वलक्षी प्रभावाने शासनाच्या पुर्व मंजुरीने मानधन व बैठक भत्ता मान्य करणे.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिकातर्फे शहर बससेवा उपक्रम लवकरच सुरु होणार आहे. मा. परिवहन सभापती यांनी त्यांचे पत्र दिनांक २२/०१/०९ अन्वये परिवहन समिती गठीत झाल्यापासून म्हणजे दिनांक २३/०८/०७ पासून परिवहन समिती सदस्यांना मानधन मिळण्याची विनंती केली आहे.

या अनुषंगाने वाहन विभागामार्फत इतर महानगरपालिका जसे नवि मुंबई महानगरपालिका व कल्याण डोंबिवली महानगरपालिका येथे विचारणा केली असता, नवि मुंबई महानगरपालिका येथे मा. परिवहन समिती सभापती व सदस्यांना मानधन रू.४०००/— व प्रति बैठक भत्ता रू.१००/— (कमाल मर्यादा रू.४००/— दर महा) तसेच कल्याण डोंबिवली महानगरपालिका मा. परिवहन समिती सभापती व सदस्यांना मानधन रू. ३०००/— व प्रति बैठक भत्ता रू.१००/— (कमाल मर्यादा रू.४००/— दर महा) एवढे अदा केले जाते.

वरिल दोन्ही महानगरपालिकेच्या मा. परिवहन समिती सभापती व सदस्य यांना मिळणाऱ्या भत्याचा विचार करता, उल्हासनगर महानगरपालिकेच्या मा. परिवहन समिती सभापती व सदस्यांना मानधन रू. ४०००/— व प्रति बैठक भत्ता रू. १००/— (कमाल मर्यादा रू.४००/— दर महा) एवढे परिवहन समिती सदस्यांना पालिका सदस्यांच्या धर्तीवर राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीने परिवहन समिती गठीत झाल्यापासून म्हणजे दिनांक २३/०८/०७ पासून मान्य करण्यास मा. महासभेच्या मंजुरीस्तव प्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: १९ | दिनांक:—२०/०७/२००९

सुचकाचे नाव :— श्री. राजु जग्यासी

अनुमोदकाचे नाव :— श्री.बी.बी. मोरे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे परिवहन सभापती व सदस्यांना महापालिका सदस्यांच्या धर्तीवर पुर्वलक्षी प्रभावाने शासनाच्या पुर्व मंजुरीने मानधन व बैठक भत्ता देणे मान्य करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ६** :– श्री. ढेणवाल बनवारी, तत्कालीन आरोग्य समिती सभापती यांना दि.२३/०१/२००१ ते २२/१२/२००१ या काळावधींचा वाहनभत्ता अदा करणेस मान्यता देणे.

---

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>महापौर :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ६**:– श्री. ढेणवाल बनवारी, तत्कालीन आरोग्य समिती सभापती यांना दि.२३/०१/२००१ ते २२/१२/२००१ या काळावधींचा वाहनभत्ता अदा करणेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या सन १९९७ ते २००३ च्या कालावधी मधील दिनांक २३/०१/०१ ते २८/०२/२००२ या कालावधीत य श्री. ढेणवाल बनवारी हे आरोग्य समितीच्या सभापती पदावर होते.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या मा. स्थायी समिती ठराव क्रमांक ६ दिनांक ३०/०४/१९९७ अन्वये विषय समिती सभापति यांना त्यांचे कार्यकालावधी मध्ये चार चाकी वाहन पुरविणे एवजी प्रति माह रू.१५०००/– वाहनभत्ता देय आहे मात्र मा. स्थायी समिती ठराव क्रमांक ६ अटी व शर्तीनुसार संबधितांकडे वाहन नसेल तर ज्या दिवशी वाहन खरेदी केले जाईल. त्या दिवसापासून वाहनभत्ता मिळण्यास संबधित पात्र राहतील.

उपलब्ध कागदपत्रानुसार श्री. ढेणवाल बनवारी यांचे नावावर सदरचे वाहन झालेनंतर दिनांक २३/१२/०१ पासून दिनांक २२/०२/०२ पर्यंत वाहनभत्ता अदा करण्यात आलेला आहे. श्री. ढेणवाल बनवारी यांनी दिनांक २३/०१/०१ ते दिनांक २२/०२/०२ या संपूर्ण कालावधीचा वाहनभत्ता मिळण्यात यावा असा दिनांक २७/४/२००३ रोजी अर्ज दिलेला होता.

तसेच मा. स्थायी समिती ठराव क्रमांक ३७ दिनांक ९/०७/२००३ अन्वये सदर प्रस्तावास मा. स्थायी समितीने मान्यता दिलेली नव्हती.

तद्नंतर मा. स्थायी समितीने ठराव क्रमांक ७१ दिनांक ९/०७/२००३ अन्वये श्री.ढेणवाल बनवारी, तात्कालीन सभापती सार्वजनिक आरोग्य समिती, यांना विशेष बाब म्हणुन दिनांक २३/१/०१ ते २२/१२/०१ या कालावधीसाठी रू. १,६५,०००/– वाहनभत्ता मंजुर करण्यात आलेला होता.

परंतु मा. उप आयुक्त (मुख्यालय) यांनी जा.क्र.पा/साप्रवि/आस्था/मुली/२६६ दिनांक २७/४/२००३ . अन्वये या पुढे वाहनभत्ता विषयक देयक शासनाची मान्यता मिळेपर्यंत या विभागाने सादर करू नयेत असे आदेश दिलेले होते. त्यामुळे श्री. ढेणवाल बनवारी यांना वाहनभत्ता देयक अदा करता आले नाही.

परंतु मा. महासभा ठराव क्रमांक ४८ दिनांक २७/०९/०७ च्या अटी व शर्तीच्या अधीन राहून पूर्वीच्या समिती सभापतीचा वाहनभत्याचा प्रस्ताव मा. स्थायी समितीने नुकताच मंजुर केलेला आहे.

आता वरिल संदर्भित पत्र क्र २ अन्वये श्री. ढेणवाल बनवारी, यांचा दिनाक २३/०१/२००१ ते दि. २२/१२/२००१ या कालावधीतील रु. १,६५,०००/— एवढया रक्कमेचा प्रस्ताव मंजुर होवुन चार वर्षापेक्षा अधीक कालावधी झाला असल्यामुळे सदर प्रस्ताव पुन्हा मा. महासभेपुढे मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र:** २० **दिनांक:—२०/०७/२००९**

सुचकाचे नाव :— श्री. तुलसीदास वसिटा

अनुमोदकाचे नाव :— श्री. रविंद्र बागुल

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. ढेणवाल बनवारी, तत्कालीन आरोग्य समिती सभापती यांना दि.२३/०१/२००१ ते २२/१२/२००१ या काळावधींचा वाहनभत्ता अदा करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र.** ७ :— महाऊर्जा मार्फत ५ व्या 'राज्यस्तरीय उर्जा संवर्धन व व्यवस्थापन पुरस्कार' करिता उल्हासनगर महानगरपालिकेस प्रथम पारितोषक प्राप्ती बाबतची माहिती नोंद करणे.

---

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**मा. महापौर, आयुक्त साहेब हा जो सातव्या क्रमांकाचा विषय माहिती नोंद करण्याबाबतचा आहे. माहिती तर नोंद करतच आहोत त्याचबरोबर मी असे सांगु इच्छितो की, काही दिवसापुर्वी विदयुत विभागातील कर्मचा—यांना आगाऊ वेतनवाढ देण्याबाबत महासभेमध्ये एक ठराव पारीत केला होता. त्याची अंमलबजावणी अदयापपर्यंत झालेली नाही. ती अंमलबजावणी त्वरीत झाली पाहिजे. व दुसरी गोष्ट अशी की, त्या विभागातील कर्मचा—यांना कार्यप्रेरक भत्ता देण्यासाठी सुध्दा लवकरात लवकर महासभेपुढे ठराव आला पाहिजे. भारतीय जनता पार्टी व संपुर्ण सभागृहाच्यावतीने मा. श्री. मुकेश आयलानी यांचे मी हार्दिक अभिनंदन करु इच्छितो.

**सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता :—**मा. महापौरजी, सर्व पक्षाच्या सदस्यांनी श्री. मुकेश आयलानी यांचे मोठया धुमधडाक्याने स्वागत केले. याबाबतीत मी अशी सूचना करु इच्छितो की, सार्वजनिक बांधकाम विभाग, आरोग्य आणि आणखी काही विभागाचे कर्मचारी आहेत या लोकांनी जर त्यांचे अनुकरण केले तर त्यांचे सुध्दा अभिनंदन करता येवु शकेल. त्यांनी यांच्यापासुन प्रेरणा घेवुन असे काम करावे अशी अपेक्षा व्यक्त करतो. धन्यवाद।

**सदस्य श्री. गोविंदराम लुंड:—**विदयुत विभागातील लोकांना अजुनपर्यंत वेतनवाढ देण्यात आलेली नाही ती लवकरात लवकर देण्यात यावी.

यावेळी सभागृहात उपस्थित असलेले सर्व पालिका सदस्य, अधिकारी यांनी श्री. मुकेश आयलानी यांच्या अतिउत्कृष्ट कार्याबद्दल त्यांना मानवंदना दिली.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, सभागृहाचे असे मत आहे की, श्री. मुकेश आयलानी यांनी जे चांगले काम केले आहे, त्यांना काहीना काही पारितोषिक दिले पाहिजे. पैश्याची तर काही किंमत नाही, १ लाख दया की पन्नास हजार. परंतु एखादा छोटासा पुरस्कार देण्यात यावा. शेवटी पुरस्कार हा पुरस्कारच असतो. तर असा पुरस्कार देण्याबाबतची महासभेत घोषणा करा. कमीत कमी ११,००० व जास्तीत जास्त आपणांस जेवढे वाटेल तेवढया रक्कमेचे पारितोषिक देण्यात यावे. जेणेकरुन अधिका—यास असे वाटेल की, आमच्या महापालिकेने, नगरसेवकानी ही एक चांगली घोषणा केली आहे. तर आजच आपण ही घोषणा करावी. कमीत कमी ११,०००/— व जास्तीत जास्त आपल्याला वाटेल तेवढे.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :—</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, संपुर्ण सभागृहाचे असे मत आहे की, श्री. आयलानी यांनी उल्हासनगर महानगरपालिकेस आणि उल्हासनगर वाशियांना एक सन्मान प्राप्त करुन दिला आहे. त्यांची मेहनत आहे. त्यांच्या विभागातील कर्मचा—यांची मेहनत आहे. श्री. जमनु पुरस्वानी यांनी म्हटले तसे पैश्याला काही किंमत नाही भलेही एक लाख दया, ५१ लाख दया, किंवा १ करोड दया. परंतु त्यांच्या कार्याची प्रशंसा करण्याच्या दृष्टीने श्री. जमनादास पुरस्वानी यांनी म्हटल्याप्रमाणे ११,००० चा पुरस्कार देण्यात यावा. त्याचे मी समर्थन करतो. व फक्त श्री. आयलानी यांचेच नव्हे तर त्यांच्या विभागातील बाकी जे अधिकारी व कर्मचारी आहेत ज्यांनी दिवस रात्र मेहनत केली मग भलेही ते शिपाई, विदयुत मदतनीस किंवा त्यांचे जे तांत्रिक अधिकारी, कर्मचारी आहेत त्यांचा सुध्दा मान—सन्मान झाला पाहिजे. एखादा व्यक्ती एकटा काही करु शकत नाही. त्यांची जी टिम आहे त्या टिमला सुध्दा मान—सन्मान मिळाला पाहिजे. त्यांच्यासाठी सुध्दा काही ना काही पारितोषिक जाहिर झाले पाहिजे. त्याच बरोबर त्यांना वार्षिक वेतनवाढ मिळाली पाहिजे. यासाठी आम्हांला असे वाटते की, आपल्यावतीने , प्रशासनाच्यावतीने प्रस्ताव आला पाहिजे. आपणच त्यांना उत्साहित केले पाहिजे. जेणेकरुन दुस—या विभागाने त्यांचे अनुकरण केले पाहिजे. वेतनवाढ देण्यामध्ये आपल्या महानगरपालिकेवर फार मोठा आर्थिक ताण पडणार नाही. यासाठी आपणाकडुनच याबाबतचा प्रस्ताव आला पाहिजे. मला अपेक्षा आहे की, श्री. मुकेश आयलानी व त्यांचे कर्मचा—यांबाबत आपण काय विचार केला आहे तो पुढील महासभेत आपण आम्हांस सांगावा. धन्यवाद।

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :—</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, जसे श्री. जीवन इदनानी यांनी सांगितले की, हे काम एकटया श्री. आयलानी साहेबांचे नाही, त्यांच्या पुर्ण विभागाच्या सहकार्याने हे यश प्राप्त झाले आहे. त्यासाठी माझे असे म्हणणे आहे की, त्यांच्या विभागात जी पदे रिक्त आहेत, व त्यांच्या विभागातील जे कर्मचारी त्या पदास लायक आहेत त्यांना पदोन्नती मिळाली पाहिजे. व ती पदे भरली पाहिजेत.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :—</u>मा. महापौरजी, संपुर्ण सभागृहाचे एक मत आहे की, महानगरपालिकेचा कोणताही अधिकारी जर अशाप्रकारचे कार्य करत असेल ज्यामुळे आमच्या महानगरपालिकेचे व आमच्या शहराचे संपुर्ण भारतवर्षामध्ये नावलौकीक होत असेल तर खरोखरच अशा अधिका—याचा येथे मानसन्मान झाला पाहिजे. व ज्याप्रकारे संपुर्ण सभागृहाची भावना आहे, त्यांना जर कोणती पदोन्नती दिली जात असेल किंवा त्यांना कोणते पारीतोषीक दिले जात असेल तर ती आम्हां सर्वांसाठी गौरवाची गोष्ट असेल, धन्यवाद।

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>श्री. आयलानी साहेबांचे सर्वांनी तोंड धरुन कौतुक केले आहे.

<u>सदस्य श्री. नरेंद्र राजानी :—</u>श्री. धनंजय बोडारेजी, मी दोन मिनिटे बोलु इच्छितो. १९९२ पासुन, तत्कालीन नगरपालिका व त्यानंतरच्या महानगरपालिकेमध्ये काम करत असतांना त्यांना पाहत आलो आहे. एक असा अधिकारी ज्यांच्याबाबतीत येथे बसुन एक शब्दही बोलु नये असे जर केले तर असे वाटेल की आम्ही आमच्या शहरासाठीच्या कर्तव्यात काही कसूर केली आहे. श्री. आयलानी यांनी मनात विचार केला होता की, मी या शहरातील किती टक्के पथदिवे चालु ठेवु शकतो. १०० टक्क्याची अपेक्षा ठेवुन १०० टक्क्यापर्यंत पोहचण्यासाठी त्यांनी जी वाटचाल केली. त्यांना असे वाटते की शहरामध्ये जेव्हा कुणी एखादा व्यक्ती रस्त्यावरुन जाईल तेव्हा त्यास रस्त्यावरील कोणताही पथदिवा बंद असल्याचे दिसु नये अशी त्यांची धारणा होती. त्यासाठी नेहमी ते कार्यमग्न असल्याचे मी पाहिले आहे. व त्यानंतर आपल्याकडील संपुर्ण यंत्रणेस कार्यालयीन यंत्रणेस गती देणे व आपल्याशी निगडित असलेल्या सर्व अधिका—यांचे मनोबल वाढविणे, त्यांच्या कनिष्ठ अधिका—यांना कधी व्यक्तीगत अडचण निर्माण होत असेल तेव्हा ते उठुन उभे राहत असत.

त्यांच्यासाठी पैसे आणि रुपयांचे काही महत्व नाही. परंतु जेव्हा कधी त्यांच्या हाताखालील कर्मचारी अडचणीत असत तेव्हा ते त्यांच्या पाठीशी उभे राहत असत. आणि त्यांचे मनोबल वाढवत असत. आणि अशा प्रकारे आपल्या संपुर्ण टिमला विकसित करुन या शहरासाठी एक चांगले उदाहरण घालुन दिले आहे. आज त्यांना पारितोषिक मिळाले. या अगोदर बदलापुर नगरपालिकेने सल्लागार म्हणुन त्यांची नेमणुक केली होती त्यावेळेस आमच्याकडे जेव्हा प्रस्ताव आला त्यावेळेस मला खेद होत होता त्यावेळेस कदाचित मी सुध्दा विचारले होते की, हा प्रस्ताव आहे काय? बदलापुर नगरपालिका आमच्या एका अधिका—यास सल्लागार म्हणुन नियुक्त करत आहे. अशा प्रकारे एक उच्च कोटीचा अधिकारी आमच्या महानगरपालिकेतही उपलब्ध आहे. व आज श्री. आयलानी यांनी एवढया चांगल्या प्रकारचे काम करुन दाखविले की, दुसरे अधिकारी सुध्दा सक्षम आहेत ते सुध्दा चांगल्या प्रकारे काम करुन दाखवतील. श्री. मुकेश आयलानी यांना श्री. प्रकाश कुकरेजा यांनी दिलेल्या संकेतानुसार आम्ही उभे राहुन मानवंदना दिली आहे. अशा प्रकारची संधी आमचे सर्व अधिकारी आम्हांला देतील तेव्हा आंम्हाला अतिशय आनंद होईल. श्री. आयलानी यांचे मी अभिनंदन करतो. धन्यवाद।

**सदस्य श्री. बी.बी. मोरे :—**सन्माननिय महापौरजी, आयुक्त साहेब, आज उल्हासनगर महानगरपालिकेचे श्री. मुकेश आयलानी साहेब यांनी या भारत देशामध्ये उल्हासनगर शहराचे नाव अतिशय लौकीक केले आहे. त्यांचे कौतुक करण्यासाठी माझ्याकडे एक शब्द सुध्दा उरलेला नाही. त्यांचे कौतुक करण्यासाठी कुठला शब्द वापरु हेच कळत नाही. आणि म्हणुन आज त्यांच्याबरोबर असणारी जी मंडळी आहे, कारण सैनिकांचा जो प्रमुख असतो त्यांच्याबरोबर जर सैनिक नसतील तर त्या प्रमुख माणसाला काम करता येत नाही. आणि म्हणुन त्याच्या बरोबर असणारे जे कर्मचारी आहेत त्यांनाही सन्मानित करावे. आणि उल्हासनगर महानगरपालिकेने पारितोषिक देवुन गौरव केल्यासारखे होईल. आज या सभागृहातर्फे श्री. आयलानी साहेबांना ज्या शुभेच्छा देण्यात आल्या, रिपब्लीकन पक्षाच्यावतीने त्यांना या महापालिकेच्यावतीने लाख लाख शुभेच्छा देतो. इतर अधिका—यांनी देखील श्री. आयलानी साहेबांचे अनुकरण करावे आणि या उल्हासनगर शहरामध्ये व महापालिकेत काम करावे एवढयाच मी त्यांना शुभेच्छा देतो आणि येथेच थांबतो.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—**श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विदयुत यांचे संपुर्ण सभागृहाने तोंड भरुन कौतुक केले. कौतुक करण्यासारखेच त्यांनी काम केलेले आहे. सतत पाच वर्ष महानगरपालिकेला पुरस्कार प्राप्त झाला आहे. सर्व अधिका—यांना त्यांचा हेवा वाटेल असे काम त्यांच्या विभागामार्फत केले जात आहे. आणि गौरव करण्यासारखे असल्याने या सभागृहाने त्यांचा सन्मान केला आहे. तो सन्मान अबाधित ठेवतीलच. त्यांनी त्यांचा विभाग तर गाजविलाच परंतु तो विभाग व अन्य विभाग मिळुन जेणे करुन इतर विभागातील अधिकारी त्यांच्याकडुन काही प्रेरणा घेतील आणि आपला विभाग चांगल्याप्रकारे कसा काम करेल याकडे लक्ष देतील. आयुक्त साहेब, अगोदरचे नगरसेवकांनी त्यांच्या विभागामधील कर्मचा—यांनी चांगले उल्लेखनिय कामगिरी केली म्हणुन त्यांना वेतनवाढ देण्याचे प्रस्ताव पारीत केला आहे. परंतु तो असाच दप्तरी दाखल आहे. त्याचबरोबर जे कर्मचारी चांगले काम करतात व अधिकारी चांगले काम करतात त्यांच्या पाठीवर सभागृह नेहमीच पाठ थोपटतो. जे चुकतात त्यांना शिक्षा देण्यासाठी प्रस्तावित करतो. आता ते काम किती करतात किती नाही ती गोष्ट वेगळी. परंतु काम ब—याचशा प्रमाणात होते. त्यात सुधारणा होते. परंतु चांगले काम केल्यावर त्यांना शाब्बासकी देणे हे तुमचे आमचे काम आहे ते आम्ही करत आहोत. परंतु जो वेतनवाढीचा प्रस्ताव पारीत केला आहे, त्याबाबत ब—याचशा तांत्रिक अडचणी असतील त्यातुन कसा मार्ग काढायचा, अडचणी घेवुन बसलो तर मार्ग निघणार नाही. मार्ग काढायचे ठरविले तर कितीही अडचणी आल्या तरी मार्ग निघतो. कर विभागातील कर्मचारी व अधिकारी यांनी मागच्यावर्षी न भुतो न भविष्यती कर वसुली केली, परंतु भविष्यात होईल कदाचित, अशी मालमत्ता कराची वसुली केली. परंतु महापालिकेच्या महसुल समितीने सर्व अधिकारी उपस्थित असतांना एक ठराव पारीत करुन त्यांना आगाऊ वेतनवाढ देण्याचे ठरविले. प्रस्ताव महसुल समितीच्या माध्यमातुन महासभेत आला. महासभेने सुध्दा त्यास मान्यता दिली परंतु त्या प्रस्तावाची अंमलबजावणी अजून झालेली नाही. त्याचे कारण काय? तुम्ही महासभेचे एक सदस्य म्हणुन आयुक्त आहेत, ७६ सदस्य जे बोलु शकतात, ८१ सदस्य जे बोलु शकतात, आयुक्त म्हणुन तुम्ही ८२ वे सदस्य आहात. तुमची सुध्दा भावना तीच आहे असे समजुन सर्वानुमते ठराव पारीत केलेला आहे. त्या ठरावाची सुध्दा अंमलबजावणी लवकरात लवकर करा अशी मी याठिकाणी विनंती करतो. जेणेकरुन अधिकारी व कर्मचा—यांना काम करण्यास प्रोत्साहन मिळेल. नाहीतर सकाळी साडेदहाला यायचे आणि साडेपाचला निघुन जायचे. यामध्ये जास्तीत जास्त काम करणारे कर्मचारी किती आहेत हा टार्गेट ठेवुन त्यांना प्रोत्साहन देणे हे आपले काम आहे. या ठरावाची अंमलबजावणी लवकरात लवकर करा. पुन्हा एकदा श्री. मुकेश आयलानी यांचे व त्यांच्या टिमचे हार्दिक अभिनंदन।

<u>सदस्य श्री. दत्तात्रय पवार :—</u>मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब, सर्व सन्माननिय सदस्य, आताच श्री. मुकेश आयलानी साहेबांचे व त्यांच्या विभागातील कर्मचा—यांची तोंडभरुन स्तृती केली. त्यांना वेतनवाढ, पदोन्नती दयावी याविषयी सर्वांचे एकमत आहे. परंतु त्यांना जे काही पुरस्कार तुम्ही देणार आहात, येत्या १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र दिवस आहे त्यादिवशी तुम्ही त्यांना सन्माननित केले तर अतिशय चांगले होईल व स्मृती राहिल. जर वेळ वाढविला आणि अधिक काळ गेला तर त्या पारितोषिकाला, प्रोत्साहनाला काही महत्व राहणार नाही म्हणुन माझी अशी विनंती आहे की, १५ ऑगस्ट रोजी आपण यांचा योग्य प्रकारे सन्मान करावा. धन्यवाद।

<u>महापौर :—</u>श्री. मुकेश आयलानी यांच्या चांगल्या कामाबद्दल त्यांना ११,०००/— रुपयाचे पारितोषिक मी घोषित करते. धन्यवाद।

<u>महापालिका सचिव :—</u>याबाबतचा जो ठराव तयार करण्यात आलेला आहे, तो सर्वांच्या माहितीसाठी मी वाचुन दाखवितो.

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे महाऊर्जा मार्फत ५ व्या 'राज्यस्तरीय उर्जा संवर्धन व व्यवस्थापन पुरस्कार' करिता उल्हासनगर महानगरपालिकेस प्रथम पारितोषक प्राप्ती बाबतची माहिती नोंद करीत आहे.

परंतु

विद्युत विभागातील कर्मचाऱ्यांना आगाऊ वेतनवाढ देणेबाबत या आधी पारीत झालेल्या ठरावाची अदयाप अमंलबजावणी का झाली नाही? याचा खुलासा व्हावा व यापूढे या विभागातील कर्मचाऱ्यांना कार्यप्रेरक भत्ता देण्याबाबतचा जर प्रस्ताव असेल तर तो महासभेपुढे सादर करणेस प्रशासनास निर्देश देत आहे.

ठिक आहे? पास?

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—</u>सन्माननिय महापौर महोदया, सदरचा प्रस्ताव आहे, त्यासाठी आपण ११,०००/— रुपयाचे पारितोषिक जाहिर केले. त्याबद्दल आपले अभिनंदन, आपण कर्मचा—याचे कौतुक केले. सदर बाबतचा प्रस्ताव आपली संमती असेल तर तपासुन जर वेतनवाढ देता येत नसेल तर श्री. मुकेश आयलानी, त्यांचे विभागातील कर्मचारी व कर विभागातील कर्मचा—यांना ठराविक अशी रक्कम देण्याबाबतीत आपली संमती असेल तर तसा प्रस्ताव स्थायी समितीपुढे मंजुरीसाठी ठेवतो आणि मंजुरी घेवुन १५ ऑगस्टला याबाबतीत कार्यवाही होईल असे करतो.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 👍

---

☑

**विषय क्र.** ७:— महाऊर्जा मार्फत ५ व्या 'राज्यस्तरीय उर्जा संवर्धन व व्यवस्थापन पुरस्कार' करिता उल्हासनगर महानगरपालिकेस प्रथम पारितोषक प्राप्ती बाबतची माहिती नोंद करणे.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयान्वये सादर करण्यात येते की, दिनांक ११ जुन, २००९ रोजीचे महाऊर्जा कार्यालयातुन प्राप्त पत्र क्र. इ.एन.सी—२००९—१०/सि.आर—०७/३६२८ अन्वये कळविण्यात आले आहे की, उल्हासनगर महानगरपालिकेस पाचव्या ''राज्यस्तरीय ऊर्जा संवर्धन व व्यवस्थापन पुरस्कार'' करीता प्रथम पारितोषिक प्राप्त झाला असुन दिनांक ०४.०७.०९ रोजी अल्पबचत भवन, पुणे येथे पुरस्कार वितरणाचे आयोजन करण्यात आले आहे.

या पुरस्काराचे वितरण मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, श्री. एस. सी. जमीर यांचे शुभहस्ते तसेच मा. अपारंपारिक ऊर्जा मंत्री, महाराष्ट्र राज्य, श्री. विनयजी कोरे यांचे उपस्थितीत पार पाडण्यात आला.

उल्हासनगर महानगरपालिकेस प्रतिवर्षीप्रमाणे यावर्षी सलग चौथ्यांदा पुरस्कार प्राप्त झाला आहे. सदर माहिती मा. महासभा पटलावर माहितीस्तव सादर.

<u>महासभा ठराव क्र:</u> २१ <u>दिनांकः—२०/०७/२००९</u>

सुचकाचे नाव :— १.श्री. जमनादास पुरस्वानी

२. श्री. जीवन इदनानी

३. श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :—१. श्री. बच्चाराम रुपचंदानी

२. श्री. बी.बी. मोरे

३. श्री. राजु जग्यासी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे महाऊर्जा मार्फत ५ व्या 'राज्यस्तरीय उर्जा संवर्धन व व्यवस्थापन पुरस्कार' करिता उल्हासनगर महानगरपालिकेस प्रथम पारितोषक प्राप्ती बाबतची माहिती नोंद करीत आहे.

<u>परंतु</u>

विद्युत विभागातील कर्मचाऱ्यांना आगाऊ वेतनवाढ देणेबाबत या आधी ठराव पारीत झालेल्या ठरावाची अदयाप अमंलबजावणी का झाली नाही? याचा खुलासा व्हावा व यापूढे या विभागातील कर्मचाऱ्यांना कार्यप्रेरक भत्ता देण्याबाबतचा जर प्रस्ताव असेल तर तो महासभेपुढे सादर करणेस प्रशासनास निर्देश देत आहे.

सुचकाची सही/—१.

२.

३.

अनुमोदकाची सही/—१.

२.

३

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र.** ८ :— उल्हासनगर महानगरपालिका अधिकारी / कर्मचा-या संबंधी प्रारुप सेवा

भरती नियम मान्य करणे.

---

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>महापौर :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ८:–** उल्हासनगर महानगरपालिका अधिकारी / कर्मचा-या संबंधी प्रारुप सेवा भरती नियम मान्य करणे.

<u>प्रस्तावना</u>

महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ नगरविकास विभाग शासन परिपत्रक क्र. ठामपा २००२/८२१/प्र.क्र. ८६/नवि–२३, २००८ अन्वये महानगरपालिकेतील कर्मचारी/अधिकारी मॉडेल सेवा प्रवेश नियम शासनाने तयार केले असून त्याआधारे उल्हासनगर महानगरपालिका कर्मचारी/अधिकरी यांचे सेवा प्रवेश नियम तयार करण्यात आले असुन त्यास मा. महासभेची मान्यता घेवुन हरकती/सुचना मागविण्यासाठी राजपत्रात प्रसिदृध करावयाचे आहेत.

उक्त शासन निर्णयाप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिका कर्मचारी/अधिकारी सेवा प्रवेश नियम (प्रारुप) तयार करुन यापुर्वी मा. महासभा पटलावर सादर करण्यात आले होते.

मा.महासभा ठराव क्र.४६, दिनांक ०९/०१/२००९ अन्वये शासनाचे महानगरपालिका (सेवाभरती व सेवांचे वर्गीकरण) प्रारुप नियम–२००८ च्या आधारे महापालिका अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी नव्याने तयार करण्यात आलेले प्रारुप सेवा भरती नियम पुढच्या स्वतंत्र प्रस्ताव म्हणुन आणण्यास प्रशासनास निर्देश दिलेले आहेत.

सबब, उल्हासनगर महानगरपालिका कर्मचारी/अधिकारी सेवा प्रवेश नियम (प्रारुप) मंजुरीकरीता मा. महासभा पटलावर प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> २२ दिनांक:– २०/७/२००९

सुचकाचे नाव :– श्री. गोविंदराम लुंड

अनुमोदकाचे नाव :– श्री. बी.बी. मोरे

ही महासभा उल्हासनगर महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांचे सेवा प्रवेशासंबधी सद्या अस्तित्वात असलेल्या नियमांचे अधिक्रमण करून शासनाने तयार केलेल्या महानगरपालिका (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) मॉडेल नियम २००८ च्या आधारे उल्हासनगर महानगरपालिका अधिकारी/कर्मचा–यांसाठी नव्याने तयार करण्यात आलेल्या पृष्ठ क्रमांक १ ते ३३ च्या सेवा भरती नियम मसुदयास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>
महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

# उल्हासनगर महानगरपालिका
# उल्हासनगर, जि. ठाणे

**मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम — १९४९ :—**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ४५४ आणि ४५७ (३) (अ) (ब) मधील तरतूदी अन्वये उल्हासनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील निरनिराळया पदांचे सेवा (सेवा भरती व सेवांचे वर्गीकरण) प्रारूप नियम — २००८ तयार करण्यात आले असून त्यास मा. महासभा ठराव क्र. ..... , दिनांक ................... अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

## प्रारूप नियम

**१. संक्षिप्त नाव, प्रारंभ व व्याप्ती :—**

१. या नियमांना ''उल्हासनगर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २००८'' असे संबांधण्यात येईल.

२. हे नियम अंतिमरीत्या राजपत्रात प्रसिद्व झाल्याच्या तारखेपासून अंमलात येतील.

३. हे नियम महानगरपालिकांमधील सर्व पदांवरील नियुक्त्यांना लागू होतील, मात्र अन्यथा नमूद केले नसल्यास अंशकालीक स्वरूपाच्या नियुक्त्या, कंत्राटी पध्दतीने किंवा रोजंदारी तत्वावरील नियुक्त्या तसेच मानसेवी स्वरूपाच्या नियुक्यांना लागू होणार नाहीत.

**२. (अ) व्याख्या :—**

विषय किंवा संदर्भानुसार अन्य अर्थ अभिप्रेत नसल्यास या नियमांसाठी :—

(१) ''अधिनियम'' म्हणजे मंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ (सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९)

(२) ''परिशिष्ट'' म्हणजे या नियमांना जोडलेले परिशिष्ट.

(३) ''नियुक्ती प्राधिकारी'' म्हणजे अधिनियमाच्या कलम ५३ च्या पोटकलक (१) ते (३) च्या तरतुदीप्रमाणे नियुक्ती देण्यास सक्षम असलेला अधिकारी.

(४) ''संवर्ग'' म्हणजे एखाद्या सेवेतील किंवा एखाद्या सेवेच्या भागातील स्वतंत्र घटक म्हणून मंजूर केलेल्या ''कायम'' शासनमान्य पदांचा समूह.

(५) ''कर्मचारी'' म्हणजे या नियमांच्या परिशिष्टात नमूद केलेले महानगरपालिका अधिकारी किंवा कर्मचारी.

(६) ''शासन'' म्हणजे महाराष्ट्र शासन.

(७) ''एकीकृत संवर्ग'' म्हणजे विविध पदांच्या कर्तव्याचे स्वरूप, ती पदे धारण करण्यासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव व वेतनश्रेणी यांचा सारासार विचार करून सेवा नियमासाठी एकिकृत केलेला संवर्ग.

(८) ''महानगरपालिका'' म्हणजे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम—१९४९ च्या तरतुदी अन्व्ये निर्माण केलेली ''महानगरपालिका''

(९) ''अर्हताप्राप्त कर्मचारी'' म्हणजे या नियमाच्या परिशिष्ट—२ मध्ये विहित केलेली अर्हता धारण करणारे कर्मचारी.

या नियमांत वापरण्यात आलेल्या परंतू व्याख्या न केलेल्या शब्द किंवा शब्द समूहांचा अर्थ अभिनियमात दिल्यानुसार असेल.

**२.(ब) सेवांचे वर्गीकरण — (Classification of Services)**

**१) प्रशासकीय सेवा :—** सामान्य प्रशासन, प्रभाग प्रशासन, महसूल व महानगरपालिका सचिवालय अंतर्गत असलेल्या विभागातील सेवा या प्रशासकीय सेवा संबोधण्यात येतील.

**२) लेखा सेवा :—** महानगरपालिकेच्या आर्थिक व्यवस्थापनाशी संबंधित (अर्थ संकल्प, लेखा, लेखा परिक्षण, लेखा आक्षेप निराकरण व खर्च व्यवस्थापन इ.) सेवा या लेखा सेवा संबोधण्यात येतील.

**३) तांत्रिक संवर्ग आणि तांत्रिक सेवा :—** ज्या पदावरील नियुक्तीसाठी सांविधिक विद्यापीठ/अभिमत विद्यापीठ/राज्य तंत्रशिक्षण मंडळ ;ठवंतक व्ि ज्मबीदपबंस म्कनबंजपवदद्ध वा केंदीय तंत्रशिक्षण मंडळ ;ठवंतक व्ि ब्मदजतंस ज्मबीदपबंस म्कनबंजपवदद्ध तंत्रशिक्षण परिषद ;ज्मबीदपबंस ब्वनदमपसद्ध यांचेमार्फत चालविले जाणारे विविध तांत्रिक व अभियांत्रिकी विषयक अभ्यासक्रम अशी किमान शैक्षणिक अर्हता विहित केली असेल, अशा पदांना ''तांत्रिक संवर्ग'' संबोधण्यात येईल व अशा पदांची सेवा 'तांत्रिक सेवा' संबोधिली जाईल.

**४) वैद्यकीय संवर्ग आणि वैद्यकीय सेवा :—** ज्या पदावरील नियुक्तीसाठी कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाचा वैद्यकीय शास्त्राचा पदवीधारक, पदव्युत्तर पदवीधारक/पदविका तसेच मेडीकल कौन्सील ऑफ इंडिया, आयुष वा

त्तसम आयुर्वेदिक कौन्सिल, युनानी, होमिओपॅथिक कॉन्सिल यांच्याकडील नोंदणी ही किमान शैक्षणिक अर्हता विहित केली असेल, अशा पदांना 'वैद्यकीय संवर्ग' संबोधण्यात येईल व अशा पदांची सेवा 'वैद्यकीय सेवा' संबोधिली जाईल.

५) **निमवैद्यकीय संवर्ग आणि निमवैद्यकीय सेवा** :— वैद्यकीय सेवेतील पदांना सहाय्यकारी असणाऱ्या पदांच्या संवर्गाला, उदा. परिचारिका, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, क्ष—किरण तंत्रज्ञ, रक्तपेढी तंत्रज्ञ, भौतिक उपचार तज्ञ, व्यवायोपचार तज्ञ, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता, दंत आरोग्य तज्ञ, मिश्रक व औषध निर्माता इ. निमवैद्यकीय संवर्ग व अशा पदांच्या सेवेला 'निमवैद्यकीय सेवा' संबांधण्यात येईल.

६) **अग्निशमन सेवा** :— महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवन सुरक्षा उपाययोजना अधिनियम—२००७ मध्ये समाविष्ट असलेल्या अग्निशमन सेवा.

३. नेमणूकीची पध्दत व अर्हता :—

१) महानगरपालिकेतील विविध पदांवर नियुक्तीसाठी कार्यपध्दती परिशिष्ट—१ मध्ये विहित केल्यानुसार व शिक्षण, अनुभव इ. आवश्यक अर्हता परिशिष्ट—२ मध्ये विहित केल्याप्रमाणे असतील. नियुक्तीची पध्दत अधिनियमाच्या कलम ५४ व अनुसुची—ड मधील प्रकरण ३ नुसार असेल.

२) **भारतीय नागरीकत्व आणि महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र** :—

उमेदवार भारताचा नागरीक असावा आणि महाराष्ट्रात १५ वर्ष अधिवास (Domicile) करत असल्याबद्‌दल सक्षम प्राधिकरणाचे प्रमाणपत्र त्याने अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

३) **संगणक हाताळणी/वापराबाबतच्या ज्ञानाची आवश्यकता** :—

परिशिष्ट—२ मध्ये विहित केलेल्या अर्हतेव्यतिरिक्त वाहनचालक आणि श्रेणी—४ ची पदे वगळून इतर सर्व पदावरील नेमणूकीसाठी/पदोन्नतीसाठी शासन वेळोवेळी आदेश काढून निश्चित करेल असे संगणक हाताळणी/वापराबाबतचे ज्ञान, एक अतिरिक्त आवश्यक अर्हता असेल.

४) **वयोमर्यादा** :—

महानगरपालिकेतील कोणत्याही पदावर नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी किमान वयाची अट १८ वर्षे पूर्ण व कमाल वयोमर्यादा ''परिशिष्ट—२'' मध्ये संबंधित पदा समारे नमुद केल्यानुसार असेल. कमाल वयोमर्यादा विहित केली नसेल अशा पदांच्या बाबत ती प्रचलित शासन धोरणाप्रमाणे असेल सामाजिक आरक्षण लागू असणाऱ्या प्रवर्गाकरीता प्रचलित शासन निर्णयानुसार वयोमर्यादा शिथिलक्षम असेल.

५) **पदोन्नती व नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या नियुक्त्यांचे प्रमाण** :—

क) नामनिर्देशन वा पदोन्नतीचे प्रमाण ''परिशिष्ट — २'' मध्ये संबंधित पदासमोर दर्शविल्यानुसार असेल. तथापि, ज्या पदासमोर असे प्रमाण विहित केलेले नसेल अशा पदावरील नियुक्तीसाठी पदोन्नती व नामनिर्देशनाचे प्रमाण ५०:५० असे राहील.

ख) एकाकी पद सामान्यत: पदोन्नतीने भरण्यात येईल. तथापि, विशिष्ट अर्हता आवश्यक असलेल्या एकाकी पदावर पदोन्नतीचे नियुक्तीसाठी उमेदवार उपलब्ध नसल्यास तसे पद प्रतिनियुक्ती किंवा नामनिर्देशनाने भरता येईल.

४. **पदोन्नतीने नेमणूक करणे** :—

पदोन्नतीने करावयाची कोणतीही नियुक्ती, **''जेष्ठता —नि—पात्रता''** या तत्वावर, अर्हताप्राप्त कर्मचा—यांमधून केली जाईल.

५. **प्रतिनियुक्तीद्वारे नेमणूक** :—

या नियमांमध्ये विहित केलेल्या अर्हतेनुसार ज्या पदांवर प्रतिनियुक्तीद्वारे नेमणूक करण्याची तरतूद आहे अशी पदे केंद्र शासन, राज्य शासनाचे नगर विकास विभागांतर्गत मुख्याधिकारी संवर्गातून प्रतिनियुक्तीने भरता येतील.

६. **एका महानगरपालिकेतून दुस—या महानगरपालिकेत बदलीने नियुक्ती** :—

या नियमात अन्यत्र काहीही नमूद केले असले तरी, अन्य महानगरपालिकेतील कर्मचाऱ्याने एखाद्या महानगरपालिकेतील पदावर बदलीने नियुक्तीसाठी अधिनियमातील तरतुदीनुसार व दोन्ही महानगरपालिकांतील नियुक्ती प्राधिकाऱ्यांच्या परस्पर संमतीने मान्य होतील, अशा अटी व शर्तीवर, खालील बाबीच्या अधीन राहून बदलीने शासन मान्यतेने नियुक्ती देता येईल.

..३..

**अ)** पदोन्नतीने भरण्यात येणाऱ्या पदांवर बदलीने नियुक्ती करण्यात येणार नाही. फक्त नामनिर्देशाने नियुक्तीकरीता राखून ठेवण्यात आलेल्या रिक्त पदांवर बदलीने नियुक्ती करण्यात यावी.

**ब)** अशी नियुक्ती झाल्यानंतर त्या पदधारकाची जेष्ठता नियुक्तीच्या दिनांकास त्या पदाच्या संवर्गात सर्वात कनिष्ठ (Zero Seniority) राहील.

**क)** श्रेणी – १ व २ मधील अधिकाऱ्यांच्या बाबत एका महानगरपालिकेतून दुस–या महानगरपालिकेत बदलीचा निर्णय दोन्ही महानरपालिकांच्या परस्पर संमतीने निश्चित अटी व शर्तीवर, शासन मान्यतेने घेतला जाईल.

७. **परिविक्षाधीन कालावधी :–**

श्रेणी – १ श्रेणी – २ व श्रेणी–३ नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती देण्यात आलेल्या उमेदवारांसाठी त्यांच्या नेमणूकीच्या मूळ दिनांकापासून दोन वर्षाचा परिविक्षाधीन कालावधी असेल. अशा उमेदवाराचे परिविक्षाधीन कालावधीतील काम समाधानकारक नसल्यास अपवादात्मक बाब म्हणून आणि तत्संबंधी कारणे नमुद करून परिविक्षा कालावधी पुढील १ वर्षापर्यंतच वाढविता येईल. तद्नंतरही या वाढीव कालावधीत काम समाधानकारक नसल्यास सदर व्यक्तीची सेवा समाप्त करण्यात येईल.

८) **भाषा परिक्षा, विभागीय परीक्षा व प्रशिक्षण :–**

महापालिका सेवेतील पदांवर नेमणूक करण्यात आलेल्या किंवा त्यासाठी निवडण्यात आलेल्या उमेदवारांनी –

०१) विहित करण्यात येतील अशा भाषा परिक्षा आणि/किंवा चाचण्या उत्तीर्ण होणे किंवा त्यांना विहीत नियमानुसार यापैकी कोणतीही परिक्षा पास होण्यापासुन सुट मिळणे आवश्यक असेल.

०२) **परिशिष्ट – ३** अन्वये विहित केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अथवा अशी परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळविणे आवश्यक असेल.

०३) वेळोवेळी ठरवून देण्यात येईल असे सेवा प्रवेशपूर्व आणि/किंवा सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण घेणेसुध्दा आवश्यक असेल.

९. **महानगरपालिका सेवेतील पदावर नियुक्तीसाठी अनर्हता :–**

एखाद्या व्यक्तिस :–

(क) अधिनियमाच्या कलम ५९ च्या तरतुदीप्रमाणे अनर्ह ठरविण्यात आले असेल,

¼[k½ egkifkydsP;k lsosrwu fdaok dks.kR;kgh LFkkfud izkf/kdj.kkP;k lsosrwu fdaok dks.kR;kgh ljdkjh lsosrwu xSjorZ.kqdhcn~ny cMrQZ dj.;kr vkys vlsy fdsok]

(ग) ज्यामध्ये नैतिक अध:पाताचा समावेश होईल अशा अपराधाबद्दल तिला दोषी ठरविण्यात आले असेल, किंवा

(घ) जर त्याच्या एकापेक्षा अधिक पत्नी हयात असतील आणि स्त्री उमेदवारांच्या बाबतीत जर तिने ज्याची पत्नी हयात आहे अशा व्यक्तीशी विवाह केला असेल, किंवा

(च) जर त्यास/तिस दोन पेक्षा अधिक हयात अपत्य असतील, किंवा

(छ) न्यायालयात ज्या गुन्हयासाठी कैदेची शिक्षा फर्मावता येते, अशा गुन्हयासाठी सहा महिन्याहून अधिक मुदतीची कैदेची शिक्षा झाली असेल व ती शिक्षा अपील वा पुनरीक्षणात रद्द झाली नसेल, अशी व्यक्ती किंवा

(ज) महापालिकेच्या सेवेत असतांना सिध्दापराध होऊन सहा महिन्यांपेक्षा अधिक मुदतीची कैदेची शिक्षा झाली असेल व ती शिक्षा अपील वा पुनरीक्षणात रद्द झाली नसेल.

अशी व्यक्ती महापालिकेच्या सेवेत नेमणुक देण्यास वा नेमणुक चालु ठेवण्यास अपात्र समजली जाईल.

१०. **महानगरपालिका सेवेतील पदांवर आरक्षण :–**

महानगरपालिका सेवेतील पदांना शासनाच्या प्रचलित धोरणानुसार आरक्षण लागू असेल. यामध्ये मागासवर्गीयांसाठी आरक्षण (सामाजिक आरक्षण), विशेष/समांतर आरक्षण, माजी सैनिक, प्रकल्पग्रस्त, अपंग, महिला, खेळाडू इ. साठीच्या आरक्षणाचा समावेश असेल.

११. **शारिरीक पात्रता प्रमाणपत्र आणि चारित्र्य पडताळणी अहवाल :–**

महापालिका सेवेतील कोणत्याही पदावरील नामनिर्देशनाने नियुक्ती :–

..४..

अ) जिल्हा शल्यचिकित्सक अधिकाऱ्याचे विहित नमुन्यातील आरोग्यविषयक वैद्यकीय प्रमाणपत्र सादर केल्यानंतर,

आणि

**ब)** उमेदवाराच्या पूर्वचारित्र्य पडताळणीबाबत (टमतपपिबंजपवद वि ।दजमबमकमदजे) सक्षम प्राधिकाऱ्यांकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर केली जाईल.

१२. **प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष दबावतंत्राचा वापर :—**
कोणत्याही उमेदवाराच्या नियुक्ती संदर्भात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रित्या दबाव आणण्याचा केलेला प्रयत्न हा त्या उमेदवाराला त्या पदावरील नियुक्तीसाठी अनर्ह करणारा ठरेल.

१३. हे नियम अस्तित्वात येण्यापूर्वी विहित मार्गाने झालेल्या सरळसेवा नियुक्त्यांना शासनाने अन्यथा वेगळे लेखी कारणे नमूद करून निर्देश दिले नसतील तर या नियमातील तरतुदीमुळे बाधा येणार नाही.

१४. वेळोवेळी सेवाभरती/आरक्षण/वयोमर्यादा इ. बाबत निर्देश देणारे राज्यशासनाचे नियम, अधिनियम, निर्णय व न्यायनिर्णय यानुसार या नियमात सुधारणा (।उमदकउमदज) करण्यात येईपर्यंत शासन निर्णय/न्याय निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येईल.

१५. सदर सेवा प्रवेशनियम उल्हासनगर महानगरपालिकेला लागू झाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्याच्या आत या नियमातील आकृतीबंधास अनुरूप एकीकृत संवर्गाची यादी तयार करून त्यास राज्यशासनाची मान्यता घेणे बंधनकारक राहीले. (परिशिष्ट—४)

## वैद्यकीय प्रमाणपत्राचा नमुना

(नियम ११ (अ) पहावा)

मी याद्वारे प्रमाणित करतो/करते की, उल्हासनगर महापालिकेच्या ( ) संवर्गातील ( ) पदावर नेमणूक करण्यासाठी असलेले उमेदवाराची तपासणी केली आणि त्याला/तिला .................................................. ..... अतिरिक्त (सांसर्गिक किंवा अन्य) कोणताही रोग, शारिरीक दौर्बल्या किंवा शारिरीक अपंगत्व असल्याचे आढळले नाही ही गोष्ट ( ) कार्यालयात ( ) म्हणून नेमणूकीसाठी अनर्ह ठरविणार आहे असे मला वाटत नाही. श्री. /श्रीम. ..................................... यांच्या स्वतःच्या निवेदनावरून त्याचे/तिचे वय ............... वर्षे आहे आणि दिसण्यावरून तो/ती सुमारे .................. वर्षे वयाचा/वयाची आहे. त्याला/तिला लस टोचण्यात आली आहे.

ओळख चिन्हे ............................................

डाव्या हाताच्या अंगठयाचा ठसा ................................

वैद्यकीय अधिकाऱ्याचे पदनाम. ............................................

**वैद्यकीय अधिकाऱ्यांचे पदनाम**

उल्हासनगर महानगरपालिका (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम—२००८

परिशिष्ट — (१)

**उल्हासनगर महानगरपालिका (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम—२००८ अंतर्गत सेवा भरतीसाठी अनुसरावयाची कार्यपध्दती :—**

१. <u>कर्मचारी निवड समिती</u> :—

महागनरपालिका पदांवर नियुक्तीकरिता मुंबई प्रांतिक महागनरपालिका अधिनियम—१९४९ च्या कलम ५४ विहित केल्यानुसार 'कर्मचारी निवड समिती' गठीत करण्यात येईल.

याव्यतिरिक्त नामनिर्देशनाने नियुक्ती करताना, मागासवर्गीय तसेच महिला उमेदवारांच्या हितरक्षणासाठी अशा समितीचे सदस्य म्हणून शासनाच्या प्रचलित आदेशानुसार संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना मुलाखतीच्या वेळेस **विशेष निमंत्रीत** म्हणून बोलावले जाईल.

२. नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या नियुक्तीसाठी कर्मचारी निवड समितीची रचना खालिलप्रमाणे असेल.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | आयुक्त किंवा आयुक्तांनी पदनिर्देशीत केलेला अन्य कोणताही अधिकारी | — | अध्यक्ष |
| २) | मुख्य लेखा परीक्षक | — | सदस्य |
| ३) | संबंधित विभाग प्रमुख | — | सदस्य |
| ४) | आयुक्तांनी नामनिर्देशित केलेला एक अन्य अधिकारी/मागावसर्गीय प्रतिनिधी | — | सदस्य |
| ५) | जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी | — | सदस्य |
| ६) | जिल्हा समाज कल्याण अधिकारी | — | सदस्य |
| ७) | प्रकल्प अधिकारी,एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प | — | सदस्य |
| ८) | उप आयुक्त (आस्थापना) | — | सचिव व नियंत्रक |

३) <u>नामनिर्देशनाद्वारे नेमणूकीकरीता कार्यपद्धती</u> :—

अ) एखाद्या पदावरील नियुक्तीसाठी, वृत्तपत्रातील जाहिरातीला अनुसरून किंवा महानगरपालिकेच्या सुचना फलकावरील सुचनेस अनुसरून विहित मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जाचा किंवा सेवा विनियम केंद्राकडून वा शासनाच्या आदेशानुसार अन्य संस्था/कार्यालयाकडून आलेल्या यादीतील उमेदवाराच्या नावाचाच विचार करता येईल.

ब) उमेदवाराने अर्जात दिलेल्या तपशीलाबाबत अधिक माहिती मागविण्याचा अधिकार आयुक्तांना असेल.

क) जाहिरातीत/सेवा विनियम केंद्राकडे पाठविलेल्या मागणी पत्रात लेखी चाचणीचा उल्लेख असल्यास अशा उमेदवरांना लेखी चाचणी द्यावी लागेल. परंतु, जाहिरातीत नमुद केलेली पदसंख्या आणि पात्र उमेदवारांची संख्या लक्षात घेऊन अशी चाचणी न घेण्याचा निर्णय आयुक्तांना घेता येईल.

ड) निवड समिती यानंतर एकूण गुण लक्षात घेऊन गुणांच्या उतरत्या क्रमाने उमेदवारांची यादी तयार करील व ती आयुक्तांकडे पाठविण्यासाठी लिफाफ्यात बंद करील.

४. <u>पदोन्नतीने नेमणूकीकरीता कार्यपद्धती</u> :—

अ) पुढील कॅलेंडर वर्षाच्या कालावधीत प्रत्येक संवर्गात पदोन्नतीने किती पदे भरावी लागणार आहेत याचा आढावा आस्थापना विभाग दरवर्षी ऑगस्ट महीन्यात किंवा त्यानंतर शक्य तितक्या लवकर घेण्यात यावा

ब) वर नमुद केलेल्या आढाव्यानुसार पदोन्नतीने भरावयाच्या पदांची संख्या निश्चित झाल्यावर पदोन्नतीसाठी आवश्यक अर्हता धारण करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यातून ज्येष्ठतानुक्रमाने पदांच्या संख्येच्या तिप्पट(१. ३)कर्मच्याऱ्यांचा विचारक्षेत्रात (ंवदम वि बवदेपकमतंजपवद) समावेश करण्यात येईल.

क) ज्यांच्याविरूध्द विभागीय चौकशी चालू आहे वा जे निलंबित आहेत त्यांचीही नावे ज्येष्ठतानुक्रमे यादीत येत असल्यास अशा यादीतून वगळण्यात येऊ नयेत. त्यांच्या नावाचा विचार केल्यावर निवड समितीचा अभिप्राय त्यांच्या नावासमोर नोंदविण्यात यावा.

ड) निवडसुचीत समावेश झालेल्या ज्या कर्मचाऱ्यांच्या गोपनीय अहवालाच्या सरासरी क्रमवारी अतिउत्कृष्ठ असेल अशा कर्मचाऱ्यास सेवा ज्येष्ठतेप्रमाणे येणाऱ्या ६ स्थानापर्यंत वरचे स्थान देण्याची शिफारस निवड समितीला करता येईल. हा अपवाद वगळता, पदोन्नतीसाठी पात्र ठरलेला कर्मचाऱ्यांचा निवडसुचीत ज्येष्ठतेनुसार समावेश करण्यात येईल. मात्र अत्युत्कृष्ठ (अ+) अहवालासाठी कर्मचाऱ्याला निवडसूचीत वरचा क्रमांक देतांना सेवेने ज्येष्ठ असलेल्या व उत्कृष्ठ (अ) अहवाल असणाऱ्या कर्मचाऱ्यापेक्षा वरचे स्थान देता येणार नाही.

इ) दरवर्षी ऑक्टोंबर महिन्यात किंवा त्यानंतर शक्य तितक्या लवकर निवड समितीच्या बैठका विभागनिहाय आयोजित करण्यात येतील.

ई) निवड समिती कर्मचाऱ्यांचे मागील ५ वर्षाचे गोपनीय अहवाल आणि त्यांचेपुढे ठेवलेली ईतर कागदपत्रे यांचे अवलोकन करून कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीच्या योग्यतेबद्दल निर्णय घेईल. मात्र असा निर्णय एकमताने झाला नाही तर त्याबद्दलचा अंतिम निर्णय समिती प्रमुखाचा असेल.

फ) कर्मचाऱ्यांच्या निवडीसंबंधी अंतिम निर्णय घेण्यापूर्वी अधिक माहितीची आवश्यकता वाटल्यास माहिती मागविण्याचा समितीस अधिकार असेल.

५. वरील (३) व (४) नुसार निवड समितीने केलेली शिफारस अधिनियमाच्या कलम ५३(१), ५३(२) वा ५३(३) नुसार संबंधित सक्षम नियुक्ती प्राधिकाऱ्याकडे मान्यतेसाठी ठेवली जाईल.

६. तयार करण्यात आलेली निवडसूची तयार केल्याच्या दिनांकापासून १ वर्षाच्या कालावधीपर्यंत वैध असेल.

..६..

७. समिती सचिव बैठकीचा कार्यवृत्तांत तयार करून त्यास समितीची मान्यता घेण्यास जबाबदार असेल. सदस्यांना सादर केलेली सर्व कागदपत्रे परत घेऊन ती एकत्रित जतन करण्याची जबाबदारी समिती सचिवाची असेल.

८. श्रेणी–३ व श्रेणी–४ मध्ये सेवा भरती करतांना शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग क्र. न्याप्र–१००३/९९/प्र. क्र.२/०३(भाग–२)/१६अ, दिनांक २५ ऑक्टोंबर २००५ अन्वये एकत्रित मार्गदर्शक तत्वांचा लागू असेल तेथे अवलंब करण्यात यावा. या मार्गदर्शक तत्वांमध्ये वेळोवेळी होणारे बदलही अंमलात आण्ण्यात यावेत.

''परिशिष्ट – ३''

## महानगरपालिका कर्मचाऱ्यांसाठी विभागीय परीक्षा नियम–२००८

मुंबई प्रांतिक महागनरपालिका अधिनियम १९४९ (सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९) च्या कलम ४६५ पोटकलम (१) खंड (ल) च्या तरतुदींनुसार महानगरपालिकांसाठी केलेले नियम.

### नियम

१. संक्षिप्त शीर्षक व नियम लागू होण्याचा दिनांक –
(अ) या नियमास ''उल्हासनगर महानगरपालिका कर्मचाऱ्यांसाठी (अर्हताकारी विभागीय परीक्षा) नियम २००८'' संबोधण्यात येईल.
(ब) शासन राजपत्रात प्रसिध्द होतील त्या तारखेपासून हे नियम अंमलात येतील.

२. व्याख्या –
(१) विषयांत किंवा संदर्भानुसार अन्य अर्थ अभिप्रेत नसल्यास या नियमानुसार :–

(अ) ''अधिनियम'' म्हणजे मंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ (सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९)

(ब) ''आयुक्त'' म्हणजे अधिनियमाच्या कलम ३६ प्रमाणे नियुक्त करण्यात आलेला प्राधिकारी व यात अधिनियमाच्या कलम ३९ प्रमाणे नेमणूक करण्यात आलेला हंगामी आयुक्त वा या नियमांच्या तरतुदीच्या अंमलबजावणीसाठी अधिनियमाच्या कलम ६९ प्रमाणे अधिकार प्रदान केलेल्या अधिकाऱ्याचा समावेश होतो.
(क) ''कर्मचारी'' म्हणजे उल्हासनगर महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम–२००८ अन्वये नियुक्त कर्मचारी, मात्र प्रतिनियुक्तीने नियुक्त कर्मचाऱ्यांच्या बाबतीत हे नियम लागू असणार नाहीत.

(ड) ''महानगरपालिका'' म्हणजे मुंबई प्रांतिक महानगरपालिका – १९४९ च्या तरतूदीनुसार निर्माण केलेली महानगरपालिका.

(इ) ''विभागीय परीक्षा'' म्हणजे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी घेण्यात येणारी व या नियमांच्या परिशिष्ट 'अ' मध्ये नमूद करण्यात आलेली विभागीय परीक्षा.

(ई) ''परिशिष्ट'' म्हणजे या नियमांचे परिशिष्ट.

(२) ज्या शब्दांची वा शब्द समुहांची व्याख्या या नियमांत समाविष्ट करण्यात आली नसेल त्यांचा अर्थ अधिनियमात ते ज्या अर्थाने वापरले असतील तसा समजण्यात येईल.

३. विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य

अ) हे नियम अस्तित्वात आल्याच्या तारखेस महानगरपालिकेच्या आस्थापनेवर स्थायी/अस्थायी स्वरूपात कोणत्याही पदावर नियुक्त असलेल्या व त्या तारखेनंतर नियुक्त होणाऱ्या परिशिष्ट '३' मध्ये नमूद केलेल्या संवर्गातील सर्व अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना परिशिष्ट–३ च्या 'ब–१' 'ब–२' मध्ये विहित केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य असेल.

ब) उपरोक्त परिशिष्ट 'अ' मध्ये ज्या संवर्गाचा उल्लेख आलेला नसेल त्या संवर्गासाठी आयुक्ताच्या मान्यतेने अधिकाऱ्यांच्या/कर्मचाऱ्यांच्या तांत्रिक ज्ञानाची चाचणी घेण्यासाठी लेखी अथवा लेखी व तोंडी परीक्षा

..७..

विहित केली जाईल. याकरिता किमान तीस दिवसापेक्षा कमी नाही एवढया कालावधीची पुर्वसूचना संबंधितांस देण्यात येईल.

४. कालावधी आणि संधीची संख्या :–
**अ) राजपत्राच्या दिनांकापूर्वी नियुक्त केलेल्या व्यक्तींकरिता कालावधी व संधीची**

संख्या :—

या नियमांच्या अधिन राहून, राजपत्राच्या दिनांकापूर्वी महानगरपालिका कर्मचारी म्हणून नियुक्त झालेल्या व सध्या अस्तित्वात असलेल्या नियमान्वये परिक्षा उत्तीर्ण न झालेल्या व्यक्तिने, तीला परीक्षा उत्तीर्ण होण्यामधून नियम ११ अन्वये सूट दिलेली नसेल तर राजपत्राच्या दिनांकापासून ३ वर्षाच्या आत व २ संधीमध्ये परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

ब) महानगरपालिका सेवाभरती नियम—२००८ नुसार नियुक्त कर्मचाऱ्यांनी त्यांची नियुक्ती झाल्याच्या दिनांकापासून ४ वर्षात ३ संधीमध्ये विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

५. <u>परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी मानक</u> :—

अ) महानगरपालिकेतर्फे आयोजित केल्या जाणाऱ्या परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी प्रत्येक प्रश्नपत्रिकेच्या एकूण गुणांच्या किमान ४५ टक्के गुण मिळविणे आवश्यक असेल.

ब) परंतु चतुर्थ श्रेणी संवर्गातील जे कर्मचारी माध्यमिक शालांन्त परीक्षा उत्तीर्ण असतील त्यांना लिपीक या पदावर पदोन्नती मिळण्यासाठी परिशिष्ट 'ब—१' च्या केवळ प्रश्नपत्रिका १ ची परीक्षा द्यावी लागेल. या कर्मचाऱ्यांना ही परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी ४० टक्के गुण आवश्यक असतील.

क) प्रत्येक संवर्गासाठी विहित करण्यात आलेल्या सर्व विषयात वरील (अ) व (ब) च्या तरतुदीच्या आधारे एक वा एकापेक्षा अधिक संधीत उत्तीर्ण झाल्यावरच विभागीय परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे समजण्यात येईल.

६. <u>अनुग्रह गुण</u> :— संपूर्ण परीक्षेसाठी विहित केलेल्या एकूण गुणांच्या ४५ टक्के किंवा त्याहून अधिक गुण एखाद्या उमेदवाराने मिळवले असतील परंतु, एक किंवा दोन स्वतंत्र प्रश्नपत्रिकांमध्ये ४५ टक्के गुण तो मिळवू शकला नसेल तर त्याला त्या विषयांमध्ये अथवा एकूण परीक्षेत जास्तीत जास्त ४ अनुग्रह गुण, जर त्यामुळे तो परीक्षा उत्तीर्ण होत असेल तर देण्यात येतील. ज्या उमेदवारांना यापुर्वीच्या प्रयत्नांमध्ये सूट देण्यात आलेली आहे. त्यांनासुध्दा ही सवलत देण्यात येईल.

७. <u>परिक्षेचा अभ्यासक्रम</u> :—

विभागीय परीक्षांसाठीचा अभ्यासक्रम परिशिष्ट '३ब' मध्ये विहित केल्याप्रमाणे किंवा शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार असेल.

परंतु, अग्निशमन विभागातील उपस्थानक अधिकारी व त्यापेक्षा वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठीच्या नागपूर अग्निशमन महाविद्यालयाकडून घेतल्या जाणाऱ्या व अभियांत्रिकी अधिकारी महाविद्यालय, नाशिक यांचेकडून अभियांत्रिकी विभागातील अधिकरी/कर्मचाऱ्यांसाठी विहित केलेल्या परिक्षांसाठीचा अभ्यासक्रम त्या परिक्षा घेणाऱ्या प्राधिकाऱ्यांकडून जाहीर केल्याप्रमाणे असेल.

८. <u>प्रशिक्षण</u> :—

विभागीय परिक्षेस बसू इच्छिणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी परिक्षेपुर्वी किमान ४० तासांचा प्रशिक्षण कार्यक्रम महानगरपालिकेडून आयोजित करण्यात येईल.

९. <u>परिक्षा उत्तीर्ण न झाल्यास होणारे परिणाम</u> :— एखादा कर्मचारी नियम—४ मध्ये विर्निदिष्ट केलेल्या कालमर्यादेत आणि संधीमध्ये परिक्षा उत्तीर्ण झाला नाहीतर पुढील परिणाम होतील :—

अ) तो परिक्षा उत्तीर्ण होईपर्यंत किंवा नियम—१० च्या पोट नियम (१) व (२) अन्वये परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून त्यास सूट मिळेपर्यंत त्याला त्याच्या पदावर कायम करण्यात येणार नाही, किंवा त्यांच्या पदाच्या वेतनमानातील पुढील वेतनवाढ त्याला देण्यात येणार नाही. अशा रीतीने रोखून ठेवलेली वेतनवाढ तो परीक्षा उत्तीर्ण झाल्याच्या दिनांकापासून किंवा त्याला परीक्षा उत्तीर्ण होण्यामधून नियम—१० च्या पोट नियम (१) व (२) अन्वये सूट देण्यात आल्याच्या दिनांकापासून त्याला देय असेल आणि कोणतेही वेतनवाढ रोखून न धरल्याचे समजून पुढील सर्व वेतनवाढी देण्यात येतील. मात्र गतकाळातील थकबाकीची रक्कम अनुज्ञेय नसेल.

ब) त्याला त्या संवर्गातील आपली ज्येष्ठता गमवावी लागेल म्हणजेच जे कर्मचारी त्यांच्या अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाले असतील त्या सर्व कर्मचाऱ्यांच्या नंतर त्याचा ज्येष्ठता क्रम लागेल. तसेच. अशा ज्या कर्मचाऱ्याच्या नंतर त्याचा ज्येष्ठता क्रम लागेल त्या कर्मचाऱ्यास ज्येष्ठ असणाऱ्या आणि त्याच्या नंतर

परंतू नियम – ४ मध्ये विर्निदिष्ट केलेल्या कालावधीत व संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या नंतरचा ज्येष्ठता क्रम त्याला देण्यात येईल.

१०. परिक्षा उत्तीर्ण होण्यामधून सूट :–

(१) राजपत्राच्या दिनांकानंतर नियुक्ती झालेल्या कर्मचाऱ्यास परीक्षा उत्तीर्ण होण्यामधून पुढील बाबतीत सूट देण्यात येईल.

(अ) त्यास यापूर्वीच कर्मचारी म्हणून कायम करण्यात आले असेल अशा प्रकरणी

किंवा,

(ब) तो सध्या अस्तित्वात असलेल्या नियमान्वये यापूर्वीच परीक्षा उत्तीर्ण झाला असेल अशाप्रकरणी किंवा,

(२) कोणत्याही दिनांकास कर्मचारी ४५ वर्षे वयाचा झाल्यानंतर त्यास परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात येईल.

११. परीक्षा सर्वसाधारणपणे वर्षातून एकदा घेण्यात येईल. एखाद्या वर्षी जर कोणत्याही कारणास्तव परीक्षा घेण्यात आली नाहीतर कालावधी व संधीची गणना करतांना वगळण्यात येईल.

१२. निर्वचनाच्या शक्ति.

या नियमातील तरतुदीनुसार अधिकाऱ्यांच्या/कर्मचाऱ्यांच्या एखाद्या संवर्गास कोणती विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे वा कोणत्या संवर्गास ही परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट आहे. यासंबंधी कोणताही विवाद उत्पन्न झाल्यास त्याबाबतचा आयुक्तांचा निर्णय अंतिम असेल.

## परिशिष्ट –३ अ

(नियम–३)

### विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य असलेले संवर्ग.

| अ.क्र. | विभाग | संवर्ग |
|---|---|---|
| १ | प्रशासकिय सेवा | लिपीक/वरिष्ठ लिपीक/जकात निरीक्षक/अधिक्षक/मुख्य लिपिक/मुख्य जकात अधिक्षक/ लघुलेखक/मुख्य विधी अधिकारी /तरणतलाव व्यवस्थापक/अभिलेखापाल/तरण तालाव निर्देशक |
| | | सहा. आयुक्त/उप कर निर्धारक व संकलक /जनसंपर्क अधिकारी/ उद्यान अधिक्षक/संगणक चालक/चौकशी अधिकारी/सादरकर्ता अधिकारी/खरेदी अधिकारी/भांडार अधिकारी |
| | | लिपीक संवर्गात येणारे पदे :–<br>लिपीक–टंकलेखक/रोखपाल/दुरध्वनी चालक/मिटर रिडर |
| २ | लेखा/लेखा परिक्षण सेवा | उप–मुख्य लेखा अधिकारी<br>लेखा अधिकारी (वर्ग–२)<br>अंतर्गत लेखा परिक्षक, लेखापाल, उपलेखापाल, वरिष्ठ लेखा परिक्षक, सहा.मुख्य लेखा परिक्षक, कनिष्ठ लेखा परिक्षक |

### परिशिष्ट ब–२ मध्ये विहित केलेल्या परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य असलेले संवर्ग.

| अ.क्र. | विभाग | संवर्ग |
|---|---|---|
| १ | अग्निशमन | अग्निशामक/ड्रायव्हर ऑपरेटर |

### महानगरपालिकेव्यतिरिक्त इतर प्राधिका–याकडून घेतल्या जाणा–या विहित विभागीय परीक्षा.

| अ.क्र. | विभाग | परीक्षा घेणारा प्राधिकारी | संवर्ग |
|---|---|---|---|
| १ | अग्निशमन | अग्निशमन महाविद्यालय, नागपूर | उपस्थानक अधिकारी/उप अग्निशमन अधिकारी (विभागीय अधिकारी परीक्षा) |
| २ | अभियांत्रिकी स्थापत्य/विद्युत/यांत्रिकी | अभियांत्रिकी अधिकारी महाविद्यालय, नाशिक | कनिष्ठ अभियंता, उप अभियंता |

..९..

परिशिष्ट —३ ब

## विभागीय परीक्षा

प्रश्नपत्रिका — १ (गुण १००, वेळ ३ तास)

१. सारांशलेखन
२. टिप्पणी लेखन
३. पत्रलेखन
४. भाषांतर (इंग्रजीतून मराठीत)

टीप:— या प्रश्नपत्रिकेचे माध्यम मराठी असेल व प्रश्नांची उत्तरे मराठी भाषेत द्यावी लागतील.

प्रश्नपत्रिका — २ (पुस्तकासह) (गुण १००, वेळ ३ तास)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ परिशिष्ट ४ व अनूसूची 'ड' ची प्रकरणे १ ते १९ व विशेष करून मुंबई प्रांतिक महागनरपालिका अधिनियमाच्या तरतुदीनुसार असलेले प्राधिकारी यांची कर्तव्ये, जबाबदा—या व कामकाजाची पध्दती.

प्रश्नपत्रिका — ३ (पुस्तकासह) (गुण १००, वेळ ३ तास)

१) सेवेच्या सर्वसाधारण शर्ती :— (गुण ७५)

रजा
वेतन
वर्तणूक आणि शिस्त व अपिल
निवृत्तीवेतन नियम

२) रचना व कार्यपध्दती :— (गुण २०)

सहा गठ्ठे पध्दती

**लिपीक वा तत्सम संवर्गातील ज्या कर्मचाऱ्यांना (गट—क) लेखा/लेखा परिक्षण सेवा विभागात काम करण्याची इच्छा असेल त्यांना प्रश्नपत्रिका १,२,३ व्यतिरिक्त पुढे विहित करण्यात आलेल्या विषयाच्या परिक्षेत उत्तीर्ण व्हावे लागेल.**

प्रश्नपत्रिका — ४ (पुस्तकासह) (गुण १००, वेळ ३ तास)

१. मुंबई वित्त नियम १९५९.
२. महाराष्ट्र अर्थ संकल्प नियम पुस्तिका प्रकरण क्र. ४,५,७,९ व १७ अभ्यासात नाही परिशिष्टे २,४,८,९,११ वगळून.
३. महाराष्ट्र आकस्मीक खर्च नियमावली १९६५ तसेच नियमावली १९९२
४. महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमावली २, ३, ६, ७, ८, ९, १०,११, १२—१ ते १२—५ इतकी प्रकरणे अभ्यासक्रमात आहेत.
५. महानगरपालिकेच्या निविदेसाठी सर्वसाधारण अटी व शर्ती.

प्रश्नपत्रिका — ५ (पुस्तकासह) (गुण १००, वेळ ३ तास)

1- Book Keeping & Accountacy
2- Accrual Based double entry accounting
३. मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम १९४७
४. मुंबई प्राथमिक शिक्षण नियम १९४९

..१०..

गट — 'क' च्या कर्मचाऱ्यांना गट — 'ब' च्या पदावर पदोन्नती मिळण्यापुर्वी या परिशिष्टातील प्रश्नपत्रिका क्र. १, २ व ३ व्यतिरिक्त खालील प्रश्नपत्रिकेत उत्तीर्ण होणे आवश्यक असेल.

<u>प्रश्नपत्रिका — ६</u> (पुस्तकासह) (गुण १००, वेळ ३ तास)

१. महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६
२. महानगरपालिका (घनकचरा व्यवस्थापन) उपविधी २००२
३. महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) वृक्षांचे जतन, अधिनियम १९७५
४. सुवर्णजयंती रोजगार योजना
५. झोपडपट्टी सुधार योजना
६. अंध व अपंगासाठीच्या शासनाच्या सवलती व योजना
७. समाज विकास व बालकल्याण संबंधीच्या शासनाच्या व महानगरपालिकेच्या योजना.

## परिशिष्ट ३ क

विभागीय परीक्षा (अग्निशमन)

<u>विभाग — अग्निशमन</u>

संवर्ग — अग्निशामक/ड्रायव्हर ऑपरेटर

तोंडी व प्रात्यक्षिक परिक्षा :— (१०० — गुण)

| | | | |
|---|---|---|---|
| १) | रासायनिक अग्निशामके | — | प्रकार,उपयोग, देखभाल व निगा |
| २) | शिडया | — | प्रकार,उपयोग, देखभाल व निगा |
| ३) | होज पाईप | — | प्रकार,उपयोग, देखभाल व निगा |
| ४) | फोम व होम साधने | — | प्रकार,उपयोग, देखभाल व निगा |
| ५) | हायड्रंट व होज फिटींग्ज | — | प्रकार,उपयोग, देखभाल व निगा |
| ६) | पंप | — | प्रकार,उपयोग, देखभाल व निगा |
| ७) | वॉटर रिले | — | प्रकार,उपयोग, देखभाल व निगा |
| ८) | गाठी | — | प्रकार,उपयोग, देखभाल व निगा |
| ९) | श्वसन उपकरणे | — | साहित्याची नावे व वापर |
| १०) | कवायत | — | आज्ञापालन व सहकाऱ्याबरोबर कवायत करण्याची क्षमता |

लेखी परिक्षा :— (१००—गुण, वेळ — २ तास)

| | | | |
|---|---|---|---|
| १) | प्रथमोपचार | — | प्रथमोपचार पेटीतील साहित्य व भाजणे, अस्थिभंग, घुसमटणे, रक्तस्त्राव, जखमा यांचेवर करावयाच्या प्रथमोपचाराची माहिती देणे. |
| २) | वॉचरूम कार्यपध्दती | — | वॉचरूममध्ये ठेवल्या जाणाऱ्या रेकॉर्डची माहिती, त्यासाठी वापरले जाणारे नमुने व काल्पनिक संदेशावर वॉचरूमच्या रेकॉर्डमध्ये नोंद करणे. |
| ३) | अग्निशामक व ड्रायव्हर ऑपरेटर पदाची कर्तव्ये | — | पदाच्या कर्तव्यांची माहिती असणे व ती कर्तव्ये पार पाडण्यासाठी कराव्या लागणाऱ्या कामाबद्दलचा तपशील. |
| ४) | शिस्त व कर्तव्यपालन | — | शिस्तीचे व कर्तव्यपालनाचे अग्निशमन विभागातील महत्व व त्यांचे पालन न झाल्यास होणारे परिणाम. कर्तव्यपालन न झाल्यामुळे वा झाल्यामुळे आठवणीत राहीलेल्या एखाद्या प्रसंगाचे वर्णन. |

## परिशिष्ट — ४

## पदोन्नतीसाठी एकीकृत संवर्ग

<u>प्रस्तावना :—</u>

उल्हासनगर महानगरपालिकेच्या कामाची व्याप्ती विचारात घेऊन वेळोवेळी विविध संवर्ग निर्माण करण्यात आलेले आहेत. मात्र या सर्व संवर्गातील कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध व्हाव्यात व त्यांची संवा ज्येष्ठता निश्चित करण्याकरिता प्रशासकीय कामाच्या सोईसाठी खालीप्रमाणे एकिकृत संवर्ग निर्माण करण्यात येत आहे.

| अ. क्र. | निर्माण करण्यात येणा—या एकिकृत संवर्गाचे नाम | समकक्ष पदे | शेरा |
|---|---|---|---|
| १) | विभाग अधिकारी (रू.६५००—१०५००) | सहाय्यक आयुक्त/उप कर निर्धारक व संकलक/चौकशी अधिकारी /सादरकर्ता अधिकारी/खरेदी अधिकारी/भांडार अधिकारी/जनसंपर्क अधिकारी | सदरची पदाची कर्तव्ये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम—१९४९ प्रमाणे असतील. |
| २) | अधिक्षक (रू.५५००—९०००) | मुख्य जकात अधिक्षक/मुख्य लिपिक /अघिक्षक/मुख्य विधी अधिकारी | सदरची पदाची कर्तव्ये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम—१९४९ प्रमाणे असतील. |
| ३) | वरिष्ठ लिपीक/जकात निरीक्षक (रू.४०००—६०००) | वरिष्ठ लिपीक /जकात निरिक्षक रोखपाल/कनिष्ठ लेखा परिक्षक | सदरची पदाची कर्तव्ये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम—१९४९ प्रमाणे असतील |
| ४) | लिपीक (रू.३०५०—४५९०) | लिपीक, टंकलेखक, मिटर रीडर | सदरची पदाची कर्तव्ये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम—१९४९ प्रमाणे असतील |
| ५) | मजुर (रू.२५५०—३२००) | मजुर/वॉलमन/झारीवाला/हेल्पर | सदरची पदाची कर्तव्ये मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम—१९४९ प्रमाणे असतील |

१) वर निर्देशित केल्याप्रमाणे संवर्गाचे एकत्रिकरण प्रत्येक महापालिकेने स्वतंत्रपणे करावयाचे आहे.

२) या एकिकृत संवर्गातील पदधारक बदलीस आंतरपरिवर्तनीय असतील.

३) **समावेशन** :— जे कर्मचारी नियमीतपणे पद धारण करीत असतील व संबंधीत पदाच्या भरतीवेळी वेळोवेळी प्रचलित असलेल्या सेवा प्रवेश नियमांचा तरतूदीनुसार त्या पदावर नियुक्ती झालेली असेल तर संबंधीत एकीकृत संवर्गात त्याचे नियीमत समावेशन झाले आहे, असे मानले जाईल. म्हणजेच त्याने धारण केलेले पद ज्या एकीकृत संवग्रात समाविष्ट केले असेल त्या एकीकृत संवर्गात त्याचे समावेशन होईल.

४) **ज्येष्ठता** :— एकिकृत संवर्गाची ज्येष्ठता महाराष्ट्र नागरी सेवा ज्येष्ठता नियम १९८१ प्रमाणे निश्चित करण्यात येईल.

सक्षम प्राधिकारी

.१ रैं

परिशिष्ट (२)

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ४५ व ५३ (१) चे तरतुदीनुसार नेमणूक करावयाच्या अधिकाऱ्यांच्या पदांसाठीची कलम ४५ (३) व ४५७ (३) अन्वये विहीत शैक्षणिक व इतर अर्हता (पहा (नियम ३)

प्रशासकीय सेवा

| अ. क्र. | सेवा व संवर्ग | पदनाम | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी<br>१.नामनिर्देशन<br>२.पदोन्नती<br>३.प्रतिनियुक्ती | प्रशासकीय सेवा | नेमणूकीकरीता अर्हता व नेमणूकीच्या पध्दती |
|---|---|---|---|---|---|
| | श्रेणी—१ प्रशासकीय सेवा | आयुक्त | ——— | ——— | (राज्य शासनाकडून वेळोवेळी नेमणूक करण्यात येईल असा अधिकारी (मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ३६ प्रमाणे) |
| | श्रेणी—१ प्रशासकीय सेवा | अतिरिक्त आयुक्त | प्रतिनियुक्ती | ——— | शासनाचे नगरविकास विभांग अंतर्गत मुख्य अधिकारी संवर्गातील अधिकारी. |
| | श्रेणी—१ प्रशासकीय सेवा | उप आयुक्त | नामनिर्देशन— ५०% | ४० वर्षे | अ) मान्यता प्राप्त विद्यापिठाची कोणत्याही शाखेची पदवी किंवा समकक्ष अर्हता.<br>ब) राज्य शासनाकडील उप जिल्हाधिकारी/मुख्याधिकारी (वर्ग—१)/शासन सेवेतील समकक्ष पदावरील किमान — ५ वर्षाचा अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारांमधून नेमणूक करता येईल किंवा महानगरपालिकेतील सहाय्यक आयुक्त या पदावर ५ वर्षाचा अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारामधुन करता येईल. |
| | | | पदोन्नती — ५०% | ——— | अ) मान्यता प्राप्त विद्यापिठाच्या कोणत्याही शाखेची पदवी किंवा समकक्ष अर्हता.<br>आणि<br>ब) महानगरपालिका सहाय्यक आयुक्त किंवा समकक्ष पदावरील किमान ५ वर्षाचा अनुभव. |
| | | | प्रतिनियुक्ती | ——— | शासनाचे नगरविकास विभांग अंतर्गत मुख्य अधिकारी संवर्गातील अधिकारी. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | श्रेणी—२ प्रशासकीय सेवा | सहाय्यक आयुक्त/प्रभाग क्षेत्र अधिकारी | नामनिर्देशन— १/३ | ४० वर्षे | अ) मान्यता प्राप्त विद्यापिठाची कोणत्याही शाखेची पदवी किंवा समकक्ष अर्हता. आणि अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेकडील एल.जी.एस. परीक्षा उर्तीर्ण.<br>ब) राज्य शासनाकडील मुख्य लिपीक किंवा समकक्ष पदावरील किंवा कोणत्याही महापालिका आस्थापनेवरील अधिक्षक या पदावरील किमान ५ वर्षाचा अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारांमधून सरळ सेवेने नेमणूक करता येईल. |
| | | | पदोन्नती — २/३ | ——— | महापालिकेच्या अधिक्षक/मुख्य जकात अधिक्षक, मुख्य लिपीक संवर्गातील व L. G. S. पदविका उत्तीर्ण असणाऱ्या कर्मचाऱ्यांमधून किमान ५ वर्षाचा अनुभव. |
| | | | प्रतिनियुक्ती | ——— | शासनाचे नगरविकास विभांग अंतर्गत मुख्य अधिकारी संवर्गातील अधिकारी. |
| | श्रेणी—३ प्रशासकीय सेवा | अधिक्षक | पदोन्नती — १००% | —— | अ) महापालिका आस्थापनेवरील वरिष्ठ लिपीक/जकात निरीक्षक या संवर्गातील किंवा समकक्ष पदावरील किमान ०५ वर्षांचा अनुभव.<br>ब) विभागीय परीक्षा उत्तीर्ण आवश्यक.<br>क) L. S. G. D. परीक्षा उत्तीर्ण. |
| | श्रेणी—३ प्रशासकीय सेवा | मुख्य लिपीक | नामनिर्देशन | ३३ वर्षे | अ) मान्यता प्राप्त विद्यापिठाच्या कोणत्याही शाखेची पदवी किंवा समकक्ष अर्हता.<br>ब) अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेकडील L. S. G. D. परीक्षा उत्तीर्ण असल्यास प्राधान्य<br>क) शासकीय/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थेकडील वरिष्ठ लिपीक/कर निरिक्षक किंवा समकक्ष पद ५ वर्षाचा अनुभव |
| | | | पदोन्नती | ——— | अ) महापालिका आस्थापनेवरील वरिष्ठ लिपीक/जकात निरीक्षक या संवर्गातील किंवा समकक्ष पदावरील किमान ०५ वर्षांचा अनुभव.<br>ब) विभागीय परीक्षा उत्तीर्ण आवश्यक.<br>क) L. S. G. D. परीक्षा उत्तीर्ण. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | श्रेणी—३ प्रशासकीय सेवा | वरिष्ठ लिपीक / जकात निरीक्षक | नामनिर्देशन—२५% | ३३ वर्षे | अ) मान्यता प्राप्त विद्यापिठाच्या कोणत्याही शाखेची पदवी किंवा समकक्ष अर्हता.<br>ब) अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेकडील L. S. G. D. परीक्षा उत्तीर्ण असल्यास प्राधान्य |
| | | | पदोन्नती—७५ % | ——— | अ) महापालिका आस्थापनेवरील लिपीक या संवर्गात किमान ०५ वर्षांचा अनुभव.<br>ब) निम्नस्तर विभागीय परीक्षा उत्तीर्ण आवश्यक<br>क) L. S. G. D. परीक्षा उत्तीर्ण. |
| | श्रेणी—३ प्रशासकीय सेवा | लिपीक / टंकलेखक / मिटररीडर | नामनिर्देशन—७५% | ३३ वर्षे | अ) एस. एस. सी. परीक्षा उत्तीर्ण.<br>ब) राज्य शासनाची मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. (जीसीसी) / इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र. मि. परिक्षा उत्तीर्ण.<br>क) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परिक्षा उत्तीर्ण किंवा D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B किंवा C स्तर पैंकी काणतीही एक परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.<br>ड) मराठी लिहीता, बोलता व वाचता येणे आवश्यक. |
| | | | पदोन्नती २५% | ——— | अ) महानगरपालिका आस्थापनेवरील किमान एस. एस. सी. परीक्षा उत्तीर्ण.<br>ब) मराठी / इंग्रजी टंकलेखनातील श.प्र.मि. ३० चे प्रमाणपत्र आवश्यक<br>क) MS-CIT परिक्षा उत्तीर्ण<br>ड) किमान ५ वर्षाचा अनुभव असलेल्या वर्ग — ४ संवर्गातून नेमणूक करता येईल. |
| | श्रेणी—४ प्रशासकीय सेवा | शिपाई | नामनिर्देशन—१००% | ३३ वर्षे | अ) इयत्ता ७ वी ची परीक्षा उत्तीर्ण.<br>ब) मराठी लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | श्रेणी—३ प्रशासकीय सेवा | वाहनचालक (जड/हलके) | नामनिर्देशन— ५०% | ३३ वर्षे | अ) मराठी ७ वी परीक्षा उत्तीर्ण. ब) जड/हलके वाहन चालविण्याचा परवाना क) परवाना मिळाल्यानंतर वाहन चालविण्याचा किमान ३ वर्षाचा अनुभव. ड) मराठी लिहिता, वाचता व बोलता येणे आवश्यक इ) वाहनदुरूस्ती देखभालीचे कामासंबंधी प्रशिक्षणाचे मान्यवर शैक्षणिक संस्थेचे प्रमाणपत्र धारण करणारास प्राधान्य. फ) महापालिका सेवेतील क्लिनर वा गट—ड मधील कर्मचाऱ्यांना प्राधान्य. |
| | | | पदोन्नती — ५०% | ——— | महापालिकेच्या आस्थापनेवरील क्लिनर या संवर्गातील ५ वर्षाचा अनुभव असणाऱ्या व उपरोक्त अर्हता धारण करणाऱ्यां कर्मचाऱ्यांमधून पदोन्नतीने नेमणूक. |
| | श्रेणी—३ प्रशासकीय सेवा | लघुलेखक (उच्चश्रेणी) (इंग्रजी/मराठी) | नामनिर्देशन— ५०% | ३३ वर्षे | अ) दहावी परीक्षा उत्तीर्ण. ब) राज्य शासनाची इंग्रजी आणि मराठी लघुलेखनाची १२० श.प्र.मि. व ४० श. प्र.मि. वेगाची टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण. क) एम. एस.सी.आय.टी. परीक्षा उत्तीर्ण. |
| | | | पदोन्नती — ५०% | ——— | अ) महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील लघुलेखक (निम्नश्रेणी) या संवर्गातील ५ वर्षाचा अनुभव आवश्यक. ब) मराठी/इंग्रजी लघुलेखन १२० श.प्र.मि. उत्तीर्ण. व ठंकलेखन ४० श. प्र. मि. वेगाची शासनाची (जी.सी.सी.) परीक्षा उत्तीर्ण. क) एम.एस.सी.आय.टी. परीक्षा उत्तीर्ण |
| | श्रेणी—३ प्रशासकीय सेवा | लघुलेखक (निम्नश्रेणी) (इंग्रजी/मराठी) | नामनिर्देशन — ७५% | ३३ वर्षे | अ) दहावी परीक्षा उत्तीर्ण. ब) राज्य शासनाची इंग्रजी आणि मराठी लघुलेखनाची १०० श.प्र.मि. व ४० श. प्र.मि. वेगाची टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण. क) एम. एस.सी.आय.टी. परीक्षा उत्तीर्ण. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | पदोन्नती — २५% | ——— | महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील उपरोक्त अर्हता धारण करणाऱ्या तसेच किमान ०३ वर्षाच्या सेवेनंतर लघुटंकलेखक संवर्गाच्या कर्मचाऱ्यांमधून २५ टक्के पदोन्नतीने नेमणूक. |
| | श्रेणी—२ प्रशासकीय सेवा | माहिती व जनसंपर्क अधिकारी | नामनिर्देशन | ३३ वर्षे | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची कोणत्याही शाखेची पदवी किंवा समकक्ष अर्हता.<br>ब) पत्रकारीता व जनसंज्ञापन (Journalisam & Mass Communication) मधील पदविका आवश्यक.<br>क) शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थेतील सहा. माहिती व जनसंपर्क विभागातील ०५ वर्षाचा अनुभव. |
| | | | पदोन्नती | ——— | महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील उपरोक्त शैक्षणीक अर्हता धारण करणाऱ्या सहा. माहिती/जनसंपर्क अधिकारी या संवर्गातील किमान ०५ वर्षाचा अनुभव. वरिष्ठस्तर परीक्षा उत्तीर्ण असणाऱ्या कर्मचाऱ्यांमधून जेष्ठता व पात्रतेच्या आधारे पदोन्नतीने नियुक्ती. |
| | श्रेणी—३ प्रशासकीय सेवा | दूरध्वनी चालक | नामनिर्देशन — १००% | ३३ वर्षे | अ) महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शालांन्त परिक्षा उत्तीर्ण.<br>ब) शासनमान्य संस्थेचा वा शासकीय आय.टी.आय. चा टेलिफोन ऑपरेटरचा अभ्यासक्रम पूर्ण.<br>क) मराठी, हिंदी व इंग्रजीत संभाषण करण्याचा सराव आवश्यक. |
| | श्रेणी—३ प्रशासकीय सेवा | मुख्य विधी अधिकारी | नामनिर्देशन | ४० वर्षे | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाचा विधी शाखेचा पदवीधर. पदव्युत्तर पदवीधारकास प्राधाध्य (एल.एल.एम.)<br>ब) जिल्हा न्यायालयातील स्वतंत्र वकिलीचा ७ वर्षाच्या विशेषत: महानगरपालिका अधिनियम, कॉन्ट्रक्ट ॲक्ट, प्रशासकीय व कामगार विषयक अधिनियमाच्या कामाचा अनुभव. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | पदोन्नती | ——— | महापालिकेच्या आस्थापनेवरील सहा. विधी अधिकारी संवर्गात ०७ वर्षाची सेवा पूर्ण झालेल्या व नामनिर्देशननासाठी आवश्यक शॅक्षणिक व इतर अर्हता. |
| | श्रेणी—३ प्रशासकीय सेवा | उद्यान अधिक्षक | नामनिर्देशन | ४० वर्षे | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची वनस्पती शास्त्रातील पदवी.<br>ब) शासनाकडील समकक्ष पदावरील किमान ०३ वर्षाचा अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारांस प्राधान्य. |
| | | | पदोन्नती | ——— | महापालिका आस्थापनेवरील उप मुख्य वृक्ष अधिकारी या संवर्गात ०५ वर्षाचा अनुभव |
| | श्रेणी—१ प्रशासकीय सेवा | कर निर्धारक व संकलक | नामनिर्देशने | ——— | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची कोणत्याही शाखेची पदवी.<br>ब) विक्रीकर अधिकारी (वर्ग—१) अथवा समकक्ष पदावरील ५ वर्षाचा अनुभव. |
| | | | पदोन्नती | ——— | महानगरपालिका सेवेतील उप मुल्य निर्धारक व संकलक या पदावर किमान ५ वर्षाचा अनुभव |
| | | | प्रतिनियुक्ती | | शासनाचे नगरविकास विभांग अंतर्गत मुख्य अधिकारी संवर्गातील अधिकारी. |
| | श्रेणी—१ प्रशासकीय सेवा | उप करनिर्धारक व संकलक | नामनिर्देशन/ प्रतिनियुक्ती | ——— | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची कोणत्याही शाखेची पदवी.<br>ब) राज्य शासनाकडील विक्रीकर अधिकारी (वर्ग—२) अथवा समकक्ष पदावरील किमान ५ वर्षाचा अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारांस प्राधान्य. |
| | | | पदोन्नती | ——— | नामनिर्देशननामध्ये विहीत केलेली अर्हता धारण करणाऱ्या व महापालिका आस्थापनेवरील अधिक्षक व समकक्ष संवर्गात किमान ५ वर्षाचा अनुभव. |
| | श्रेणी — २ प्रशासकीय सेवा | चौकशी अधिकारी | नामनिर्देशन | ३३ वर्षे | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी (विधी पदवी धारकास प्राधान्य)<br>ब) शासकीय निमशासकीय सेवेतील ३ वर्षाचा प्रशासकीय अनुभव |
| | | | पदोन्नती | ——— | महानगरपालिकेतील अधिक्षक पदाचा किंवा तत्सम श्रेणीतील ७ वर्षाच्या सेवेचा अनुभव |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | प्रतिनियुक्ती | ——— | राज्य शासनामधून किंवा अन्य स्थानिक संस्थामधून योग्य अधिकाऱ्यांच्या प्रतिनियुक्तीवर नेमणूक करून |
| | श्रेणी — २ प्रशासकीय सेवा | सादरकर्ता अधिकारी | नामनिर्देशन | ३३ वर्षे | अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी विधी पदवी धारकास प्राधान्य<br>ब) शासकीय/निमशासकीय सेवेतील प्रशासकीय कामाचा ३ वर्षाचा अनुभव |
| | | | पदोन्नती | | महानगरपालिकेतील अधिक्षक पदाचा किंवा तत्सम श्रेणीतील ७ वर्षाच्या सेवेचा अनुभव. |
| | | | प्रतिनियुक्ती | | राज्य शासनामधून किंवा अन्य स्थानिक संस्थामधून योग्य अधिका—यज्ञंचा प्रतिनियुक्तीवर नेमणूक करून |
| | श्रेणी — २ प्रशासकीय सेवा | खरेदी अधिकारी | नामनिर्देशन | ३३ वर्षे | अ) मान्यता प्राप्त विद्यापिठाची कोणत्याही शाखेची पदवी<br>ब) शासन/निमशासकीय खरेदी विभागातील ०७ वर्षाचा अनुभव |
| | | | पदोन्नती | ——— | अ) एस. एस. सी. परिक्षा उत्तीर्ण<br>ब) अधिक्षक किंवा तत्सम पदावरील ०७ वर्षाचा अनुभव |
| | श्रेणी — ३ प्रशासकीय सेवा | मुख्य जकात अधिक्षक | नामनिर्देशन | ३३ वर्षे | अ) मान्यता प्राप्त विद्यापीठातील कोणत्याही शाखेची पदवी<br>ब) शासकीय/निमशासकीय संस्थेतील प्रशासकीय कामाचा ०५ वर्षाचा अनुभव |
| | | | पदोन्नती | ——— | अ) माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण<br>ब) अधिक्षक किंवा तत्सम श्रेणीतील ०७ वर्षाचा अनुभव |
| | श्रेणी — ३ प्रशासकीय सेवा | तरणतलाव व्यवस्थापक | नामनिर्देशन | ३३ वर्षे | अ) बी.पी.एड. ही पदवी आणि आंतर महाविद्यालयीन प्रमाणपत्र असलेले तज्ञ जलतरणपटू, राज्य स्तरावरील उत्कृष्ठ जलतरण प्राविण्य मिळवीणाऱ्या उमेदवारास प्राधान्य |
| | | | पदोन्नती | ——— | अ) मान्यता प्राप्त विद्यापिठातील कोणत्याही शाखेची पदवी आणि आंतर महाविद्यालयीन प्रमाणपत्र किंवा सी.ए. एम.ए चे जलतरण प्रमाणपत्र असलेला तज्ञ जलतरणपटू.<br>ब) त्यास तरणतलाव निर्देशक/प्रशिक्षक म्हणून महानगरपालिकेच्या सेवेतील ५ वर्षाचा अनुभव आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | श्रेणी — ३ प्रशासकीय सेवा | अभिलेखापाल | नामनिर्देशन | ३३ वर्षे | अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची कौणत्याही शाखेची पदवी |
| | | | पदोन्नती | ——— | अ) एस. एस. सी.<br>ब) वरिष्ठ लिपीक किंवा तत्सम पदावरील ०५ वर्षाचा अनुभव असेल. |
| | श्रेणी — ३ प्रशासकीय सेवा | रोखपाल | नामनिर्देशन — २५% | ३३ वर्षे | अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी. |
| | | | पदोन्नती — ७५% | ——— | अ) एस. एस.सी.<br>ब) महानगरपालिकेच्या सेवेतील लिपीक या पदावरील ०३ वर्षाचा अनुभव |
| | श्रेणी — ३ प्रशासकीय सेवा | तरणतलाव निर्देशक | नामनिर्देशन — १००% | ३३ वर्षे | अ) एस. एस. सी. उत्तीर्ण, जलतरण पटू म्हणून आंतरमहाविद्यालयीन प्रमाणपत्र किंवा सी.ए.एम.ए चे जलतरण प्रमाणपत्र असलेले तज्ञ जलतरणपटु,<br>जिल्हा स्तरावरिल तज्ञ जलतरणपटूंना प्राधान्य देण्यात येईल. |
| | श्रेणी — ४ प्रशासकीय सेवा | मजुर/हेल्पर/ माळी/वॉलमन / झारीवाला | नामनिर्देशन— १००% | ३३ वर्षे | इयत्ता ७ वी ची परीक्षा उत्तीर्ण |
| | श्रेणी — ४ प्रशासकीय सेवा | विद्युत मदतनीस | नामनिर्देशन— १००% | ३३ वर्षे | अ) चौथी पास<br>ब) मजबुत शरीरयष्टी |
| | श्रेणी — ४ प्रशासकीय सेवा | वाहन मदतनीस | नामनिर्देशन— १००% | ३३ वर्षे | अ) चौथी पास<br>ब) मजबुत शरीरयष्टी |
| | श्रेणी — ४ प्रशासकीय सेवा | बिल सर्व्हर | नामनिर्देशन— १००% | ३३ वर्षे | अ) एस्.एस्.सी. पास<br>ब) मजबुत शरीरयष्टी |
| | श्रेणी — २ प्रशासकीय सेवा | भांडार अधिकारी | नामनिर्देशन | ३३ वर्षे | अ)मान्यताप्राप्त विद्यापीठातील कोणत्याही शाखेची पदवी<br>ब) शासकीय/निमशासकीय भा.डार विभागातील ०७ वर्षांचा अनुभव |
| | | | पदोन्नती | ——— | एस्.एस्.सी. परिक्षा उत्तीर्ण अधिक्षक किंवा समानश्रेणी पदावरील ०७ वर्षाचा अनुभव |
| | श्रेणी—१ प्रशासकीय सेवा | महानगरपालिका सचिव/ नगरसचिव | नामनिर्देशन | ४० वर्षे | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची कोणत्याही शाखेची पदवी आणि L.G.S. परीक्षा उत्तीर्ण.<br>ब) विधी शाखेच्या पदवीधरास प्राधान्य. |
| | | | पदोन्नती | | नामनिर्देनिर्देशनासाठी विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या महापालिका आस्थापनेवरील वर्ग — २ च्या अधिकाऱ्यामधून किमान ५ वर्षाचा अनुभव. |
| | | | | | |

..२०..

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| सुरक्षा सेवा | | | | | |
| | श्रेणी—३ सुरक्षा सेवा | सुरक्षा अधिकारी | पदोन्नती —१००% | ——— | अ) उच्च माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण.<br>ब) मराठी लिहीता बोलता व वाचता येणे आवश्यक.<br>क) किमान शारिरीक पात्रता — उंची १६५ से.मी., वजन ५० कि.ग्रॅ, छाती ८१ से. मी. ८६ से. मी.(फुगवून), दृष्टी चांगली. वरीष्ठ सुरक्षारक्षक या पदावरील किमान ५ वर्षाचा अनुभव |
| | श्रेणी — ४ सुरक्षा सेवा | वरिष्ठ सुरक्षारक्षक | पदोन्नती —१००% | — | अ) माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण.<br>ब) शारिरीक पात्रता<br>क) सुरक्षा रक्षक या पदावरील किमान ५ वर्षाचा अनुभव |
| | श्रेणी — ४ सुरक्षा सेवा | सुरक्षा रक्षक | नामनिर्देशन — १००% | ३३ वर्षे | अ) ७ वी पास<br>ब) उंची १६५ सें. मी., छाती किमान ८१ से. मी. व ८६ से. मी.फूगवुन तसेच वजन ५० कि. ग्रॅ. दृष्टी चांगली |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| तांत्रीक सेवा | | | | | |
| | श्रेणी—२ तांत्रिक सेवा | सिस्टीम ॲनालिस्ट | नामनिर्देशन | ३३ वर्षे | अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची संगणक अभियांत्रिकीमधील पदवी (B.E.Computer) किंवा समकक्ष अर्हता.<br>ब) सिस्टीम ॲनलिसीस/प्रोग्रमिंग/सॉफटवेअर डेव्हलपमेंट मधील किमान ०५ वर्षाचा अनुभव |
| | | | पदोन्नती | ——— | कनिष्ट अभियंता (सॉफ्टवेअर) संवर्गातील किमान ५ वर्षांचा अनुभव. |
| | श्रेणी—३ तांत्रिक सेवा | नळ कारागीर (प्लंबर/फिटर) | नामनिर्देशन — ५०% | ३३ वर्षे | अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक मंडळाची शालांन्त परिक्षा उत्तीर्ण.<br>ब) शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे नळ कारागीर/फिटर या विषयाचा अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र.<br>क) संबंधित कामाचा ३ वर्षाचा अनुभव |
| | | | पदोन्नती — ५०% | ——— | महानगरपालिकेच्या सेवेतील उपरोक्त शैक्षणिक पात्रता धारण करणारे वर्ग — ४ चे कर्मचारी |
| | श्रेणी—३ तांत्रिक सेवा | पंप ऑपरेटर | नामनिर्देशन —५०% | ३३ वर्षे | अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक मंडळाची शालांन्त परिक्षा उत्तीर्ण.<br>ब) शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे पंप ऑपरेटर या विषयाचा अभ्यासक्रम पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र<br>क) अनुभवास प्राधान्य |
| | | | पदोन्नती ५०% | ——— | राज्य शासनाच्या उद्योग उर्जा व कामगार विभागाने दिलेले तारतंत्री परवाना असेल असे वर्ग—४ मधील कर्मचारी |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | श्रेणी—३ तांत्रिक सेवा | वीजतंत्री | नामनिर्देशन — २५% | ३३ वर्षे | अ) महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक मंडळाची शालांन्त परिक्षा उत्तीर्ण.<br>ब) शासन मान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे वीजतंत्री अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र. |
| | | | पदोन्नती — ७५% | | राज्य शासनाच्या उद्योग उर्जा व कामगार विभागाने दिलेले तारतंत्री परवाना असेल असे तारतंत्री मधिल कर्मचारी |
| | श्रेणी—३ तांत्रिक सेवा | तारतंत्री | नामनिर्देशन — ५०% | ३३ वर्षे | अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक मंडळाची शालांन्त परिक्षा उत्तीर्ण.<br>ब) शासन मान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे तारतंत्री या विषयाचा अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र. |
| | | | पदोन्नती — ५०% | | राज्य शासनाच्या उद्योग उर्जा व कामगार विभागाने दिलेले तारतंत्री परवाना असेल असे वर्ग—४ मधील कर्मचारी |
| | श्रेणी — ३ तांत्रिक सेवा | प्रोगॅमर (संगणक) | नामनिर्देशन — १००% | ३३ वर्षे | अ) इलेक्ट्रॉनिक कॉम्प्युटर पदवीका अथवा इलेक्ट्रॉनिक कॉम्प्युटर पदवीधारक |
| | | | **अग्निशमन सेवा** | | |
| | श्रेणी — ३ अग्निशमन सेवा | मुख्य अग्निशमन अधिकारी | नामनिर्देशन | ३३ वर्षे | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची प्राधान्याने विज्ञान शाखेतील पदवी आणि राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय नागपुर येथून विभागीय अधिका—यांचा पाठयक्रम किंवा राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय नागपूर येथून बी. ई. अग्निशमन ही परिक्षा उत्तीर्ण किंवा अग्निशमन अभियंता संस्था (भारत) या संस्थेची पदवी परिक्षा उत्तीर्ण किंवा ज्यांची लोकसंख्या पाच लाखांपेक्षा कमी नसेल अशा शहराच्या कोणत्याही अग्निशमन सेवेचा उपमुख्य अग्निशमन अधिकारी म्हणून ३ वर्षे सेवा.<br>ब) किमान उंची १६५ से.मी. आणि किमान छाती ८१ से. मी. व फूगवून ८६ से. मी. असावी आणि वजन ५० किलोपेक्षा कमी नसेल इतके असावे व त्याची दृष्टी नियमित (नॉर्मल) असावी. |
| | | | पदोन्नती | ——— | उप मुख्य अग्निशमन अधिकारी म्हणून महानगरपालिकेच्या सेवेतील ३ वर्षाचा अनुभव असेल. |
| | श्रेणी — ३ अग्निशमन सेवा | उप मुख्य अग्निशमन अधिकारी | नामनिर्देशन | | अ) एस. एस. सी परीक्षा उत्तीर्ण<br>ब) राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालयातील विभागीय अधिकाऱ्याचा पाठयक्रम उत्तीर्ण किंवा शासन मान्य तत्सम आभ्यासक्रम उत्तीर्ण<br>क) शासकिय/निमशासकीय/खाजगी सवेतील विभागीय अधिकारी या पदाचा ०३ वर्षाचा अनुभव |
| | | | पदोन्नती | | अ) एस. एस. सी परीक्षा उत्तीर्ण<br>ब) राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालयातील विभागीय स्थानक अधिकारी हा अभयासक्रम उत्तीर्ण किंवा शासनमान्य तत्सम आभ्यासक्रम उत्तीर्ण<br>क) उप स्थानक अधिकारी या पदावरील ०५ वर्षाचा अनुभव |

--22—

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | श्रेणी — ३ अग्निशमन सेवा | उप स्थानक अधिकारी (अग्निशमन) | नामनिर्देशन — ५०% | ३३ वर्षे | अ) एस. एस. सी. उत्तीर्ण<br>ब) अग्निशमन सेवेतील ०२ वर्षाचा अनुभव आणि नॅशनल फायर सर्विसेस कॉलेज नागपुर मधून दुय्यम अधिकाऱ्याचा पाठयक्रम उत्तीर्ण<br>क) उंची — १६५ सेंमी, छाती — ८१ सेंमी, ८६ सेंमी (फुगवून), वजन — ५० किलोग्रॅम, दृष्टि — सर्वसाधारण (चष्म्याशिवाय, तसेच रंगअंधत्व नसावे) |
| | | | पदोन्नती — ५०% | ——— | अ) एस. एस. सी. उत्तीर्ण<br>ब) अग्निशमक किंवा प्रमुख अग्निशमक म्हणून १० वर्षाचा अनुभव आणि नॅशनल फायर सर्विसेस कॉलेज नागपुर मधून दुय्यम अधिकाऱ्याचा पाठयक्रम उत्तीर्ण |
| | श्रेणी — ३ अग्निशमन सेवा | थ्लडींग फायरमन | पदोन्नती — १००% | ——— | अ) फायरमन पदावरील ०५ वर्षाचा अनुभव आणि लिडींग फायरमन या पदावरील कर्तव्य पार पाडण्यास शारिरीक दृष्ट्या सक्षम |
| | श्रेणी — ४ अग्निशमन सेवा | फायरमन | नामनिर्देशन— १००% | ३३ वर्षे | अ) राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंदाकडून चालविला जाणारा मुलभुत अग्निशमन पाठयक्रम उत्तीर्ण.<br>ब) उंची — १६५ सेंमी, छाती — ८१ सेंमी, ८६ सेंमी (फुगवून), वजन — ५० किलोग्रॅम, दृष्टि — सर्वसाधारण (चष्म्याशिवाय, तसेच रंगअंधत्व नसावे) |

| लेखा सेवा | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | श्रेणी — १ लेखा सेवा | मुख्य लेखा व वित्त अधिकारी | नामनिर्देशन | ४५ वर्षे | अ) वित्तीय व्यवस्थापनातील पदव्युत्तर पदवी किंवा सी.सी.ए.(चार्टर्ड अकाऊंटंट) परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>ब) शासकीय/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थामधील लेखा संवर्गातील वर्ग—२ च्या पदावरील ०७ वर्षाचा अनुभव. अनिवार्य. |
| | | | पदोन्नती | ——— | अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेची पदवी किंवा समकक्ष अर्हता.<br>ब) वित्तीय व्यवस्थापनातील पदव्युत्तर पदवी किंवा अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेकडील लोकल फायनान्स मॅनेजमेंट (डी.एफ.एम.) पदविका किंवा G.D.C & A. किंवा L.G.S. उत्तीर्ण असणे आवश्यक. क) महापालिका विभागीय परीक्षा (लेखा) उत्तीर्ण असलेल्या कार्यरत उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी संवर्गाचा ०५ वर्षाचा अनुभव अथवा लेखा अधिकाऱ्यांतून ०७ वर्षाचा अनुभव. |
| | | | प्रतिनियुक्ती | ——— | शासनाकडील महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील वर्ग—१ च्या अधिकाऱ्यांमधून प्रतिनियुक्तीने. |
| | श्रेणी—१ लेखा सेवा | उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी | नामनिर्देशन | ४५ वर्षे | अ) वित्तीय व्यवस्थापनातील पदव्युत्तर पदवी किंवा जी. सी. ए. (चार्टर्ड अकाऊंटंट) परीक्षा उत्तीर्ण.<br>ब) शासनाकडील लेखा संवर्गातील वर्ग — २ च्या पदावरील ०५ वर्षाचा अनुभव असल्यास विशेष पसंती. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | पदोन्नती | ——— | अ) वित्तीय व्यवस्थापनातील पदव्युत्तर पदवी किंवा अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेकडील लोकल फायनान्स मॅनेजमेंट (डी.एफ.एम.) पदविका अथवा G.D.C & A. अथवा L.G.S.पदविका उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>ब) महापालिका विभागीय परीक्षा (लेखा) उत्तीर्ण असलेल्या लेखा अधिकारी (वर्ग—२) या पदावरील किमान ०५ वर्षाचा अनुभव असणाऱ्या अधिकाऱ्यातून ज्येष्ठता व पात्रतेच्या निकषांन्वये पदोन्नतीने नियुक्ती. |
| | | | प्रतिनियुक्ती | ——— | शासनाकडील महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील वर्ग—१ च्या अधिकाऱ्यांमधून प्रतिनियुक्तीने. |
| | श्रेणी—२ लेखा सेवा | लेखाधिकारी | नामनिर्देशन | ——— | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची वाणिज्य शाखेची पदवी किंवा समकक्ष अर्हता.<br>ब) वित्तीय व्यवस्थापनातील पदव्युत्तर पदवी/पदविका किंवा वाणिज्य शाखेची पदव्युत्तर पदवीधारक उमेदवार असल्यास प्रधान्य अथवा राज्य शासनाकडील एम्.ए.एस्.(महाराष्ट्र अकाऊंट सर्व्हीसेस, कनिष्ठ स्तर परिक्षा उत्तीर्ण किंवा अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेकडील लोकल फायनान्स मॅनेजमेंट (डी.एफ.एम.) पदविका<br>क) शासनाकडील सहा. लेखा अधिकारी या पदावरील किमान ०५ वर्षाचा अनुभव. |
| | | | पदोन्नती | ——— | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची वाणिज्य शाखेची पदवी किंवा समकक्ष अर्हता.<br>ब) अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेकडील लोकल फायनान्स मॅनेजमेंट (डी.एफ.एम.) पदविका अथवा L.S.G.D. किंवा G.D.C & A. परीक्षा उत्तीर्ण असल्यास प्राधान्य.<br>क) महापालिका कनिष्ठस्तर विभागीय परीक्षा (लेखा) उत्तीर्ण असलेल्या उप लेखापाल या पदावरील किमान ०५ वर्षाचा अनुभव. |

--24--

| | | | | |
|---|---|---|---|---|
| श्रेणी—१ लेखा सेवा | मुख्य लेखा परिक्षक | नामनिर्देशन | ४० वर्षे | १) वित्तीय व्यवस्थापनातील पदव्युत्तर पदवी किंवा जी.सी.ए.(चार्टर्ड अकाऊंटंट) परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>ब)राज्य शासनाकडील एम.ए.एफ.एस. (महाराष्ट्र अकाऊंट ॲन्ड फायनान्स सव्हिसेस, वर्ग—१) परिक्षा उत्तीर्ण असलेल्या उमेदवारास प्राधान्य.<br>क) शासकीय/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थामधील लेखा संवर्गातील वर्ग—२ च्या पदावरील ७ वर्षाचा अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारांमधून सरळ सेवेने नेमणूक करता येईल. |
| | | पदोन्नती | ——— | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची वाणिज्य शाखेची पदवी किंवा समकक्ष अर्हता.<br>ब) वित्तीय व्यवस्थापनातील पदव्युत्तर पदवी किंवा अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेकडील लोकल फायनान्स मॅनेजमेंट (डी.एफ.एम.) पदविका अथवा G.D.C & A किंवा L. G. S. उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>क) महापालिका वरिष्ठस्तर विभागीय परीक्षा (लेखा) उत्तीर्ण असलेल्या उप मुख्य लेखा परीक्षक (वर्ग—१) पदावरील किमान ७ वर्षाचा अनुभव आवश्यक. |
| | | प्रतिनियुक्ती | ——— | शासनाकडील महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील वर्ग—१ च्या अधिकाऱ्यांमधून प्रतिनियुक्तीने. |
| श्रेणी—२ लेखा सेवा | अंतर्गत लेखा परिक्षक | नामनिर्देशन | ४० वर्षे | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी किंवा समकक्ष अर्हता.<br>ब) वित्तीय व्यवस्थापनातील पदव्युत्तर पदवी/पदवीका किंवा वाणिज्य शााखेची पदव्युत्तर पदवी किंवा अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेकडील फायनान्स मॅनेजमेंटमधील पदविका (डी.एफ.एम.) असणे आवश्यक.<br>क) शासनाकडील सहाय्यक लेखा अधिकारी या पदावरील ०५ वर्षाचा अनुभव असल्यास प्राधान्य. |
| | | पदोन्नती | ——— | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची वाणिज्य शाखेची पदवी किंवा समकक्ष अर्हता.<br>ब) अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेकडील लोकल फायनान्स मॅनेजमेंट (डी.एफ.एम.) पदविका अथवा G.D.C & A. किंवा L.G.S. पदवीका उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>क) महापालिका वरिष्ठस्तर विभागीय परीक्षा (लेखा) उत्तीर्ण असलेल्या सहाय्यक लेखा अधिकारी या पदावरील ५ वर्षाचा अनुभव |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | प्रतिनियुक्ती | ——— | शासनाकडील महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील वर्ग—२ च्या अधिकाऱ्यांमधून प्रतिनियुक्तीने. |
| | श्रेणी — २ लेखा सेवा | लेखापाल | नामनिर्देशन | ३३ वर्षे | अ) मान्यता प्राप्त विद्यापीठातील कोणत्याही शाखेची पदवी वाणिज्य शाखेतील पदवीधारकास प्राधान्य<br>ब) शासकीय/निमशासकीय सेवेतील अशाप्रकारच्या कामाचा ०७ वर्षाचा अनुभव |
| | | | पदोन्नती | | अ) महापालिका सेवेतील उपलेखापाल किंवा तत्सम पदावरील ०७ वर्षाचा अनुभव |
| | श्रेणी — ३ लेखा सेवा | उप लेखापाल | नामनिर्देशन — २५% | ——— | अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेची पदवी किंवा समकक्ष अर्हता.<br>ब) अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेकडील लोकल फायनान्स मॅनेजमेंट (डी.एफ.एम.) पदविका परीक्षा अथवा L. S. G. किंवा G.D.C. & A. परीक्षा उत्तीण्र<br>क) महापालिका कनिष्ठस्तर विभागीय परीक्षा (लेखा) उत्तीर्ण असलेल्या वरिष्ठ लिपीक (लेखा) या पदावरील किमान ३ वर्षाचा अनुभव. |
| | | | पदोन्नती — ७५% | ——— | वरिष्ठ लिपिक अथवा तत्सम श्रेणीवरील ०५ वर्षाचा अनुभव. |
| | श्रेणी — ३ लेखा सेवा | कनिष्ठ लेखा परिक्षक | नामनिर्देशन— २५% | ३३ वर्षे | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी (वाणिज्य शाखेच्या पदवीधरांना प्राधान्य)<br>ब) शासकीय/निम शासकीय मधिल सेवेतील लेखा विषयक बाबींचा ७ वर्षाचा अनुभव |
| | | | पदोन्नती — ७५% | ——— | अ) एस.एस.सी<br>ब) महानगरपालिकेतील लिपीक पदावरील ०५ वर्षाचा अनुभव |
| | श्रेणी — ३ लेखा सेवा | वरिष्ठ लेखा परिक्षक | नामनिर्देशन | ३३ वर्षे | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठातील कोणत्याही शखेची पदवी वाणिज्य शाखेतील उमेदवारास प्राधान्य<br>ब) शासकीय निमशासकीय सेवेतील लेखा/परिक्षण या कामाचा ०३ वर्षाचा अनुभव |
| | | | पदोन्नती | ——— | नामनिर्देशनामध्ये विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या व महापालिका सेवेतील वरिष्ठ लिपिक या एकीकृत संवर्गातून ०३ वर्षाचा अनुभव |
| | | | प्रतिनियुक्ती | | शासनाकडील महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील वर्ग—३ च्या अधिकाऱ्यांमधून प्रतिनियुक्तीने. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | श्रेणी — ३ लेखा सेवा | सहा. मुख्य लेखा परिक्षक | नामनिर्देशन | ३३ वर्षे | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी किंवा समकक्ष अर्हता.<br>ब) वित्तीय व्यवसीापनातील पदव्युत्तर पदवी/पदवीका किंवा वाणिज्य शाखेची पदव्युत्तर पदवी किंवा अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संसीकडील फायनान्स मॅनेजमेंटमधील पदविका (डी.एफ.एम.) असणे आवश्यक.<br>क) शासनाकडील सहाय्यक लेखा अधिकारी या पदावरील ०५ वर्षाचा अनुभव असल्यास प्राधान्य. |
| | | | पदोन्नती | ——— | अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची वाणिज्य शाखेची पदवी किंवा समकक्ष अर्हता.<br>ब) अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेकडील लोकल फायनान्स मॅनेजमेंट (डी.एफ.एम.) पदविका उत्तीर्ण किंवा G.D.C. & A. किंवा L. G. S. पदविका उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>क) महापालिका विभागीय परीक्षा (लेखा) उत्तीर्ण असलेल्या सहाय्यक लेखा अधिकारी या पदावरील किमान ५ वर्षाचा अनुभव असल्यास प्राधान्य. |

| अभियांत्रिकी सेवा | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २८ | श्रेणी—१ अभियांत्रिकी सेवा | शहर अभियंता (विकास/सेवा) | नामनिर्देशन | ४० वर्षे | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी.<br>ब) एम.ई.(स्ट्रक्चर/रोड ॲन्ड ब्रिजेस/पर्यावरण अभियांत्रिकी/सिव्हील/वॉटर रिसोर्सेस/सिव्हील सॉईल/सिव्हील कन्स्ट्रक्शन/सिव्हील ट्रान्सपोर्टेशन व तत्सम विषयातील) पदव्युत्तर पदवी धारकास प्राधान्य.<br>क) राज्य शासनाकडील व महानगरपालिकेकडील कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदावरील किमान ७ वर्षाचा अनुभव. |
| | | | पदोन्नती | ——— | नामनिर्देशननामध्ये विहीत केलेली अर्हता धारण करणाऱ्या व महापालिका सेवेतील कार्यकारी अभियंता पदावरील किमान ७ वर्षाचा अनुभव. |
| | | | प्रतिनियुक्ती | ——— | राज्य शासनाच्या अधिक्षक अभियंता संवर्गातील अधिकाऱ्याच्या प्रतिनियुक्तीने. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | श्रेणी—१ अभियांत्रिकी सेवा | कार्यकारी अभियंता (स्थापत्य/ पाणीपुरवठा/ मालमत्ता/ मलनि:सारण/ घनकचरा) | नामनिर्देशन | ३३ वर्षे | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी.<br>ब) राज्य शासनाकडील व महानगरपालिकेतील उप अभियंता (स्थापत्य) या पदावरील किमान ७ वर्षाचा अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारांस प्राधान्य. |
| | | | पदोन्नती | ——— | नामनिर्देशनासाठी विहीत केलेली अर्हता धारण करणाऱ्या महानगरपालिकेकडील उप अभियंता पदावरील किमान ५ वर्षाचा अनुभव. |
| | श्रेणी—१ अभियांत्रिकी सेवा | कार्यकारी अभियंता (विद्युत) | नामनिर्देशन | ३३ वर्षे | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची विद्युत अभियांत्रिकी शाखेची पदवी.<br>ब) राज्य शासनाकडील व महानगरपालिकेतील उप अभियंता (विद्युत) या पदावरील किमान ७ वर्षाचा अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारांस प्राधान्य. |
| | | | पदोन्नती | ——— | नामनिर्देशननासाठी विहीत केलेली अर्हता धारण करणाऱ्या महानगरपालिकेकडील उप अभियंता पदावरील किमान ५ वर्षाचा अनुभव. |
| ३१ | श्रेणी—१ अभियांत्रिकी सेवा | सहाय्यक संचालक (नगररचना) | नामनिर्देशन | ३३ वर्षे | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची स्थापत्य अभियांत्रिकी पदवी (बी.ई.(सिव्हील) किंवा आर्किटक शाखेची (B.Arch) पदवी.<br>ब) शासन/केंद्र शासनाकडील नगररचना विषयाचा मान्यताप्राप्त अभ्यासक्रम पूर्ण.<br>क) उपरोक्त शाखेतील पदव्युत्तर पदवी आणि अथवा नगररचनाकार पदावर काम करण्याचा किमान ०५ वर्षाचा अनुभव धारकास प्राधान्य. |
| | | | पदोन्नती | ——— | नामनिर्देशननासाठी विहीत केलेली अर्हता धारण करणाऱ्या नगररचनाकार/उप अभियंता पदावरील किमान ५ वर्षाचा अनुभव. |
| | | | प्रतिनियुक्ती | ——— | प्रसंगानुरूप संचालक, नगररचना व मुल्य निर्धारण संचालनालय महाराष्ट्र राज्य यांच्या आस्थापनेवरील समकक्ष अधिकाऱ्याचे प्रतिनियुक्तीने नियुक्ती करता येईल. |
| | श्रेणी—१ अभियांत्रिकी सेवा | उप अभियंता/ (स्थापत्य/ पाणीपुरवठा) | नामनिर्देशन | ३३ वर्षे | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी.<br>ब) पदव्युत्तर पदवी आणि/अथवा समकक्ष पदावरील कामाचा अनुभव असल्यास प्राधान्य |
| | | | पदोन्नती | ——— | कनिष्ठ अभियंता वर्ग — ३ या पदावरील किमान ५ वर्षाचा अनुभव |

--28—

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | श्रेणी—१ अभियांत्रिकी सेवा | उप अभियंता (विद्युत) | नामनिर्देशन | ३३ वर्षे | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची विद्युत अभियांत्रिकी शाखेची पदवी अथवा तत्सम समकक्ष शाखेची पदवी.<br>ब) पदव्युत्तर पदवी आणि/अथवा समकक्ष पदावरील कामाच्या अनुभव असल्यास प्राधान्य. |
| | | | पदोन्नती | ——— | नामनिर्देशननासाठी विहीत केलेली अर्हता धारण करणाऱ्या कनिष्ठ अभियंता पदावरील किमान ५ वर्षाचा अनुभव. |
| | श्रेणी—३ अभियांत्रिकी सेवा | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य/ पाणीपुरवठा) | नामनिर्देशन — ७५% | ३३ वर्षे | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवीका व ३ वर्षाचा संबंधीत कामाचा अनुभव किंवा स्थापत्य अभियांत्रिकी शाखेतील पदवी परीक्षा उत्तीर्ण. |
| | | | पदोन्नती — २५% | ——— | नामनिर्देशनासाठी विहीत केलेली अर्हता प्राप्त असलेला अथवा अभियांत्रिकी महाविद्यालय, नाशिक येथील कनिष्ठ अभियंता व्यावसायीक परीक्षा उत्तीर्ण असलेला. ब)कनिष्ठ पदावरील ३ वर्षाचा अनुभव. |
| | श्रेणी—३ अभियांत्रिकी सेवा | कनिष्ठ अभियंता (विद्युत) | नामनिर्देशन — ७५% | ३३ वर्षे | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची विद्युत अभियांत्रिकी शाखेची अथवा समतुल्य शाखेची पदवीका व ३ वर्षाचा संबंधीत कामाचा अनुभव.<br>किंवा<br>विद्युत अभियांत्रिकी शाखेतील पदवी परीक्षा उत्तीर्ण. |
| | | | पदोन्नती — २५% | ——— | नामनिर्देशनासाठी विहीत केलेली अर्हता धारण केलेल्या अथवा अभियांत्रिकी महाविद्यालय, नाशीक येथील कनिष्ठ अभियंता व्यवसायीक परीक्षा उत्तीर्ण असलेल्या कनिष्ठ पद धारण करणारे व सदर पदावर ३ वर्षाचा अनुभव |
| | श्रेणी—३ अभियांत्रिकी सेवा | अनुरेखक | नामनिर्देशन — १००% | ३३ वर्षे | अ) राज्य माध्यमिक/उच्च माध्यमिक शालांत शिक्षण मंडळाची परीक्षा उत्तीर्ण.<br>ब) शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संथेचा अनुरेखक (यांत्रिकी) व तत्सम समतुल्य अभ्यासक्रम पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र. |
| | श्रेणी—१ अभियंत्रीकी सेवा | नगररचनाकार | नामनिर्देशन | ३३ वर्षे | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची आर्किटेक शाखेची (B.Arch) पदवी/पदविका आणि शासन/केंद्र शासनाकडील नगररचना विषयाचा मान्यताप्राप्त अभ्यासक्रम पूर्ण.<br>ब) सहाय्यक नगररचनाकार किंवा तत्सम पदाच्या किमान ०५ वर्ष्राची अनुभव धारकास प्राधान्य. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | पदोन्नती | ——— | नामनिर्देशनासाठी विहीत केलेली अर्हता धारण करणाऱ्या सहा. अभियंता वर्ग — १ पदावरील किमान ५ वर्षाचा अनुभव अथवा शाखा अभियंता/सहाय्यक अभियंता (वर्ग—२) संवर्गात ०७ वर्षाचा अनुभव आवश्यक. |
| | | | प्रतिनियुक्ती | ——— | राज्य शासनाच्या नगररचना विभागातून प्रतिनियुक्तीवर योग्य अधिका—याची नेमणूक करून |
| | श्रेणी — ३ अभियंत्रीकी सेवा | वाहन व्यवस्थापक | नामनिर्देशन | ३३ वर्षे | अ) शैक्षणिक अर्हता ऑटोमोबाईल अभियांत्रिकीमधील पदविका किंवा पदवी. |
| | | | पदोन्नती | ——— | अ) महापालिकेच्या लगतनंतरचा निम्न श्रेणीतील कनिष्ठ अभियंता (वाहन/यांत्रिकी) या श्रेणीतील ३ वर्षाचा अनुभव. |
| | श्रेणी — ३ अभियंत्रीकी सेवा | मालमत्ता व्यवस्थापक | नामनिर्देशन | ३३ वर्षे | अ) कोणत्याही मान्यता प्राप्त विद्यापीठातील स्थापत्य शाखेची पदवी किंवा तत्सम शैक्षणिक अर्हता<br>ब) ०३ वर्षाचा या क्षेत्रातील अनुभव |
| | | | पदोन्नती | ——— | अ) कनिष्ठ अभियंता या पदावरील ०७ वर्षाचा अनुभव |
| | श्रेणी — ३ अभियांत्रिकी सेवा | सुतार | नामनिर्देशन — १००% | ३३ वर्षे | संबंधित क्षेत्रातील आय.टी.आय. अभ्यासक्रम पूर्ण |
| | श्रेणी — ३ अभियांत्रिकी सेवा | गवंडी | नामनिर्देशन— ७५% | ——— | अ) शासकीय संस्थेतून संबंधित क्षेत्रातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा पाठयक्रम उत्तीर्ण. |
| | | | पदोन्नती — २५% | ——— | अ) महानगरपालिकेच्या वर्ग चार प्रवर्गातील संबंधितत क्षेत्रामधील ५ वर्षाचा अनुभव असेल. |
| | श्रेणी — ३ अभियांत्रिकी सेवा | रंगारी | नामनिर्देशन— १००% | ३३ वर्षे | अ) एस्. एस. सी. परिक्षा उत्तीर्ण<br>ब) संबंधीत क्षेत्रातील ०३ वर्षांचा अनुभव |
| | श्रेणी — ४ अभियंत्रीकी सेवा | मुकादम बांधकाम | पदोन्नती — १००% | ——— | मजुर किंवा तत्सम संवर्गातील १० वर्षाचा अनुभव |

| यांत्रिकी सेवा | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | श्रेणी — ३ यांत्रिकी सेवा | प्लान्ट ऑपरेटर | नामनिर्देशन | ३३ वर्षे | अ) यांत्रिकी किंवा विद्युत अभियांत्रिकीमधील पदविका |
| | | | पदोन्नती | ——— | अ) एस.एस.सी आणि शासनाच्या उद्योग, उर्जा व कामगार विभागाने दिलेले तारतंत्री लायसन्स<br>ब) तारतंत्री म्हणून महानगरपालिकेच्या तरण तलाव विभागातील १० वर्षाचा अनुभव असेल. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | श्रेणी — ३ यांत्रिकी सेवा | आरेखक/ड्राफट्समन | नामनिर्देशन — १००% | ३३ वर्षे | अ) राज्य माध्यमिक/उच्च माध्यमिक शालांत शिक्षण मंडळाची परीक्षा उत्तीर्ण<br>ब) शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा अनुरेखक व तत्सम समतुल्य अभ्यासक्रम पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र. |
| | श्रेणी — ३ यांत्रिकी सेवा | संगणक चालक | नामनिर्देशन — १००% | ३३ वर्षे | अ) एच. एस.सी. परिक्षा उत्तीर्ण आणि मान्यताप्राप्त संस्थेतून पूर्ण केलेला संगणक चालकाचा पाठयक्रम.<br>ब) संबंधित क्षेत्रातील १ वर्षाचा अनुभव. |
| | श्रेणी — ३ यांत्रिकी सेवा | मिटर चेकर/दुरूस्तीकार | नामनिर्देशन — १००% | ३३ वर्षे | अ) एच. एस. सी. परिक्षा उत्तीर्ण आणि शासकीय संस्थेतून पूर्ण केलेला संबंधित क्षेत्रातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा (आय.टी.आय.) पाठयक्रम ही अर्हता असेल. |
| | श्रेणी — ३ यांत्रिकी सेवा | मिस्त्री | नामनिर्देशन— ५०% | ३३ वर्षे | अ) एस.एस.सी परिक्षा उत्तीर्ण आणि संबंधित क्षेत्रातील आय.टी.आय. अभ्यासक्रम पूर्ण<br>ब) स्थापत्य बांधकाम क्षेत्रातील ३ वर्षे इतका इतका अनुभव. |
| | | | पदोन्नती — ५०% | ——— | अ) महानगरपालिकेच्या सेवेतील मुकादम म्हणून ५ वर्षाचा अनुभव. |
| | श्रेणी — ३ यांत्रिकी सेवा | यांत्रिकी मेकॅनिक | नामनिर्देशन— १००% | ३३ वर्षे | अ) एस्. एस. सी. परिक्षा उत्तीर्ण<br>ब) शासनाने मान्यता दिलेल्या संस्थेमधून संबंधीत क्षेत्रातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतेचा (आय. टी.आय.) पाठयक्रम उत्तीर्ण<br>क) पेट्रोल डिझल वाहन दुरूस्तीचा ०३ वर्षाचा अनुभव |

| सार्वजनिक आरोग्य सेवा | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | श्रेणी—३ सार्वजनिक आरोग्य सेवा | मुख्य आरोग्य निरीक्षक | नामनिर्देशन | ३३ वर्षे | अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी. आणि स्वच्छता निरिक्षक पदविका.<br>ब) कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थेमधील स्वच्छता निरिक्षक या संवर्गातील किमान ०५ वर्षाचा अनुभव.<br>क) शास्त्र शाखेची पदवी आणि अविा L. S. G. D. परीक्षा उत्तीर्ण असलेल्या उमेदवारांस प्राधान्य. |
| | | | पदोन्नती | ——— | महानगरपालिकेच्या स्वच्छता निरीक्षक वा तत्सम समतुल्य संवर्गात किमान ०५ वर्षाचा अनुभव आवश्यक. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | श्रेणी—३ सार्वजनिक आरोग्य सेवा | आरोग्य/ स्वच्छता निरिक्षक | नामनिर्देशन —५०% | ३३ वर्षे | अ) किमान उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण आणि अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेकडील स्वच्छता निरीक्षक अभ्यासक्रम उत्तर्ण असणे आवश्यक.<br>ब) शासन मान्य विद्यापिठाची पदवी विशेषत: शास्त्र शाखेची पदवी आणि एल.एस.जी.डी. परीक्षा उत्तीर्ण असणाऱ्यांस उमेदवारांस प्राधान्य.<br>क) स्वच्छता निरिक्षक म्हणून अनुभव असल्यास विशेष प्राधान्य. |
| | | | पदोन्नती — ५०% | ——— | महानगरपालिकेच्या सेवेतील अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेतील स्वच्छता निरिक्षक अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेले कनिष्ठ संवर्गातील कर्मचारी |
| | श्रेणी—४ सार्वजनिक आरोग्य सेवा | मुकादम(आरोग्य) | पदोन्नती — १००% | ——— | महापालिकेच्या आस्थापनेवरील सफाई कामगार पदाचा किमान ०७ वर्षाचा अनुभव आवश्यक आणि चौथी इयत्ता उत्तीर्ण |
| | श्रेणी—४ सार्वजनिक आरोग्य सेवा | सफाई कामगार | नामनिर्देशन — १००% | ३३ वर्षे | अ) ४ थी पास<br>ब) मराठी लिहीता, वाचता व बोलता येणे आवश्यक |
| | | | पदोन्नती | ——— | नामनिर्देशननासाठी विहित केलेली शैक्षणीक अर्हता धारण करणाऱ्या वैद्यकीय अधिकारी वा तत्सम या संवर्गातील किमान ०५ वर्षाचा अनुभव. |
| | श्रेणी — २ सार्वजनिक आरोग्य सेवा | सहाय्यक सार्वजनिक आरोग्य अधिकारी | नामनिर्देशन | ३३ वर्षे | अ) मान्यता प्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी तसेच सॅनिटेशन/सॅनिटरी सायन्स/किंवा सार्वजनिक आरोग्य किवा आरोग्य शास्त्र मधील पदवीका<br>ब) या क्षेत्रातील अनुभवी उमेदवारास प्राधान्य |
| | | | पदोन्नती | | अ) एस. एस. सी. परीक्षा उत्तीर्ण<br>ब) मुख्य स्वच्छता निरीक्षक या पदावरील ०७ वर्षाचा अनुभव<br>क) सॅनिटेशन/सॅनिटरी सायन्स/किंवा सार्वजनिक आरोग्य किवा आरोग्य शास्त्र मधील पदवीका |
| | श्रेणी — ३ सार्व. आरोग्य सेवा | मुख्य बाजार निरीक्षक | नामनिर्देशन | ३३ वर्षे | अ) मान्यता प्राप्त विद्यापीठातील कोणत्याही शाखेतील पदवी<br>ब) अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेतील स्वच्छता निरीक्षकचा अभ्यासक्रम<br>क) शासकीय/निमशासकीय सेवेतील स्वच्छता निरीक्षक या पदाचा ०७ वर्षाचा अनुभव |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | पदोन्नती | ——— | अ) उच्च माध्यमिक शालान्त परिक्षा उत्तीर्ण आणि अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेतील स्वच्छता निरीक्षक अभ्यासक्रम<br>ब) स्वच्छता निरीक्षक किंवा बाजार निरीक्षक या पदाचा ०७ वर्षाचा अनुभव |
| | श्रेणी — ३ सार्वजनिक आरोग्य सेवा | बाजार निरीक्षक | नमनिर्देशन | ३३ वर्षे | अ) किमान उच्च माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण आणि अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेकडील स्वच्छता निरीक्षक अभ्यासक्रम उत्तर्ण असणे आवश्यक.<br>ब) शासन मान्य विद्यापिठाची पदवी विशेषत: शास्त्र शाख्ेची पदवी आणि एल.एस.जी.डी. परीक्षा उत्तीर्ण असणाऱ्यांस उमेदवारांस प्राधान्य.<br>क) स्वच्छता निरिक्षक म्हणून अनुभव असल्यास विशेष प्राधान्य. |
| | | | पदोन्नती | ——— | महानगरपालिकेच्या सेवेतील अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेतील स्वच्छता निरिक्षक अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेले कनिष्ठ संवर्गातील कर्मचारी |

| **वैद्यकीय सेवा** | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | श्रेणी—१ वैद्यकीय सेवा | वैद्यकीय आरोग्य अधिकारी | नामनिर्देशन | ४० वर्षे | अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची वैद्यक शास्त्रीतील सार्वजनिक प्रतिबंधात्मक व सामाजिक आरोग्य शास्त्र शाखेची पदव्युत्तर पदवी (M.D.(PS.M.)) परिक्षा उत्तीर्ण.<br>ब) शासन/केंद्रशासन/निमशासकीय/स्थानिक स्वराज्य संस्था यांचेकडील सहा. आरोग्य अधिकारी वा तत्सम पदावरील किमान ७ वर्षाचा पर्यवेक्षीय व कार्यकारी पदाचा अनुभव आवश्यक.<br>क) रूग्णालयातील प्रशासन, सार्वजनिक आरोग्य व प्रतिबंधात्मक उपचारात्मक बाबी समर्थपणे हाताळण्याचा व विशेषत: स्व्च्छता पर्यवेक्षण, साथ आजार निर्मूलन कार्यक्रम, हिवताप नियंत्रण आदि बाबींच्या कार्याचा किमान ७ वर्षाचा प्रत्यक्ष अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारांस प्रधान्य. |
| | | | पदोन्नती | ——— | नामनिदेशनासाठी विहित केलेली शैक्षणीक अर्हता धारण करणाऱ्या आरोग्य अधिकारी रूग्णालय/आरोग्य अधिकारी प्रतिबंधात्मक उपाय या संवर्गातील किमान ७ वर्षाचा अनुभप आवश्यक. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | प्रतिनियुक्ती | ——— | (नामनिर्देशनन व पदोन्नतीसाठी योग्य अधिकारी उपलब्ध न झाल्यास) नामनिर्देशननासाठी विहीत केलेली शैक्षणीक अर्हता व अनुभव धारण करणाऱ्या शासनाकडील योग्य अधिकाऱ्याच्या प्रतिनियुक्तीने. |
| | श्रेणी—३ वैद्यकीय सेवा | मिश्रक | नामनिर्देशन — १००% | ३३ वर्षे | अ) उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (विज्ञान शाखा) उत्तीर्ण.<br>ब) औषध निर्माण शास्त्रातील पदविका (डी.फार्म.)<br>क) औषध निर्माण शास्त्रातील पदवीधर उमेदवारास प्राधान्य.<br>ड) संबंधीत कामाचा ३ वर्षाचा अनुभव आवश्यक. |
| | श्रेणी — २ वैद्यकीय सेवा | वैद्यकिय अधिकारी | नामनिर्देशन | ३९ वर्षे | अ) सांविधिक विद्यापीठाची एम.बी.बी.एस. पदवी किंवा भारतीय वैद्यकीय परिषद अधिनियम १९५६ अन्वये असलेली अन्य अर्हता असेल.<br>ब) महाराष्ट्र वैद्यकीय व्यावसायी अधिनियम १९६५ अन्वये नोंदणी झालेली असेल. |
| | | | प्रतिनियुक्ती | ——— | राज्य शासनामधून प्रतिनियुक्तीवर योग्य अधिका—यांची बदली करून |
| | श्रेणी — ३ वैद्यकीय सेवा | स्टाफ नर्स | नामनिर्देशन — १००% | ३३ वर्षे | अ) महाराष्ट्र परिचारीका परिषदेची मान्यता असलेल्या संस्थेतील जनरल परिचारीका या अभ्याक्रमाची पदवीका |
| | श्रेणी — ३ वैद्यकीय सेवा | लसटोचक | नामनिर्देशन — १००% | ३३ वर्षे | अ) एस. एस. सी आणि शासनमान्य लस टोचणी पाठयक्रम उत्तीर्ण |

---

महापालिका सचिव:— विषय क्र.......

सदस्य श्री. रविंद्र बागुल :—सचिव साहेब, आपण अर्धवट विषय पुकारला त्यापुढे आपण काही बोलला नाहीत.

महापालिका सचिव :—विषय क्र. ८.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—मा. महापौर महोदया, मा. आयुक्त साहेब, ८ पर्यंत विषय पारीत झाले आहेत. नवव्या क्रमांकाचा जो विषय आहे.....

महापालिका सचिव :—नववा विषय मी वाचुन दाखविलेला नाही.

सदस्य श्री. रविंद्र बागुल :—विषय क्र. ९ वा अदयाप वाचुन दाखविला नाही.

महापालिका सचिव :—८ वा विषय वाचला, ९ वा अजुन मी वाचला नाही. ९ व्या विषयाबाबत प्रस्तावक जे आहेत ते आधी बोलतील त्यानंतर अनुमोदक जो कोणी असेल तो बोलेल.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**नाही, नाही. आम्ही सभा स्थगित करु इच्छितो. भारतीय जनता पार्टी व शिवसेनेची एक विशेष बैठक ठाणे येथे ठेवली आहे. तेथे आम्ही सर्वजण जात आहोत. त्यासाठी आजची सभा तीन चार दिवसासाठी किंवा पुढील सूचना देईपर्यंत स्थगित केली जावी.

**सदस्य श्री. रविंद्र बागुल :—**आयुक्त साहेब, सभेचे कामकाज सलगपणे चालु राहु दया. सभा सूचनेवर फक्त १२ विषय आहेत.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**मा. महापौर महोदया, मी प्रस्ताव ठेवला आहे की, पुढील सूचना देईपर्यंत सभा स्थगित करण्यात यावी.

**महापालिका सचिव :—** महासभा स्थगित करण्यासाठी कुणाची काही हरकत? पुढील तारखेपर्यंत, कोणतीही तारीख निश्चित केलेली नाही.

---

**विषय :—** सभेचे कामकाज स्थगित करणे बाबत.

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी
अनुमोदकाचे नाव :—श्री. दिलीप गायकवाड

**स्थगन प्रस्ताव**

. भारतीय जनता पार्टी व शिवसेनेची एक विशेष बैठक ठाणे येथे ठेवली आहे व सर्व सदस्यांना तेथे जायचे असल्याने या सभेचे कामकाज पुढील सूचना देईपर्यंतच्या कालावधीसाठी स्थगित केले जावे.

**महासभा ठराव क्र. २२ अ** **दिनांक:—२०/७/२००८**

ही महासभा वरील प्रस्ताव विचारात घेता या सभेचे कामकाज पुढील तारीख व वेळेची सूचना देईपर्यंत स्थगित करण्यास मान्यता देत आहे.

**सर्वानुमते**

महापौर/पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दया.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सांयकाळी ६.०० वाजता महापौर श्रीमती निर्मले विद्या विजय यांनी सभा पुढील सूचना देईपर्यंत स्थगित केल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः— ४/८/२००९

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. ४/८/२००९ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

४अ

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा सोमवार दिनांक २०/७/२००९ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेचे कामकाज स्थगित करण्यात आल्याने सदरची सभा मंगळवार दिनांक ४/८/२००९ रोजी सांयकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली. सदर सभेत महापौर, श्रीमती निर्मले विद्या विजय हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१. महापौर—— श्रीमती निर्मले विद्या विजय

२. उप—महापौर —— श्री. ठाकुर विनोद लालसिंग

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | २९ | श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा |
| ४ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | ३० | श्री. लालबिहारी बुझारत यादव |
| ५ | श्री. गायकवाड दिलीप | ३१ | श्रीमती करोतीया मालती राधाचरण |
| ६ | श्री. रविंद्र दशरथ बागूल | ३२ | श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण |
| ७ | श्री. रामसागर जनार्दन यादव | ३३ | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| ८ | श्रीमती निलम प्रेमसिंग रावत | ३४ | श्रीमती बोडारे वसुधा धनंजय |
| ९ | श्री. मोरे भानजी भिकारी | ३५ | श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे |
| १० | श्री. दत्तात्रय नारायण पवार | ३६ | श्री. शेखर केशव यादव |
| ११ | श्रीमती चौधरी राजश्री राजेंद्र | ३७ | श्रीमती सुमन गजानन शेळके |
| १२ | श्री. विजय खंडु सुपाळे | ३८ | श्री. प्रशांत किसनराव धांडे |
| १३ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ३९ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १४ | श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान | ४० | श्री. किशोर जग्यासी |
| १५ | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी | ४१ | श्रीमती चेनानी ज्योती रमेश |
| १६ | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज) | ४२ | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड |
| १७ | श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी | ४३ | श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी |
| १८ | श्रीमती सुजाता रमेश रिझवानी | ४४ | श्रीमती ज्योती शाम माने |
| १९ | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद | ४५ | श्री. मोहन साधवाणी |
| २० | श्री. राजू जग्यासी | ४६ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| २१ | श्री. राम (चार्ली) पारवानी | ४७ | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| २२ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे | ४८ | श्री. मुकेश सोहन तेजी |
| २३ | श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा | ४९ | श्री. पाटील प्रधान धर्मा |
| २४ | श्री. लाल पंजाबी | ५० | श्री. सुनिल साहेबराव गंगवानी |
| २५ | श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास | ५१ | श्री. प्रकाश गणपत सावंत |
| २६ | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती | ५२ | श्री. गोदुमल नारायणदास क्रिष्णानी |
| २७ | श्रीमती शकुंतला पाटील | ५३ | श्री. राजेश नानीकराम वधारीया |
| २८ | ॲड. श्री. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी | ५४ | श्री. एडके गणपत गोविंद |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
१. श्रीमती संगीता राजेश कंडारे, २. श्री. हरेश परमानंद जग्यासी, ३. श्रीमती जया प्रकाश माखीजा, ४. श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी, ५. डॉ. (श्रीमती) निना प्रकाश नाथानी, ६. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार

(कुमारी)केवलराम, ७. श्री. भठीजा (बब्बु) संजय, ८. श्री. मोहन (गारो) रामरख्यानी, ९. श्री. सुखरामानी महेश पहलाजराय, १०. श्री. ढोके जनार्दन किसनराव, ११. श्रीमती वेलकर सुरेखा राजन, १२.श्रीमती महाडीक रजनी मोहन, १३. श्रीमती पंचशिला नाना पवार, १४. श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी, १५. श्री. मंगतानी सुंदर आसनदास, १६. कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल, १७. श्री. कुमार उत्तमचंद आयलानी, १८. श्री. सुरेश मधुकर जाधव, १९. श्रीमती मनसुलकर शिला सुभाष, २०. श्रीमती लता शांताराम निकम, २१. श्री. राजेश देवेंद्र वानखेडे, २२. श्रीमती मीना सोनेजी (सोंडे), २३. श्रीमती वनवारी मोना अशोक, २४. श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई), २५. श्री. बच्चाराम रूपचंदानी, २६. श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी, २७.श्री. नरेंद्र रामचंद्र राजानी,

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. अशोक बागेश्वर, आयुक्त
२. श्री. अशोक रणखांब, अतिरिक्त आयुक्त
३. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
४. श्री. जी.टी.जिंदे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी
५. श्री. हरेश इदनानी, प्र. उपआयुक्त शहर
६. श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विदयुत
७. श्री. एस.जी. खडताळे, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
८. श्री. आर.बी.शिर्के, कार्यकारी अभियंता
९. श्री. अनंत कांबळे, सहा. लेखापरिक्षक
१०.डॉ. राजा रिझवानी, वैद्यकीय अधिकारी
११.श्री. रमेश काजळे, प्र. प्रभाग अधिकारी
१२.श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
१३. श्री. रमेश काजळे, प्र. सहा. आयुक्त
१४. श्री. अश्विनी आहुजा, कनिष्ठ अभियंता, मालमत्ता वि.
१५. श्री. उदय लिमये, मुख्य लिपिक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.

१. श्री. गणेश शिंपी
२. श्री. श्याम शिवनानी
३. श्री. तानाजी पतंगराव
४. श्रीमती नर्गिस खान

सांयकाळी ४.२५ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :—</u>मा. महापौरजी, आमचे नगरसेवक श्री. नरेंद्रकुमार ठाकुर यांच्या भगिनी श्रीमती देवी लालचंद तेजवानी यांचे दि.२९/७/०९ रोजी निधन झाले आहे. त्याबद्दल मी सभागृहास अनुरोध करतो की त्यांना श्रध्दांजली दिली जावी.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u>परिवहन समितीचे माजी सदस्य श्री. राणा सगु यांचेही नुकतेच काही दिवसांपुर्वी निधन झाले आहे. त्यांच्या आत्म्यास शांती मिळावी म्हणुन दोन मिनिटे मौन धारण करुन श्रध्दांजली दिली जावी.

---

सुचकाचे नाव :— श्री. राजु जग्यासी

अनुमोदकाचे नाव :— श्री. रमेश चव्हाण

<u>शोक प्रस्ताव</u>

उल्हासनगर महानगरपालिकेतील नगरसेवक श्री. नरेंद्रकुमार ठाकुर यांच्या भगिनी श्रीमती देवी लालचंद तेजवानी यांचे दिनांक २९/७/२००९ रोजी निधन झाले आहे.

तसेच परिवहन समितीचे माजी सदस्य श्री. राणा सगु यांचेही नुकतेच काही दिवसांपुर्वी निधन झाले आहे.

श्रीमती देवी लालचंद तेजवानी व श्री. राणा सगु यांच्या कुटूंबियांचे दु:खात हे सभागृह सहभागी असुन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. तसेच मृतात्म्यास चिरशांती लाभावी अशी प्रार्थना करण्यासाठी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पित करण्यासाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र. २२ ब** **दिनांक:—४/८/२००९**

ही महासभा वरील प्रस्तावनेनुसार श्रीमती देवी लालचंद तेजवानी व श्री. राणा सगु यांच्या निधनामुळे दोन मिनिटे मौन पाळून श्रध्दांजली अर्पण करीत आहे. तसेच त्यांच्या कुटूंबियांच्या दु:खात सहभागी होऊन हे दु:ख सहन करण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो अशी प्रार्थना करीत आहे.

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—**मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, या सभेस सुरुवात करण्यापुर्वी मी काही बोलु इच्छितो. ही स्थगित झालेली सभा असल्यामुळे या सभेत काही ठराव आणता येत नाही, परंतु काही गोष्टींकडे बघता तातडीच्या काही गोष्टी आहेत त्याबाबत मी या सभागृहात बोलु इच्छितो. शुक्रवारी उल्हासनगर शहरातील इमारत गुडमॅन कॉटेज, जी बॅरेक क्र. ७१ वर बांधली होती ती इमारत पडली. सर्वात प्रथम मा. महापौर महोदया, आयुक्त साहेब व त्यांच्या संपुर्ण संघास मी धन्यवाद देवु इच्छितो. जशी या घटनेची माहिती मिळाली तसे तात्काळ आयुक्त साहेब आपल्या संपुर्ण टिमसह घटनास्थळी दाखल झाले. त्याचबरोबर मा. महापौर महोदया, उप—महापौर महोदय, व माझे सर्व सहकारी त्याठिकाणी आले. इमारत पडल्यानंतर निर्माण झालेली स्थिती हातळण्यासाठी आणि मलबा हटविण्यासाठी युध्दपातळीवर प्रयत्न केले आणि दोन दिवसातच मलबा हटविला. व परिसरातील जी विदयुत व्यवस्था बिघडली होती ती दुरुस्त करण्यात आली. त्यासाठी आयुक्त साहेबांना मी पुन्हा एकदा धन्यवाद देवु इच्छितो. दुसरे मी असे सांगु इच्छितो की, या शहरामध्ये अशा प्रकारच्या ज्या जवळ जवळ ७०, ७५ इमारती आहेत. ज्यांना उल्हासनगर महानगरपालिकेने धोकादायक घोषित केले आहे. त्याचबरोबर कमित कमी १०० अशा इमारती आहेत ज्या धोकादायक इमारतींच्या यादीमध्ये येवु शकतात. त्याबद्दल मी आयुक्त साहेबांना निवेदन करेन की, याबाबतचा ठराव पुढील महासभेत आणला जावा. आजच्या या महासभेत या विषयीचा ठराव आणला जावु शकत नाही. कारण की, आजची ही सभा स्थगित महासभा आहे. व इमारतीच्या स्थर्याची पाहणी करण्यासाठी एका अभियंत्याची नेमणुक केली जावी. जो इमारतींच्या मजबुतीबाबत माहिती गोळा करेल. बांधकाम नमुन्यांची प्रयोगशाळेतुन तपासणी करुन घेवू शकेल. त्यावरुन त्या इमारतीच्या स्थैर्याबाबतची नेमकी स्थिती काय आहे ते कळु शकेल. आणि या बाबतचे जे काही प्रमाणपत्र असेल ते व त्या इमारतीची दुरुस्तीबाबत जी काही परवानगी असेल ती देण्यासाठी या महापालिकेने प्रत्येक इमारतीधारकास, बिल्डरला प्रमाणपत्र दिले पाहिजे. कारण की, केवळ एक इमारत पडल्यामुळे आपली महापालिका दोन दिवस पुर्णपणे अस्त व्यस्त झाली होती. सर्व नगरसेवक, सर्व राजकिय पक्षांचे नेते तेथे होते. जे लोक बेघर झाले होते त्यांची व्यवस्था करायची होती. अशा प्रकारची दुर्घटना यापुढे जर झाली तर या शहरासाठी फार मोठी समस्या निर्माण होवु शकेल. यासाठी यापुढे अशा प्रकारची दुर्घटना होवु नये म्हणुन आपण त्वरीत अशा प्रकारांकडे लक्ष दिले पाहिजे. प्रत्येक कॅम्पात एक एक अभियंता याकामी नेमला पाहिजे. आणि त्याच्याकडुन त्या इमारतीच्या स्थैर्याबाबतचा सल्ला घेवुन इमारत दुरुस्तीची आवश्यकता आहे किंवा नाही याबाबतचा सल्ला घेवुन तसेच जर इमारत खाली करुन घेण्याची वेळ आली तर ती खाली करुन घेवुन, त्यासाठी रहिवाश्यांवर दबाव टाकुन इमारत खाली करुन घेण्याचे काम आपणांस करावे लागेल. नाहीतर या शहराची फार मोठी दुर्दशा होईल. विशेष करुन १९९३

पासुन १९९६ पर्यंत जेव्हा या शहरात बाहेरुन रेती येत नव्हती तेव्हा लोक उल्वाची रेती व दगडाचे ग्रिट वापरत होते. त्यावेळी ज्या इमारती बांधण्यात आल्या आहेत त्या विशेषकरुन जास्त धोकादायक आहेत. यासाठी मी आपणांस निवेदन करतो की या बाबींकडे लक्ष दयावे व दुसरी गोष्ट अशी की ज्या प्रकारे गुडमॅन कॉटेज ही इमारत पडली त्यावेळी सत्ताधारी पक्षातील सर्व सदस्य, विरोधी पक्षाचे सर्व सदस्य, सर्व राजकिय पक्षांची नेते मंडळी तेथे उपस्थित होती. व सर्वांचे एकमत होते की, या लोकांचे कुठल्या ना कुठल्या तरी प्रकारे पुनर्वसन केले जावे. तेथे काही गटनेत्यांनी घोषणा केल्या होत्या त्याची या महासभेत घोषणा केली जावी. उल्हासनगर महानगरपालिकेमध्ये जे ८१ नगरसेवक आहेत ते आपले चार,चार हजार रुपयाचे मानधन या इमारतीमधील लोकांच्या पुनर्वसनासाठी देवु इच्छितात त्याबाबतीत आपण सर्वसंमतीने घोषणा करु या. त्याचबरोबर त्या १४ कुटुबांना व बाजुच्या बॅरेकमधील जी ४ कुटुंबे आहेत ज्यांची पुर्ण घरे तुटली आहेत. त्यांच्या मदती विषयीची घोषणा आजच्या या महासभेत केली जावी. आमच्या भारतीय जनता पार्टीच्यावतीने अशी मागणी आहे की, त्या इमारतीमध्ये जी १४ कुटुंबे होती व बॅरेकमधील जी ४ कुटुंबे होती त्या १८ कुटुंबांना प्रत्येकी कमीत कमी २५,०००/– रुपये मदत म्हणुन दिले पाहिजेत. व आजच्या या महासभेमध्ये याबाबतची घोषणा केली जावी. भलेही दोन–तीन दिवसानंतर स्थायी समितीपुढे याबाबतचा प्रस्ताव पाठवा किंवा महासभेत प्रस्ताव पारीत करा. परंतु आजच्या या महासभेत याबाबतची घोषणा केली जावी. तेथिल लोकांच्या आपणाकडुन ब–याचशा अपेक्षा आहेत त्यासाठी आपण जास्तीत जास्त रक्कमेची घोषणा करावी. व आजुबाजुची जी चार घरे आहेत जी पुर्णपणे तुटली आहेत त्यांना सुध्दा काही ना काही मदत करावी. धन्यवाद।

<u>सदस्या श्रीमती सुजाता रिजवानी :–</u>श्री. जमनादास पुरस्वानी यांच्या मताशी मी सुध्दा सहमत आहे. त्यांनी जे काही म्हटले ते जरुर केले पाहिजे. प्रस्ताव पारीत केला पाहिजे. मी त्यांच्या मताशी सहमत आहे आणि स्वत:च्यावतीने मदत करण्यास मी सहमत आहे.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :–</u>सन्माननिय महापौरजी आणि आयुक्त साहेब, मागे स्थगित करुन आज पुन्हा आयोजित केलेली ही सभा आहे. या सभेत आमचे एक सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी यांनी सांगितले की, अशा प्रकारच्या ज्या काही इमारती आहेत त्यांच्याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. त्यांच्या स्थैर्याची माहिती घेण्यासाठी प्रत्येक कॅम्पामध्ये एक एक अभियंता नेमण्याची आवश्यकता आहे. त्याबाबतीत मला असे म्हणायचे आहे की, त्या इमारती ८५५ अनाधिकृत इमारतींमधील असतील तर महापालिका आयुक्तांनी तेथे उतरु नये. कारण की तेथे गेल्यामुळे ते तर अडचणीत येतीलच येतील पण सन्माननिय सदस्य देखील अडचणीत येतील. कारण मुंबई उच्च न्यायालयाने जाहिर केले आहे की, ज्या ८५५ अनाधिकृत इमारती आहेत त्या आज ना उदया तोडणारच. आणि ही कारवाई ब–याच वेळेस झालेली आहे आणि होत आहे. परंतु याबाबत महापालिकेच्यावतीने जर का काही घोषणा आपण केली त्यांना आपण मदत जाहिर केली तर आपण उच्च न्यायालयाच्या विरोधात काम करतोय असे जाहिर होईल. आणि उच्च न्यायालयाच्या रोषाला आपणांस तोंड दयावे लागेल. मला असे म्हणायचे आहे की, ज्या ज्या इमारती अशा धोकादायक झालेल्या आहेत त्यांना तुम्ही नोटिसा काढाव्यात. ८५५ इमारतीमधील ज्या अनाधिकृत इमारती असतील त्यांना तुम्ही मदत करु नये. असे माझे ठाम मत आहे. आमचा एक नगरसेवक जाहिरपणे येथे सांगतो आहे ठिक आहे, हा आपुलकीचा प्रश्न आहे. पण तो कायदेशीररित्या जर घेतला आज ती इमारत जर अनाधिकृत असेल तर तिच्याबाबतीत असे करणे बरोबर होणार नाही. आणि म्हणुन महानगरपालिकेने, महापौरांनी, आयुक्तांनी व्यवस्थितपणे सर्व कायदेशीर बाबींचा विचार करावा. एवढे लक्षात घ्यावे. कारण महापालिकेच्यावतीने जर काही गोष्टी केल्या तर उदया उच्च न्यायालय या महानगरपालिकेवर ताशोरे ओढेल. आणि उदया महापालिकेवर वेगळा प्रसंग येईल तो येवु नये तो टाळावा आणि म्हणुन मी ही एक सूचना करत आहे. अशा इमारतींना आपण मदत करु नये. तुम्ही तुमच्या इमारतींना सुधारावे किंवा काहीही करावे या पध्दतीने आपण कारवाई करावी. धन्यवाद।

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :–</u>मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, गुडमॅन कॉटेजची जी परिस्थिती झाली आहे तीच परिस्थिती ७० इमारतींची आहे. या अगोदर सुध्दा उल्हासनगर शहरातील राणी माँ ही इमारत पडली होती. त्या इमारतीचे अजुन काहीही झालेले नाही आणि आता ही जी इमारत आहे गुडमॅनं कॉटेज त्याबाबत जो प्रश्न उपस्थित झाला आहे, त्यास कारणीभुत कोण आहे? या परिस्थितीकडे मी सभागृहाचे लक्ष वेधु इच्छितो. ब–याचशा बिल्डर लोकांनी इमारती बांधल्या. त्याठिकाणी राहणारे लोक व्यवस्थीतपणे त्या इमारतीचा वापर करत नाहीत. त्याठिकाणी कचरा वगैरे टाकला जातो, अन्न टाकले जाते, त्यामुळे घुसी येतात आणि घुसी अशा आहेत की, किती ही मोठे कॉंक्रिटचे बांधकाम असले तरीही त्याला सुध्दा कोरुन होल पाडतात. आणि त्यामुळे इमारती खालुन पोकळ होवुन जातात. आणि अशा परिस्थितीमुळे हे झालेले आहे. आता गुडमॅन कॉटेज पडली तर तिच्याबाबत सहानुभुती आहे. यानंतर अशाच इमारती उल्हासनगर मध्ये पडत

राहतील त्यामध्ये महानगरपालिका किती सहानुभुती दाखवु शकते? माझे सांगण्याचा अर्थ असा आहे की, इमारतींवर महापालिकेने दंड आकारला पाहिजे. तेथे साफसफाई व्हायला पाहिजे. जर ती सोसायटी साफ सफाई ठेवु शकत नसेल तर अशा इमारतींवर दंडात्मक कारवाई होणे आवश्यक आहे. या शहरामध्ये पत्त्याच्या बंगल्यासारख्या ज्या इमारती पडतात त्या थांबतील व शहराला एक वेगळी दिशा मिळेल.

सदस्य श्री. मोहन साधवानी :—मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, गुडमॅन कॉटेज इमारत जी पडली त्यासंदर्भात दोन प्रश्न मी आपणांस विचारु इच्छितो. या इमारतीच्या पुर्नबांधणीसाठी जर कोणी नगरसेवक आपला नगरसेवक निधी देवु इच्छित असेल तर काय तो आपला नगरसेवक निधी देवु शकेल?

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—नाही.

सदस्य श्री. मोहन साधवानी :—नाही? समजा, या इमारतीतील लोक जर इमारत दुरुस्तीसाठी नकाशा सादर करत असतील तर काय आपण त्यास मंजुरी दयाल? समजा त्यांना इमारतीची पुर्नबांधणी करायची आहे तर त्यांचा बांधकाम नकाशा तर मंजुर होणे आवश्यक आहे.

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—मा. महापौर महोदया, आता सन्माननिय सदस्य श्री. मोहन साधवानी यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्याबाबत मी सांगतो की, नगरसेवक निधी फक्त विकासकामांसाठी दिला जातो. त्यासाठी याचे उत्तर नाही असे आहे. दुसरे जो मुद्दा आहे त्याबाबत मी असे सांगतो की, जर नियमाप्रमाणे आवश्यक ते कागदपत्र दिले तर मी दोन दिवसात बांधकाम नकाशा मंजुर करुन देतो.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—दोन दिवसामध्ये प्लॉन मंजुर करुन देईल असे आपण आश्वासन दिले ते ठिक आहे परंतु मी सभागृहास व आपणांस निवेदन करेन की, बांधकाम नकाशा मंजुर करतांना महापालिका जे विकास शुल्क घेते ते या प्रकरणात घेवु नये. कारण ही इमारत या अगोदर बांधण्यात आलेली आहे आणि ती पडलेली आहे. यासाठी माझे असे म्हणणे आहे की, त्यांच्याकडुन विकास शुल्क घेतले जावु नये.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—मा. आयुक्त साहेब, निवडणुका जवळ आल्या आहेत आम्ही हे समजतो. निवडणूका डोळयासमोर ठेवुन तुम्ही जर काम करत असाल तर ते चुकीचे आहे. कायदयानुसार जे होत असेल तेच तुम्ही केले पाहिजे. त्याच्यापलिकडे काहीच झाले नाही पाहिजे. जे कायदयात बसत असेल तेच करावे.

सदस्य श्री. बी.बी. मोरे :—२००५ मध्ये आलेल्या महापूरामध्ये शहरातील कितीतरी झोपडया वाहुन गेल्या. लोक वाहुन गेले. त्यांच्यासाठी महापालिकेने काही केले नाही. ५,—२५ हजार रुपयाचे घर बांधण्यासाठी कुणी मदत केली नाही. मात्र इमारतवाल्यांसाठी तुम्ही जर अशा प्रकारची मदत करत असाल तर आम्ही सुध्दा विचार करु की, आम्ही झोपडपट्टीमध्ये राहतो. म्हणजे आम्ही काही शेळया मेंढया नाहीत. आम्ही सुध्दा माणसेच आहोत. आमच्यासाठी महानगरपालिका अशा प्रकारची मदत का करत नाही? नगरसेवक का मदत करत नाहीत? आजपर्यंत काही लोक बेघर आहेत. आता निवडणुका जवळ आल्या आहेत. त्या नजरेसमोर ठेवुन प्रत्येक पक्षाचे लोक काम करत आहेत. आम्ही त्यास विरोध करु. नाहीतर या महापालिकेच्या समोर आम्ही आंदोलनास बसु. व हे होवू देणार नाही.

**यावेळी सदस्य श्री. नरेंद्र दवणे व श्री.भारत राजवानी, यांनी सभागृहात प्रवेश केला.**

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—मा. आयुक्त साहेब, आम्ही महानगरपालिकेकडुन कोणताही नगरसेवक निधी मागितलेला नाही. मी आता सुध्दा स्पष्ट करु इच्छितो की, नगरसेवक आपला मानधन भत्ता देवु इच्छित आहेत. भारतीय जनता पक्षाचे सर्व नगरसेवक आपला मानधन भत्ता देण्यास तयार आहेत. जो आपला मानधन भत्ता देवु इच्छित नसेल त्यांनी हात वर करावा. त्यांनी आपला मानधन भत्ता देवु नये.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :—हे येथे घोषित करण्याची आवश्यकता नाही.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—जरुरत आहे.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :–</u>आपण आपल्या पक्षाच्यावतीने मदत करत असाल तर ते येथे घोषित करण्याची काही आवश्यकता नाही.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>आपणाकडुन १०० वेळा असे प्रस्ताव येतात की अमुक एक व्यक्ती आजारी आहे त्याच्या औषधोपचारासाठी नगरसेवकांनी आपला मानधन भत्ता दयावा.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u> श्री. जमनुजी, मी आपणांस विचारु इच्छितो आजपर्यंत किती झोपडया पडल्या? त्यांच्यासाठी आपण किती नगरसेवक निधी दिलात? किती सदस्यांनी आपले मानधन दिले? त्याठिकाणी जर एखादी झोपडी पडली असती तर आपण आपले मानधन दिले असते काय? आपल्या प्रभागामध्ये दुर्घटना झालेली आहे. त्यास महापालिका जबाबदार आहे त्यामुळे. अधिका–यांवर कारवाई करा.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u> त्या इमारत धारकांना मदत करण्याविषयीचा आजच्या या सभेपुढे विषय नाही. असे असतांना या सभागृहात चर्चा करण्याची आवश्यकता काय?

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u> या इमारती मधील रहिवाश्याना मदत करण्यास आमचा विरोध नाही परंतु ८५५ अनाधिकृत इमारतीमधील ती एक अनाधिकृत इमारत आहे व तिच्यावर कायदयानुसार कारवाई झाली पाहिजे.

<u>उप–महापौर :–</u> श्री. धांडे, हा विषय विषयपटलावर नाही, त्यामुळे याबाबत कुणी बोलु नये.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u> धन्यवाद, धन्यवाद।

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u> धन्यवाद, धन्यवाद।

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u> मा. महापौरजी........

<u>उप–महापौर :–</u>ज्या कुणास आपले मानधन दयायचे असेल त्याने मा. महापौरांकडे याबाबतचे पत्र दयावे.

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. ९ :– <u>प्रस्तावावी सूचना</u>

उल्हासनगर शहरात महापालिका निहित मोकळया जमीनी व इमारतीवरील विकास योजनेची तजबिज करणे व विशिष्ट सल्लागार नेमणे बाबतचा श्री. धनंजय बोडारे व श्री लाल पजांबी या पालिका सदस्यांचा प्रस्ताव.

---

<u>महापालिका सचिव :–</u> सदस्य श्री.धनंजय बोडारे यांनी, कृपया आपला प्रस्ताव मांडावा.

यावेळी सदस्य श्री. जीवन इदनानी हे सभागृहातून बाहेर गेले. 

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>मा. महापौरजी, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, हा विषय आपल्यासमोर या प्रस्तावाद्वारे आणलेला आहे. उल्हासनगर शहरात महापालिका निहित मोकळया जमीनी व इमारतीवरील विकास योजनेची तजबिज करणे व विशिष्ट सल्लागार नेमणे, उल्हासनगर महापालिकेचा विकास आराखडा १९७४ साली झाला त्यावेळेस महापालिकेने भुखंड आपल्या ताब्यात घ्यावे याबाबत प्रांत अधिका–यांनी तगादा लावला होता. काही भुखंड महापालिकेने घेतले काही विकसित केले. काही मोकळे ठेवले. त्यानंतर १९९९ साली विकास आराखडा पुन्हा तयार करण्यात आला त्यामुळे ब–याचशा ठिकाणी मोकळया भुखंडावर, काही अतिक्रमण झाली. त्यामुळे आरक्षण टाकायचे कुठे हा प्रश्न पडला. त्यामुळे सर्व भुखंड संपले त्यामुळे आरक्षित भुखंड गिळंकृत करण्याची सुरुवात झाली, मग त्यावर सनदा काढल्या गेल्या. या काढलेल्या सनदेवर महापालिकेने परस्पर प्लॅान मंजुर केलेत. २५ टक्के विकसीत बांधकाम महापालिकेने घेतले व ७५ टक्के हे

बिल्डरला दयायचे.असे झाले. मागच्या तीन सभेमध्ये सतत मी तो विषय उचलला आहे की २५ टक्के मार्जिन देवुन आपणांस किती फायदा झाला? आणि विकासकाला किती फायदा झाला आणि महापालिकेला किती नुकसान झाले? १९९६ पासुन ते आजपर्यंत १२ वर्षामध्ये ते भुखंड आपण ताब्यात घेतलेले नाहीत? सतत तीन महिने महासभेत आवाज उठविल्यानंतर त्यातील आतापर्यंत ८ कि ९ भुखंड ताब्यात घेतले आहेत. व त्यातील काही ताब्यात घेणे बाकी आहेत. त्यामुळे भुखंड आरक्षित जरी असले तरी त्याचा फायदा महापालिकेला होत नाही. मग तो कुणातरी एका व्यक्तीला त्याचा फायदा होतो. महापालिकेचे जे रिकामे भुखंड आहेत, आरक्षित भुखंड आहेत ते किती आहेत? जवळपास १४२ भुंखडांचा सर्व्हे केला त्यापैकी काही भुखंड मंजुरीसाठी पाठविले आहेत ते पुढील महासभेत येतीलच. कारण मी सतत त्याच्याशी संपर्कात आहे. आणि वारंवार सांगुन सुध्दा या महानगरपालिकेच्या नगररचना विभागाने जे मोकळे भुखंड आहेत ते ताब्यात घेतले पाहिजेत. ताब्यात मिळाले नसतील तर त्यावरील बांधकाम परवानगीसाठी जर प्लॅन आला असेल तर तो मंजुर करु नये. त्यावेळेस जमिन संपादनाची जी कारवाई आहे ती करुन ती जागा ताब्यात घ्यावी. खाजगी मालमत्ता जरी असली तरी त्यावरील बांधकाम नकाशा आपण मंजुर केलाच पाहिजे असे काही नाही. तो प्लॉटसुध्दा आपण ताब्यात घेवु शकतो. तो मालक कुणीही असो त्याच्याकडुन ती जागा सार्वजनिक प्रयोजनासाठी ताब्यात घेवु शकतो. तसे न करता त्याठिकाणी एक शॉर्टकट मेथड अवलंबिली गेली. आणि २५ टक्के आपण घ्यायचे आणि ७५ टक्के त्यांनी घ्यायचे त्यांनी ७५ टक्क्यातुन १०१ टक्के काम केले हे कुणाला माहित? उल्हासनगर महानगरपालिकेतर्फे मागच्या दोन–तीन महासभेत प्रस्ताव आलेत. तो ७०५ चा प्लाट असेल किंवा प्लॉट नं. १०५ चा असेल ते बीओटी तत्वावर विकसीत करण्याचा प्रस्ताव आणला तर आजतागायत काम थांबले आहे त्याची कारणे काय ते अजुन आम्हांला कळलेली नाहीत. तांत्रिक अडचणी आल्यात, तांत्रिक अडचणी सोडविणे हे आमचे काम नाही ते प्रशासनाचे काम आहे. प्रशासनाला काय हवे ते आम्ही पुरवायला तयार आहोत. त्यासाठी उल्हासनगर महानगरपालिकेचे भुखंड, आता जे महापालिकेचे कर्मचारी आहेत त्यांनी त्याबाबत सर्व्हे केलेले आहेत, ते भुखंड ताब्यात घेवुन कोणते प्रयोजनासाठी आपणांस विकसित करता येतील, जेणेकरुन उल्हासनगर शहराला चांगला प्रकल्प मिळेल.यासाठी आम्ही एक यादी दिली त्यामध्ये व्हीटीसी ग्रउंड येथे एक इंनडोअर टुर्नामेंटसाठी व एक आउटडोअर टुर्नामेंटसाठी एक चांगले स्टेडीयम तयार करण्यात यावे, असा प्रस्ताव १९८७ साली दिला. त्यासाठी एक सल्लागार नेमणे, त्यासाठी नक्की काय करता येईल, आपण विचार करतो एक परंतु वास्तविक ते होवु शकत नाही. पण जर तज्ञांकडुन माहिती घेतली तर ते साकार होते. व्हीटीसी ग्रउंड, दशहरा मैदान, उल्हासनगर–५, गोल मैदान, उल्हासनगर–१, महापालिका शाळा, अशा काही जागा आहेत. आम्ही सर्व नगरसेवक प्रशिक्षणासाठी चंदीगडला गेलो होतो. तिथल्या नागरीकांना वेगळया सुविधा दिल्या जातात. दिल्लीला जसे पालिका बाजार आहे. वर गार्डन आहे आणि खाली दुमजली बाजार आहे. हे फक्त दिल्लीलाच का? येथे उल्हासनगरला का नाही? आमच्या उल्हासनगरला जागा आहेत. गोल मैदानसारखा विभाग आहे. आम्ही म्हणतो की, आमची १३ चौरस किलोमिटरची जागा त्यामध्ये जवळपास ९ लाखाची लोकसंख्या म्हणजे अगदी सर्वात जास्त दाट लोकसंख्या असलेले, जास्त घनता असलेले हे शहर दाट लोकसंख्या असलेल्या वस्तीच्या शहरामध्ये सुविधा देण्यासाठी अशा प्रकारच्या मार्गांचा आपणाांस अवलंब करावाच लागेल. त्याच्यामध्ये भुयारे असतील अंडरग्रांउड पार्किंग असेल, आमच्याकडे पार्किंगची सुविधा नाही. ठिक आहे, वर गार्डन असेल परंतु खाली गाडया असतील, अशा प्रकारच्या सुविधा आपण दिल्या तर येथे पार्किंगची समस्या सुटेल, आमच्याकडे उदयाने नाहीत उदयानांची सुविधा आम्ही देवु शकतो. अशा प्रकारचे प्रकल्प राबवायचे असतील तर त्यासाठी एक तज्ञ नेमणे आवश्यक आहे. जेणेकरुन संपुर्ण उल्हासनगरची जी १३ चौरस किलोमिटरची जागा आहे त्या जागेत परिवहन सेवा कशी चालु करता येईल हे देखिल तो तज्ञ सांगु शकेल. पार्किंग कोठे घेता येईल हे ही तो सांगु शकेल. पालिका बाजार कोठे घेता येईल हे ही तो सांगु शकेल. शाळा चालु करत असतांना महापालिकेला उत्पन्न कसे मिळू शकेल हेही तो सांगु शकेल अशा प्रकारचा तज्ञ, एक सल्लागार या महापालिकेने नेमावा, जेणेकरुन उल्हासनगरचे चांगले भवितव्य घडेल आणि आम्ही पुढील पिढीला चांगले प्रकल्प देवु शकू त्यासाठी लवकरात लवकर असे प्रकल्प राबविले गेले पाहिजेत. आम्ही याकामी कमी पडतो. यासाठी कायदेशीर बाबींसाठी तज्ञ सल्लागार नेमावा. उल्हासनगरचा विकास करण्यासाठी लवकरात लवकर तज्ञ सल्लागार घ्या. आणि तो तज्ञ सल्लागार कोण आणता त्याचा प्रस्ताव लवकरात लवकर महासभेपुढे दया.

यावेळी सदस्य श्री. राजेश वधारिया, श्री अंकुश म्हसके यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे</u> :– सन्माननिय नगरसेवक श्री. धनंजय बोडारे यांनी अतिशय चांगला असा प्रस्ताव मांडलेला आहे. त्याबद्दल आयुक्त साहेबांना मी विचारतो की, यापुर्वी जेवढे प्लॉट नगरपालिकेच्या ताब्यात आहेत, त्यांवर आपण कितीवेळा कुंपन घातले आहे? उदाहरणादाखल गोल मैदानच्या बाजुला अमन टॉकीज

रस्त्यालगत असलेल्या प्लॉट नं. ७०५ ला आपल्या  महानगरपालिकेने फलक लावला होता तो फलक दुस—याच दिवशी फेकुन देण्यात आला होता.  उल्हासनगर मधील कुणी एक्सवायझेड व्यक्ती महापालिकेने लावलेला फलक फेकुन देते त्यावर महापालिका काय कारवाई करते ?  फलक फेकुन दिला जातो, कुंपन काढुन टाकले जाते, आणि माणसे तेथे नैसर्गीक विधिस जातात, ही दुदर्शा या महापालिकेची?  मुळीच नाही. आणि असे होता कामा नये.  म्हणुन ज्या अधिका—याने कामचुकारपणा केला असेल त्याला तुम्ही घरी पाठवा. त्याला ताकिद दया.  कारणे दाखवा नोटिसा बजवा.  परंतु असे काहीही होत नाही.  आणि म्हणुन या महापालिकेतर्फे आम्ही सन्माननिय सदस्यांनी कितीही बोंबा मारल्या आणि कितीही काही केले तरी महापालिका काहीही करत नाही असे माझे ठाम मत आहे.  आता नविन आयुक्त साहेब आलेले आहेत ते चांगले काम करणारे आहेत.  महापालिके अंतर्गत जे जे भुखंड असतील त्यांना कुंपन घालुन ते विकसीत करावेत.  ते विकसित करण्यासाठी जर काही गोष्टी कमी पडत असतील तर आम्ही मदत करु.  परंतु आयुक्तांनी याबाबत मनावर घ्यावे  आम्ही मदत करायला तयार आहोत.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :</u>—सन्माननिय महापौर महोदया, उप—महापौर, आयुक्त साहेब, सन्माननिय श्री. बोडारे साहेबांनी हा जो प्रश्न उपस्थित केला आहे, उल्हासनगरमधील आरक्षित भुखंडाबाबतीत किती लोकांवर आपण कारवाई केलेली आहे?  कोणत्या अधिका—यांनी काय काय केलेले आहे?  आज किती भुखंड असेच पडलेले आहेत, आणि कित्येक आरक्षीत भुखंडांवर बिल्डर लोकांनी इमारती उभ्या केल्या आहेत  काय त्यांच्यावर काही कारवाई झालेली आहे काय?  काही भुखंडावर अनाधिकृत बांधकामे उभे केली आहेत.  आज उल्हासनगर मध्ये कॅम्प नं. १,२,३ मध्ये काही आरक्षित भुखंड आहेत त्यात  ७०५ क्रमांकाचा भुखंड आहे.  उल्हासनगरमध्ये टाउन हॉल बांधण्यात आलेला आहे.  त्या टाउन हॉलला आपण नाव दिले आहे, जनरल अरुणकुमार वैदय यांचे त्यास नाव देण्यात आलेले आहे.  त्यावर तुम्ही कुमार रिसोर्टचे नाव दिले आहे.  आता ज्या मोकळया जागा आहेत त्या ताब्यात घेवुन त्या विकसित करुन यासारखेच प्रकार करणार आहात काय?  ठिक आहे, आज श्री. बोडारे साहेबांनी हा प्रस्ताव मांडला.  त्यांचे म्हणणे आहे की, एवढे जे भुखंड पडुन आहेत त्यामध्ये काहीतरी विकास कामे झाली पाहिजेत.  चंदीगडमध्ये आम्ही बघितले, आम्ही साहेबांबरोबर होतो. आम्ही चंदीगडमध्ये बरीचशी विकासकामे पाहिली.  तशी विकासकामे उल्हासनगरमध्ये होतील काय?  उल्हासनगरला चंदीगडची दिशा देणार काय?    दिली पाहिजे.  जर चांगले भुखंड असतील आणि ते महापालिकेचे असतील तर ते विकसीत केले पाहिजेत.  चंदीगड येथे प्रशिक्षणासाठी उप—महापौर सुध्दा आमच्याबरोबर होते. उप—महापौर साहेब आपण सुध्दा यावर स्पष्टीकरण दया.  धन्यवाद।

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :</u>—मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, हा जो प्रस्ताव देण्यात आलेला आहे तो असा आहे की, उल्हासनगर शहरात महापालिका निहित मोकळया जमीनी व इमारतीवरील विकासयोजनेची तजबिज करणे व विशिष्ट सल्लागार नेमणे, याबाबत आपणाकडुन मी जरा माहिती घेवु इच्छितो की, हा जो प्रस्ताव आहे तो आपल्या शहरासाठी कोणतीही एखादी योजना तयार करण्यासाठी आहे की शहरामध्ये जे भुखंड व मोकळया जागा पडल्या आहेत, त्या बांधा वापरा आणि हस्तांतरीत करा या तत्वानुसार देण्याबाबतीत आहे.  याबाबत जरा खुलासा करावा.  जर कुणी अधिकारी किंवा पदाधिकारी खुलासा करु इच्छित असेल तर त्याच्याकडुन मी माहिती जाणून घेवु इच्छितो.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :</u>—प्रस्ताव माझा आहे, मीच सांगतो.   हा प्रस्ताव यासाठी आहे, ज्या मोकळया जागा विकसित करण्यासाठी बिल्डरकडे जात आहेत, त्या थांबविण्यासाठी हा प्रस्ताव आहे.  त्या जागा शहरातील सर्वसामान्य लोकांच्या कामी याव्यात त्यासाठी हा प्रस्ताव आहे.  उल्हासनगरमध्ये चांगल्यात चांगले प्रकल्प आणले पाहिजेत.  चांगले म्हणजे फक्त नावापुरते चांगले नाहीत.  ते कामाने सुध्दा चांगले असले पाहिजेत.  त्यासाठी तज्ञ सल्लागार आवश्यक आहे.  हे जे भुखंड आहेत ते आम्ही कसे ताब्यात घ्यावेत आणि कसे विकसित करावे याबाबत त्यांनी सल्ला दयावा.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :</u>—अशा प्रकारचा जर प्रस्ताव असेल तर त्यास आमचे समर्थन राहिल.  परंतु तरीही मी ही गोष्ट स्पष्ट करु इच्छितो की, बांधा वापरा व हस्तांतरीत करा या तत्वानुसार जर काही प्रकल्प हाती घेत असाल की ज्याप्रमाणे आपण गोषवा—यामध्ये लिहिले आहे त्यास आमचा विरोध राहिल. आमच्या शहराचे जे काही भुखंड आहेत व मोकळया जागा आहेत त्या बांधा वापरा आणि हस्तांतरीत करा या तत्वानुसार विकसित करण्यात येणार असतील तर आम्ही त्या प्रस्तावाचे समर्थन करु शकणार नाही.  बाकी आपल्या शहरातील जे काही भुखंड किंवा मोकळया जागा पडुन आहेत ते विकसित करण्यासाठी जर काही आपण योजना आणत असाल त्यासाठी जर कुणी तज्ञ सल्लागार नेमु इच्छित असाल तर आम्ही त्या प्रस्तावाचे स्वागत करु.  व

आमचे त्या प्रस्तावास समर्थन राहिल. मा. महापौरजी, याचबरोबर माझे सहकारी श्री. भरत गंगोत्री यांनी अशी माहिती दिली आहे की, कॅम्प नं. ४ कि ५ मध्ये असा एक भुखंड आहे ज्यावर महापालिकेने आपला फलक लावला आहे. त्याबद्दल आम्हांला अशी माहिती मिळाली आहे की, त्या भुखंडाशी महापालिकेचा कोणताही संबंध नाही. तर अशा ज्या घटना घडतात त्यांवर आपण विचार केला पाहिजे. आपले जे भुखंड आहेत, ते भुमाफिया हडप करतात, त्या वेळेस महापालिका स्तब्ध असते.व जो भुखंड महापालिकेचा नाही त्या ठिकाणी महापालिका आपली मालकी असल्याचा फलक लावते. तर याबाबत विचार केला जावा. जर अशी काही घटना असेल तर त्वरीत तेथुन तो फलक हटविला जावा.

यावेळी सदस्य श्री.जीवन इंदनानी यांनी सभागृहात पुन्हा प्रवेश केला.

<u>सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u> सन्माननिय महापौर, उप–महापौर, आयुक्त साहेब, सभागृहातील सर्व नगरसेवक सहकारीहो, या प्रस्तावाचा मी अनुमोदक आहे. जोपर्यंत शहरातील मोकळे भुखंड आम्ही विकसित करत नाहीत. तोपर्यंत अतिक्रमण होत राहिल. इतकी वर्ष आम्ही भुखंडांचे संरक्षण केले नाही. त्याचे परिणाम आजपर्यंत आपण भोगत आहोत. आपले शहर अपेक्षेप्रमाणे विकसित होतांना दिसत नाही. आम्ही नगरसेवक प्रशिक्षणासाठी जातो, त्यावेळेस आमच्या मनात भावना निर्माण होते, त्या चंदीगडसारखे आपल्या येथे होवु शकते ? चंदीगड येथे आम्ही मोठ मोठे पुल पाहिले. पार्किंग खाली आहे व वर वाहन चालत आहे. त्यावेळेस आम्हां सर्व नगरसेवकांच्या मनात एकच भावना निर्माण होत होती की तेथे होवु शकते तर आपल्या शहरात का होवु शकत नाही? बेसमेंटमध्ये पार्किंग का होवु शकत नाही? मल्टीस्टोअर पार्किंग तेथे आहे तर मग आमच्या शहरात का होवु शकत नाही? एवढया वर्षापासुन येथिल भुखंड विकसित झालेले नाहीत त्यामुळे तेथे पहारेदारी करावी लागते. आमचे श्री.बी.बी. मोरे म्हणतात की तुम्ही भुखंडांना कुंपन घाला, जर हे आधी झाले असते तर आज एवढा त्रास झाला नसता. आता सुध्दा वेळ गेलेली नाही. आम्हां सर्वांना असे वाटते की, भुखंड ताब्यात घेवुन ते विकसित झाले पाहिजेत. ज्या ज्या प्लॉटवर आरक्षण ठेवले गेले आहे, होवु शकते की तो प्लॉट मोठा असेल किंवा त्यावर ५० टक्के अतिक्रमण झाले असेल. ५० टक्के राहिले असेल. जसे श्री. राजु जग्यासी यांनी सांगितले की, तज्ञ सल्लागार नेमला तर तो व्यवस्थित सांगेल की एक तृतियांश भुखंड शिल्लक आहे व दोन तृतियांश भुखंडावर अतिक्रमण झाले आहे किंवा ५० टक्के भुखंड वाचला आहे तर त्यास आपण कशाप्रकारे विकसति करु शकता. आम्ही जी यादी दिली. त्यामध्ये महापालिका भाजी मार्केट आहे व इतर काहीही असू शकते. येणा–या भविष्यात आपण आणखी काही करण्याचा विचार करु शकतो. आज मला एक आर्किटेक्ट भेटले ते म्हणाले की, उल्हासनदी जवळ किंवा विठ्ठलवाडी स्टेशन जवळ रस्ता तयार करु शकतो. आज आम्ही ही १० ची यादी दिली त्यात आणखी वाढ होवू शकते. आमची आयुक्तांकडुन अपेक्षा आहे की, चार पाच महिन्याच्या आत एक चांगला सल्लागार नेमुन अहवाल तयार करुन हे शहर कसे विकसित करता येईल ते पाहुन, हे शहर जर चांगले विकसित झाले तर आपल्या शहराचे नाव होईल. व जे भुखंड सार्वजनिक प्रयोजनासाठी आहेत ते लोकांच्या कामात येतील. तर आमची अपेक्षा आहे की, एक किंवा अनेक सल्लागार नेमुन या शहराचा विकास करावा. भुखंड विकसित झाला नाही पाहिजे. अशी कोणत्याही नगरसेवकाची भावना नाही की तर आमची हीच अपेक्षा आहे की, आपण लवकरात लवकर एक दोन किंवा तीन सल्लागार नेमुन शहराचा विकास करण्याचा प्रस्ताव दोन तीन महिन्यामध्ये महासभेपुढे आणावा जेणेकरुन शहराचे चांगले नाव निघेल, शहर विकसित होवु शकेल. धन्यवाद।

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :–</u>मा. महापौर, उप–महापौर, आयुक्त साहेब, आमचे सदस्य श्री. धनंजय बोडारे व श्री. लाल पंजाबी यांनी चांगला प्रस्ताव आणला आहे. शहर चांगले विकसीत झाले पाहिजे. बरेच भुखंड विकसित झाले आहेत काही मोकळे आहेत. शहर बनविण्याच्या हेतुने त्यांनी चांगला प्रस्ताव आणला आहे. जसे श्री. लाल पंजाबी यांनी म्हटले की, वेगवेगळे सल्लागार नेमण्यात यावेत व सहा महिन्याच्या आत या योजनेस रुपरेषा दिली जावी. त्यासाठी प्रकल्प तयार केला जावा व महानगरपालिका सक्षम असेल तर स्वत: खर्च करेल, सक्षम नसेल तर बांधा वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर करता येईल. आमच्या शहरात कोठे कोठे

काय काय आवश्यकता आहे याबाबत मी आपणांस एक सूचना देवु इच्छितो. जसे की कॅम्प नं. १ ते ५ मधील भाजी मार्केट आहेत, काही रिकामी आहेत तर काही अनाधिकृत आहेत. जी अनाधिकृत आहेत त्यांना अधिकृत केले पाहिजे. सपना गार्डन येथिल जी रिकामी जागा आहे तेथे पार्किंग बनविली पाहिजे. प्लॉट नं. ४४४ जे आहे तेथे हॉकर्स प्लाझा बनविला जावा. उल्हास विकास प्रेस समोर जो प्लॉट आहे तेथे हॉकर्स आणि पार्किंग प्लाझा बनविला जावा. उल्हासनगर १ येथिल जे भाजी मार्केट आहे ज्यास मच्छी मार्केट म्हणतात तेथे सुध्दा पार्किंग व हॉकर्स प्लाझा बनविले जावे. श्रीमती जया माखिजा यांचा जो प्रभाग आहे, भाजी मार्केट उल्हासनगर–२ येथे

सुध्दा हॉकिंग प्लाझा व पार्किग प्लाझा बनविला जावा. आमचे नगरसेवक श्री. अनिल विदयार्थी यांच्या प्रभागात सुध्दा एक गार्डन आहे, तेथे सुध्दा एक मार्केट, पार्किंग प्लाझा व एक गार्डन विकसित करु शकतो. उल्हासनगर ५ येथे सुध्दा हॉकिंग प्लाझा व मार्केटची आवश्यकता आहे. उल्हासनगर ५ येथे जे मच्छी मार्केट आहे तेथे सुध्दा पार्किंग व हॉकर्स प्लाझा बनविला जावा. तसेच आपल्या शहरात पार्किंग ची समस्या आहे, जेवढे काही आमचे मोठ मोठे मार्केट आहेत, जितके भुखंड पडुन आहेत, जे खाजगी नाहीत, महापालिकेचे आहेत, शासनाचे असतील ते त्यांच्याकडुन घेवुन, तसेच जी मॅरेज लॉन्स आहेत, तसेच हॉटेल एम्ब्रासिया येथे जो पार्किंगचा प्लॉट पडुन आहे तेथे लवकरात लवकर पार्किंग प्लाझा विकसित केला जावा. तसेच शांती नगर रस्त्यावर किंवा इतर कोणत्याही ठिकाणी जी गॅरेज आहेत, तेथे कोठे ट्रक, कोठे कार तर कोठे स्कुटर बनवितात, तर यासाठी कॅम्प नं. ५ येथिल जे क्रिमीशन ग्रउंड आहे त्याच्या मागे जी जागा आहे किंवा अन्य कोठे जागा असेल तेथे ट्रान्सपोर्ट नगर बनविले जावे, जेथे या ट्रान्सपोर्ट वाल्यांना हलविले जाईल. रिटेल आणि होलसेल साठी शॉपिंग मॉल बनविणे आवश्यक आहे की ज्यामुळे आपल्या व्यापा—याला उत्तेजन मिळेल. जसे गोल मैदान आहे, तेथे एक मार्केट विकसीत केले जावे. इंदिरा गांधी भाजी मार्केट व मटन मार्केट असेच पडुन आहे, फारच मोठी जागा आहे त्यास शॉपिंग मॉल मध्ये कन्व्हर्ट केले जावे. किंवा कमर्शियल कॉम्पलेक्स मध्ये कन्व्हर्ट केले जावे. अमन टॉकिज शेजारी जो ७०५ क्रमांकाचा प्लॉट आहे त्यामध्ये मल्टीयुटीलिटी रिजर्वेशन आहे, कमर्शियल, गार्डन व स्पोर्टस् सुध्दा आहे. त्याबाबत अनेकवेळा महासभेत चर्चा झाली आहे. नेताजी चौक येथिल जे फायर ब्रिगेड आहे त्याची स्थिती अतिशय खराब आहे. बरीच मोठी जागा आहे, त्यास कमर्शियल कॉम्पलेक्स मध्ये कन्व्हर्ट केले जावे. की जेणे करुन महापालिकेची आर्थिक स्थिती मजबुत होईल. तेथे महापालिकेची बरीच मोठी जागा आहे, तेथिल काही जागेत कमर्शियल कॉम्पलेक्स बनवुन काही जागेत एक सुंदर फायर ब्रिगेड बनविले जावे. तसेच गायकवाड पाडा येथे देखिल फार मोठी जमिन पडुन आहे, कॅम्प न. ५ येथे जिन्सचा धंदा फारच जोरात चालु आहे. तेथे जिन्सचे अनेक कारखाने आहेत. तेथे जिन्स धुण्याचे वगैरे काम केले जाते त्यामुळे प्रदुषण होते. ते कारखाने बंद केले जावेत म्हणून मागे ब—याच नेत्यांनी प्रयत्न केला प्रदुषण हटविले जावे परंतु काही झाले नाही. ते शक्य सूध्दा नाही कारण आजुबाजुला काही कारखाने नाहीत. त्यासाठी कॅम्प नं. ५ येथे जेथे गायकवाड पाडा आहे, तेथे उदयोग स्थापला जावा, किंवा जिन्सच्या कारखान्यास तेथे जागा दिली जावी. शहरात उदयानांची अतिशय आवश्यकता आहे. १७ सेक्शन मधील रोटरी गार्डन जे आहे त्यास चिल्ड्रन्स पार्क बनवुन, सुंदर बनविले जावे व जनतेस वापरण्यास दयावे. शांतीनगर मध्ये साईट नं. २९ ही उद्यांनासाठी आरक्षित आहे. तो खुपच चांगला प्लाट आहे. येणा—या जाणा—या व्यक्तीस ते फारच आवडेल. शहराचे सौंदर्य वाढेल. यासाठी साईट नं. २९ हे उदयानासाठी विकसित केले जावे. श्री. मोहन बेहरानी यांच्या नावाने इंदिरा गांधी भाजी मार्केट जवळ, दसेहरा मैदान, उल्हासनगर—३ येथे जे उदयान बनविले आहे त्यास सुध्दा विकसित केले जावे. मुलांसाठी खेळणी, विविध सुविधा त्या गार्डनमध्ये दिल्या जाव्यात. दशहरा मैदान, उल्हासनगर—५ जे श्री. धनंजय बोडारे यांनी सुचित केलेले आहे त्यास सुध्दा विकसित केले जावे व जनतेस उपलब्ध करुन दिले जावे. तसेच व्हीटीसी ग्राऊंड येथे स्पोर्ट कॉम्पलेक्स विकसित करण्याचे सुध्दा सूचित केले आहे ते सुध्दा जनतेस हस्तांतरीत केले जावे. तेथे प्राणीसंग्राहलय, जीम असले पाहिजे. ते लवकरात लवकर महापालिकेतर्फे किंवा महापालिकेस शक्य नसेल तर खाजगी संस्थेतर्फे चालविले जावे. परंतु जनतेस त्यात सहभागी करुन घेतले पाहिजे अशी आमची सूचना आहे. त्याशिवाय आपल्या शहरात सफाई कामगार इतक्या मेहनतीने कामे करतात परंतु त्यांची क्वार्टस दयनीय स्थितीत आहेत, त्यामुळे कुठेही दुर्घटना होवु शकते. ती तोडुन नविन बांधकाम केले जावे. त्यासाठी जे पैसे मिळतात ते हरीजन बंधुसाठी खर्च केले जावेत. त्यांच्यासाठी अन्य ठिकाणी सुध्दा निवासस्थाने बनविली जावीत. अशी आमची सूचना आहे. तशीच दुसरी सूचना म्हणजे आमच्या शहरातील आमचे जे बौध्द बंधु आहेत त्यांच्यासाठी कॅम्प नं. ५ मध्ये बुध्द विहार बनविले जावे. भरपुर भुखंड आहेत, तुम्हांला माहिती देण्याचे काम आमचे आहे, परंतु भुखंड भरपुर आहेत. बुध्द बंधुसाठी बुध्दविहार बनविणे आवश्यक आहे. तसेच आमचे उप—महापौर यांच्या प्रभागात तीन मोठ मोठे भुखंड आहेत तेथे महापौरांसाठी एक बंगला, दुस—या भुखंडात एक सुंदर गार्डन, तसेच आमच्या शहरात तर गेस्ट हाउस नाहीच आहे. गेल्या वेळेस काही आमदार उल्हासनगर शहरात आले होते त्यावेळेस मयुर हॉटेल बुक केले होते बारवी डॅम बुक केले होते. हेरीटेज हॉटेल बुक केले होते, तर यासाठी माझी सूचना आहे की, आमच्या उप—महापौर यांच्या प्रभागात भरपुर भुखंड आहेत तेथे गेस्ट हाउस बनविला जावा. त्यासाठी चांगले सल्लागार नेमले जावेत जेणेकरुन शहराचा चांगला विकास होईल व शहर सुंदर दिसेल.

यावेळी सदस्य श्री.धनंजय बोडारे, श्री.लाल पंजाबी, श्री.अंकुश म्हसके सभागृहातून बाहेर गेले.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :—आज याठिकाणी सन्माननिय सदस्य श्री. धनंजय बोडारे व श्री. लाल पंजाबी यांनी फारच चांगला प्रस्ताव आणला आहे. त्यांवर आमच्या काही सन्माननिय सदस्यांनी फारच चांगल्या प्रकारे सांगितले की, शहरात काय केले पाहिजे. काय झाले पाहिजे आणि काय नाही झाले पाहिजे. अडीच वर्षात प्रथमच हा चांगला प्रकल्प मांडला आहे त्यासाठी नगरसेवकांची एक समिती नेमली पाहिजे. शहरामध्ये काय केले पाहिजे आणि काय नाही केले पाहिजे याबबातचे अधिकार नगरसेवकास दिले पाहिजेत. फक्त कुणी एकटा श्री.बी.बी. मोरे ताबा घेवुन बसेल हे आम्ही सहन करणार नाहीत. कुणीही असू दया. समिती ही फक्त नगरसेवकांची नेमली जावी व शहराचा विकास केला जावा धन्यवाद।

सदस्य श्री. तुलसीदास वसिटा :—मा. महापौरजी, श्री. धनंजय बोडारे व श्री. लाल पंजाबी यांनी जो प्रस्ताव आणला आहे त्यास कॉंग्रेस पक्षाच्यावतीने आम्ही समर्थन देतो.

सदस्य श्री. राजु जग्यासी :—मा. महापौरजी, यापुर्वी सांगितल्याप्रमाणे शहराच्या विकासाचा जो प्रस्ताव आलेला आहे त्या प्रस्तावाचे आम्ही समर्थन करतो. आमचे बंधु श्री. जीवन इदनानी यांनी चांगल्या सूचना दिल्या. त्यात शहराचा विकास झाला पाहिजे, महापौरांचा बंगला झाला पाहिजे. उदयान बनविले पाहिजे इत्यादी. त्यावर श्री. बी.बी. मोरे यांनी टिका टिप्पणी केली की, पहिल्यांदा असा प्रस्ताव आला आहे. आम्ही या प्रस्तावाचे समर्थन करतो. परंतु आजच्या स्थितीत महत्वाचे म्हणजे या शहरातील रस्त्यांवरील खड्डे भरले जावेत. मा. महापौरजी, आज रस्त्यावरील खड्डयांची स्थिती काय आहे? आपण ज्या रस्त्यावरुन जाता, आपण महापौर आहात, गणपती उत्सव जवळ येत आहे व आज हे पहिल्यांदाच होत आहे की पावसाळयापुर्वी रस्त्यांवरील खड्डे भरले जात नाहीत? मी तर आपणांस सांगेन की आपण आयुक्त साहेबांना आजच आदेश दया की, उदयापासुन रस्त्यांवरील खड्डे भरण्याचे काम सुरु केले जावे. मोठ मोठे प्रस्ताव आणा, आम्ही त्याचे समर्थन करतो. परंतु आज सर्वसाधारण जनतेची आवश्यकता काय आहे? ज्या रस्त्यावरुन आपण, आम्ही व जनता जात असते, आज त्या रस्त्याची स्थिती काय आहे? कॅम्प नं. ४ येथिल पुलावरुन आपण जा, कॅम्प नं. १ मधील मच्छी मार्केटमध्ये जा, सर्व नगरसेवक आपआपल्या प्रभागात भेट देत असेल, मुख्य रस्त्यांची स्थिती काय आहे? याबाबत कुठलीच चर्चा नाही? तर मी आपणांस निवेदन करतो की, शहर विकासाचे मुद्दे आपण आणा आमचे त्यास समर्थन आहे. आपण आज आदेश दया की, उदयाच शहरातील खड्डे भरले जावेत, धन्यवाद।

सदस्य श्री.बी.बी. मोरे:—सन्माननिय महापौरजी, श्री. राजु जग्यासी यांनी सांगितले की या प्रस्तावास आमचे समर्थन आहे. त्यांनी शहरातील रस्त्यांवरील खड्डयांचा उल्लेख केला. त्याबद्दल मी असे सांगु इच्छितो की, शहरात राहत नाहीत. शहरातील रस्त्यांवरुन फिरत नाहीत. कारण की, जसा पावसाळा सुरु झाला तसे रस्त्यांवरील खड्डे भरण्याचे काम महापालिकेने चालु केल आहे. आपण प्रत्येक रस्त्यावर जावुन पहा खड्डे भरण्याचे काम चालु आहे की नाही?

सदस्य श्री. सतिश चहाळ :—रस्त्यावरील खड्डे पाण्याने भरले आहेत.

सदस्य श्री. राजु जग्यासी :—शहरातील जनतेला विचारा.

सदस्य श्री. बी.बी. मोरे :—आम्ही सुध्दा जनताच आहे ना? आपण जावुन पहा, चोपडा कोर्ट ते गोल मैदान पहा. या रस्त्यावरील खड्डे भरले आहेत. शहाड फाटक पासुन महापालिकेचा रस्ता पहा, त्यावरील देखील खड्डे भरले आहेत.

यावेळी सदस्या श्रीमती नीलू चांदवानी, श्रीमती मंजू पोपटानी, या सभागृहातून बाहेर गेल्या.

सदस्य श्री. रविंद्र बागुल :—शहाड फाटक रस्त्यावरील खड्डे भरलेले नाहीत साहेब. श्री. मोरे साहेब, दोन मिनिट, शहाड फाटकला माती टाकुन ठेवली आहे. परंतु अदयापपर्यंत खड्डे बुजविले नाहीत. त्याबाबत अधिका—यांना तीन तीन वेळा मी स्मरण करुन दिले आहे.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—मा. महापौरजी, सभा सूचनेवर हा विषय आहे का? या विषयावर सदस्य मध्येच कसे बोलत आहेत?

उप—महापौर :—मा. महापौरजी, सर्व सन्माननिय सदस्यांना विंनती आहे की, सभा सूचनेवर जो विषय असेल त्यावरच चर्चा करा. सभा सूचनेवरील विषय सोडुन कोणीही बोलु नये.

सदस्य श्री. रमेश चव्हाण :—मा. महापौर, उप—महापौर, सभा सूचनेवर विषय असो अगर नसो. रस्त्यावरील खड्डे भरणे हा शहराचा विषय आहे. शहराच्या विषयावर तुम्ही अवश्य बोला. तुम्हांला बोलायलाच पाहिजे. त्यासाठी तुम्ही तेथे बसला आहात. आयुक्त साहेब येथे बसलेले आहेत त्यांना मी सांगु इच्छितो की, प्रत्येक शहरात पावसाळया अगोदर रस्त्यासंदर्भातील बीएमएसीचे काम सुरु होते. मात्र आपले ठेकेदार, कर्मचारी आणि

आयुक्त कधी पाऊस सुरु होतो याची वाट बघतात. पावसास सुरुवात झाली की तुम्ही डांबरीकरणाच्या कामास सुरुवात करता अजुनही डांबरीकरणाचे काम झालेले नाही. काय करता? ठेकेदाराचे पोट भरण्यासाठी तुम्ही कामे करता? गणपतीचा सण २० दिवसावर आलेला आहे. तुम्ही जर खड्डे भरले नाहीत, खड्डे तर तुमचे भरुन होणारच नाहीत, गणपतीचा सण जवळ आलेला आहे. पुढची महासभा एक महिन्यानंतर लागणार आहे. त्याअगोदर गणपती बसणार आहेत. आणि त्यासाठी मी हे बोलत आहे. गणपतीचा सण आलेला आहे. तुम्ही जर रस्त्यांवरील खड्डे भरलेले नाहीत आणि जर गणपतीच्या मुर्तीची विटंबना झाली तर आम्ही तुम्हांला सोडणार नाहीत. हे तुम्ही लक्षात ठेवा. आम्ही तुम्हांला काळे फासु.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, श्री. रमेश चव्हाण यांच्या मताशी मी सहमत आहे. कारण ते बोलतात ते खरेच आहे. रस्त्यांमध्ये खड्डे आहेत की खड्डयांमध्ये रस्ते आहेत हेच समजुन येत नाही. उप—महापौर साहेब, आपण ज्या रस्त्याने येता, जाता त्या रस्त्याची स्थिती काय आहे ती आपण स्वत: पाहिली असेलच. त्याबाबत आपली चर्चाही झालेली आहे, त्या रस्त्यावरील खड्डे अदयापही भरलेले नाहीत. आणि श्री. रमेश चव्हाण साहेबांनी सांगितल्याप्रमाणे...........

सदस्य श्री. रविंद्र बागुल :—अतिरिक्त आयुक्त श्री. रणखांब साहेबांनी रस्त्यावरील खड्डे भरण्यासाठी आठ दिवसाची मुदत घेतली होती, कुठे गेले? तुम्ही शहाड स्टेशनमधुन बाहेर निघा, रस्त्याची काय हालत आहे ते बघा. गणपतीचा सण जवळ आलेला आहे. श्री. रमेश चव्हाण बोलले ते बरेबर आहे.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—श्री. बागुल साहेब, मी बोलत आहे. तुम्ही नंतर बोला. तुम्ही थांबा जरा. आमचे काही चुकले असेल तर महासभेत उठुन आम्ही सांगतो. तेवढी आमच्यात ताकद आहे. महानगरपालिकेने रस्त्यावरील खड्डे भरले नाहीत ही आम्ही शोकांतिका मानतो. यास अधिकारी जबाबदार आहेत. मला तर असे वाटते की, या कामाची निविदाही निघाली नसेल. मला याबाबतीत पुर्णपणे काही माहिती नाही. परंतु अजुनपर्यंत रस्त्यावरील खड्डे भरले नाहीत. आणि दुसरे म्हणजे आता श्री. जीवन इदनानी यांनी ज्याप्रमाणे सांगितले, या शहरामध्ये जी काही विकासकामे चालु आहेत, उल्हासनगर ते बदलापुरचा जो हायवे आहे त्याठिकाणी कारची रांगच रांग लागली आहे. सर्वजण व्यापार करत आहेत. त्यांच्या गाडया रस्त्यावर आहेत. चाळीस फुट, ६० फुट रुंदीचा रस्ता आहे. गाडयांच्या पार्किंगमुळे तो ४० फुट, ६० फुट रुंदीचा दिसत नाही तो २० फुटच दिसतो. त्याच्यासाठी तरी काहीतरी करा. ज्या ज्या प्रभाग अधिका—यांच्या प्रभागामध्ये हे येत असेल त्यांनी त्या गाडया उचलुन महानगरपालिकेच्या कुठल्यातरी जागेत पार्किंग कराव्यात.

सदस्य श्री. मोहन साधवानी :—आयुक्त साहेब, महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात तरतुद आहे. तरीसुध्दा आपण रस्त्यावरील खड्डे का भरत नाहीत? मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे प्रकरण ५ (२) (२) अन्वये हे काम देवुन टाका, निविदेची वाट का पाहता? प्रत्येक प्रभाग समितीसाठी किती रक्कमेचे काम येईल त्याप्रमाणे वाटप करुन ५ (२) (२) अंतर्गत करुन मोकळे व्हा. यामध्ये अडचण काय आहे? का नाही करत?

यावेळी सदस्य श्री. धनंजय बोडारे, श्री. लाल पंजाबी यांनी पुन्हा सभागृहात प्रवेश केला.

उप—महापौर :—गणपतीचा सण हा महाराष्ट्रातील सर्वात मोठा सण आहे. व गणपती सणा अगोदरच शहरातील रस्त्यांवरील खड्डे भरले जातील. या कामी कार्यवाही करण्यासाठ मा. महापौरांच्यावतीने मी आयुक्त साहेबांना आदेश देतो.

सदस्य श्री. रमेश चव्हाण :—मा. उप महापौरजी, हे तुम्ही सांगत आहात. मा. आयुक्त साहेबांनी, त्यांच्या टिमने हे सांगु दया ना? त्यांचे अधिकारी येथे बसले आहेत त्यांनी सांगावे, त्यांनी काम केले नाही तर उदया जबाबदार तुम्ही राहाल, आपण राजकिय पक्षांचे प्रतिनिधी आहात, तुम्ही आदेश देणार,पण त्या आदेशाचे पालन होईल काय?

उप—महापौर:—होणार, नाही झाले तर गणपती सणाच्यावेळी आम्ही मा. महापौरांसह व्यासपीठासमोरील मोकळया जागेत खाली जमिनिवर बसु.

महापालिका सचिव :—पास? सर्वसंमतीने? नवव्या क्रमांकाचा हा जो प्रस्ताव होता या प्रस्तावाचा एकच उद्देश होता की, आपण जो सल्लागार नेमणार आहात, तो केवळ योजना तयार करुन देईल. कोणती इमारत, कोणती जमिन कोणत्या वापरासाठी उपयोगात येवु शकते. त्यानंतर आपण ती जागा महापालिका निधीतून विकसित करा, किंवा बांधा वापरा व हस्तांतरीत करा या तत्वानुसार विकसित करण्यास दयाल हा नंतरचा विषय आहे. त्याबाबतचा निर्णय नंतर घेतला जाईल. ही यादी देण्यामध्ये काही फायदयाचे नाही. महापालिका जेवढया काही योजना तयार करु इच्छित असेल तेवढया तयार करु शकते. ठिक आहे? पास?

काही सदस्य :—पास—पास......

<u>महापौर :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

<u>प्रस्तावावी सूचना</u>

**विषय क्र. ९**:–उल्हासनगर शहरात महापालिका निहित मोकळया जमीनी व इमारतीवरील विकास योजनेची तजबिज करणे व विशिष्ट सल्लागार नेमणे बाबतचा श्री. धनंजय बोडारे व श्री लाल पजांबी या पालिका सदस्यांचा प्रस्ताव.

<u>प्रस्तावना</u>

उल्हानगर महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिकेच्या विकास योगने अंतर्गत ४२ आरक्षित भुखडांवरील रिकाम्या असलेल्या किंवा अगोदर बांधकाम झालेला जमीनीची फेर आखणी करुन विकास योजना तजविज करणे आवश्यक आहे. त्यामुळे महापालिका निहित असलेल्या खालील रिकाम्या असलेल्या जमिनीवर किंवा अगोदरच बांधकाम असलेल्या जमीनीवर विकास योजना तजविज करणे आवश्यक आहे.

१. व्ही.टी.सी. ग्राऊंड
२. दसहरा मैदान, उल्हासनगर–५.
३. गोल मैदान, उल्हासनगर–१.
४. सर्व महापालिका शिक्षण शाळा
५. महापालिका भाजी मार्केट
६. प्लॉट नं.७०५, उल्हासनगर–१.
७. रिकामे असलेले ४२ भुखंड
८. सपना गार्डन
९. जकात नाका क्र. ९ समोरील मोकळया जागा
१०. महापालिका विहित अगोदरच बांधकाम केलेल्या जागा किंवा जमीनीच्या विकास

उल्हासनगर शहरात विकास प्रयोजनार्थ उक्त योजना (बीओटी) बांधा वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर पार पाडण्यासाठी पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही बाबी करिता तरतुद केलेली असली पाहिजे.

अ) निवास, उदयोग, वाणीज्य, कृषी, मनोरंजन या प्रयोजनासाठी

ब) शाळा, महाविद्यालय, व इतर शैक्षणिक संस्था, वैद्यकिय आरोग्य संस्था, बाजार, समाजकल्याण व सांस्कृतिक संस्था किंवा, सार्वजनिक सभेच्या जागा, संग्रालय, कलाकक्ष, धार्मिक इमारती आणि शासकिय व इतर सार्वजनिक इमारती या सारख्या सार्वजनिक प्रयोजनासाठी

क) सामुहिक सोयी व सेवा यांसाठी

ड) सेवा औदयोगिम वसाहती यासाठी

वरील विकासाकामी प्रत्येक योजनेचा एकुणे खर्चाचा अंदाज काढणे आराखडा तयार करणे व योजनेची तजविज करणे, प्रकल्प अहवाल तयार करणेकामी स्थापत्य सल्लागार नेमणेस प्रशासनास निर्देशित करण्यास महासभेपुढे प्रस्तावित.

<u>महासभा ठराव क्र</u>: २३ <u>दिनांक:–</u>०४/०८/२००९

सुचकाचे नाव :– १) श्री. धनंजय बोडारे
२) श्री. लाल पंजाबी
अनुमोदकाचे नाव :– १) श्री. जीवन इदनानी
२) श्री. राजु जग्यासी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महापालिका निहित कोणत्याही मोकळया जमीनी व इमारतीच्या जमिनीविषयी विकास योजनेचा व रुपाविषयीचा नकाशा तयार करणे कामी सहा महिन्याच्या आत तजबिज करणे प्रयोजनार्थ सल्लागार नेमणेस व स्वारस्याची अभिव्यक्ती सूचना (एक्सप्रेशन ऑफ इन्टरेस्ट नोटिस) काढण्यास आयुक्तास प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची <u>सही/–</u>१)

२)

अनुमोदकाची सही/—१)

२)

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

यावेळी सदस्य श्री. अंकुश म्हसके, यांनी पुन्हा सभागृहात प्रवेश केला.

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १० वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. १० :— प्रस्तावावी सूचना**

उल्हासनगर महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा फक्त निवडणूक कामासाठी वर्ग करणे विषयी श्री. जीवन इदनानी या पालिका सदस्याचा प्रस्ताव.

---

सन्माननिय सदस्य श्री. जीवन इदनानी आपण आपला प्रस्ताव मांडा.

**सदस्य श्री. जीवन इदनानी :—**मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, हा जो प्रस्ताव मी मांडला आहे, तो अतिशय गंभीर प्रस्ताव आहे. विषय असा आहे की, प्रत्येक वेळेस तहसिलदार कार्यालयाकडुन आपल्या महापालिकेस विनंती पत्र पाठविले जाते की, अमुक २५ लोक, ५० लोक आम्हांस पाठवा त्यांच्या सेवांची आम्हांस जरुरत आहे. त्यामुळे आमच्या महानगरपालिकेचे २०० ते २५० कर्मचारी तहसिलदार कार्यालयात पाठविण्यात आले आहेत. मग ते उल्हासनगर तहसिलदार कार्यालय असो किंवा कल्याण तहसिलदार कार्यालय असो, किंवा कल्याण महानगरपालिकेचे प्रभाग क्षेत्र कार्यालय असो. किंवा अंबरनाथ तहसिलदार कार्यालय असो तेथे त्यांना पाठविले जाते. व ते केवळ एक दोन महिन्यासाठी किंवा पाच पंधरा दिवसासाठी नसुन वर्षानुवर्ष तेथे असतात. जर कुणी विचारणा केली की हा कर्मचारी कुठे आहते तर सांगितले जाते की, तहसिलदार कार्यालयात काम करत आहे, का? तर तहसिलदारांकडील मागणी आहे. कोणत्या कामासाठी? निवडणूकीच्या कामासाठी, मला नाही वाटत की, बाराही महिने निवडणूकीचे काम असते. विधानसभा असो की लोकसभा असो, बारा महिने तर या निवडणूका होत नाहीत. पाच वर्षातुन एकदा होतात. व कायदेकानुन नुसार जेव्हा निवडणूक आयुक्त जेव्हा निवडणूका घोषित करतात, जेव्हा कर्मचा—यांना पाठविणे भाग असते ती आमच्या देशाची सेवा आहे. परंतु येथे तर अशी पध्दत चालु आहे की, ज्यास उल्हासनसगर महानगरपालिकेस काम करायचे नाही तो तहसिलदार ऑफिसमध्ये जावून आपल्या बदलीचा आदेश काढुन घेतो. आणि त्याबाबत तेथे सांगितले जाते की, या आमच्याकडे, आमच्याकडे येवुन काम करा. ज्यामुळे आमच्या शहरास सुविधा मिळाल्या पाहिजे त्यांवर परिणाम होत आहे. आमच्या कर विभागातील कर्मचारी कर विभागात नसुन ते तहसिलदार कार्यालयात काम करतात. त्यामुळे घरपट्टी आणि अन्य जे कर आहेत ज्यांमध्ये शासनाचा सुध्दा हिस्सा आहे. त्या करांची सुध्दा वसुली होत नाही. त्याचा परिणाम आमच्या महानगरपालिकेच्या कोषागारावरावर पडतो. ज्यामुळे आमची कित्येक विकासकामे खोळंबुन पडतात. ज्या अन्य सुविधा आहेत ज्यांच्यासाठी त्यांना येथे नेमलेले आहे, त्या सुविधा सुध्दा जनतेला मिळत नाहीत. अन्य विभागातीलही आमचे काही कर्मचारी तहसिलदार कार्यालयात पाठविले जातात. सार्वजनिक बांधकाम विभागाकडे मी वळतो. आमच्या सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये एकही कनिष्ठ अभियंता नाही. दोन ते तीन कनिष्ठ अभियंता आहेत. ज्यांना दहा, दहा, पंधरा पंधरा प्रभागाचे काम देण्यात आले आहे. एका कर्मचा—याची क्षमता काय आहे? किती काम करेल? शेवटी ते काम करु शकत नाहीत. एकतर काम करु शकत नाहीत किंवा कामात चुका करतात. त्यामुळे नगरसेवकांना त्रास होतो. ते आपल्या काही सूचना देवु शकत नाहीत. काम सांगु शकत नाहीत. पर्यायाने जनतेला त्याचा त्रास सहन करावा लागतो. काही कनिष्ठ अभियंत्यांना तहसिलदार

कार्यालयामध्ये बोलावुन घेतले आहे. वर्षानुवर्षे ते तेथे काम करतात. तेथे कनिष्ठ अभियंत्यांची काय आवश्यकता आहे? तेथे ते लिपिक म्हणुन काम करतात. तर ही प्रथा बंद झाली पाहिजे. मी या प्रस्तावाद्वारे सुचीत करतो व सभागृहास विनंती करतो की, एक असा प्रस्ताव, जो मी दिला आहे तो पारीत केला जावा. व जेव्हा जेव्हा निवडणूका घोषित होतील, आचारसंहिता घोषित होईल, निवडणूकीचा कार्यक्रम घोषित होईल तेव्हा शासनास कर्मचा–यांची जी काही आवश्यकता असेल, तेव्हा सेवा वर्ग केली जावी. अन्यथा कुठल्याही कर्मचा–याची सेवा शासनास देवु नये असा माझा प्रस्ताव आहे.

यावेळी सदस्य श्री. अनिल विद्यार्थी, प्रधान पाटील हे सभागृहातून बाहेर गेले.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>मा. महापौर महोदया, सन्माननिय नगरसेवक श्री. जीवन इदनानी यांनी जो प्रस्ताव आणला त्याचे मी समर्थन करतो. त्याचबरोबर मी आयुक्त साहेबांना निवेदन करतो की, आमचे जेवढे कर्मचारी तहसिलदार कार्यालय, किंवा अन्यठिकाणी पाठविले जातात ते किती कालावधीसाठी तेथे असतील ते निश्चित असले पाहिजे. आचारसंहिता संपल्यानंतर ५, १० दिवस जास्तीत जास्त त्यांना थांबविले पाहिजे. त्यानंतर ते महापालिकेत पुन्हा आले पाहिजेत. परंतु येथे तर अशी परंपरा आहे जसे श्री. जीवन इदनानी यांनी सांगितले जे लिपिक येथुन तहसिलदार कार्यालयात जातात ते वर्षानुवर्ष तेथेच राहतात इकडे येण्याचे नावच काढत नाहीत. तर ही प्रथा बंद केली पाहिजे. आचारसंहिता संपताच कर्मचा–याने परत आले पाहिजे. सन्माननिय सदस्य श्री. जीवन इदनानी यांनी सांगितले की, सार्वजनिक बांधकाम विभागातील परिस्थिती खराब आहे. जसे या महानगरपालिकेत चार आयुक्त आहेत व उप–आयुक्त दोन आहेत. असे चालेल का? आयुक्त चार आहेत आणि उप–आयुक्त दोन आहेत. अशी स्थिती सार्वजनिक बांधकाम विभागात आहे. येथे कनिष्ठ अभियंता दोन आहेत, आणि उप–अभियंते चार आहेत. अशी स्थिती या महापालिकेत झालेली आहे. तिच्याकडे कुणाचे लक्ष नाही. यास्तव मी आपणांस निवेदन करतो की, जर सार्वजनिक बांधकाम विभागात कनिष्ठ अभियंत्यांची कमतरता असेल तर दुस–या विभागातुन बदली करावी. कारण जर चार उप अभियंता आहेत तर कमीत कमी चार कनिष्ठ अभियंते असले पाहिजे. किंवा जे कनिष्ठ अभियंते बाहेर गेले आहेत त्यांना परत बोलाविले जावे. १९९७ मध्ये जेव्हा आम्ही पहिल्यांदाच नगरसेवक म्हणुन निवडुन आलो होतो त्यावेळेस या शहरात सार्वजनिक बांधकाम विभागचे नाव चांगले होते. प्रत्येक झोनमध्ये एक एक कनिष्ठ अभियंता होता. याप्रमाणे एकुण आठ कनिष्ठ अभियंते होते. त्यामुळे योग्य प्रकारे प्राकलने तयार होत होती. व काम सुध्दा योग्य प्रकारे होत होते. यास्तव मी आपणांस निवेदन करेन की, हा प्रस्ताव तर पारित कराच. परंतु पारीत झाल्यानंतर त्यावर अंमलबजावणीसुध्दा त्वरीत केली जावी. धन्यवाद।

यावेळी सदस्य श्री. मुकेश तेजी, श्री. चंद्रशेखर यादव हे सभागृहातून बाहेर गेले.

<u>सदस्य श्री. दत्तात्रय पवार :–</u>मा. महापौरजी, उप–महापौरजी, व मा. आयुक्त साहेब, आताच श्री. जीवन इदनानी साहेबांनी जो प्रस्ताव मांडला तो अतिशय स्तृत्य आहे, चांगला आहे. कारण महापालिकेतील कर्मचा–यांना अडीच अडीच वर्ष तेथे निवडणूक कामासाठी राबविले जाते. प्रत्यक्षात मात्र तहसिलदार कार्यालयातील जे कर्मचारी आहेत ते त्यांची कामे सुध्दा आपल्या कर्मचा–यांवर सोपवतात. आणि स्वत: मात्र इतर कामात मग्न असतात. दुसरी गोष्ट महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाच्या शाळांमधील जे शिक्षक आहेत त्यांना सुध्दा अशाप्रकारचे काम दिले जाते. त्यांचा सुध्दा येथे विचार व्हावा. त्या शिक्षकांना सुध्दा दोन दोन, अडीच अडीच वर्ष अशा प्रकारच्या कामासाठी बीएलओ म्हणुन नेमणुका केलेल्या आहेत. त्यामुळे विदयार्थ्यांचे आतोनात नुकसान होते. वर्गावर शिक्षक नसतात. आणि कमी शिक्षकांना जास्त प्रमाणावर कामे करुन विदयार्थ्यांना शिकवावे लागते. त्यामुळे शिक्षणाचे काम देखिल व्यवस्थीत होत नाही. त्यामुळे ज्या काळामध्ये आचारसंहिता असेल , त्याच काळात आपण या कर्मचा–यांना निवडणुक कामासाठी नेमणुका दयाव्यात. आणि दुसरे आणखी सांगायचे म्हणजे या कर्मचा–यांना अतिशय क्रुरपणे वागणुक दिली जाते. त्याना सांगितले की, तुमची डयुटी अमुक आहे, तुम्हांला अमुक तारखेला कामावर आलेच पाहिजे नाहीतर तुमच्यावर कारवाई केली जाईल. त्यामुळे नाहक या कर्मचा–यांना त्रास होतो व त्याची दखल कुणीही घेत नाही. अधिकारी म्हणतात निवडणूक कामांसाठी त्यांना नियुक्त केलेले आहे परंतु तेथे गेल्यानंतर वेळेचे बंधन नसते सकाळी १० ते रात्री ७, ८ वाजेपर्यंत त्यांना राबविले जाते. त्यांना कुणाचाही आधार नाही, यासाठी गांभिर्याने विचार केला जावा. आणि कर्मचा–यांसाठी योग्य तो निर्णय घ्यावा धन्यवाद।

यावेळी सदस्या श्रीमती मालती करोतिया, या सभागृहातून बाहेर गेल्या.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :–</u>सन्माननिय महापौरजी, आयुक्त साहेब, आजचा हा जो विषय आहे, आमचे सन्माननिय सदस्य श्री. जीवन इदनानी यांनी जो प्रस्ताव आणला आहे तो पारीत करण्यासाठी माझा विरोध नाही मी त्यास समर्थन देतो परंतु तो पारीत करण्या अगोदर निवडणूक आयुक्तांना पत्र पाठवुन त्याबाबत सल्ला

घेतला पाहिजे. जर निवडणूक आयुक्तांना पत्र दिले नाही तर आयुक्तांवर, उप–आयुक्तांवर घरी जाण्याची वेळ येईल. त्यांना नोटिसा येतील. नुसताच हा विषय पारीत करायचा व कर्मचा–यांना पाठवायचे नाही. मुख्यमंत्री महोदयांच्या बाबतीत सुध्दा निवडणूक आयुक्त भांडत होते तर तुमची आणि माझी व सन्माननिय सदस्यांची निवडणूक आयुक्तांना काय काळजी वाटणार आहे? म्हणुनच सन्माननिय सदस्यांस माझी एक सूचना आहे, मी या प्रस्तावास विरोध करत नाही. परंतु हा विषय आणण्याआधी त्यांनी त्याची पडताळणी करावयास पाहिजे होती. त्याबाबत विचार केला पाहिजे होता. या प्रस्तावाचे जो समर्थन करतो, तो शिक्षक आहे तो शिक्षकांचे समर्थन करणारच शिक्षकांनाही थोडीशी कठिणाई होते. जर निवडणूक आयुक्तांनी आपणांस एक प्रश्न टाकला की, तुम्ही महापालिकेमार्फत शिक्षक का पाठविले नाहीत? किंवा कर्मचारी का नाही पाठविले? तर त्याला काय उत्तर देणार? म्हणुन हा विषय पारीत करण्याच्या अगोदर आपण निवडणूक आयुक्तांना एक पत्र पाठविले पाहिजे. किंवा महाराष्ट्र शासनाला पत्र पाठविले पाहिजे की, अशी अशी आमच्या महापालिकेत परिस्थिती आहे. कर्मचारी जास्त नाहीत आणि आहेत त्या कर्मचा–यांमधुन आम्ही निवडणूक कामांसाठी कर्मचारी पाठविले तर प्रशासकिय कामकाज थंडावते प्रशासकिय कामाला बाधा येते. ती बाधा येवु नये म्हणुन कृपया आमच्यातर्फे अशी एक विनंती आहे की यासाठी निवडणूक आयुक्तांना पत्र पाठविले पाहिजे. विनंती केली पहिजे तुम्ही जर अरेरावीची भाषा वापरुन असा प्रस्ताव आणून ठराव पारीत केला तर ते निवडणूक आयुक्त तो ठराव परत पाठविल्याशिवाय राहणार नाहीत. मी असे जाहिरपणे सांगतो आहे. आणि म्हणुन सन्माननिय सदस्यांनी जो ठराव आणलेला आहे तो पारीत करण्या अगोदर अशी माझी सूचना आहे. धन्यवाद।

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे</u> :—सचिव साहेब, मा. सदस्य श्री. जीवन इदनानी यांनी ठराव आणलेला आहे. आणि त्यांची मागणी रास्त आहे महापालिकेच्या कर्मचा–यांनी महापालिकेचे कामकाज सांभाळले पाहिजे परंतु विरोधी पक्ष नेता, सभागृह नेता, गटनेता कार्यालयात लिपिक नाहीत. निवडणूक आयुक्तांचे मत काय आहे ते माहित नाही. परंतु कायदा काय म्हणतो त्याचे जरा स्पष्टीकरण झाले पाहिजे. केंद्र शासन, राज्य शासन व स्थानिक स्वराज्य संस्था हे शासनाचे तीन अंग असून स्थानिक स्वराज्य संस्था ही स्वायत्त संस्था आहे. त्यांचे दैनंदिन कामकाज चालविण्यासाठी महापालिकेचे कर्मचारी घेवु शकतात काय? ठिक आहे निवडणूक कामासाठी महापालिकेचे कर्मचारी घेतले परंतु कायदा असा आहे का की हेच कर्मचारी घ्यायचे? तहसिलदार कार्यालय कर्मचा–यांची यादी देते, आपण त्यांस नाही सोडले तर त्यांच्यावर पोलिस कारवाई वगैरे होते. हे कायदेशीर आहे काय? कारण यावर आतापर्यंत कधी चर्चाच झाली नव्हती. आज महासभेसमोर आलेले आहे. एकदा काय तो निर्णय होवू दया. आपण देवु शकतो की देवु शकत नाही? म्हणजे त्यांनी मागीतलेल्या कर्मचाऱ्याला आपण आपल्या अधिकारामध्ये सांगु शकतो काय की आम्हांला या कर्मचा–यांची आवश्यकता आहे. जसे आमच्याकडचे कनिष्ठ अभियंता आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाची आवश्यकता अशी आहे की ४ उप–अभियंते व २ कनिष्ठ अभियंते. असे असल्यामुळे आम्ही तुम्हांला कनिष्ठ अभियंते देवु शकत नाहीत. त्याऐवजी दुसरे कर्मचारी देवु. त्यांना तेथे कनिष्ठ अभियंते कशासाठी पाहिजेत ? एवढे तरी आपण सांगु शकतो की नाही? तहसिलदारांचा आदेश आला म्हणजे निवडणूक आयोगांचा आदेश आलेला आहे. असे समजुन गडबडुन जावुन आपण कर्मचा–यांना त्यांच्याकडे पाठवुन देतो. आणि तसे केले नाही तर ते पोलिसांची ढाल दाखवितात. हे कायदेशीर आहे का? हे तपासलेले आहे का? की ते बंधनकारकच आहे? म्हणजे आपली कामे सोडायची, महापालिकेच्या ६ लाख नागरीकांना ज्या सुविधा दयायच्या त्यामध्ये बाधा आणुन मग ते पाणी पुरवठा, सार्वजनिक बांधकाम, आरोग्य, जकात, कर यामधील कर्मचारी सोडायचे. म्हणजे त्यांना पाहिजे म्हणुन आपण त्यांना दयायचे हे बंधनकारक आहे का? याचे जरा स्पष्टीकरण करा. तरच या ठरावाचा उपयोग. नाहीतर ठराव करुन उपयोग नाही. केंद्र शासन, राज्य शासन आणि आमची स्थानिक स्वराज्य संस्था ही स्वायत्त आहे किंवा नाही? आम्हांला आमचे निर्णय घ्यायचे अधिकार आहेत किंवा नाही? किंवा तहसिलदारांसारखा एखादा कुठला अधिकारी आयुक्तांना आदेश देणार? आणि नाही सोडले तर आम्ही कर्मचा–यांवर अमुक अमुक कलमान्वये केस करु असे सांगणार–असे काही आहे का? सचिव साहेब, ……… ……

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी</u> :—मा. महापौर महोदया, आताच श्री. बोडारे साहेबांनी जी विचारणा केली त्याबाबत सांगु इच्छितो की, तहसिलदारांकडुन किंवा कुण्या अन्य अधिका–यांकडुन आपल्या कर्मचा–यांची मागणी करण्यासाठी जेव्हा पत्र येते तेव्हा त्याबाबतची माहिती महासभेस दयायची आहे किंवा नाही? किंवा किती कर्मचारी निवडणूक कामासाठी कधी पाठविले, किती कर्मचारी परत कधी आले याची माहिती महासभेला दयायची आहे किंवा नाही? याचीही माहिती महासभेला दयावी. किंवा कर्मचा–यांना निवडणूक कामासाठी पाठविण्यासंदर्भात महासभेकडुन ठराव पारीत करुन घ्यायचा आहे किंवा नाही? किंवा माहितीसाठी ते पत्र

सभागृहापुढे ठेवायचे आहे किंवा नाही? कि असेच त्यांना निवडणूक कामासाठी पाठवायचे आहे? याची सुध्दा माहिती दिली जावी.

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—सन्माननिय महापौर महोदया, लोकप्रतिनीधी अधिनियम १९५१ जो आहे त्यानुसार निवडणूकीच्या कामासाठी निवडणूक आयोगाला कुठलेही कर्मचारी घेता येतात. जर कर्मचारी निवडणूक कामासाठी हजर झाला नाही तर त्याच्यावर कलम १३४ खाली फौजदारी गुन्हा दाखल करतात. आता जो ठराव होईल तो निवडणूक आयुक्तांकडे विनंती म्हणुन पाठवु. आमच्या महापालिकेत अशी अशी परिस्थिती आहे त्यामुळे आमची दैनंदिन कामे होत नाहीत. किंवा जे कनिष्ठ अभियंते वगैरे आहेत त्यांना निवडणूक कामासाठी सोडण्यासंदर्भात आपण जिल्हाधिकारी व निवडणूक आयोगास विनंती करु या.

सदस्य श्री. लाल पंजाबी :—या विषयाबाबत मी बोलु इच्छितो. या प्रस्तावासंदर्भात श्री. जीवन इदनानी व इतर सदस्यांनी आपले मत मांडले त्या संदर्भात मी सांगु इच्छितो की, एक एक, दोन दोन वर्ष, वर्षानुवर्षे निवडणूक कामा व्यतिरिक्त इतर कामासाठी कर्मचा—यांचा वापर करुन निवडणूकीच्या नावाखाली दुरुपयोग केला जात आहे. जरुरत नसतांना आपले कर्मचारी वर्षानुवर्षे तेथे काम करत राहतात. हा जो संदर्भ आहे तो त्यासाठी आहे. सहा महिन्यापासुन आता कोणतीही निवडणूक नसतांना आमचे कर्मचारी तेथे काय करतात? आमचे कर्मचारी दुसरे काम करतात. तहसिलदार कार्यालयास किंवा शासनास आपला स्वतःचा कर्मचारी अपुरा आहे. यासाठी ते आमचे कर्मचारी घेवुन आपली कामे करुन घेत आहेत. हे मुख्य कारण आहे. तसेच आणखी एका गोष्टीची आपणांस माहिती देवु इच्छितो की, १५ दिवसापुर्वी मुंबई महानगरपालिकेत तेथिल नगरसेवकांनी एक ठराव आणला होता तो पारीत सुध्दा झाला होता. त्यामध्ये या प्रस्तावाशी संबंधीत आणखी एक मुद्दा होता. त्यांनी असे ठरविले की, पाणी पुरवठा विभागाचे जे अधिकारी आहेत जे दैनंदिन पाणी पुरवठया संदर्भात जबाबदार आहेत, त्यांना निवडणुक कामासाठी घेतले जावु नये. श्री. जयराज पाठक महापालिका आयुक्त यांचे स्वतःचे निवेदन वृत्तपत्रात छापून आले होते. ते मी वाचले आहे. त्यांनी म्हटले होते की, मी स्वतः जावुन राज्य निवडणूक आयोगाकडे या विषयीचा मुद्दा उपस्थित करेन व त्यांना मी सांगेन की, या कर्मचा—यांना निवडणुक कामासाठी कार्यमुक्त करण्यास आपण आम्हांस सांगु नये. त्यानुसार आपण तहसिलदारांना किंवा प्रांत अधिका—यांना असे लिहुन पाठवा की, आपण निवडणूक निर्देशांचा दुरुपयोग केला आहे. माझी माहिती अशी आहे की, ४०,४२ कर्मचारी असे आहेत जे एक एक दिड दिड वर्षापासुन तेथे काम करत आहेत, आपण त्यांची यादी तयार करुन त्यांना लिहून पाठवा. या कर्मचा—यांचा निवडणुक कामाच्या नांवाने दुरुपयोग करत आहात व आमची भावना अशी आहे की निवडणूकीच्या कामासाठी या कर्मचा—यांचा दुरुपयोग होता कामा नये व निवडणूकीचे काम झाल्यानंर या कर्मचाऱ्यांना त्वरीत परत पाठविले पाहिजे. अशी सर्वांची भावना आहे ती सरकारपर्यंत पोहचवा. सरकारला जिल्हाधिका—यांमार्फत व प्रांत अधिका—यांशी आपण स्वतः बोलावे. तेव्हाच आपण हा जो ठराव पारीत करत आहोत त्याचा योग्य उपयोग होवु शकेल असे मला वाटते.

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—सन्माननिय महापौर महोदया, सभागृहाच्या भावनेशी मी सहमत आहे. आपली जी भावना आहे ती मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र शासन यांना कळवितो आणि आपले जे कर्मचारी आहेत ते किती दिवसापासुन कार्यरत आहेत, त्यांचा अवधी आणि त्यांना काय काम दिले आहे हे सविस्तरपणे जिल्हाधिका—यांना कळवु या. आम्हांला दैनंदिन कामामध्ये खुप अडचणी येत आहेत. आणि पाणी पुरवठया सारखी जी अत्यंत आवश्यक सेवा आहे ती सुध्दा पुरविणे शक्य होत नाही त्यामुळे निवडणूकीच्या प्रत्यक्ष कामाव्यतिरिक्त आमच्या कर्मचाऱ्यांची सेवा वापरु नये. अशी आपण विनंती करु या.

महापालिका सचिव :—ठिक आहे ? पास? हा जो अशासकिय प्रस्ताव आहे त्याचा ठराव याप्रकारे आहे. हि महासभा वरील प्रस्तावनेनुसार प्रशासनास खालिलप्रमाणे निर्देश करीत आहे.

१) केंद्र/राज्य निवडणुक आयोगामार्फत निवडणुकीचा दिनांक जाहिर झाल्यानंतर फक्त निवडणुक कामासाठीच अधिकारी व कर्मचा—यांच्या सेवा वर्ग करण्यात याव्यात.

२) नियमित स्वरूपाच्या कामासाठी अधिकारी/कर्मचारी उपलब्ध करून देण्यात येवु नयेत. ठिक आहे? पास?

काही सदस्य :—पास—पास......

यावेळी सदस्या श्रीमती. नीलू चांदवानी, श्रीमती मंजू पोपटानी यांनी पुन्हा सभागृहात प्रवेश केला.

महापौर :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑

<u>प्रस्तावावी सूचना</u>

**विषय क्र.** १०:—उल्हासनगर महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा फक्त निवडणूक कामासाठी वर्ग करणे विषयी श्री. जीवन इदनानी या पालिका सदस्याचा प्रस्ताव.

<u>प्रस्तावना</u>

केंद्र/राज्य निवडणुक आयोग यांचेमार्फत लोकसभा/विधानसभा निवडणुका जाहिर झाल्यानंतर प्रांत विभाग/तहसिलदार कार्यालयांकडुन निवडणुकीची प्रक्रीया सुरू होत असते.

तहसिलदार/प्रात विभाग कार्यालयांकडुन निवडणुक तसेच फोटोपास, मतदार नोंदणी, नैसर्गिक आपत्ती व इतर कार्यालयीन कामांसाठी वर्षानुवर्षे महापालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा वर्ग करून घेतल्या जातात. प्रत्यक्षात निवडणुकीव्यतिरिक्त नियमित स्वरूपाचे काम उदा. फोटोपास, मतदार नोंदणी व इतर कार्यालयीन कामे ही तहसिलदार/प्रांत विभाग यांनी त्यांच्याकडे कार्यरत कर्मचा—यांकडुन करून घेणे अपेक्षित आहे.

महानगरपालिकेत प्रतिनियुक्तीवर नेमणुक केलेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवादेखील वरील कामांसाठी वर्ग केल्या जातात. प्रतिनियुक्तीवर नेमणुक केलेल्या अधिकारी/कर्मचा—यांच्या सेवेपोटी पगार, भत्ते व इतर सुविधेपोटी महानगरपालिकेस लाखो रूपये खर्च करावे लागत असतात व असे करीत असताना या कर्मचा—यांच्या तहसिलदार कार्यालयांमार्फत इतर कामांसाठी सेवा वर्ग केल्यामुळे महानगरपालिकेतील कामकाज सुरळीतपणे पार पाडण्यात अडथळा निर्माण होत असतो.

मालमत्ता करासोबत महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण कर, रोजगार हमी कर व मोठया निवासी जागेवरील करांची वसुली ही महानगरपालिकेच्या कर विभागातील कर्मचा—यांकडुन पार पाडण्यात येते. शहरातील संपुर्ण क्षेत्राची माहिती कर विभागातील कर्मचा—यांना असल्यामुळे सतत निवडणुक कामासाठी कर विभागातील कर्मचा—यांच्या सेवा तहसिलदार कार्यालयाकडे वर्ग केल्या जातात. तहसिलदार कार्यालयात काम करताना कर विभागातील कर्मचारी कर वसुलीचे काम करू शकत नाहीत. परिणामस्वरूपाने महानगरपालिकेची व शासनाची वसुली होवु शकत नाही व तहसिलदार कार्यालयामार्फत शासनाच्यावतीने मदतीचे आदेश बजावण्यात येतात.

वरील सर्व बाबींचा विचार करता निवडणुक आयोगामार्फत निवडणुकीचा दिनांक जाहिर झाल्यानंतर फक्त निवडणुक कामासाठीच अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवा वर्ग करण्यात याव्यात. तसेच नियमित स्वरूपाच्या कामासाठी महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी उपलब्ध करून देण्यात येवु नयेत असे निर्देशित करण्यास महासभेपुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> २४ <u>दिनांक:—</u>०४/०८/२००९

सुचकाचे नाव :— श्री. जीवन इदनानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

हि महासभा वरील प्रस्तावनेनुसार प्रशासनास खालिलप्रमाणे निर्देश करीत आहे.

१) केंद्र/राज्य निवडणुक आयोगामार्फत निवडणुकीचा दिनांक जाहिर झाल्यानंतर फक्त निवडणुक कामासाठीच अधिकारी व कर्मचा—यांच्या सेवा वर्ग करण्यात याव्यात.

२) नियमित स्वरूपाच्या कामासाठी अधिकारी/कर्मचारी उपलब्ध करून देण्यात येवु नयेत.

सुचकाची सही:

अनुमोदकाची सही:

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

**<u>महापालिका सचिव :—</u>** विषय क्र. ११ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. ११ :— <u>प्रस्तावावी सूचना</u>

उल्हासनगर महानगरपालिकेत तीन वर्षापेक्षा अधिकाळ प्रतिनियुक्तीने नियुक्त अधिकाऱ्यांना कार्यमुक्त करणे विषयी श्री. जीवन इदनानी या पालिका सदस्याचा प्रस्ताव.

---

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :—</u>मा. महापौर, उप—महापौर व आयुक्त साहेब, मी सभागृहासमोर असा प्रस्ताव ठेवला आहे की, प्रत्येक वेळी आमच्याकडे काही सरकारी अधिकारी आम्ही मागणी केली असतांना किंवा केली नसतांनाही आमच्याकडे प्रतिनियुक्तीने पाठविले जातात. ठिक आहे, प्रतिनियुक्तीवर आल्यानंतर त्यांचे काही नियम असतात, निश्चित असा कालावधी ठरवुन दिलेला असतो. एक वर्षाचा, दोन वर्षाचा, तीन वर्षाचा जास्तीत जास्त तीन वर्षाचा. यांची तर आता येथे नविनच पध्दत चालु झाली आहे, ज्यांना येथे चांगले वाटते ते चार, चार, पाच , पाच वर्ष येथे कसे राहता येईल याचा प्रयत्न करतात. नियमाकडे न पाहता, कायदयाकडे न पाहता येथे काहीही चालते. उल्हासनगर महानगरपालिकेत कुणालाही शासनाच्या मंजुरीशिवाय मुदतवाढ दिली जाते. त्यांचे पद बदली केले जाते. एका पदावर तीन चार वर्ष काम केल्यावर त्याठिकाणी ते पाच पाच वर्ष राहु इच्छितात, शासनाकडुन त्यांना कोणतीही मान्यता नाही. आमचे आयुक्त साहेब, त्या अधिका—याचे पद बदली करुन त्यांना प्रतिनियुक्तीवर सलगपणे ठेवतात. हे फार चांगले आहे. शासन तर येथे आहे, मुख्यमंत्री कोठे आहेत? त्यांची तर मला काही भुमिका दिसत नाही. मंत्री महोदयांची सुध्दा काही भुमिका दिसत नाही. सचिवालयाची सुध्दा काही भुमिका नाही. येथे आयुक्त साहेब, स्वत:च मुदतवाढ देतात. पद सुध्दा बदली करतात, जसे त्यांच्या मनात आले तसे कारभार चालवत राहतात. आयुक्त साहेब आहेत, हातात अधिकार आहेत. माझ्या माहिती नुसार आयुक्त सुध्दा सलग तीन वर्षापेक्षा जास्त काळ राहु शकत नाहीत. शहर अभियंता, मुख्य लेखा अधिकारी, अशी अन्य सुध्दा काही पदे आहेत कार्यकारी अभियंता, उप—अभियंता अशी बरीच काही पदे आहेत माझ्या नजरेत तर तीन मोठ मोठे अधिकारी या महापालिकेत आलेत. ज्यांचा मी उल्लेख केला. त्या व्यतिरिक्त सुध्दा बरेचसे अधिकारी आलेत. ज्या तीन अधिका—यांचा मी उल्लेख केला आहे. त्यातील एक आहे श्रीमान मिलिंद सावंतजी, उप—आयुक्त १/३/२००६ पासुन ते येथे आहेत. तीन वर्ष तीन महिने झालेत. श्री. दिपक सावंतजी १७/१/२००६ पासून तीन वर्ष सहा महिने, श्री. अनुदिप दिघे, मुख्य लेखा परिक्षक २७/७/२००५ पासुन कार्यरत चार वर्ष संपले पाचवे वर्ष सुरु आहे. हे अधिकारी दुस—या ठिकाणी जावु इच्छित नाहीत. बदली झाल्यानंतर सुध्दा येथेच बसुन राहतात. नुकत्याच काही दिवसापुर्वी श्री. अनुदिप दिघे यांचा बदलीचा आदेश आला आहे, त्यांना त्या महापालिकेतुन जाणे योग्य वाटले नाही. आमचे तत्कालीन आयुक्त साहेबांनी न जाने काय विचार केला? त्यांना कार्यमुक्त केले नाही. त्यांच्या जागी श्री. गरड साहेब हे दुसरे साहेब आले. त्यांची बदली केली जावी असा आदेश सुध्दा निघाला परंतु आयुक्त साहेबांनी त्यांची बदली केली नाही. महाराष्ट्र सरकारचे येथे चालेल कसे? आपले सरकार आहे? आपल्या येथे नविन आयुक्त आले आहेत त्यांच्यावर दबाव पडत असेल परंतु ते बोलणार नाहीत. सभागृहासमोर मी या सर्व गोष्टी मांडु इच्छितो अधिकारशाही का निर्माण होत आहे ? चार वर्ष पाच वर्ष यांना ना प्रतिनिधींविषयी पडले आहे ना जनतेविषयी पडले आहे, हे खुश आहेत, मजेत आहेत, सर्व ठिक आहे आम्हांस येथुन जायचे नाही असे जर राहिले तर जनतेचे काम होणार नाही. या अधिका—यांनी स्वत: विचार केला पाहिजे की आमच्या विरुध्द नगरविकास विभागामधुन आदेश निघाला आहे यांच्याबाबत चौकशी केली जावी याबाबत महाराष्ट्र शासनाचा आदेश आहे. उमपा/२३२७/४१८/प्र.क्र./११/६० नवि/२१, दिनांक १० ऑगस्ट २००८ यामध्ये स्पष्ट लिहिले आहे की, कार्यकारी अभियंता, उप—आयुक्त, मुख्य लेखा अधिकारी हे दोषी आहेत त्यांच्यावर कारवाई करा आणि पैसे वसुल करावेत. व संबंधीत विभागास माहिती पाठविली जावी व त्यांच्या विरुध्द खातेनिहाय चौकशीची कारवाई सुरु केली जावी. मला नाही वाटत की या आदेशाची अंमलबजावणी झाली आहे. संबंधित विभागास काही लिहिले आहे की नाही, ते मला माहित नाही. आजपर्यंत महासभेला सुध्दा सांगितले नाही. कदाचित आमचे आयुक्त साहेब आता चौकशी करतीलच. लिहिले नसेल तर त्या विभागांना ते लिहितील. कारण की हे अतिशय गंभीर असे प्रकरण आहे. हा आदेश शासनाचा आहे. नगरविकास विभागाचा आहे. त्यास जर दाबुन ठेवले असेल तर ते चुकीचे आहे. तर असे अधिकारी ज्यांच्यावर चौकशीचे आदेश आहेत, तरी सुध्दा त्यांना सलगपणे येथे कसे ठेवले आहे? त्यांना कसे ठेवले आहे? आयुक्त साहेब त्यांना येथेच सलगपणे ठेवु इच्छितात. त्यांचे पद सुध्दा बदली करतात. महासभेचे काही अस्तित्व नाही. महासभा ही नियुक्ती प्राधिकारी आहे परंतु तिच्याकडुन ना काही निर्देश घेतले जाता ना तिला काही माहिती दिली जात. तर मग महासभा नियुक्ती प्राधिकारी म्हणुन राहिली तरी कुठे?

महासभेचा तर काही भुमिकाच येत नाही. हे जे अधिकारी मुदतवाढ मागतात त्यांनी महासभेला नियुक्ती प्राधिकारी म्हणुन कधी विनंतीपत्र दिले आहे? काय आमच्याकडुन, महासभेकडून अनुमती घेतली आहे? अनुमती घेतली आहे का की आम्ही येथे आणखी एक दोन वर्ष राहु इच्छित आहोत ? जेव्हा मनात येईल तेव्हा यायचे, मनाला वाटेल तेव्हा जायचे. जे वाटेल ते करणार. त्यांची काही जबाबदारी नाही. लोकांबाबतीत लोकांनी निवडुन दिलेल्या लोकप्रतिनिधींबाबतीत त्यांची काही जबाबदारी नाही. मला तर असे वाटते की, ते येथे प्रशासन चालविण्यासाठी येत नसून राजकारण करण्यासाठी येतात. ब—याच कालावधीपासुन मी पाहिले आहे हे अधिकारी राजकरणामध्ये बराच रस घेतात. प्रशासनाच्या कामामध्ये त्यांचे लक्ष नसते. ते महानगरपालिकेत येतात जरुर, १२ वाजता येतात. का ? त्यांच्यावर कोणाचे काही नियंत्रण नाही? त्यांना कुणी बोलणारा नाही. १२ वाजता येतात, सव्वा एक वाजता जेवणाचा डब्बा घेवुन जातात. जेवणाची वेळ कदाचित दिड ते दोन वाजेपर्यंतची आहे. परंतु हे तीन वाजता जेवण करुन परत येतात. साडेचार पाच वाजता आपल्या गाडीने घरी निघुन जातात. गाडीचे भाडे तर दयायचे नाही. गाडीचे भाडे महानगरपालिकेने दयायचे आहे. गाडीत बसतात आणि महाशय निघुन जातात. नगरसेवक त्यांना शोधत राहतात. प्राकलन हातात घेवुन एका दरवाज्यातुन दुस—या दरवाज्यात असे फिरत राहतात. परंतु हे महाशय मिळत नाहीत. आणखी काही खोलातील गोष्टी मी आपणांस सांगेन, परंतु आमचे सभागृह त्या सर्व बाबीस परिचीत आहे. सभागृहास त्या सर्व गोष्टी माहित आहेत. यास्तव मी अशी विनंती करेन की, यांची ज्या ज्या ठिकाणी बदली झालेली आहे, त्याठिकाणी हजर होण्यासाठी येथुन कार्यमुक्त करुन तेथे पाठविले जावे. बाकी शासन आहे ते बघुन घेईल. त्यांना तेथे पाठवायचे आहे की अन्य कुठल्या ठिकाणी पाठवायचे आहे ती महाराष्ट्र शासनाची जबाबदारी आहे. मात्र आमची जी जबाबदारी आहे ती हीच आहे की यांना लवकरात लवकर कार्यमुक्त केले जावे. जनतेचे व लोकप्रतिनिधींचे नुकसान न करता या शहराशी आणखी धोका न करता हा ठराव अंमलात आणावा.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>मा. महापौर महोदया, सन्माननिय सदस्य श्री. जीवन इदनानी यांनी जो प्रस्ताव मांडला आहे त्या प्रस्तावाविषयी मी बोलु इच्छितो. १३ वर्षापुर्वी जेव्हा तत्कालीन उल्हासनगर नगरपालिका महानगरपालिकेत रुपांतरीत झाली तेव्हा शासनाकडुन असा एक आदेश आला होता, शासन निर्णय आला होता त्यामध्ये असे लिहिले होते की, जे उप—आयुक्त या शहरात येतील ते काही कालमर्यादेपर्यंत या शहरात राहतील. व आमच्या शहरातील जे अधिकारी आहेत, जे पदोन्नतीस लायक आहेत, ज्यांना मुख्य लेखा अधिकारी, उप—आयुक्तपदी पर्यंत पदोन्नती दिली जावु शकेल. अशा अधिका—यांना प्रशिक्षण देवुन त्यापुढे आपल्या अधिका—यांना प्रशिक्षण दिले जाईल. व मुख्य लेखा अधिका—यापासुन उप—आयुक्तपदी पर्यंत ज्या अधिका—यांना पदोन्नती दिली जावु शकते त्यांना पदोन्नती दिली जाईल. १३ वर्षामध्ये या शहरातील एखादा अधिकारी उप—आयुक्तपदाच्या दर्जापर्यंत पोहचला आहे का? कुणाला या पदापर्यंतची पदोन्नती दिली आहे का? नाही दिली. दुसरी गोष्ट अशी की, जो कुणी अधिकारी प्रतिनियुक्तीवर येतो त्याने तीन वर्षापेक्षा जास्त काळ येथे राहता कामा नये याबाबतचे प्रस्ताव यापुर्वी अनेक वेळा महासभेत आले आहेत. १९९७ पासुन आजपर्यंत ब—याच वेळा असे प्रस्ताव आले आहेत. कारण की एकाच ठिकाणी जास्त वेळ राहिल्यामुळे त्या अधिका—याची त्या ठिकाणी एकाधिकारशाही निर्माण होते. म्हणुन तीन वर्षानंतर त्याची येथुन बदली झालीच पाहिजे. तीन वर्षापेक्षा अधिक कालावधी ज्या अधिका—यांना होतो त्यांच्याबाबतची माहिती सभागृहापुढे आली पाहिजे. परंतु आजपर्यंत अशा प्रकारचा प्रस्ताव महासभेपुढे कधी आला नाही. त्यामुळे आमचे सन्माननिय सदस्य श्री. जीवन इदनानी यांच्या या प्रस्तावाचे मी समर्थन करतो. ते केवळ या तीन अधिका—यांपुरतीच नव्हे तर असे जे अधिकारी आहेत की जे प्रतिनियुक्तीवर आले आहेत व त्यांना तीन वर्षापेक्षा अधिक कालावधी येथे झाला आहे त्यांना त्वरीत येथुन कार्यमुक्त केले जावे. व जेव्हा तीन वर्षाचा कालावधी पुर्ण होतो तेव्हा तात्काळ त्याची माहिती महासभेस दिली पाहिजे. व १९९७ मध्ये शासनाचा जो आदेश आला होता, तो काय आदेश आला होता ? त्याबाबतची माहिती श्री. प्रकाश कुकरेजा या सभागृहास देतील, उप—आयुक्त, पदासाठी जे लायक आहेत त्यांना पदोन्नती दिली पाहिजे किंवा नाही? याबाबत त्यांनी खुलासा केला तर आम्ही अधिक चांगल्याप्रकारे समजु शकु. या महापालिकेतील अधिका—यांना पदोन्नती दिली तर ते वेळेवर कामावर येतील. लोकांच्या अडचणी समजुन घेवु शकतील आणि त्या सोडविण्यासाठी ते कामेही करु शकतील. तर याबाबतची माहिती सचिव साहेबांनी दयावी. आजपर्यंत मुख्य लेखा अधिकारी ते उप—आयुक्तपदीपर्यंत या महापालिकेतील किती अधिका—यांना पदोन्नत्या देण्यात आल्या आहेत त्याची माहिती श्री. प्रकाश कुकरेजा यांनी दयावी.

यावेळी सदस्या श्रीमती निलम रावत, या सभागृहातून बाहेर गेल्या.

**सदस्य श्री.बी.बी. मोरे :**—सन्माननिय महापौर, उप—महापौर व आयुक्त साहेब, सन्माननिय सदस्य श्री. जीवन इदनानी यांनी जो प्रस्ताव सभागृहात मांडला आहे तो अतिशय चांगला आहे. एका ठिकाणी ३ वर्ष झाल्यानंतर त्याची बदली केली पाहिजे हा महाराष्ट्र शासनाचा नियम आहे. हा जो प्रस्ताव मांडला आहे, त्याची प्रस्तावना मी वाचली आहे..काय या महापालिकेत हे तीनच अधिकारी तीन वर्षपेक्षा जास्त कालावधीपासुन येथे आहेत. दुसरे कुणी नाहीत? अहो, श्री. शिर्के यांना किती वर्ष झाली? श्री. शिर्के, तुमची ७० ७० लाखाची प्राकलने मंजुर करुन देतो. म्हणुन श्री. शिर्के यांचे नाव घेत नाहीत. का नाही घेतले जात श्री. शिर्केचे नाव? मी सभागृहास विनंती करु इच्छितो व आयुक्त साहेबांना विचारु इच्छितो की असे किती अधिकारी आहेत? १९९७ साली मी नगरसेवक म्हणुन येथे निवडुन आलो तेव्हापासुन मी पाहत आहे, श्री. शिर्के येथे आहे. आता २००७ मध्ये मी पुन्हा निवडून आलो तरी श्री. शिर्के येथेच आहे. त्याचे या प्रस्तावनेत नाव आले नाही? ते का नाही आले? तर ही सर्व विचार करण्याची गोष्ट आहे. मी सभागृहाला हे सांगु इच्छितो की, या विषयाचा ठराव पारीत करण्यास मी समर्थन देतो. मी विरोध करत नाही परंतु हा न्याय सर्वांसाठी असला पाहिजे. जो नियम श्री.बी.बी. मोरे साठी असेल तोच नियम श्री. जीवन इदनानी यांच्यासाठी सुध्दा असला पाहिजे. श्री. जीवन इदनानी यांनी तीन अधिका—यांविषयी जो प्रस्ताव येथे मांडला आहे त्यामध्ये श्री. मिलिंद सांवत, श्री. दिपक सावंत, श्री. अनुदिप दिघे यांची नावे आहेत यातील २ अधिका—यांच्या तर बदल्या झाल्या आहेत. परवा ते येथुन निघुन जातील. बाकी राहिला एक अधिकारी ठराव पारीत होण्या अगोदर अधिकारी येथुन निघुन जात असतांना त्यांच्याबाबतीत सभागृहात एवढी चर्चा होताच कामा नये. ते स्वत: वैचारीक आहेत ते विचार करतात की महासभेपुढे विषय येण्याअगोदर आपण येथुन निघुन गेले पाहिजे मी त्यांना धन्यवाद देतो. असे काही अधिकारी आहेत त्यांनी येथे राहणे पसंत केले नाही. आणि हेच श्री. मिलिंद सावंत यांनी बोलुन दाखविले की माझा विषय महासभेपुढे येण्या अगोदरच मी भिंवडी महापालिकेत रुजु होतो, हे मला सुध्दा माहित आहे. तर सर्व सन्माननिय सदस्यांना माझी एक विनंती आहे की, आपण नियम करा, तो सर्वांसाठी करा. श्री. दिघे माझे बील पास करत नाही. म्हणुन श्री. दिघे यांना येथुन परत पाठवा असे होता कामा नये. अशा प्रकारचा दुजाभाव आम्ही चालु देणार नाहीत, चालु देणार नाही, चालु देणार नाहीत.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :**—मा. महापौरजी, मी सांगु इच्छितो की, श्री.बी.बी. मोरे जे बोलत आहेत मला वाटते त्यांना विषयाचे ज्ञान नाही. तीन अधिका—यांबाबतीत सन्माननिय सदस्य श्री. जीवन इदनानी यांनी जो प्रस्ताव दिलेला आहे ते अधिकारी प्रतिनियुक्तीने या महापालिकेत आलेले आहेत. त्या प्रस्तावात त्यांनी असाही उल्लेख केला आहे की या अधिका—यांबरोबर आणखी जे काही अधिकारी प्रतिनियुक्तीने आलेले आहेत आणि त्यांना तीन वर्षपेक्षा अधिक कालावधी झाला आहे आणि आमच्या नजरेतुन ते सुटले आहेत त्याच्या विषयी सविस्तर माहिती देता येत नाही. व श्री. शिर्के हे प्रतिनियुक्तीवर आलेले नाहीत. श्री. मोरे यांना मी सांगु इच्छितो की, श्री. शिर्के हे या महापालिकेचे अधिकारी आहेत. तर श्री. जीवन इदनानी यांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे तो पुर्णपणे बरोबर आहे. जे अधिकारी प्रतिनियुक्तीवर आले आहेत आणि त्यांना तीन वर्षपेक्षा जास्त कालावधी झाला आहे त्यांनी परत गेले पाहिजे. त्यांनी तीन नावे दिली आहेत त्या व्यतिरिक्त खाली लिहिले आहे त्यानुसार इतर अधिका—यांनीही गेले पाहिजे. व श्री.बी.बी. मोरे यांनी जे म्हटले त्या विषयी मी सांगु इच्छितो की, त्यांनी कृपया विषयाबाबत अभ्यास करावा. अभ्यास न करता जेव्हा कुणी बोलतो ते बरोबर नाही. श्री.बी.बी. मोरे एवढे मोठे नेते आहेत त्यांना विरोधी पक्ष नेता बनविले आहे. ज्यांचा कालच मी इंटरनेट वरुन फोटो घेतला होता. विरोधी प्क्ष नेता म्हणुन त्यांचा फारच चांगला असा फोटो छापला होता परंतु ते विषयाचा अभ्यास करत नाहीत.

**सदस्य श्री.बी.बी. मोरे :**—मा. महापौरजी.........

**सदस्य श्री. जीवन इदनानी :**—मा. श्री.बी.बी. मोरे साहेब आपण बोलु इच्छित आहात काय? बोला बोला.....

**सदस्य श्री.बी.बी. मोरे :**—श्री. जीवन इदनानी यांनी जो प्रस्ताव मांडला आहे त्याबाबतीत मी या अगोदर सुध्दा सांगितले आहे. आताही सांगत आहे. मी त्यास विरोध करत नाही. महाराष्ट्र शासनाचा असा नियम आहे की, जे दोन वर्षासाठी आले आहेत किंवा तीन वर्षासाठी आले आहेत? तीन वर्षांनी सर्वांना परत जायचेच आहे. आता मी आपणांस काय सांगु? मी शासनामध्ये १६ वर्ष सेवा केली आहे. महाराष्ट्र शासनाची सेवा केली आहे. डेप्युटी डायरेक्टर ऑफ एज्युकेशन डिपार्टमेंट ग्रेटर बॉम्बे येथे मी असिसस्टंट ऐज्युकेशन इन्सपेक्टर म्हणुन मी होतो. आपण तर उल्हासनगर मध्ये होता, आपणांस काय माहित आहे? सरकारी नियम काय असतात ते? आपण नगरसेवक म्हणुन निवडून आलात, आणि श्री. जीवन इदनानी यांची बाजु घेता ?

हे बरोबर नाही. अहो तुम्ही सांगा, हे नियम सर्वांसाठी आहत. नियम नाहीत असे मी कुठे सांगत आहे ? नियम आहे. परंतु त्या नियमानुसार चाला. हेच माझे म्हणणे आहे. माझा या विषयास विरोध नाही.

यावेळी सदस्या श्रीमती लिलाबाई लक्ष्मण आशान, श्रीमती सुमन शेळके या सभागृहातून बाहेर गेल्या.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :</u>—आयुक्त साहेब, मी आपणांस एक प्रश्न विचारु इच्छितो. जर एखादया अधिका—यास येथे तीन वर्ष होवुन गेले असतील तर त्याच्याबाबतीत महासभेत प्रस्तावपारीत करणे असा काही नियम आहे काय? महाराष्ट्र नागरी सेवा नियमानुसार जर कुणी अधिकारी प्रतिनियुक्तीवर या महापालिकेत येतो तर तो आयुक्तांच्या हाताखाली काम करतो. परंतु जर समान दर्जाची दोन पदे असतील तर कोणाला कोणते काम दयायचे हे आयुक्तांच्या अधिकारात असते. मला वाटते कदाचित त्यामध्ये राज्य सरकार सुध्दा हस्तक्षेप करु शकत नाही. जोपर्यंत ते अधिकारी या महापालिकेत प्रतिनियुक्तीवर आहेत तोपर्यंत या तीन अधिका—यां व्यतिरिक्त आणखी किती अधिकारी आहेत की ज्यांना तीन वर्ष पुर्ण झाली आहेत? व ते कोण कोणते अधिकारी आहेत ?

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):</u>—सन्माननिय महापौर महोदय, या तीन अधिका—यां व्यतिरिक्त माहिती उपलब्ध नाही. माहिती घेतो आणि सभागृहापुढे सांगतो.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :</u>—आणखी एका प्रश्नाचे उत्तर दया. जेव्हा आम्ही महासभेत ठराव पारीत करुन एखादया अधिका—यास परत पाठवितो. तो अधिकारी पुन्हा महापालिकेत येवु शकतो काय?

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):</u>—महापौर महोदया, शासन नियुक्ती करु शकते. महासभेसमोर त्याची माहिती दयायची आहे. आणि माहिती दिल्यानंतर तो कार्यरत राहतो. जर शासनाला वाटले तर पुनर्नियुक्ती होवु शकेल?

<u>महापालिका सचिव :</u>—पास?

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :</u>—आमचे आयुक्त साहेब अजुनही काही गोष्टी लपवत आहेत. स्पष्टपणे सांगत नाहीत. जर एखादा अधिकारी या उल्हासनगर महानगरपालिकेत चांगले काम करत असेल व त्यास तीन वर्ष झाले असतील, आणि त्याची महापालिकेस आवश्यकता असेल, तर त्यास ठेवायचे किंवा नाही हे आयुक्तांवर अवलंबुन असते. आयुक्त त्यांना रोखु शकतो व महाराष्ट्र शासनाला सांगु शकतो की, या माणसाची महापालिकेला जरुरत आहे. उदाहरण दाखल सांगु इच्छितो की, येथे श्री. भडकवाड साहेब होते. येथे ते उप—आयुक्त, मुख्यालय म्हणुन होते. त्यावेळेस त्यांची बदली महाराष्ट्र शासनाच्या वतीने मंत्रालयातुन केली गेली. त्यावेळी येथे आयुक्त होते श्री. पोखरकर साहेब ज्यावेळेस मी श्री. पोखरकर साहेबांकडे गेलो व म्हटले की, तुम्ही यांची बदली का करत नाहीत? कारण खासदार श्री. रामदास आठवलेंचे पत्र आले होते. श्री. जमनुजी, ऐकुन घ्या. त्यावेळी श्री. भडकवाड यांची बदली झाली होती व खासदार श्री. आठवलेंचे यांचे पत्र होते. परंतु श्री. पोखरकरांनी सांगितले की, श्री.बी.बी. मोरेजी या महानगरपालिकेला या माणसाची जरुरत आहे. असा दुसरा माणुस वेळेवर येवु शकत नाही. आणि म्हणुन या माणसाला काही अवधीसाठी येथे ठेवणे जरुरीचे आहे. ज्यावेळेला यांच्या जागेसाठी पर्यायी अधिकारी उपलब्ध होईल त्यावेळेस यांची मी बदली करु शकतो. आणि अशा पध्दतीने श्री. भडकवाड साहेब सहा महिने नाही तर वर्षभर राहिले आणि त्यानंतर त्यांची बदली झाली. हे मी शासनाच्यावतीने सांगतो. श्री.जमनुजी कानावरचा फोन बाजुला करा आणि व्यवस्थित ऐकुन घ्या. आणि तेव्हा विचारा श्री.बी.बी. मोरे किती शिकले आहेत ते? किती शिकले आहेत आणि किती बोलतात, समजले.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :</u>—मा. महापौर महोदया, हिंदीमध्ये एक म्हण आहे की, ''निम हकीम खतरे जान''. जेव्हा असे अर्धवट डॉक्टर असतील तेव्हा धोका तर होईलच होईल. ज्यांना हे माहित नाही की, श्री. शिर्के कुठला अधिकारी आहे ? ते प्रतिनियुक्तीवर आले आहेत की, येथिलच आहेत ? मी प्रश्न विचारला की, जेव्हा १९९६—१९९७ ला महानगरपालिका स्थापन झाली होती तेव्हा शासनाकडुन काय आदेश आले होते? ते सांगितले जावे. जेव्हा उल्हासनसगर नगरपालिकेचे महानगरपालिकेत रुपांतर झाले होते तेव्हा

शासनाकडुन काय आदेश आले होते त्याचा खुलासा केला जावा. व श्री. बी.बी. मोरे माहिती नसतांना आपण बोलु नका.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>सन्माननिय महापौरजी, मा. आयुक्त साहेब, मा. उप–महापौर, सचिव साहेब, माझे बंधु श्री. जीवन इदनानी यांचे मी या सभागृहात अभिनंदन करु इच्छितो, त्यांनी स्वत: होवून या सभागृहात हे मान्य केले आहे की, या कार्यकालावधीत टॅंकर घोटाळा झालेला आहे. खरेच हे अभिनंदनास पात्र आहेत. त्यांनी येथे वाचुन दाखविले की, टॅंकर घोटाळा झालेला आहे. याच सभागृहात मी याविषयी प्रश्न आणत होता. लक्षवेधी आणत होतो. परंतु दु:खाने सांगवे लागत आहे की, याच सभागृहात ना ती लक्षवेधी स्विकृत केली, ना त्या मुद्दयांवर चर्चा केली. आज महाराष्ट्र शासनाकडुन निर्णय आला आहे की, त्यावेळेस जे सत्ताधारी होते ते टॅंकर घोटाळयामध्ये सहभागी होते, व त्यावेळेस जो कुणी अधिकारी होता तो त्यामध्ये सामिल होता आणि हे आज यांनी मान्य केले आहे म्हणुन ते अभिनंदनास पात्र आहेत. त्यांनी मान्य केले आहे की, त्यांनी घोटाळा केला आहे. व श्री. जीवन इदनानीजी मोठा भाऊ या नात्याने सांगु इच्छितो की, अधिकारी १२.०० वाजता येतो, २.०० वाजता जातो, पुन्हा ३.०० वाजता येतो. हे जेव्हा अधिका–याचे तीन वर्ष पुर्ण होतात तेव्हा सुरु होत नाही. जेव्हापासुन त्यांची नियुक्ती होते तेव्हापासुन हे चालु असते. तर त्यावेळेस आपण झोपला होतात? आता आपल्या लक्षात आले आहे की, अधिकारी १२.०० वाजता येतो, दुपारी २.०० वाजता जेवायला जातो आणि ३.०० वाजता येतो आणि ४.०० वाजता घरी निघुन जातो. आपण या गोष्टींवर विचार करा की खरेच आपण कायदयाबाबत बोलत आहोत की, कुण्या एका व्यक्तीस विरोध करायचा आहे म्हणुन बोलत आहोत. दुसरी गोष्ट आपण आता येथे सांगितले की, येथे कोणत्याही मंत्री महोदयाचे चालत नाही. आयुक्त साहेबांबाबतीत आपण जे काही म्हटले, त्याबद्दल मी आपणांस सांगु इच्छितो की, या अगोदर सुध्दा आयुक्त आले होते. व प्रत्येक आयुक्त, आपल्या मर्जीनुसार ज्या कुण्या अधिकारास पदोनन्ती दयायची असेल त्यास देत असे. त्यावेळेस आपण कधी आवाज उठविला नाही. या सर्व गोष्टींचा विचार करा. व माझी आपणांस विनंती आहे की, येथे कोणतेही काम नियमानुसार केले जावे. ब–याच दिवसापासुन आपणाकडे नगररचनाकार नव्हते. त्यावेळेस आपण सर्वजण ओरडुन सांगत होतो की, आमच्या शहराचा कारभार ठप्प झाला आहे. बांधकाम परवानग्या देण्याचे काम ठप्प झाले आहे. आमच्या शहराचा विकास थांबला आहे. यासाठी जेवढे लवकर होईल तेवढया लवकर आमच्या महापालिकेत नगररचनाकार आला पाहिजे. आज आपण आपला व्यक्तिगत स्वार्थ बाजुला सारुन जर खरोखरच आपण शहर हिताच्या बाबतीत प्रामाणिक आहात तर कायदयात जे बसत असेल त्यानुसार निर्णय घेतला पाहिजे. कोणत्याही अधिका–यास आणणे किंवा परत पाठविणे याबाबत महासभेला अधिकार आहे किंवा नाही? याविषयी आमचे सन्माननिय सदस्य श्री. मोहन साधवानी यांनी विचारलेल्या प्रश्नाचा आपण खुलासा केला पाहिजे. परंतु आमचा या प्रस्तावास विरोध आहे. कारण की, आणखी किती अधिका–यांना येथे येवुन तीन तीन वर्ष झाली आहेत याची माहिती नसल्याचे आयुक्तांनी आताच सांगितले. सभागृहापुढे त्यांनी त्याबाबतची माहिती दिलेली नाही. यासाठी माझी आपणांस सूचना असेल की, जर आपणांस आपला प्रस्ताव आणायचा असेल तर ज्यांना तीन वर्ष पुर्ण झाली आहेत त्या सर्वांची यादी आपण सभागृहात सादर करा. आणि त्यानुसारच सभागृहाने निर्णय घेतला पाहिजे. धन्यवाद।

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>प्रतिनियुक्तीवर जे अधिकारी येतात, त्यांची तीन वर्षानंतर बदली करण्यासंदर्भात काही नियम आहे काय? असेल तर तो कोणता शासन निर्णय आहे ते सांगितले जावे. शासन परिपत्रक किंवा कायदयात काय तरतुद आहे ती सांगितली जावी. त्यानंतरच पुढील चर्चा होईल.

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):–</u>मा. महापौर महोदया, प्रतिनियुक्तीचा कालावधी असा नाही, शासन शक्यतो एका पदावर एका अधिका–याची तीन वर्षासाठी प्रतिनियुक्तीवर नियुक्ती करते. त्यानंतर शासनास वाटल्यास शासन त्याची बदली करते.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>असा शासन निर्णय तर नाही ना? हा जो ठराव आला आहे त्यामध्ये लिहिले आहे की असा नियम आहे. याबाबतीत नियम तर नाही ना कोणताही?

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):–</u>शासनास वाटल्यास.....

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>शासनास वाटल्यास, नियम तर नाही ना कोणताही? आम्ही नियम विचारत आहोत. नियम नाही ना? शासनास वाटल्यास, आणि नियम या दोन्ही मध्ये फरक आहे.

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—</u>नियम असाच आहे, साधारणत: कर्मचा–याची, अधिका–याची एका पदावरील नियुक्ती तीन वर्षापर्यंत असते. आणि शासनास वाटेल तर शासन त्याची नियुक्ती किंवा बदली शासन त्या कालावधीनंतर करु शकते.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>नियम काय आहे? शासन निर्णय वाचुन दाखवा. कोणत्या पृष्ठावर अशी नोंद आहे ते वाचुन दाखवा. आपल्या बोलण्यानुसार तर आम्ही मान्य करणार नाहीत. शासन निर्णय क्रमांक काय आहे तेही वाचुन दाखवा इतिवृत्तात त्याची नोंद आली पाहिजे.

<u>श्री. अशोककुमार रणखांब (अतिरिक्त आयुक्त):—</u>मा. महापौर महोदया, प्रतिनियुक्तीने जी नियुक्ती होते, तिचा कार्यकाळ सर्वसाधारण तीन वर्षाचा असतो. व तीन वर्षानंतर त्यास सलगपणे सेवेत ठेवायचे किंवा नाही हे महानगरपालिकेच्या अधिकारात येते. आता तीन अधिका–यांच्या बाबतीत जो प्रस्ताव सभागृहापुढे आलेला आहे. त्या तीन्ही अधिका–याचा प्रतिनियुक्तीचा कालावधी तीन वर्षापेक्षा अधिक झालेला आहे. त्यातील दोन अधिका–यांची महाराष्ट्र शासनाने बदली केली आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>किती अधिका–यांच्या बदलीचे आदेश आले आहेत हे आम्ही विचारत नाही. अधिका–यांना येथे पाठविले जाते. त्याबाबत त्यांना बदलीचे जे काही आदेश पत्र मिळते त्यामध्ये असे लिहिलेले असते का की तुम्हांला येथे तीन वर्षापेक्षा अधिक काळ काम करायचे नाही असे काही लिहिलेले असते काय? समजा, आपली नियुक्ती येथे तीन वर्षासाठी केली जाते. असे त्यांना पत्र मिळते काय? जसे एखादया विकास कामासंदर्भात ठेकेदाराला कार्यादेश दिला जातो त्यामध्ये लिहिलेले असते अमूक एवढया कालावधीत हे काम पुर्ण करायचे आहे. तर माझी तीन वर्षासाठी येथे नियुक्ती झाली आहे असे पत्र घेवुन अधिकारी येथे येतात का?

<u>श्री. अशोककुमार रणखांब (अतिरिक्त आयुक्त):—</u>नियुक्तीचा कालावधी लिहिलेला असतो किंवा नसतो लिहिलेला नसेल तर तो तीन वर्षाचा असतो.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u> हे जे तीन अधिकारी आहेत यांच्या आदेशात तसे लिहिलेले आहे का?

<u>श्री. अशोककुमार रणखांब (अतिरिक्त आयुक्त):—</u>काही आदेशांमध्ये लिहिलेले असते. महाराष्ट्र नागरी सेवा नियमामध्ये प्रतिनियुक्तीचा कालावधी तीन वर्षाचा असेल असे नमुद आहे. आणि याबाबतचा शासन निर्णय सध्या आमच्याकडे येथे उपलब्ध नाही.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>येथे उपलब्ध नाही म्हणजे अशा प्रकारचा कायदा नाही, असा नियमच नाही.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :—</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, ..........

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>सन्माननिय महापौरजी, उप–महापौरजी आणि आयुक्त साहेब, याबाबत मी आपणाकडुन उत्तर मागत आहे. कुण्या नगरसेवकाकडुन उत्तर मागत नाही. मला या प्रश्नाचे अधिका–यांकडुन उत्तर पाहिजे.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :—</u>मी आपणांस उत्तर देत नाही. काही गोष्टी मी मा. महापौर आणि आयुक्त यांच्या निदर्शनास निदर्शनास आणुन देवु इच्छित आहे. आपणांस आठवत असेल, काही कालावधीपुर्वी उच्च न्यायालमध्ये एक जनहित याचिका दाखल करण्यात आली होती. त्यावेळेस न्यायालयाने सुध्दा मान्य केले होते की, आयुक्त पदावर कमीत कमी तीन वर्षासाठी कोणत्याही आयुंक्तास ठेवले जावे. त्या अगोदर कुणाचीही बदली केली जावु नये. आपणांस कदाचित हे माहित असेल. सचिव साहेब आपणांस माहित असेल. असा एक निर्णय आला होता. याचाच अर्थ तीन वर्षाबाबतीत असा काही नियम आहे ज्याचे उच्च न्यायालय सुध्दा समर्थन करते. एवढे माझ्या लक्षात आहे ते मी आपल्या निदर्शनास आणुन देवु इच्छितो. पुढे यांच्या प्रश्नाचे जे काही उत्तर देवु इच्छित असाल ते दया.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>सन्माननिय महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, मला उत्तर पाहिजे. नियम आहे किंवा नाही. शासन निर्णय असेल तर त्याची प्रत दया. उपलब्ध नसेल तर तसे सांगा की आमच्याकडे उपलब्ध नाही. तसा शासन निर्णयच नाही. आपणांस कायदेशीर सल्ला देण्यासाठी येथे कोणी नाही ?

<u>आयूक्त (श्री. अशोक बागेश्वर):—</u>सन्माननिय महापौर महोदया, असा शासनाचा आदेश आहे. तो सध्या उपलब्ध नाही. आपणांस पाहिजे तर आम्ही आपणांस उपलब्ध करुन देवु. सर्वसाधारणपणे एका अधिका—याची नियुक्ती ही तीन वर्षासाठी असते. जर शासनाला वाटले तर त्या पदावरील नियुक्ती पुढे चालु ठेवली जावु शकते. किंवा शासन त्याची बदली करु शकते.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>हे शासनावर अवलंबुन आहे. शासन निर्णय तर काही नाही ना?

<u>आयूक्त (श्री. अशोक बागेश्वर):—</u>शासनाचे धोरण हे शासन निर्णयच असतो ना?

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>शासनाचा जो काही नियम निघतो त्याची पुस्तिका निघते. जसे महापालिकेचे नियम आहेत, तसे शासन नियमाची पुस्तीका असते. असे काही आहे का? आपणांस त्याची काही माहिती आहे का? हे जे तीन अधिकारी आपणाकडे प्रतिनियुक्तीवर आलेले होते त्यांच्या आदेशात असे काही लिहिले होते काय की आपणांस त्याठिकाणी तीन वर्षच तेथे काम करायचे आहे म्हणुन?

<u>आयूक्त (श्री. अशोक बागेश्वर):—</u>महापौर महोदया, हे जे म्हटले तो सर्वसाधारण नियम आहे.

<u>सदस्य श्री. मोहन साधवानी :—</u>त्या अधिका—यांना कोठे पाठवायचे? त्याबाबतचा निर्णय राज्य सरकार घेईल ना?

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :—</u>आयुक्त साहेब, आता तुम्हांला पदोन्नती देवुन येथे आयुक्त म्हणुन पाठविले आहे. महाराष्ट्र शासनाने असे म्हटले आहे का की तुम्ही तीनच वर्ष तेथे जा म्हणुन? असे म्हटलेले आहे का? दाखवा बरे जर कुठल्या आदेशात म्हटले आहे? असे नाही आहे.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी:—</u>मा. महापौर महोदया, उप—महापौर आणि आयुक्त साहेब, एक मुद्दा मी अगोदरच स्पष्ट केला आहे. पुन्हा स्पष्ट करत आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३६ हे अतिशय स्पष्ट आहे. त्यात लिहिले आहे.

आयुक्तांची नेमणुक

(१) आयुक्तांची नेमणूक वेळोवेळी राज्य शासनाकडुन करण्यात येईल.

(२) आयुक्त हा प्रथमत: राज्य शासन ठरविल त्याप्रमाणे तीन वर्षाहून अधिक नसेल अशा कालावधीपर्यंत पद धारण करील आणि त्याची नेमणूक एका वेळी तीन वर्षाहून अधिक नसेल अशा कालावधीसाठी वेळोवेळी नवीनीकृत करता येईल.

<u>सदस्य श्री. गणपत एडके :—</u>मा. महापौरजी, उप—महापौरजी, आयुक्त, सचिव साहेब, मी याठिकाणी जो प्रश्न उपस्थित करणार आहे तो या प्रस्तावाशी निगडित आहे की नाही? मी आपणांस विचारु इच्छितो की, प्रत्येक प्रभागामध्ये १३,१४,८ असे सफाई कामगार दिले होते. ते फक्त कागदोपत्रीच आहे. ते त्याठिकाणी काम करतात. त्याचप्रमाणे पावसाळयामध्ये जे कामगार घेतले जातात ते परत दिले जात नाहीत. आणि त्याचप्रमाणे जे कर्मचारी सेवा निवृत्त होतात, त्यांच्या जागी दुसरा कामगार भेटत नाही.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भल्लर :—</u>मा. महापौर, उप—महापौर, आयुक्त साहेब, जरा उत्तर दया. शासनाच्या कामामध्ये आपण दखल देवु शकतो काय? आपणांस हक्क आहे काय?

<u>आयूक्त (श्री. अशोक बागेश्वर):—</u>सन्माननिय महापौरजी, आपला जो मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम आहे, त्यानुसार शासनास महानगरपालिकेस निर्देश देण्याचे सर्व अधिकार आहेत.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>तसेच श्री. गरड यांची महानगरपालिकेच्या मुख्य लेखा अधिकारी या पदावर प्रतिनियुक्ती शासनाने केली आहे. हे महानगरपालिकेस आपण सांगितले आहे काय? सभागृहासमोर हा विषय आला आहे काय? या प्रस्तावात लिहिले आहे की, श्री. गरड यांची नियुक्ती झाली आहे.

<u>आयूक्त (श्री. अशोक बागेश्वर):—</u>महापौर महोदया, सदर नियुक्तीबाबत शासनाचे असे आदेश आहेत की शासनाने नियुक्ती केल्यानंतर सदरची बाब महासभेसमोर माहितीस्तव ठेवायची एवढेच शासनाचे निर्देश आहेत.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>आपण महासभेपुढे माहितीस्तव ठेवले आहे काय? ते आले आहेत काय? श्री. गरड यांनी पदभार स्विकारला आहे काय?

<u>आयूक्त (श्री. अशोक बागेश्वर):—</u>सन्माननिय महापौर महोदया, सदर अधिका—यांने पदभार स्विकारला होता. त्यानंतर त्यांची नियुक्ती मा. उप—मुख्यमंत्री यांचेकडे विशेष कार्य अधिकारी म्हणुन झाली असून त्या ठिकाणी रुजू होण्यासाठी त्यांना येथून कार्यमुक्त करण्यांत आले आहे..

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>ते आले आणि निघुन सुध्दा.गेले आणि आता आपण येथे सांगत आहात की ते आले आहेत.

<u>सदस्य श्री. दिलीप गायकवाड :—</u>ज्यांची बदली होते. ते अधिकारी येथे येण्यास तयार नाहीत आणि जे अधिकारी काम करतात त्यांना जर तुम्ही परत पाठवत असाल तर त्यांच्या ठिकाणी अगोदरच दुस—या अधिका—याची नियुक्ती करुन घ्या. आज दोन,दोन, तीन—तीन उप—आयुक्त तुम्ही परत पाठवत आहात. पावसाळयाच्या तोंडावर आणि निवडणूकाही येत आहेत. याच्या अगोदर सन्मानिय सदस्य आणि गटनेते श्री. धनंजय बोडारे साहेबांनी तुम्हांला सांगितले. आमच्याकडे काम करणारे जे क्लार्क आहेत त्यांना सुध्दा दोन दोन वर्ष, एक,एक वर्ष, सहा, सहा महिने निवडणूकीच्या कामासाठी पाठविता. कधी कल्याणला पाठविता, कधी अजुन कुठल्या ठिकाणी पाठवता. पण हे जे दोन,दोन, तीन,तीन उप—आयुक्त येथे काम करणारे आहेत, रुपयात बाराआणे, ८० टक्के जे काही काम होईल, ते सुध्दा काम ते नसल्यामुळे होणार नाही. त्यास जबाबदार कोण असणार आहे? आणि हा अधिकार आम्हांला आहे की तुम्हांला आहे ? त्याचा सुध्दा खुलासा येथे झाला पाहिजे. एकाच वेळेला तीन अधिकारी गेल्यानंतर येथिल काम कोण पाहणार आहे? ज्यांची बदली होवून दिल्लीवरुन जे येथे आले ते श्री. गरड साहेब यांनी ताबडतोब बदली करुन घेतली आणि येथुन निघुन गेले. याच्या मागचे कारण काय? नविन अधिकारी यायला तयार नाहीत. जुने काम करतात त्यांना तुम्ही काम करु देत नाहीत. म्हणजे ''बाप भिक मागु देत नाही आणि आई जेवु घालत नाही'' अशी परिस्थिती तुम्ही करणार आहात काय? त्याचे उत्तर दया.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :—</u>महापौर महोदया, उप—महापौर साहेब, आयुक्त साहेब, आमचे मित्र श्री. जीवन इदनानी यांनी एक मुद्दा येथे उपस्थित केला. जे आयुक्त आहेत त्यांच्यावर सुध्दा चौकशीचा प्रश्न काढला. टॅंकर घोटाळयाचे पैसे वसुल करा यांच्या बदल्या झाल्यावर हे पैसे कोणाकडुन वसुल करायचे? तर ठेकेदार घेतलेले पैसे महानगरपालिकेला परत करणार आहेत का? हा सुध्दा मुद्दा उपस्थित व्हायला पाहिजे. आणि चांगले अधिकारी जर असतील तर त्यांना पदोन्नती देवुन त्यांना कायम करावे. जेणेकरुन महापालिकेमध्ये अधिकाऱ्यांवर कामाचा ताण होणार नाही. आणि काम सुरळीत चालेले अशी आमची इच्छा आहे.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :—</u>श्री. सतिश चहाळजी, नमस्कार, आपण पैसे वसुल करण्याबाबत विचार करु नका. मी प्रस्ताव दिला आहे की, त्यांचा अहवाल त्यांच्या ठरावीक त्या विभागास सादर केला जावा. जी चौकशी व्हायची असेल ती त्यांचा विभाग करेल. व पैसे सुध्दा वसुल करेल हा शासनाचा आदेश आहे. व जो वित्त विभाग आहे तो महाराष्ट्र शासनापासुन लांब नाही.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :—</u>श्री. राजु इदनानीजी, शासनाचा येथे आदेश आलेला आहे की, यांची चौकशी केली जावी. व ताबडतोब त्यांच्याकडुन पैसे वसुल केले जावेत. तर त्यावेळेस आमच्या महापालिकेसमोर हे मुद्दे का आले नाहीत? तो अहवाल उघड का करण्यात आला नाही?

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :—</u>माझे बंधु, माझे म्हणण्याचा हाच अर्थ आहे की, आजपर्यंत महासभेसमोर प्रशासनाने हा मुद्दा का आणला नाही? व मला काय जरुरत पडली आहे हा मुद्दा आणण्याची? हा मूद्दा

आयुक्तांनी आणला पाहिजे. उप–आयुक्त यांनी आणला पाहिजे. अन्य अधिका–यांनी आणला पाहिजे. आम्हांला काय माहित? कुठले पत्र आले आहे? आयुक्तांना कोणते पत्र आले आहे? श्री. राजु जग्यासी यांनी टॅकर घोटाळा घोटाळा असे म्हटले, त्याचे काय झाले ते माहित नाही.

सदस्य श्री. राजु जग्यासी :–मा. महापौरजी, श्री. जीवन इदनानी यांच्या मताशी मी सहमत आहे. यांच्या कार्यकालावधीत टॅकर घोटाळा झालेला आहे. या सभागृहापुढे तो आला पाहिजे. कोणत्या ठेकेदाराने हा घोटाळा केला होता? याची इतिवृत्तात नोंद घेतली जावी व त्या ठेकेदारास काळया यादीमध्ये टाकले जावे. व होवु शकत असेल तर घोटाळा केलेली रक्कम त्या ठेकेदाराकडुन वसुल केली जावी. हे इतिवृत्तात आले पाहिजे. मला वाटते संपुर्ण सभागृह माझ्या बरोबर असेल. दुसरी गोष्ट मा. महापौरजी, मी आपणाकडुन एका माहितीची अपेक्षा केली होती की, तीन वर्ष, किती व कोणत्या अधिका–यांना झाले आहेत त्याची माहिती सभागृहासमोर ठेवली जावी.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–याबाबतीत ठराव जर होत असेल, नियम आहे. त्यानुसार तीनच नाहीत तर जेवढे अधिकारी असतील त्यांचा पुढील महासभेत ठराव बनवुन आणावा.

सदस्य श्री. राजु जग्यासी :–होय, पुढील महासभेत ठराव आणावा.

सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–सभागृहासमोर असा ठराव आणावा.

सदस्य श्री. दिलीप गायकवाड :–मा. महापौर महोदया, त्या अगोदर त्यांच्याजागी दुसरे अधिकारी आले पाहिजेत. त्यानंतरच त्यांना पाठवा. ते जातील आणि येथे कुणी आले नाही तर महापालिकेचे काम होणार नाही.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :–मा. महापौर महोदया, ब-याच वेळेपासुन चर्चा चालू आहे. श्री.जीवन इदनानी यांनी दिलेल्या प्रस्तावात तीन अधिका–याची नावे आहेत. बाकी अधिका–यांची नावे नाहीत. श्री. भुल्लर महाराज यांनी सांगितले की, आली तर सर्व अधिका–यांची नावे आली पाहिजेत. आम्हांला सर्व अधिकारी सारखेच आहेत. प्रस्तावात जे नमुद केले आहे त्यास सर्वच्या सर्व सभागृह सहमत असेलच असे नाही. प्रस्तावामध्ये लिहिले आहे की, एकाधिकारशाही होते, नाही, आमचे काही अधिकारी आहेत, श्री. हरेश इदनानी आहेत. श्री. शिर्के आहेत, श्री. मुकेश आयलानी आहेत. यांनी पारितोषिके मिळविली आहेत. अधिकारी याठिकाणी राहिले म्हणजे एकाधिकारशाही होते असे नाही, उलट त्यांचा अनुभव वाढत जातो. ते अनुभवाने परिपक्व होत जातात. त्या अनुभवाचा आम्ही फायदा करुन घेतला पाहिजे. आम्हांला तो करुन घेता येत नाही. तीन अधिकारी येथुन गेले तर , त्यांच्या जागी दुसरे अधिकारी येतील. त्यांच्यासाठी आमच्यात वाद का? खड्डे पडल्यानंतर ते बुजवायचे आहेत तुम्हांला. पाणी नसल्यामुळे ते पुरवायचे आहे तुम्हांला. तुम्ही पाणी पुरविले नाही तर आम्ही उपोषणाला बसणार, येथे बसणार अगदी महापौर, उप–महापौरांपासुन शासन निर्णय आहे त्याची अंमलबजावणी तुम्हांला करायची आहे. आमच्या भावना आहेत, कुठल्या अधिका–याला ठेस पोहचवायची नाही. पण कायदेशीर काय आहे? त्याची तपासणी करा. त्यांनी विषय आणलेला आहे. मी सांगितल्याप्रमाणे या प्रस्तावाशी सर्व सभागृह सहमत नसेलही, पण ठिक आहे. एका सदस्याच्या भावना आहेत, त्याचा सन्मान सर्व सदस्यांनी केला पाहिजे. परंतु त्यातुन मार्ग कसा काढायचा ते तुम्हांला ठरवायचे आहे. जसे श्री. दिलीप गायकवाड साहेबांनी सांगितले की, एक अधिकारी गेल्यानंतर तेथे दुसरा अधिकारी आला पाहिजे. जर एकाही अधिका–याशिवाय जर तुम्ही काम चालवू शकत असाल तर सर्वच्या सर्व अधिका–यांना परत पाठवा. काही अधिकारी असे आहेत, आता तुमचा विषय रंगलेला आहे, असे म्हटले जाते की, ''गव्हाबरोबर किडे रगडले जावु नयेत'' या महानगरपालिकेला काही प्राप्ती आहे तर काही देणी आहे. ज्या प्राप्ती आहेत त्या ठेवल्याच पाहिजे. त्यांच्या विचारांचा, त्यांच्या अनुभवाचा फायदा आम्ही/महापालिकेने करुन घेतला पाहिजे. माझी वैयक्तिकपणे कुणाशी दुश्मनी असेल म्हणुन अशाप्रकारचा दुरुपयोग करता कामा नये, यापुढे होणार नाही. परंतु प्रशासन तुम्हांला चालवायचे आहे. आम्ही निर्णय घेतले, आम्ही तो घेणारच. कारण त्यांनी सांगितले की, तीन वर्षासाठी शासनाचा निर्णय आहे? तर तीन वर्षानंतर बदली व्हावी, कारण एकाधिकारशाही करणार असेल तर त्यास नक्की घालवा. जर कारवाई करायची असेल तर सर्वच्या सर्व अधिकाऱ्यांवर करा. आणि असेही म्हणता येणार नाही की सर्वच अधिका–यांवर करा. ठराव करतांना सर्व अधिका–यांची माहिती आणावयास पाहिजे होती. परंतु आमची चुक आहे ती कबुल करतो. आम्ही फक्त तीन अधिका–यांचा प्रस्ताव आणण्याची घाई केली आहे. बाकीच्यांची माहिती नाही. ही आमची परिपक्वता

नाही. आम्ही ठराव करतांना व्यवस्थित मांडणी करावयास पाहिजे होती व त्या अधिका–यांना किती वर्ष झाले आहेत ते दयायला पाहिजे होते. पण आम्ही घाई केलेली आहे. आम्ही आमची चुक मान्य करतो. पण प्रशासन तुम्हांला चालवायचे आहे. चांगले कुठले, वाईट कुठले याची शहानिशा तुम्ही करा. तुम्ही आम्हांला प्रशासन चांगले दया. शहरातील रस्त्यावरील खड्डे भरा असे श्री. राजु जग्यासी यांनी सांगितले, त्यावर संपुर्ण सभागृहाने टाळया वाजविल्या. खड्डे विरहित शहर करा, पाणी पुरवठा व्यवस्थीत करा, साफसफाई करा, प्रशासन तुम्हांला चालवायचे आहे, मी सर्वांना विनंती करतो, ठराव आलेला आहे. त्यावर निर्णय घ्या.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>श्री. बोडारे साहेब, मी स्पष्टपणे बोलु इच्छितो की, आमचे सुध्दा समर्थन राहिल. जर आपण पुढील महासभेत अशा सर्व अधिका–यांचा प्रस्ताव आणला तर आम्हांला याबाबतीत काही हरकत नाही. आम्हांला कोणत्याही अधिका–याविषयी विशेष आस्था नाही. मोठया मनाने आपण आपली चुक मान्य केली आहे. फक्त तीन अधिका–यांच्या बाबतीत प्रस्ताव आणणे हे बरोबर नाही. मा. महापौरजी, आपण प्रशासनाला आदेश दया की, ज्या अधिका–यांना प्रतिनियुक्तीवर येवुन तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे त्यांना परत पाठविण्याबाबतचा प्रस्ताव पुढील महासभेत सादर केला जावा. असे जर असेल तर आमची काही हरकत नाही. आम्ही आपणांस समर्थन देवु. पाहिजेतर चार दिवसानंतर आपण महासभा ठेवा. महापौरजी, आम्ही आपणांस समर्थन देण्यास तयार आहोत. परंतु सर्वांसाठी कायदा एकच असला पाहिजे. सर्व अधिका–यांकडे एकाच नजरेने पाहिले पाहिजे.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>त्यांनी तसे लिहिले आहे. तीन अधिका–यांची नावे दिली आहेत, बाकी जे अधिकारी असतील त्यांच्याबाबतीतही निर्णय घ्यायचा आहे. बाकी अंमलबजावणी करणे आयुक्तांच्या हातात आहे.

<u>सदस्य श्री. राजु जग्यासी :–</u>सभागृहाला याची माहिती झाली पाहिजे की, असे कोणकोणते अधिकारी आहेत?पाहिजे तर पंधरा दिवसानंतर आपण महासभा ठेवा.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>मी एक उदाहरण देतो, श्री. जवादे यांच्यासाठी गेल्या चार महिन्यापासुन आदेश झाले आहेत. मा. मुख्यमंत्री महोदयांनी आदेश दिले आहेत. परंतु ठाण्याचे आयुक्त त्यांना आपल्याकडे सोडत नाहीत. एकिकडे आपल्याकडे शहर अभियंता नाही. नगररचनाकार नाहीत. असे असतांना आम्ही आमच्या भावना याठिकाणी व्यस्त करत आहोत. भावना व्यक्त करण्याचा प्रत्येकास अधिकार आहे. आणि आम्हांला बरोबर चालायचे आहे. तर हा जो ठराव आहे, त्याबाबतीत पुढच्या महासभेत तुम्ही अधिका–यांच्या नावाची यादी दया. पण आज आम्ही हा ठराव मंजुरीसाठी ठेवला आहे. कारण मागे झालेले आहे. काय फरक पडतो? त्यांनी नावे दिलेली आहेत सर्व...........

<u>सदस्य श्री. सतीश चहाळ :–</u>अशा सर्व अधिका–यांचा एकत्रित ठराव पुढील महासभेत आणा.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u>मा. महापौरजी, उप–महापौरजी, आता श्री. जीवन इदनानी यांनी तीन अधिका–यांबाबतचा जो ठराव आणलेला आहे, तो पारीत करावा आणि तीन वर्ष पुर्ण झालेले बाकीचे जे अधिकारी आहेत त्यांच्याबाबतचा ठराव पुढच्या महासभेत आणा. कोण कोणत्या अधिका–यांना तीन वर्ष झाली आहेत हे तुम्हांला आता सांगता येत नाही म्हणुन तुम्हांला वेळ देण्यात येत आहे. तुम्ही पुढील महासभेत त्यांच्याबाबतचा ठराव आणा. व तोही पारीत करुन टाका. पण आलेला हा विषय पारीत करुन टाका.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :–</u>साहेब, या प्रस्तावासंदर्भात आमच्या पक्षाचा विरोध राहिल कारण काय की आम्ही तुम्हांला विनंती केली आहे की, सर्व अधिक–यांबाबतचा प्रस्ताव तुम्ही पुढील महासभेत आणा. ज्यांना तीन वर्ष झाली आहेत, अशा अधिका–यांमध्ये फक्त या तीनच अधिका–यांचा प्रस्ताव असेल तर आमचा त्यास विरोध राहिल.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–</u>माझ्या प्रश्नाचे प्रथम उत्तर तर दया.

<u>उप–महापौर :–</u>कृपया आपण बसुन घ्या, सचिव साहेब या प्रस्तावावर मतदान घेतले जावे.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :–</u>सन्माननिय महापौरजी, ....    ..

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>आपण अशा प्रकारे कुणाचा आवाज दाबु शकत नाहीत. मी किती तरी वेळेपासुन प्रश्न विचारत आहे त्याचे उत्तर दया. या प्रस्तावावर त्यानंतरच मतदान होईल. प्रथम माझ्या प्रश्नाचे उत्तर दया. १९९६ मध्ये जेव्हा ही महानगरपालिका घोषित करण्यात आली त्यावेळेस शासनाने काय आदेश दिले होते. त्याबाबत काही उत्तर न देता असेच बसुन राहणार काय? आपण उप–महापौरांच्या आसनावर बसला आहात आपण न्याय करत नाहीत. आपण बसा, बसा म्हणत आहात.

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :–</u>मा. महापौरजी, आयुक्त साहेब, काही वेळेला असे म्हटले जाते की, हा प्रस्ताव वगळुन पुढच्या वेळेला घेवु. असा पध्दतीने होते. मला असे म्हणायचे आहे की, सन्माननिय सदस्य श्री. रमेशजी चव्हाण जसे म्हणतात की, हा प्रस्ताव आज पारीत करा. आणि पुढच्या वेळेस बाकीच्यांचा प्रस्ताव आणा हे बरोबर नाही.आपण ज्या लोकांना पदोन्नत्या दिल्या त्यांना किती वर्ष झाली? श्री. रमेश चव्हाणजी जरा लक्षपुर्वक ऐकुन घ्या. किती वर्षानंतर त्यांना पदोन्नत्या देतो आहे? तो लिपिक, शिपाई, मुकादम हा त्या पदास लायक आहे किंवा नाही? हे सर्व तपासून पाहिले गेले आणि त्यानंतरच आपण त्यांना पदोन्नती दिली आहे. मी या प्रस्तावास विरोध करत नाही. परंतु पध्दत अशी आहे की, एखादा गोषवारा जर एकाच अधिकाऱ्याच्या बाबतीत दिला तर ते बरे नाही. यासाठी सगळयांच्या बाबतीत एकत्रित गोषवारा आणा. आणि पास करा. आम्ही सहमत राहु असे मी आरपीआयच्यावतीने सांगतो आहे.

यावेळी सदस्य श्री. रविंद बागूल, श्री. प्रशांत धांडे हे सभागृहातून बाहेर गेले.

<u>महापालिका सचिव :–</u>ठिक आहे? पास?

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>सचिव साहेब, प्रथम माझ्या प्रश्नाचे उत्तर दया.

<u>महापालिका सचिव :–</u>मा. महापौर महोदया, आपले सन्माननिय सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी यांनी जो प्रश्न विचारला आहे, मला आठवत नाही ते कोणत्या संदर्भातील शासन निर्णयाबाबत विचारत आहेत? आणि मला असा कोणताही शासन निर्णय आठवत नाही. आणि त्यांचे दुसरे असे म्हणणे आहे की येथिल स्थानिक जे अधिकारी आहेत त्यांना पदोन्नती मिळाली पाहिजे. त्याबाबतीत नियमामध्ये स्पष्ट तरतूद आहे की, जेवढी काही पदे रिक्त असतील त्यातील ५० टक्के पदावर स्थानिक लोकांना पदोन्नती मिळाली पाहिजे. परंतु पदे रिक्त राहिल्यामुळे अदयापपर्यंत कुणाला पदोन्नती मिळाली नाही. त्यामुळे या पदांवर प्रतिनियुक्तीने अधिकारी मागविले जातात. ही पदे जर भरली तर ती रिक्त राहणार नाहीत. त्यामुळे प्रतिनियुक्तीने कुणी येणार नाही. या पदांसाठी काही पात्र उमेदवार असू शकतील.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–</u>मा. महापौरांना मी निवेदन करेन की, आमचे जे अधिकारी या पदांना पात्र आहेत, त्यांना त्वरीत पदोन्नती दिली जावी. ५० टक्के अधिकारी जर आपल्या येथिल असतील तर आमच्यासाठी फारच चांगले होईल. यासाठी मी आपणांस विनंती करतो की, याबाबतचा विषय लवकरात लवकर महासभेपुढे आणला जावा व जे पात्र आहेत त्यांना पदोन्नती दिली जावी.

<u>महापालिका सचिव :–</u> ठिक आहे? या प्रस्तावाबाबत मतदान घ्यायचे ? जे सन्माननिय सदस्य या प्रस्तावाच्या बाजुने आहेत त्यांनी कृपया आपला हात वर करावा.

<u>प्रस्तावाच्या बाजुने २६ मते</u>

१. श्रीमती. विद्या निर्मले
२. श्रीमती. ज्योती चैनानी
३. श्री. दत्तात्रय पवार
४. श्री. दिलीप जग्यासी
५. श्री. गोविंदराम लुंड
६. श्री. जीवन इदनानी

७. श्री. जमनादास पुरस्वानी
८. श्री. रामचंद्र पारवानी
९. श्री. लाल पंजाबी
१०. श्रीमती शकुंतला पाटील
११. श्री. किशोर जग्यासी
१२. श्री. लालबिहारी यादव
१३. श्री. अंकुश म्हस्के
१४. श्री. विनोद ठाकूर
१५. श्री. धनंजय बोडारे
१६. श्री. दिलीप गायकवाड
१७. श्री. राजेंद्रसिंह भुल्लर
१८. श्री. रमेश चव्हाण
१९. श्री. रामसागर यादव
२०. श्रीमती. वसुधा बोडारे
२१. श्रीमती. राजश्री चौधरी
२२. श्रीमती. नेहा भोईर
२३. श्रीमती. ज्योती माने
२४. श्रीमती. जयश्री सुर्वे
२५. श्रीमती. चंद्रा टेकचंदानी
२६. श्री. विजय सुपाळे

<u>महापालिका सचिव :—</u>जे या प्रस्तावाच्या विरोधात आहेत त्यांनी कृपया आपला हात वर करावा.

<u>प्रस्तावाच्या विरोधात ११ मते</u>

१. श्री. मोहन साधवानी
२. श्री. तुलसीदास वसीटा
३. श्रीमती. इंदिरा उदासी
४. श्री. राजू जग्यासी
५. श्री. प्रभुनाथ गुप्ता
६. श्री. सतीश चहाळ
७. श्री. गणपत एडके
८. श्री. भारत राजवानी
९. श्रीमती. सुजाता रिजवानी
१०. श्रीमती. निलू चांदवानी
११. श्रीमती. मंजू पोपटानी

<u>महापालिका सचिव:—</u>व या प्रस्तावाबाबत जे तटस्थ राहु इच्छितात त्यांनी कृपया आपला हात वर करावा. श्री. बी.बी. मोरेजी आपण तटस्थ आहात काय?

<u>सदस्य श्री. बी.बी. मोरे :—</u>तटस्थ.

<u>तटस्थ</u> ३

१. श्री. बी.बी. मोरे
२. श्री. नरेंद्र दवणे
३. श्रीमती जयश्री ज्ञानेश्वर पाटील

महापौर :—या प्रस्तावाबाबत बहुमताने पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑

प्रस्तावावी सूचना

**विषय क्र. ११ :—** उल्हासनगर महानगरपालिकेत तीन वर्षापेक्षा अधिकाळ प्रतिनियुक्तीने नियुक्त अधिकाऱ्यांना कार्यमुक्त करणे विषयी श्री. जीवन इदनानी या पालिका सदस्याचा प्रस्ताव.

प्रस्तावना

शासनातर्फे वेळोवेळी उल्हासनगर महानगरपालिकेचे आस्थापनेवर असलेल्या विविध पदावर विविध अधिकाऱ्यांची प्रतिनियुक्तीने नियुक्ती केली जात आहे. सदरहु अधिकाऱ्यांची प्रतिनियुक्तीचा कालावधी ३ वर्षापेक्षा जास्त असु नये असा नियम आहे.

सद्या महापालिकेत प्रतिनियुक्तीने नेमलेल्या खालील अधिकाऱ्यांचा कालावधी ३ वर्षापेक्षा अधिक झाला असून त्याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अनु.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | पद | नियुक्तीचा दिनांक | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १) | श्री. मिलिंद सांवत | उप—आयुक्त | ०१/०३/२००६ | ३ वर्ष ३ महिने |
| २) | श्री. दिपक सांवत | उप—आयुक्त | १७/०१/२००६ | ३ वर्ष ६ महिने |
| ३) | श्री. अनुदिप दिघे | मुख्य लेखा परिक्षक | २७/०७/२००५ | ४ वर्ष |

या व्यतिरिक्त इतर अधिकारी महानगरपालिकेत आहेत ज्यांना ३ वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला आहे. सविस्तर माहिती उपलब्ध नसल्यामुळे तपशिलवार माहिती देता येत नाही.

श्री. ध.म. गरड यांची महापालिकेत मुख्य लेखा अधिकारी या पदावर प्रतिनियुक्तीने शासनातर्फे नियुक्ती करण्यांत आली असून पूर्वीचे मुख्य लेखा अधिकारी श्री. अनुदिप दिघे यांना कार्यमुक्त करणे आवश्यक होत परंतु तत्कालीन आयुक्तांनी शासनातर्फे आदेशाशिवाय व मंजुरी शिवाय थेट मुख्य लेखा परिक्षकाचे पद सोपविले व त्यांची महापालिकेत मुख्य लेखा परिक्षक या पदावर प्रतिनियुक्तीने नेमणूक कायम केली त्यामुळे महापालिका निधीतुन त्याच्या पगाराची रक्कम अदा करणे हे नियमबाहय असून त्यांना त्या पदावर ठेवता कामा नये तसेच त्यांची या महापालिकेत शासनाचे व महासभेच्या मान्यतेशिवाय असून ती बेकायदेशीर आहे व ३ वर्षापेक्षा अधिक आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे शासनाने महानगरपालिकेत किंवा इतर काही संस्थेत नियुक्ती प्राधिकरणाच्या संमती शिवाय कोणत्याही अधिकाऱ्यांमुळे महापालिकेच्या पात्र कर्मचाऱ्यांना/अधिकाऱ्यांना पदोन्नतींची संधी उपलब्ध होवू शकत नाही याव्यतिरिक्त ३ वर्षापेक्षा अधिक असलेल्या कालावधीमुळे त्या अधिकाऱ्यांच्या एकाधिकारशाही तयार होते.

सबब उल्हासनगर महानगरपालिकेत प्रतिनियुक्तीने नियुक्त केलेल्या ज्या काही अधिकाऱ्यांना ३ वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला आहे त्यांना कार्यमुक्त करण्यासाठी प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र २५** **दिनांक:—०४/०८/२००९**

सुचकाचे नाव :— श्री. जीवन इदनानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

ही महासभा वरील प्रस्तावने नूसार उल्हासनगर महापालिकेत १) श्री. मिलिंद सावंत २) श्री दिपक सांवत ३) श्री. अनुदिप दिघे व इतर अधिकारी/कर्मचारी ज्यांची महापालिका सेवेत प्रतिनियुक्तीवर नेमणूक करण्यात आली आहे व जे ३ वर्षापेक्षा जास्त कालावधीपासून प्रतिनियुक्तीने कार्यरत आहेत त्यांना ताबडतोब कार्यमुक्त करण्यास आयुक्तास प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

बहुमताने

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १२ वाचुन दाखवितात

---

➪ विषय क्र. १२ :— <u>प्रस्तावावी सूचना</u>

शहरातील राहिलेल्या इमारतीची व जमीनीची कर आकारणी करणे विषयी श्री. लाल पंजाबी, पालिका सदस्य यांचा प्रस्ताव.

---

<u>सदस्य श्री. लाल पंजाबी :—</u>आपल्या कर विभागाकडुन सर्व मिळकतींना कर आकारणी केली पाहिजे. असा नियम सुध्दा आहे. परंतु ब—याचवेळा आपण बघतो की, ब—याचशा मिळकतींची कित्येक वर्षापासुन कर आकारणी झालेली नाही. आणि त्यासाठी कुणालाही जबाबदार धरले जात नाही. या सभागृहात एका मिळकतीबाबत आपणांस माहिती मिळाली होती जिची कित्येक वर्ष कर आकारणी झालेली नव्हती. श्री. धनंजय बोडारे यांनी त्याबाबत प्रश्न विचारल्यानंतर त्या मिळकतीस कर आकारणी करण्यात आली. तसेही आमचे प्रशासन व कर विभागातील कर्मचारी याबाबतीत अशी अपेक्षा करतात की, लोक आमच्याकडे आल्यानंतर आम्ही त्या मिळकतीची पाहणी करु आणि त्यानंतर तिला कर आकारणी करु. परंतु मला असे वाटते की, आपले धोरण असे असले पाहिजे की, कर आकारणी करुन घेण्यासाठी लोक आपणाकडे येवोत किंवा न येवोत आपण त्यांच्याकडे गेले पाहिजे. कारण आपला महसुल बुडत आहे. जर एखादया मिळकतीस वर्षानुवर्षे कर आकारणी केली जात नसेल तर महानगरपालिकेच्या महसुलाचे नुकसान होते. यासाठी प्रामुख्याने आमच्या कर्मचा—यांच्या मानसिकतेमध्ये बदल झाला पाहिजे की कर आकारणी करणे ही आमची जबाबदारी आहे. आणि आम्ही या सर्व मिळकतींची कर आकारणी केली पाहिजे. आता हा प्रस्ताव दिल्यानंतर मला असे समजले आहे की, ब—याचशा मिळकतींना कर आकारणी करण्याचे काम सुरु झालेलेही आहे. ही फार चांगली गोष्ट आहे, याबद्दल मला असे वाटते की आपण आपल्या कर्मचा—यांना असे निर्देश दिले पाहिजे की, ज्या मिळकतींना कर आकारणी करण्यात आलेली नाही अशा सर्व मिळकतींना तीन महिन्याच्या आत कर आकारणी केली जावी. जर एखादे लहान मोठे बांधकाम राहत असेल तर ते आपण समजु शकतो. परंतु पुर्ण इमारतच्या इमारत जर कर आकारणीपासुन सुटत असेल तर त्यासाठी संबंधीत अधिका—यास निश्चितपणे जबाबदार धरले पाहिजे. असा माझा ठराव आहे. माझे म्हणणे आहे की, प्रशासनाने लोकांकडे गेले पाहिजे. व पाहिले पाहिजे की, प्रत्येक विभागातील मिळकतीस कर आकारणी झाली आहे किंवा नाही? व जाणीवपुर्वक जर कर आकारणी केली जात नसेल तर संबंधीत अधिका—यावर, कर्मचा—यावर कारवाई झाली पाहिजे. असा माझा प्रस्ताव आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>मा. महापौर महोदया, आदरणीय सदस्य श्री. लाल पंजाबी यांनी जो प्रस्ताव आणलेला आहे. त्या विषयाबाबत मी बोलु इच्छितो, या अगोदरचे आमचे जे आयुक्त होते, त्यांनी एक प्रस्ताव तयार करुन सर्व गटनेत्यांसमोर ठेवला होता की जर या शहरातील कर विभागाच्या कामकाजाचे खाजगीकरण केले तर येणा—या तीन वर्षानंतर जी कर वसुली होईल ती १०० कोटीपर्यंत पोहोचेल. अशा प्रकारचा प्रस्ताव त्यांनी आम्हाला दिला होता. आज सुध्दा त्याची प्रत माझ्याकडे आहे. त्यांनी असे दर्शविले होते की, या शहरातील कर वसुली, बिल वाटप करण्याचे काम तसेच कर आकारणी करण्यासाठी वर्षभराचा जो खर्च आहे तो एकुण कर वसुलीच्या १० टक्के एवढा आहे. आज जर ३३ कोटी कर वसुली येत आहे, त्यांनी असे दर्शविले होते की, बऱ्याचश्या मिळकतींना आजपर्यंत कर आकारणी करण्यात आलेली नाही. तर कर आकारणी न केल्यामुळे व आमच्या अधिका—यांच्या बेपर्वाईपणामुळे आम्हांला आज प्रत्येकवर्षाला २५ कोटीचे नुकसान होत आहे असे त्यांच्या प्रस्तावात होते. श्री. बोडारे साहेब व आम्ही सर्वजण त्यावेळी बरोबर होतो. त्यावेळी आम्ही असा निश्चय केला होता की जर एखादी खाजगी संस्था शहरातील कर आकारणी न झालेल्या मिळकतींना कर आकारणी करुन जर १०० कोटीपर्यंत कर वसुली करु शकते तर आमच्या उल्हासनगर महानगरपालिकेचे अधिकारी का करु शकत नाहीत ? तर मी आपणांस निवेदन करेन की, जसा प्रस्ताव श्री. लाल पंजाबी यांनी आणला आहे की तीन महिन्याची मुदत दिली जावी. या कालावधीत सर्वच्या सर्व मिळकतींना कर आकारणी केली पाहिजे. एखादी लहान मोठी मिळकत राहत असेल तर ती गोष्ट वेगळी आहे. परंतु जर फार मोठे असे बांधकाम कर आकारणीतुन सुटत असेल तर संबंधीत अधिका—यास जबाबदार धरुन त्यावर कारवाई केली पाहिजे. जेणेकरुन या शहराच्या महसुलामध्ये प्रतिवर्षाचे जे २५ कोटीचे नुकसान आहे ते वाचविले जावु शकेल. धन्यवाद ।

यावेळी सदस्या श्री. प्रशांत धांडे यांनी पुन्हा सभागृहात प्रवेश केला.

**सदस्य श्री. बी.बी. मोरे :—** सन्माननिय महापौरजी व आयुक्त साहेब, श्री. लाल पंजाबी यांनी, शहरातील राहिलेल्या इमारतींना कर आकारणी करण्याविषयीचा हा जो प्रस्ताव आणलेला आहे, त्याचा तो गोषवारा मी पाहिला आहे. त्या गोषवा—यामध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की, ज्या ज्या अधिका—यांनी आतापर्यंत कर आकारणी केलेली नसेल त्याला महापालिकेने अभय देवु नये. त्या अधिका—यांचे या महासभेत नाव घोषित केले पाहिजे की कुठल्या कुठल्या अधिका—याने कर आकारणी केली नाही. महापालिकेचे नुकसान त्या अधिका—यांनी केलेले आहे. त्यांची वार्षिक वेतनवाढ बंद केली पाहिजे. त्याच्या पगारातुन ती रक्कम वसुल केली पाहिजे.कारण आमचे श्री.जमनु पुरस्वानी म्हणतात तीन महिन्याची त्यांना मुदत दिली पाहिजे, म्हणजे ''चोराच्या वरती घोंगडी टाकणे'' म्हणजे त्याला अभय देणे असा प्रकार आहे. मी तर म्हणतो ज्यांनी ज्यांनी कर आकारणी केली नसेल अशा अधिका—यांची नावे जाहिर करावीत. आणि त्या अधिका—यांवर योग्य ती कारवाई करावी आणि मग एक समिती बसवावी. आणि त्या समितीच्या वतीने ती कर आकारणी किती महिन्यात करत आहेत, का सोडली गेली, का केली गेली नाही या प्रश्नांची उत्तरे मिळाली पाहिजेत. नाहीतर सर्व असेच चालले आहे ते बरोबर नाही. आणि म्हणून माझी विनंती आहे आयुक्त साहेबांनी याबाबतीत आदेश काढावेत. कर आकारणी विभागाचे कोणी अधिकारी येथे उपस्थित असतील तर त्यांची माझे प्रश्नांची उत्तरे द्यावीत. सर्व प्रश्नांची उत्तरे आमचे जे नवीन आयुक्त आले आहेत तेच देत आहेत. परंतु ज्या विभागाची संबंधीत हे प्रश्न आहेत ते अधिकारी येथे उपस्थित नाहीत. आम्ही सन्माननीय सदस्य उपस्थित राहतो. आणि प्रत्येक विषयावर चर्चा करतो. परंतु संबंधीत विभागाचे अधिकारी येथे उपस्थित नसतात. आणि म्हणून कर आकारणी विभागाचा जो अधिकारी असेल त्यांनी व्यासपीठावर यावे व कोणकोणत्या अधिका—यांनी कर वसूली केलेली नाही ते जाहिर करावे. ती का केली नाही? कशासाठी केली गेली नाही? त्यांनी लाच वगैरे घेतली आहे का? मी तर महासभेत असे सांगू इच्छितो की कर विभागातील शिपाई, लिपिक व अधिका—यांनी लाच घेतली असेल आणि महापालिकेचा महसूल बुडविला आहे. आणि म्हणून माझा आरोप आहे की अशा अधिका—यांची नावे येथे घोषित करावीत. आणि त्यांच्यावर योग्य ती कारवाई करावी. काय येथे उत्तर देणेसाठी कर विभागाचा कोणी अधिकारी उपस्थित नाही?

**श्री. हरेश इदनानी (प्र.उपआयुक्त, शहर) :—** श्री. लाल पंजाबी साहेबांनी हा जो प्रस्ताव मांडला आहे की महानगरपालिका हद्दीमध्ये जेवढया काही मिळकती आहेत त्यांची मोजणी करून त्यास कर आकारणी केली जावी. त्याबाबतीत सर्वात प्रथम मी आपणांस कायद्यातील तरतूद सांगू इच्छितो, याबाबतीत मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियमात कराधान नियम म्हणून एक प्रकरण आहे. ज्यामध्ये प्रत्येक बाबीचे स्पष्टिकरण दिलेले आहे. त्यामध्ये सर्वात प्रथम असे आहे की, महानगरपालिकेचे मालमत्ता कराची जी देयके आहेत. ती पहिल्या तारखेस शहर वासियांनी महापालिकेत येवून भरावयाची आहेत. महानगरपालिका हद्दीत जर मिळकतीवर कोणत्याही प्रकारे नावात बदल होत असेल जसे की, तहसीलदार कार्यालयात जावून मिळकती संदर्भात खरेदीखत केले जाते. त्याबाबतीत संबंधीत मालकाने पंधरा दिवसाच्या आत महानगरपालिकेला माहिती द्यावयाची आहे. याचप्रकारे जर बांधकाम केले जात असेल तर त्यांनी पंधरा दिवसाच्या आत महानगरपालिकेला माहिती द्यावयाची आहे. तसेच ज्याच्या नावावर मिळकत असेल अशा मालमत्ता धारकाचे निधन झाले असेल तर त्याच्या कुटुंबियांनी महापालिकेला कळविले पाहिजे. तसेच एखाद्या मालमत्तेचे जर निष्कासन झालेले असेल तर त्याबाबतीतही संबंधीत मालमत्ताधारकाने कळविले पाहिजे की, या मिळकतीचे मालमत्ता धारक निधन पावले आहेत, ही मिळकत निष्कासीत झाली आहे. त्यामुळे या मिळकत धारकाचे नावात बदल करा किंवा निष्कासीत झालेली मिळकत मालमत्ता कराच्या खात्यातून वगळली जावी. अशा काही तरतुदी आहेत ज्यांची जबाबदारी मालमत्ताधारकांवर आहे. याबाबतीत आणखीही आपणांस सांगू इच्छितो की, जसा आयकर आहे. त्याबाबतीत आपणांस माहित आहे की, १५ जुलै, १५ सप्टेबर, १५ मार्च या दरम्यान आपणाकडे आयकर वसूलीसाठी कोणताही आयकर अधिकारी येत नाही. वॅट कराचा भरणा करून घेणेसाठी कोणताही अधिकारी येत नाही.

**सदस्य श्री. बी.बी. मोरे :—** श्री. हरेश इदनानीजी आपण आयकर, वॅट कराबाबतीत जे काही सांगत आहात त्याबाबतीत मी काही विचारलेले नाही. मी काय विचारले आहे? कर वसूली अधिकारी किती होते आणि त्यांनी काय केले आहे? त्यांनी कर वसूली का केली नाही? माझे म्हणणे आहे की, उल्हासनगर महानगरपालिकेने जे अधिकारी नियुक्त केले आहेत. व ज्यांनी कर वसुली केली नाही त्यांची नावे जाहिर केली पाहिजेत. का आपण त्यांना अभय देत आहात की, तीन महिन्यामध्ये त्यांनी वसुली केली पाहिजे? असे का होत आहे?

**आयूक्त (श्री. अशोक बागेश्वर):—** सन्माननीय महापौर महोदया प्रथमत: मी स्पष्ट करतो की, सदरचा प्रस्ताव हा अशासकीय प्रस्ताव आहे? वसुली झाली नाही असा प्रस्ताव प्रशासनातर्फे आणलेला नाही. या प्रस्तावात जसे प्रस्तावित केले आहे की, वसुली झाली नसल्यास वसुली करावी त्यानुसार वसुली करण्यात येईल. वसुली झालेली नाही किंवा वसुली राहिली आहे. असा प्रस्ताव आम्ही प्रशासनामार्फत सभागृहात आणलेला नाही. हा प्रस्ताव अशासकिय आहे. याच्यावर निर्णय सभागृहाने घ्यायचा आहे.

**सदस्य श्री. बी.बी. मोरे :—** या गोषवाऱ्यामध्ये तुम्हीच म्हटले आहे की मुंबई प्रातिक महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची 'ड' च्या प्रकरण ८ मधील नियम २० प्रमाणे आयुक्तास प्रत्येक सरकारी वर्षात

आकारणी पुस्तकात सुधारणा करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. उल्हासनगर शहरात बऱ्याच जमीनी व इमारतीची कर आकारणी करण्यात आलेली नाही. त्यामुळे महापालिकेचे करोडो रुपयाचे आर्थीक नुकसान होत आहे. कर आकारणी न करण्याचे मुळ कारण आहे महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी.. हा गोषवारा कोणी आणला आहे ?

यावेळी सदस्या श्रीमती. चंद्रा टेकचंदानी, श्रीमती ज्योती चैनानी, श्रीमती निलु चांदवानी व श्रीमती मंजू पोपटानी या सभागृहातून बाहेर गेले.

**महापालिका सचिव:—** हा प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री. लाल पंजाबी यांनी आणला आहे.

**सदस्य श्री. बी.बी. मोरे :—** अशा प्रकारचा प्रस्ताव जेव्हा महासभेसमोर आणला जाातो. तेव्हा प्रशासन सुध्दा त्यास समत आहे, त्यांनी जो गोषवारा दिला आहे तो वाचून मी दाखवतो.

**महापालिका सचिव:—** मा.महापौर महोदया .....

**सदस्य श्री. बी.बी. मोरे :—** सचिवजी एक मिनिट, गोषवाऱ्यात काय लिहिले आहे, महापालिकेचे आर्थिक नुकसान होऊ नये. व जमिनीचे कर आकारणीचे पुस्तक ठेवणे आवश्यक आहे. परंतु महापालिका अधिकारी व कर्मचारी दिरंगाई करुन तसेच कायद्याचे उल्लंघन करुन महापालिकेचे आर्थिक नूकसान करीत आहेत ते होऊ नये म्हणून सदरहू कर आकारणी ३ महिन्याचे आत झाली नाही तर कसूरदार अधिकारी व कर्मचाऱ्यावर कारवाई करण्यासाठी महासभेपुढे प्रस्तावित असा गोषवारा आहे. याबाबती सरळ सरळ मी असे म्हणतो की कर आकारणी करणाऱ्या अधिकाऱ्यांने पैसे खाल्ले आहेत. आणि कर आकारणी केलेली नाही. जिना सोडला, फुटपाथ सोडला अशा प्रकारे सर्व वाटोळा केलेला आहे. तेव्हा तुम्ही योग्य ती कारवाई करा, नाहीतर महापालिका बुडीत खात्यात जाईल. आणि शेवटी आपल्याला शासनाकडून, इकडून तिकडून कर्ज घेवून या कर्मचाऱ्यांचा पगार द्यावा लागेल. अन्यथा तो वेळेवर दिला जाणार नाही मी अशी सुचना करतो की, श्री. लाल पंजाबी यांनी हा जो प्रस्ताव आणलेला आहे. त्यामध्ये काय काय म्हटले आहे ते मी वाचून दाखविले आहे. त्यावर योग्य तो तोडगा काढावा., याच्यावर एक समिती नेमावी. आणि त्या समितीमध्ये सन्माननीय सदस्य असावेत, सन्माननीय सदस्य विचारतील की कर आकारणीचे अधिकारी कोण होते ? का कर आकारणी केली नाही ? हे सर्व झाले पाहिजे, नाहीतर साहेब, तुम्ही इथे होतात की नव्हता त्यावेळेला, एक—एक कर्मचारी तीन तीन वेळा निलंबित झाला आहे. या अशा कारणास्तव व पुन्हा या महापालिकेत असतो. या सर्व गोष्टी या महापालिकेत चालल्या आहेत. आणि म्हणूनच माझा सक्त विरोध आहे की, हे असे होऊ नये, आणि जर होत असेल तर ती महापालिका बुडीत खात्यात आल्याशिवाय राहणार नाही.

**सदस्य श्री. दत्तात्रय पवार:—** मा.महापौरजी याबाबत समिती आहे आणि या समितीच्या सभापती आरपीआयच्या श्रीमती लता निकम या आहेत. याची कल्पना श्री.मोरे साहेबांना मी करुन देतो. त्यासाठी वेगळी समिती नेमण्याची गरज नाही. कारण की तुमच्याच पक्षाच्या सदस्या सभापती आहेत. आणि कधाचीत मला वाटते तुमच्या हे लक्षात नसेल याची पुन्हा आठवण करुन देवू इच्छितो.

**आयूक्त (श्री. अशोक बागेश्वर):—** मा.महापौर महोदया, सदरचा जो प्रस्ताव आलेला आहे. मला असे वाटते की त्याचा मागचा उद्देश महापालिकेचे उत्पन्न वाढावे. कर आकारणी करण्याबाबतीत महापालिकेमार्फत ज्या त्रुटी राहिल्या आहेत. त्या दुर करुन जास्तीत जास्त उत्पन्नाचे स्ओत निर्माण करण्याचे व महापालिका आर्थिक दृष्टया सक्षम कशी होईल, हा उद्देश आहे माझी सर्व सभागृहाला विनंती आहे या प्रस्तावा मागे आपणास अभिप्रेत असलेली जी भावना आहे ती लक्षात घ्यावी व त्यावर निर्णय घ्यावा, अशी आपणांस विनंती करतो.

**सदस्य श्री. धनंजय बोडारे :—** आयुक्त साहेब, श्री. लाल पंजाबी साहेबांनी जो प्रस्ताव आणलेला आहे तो अतिशय योग्य आहे त्यावर भरपूर चर्चा झालेली आहे आणि सभागृहाची तशी भावना आहे, काही चुका चुकून होतात, काही चुका जाणूनबूजून होतात. पण झाले त्याच्यावर कारवाई करत बसण्यापेक्षा, ठिक आहे, त्या अगोदर आपली चुक सुधारावी कशी त्याकडे हा कल आहे. महापालिकेचे उत्पन्न वाढवायचे कसे, तर पुढील ३ महिन्याचा कालावधी दिलेला आहे, यापूर्वी काय झालं, कशामुळे चुका झाल्या आणि चुका कशा झाल्या, याच्यातून वसूली वाढली तर आपणास कळेल, कुठल्या विभागातील मालमत्ता सुटलेल्या होत्या, कुठल्या विभागातील घेतल्या होत्या आणि या ठरावामध्ये अप्रत्यक्षपणे असे दिसून येते की, कर्मचाऱ्यांना संपूर्ण माहिती आहे. कोणत्या मिळकतीना कर आकारणी झालेली नाही. अप्रत्यक्षपणे त्यांनी नमुद केले आहे. त्या कर्मचाऱ्यांना, जे वर्षानवर्षे कर आकारणीचे काम करतात. त्यांना माहित आहे त्यामुळे त्यांच्यावर जबाबदारी टाका. आपणाला त्याच्यावर कारवाई करणे नाही कुठेतरी कार्यप्रणालीत बदल झाला पाहिजे. आणि तो

करण्यासाठी हा प्रस्ताव आहे. कार्यप्रणाली एकदा तयार झाली की वर्षानवर्ष ती तशीच राहणार आहे. ज्या मिळकतींना कर आकारणी करण्याचे राहून गेले असेल त्यांना महापालिकेचे कर आकारणी करण्याचे अधिकारी व कर्मचारी ३ महिन्यामध्ये कर आकारणी करतील. आणि वसूली करतील. पण तसे झाले नाही तर त्यासाठी समिती असेल महसूल समिती तर आहेच, महसूल समिती आणि अधिकारी, त्या विभागाचे सोडून इतर विभागाचे अधिकारी क्रॉस चेकींग करण्यासाठी घेतले जातील. त्याच बरोबर स्थायी समितीचे दोन सदस्य, म्हणजे ९ आणि २ असे ११ आणि २ अधिकारी हे लोक त्यांची क्रासचेकींग करतील. समजा माझ्या प्रभागातील एखादे प्रकरण असेल, मी तक्रार केली असेल तर तेथे अधिकारी जातील. आणि जर तेथील मालमत्तेची कर आकारणी झाली नसेल तर तिच्याशी सबंधीत अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे अशी मागणी या प्रस्तान्वये केली आहे. त्यानुसार या प्रस्तावाच्या ठरावामध्ये एक सुधारणा करु इच्छितो की, त्या समितीमध्ये महसूल समितीचे सर्व सदस्य, स्थायी समितीचे २ सदस्य व दुसऱ्या विभागाचे २ अधिकारी यांचा समावेश करावा. ?

<u>महापालिका सचिव:—</u> पास ? सर्व समतीने ?

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

<u>प्रस्तावावी सूचना</u>

**विषय क्र. १२:—** शहरातील राहिलेल्या इमारतीची व जमीनीची कर आकारणी करणे विषयी श्री. लाल पंजाबी, पालिका सदस्य यांचा प्रस्ताव.

<u>प्रस्तावना</u>

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे अनुसुची 'ड' च्या प्रकरण ८ मधील नियम २० प्रमाणे आयुक्तास प्रत्येक सरकारी वर्षात आकारणी पुस्तकात सुधारणा करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. उल्हासनगर शहरात बरेच जमीन व इमारतीची कर आकारणी करण्यांत आलेली नाही. त्यामुळे महापालिकेचे करोडो रुपयांचे आर्थिक नुकसान होत आहे. कर आकारणी न करण्याचे मुळ कारण आहे. महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी अशा इमारतींना संरक्षण देत आहेत व स्वत:चा फायदा करुन घेत आहेत. महापालिकेचे आकारणीचे पुस्तक ठेवणे आवश्यक आहे. परंतु महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी दिरंगाई करुन तसेच कायदयाचे उल्लंघन करुन महापालिकेचे आर्थिक नुकसान करत आहेत तसे होवू नये म्हणुन सदरहू कर आकारणी ३ महिन्याच्या आत करण्यात निर्देशित करण्यास व ३ महिन्याच्या आत कर आकारणी झाली नाही तर कसुरदार अधिकार/कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी महासभेपुढे प्रस्तावित.

**महासभा ठराव क्र २६** दिनांक:—०४/०८/२००९

सुचकाचे नाव :— श्री. लाल पंजाबी
अनुमोदकाचे नाव :—श्री. जमनादास पुरस्वानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे तीन महिन्याच्या आत शहरातील राहिलेल्या इमारतीची व जमिनीची कर आकारणी करुन कर आकारणी पुस्तकात सुधारणा करण्यास प्रशासनास निर्देश देत आहे. जर तीन महिन्याच्या आत ही कार्यवाही न झाल्यास कसुरदार अधिकारी/कर्मचा—यावर कारवाई करण्यास आयुक्तास प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची <u>सही/—</u>

अनुमोदकाची <u>सही/—</u>

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी

सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १३ वाचुन दाखवितात

---

आयत्यावेळचा विषय

**विषय क्र. १३:—** उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवरील बिल सर्व्हेअर या पदाची रू. २६००—४००० सुधारीत वेतनश्रेणी लागू करणे.

---

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

आयत्यावेळचा विषय

**विषय क्र. १३:—** उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवरील बिल सर्व्हेअर या पदाची रू. २६००—४००० सुधारीत वेतनश्रेणी लागू करणे.

प्रस्तावना

तत्कालीन उल्हासनगर नगरपरिषद ठराव क्र. २३७, दिनांक १५/१२/१९८७ अन्वये 'बिल सर्व्हेअर' या पदाची वेतनश्रेणी रु. २००—३—२५५ विस्तार ऐवजी—५—२८० ऐवजी रु. ५—५—२५०—७—२८५—१०—३०५— विस्तार—१०—३५५ अशी सुधारीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

सदरहु ठरावानुसार महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औदयागिक नगरी अधिनियम १९६५ मधील तरतुदीनुसार मा. संचालक, नगरपालिका प्रशासन मुंबई यांचे मान्यता मिळण्यासाठी प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, ठाणे व मा. प्रादेशिक संचालक तथा विभागीय आयुक्त, नगरपरिषद प्रशासनालय, कोकण भवन यांचे मार्फत सादर करण्यात आला होता.

मा. जिल्हाधिकारी ठाणे यांनी त्यांचेकडील जा.क्र./सामान्य/क्र. ३/टे—२/नपा—४६/८९, दिनांक २३/१/१९८९ व ८/८/१९९९ अन्वये प्रस्ताव शिफारशीसह मा. प्रादेशिक संचालक तथा विभागीय आयुक्त, नगरपरिषद प्रशासनालय, कोकण भवन यांच्याकडे पाठविला.

मा. प्रादेशिक संचालक तथा विभागीय आयुक्त, नगरपरिषद प्रशासनालय, कोकण भवन यांनी त्यांचेकडील पत्र क्र. साशा.का. ४ नपा. ३, प्र.क्र. ८४१/८८, दिनांक ४ जून १९९० अन्वये प्रस्ताव शिफारशीसह मा. संचालक, नगरपालिका प्रशासन मुंबई यांच्याकडे पाठविला.

मा. संचालक नगरपालिका प्रशासन यांचेकडुन मंजुरी प्राप्त न झाल्यामुळे त्यांना कार्यालयीन पत्र दिनांक ९/७/२००८ अन्वये स्मरणपत्र पाठविले असता, त्यांनी त्यांचे दिनांक १८/१२/२००८ रोजीच्या पत्रान्वये असे कळविले आहे की, उल्हासनगर नगरपरिषद रुपांतर महानगरपालिकेत झाले आहे. महानगरपालिकेतील कर्मचा—यांची वेतनश्रेणीबाबत निर्णय घेण्यास नगरपरिषद प्रशासन संचालनालय सक्षम प्राधिकारी नाही. सबब प्राधिकरणाचा मान्यतेने बिल सर्व्हेअर कर्मचा—यांचे सुधारीत वेतनश्रेणी बाबत आपले स्तरावर निर्णय घेण्यात यावा.

तत्कालीन उल्हासनगर नगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्र. २३७, दिनांक १५/१२/१९८७ अन्वये बिल सर्व्हेअर या पदाची वेतनश्रेणी रु. २०३—३—२३०—५—२५५—मु.वा.—५—२८० ऐवजी रु. २५०—५—२५०—७—२८५—१०—३०५—मु.वा.—१०—३५५ अशी दिनांक १/४/१९८२ पासून सुधारीत करण्यास मान्यता दिलेली आहे.

बिल सर्व्हेअर या पदावर कार्यरत असलेल्या कर्मचा—यांनी दिनांक ५/११/२००७ रोजीच्या पत्रान्वये वेतनश्रेणी रु. २०५—३५५ या वेतनश्रेणी ५ व्या वेतन आयोगानुसार समतुल्य वेतनश्रेणी रु. २६००—४००० अशी दि. १/१/१९९६ पासून मंजुर करावी अशी विनंती केलेली आहे.

सबब, महानगरपालिका आस्थापनेवर कार्यरत ''बिल सर्व्हेअर'' या पदाची वेतनश्रेणी रु. २५५०–३२०० वरुन रु. २६००–४००० अशी सुधारीत करणेकरीता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील ५१ (४) मधील तरतुदीनुसार शासनाच्या मंजुरीसाठी मा. महासभेपुढे प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र २७** दिनांकः–०४/०८/२००९

सुचकाचे नाव :– श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :– श्री. लाल पंजाबी

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवर कार्यरत बिल सर्व्हेअर या पदाची अनुज्ञेय वेतनश्रेणी दिनांक १/१/१९९६ पासून रु. २५५०–३२०० वरुन रु. २६००–४००० फेरनिश्चित करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. १४ वाचुन दाखवितात

---

⇨ आयत्यावेळचा विषय

**विषय क्र. १४:–** उल्हासनगर महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांना सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार वेतनश्रेणी निश्चित करणेबाबत.

---

**सदस्य श्री. बी.बी. मोरे :– सभा सुचनेवर** तर १२ विषय आहेत या विषयांचे गोषवारे कुठे आहेत ?

**महापालिका सचिवः–** दिनांक २०/७/२००९ रोजीच्या महासभेत जेव्हा आपण सर्वजण आला होतात तेव्हा आयत्यावेळेच्या ३ विषयांचे गोषवारे आपणा सर्वांना वितरीत करण्यात आले होते. व ते सर्वसंमतीने सभेच्या कामकाजात सामावून सुध्दा घेण्यात आले होते.

**सदस्य श्री. लाल पंजाबीः–** सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार वेतनश्रेणी निचित करणेबाबतचा हा जो विषय आहे. त्याबाबतीत मला असे वाटते की, काही दिवसामध्ये विधानसभा निवडणूकाची आचारसंहिता लागू होऊ शकते. त्यामुळे दोन तीन महिने महासभा होऊ शकणार नाही. त्यासाठी या विषयाच्या ठरावामध्ये एक वाक्य समाविष्ठ करु इच्छितो की, इतिवृत्त कायम होण्याची वाट न पहाता. या ठरावा अंतर्गतचा निर्णय थेट अमलात आणण्यात यावा. या ठरावास शासनाच्या मान्यतेची आवश्यकता आहे का ?

**महापालिका सचिवः–** कार्यवाही पूर्ण करण्यासाठी शासनाची मान्यता आवश्यक आहे. त्यामुळे इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता या ठरावांतर्गतचा निर्णय थेट अमलात आणायचा काय ?

**सदस्य श्री लाल पंजाबीः–** कार्यवाही चालू केली जावी.

**महापालिका सचिवः–** पास ? सर्वसंमतीने ?

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

<u>आयत्यावेळचा विषय</u>

**विषय क्र. १४:—** उल्हासनगर महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांना सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार वेतनश्रेणी निश्चित करणेबाबत.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवर अंदाजे २६०० अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहेत. सर्व अधिकारी/कर्मचारीचाऱ्याना वेतन भत्ते व इतर फायदे महाराष्ट्र सेवा शर्ती नियमानुसार देण्यात येत आहे. सदर नियमानुसार उल्हासनगर महानगरपालिकेचे अधिकारी/कर्मचाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगाच्या वेतन शिफारशीनुसार वेतन व इतर भत्ते मिळत आहे.

राज्य शासनाने शासन आदेश क्. वेपुर १२०९/प्रक्र २७/सेवा ९, दिनांक २२ एप्रिल २००९..अन्वये राज्यातील सर्व शासकीय कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम, २००९ लागू करून सुधारीत वेतनश्रेणी निश्चित केलेली आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेने शासनाच्या धोरणानुसार महापालिकेतील कर्मचाऱ्यांसाठी सहाव्या वेतन आयोगाची शिफारस मंजूर करून अग्रीम रक्कम रू. १०,०००/— पुर्वीच अदा केली आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेतील कर्मचाऱ्याना सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीप्रमाणे वेतन मिळणे करीता विद्यमान वेतनश्रेणी ऐवजी नवीन वेतनश्रेणी लागू करणेसाठी सुधारीत वेतन नियम लागू करणे आवश्यक आहे.

सबब, उल्हासनगर महानगरपलिकेतील अधिकारी व कर्मचाऱ्याना पुढीलप्रमाणे वेतनश्रेणी लागू करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | हुद्दा/संवर्ग | विद्यमान वेतनश्रेणी | सुधारित वेतन संरचना | |
|---|---|---|---|---|
| | | | वेतन बॅड | ग्रेड वेतन |
| १ | वैद्यकिय आरोग्य अधिकारी | १२०००—१६५०० | १५६००—३९१०० | ७६०० |
| २ | शहर अभियंता | १२०००—१६५०० | १५६००—३९१०० | ७६०० |
| ३ | कार्य. अभियंता (सा.बां.) | १०६५०—१५८५० | १५६००—३९१०० | ६९०० |
| ४ | कार्य. अभियंता (विद्युत.) | १०६५०—१५८५० | १५६००—३९१०० | ६९०० |
| ५ | महापालिका सचिव | ८०००—१३५०० | १५६००—३९१०० | ५४०० |
| ६ | उपायुक्त | ८०००—१३५०० | १५६००—३९१०० | ५४०० |
| ७ | कर निर्धारक व संकलक | ८०००—१३५०० | १५६००—३९१०० | ५४०० |
| ८ | मुख्य लेखा अधिकारी | ८०००—१३५०० | १५६००—३९१०० | ५४०० |
| ९ | मुख्य लेखा परिक्षक | ८०००—१३५०० | १५६००—३९१०० | ५४०० |
| १० | सहा. संचालक, नगररचना | ८०००—१३५०० | १५६००—३९१०० | ५४०० |
| ११ | नगररचनाकार | ८०००—१३५०० | १५६००—३९१०० | ५४०० |
| १२ | उप अभियंता (सा.बां.) | ८०००—१३५०० | १५६००—३९१०० | ५४०० |
| १३ | उप अभियंता (विद्युत) | ८०००—१३५०० | १५६००—३९१०० | ५४०० |
| १४ | उप मुख्य लेखा अधिकारी | ७५००—१२००० | ९३००—३४८०० | ४९०० |
| १५ | सहा. आयुक्त/ प्रभागक्षेत्र अधिकारी | ६५००—१०५०० | ९३००—३४८०० | ४४०० |
| १६ | चौकशी अधिकारी | ६५००—१०५०० | ९३००—३४८०० | ४४०० |
| १७ | सादरकर्ता अधिकारी | ६५००—१०५०० | ९३००—३४८०० | ४४०० |
| १८ | जनसंपर्क अधिकारी | ६५००—१०५०० | ९३००—३४८०० | ४४०० |
| १९ | उपकर निर्धारक व संकलक | ६५००—१०५०० | ९३००—३४८०० | ४४०० |
| २० | खरेदी अधिकारी | ६५००—१०५०० | ९३००—३४८०० | ४४०० |
| २१ | भांडार अधिकारी | ६५००—१०५०० | ९३००—३४८०० | ४४०० |
| २२ | लेखा अधिकारी | ६५००—१०५०० | ९३००—३४८०० | ४४०० |
| २३ | लेखापाल | ६५००—१०५०० | ९३००—३४८०० | ४४०० |
| २४ | अंतर्गत लेखा परिक्षक | ६५००—१०५०० | ९३००—३४८०० | ४४०० |
| २५ | वैद्यकिय अधिकारी | ६५००—१०५०० | ९३००—३४८०० | ४४०० |
| २६ | सहा. सार्व. आरोग्य अधिकारी | ६५००—१०५०० | ९३००—३४८०० | ४४०० |
| २७ | सिस्टीम ॲनालिस्ट | ६५००—१०५०० | ९३००—३४८०० | ४४०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २८ | मुख्य विधी अधिकारी | ५५००—९००० | ९३००—३४८०० | ४३०० |
| २९ | मुख्य जकात अधिक्षक | ५५००—९००० | ९३००—३४८०० | ४३०० |
| ३० | कर निरीक्षक / अधिक्षक | ५५००—९००० | ९३००—३४८०० | ४३०० |
| ३१ | मालमत्ता व्यवस्थापक | ५५००—९००० | ९३००—३४८०० | ४३०० |
| ३२ | मुख्य लिपीक | ५५००—९००० | ९३००—३४८०० | ४३०० |
| ३३ | मुख्य बाजार निरीक्षक | ५५००—९००० | ९३००—३४८०० | ४३०० |
| ३४ | लघुलेखक उच्चश्रेणी | ५५००—९००० | ९३००—३४८०० | ४३०० |
| ३५ | उप लेखापाल | ५५००—९००० | ९३००—३४८०० | ४३०० |
| ३६ | सहा. मुख्य लेखा परिक्षक | ५५००—९००० | ९३००—३४८०० | ४३०० |
| ३७ | वाहन व्यवस्थापक | ५५००—९००० | ९३००—३४८०० | ४३०० |
| ३८ | मुख्य आरोग्य निरिक्षक | ५०००—८००० | ९३००—३४८०० | ४२०० |
| ३९ | स्टाफ नर्स | ५०००—८००० | ९३००—३४८०० | ४२०० |
| ४० | अभिलेखापाल | ४५००—७००० | ५२००—२०२०० | २८०० |
| ४१ | बाजार निरीक्षक | ४५००—७००० | ५२००—२०२०० | २८०० |
| ४२ | तरणतलाव व्यवस्थापक | ४५००—७००० | ५२००—२०२०० | २८०० |
| ४३ | वरिष्ठ लेखा परिक्षक | ४५००—७००० | ५२००—२०२०० | २८०० |
| ४४ | मिश्रक | ४५००—७००० | ५२००—२०२०० | २८०० |
| ४५ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | ४५००—७००० | ५२००—२०२०० | २८०० |
| ४६ | प्रोग्रॅमर (संगणक) | ४५००—७००० | ५२००—२०२०० | २८०० |
| ४७ | प्लान्ट ऑपरेटर | ४५००—७००० | ५२००—२०२०० | २८०० |
| ४८ | कनिष्ठ अभियंता (विद्युत)/पर्यवेक्षक | ४५००—७००० | ५२००—२०२०० | २८०० |
| ४९ | जकात निरीक्षक | ४०००—६००० | ५२००—२०२०० | २४०० |
| ५० | वरिष्ठ लिपीक | ४०००—६००० | ५२००—२०२०० | २४०० |
| ५१ | लघुलेखक निम्नश्रेणी | ४०००—६००० | ५२००—२०२०० | २४०० |
| ५२ | तरणतलाव निर्देशक | ४०००—६००० | ५२००—२०२०० | २४०० |
| ५३ | रोखपाल | ४०००—६००० | ५२००—२०२०० | २४०० |
| ५४ | कनिष्ठ लेखा परिक्षक | ४०००—६००० | ५२००—२०२०० | २४०० |
| ५५ | लसटोचक | ४०००—६००० | ५२००—२०२०० | २४०० |
| ५६ | आरोग्य निरीक्षक | ४०००—६००० | ५२००—२०२०० | २४०० |
| ५७ | उद्यान अधिक्षक | ४०००—६००० | ५२००—२०२०० | २४०० |
| ५८ | सुरक्षा अधिकारी | ४०००—६००० | ५२००—२०२०० | २४०० |
| ५९ | आरेखक/ड्राफट्समन | ४०००—६००० | ५२००—२०२०० | २४०० |
| ६० | मुख्य अग्निशमन अधिकारी | ४०००—६००० | ५२००—२०२०० | २४०० |
| ६१ | उप मुख्य अग्निशमन अधिकारी | ४०००—६००० | ५२००—२०२०० | २४०० |
| ६२ | उपस्थानक अधिकारी (अग्निशमन) | ४०००—६००० | ५२००—२०२०० | २४०० |
| ६३ | विजतंत्री | ४०००—६००० | ५२००—२०२०० | २४०० |
| ६४ | संगणक चालक | ३२००—४९०० | ५२००—२०२०० | २००० |
| ६५ | टेलिफोन ऑपरेटर | ३२००—४९०० | ५२००—२०२०० | २००० |
| ६६ | अनुरेखक/ट्रेसर | ३२००—४९०० | ५२००—२०२०० | २००० |
| ६७ | लिडींग फायरमन | ३२००—४९०० | ५२००—२०२०० | २००० |
| ६८ | टंकलेखक | ३०५०—४५९० | ५२००—२०२०० | १९०० |
| ६९ | लिपीक | ३०५०—४५९० | ५२००—२०२०० | १९०० |
| ७० | मिटर रिडर | ३०५०—४५९० | ५२००—२०२०० | १९०० |
| ७१ | वाहनचालक | ३०५०—४५९० | ५२००—२०२०० | १९०० |
| ७२ | मिटर चेकर/दुरूस्तीकार | ३०५०—४५९० | ५२००—२०२०० | १९०० |
| ७३ | मिस्त्री | ३०५०—४५९० | ५२००—२०२०० | १९०० |
| ७४ | सुतार | ३०५०—४५९० | ५२००—२०२०० | १९०० |
| ७५ | ग्वंडी | ३०५०—४५९० | ५२००—२०२०० | १९०० |
| ७६ | थ्फटर | ३०५०—४५९० | ५२००—२०२०० | १९०० |
| ७७ | श्रंगारी | ३०५०—४५९० | ५२००—२०२०० | १९०० |
| ७८ | यांत्रिकी मेकॅनिक | ३०५०—४५९० | ५२००—२०२०० | १९०० |
| ७९ | तारतंत्री | ३०५०—४५९० | ५२००—२०२०० | १९०० |
| ८० | पंपचालक | ३०५०—४५९० | ५२००—२०२०० | १९०० |
| ८१ | फायरमन | २७५०—४४०० | ५२००—२०२०० | १८०० |
| ८२ | मुकादम आरोग्य | २६१०—४००० | ४४४०—७४४० | १६०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८३ | वरिष्ठ सुरक्षारक्षक | २६१०—४००० | ४४४०—७४४० | १६०० |
| ८४ | मुकादम बांधकाम | २६१०—४००० | ४४४०—७४४० | १६०० |
| ८५ | वाहन मदतनीस | २५५०—३२०० | ४४४०—७४४० | १३०० |
| ८६ | शिपाई | २५५०—३२०० | ४४४०—७४४० | १३०० |
| ८७ | बिल सर्व्हर | २५५०—३२०० | ४४४०—७४४० | १३०० |
| ८८ | सफाई कामगार | २५५०—३२०० | ४४४०—७४४० | १३०० |
| ८९ | सुरक्षारक्षक | २५५०—३२०० | ४४४०—७४४० | १३०० |
| ९० | मजूर/माळी/वॉलमन/झारीवाला/ हेल्पर | २५५०—३२०० | ४४४०—७४४० | १३०० |
| ९१ | विद्युत मदतनीस | २५५०—३२०० | ४४४०—७४४० | १३०० |
| ९२ | विद्युत लिपीक | २७५०—४४०० | ५२००—२०२०० | १८०० |
| ९३ | कॅटल कॅचर | २५५०—३२०० | ४४४०—७४४० | १३०० |

महानगरपालिका कर्मचाऱ्यांना सुधारीत वेतनश्रेणी लागू केल्यास अंदाजे १८% ते २५ % पर्यत आस्थापना खर्चात वाढ होईल. दिनांक १ जानेवारी, २००६ ते ३१ मार्च २००९ पर्यंत या कालावधीतील अनुज्ञेय फरकाची रक्कम कर्मचाऱ्यांना पुढील ५ वर्षामध्ये समसमान टप्प्याने त्यांचे भविष्य निर्वाह निधीमध्ये जमा करावयाची आहे. सुधारीत वेतनश्रेणी निश्चित केल्यामुळे होणाऱ्या वाढीव खर्चापोटी काही रक्कमेची तरतुद महानगरपालिकेने सन २००९—१० च्या अंदाजपत्रकात केलेली आहे. त्याप्रमाणे पुढील अर्थिक वर्षामध्येपण आवश्यक ती आर्थिक तरतुद करण्यात येईल.

सबब, उल्हानगर महानगरपालिकेतील कर्मचारी यांना महाराष्ट्र नागरी सेवा सुधारीत वेतन नियम, २००९ लागू करण्याचा प्रस्ताव शासनाच्या मंजूरीच्या अधिन राहुन प्रस्ताव मा. महासभेच्या मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र** २८ **दिनांक:—०४/०८/२००९**

सुचकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :— श्री. लाल पंजाबी

ही महासभा शासनाच्या मंजुरीस अधिन राहून प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेच्या अधिकारी/ कर्मचा—यांना ६ व्या वेतन आयोगाच्या शिफारसी अनुसार महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम २००९ लागू करुन सुधारीत वेतन श्रेणी निश्चित करण्यास मान्य करीत आहे.

परंतु——

दिनांक १ जानेवारी २००६ ते ३१ मार्च २००९ पर्यंतच्या कालावधीतील अनुदेय फरकाची रक्कम कर्मचा—यांना पुढील ५ वर्षे समसमान टप्प्यात त्यांचे भविष्य निर्वाह निधीत जमा करायची आहे.

या ठरावाद्वारे घेतलेला निर्णय अंतिम असून इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता तो थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. १५ वाचुन दाखवितात

---

आयत्यावेळचा विषय

**विषय क्र. १५:—** उल्हासनगर शहराचा सुधारीत विकास आराखडा तयार करणेकामी २ सहा. नगररचनाकार, २ आरेखक, २ अनुरेखक यांची नियुक्ती करणेबाबत.

---

सदस्य श्री. धनंजय बोडारे:— या विषयांशी संबंधीत असलेले सहा. सचांलक नगररचना हे कुठे आहेत ? संबंधीत एकही अधिकारी येथे उपस्थित नाही, नगररचनाकार नाहीत.

आयुक्त (श्री.अशोक बागेश्वर):— उच्च न्यायालयात एक केस होती त्यासाठी ते उच्च न्यायालयात गेले आहेत. दोघेही विचारुन गेले आहेत.

सदस्य श्री.बी.बी.मोरे:— पुढच्या महासभेमध्ये ज्या अधिकाऱ्याच्या विभागाशी सबंधीत विषय असतील, प्रश्न असतील ते जर उपस्थित नसतील तर मी सभेचे कामकाज चालू देणार नाही. अधिकाऱ्यांनी विचार केलेला असतो की, सदस्य महासभेत येतात, ओरडतात आणि जातात आणि महासभेस अनुउपस्थित असलेल्या अधिकाऱ्यांवर आयुक्त काही कारवाई करत नाहीत. दाखवा तुम्ही आज किती अधिकारी उपस्थित आहेत ? सबंधीत एकही अधिकारी उपस्थित नाही. कारण त्यांना कल्पना आहे की आज महासभा आहे आणि महासभेला आपला विषय आहे परंतु कोणीही सभेला उपस्थित राहत नाही, म्हणून पुढच्या वेळेला असे जर का घडले तर आम्ही तुमच्या आसना समोर ठिय्या मांडून आरपीआयच्यावतीने आंदोलन चालू करणार

महापालिका सचिव:— २ सहा. नगररचनाकार, २ आरेखक, २ अनुरेखक नियुक्त करायचे आहेत, पास ? सर्वसमतीने ?

यावेळी सदस्या श्रीमती. वसुधा बोडारे, श्रीमती शंकुतला जग्यासी, श्रीमती राजश्री चौधरी, श्रीमती नेहा भोईर व श्रीमती जयश्री सुर्वे या सभागृहातून बाहेर गेल्या.

सदस्य श्री.गोविदराम लुंड:— १२ वर्षापासून उद्यान अधिक्षकाचे पद भरले जात नाही. त्याबाबतीत मागील महासभेमध्ये आवाज उठविला होता. लक्षवेधी सुचना टाकली होती. हे पद का भरले जात नाही ?

सदस्य श्री लाल पंजाबी:— हे पद मंजूर आहे काय ? काय आहे ?

सदस्य श्री.गोविदराम लुंड— उद्यान अधिक्षकाचे पद पहिल्यापासून मंजूर आहे. १२ वर्षापूर्वी उद्यान अधिक्षक सेवानिवृत्त झाला तेव्हापासून ते पद भरले नाही त्यामुळे उद्यानाची अशी बिकट अवस्था झाली आहे, उद्यानासाठी कोणी धनीसाई नाही.

आयुक्त (श्री.अशोक बागेश्वर):— मा.महापौर महोदया शहर आराखडा तयार करायचा आहे त्यासाठी विशेष करुन ही पदे शासनाकडून मागवायची आहेत. यासाठी भरती वगैरे होणार नाही.

सदस्य श्री.गोविदराम लुंड :— मी काय सांगतो साहेब, उद्यानांची स्थिती खुपच खराब आहे.

सदस्य श्री. बी.बी.मोरे:— एक नगररचनाकार आणण्यासाठी किती तरी वेळ थांबावे लागले, नगररचनाकार येवू शकला नाही.आता आपण या पदांचे अधिकारी मागवत आहात ते येवू शकतील का ?

सदस्य श्री.राजु जग्यासी :— मा.महापौर महोदया. आयुक्त साहेब, याकामासाठी एखादया संस्थेची नेमणुक केली आहे का,? निविदा सूचना काढली आहे का? याकामासाठी संस्थेचीही नेमणूक करणार व या अधिका—यांची सुध्दा आवश्यकता आहे?

आयुक्त (श्री.अशोक बागेश्वर):—महापौर महोदया, संस्था सर्व्हे वगैरचे काम करते कार्यालयीन जे कामकाज आहे आराखडे वगैरे तयार करण्याचे काम आहे ते........

सदस्य श्री. बी.बी.मोरे:— फक्त पास करून ठेवायचे

सदस्य श्री.राजु जग्यासी :— आराखडे वगैरे तयार करण्याचे काम यांचेकडून करून घ्यायचे.

सदस्य श्री.जीवन इदनानी :— हे अधिकारी येईपर्यंतच्या कालावधीसाठी आपल्याकडे यापूर्वी जे ट्रेसर म्हणून काम करत होते ते श्री. भरत गीध, जे सेवानिवृत्त झाले आहेत, त्यांना मानधनावर ठेवले जावे. जेणेकरून येथील कामात काही अडचण येवू नये. यासाठी आमची आयुक्त साहेबांना विनंती आहे की, याबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीपूढे आणला जावा. मानधन तत्वावर त्यांस कमीत—कमी सहा महिन्यांसाठी ठेवले जावे.

महापालिका सचिव :— पास ? सर्वसंमतीने ?

काही सदस्य :— पास—पास......

महापौर :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे.

---

आयत्यावेळचा विषय

**विषय क्र. १५**:— उल्हासनगर शहराचा सुधारीत विकास आराखडा तयार करणेकामी २ सहा. नगररचनाकार, २ आरेखक, २ अनुरेखक यांची नियुक्ती करणेबाबत.

प्रस्तावना

सद्यस्थितीत उल्हासनगर शहराचा सुधारीत विकास आराखडा तयार करण्याचे काम सुरु आहे. त्याकरीता महानगरपालिकेकडे पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध नसल्यामुळे शासनाकडुन प्रतिनियुक्तीवर उल्हासनगर महानगरपालिकेत २ सहा. नगररचनाकार, २ आरेखक, २ अनुरेखक यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. यासाठी मा. महासभेची मंजुरी मिळणेस्तव प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र २९** दिनांक:—०४/०८/२००९

सुचकाचे नाव :— श्री. जीवन इदनानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. लाल पंजाबी

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार उल्हासनगर शहराच्या सुधारीत विकास आराखडा तयार करणेकामी शासनाकडुन उल्हासनगर महानगरपालिकेत २ सहाय्यक नगररचनाकार, २ आरेखक, २ अनुरेखक यांची प्रतिनियुक्तीने नियुक्तीस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :—कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ७.०० वाजता महापौर श्रीमती निर्मले विद्या विजय यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

## उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:— १३/११/२००९

उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. १३/११/२००९ रोजीच्या
सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक १३/११/२००९ रोजी सायंकाळी ४.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत महापौर, श्रीमती निर्मले विद्या विजय हया पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होत्या. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

११.महापौर —— श्रीमती निर्मले विद्या विजय

१२.उप—महापौर —— श्री. ठाकूर विनोद लालसिंग

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | ४३ | श्री. कुमार उत्तमचंद आयलानी |
| ४ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | ४४ | श्री. लालबिहारी बुझारत यादव |
| ५ | श्री. गायकवाड दिलीप | ४५ | श्रीमती पंचशिला नाना पवार |
| ६ | श्रीमती संगीता राजेश कंडारे | ४६ | श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी |
| ७ | श्री. रविंद्र दशरथ बागूल | ४७ | श्रीमती करोतीया मालती राधाचरण |
| ८ | श्री. रामसागर जनार्दन यादव | ४८ | श्री. मंगतानी सुंदर आसनदास |
| ९ | श्रीमती निलम प्रेमसिंग रावत | ४९ | श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण |
| १० | श्री. मोरे भानजी भिकारी | ५० | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| ११ | श्री. दत्तात्रय नारायण पवार | ५१ | श्रीमती बोडारे वसुधा धनंजय |
| १२ | श्रीमती चौधरी राजश्री राजेंद्र | ५२ | कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल |
| १३ | श्री. विजय खंडु सुपाळे | ५३ | श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे |
| १४ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ५४ | श्री. शेखर केशव यादव |
| १५ | श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान | ५५ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १६ | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी | ५६ | श्रीमती सुमन गजानन शेळके |
| १७ | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज) | ५७ | श्री. प्रशांत किसनराव धांडे |
| १८ | श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी | ५८ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| १९ | श्रीमती सुजाता रमेश रिझवानी | ५९ | श्रीमती मनसुलकर शिला सुभाष |
| २० | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद | ६० | श्री. किशोर जग्यासी |
| २१ | श्री. राजू जग्यासी | ६१ | श्रीमती चेनानी ज्योती रमेश |
| २२ | श्री. राम (चार्ली) पारवानी | ६२ | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड |
| २३ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ६३ | श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी |
| २४ | श्रीमती जया प्रकाश माखीजा | ६४ | श्रीमती ज्योती शाम माने |
| २५ | श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी | ६५ | श्रीमती लता शांताराम निकम |
| २६ | डॉ. (श्रीमती) निना प्रकाश नाथानी | ६६ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २७ | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार (कुमारी)केवलराम | ६७ | श्री. मोहन साधवाणी |
| २८ | श्री. भठीजा (बब्बु) संजय | ६८ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| २९ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे | ६९ | श्री. बच्चाराम रूपचंदानी |
| ३० | श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा | ७० | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| ३१ | श्री. लाल पंजाबी | ७१ | श्रीमती मीना सोनेजी (सोंडे) |
| ३२ | श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास | ७२ | श्रीमती वनवारी मोना अशोक |
| ३३ | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती | ७३ | श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई) |
| ३४ | श्रीमती शकुंतला पाटील | ७४ | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी |
| ३५ | श्री. मोहन (गारो) रामरख्यानी | ७५ | श्री. मुकेश सोहन तेजी |
| ३६ | श्री. सुखरामानी महेश पहलाजराय | ७६ | श्री. पाटील प्रधान धर्मा |
| ३७ | ॲड. श्री. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी | ७७ | श्री. सुनिल साहेबराव गंगवानी |
| ३८ | श्री. ढोके जनार्दन किसनराव | ७८ | श्री. प्रकाश गणपत सावंत |
| ३९ | श्री.एडके गणपत गोविंद | ७९ | श्री. नरेंद्र रामचंद्र राजानी |
| ४० | श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा | ८० | श्री. गोदुमल नारायणदास क्रिष्णानी |

| | | | |
|---|---|---|---|
| ४१ | श्रीमती वेलकर सुरेखा राजन | ८१ | श्री. राजेश नानीकराम वधारीया |
| ४२ | श्रीमती महाडीक रजनी मोहन | | |

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१२६. श्री. अशोक बागेश्वर, आयुक्त
१२७. श्री. विजयकुमार म्हसाळ, उप—आयुक्त
१२८. श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
१२९. श्री. दिपक सावंत, उप—आयुक्त
१३०. श्रीम. संगिता धायगुडे, उप—आयुक्त
१३१. श्री. च.प्र.सिंह, सहा. संचालक, नगररचना
१३२. श्री. विजयकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी
१३३. श्री. अनुदिप दिघे, मुख्य लेखा परिक्षक
१३४. श्री. जी.टी. जिंदे, वैदयकीय आरोग्य अधिकारी
१३५. श्री. माधव जवांदे, शहर अभियंता
१३६. श्री. एस.जी. खडताळे, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
१३७. श्री. मुकेश आयलानी, कार्यकारी अभियंता, विदयुत
१३८. श्री. आर.बी. शिर्के, कार्यकारी अभियंता, स्थापत्य
१३९. डॉ. राजा रिझवानी, वैद्यकीय अधिकारी
१४०. श्री. रमेश काजळे, प्र. प्रभाग अधिकारी
१४१. श्री. चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख
१४२. श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
१४३. श्री. नंदु समतानी, प्र. प्रभाग अधिकारी
१४४. श्री. अश्विनी अहूजा, कनिष्ठ अभियंता, मालमत्ता
१४५. श्री. खामितकर, कनिष्ठ अभियंता, मालमत्ता
१४६. श्री. उदय लिमये, मुख्य लिपिक

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१. श्री. तानाजी पतंगराव
२. श्रीमती अमिता संखे
३ श्रीमती नर्गिस खान

सांयकाळी ४.३८ वाजता सभेची सुरूवात करण्यात आली.

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १ वाचुन दाखवितात.
प्रश्नोत्तरे.........

सायंकाळचे ४ वाजुन ३८ मिनिटे झाली आहेत.

प्रश्न क्र. १८८ हा श्रीमती जयश्री सुर्वे यांचा आहे.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी:—</u>सचिव साहेब, प्रश्नोत्तराचा तास सुरु करण्या अगोदर...........

<u>सदस्य श्री. भारत राजवानी :—</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब, आता, आता श्री. प्रभुनाथ गुप्ता यांची विरोधी पक्ष नेता पदी नेमणुक करणेबाबत आम्ही जे पत्र दिले आहे त्याबद्दल जरा खुलासा केला जावा.

<u>महापौर :—</u>दुसरे सन्माननिय सदस्य बोलण्यास या अगोदरच उभे असल्याने सध्या कृपया आपण बसून घ्या.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>मागील प्रश्नांना उत्तर देण्यामध्ये यासभेच्या प्रश्नोत्तरची वेळ जाईल. त्यामुळे जेथे मागील प्रश्नावरील चर्चा संपेल तेथुन या सभेतील प्रश्नांसाठी अर्ध्या तासाची वेळ मोजली जावी.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u>साहेब, माझी एक अशी विनंती आहे की, या प्रश्नाचे उत्तर देण्याची जबाबदारी आयुक्त या नात्याने आपली होती. परंतु प्रत्यक्षात कार्यकारी अभियंता श्री. शिर्के हे उत्तर देत आहेत. मागील वेळेस जे आयुक्त होते, त्यांनी या प्रकरणाची चौकशी करण्याची जबाबदारी घेतली होती. यासाठी या प्रश्नाचे उत्तर कार्यकारी अभियंता यांनी न देता आयुक्तांनी दिले पाहिजे. ज्यांच्या बाबतीत आम्ही तक्रार केली होती तेच या प्रश्नाचे उत्तर देणार काय? हे कसे चालेल? कुणाच्या विरोधात चौकशी करण्यात येणार होती? आयुक्त साहेब, काय ज्याच्या विरोधात तक्रार आहे तोच उत्तर देईल? चौकशी कुणाच्या विरोधात कोणी करायची होती? या महापालिकेत ही कशी कार्यपध्दती चालु आहे?

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—</u>जी तक्रार होती त्याबाबत शहर अभियंता यांनी चौकशी केलेली आहे.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u>कुणी केली आहे चौकशी?

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—</u>शहर अभियंता यांनी चौकशी केली आहे.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u>शहर अभियंता यांनी चौकशी केलेली नाही. ज्यांच्या विरोधात तक्रार होती त्यांनीच चौकशी केली आहे. आम्ही ज्यांच्या विरोधात बोलतो काय तेच आम्हांला उत्तर देणार? चौकशी कोणी करायची होती आणि कोणी केली आहे? आयुक्त साहेब, मी आपणांस जे प्रश्न विचारत आहे, त्यांची उत्तरे श्री. शिर्के यांच्याकडुन ऐकुन घेण्यास मी तयार नाही. चौकशी करण्यासाठी आपण कुणाला आदेश दिले होते? श्री. शिर्के यांना चौकशी करण्यास आपण आदेश दिले होते काय? आयुक्त साहेब, मी आपणांस विचारत आहे.

<u>श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):—</u>मागील महासभेत आयुक्त साहेबांनी,.............

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u>चौकशी करण्यासाठी आपण कुणाला आदेशित केले होते? शहर अभियंतांना की कार्यकारी अभियंतांना?

<u>श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):—</u>मलाच सांगण्यात आले होते.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u>सांगा, कोणत्या तारखेला आपणांस आदेश देण्यात आला आहे?

<u>श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):—</u>महासभेतच निर्देश देण्यात आले होते.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u>आपल्या विरोधात आपणच चौकशी करणार?

<u>श्री. आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, साबांवि):—</u> कार्यकारी अभियंता म्हणुन देयकावर आपण सही करतात? आपल्या विरोधात आपणच चौकशी करणार?

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—</u>सन्माननिय महापौर महोदया, मागील महासभेत अतिरिक्त आयुक्त आयुक्तांच्या स्थानी आसनस्थ होते. त्यांनी आदेश दिले असतील. आता उत्तराने जर समाधान होत नसेल तर मी अतिरिक्त आयुक्तांच्या मार्फत किंवा उप—आयुक्तांच्या मार्फत चौकशी करुन......

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u>आयुक्त साहेब, मला अतिशय दु:खाने सांगावे लागत आहे की, शहर अभियंत्यांस आपण चौकशीसाठी आदेश दिले होते. शहर अभियंता आजारी असल्यामुळे त्यांनी चौकशी केली नाही. त्यानंतर दुस—या शहर अभियंत्यास आदेश दिला होता, त्यांनी सुध्दा चौकशी केली नाही. व मागील महासभेत आम्हांस सांगण्यात आले होते की, ८ दिवसात आपणांस अहवाल दिला जाईल. अहवाल कोण देईल? ज्यांच्या विरोधात आम्ही बोलतो ते? कार्यकारी अभियंत्याला तर माझे आव्हान होते. ते तयार असतील तर त्यांनी महापालिका सोडावी, किंवा मी महापालिका सोडतो. आणि तेच आम्हांला त्यांच्या विरुध्दच्या चौकशीचा अहवाल देणार? ऑगस्ट पासुन नोव्हेंबरपर्यंतच्या तीन महिन्याच्या कालावधीत चौकशी करण्यासाठी आपणांस वेळ मिळाला नाही? आपण काय सभेचा अपमान करु इच्छिता? सभागृहाचे आपण

मजाक उडवित आहात? ऑगस्ट महिन्यामध्ये आपणांस सांगण्यात आले होते आणि त्या अगोदर जुलै महिन्यातील हा प्रश्न आहे. ही कशी सभा चालवत आहेत?

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):— सन्माननिय महापौर महोदया, आता जी चौकशी केली आहे ती कार्यकारी अभियंता यांनी केली आहे. आता या प्रकरणाची शहर अभियंत्याच्या मार्फत चौकशी करुन आठ दिवसाच्या आत सन्माननिय सदस्यास अहवाल देण्याची कार्यवाही करतो.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—हे पहा साहेब, जुलै महिन्यापासुनचा प्रश्न आहे. ४ महिने होवुन गेले. सदनामध्ये आपण आम्हांस चुकीची माहिती देता. ऑगस्ट महिन्यात आपण म्हटले होते की आठ दिवसात आम्ही चौकशी करु. आता त्यास तीन महिने झाले. अदयापपर्यंत आपली चौकशी पुर्ण झालेली नाही. यावरुन मला काय वाटेल. चौकशी पुर्ण झाली नसतांना त्याच ठेकेदारास मुंप्रांमअ १९४९ चे प्रकरण ५ (२)(२) अन्वये आपण काम देता. असे चालते काय? ज्या ठेकेदाराची चौकशी पुर्ण झाली नाही त्यास आपण काम देता? यावरुन काय दिसुन येते?

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):— सन्माननिय महापौर महोदया, आठ दिवसात चौकशीचा अहवाल सन्माननिय सदस्यास दिला जाईल.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—नाही, नाही मी आपणांस आता विचारले की, ज्या ठेकेदाराची चौकशी अदयाप पुर्ण झालेली नाही त्यास मुंप्रांमअ १९४९ चे प्रकरण ५ (२)(२) अन्वये आपण त्यास काम देवु शकता? हे काय आहे? ज्याबाबत आम्ही ओरडुन सांगत आहोत की काम झालेले नाही. आणि त्या ठेकेदाराला आपण मुंप्रांमअ १९४९ चे प्रकरण ५ (२)(२) अन्वये काम देता?

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—सन्माननिय महापौर महोदया, जोपर्यंत एखादी चौकशी पुर्ण होवुन एखादयावर ठपका ठेवला जात नाही किंवा तो गुन्हेगार ठरत नाही तोपर्यंत तो माणुस ती संस्था निर्दोष आहे असे आपण मानतो.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—नाही, नाही, हे जे आपण उत्तर देता ते चुकीचे देता ना? रस्त्यांवरील खड्डे बुजविणा—या ठेकेदाराच्या कामाबाबतीत आम्ही येथे प्रश्न उपस्थित केला आहे, त्याच ठेकेदारास आपण मुंप्रांमअ १९४९ चे प्रकरण ५ (२)(२) अन्वये काम देणार? चौकशी पुर्ण होण्याअगोदर त्यास काम का दिले? त्याला जे मुंप्रांमअ १९४९ चे प्रकरण ५ (२)(२) अन्वये काम दिले आहे त्याची पुर्ण चौकशी करा. हे सर्व एकदुस—यास मिळाले आहेत. पॉटहोल्सचे काम सुध्दा त्यांनी असेच केले आहे. सगळे एकदुस—यास मिळाले आहेत असे असतांना आयुक्त उलट उत्तर कसे देत आहेत? चौकशी पुर्ण झाली नसतांना त्या ठेकेदारास मुंप्रांमअ १९४९ चे प्रकरण ५ (२)(२) अन्वये काम कसे देता? जुलै पासुन आजपर्यंत चौकशी पुर्ण झाली नाही आता म्हणता आठ दिवसात चौकशी पुर्ण करुन अहवाल देतो.

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—सन्माननिय महापौर महोदया, आठ दिवसात सन्माननिय सदस्यास अहवाल दिला जाईल तसेच तो ठेकेदार दोषी आढळुन आला तर त्यास जे काम दिले आहे ते जर झाले नसेल तर रद्द केले जाईल.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—नाही नाही मी आपणांस ५ (२)(२) बाबते विचारत आहे. आपण दुसरेच म्हणत आहात.

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):— ५ (२)(२) अन्वये काम देण्यामध्ये कुठलीही दिक्कत नव्हती. जोपर्यंत एखादा ठेकेदार दोषी आढळत नाही तोपर्यंत त्याला काम देण्याबाबत किंवा जोपर्यंत सभागृह किंवा स्थायी समिती याबाबतीत..........

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— सभागृहास चौकशी करण्यास आम्ही सांगतो तर आपण चौकशी करु देत नाहीत, चौकशी न करता आपण त्या ठेकेदारास ५ (२)(२) अन्वये काम देता, हे चालेल ना असे? ठिक आहे ना? आपण उत्तर देता फार चांगले उत्तर देता. तर मग आम्ही का बोलत राहायचे? तुमच्या चौकश्या चालु राहु दया आणि ठेकेदारास ५(२)(२) अंतर्गत काम देत रहा चालेल ना असे?

<u>महापौर :—</u>सन्माननिय सदस्य, आपण बसून घ्या. आठ दिवसातम आपणांस चौकशी अहवाल दिला जाईल.

**यावेळी सदस्य श्री. राजेश वानखेडे यांनी सभागृहात प्रवेश केला.**

<u>महापालिका सचिव :—</u>ठिक आहे? प्रश्न क्र. १८८ हा श्रीमती जयश्री सुर्वे यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. १८८ :—</u> वर्ष २००८—०९ च्या अर्थसंकल्पामध्ये महापालिकेच्या विविध विभागातून करावयांचे कामासाठी निधींची तरतूद करण्यात आलेल्या लेखाशिर्षा अंतर्गत निधी अपुरा पडल्याने तसेच जास्तीचे कामाचे प्रस्तावास मंजुरी प्राप्त झालेली असल्याने निधी समायोजन करण्यात आला आहे त्या अनुषंगाने खालील प्रश्नावर महासभेत चर्चा होवून समाधानकारक माहिती मिळावी.

प्र.क्र. १ अ) सन २००८—०९ मधील अर्थसंकल्पात लेखाशिर्षातील तरतूदीतील निधी संपल्याने मा. आयुक्तांनली निधीचे समायोजन करुन काम करणेस कोणकोणत्या कामांना मंजुरी दिली आहे? सदरचे समायोजनास कायदा व अर्थसंकल्प धाब्यावर बसवून समायोजन करुन कामे करण्याची कोणती निकड, आवश्यकता भासली होती? याचा प्रत्येक कामाचा स्वतंत्र खुलासा व्हावा?

ब) सन २००८—०९ मधील अर्थसंकल्पात लेखाशिर्षातील तरतूदीतील निधी संपल्याने निधीचे समायोजन करुन कोणकोणती कामे करण्यात आली आहेत? त्यांचे नाव व पत्ते, कामांची रक्कम, मंजुरी आदेशाचा क्रमांक व दिनांक तसेच निधीचे समायोजन कोणत्या लेखाशिर्षातून केले त्या लेखा शिर्षाचे नाव? समायोजन करण्यात आलेल्या लेखाशिर्षात किती निधी शिल्लक होता? संबंधीत लेखाशिर्षात निधीची तरतुद करण्यात येवूनही लेखाशिर्षा अंतर्गत करावयाची कामे का करण्यात आली नाहीत? याची सविस्तर कारणे दयावतील?
क) सन २००९—१० चे अर्थसंकल्पातील तरतूदी नुसार सार्वजनिक बांधकाम विभाग, पाणी पुरवठा विभाग व आरोग्य विभगामध्ये कामासाठी किती निधीची तरतूद करण्यात आली आहे? आचारसंहिता दिनांक २८/५/२००९ रोजी संपली असून आचारसंहिता संपल्यापासुन किती कामांना मंजुरी देणेत आली? त्यांना मंजुरी देतांना कोणते निकष लावण्यात आले? सन २००९—१० चे अर्थसंकल्पातील तरतूदीनुसार कामे होणार आहेत का? की सन २००८—०९ मधील प्रलंबित मंजुर कामे करण्यात येणार आहेत? कोणकोणती? या सर्व घोटाळयास जबाबदार कोण? व कारवाई काय करणार?

<u>उत्तर :—</u> १ अ) आरोग्य विभागातील कोणत्याही कामासाठी निधीचे समायोजन केलेले नाही.

ब) आरोग्य विभागामार्फत कोणत्याही कोणत्याही कामासाठी निधीचे समायोजन केलेले नाही.

क) सन २००९—१० चे अर्थसंकल्पातील तरतूदीनुसार आरोग्य विभागांसाठी पुढील प्रमाणे निधीचे तरतुद करण्यात आलेली आहे.

**रिव्हेन्यु एक्सपींडीचर——**

फिग—इन थाउजंड

| बजेट हेड नेम | बजेट ०९—१० |
|---|---|
| रिमुव्हल ऑफ रिफ्युज | ६०००० |
| मशिनरी स्विपींग | ७५०० |
| परचेस ऑफ इन्सेक्टीसाइड ॲण्ड ऑदर | ७५०० |
| मेनिटोरींग इन्व्हे. स्टेडसृ. | ५०० |
| परचेर ऑफ फुड फोर एनीमल | १०० |
| ऑदर मिस्क.एक्सपेंडीचर | २५ |
| मलेरिया ॲण्ड डेंग्यु सीएनटी. मेझ्युरस् | ५००० |

| | |
|---|---|
| डिसेल्टींग ऑफ डेनस् ॲण्ड नाला | ८००० |

कॅपीटल एक्सपेंडीचर

फिग–इन थाउजंड

| बजेट हेड | बजेट ०९–१० |
|---|---|
| परचेस ऑफ सेनीटेशन एक्वापमेंट | ५००० |
| डेव–ऑफ लॅण्ड फोर सालिडवेस्ट | ५०० |

आचार संहिता संपल्यापासून आरोग्य विभागातील एकाही कामास/प्रस्तावास पुर्णत: मंजुरी मिळालेली नाही.

पाणी पुरवठा विभागातील अशा प्रकारच्या कुठल्याही प्रस्तावास मंजुरी देण्यात आलेली नाही.

प्रश्न उद्‌भवत नाही

पाणी पुरवठा विभागासाठी सन २००९–१० चे अर्थसंकल्पातील तरतुदीची तपशिल सोबत जोडला आहे (प्रपत्र अ)

पाणी पुरवठयाशी संबधित मंजुर अत्यावश्यक कामांची यादी सोबत जोडली आहे (प्रपत्र ब)

अर्थसंकल्पीय तरतुदानुसार मंजुर कामे हाती देण्यात येतील.

<u>सदस्य श्रीमती जयश्री सुर्वे :–</u> ठिक आहे.

<u>महापालिका सचिव :–</u> प्रश्न क्र. १८९ हा श्रीमती वसुधा बोडारे यांचा आहे.

<u>प्रश्न क्र. १८९ :–</u> सन २००७–०८ या आर्थिक वर्षात अथक परिश्रम करुन विक्रम कर वसुली करणा–या कर विभागातील कर्मचा–यांना यापुढेही काम करतांना प्रोत्साहन मिळावे यासाठी दोन आगाउ वेतनवाढी देण्याची शिफारस करण्यात आली होती. तसेच सदरचा विषय महसूल समितीचे दिनांक १८/६/२००८ रोजी चर्चेला येवून महसूल समिती ठराव क्र. ४ अन्वये प्रभाग निहाय ९० लाखापेक्षा जास्त करवसूली तसेच विभागनिहाय ३ कोटी ७५ लाख रुपये पेक्षा जास्त कर वसूली करणा–या निरिक्षकांना दोन आगाउ वेतनवाढी देणेची शिफारास करण्यात आली होती. सदर महसूल समितीचे बैठकीत उप–आयुक्त (महसूल) सचिव, अन्य वरीष्ठ अधिकारी उपस्थित होते. संबंधीतांचे उपस्थितीत सदरचा ठराव पारीत करण्यात आला असून महासभेपूढे सदर विषय मान्यतेसाठी आल्यानंतर सर्व पदाधिकारी व मा. आयुक्तंचे उपस्थितीत महासभेनेही मान्यता दिलेली आहे. तरी देखिल आजतागायत संबंधीत कर्मचा–यांना आगाउ वेतनवाढीचा लाभ देणेत आलेला नसल्याने खालील प्रश्नावर महासभेत चर्चा होवू सूचक, समाधानकारक, सविस्तर माहिती मिळावी ही नम्र विनंती.

प्र.क्र. १ अ) मा. आयुक्त, उपायुक्त (महसूल) सचिव, अन्य वरिष्ठ अधिकारी तसेच महसूल समिती सदस्य व महापालिका पदाधिकारी इत्यादी मान्यवरांचे उपस्थितीत महसूल समिती व महासभेमध्ये कर विभगाातील विक्रमी कर वसूली करणा–या कर्मचा–यांना आगाउ वेतनवाढी देणेचा प्रस्ताव पारीत होवूनही आजतागायत वेतनवाढी का देणेत आल्या नाहीत?आगाउ वेतनवाढी अदयापपर्यंत न देणे मागणी कारणे काय आहेत?

<u>उत्तर :–</u> उल्हासनगर महानगरपालिका आस्थापनेवर कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांना उल्लेखनिय कामाबाबत आगाऊ वेतनवाढ देणे ही प्रशासकीय बाब आहे.

सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्रमांक एसआरव्ही–१०८९/२८२९/प्रकरण क्रमांक ४०६/आठ, दिनांक ४ एप्रिल १९९० नुसार शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचे पाच वर्षाचे गोपनीय अहवाल अत्युत्कृष्ट असल्यास दोन आगाऊ वेतनवाढ व तीन वर्षाचे गोपनीय अत्युत्कृष्ट असल्यास दोन आगाऊ वेतनवाढ मंजुर करण्यात यावी असे नमुद केले आहेत.

संबधित कर्मचाऱ्यांचे गोपनीय अहवाल तपासणी केले असता उक्त शासन आदेशानुसार असल्याचे दिसुन येत नाही. सबब बाब प्रलंबित ठेवण्यात आली आहे

**यावेळी सदस्य श्री. तुलसीदास वसिटा, श्री. मोहन साधवानी, श्री. संजय बठिजा, श्री. नरेंद्र राजानी, श्री. राजेश वदारिया, श्री. जीवन इदनानी हे सभागृहातुन बाहेर गेले.**



<u>सदस्या श्रीमती वसुधा बोडारे:—</u> मा. महापौर, उप—महापौर आणि आयुक्त साहेब, हा प्रश्न दोन वर्षापुर्वीचा आहे. महसुल समितीचा हा ठराव महासभेने मंजुर केला तेव्हा महापौर व आयुक्त साहेब आपण सुध्दा सभागृहात उपस्थित होतात त्यावेळी ठराव मंजुर करतांना हा मुद्दा उपस्थित केला नव्हता. आताच तुम्ही सांगितले की, महासभा जो निर्णय घेते तो अंतिम असतो. नंतर हा ठराव महासभेत सुध्दा आणला होता. तेथेही तो मंजुर होतो. आणि त्यानंतर उप—आयुक्त श्री.मिलिंद सावंत अशा प्रकारची उत्तरे देतात की आता आम्हांला त्यांचे गोपनिय अहवाल तपासून पहावे लागतील किंवा दुसरे काही. हा ठराव मंजुर करतांना किंवा आपण जेव्हा कार्यक्रम घेतो तेव्हा का नाही त्यावेळेस कुणी सांगितले? त्यावेळेस तुम्ही सर्वांनी टाळया वाजविल्या. प्रशस्तीपत्रक वगैरे देण्यास संमती दर्शविली. महासभेत पण ठराव मंजुर करता. आणि दोन दोन वर्ष हा प्रश्न/मुददा प्रलंबित ठेवता? महासभेत मंजुर झाल्यानंतर हा प्रश्न का प्रलंबित राहिला, याचे मला व्यवस्थित उत्तर दयावे.

<u>श्री. विजयकुमार म्हसाळ (उप—आयुक्त, मुख्यालय):—</u>आदरणीय महापौर महोदया, आयुक्त साहेब, सन्माननिय व्यासपीठ, उल्हासनगर महापालिकेच्या आस्थापनेवर कार्यरत असलेले अधिकारी व कर्मचारी यांना उल्लेखनिय कामाबाबत आगाऊ वेतनवाढ देण्याची बाब प्रशासकिय आहे. याबाबत महापालिकेने जो ठराव पारीत केलेला होता, त्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाने ..................

<u>सदस्या श्रीमती वसुधा बोडारे :—</u> ही बाब प्रशासकिय आहे हे त्यावेळेला कळले नाही का? श्री. मिलिंद सावंत त्यावेळेला तेथे उपस्थित होते. स्वतः आयुक्त श्री. बागेश्वर साहेब उपस्थित होते. महापौर महोदया उपस्थित होत्या. ही सर्व मोठ मोठी मंडळी उपस्थित असतांना ही प्रशासकिय बाब त्यावेळेस आठवत नाही काय? नंतर दोन वर्षानंतर तुम्ही सांगता की, ही प्रशासकिय बाब आहे असे असते तर आम्ही हा मुद्दा सभेपुढे आणलाच नसता. तेथे मंजुर करता, महासभेत मंजुर करता आणि दोन वर्षांनी हे उत्तर देता हे बरोबर आहे का? मी सभापती असतांना त्यावेळेस तुम्ही का नाही सागितले की सभापती महोदया हा मुद्दा पुढे नेवु नका हा मंजुर होवु शकणार नाही. त्याच वेळेला तेथे ठराव पारीत केला नसता, महासभेत आणला नसता. महासभेचे एवढे सर्व सदस्य मुर्ख आहेत काय? महासभेत ठराव मंजुर करता? नंतर दोन वर्षांनी उत्तर देता, म्हणजे आम्ही नेमके काय करायचे? मंजुर करतांना तुम्ही उपस्थित होतात . श्री. मिलिंद सावंत होते तेआता नाहीत. ठिक आहे. स्वतः श्री. बागेश्वर साहेब होते. स्वतः त्यांनी प्रशस्ती पत्रके वाटली आहेत. महापौर महोदया उपस्थित होत्या, एवढी मोठे मोठी मंडळी उपस्थित असतांना त्यावेळेस तुम्ही सांगत नाहीत, दोन वर्षानंतर तुम्ही सांगता की ही प्रशासकिय बाब आहे. त्याच वेळेस सांगितले असते तर आम्ही महासभेपुढे हा मुद्दा आणलाच नसता. म्हणजे महासभेपुढे हा मुद्दा आणणारे आम्ही मुर्ख का? आता आम्हांला तुमची ही उत्तरे मान्य नाहीत. त्यांना वेतनवाढ देण्यात यावी. आताच. थोडया वेळेपुर्वी श्री. बागेश्वर साहेबांनी सांगितले की, महासभेत जो निर्णय होतो तो अंतिम असतो. आता तुम्ही हे सर्व मागे ठेवुन त्या लोकांना वेतनवाढ दयावी हीच माझी इच्छा आहे. आणि ती लगेच देण्यात यावी. दोन वर्ष झाली. तुमची कागदपत्र या टेबलवरुन त्या टेबलवर फिरत आहे. दोन वर्ष आम्ही पाठपुरावा करत राहायचा. का तर त्यांनी कामे केली आहेत, त्यांना वेतनवाढ दया म्हणुन. त्यावेळेला तुम्ही हे का नाही सांगितले, विचारा, त्यावेळेला कोणकोणते अधिकारी तेथे उपस्थित होते? सर्व उपस्थित होते. कुणीही गैरहजर नव्हते. प्रत्येक सभेला सर्वजण उपस्थित होते. स्वतः सचिव साहेब सुध्दा महसुल समितीच्या प्रत्येक सभेला उपस्थित होते, सर्व उपस्थित होते. त्यावेळेला तुम्ही हे सर्व का नाही वाचुन दाखविले?

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—</u> सन्माननिय महापौर महोदया, सदरचा विषय महासभेत आल्यानंतर तो तपासुन बघण्यात आला आहे, आणि वेतनवाढ देता येत नाही म्हणुन त्यांना प्रोत्साहन पर बक्षिस म्हणुन आपण त्यांना तशी शिफारस केली होती. ती मला वाटते मंजुर झाली आहे. आणि त्याप्रमाणे कार्यवाही सुध्दा......

श्री. रविंद्रकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय):– बक्षिसे आणि सन्मानपत्र त्यावेळेस दिली होती. फक्त दोन वेतनवाढी देण्यासाठी मागील पाच वर्षाचे गोपनिय अहवाल असाधारण किंवा 'अ प्लस' असावे लागतात असा शासनाने निकष ठरवुन दिलेला आहे.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :–आयुक्त साहेब, साधा आणि सरळ प्रश्न आहे. हा विषय प्रशासनाच्या वतीने महसुल समितीच्या बैठकीमध्ये आला.दोन वेळा बैठक पुढे ढकलण्यात आलेली होती. हा विषय पुढे ढकलण्यात आलेला आहे. प्रशासनाकडुन ठराव आला, ठराव आणतांनाच याबाबत चौकशी का नाही केली? हे पाहिले का नाही. बरं, महसुल समितीमध्ये चुक झाली, सन्मा. सदस्या त्यावेळेस महसूल समितीच्या सभापती होत्या. शिवसेना प्रमुखांनी आम्हांला सांगितले आहे की, एकदा अभिवचन दिले की ते पाळले पाहिजे. त्यांच्या कारकिर्दीमध्ये प्रशासनाच्यावतीने ठराव आला, तो कायदेशीर असेल असे समजुन त्यावेळेस समितीने तो मंजुर केला आणि त्यावेळेस सचिव होते, आयुक्त साहेब होते त्यावेळेचे तत्कालीन उप–आयुक्त होते त्यांनी उत्तर दयावयास पाहिजे होते. आणि त्यावेळेस महासभेत महसुल समितीचा ठराव पारीत केला. महसुल समितीने पारीत केलेला ठराव महासभेत कायम करण्यासाठी प्रशासनाच्यावतीने आला. त्यावेळेस सुध्दा हे मुददे उपस्थित केले नाहीत, पुन्हा तसेच. महासभेत पारित केलेला ठराव स्थायी समितीमध्ये जातो. त्याचे कारण म्हणजे प्रशासनाचे अर्धवट ज्ञान आता तुम्ही सांगता हे नक्की बरोबर आहे का? ते बरोबर आहे की हे बरोबर आहे? आता तुमच्यावर विश्वास ठेवायचा कसा काय? जेव्हा तुम्ही सभागृहासमोर तो ठराव आणला होता. मग तो महसूल समितीमध्ये किंवा महासभेत असेल, तो चूकीचा असेल तर हे बरोबर असेल कशावरुन? तुम्ही आता हे जे सांगत आहात तेच चुकीचे आहे आमच्यामते. त्यावेळेस तत्कालीन प्रशासनाची जी भुमिका होती ती बरोबर होती. आम्ही दोष कोणाला दयायचा? त्यावेळच्या आयुक्तांना, उप–आयुक्तांना कि आता तुम्हांला? बरोबर कोण? सचिव साहेब, वस्तुस्थिती आपल्या समोर आहे. महसुल समितीच्या सभेत आपण होतात. त्यावेळेस कुठेही हा मुद्दा उपस्थित झालेला नाही. त्यामुळे त्यावेळेस उपस्थित झालेला मुद्दा हा कायदेशीर होता. जर बेकायदेशीर असता तर त्याचवेळेस तुम्ही सांगायला हवे होते. म्हणजेच ते कायदेशीर होते.

श्री. रविंद्रकुमार म्हसाळ (उप–आयुक्त, मुख्यालय):–प्रोत्साहनपर भत्ता आपण देवु शकतो व आपण दिलेला आहे. परंतु त्यांना विशेष वेतनवाढ दयायची आहे त्यासाठी शासनाने काही निकष ठरवुन दिलेले आहेत.

सदस्य श्री. धनंजय बोंडारे :–कर्मचारी तुमचे आणि आमचे आहेत. ज्यांनी चांगले काम केले त्याला प्रोत्साहन दिले पाहिजे, त्याच्या पाठीवर शाब्बासकीची थाप मारली पाहिजे. जो चुकेल त्याला शिक्षा झाली पाहिजे, सजाही झाली पाहिजे, ही धारणा आमची आहे. आणि त्यामुळे तुम्ही आणलेला प्रस्ताव लगेच पारीत करुन अगदी इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता ठरावांतर्गतचा निर्णय थेट अंमलात आणण्यात यावा. अशा प्रकारचा विदयुत अभियांत्रिकी विभागातील व कर विभागातील कर्मचा–यांसाठी ठराव आम्ही पारीत केला. ते कर्मचारी बिचारे आशेने, आतुरतेने पाहतात त्यांना कायदयाची माहिती नाही. महासभेने ठराव पारीत केला, महासभा, उप–आयुक्त, आयुक्त हे त्यांच्या दृष्टीने सर्वोच्च आहेत. ही सर्वोच्च संस्था झाली किंवा सर्वोच्च न्यायालय झाले. या न्यायालयाने कर्मचा–यांसाठी दिलेल्या निर्णयात जर अंमलबजावणी होत नसेल तर उपयोग काय त्याचा? कस करायचे ते तुम्ही ठरवा.

**यावेळी सदस्य श्री. मोहन साधवानी, श्री. जीवन इदनानी, श्री. प्रशांत धांडे, श्री. सुरेश जाधव, श्री. तुलसीदास वसिटा यांनी सभागृहात पुन्हा प्रवेश केला.**

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):– सन्माननिय महापौर महोदया, सन्माननिय सदस्यांचा जो प्रश्न आहे त्याबाबतीत शासनाकडुन मार्गदर्शन घेवुन त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

महापालिका सचिव :–प्रश्न क्र. १९० हा श्री. भारत राजवानी यांचा आहे.

प्रश्न क्र. १९० :– उल्हासनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर जनसंपर्क अधिकारी म्हणुन कार्यरत असणा–या श्री. युवराज भदाणे यांचेबाबत खालील प्रश्नांवर महासभेत चर्चा होवून सविस्तर माहिती मिळणेस विनंती आहे.

प्रश्न क्र १ अ) श्री. युवराज भदाणे यांची महापालिके सेवेत जनसंपर्क अधिकारी म्हणुन नेमणुक कधी करण्यात आली? सदर आदेशाचा क्र. व दिंनाक मिळावा? श्री. युवराज भदाणे हे जनसंपर्क अधिकारी पदासाठी आवश्यक शैक्षणिक पात्रता धारण करीत आहेत का? त्यांनी सादर केलेल्या सर्व कागदपत्राची, दाखल्याची, प्रमाणपत्राची पडताळणी महापालिका प्रशासनाने केली आहे का? देण्यात आलेले दाखले बरोबर असल्याची खात्री केली आहे का? श्री भदाणे हे महापालिका सेवेत रुजु झाल्यापासुन त्यांना कोणकोणत्या पदाचा कार्यभार सोपविण्यात आला? सदरचा कार्यभार साभाळंत असताना त्याचे विरुध्द महापालिका कर्मचारी, पदाधिकारी, व नागरिक यांनी किती तक्रारी केल्या आहेत. त्या सर्व तक्रारीची माहिती मिळावी. सदर तक्रारी पेकी किती तक्रारीवंर प्रशासनाने चौकशी केली आहे किती तक्रारीची चौकशीच केली नाही? प्रभाग अधिकारी सहा. अनधिकृत बांधकाम नियंत्रण प्रमुख हया पदाचा कार्यभार साभांळण्यासाठी श्री भदाणे यांची शैक्षणिक पात्रता, अनुभव, सेवा जेष्ठता आहे का? हया सर्व पदासाठी किती कर्मचारी, अधिकारी, सेवा जेष्ठ अनुभवी पात्र आहेत? श्री. भदाणे यांनाचा वारंवार प्रभाग अधिकारी, सहा. आयुक्त, अनधिकृत बाधंकाम नियत्रंण प्रमुख इत्यादी महत्वाचे पदाचे कार्यभार का सोपविण्यात येत आहेत? या मागे प्रशासनाचा हेतु काय आहे? श्री भदाणे हे सदरच्या पदांना व कामास योग्य न्याय देत आहेत का? सदरची पदे भुषविण्यासाठी महापालिकेकडे अन्य सेवाजेष्ठ, अनुभवी, पात्र कर्मचारी उपलब्ध नाही का? असल्यास संबधिंताना डावलुन श्री. भदाणे यांनाच सदर पदावर काम करण्याची वारंवार संधी का देण्यात आहे? यामागे काय गोंडबगाल आहे?

<u>उत्तर :–</u> १) श्री. युवराज भदाणे यांना महानगरपालिकेत जनसंपर्क अधिकारी पदावर दि.२२/१२/२००३ पासुन नियुक्त करण्यात आले असून का. आ. क्र. उमपा/साप्रवि/आस्था/मुली/२३७/०३ असा आहे.

२) होय.

३) श्री. युवराज भदाणे यांना सादर केलेल्या कागरपत्राची छाननी तत्कालीन निवड समिती मार्फत करण्यात आलेली आहे.

४) श्री. भदाणे यांना महापालिका सेवेत रूज२ झाल्यापासून खालीलप्रमाणे कार्यभार सोपविण्यात आलेला आहे.

A) जनसपंर्क अधिकारी– २२–१२–२००३ ते अद्याप

B) प्रभाग अधिकारी प्रभाग समिती–२ (दिनांक २७/२/२००४ ते १५/२/२००७)

C) सहा. आयुक्त आरोग्य (१३/०७/२००५)

D) प्रभाग समिती–३, प्रभाग अधिकारी म्हणून दि.(१९/१०/२००५)

E) प्रभाग समिती–४, प्रभाग अधिकारी (दि. १४/११/२००५ ते २०/२/२००९)

F) प्रभाग समिती–१, प्रभाग अधिकारी म्हणून दिनांक १२/११/२००८ या पदाच्या अतिरिक्त सहा. नियंत्रक अ.बां. नि. विभाग १६/१/२००९.

५–६ व ७

श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी यांच्या विरूध्द खालीलप्रमाणे तक्रारी आल्या आहेत.

A) महानगरपलिकेतील काही महिला कर्मचारी यांनी दिनांक १९/०४/२००६ रोजी तक्रार नांदविलेली असून सदर तक्रारीची चौकशी जिल्हास्तरीय समिती तथा जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय ठाणे यांच्या मार्फत करण्यात येत आहे.

B) सौ.जयश्री ज्ञानेश्वर पाटील–गटनेता उल्हासनगर महानगरपालिका यांची दिनांक १४/१/२००९ रोजीची तक्रार दाखल केली होती त्याअनुषगांने त्यांची प्रभाग समिती–१ मधून बदली करण्यात आली होती.

C) श्री. डॉ. जगन्नाथ कामत संपादक पाचमुखी यांनी दिनांक १४/१०/२००८ रोजी उपविभागीय अधिकारी उल्हासनगर येथे तक्रार नोंदविली होती. मात्र त्यांनी दिनांक १६/१२/२००८ रोजी डॉ. कामत यांनी तक्रार मागे घेतली आहे.

८) श्री. युवराज भदाणे हे जनसंपर्क अधिकारी वेतनश्रेणी रू.१६००–२००–१०५०० अशी आहे. सबब त्यांना सहा. आयुक्त पदी पदोन्नती देण्यात आलेली नाही. केवळ प्रशासकीय कारणास्तव सदर पदाची अतिरिक्त कार्यभार त्यांच्यावर सोपवण्यात आलेला आहे.

९) सहा. आयुक्त या पदावर श्री. भदाणे यांचे शिवाय श्री. काजळे, श्री. व्हा.आर.गर्जे, श्री. समतानी यांना देखील सहा. आयुक्त या पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आलेला आहे.

<u>सदस्य श्री. भारत राजवानी :–</u> ठिक आहे.

<u>महापालिका सचिव :–</u>प्रश्न क्र. १९१ हा श्री. भारत राजवानी यांचा आहे.

**प्रश्न क्र. १९१ :–** वार्ड क्र.६७ मधील बॅरेक नं. बी ३५ समोर रुम नं. २०९ येथील शौचालयास महापालिकेने दुरुस्ती परवानगी दिली होती का? परवानगी दिली असल्यास सहा. आयुक्तांना बांधकाम निष्कासित करता येते का? त्या आदेशाची प्रत मिळावी. अधिकारांचा गैरवापर विना परवानगी कोणताही आदेश नसतानाही श्री. भदाणे यांनी सदरचे शौचालय तोडल्यामुळे महापालिका प्रशासन त्यांचेवर निलंबनाची कार्यवाही करणार? श्री. भदाणे यांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील विना परवानगी, अनधिकृत असलेली सर्व बाधंकामे निष्कासित केली आहेत का? केली नसल्यास का केली नाहीत? श्री. भदाणे यांनी अनधिकृत ठरवुन निष्कासित केलेल्या बाधंकामाची यादी दयावी तसेच अनधिकृत बाधंकाम केल्याची तक्रार प्राप्त होवुनही सदरचे बाधंकाम श्री. भदाणे यांनी निष्कासित न केलेल्या बाधंकामाची यादी मिळावी.

**उत्तर :–** १) अनधिकृत बाधंकाम विभागाकडुन उत्तर देण्यात आले आहे.

२) मुद्दा क्र.१ नुसार कार्यवाही का केली याची कारणे देण्यात आलेली आहेत. त्यामुळे अधिकाराचा गैरवापर झालेला नाही असे दिसुन येते.

३) अनधिकृत बांधकाम विभागाकडुन उत्तर देण्यात आले आहे.

४) अनधिकृत बांधकाम विभागाकडुन उत्तर देण्यात आले आहे.

**सदस्य श्री. भारत राजवानी :–** ठिक आहे.

**महापालिका सचिव :–**प्रश्न क्र. १९२ हा श्री. भारत राजवानी यांचा आहे.

**प्रश्न क्र. १९२ :–** उल्हासनगर कॅम्प नं. ५ येथिल यु. नं. ६२०, शिट नं. ६७, ६८ या मोकळया भुखंडाबाबत खालील प्रश्नावर महासभेत चर्चा होवून सविस्तर माहिती मिळणेसाठी विनंती आहे.

प्र. क्र. १ अ) सदरच्या भुखंडाची मालकी कोणाची आहे? उल्हासनगर महानगरपालिकेची मालकी असल्यास तत्कालीन प्रशासन उल्हासनगर वसाहत/उपविभागीय अधिकारी यांनी केव्हा, कुठल्या आदेशान्वये सदरचा भुखंड महापालिकेस हस्तांतरीत केला आहे? त्या आदेशाच्या सत्यप्रती मिळाव्यात? सदरचे भुखंडाचे एकुण क्षेत्रफळ किती आहे?सदरचा भुखंड विकास योजना अंतर्गत आरक्षित आहे किंवा कसे? भुमि अभिलेखा विभागाचे प्राप्त अहवालानुसार भुखंडाची मालकी महाराष्ट्र शासनाची आहे किंवा नाही? असल्यास अतिक्रमणदार, भोगवटा धारकाचे नाव व पत्ता मिळावा? भुखंडाचे क्षेत्रफळ याबाबत माहिती मिळावी? सदरचे भुखंडाचे मिळकत कर (घरपट्टी कर), कोणाकडुन आकारलेले आहे? या भुखंडाची कर पावती कोणाचे नावे आहे? त्या कर पावतीचा वार्ड क्रमांक, खाते क्रं., बिल क्रमांक, कर पावतीची छायांकित प्रत मिळावी? सदर मिळकत धारक संबधित मिळकतीचा कर अदा करीत आहे का? अदा करीत असल्यास कधीपासुन अदा करीत आहे? कालावधी नमुद करावा? सदरचे भूखंडावर आरक्षित असा फलक लावला आहे? प्रभाग अधिकारी युवराज भदाणे यांनी तो कोणाचे आदेशाने, परवानगीने लावला आहे? त्या आदेशाची सत्यप्रत मिळावा? कोणताही आदेश नसतानाही सदरच्या भुखंडावर आरक्षित भुखंड असा फलक युवराज भदाणे यांनी लावला असल्यास महापालिका प्रशासन त्यांचेवर कोणती कार्यवाही करणार किंवा नाही? सदरचा भुखंड महाराष्ट्र शासनाचे मालकीचा असल्यास महापालिकेस आरक्षित भुखंड असा फलक लावला येतो का? कोणत्या नियम आदेशान्वये त्याची सत्यप्रत मिळावी?

**उत्तर :–** सदर भूखंडाची मालकी हक्काची या विभागात नोंद नसते.

या विभागाशी संबंधित नाही.

सुधारीत इम्पोज शिटमध्ये भूखंडाचे क्षेत्रफळ दर्शविलेले नसते.

या विभागाशी संबंधित नाही.

**सदस्य श्री. भारत राजवानी :–** ठिक आहे.

**महापालिका सचिव :–**प्रश्न क्र. १९३ हा श्री. जमनादास पुरस्वानी यांचा आहे.

**?** <u>प्रश्न क्र. १९३ :–</u> १. उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रमें चार प्रभाग समिती में सार्वजनिक बाधंकाम विभाग में टोटल उप–अभियंता है तथा कितने कनिष्ठ अभियंता है.

१३. उप–अभियंता का काम क्या–क्या है.

३. कनिष्ठ अभियंता का का क्या–क्या है.

<u>उत्तर :–</u> १) उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रमें चार प्रभाग समिती में सार्वजनिक बांधकाम विभाग में. टोटल उप अभियंता–४ और कनिष्ट अभियंता–३ है, (उसमें से एक कनिष्ठ अभियंता इलेक्शन डयुटी पर है)

२) उप अभियंता का काम शहर में उनको सोपे गये क्षेत्र में सार्वजनिक बांधकाम विभाग के कामोंपर नियंत्रण एवं पर्यवेक्षण करना है.

३) कनिष्ठ अभियंता का काम शहर में अनको सोपे गये क्षेत्र में सार्वजनिक बांधकाम विभाग के कामोंपर पर्यवेक्षण करना है.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u> मा. महापौर महोदया, मी एका प्रश्नान्वये सार्वजनिक बांधकाम विभागातील कनिष्ठ अभियंता व उपअभियंता यांच्याबाबतीत माहिती मागितली होती. आपण त्याचे जर उत्तर बघितले तर आपणांस आश्चर्य वाटेल. त्याचे उत्तर असे आहे की, या महानगरपालिकेतील चार प्रभाग समित्यांमध्ये चार उप अभियंते आहेत. व कनिष्ठ अभियंता तीन असून त्यातील एक निवडणूकीच्या कामासाठी गेला आहे. म्हणजेच फक्त दोन कनिष्ठ अभियंता कार्यरत आहेत. जर एखादया महानगरपालिकेत आयुक्त दोन आहेत व उपआयुक्त एक असेल तर आपणांस कसे वाटेल? उप अभियंता चार व कनिष्ठ अभियंता दोन. विचार करण्यासारखी गोष्ट आहे. आपणाकडे अधिका–यांची कमतरता आहे, ती दुर केली जावी. वारंवार सांगुन सुध्दा आणि सत्ताधारी पक्षात राहून सुध्दा आम्हाला प्रश्न विचारावे लागत आहे, आम्हाला चार प्रभाग समित्यामध्ये आठ कनिष्ठ अभिंयता पाहिजेत, कारण की सार्वजनिक बाधंकाम विभागामार्फत जी काही विकास कामे केली जातात त्याच्यावर योग्य प्रकारे पर्यवेक्षण होऊ शकेल. मात्र येथे कार्यालयात बसुन प्राकलन तयार केले जाते व कार्यालयात बसून देयक तयार केले जाते, यास्तव आपणास निवेदन करतो की, कमीत कमी दोन–दोन कनिष्ठ अभिंयते असले पाहिजेत प्रत्येक प्रभाग समितीमध्ये दोन दोन कनिष्ठ अभिंयते असले पाहिजेत. कोणत्याही प्रकारे त्याची पुर्तता केली जावी.

<u>महापालिका सचिव :–</u>प्रश्न क्र. १९४ हा श्री. जमनादास पुरस्वानी यांचा आहे.

**?** <u>प्रश्न क्र. १९४ :–</u> १. उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रमें एम.एम.आर.डी.ए. की तरफ से सार्वजनिक शौचालयका निर्माण का काम टोटल कितने स्थानों पर पास हुआ है.

२. काम शुरू करने का आदेश (वर्क ऑडर) कितने स्थानो पर मिला है तथा (वर्क ऑडर) कब दिया गया है.

१४. कितने स्थानों पर एम.एम.आर.डी.ए. का र्शाचालय निर्माण का काम शुरू हो चुका है.

१५. कितने स्थानों पर अभी तक वर्क ऑडर के बादभी काम शुरू नही हुआ है.

१६. वर्क ऑडर मिलने के बाद कब तक काम शुरू होगा–ठेकेदार पर क्या कार्यवाही की है.

१७. फंड लेब्स होनेपर जवाबदार कौन होगा.

१. <u>उत्तर :–</u> एम.एन.आर.डी.ए.की तरफ से उल्हासनगर शहर के लिए एकुण ३४४४ सिट्स को मंजुरी दि गई है. शौचालय स्थानो की निश्चिती उल्हासनगर महानगरपालिका करनी है.

२. पहिने फेज में ९५ स्थानों पर शौचालय बनाने का आदेश दिया था. और दुसरे फेज मे १५१ शौचालय बनाने के लिए कार्यादेश दिये थे.

३. पहिले फेज में ८२ सीनों पर शौचालय का काम शुरु थे. दुसरे फेज में ८१ स्थानों पर शौचालय का काम शुरु है.

४. पहिले फेज में १३ व दुसरे फेज में ७० इतने काम वर्क ऑर्डर के बाद भी शुरु नही है.

५. पाहिले फेज में जीन स्थानों पर साईट का विवाद था वहॉ पर काम शुरु हुआ नही है. दुसरे फेज के कार्यारंभ आदेश निर्गमित करने के बाद अस समय मा. लोकसभा आचारसहिंता के वजह से कामों की शुरुवात नहीं हो सकी थी, असके बाद एक एक काम शुरु होना चालु हुआ था परंतु उसके बाद एम.एम.आर.डी.ए. ने सिर्फ ८१ कामों को निधी देने का संकेत दिया था वही काम पुरे करने के लिए एम.एम.आर.डी.ए. से सूचना आने के बाद वही काम शुंरु है. वह काम एम.एम.आर.डी.ए. गाईड लाईन्स पर मान्यता प्राप्त एन.जी.ओ. के. मार्फत शुरु किए गये है. महापालिकाने ठेकेदारोंको काम दिए नही, उपरोक्त कारण काम शुरु नही होनेसे एन.जी.ओ. पर कारवाई की नही. होनेसे एन.जी.ओ. पर कारवाई करना जरुरी नही था. इसलिए एन.जी.ओ. पर कारवाई की नही. भविष्य मे एम.एम.आर.डी.ए. के तरफ से निधी उपलब्ध होते है तो बचे हुए काम भी हो सकते है.

६. एम.एम.आर.डी.ए. ने जितने काम शुरु रखने की मान्ता दी है उतना ही निधी उपलब्ध होगा. इस वजह से निधी लेब्स होने का कारण नही है.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u> मा. महापौर महोदया, या प्रश्नाकडे सुध्दा लक्ष पुर्वक पाहिले तर आपणास दिसून येईल की एमएमआरडीमार्फत सार्वजनिक शौचालयाचे काम सुरु केले होते, त्याबाबत आपणांस माहितीच असेल की आपण कशा प्रकारे या कामास असफल झालो आहोत. याचे उत्तर आपण वाचाल तर दिसून येईल की किती निधी आले, कसे आले, त्यांची प्राकलने कशी तयार करण्यात आली? मंजुर झाली? परंतु फक्त आमच्याकडे कनिष्ठ अभियंता नसल्यामुळे आमची कामे अर्धवट राहिली.व उत्तराच्या शेवटी असे म्हटले आहे की, एमएमआरडीएने उर्वरीत कामे करण्यास मनाई केली आहे. ज्यामुळे आपले पाच दहा कोटीचे नुकसान झाले आहे. गलिच्छ वस्त्यांमध्ये शासन निधीतुन जी सार्वजनिक शौचालय तयार होणार होती, त्यामुळे गलिच्छ वस्तीतील लोक त्यापासुन वंचित झाले आहेत. तेथिल कामांची प्राकलने मंजुर झाली आहेत. कार्योत्तर मंजुरीही मिळाली आहे. परंतु योग्य वेळी काम सुरु न झाल्यामुळे ती कामे रद्द झाली आहेत. व आज त्यांच्याकडुन आदेश आले आहेत की आपण पुढील कामे करु नका. उर्वरीत कामे बंद असल्याचे या प्रश्नाचे उत्तर जर आपण लक्षपुर्वक वाचले तर दिसुन येईल. यास्तव मी आयुक्त साहेबांना निवेदन करेल की, अधिका—यांच्या कमतरतेमुळे जी कामे थांबुन राहतात व आमचे जे करोडो रुपयाचे नुकसान होते यासाठी लवकरात लवकर अधिका—यांची भरती केली जावी.

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—</u> सन्माननिय महापौर महोदया, भरतीची प्रक्रिया चालु केली आहे. शक्य होईल तेवढया लवकरात लवकर कनिष्ठ अभियंत्याची भरती केली जाईल. व दुसरी जी गोष्ट आहे, एमएमआरडीए बाबतची त्याबाबतीत राज्य स्तरावर निर्णय झालेला आहे. त्यामुळे पुढील कामे रद्द झाली आहेत. उल्हासनगर बाबत संपुर्ण राज्य भरात तक्रारी झाल्या होत्या. त्यामुळे दुस—या टप्प्यातील जी कामे आहेत मग ती येथिल असोत किंवा ठाण्यामधील असोत ती सर्व कामे त्यांनी बंद केली आहेत.

<u>महापालिका सचिव :—</u>प्रश्न क्र. १९५ हा श्री. गोविंदराम लुंड यांचा आहे.

**?** <u>**प्रश्न क्र. १९५ :—**</u> १) उल्हासनगर महापालिका अग्निशमन विभागाची गाडी किती सालापासून भंगारामध्ये पडून आहे?

२) सदरची गाडी कोणत्या कारणासाठी मागविण्यात आली होती?

३) या गाडीची किंमत किती होती?

४) सदरची गाडी मागविल्यानंतर ती उपयोगात का आणली गेली नाही?

यास जबाबदार असणा—यांवर कारवाई करण्यात यावी.

<u>उत्तर :—</u> १) तत्कालीन उल्हासनगर नगरपरिषदने वर्ष १९८८ मध्ये सदरची गाडी अग्निशमन विभागासाठी मागविण्यात आलेली होती तेव्हापासून महापालिका आवारात ठेवण्यात आलेली आहे.

२) तत्कालीन उल्हासनगर नगरपरिषदेने सदरची गाडी अग्निशमन विभागासाठी मागविण्यात आलेली होती.

३) सदर गाडीची खरेदीची किंमत रु.२० लाख इतकी होती.

४) सदरची गाडी मागविल्यानंतर तत्कालीन उल्हासनगर नगरपारिषदेने वेळोवेळी मागणी करुनही उत्पादक कंपनीकडून ब्लु प्रिंट न मिळाल्याने आर.टी.ओ कडून पासींग न झाल्यामुळे ती वापरात आणता आलेली नाही. सदरची गाडी तेव्हापासून महापालिका आवारात ठेवण्यात आलेली आहे.

<u>सदस्य श्री. गोविंदराम लुंड :–</u> अग्निशमन विभागासाठी १९८८ मध्ये एक गाडी मागविण्यात आली होती. ती आता पुर्णपणे भंगार झाली आहे. मी याबाबत पत्र दिले होते. त्याचे आपण उत्तर दिले आहे की, ती गाडी २० लाखाला खरेदी केली. मी आयुक्त साहेबांना विचारु इच्छितो की, ती जर २० लाखाला खरेदी केली तर ती गाडी अजुनपर्यंत का कामात येत नाही?

<u>डॉ. दिपक सावंत (उप–आयुक्त):–</u> सन्माननिय महापौर महोदया, उप–महापौरजी, आयुक्त साहेब, श्री. गोविदराम लुंड यांनी मुद्दा उपस्थित केला की, गाडी वापरात का आणली गेली नाही? ती गाडी इम्पोर्टेड गाडी होती ती २० लाखाला खरेदी केली होती. १९८८ मध्ये ही गाडी आल्यानंतर त्याची ब्ल्यु प्रिंट हवी होती ब्ल्यु प्रिंट न आल्यामुळे आरटीओने त्या गाडीची नोंदणी केली नाही. नोंदणी न झाल्यामुळे ती गाडी वापरात आली नाही.

<u>सदस्य श्री. गोविंदराम लुंड :–</u>ब्ल्यु प्रिंट न आल्यामुळे आपण त्या गाडीची नोंदणी करु शकला नाहीत. का? आपण ती गाडी कंपनीस का परत केली नाही? परत करावयास पाहिजे होती ना? आज २४ वर्ष झाली आहेत.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–</u>मा. महापौरजी, आमच्या उप–आयुक्त साहेबांनी, आमचे जेष्ठ सदस्य श्री. गोविंदराम लुंड यांना आता सांगितले की, २० लाखाची गाडी त्यावेळेस खरेदी करण्यात आली होती. आरटीओने या गाडीची नोंदणी करुन दिली नाही. त्याबाबतीत मी विचारु इच्छितो की, २० लाख रुपये खर्चुन घेतलेल्या गाडीची नोंदणी करणे, नोंदणी न झाल्यास ती परत करणे हे काम कुणाचे आहे? ते प्रशासनाचे काम आहे, शासनाचे काम आहे की, नगरसेवकाचे काम आहे. आपण अतिशय सरळ उत्तर दिले की आम्हांला आरटीओने परवानगी दिली नाही. अमुक झाले, तमुक झाले. परंतु महापालिकेचे २० लाख रुपयाचे जे नुकसान झाले त्याची भरपाई कोण करेल? हे एक. दुसर असे की, २० लाखाची गाडी आल्यानंतर हीतीचा उपयोग न केलयाने शहरातील लोकांना जो त्रास झाला, त्याची जबाबदारी कोण घेईल? जर आम्ही आपला एक महिन्याचा पगार, एक वर्षाची इन्क्रीमेंट कपात केली तर आपणांस कसे वाटेल? हे २० लाख रुपये कुणाच्या सांगण्यानुसार गेले, यास जबाबदार कोण? आपण जरा सांगाल काय, त्यावेळेस कोणते अधिकारी होते? मी आयुक्त साहेबांना विचारु इच्छितो की, ही २० लाखाची रक्कम उल्हासनगर महानगरपालिकेने अशीच व्यर्थ घालविली. त्यासाठी जबाबदार कोण? त्याची चौकशी कोण करेल? त्याची भरपाई कोण करेल? जर आम्ही एखादया कर्मचा–यास एखादया महिन्याचा पगार दिला नाही तर तो कसा ओरडतो? तर २० लाखाची ही रक्कम कोण भरुन देईल? या बेपावईस जबाबदार कोण आहे? याबाबतीत मी आयुक्त साहेबांना विचारु इच्छितो. २० लाखाचे जे नुकसान झाले त्याची भरपाई कोण करणार? तसेच शहरामध्ये गाडी येवुन सुध्दा जे हाल भोगावे लागले त्यास जबाबदार कोण आहे?

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>सन्माननिय महापौरजी, आयुक्त साहेब, २० वर्षापुर्वी जो प्रकार झाला आहे त्यास आजच्या अधिका–यांना जबाबदार धरले जावु शकते काय? ते सांगा नाहीतर या कामी एक समिती बसविली जावी. यास जे कुणी जबाबदार असतील त्यांच्या भविष्य निर्वाह निधीतुन रक्कम कपात केली जावी. आपण चौकशी करा, त्या लोकांची नावे दया. त्यांच्यावर कारवाई करा. जो २० वर्षापुर्वी प्रकार झाला त्यास आजच्या अधिका–यास जबाबदार कसे धरले जाईल? ते आपल्यावर का घेतील? आपण चौकशी करा. जो त्यास जबाबदार आहे त्याचा भविषय निर्वाह निधी कपात केला जावा.

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):–</u>सदरची चौकशी उप–आयुक्त वाहन यांच्या मार्फत करण्यात येईल. त्यावेळेस जे जबाबदार अधिकारी होते त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

<u>सदस्य श्री. लाल पंजाबी :–</u>या मुद्दयाबाबत मला असे आठवते की, यावर आधीच चौकशी बसली आहे.

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):–</u>या मुद्दयावर आधीच चौकशी बसली आहे हे बरोबर आहे परंतु त्याचा अहवाल उपलब्ध नाही.

सदस्य श्री. लाल पंजाबी :—कुठे गेला त्याचा अहवाल?

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—चौकशी बसविण्यात आली होती. परंतु तिचा अहवाल अदयाप उपलब्ध झालेला नाही.

सदस्य श्री. लाल पंजाबी:—हा तर अन्याय आहे ना?

सदस्य श्री. गोविंदराम लुंड :—२२ वर्षे झाली ती गाडी उभी आहे. तिचे भाडे किती होते? आणि एवढया मोठया रक्कमेचे व्याज किती होते? आपण चौकशी करा, जो अधिकारी दोषी आढळुन येईल त्यास निलंबित करा. हा कुठला न्याय आहे? २२ वर्षापासुन ती गाडी पडुन आहे. दुसरे असे की, व्हीटीसी येथे कितीतरी भंगार पडुन आहे, त्याचा लिलाव करण्यास कुणी नाही?

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—भंगाराची विल्हेवाट लावण्याकामी निविदा मागविण्यात आली होती. ज्याने निविदा भरली होती........

सदस्य श्री. रविंद्र बागुल :—सन्माननिय आयुक्त साहेब, भंगार मध्ये ती गाडी विकली तर २० लाख रुपये मिळतील का?

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—भंगाराची विल्हेवाट लावण्याकामी निविदा मागविण्यात आली आहे. गाडीबाबतचा जो प्रस्ताव आहे याबाबत चौकशी करण्यात येईल. अहवाल आल्यानंतर त्यावेळचे जे जबाबदार अधिकारी होते, त्यांची पेन्शन वगैरे जे काही असेल ती कपात करण्याची नियमाप्रमाणे कारवाई केली जाईल.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—आता आपण म्हणालात की, चौकशी समिती नेमण्यात आली होती. चौकशी झाली होती, परंतु तिचा अहवाल उपलब्ध झालेला नाही. तर आता सुध्दा याबाबत असेच होईल?

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—नाही, नाही, यावेळेस असे काही होणार नाही.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—असे नाही की कुणी अहवाल घरी घेवुन गेला असेल?

सदस्य श्री. गोविंदराम लुंड :—किती दिवसात उत्तर दयाल? आठ दिवसात, एक महिन्यात?

डॉ. दिपक सावंत (उप—आयुक्त):—एक महिन्यात चौकशी पुर्ण करु.

सदस्य श्री. गोविंदराम लुंड :—आज महासभा आहे, नोव्हेंबर महिन्याची १३ तारीख आहे. दुस—या महिन्याच्या १३ तारखेस दया. नाहीतर जबाबदार अधिका—यास निलंबित करा.

महापालिका सचिव :—प्रश्न क्र. १९६ हा श्री हिरानंद जग्यासी यांचा असून यावेळी ते सभागृहात उपस्थित नाहीत. त्यामुळे त्यांच्या प्रश्नोत्तराची इतिवृत्तांतात नोंद घेण्यात येत आहे.

? प्रश्न क्र. १९६ :— रिगार्डीग इरीग्युरीटीज इन टाउन प्लॅनिंग डिपार्टमेंट रिगार्डिग आरटीआय बाय पब्लीक इनफोरमेशन ऑफिसर (पीआयओ) ॲण्ड अप्लीअंट ॲथोरीटी.

१)नो ऑफ आटीआय रिसिव्ह बाय टाउन प्लॅनिंग डिपार्टमेंट फॉर्म लास्ट सिक्स मंथस् ॲण्ड इनफोरमेशन प्रोवाईड अगेण्स्ट देम अलॉग विथ नेमस् ॲडरेस ॲण्ड सबजेट मेटर ऑफ आटीआयस्?

२) नो ऑफ आरटीआय ॲप्लीकेशनस् पेंडींग विथ टाउन प्लॅनिंग डिपार्टमेंट?

३) लिस्ट ऑफ पेंडींग आरटीआय ॲप्लीकेशन अलॉग विथ द नेम ॲण्ड ॲडरेस ऑफ द ॲप्लीकंट विथ द सबजेट मेटर?

प्लीज प्रोवाईड द अंसर ऑफद द अबोव क्युशन बिफोर जनरल बॉडी मिटींग.

उत्तर :— १) गेल्या सहा महिन्यात एकूण २५८ माहिती अधिकाराचे अर्ज प्राप्त झालेले आहेत त्याची संख्या जास्त असल्यामुळे या कार्यालयाच्या अभिलेखावरुन उपलब्ध करुन घ्यावी.

२) एकूण १०९ माहिती अधिकाराचे अर्ज प्रलंबित असून गेल्या तीन महिन्यापासून या विभागातील संगणंक चालक आणि एक कनिष्ठ अभियंता हे इलेक्शन डयुटीवर असलयामुळे या कार्यालयात पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध होऊ न शकल्यामुळे ती प्रलंबित आहे.

३) त्यांची संख्या जास्त असल्यामुळे या कार्यालयाचे अभिलेखावरुन उपलब्ध घ्यावी.

महापालिका सचिव :—प्रश्न क्र. १९७ हा श्री हिरानंद जग्यासी यांचा असून यावेळी ते सभागृहात उपस्थित नाहीत. त्यामुळे त्यांच्या प्रश्नोत्तराची इतिवृत्तांतात नोंद घेण्यात येत आहे.

**?** प्रश्न क्र. १९७ :— रिगार्डींग इरीग्युलेटीज इन टाउन प्लॅनिंग डिपार्टमेंट रिगार्डींग आरटीआय बाय पब्लीक इनफोरमेशन ऑफिसर (पीआयओ) ॲण्ड अप्लीअंट ॲथोरीटी.

१) नो ऑफ फर्स्ट अपिलस् मेड बाय द ॲप्लीकंट अलॉग विथ डिटेलस् नेम ॲडरेस ॲण्ड सबजेट मेटर ॲण्ड अल्सो आउ मेन अपिल्स आर हिअर्ड बाय द फर्स्ट अपिलेट ॲथोरीटी?

प्लीज प्रोवाईड द अंसर ऑफ द अबोव क्युशन बिफोर जनरल बॉडी मिटींग.

उत्तर :— १) गेल्या सहा महिन्यापासून या विभागात प्रथम अपील अधिकारी यांचेकडे २२ अर्ज प्राप्त झालेले आहेत त्यांची नावाची यादी या कार्यालयात अभिलेखावरुन उपलब्ध करुन घ्यावी.

महापालिका सचिव :—प्रश्न क्र. १९८ हा श्री हिरानंद जग्यासी यांचा असून यावेळी ते सभागृहात उपस्थित नाहीत. त्यामुळे त्यांच्या प्रश्नोत्तराची इतिवृत्तांतात नोंद घेण्यात येत आहे.

**?** प्रश्न क्र. १९८ :— रिगार्डींग इरीग्युलेटीज इन टाउन प्लॅनिंग डिपार्टमेंट रिगार्डींग आरटीआय बाय पब्लीक इनफोरमेशन ऑफिसर (पीआयओ) ॲण्ड अप्लीअंट ॲथोरीटी.

१) नो रिपोर्टस् सबमिटेड बाय द टाउन प्लॅनिंग डिपार्टमेंट ऑफ द वार्ड ऑफिसर ऑफ वार्ड ऑफिस नं. ०४ मि. युवराज भदाणे फोर रिपोर्टर्स ऑफ वायोलेशन इन ऑन गोविंग बिल्डींग परमीशन?

प्लीज प्रोवाईड द अंसर ऑफ द अबोव क्युशन बिफोर जनरल बॉडी मिटींग.

उत्तर :— १) प्रभाग समिती क्रं. ४ मध्ये सहाय्यक आयुक्त श्री. युवराज भदाणे यांची नियुक्ती झाल्यापासून प्रभाग समिती क्रं. ४ मधील एकही इमारतीच्या वाढीव बांधकामाचा अहवाल पाठविण्यात आलेला नाही.

महापालिका सचिव :—प्रश्न क्र. १९९ हा श्री हिरानंद जग्यासी यांचा असून हा त्यांचा पाचवा प्रश्न आहे.यावेळी ते सभागृहात उपस्थित नाहीत. त्यामुळे त्यांच्या प्रश्नोत्तराची इतिवृत्तांतात नोंद घेण्यात येत आहे.

**?** प्रश्न क्र. १९९ :— रिगार्डींग रिपोर्टस फोर डिटेक्टींग वायोलेशन फोरम टाउन प्लॅनिंग डिपार्टमेंट डिमांडेड बाय मि. युवराज भदाणे वार्ड ऑफिसर ऑफ वार्ड ऑफिस नं. ०४.

१) लिस्ट ऑफ रिपोर्टस डिमांडेड फोरम टाउन प्लॅनर ॲण्ड ज्यु. इंजिनिअर ऑफ टाउन प्लॅनर ॲण्ड ज्युनिअर इंजिनिअर ऑफ टाउन प्लॅनिंग डिपाटमेंट ऑफ प्रोवाईड द डिटेशन ऑफ गिवोलेशन अलोंग विथ द नेम ॲण्ड ॲडरेस ॲण्ड ऑदर डिटेल्स?

२) इन वार्ड ऑफिस फोर व्हॉट परपस द ज्यु. इंजिनिअर ॲण्ड वार्ड ऑफिसरर्स आर अपॉईंटेड?

३) इफ द रिपोर्टस फोर डिटेशन ऑफ वायोलेशन इन बिल्डींग अंडर कन्स्ट्रक्शन इज डिमांडेड फोरम टाउन प्लॅनिंग डिपार्टमेंट ज्युनिअर इंजिनिअर ॲण्ड टाउन प्लॅनर वाय द पोस्ट ऑफ ज्युनिअर इंजिनिअर इज क्रियेटेड फोर वार्ड ऑफिस?

प्लीज प्रोवाईड द अंसर ऑफ द अबोव क्युशन बिफोर जनरल बॉडी मिटींग.

<u>उत्तर :–</u> १) नगररचना विभागाकडून वाढीव बांणकामाचा अहवाल या कार्यालयात प्राप्त झालेला नाही. तसेच या कार्यालयामार्फत वाढीव बांधकामाबाबत दोन पत्र दि. ३०/३/०९ व दिं. ३१/७/०९ रोजी देण्यात आलेली आहेत.

२) वार्डात होणारी अनधिकृत बांधकामे निष्कासित करणेकामी

३) बांधकामाचा नकाशा नगररचना विभागाकडून मंजुर करण्यात येत असल्यामुळे वाढीव बांधकामा बाबतचा अहवाल नगररचना विभागाकडून मागविण्यात येतो.

(तसेच बॅ.क्र. २०७०, रुम नं. १, सदरचे प्रकरण जनहित याचिका क्र. १४१/२००८ अन्वये न्यायप्रविष्ट आहे.)

<u>महापालिका सचिव :–</u>प्रश्नोत्तराचा कालावधी समाप्त झाला.

कृपया लक्ष दया, सहा लक्षवेधी सुचना प्राप्त झाल्या असून त्या पुढील प्रमाणे आहेत.

लक्षवेधी सुचना क्र. १ जीचे सुचक आहेत श्री. राजेश वानखेडे व अनुमोदक आहेत श्री. चंद्रशेखर यादव

**विषय** :– श्री. भदाणे यांच्या भ्रष्टाचाराचे स्पष्ट पुरावे/माहिती देवुनही त्यांच्यावर कारवाई का होत नाही याबाबत.

लक्षवेधी सुचना क्र. २ जीचे सुचक आहेत श्री. गोविंदराम लुंड व अनुमोदक आहेत श्री. सुनिल गंगवानी

**विषय** :– शहरात आयात होणा–या साखर, गुळ, घरगुती वापराचा गॅस, रॉकेल, चहा, कॉफी या मालावर कमी दराने जकात कर आकारणी करणेबाबत दिनांक १२/२/२००९ रोजी स्थायी समिती ठराव परीत होवूनही त्यावर कार्यवाही होत नसल्याबाबत.

लक्षवेधी सुचना क्र. ३ जीचे सुचक आहेत श्री. राजेंद्रसिंह भुल्लर व अनुमोदक आहेत श्री. रमेश चव्हाण

**विषय** :– कोसळलेल्या इमारतींच्या जागेवर नविन इमारत बांधण्यासाठी ठेकेदारास दुप्पट चटई क्षेत्र देवुन त्याठिकाणी बेघर झालेल्या रहिवाश्यांना घरे व दुकाने नि:शुल्क उपलब्ध करुन देणे बाबत.

लक्षवेधी सुचना क्र. ४ जीच्या सुचक आहेत श्रीमती कविता सिरवानी

**विषय** :– दसरा मैदानास स्व. मोहनदास बेहरानी उदयान असे नाव देण्यात आले असतांना स्व. इंदिरा गांधी उदयान असे नाव कसे देण्यात आले त्याबाबत लक्षवेधी.

लक्षवेधी सुचना क्र. ५ जीचे सुचक आहेत श्री. धनंजय बोडारे

**विषय** :–धोकादायक इमारंतीची पुनर्बांधणी करणे विषयी चर्चा करणे

लक्षवेधी सुचना क्र. ६ जीचे सुचक आहेत श्री प्रकाश सावंत व अनुमोदक आहेत श्री. प्रधान पाटील

**विषय** :–चिकनगुनिया, डेगु सारखे साथीचे आजांर रोखण्यासाठी उपाययोजना करणे बाबत
या ६ लक्षवेधीपैकी कोणत्या २ लक्षवेधी सूचना मा. महापौर स्विकारतात, त्याबात मा. महापौर निर्णय देतील.

<u>महापौर :–</u> लक्षवेधी सूचना क्र. ५ व ६ सदरच्या दोन लक्षवेधी सुचना स्विकृत करण्यात येत आहेत.

<u>महापालिका सचिव :–</u>लक्षवेधी सूचना क्र. ६ जिचे सुचक आहेत श्री. प्रकाश सावंत व अनुमोदक आहेत श्री. प्रधान पाटील

**विषय** :–चिकनगुनिया, डेगु सारखे साथीचे आजांर रोखण्यासाठी उपाययोजना करणे बाबत

लक्षवेधी सूचना क्र. ५ व लक्षवेधी सूचना क्र. ३ हया समसमान असल्यामुळे हया लक्षवेधी सूचना एकच मानुन त्या स्विकारण्यास मा. महापौरांनी अनुमती दिली आहे. त्यांचे सुचक आहेत श्री. राजेंद्रसिंह भुल्लर व श्री. धनंजय बोडारे

**विषय** :—धोकादायक इमारंतीची पुनर्बांधणी करणे विषयी चर्चा करणे

सर्वात प्रथम धोकादायक इमारतीची पुनर्बांधणी बाबतची लक्षवेधी सूचना घेतली जाईल त्याचे सुचक श्री. राजेंद्रसिंह भुल्लर व श्री. धनंजय बोडारे यांनी आपला प्रस्ताव मांडावा.

लक्षवेधी सुचना याप्रकारची आहे......................

---

## लक्षवेधी सूचना क्रमांक १

सुचकाचे नाव :—श्री. राजेंद्रसिंह भुल्लर
श्री. धनंजय बोडारे

**विषय** :—धोकादायक इमारंतीची पुनर्बांधणी करणे विषयी चर्चा करणे

सन्मुख सदन ही इमारत कोसळल्यानंतर उल्हासनगर शहरात भितीचे, दहशतीचे वातावरण पसरले असून नागरीकांत अफवांचे पिक पसरले आहे. माहे जुलै २००९ पासुन इमारत कोसळण्याची ही तिसरी घटना असून सन १९९२ ते १९९५ या कालावधीत बांधण्यात आलेल्या इमारती असून या सर्व इमारतीत राहणारे लोक जिव मुठित धरुन राहतात. महापालिकेने या अगोदरच ११३ इमारतींना धोकादायक ठरविले असून सन १९९२ ते १९९५ दरम्यान बांधण्यात आलेल्या अतर इमारती यांचे बाबतीत दुर्देवाने काही घटना घडल्यास फार मोठा अनर्थ घडू शकतो तो टाळणेसाठी इमारतींची पुर्नबांधणी करणे आवश्यक असून लोकांचे जिविताची हानी होणार नाही याबाबत चर्चा करुन शासनास अवगत करणेसाठी सदर लक्षवेधीवर चर्चा व्हावी.

---

<u>**सदस्य श्री. धनंजय बोडारे :**</u>—मा. महापौर महोदया, उप—महापौरजी, आयुक्त साहेब आणि सभागृहातील सर्व सदस्य, जुलै महिन्यात गुडमॅन कॉटेज ही इमारत कोसळल्याने त्याठिकाणी १४ कुटुंबे बेघर झाली. त्याठिकाणी ५ दुकाने होती. त्याचप्रमाणे उल्हासनगर—४ येथिल मल्लिका महल ही इमारत दुर्घटना होता होता वाचली. त्याठिकाणी जिवित हानी किंवा वित्त हानी झाली नाही, हे आपले सर्वांचे सौभाग्य. परंतु त्यानंतर मागील महिन्यात सन्मुख सदन ही इमारत कोसळली त्याठिकाणी १५ कुटुंब बेघर झाली. १९९२ ते ९५ मध्ये जी अनधिकृत बांधकामे तसेच निष्कृष्ट दर्जाची जी बांधकामे झाली ती सलगपणे कोसळण्याची सुरुवात झाली आहे. कधी, कोणती आणि कशी इमारत पडेल याचा काही नेम नाही किंवा भरोसा नाही. अशा धोकादायक इमारतीमध्ये भयभयीत झालेले लोक आहेत किंवा जीव मुठित घेवुन राहणारे लोक आहेत. महापालिकेने अशा ११३ इमारती धोकादायक असल्याचे घोषित केले आहे. गेल्या सात—सात, आठ—आठ वर्षापासून काही इमारती धोकादायक म्हणुन घोषित केल्या गेल्यामुळे अजुन लोकांना तशी भिती आहे परंतु त्यावर उपाययोजना काही केलेल्या नाहीत. सन्मुख सदन ही इमारत बेकायदेशीर असून आठ दिवसापुर्वी त्याची दुरुस्ती करत होते. म्हणुन ही इमारत खाली करण्यात आली होती. त्यामुळे सुदैवाने फक्त २ व्यक्ती मृतमुखी पडल्या, सहा व्यक्ती जखमी आहेत. परंतु असेच होत राहिले तर पुढे काय करणार? ते थांबविण्यासाठी आपण काय केले पाहिजे? इमारत पडेल किंवा पडणार नाही हे कोणाच्या हातात नाही. परंतु असा प्रसंग आल्यानंतर त्यावेळेस लोकांनी काय केले पाहिजे यासाठी जनजागृती केली पाहिजे. लोकांनी जागृत राहिले पाहिजे. इमारतींची वेळच्या वेळी दुरुस्ती होणे आवश्यक आहे. त्यातल्या त्यात ज्या धोकादायक इमारती आहेत त्यांचे सर्व्हे केले म्हणजे संपले हे चुकीचे आहे. सर्व्हे केल्यानंतर काय केले पाहिजे? त्याची पुढची पायरी घेतली पाहिजे, ती जरा कंट्रोल मध्ये असेल तर ठोक आहे नाहीतर अपघात झाल्यानंतर त्याठिकाणी आयुक्त काय करतात, महापौर काय करतात, नगरसेवक काय करतात, सचिव साहेब काय करतात, अनाधिकृत बांधकाम विभागातील कर्मचारी काय करतात अशी लोकांची भावना तयार होते. महापालिकेतील कर्मचा—यांनी अहोरात्र मेहनत घेतली तरी ती शुन्य होते. कारण त्यावेळेस लोकांच्या भावना जास्त भडकलेल्या असतात. त्यामुळे ११३ ज्या धोकादायक इमारती आहेत तसेच १९९२ ते ९५ दरम्यानच्या ज्या इमारती आहेत त्यांचा सर्व्हे करणे आवश्यक आहे व महासभेत त्याची चर्चा होणे आवश्यक आहे. त्यासाठी महापौरांनी एक बैठक बोलावली त्यामध्ये काही प्रतिष्ठित नागरीक होते, लोकप्रतिनिधी होते, वकिल होते, डॉक्टर्स होते त्यांनी उत्कृष्ट प्रकारे आपले प्रस्ताव ठेवले. त्याठिकाणी शहरातील तीन आमदार श्री. मोते सर, आमदार श्री. आयलानी, आमदार डॉ. किणिकर हे याठिकाणी उपस्थित

होते आणि त्यावेळी शहरातील नागरीकांनी ज्या सूचना त्याठिकाणी व्यक्त केल्या. आणि त्यांना विनंती केली की, या शहराला या दुर्मिक्षापासुन वाचविण्यासाठी महासभेच्या माध्यमातुन जे जे ठराव आम्ही पारीत करु त्याचा पाठपुरावा तुम्ही आमच्याबरोबर करा आणि ते आम्हांला करुन दया. कारण उल्हासनगरच्या बाबतीत यापुर्वी महासभेने जे काही प्रस्ताव पारीत केले त्याबाबतीत शासनाच्या उदासीनतेमुळे ते तसेच पडुन आहेत. नगररचना विभागाचे जे प्रस्ताव आहेत, मग शहराच्या सरहद्दी वाढविण्याचे प्रस्ताव असोत किंवा विकास नियंत्रण नियमावली मंजुर करण्याबाबतचे प्रस्ताव असोत, विकास आराखडयाचा विषय असो, महाराष्ट्र शासनाच्या उदासिनतेमुळे किंवा उल्हासनगरकडे बघण्याच्या दृष्टीकोनामुळे ते तसेच्या तसे अर्धवट पडुन आहेत. परंतु आता हक्काचे आमदार आले आहेत, त्यांनी आमच्या समस्या ऐकुन घेतल्या आहेत. आणि म्हणुन त्यावेळेस ठेवलेली ती बैठक ख—या अर्थाने यशस्वी झाली तर आता आम्ही कोठे कमी पडायला नको, महाराष्ट्र शासनाकडुन हे मंजुर करुन घेण्याची हमी, वचन त्यांनी दिले आहे. महाराष्ट्र शासनाकडे आपणाकडुन काही गेले नाही तर मंजुर काय करणार? त्यासाठी माझी एक सूचना आहे की, पहिल्यांदा तुम्ही ११३ इमारतीचा जो सर्व्हे केलेला आहे त्याठिकाणी आताची परिस्थिती नेमकी काय आहे? त्या व्यतिरिक्त इतर धोकादायक इमारती आहेत का? असल्यास लोकांना जागृत कसे करता येईल? धोकादायक इमारत, पडण्यासारखी इमारत कुठली असेल तर त्यांच्या साईट्स असतात. संभाव्य धोका ओळखण्यासाठी लोकांना जागृत करावे. जे तज्ञ लोक असतील त्यांची एक समितीत स्थापन करावी. या इमारतीमध्ये भविष्यात धोका होणार आहे. धोका झाल्यास त्यावर लवकरात लवकर काय उपाययोजना केली पाहिजे? हे लोकांना समजावुन सांगणे आवश्यक आहे. आणि त्याच बरोबर धोकादायक इमारतींमध्ये सुध्दा लोक राहतात. तर कोणता गंभीर प्रसंग येईल हे त्यांना समजवुन सांगणे आवश्यक आहे. तर आणि तरच ते उपयोग करतील. नाहीतर प्रत्येकजण उठेल आणि आहे मग ट्रांझीट कॅम्प ट्राझीट कॅम्प बनविणार तरी किती? नाहीतर एक वेळ अशी येईल येथे रडणार कोण? कोणासाठी ? आणि तेच प्रसंग वारंवार येतील. तेव्हा बघायलाही आम्हांला वेळ नसणार आहे. आणि त्याची तिव्रता तीही जास्त असेल. मराठीत म्हण आहे ''रोजचे मरे त्यास कोण रडे''. रोजच असा प्रकार झाला तर त्याला बघायला कुणी जाणार नाही. सन्मुख सदन मध्ये लोकांची तशीच अवस्था आहे. आज ते बेघर आहेत त्यांना राहायला घर नाही. इकडे तिकडे भटकत आहेत. त्यावर ट्रझिट कॅम्पच्या माध्यमातुन महापालिकेने पर्याय शोधला आहे. पण असे करणार किती? दुर्देवाने अशी घटना जेथे कोणतेही वाहन जावु शकत नाही. अशी घटना आमच्या गजानन मार्केटच्या मागच्या बाजुला घडली तर आम्ही काय करणार? त्यासाठी वेळीच उपायोजना करणे आवश्यक आहे. तर त्यासभेत चर्चा झाल्यानुसार एकतर तंज्ञ समिती याठिकाणी नियुक्त करा नाखवा किंवा कुणीतरी आपण नियुक्त केला आहे. त्याचे काम लागलीच सुरु झाले आहे काय? ते पहा. त्याव्यतिरिक्त महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातुन जो अध्यादेश पारीत झालेला आहे, त्या अध्यादेशान्वये आम्ही आहे ते बांधकाम फक्त नियमित करु शकतो. पण ते बांधकाम पाडल्यानंतर पुर्वीच्या एवढे चटईक्षेत्र आम्हांला मिळणार नाही. त्यामुळे त्या अध्यादेशामध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव आम्ही आणुच परंतु प्रशासनाच्यावतीने सुध्दा त्याबाबत आम्हांला सूचना येणे आवश्यक आहे. मग तो अशासकिय प्रस्ताव असेल किंवा आणखी काही असेल तो येईलच. त्याचबरोबर झोपडपट्टी विकास एसआरएस स्कीम ही महाराष्ट्र शासनाने लागु केली आहे, फक्त मुंबई पर्यंत. ठाण्याच्या अलिकडे नाही. ही कॉक्रिटची झोपडपट्टी, फक्त झोपडपट्टी झाली की झोपडपट्टीच राहिल? आमच्याकडे एसआरएस स्कीम सुध्दा कशी येईल? आणि फक्त झोपडपट्टयांपर्यंत मर्यादीत न राहता मी यापुर्वी नमुद केल्याप्रमाणे गजानन मार्केटच्या मागच्या बाजुला जर अशा प्रकारचा प्रसंग झाला तर आम्ही काय करणार आहोत? तर त्याठिकाणच्या लोकांना पर्याय सुध्दा दिला पाहिजे. त्यासाठी विशेष बाब म्हणुन एसआरएस स्कीम झोपडपट्टींमध्ये सुध्दा राबविता आली तर बरे होईल. अशा प्रकारची विनंती महाराष्ट्र शासनाला करणे गरजेचे आहे. त्यासाठी प्रशासनाच्यावतीने जे जे काही करता येईल, मग ते सरहद्दी वाढविण्याच्या दृष्टीने ते प्रस्ताव पारीत करुन तशा सूचना किंवा प्रस्ताव नगररचना विभागाकडुन याठिकाणी तयार करावेत. शासनाची किंवा प्रशासनाची जी अडचण असेल ती आम्ही सोडवु. आमची अडचण असेल तर तुम्ही सोडवा. पण लोकांना धोक्याची जाणीव करुन देणे आवश्यक आहे. तोपर्यंत लवकरात लवकर ट्रांझिट् कॅम्प तयार केले जावेत कारण कधी काय दुर्घटना होईल हे सांगता येत नाही तसे घडणार नाही. अशी आपण ईश्वर चरणी प्रार्थना करु. पण तसे घडल्यास आपण तयार असले पाहिजे. कुठली घटना घडल्यानंतर आपण धावपळ करायीच, असे घडु नये किंवा घडल्यानंतर अगोदर आपली तयारी असली पाहिजे. अशा प्रकारची तयारी करणे हे प्रशासनाचे काम आहे, कधी कुठे घडेल हे सांगता येत नाही. त्यासाठी लागेल ते सहकार्य आम्ही देवु, तुमच्याकडुन आलेले प्रस्ताव हे नक्कीच पारीत करु. परंतु मी ज्या सूचना केल्या, जसे सरहद्दी वाढविण्यासाठी, एसआरएस स्कीम लागु करण्यासाठी आणि जो अध्यादेश निघालेला आहे, त्या अध्यादेशानुसार बांधकामे नियमित करण्यासाठीच्या ज्या काही अडचणी आहेत त्या बाजुला करा. त्यामध्ये तुम्ही तज्ञं आहात. तांत्रिक विभागाचे तुम्ही आहात.जी प्रकरणे पडुन आहेत त्यांचा कसा निपटारा करता येईल आणि त्या अध्यादेशामध्ये बदल काय करायचा आहे? चटईक्षेत्र निर्देशांक किती करावयाचा?

बांधकाम नियंत्रण नियमावलीत काय बदल करायचे? हे सर्वच्या सर्व प्रस्ताव लवकरात लवकर महासभेपुढे आणा. त्यासाठी ही लक्षवेधी आहे. प्रशासनाच्यावतीने यावर काही उपाययोजना केली, तुम्ही म्हणालात तुम्ही काय उपाययोजना केली आहे. कारण हा प्रसंग तिसरा आहे. मला वाटते चौथा आहे. त्यामुळे यापुर्वी केलेली उपाययोजना काय आणि अपेक्षित असलेली उपाययोजना काय हे याठिकाणी नमुद करा.

**यावेळी सदस्य श्री. प्रधान पाटील, श्री.बी.बी. मोरे, श्री. महेश सुखरामानी, श्री. शेखर यादव हे सभागृहातुन बाहेर गेले.** 

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :</u>—सन्माननिय महापौरजी, उप—महापौरजी आणि आयुक्त साहेब, आता ज्या इमारती कोसळत आहेत, त्यामुळे जे लोक बेघर होत आहेत त्यांना पुन्हा घर कसे मिळु शकेल? आणि यापुढे ज्या इमारती कोसळणार आहेत त्यामुळे बेघर होणा—या लोकांना घर कसे मिळु शकेल. याबाबत मला असे म्हणायचे आहे की, अनाधिकृत बांधकामे नियमित करण्यासाठी शासनाने जो चार चटईक्षेत्र निर्देशांक मंजुर केला आहे त्यानुसार ज्या इमारती कोसळायला आलेल्या आहेत त्यांच्या पुर्नबांधणीसाठी चार चटईक्षेत्र निर्देशांक देण्यात यावा. त्यासाठी बैठक घेवुन जर कुणी एक हजार चौरस फुटाच्या घरात राहत असेल तर त्यास सातशे चौरस फुटाचा फ्लॅट दिला जावा. व अशा इमारतींसाठी कमीत कमी चार चटईक्षेत्र निर्देशांक देवुन बिल्डरने त्यांना बांधकाम करुन दयावे. आणि यासाठी महापालिकेने मध्यस्थी केली तरच बेघर वाशियांना घरे मिळु शकतील. कारण की, इमारती बांधुन बिल्डर अगोदरच निघुन गेले आहेत. आज अशी परिस्थिती आहे. समजा एखादया इमारतीमध्ये चाळीस कुटुंबे राहतात त्यातील १५ लोक असे असतात की ते मेंन्टेनन्स सुध्दा भरु शकत नाहीत. आणि इमारत कोसळुन असे लोक जर बेघर झाले तर नव्याने आपले घर कसे उभे करु शकतील. यासाठी महापालिकेने एक अशासकिय प्रस्ताव आणावा. चार चटईक्षेत्र निर्देशांक वापरुन महापालिकेने त्यास इमारत बांधुन दयावी. पाहिजे तर पाच चटईक्षेत्र निर्देशांक वापरावा. एक चटईक्षेत्र निर्देशांक बिल्डरला देवुन चार चटईक्षेत्र निर्देशांकमध्ये इमारतीमध्ये सर्वांना सामावुन घ्यावे. आणि माझा दुसरा असा प्रस्ताव आहे की, जी इमारत कोसळली नाही, पडली नाही ती पाडण्याचे काम ठेकेदाराने करावे. व तेथिल रहिवाश्यांच्या पुर्नवसनाचे काम ठेकेदाराने करावे. व इमारत पाडल्यानंतर ती जागा जर एखादया आरक्षणाखालील असली तरीही आरक्षणाचा विचार न करता तेथे इमारत बांधण्यास परवानगी दिली जावी. आरक्षणाकडे बोट दाखवुन बांधकाम परवानगी नाकारली जावु नये तेथे इमारत बांधण्यास परवानगी मिळालीच पाहिजे. जर शासकिय जमिनीवर इमारत बाधंली असेल त्या जागेवर कुणाचा मालकी हक्क नसेल. एखादयाने तेथे इमारत बांधुन तो निघुन गेला असेल तर आज तेथे जे लोक राहतात त्यांचा काही दोष नाही. आज जर त्यांना कुणी सांगितले की, तुम्ही आता या जागेतुन बाहेर पडा तर अशावेळी कोण बाहेर पडणार आहे? आणि त्याठिकाणी पुन्हा इमारत बांधण्याचा प्रस्ताव कोण सादर करेल? यासाठी त्याठिकाणी कुणीही इमारत बांधण्याचा प्रस्ताव सादर करण्याची आवश्यकता नाही. त्याठिकाणी महापालिकेने स्वत: इमारत बांधुन बेघर वाशियांना घर उपलब्ध करुन दयावे. असे माझे सांगणे आहे. बाकी सभागृहात बरेचसे समजदार सदस्य आहेत ते आपापला प्रस्ताव सभागृहा पुढे ठेवु शकतात. व सर्व संमतीने हा प्रस्ताव पारीत करुन प्रशासकिय प्रस्ताव पुढील महासभेत आला पाहिजे. त्यानंतर तो शासनाकडे पाठविला पाहिजे.

<u>सदस्य श्री. लाल पंजाबी :</u>—सन्माननिय सदस्य श्री. बोडारे साहेबांनी ही जी लक्षवेधी सूचना मांडली आहे, या लक्षवेधीतील बहुतांश मुद्दे मागे इमारतींच्या संदर्भात सभागृहात शहरवाशियांची जी बैठक बोलाविली होती त्या बैठकीत आलेले आहेत. श्री. बोडारे साहेबांनी सर्व मुद्दे चांगल्याप्रकारे/ विस्तृतपणे मांडले आहेत. त्यांनी जे म्हटले त्या व्यतिरिक्त माझ्या दोन सूचना आहेत एक तर धोकादायक इमारतींची यादी सर्व नगरसेवकांना वितरीत केली जावी. कारण की, ज्या ज्या नगरसेवकांच्या प्रभागात अशा धोकादायक इमारती आहेत व ज्यांची दुरुस्ती होवु शकते अशा इमारतीची दुरुस्ती करुन घेण्यासाठी ते सदस्य त्या इमारतीतील लोकांना समजावुन सांगु शकतील. यासाठी ११३ धोकादायक इमारतीची यादी नगरसेवकांना वितरीत केली जावी.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :</u>—सन्माननिय महापौरजी, आयुक्त साहेब, माझा एक आणखी मुद्दा आहे. दुरुस्तीचा जो मुद्दा आहे, त्यासाठी विशेषज्ञ जे आहेत त्यांना बोलवा आणि त्यानंतरच दुरुस्तीचे काम दया. सन्मुख सदन इमारतीच्या दुरुस्तीसाठी आर्किटेक्टने लोकांकडुन ५०—५० हजार रुपये घेतले आहेत. दुरुस्ती केली व लोकांना सांगितले की, राहायला जा. त्यानंतर दुर्घटना घडुन लोक मरण पावले त्यामुळे आर्किटेक्टवर कारवाई केली पाहिजे. दुरुस्ती परवानगी अशा इमारतीस दया की दुरुस्ती केल्यानंतर ती इमारत २० वर्ष तरी टिकली पाहिजे.

<u>सदस्य श्री. लाल पंजाबी</u> :—एकतर ही एक सूचना सर्व सदस्यांना वितरीत करा व दुसरी गोष्ट अशी की, त्या बैठकीच्यावेळी श्री. जमनादास पुरस्वानी यांनी एक सूचना केली होती. ती अशी की, धोकादायक इमारतींची ही जी यादी आहे त्यांची आपण वर्गवारी करा. अतिशय धोकायदाय इमारती, धोकादायक इमारती, कमी धोकादायक इमारती अशा प्रकारची आपण वर्गवारी करा. त्यानुसार कारवाई करा. नाहीतर ११३ इमारतींना जर नोटिस देणे सुरु केले तर जे भयाचे वातावरण आहे ते जास्त होईल. त्यासाठी जी इमारत जास्त धोकादायक आहे त्याची वेगळी यादी करुन प्रथम त्यावर कार्यवाही केली तर उचित राहिल.

यावेळी मा. उप—महापौर श्री. विनोद ठाकुर हे सभागृहातुन बाहेर गेले. 

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ</u> :—मा. महापौर महोदया, इमारत कोसळण्याची जी सुरुवात झाली आहे याबाबत फक्त एकच बोलले जाते की, १९९२,९४,९६ मध्ये रेती खराब मिळत होती आणि त्यावेळेस ज्या इमारती बांधल्या गेल्या त्या कोसळत आहेत परंतु वस्तुस्थिती जर पाहिली तर उल्हासनगरमध्ये साफसफाईचा गंभीर प्रश्न आहे. इमारतीत राहणारे लोक इमारतीची साफसफाई व्यवस्थित ठेवत नाहीत तेथील लोकांना वाटते की आम्ही फ्लॅटमध्ये राहायला गेलो म्हणजे आम्ही फार मोठे झालोत असा त्यांचा गैरसमज होतो. त्यामुळे तेथिल लोक शिळा भात वगैरे इमारतीच्या खिडकीतुन बाहेर टाकतात आणि त्यामुळे ब—याच इमारतीच्या खाली घुशीने पोखरलेले दिसते, मोठ मोठे उंदिर व घुसींनी ते पोखरलेले तुम्हांला नजरेस पडेल. तसेच लोक इमारतीचे मेंटेनन्स भरत नाहीत. मेंटेनन्स न भरल्यामुळे इमारत दुरुस्तीसाठी पैसा मिळत नाही. अपु—या पैश्यामुळे, इमारतीची साफसफाई बरोबर होत नाही. मी एवढेच सांगु इच्छितो की, काही इमारतींचे पाईप फाटलेले आहेत, काहीं इमारतींमधील घाणेरडे पाणी बाहेर पडत असते. रस्त्यावरुन सफाई कामगार जातात, रस्त्याच्या कडेला इमारती असल्यामुळे जाणा—या माणसांवरच घाणेरडे पाणी पडत असते. ही जी परिस्थिती आहे त्याला कारणीभुत इमारतीमध्ये राहणारे सुध्दा लोक आहेत. काही गोष्टींवर अंकुश लावणे फार गरजेचे आहे. त्यामुळे आरोग्य विभागामार्फत हे तपासणे जरुरी आहे की ज्या इमारतींमध्ये साफसफाई होत आहे किंवा नाही त्यास दंड आकारणी केली पाहिजे. तरच यामध्ये काही सुधारणा होतील. आणि ज्या इमारती पडतात, तसेच ज्या इमारती जास्त धोकादायक आहेत त्यांच्यावर प्रथम कारवाई केली पाहिजे. आर्किटेक्ट तेथे धंदा करायला जातात, इमारत पडणार नाही, टेकु दयावे लागतात, टेकु देतात, दुस—या बाजुला इमारत झुकते आणि इमारत कोसळते. आणि नंतर सांगतात की तेथे दुरुस्तीचे काम चालु होते. त्यामुळे महापालिकेची बदनामी होते. उल्हासनगरमध्ये अशा १३० ते १३५ इमारतीं आहेत. यांचे एकमागे एक असे नंबर लागणारच आहेत. त्यासाठी आपण नियमितपणे जर साफसफाई ठेवली नियमित साफसफाईकडे लक्ष दिले तर फारच चांगले होईल एवढीच विनंती करतो.

<u>सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता</u> :—मा. महापौरजी, प्रभाग क्र. ३२, जवाहर टॉकीजच्या बाजुला सभागणी अपार्टमेंट आहे. जी आठ वर्षापुर्वी खाली करण्यात आली होती. पावसाळयाअगोदर तेथे १२ कुटुंबे राहत होती आता पाहतो तर २ कुटुंबे राहत आहेत. पावसाळयात त्या इमारतीचे छप्पर कोसळले होते. आता ही इमारत कोसळण्याच्या स्थितीत आहे. यासाठी या इमारतीचा सर्व्हे करुन नियमानुसार कारवाई करा. भविष्यात ही इमारत कोसळली तर त्यास जबाबदार कोण असेल या बाबींकडे विशेष करुन लक्ष दिले जावे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u> मा. महापौर महोदया, सर्वात प्रथम मी श्री. भुल्लर महाराजाना धन्यवाद देतो कारण यानी लक्षवेधी सुचना आणली. या लक्षवेधी सुचनेचा ठराव तयार करुन शासनाकडून मान्यता घेतली पाहिजे. कारण यापुर्वी सुध्दा या विषयावर चर्चा झाली आहे. शहरामध्ये ज्या धोकादायक इमारती आहेत यांची तपासणी झाली पाहिजे कारण किती धोकादायक इमारती आहेत ज्यांची पुर्ननिर्माण होऊ शकत नाही. ज्याची दुरुस्ती होऊ शकत नाही त्यांना तोडणे आवश्यकच आहे त्याची यादी बनवुन शासनाकडे पाठविली पाहिजे. तसेच श्री. भुल्लर महाराज यांनी असे म्हटले की, या इमारतींना चार चटई क्षेत्र निर्देशांक देऊ त्याने काय होणार तर त्याने काय होईल जे गरिब लोक तेथे राहतात त्यांची हिंमत नाही की ते इमारत तोडुन परत बनवु शकतील. जर चार चटई क्षेत्र निर्देशांक दिला तर कोणताही ठेकेदारांस ते काम घेऊन तो ठेकेदार त्यांना मोफत मध्ये इमारत बनवुन देईल. तर मी लक्षवेधीचे सर्मधन करतो व श्री भुल्लर महाराज यांना धन्यवाद देतो, त्यांनी ही लक्षवेधी आणली आहे याचा ठराव करुन शासनाच्या मंजुरीसाठी पाठवावा. व हा ठराव गेल्यानंतर शहरात अशा किती इमारती आहेत याची तपासणी करुन त्यांची दुरुस्ती करुन ज्या इमारती तोडाव्याच लागतील अशा इमारतीची यादी महासभेत दिली जावी, या इमारतींची दुरुस्ती केली जावी व अशा इमारतींची सुध्दा अ, ब, क प्रमाणे वर्गवारी करुन वीस वीस पचंवीस इमारतींना खाली करुन त्याचे दुरुस्तीचे काम करण्यास परवानगी दिली

जावी. तर मी आपणांस विंनती करतो की, पुढील  महासभेत ठराव बनवुन आणला जावा व याची यादी सर्व नगरसेवकांना दिली जावी की, जेणे करुन प्रत्येक नगरसेवकांच्या प्रभागात अशा काही धोकादायक इमारती असतील तर त्याची माहिती त्यांना मिळेल. धन्यवाद.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी:—</u> मा. महापौरजी, उप—महापौरजी, श्री. भुल्लर महाराज, श्री. धनंजय बोडारे, श्री. रमेश चव्हाण व इतर नगरसेवकांनी येथे चांगलाच मुद्दा मांडला आहे. शहरातील समस्या वाढलेल्या आहेत. आमचे लोकभारतीचे उपाध्यक्ष श्री. सांई बलरामजी यांनी सुध्दा मागे हेच मुद्दे उपस्थित केले होते. ऑगस्ट महिन्यात त्यांनी आमरण उपोषण केले होते.  या शहराचे काय होईल? एका मागोमाग एक इमारत पडेल त्याचे पुनर्वसन कसे होईल? बरीच चर्चा, गोष्टी झाल्या, काहींचा मार्ग निघाला, काहींचा निघाला नाही.  आता सन्मुख सदन ही इमारत पडल्यानंतर ज्या मशिनरी बंद होत्या त्या आता कार्यान्वीत झाल्या आहेत.  गुडमॅन कॉटेजबाबत मी आयुक्त साहेबांकडे मुद्दा उपस्थित केला होता की, गुडमॅन कॉटेजला चार चटईक्षेत्र निर्देशांक मिळायला हवा होता.  रेग्युलायझेशनच्या केस मध्ये मा. सेक्रेटरी श्री.टी.ी. बेन्जामिन साहेबांचा आदेश आहे, मी हा आदेश आयुक्त साहेबांपुढे व नगररचना साहेबांपुढे वाचला होता त्यावेळेस बरीच चर्चा झाली होती. व त्यावेळेस त्यांनी मान्यही केले होते.  आणि याचे व्हीडीओ रेकॉर्डीग सुध्दा तेथे उपलब्ध आहे.  त्यावेळी त्यांनी मान्य केले होते की होय बरोबर आहे, असा आदेश आहे.  गुडमॅन कॉटेजला ४ चटईक्षेत्र निर्देशांक मिळालेच पाहिजे.  पाहिजे तर मी त्या आदेशातील काही वाक्य वाचून दाखवितो.  ती वाक्य अशी आहेत '' अशा नियमाधीन करण्यात आलेल्या बांधकामाचे चटईक्षेत्र निर्देशांक ४ पेक्षा कमी असल्यास भविष्यात पुर्नबांधकाम करतांना केवळ तेवढाच चटईक्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय होईल.  याचाच अर्थ ज्याचा चटईक्षेत्र निर्देशांक ४ असेल तर ४, कमी असेल तर त्यास कमी, ४ पेक्षा जास्त नाही.  अशा प्रकारचा आदेश शासनाने दिलेला आहे. त्यानंतर सुध्दा गुडमॅन कॉटेजला न्याय मिळाला नाही.  तर्क, विर्तक हे असे नाही, असे आहे. कुण्या एका अधिका—याने मला असे सांगितले की, यामध्ये असे आहे की, जी इमारत नियमाधीन झाली आहे, त्यासाठी हा आदेश आहे.  गुडमॅन कॉटेज अदयापपर्यंत नियमाधीन झाली नव्हती.  गुडमॅन कॉटेजचा आदेश काय आहे तर आपण दुरुस्ती करा, चटईक्षेत्र ४ चा निर्देशांक दया.  मग आपले बांधकाम नियमाधिन होईल.  ते काम त्यांनी केले.  त्यासाठी त्यांनी माईंड अप्लाय केले परंतु शासकिय यंत्रणेने काही केले नाही. ती इमारत नियमाधीन झाली नाही.  त्याचा परिणाम गरीब लोकांनी कशाला भोगायला हवा? त्याचे कारण काय?  अधिकारशाहीमुळे हे भोगावे लागत आहे. मोठ मोठया गोष्टी करतात, हे झाले, ते झाले आम्ही, इमारत नियमाधिन केली. परंतु त्याचा फायदा सर्वसाधारण माणसास मिळत नाही. ही अधिकारशाही अजुनही चालु आहे.  जनतेला काही फायदा मिळत नाही. आदेशाचा असा अर्थ आहे, तसा अर्थ आहे म्हणुन सांगतात.  ठिक आहे, जी काही अ,ब,क,ड बांधकामे नियमित झालीत ती मी मान्य करतो.  त्यास चटई क्षेत्र ४ दिला पाहिजे.  नियमाधिन झालेल्या इमारतीसुध्दा आहेत त्या धोकादायक आहेत त्या केव्हाही पडण्यासारख्या आहेत.  त्यांच्याबरोबर काय होणार?  कुणी तरी सांगितले की, गुडमॅनसाठी हा एक कागदोपत्री आजार आहे.  अन्य इमारतींसाठी तर नाही आहे?  दोन चोर आहेत दोघांनी चोरी केली आहे, त्यातील एकास फासी देणार व दुस—यास म्हणणार जा घरी बस.  किंवा बक्षीस दयाल तर वेगवेगळे दयाल?  कायदा सर्वांसाठी समान आहे.  सचिव साहेब, या आदेशाची मी आपणांस प्रत देतो.  कृपया आपण ती मा. महापौर, मा. उप—महापौर व आयुक्त साहेबांना दाखवा.  मराठीत काय लिहिले आहे, त्याचा स्पष्टपणे खुलासा होवु शकेल.  कदाचित माझ्या पुर्णपणे लक्षात आलेले नसेल. मी अगोदरसुध्दा आयुक्तांच्या दालनात सांगितले होते की, कदाचित मी चुकीचेही म्हणत असेन. तर यासाठी आपण यावर प्रकाश टाकावा.  एक एक शब्द वाचुन सभागृहाला, संपुर्ण शहराला सांगा की काय होणार आहे?  या आदेशाचे काय होईल?  प्रधान सचिव श्री.टी.सी. बेन्जामिन साहेबांनी चुकीचा आदेश तर दिला नाही? कदाचित त्यांच्याकडुन सुध्दा चुक होवु शकते.  त्यासाठी यावर आज कृपया निर्णय घ्या.

**मा. उप—महापौर श्री. विनोद ठाकुर यांनी सभागृहात प्रवेश केला.**

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>मा. महापौर महोदया, याचबरोबर आणखी एका गोष्टीचा खुलासा करु इच्छितो.  इमारत नियमाधिन करण्यासाठी जी काही कागदपत्र पाठविली जातात.  व जे लोक अपिलात गेले होते, त्यांचे अपिल रद्द करण्यात आले. ज्याप्रकारे गुडमॅन कॉटेजचे प्रकरण आहे की आपली इमारत ४.३५ चटई क्षेत्राची आहे त्यासाठी आपण ०.३५ चटईक्षेत्र कमी करुन, ४ चटईक्षेत्राच्या आत प्रस्ताव आणला तर आपणांस आपली इमारत नियमाधिन करुन देण्यात येईल.  तर मी आपणांस एक प्रश्न विचारतो की, जेव्हा त्यांना शासनाकडुन हा आदेश आला व त्यांनी ४.३५ चटईक्षेत्राचे बांधकाम तोडुन ४ चटई क्षेत्राव्यतिरिक्त जे वाढीव बाधंकाम होते ते जर तोडले असते व जर इमारत कोसळली असती तर त्या लोकांनी काय केले

असते? त्यानां सागण्यात आले होते की, आपल्या इमारतीच्या काही बाल्कनी व अन्य काही भाग जो ०. ३ एवढया चटई क्षेत्राचा आहे तो भाग तोडुन या आम्ही तुम्हास ४ चटई क्षेत्र निर्देशांक नुसार इमारतीचे बाधंकाम नियमित करुन देऊ. , त्यानुसार जर त्या लोकांनी तेवढा भाग तोडला असता आणि जर का इमारत कोसळली असती तर ४ चटई क्षेत्र निर्देशकांनुसार बाधकाम करण्यास आम्ही सागिंतले असते. कारण की शासनाने असा आदेश दिला आहे की आपण ४ चटई क्षेत्र निर्देशकांनुसार बाधंकाम करुन नियमित करण्यासाठी प्रस्ताव घेऊन या. समजा त्यानुसार त्यांनी ४ चटई क्षेत्र निर्देशकांनुसार बांधकाम केले असते तर ते बाधंकाम नियमित केले नसते याचा खुलासा या ठिकाणी झाला पाहिजे, याबाबतचे जे विशेषज्ञ आहेत त्यांच्याशी सल्लामसलत करा. शासन आदेश देते की, ४ चटई क्षेत्र निर्देशकापेक्षा जे वाढीव बाधंकाम आहे ते तोडा किंवा संपुर्ण बाधंकाम तोडुन ४ चटई क्षेत्र निर्देशकांएवढे बाधंकाम करा यापैकी नेमके काय करावे? कृपया याचा खुलासा व्हावा.

**🕴 🕴 🕴 🕴 यावेळी सदस्य श्री. महेश सुखरामानी, श्री. प्रधान पाटील, श्री. शेखर यादव, श्री.बी.बी. मोरे यांनी सभागृहात प्रवेश केला.**

**<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—</u>** सन्मा. महापौर महोदया, मी प्रथमत: सभागृहाचा आभारी आहे, एवढा महत्वाचा विषय चर्चेसाठी घेतला, लोंकाच्या दृष्टीने आणि लोकांच्या जीवीत्वाच्या दृष्टीने फार महत्वाचा विषय आहे. सदर विषयाबाबत श्री. साई बलराम यांनी उपोषण केले होते, त्यावेळी आश्वासन दिले होते, त्यानंतर लोंकाच्या पुनर्वसनासाठी व तंज्ञ सल्लागार नेमण्याकामी कार्यवाही चालु करण्यात आली होती. नंतर माझे दालनात सर्व गटनेत्यांची एक बैठक घेतली, आणि त्या बैठकित तात्काळ कार्यवाही करण्याबाबतीत जे निर्णय घेण्यात आले त्यानुसार तज्ञ सल्लागार नेमण्याची कार्यवाही सुरु झाली आहे, एक तज्ञ सल्लागार नेमण्यात आलेला आहे, कॉक्रीटचे हॅमर टेस्ट वगैरे, त्या घेण्याबाबतीत कार्यवाही चालु आहे महत्वाचे म्हणजे तेथे जे मुदद् उपस्थित झाले ४ चटई क्षेत्र किंवा जी इमारत अस्तित्वात आहे त्या इमारतीच्या बाबतीत बाधंकाम नियंत्रण नियमावली मध्ये बदल करण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे त्याप्रमाणे प्रशासनाच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे मी आपल्या सुचनांचे स्वागत करतो. सर्व सुचना त्या बाधंकाम नियंत्रण नियमावली मध्ये समाविष्ट होतील किंवा शासनाचे जे अधिकार आहेत, नगररचना अधिनियमाचे कलम ५४ खाली कल्याण महानगरपालिकेस शासनाने आदेश दिले होते अशी अशी कार्यवाही करा त्याप्रमाणे शासनाकडुन काही आदेश प्राप्त करुन घेता येतील का? त्याबाबत परिपुर्ण असे प्रस्तावाचे काम चालु आहे, त्याबाबतचा प्रस्ताव पुढच्या महासभेत मंजुरीसाठी ठेवतो. प्रस्ताव मंजुर झाल्यानंतर सदरचा प्रस्ताव शासनाकडे पाठवु या, अशी माझी आशा आहे व मी सभागृहास विनंती करतो की या विषयात सर्वांनी रस घ्यावा आणि शहराच्या दृष्टीने चांगले पाऊल उचलावे अशी मी अपेक्षा करतो

**<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे:—</u>** श्री. सिंग साहेब, श्री. जीवन इदनानी यांनी मुदद्‌ उपस्थित केला आहे तो महत्वाचा मुदद्‌ आहे सपुंर्ण शहराची जी परिस्थिती आहे ती सुधारण्यासाठी , हाताळण्यासाठी महत्वाची आहे, श्री. बेन्जामिन यांचा तो निर्णय आहे. त्यांनी स्पष्टपणे सांगितले आहे की, पदनिर्देशित अधिकारी यांनी असे प्रस्ताव अधिनियमातील तरतुदीनुसार ४ चटई क्षेत्र निर्देशांक मर्यादेत असल्यास विकास नियंत्रण नियमावलीतील तसेच नियमावलीतील तरतुदीच्या अधीन राहुन नियमाधीन करण्याची कार्यवाही करावी. व सुधारीत आदेश एक महिन्यात पारित करावे. अशा नियमानुकुल करण्यात आलेल्या बाधंकामाचे चटई क्षेत्र निर्देशांक ४ पेक्षा कमी असल्यास भविष्यात पुर्नबाधंकाम करताना केवळ तेवढाच चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय राहिल. म्हणजेच ज्याचा चटई क्षेत्र निर्देशांक ४ पेक्षा कमी आहे. जी बाधंकामे नियमाधीन झाली दुसऱ्या दिवसांपासुन त्याचे भविष्य सुरु होते भविष्य म्हणजे पाच वर्षानी, दहा वर्षानी, पन्नास वर्षानी असे होत नाही, आज आहे तो वर्तमान काळ तर उद्यापासुन भविष्य सुरु होईल, बाधंकाम नियमाधीन केल्यावंर त्यांची पुर्नबाधणी करायचे आहे हे तंत्र ठेवावे, भविष्यात पुर्नबाधंणी करायची असल्यास जर चटई क्षेत्र निर्देशांक ४ पेक्षा कमी असेल तर तेवढेच मिळेल म्हणजेच जर एखादयाचा २ चटई क्षेत्र निर्देशांक असेल तर तो तेवढाच असेल, परंतु ४ चटई क्षेत्र निर्देशांक मिळाला पाहिजे असा त्याचा अर्थ आहे, ग्लास अर्धा भरलेला आहे का? अर्धा रिकामा आहे? तुम्ही जर अर्धा रिकामा आहे असा घ्याल तर निष्कर्ष काढता येईल की अर्धा भरलेला आहे. माझी दुसरी एक सुचना आहे की, मुबंई मध्ये जसे दुरुस्ती आणि पुर्नबाधंणीचे बोर्ड आहे त्याच धर्तीवर बोर्ड स्थापण्यासाठी आम्ही या उल्हासनगर मध्ये काय केले पाहिजे? त्याबाबत प्रशासनाच्या सुचना काय आहेत? आणि आमची सर्वांची एक भावना आहे की, अध्यादेश पारित करणे हिच आमची भावना होती. जसे आहे तसे तसे बाधंकाम करण्यासाठी काय करता येईल. आम्ही काय करावे? तेच प्रशासनाने आम्हाला मार्गदर्शन करावे. शासनाचा आदेश आहे का? त्या आदेशानुसार तुम्ही चालायचे पण लोंकाच्या भावना या लोकप्रतिनिधीच्या माध्यमातुन तुमच्या कडुन कशा प्रकट

करुन घेता येतील तसेच शासनाकडुन कसे करुन  घ्यायचे ते आमदारांनी मान्य केले आहे. त्याबाबत काय करणार याबाबत सुचना दया.

श्री. सी.पी.सिंग (सहा. नगररचनाकार):— मा. महापौर महोदया, माननीय सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे त्यामध्ये श्री. बेन्जामीन साहेबाचा आदेश मी वाचुन दाखवितो, बेन्जामीन साहेबाच्या आदेशाच्या शेवटच्या दोन ओळी अशा आहेत की, '' असा नियमाकुल करण्यात आलेल्या बाधकामाचे चटई क्षेत्र निर्देशांक म्हणजेच जी इमारत पदनिर्देशित अधिकाऱ्यांनी आधीच नियमाधीन केली असेल तर, जर नियमाधीन केलेली नसेल तर त्यास काही फायदा मिळणार नाही. या ठराविक प्रकरणामध्ये त्यांनी जो निर्णय दिलेला आहे तो असा आहे इमारत जर नियमाधीन झालेली असेल तर त्याला ४ पेक्षा कमी चटई क्षेत्र निर्देशांक असलेल्या पेक्षा कमी त्यांनी बाधलेली असेल तेवढा चटई क्षेत्र निर्देशांक त्यांना देण्यात यावा. किंवा जास्तीत जास्त ४ चटई क्षेत्र निर्देशांक देण्यात यावा, यामध्ये हा स्वतंत्र प्रकरणांतील निर्णय आहे. आपल्याला तसा पाहिजे असेल तर तसा नियम घेवू शासनाकडुन प्रत्येक प्रकरणामध्ये जे काही नियमाधीन झालेले असतील, त्यांनी जरी अपिल केलेले नाही तरी यांमध्ये आपण शासनाचे स्पष्टीकरण आपण घेऊ.

यावेळी श्रीमती कविता सिरवानी श्रीमती लिलाबाई आशान, श्रीमती शिला मनसुलकर हया सभागृहातुन बाहेर गेल्या.

सदस्य श्री. धनंजय बोडारे:— मला तेच सागांयचे आहे की, नियमाधीन करण्याची मोहिम जी संथ गतीने चाललेली आहे मग ती कुठलीही कारणे असतील, मग ती जिल्हाधिकारी स्तरावर असतील किंवा महापालिकेच्या स्तरावर असली तरी जास्त लवकर कशी करता येईल. आणि लोकांमध्ये जागरुकता कशी निर्माण करता येईल. एक एक प्रभाग तुम्ही घ्या, विभाग तेथे लावा, कुठली नियमाधीन करण्यासाठी आहेत कुणी आता अर्ज दिले आहेत, त्यांच्या अडचणी काय? गैरसमजुत काय आहे? ते टाळण्यासाठी जास्तीत जास्त प्रयत्न करा. आणि मग श्री. जमनादास पुरस्वानी यांनी सांगितल्या प्रमाणे त्या इमारतींची अ,ब,क,ड प्रमाणे वर्गवारी करा.

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):— मा. महापौर महोदया, ................

सदस्य श्री. जीवन इदनानी:—   महापौर महोदया, श्री. सिंग साहेबांनी आता जो आदेश वाचुन दाखविला, त्यात सांगितले की, ज्या इमारती नियमाधीन झाल्या आहेत, त्याच्यासाठी होऊ शकते परंतु जी ठराविक प्रकरणे आहेत जी नियमाधीन झालेली नाहीत, ठिक आहे, नाही झाली. श्री. बेन्जामीन साहेबांनी, जो आदेश दिलेला आहे त्यामध्ये त्यांनी स्पष्टपणे लिहिले आहे की, ही जी इमारत आहे ती नियमाधीन करण्यात आलेली नाही त्यास एक संधी देण्यात यावी नाहीतर ४ चटई क्षेत्र निर्देशांक अंतर्गत घेऊन प्रस्ताव फेरसादर करायचा आहे त्यावेळेस त्यांना माहित होते की, हे प्रकरण नियमाधीन झालेले नाही, त्यामुळे त्यांनी स्पष्ट लिहलेले आहे की, आपण फेरसादर करा व गुडमॅन कॉटेजवाल्यांनी त्यात फेरसादर केला आहे. हे माहित असुन सुध्दा त्यानी पुनर्बांधणीसाठी ४ चटई क्षेत्र निर्देशांकांच्या खाली निर्देशांक दिला आहे. हे पहा तुम्ही बघा आदेशात त्यांनी स्पष्टपणे दिले आहे. त्यामध्ये ३ चटई क्षेत्र निर्देशांक दिलेला आहे आपण त्याचे ४ चटई क्षेत्र निर्देशांक करा.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :— शासनाचे असे आदेश होते की, ४.३५ चटई क्षेत्राच्या बांधकामातील वाढीव ०.३५ चटईक्षेत्राचे बांधकाम तोडुन ४ चटई क्षेत्राचे बांधकाम नियमित करण्याचा प्रस्ताव आपण घेवुन या. त्यानुसार जर वाढीव ०.३५ चटईक्षेत्राचे बांधकाम तोडत असतांना जर इमारत कोसळली तर काय करणार?  ४ चटई क्षेत्राप्रमाणे बांधकाम करुन जायचे किंवा नाही?

सदस्य श्री. राजेश वदारिया:—मा. महापौरजी, जेव्हा त्यांनी ४ चटईक्षेत्र निर्देशांकाच्या आतील बांधकामाचा सुधारीत बांधकाम परवानगीसाठीचा प्रस्ताव दाखल केला होता तो जर तांत्रिक समिती मंजुर करत असेल तर त्यांना ४ चटईक्षेत्र निर्देशांक मिळतो.  बांधकामे नियमित करण्याची कार्यवाही जी थांबलेली आहे ती आपण चालु करा.  तसे केले तर त्यांना ४ चटईक्षेत्र निर्देशांक मिळू शकेल.

**<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :</u>**—मा. प्रधान सचिव साहेबांना हे माहित असतांना सुध्दा त्यांनी असे लिहिले आहे की, पुनर्बांधणीसाठी ४ चटई क्षेत्र निर्देशांकापर्यंत मंजुरी दिली जावु शकते. जर कमी असेल तर कमी करा. ३ असेल तर ३ दया, ४ असेल तर ४ दया.

**<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):</u>**— मा. महापौर महोदया, सोमवारी १६ तारखेला मंत्रालयात प्रधान सचिव साहेबांकडे बैठक आहे. सभागृहाने जे मुद्दे उपस्थित केले आहेत ते सर्व मा. प्रधान सचिव साहेबांच्या निदर्शनास आणुन देतो आणि तुमचे जे मत आहे मी त्याच्याशी सहमत आहे. कायदेशीर अडचण असेल तर ती अडचण दुर करण्यासाठी तसा प्रस्ताव देवु या. गुडमॅन ही इमारत पडली आहे. मा. प्रधान सचिव साहेबांना मी प्रस्ताव देतो की, त्याबाबतचा प्रस्ताव सादर केलेला होता, जे प्रस्ताव मंजुर झालेले आहे, तर त्यांना आपण ४ चटई क्षेत्र निर्देशांक देतो तो निर्देशांक यांना देण्यात यावा असा मी मा. प्रधान सचिव साहेबांकडे प्रस्ताव देतो, त्यांनी जर मंजुरी दिली तर आपण देवु या.

**<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :</u>**—त्याचा पाठपुरावा कोण करणार?

**<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):</u>**— मा. महापौर महोदया, सोमवारी १६ तारखेला मंत्रालयात प्रधान सचिव साहेबांकडे बैठक आहे. त्याची मी तुम्हांला प्रत देतो.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :</u>**—कुणा कुणाचे ४.५ चटई क्षेत्र निर्देशांकाचे बांधकाम आहे, आपण म्हणता की, ती तोडुन ४ चटई क्षेत्र निर्देशांकाचे बांधकामाचा प्रस्ताव नियमित करण्यासाठी सादर करा. त्यानुसार वाढीव बांधकाम तोडतांना इमारत कोसळते. मग अशी इमारत कोसळल्यानंतर तेथे ४ चटईक्षेत्र निर्देशांकानुसार बांधकाम करण्यास परवानगी दया.

**<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):</u>**—बाधंकामे नियमाधिन करण्याबाबतचा जो अध्यादेश आहे त्यामध्ये काही सुधारणा करण्याचे काम चालु आहे. ज्या त्रुटी आहेत त्या मी सभागृहाच्या समोर आणतो. त्या त्रुटी दुर करुन प्रस्ताव सर्वसंमतीने पारीत करु.

**<u>महापालिका सचिव:</u>**—लक्षवेधी सुचना क्र. २ जीचे सुचक आहेत श्री. प्रकाश सावंत व अनुमोदक आहेत श्री. प्रधान पाटील

लक्षवेधी सुचना याप्रकारची आहे......................

---

## <u>लक्षवेधी सूचना क्रमांक २</u>

सुचकाचे नाव :— श्री. प्रकाश सावंत
अनुमोदकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

**विषय** :—चिकनगुनिया, डेगु सारखे साथीचे आजांर रोखण्यासाठी उपाययोजना करणे बाबत

उल्हासनगरमध्ये मोठया प्रमाणात चिकनगुंनिया, डेंग्यु सारख्या आजाराने थैमान घातले असून नुकत्याच झालेल्या अवेळी पावसामुळे त्यामध्ये अधिकच भर पडणार आहे. त्यामुळे उल्हासनगर मधील नागरीक हवालदिल झालेले आहेत. तरी त्यावर साथीचे आजार रोखण्यासाठी प्रशासनाने तातडीने उपाय योजना करणे आवश्यक आहे. त्याबद्दल सभागृहाचे लक्ष वेधत आहे.

---

**<u>महापालिका सचिव:</u>**—श्री. प्रकाश सावंत यांनी आपली लक्षवेधी मांडावी.

**<u>सदस्य श्री. प्रकाश सावंत :</u>**—माझी जी लक्षवेधी सूचना आहे, ती शहरात परसरलेल्या डेंग्यु, मलेरिया आणि चिकनगुनिया सारख्या साथीच्या रोगांविषयी आहे. शहरात नियमितपणे साफसफाई होत नाही. रुग्णालयांमध्ये औषधे नाहीत. व जेवढे डॉक्टर्स आणि कर्मचारी पाहिजे होते तेवढया संख्येत ते नाहीत. त्यामुळे चिकनगुनिया

आणि डेंग्युची साथ आली आहे. आज वर्तमानपत्रामध्ये बातमी आली आहे की, शासकिय रुग्णालय हे काम करण्यास तयार नाही. व आपणाकडे जी पाच, सहा आरोग्य केंद्र आहेत तेथे या बाबतची औषधे मिळत नाहीत. ही रोगराई अधिकाधिक फैलावु नये म्हणुन महानगरपालिकेने लक्ष दिले पाहिजे अशी माझी आपणांस विनंती आहे.

डॉ. जी.टी.जिंदे (वैदयकीय आरोग्य अधिकारी):—मा. महापौर महोदया, उप—महापौरजी, आयुक्त साहेब, सन्मा. सर्व सदस्य, सन्मा. सदस्य श्री. प्रकाश सावंत यांनी लक्षवेधीद्वारे जो मुद्दा उपस्थित केला आहे त्या संबंधाने निवेदन करु इच्छितो की, मलेरिया, चिकुनगुनिया आणि डेंग्यु हे सर्वसामान्यपणे दरवर्षी पावसाळयाच्या उत्तरार्धात यांचे प्रमाण वाढते. यावर्षी रुग्णांचे जे प्रमाण आहे, ते लक्षात घेता, तत्काळ कार्यक्षेत्रामध्ये दैनंदिन धुराडी, फवारणी करण्याबाबत वारंवार बैठका घेवुन त्यांना सूचना दिलेल्या आहेत. डेंग्यु व चिकुनगुनिया आजाराबाबत जनजागृती करण्यासाठी मागील दोन महिन्यामध्ये आम्ही शहरामध्ये एक लाख हस्तपत्रके वाटप केली आहेत. त्याव्यतिरिक्त मागील महिन्याच्या २०/१०/२००९ व २१/१०/२००९ रोजी विशेष बैठका घेवुन नागरी आरोग्य केंद्राच्या वैदयकीय अधिकारी व स्वच्छता निरिक्षक यांच्या बैठका घेवुन शहरात नियमितपणे फवारणी व इतर प्रतिबंधात्मक उपाययोजना अविरतपणे कार्यरत ठेवण्याबाबत निर्देश दिले आहेत. त्याप्रमाणे त्यांचे अहवाल प्राप्त होतात. तसेच शहरातील खाजगी रुग्णालयातुन रुग्णांची रोजच्या रोज माहिती घेवुन त्या त्या केंद्रामार्फत उपचाराची कार्यवाही चालु आहे. प्रत्येक नागरी आरोग्य केंद्रामध्ये साथ रोगाविषयी प्रथमोपचार कक्ष स्थापन करण्यात आलेले आहेत. तसेच मध्यवर्ती रुग्णालयामध्ये ५० खाटा आरक्षित केल्या आहेत. आणि मागच्या आठवडयामध्ये साथ रोगाविषयी लागणारी सर्व औषधे उपलब्ध करुन दिलेली आहेत.

सदस्य श्री. प्रकाश सावंत :—डॉ. साहेब, आरोग्य केंद्रामध्ये डॉक्टर आणि इतर कर्मचारी कमी आहेत असे आपण म्हणाला होतात ते खरे आहे काय?

डॉ. जी.टी.जिंदे (वैदयकीय आरोग्य अधिकारी):—होय, आमच्यासाठी ही दुर्देवाची बाब आहे की, महाराष्ट्रामध्ये २२ महापालिकांपैकी आपल्या महापालिकेत १२ प्राथमिक आरोग्य केंद्रांची आपणांस आवश्यकता आहे. गेल्या दोन वर्षापासुन आपण मंत्रालयामध्ये पाठपुरावा करत आहोत. शासनाची नागरी आरोग्य केंद्र उल्हासनगरमध्ये आहेत. ती सुध्दा १९८८ मध्ये आम्ही राज्य शासनाकडे दिली आहेत. तेव्हापासुन राज्य शासनाचे कर्मचारी तेथे आहेत. आणि महापालिकेचे सहनियंत्रण आहे. मध्यवर्ती रुग्णालय व शासकिय प्रसृतीगृह यातील डॉक्टरांच्या नेमणुका केल्या जातात. नागरी आरोग्य केंद्रामध्ये लक्ष दयायला हवे असते त्यामध्ये कधी कधी कमतरता भासते.

सदस्य श्री. प्रकाश सावंत :—डॉक्टर साहेब, औषध फवारणीच्या तुम्ही ज्या काही सूचना करता, ही फवारणी व्यवस्थीत केली जाते की नाही यावर लक्ष कोण ठेवते?

डॉ. जी.टी.जिंदे (वैदयकीय आरोग्य अधिकारी):—आरोग्य विभागाचे उप—आयुक्त त्यावर पर्यवेक्षण करतात.

सदस्य श्री. प्रकाश सावंत :—डॉक्टर साहेब, आपल्या बाजुला कल्याण शहर आहे. किंवा अंबरनाथ, बदलापुर शहर आहे. या शहरांमध्ये साथीचे रोग नाहीत, फक्त आपल्याच शहरात आहे. यावरुन असे आढळुन येते की, आपल्या शहरामध्ये व्यवस्थित जंतुनाशकांची फवारणी केली जात नाही. आयुक्त साहेब, मी आपणांस विनंती करतो की, आपल्या लोकसंख्येच्या प्रमाणानुसार आपणाकडे १२ प्राथमिक आरोग्य केंद्र असली पाहिजे होती. मला असे वाटते की, आपणाकडे ४ ते ५ च आरोग्य केंद्र आहेत.

डॉ. जी.टी.जिंदे (वैदयकीय आरोग्य अधिकारी):—लोकसंख्येच्या प्रमाणानुसार १२ प्राथमीक आरोग्य केंद्रांची आपली गरज आहे. पैकी सहा आरोग्य केंद्र आहेत परंतु ती राज्य शासनाकडे आहेत. ती आपणाकडे वर्गीकृत करावी म्हणुन मागील महिन्यात मंत्रालयात सचिवांनी निर्णय घेतलेला आहे. परंतु ती अदयाप आपणाकडे वर्गीकृत झालेली नाहीत. आणि आणखी सहा नविन प्राथमिक आरोग्य केंद्र आपणाकडे हवी आहेत.

सदस्य श्री. प्रकाश सावंत :—आयुक्त साहेबांना विनंती आहे की, सहा प्राथमिक आरोग्य केंद्र महापालिकेच्या ताब्यात दयावीत. व त्यांसाठी आवश्यक असलेली पदे आपण भरावीत. तसेच इतर शहरांमध्ये जसे फिरते

दवाखाने आहेत तसे उल्हासनगरमध्ये सुध्दा २ फिरते दवाखाने चालु करावेत. कारण की येथे झोपडपट्टयांची संख्या फार मोठया प्रमाणावर आहे. तिथे जर आपण दवाखाने उघडले तर गरिब लोकांना फायदा होईल.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u> मा. महापौरजी, आयुक्त साहेब, आपण मला सांगावे ज्यांना चिकनगुनीया झाला अशा किती लोकांनी फायदा घेतला आहे, आपल्या महापालिकेत औषधे उपलब्ध आहेत का? ज्या ठिकाणी जास्तीत जास्त रोगी आहेत त्यांना पुर्ण औषध देऊ शकत नाही.

<u>डॉ. जी.टी.जिंदे (वैदयकीय आरोग्य अधिकारी):–</u> जुलै ते ऑक्टोबंर या तीन महिन्यामंध्ये ६ नागरी आरोग्य केंद्रामध्ये जे ७२ लोक आहेत त्यापैकी ४५ ए.एम.एन., पी.एच.एन मार्फत घरोघरी सर्वेक्षण केलेले आहे. १८,००० घराचे सर्वेक्षण केले आहे त्यामध्ये ३,०८५ लोकांना आपण उपचार दिलेले आहेत आणि त्यांनतर आपण प्रत्येक एरिया मध्ये स्पेशल हेल्थ कॅम्प घेऊन ९३५ लोकांना फायदा दिलेला आहे.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :–</u> सांवत साहेबांनी जो विषय मांडलेला आहे, माझ्या प्रभागात घरांघरामध्ये कुणाला साथ चालु आहे. मलेरिया, चिकनगुनीया यांचा आजार चालु आहे, त्यामुळे खाजगी दवाखान्यात जाऊन सुध्दा इलाज होत नाही. यासाठी आपण जाहिरात दिलेली आहे. त्यांनी महानगरपलिकेच्या मध्यवर्ती केंद्रात येऊन इलाज केला तर लवकरात लवकर ते बरे होतील अशा पध्दतीने आपण सुचना दयावी. फवारणी बदद्ल मोहिम चालु आहे परंतु एकदिवसाआड फवारणी झाली पाहिजे, एकदिवसा आड मलेरिया ऑईल टाकले पाहिजे. या गोष्टीवर जास्तीत जास्त लक्ष दयाल अशी मी आशा करतो.

<u>सदस्य श्री सतिश चहाळ:–</u> महापौर महोदया, मी आपणांस सांगु इच्छितो, डॉक्टर साहेबांना प्रश्न विचारु इच्छितो, मलेरिया आणि डेंग्यु कश्यामुळे होतो? हा का तयार होतो? व उल्हासनगर मध्ये हा जो रोग तयार झालेला आहे. हा का झालेला आहे? यांचे उत्तर मला दयाल तर बरे होईल.

<u>डॉ. जी.टी.जिंदे (वैदयकीय आरोग्य अधिकारी):–</u> मी सुरुवात करणार होतो, परंतु बरे झाले की तुम्ही प्रश्न विचारला, मलेरिया डास चावल्यानंतर पॅरासाईज आणि वायरल असे दोन प्रकारचे इन्फेकशन होतात. पॅरासाईज गेल्यानंतर चार प्रकारचा मलेरिया होतो तसेच जे वायरल इन्फेकशन मध्ये चिकनगुनीया डेग्यु, पुन्हा डेग्यु प्युअर मध्ये दोन प्रकार आहेत एक सिम्पल डेग्यु आणि शरिरामध्ये रक्तस्त्राव करणारी डेग्यु, आणि तिसरे म्हणजे जापानी जिनकेबेलायटेस डोक्याचा आजार होतो अशा प्रकारे पाच प्रकारचे आजार होतात.

<u>सदस्य श्री सतिश चहाळ:–</u> माझा प्रश्न विचारण्याचा हेतु हा होता की हा रोग कश्यामुळे होतो.

<u>डॉ. जी.टी.जिंदे (वैदयकीय आरोग्य अधिकारी):–</u> हो, ते सांगतो......

<u>सदस्य श्री सतिश चहाळ:–</u> आपल्या महापालिकेच्या आरोग्य विभागाची काम करण्याची पध्दत, आणि येणारी औषधे बरोबर आहेत किंवा नाही याची महानगरपालकेने कधी तपासणी केलेली नाही तसेच जी शहरामध्ये फवारणी होते त्या फवारणी मुळे मच्छर वगैरे मरत नाहीत तसेच जी पावडर आहे ती पावडर सुध्दा बरोबर नाही ही अशी बरीच रोगराईची कारणे आहेत. तुम्ही डॉक्टर आहात, हा तुमचा मूद्दा वेगळा ज्यावेळी मच्छर तयार होतील, ज्यावेळेस ते चावतील त्यावेळेस तुम्ही तुमचा इलाज चालु करणार. त्या अगोदर महापालिकेच्या आरोग्य विभागाने जर चांगले काम केले, साफसफाई जर चांगली ठेवली तर डेंग्यु या रोगाची ही वेळ येणार नाही. तुम्ही डॉक्टर आहात म्हणुन मी तुम्हांला विचारतो की हे रोग कशापासुन फैलावले जातात?

<u>डॉ. जी.टी.जिंदे (वैदयकीय आरोग्य अधिकारी):–</u> २०/१०/२००९ व २०/११/२००९ ला आयुक्त साहेबांनी बैठक घेवुन त्याबाबत आरोग्य विभागास सूचना दिल्या. आणि साहेबांनी स्वत: एक नमुना तयार करुन दिला. त्या नमुन्याच्या आधारे दैनंदिन अहवाल यायला सुरुवात झाली, दैनंदिन अहवाल हा आरोग्य विभागातुन गेला पाहिजे. कमीत कमी आठवडयातुन दोन वेळा तरी आठवडयातुन दोंनदा फवारणी आणि धुरांरणी झाली पाहिजे. सगळयात महत्वाचा एक मुद्दा म्हणजे फवारणी व धूरारणी बरोबर झाली पाहिजे.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :</u>—तुम्ही तशी तक्रार केलेली आहे का? ज्यावेळेस तुमच्याकडे रोगी येतात त्यावेळेस तुम्ही तशी तक्रार आरोग्य विभागास केली आहे का? तुमची फवारणी होते किंवा नाही? तसेच साफसफाई होते किंवा नाही?

<u>डॉ. जी.टी.जिंदे (वैदयकीय आरोग्य अधिकारी):</u>— त्यांना आम्ही दर आठवडयाला अहवाल पाठवतो त्यावरुन दर आठवडयास त्यांना सूचना मिळतात. अमुक एक प्रकारची केस आढळली तर आम्ही लगेच तेथे जातो व सर्व्हेक्षण करतो आम्ही दर आठवडयास सूचना देतो, अशा प्रकारच्या धुवारणीची गती वाढवा आमच्याकडुन अशा प्रकारच्या सूचना जातात. सूचनांचा पुर्ण रेकॉर्ड आहे .

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :</u>—तरी पण अशी वेळ येवु नये शहरावर यासाठी डेंग्यु आणि मलेरियाची जी साथ आहे ही महापालिकेवर येते म्हणजे हे आमचे दुर्भाग्य आहे. साफसफाईवर जर आपण लक्ष दिले तर फार बरे होईल.

<u>सदस्य श्री. गोविंदराम लुंड :</u>—डॉ. साहेब, मी पंधरा दिवस आधी पत्र दिले आहे, त्याचे आपण उत्तर दिलेले नाही. आपण बाहेर जावुन पाहा, शहरात सफाई आहे किंवा नाही आहे? दोन दोन वर्ष सफाई कामगार कामावर येत नाहीत. तरी आपण त्यास निलंबित करु शकत नाहीत? आपण पत्राचे उत्तर तर दया. आयुक्त साहेबांना नेहमी सांगतो, कचरा पहा, कचरा पहा, अॅन्थोनी ठेकेदार कचरा वेळेवर, बरोबर उचलत नाही. आणि गल्लीमध्ये किती कचरा जमा आहे? कचरा कोण साफ करेल? आपण याल तर मी आपणांस घेवुन जाईन. कच—यामुळे किती आजार वाढत आहे याचा तुम्ही विचार केला आहे का? आज माझ्या घरी फवारणीवाला आला, त्या औषधमध्ये पाणी टाकले, मी म्हणालो की, मी तक्रार करेल. ही आजचीच गोष्ट आहे. तसेच जे मच्छरसाठी मशिन आपण चालु केले आहे, एक महिना नाही, कमीत कमी तीन महिने चालवा. त्या मशिनमध्ये औषध व्यवस्थीत टाकले जात नाही, त्याची तपासणी कुणी करत नाही. आजचीच गोष्ट आहे. आपण त्याचा आदेश काढा. प्रभागांमध्ये जावुन सर्व सदस्यांकडे जा तर आपणांस माहित पडेल. आपण आपल्या माणसास घेवुन जा. ३० टक्के सफाई कामगार कमी आहेत. त्यांचे आपण काय केले? काहीच नाही केले? आपणाकडे उत्तरच नाही. खाडाबदली सफाई कामगार का घेत नाहीत? खाडाबदली कामगार घ्या ना. आम्ही २००२ पासुंन ओरडत आहोत, खाडाबदली, खाडाबदली, का नाही भरत? ३० टक्के सफाई कामगार कमी आहेत, १० लाख जनसंख्या आहे, जेव्हा ५ लाख होती तेव्हा सुध्दा एवढेच सफाई कामगार होते. आज १० लाख जनसंख्या आहे तरी सुध्दा तेवढेच सफाई कामगार आहेत.

<u>उप—महापौर :</u>—हा प्रश्न डॉक्टर साहेबांचा नाही, आरोग्य विभागाचा विषय आहे. उप—आयुक्त आरोग्य हया उत्तर देतील.

<u>सदस्य श्री. गोविंदराम लुंड:</u>—मॅडमला मी विनंती करतो की, जेव्हा मशिन चालु केली तेव्हा ती मध्ये, फक्त पाणीच होते, त्यात औषधे टाकणारा कोणीच नाही? जास्त कामगार घेतले जावेत. खाडाबदली सफाई कामगार नक्की घ्या. ३० टक्के कमी आहेत मी आपणांस पत्र दाखविले आहे. दोन दोन वर्ष सफाई कामगार कामावर येत नाही. आपण त्यास निलंबित का करत नाही? याला काही नियम असतील की नाही? त्यासाठी घरोघरी जावुन गल्ली बोळात कसा कचरा पडला आहे ते पहा. कल्याणमध्ये जावुन पहा. कल्याण तर उल्हासनगरच्या बाजुलाच आहे ना तेथे का कचरा होत नाही? तेथे साफसफाई होते. आपण एकाने तरी जावुन पहा? आम्ही आपणांस त्या वेळेस बोलावुन विनंती केली. परंतु त्याचे काही झाले नाही. त्यासाठी मी सांगतो प्रथम खाडाबदली सफाई कामगार घ्या.

**यावेळी श्रीमती कविता सिरवानी, श्रीमती लिलाबाई आशान यांनी सभागृहात प्रवेश केला.**

<u>सदस्य श्री. नरेंद्र राजानी :</u>—मा. महापौरजी, आरोग्य विषयी शहरातील लोकांचे आरोग्य चांगले रहावे यासाठी महापालिकेने खास लक्ष दिले पाहिजे. आज शहरात जसे चिकुनगुनिया, डेंग्यु सारखे आजार व व्हाइअरल इन्फेक्शन जे चालु आहे त्याची साथ चालु (अॅपीडेमीक) आहे का?

<u>डॉ. जी.टी.जिंदे (वैदयकीय आरोग्य अधिकारी):</u>—सर, २००८ मध्ये साडेतीन हजार केसेस होत्या.

<u>सदस्य श्री. नरेंद्र राजानी :—</u>कुठल्या आजाराविषयी?

<u>डॉ. जी.टी.जिंदे (वैदयकीय आरोग्य अधिकारी):—</u>तापाबद्दल. यावर्षी २५ टक्क्यांनी केसेस वाढल्या आहेत. म्हणजेच १ हजार केसेस वाढुन त्या चार हजार झालेल्या आहेत. डेंग्युचे जे १२ संशयीत रुग्ण आहेत, व्हाइअरल तपासणी करणा—या देशामध्ये तीन संस्था आहेत. एक दिल्लीमध्ये ऑल इंडिया इंन्स्टीटयुट ऑफ मेडिकल सायन्स, दुसरी हापकीन्स आणि तिसरी व्हाइअरल इन्स्टीटयुट ऑफ पुणे, यांच्याकडे केसेस पाठविल्या नंतर त्यांचे कडील अहवाला अंती अशी खात्री होंते. त्यानंतर आम्ही पुढील कार्यवाही करतो. परंतु या प्रकरणामध्ये संशयीत रुग्ण म्हणुन आम्ही कार्यवाही सुरु केली आहे. आणि २५ ते ३० केसेस पुण्याला पाठविण्यासाठी आम्ही तयारी केलेली आहे.

<u>सदस्य श्री. नरेंद्र राजानी :—</u>डेंग्युचे किती संशयीत रुग्ण आढळुन आले आहेत?

<u>डॉ. जी.टी.जिंदे (वैदयकीय आरोग्य अधिकारी):— </u>१२.

<u>सदस्य श्री. नरेंद्र राजानी :—</u>खाजगी आणि शासकिय रुग्णालय मिळुन? जेवढे काही आजार आहेत ते व्हाइअरल इन्फेक्शन मुळे आहेत. फक्त ते डेंग्यु आहे की चिकुनगुनिया आहे हे तपासुन पहावे लागते, की व्हाइअरल फिव्हर आहे, व्हाइअरल फिव्हर असेल तर त्यास आपण (अपिडेमीक) साथीचे आजार मानतो का? आपण एक डॉक्टर आहात तसेच महापालिकेचे अधिकारी सुध्दा आहात. महापालिकेचे अधिकारी असतांना आपण ते नक्की पहाल. परंतु डॉक्टर या नात्याने या शहरासाठी जे जे केले पाहिजे ते आपण केले आहे का?

<u>डॉ. जी.टी.जिंदे (वैदयकीय आरोग्य अधिकारी):—</u> होय त्याचा सर्व्हे केला आहे. जुलै पासुन ते ऑक्टोबर पर्यंत तीन महिन्यात आमच्याकडे पी.एच.एन. स्टेट चे सनियंत्रण आहे त्या सनियंत्रणाच्या आधारे १८,००० घरांचे प्रत्यक्ष जागेवर जाऊन सर्व्हे केला आहे त्यामध्ये ३,०१५ लोकांना उपचार केले आहेत. तसेच दुरच्या गावामध्यें जावुन ७ कॅम्प्स लावुन १,९३५ लोकांवर उपचार केला आहे.

<u>सदस्य श्री. नरेंद्र राजानी :—</u>प्रिव्हेशन प्रतिबंधात्मक आपण काय उपाय केला आहे?

<u>डॉ. जी.टी.जिंदे (वैदयकीय आरोग्य अधिकारी):—</u> प्रिव्हेशनसाठी एक लाख हस्तपत्र बनवुन वाटप केले आमचे आरोग्य विभागातील जे ६५ लोक आहेत त्याच्या क्षेत्रात त्याच्या माध्यमातुन मलेरिया, लेप्रसी युनीटच्या माध्यमातुन आरोग्य विभागातुन, हस्तपत्र शहरात वाटले आहे.

<u>सदस्य श्री. नरेंद्र राजानी :—</u> तुलनात्मक दृष्टीने उल्हासनगरमध्ये कल्याण ठाण्याच्या तुलनेने आपल्या काही परिसरात जास्त केसेस का आहेत? त्यावर अभ्यास केला जावा.

<u>डॉ. जी.टी.जिंदे (वैदयकीय आरोग्य अधिकारी):—</u> होय, त्यावर चार गोष्टी आहेत, आता या वातावरणात ठाणे जिल्हयामध्ये हिच परिस्थीती आहे, आमची प्रत्येक महिन्यात विभागीय सभा होते, ठाणे जिल्हयामध्ये या प्रकारच्या केसेस खुप आहेत. अंबरनाथ तसेच काही ग्रामिण विभागात या प्रकारच्या सकारात्मक केसेस आलेल्या आहेत. परंतु आपल्या विभागात या ऋतुमध्ये जागोजागी पाणी जमा होते. आपल्याकडे बाधंकामे नेहमीच चालु असतात. बाधंकामे चालु असल्यामुळे पाण्याचा साठा जमा झालेला असतो. प्रत्येक शुक्रवार आपण कोरडा दिवस साजरा करतो, लोकानी जमा केलेले पाणी वापरले जाते, परंतु आम्हास एवढा प्रतिसाद मिळत नाही, आठवडयातुन एकदा कोरडा दिवस असला पाहिजे. आता आम्ही फवारणीची प्रक्रिया चालु केली आहे तर मुख्यत्वेकरुन आमच्याकडे बाधंकामदार व्यक्तीगत पातळीवर लोक प्रत्यक्षात लक्ष देत नाहीत. तसेच जे पाण्याचे साठे असतात त्याकडे आपण जास्त लक्ष देणे गरजेचे आहे.

<u>सदस्य श्री. नरेंद्र राजानी :—</u> आपणांस हे मान्य आहे की प्रतिबंधासाठी जिथे साठवलेले पाणी आहे, जेथे वेक्टोस्कोप कल्चर वाढण्याची शक्यता आहे त्यासाठी काही केले पाहिजे. साहेब, येवढे सर्व, सगळे केल्यानंतर दुसऱ्या जागेपेक्षा आमच्याकडे समस्या निर्माण होण्याची शक्यता जास्त आहे. त्यासाठी आपणांस यावर कार्यवाही करणे आवश्यक आहे. मी आयुक्त साहेब व महापौर महोदया यांना विनंती करतो हा खुपच गंभीर असा विषय आहे, कारण या शहरातील बऱ्याच लोकांचे कामाचे दिवस वाया जात आहेत. तसेच जेवढे काही कामाचे दिवस वाया जात आहेत अशा लोकांच्या कामामध्ये व शहरामध्ये प्रगतीस बाधा येते. आणि काही लोक

उपचार सहन करु शकतात. व काही लोक सहन करु शकत नाहीत. त्याशिवाय या आजारपणामुळे सार्व. आरोग्य कमजोर होते, यात काही लोक लक्ष देतात काही लोक लक्ष देत नाहीत. तसेच सेकेन्डरी इन्फेकशन व दुसरा काही आजार लागणे या सर्वाचा समावेश या बरोबर होतो. त्यासाठी आपणांस लक्ष दिले पाहिजे. भले ती महासभा असो किंवा समितीची सभा असो याकडे लागोपाठ लक्ष ठेवले पाहिजे. तसेच शाळा आहेत, कॉलेज आहेत, काही जागा जेथे लोक एकत्र येतात, जेथे पाण्याचे साठे आहेत, बांधकामे चालु आहेत, साफसफाईच्या समस्या आहेत, जर या सर्व समस्या सोडविल्या नाहीत तर शहराच्या प्रगतीमध्ये व लोकांच्या आरोग्यास बाधा येते. धन्यवाद।

सदस्य श्री. रविंद्र बागुल :—सन्मानयि डॉ. जिंदे साहेब, आरोग्य विभागातील ज्या उप—आयुक्त महोदया आहेत त्यांना जरा व्यासपीठावर बोलवा. आणि त्यांना विचारा...........

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—डॉक्टर साहेब, मी आपणांस विचारतो की, चिकुनगुनियाची जी औषधे आहेत ती कुठे उपलब्ध आहेत? चिकुनगुनिया हा आजार कोठुन येतो?

डॉ. जी.टी.जिंदे (वैदयकीय आरोग्य अधिकारी):— जसे मी तुम्हांला सांगितले की, चिकुनगुनिया हा वायरल इन्फेक्शनने होतो. त्यासाठी काही वेगळा काही उपचार नाही.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—तर आपण कसे उपचार करता. जर आपणाकडे रोगी आला तर आपण काय करता?

डॉ. जी.टी.जिंदे (वैदयकीय आरोग्य अधिकारी):— त्यासाठी शासनाचे परिपत्रक आहे की त्या रोग्यासाठी कोणते उपचार केले पाहिजेत?

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी:— चिकुनगुनियाच्या केसेस किती आहेत?

डॉ. जी.टी.जिंदे (वैदयकीय आरोग्य अधिकारी):— साहेब, आपणांस तेच सांगत आहे. त्यामध्ये अॅण्टीबायोटिक पेनक्लीअर दयायला पाहिजे. तसेच क्रोसिन नावाची, डायक्लोसिन नावाची गोळी येते. आयव्हील नावाची गोळी येते. सिकीज नावाची गोळी येते. हया गोळया आपण आयपीडीमध्ये विशेष करुन उपलब्ध केलेल्या आहेत. या रोगांसाठीच आहेत. तेच सांगतो की, या गोळया ३,०८५ केसेसला देण्यात आल्या आहेत. या गोळया नागरी आरोग्य केंद्रात सुध्दा उपलब्ध आहेत. आपला ४० वर्षापुर्वीचा जो दवाखाना आहे. तेथे रोज दिडशे ते दोनशे रुग्ण येतात.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—शासकिय रुग्णलयात काही इन्जेक्शने आली आहेत का?

डॉ. जी.टी.जिंदे (वैदयकीय आरोग्य अधिकारी):— नाही, नाही. इजेंक्शन नाही, सलाईन नाही कुठलेही खास औषध यावर नाही .

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी:— समजा जर गोळी दिली तर काय फरक पडतो त्या रुग्णावर?

डॉ. जी.टी.जिंदे (वैदयकीय आरोग्य अधिकारी):— आपण चांगला प्रश्न विचारला आहे. हा आजार चांगल्या भल्या माणसाला परंतु थोडीफार सहनशक्ती असली पाहिजे. थोडाफार ताप येतो, जॉइंट पेन होते परंतु नंतर तो कमी होतो.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—चिकुनगुनियाचे प्रकरण जर आले तर ते महापालिकेत येतात की सेंट्रल हॉस्पीटल मध्ये.

डॉ. जी.टी.जिंदे (वैदयकीय आरोग्य अधिकारी):—महापालिकेत ३,३८५ केसेस आल्या आहेत.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— किती महिन्यात?

डॉ. जी.टी.जिंदे (वैदयकीय आरोग्य अधिकारी):— तीन महिन्यात जुलै ते ऑक्टोंबर महिन्यात.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— ठिक आहे. तसेच सेंट्रल हॉस्पीटलमध्ये?

डॉ. जी.टी.जिंदे (वैदयकीय आरोग्य अधिकारी):— सेंट्रलचे आकडे आपणांस मिळत नाहीत.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— आपण तर सेंट्रल मध्ये आहात ना?

डॉ. जी.टी.जिंदे (वैदयकीय आरोग्य अधिकारी):— नाही. आकडा आपण आपल्या माध्यमातुन घेवु शकतो.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— परंतु शहरात किती रुग्ण आहेत ते माहित असले पाहिजे ना? शहरात किती चिकुनगुनियाचे रुग्ण आहेत?

डॉ. जी.टी.जिंदे (वैदयकीय आरोग्य अधिकारी):— कसारावरुन, कल्याण—डोंबिवलीवरुन सुध्दा रुग्ण येतात. यासाठी आपण आपल्या शहरातील आकडा ठेवत नाही.

यावेळी श्रीमती इंदिरा उदासी, श्रीमती मिनाताई सोनेजी, श्रीमती मालती करोतिया हया सभागृहातुन बाहेर गेले.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— परंतु मला हे सांगा की, डेंग्यु कशामुळे होतो?

डॉ. जी.टी.जिंदे (वैदयकीय आरोग्य अधिकारी):—तो वायरसने होतो.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— त्याचे मुळ कारण काय आहे, तो कच—याने होतो? पाण्याने होतो? कश्याने होतो?

डॉ. जी.टी.जिंदे (वैदयकीय आरोग्य अधिकारी):—डास चावल्याने होतो. मच्छर चावल्याने जो डेंग्यु होतो तो दोन प्रकारे होतो तो म्हणजे एक साधा व दुसरा हिमोग्लाबिनवाला शरीरात त्याचा रक्तस्त्राव होतो.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—मी हे विचारतो की, हे मच्छर कशामुळे होतात, जसे पाण्याने वगैरे.....?

डॉ. जी.टी.जिंदे (वैदयकीय आरोग्य अधिकारी):—हे जे मच्छर आहेत, ते स्वच्छ पाण्याचा जो साठा करुन ठेवतो, कुलरचे पाणी, बाहेर कुंडीमधील पाण्याचा साठा असतो त्यापासून होतात......

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—पाठशाळा चालु झाली काय?

सदस्य श्री. बी.बी. मोरे :—सन्माननिय महापौरजी, आयुक्त साहेब................

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— एक मिनिट श्री. मोरे साहेब, एक मिनिट मला बोलु दया नंतर आपण बोला. मी बोलत असतांना आपण का बोलत आहात? आपण बसुन घ्या. आपण नंतर विचारा.

उप—महापौरजी:—श्री. मोरे साो. आपण बसून घ्या.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— शहरात हा जो आजार पसरला आहे, आपणांस कळत नाही का की डेंग्यु, चिकुनगुनिया कशामुळे होतो ते? या आजारांचे मुळ कारण काय आहे?

डॉ. जी.टी.जिंदे (वैदयकीय आरोग्य अधिकारी):—तो मच्छर चावल्यामुळे होतो.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— मच्छर चावल्यामुळे होतात?

डॉ. जी.टी.जिंदे (वैदयकीय आरोग्य अधिकारी):—होय.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— तर मच्छर कशामुळे तयार होतात? पाण्याने होतात की कसे होतात? घान पाण्याने कि स्वच्छ पाण्याने होतात?

डॉ. जी.टी.जिंदे (वैदयकीय आरोग्य अधिकारी):— घाण पाण्याने सुध्दा होतात व स्वच्छ पाण्याने सुध्दा होतात.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :— समजा आपण ड्रेनेज साफ केला नाही तर मच्छर होतात. शहरात साफसफाई झाली नाही तर मच्छर होतील. डॉक्टर मी आरोग्य विभागाच्या उप—आयुक्त मॅडम यांना विचारतो. प्रथम आपण सांगा नंतर त्या सांगतील.

डॉ. जी.टी.जिंदे (वैदयकीय आरोग्य अधिकारी):—दोन्ही पाण्यांमध्ये होतो. गंदया पाण्यामध्ये सुध्दा तयार होतात.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :—महापौर महोदया, वेळ खुप होत चालली आहे. वेळेचे सुध्दा बंधन ठेवा. मच्छर कोठुन होतात, डेंग्यु कोठुन होतात याची पाठशाळा नंतर घेवु या. वेळेचे भान ठेवा.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :—मा. महापौरजी, उप—महापौरजी व आयुक्त साहेब, या लक्षवेधीवर बरीच चर्चा झाली. डेंग्यु कशाने होतो, अमुक कशाने होतो, ढमुक कशाने होतो? आमचे सन्माननिय सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी यांनी फार प्रश्न विचारले, उभे राहुन त्यांचे पाय दुखुन आले असतील . त्यांनी प्रश्न विचारला आपले उप—महापौर यांना डेंग्यु झाला होता, त्यावेळी महापालिकेतर्फे काही विचारणा सुध्दा झाली नाही. दिवाळीचा एक महिना झाला होता. मला एक सांगायचे आहे की, सन्माननिय सदस्यांनी याबाबत चर्चा केली की डेंग्यु असा आहे तसा आहे. परंतु ही चर्चा केली नाही की, अॅन्थोनी ठेकेदार दिवाळीच्या आधीपासुन शहरातील कचरा उचलत नाही? शहरामध्ये कच—याचा ढिग लागलेला आहे. दुर्गंधी सुटलेली आहे. तरी त्याचे लक्ष नाही. मला तरी असे वाटते की तो दिवाळीमध्ये काही लोकांना भेटला असेल. आणि म्हणुन त्याच्या बाबत कुणी चर्चाच करत नाहीत? का चर्चा करत नाही? त्याबाबत मी १७ वेळा पत्र देवुन सन्माननिय महापौरांबरोबर याबाबत मी चर्चा केली होती. त्यांना विनंती केली होती की त्या अॅन्थोनी ठेकेदारास बोलवा त्यास पत्र दया. तो जर कचरा उचलत नसेल साफ सफाई करत नसेल तर त्याचे बिल काढु नका. त्यास पत्र दया. डेंग्यु याच्याने होतो, त्याच्याने होतो ठिक आहे. सविस्तरपणे सर्व ऐकुन घेवु या. परंतु डेंग्यु याला कारण काय? कोठुन कसा होतो? शहरात एवढी दुर्गंधी आहे. आपले आयुक्त साहेब, रोज झोपडपट्टी एरियातुन येतात असे मला वाटते. दोन तीन ठिकाणी कच—याचे ढिग एवढे असतात, आमचे सन्माननिय नगरसेवक व विरोधी पक्ष नेता, श्री. भुल्लर महाराजजी हे सभागृहनेता सुध्दा होते. त्यांच्या प्रभागात कच—याचा ढिक जर आपण पाहिला तर रोज सकाळी मी माझ्या नातीला पोहाचायला जात असतांना नाक दाबुन जावे लागते. अशी परिस्थिती असतांना अॅन्थोनी ठेकेदाराकडे कुणी बघत नाही. अॅन्थोनी ठेकेदार फोन करतो, दिवाळीला येतो आणि नंतर अजिबात येत नाही. काही लोकांकडे आला असेल तर मला माहित नाही. परंतु मी सर्व सदस्यांना एक विनंती करतो की, त्या ठेकेदाराबाबत कच—यावाल्याच्याबाबत आपण कडक नियम केला पाहिजेत. एक तर त्याचे पैसे कपात केले पाहिजे. कारण त्यास असे वाटते की, ही महापालिका काहीच करत नाही. माझा ठेका रद्द करत नाही. कारण त्याच्या काही अटी व शर्ती असतात. मी आयुक्त साहेबांना व सदस्यांना नेहमी सांगतो की आपण त्याचा ठेका रद्द केला पाहिजे, तो काय करतो? सन्माननिय उप—आयुक्त महोदया या नविन आलेल्या आहेत त्यांची त्या कच—यावाल्या ठेकेदाराबरोबर अजुन ओळखही झाली नसेल. त्यांनी त्यांचे तोंडही पाहिले नसेल. आयुक्त साहेबांनी डॉक्टर व सन्माननिय महोदया यांना बोलाविले तर त्यावेळेस तुम्ही सांगु शकतात, तुम्ही कचरा न उचलल्यामुळे आम्हांला तासन्तास महासभेत नगरसेवक उभे करुन ठेवतात. तासन्तास आम्हांला प्रश्न विचारत असतात. त्याचे उत्तर देतांना आम्हांला भारी पडते. म्हणुनच प्रथम कच—यावाल्यावर कारवाई केली पाहिजे. शहरामध्ये दुर्गंधी कशामुळे होते तर कच—यामुळे होते. घाणीमुळे होते. कचरा साफसफाई न केल्यामुळे शहरात घाण होते. डेंग्यु होतो, मलेरीया होतो, कशामुळे होतो? शहरामध्ये दुर्गंधी असेल तर तेथुनच हा रोग पसरत असतो. हे सर्व अधिकारी व सन्माननिय सदस्यांना समजले पाहिजे. मी आयुक्त साहेबांना व सन्माननिय महापौर महोदयांना विनंती करतो की, ताबडतोब आपण अॅन्थोनी ठेकेदारास पत्र देवुन आणि जर पत्र देवुन जर त्याला तसेच चालवायचे असेल तर त्याने कचरा उचलला पाहिजे. म्हणुन मी सांगतो की, डॉक्टर व उप—आयुक्त मॅडम महोदयांनी उत्तर न देता आयुक्तांनी येथे उत्तर दिले पाहिजे.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :–</u>श्री. मोरेजी, . मी उप–आयुक्त आरोग्य यांना व डॉ. जिंदे यांना डेग्युच्या साथीबद्‌दल विचारणा करत असतांना आपणांस का त्रास होत आहे? वारंवार बोलण्यास आपणांस काही अधिकार नाही. वारंवार बोलणारे आपण कोण होतात?

<u>सदस्य श्री.बी.बी. मोरे :–</u>आपण बसुन घ्या. मला माझे बोलणे पुर्ण करु दया. मा. महापौरजी आणि आमच्या उप–आयुक्त महोदया यांनी याच्यावर.................

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुल :–</u>श्री. बच्चाराम रुपचंदानी साहेबांना मध्यंतरी बरे नव्हते ते पंधरा दिवस रुग्णालयात दाखल होते.

<u>सदस्य श्री. प्रकाश सावंत :–</u>मा. महापौरजी, मी जी लक्षवेधी सूचना मांडली आहे तिचे मा. आयुक्तांकडुन मला उत्तर मिळाले नाही. आयुक्तांनी त्याचे उत्तर दयावे.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :–</u>मा. महापौरजी, मा. आयुक्त साहेब व सर्व सन्माननिय सदस्य, मी जे बोलत आहे, त्याबद्‌दल वाईट वाटुन घेवु नका. श्री. बच्चाराम रुपचंदानी यांनी म्हटले की चिकुनगुनिया येतो कोठुन? आपण तर त्याचे उत्तर दिले नाही?

<u>डॉ. जी.टी. जिंदे (वैद्यकीय आरोग्य अधिकारी):–</u>मच्छर चावल्यामुळे चिकुनगुनिया होतो. साठवलेल्या पाण्यामुळे व दुर्गंधीयुक्त पाण्यामुळे मच्छर होतात.

<u>सदस्य श्री. राजेश वदरिया :–</u>मा. महापौरजी, राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टीच्यावतीने सन्माननिय सदस्य श्री. प्रभुनाथ गुप्ता यांना विरोधी पक्ष नेता पद देण्याबाबतीत यापुर्वीच आम्ही पत्र दिले आहे. व आता सुध्दा पत्र दिले आहे. ते प्रलंबित ठेवता कामा नये. त्याबाबत निर्णय देणे अनिर्वाय आहे. त्यांना विरोधी पक्ष नेता नियुक्त केले पाहिजे.

<u>उप–महापौर :–</u>सभा संपु दया.

<u>सदस्य श्री. राजेश वदरिया :–</u>उप–महापौरजी, सभेच्या अगोदर किंवा शेवटी यामध्ये काही फरक पडत नाही.

<u>उप–महापौर :–</u>आपले पत्र आले आहे.

<u>सदस्य श्री. राजेश वदरिया :–</u>आमचे पत्र आजचे नाही. या अगोदरचे सुध्दा पत्र आहे. त्यावर निर्णय घेण्यास आपणांस काय अडचणीचे आहे?

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>श्री. वदरियाजी, आपण पत्र दिले आहे त्यावर महापौर महोदया निर्णय घेतील आणि आपणांस सांगतील.

<u>सदस्य श्री. राजेश वदरिया :–</u>माझा आग्रह आताच नाही. आपण निर्णय नंतर सुध्दा घेवु शकता किंवा आता सुध्दा घेवु शकता.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :–</u>सभा चालु आहे महापौर महोदया नंतर निर्णय देतील.

<u>उप–महापौर :–</u>आपले पत्र प्राप्त झाले आहे. सध्या सभेचे कामकाज चालु आहे, आपणांस शेवटी सांगु.

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

---

⇨ <u>विषय क्र. २ :–</u> मागील सभेचे दिनांक २०/८/२००९ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u>सचिव साहेब, इतिवृत्ताचे पृष्ठ क्र. २९ व ३० जरा पहा.

<u>महापालिका सचिव :—</u>ठिक आहे पाहतो.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u>त्यावेळी आयुक्त साहेबांनी सांगितले होते की, उदयानांसाठी आम्ही खाजगी सुरक्षा रक्षक नेमु. व आमचे उप—महापौर साहेबांनी आदेश दिले होते की, याकामी अर्थसंकल्पात तरतुद करुन लवकरात लवकर या नेमणुका केल्या जाव्यात तर त्याचे काय झाले? आपल्या हातात इतिवृत्त आहे. त्यातील पृष्ठ क्र. २९ व ३० वर याची स्पष्टपणे नोंद आलेली आहे. उप—महापौर साहेबांनी जो आदेश दिला होता तो २० ऑगस्ट रोजी दिला होता आज १३ नोव्हेंबर आहे. या दरम्यान त्याबाबतीत काय झाले?

<u>महापालिका सचिव :—</u>पृष्ठ क्र. ३० वर चौथ्या ओळीवर आहे ना?

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—</u>होय, ती वाक्य मी वाचुन दाखवितो. आज तीन महिने झाले याबाबतीत पुढे काय झाले? तरतुद करण्यात आली आहे किंवा नाही? आणि आजच्या तारखेला ती संचिका कोठे आहे? २० जुलैला सांगण्यात आले होते की एक महिन्यात आम्ही हे काम करु त्यानंतर ऑगस्टमध्ये सांगितले की याकामी आम्ही तरतुद करु आता नोव्हेंबरमध्ये तुमचे काय उत्तर आहे ते सांगा. याचे काही उत्तर नाही? लेखा विभागाचा कोणी अधिकारी सभागृहात उपस्थित नाही काय?

<u>श्री. प्रविणकुमार जैन (मुख्य लेखा अधिकारी):—</u>मा. महापौर महोदया, सुरक्षा रक्षकांच्या नेमणुकीबाबतचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन आमच्याकडे आलेला नाही. परंतु तरीही डिसेंबर महिन्यामध्ये अर्थसंकल्पात याकामी निधी समायोजित करुन घेवु.

**यावेळी श्रीमती ज्योती चैनानी, डॉ. निना नाथानी, श्रीमती मोना वनवारी हे सभागृहातुन बाहेर गेले.**

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी:—</u>सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन आपणाकडे प्रस्ताव आलेला नाही?

<u>श्री. प्रविणकुमार जैन (मुख्य लेखा अधिकारी):—</u>अदयापपर्यंत आलेला नाही.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी:—</u>२० ऑगस्टला असे लिहिण्यात आले आहे की, सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन याबाबतचा प्रस्ताव लेखा विभागात पाठविण्यात आला आहे व त्याबाबतीत लेखा विभागाचे म्हणणे आहे की याकामी अर्थसंकल्पात तरतुद नाही. तरतुद करण्यासाठी स्थायी समितीकडे प्रस्ताव पाठविला पाहिजे. त्यावर स्थायी समिती सदस्यांनी येथे उत्तर दिले आहे. व आपण म्हणता की, सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन आमच्याकडे संचिका आलेली नाही? तर मग आपण तरतुद कशी करणार? २० ऑगस्टचा प्रश्न आहे आज १३ नोव्हेंबरला आपण उत्तर देता की आमच्याकडे संचिका आलेली नाही. मात्र डिसेंबर महिन्यामध्ये आम्ही याकामी तरतुद करु. आपण कुणाच्या सांगण्यानुसार तरतुद करणार?

<u>श्री. प्रविणकुमार जैन (मुख्य लेखा अधिकारी):—</u>सुधारीत अर्थसंकल्पात याकामी २० लाखाची तरतुद करु.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी:—</u>कधी करणार?

<u>श्री. प्रविणकुमार जैन (मुख्य लेखा अधिकारी):—</u>डिसेंबर महिन्यामध्ये.

<u>सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी:—</u>२० ऑगस्टला आपणांस कार्यवाही करायची होती. याबाबतीत आमच्या सभागृह नेत्याने लक्षवेधी सूचना मांडलेली होती. त्यावेळी स्थायी समिती सदस्यांनी म्हटले होते की, आम्ही या कामी सर्व पुर्तता केली आहे. तर हे काय आहे? सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिका—यांना व्यासपीठावर बोलवा. त्यांना विचारतो. सभागृहात हे काय चालले आहे? सार्वजनिक बांधकाम विभागाचा कोण अधिकारी आहे?

**श्री. माधव जवांदे (शहर अभियंता):—**मा. महापौर  महोदया, मा. स्थायी समितीपुढे सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे प्रस्ताव पाठविला जाईल.

**सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी:—**पाठविला जाईल?

**श्री. माधव जवांदे (शहर अभियंता):—**प्रस्ताव तयार आहे.

**सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी:—**२० जुलैला आपल्या विभागाच्या कार्यकारी अभियंत्याने उत्तर दिले होते की, आमचा प्रस्ताव तयार आहे.  आम्ही लेखा विभागात पाठविला आहे.  अर्थसंकल्पात तरतुद नाही व आज आपण म्हणत आहात प्रस्ताव पाठवु. २० जुलैपासुन यावर चर्चा चालु आहे.  २० ऑगस्टला आपण उत्तर दि होते.  हे सभागृहाता काय चालु आहे ते समजत नाही?  अधिकारी लोक ८१ नगरसेवकांची मजाक उडवत आहेत?  आपण इतिवृत्त वाचा.  २० जुलैला सार्वजनिक बांधकाम विभागाने आम्हांस उत्तर दिले आहे की २० ऑगस्टच्या आधी आम्ही याकामी कार्यवाही करु.  २० ऑगस्टला आम्हांस उत्तर देतात की याकामी आमच्याकडे तरतुद नाही.  १३ नोव्हेंबरला आता आम्हांला उत्तर दिले जाते की, आम्ही याबाबतचा प्रस्ताव पाठवु. काय आमची टर्म संपल्यानंतर करणार आहात?  २०१२ नंतर करणार आहात?  आपण सभेमध्ये ही काय मजाक चालवली आहे?  सभागृहात खोटे बोलता?  दिशाभुल करता?  इतिवृत्तामध्ये स्पष्टपणे नोंद आली आहे त्यानंतर तीन महिने झाले तरी आपण काही करत नाहीत?

**श्री. माधव जवांदे (शहर अभियंता):—**मा. महापौर महोदया, मध्यंतरी आचारसंहिता होती त्यामुळे प्रस्ताव पाठविण्यात आला नाही.  सार्वजनिक बांधकाम विभागात त्याबाबतचा प्रस्ताव तयार असून तो आता पाठविला जाईल.

**सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—**शहर अभियंता साहेब, २० ऑगस्टनंतर आचारसंहिता कधी संपली?  हे आपणांस माहित असले पाहिजे की, ती ऑक्टोंबर मध्ये संपली आहे. आता आचारसंहिता संपली आहे ती लागु नाही, त्यानंतर आपण पाठवावयास पाहिजे होते?  चुकीची उत्तरे देत आहात.

**आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—**सुरक्षा रक्षक नेमण्याचा जेव्हा प्रस्ताव आला तेव्हा सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत फाईल पाठविली होती.  त्यानंतर लेखा विभागाने तशी तरतुद नसल्याकारणाने........

**सदस्य श्री. बच्चाराम रुपंचदानी :—**आता लेखा विभागाने तर सांगितले की, फाईलच आली नाही म्हणुन? त्यांनी काय सांगितले की, आता आमच्याकडे फाईलच आली नाही परंतु तरीसुध्दा आम्ही तरतुद करु?  आता आम्ही कोणाचे खरं मानायचे?  आपले की त्यांचे?

**यावेळी श्री. सुंदर मंगतानी, श्री. क्रिशनानी गोदुमल हे सभागृहातुन बाहेर गेले.**

**आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—**मी आयुक्त म्हणुन बोलतो.

**सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—**त्यावेळेस शहर अभियंता यांनी सांगावयास पाहिजे होते?

**आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—**मी आयुक्त म्हणुन बोलतो. मी जे बोलतो ते सत्य बोलतो.

**सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—**त्यावेळेस आयुक्तांनी सुध्दा सांगितले होते.  २० ऑगस्टला सुध्दा आयुक्तांनी सांगितले होते.  श्री. शिर्के साहेबांनी नव्हते सांगितले?

**आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—**त्यावेळेस श्री. जैन नव्हते.

**सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—**आता तर श्री. जैन यांनीच सांगितले ना?

**आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—**श्री. जैन यांना माहित नव्हते.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—आम्ही आयुक्त व शहर अभियंतांशी बोलत आहे. आम्ही वैयक्तीक गोष्ट करत नाही. त्यावेळेस शहर अभियंता यांनी सांगावयास पाहिजे होते?

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—अर्थसंकल्पात पैश्यांची तरतुद नाही. कुठल्या शिर्षातुन पैसे वळविता ती ते पहात आहोत. असे पैसे कुठल्या लेखाशिर्षतुन वळवता येईल ते पाहत आहोत.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—त्यावेळेस आयुक्त साहेबांनी सांगितले होते त्यांनी कसे सांगितले होते की, मी एका महिन्यात आदेश देतो म्हणुन? जे आयुक्त खुर्चीवर बसतात त्यांना माहित नाही का की त्यास वेळ लागेल, एक महिना लागेल, चार महिने लागतील, आठ महिने लागतील हे माहित नाही का?

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—मी आपणांस निवेदन करतो की, फाईल पाठविली आहे.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—आपले वेगवेगळे उत्तर आहे, शहर अभियंता सांगतात फाईल पाठविली आहे तर श्री. जैन सांगतात फाईल पाठविली नाही म्हणुन? शहर अभियंता आता सांगातात की आम्ही पाठवु.

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—मी आयुक्त म्हणुन बोलतो, माझे उत्तर संपले.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—कधी होणार?

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—कुठल्या शिर्षातुन ते वळवायचे ते पाहतो.

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—नाही, नाही कधी होणार ते सांगा.

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—आधी हे तर पहावे लागेल कुठल्या शिर्षात शिल्लक आहे ते?

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—नाही, किती महिन्यात ते सांगा ? एक महिना? सहा महिने?

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—जर एका महिन्यात झाले नाही तर आपण म्हणणार एक महिन्यात झाले नाही?

सदस्य श्री. बच्चाराम रुपचंदानी :—एक महिन्याचे दोन महिने घ्या. काही तरी वेळ तर दया ना?

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—मी पाहतो, आम्ही स्थायी समितीकडे प्रस्ताव सादर करतो.

महापालिका सचिव :—ठिक आहे? सर्वसंमतीने?

काही सदस्य :—पास—पास......

महापौर :— मागील सभेचे दिनांक २०/८/२००९ रोजीचे इतिवृत्त जसे आहे तसे सर्वानुमते कायम करण्यात येत आहे.

---

☑

विषय क्र. २ :— मागील महासभेचे दिनांक २०/८/२००९ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नाव : श्री. गोविंदराम लुंड
अनुमोदकाचे नाव : श्री. बी.बी. मोरे

<u>महासभा ठराव क्र. ४५ अ</u>  <u>दिनांक : १३/११/२००९</u>

ही महासभा महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेल्या दिनांक २०/८/२००९ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे पृष्ठ क्र. १ ते ५४ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

<u>एकमताने</u>

महापौर/ पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ३ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. ३:— श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे माजी सभापती, क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समिती यांना सन २००६-०७ या कालावधीची दुरध्वनी देयकाची रक्कम अदा करणेस मान्यता देणे.

---

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>मा. महापौर महोदया, हा पुर्वीच्या बॉडीचा प्रस्ताव आहे. हे नगरसेवक २००७ मध्ये निवडुन आलेले आहेत व प्रस्ताव आणला २००६ चा?

<u>उप—महापौर :—</u>यापुर्वी सुध्दा दिले आहेत.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>परंतु आता केले आहे ना २००७ चे?

<u>उप—महापौर :—</u> नाही, २००६ चे सुध्दा केले आहेत.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>उदया २००० चा प्रस्ताव कुणी घेवुन येईल?

<u>महापालिका सचिव :—</u>पास? सर्वसंमतीने?

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

**यावेळी सदस्या श्रीमती जया माखिजा, श्रीमती कविता सिरवानी, श्रीमती चंद्रा टेकचंदानी हया सभागृहातुन बाहेर गेले.**

<u>महापौर :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ३ :—** श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे माजी सभापती, क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समिती यांना सन २००६-०७ या कालावधीची दुरध्वनी देयकाची रक्कम अदा करणेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे माजी सभापती, क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समिती यांनी दिनांक २/७/२००९ रोजी सन २००६—०७ या कालावधीचे दुरध्वनी देयकाची मागणी केलेली आहे. सदर देयक बुकात पाहणी केली असता त्यांनी सन २००६—०७ या कालावधीचे दुरध्वनी देयकाची रक्कम घेतलेली नाही. महापालिका स्थायी समिती ठराव क्र. ७, दिनांक ३०/४/९७ नुसार इतर सभापती यांना दुरध्वनी देयक भरणा करण्यासाठी दरमहा रु. १५००/— प्रमाणे देण्यास मंजुरी दिलेली आहे.

श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे माजी सभापती, क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समिती सन २००६—०७ या कालावधीचे दुरध्वनी देयकास प्रशासकिय वित्तीय तरतुदीस महासभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

वरील बाब लक्षात घेवुन महासभेपुढे योग्य निर्णयासाठी सादर.

<u>महासभा ठराव क्र:</u> ४६ <u>दिनांक:—१३/११/२००९</u>

सुचकाचे नाव :— श्री. मोहन साधवानी
अनुमोदकाचे नाव :— श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री. सुर्यकांत (बबन) लिंगे माजी सभापती, क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक कार्यक्रम समिती यांना सन २००६—०७ या कालावधीची दुरध्वनी देयकाची रक्कम अदा करणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ४ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ४ :— विशेष समित्यांची नेमणूक करणे.**

---

<u>महापालिका सचिव:—</u>नऊ समितीसाठी सर्व राजकिय पक्षाचे सन्माननिय सदस्यांचे नावे आलेली आहेत. सर्वात प्रथम लोकभारती पक्ष........

## <u>लोकभारतीच्यावतीने</u>

<u>सार्वजनिक बांधकाम समिती</u>

१. श्री. गोविंदराम लुंड
२. श्री. जग्यासी दिलीप

<u>नियोजन व विकास समिती</u>

१. श्री. जीवन इदनानी
२. श्री. अंकुश म्हस्के

<u>आरोग्य परिरक्षण व वैदयकीय सहाय्य समिती</u>

१. श्री. मोहनदास रामरख्यानी
२. श्री. दत्तात्रय पवार

<u>माध्यमिक शिक्षण व पुर्व प्राथमिक शिक्षण समिती</u>

१. श्रीमती वनवारी मोना
२. श्रीमती शिला मनसूलकर

<u>पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती</u>

१. श्री. सुरेश जाधव
२. श्रीमती कविता सिरवानी

<u>गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती</u>

१. श्रीमती चंद्रा टेकचंदानी
२. श्री. प्रशांत धांडे

<u>क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक समिती</u>

१. श्री. भजनलाल रामचंदानी
२. श्री. प्रशांत धांडे

<u>महसूल समिती</u>

१. श्रीमती ज्योती चैनानी
२. श्री. भजनलाल रामचंदानी

<u>महिला व बालकल्याण समिती</u>

१. श्रीमती निलम रावत
२. श्रीमती ज्योती चैनानी

## भारतीय जनता पार्टीच्यावतीने

<u>सार्वजनिक बांधकाम समिती</u>

१. श्री. रामचंद्र पारवानी

<u>नियोजन व विकास समिती</u>

१. श्री. लाल बिहारी यादव

<u>आरोग्य परिरक्षण व वैदयकीय सहाय्य समिती</u>

१. श्री. हरेश जग्यासी

<u>माध्यमिक शिक्षण व पुर्व प्राथमिक शिक्षण समिती</u>

१. श्री. महेश सुखरामानी

<u>पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती</u>

१. श्री. किशोर जग्यासी

<u>गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती</u>

१.श्री. बच्चाराम रुपचंदानी

<u>क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक समिती</u>

१. श्रीमती शकुंतला जग्यासी

<u>महसूल समिती</u>

१.श्रीमती शकुंतला पाटील

<u>महिला व बालकल्याण समिती</u>

१. डॉ. निना नाथानी

## शिवसेना पक्षाच्यावतीने

<u>सार्वजनिक बांधकाम समिती</u>

१. श्री. प्रधान पाटील
२. श्रीमती जयश्री सुर्वे

<u>नियोजन व विकास समिती</u>

१. श्री. चंद्रशेखर यादव
२. श्रीमती मिनाताई सोनेजी

<u>आरोग्य परिरक्षण व वैदयकीय सहाय्य समिती</u>

१. श्री. प्रधान पाटील
२. श्रीमती जयश्री सुर्वे

माध्यमिक शिक्षण व पुर्व प्राथमिक शिक्षण समिती

१.श्रीमती राजश्री चौधरी
२. श्रीमती ज्योती श्याम माने

पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती

१. श्री. राजेश देवेंद्र वानखेडे
२. श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती

१. श्रीमती वसुंधरा बोडारे
२. श्री. दिलीप दशरथ गायकवाड

क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक समिती

१.श्री. रामसागर यादव
२. श्री. रमेश चव्हाण

महसूल समिती

१. श्रीमती वसुधरा धनंजय बोडारे
२. श्री. मुकेश तेजी

महिला व बालकल्याण समिती

१.श्रीमती ज्योती श्याम माने
२. श्रीमती मिनाताई सोनेजी

## राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्यावतीने

सार्वजनिक बांधकाम समिती

१. श्री. अनिल विदयार्थी
२. श्रीमती संगिता कंडारे

नियोजन व विकास समिती

१. श्री. सतिश चहाळ
२. श्रीमती सरोजीन टेकचंदानी

आरोग्य परिरक्षण व वैदयकीय सहाय्य समिती

१. श्री. अनिल विदयार्थी
२. श्री. संजय बठिजा

माध्यमिक शिक्षण व पुर्व प्राथमिक शिक्षण समिती

१. श्री. रविंद्र बागु
२. श्री. हिरानंद जग्यासी

पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती

१. श्री. सतिश चहाळ
२. श्री. राजु जग्यासी

गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती

१. श्रीमती सुरेखा वेलकर
२. श्री. भारत राजवानी

क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक समिती

१. श्रीमती निलु चांदवानी
२. श्री. गणपत एडके

महसूल समिती

१. श्री. प्रभुनाथ गुप्ता
२. श्री. नरेंद्र ठाकुर

महिला व बालकल्याण समिती

१. श्रीमती सुजाता रिजवानी

२. श्रीमती मंजु पोपटानी

## आरपीआय पक्षाच्यावतीने

सार्वजनिक बांधकाम समिती

१.श्रीमती सुमन शेळके

नियोजन व विकास समिती

१.श्रीमती पंचशिला नाना पवार

आरोग्य परिरक्षण व वैदयकीय सहाय्य समिती

१. श्रीमती पंचशिला नाना पवार

माध्यमिक शिक्षण व पुर्व प्राथमिक शिक्षण समिती

१. श्री. जे.के. ढोके

पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती

१. श्री.बी.बी. मोरे

गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती

१.श्रीमती लता शांताराम निकम

क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक समिती

१. श्री. बी.बी. मोरे

महसूल समिती

१.श्रीमती लता शांताराम निकम

महिला व बालकल्याण समिती

१. श्रीमती सुमन शेळके

## कॉंग्रेस पार्टीच्यावतीने

सार्वजनिक बांधकाम समिती

१. श्रीमती इंदिरा उदासी

नियोजन व विकास समिती

२. श्री. मोहन साधवानी

आरोग्य परिरक्षण व वैदयकीय सहाय्य समिती

१. श्री. तुलसीदास वसिटा

माध्यमिक शिक्षण व पुर्व प्राथमिक शिक्षण समिती

१. श्री. सुंदर मंगतानी

पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती

१. श्रीमती रजनी महाडिक

गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती

१.श्रीमती मालती करोतिया

क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक समिती

१. श्रीमती मालती करोतिया

महसूल समिती

१.श्री. सुंदर मंगतानी

महिला व बालकल्याण समिती

१. श्रीमती महाडिक रजनी

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—मा. महापौर महोदया, आता ज्या सदस्यांची नेमणुक झाली आहे, त्यांची मुदत आठ महिने असली पाहिजे. इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता हा ठराव अंमलात आणला जावा.

महापालिका सचिव :—या सदस्यांची मुदत आजच्या तारखेपासुन आठ महिन्याची असेल. पास? सर्वसंमतीने?

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>महापौर :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ४:–** विशेष समित्यांची नेमणूक करणे.

<u>प्रस्तावना</u>

मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० अन्वये विशेष समित्यांची नेमणुक करता येते व महापालिका, स्थायी समिती, परिवहन समिती इत्यादीचे कामकाजाचे नियम ४ अन्वये खालील आठ समित्यांची नेमणुक करता येते. त्यानुसार महासभा ठराव क्र. १५, दिनांक १/९/२००८ अन्वये खालील नऊ विशेष समित्यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

१. सार्वजनिक बांधकाम समिती
२. नियोजन व विकास समिती
३. पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती
४. आरोग्य परिरक्षण व वैद्यकीय सहाय्य समिती
५. माध्यमिक शिक्षण व पुर्व प्राथमिक शिक्षण समिती
६. गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती
७. क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक समिती
८. महिला व बालकल्याण समिती
९. महसूल समिती

वरील विशेष समित्यांची एक वर्षाची मुदत दिनांक ३१/८/२००९ रोजी संपृष्टात येत आहे. त्यामुळे दिनांक १/९/२००९ पासून नविन ८ समित्यांची रचना करणे आवश्यक आहे.

प्रत्येक समितीत ९ सदस्यांची नियुक्ती करता येईल. महापालिकेच्या विशेष समितीवर ९ सदस्यांची नियुक्ती ही मान्यता प्राप्त पक्षाचे किंवा नोंदणीकृत पक्षांचे तौलनिक पक्षबळ विचारात घेवून आणि सभागृह नेता, विरोधीपक्ष नेता व अशा प्रत्येक पक्षाशी किंवा गटाशी विचार विनिमय करुन महानगरपालिकेतील अशा पक्षाच्या किंवा गटाच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन करण्याबाबतची तरतुद आहे. प्रत्येक गटाचे संख्याबळ खालील प्रमाणे आहे.

| लोकभारती | शिवसेना | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी | भाजपा | कॉंग्रेस | आरपीआय | मनसे | अपक्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १७ | १७ | १६ | १२ | ६ | ५ | २ | १ |

| | |
|---|---|
| ७६<br>—<br>९ | = ८.४४ |

प्रत्येक विशेष समितीवर एका सदस्याचे निवडणूकीसाठी मतांचे प्रमाण– ८.४४ असणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने प्रत्येक गटाच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देश खालील प्रमाणे असेल.

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | लोकभारती | १७<br>—— X ९<br>७६ | = २.०१ | (५) | कॉंग्रेस | १६<br>—— X ९<br>७६ | = ०.७१ |
| (२) | शिवसेना | १७<br>—— X ९<br>७६ | = २.०१ | (६) | आरपीआय | ५<br>—— X ९<br>७६ | = ०.५९ |
| (३) | रा.का.पा. | १६<br>—— X ९<br>७६ | = १.८९ | (७) | म.न.से. | २<br>—— X ९<br>७६ | = ०.२३ |
| (४) | भाजपा | १२<br>—— X ९<br>७६ | = १.४२ | (८) | अपक्ष | १<br>—— X ९<br>७६ | = ०.११ |

वरील प्रत्येक गटाच्या संख्येच्या तौलनिक संख्याबळातून पूर्णांकाच्या आधारे प्रथम पक्षनिहाय प्रत्येक समितीवर खालील नेमणूका करण्यात येतील.

| लोकभारती | शिवसेना | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी | भाजपा | एकूण |
|---|---|---|---|---|
| २ | २ | १ | १ | ६ |

यानंतर रिक्त राहणा–या तीन जागांवर नामनिर्देशन करतांना ज्या गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ जास्त आहे. त्या गटाचे पालिका सदस्याचे नामनिर्देशन करता येईल.

त्यामुळे खालील गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ खालील प्रमाणे आहे.

(१) लोकभारती ०.०१ (२) शिवसेना ०.०१ (३) रा.का.पा. ०.८९

(४) भा.ज.पा. ०.४२ (५) कॉंग्रेस ०.७१ (६) आरपीआय ०.५९

(७) म.न.से ०.२३ (८) अपक्ष ०.११

वरील परिस्थिती पहाता प्रत्येक समितीवर भाजपा, कॉंग्रेस व आरपीआय या गटाचे अपूर्णांकातील तौलनिक बळ जास्त आहे व त्यामुळे तीन रिक्त जागांवर या पक्षांच्या प्रत्येकी एक–एक सदस्याची नेमणूक करता येईल म्हणून प्रत्येक गटाचे विशेष समितीत प्रमाणाशिर प्रतिनिधीत्व खालील प्रमाणे करण्यास प्रस्तावित.

| लोकभारती | शिवसेना | रा.का.पा. | भाजपा | कॉंग्रेस | आरपीआय | मनसे | अपक्ष | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | २ | २ | १ | १ | १ | ० | ० | ९ |

<u>महासभा ठराव क्र:</u> ४७ <u>दिनांकः–१३/११/२००९</u>

सुचकाचे नाव :– श्री. जीवन इदनानी

अनुमोदकाचे नाव :– श्री. रामसागर यादव

ही महासभा वरील प्रस्तावनेअनुसार प्रत्येक विषय समितीवर नऊ पालिका सदस्यांचा समावेश असलेल्या खालील ९ विषय समित्यांची नेमणुक करीत आहे.

१. <u>सार्वजनिक बांधकाम समिती</u>

१. श्री. लुंड गोविंदराम
२. श्री. जग्यासी दिलीप
३. श्री. पाटील प्रधान
४. श्रीमती सुर्वे जयश्री
५. श्री. ऐलानी अनिल (विद्यार्थी)
६. श्रीमती कंडारे संगिता
७. श्री. पारवानी रामचंद्र
८. श्रीमती उदासी इंदिरा
९. श्रीमती शेळके सुमन

२. <u>नियोजन व विकास समिती</u>

१. श्री. इदनानी जीवन
२. श्री. म्हस्के अंकुश
३. श्री. यादव चंद्रशेखर
४. श्रीमती सोनेजी मिना
५. श्री. चहाळ सतिश
६. श्रीमती टेकंचदानी सरोजिनी
७. श्री. यादव लालबिहारी
८. श्री. साधवानी मोहन
९. श्रीमती पवार पंचशिला

३. <u>पाणी पुरवठा व जलनिस्सारण समिती</u>

१. श्री. जाधव सुरेश
२. श्रीमती सिरवानी कविता
३. श्री. वानखेडे राजेश
४. श्री. भुल्लर राजेंद्रसिंह
५. श्री. चहाळ सतिश
६. श्री. जग्यासी राजु

७. श्री. जग्यासी किशोर
८. श्रीमती महाडिक रजनी
९. श्री.मोरे बी.बी.

४. आरोग्य परिरक्षण व वैद्यकीय सहाय्य समिती

१. श्री. रामरख्यानी मोहनदास
२. श्री. पवार दत्तात्रय
३. श्री. पाटील प्रधान
४. श्रीमती सुर्वे जयश्री
५. श्री. ऐलानी अनिल (विद्यार्थी)
६. श्री. बठिजा संजय
७. श्री. जग्यासी हरेश
८. श्री. वसिटा तुलसीदास
९. श्रीमती पवार पंचशिला

५. माध्यमिक शिक्षण व पुर्व प्राथमिक शिक्षण समिती

१. श्रीमती वनवारी मोना
२. श्रीमती मनसूलकर शिला
३. श्रीमती चौधरी राजश्री
४. श्रीमती माने ज्योती
५. श्री. बागुल रविंद्र
६. श्री. जग्यासी हिरानंद
७. श्री. सुखरामानी महेश
८. श्री. मंगतानी सुंदर
९. श्री. ढोके जे.के.

६. गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती

१. श्रीमती टेकचंदानी चंद्रा
२. श्री. धांडे प्रशांत
३. श्रीमती बोडारे वसुधा
४. श्री. गायकवाड दिलीप
५. श्रीमती वेलकर सुरेखा
६. श्री. राजवानी भारत
७. श्री. रुपचंदानी बच्चाराम
८. श्रीमती करोतिया मालती
९. श्रीमती निकम लता

७. क्रिडा समाज कल्याण व सांस्कृतिक समिती

१. श्री. रामचंदानी भजनलाल
२. श्री. धांडे प्रशांत
३. श्री. यादव रामसागर
४. श्री. चव्हाण रमेश
५. श्रीमती चांदवानी निलू
६. श्री. एडके गणपत
७. कु. जग्यासी शकुंतला
८. श्रीमती करोतिया मालती
९. श्री. मोरे बी.बी.

८. महिला व बालकल्याण समिती

१. श्रीमती रावत निलम
२. श्रीमती चैनानी ज्योती
३. श्रीमती माने ज्योती
४. श्रीमती सोंनेजी मिना
५. श्रीमती रिजवानी सुजाता
६. श्रीमती पोपटानी मंजु
७. डॉ. नाथानी निना
८. श्रीमती महाडिक रजनी

९. श्रीमती शेळके सुमन

९. महसूल समिती

१. श्रीमती चैनानी ज्योती
२. श्री. रामचंदानी भजनलाल
३. श्रीमती बोडारे वसुधा
४. श्री. तेजी मुकेश
५. श्री. गुप्ता प्रभुनाथ
६. श्री. ठाकुर नरेंद्रकुमार
७. श्रीमती पाटील शकुंतला
८. श्री. मंगतानी सुंदर
९. श्रीमती निकम लता

सदर समित्या दिनांक १३/११/२००९ पासून दिनांक १२/७/२०१० या ८ महिन्याच्या कालावधीसाठी कार्यरत राहतील.

या ठरावाद्वारे घेतलेला निर्णय अंतिम असून इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता तो थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/–
अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ५ :–** महासभा ठराव क. २ दिनांक १२/६/२००८ मध्ये अशंता बदल करून श्री बालचंद्र बाबु दिनकर यांची सफाई कामगार पदावर वशिला पध्दतीने नियुक्ती करणेस मान्यता देणे.

---

सदस्य श्री. रविंद्र बागुल :–सचिव साहेब, मा. महापौर आणि आयुक्त साहेब, हे जे श्री. दिनकर आहेत ते व्हीआयपी आहेत, यांची नियुक्ती केली आहे. या अगोदरचे बरेच कामगार असेच पडुन आहे, ज्यांच्या घरातील कुणी सदस्य वारले आहेत त्यांच्या जागेवर त्या कुटुंबातील कुण्या एखादया व्यक्तीची का भरती होत नाही? नविन नियुक्ती का नाही दिली ? गेल्या वेळेस आरोग्य विभागातील ३२० सफाई कामगारांची भरती होती, ती माणसे भरली नाहीत? मी ब–याच वेळा याबाबत यादी मागीतली आहे. जेव्हा पाहिले तेव्हा नविन भरती केली जाते, हे भरले जात आहेत त्याबद्दल माझे काही म्हणणे नाही परंतु जे मागचे लोक आहेत त्यांना सुध्दा घेतले जावे ना?

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):–मा. महापौर महोदया, सदरची भरती शासनाच्या नियमाप्रमाणे लाड कमिशनने जी शिफारस केली आहे, सफाई कर्मचारीच्या बाबत आहे. आपण म्हणत असाल की, एखादा कर्मचारी निधन पावला तर त्यांच्या जागेवर त्याच्या नातेवाईकाला घ्या. याबाबत अनुकंपा तत्वाचा वेगळा नियम आहे. त्यासाठी जेष्ठता यादी आहे जेष्ठता यादी प्रमाणे आपण कारवाई करतो. याची जी यादी आहे यामध्ये एखादा कामगार सेवानिवृत्त झाला असेल तर त्या बदल्यात ही भरती आहे. याबाबत वेगळा नियम आहे.

महापालिका सचिव :–पास? सर्वसंमतीने?

काही सदस्य :–पास–पास......

महापौर :– सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑

**विषय क्र. ५:–** महासभा ठराव क्र. २ दिनांक १२/६/२००८ मध्ये अशंता बदल करून श्री बालचंद्र बाबु दिनकर यांची सफाई कामगार पदावर वशिला पध्दतीने नियुक्ती करणेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

मा. महासभा ठराव क्र. २, दिनांक १२/६/२००८ अन्वये पात्र उमेदवारांचे यादीतील अनु क्र. २ (२/ड) मधील अंजू बाबू दिनकर यांची ''सफाई कामगार'' पदासाठी नियुक्ती प्रस्तावित होती.

मात्र त्यांनी त्यांचेकडील दिनांक २६/६/२००८ रोजीच्या पत्राद्वारे वैद्यकीय कारणास्तव असमर्थता दर्शवून त्यांचेऐवजी त्यांचा भाऊ कु. बाळचंद्र बाबू दिनकर यांची नियुक्ती करणेबाबत विनंती अर्ज तसेच ना हरकत प्रमाणपत्राचे सत्यप्रतिज्ञा लेख (अफफिडेव्हीट) सादर केला होता. याबाबत महानगरपालिका पॅनलवरील वकीलांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय नोंदविले आहेत –– ''श्रीमती अंजू बाबू दिनकर यांचेडील सत्यप्रतिज्ञापत्र ;।िफिकंअपजद्ध आणि ना हरकत प्रमाणपत्र पाहता श्री. बालचंद्र बाबू दिनकर यांची सफाई कामगार पदावर नियुक्ती करणेस हरकत नसावी.''

तरी महानगरपालिका पॅनलवरील ॲड. नंदकुमार भोळे यांचे संबंधीत अभिप्राय पाहता श्रीमती अंजू बाबू दिनकर यांचेऐवजी ''श्री. बालचंद्र बाबू दिनकर'' यांची 'सफाई कामगार' पदावर अनुकंपा तत्वाने नियुक्ती करणेबाबत मा. महासभा पटलावर मान्यतेसाठी सादर करीत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ४८ <u>दिनांक:–१३/११/२००९</u>

सुचकाचे नाव :– श्री. जे.के. ढोके
अनुमोदकाचे नाव :– श्री. भारत राजवानी

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार श्रीमती अंजु बाबू दिनकर याचे ऐवजी श्री. बालचंद्र बाबु दिनकर यांची सफाई कामगार पदावर वशिला पध्दतीने नियुक्ती करण्यास व त्या प्रयोजनार्थ दिनांक १२/६/२००८ च्या महासभा ठराव क्र. २ मध्ये अंशत: बदल करीत आहे.

सुचकाची सही/–
अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

⇨ विषय क्र. ६ :–९ सेवा निवृत्त/दिवंगत सफाई कामगारांचे वारसांना नेमणुका देणे.

---

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>महापौर :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ६:–** ९ सेवा निवृत्त/दिवंगत सफाई कामगारांचे वारसांना नेमणुका देणे.

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विशयास अनुसरून सादर करण्यात येते की, लाड कमिटीच्या शिफारशी वारसा (वशिला) पध्द्तीच्या अंमलबजावणीबाबत नगर विकास विभाग, परिपत्रक क्र. संकीर्ण–२२९२/१९९९/प्र.क्र. १६४/९२/नवि–६, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,दिनांक ३०

जुन १९९४ नुसार महानगरपालिकेतील सफाई कामगार/मुकादम यांच्या निवृत्तीनंतर, मृत्युनंतर, स्वेच्छा निवृत्तीनंतर किंवा वैद्यकीयदृष्टया अपात्र ठरविल्यानंतर त्यांचे जागी वारसा हक्काने नियुक्ती करण्यात येते.

उल्हासनगर महानगरपालिकेतील सेवा निवृत्त, दिवंगत, वैद्यकीय सेवानिवृत्त सफाई कामगार यांचे जागी वारसा हक्कांने नियुक्ती मिळणेबाबत खालीलप्रमाणे विनंती अर्ज सादर केलेले आहेत.

| अ. क्र | सफाई कर्मचाऱ्याचे नाव | सेवा निवृत्ती/मृत्यु दिनांक | वारसाचे नाव | कर्मचाऱ्याशी असलेले नातेसंबंध |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. रामअवतार सुख्खन | स्वेच्छा सेवा निवृत्ती दि २८/०२/२००९ | श्री. मनिष रामअवतार | मुलगा |
| २ | श्रीम. शीला कंच्छी खैरालिया | विहीत वयोमानानुसार सेवा निवृत्ती, दि ३०/०४/२००९ | श्रीम. मिना राजपाल खैरालिया | सुन |
| ३ | श्रीम. शकुंतला बाळु जाधव | वैद्यकिय सेवा निवृत्ती दि १८/०२/२००९ | श्री. रामेश्वर बाळु जाधव | मुलगा |
| ४ | श्रीम. केशरबाई जियाजी सौदागर | स्वेच्छा सेवा निवृत्ती, दि ३१/०७/२००९ | श्री. अबादास जियाजी जाधव | मुलगा |
| ५ | श्रीम. कविता संतुमल करिरा | वैद्यकिय सेवा निवृत्ती, दि १३/०३/२००९ | श्री. दिपक सुरेशलाल पेशवानी | भाचा (भावाचा मुलगा) |
| ६ | कै. वसत रामभाऊ | मृत्यु, दि.२०/११/२००७ | श्रीम. उषा वसंत घोडके | पत्नी |
| ७ | श्रीम. सुशिला सुखदेव गायवाड | वैद्यकिय सेवा निवृत्ती, दि ०५/०४/२००९ | श्री. संजय सुखदेव गायकवाड | मुलगा |
| ८ | श्री. धोंडीराम पुंजाराम मगरे | वैद्यकिय सेवा निवृत्ती, दि ०१/०१/२००९ | श्री. नितिन धोडीराम मगरे | मुलगा |
| ९ | श्री. मधु गगांराम देवकर | वैद्यकिय सेवा निवृत्ती, दि १४/०६/२००९ | श्री. अनिल मधु देवकर | मुलगा |

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महानगरपालिकेच्या ज्या अधिकाऱ्याचे किमान मासिक वेतन भत्ते वगळुन चारशे रू. किंवा त्याहुन अधिक आहे असे अधिकारी तात्पुरते असो किंवा कायम असो त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकेस निहीत असेल अशी तरतुद आहे. म्हणजेच नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (नि. वे.) नियम १९८२ मधील नियम ६५ व ६६ अन्वये सेवानिवृत्ती प्रकरणी कार्यवाहीस नियुक्ती प्राधिकारी सक्षम आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महापालिका म्हणजेच महासभा ''नियुक्ती प्राधिकारी'' म्हणुन सक्षम आहे.

तरी शासन निर्णयाच्या अधिन राहुन वरील वारसांना उल्हासनगर महानगरपालिकेतील सेवा निवृत्त, दिवंगत, स्वेच्छा, वैद्यकीय सेवानिवृत्त सफाई कामगार यांचे रिक्त जागेवर वारसा हक्कांने नियुक्ती देणेकामी मा. महासभेपुढे मंजुरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ४९ <u>दिनांक:–१३/११/२००९</u>

सुचकाचे नाव :– श्री. रामचंद्र पारवानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेंद्रसिंह भुल्लर

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या ९ सेवा निवृत्त/दिवंगत सफाई कामगारांचे वारसांना नेमणुका देणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—
अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ७ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ७ :— दोन** सफाई कामगारांना वैद्यकीय सेवा निवृत्ती देणे

---

<u>**काही सदस्य :—**</u>पास—पास......

<u>महापौर :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

**विषय क्र. ७:— दोन** सफाई कामगारांना वैद्यकीय सेवा निवृत्ती देणे

<u>प्रस्तावना</u>

उपरोक्त विषयास अनुसरून सादर करण्यात येते की, उल्हासनगर महानगरपालिकेतील खालील सफाई कामगार यांनी वयोमानानुसार तसेच शारीरिक आजारपणामुळे त्यांचेकडुन सफाई काम होत नसल्यामुळे ''वैद्यकीय सेवा निवृत्ती'' मिळणेबाबत विनंती अर्ज सादर केला आहे.

| अ. क्र | सफाई कर्मचाऱ्याचे नाव | एकुण सेवा | वैद्यकीय सेवा निवृत्तीचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | श्रीम. रंजाना कचरू निकाळजे | १९ वर्षपेक्षा जास्त | ०६/०८/२००९ |
| २ | श्री. हरेष राधेष्याम | १५ वर्षपेक्षा जास्त | ३०/०७/२००९ |

त्याअनुषंगाने संबंधित कर्मचारी शारिरीक दृष्टया सेवा करणेस पात्र आहेत किंवा नाहीत याबद्दलचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणेबाबाबते मा. जिल्हा शल्यचिकित्सक, ठाणे तसेच संबंधित कर्मचारी यांना कळविण्यात आले होते.

संबंधित कर्मचारी यांनी मा. जिल्हा शल्यचिकित्सक, ठाणे यांचेकडील प्रमाणपत्र सादर केले आहेत. त्यानुसार त्यांना नावासमोर दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका सेवेतुन वैद्यकीय सेवानिवृत्ती देणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम ७१ अन्वये रूग्णता निवृत्ती वेतनासाठी वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल केल्यानंतर नियम ८० अन्वये कार्यमुक्तता केली जाते. तसेच नियुक्ती प्राधिकारी वैद्यकीय सेवा निवृत्तीस परवानगी देवु शकतो अशी तरतुद आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महानगरपालिकेच्या ज्या अधिकाऱ्याचे किमान मासिक वेतन भत्ते वगळुन चारशे रू. किंवा त्याहुन अधिक आहे असे अधिकारी तात्पुरते असो किंवा कायम असो त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकेस निहीत असेल अशी तरतुद आहे. म्हणजेच नियुक्ती प्राधिकारी मा. महासभा आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (नि. वे.) नियम १९८२ मधील नियम ७१ अन्वये वैद्यकीय सेवा निवृत्ती प्रकरणी कार्यवाहीस नियुक्ती प्राधिकारी सक्षम आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महापालिका म्हणजेच महासभा ''नियुक्ती प्राधिकारी'' म्हणुन सक्षम आहे.

तरी वरील सफाई कामगार यांना वैद्यकीय कारणास्तव ''सेवानिवृत्ती'' देणेकामी मा. महासभा पटलावर मंजुरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ५० <u>दिनांक:–१३/११/२००९</u>

सुचकाचे नाव :– श्री.जे.के. ढोके
अनुमोदकाचे नाव :– श्री. भारत राजवानी

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केलेल्या **दोन** सफाई कामगारांना वैद्यकीय सेवा निवृत्ती देणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्र. ८ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. ८ :–** श्री हरी चंदर अल्हाट सफाई कामगार यांना महापालिका सेवेतुन दिनांक ३१/१०/२००९ पासून स्वेच्छा निवृत्ती मान्य करणे

---

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>महापौर :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. ८:–** श्री हरी चंदर अल्हाट सफाई कामगार यांना महापालिका सेवेतुन दिनांक ३१/१०/२००९ पासून स्वेच्छा निवृत्ती मान्य करणे

<u>प्रस्तावना</u>

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम ६५ व ६६ अन्वये अनुक्रमे ३० वर्ष व २० वर्ष अर्हतकारी सेवा पुर्ण झाल्यानंतर कर्मचाऱ्यास ३ महिन्यांची नोटीस देवुन स्वेच्छा निवृत्ती घेता येते. तसेच नियम ७१ अन्वये रूग्णता निवृत्ती वेतनासाठी वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल केल्यानंतर नियम ८० अन्वये कार्यमुक्तता केली जाते. नियम ६५ पोट नियम १ अन्वये ३० वर्षांच्या सेवेनंतर, व नियम ६६ पोट नियम १ अन्वये २० वर्षांच्या सेवेनंतर नियुक्ती प्राधिकारी, स्वेच्छा निवृत्तीस परवानगी देवु शकतो अशी तरतुद आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (नि. वे.) नियम १९८२ मधील नियम ६५ व ६६ अन्वये सेवानिवृत्ती प्रकरणी कार्यवाहीस नियुक्ती प्राधिकारी सक्षम आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ (१) अन्वये महापालिका म्हणजेच महासभा ''नियुक्ती प्राधिकारी'' म्हणुन सक्षम आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेतील खलील सफाई कर्मचारी यांनी स्वेच्छा निवृत्तीसाठी विनंती अर्ज सादर केलेला आहेत.

| अ.क्र | सफाई कर्मचाऱ्याचे नाव | अर्हतकारी सेवा | नियम | स्वेच्छा निवृत्तीचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. हरि चंदर अल्हाट | २० वर्षापेक्षा जास्त | ६६ | ३१/०८/२००९ |

तरी वरील सफाई कामगार यांना स्वेच्छा सेवा निवृत्ती देणेकामी मा. महासभा पटलावर मंजुरीकरीता प्रस्तावित करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ५१ <u>दिनांक:—१३/११/२००९</u>

सुचकाचे नाव :— बी.बी. मोरे

अनुमोदकाचे नाव :— श्रीमती पंचशिला पवार

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्री हरी चंदर अल्हाट सफाई कामगार यांना महापालिका सेवेतुन दिनांक ३१/१०/२००९ पासून स्वेच्छा निवृत्ती मान्य करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ९ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ९ :—** श्रीमती वैशाली वामन काथार, कनिष्ठ लिपिक, यांना औरंगाबाद महानगरपालिका कायम स्वरूपी सामावून घेण्यास तयार असल्यास उल्हासनगर महानगरपालिकातर्फे मंजुरी देणे

---

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ९:—** श्रीमती वैशाली वामन काथार, कनिष्ठ लिपिक, यांना औरंगाबाद महानगरपालिका कायम स्वरूपी सामावून घेण्यास तयार असल्यास उल्हासनगर महानगरपालिकातर्फे मंजुरी देणे

<u>प्रस्तावना</u>

दिनांक २६ व २७ जुलै २००५ रोजी झालेल्या अतिवृष्टी व त्यामुळे निर्माण झालेल्या पुर परिस्थितीमुळे श्री. वामन बी. काथार, शा अभियंता, उल्हासनगर महानगरपालिकेत प्रतिनियुक्तीवर कार्यरत असंतांना त्यांचे निधन झाल्यामुळे त्यांची पत्नी श्रीमती वैशाली वामन काथार यांना अनुकंपा तत्वावर मा. महासभा ठराव क्र. ७७, दिनांक ८/२/२००६ अनुषंगाने कार्यालयीन आदेश क्र.

उमपा/साप्रवि/आस्था/मुली/१८२, दिनांक २७/२/२००६ अन्वये कनिष्ठ लिपिक या संवर्गातील अस्थायी पदावर अनुकंपा तत्वावर नेमणुक करण्यात आली.

मा. आयुक्त औरंगाबाद महानगरपालिका यांनी श्रीमती वैशाली वामन काथार यांना औरंगाबाद महानगरपालिकेत सामावून घेण्याबाबत कळविले आहे. श्रीमती वैशाली वामन काथार यांनी त्यांचे दिनांक २०/८/२००९ च्या अर्जानुसार त्यांना उल्हासनगर महानगरपालिकेतुन कार्यमुक्त करणेबाबत विनंती अर्ज केलेला आहे. वरील सर्व बाबींचा विचार करता त्यांना उल्हासनगर महानगरपालिकेच्या सेवेतून कार्यमुक्त करणेसाठी महासभेची मंजुरी घेणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने सदर प्रस्ताव मा. महासभेच्या पटलावर मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ५२ <u>दिनांक:—१३/११/२००९</u>

सुचकाचे नाव :— श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

अनुमोदकाचे नाव :— श्री.संजय बठिजा

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे श्रीमती वैशाली वामन काथार, कनिष्ठ लिपिक, यांना औरंगाबाद महानगरपालिका कायम स्वरूपी सामावून घेण्यास तयार असल्यास उल्हासनगर महानगरपालिकातर्फे मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १० वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १० :—** उल्हासनसगर महापालिका अधिकारी/ कर्मचा-यांना वर्ष २००९-२०१० साठी सानुग्रह अनुदान म्हणुन अदा केलेल्या रुपये ६,६६६/- रक्कमेस कार्योत्तर मंजुरी देणे.

---

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>यामध्ये काही कर्मचारी शिल्लक असतील जसे सुवर्ण जयंतीच्या काही महिला आहेत, त्यातील कर्मचा—यांना सुध्दा समाविष्ट केले आहे का? त्यांना समाविष्ट करण्यात यावे. ते महापालिकेचे कर्मचारी आहेत किंवा नाही?

<u>आयुक्त(श्री. अशोक बागेश्वर):—</u>ते शासकिय कर्मचारी असल्याने त्यांना बोनस देणे शक्य होणार नाही.

<u>महापालिका सचिव :—</u>पास?

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>महापौर :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

विषय क्र. १०:– उल्हासनसगर महापालिका अधिकारी/ कर्मचा-यांना वर्ष २००९-२०१० साठी सानुग्रह अनुदान म्हणुन अदा केलेल्या रुपये ६,६६६/- रक्कमेस कार्योत्तर मंजुरी देणे.

<u>प्रस्तावना</u>

सालाबादाप्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेतील सर्व अधिकारी/कर्मचारी यांना सन २००९—२०१० या वित्तीय वषामध्ये महापालिका अधिकारी/कर्मचारी यांना सानुग्रह अनुदान व बोनस मिळणेबाबत महापालिकेतील विविध कर्मचारी संघटना यांचे समवेत मा. आयुक्त यांचे दालनात दिनांक २८/८/२००९ रोजी दुपारी १२.३० वाजता बैठक घेणेत आली.

बैठकीमध्ये सर्वानुमते, सन २००९—२०१० या वित्तीय वर्षामध्ये महापालिका अधिकारी/कर्मचारी यांना सरसकट व एकरक्कमी रू. ६५००/— अदा करणेबाबत तत्वत: सहमती दर्शविण्यात आली होती. (प्रत सोबत जोडत आहे.)

कर्मचारी संघटने समवेत झालेल्या बैठकीनंतर मा. महापौर यांचे अध्यक्षतेखाली महापौर यांचे दालनामध्ये सर्व गटनेते पदाधिकारी व महापालिका अधिकारी यांची दिनांक ३१ ऑगस्ट २००९ रोजी दुपारी १२.०० वाजता आढावा बैठक घेण्यात आली. सदरहु बैठकीमध्ये पुढील प्रमाणे निर्णय घेणेत आला.

‘‘सर्व कामगाराना दिवाळी सणानिमित्त सानुग्रह अनुदान देण्याबाबत, सर्व गटनेते व अधिकाऱ्याशी चर्चा विनिमय करून आगामी होणाऱ्या विधानसभेच्या निवडणूकीच्या अचारसंहितेचा विचार करता सर्व कामगाराना दिवाळी निमित्त सानुग्रह अनुदान म्हणून रू. ६,६६६/— दिवाळी पुर्वी देण्यात यावे व तशी मंजूरी तद्‌दनंतर महासभेत घेणेबाबत एकमताने निर्णय घेण्यात आले.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे सादर केरणेत येते की,

foRrh; o"kZ 2009&2010 lkBh loZ egkikfydk deZpkÚ;kauk [kkyhy vVh o 'krhZl vf/ku jkgwu lkuqxzg vuqnku [kkyhy izek.ks vnk dj.ksl izLrkfor dj.;kr ;sr vkgs-

१) Lknjps lkuqxzg vuqnku xV ^^v** ^^c** ^^d** o ^^M** e/khy loZ egkikfydk vf/kdkjh@deZpkjh rlsp f'k{k.k eaMGkrhy vf/kdkjh deZpk&;kauk o izfrfu;qDrhojhy loZ vf/kdkjh@deZpkjh ;kauk vuqKs; jkghy-

२) जे कर्मचारी ३१ मार्च २००९ रोजी सेवेत होते आणि ज्यांनी वर्ष २००८—२००९ मध्ये किमान ३० दिवस सेवा केलेली असेल असे कर्मचारी सानुग्रह अनुदान मिळण्यास पात्र राहतील.

३) दिनांक १/४/२००८ ते ३१/३/२००९ या कालावधीत संपूर्ण वर्ष निलंबीत असलेले कर्मचारी सानुग्रह अनुदान मिळण्यास अपात्र असतील.

४) सदर सानुग्रह अनुदान ही प्रत्यक्ष हजर असलेल्या दिवसाच्या प्रमाणात खालील सुत्रानुसार देण्याचे प्रस्तावित आहे.

$$\frac{\text{रूपये ६,६६६/—}}{\text{३६५ दिवस}} \times \text{हजर दिवस}$$

५) कर्मचा—यांच्या सेवा कालावधीचा विचार करता, सर्व प्रकारच्या मंजूर रजा गृहीत धरण्यात याव्यात परंतु विना वेतन रजेचा विचार करण्यात येवू नये.

६) सानुग्रह अनुदान संदर्भामध्ये शासनाने वसुली संदर्भामध्ये निकाल दिल्यास सदर रक्कम एक रक्कमी वसुल करण्यात येईल.

सदर खर्चाची तरतूद वित्तीय वर्ष २००९—२०१० च्या अर्थ संकल्पात सानुग्रह अनुदान या शिर्षाखाली रू. १.६२ कोटी इतकी तरतुद करण्यात आलेली आहे.

mijksDr o"kZ 2009&2010 lkBh lkuqxzg vuqnku Eg.kwu :i;s 6]666@&izfr vf/kdkjh@deZpkjh ;kauk vnk dsysY;k dk;Zokghl ek- egklHksph dk;kZsRrj eatwjh feG.ksckcr izLrkfor-

<u>महासभा ठराव क्र:</u> ५३ <u>दिनांक:—१३/११/२००९</u>

सुचकाचे नाव :— श्री. धनंजय बोडारे

अनुमोदकाचे नाव :— श्री. बी.बी. मोरे

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे उल्हासनसगर महापालिका सर्व अधिका-यांना / कर्मचा-यांना वर्ष २००९-२०१० साठी सानुग्रह अनुदान म्हणुन अदा केलेल्या प्रत्येकी रुपये ६,६६६/- रक्कमेस कार्योत्तर मंजुरी देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. ११ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. ११** :— सन्मुख सदन ही इमारत कोसळून मृत्युमुखी/अपघातग्रस्त झालेल्या नागरीकांचे कुटुंबियास आर्थिक मदत देणे.

---

<u>महापालिका सचिव :—</u>पास?

**यावेळी सदस्या श्रीमती सरोजनी टेकचंदानी, श्रीमती बेबी भोईर हया सभागृहातुन बाहेर गेल्या.**

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर :—</u>एक मिनिट, या इमारतीचा जो उरलेला भाग आहे तो तोडण्यासाठी आपण निविदा काढली आहे का?

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u>मा. आयुक्त साहेब, जे मृत्युमुखी पडलेले लोक आहेत त्यांच्या जवळच्या नातेवाईकांना आर्थिक मदत देण्यासाठी किती रक्कम ठेवली आहे? जे किरकोळ जखमी आहेत त्यांना किती? जे मृत्युमुखी पडले आहेत त्यांच्या नातेवाईकाना किती? गंभीर इजा झाली असेल त्यांना किती?

<u>सदस्य श्री बी. बी. मोरे :—</u> महापालिका सदस्यांनी दयायचे आहेत का?

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u> महानगरपालिका देईल ना? सदस्य कशाला देतील?

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—</u> जे मृत्युमुखी पडले आहेत त्यांच्या नातेवाईकांना एक लाख रुपये व जे जखमी आहेत त्यांना पंचवीस हजार रुपये असे प्रस्तावीत करण्यात येत आहे.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u> जे मृत्युमुखी पडले आहेत त्यांच्या कुटुबींयाना पाच लाख रुपये आर्थिक मदत का नाही?

<u>काही सदस्य :—</u> एक लाख रुपये, एक लाख

सदस्य श्री. प्रशांत धांडे :— ज्यांच्या घरातील कमावती व्यक्ती निधन पावली अशा कुटुबींयांना आपण एक लाख रुपयांची मदत दिली तर एवढयाश्या मदतीने काय होईल?

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):— एक लाख रुपये प्रस्तावित करण्यात येत आहे या बाबत सभागृहाने निर्णय घ्यावा.

सदस्य श्री. रमेश चव्हाण :— मा. आयुक्त साहेब, माझे प्रभागात राहणारी एक महिला ती तेथील डॉक्टर गायकवाड यांच्याकडे कामाला होती तेथे मृत्युमुखी पडली आहे तीची दोन लहान लहान मुले आहेत, त्यामुळे तुम्ही हे पैसे देणार कोणाकडे? तिच्या नवऱ्याकडे देणार की आईकडे देणार? की सासुकडे? याबाबतीत माझे असे मत आहे की, तीची जी दोन लहान मुले आहेत त्यांच्या नावांवर ही रक्कम कायमस्वरुपी ठेवीमध्ये ठेवण्यात यावी.

**यावेळी श्री. किशोर जग्यासी, श्री. महेश सुखरामानी, श्री. अंकुश म्हस्के हे सभागृहातुन बाहेर गेले.**



सदस्य श्री. प्रशांत धांडे :— श्री. चव्हाण साहेब, हे ठिक आहे, परंतु मदतीची रक्कम किती?

सदस्य श्री बी. बी. मोरे :— पाच लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात यावी.

सदस्य श्री. रमेश चव्हाण :— एक लाखात काही होणार नाही.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :— पाच लाख आर्थिक मदत देण्यात यावी.

सदस्य श्री. सतिश चहाळ :— दहा लाख रुपये दिले तरी कमी थोडेच पडणार आहेत?

सदस्य श्री. रमेश चव्हाण :— किमान पाच लाख रुपये तरी दिले पाहिजेत.

आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):— सदरची अनुक्रमे एक लाख रुपये व पचंवीस हजार रुपयांची रक्कम महापौर महोदयांनी घोषित केली होती. त्यामुळे प्रस्तावित करण्यात आली आहे.

सदस्य श्री. प्रशांत धांडे :— आयुक्त साहेब, आजची महागाई लक्षात घेता वस्तुस्थिती पहावी, महागाई वाढलेली आहे, शाळेची फी वाढलेली आहे, दहा रुपये किलो मिळणारे कांदे बटाटे चाळीस रुपये किलो झाले आहेत. यासर्व गोष्टीचा जर आढावा आपण घेतला असेल तर आजच्या तारखेला केवळ एक लाख रुपये ठेवणे कितपत योग्य आहे. अठरा वर्षांनतर त्यांना या अल्पशा रक्कमेतुन काय फायदा मिळणार?

सदस्य श्री. रमेश चव्हाण :— साहेब, एका व्यक्तीच्या मृत्युची किंमत एक लाख रुपये?

सदस्य श्री बी. बी. मोरे :— एखादा माणुस मरतो त्यांची किंमत काय एक लाख रुपये?

सदस्य श्री. प्रशांत धांडे :— साहेब, जी व्यक्ती निधन पावली आहे तिला एक मुलगा व एक मुलगी आहे आणि ती मुलगी अठरा वर्ष वयाची झाल्यानंतर जेव्हा ती लग्नास उभी राहील तेव्हा हे एक लाख रुपये पुरतील का?

सदस्य श्री बी. बी. मोरे :— आयुक्त साहेब, पाच लाख रुपये मंजुर करा.

सदस्य श्री जीवन इदनानी :— अहो महापौर महोदया, उप—महापौर साहेब, आणि आयुक्त साहेब कमीत कमी पाच लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर करा.

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—</u> सदरची रक्कम प्रस्तावित केलेली आहे. अतिंम निर्णय आपण घ्यायचा आहे. आपणांस विनंती करतो की आपणांस जे काही योग्य वाटेल त्याप्रमाणे निर्णय घ्यावा.

<u>सदस्य श्री. सतिश चहाळ :—</u> कमीत कमी पाच लाख रुपये देऊन टाकावेत.

<u>आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, सा.बा.वि.):—</u> मा. महापौरजी, सन्मा. सदस्य श्री. राजेंद्रसिंह भुल्लर महाराज यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत माहिती देतो की, सन्मुख सदन ही इमारत तोडण्यासाठी महापालिकेने अद्यापपर्यंत कोणतीही निविदा काढलेली नाही.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिह भुल्लर :—</u> निविदा काढली तर, पैसे देण्याची गरज नाही? महानगरपालिकेचे नुकसान होता कामा नये. अशाप्रकारे बरेसचे लोक आहेत की जे अशी बाधंकामे तोडुन आपणांस पैसे देवुन जातील, पैसे घेवुन जाणार नाहीत. आपणांस त्यांना पैसे दयावे लागणार नाहीत. ते किती रक्कम देवुन जातील याबाबत त्या निविदेत अटीशर्ती टाकल्या पाहिजेत.

<u>आर.बी. शिर्के (कार्यकारी अभियंता, सा.बा.वि.):—</u> याबाबत अभ्यास करु.

<u>सदस्य श्री. राजेंद्रसिह भुल्लर :—</u> होय, याबाबत अभ्यास करा.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u> साहेब, आर्थिक मदतीची रक्कम अद्याप आपण निश्चित केली नाहीत?

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u> महापौर महोदया, त्या दुर्घनेत निधन पावलेल्या व्यक्तीच्या कुटुबींयांना पाच लाख रुपये आर्थिक मदत जाहीर करावी अशी मी तुम्हाला विनंती करतो.

<u>सदस्य श्री. प्रशांत धांडे :—</u> आर्थिक मदत देण्याबाबतीत आम्ही जबरदस्ती केली नसती परंतु आजकालचा महागाईचा काळ लक्षात घेता आपण यावर विचार करु शकता. आणि एक लाख रुपयांची रक्कम अतिशय कमी असुन सभागृहाची अशी धारणा आहे की पाच लाख करावी.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे:—</u> सभागृहाची एक अशी भावना आहे की, पाच लाख रुपये आर्थिक मदत जाहिर करावी व यापुढे दुर्देवाने जर अशी काही घटना घडली तर, त्यांच्यासाठी पाच लाख रुपये देण्याकामी कायम स्वरुपीचा हा ठराव पारीत करा. मग ती दुर्घटना कुठलीही असुदया प्रत्येकाला पाच लाख रुपये दयावेत असे मी प्रस्तावित करतो.

<u>सदस्य श्री. जीवन इदनानी :—</u> संपुर्ण सभागृहाचे हेच मत आहे,

<u>सदस्य श्री. प्रशांत धाडे:—</u> आपण ९९ वर्षासाठी बोट क्लब लीजवर देतो, हे तर मृत्युमुखी पडले आहेत त्यांच्या कुटुबींयाना मानवतेच्या दृष्टीकोनातुन पाच लाख रुपये आर्थिक मदत देण्यात यावी अशी मी मा. महापौर, उप महापौर, आयुक्त यांना विनंती करतो. माणुसकीच्या दृष्टीकोनातुन पाहिले तर एखादया माणसांच्या मृत्युची किंमत आपण पाच लाख रुपये करु शकत नाहीत परंतु या सभागृहाला विनंती आहे की सर्व सन्मा. सदस्य, आयुक्त, मा. महापौर, मा. उप महापौर, यांना विनंती आहे की, आपण जर पाच लाख रुपये केले तर त्या गरिबां घरची मुलगी अठरा वर्ष नंतर जेव्हा लग्नाला येईल तेव्हा ती रक्कम काहीतरी कामाला येईल, आणि या मदतीमुळे त्याचे शिक्षण सुध्दा होईल आज शिक्षण महाग झाले आहे. शिक्षणासाठी देखील हे पैसे कामाला येतील. मा. आयुक्त साहेब, आणखी एक चांगला मुदद्‌ा सुचवितो, यानंतर आता अशा काही घटनेसाठी बजेटमध्ये या गोष्टीची तरतुद करुन ठेवुया एक दहा लाखाची अर्थसंकल्पात तरतुद करुन ठेवुया, जेवढी पाहिजे तेवढी आपण तरतुद करुन ठेवु या. भविष्यात अश्या दुर्घटनेत कुण्या एकाचा मृत्यु झाला तर या तरतुदी मधुन आपण पैसे देवु शकु.

<u>आयुक्त (श्री. अशोक बागेश्वर):—</u> सन्मा. महापौर महोदया, आपण लोंकाचे प्राण वाचविण्यासाठी आहोत, हा अपघात आहे, या अपघातात काय मदत देण्यासाठी असेल त्याबाबतीत तुम्ही निर्णय घ्या.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :—</u> आयुक्त साहेब, माझी तुम्हाला पुन्हा एकदा विनंती आहे.

<u>सदस्य श्री बी. बी. मोरे :–</u> विद्युत विभागामध्ये काम करणारे श्री. ससाणे नावाचे इसम कर्तव्य बजावत असताना मृत्युमुखी पडले आहेत, आणि आर्थिक मदत देण्याचा जर विषय असेल तर या सर्वांना सारखीच मदत देण्यात यावी.

<u>काही सदस्य :–</u> त्याबाबतचा विषय यानंतर आहे.

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u> आयुक्त साहेब, पुन्हा एकदा विनंती आहे की, तुम्ही पुढाकार घ्यावा. त्यांच्या नातेवाईकाच्या कुणाच्या हातात पैसे गेले नाही पाहिजेत.

<u>सदस्य श्री. रविंद्र बागुलः–</u>उप–महापौर साहेब या महिन्यात किती इमारती पडलेल्या आहेत? त्यामध्ये किती मृत्युमुखी पडले आहेत?

<u>सदस्य श्री. रमेश चव्हाण :–</u>महापौर महोदया, उप–महापौर साहेब स्पष्ट करा.

<u>उप–महापौर :–</u>सर्व सदस्यांच्या भावना लक्षात घेवुन मी महापौरांच्या वतीने आयुक्त साहेबांना विनंती करतो की, त्या लोंकाना पाच लाख रुपये देण्याची कृपा करावी.

<u>सदस्य श्री. प्रशांत धाडेः–</u> धन्यवाद, आभारी आहे.

<u>महापालिका सचिवः–</u> जखमी लोकांना किती? पंचवीस हजार?

<u>काही सदस्य :–</u> पचंवीस हजार?

<u>सदस्य श्री. बी.बी.मोरेः–</u> पन्नास हजार?

<u>काही सदस्यः–</u>पंचविस हजार...

<u>महापालिका सचिवः–</u> पंचविस हजार ठिक आहे?

<u>काही सदस्य :–</u>पास–पास......

<u>महापौर :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. ११ :–** सन्मुख सदन ही इमारत कोसळून मृत्युमुखी/अपघातग्रस्त झालेल्या नागरीकांचे कुटुंबियास आर्थिक मदत देणे.

<u>प्रस्तावना</u>

बुधवार दिनांक २८/१०/२००९ रोजी दुपारी २.४५ च्या सुमारास नेहरु चौक परिसरामधील सन्मुख सदन ही पाच मजली इमारत कोसळून मृत्युमुखी/अपघातग्रस्त झालेल्या नागरीकांचे कुटुंबियास उल्हासनगर शहराचे मा. महापौर श्रीमती विद्याताई निर्मळे व मा. आमदार श्री. कुमार आयलानी यांनी आर्थिक मदत देण्याचे प्रसारमाध्यमांसमोर जाहिर केले आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६६ (३९) मधील तरतुदीनुसार ''शहरातील जनतेवर ओढवलेली कोणतीही आपत्ती दूर करण्यासाठी उपाययोजना करणे'' असे नमुद केले आहे. अपघातग्रस्त कुटुंबियांवर ओढावलेला दुःखद प्रसंग विचारात घेवून विशेष बाब म्हणून मृत्युमुखी पडलेल्या प्रत्येक नागरीकांचे कुटुंबियास आर्थिक मदत म्हणून रुपये १ लाख व सदर अपघातामध्ये दुखापत झालेल्या नागरीकांना रुपये २५ हजार इतकी आर्थिक मदत मिळावी असे प्रस्तावित करीत आहे.

असे प्रस्तावित मा. महासभा पटलावर मान्यतेसाठी सादर करीत आहे.

महासभा ठराव क्र: ५४ दिनांक:–१३/११/२००९

सुचकाचे नाव :– श्री. प्रशांत धांडे

अनुमोदकाचे नाव :– श्री. रमेश चव्हाण

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार सन्मुख सदन ही इमारत कोसळल्याने मृत्युमुखी पडलेल्या प्रत्येक नागरीकांचे कुटुंबियास रु. ५ लाख व दूखापत झालेल्या प्रत्येक नागरीकास रु. ५० हजार आर्थिक मदत देणे मान्य करीत आहे.

तसेच यापुढे अशा प्रकारच्या दुर्घटनांमध्ये मृत्युमुखी पडणा-या नागरीकांचे कुटुंबियास रु. ५ लाख व दुखापत झालेल्या प्रत्येक नागरीकास रु. ५० हजार आर्थिक मदत देणे मान्य करीत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :– विषय क्र. १२ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १२** :– महापालिकेच्या विदयुत अभियांत्रिकी विभागातील सर्व तांत्रिक कर्मचा-यांचा प्रत्येकी रुपये ५ लाखाचा विमा उतरविण्यास मान्यता देणे.

---

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:– मा. महापौरजी हा विषय पारित केला जावा व पुढील महासभेत जे फायरब्रिगेडचे कर्मचारी आहेत त्याच्यासाठी सुध्दा असा विषय आणला जावा.

सदस्य श्री. राजेश वधारीया:– हे पहा ठाणे महानगरपालिकेचे अग्निशमन विभागाचे सहा कर्मचारी इमारतींची आग विझविण्यासाठी गेले असतांना तेथे त्यांचा मृत्यु झाला. तर विद्युत विभागाचे कर्मचारी व अग्निशमन विभागाचे कर्मचा–यांचा विमा उतरविला पाहिजे. या ठरावात सुध्दा आपण अग्निशमन विभागाच्या कर्मचाऱ्यांविषयी विमा उतरविण्याचा विषय नमुद करु.

महापालिका सचिव :– काय करायचे?

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:– यामध्ये असे नमुद करता येऊ शकते...........

उपमहापौर :– फायर व विद्युत विभागाचे कर्मचारी यांना या सुविधा देता येऊ शकतील.

सदस्य श्री. सतिश चहाळ:– महापौर महोदया, उप महापौर साहेब, मी आपणांस विनंती करतो की, अतिक्रमण विभागाचे जे कर्मचारी इमारत तोडण्यासाठी जातात त्यांना सुध्दा काही ठिकाणी इजा होण्याची शक्यता असते त्यांचा सुध्दा विमा काढण्यासाठी विचार करावा.

महापालिका सचिव :– पास? अतिक्रमणचा नाही फक्त विद्युत आणि फायरसाठी.

काही सदस्य :—पास—पास......

महापौर :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

**विषय क्र. १२:**— महापालिकेच्या विदयुत अभियांत्रिकी विभागातील सर्व तांत्रिक कर्मचा-यांचा प्रत्येकी रुपये ५ लाखाचा विमा उतरविण्यास मान्यता देणे.

प्रस्तावना

दिनांक ८/९/२००९ रोजी विदयुत अभियांत्रिकी विभागातील कर्मचारी श्री. भिमा ससाणे, तारतंत्री यांचे कार्यालयीन वेळेत कर्तव्य बजावत असतांना दुपारी १२.४५ वाजता विदयुत धक्का बसल्यामुळे त्वरीत मध्यवर्ती रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरने तेथे त्यांना मयत घोषित केले.

सदरचा प्रकार हा अत्यंत दु:खदायक आहे व अशाप्रकारचा प्राणघातक अपघात कधीही कोणावरही ओढचु शकतो. विदयुत अभियांत्रिकी विभागातील कार्यरत सर्व तांत्रिक कर्मचारी उदा. कार्यकारी अभियंता (विदयुत), कनिष्ठ अभियंता (विदयुत) (विदयुत पर्यवेक्षक), विजतंत्री, तारतंत्री, मदतनीस (विदयुत) मजूर व वाहनचालक इत्यादी यांच्याबाबतीत कार्यालयीन वेळेत कर्तव्य बजावत असतांना प्राणघातक अपघात झाला असता अशावेळेस त्यांच्या कुटुंबियांना आधार देणे गरजेचे आहे.

विदयुत अभियांत्रिकी विभागातील कार्यरत सर्व तांत्रिक कर्मचा—यांच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने उपाययोजना म्हणून व त्यांच्या कुटुंबियांना मदत म्हणून महापालिकेतर्फे प्रत्येकी रुपये ५ लाखाचा विमा काढण्याबाबतचा प्रस्ताव मा. महासभेपूढे मान्यतेसाठी सविनय सादर करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: ५५ दिनांक:—१३/११/२००९

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. सतिश चहाळ

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे महापालिकेच्या विदयुत अभियांत्रिकी विभागातील सर्व पात्र तांत्रिक अधिका-यांचा / कर्मचा-यांचा महापालिकेतर्फे प्रत्येकी रुपये ५ लाखाचा विमा उतरविण्यास मान्यता देत आहे.

याच बरोबर अग्निशमन विभागातील सर्व अधिकारी व कर्मचा-यांचाही महापालिकेतर्फे प्रत्येकी रु. ५ लाखाचा विमा उतरविण्यास मान्यता देत आहे. .

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

महापालिका सचिव :— विषय क्र. १३ वाचुन दाखवितात

**विषय क्र. १३** :— महापालिकेच्या विदयुत अभियांत्रिकी विभागातील दिवंगत कर्मचारी श्री. भिमा ससाणे, यांचे वारसास दरमहा रुपये ७,०००/- ठोक पगारावर नियुक्ती देणे.

काही सदस्य :—पास—पास......

<u>महापौर :—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

**विषय क्र. १३** :— महापालिकेच्या विदयुत अभियांत्रिकी विभागातील दिवंगत कर्मचारी श्री. भिमा ससाणे, यांचे वारसास दरमहा रुपये ७,०००/- ठोक पगारावर नियुक्ती देणे.

<u>प्रस्तावना</u>

दिनांक ८/९/२००९ रोजी विदयुत अभियांत्रिकी विभागातील कर्मचारी श्री. भिमा ससाणे, तारतंत्री यांना कार्यालयीन वेळेत कर्तव्य बजावत असतांना दुपारी १२.४५ वाजता विदयुत धक्का बसल्यामुळे त्वरीत मध्यवर्ती रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरने तेथे त्यांना मयत घोषित केले.

सदरचा प्रकार हा अत्यंत दु:खदायक असल्यामुळे त्यांच्या कुटुंबियांना आधार देणे गरजेचे आहे. दिवंगत श्री. भिमा ससाणे, तारतंत्री यांच्या वारसास विशेष बाब म्हणून अनुकंपा तत्वाने महापालिका सेवेत तात्काळ सामावून घेण्यात यावे व जोपर्यंत कार्यवाही पूर्ण होत नाही तोपर्यंत त्यांच्या वारसाला त्वरीत दरमहा रुपये ७,०००/— ठोक पगारावर मदतनीस म्हणून रुजु करुन घेणेबाबतचा प्रस्ताव मा. महासभेपूढे मान्यतेसाठी सविनय सादर करण्यात येत आहे.

<u>महासभा ठराव क्र:</u> ५६ <u>दिनांक:—१३/११/२००९</u>

सुचकाचे नाव :— श्री. चंद्रशेखर यादव

अनुमोदकाचे नाव :— श्री. विजय सुपाळे

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार महापालिकेच्या विदयुत अभियांत्रिकी विभागातील दिवंगत कर्मचारी श्री. भिमा ससाणे, तारतंत्री यांचे कर्तव्य बजावतांना निधन झाल्याने त्यांच्या पात्र वारसास विशेष बाब म्हणून अनुकंपा तत्वाने महापालिका सेवेत तात्काळ सामावून घेण्यात यावे व जोपर्यंत कार्यवाही पूर्ण होत नाही तोपर्यंत त्यांच्या वारसाला त्वरीत दरमहा रुपये ७,०००/— ठोक पगारावर मदतनीस म्हणून नियुक्ती देणेस मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

<u>सर्वानुमते</u>

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्र. १४ वाचुन दाखवितात

---

**विषय क्र. १४** :— विदयुत अभियांत्रिकी विभागातील कर्तव्य बजावत असतांना मृत्यु पावलेल्या श्री भिमा ससाणे यांच्या कुटुंबियास आर्थिक मदत देणे.

---

**सदस्य बी.बी. मोरे:—** सन्मा. महापौरजी, मी आता मघाशीच बोललो की, कामावर असतांना त्याचा मृत्यु झाला आहे तेव्हा त्यांना देखील हा नियम लागु करावा पाच लाख रुपये त्यांना सुध्दा देण्यात यावे.

**महापालिका सचिव :—** पाच लाख? पास?

**काही सदस्य :—**पास—पास......

**महापौर :—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र. १४:—** विदयुत अभियांत्रिकी विभागातील कर्तव्य बजावत असतांना मृत्यु पावलेल्या श्री भिमा ससाणे यांच्या कुटुंबियास आर्थिक मदत देणे.

**प्रस्तावना**

कै. भिमा ससाणे, तारतंत्री यांचा मगळवार दिनांक ८/९/२००९ रोजी कर्तव्य बजावत असतांना विजेचा धक्का बसल्याने दुपारी १२.४५ वाजता अपघाती मृत्यू झाला आहे. त्यांच्या कुटुंबियास आर्थिक मदत म्हणून रुपये ५ लाख इतकी मदत मिळावी अशी टिप्पणी विदयुत विभागामार्फत निवेदन केले आहे.
वर नमुद केल्याप्रमाणे कै. भिमा ससाणे यांचे कुटुंबियांवर ओढावलेला दु:खद प्रसंग विचारात घेवून विशष बाब म्हणून त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६६ (१८) मधील तरतुदीनुसार आर्थिक मदत करणे प्रस्तावित करीत आहे. महानगरपालिकेचे सन २००९—१० करीताचे अंदाजपत्रकामधील इ संकिर्ण ;ग्टप्द्ध अन्वये रुपये १०,००,०००/— (दहा लाख) इतकी आर्थिक तरतुद असून कै. भिमा ससाणे यांचे कुटुंबियास मानवतेच्या दृष्टीकोनातून आर्थिक मदत म्हणून रुपये ५,००,०००/— देणेबाबतचा प्रस्ताव मा. महासभा पटलावर मान्यतेसाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**महासभा ठराव क्र:** ५७ **दिनांक:—१३/११/२००९**

सुचकाचे नाव :— श्री.बी.बी. मोरे

अनुमोदकाचे नाव :— श्री. नरेंद्रकुमार ठाकुर

ही महासभा वरील प्रस्तावने अनुसार विदयुत अभियांत्रिकी विभागातील कर्तव्य बजावत असतांना मृत्यु पावलेल्या श्री भिमा ससाणे यांच्या कुटुंबियास रु. ५ लाख आर्थिक मदत देणे मान्य करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

**सर्वानुमते**

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :—** विषय क्र. १५ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १५ :—** उल्हासनगर शहरात वस्तु ठेवणे आणि धंदे व व्यवसाय करण्यासाठी परवान्या संबंधी प्रारूप उपविधी व नियमावली कामी अंतिम मान्यता देणे.

---

<u>महापालिका सचिव :–</u> वगळायचा का?

<u>काही सदस्य :–</u>हो.

<u>महापौर :–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑

**विषय क्र.** १५:– उल्हासनगर शहरात वस्तु ठेवणे आणि धंदे व व्यवसाय करण्यासाठी परवान्या संबंधी प्रारूप उपविधी व नियमावली कामी अंतिम मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात अनेक प्रकारचे व्यवसाय चालविण्याकरिता व इतर प्रयोजनांकरिता व्यवसाय धारकांकडून विवक्षीत वस्तुंची साठवणूक करण्यात येते. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३७६, ३८३ व ३८६ नुसार आयुक्तांना दिलेल्या अटी व शर्तीनुसार आणि त्यास अनुसरून कोणत्याही नियमात विर्निदिष्ट केलेल्या कोणत्याही वस्तु कोणत्याही जागेत किंवा जागेवर परवान्यांशिवाय ठेवता येणार नाहीत.

आसपासच्या इतर महानगरपालिकांचे सदर विषयासंबंधीचे उपविधी पडताळून अधिनियमाचे कलम ४५८(२०) ४५५ प्रमाणे उल्हासनगर महानगरपालिकेसाठी नव्याने नियम व उपविधी तयार करण्यात आले असून सदर विषयी वस्तु व व्यापार साठवणूकीसंबंधी संपूर्ण माहिती तसेच जागा वापरासंबंधी प्रारूप उपविधी व नियमावली तयार केलेली आहे.

सदर उपविधी व नियमावलीस महासभा ठराव क्र. १११ दिनांक १९/१२२२००३ नुसार प्राथमिक मंजुरी मिळाली होती. त्यानुसार ठरावात नमुद केल्याप्रमाणे स्थानिक वर्तमान पत्रांमध्ये उपविधी व प्रारूप निमावलीस आवश्यक ती प्रसिध्दी देवून दिनांक ३१/०१/२००४ अखेर सुचना व हरकती मागविल्या होत्या. तसेच प्रस्तृत प्रारूप उप विधीस महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्दी देण्यात आली होती. व जनतेच्या अवलोकनासाठी खुली ठेवली होती. तथापी वरिल मुदतीत कोणचे सुचना व हरकती प्राप्त झाल्या नाहीत.

सदर उपविधी अंतिम मंजुरीकरिता राज्य शासनाकडे पाठविण्या अगोदर महासभेसमोर अंतिम मंजुरीला प्रस्तावित करणे आवश्यक असल्याने महासभेपूढे प्रस्तावित करण्यात आले. परंतु महासभ ठराव क्र. १६ दिनांक १९/५/२००४ नुसार शासनाच्या मंजुरीस अधिन राहून उल्हासनगर शहरात वस्तु ठेवणेसाठी धंदे व व्यवसाय करणेसाठीचे परवान्यासंबंधी प्रारूप उपविधी व प्रारूप नियमावलीस अंतिम मान्यता दिलेली नाही.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(१०) अन्वये उपद्रवकारक व धोकादायक उदयोग किंवा प्रयोगयांचे नियमन व उशमन करणे हे महानगरपालिकेच्या आवश्यक कर्तव्यात समाविष्ट आहे. कायदयाने महानगरपालिकेवर लादलेल्या या कर्तव्याच्या पालनासाठी वरील उपविधी करून त्यांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. त्यामुळे शहरातील उदयोग व्यवसायाचे नियमन व सार्वजनिक आरोग्य व सुरक्षितता या बाबी साध्य होवू शकणार आहे. तसेच या उपविधी अंमलात आणल्यास महानगरपालिकेस निश्चित स्वरूपाचे उपत्पन्न प्राप्त होऊ शकणार आहे. या बाबी विचारात घेवून महापालिकेने महासभा ठराव क्र. १६ दिनांक १९/५/२००४ नुसार घेतलेल्या निर्णयाचा फेरविचार करण्यासाठीचा प्रस्ताव महासभेसमोर पुनर्विचारार्थ ठेवण्यात आला होता.

तथापी महासभा ठराव क्र. ३१ अ दिनांक २९/६/२००७ अन्वये पुर्विचा महासभा ठराव क्र. १६ दिनांक १९/५/२००४ व ठराव क्र. १०० दिनांक २०/३/२००६ मध्ये बदल करून उल्हासनगर शहरात वस्तु ठेवणे आणि धंदे व व्यवसाय करण्यासाठी

परवान्यासंबधी प्रस्तावित शुल्क, प्रारूप उपविधी व नियमावलीस अंतिम करण्याचा प्रस्ताव सविस्तर माहिती अभावि सभेच्या कामकाजातून वगळण्यात आला होता.

सबब,उल्हासनगर शहरात वस्तु ठेवणे आणि धंदे व व्यवसाय करण्यासबंधी प्रारूप उपविधी व प्रारूप नियमावली सविस्तर प्रस्ताव सोबत जोडलेला असून अंतिम मान्यतेकरिता मा. महासभेसमोर पुर्नप्रस्तावित करण्यात येत आहे.

महासभा ठराव क्र: ५७ अ दिनांक:—१३/११/२००९

सुचकाचे नाव :— श्री. जीवन इदनानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. प्रधान पाटील

ही महासभा उल्हासनगर शहरात वस्तु ठेवणे आणि धंदे व व्यवसाय करण्यासाठी परवान्या संबंधी प्रारूप उपविधी व नियमावली कामी अंतिम मान्यता देणे बाबतचा विषय सविस्तर माहिती अभावी या सभेच्या कामकाजातुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. १६ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र. १६** :— सन्मुख सदन इमारत कोसळल्याने बेघर झालेल्या लोकांना महापालिका निहित इमारतींमध्ये तात्पुरता जागा वापर परवाना देणे.

---

काही सदस्य:— दोन्ही इमारतीतील नाही.

महापालिका सचिव :— यांचे म्हणणे आहे की, दोन्ही इमारतीतील बेघरवाशियांना जागा देता येवू शकत नाही.

सदस्य श्री. धनंजय बोडारे:— गुडमॅन आणि सन्मुख सदन, सन्मुख सदनची सुध्दा तीच अवस्था आहे तर या प्रस्तावात दोघांची तरतुद करा.

आयक्त (श्री. अशोक बागेश्वर):— गुडमॅन कॉटेजचे काम चालु झालेले आहे.

सदस्य श्री. धनंजय बोडारे:— दोन्ही इमारतीतील रहिवाश्यांची व्यवस्था करा.

सदस्य श्री. सतिश चहाळ:— दोन्ही इमारतीतील रहिवाश्यांची व्यवस्था करावी लागेल ना?

महापालिका सचिव :— पास? सन्मुख सदन व गुडमॅन कॉटेज दोन्हीही?

काही सदस्य :—पास—पास.....

महापौर :— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

**विषय क्र. १६:—** सन्मुख सदन इमारत कोसळल्याने बेघर झालेल्या लोकांना महापालिका निहित इमारतींमध्ये तात्पुरता जागा वापर परवाना देणे.

प्रस्तावना

उल्हासनगर शहरामध्ये जीर्ण झालेल्या व जुन्या इमारती वेळेत दुरुस्ती न केल्याने धोकादायक होवून पडत आहेत. गुडमॅन कॉटेज हया इमारतीत निष्कृष्ट दर्जाचे साहित्य वापरल्याने ती इमारत पूर्णपणे कोसळली. तत्पूर्वी सदर इमारतीमधील रहिवाश्यांना वेळेत बाहेर काढणे शक्य झाल्याने जिवितहानी टहली. परंतू त्यामधील वास्तव्य करीत असलेले रहिवाशी बेघर झाले.

गुडमॅन कॉटेज या इमारतीमधील बेघर झालेल्या रहिवाश्यांना आर्थिक मदत देण्यात आली असून त्यांच्या तात्पुरत्या निवासासाठी सोय करणेकरीता समावेशक आरक्षण शासन निर्णय अन्वये आरक्षणातील मालकी हक्क (सनद) असलेल्या जागेत २५ टक्के महानगरपालिकेस दयावयाच्या क्षेत्रांतर्गत देण्यात आलेल्या बांधकाम परवानगीपैकी खालील २ ठिकाणी बांधकाम क्षेत्र ताब्यात घेतलेले आहे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | श्री. सुनिल राजवानी व इतर | प्लॉट नं. १४/२५ ते १४/२८, शिट नं. ४९, उल्हासनगर—३ | बांधकाम परवानगी क्र. १९/००/७८९, दिनांक १९/८/२००३ | सदर जागा मालमत्ता विभागाने ताब्यात घेतलेली आहे. |
| २) | श्री. चंदर अहुजा व श्री. विनोद पंजाबी | यु.नं. ७६ (भा), प्लाट नं. १४/२४ (भा), शिट नं. ४९, उल्हासनगर—३ | ८९/०३/१२८ दिनांक १९/७/२००५ | सदर जागा मालमत्ता विभागाने दिनांक ७/२/२००८ रोजी ताब्यात घेतलेली आहे. |

यामध्ये गुडमॅन कॉटेज मधील बेघर झालेल्या रहिवाशांना त्यांची इमारत पूर्ण बांधून होत नाही तोपर्यंत तात्पुरत्या निवासासाठी सोय करणेचे विचाराधीन आहे. याबाबतचा प्रस्ताव मा. महासभेसमोर चर्चा व विचार विनिमयार्थ सादर.

महासभा ठराव क्र: ५८ दिनांक:—१३/११/२००९

सुचकाचे नाव :— श्री. जीवन इदनानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. प्रधान पाटील

ही महासभा वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे सन्मुख सदन व गुडमॅन कॉटेज या इमारती कोसळल्याने बेघर झालेल्या रहिवाश्यांना तात्पुरत्या निवासासाठी समावेशक आरक्षणाच्या माध्यमातून महापालिकेने ताब्यात घेतलेल्या २५ टक्के बांधकाम क्षेत्रातील वर उल्लेख केलेल्या इमारतींमध्ये तात्पुरता जागा वापर परवाना देण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

महापौर / पीठासीन अधिकारी
सर्वसाधारण महासभा
उल्हासनगर महानगरपालिका

महापालिका सचिव :—कृपया राष्ट्रगिताकडे लक्ष दयावे.

जनगणमन या राष्ट्रगीताच्या सामुहिक गायनानंतर सायंकाळी ७.१० वाजता महापौर श्रीमती निर्मले विद्या विजय यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:—४/१२/२००९

## उल्हासनगर महानगरपालिकेच्या दि. ४/१२/२००९ रोजीच्या सर्वसाधारण महासभेचे इतिवृत्त.

7

उल्हासनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण महासभा शुक्रवार दिनांक ४/१२/२००९ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभेत **श्री. सुभाष सोनवणे, जिल्हाधिकारी, रायगड (अलिबाग)** हे पीठासीन अधिकारी या स्थानी आसनस्थ होते. व खाली दर्शविलेले सन्माननिय सदस्य/सदस्या उपस्थित होते / होत्या.

१ महापौर —— श्रीमती निर्मले विद्या विजय

२ उप—महापौर —— श्री. ठाकूर विनोद लालसिंग

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर | ४० | श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा |
| ४ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील | ४१ | श्रीमती वेलकर सुरेखा राजन |
| ५ | श्री. गायकवाड दिलीप | ४२ | श्रीमती महाडीक रजनी मोहन |
| ६ | श्रीमती संगीता राजेश कंडारे | ४३ | श्री. कुमार उत्तमचंद आयलानी |
| ७ | श्री. रविंद्र दशरथ बागूल | ४४ | श्री. लालबिहारी बुझारत यादव |
| ८ | श्री. रामसागर जनार्दन यादव | ४५ | श्रीमती पंचशिला नाना पवार |
| ९ | श्रीमती निलम प्रेमसिंग रावत | ४६ | श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी |
| १० | श्री. मोरे भानजी भिकारी | ४७ | श्रीमती करोतीया मालती राधाचरण |
| ११ | श्री. दत्तात्रय नारायण पवार | ४८ | श्री. मंगतानी सुंदर आसनदास |
| १२ | श्रीमती चौधरी राजश्री राजेंद्र | ४९ | श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण |
| १३ | श्री. विजय खंडु सुपाळे | ५० | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| १४ | श्री. अंकुश निवृत्ती म्हस्के | ५१ | श्रीमती बोडारे वसुधा धनंजय |
| १५ | श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान | ५२ | कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल |
| १६ | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी | ५३ | श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे |
| १७ | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज) | ५४ | श्री. शेखर केशव यादव |

| | | | |
|---|---|---|---|
| १८ | श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी | ५५ | श्री. सुरेश मधुकर जाधव |
| १९ | श्रीमती सुजाता रमेश रिझवानी | ५६ | श्रीमती सुमन गजानन शेळके |
| २० | श्री. पुरसवाणी जमनादास खुबचंद | ५७ | श्री. प्रशांत किसनराव धांडे |
| २१ | श्री. राजू जग्यासी | ५८ | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| २२ | श्री. राम (चार्ली) पारवानी | ५९ | श्रीमती मनसुलकर शिला सुभाष |
| २३ | श्री. हरेश परमानंद जग्यासी | ६० | श्री. किशोर जग्यासी |
| २४ | श्रीमती जया प्रकाश माखीजा | ६१ | श्रीमती चेनानी ज्योती रमेश |
| २५ | श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी | ६२ | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड |
| २६ | डॉ. (श्रीमती) निना प्रकाश नाथानी | ६३ | श्रीमती ज्योती शाम माने |
| २७ | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार (कुमारी)केवलराम | ६४ | श्रीमती लता शांताराम निकम |
| २८ | श्री. भठीजा (बब्बु) संजय | ६५ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| २९ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे | ६६ | श्री. मोहन साधवाणी |
| ३० | श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा | ६७ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| ३१ | श्री. लाल पंजाबी | ६८ | श्री. बच्चाराम रूपचंदानी |
| ३२ | श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास | ६९ | श्रीमती मीना सोनेजी (सोंडे) |
| ३३ | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती | ७० | श्रीमती वनवारी मोना अशोक |
| ३४ | श्रीमती शकुंतला पाटील | ७१ | श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई) |
| ३५ | श्री. मोहन (गारो) रामरख्यानी | ७२ | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी |
| ३६ | श्री. सुखरामानी महेश पहलाजराय | ७३ | श्री. मुकेश सोहन तेजी |
| ३७ | ॲड. श्री. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी | ७४ | श्री. पाटील प्रधान धर्मा |
| ३८ | श्री. ढोके जनार्दन किसनराव | ७५ | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी, |
| ३९ | श्री. एडके गणपत गोविंद | ७६ | श्री. सुनिल साहेबराव गंगवानी |
| | | ७७ | श्री. प्रकाश गणपत सावंत |

तर

खालील दर्शविलेले सदस्य/सदस्या हे सभेस अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीमती नीलु ठाकुर चांदवाणी, २. श्री. नरेंद्र रामचंद्र राजानी ३. श्री. गोदुमल नारायणदास क्रिष्णानी ४. श्री. राजेश नानीकराम वधारीया

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१ श्री. किरण पाणबुडे, उप विभागीय अधिकारी
२ श्री. अशोककुमार रणखांब, अतिरिक्त आयुक्त
३ श्री. विजयकुमार म्हसाळ, उप—आयुक्त
४ श्री. संजय येनपुरे, पोलिस उप—आयुक्त
५ श्री. प्रकाश कुकरेजा, महापालिका सचिव
६ श्री. दिपक सावंत, उप—आयुक्त
७ श्री. प्रविणकुमार जैन, मुख्य लेखा अधिकारी
८ श्री. जी.टी. जिंदे, वैद्यकीय अधिकारी
९ डॉ. राजा रिझवानी, वैद्यकीय अधिकारी
१० श्री. युवराज भदाणे, जनसंपर्क अधिकारी
११ श्री. चिमनकारे, वाहन विभाग प्रमुख
१२ श्री. भालेराव, पर्यवेक्षक, उपविभागीय कार्यालय

तसेच खालील कर्मचारी सभेस हजर होते.
१. श्री. तानाजी पतंगराव
२. श्रीमती अमिता संखे
३. श्रीमती नर्गिस खान

सर्व प्रथम वंन्देमातरम् म्हणून **सकाळी ११.०० वाजता** सभेची सुरूवात करण्यात आली.

श्री. अशोककुमार रणखांब, अतिरिक्त आयुक्त हे आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ होते.

**महापालिका सचिव :—**महापौर व उपमहापौर या पदासाठी निवडणूक नियमातील नियम ५ अन्वये महापौरांची नेमणूक करण्यासाठी बोलविलेल्या आजच्या या विशेष सभेच्या अध्यक्षस्थानी मा. श्री. सुभाष सोनवणे, जिल्हाधिकारी, रायगड, अलिबाग हे उपस्थित आहेत.

विषय क्र. १ वाचुन दाखवितात.

---

☐ **विषय क्र. १ :—** उल्हासनगर महानगरपालिका निर्वाचीत सदस्यांपैकी एका सदस्याची महापौर
(महिला) या पदी निवड करणे .

---

**श्री. सुभाष सोनवणे (पीठासीन अधिकारी):—महापौर** पदासाठी महापालिका सचिव यांचेकडे **दिनांक** ३०/११/२००९ रोजी ठरवून दिलेल्या वेळेमध्ये ७ नामनिर्देशन अर्ज प्राप्त झाले असून त्यांची नावे अनुक्रमाने पुढीलप्रमाणे आहेत:—

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | सुचकाचे नाव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी | श्री. जीवन इदनानी | श्री. गोविंदराम लुंड |
| २. | श्रीमती चंद्रा राजु टेकचंदानी | श्री. जग्यासी दिलीप | श्री. पवार दत्तात्रय |
| ३ | श्रीमती शेळके सुमन गजानन | श्रीमती निकम लता शांताराम | श्री. ढोके जनार्दन किशन |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | श्रीमती चौधरी राजश्री राजेंद्र | श्री. धनंजय बाबुराव बोडारे | श्री. रमेश महादेव चव्हाण |
| ५ | श्रीमती चौधरी राजश्री राजेंद्र | श्री. विनोद ठाकुर | श्री. मोहन रामरख्यानी |
| ६ | श्रीमती चौधरी राजश्री राजेंद्र | श्री. हरेश पी. जग्यासी | श्री. किशोर जग्यासी |
| ७ | श्रीमती वसुधा धनंजय बोडारे | श्री. दिलीप दशरथ गायकवाड | श्री. मुकेश सोहन तेजी |

महापौर पदाच्या निवडणूकीसंबंधातील महापौर व उपमहापौर पदासाठी निवडणूका नियम ६ (२) अन्वये, मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये, मी सर्व नामनिर्देशनाची छाननी केली आहे. छाननीमध्ये वैध ठरलेल्या उमेदवारांची नावे अनुक्रमाने पुढीलप्रमाणे आहेत:—

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १. | श्रीमती चौधरी राजश्री राजेंद्र |
| २. | श्रीमती टेकचंदानी चंद्रा राजु |
| ३ | श्रीमती बोडारे वसुधा धनंजय |
| ४ | श्रीमती शेळके सुमन गजानन |
| ५ | श्रीमती सिरवानी कविता लक्ष्मणदास |

यावेळेस **सकाळचे ११.०९** मिनिटे झाली आहेत.

वरील ५ उमेदवारांपैकी ज्या उमेदवाराला आपली उमेदवारी मागे घ्यावयाची आहे त्यासाठी १५ मिनिटांचा वेळ देण्यात येत आहे. ज्यांना आपली उमेदवारी मागे घ्यावयाची आहे त्यांना उमेदवारी मागे घेण्याचा विहित नमुन्यामध्ये अर्ज देवून आपली उमेदवारी मागे घेता येईल.

आता **सकाळचे ११.२४** मिनिटे झाली आहेत. उमेदवारी मागे घेण्यासाठी देण्यात आलेली १५ मिनिटांची वेळ संपली आहे असे मी जाहिर करतो. ज्या उमेदवारांनी उमेदवारी मागे घेतली आहे त्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १. | श्रीमती सिरवानी कविता लक्ष्मणदास |
| २. | श्रीमती टेकचंदानी चंद्रा राजु |
| ३ | श्री. बोडारे वसुधा धनंजय |
| ४ | श्रीमती शेळके सुमन गजानन |

दिलेल्या वेळेमध्ये वरील ४ उमेदवारांनी आपली उमेदवारी मागे घेतली आहे.

आता, महापौर पदाच्या एका जागेसाठी खालील **एकमेव** उमेदवार शिल्लक राहिल्या असून मी पुढीलप्रमाणे निकालाची घोषणा करतो.

## निकाल घोषणा

महापालिका सचिवांनी दिनांक २५/११/२००९ रोजी काढलेल्या सभा सूचने अन्वये सर्व सदस्यांना महापौर पदाचा निवडणूक कार्यक्रम कळविण्यांत आला होता. त्या अनुषंगाने दिनांक ३०/११/२००९ रोजी ५ उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले होते. त्यापैकी ४ उमेदवारांनी दिनांक ४/१२/२००९ रोजी विहित

मुदतीत आपले उमेदवारी अर्ज मागे घेतले. त्यामुळे एकमेव उमेदवार **श्रीमती चौधरी राजेंद्र राजश्री** या रिंगणात शिल्लक राहिल्या आहेत.

महापौर पदासाठी एकमेव उमेदवार असून मुंबई प्रांतिक महानगरपालिका ( महापौर आणि उपमहापौर पदासाठी निवडणूका घेणे) नियम २००५ मध्ये नियम ७ (१) अन्वये पीठासीन अधिकारी म्हणून मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये **महापौर** पदाचे उमदेवार ***श्रीमती चौधरी राजश्री राजेंद्र*** या **बिनविरोध** निवडून आल्याचे जाहिर करतो.

दिनांक :—४/१२/२००९ (सुभाष सोनवणे)

जिल्हाधिकारी तथा पीठासीन अधिकारी उल्हासनगर महानगरपालिका

स्थान :— उल्हासनगर महानगरपालिका सभागृह

महापालिका सचिव :—श्रीमती राजश्री चौधरी कृपया आपण मंचावर यावे.

सदस्य श्री. बी.बी. मोरे :—सन्माननिय पीठासीन अधिकारी व सचिव साहेब, मी असे सूचीत करतो की, प्रथा अशी आहे की, जुन्या ज्या महापौर आहेत त्या तेथे बसतील आणि ज्यावेळेस नविन महापौर निवडून येतील त्यावेळेस त्या त्यांना आपले आसनग्रहण करण्यास देतील. व नंतर जुन्या महापौर व्यासपीठावरुन खाली येतील. हॅण्ड ओवर टेक ओव्हर कोणते असते?

महापालिका सचिव :—एक मिनिट, व्यासपीठावर नविन महापौरांचे स्वागत करत आहोत.

सदस्य श्री.बी.बी. मोरे :—जुन्या महापौरांना आपण खाली बसविले आहे हा घोर अपमान आहे. जुन्या महापौरांना व्यासपीठावर बसविले पाहिजे व ज्यावेळेस महापौर निवडून येतील त्यावेळेस हॅण्ड ओवर टेक ओव्हर होईल त्यावेळेस जुन्या महापौर नविन महापौरांना खुर्चीवर बसवतील मग जुन्या महापौर व्यासपीठाच्या खाली येतील. हे बरोबर होत नाही.

महापालिका सचिव :—सन्मानिय सदस्य श्री. बी.बी. मोरे यांना सांगतो की, आता पदग्रहण होत नाही, केवळ निकालाची घोषणा होत आहे. ज्यावेळेस निकालाची घोषणा होते त्यावेळेस दोन्ही महापौर व्यासपीठावर राहतील.

सदस्य श्री. बी.बी. मोरे :—नाही, मला काय म्हणायचे आहे की, पीठासीन अधिकारी तुम्ही आहेत साहेब. ज्यावेळेस एक अधिकारी दुस—या अधिका—यास आपला पदभार देतात त्यावेळेस हॅण्ड ओवर टेक ओवर होते.

श्री. सुभाष सोनवणे (पीठासीन अधिकारी):—एक मिनिट, मी आपल्या माहितीसाठी सांगु इच्छितो की, मी काही पदभार त्यांना देत नव्हतो, मी फक्त निकाल जाहिर केलेला आहे.

**सदस्य श्री.बी.बी. मोरे** :—मी म्हणतो, निकाल जाहिर करायच्या वेळेस आमच्या माजी महापौर त्यावेळेस व्यासपीठावर बसल्या पाहिजे होते. तुमच्या बाजुला त्यांना बसण्यासाठी खुर्ची ठेवा.

**सदस्य श्री. जीवन इदनानी** :—मा. पीठासीन अधिकारी, मी सुध्दा श्री.बी.बी. मोरे यांच्या बोलण्यास समर्थन करतो. मी त्यांच्या मताशी सहमत आहे.

**सदस्य श्री.बी.बी. मोरे** :—साहेब, मी शासकिय सेवेत १६ वर्ष सर्व्हीस केलेली आहे. मला या सर्व गोष्टीची जाणीव आहे.

**महापालिका सचिव** :—विशेष समित्यांच्या निवडणूका झाल्यानंतर आपसात आदलाबदली करता येईल. कृपया लक्ष दया, हा जो नविन नियम आहे त्याप्रमाणे आज सभागृहातील मा. पीठासीन अधिकारी, रायगड हे आहेत, त्यांना आज पीठासीन अधिकारीचे पद ग्रहण करायचे आहे. आजच्या निकालाची घोषणा ते करतील. निकालाची घोषणा झाल्यानंतर ते आपसात आदलाबदली करु शकतात.

विषय क्र. २ वाचुन दाखवितात.

☐ **मा. सदस्या श्रीमती मंजु पोपटानी यांनी सभागृहात प्रवेश केला.**

---

☐ **विषय क्र. २** :— उल्हासनगर महानगरपालिका निर्वाचीत सदस्यांपैकी एका सदस्याची

उप—महापौर या पदी निवड करणे .

---

**श्री. सुभाष सोनवणे (पीठासीन अधिकारी)**:—

**उप—महापौर** पदासाठी महापालिका सचिव यांचेकडे **दिनांक** ३०/११/२००९ रोजी ठरवून दिलेल्या वेळेमध्ये ७ उमेदवारी अर्ज प्राप्त झाले असून त्यांची नावे अनुक्रमाने पुढीलप्रमाणे आहेत:—

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | सुचकाचे नाव | अनुमोदकाचे नाव |
|---|---|---|---|
| १. | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड | श्री. हरेश परमानंद जग्यासी | श्री. दत्तात्रय नारायण पवार |
| २. | श्री. गोविंदराम डोलुमल लुंड | श्री. जीवन चंद्रभान इदनानी | श्री. दिलीपकुमार जग्यासी |
| ३ | श्री. विनोद लालसिंग ठाकुर | श्रीमती निलम प्रेमसिंग रावत | श्री. भजन लक्ष्मणदास रामचंदानी |
| ४ | श्री. अनिल (विद्यार्थी) सी. आयलानी | श्री. सतिश चहाळ | श्री. भारत आर. राजवानी |
| ५ | श्री. जनार्दन किशन ढोके | श्री. भानजी भिकारी मोरे | श्रीमती सुमन गजानन शेळके |
| ६ | श्री. विनोद लालसिंग ठाकुर | श्री. प्रशांत किसनराव धांडे | श्री. पारवानी राम कुटुमल |
| ७ | श्रीमती सुजाता रमेश रिजवानी | श्री. भठिजा संजय रामचंद्र | श्री. बागुल रविंद्र दशरथ |

उप—महापौर पदाच्या निवडणूकीसंबंधातील महापौर व उपमहापौर पदासाठी निवडणूका नियम ६ (२) अन्वये, मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये, मी सर्व नामनिर्देशनाची छाननी केली आहे. छाननीमध्ये वैध ठरलेल्या उमेदवारांची नावे पुढील अनुक्रमाने आहेत:—

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १. | श्री. आयलानी अनिल (विद्यार्थी) सी. |
| २. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग |
| ३ | श्री. ढोके जनार्दन किशन |
| ४ | श्रीमती रिजवानी सुजाता रमेश |
| ५ | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल |

यावेळेस सकाळचे ११.३७ मिनिटे झाली आहेत.

वरील ५ उमेदवारांपैकी ज्या उमेदवाराला आपली उमेदवारी मागे घ्यावयाची आहे त्यासाठी १५ मिनिटांचा वेळ देण्यात येत आहे. ज्यांना आपली उमेदवारी मागे घ्यावयाची आहे त्यांना विहित नमुन्यामध्ये उमेदवारी मागे घेण्याचा अर्ज देवून आपली उमेदवारी मागे घेता येईल.

आता सकाळचे ११.५२ मिनिटे झाली आहेत. उमेदवारी मागे घेण्यासाठी देण्यात आलेली वेळ संपली आहे असे मी जाहिर करतो. ज्या उमेदवारांनी उमेदवारी मागे घेतली आहे त्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १. | श्री. ढोके जनार्दन किशन |
| २. | श्रीमती रिजवानी सुजाता रमेश |
| ३ | श्री. लुंड गोविंदराम डोलुमल |

आता, उप—महापौर पदाच्या एका जागेसाठी खालील **दोन** उमेदवार रिंगणात शिल्लक राहिलेले आहेत आणि ज्यांनी आपली उमेदवारी मागे घेतलेली नाही त्यांची नावे मराठी वर्णानुक्रमाने पुढीलप्रमाणे आहेत :—

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| १. | श्री. आयलानी अनिल (विद्यार्थी) सी. |
| २. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग |

आता, मराठी वर्णानुक्रमाने उप—महापौर पदाचे अनु. क्र. १ आणि २ च्या उमेदवारांची नांवे जाहिर करण्यात आली आहेत. प्रत्येक उमेदवाराच्या बाजूने ज्यांना आपले मत द्यावयाचे आहे त्यांनी आपला हात वर करायचा आहे. उमेदवार निहाय तयार केलेल्या यादीमध्ये उमेदवाराला मतदान करणा—या सदस्यांच्या नावांची नोंद घेण्यात येईल.

यावेळी सदस्य श्री. गोविंदराम लुंड हे सभागृहातुन बाहेर गेले.

माझ्या उजव्या बाजुला पहिल्या ओळीमध्ये बाकडयावर बसलेल्या सदस्यांपासुन मतदान प्रक्रिया सुरु करण्यात येईल आणि ६ व्या ओळीमध्ये शेवटच्या बाकावर बसलेल्या सदस्यांनंतर संपविण्यात येईल. प्रत्येक उमेदवाराला मतदान करणा—या सदस्यांची नावे जाहिर करण्यात येतील.

सर्वप्रथम उप—महापौर पदाचे अनु. क्र. १ चे उमेदवार **श्री. आयलानी अनिल (विद्यार्थी) सी** यांचे नाव पुकारण्यांत येत आहे. **श्री. आयलानी अनिल (विद्यार्थी) सी** यांना मतदान करु इच्छिणा—या सदस्यांनी आपले हात वर करावेत:—

मतदान केलेल्या सदस्यांच्या नावांची नोंद पुढीलप्रमाणे जाहिर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पालिका सदस्यांचे संपूर्ण नाव |
|---|---|
| १ | श्री. भारत रामचंद्र राजवानी (गंगोत्री) |
| २ | श्री. राजू जग्यासी |
| ३ | श्री. गुप्ता प्रभूनाथ दुखंती |
| ४ | श्री. ठाकुर नरेंद्रकुमार उर्फ (कुमारी)केवलराम |
| ५ | *श्रीमती वेलकर सुरेखा राजन* |
| ६ | श्रीमती सुजाता रमेश रिझवानी |
| ७ | श्री. भठीजा (बब्बु) संजय |
| ८ | श्री. एडके गणपत गोविंद |
| ९ | श्री. ॲड. अनिल (विद्यार्थी) सी. ऐलानी |
| १० | श्री. रविंद्र दशरथ बागूल |
| ११ | श्री. हिरानंद आत्माराम जग्यासी (सांई) |
| १२ | श्री. चहाळ सतीश (बाजीराव) तात्याबा |
| १३ | श्रीमती संगीता राजेश कंडारे |
| १४ | श्रीमती सरोजनी मुरलीधर टेकचंदानी |
| १५ | श्रीमती मंजू ईश्वर पोपटानी |
| १६ | श्री. तुलसीदास बद्रीचंद वसिटा |
| १७ | श्री. मोहन साधवानी |
| १८ | श्रीमती उदासी इन्दिरा जमनादास |
| १९ | श्रीमती मालती राधाचरण करोतिया |
| २० | श्रीमती रजनी महाडिक |
| २१ | श्री. सुंदर आसनदास मंगतानी |

त्यानंतर उप—महापौर पदाचे अनु. क्र. २ चे उमेदवार **श्री. ठाकुर विनोद लालसिंग** यांचे नाव पुकारण्यांत येत आहे. **श्री. ठाकुर विनोद लालसिंग** यांना मतदान करु इच्छिणा—या सदस्यांनी आपले हात वर करावेत:—

मतदान केलेल्या सदस्यांच्या नावांची नोंद पुढीलप्रमाणे जाहिर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पालिका सदस्यांचे संपूर्ण नाव |
|---|---|
| १ | श्री. मोहन (गारो) रामरख्यानी |
| २ | श्री. इदनानी राजू (जीवन) चंद्रभान |
| ३ | श्रीमती आशान लिलाबाई लक्ष्मण |
| ४ | श्री. सुरेश मधुकर जाधव |

| | |
|---|---|
| ५ | श्री. ठाकूर विनोद लालसिंग |
| ६ | श्रीमती चंद्रा राजू टेकचंदानी |
| ७ | श्रीमती वनवारी मोना अशोक |
| ८ | श्रीमती कविता लक्ष्मणदास सिरवानी |
| ९ | श्रीमती मनसुलकर शिला सुभाष |
| १० | श्री. दिलीपकुमार देविदास जग्यासी |
| ११ | श्री. दत्तात्रय नारायण पवार |
| १२ | श्री. भजनलाल लक्ष्मण रामचंदानी |
| १३ | श्रीमती चैनानी ज्योती रमेश |
| १४ | श्रीमती निलम प्रेमसिंग रावत |
| १५ | श्री. पुरस्वाणी जमनादास खुबचंद |
| १६ | श्री. आयलानी कुमार उत्तमचंद |
| १७ | श्रीमती जया प्रकाश माखीजा श्री. |
| १८ | श्री. राम (चार्ली) फुंदुमल पारवानी |
| १९ | लाल देवनदास पंजाबी |
| २० | श्री. बच्चाराम रूपचंदानी |
| २१ | श्रीमती डॉ. निना प्रकाश नाथानी |
| २२ | श्रीमती शकुंतला पाटील |
| २३ | *श्री. हरेश परमानंद जग्यासी* |
| २४ | श्री. सुखरामानी महेश पहलाजराय |
| २५ | कु. जग्यासी शकुंतला जीवनलाल |
| २६ | श्री. किशोर जग्यासी |
| २७ | श्री. मुकेश सोहन तेजी |
| २८ | श्री. लालबिहारी बुझारत यादव |
| २९ | श्री. भुल्लर राजेंद्रसिंह वि. (महाराज) |
| ३० | श्री. बोडारे धनंजय बाबूराव |
| ३१ | श्री. चव्हाण रमेश महादेव |
| ३२ | श्री. गायकवाड दिलीप दशरथ |
| ३३ | श्रीमती मीना सोनेजी (सोंडे) |
| ३४ | श्री. रामसागर जनार्दन यादव |
| ३५ | श्रीमती बोडारे वसुधा धनंजय |
| ३६ | श्रीमती चौधरी राजश्री राजेंद्र |
| ३७ | श्रीमती बेबी उर्फ नेहा नंदकूमार भोईर |
| ३८ | श्रीमती ज्योती शाम माने |
| ३९ | श्रीमती विद्या विजय निर्मले |
| ४० | श्रीमती जयश्री सुनिल सुर्वे |
| ४१ | श्री. विजय खंडु सुपाळे |
| ४२ | श्री. राजेश देवेंद्र वानखेडे |
| ४३ | *श्री. पाटील प्रधान धर्मा* |
| ४४ | श्री. शेखर केशव यादव |
| ४५ | श्री. मोरे भानजी भिकाजी |
| ४६ | श्री. ढोके जनार्दन किशनराव |
| ४७ | श्रीमती पंचशिला नाना पवार |
| ४८ | *श्रीमती लता शांताराम निकम* |
| ४९ | श्रीमती सुमन गजानन शेळके |

| | |
|---|---|
| ५० | श्री. प्रशांत धांडे |

यावेळी श्री. अंकुश म्हस्के मत घेतांना आपले हात वर केले नाही परंतु मत गणना संपल्याने त्यांनी हात वर करुन आपले मत उमेदवार श्री. ठाकुर विनोद लालसिंग यांच्या बाजुने नोंद करण्यास इच्छा व्यक्त केली परंतु त्यांच्या मताची नोंद घेण्यात आली नाही.

उप—महापौर पदाच्या निवडणकीमध्ये ज्यांनी भाग घेतला नाही त्यांचे नावे पुढीलप्रमाणे आहे.

**तटस्थ सदस्यांची संख्या —**

| | |
|---|---|
| १ | श्रीमती जयश्री (जया) ज्ञानेश्वर पाटील |
| २ | श्री. नरेंद्र (रवीभाऊ) दवणे |

<u>पीठासीन अधिकारी (श्री. सुभाष सोनवणे):—</u> आता मतदान प्रक्रिया समाप्त झाली आहे म्हणुन यापुढे मी निकालाची घोषणा करतो.

## <u>निकाल घोषणा</u>

उल्हासनगर महानगरपालिका उप—महापौर पदाच्या निवडणूकीमधील प्रत्येक उमेदवाराला मिळालेल्या मतांचा तपशिल त्यांच्या नावासमोर नमुद करण्यांत आला असून तो पुढीलप्रमाणे आहे:—

| अ.क्र. | उमेदवारांचे नाव | मतदानाची संख्या |
|---|---|---|
| १. | श्री. आयलानी अनिल (विद्यार्थी) सी. | २१ |
| २. | श्री. ठाकुर विनोद लालसिंग | ५० |
| **एकुण मतदान संख्या —** | | ७१ |
| **तटस्थ सदस्यांची संख्या —** | | ०२ |

महापौर व उप—महापौर पदासाठी निवडणूका घेणे नियम २००५ मधील नियम ७ (७) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये **उप—महापौर** पदाचे उमेदवार ***श्री. ठाकुर विनोद लालसिंग*** यांना *एकूण ७१ पैकी ५० इतकी* म्हणजेच सर्वाधीक मते मिळाल्यामुळे त्यांची ***उप—महापौर*** म्हणून रीतसर नेमणुक झाली आहे असे मी जाहिर करतो.

दिनांक :—४/१२/२००९ (सुभाष सोनवणे)

जिल्हाधिकारी
तथा
पीठासीन अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

स्थान :— उल्हासनगर महानगरपालिका सभागृह

दुपारी १२.०० वाजता ***श्री सुभाष सोनवणे जिल्हाधिकारी तथा पीठासीन अधिकारी*** उल्हासनगर महानगरपालिका यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(प्रकाश पं. कुकरेजा)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका